# सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र

**खण्ड ३**

**डॉ. मुहम्मद आज़म**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र

## (त्रिखण्डात्मक)

## खण्ड – तीन

**डॉ. मुहम्मद आज़म**

एम.ए. (हिन्दी-फ़ारसी); एम.एड. (तौलनिक शिक्षणशास्त्र);
पीएच.डी. (हिन्दी); एम.ए. (समग्र उर्दू); पीएच.डी. (उर्दू)
माजी हिन्दी, उर्दू आणि फ़ारसी विभाग प्रमुख,
अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर – ४१४००१ (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२४१) २३४३७५८
भ्रमणध्वनी : ८३०८३३०६३४

*महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई*

- **सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र (त्रिखण्डात्मक) खंड तीन**
  डॉ. मुहम्मद आजम

- **पहिली आवृत्ती :** २०१९

- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
  पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
  सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

- **अक्षरजुळणी :**

  सौ. अनिता विनायक भालेराव,
  क्रिएशन, 'जयश्री', एन-१, सिडको,
  औरंगाबाद - ४३१ ००३
  दूरध्वनी : ०२४०-२४८६९१०

- **मांडणी व रचना :**

  श्री. विनायक अंबादास भालेराव
  औरंगाबाद - ४३१ ००३
  भ्रमणध्वनी : ९४२३३९६८८१

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  कोल्हापूर-४१६ ००३.

- **मुखपृष्ठ :**

  श्री. भ. मा. परसवाळे, हिंगोली
  भ्रमणध्वनी : ९४०३२२४१३०

- **एकत्रित मूल्य : ६२३/-**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

आज आपण एकवीसाव्या शतकात शिक्षण, विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगतीचा एक एक टप्पा गाठत असताना जगभरात अवर्षणाचं, अतिवृष्टीचं आणि पर्यावरण असंतुलनाचं संकट आपल्या डोक्यावर घोंगावत असताना जाती-धर्माच्या नावानं दहशतवादाचं भूत भेडसावत आहे. यातून जगभर अशांती अन् भीतीच्या काळ्याकुट्ट ढगांनी आसमंत भरून व्यापला आहे.

खरे तर सुखद जगण्यासाठी धर्म पाळणे, हा निसर्गाचा जगमान्य नियमच आहे. निसर्गात प्रत्येक गोष्ट निसर्ग नियमाप्रमाणेच घडत असते. नियम मोडले की निसर्ग शिक्षा करतो. आपणही जगताना, वागताना, खाताना नियम मोडला की शिक्षा होणारच; पण बरेचदा ती दृश्य स्वरूपात नसते. आपले खाणं-पिणं अन् वागण्यातून आपल्या शरीर-मनाची जडण-घडण होत जाते. शरीर हे स्वयंचलित यंत्र आहे. चुकीचे केले की बिघाड ठरलेला. मग त्याची सर्व्हिसिंग स्वत: अथवा डॉक्टरांकडे जाऊन करावी लागते.

समाजात प्रत्येक माणूस या समाजाचा घटक असतो. समाज धर्म भावनेने बांधलेला असतो. प्रत्येक धर्मात स्वातंत्र्य, बंधूभाव आणि समतेचा संदेश हा मूळ गाभा असतो. मात्र प्रत्येक धर्मातील काही माणसे स्वार्थ, मोह, हेवा याचे गुलाम बनून हिंसकवृत्तीचे बळी बनतात. अन् त्यातून अतिरेकी दहशतवाद डोकं वर काढतो.

डॉ. मुहम्मद आज़म यांनी 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' या बृहद ग्रंथात या मानवी प्रवृत्तींचा शोध घेतांना यावर मानवता धर्माचा मार्ग प्रतिपादिला आहे. ते म्हणतात, सूफ़ी हे इस्लाम धर्माचे पाईक, शांतीचे खंदे पुरस्कर्ते आहेत. सूफ़ी धर्म तत्त्वज्ञान शांती मार्ग आहे. जगभरातील अशांततेचं मूळ प्रत्येकाच्या स्वार्थात आहे. प्रत्येक चांगल्या अन् वाईट गोष्टींची सुरुवात आपल्यापासूनच होत असते. त्याकरिता सदाचार हा परमार्थाचा पायाच आहे. शांतीचे अन् विश्वबंधुत्वाचे साम्राज्य जगभर नांदावे हे इस्लाम धर्माचे उदात्त ध्येय व उद्दिष्ट्यच आहे आणि या करिता सूफ़ी संत झटत आले आहेत.

जगभरातील माणसं ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, त्यामुळे सर्वांनी परस्पर प्रेम अन् गुण्या-गोविंदाने जगावे, असे सर्व धर्मातील संत-महात्म्यांनी सांगून ठेवले आहे. जगभरातील लढाया, दंगेधोपे बंड-उठावाच्या मुळाशी मानवी मनाचा स्वार्थच आहे.

त्यामुळेच सर्व संतांनी मन आवरा हा संदेश देऊन, प्रसंगी स्वार्थी माणसं जागोजागी दहशतवाद अन् हिंसा सुरू ठेवत आहेत. यास वेसण घालण्याचं काम सूफ़ी व अन्य सर्व संत वर्षानुवर्षे शिकवण देत आले आहेत. सद्‌विचार व सदाचार हे सूफ़ी संतांचे गुणकारी औषधच आहे.

या निसर्ग सृष्टीमध्ये प्रत्येक गोष्टीत विविधता आणि वैचित्र्य आढळून सर्व एका निसर्ग नियमाने ती बांधलेली आहेत. प्रत्येकाने नियम पाळणे हा इथला कायदा. जो नियम मोडेल, त्याला शिक्षा ठरलेली; परंतु काही माणसेमनाविरुद्ध स्वार्थाच्या आहारी जाऊन हिंसेचे पाईक बनतात. अन् तिथचं दहशतवादाचा उदय ठरलेला. यावरचा उपाय डॉ. आज़म यांनी या ग्रंथात सांगितला आहे. ते म्हणतात, संपूर्ण जगास विश्वबंधुत्व आणि विश्वशांतीची तहान भूक आहेच. त्याकरिता सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. हेच काम डॉ. आज़म यांनी या ग्रंथात समर्थपणे केले आहे. या बृहत ग्रंथात त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान, पाश्चात्य तत्त्वज्ञान, इस्लामी तत्त्वज्ञान, आणि सूफ़ी तत्त्वज्ञान यांची सुलभपणे ओळख करून दिली आहे.

आपापल्या मनाची शांती ढळू न देता, सर्व धर्म तत्त्वांचा आदर करत मानवी मूल्य जपण्यासाठी मनाची प्रसन्नता टिकवावी लागेल. संत तुकोबांनी मनाच्या अशा प्रसन्नतेत सिद्धीची बीजे पाहिली आहेत. तेच कार्य 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशस्त्र' या डॉ. मुहम्मद आज़म यांच्या ग्रंथांच्या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास या ग्रंथ प्रकाशनाची संधी त्यांनी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार.

दिनांक : १४/१/२०१८

**बाबा भांड**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

# अभिप्राय : डॉ. भालचंद्र नेमाडे

रा. मुहम्मद आजम यांचा प्रस्तुत 'सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' हा ग्रंथ महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे कार्य केलेल्या सूफी दर्शनावरचा एक पायाभूत ग्रंथ ठरेल, याची मला खात्री आहे. अनेक वर्षांच्या परिश्रमाचे हे फळ असून मराठी साहित्य, संस्कृतीआणि धर्मविचार या क्षेत्रांतील अभ्यासक्रमांना अपरिहार्य ठरेल अशी सांगोपांग माहिती ह्या त्रिखंडात्मक बृह्दग्रंथात मिळते. सूफी विचारावर एकत्रित असा व्यासंगपूर्ण तपशील मराठीत कुठल्याही अन्य ग्रंथात सापडणार नाही. मी अनेक वर्ष तौलानिक भारतीय साहित्य अनेक विद्यापीठांमध्ये शिकवत असतांना संपूर्ण जगात प्रभावशाली ठरलेल्या ह्या तत्त्वज्ञानासंबंधी मला परक्या भाषांमधील पुस्तकांचाच आधार घ्यावा लागे, कारण मराठीत ह्या विषयावर सविस्तर चर्चा करणारी सामग्री फारशी नव्हती. आता रा. मुहम्मद आजम ह्या मराठी विद्वानाने लिहिलेल्या ग्रंथांनी ही उणीव बऱ्याच अंशी भरून येत आहे.

मराठीत तसेच इतर भारतीय भाषांमध्येही सूफी तत्त्वज्ञानाच्या प्रभावाचे कार्य फार मोठे ठरले आहे. विनोबा भावे, साने गुरुजी, रा. चिं. ढेरे, सेतु माधवराव पगडी आदि लेखकांनी ह्याबद्दल मौलिक ग्रंथरचना करून ठेवली आहे. अस्सल भारतीय बहुविधता आणि सहिष्णुता जोपासणारे आणि इथल्या देशी परंपरा, लोककला, लोकाचार जपणारे सूफी तत्त्वज्ञान सिंधी, पंजाबी, काश्मिरी, हिंदी आदि उत्तरेतील भाषांमध्ये क्रांतिकारक बदल करणारे ठरले आहेत. गुरू नानक, कबीर, शाह लतीफ, बंगाली बाऊल फकीर असे मोठमोठे भारतीय साहित्यकार सूफी प्रभावाची जिवंत ओळख करून देतात. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या घराण्यात, एकनाथाच्या गुरूपरंपरेतील सय्यद चांदसाहेब कादरी उर्फ चांद बोधला, तुकारामाच्या चिस्ती सूफी गुरू परंपरेच्या सय्यद बंदानवाज गेसूदराज आणि महादजी शिंदे यांच्यापर्यंत सूफी संतांना मध्यवर्ती स्थान होते. मराठी संस्कृती किती समावेशक आहे, याचे हे ठळक उदाहरण आहे. देवगिरीजवळ खुल्दाबाद येथे तर मोठे सूफी विद्यापीठ भरभराटले होते. गावोगाव पीर, समाध्या, जत्रा आजही आढळतात. सूफी विचारांद्वारे आपण अरबस्तान, इराण, तुर्कस्तान आणि उझबेक वगैरे मध्य आशियातील संस्कृतींशी बंधुभावाच्या नात्याने जोडले गेलो होतो. देशाबाहेरील ग्रीक, इराणी, झरतुष्ट्र, खिस्ती ह्या तत्त्वज्ञानांशी तसेच देशी जैन, बौद्ध आणि इतर भारतीय दर्शनांशी स्वतःला सेंद्रियपणे जोडूण घेणारा भारतीय सूफी वाद आपल्या सर्व भाषांमध्ये अत्यंत सर्जनशील ठरला आहे. मराठीत एकनाथ, तुकाराम ही देदिप्यमान उदाहरणे सूफी प्रभावाची आहेतच. महाराष्ट्रातला पहिला सूफी कवी शहा मुंतोजी ब्राह्मणी (बहामनी) याच्या दखनी भाषेतील पंचीकरण ग्रंथात लिहिल्याप्रमाणे :

।। हिंदू - मुसलमान येक कर दिये ।।

हे सूफी स्वप्न आपल्याला अजूनही पुरे करता येऊ नये, याची खंत वाटते. मराठी भक्तीकाव्यात ईश्वराला प्रेयसी मानून भक्तीरस अविष्कार करण्याची उन्मनावस्था म्हणजे मधुराभक्तीचे मूळ ही सूफी-मराठी संयोगात सापडते.

कुराणात इस्लामचे त्याज्य ठरवलेल्या संगीतनृत्यादि कला सुफींनी बंडखोरी करून प्रत्यक्ष आचरणात आणल्या आणि हा सनातनी दुराग्रह टाकून देऊन उत्तुंग सर्जनशीलता जोपासली. साहित्यात तर वैश्विक मानदंड ठरतील असे मीर, गालिब, मोमिन हे कवी प्रभावशाली होते. उर्दू ह्या महाराष्ट्रात जन्मलेल्या आर्यभाषेत उत्तमोत्तम काव्यप्रकार, अलंकार, शैलीरूपे आणि मुशायरादि जगात कुठे नसतील असे लोकाभिमुख वाङ्मयव्यवहार रुढ केले. भारतीय संगीताला सूफी तत्त्वज्ञानाने दिलेले गौरवशाली रूप तर अमीर खुस्रोपासून आजपर्यंत बहरत आले आहे.

रा. मुहम्मद आजम यांनी आपल्या व्यासंगी शैलीत अनेक तपशील मार्मिक पद्धतीने दिले आहेत आणि जागतिक सूफी वाङ्मयाच्या नकाशावर भारतीय सूफी संप्रदायांचे अमूल्य योगदान सिद्ध केले आहे. मोठा आवाका असूनही हा ग्रंथ त्यांच्या अस्सल मराठी भाषेच्या वापरामुळे वाचनीय झाला आहे. सूफी तत्त्वज्ञानासंबंधी एकत्रितपणे सुसंगत मांडणी करण्याचे रा. आजम यांचे कौशल्य वाखाणण्या सारखे आहे. त्यांनी वापरलेली परिभाषा आणि शैली अहमदनगरच्या अस्सल मराठमोळ्या धाटणीमुळे सुलभ अर्थवाही झाली आहे. मराठी मातृभाषा असलेल्या मुसलमान विद्वानांमध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले पाहिजे. उदा. "अध्यात्माच्या प्रक्रियेत कठीण चढण चढून गेल्यावर जे घाटमाथे लागतात", त्या अवस्थांचे त्यांनी केलेले विश्लेषण पाहावे. मराठीतल्या नव्या पिढीतल्या मुसलमान लेखकांनी ही परंपरा जोपासली पाहिजे, कारण ही महाराष्ट्राची वैभवशाली भक्तीपरंपरा आहे.

रा. मुहम्मद आजम यांनी हा बहुमोल ग्रंथ रचून मराठीची अतुलनीय सेवा केली आहे. प्रचंड मोठा जागतिक विचारांचा आवाका असूनही त्यांनी संपूर्ण विवेचन संतुलित आणि सुबोध केले आहे. मराठीच्या विद्यार्थ्यांना तसेच आंतरविद्याशास्त्रीय तौलनिक साहित्याच्या अभ्यासकांना हा संदर्भग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल, याची मला खात्री आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. बाबा भांड यांनी ह्या बहुमोल प्रकाशनाची जबाबदारी लक्षपूर्वक पार पाडली, हे स्तुत्य आहे.

**डॉ. भालचंद्र नेमाडे**

गोहाती,
२६ जानेवारी २०१८

# ग्रंथकर्त्याचे मनोगत

**चालना व संकल्प :**

५ मे २००९ रोजी माझे प्रथम ग्रंथ ''सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन''ची हस्तलिखित प्रत प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांच्या स्वाधीन केल्यानंतर मी त्या ग्रंथलेखनाचा शीण घालविण्यासाठी जवळ-जवळ तीन वर्षे लेखनकार्यास विराम दिला होता. मात्र दरम्यान माझे जिवलग मित्र सोलापूरचे **प्रा. फ़ख्रुद्दीन बेन्नूर** हे आपल्या खाजगी कामानिमित्त अहमदनगरला आले असता वेळ काढून माझ्या घरी येऊन भेटले. कुशल-मंगल झाल्यानंतर त्यांनी सहज विचारले, 'सध्या काय चालले आहे?,' 'काही नाही, आराम आहे,' मी उत्तरलो. माझे हे उत्तर ऐकून ते संतापून गरजले, 'असे काय करता? वृद्धापकाळ आहे. तब्येतीचे काही खरे नसते. अद्याप तुमचे आरोग्य उत्तम आहे. उरलेल्या वेळेचा सदुपयोग करा. तुमचा पुढचा मनोनीत प्रकल्प तत्काळ हाती घ्या.'

माझे डोळे उघडले. सल्ला पटला. मी ताबडतोब दुसऱ्या दिवसापासून माझे मनोनीत प्रकल्प म्हणजेच **'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र'**च्या लेखनास सुरुवात केली. हा प्रकल्प दि. १० एप्रिल २०१२ रोजी हाती घेतला व तो दि. १० मार्च २०१४ रोजी तडीस नेला. मित्रवर्य प्रा. बेन्नूर यांच्या प्रेमळ कानउघाडणीसाठी मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांची कानउघाडणी माझ्या सदरहू ग्रंथलेखनासाठी ऊर्जस्वी व ओजस्वी प्रेरणाच ठरली! तिने पुढील लेखनकार्यास शेवटपर्यंत हुरूप देऊ केले.

**प्रयास :**

ग्रंथलेखनाचा आराखडा निश्चित करण्यामध्ये आणि प्रकरणांची मांडणी व विभागणी करण्यामध्ये प्रो. देविदास दत्तात्रेय वाडेकरद्वारा संपादित ''मराठी तत्त्वज्ञान - महाकोश'' (त्रिखंडात्मक)च्या तिन्ही खंडांचा बहुमोल उपयोग झाला. इतकेच नव्हे तर माझ्यासारख्या वाङ्मयाच्या एक साधारण अभ्यासकास तत्त्वज्ञानाची बैठक भक्कम करण्यामध्ये या महाकोशाचा हातभार आहे, हे नाकारता येत नाही. याच्या अभ्यासामुळे तत्त्वज्ञानाच्या गूढ आणि रुक्ष संकल्पना सुस्पष्ट होत गेल्या. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाची चांगली ओळख झाली. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास योग्य दिशा मिळाली आणि लेखनाचा मार्ग सुकर झाला. ग्रंथलेखन तीन पदरी असल्याचे वाचकांना आढळून येईल. पहिले पदर भारतीय तत्त्वज्ञानाचे, दुसरे इस्लामी तत्त्वज्ञानाचे; तर

तिसरे सूफ़ी तत्त्वज्ञानाचे. काही ठिकाणी स्वतंत्रपणे पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे विवेचन आढळून येईल. या मांडणीमुळे वाचकांच्या मनात परोक्ष तुलना सहजपणे प्रस्थापित होऊ शकेल.

उपरोक्त तीन्ही खंड माझ्या अभ्यासासाठी अहमदनगरचे प्रसिद्धीपराङ्मुख आणि अत्यंत विनम्र असे **सूफ़ी फैयाज़ अहमद पटेल,** माजी अतिरिक्त आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पुरविले. हे ग्रंथ माझ्या प्रथम प्रकल्पापासून म्हणजे जवळजवळ आठ-नऊ वर्षे त्यांनी मजजवळ अभ्यासार्थ ठेवण्याची कृपा केली आणि दरम्यानच्या काळात या ग्रंथांविषयी त्यांनी ब्रसुद्धा काढला नाही. मीच ओशाळून त्यांना ते परत घेण्याची विनवणी केली असता ते अत्यंत नम्रपणे म्हणत, ''ग्रंथ हे वाचण्यासाठी, अभ्यासासाठीच असतात. तुमच्यासारख्याकडून त्यांचा सदुपयोग होत आहे, हे मी माझे भाग्य समजतो. ते परत करण्याची मुळीच घाई करू नका. तुमच्या लेखनात त्यांचा भरपूर उपयोग करून घ्या.'' सहकार्याची व सदिच्छेची केवढी ही पराकाष्ठा! त्यांच्या ऋणातून उतराई होणे महाकठीणचनसून जवळजवळ अशक्यच आहे. इतकेच नव्हे तर माझ्या सदरहू ग्रंथाचे जवळजवळ १४०० पानांचे हस्तलेखन अत्यंत सूक्ष्मपणे वाचून 'व्यक्ती-नाम-सूची'चे क्लिष्ट काम पण त्यांनी मोठ्या आनंदाने स्विकारून ते पूर्ण केले. तेच माझ्या या ग्रंथाचे प्रकाशनपूर्व प्रथम वाचक आहेत. त्यांच्या या उत्स्फूर्त सहकार्यासाठी त्यांचे आभार-प्रदर्शनासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत.

आकाशात उंच उडत असताना सुद्धा घारीचे चित्त तिच्या पिलापाशी असते. तद्वत अहमदनगरपासून लांब पुण्यामध्ये असूनसुद्धा माझे परमस्नेही डॉ. मूसा बागवान व ज्येष्ठ मित्र कै. प्राचार्य रामदास डांगे यांच्या पर्यवेक्षणाची सूक्ष्म दृष्टी मजवर सदोदित राहिली आहे. माझ्या लिखाणाच्या प्रगतीविषयी इत्थंभूत माहिती ते वेळोवेळी घेत असत. त्यांची ही कृपादृष्टीपण माझ्यासाठी प्रेरक ठरली आहे. त्या दोघांना 'उपकार' शब्द रूचणार नाही. म्हणून मी याबाबतीत मौन धारण करणेच श्रेयस्कर ठरेल.

**मनोकामनापूर्तीचे पाच एकसमान आश्चर्यकारक प्रसंग**

**पहिला प्रसंग :** दि. १९ जानेवारी, २०१३ चा जळगाव येथील एक प्रसंग. अध्ययनासाठी इंग्रजी भाषेतील आधारग्रंथांपैकी फक्त ए. जे. आर्बेरी यांचे 'सूफ़ीझम' हे पुस्तक हाती लागणे बाकी होते. अखिल भारतीय मराठी मुस्लिम साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदावरून मी जळगाव येथे दि. १८ जानेवारी २०१३ रोजी माझे अध्यक्षीय भाषण संपवून मध्यंतरामध्ये विश्रांतीसाठी हॉलमधून बाहेर पडलो. इतक्यात **फ़हीम अहमद** नावाचा एक अनोळखी तरुण लगबगीने माझ्याजवळ येऊन बोलताना म्हणाला, 'माझ्याजवळ सूफ़ी तत्त्वज्ञानावर इंग्रजीमध्ये एक पुस्तक आहे. ते आपणास उद्या दाखवितो. वायद्याप्रमाणे तो मला दुसऱ्या दिवशी त्या पुस्तकासह भेटला. काय आश्चर्य! त्याने माझे बहुप्रतीक्षित पुस्तकच मला दाखविले! चिंच पाहिल्याबरोबर जसे तोंडास पाणी सुटते तद्वत माझ्या मनात ए. जे. आर्बेरीच्या त्या 'सूफ़ीझम' या पुस्तकाविषयी उत्कट लालसा निर्माण झाली. मनातील लालसा जिव्हेवर तत्काळ पोहोचली आणि ती उच्चारण्याअगोदरच काय चमत्कार! त्या उदार तरुणानेच स्वेच्छेने ते पुस्तक मला सहर्ष सप्रेम भेट दिल्याचे घोषित केले. ही ईश्वरी कृपेची लीला नव्हे तर काय आहे! सदरहू पुस्तकाचा मला 'रक़्स' (सूफ़ींचे नृत्य), नामस्मरण विधी आणि सूफ़ीशास्त्र व सरावाची संरचना या विषयावरील लेखनासाठी बहुमोल उपयोग झाला.

**दुसरा प्रसंग :** दि. ४ एप्रिल २०१३ रोजी बार्शी (जि.सोलापूर) येथे **सूफ़ी गुलाम हुसैन मुस्तफ़ा बेग** यांच्याकडून 'दि मॉडर्न पार्शियन डिक्शनरी' (पर्शियन-उर्दू-इंग्लिश) हा प्रोफेसर एफ्. डी. रज़ी यांचा हा मनोवांछित शब्दकोश अयाचितपणे स्वयंस्फूर्त रीतीने सप्रेम भेटस्वरूप प्राप्त झाला. तत्कालीन चाललेल्या माझ्या लेखनासाठी उपरोक्त शब्दकोशाची मला खरोखर नितांत आवश्यकता होती. परमेश्वरानेच न मागता माझी ही गरज आपोआप पूर्ण केली.

**तिसरा प्रसंग :** 'भक्तीचा राजमार्ग : ईश्वराचे नामस्मरण' या विषयाचे लेखन करण्यासाठी माझ्या डोक्यात त्याची रुपरेषा निर्माण होत असताना तत्संबंधी भारतीय संतांची संकल्पना मांडणे जरूर होते. याची निकड दि. १ जुलै, २०१३ रोजी **सूफ़ी फैयाज़ अहमद पटेल** यांनी त्याच सुमारास उत्स्फूर्तपणे दिलेल्या रामचंद्र कृष्ण कामत यांच्या 'नामचिंतामणी' या पुस्तकाने भागविली. हा निव्वळ योगायोग नसून, ती ईश्वरी कृपाच आहे!

**चौथा प्रसंग :** ''सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन'' माझ्या या ग्रंथाने प्रभावित होऊन अहमदनगर येथील एक **सुप्रसिद्ध गायक पवन नाईक** याने स्वेच्छा माझे शिष्यत्व ग्रहण केले. 'समाअ'विषयी इस्लामी (धार्मिक) दृष्टिकोन समजून घेण्यासाठी दि.२० सप्टेंबर, २०१३ रोजी सच्छिष्य पवन नाईक यांनी दिलेले सूफ़ी फ़क़ीर सय्यद महबूब अली शाह निज़ामी यांचे 'समाअ' (क़व्वाली) हे इंग्रजी पुस्तक फार उपयोगी पडले. पूर्ण ब्रह्मस्वरूप 'ॐकार'च्या लेखनासाठी त्यांनी दिलेले श्री. राधागोविंद पातर यांचे 'मानव और धर्म' हे पुस्तक पण अत्यंत उपयोगी सिद्ध झाले. 'समाअ'चे विवेचन प्रस्तुत करण्यासाठी भारतीय संगीताची पृष्ठभूमी जाणून घेणे परम आवश्यक होते. याची परिपूर्तता 'संगीत विशारद' लेखक वसंत (संपादक - डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग) या ग्रंथामुळे झाली; आणि त्यामुळे लिखाणास थोडीफार खोली प्राप्त झाली. उपरोक्त तीन्ही ग्रंथ मी न मागता सच्छिष्य पवन नाईक यांनी स्वत: होऊन माझ्या अभ्यासासाठी घरपोच केले. ही पण अयाचित ईश्वरी कृपा नव्हे काय? सच्छिष्यास अयाचित बहुमोल मदतीसाठी शुभ आशीर्वादाव्यतिरिक्त सर्वोत्तम उपहार कोणता बरे असू शकेल! तर जळगावचा तो अनोळखी तरुण **फ़हीम अहमद** याचे आभार प्रदर्शन करणे अगत्याचे आहे. **सूफ़ी गुलाम हुसैन मुस्तफ़ा बेग** आणि **सूफ़ी फ़ैयाज़ अहमद पटेल** या सूफ़ीद्वयांच्या ऋणात ऋणांकित राहणेच ग्रंथकर्त्यास आवडेल.

**पाचवा प्रसंग :** पाचवा शेवटचा चमत्कार हा रविवार दिनांक २७ ऑगस्ट २०१७ रोजी स्वप्नातही नसताना अकस्मात घडला. तो असा - मुक्काम बोल्डा, ता. कळमनुरी येथील **श्री. शफ़ी गोल्डेकर** हे माझे 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' या ग्रंथाचे चाहते आणि उत्कट प्रेमी आहेत. त्यांचा उपरोक्त तारखेस अकस्मात फोन आला. सूफ़ी संदर्भातील आपले एक ग्रंथ प्रकाशनाची सुवार्ता कळविली. या प्रकाशन समारंभाचे प्रमुख वक्ते म्हणून हिंगोलीचे प्रसिद्ध चित्रकार **श्री. भ. मा. परसवाळे** हे होते. माझ्या प्रस्तुत ग्रंथासाठी फक्त मुखपृष्ठ निश्चित करण्याचे नियोजन बाकी होते. उपरोक्त दिवशी श्री. शफ़ी यांनी

श्री. परसवाळे यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळवून दिली. संयोगाने श्री. परसवाळे सुद्धा सूफ़ी तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक असल्यामुळे त्यांनी माझ्या नवलेखनाविषयी सहज चौकशी केली आणि माझ्या या प्रस्तुत 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' या ग्रंथाची रूपरेषा जाणून घेतली व तत्काळ उत्स्फूर्तपणे त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून सदरहू ग्रंथासाठी सुंदर कलात्मक व समर्पक असे मुखपृष्ठ तयार करून देण्याचे अभिवचन दिले व ते त्यांनी पाळले. या शेवटच्या मनोकामनेपूर्तीसाठी पण माझ्यासाठी प्रभूकृपा धावून आली असेच म्हणावे लागेल. श्री. भ.मा. परसवाळे यांच्या या स्वयंस्फूर्त सहयोगासाठी त्यांच्या प्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्यच समजतो. त्यास्तव मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

अशा प्रकारे ज्या ज्या वेळेस ज्या ज्या ग्रंथांची गरज होती त्या त्या वेळेस परमेश्वर आपल्या कृपेने ते ते ग्रंथ उपरोक्त पाच व्यक्तींमार्फत अनायास पुरवीत गेला. केवढे हे त्याचे अनंत उपकार! त्या उपकारास स्मरून परमेश्वराचे आभारप्रदर्शनासाठी 'पवित्र कुराण'मधील पुढील श्लोक अनायास ओठावर येतो -

''फ़ज़्कुरुनी अज़्कुर्-कुम वश्कुरुली व ला तक्फुरुनि'' - २:१५२

म्हणजेच ''तर तुम्ही माझे स्मरण करा; म्हणजे मीही तुमचे स्मरण ठेवीन आणि माझे आभार मानीत राहा व माझ्याशी कृतघ्न होऊ नका.'' - २:१५२

**ग्रंथरचनेची षट्सूत्रे**

सारांश, प्रेरणा, प्रोत्साहन, पाठबळ, प्रयत्न, प्रसाद आणि प्रभू-कृपा ही या ग्रंथरचनेची षट्सूत्रे आहेत.

**(१) प्रेरणा :** सोलापूरचे मित्रवर्य **प्रा. फ़ख़्रुद्दीन बेन्नूर** यांची.

**(२) प्रोत्साहन :** परमप्रिय **डॉ. मूसा बागवान** आणि ज्येष्ठ मित्र **कै. प्राचार्य रामदास डांगे** यांचे प्रोत्साहन; तसेच **डॉ. रहीमशामियाँ चांदमियाँ शेख** या ज्येष्ठ स्नेह्यांचे वेळोवेळी दिलेले सल्ले शक्तिवर्धक सिद्ध झाले आहेत.

**(३) पाठबळ :** बार्शीचे **सूफ़ी गुलाम हुसेन शाह मुस्तफ़ा बेग** आणि अहमदनगरचे **सूफ़ी फ़ैयाज़ अहमद पटेल,** माजी अतिरिक्त आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आत्मिक व आध्यात्मिक पाठबळ.

**(४) प्रयत्न :** या बृहत् ग्रंथाच्या प्रकाशनाच्या विवंचनेत असताना माझे परममित्र **कॉ. विलास सोनवणे** हे माझ्या मदतीला धावून आले. त्यांनी या कामी पुणे येथील हर्मिसचे प्रकाशक **श्री. सुशील धसकटे** यांना हे मोठे व अवघड काम हाती घेण्याचे धाडस निर्माण करण्याविषयी प्रेरित केले व **श्री. धसकटे** यांनी पण कंबर कसली. त्यांनी नेटाने अक्षर जुळणीचे संगणकीय कार्य तडीस नेले. खरे तर या दोघांच्या प्रयत्नामुळेच हा ग्रंथ दृश्य स्वरूपात येऊ शकला.

या ग्रंथ प्रकाशनास चालना देणाऱ्या **कॉ. सोनवणे** व **श्री. धसकटे** यांचे आभार कसे मानावेत, हेच कळेनासे झाले आहे.

शेवटी ग्रंथाचा आकार, रचना व मांडणी तसेच इतर सर्व संगणकीय सोपस्कार कमीत कमी वेळेत कलात्मक, दर्जेदार व उच्च गुणवत्तेचे करून दिल्याबद्दल औरंगाबादचे **श्री. विनायक भालेराव** व **सौ. अनिता विनायक भालेराव** या दंपतीद्वयांचे आणि त्यांचे कुशल सहकारी **श्री. अनंत भालेराव** व अरबी वर्णाक्षरांसाठी **श्री. बिलाल** यांनी सहकार्य केले. या सर्वांचे आभार प्रदर्शन करणे अटळ असून अगत्याचे पण आहे. म्हणून या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**(५) प्रसाद :** संत-महात्मे आणि विद्वज्जनांचे कृपा-प्रसाद आणि सर्वांत शेवटी वाचकांची सदिच्छा ग्रंथकर्त्यासाठी 'पसायदान'च!

**(६) प्रभू-कृपा :** गरजेची पुस्तके यथायोग्य वेळेस विनासायास व अनायास पुरविण्यासंबंधी उपरोक्त पाच एकसमान आश्चर्यकारक प्रसंग घडवून आणणारी ईश्वरी कृपा म्हणजे प्रभू-कृपाच होय.

**एक लक्षवेधी सूचना**

प्रकरण २५ - ''मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या''मधील 'जादू किंवा यातुविद्या : इस्लामी व सूफ़ी दृष्टिकोन' या विवेचनांतर्गत वशीकरण आणि ताईतच्या संदर्भातील काही लिखाणावरून अंधश्रद्धेला प्रोत्साहन देण्याचा ग्रंथकाराचा हेतू आहे की काय असा संशय बळावण्याची दाट शक्यता आहे. मात्र इस्लामी लोकव्यवहार व लोकनीतिची कल्पना वाचकांना यावी, एवढ्याच मर्यादित हेतूने त्याने सदरहू भाग समाविष्ट केले आहे. हा मुद्दा वाचकांनी जरूर लक्षात घ्यावा. किंबहुना सूफ़ींकडून यांचा वापर क्वचितच आणि केवळ लोककल्याणाच्या गरजेपोटी विनामोबदला होत असल्याचे आढळून येते.

काही काही ठिकाणी वाचकास पुनरावृत्तीचा दोष आढळून येईल. आवश्यकतेच्या अनिवार्यतेमुळे असे घडले आहे. अटळ असल्यामुळे नाइलाजास्तव पुनरावृत्तीचा दोष दृष्टिपथात येतो. म्हणून वाचकांच्या उदारतेची अपेक्षा आहे.

इस्लाम धर्म किंवा तत्त्वज्ञानसंदर्भात, तसेच सूफ़ी तत्त्वज्ञान संदर्भातील विवेचनामध्ये संपूर्ण ग्रंथभर अनेक अवतरणे वाचकांना दिसतील. अवतरण संपल्यानंतर एका पाठोपाठ एक अशा दोन संख्या आणि मध्ये **:** (विसर्ग चिन्ह) दिसेल. पैकी प्रथम संख्या ही पवित्र कुरआनमधील सूरा **:** अर्थात् अध्याय क्रमांक निदर्शक आहे, तर दुसरी संख्या त्या अध्यायामधील आयत (आयात) अर्थात् महाश्लोक क्रमांक दर्शविते.

**सहायक व संदर्भ ग्रंथांविषयी थोडेसे...**

हे ग्रंथ तीन प्रकारात मोडतात- (१) संदर्भ ग्रंथ, (२) स्रोत ग्रंथ आणि (३) परामर्शित ग्रंथ. साधारणत: उद्धरण जर दोन पृष्ठांइतका असेल तर त्याची गणना संदर्भ ग्रंथ स्वरूपात करण्यात आली आहे. हा संदर्भ मजकूर संपताच त्याखाली कंसात देण्यात आला आहे. जर अवतरण त्यापेक्षा मोठे असेल तर त्याची गणना स्रोत ग्रंथ स्वरूपात करण्यात आली आहे. स्रोत ग्रंथांची सूची ग्रंथाच्या शेवटी ससंदर्भ देण्यात आली आहे. गरजेपुरते अवलोकन करण्यात आलेल्या ग्रंथांना परामर्शित ग्रंथ म्हणून संबोधण्यात आले आहे. याची यादी पण शेवटी दिलेली आहे. ग्रंथकर्ता हा उपरोक्त सर्व प्रकारच्या ग्रंथ-लेखकांचा ऋणी आहे. त्यांच्या आधाराविना ग्रंथरचनाच करता आली नसती.

**अर्पण पत्रिकेविषयी**

शेवटी ईश्वरी कृपेशिवाय ग्रंथरचना पूर्णत्वास नेणे अशक्यप्राय असल्यामुळे **अल्लाहच्या** उपकाराप्रीत्यर्थ सर्वप्रथम ''अर्पण पत्रिका'' नमूद केल्याशिवाय राहवत नाही. म्हणून या ग्रंथाचा आरंभ 'अर्पणपत्रिके'ने होतो.

**कृतज्ञता ज्ञापन**

या ग्रंथाचे 'सूफ़ी तत्त्वज्ञान : सखोल विश्लेषण' या स्वरूपातील हा ग्रंथ जवळजवळ दोन हजार (२,०००) पृष्ठे इतका बृहत असल्याकारणाने छपाईसाठी थोड्या फार प्रमाणात आर्थिक भार हलका व्हावा या हेतूने ग्रंथकर्त्याने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे आपला अर्ज पाठवला होता. मात्र मराठी भाषा विभागाच्या तज्ज्ञ समितीला या ग्रंथाचे सविस्तर प्रारूप पाहिल्यानंतर तो इतका आवडला की तिने तो प्रस्ताव बृहद् प्रकल्प स्वरूपात स्विकारण्याची शिफारस मंडळास केली व मंडळाने तो भरघोस आर्थिक अनुदानासह स्विकारण्यात येत असल्याचे कळविले. यामुळे प्रकाशनाची चिंता मिटली आणि मानसिक समाधानच नव्हे तर अत्यानंद पण झाला. म्हणून ग्रंथकर्ता महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि विशेषत: या मंडळाचे अध्यक्ष **श्री. बाबा भांड** यांचा या प्रकल्पामध्ये व्यक्तिश: रस घेतल्याबद्दल सदैव ऋणी आहे.

शेवटी मराठीचे प्रख्यात कादंबरीकार, समीक्षक व विचारवंत, माझे मित्रवर्य, **ज्ञानपीठ पुरस्कार विजेते पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे** यांनी आपल्या निरंतर व्यस्ततेतून, वेळात वेळ काढून या ग्रंथासाठी आपला अभिप्राय पाठविण्याची जी कृपा केली त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

सूज्ञ वाचकांकडून माझ्या प्रथम ग्रंथासारखेच भरघोस प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा.

दिनांक – १४ जानेवारी २०१८

अहमदनगर.

**– डॉ. मुहम्मद आज़म, ग्रंथकर्ता**

दूरध्वनी : (०२४१) २३४३७५८

भ्रमणध्वनी : ८३०८३३०६३४

**संपर्क :– डॉ. मुहम्मद आज़म**

C/o – डॉ. शहनाज़

सर्वे नं. ३२१/१, बंगला नं. २

बाँबे हॉस्पिटलसमोर, मुकुंदनगर,

अहमदनगर – ४१४ ००२

(महाराष्ट्र)

# अनुक्रम


- अध्यक्षांचे मनोगत – बाबा भांड ..... तीन
- अभिप्राय – डॉ. भालचंद्र नेमाडे ..... पाच
- ग्रंथकर्त्याचे मनोगत ..... सात

## खण्ड – एक

### विभाग – १ : तत्त्वज्ञान

| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | तत्त्वज्ञान : सर्वसामान्य, ग्रीक व भारतीय ..... | ३ |
| प्रकरण २ | इस्लामी तत्त्वज्ञान ..... | १६ |
| प्रकरण ३ | इस्लामी चिंतनाचे दार्शनिक संप्रदाय ..... | ६२ |
| प्रकरण ४ | सूफीवाद आणि सूफी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना ..... | ७१ |

### विभाग – २ : अल्लाह (परात्पर परब्रह्म)

| | | |
|---|---|---|
| प्रकरण ५ | अल्लाहचे अस्तित्व (वजूद) ..... | १०३ |
| प्रकरण ६ | अल्लाहचे स्वरूप ..... | १६२ |
| प्रकरण ७ | ईश्वरवाद अथवा ईश्वरासंबंधी संकल्पना ..... | २६६ |

### विभाग – ३ : ब्रह्मांड

| | | |
|---|---|---|
| प्रकरण ८ | उपनिषदेंप्रणीत विश्वोत्पत्ती – विचार ..... | ३०१ |
| प्रकरण ९ | सृष्टी – प्रपंच : तौलनिक विवेचन (इस्लामी व भारतीय दृष्टिकोन) ..... | ३०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १० | विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त व तदविषयक इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता | ..... | ३२४ |
| प्रकरण ११ | विश्वरचना – विचार : दार्शनिक दृष्टिकोन (भारतीय व पाश्चात्य) | ..... | ३५४ |
| प्रकरण १२ | ब्रह्मांड – निर्मिती : सूफ़ी दार्शनिक दृष्टिकोन | ..... | ३६७ |
| प्रकरण १३ | परलोक (आख़िरत) : तौलनिक विवेचन | ..... | ४२८ |
| प्रकरण १४ | सूफ़ींच्या कल्पनेतील सृष्टीची विलक्षणता व अद्भुतता किंवा ईश्वराची अगाध लीला : सृष्टीमधील चमत्कारांचा खेळ | ..... | ४४५ |

## विभाग – ४ : मानव

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १५ | मानव : निर्मिती – प्रयोजन व विशेषता | ..... | ४७९ |
| प्रकरण १६ | विश्व, मानव आणि ईश्वर | ..... | ४९० |
| प्रकरण १७ | मानव – देह – विज्ञान : दार्शनिक दृष्टिकोन | ..... | ५०९ |

## खण्ड – दोन

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १८ | आत्मा ('रूह') : दार्शनिक विवेचन | ..... | ५५९ |
| प्रकरण १९ | पुरुषोत्तम (नरोत्तम) | ..... | ६६२ |
| प्रकरण २० | आध्यात्मिक जीवन व आध्यात्मिक अनुभूती | ..... | ६८९ |
| प्रकरण २१ | भक्तिशास्त्र | ..... | ७६६ |
| प्रकरण २२ | सूफ़ी – प्रेमपंढरीचे वारकरी | ..... | ८४९ |
| प्रकरण २३ | जपविज्ञान | ..... | ९२७ |
| प्रकरण २४ | 'समाअ' (संकीर्तन श्रवण, सूफ़ी संगीत श्रवण) | ..... | १०६३ |

## खण्ड – तीन

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण २५ | मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या | ..... | ११६३ |
| प्रकरण २६ | वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र | ..... | १२६६ |

## विभाग – ५ : परिशिष्टे

| | | | |
|---|---|---|---|
| क) | परिशिष्टे – १ ते ६९ | ..... | १३३७ |
| ख) | दार्शनिक चिंतनिका | ..... | १६११ |
| ग) | व्यक्ती – नाम – सूची | ..... | १६२३ |

# विस्तारित अनुक्रमणिका

# खण्ड तीन


**प्रकरण २५ मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या ..... ११६१**

क) भारतीय दार्शनिक दृष्टिकोन, मंत्रशास्त्र विवेचन' [११६३], १) आद्यमंत्र 'ॐकार' व बीजमंत्र : उत्पत्ती कशी व केव्हा? [११६३], २) मंत्रांची उत्पत्ती [११६७], ३) मंत्रांची सिद्धी [११६८], ४) मंत्रात असाधारण शक्ती कशाने व केव्हा उत्पन्न होते? [११७१], ५) मंत्रजपाने भावसमाधी [११७२], ६) मंत्र प्रकार [११७२], ७) गायत्री मंत्राची मीमांसा' [११७३] क) गायत्री मंत्राचे श्रेष्ठत्व, ख) गायत्री मंत्र, ग) ब्रह्मांड व परमात्माबोधक सरलार्थ, घ) गायत्री मंत्राचे निरूपण, १) व्याहृत्यर्थ, २) मीमांसा, अ) मंत्राचा सरळ भावार्थ, आ) मंत्राची मीमांसा, च) गायत्रीमंत्रास शाप व त्याचे विमोचन, ८) मंत्रयोगाची सोळा अंगे [११७८], १) पहिले अंग 'भक्ती', अ) वैधी भक्ती, १) श्रवण, २) कीर्तन, ३) नामस्मरण, ४) पादसेवन, ५) अर्चन, ६) वंदन, ७) दास्य, ८) सख्य, ९) आत्मनिवेदन, नवविधा भक्ती [११८०], भाग-१ : नाम, भाग-२ : रूप, भाग-३ : भाव, नवविधाभक्ती विवेचन' आ) रागात्मिका भक्ती, इ) 'परा' भक्ती, २) दुसरे अंग 'शुद्धी', अ) दिक्‌शुद्धी, आ) कार्यशुद्धी, इ) स्थानशुद्धी, ई) अन्तःशुद्धी, ३) तिसरे अंग 'आसन', ४) चौथे अंग 'पंचांगसेवन', ५) पाचवे अंग 'आचार', ६) सहावे अंग 'धारणा', ७) सातवे अंग 'दिव्यदेशसेवन', ८) आठवे अंग 'प्राणक्रिया', ९) नववे अंग 'मुद्रा', १०) दहावे अंग 'तर्पण', ११) अकरावे अंग 'हवन', १२) बारावे अंग 'बली', १३) तेरावे अंग 'याग', १४) चौदावे अंग 'जप', १५) पंधरावे अंग 'ध्यान', १६) सोळावे अंग 'समाधी', ९) मंत्र- क्रिया [११९०], क) मंत्राची व्याख्या, ख) मंत्र-क्रिया, १०) मंत्र शक्तीचे वैज्ञानिक आधार [११९२], मंत्र जपाचा प्रभाव, सिद्धी विवेचन [११९३], १) सिद्धावस्था (सहज समाधी), २) सिद्धी प्राप्तीचे लक्षण, ३) सत्‌ची झलक सिद्धीचे स्वरूप आणि सिद्ध

पुरुषाची लक्षणे, सत्‌ची झलक, आत्मदर्शन, सिद्ध पुरुषाची लक्षणे [११९७], ४) अष्टसिद्धीची यथार्थ मीमांसा, १) अणिमा, २) महिमा, ३) लघिमा, ४) गरिमा, ५) प्राप्ति, ६) प्राकाम्य, ७) ईशित्व, ८) वशित्व, तंत्र विवेचन [११९९], १) तंत्र : आविर्भाव, स्वरूप आणि भेद (शिव-शाक्त तत्त्वज्ञान आधारे)' क) आविर्भाव, ख) स्वरूप, ग) भेद, घ) तंत्र तत्त्वज्ञान, २) तंत्र आणि विद्यातंत्र : आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून, क) तंत्र आणि विद्यातंत्र : व्याख्या, ख) तंत्र आणि विद्यातंत्र : मनाचा वैज्ञानिक विस्तार, मंत्र विद्या किंवा यातु विद्या अथवा इंद्रजाल विवेचन, १) अमलियात (जंत्र-मंत्र), तावीज़ (ताईत) व फ़ाल (शकुन) : इस्लामी धारणा, क) अमलियात (जंत्र-मंत्र), आमाल (जंत्र-मंत्र) आणि कृपा-याचनां (दुआ)च्या अटी, १) वैध-शुद्ध आहार, २) सत्य व्रत, ३) निष्कपटता, ४) संयम व इंद्रिय निग्रह, ५) ईश्वरी निशाण्यांचा आदर राखणे, ६) चित्ताची एकाग्रता, ७) दृढ श्रद्धा, मंत्र जपांची अनिवार्य पद्धत, १) परमेश्वराच्या दरबारामध्ये विनम्र निवेदन, २) दानधर्म, ३) पवित्र अंतरासक्ती (दरूद शरीफ़), ४) पुन्हा पुन्हा कृपा-याचना करावी, ५) एकांतता, ६) कुणाचेही नुकसान करू नये, ७) मिताहार, ८) स्वच्छता व टाप टीप, ९) स्वच्छ शाई, १०) शुभ मुहूर्त आणि शुभ संकल्प, ख) अमलियात, तावीज़ व फ़ाल यासंदर्भात कुरआनच्या प्रकरणांची विशेषता, ग) कुरआनी अध्यायांचे जंत्र-मंत्र सामर्थ्य आणि ताईत, १) सूरतुल् - फ़ातिहा (अध्याय - १ ला), २) सूरतु - यासिन (अध्याय - ३६ वा), ३) सूरतुर - रहमान (अध्याय - ५५ वा), ४) सूरतुल् - फ़लक़ (अध्याय -११३ वा), ५) सूरतु-न्नास (अध्याय - ११४ वा), घ) काही कुरआनी श्लोकांचे जंत्र-मंत्र सामर्थ्य, ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम'' चे मंत्र सामर्थ्य [१२१४], १) मनोकामनापूर्तीसाठी, २) ताप (ज्वर) आणि हिवताप (कंपज्वर) पासून बरे होणे, ३) भूतबाधा नाहीशी होण्यासाठी, ४) संकटामध्ये असताना, 'शश कुफ़्ल' (सहा टाळे), पहिले कुफ़्ल (टाळे), दुसरे कुफ़्ल (टाळे), तिसरे कुफ़्ल (टाळे), चौथे कुफ़्ल (टाळे), पाचवे कुफ़्ल (टाळे), सहावे कुफ़्ल (टाळे), ''आयतलकुर्सी (महाश्लोकासन)चे वैशिष्ट्य'', च) आणखी काही कुरआनी अध्यायांचे जंत्र-मंत्र सामर्थ्य, १) सूरतु-न्निसा (अध्याय ४ था) ची विशेषता, २) सूरतु-यूनुस (अध्याय १० वा) चे वैशिष्ट्य, ३) सूरतु-इब्राहीम (अध्याय १४ वा) ची विशेषता, ४) सूरतुल्-कहफ़् (अध्याय १८ वा) ची विशेषता, ५) सूरतुल्-मर्यम (अध्याय १९ वा) ची विशेषता, ६) सूरतु-ताहा (अध्याय २० वा) चे वैशिष्ट्य, ७) सूरतुल्-अन्कबूत (अध्याय २९ वा) ची विशेषता,

८) सूरतुर्रूम (अध्याय ३० वा) चे वैशिष्ट्य, ९) सूरतु-स्सिज्दा (अध्याय ३२ वा) चे वैशिष्ट्य, १०) सूरतु-हा-मीम-स्सिज्दः (अध्याय ४१ वा) चे वैशिष्ट्य, छ) आणखी काही ताईती, १) प्रेम-भाव निर्माण होण्यासाठी ताईत, पद्धत व प्रणाली, २) भूतबाधितासाठी ताईत, पद्धत व प्रणाली, ३) डोकेदुखीसाठी ताईत, पद्धत वा प्रणाली, ४) ज्या स्त्रीस मूल होत नसेल त्यासाठी ताईत, पद्धत व प्रणाली, ५) दुष्ट नज़र लागली असेल तर त्यासाठी ताईत, पद्धत व प्रणाली, ज) फ़ाल (शकुन) (फ़ालनामा कुरआनी) (कौराणिक शकुन), काही शकुन पाहण्याची रीत [१२२०], १)ह ت ''या अय्युहल्लज़ीन आमनू तौबू इलिल्लाहि तौबतन् न्नुसूहा'', २) س ''यासीन् वल्कुर्‌आनिल् - हकीमि इन्नक लमिनल् - मुर्सलीन'', ३) ص ''फ़ सबिरु सब्रुन् जमीलन्'', ४) ن ''नून वल्क़लमि व मयस्तुरून्'', ५) ه ''व नउज़्ज़ि मिंत्तशाऽवु तज़िल्लु मिंत्तशाअ'', २) मंत्र सिद्धी (दावत) : सूफ़ी तात्त्विक धारणा' सूफ़ी मंत्र-सिद्धी क्रिया मध्ये उपयोगात आणली जाणारी काही कोष्टके, कोष्टक - १, कोष्टक - २ - सप्तग्रह आणि त्यांचे कालखंड, कोष्टक - ३ - अब्जद : वर्णांकशास्त्र : मालिनीविजय धारा, कोष्टक - ४ - क), अब्जद : वर्णांकशास्त्राचे सूत्र व तदंतर्गत मूल्यभारांकन, 'अब्जद' चे सूत्र पुढीलप्रमाणे आहे, उपरोक्त वर्णाक्षरांचे मूल्यभारांक, ख) अब्जद-ए-शम्सी : 'अबतस' पद्धती, कोष्टक - ५ - वर्णांक्षरांचे बिंदु भारांक, कोष्टक - ६ - वर्णाक्षर उदरस्थ मूल्यांक व तत्संबंधी वेताळ (मुवक्किल), मुवक्किल अर्थात वेताळ निश्चित करण्याची पद्धत [१२२५], ३) सूफ़ी मंत्र सिद्धी (दावत) : काही प्रक्रिया व पद्धती' कोष्टक - ७ - बारा राशी, तत्संबंधी वेताळ आणि त्यांचे भौतिक गुणधर्म, क) सूफ़ी मंत्र-सिद्धी-शास्त्राची प्रक्रिया व तिचे टप्पे, मंत्र-पठनाचे सप्त-सोपान, ख) 'इस्म-ए-आज़म' (सर्वश्रेष्ठ महामंत्र) अल्लाहु, : या अल्लाहु, ग) सप्त पुनरावृत्त अष्ट-ईश-शुभनामांचा मंत्र, घ) सप्तग्रह किंवा सप्तदैहिक मंत्र (दुआए हफ़्त पैकर), च) इहलोक व परलोकाचे भय (भिती) दूर करण्यासाठी मंत्र, छ) प्रथम नाम 'सुबहान' ची मंत्र-सिद्धी पद्धत : तरीक़-ए-दावत इस्म अव्वल, ज) सन्मार्गाच्या सरळ मार्गाची मंत्र-सिद्धी : तरीक़-ए-दावत सिरात मुस्तक़ीम, प्रथम नाम 'सुबहान' ची मंत्र-सिद्धी [१२३२], झ) प्रतिष्ठित नामांची वैशिष्ट्ये : प्रथम नाम (इस्म अव्वल), ट) मंत्र कुप्रभाव आणि जादूचा प्रभाव नष्ट होण्यासाठी मंत्र-योजना, ८०. सुरतुअबस, बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम [१२३३], भाषांतर, ८०. सुरतुअबस (नापसंतीचे अध्याय) [१२३३], कुमंत्र आणि जादूचा प्रभाव निष्प्रभ करण्यासाठी एकनिष्ठ

एकेश्वरवादी भक्ताचे प्रमाण, मंत्र-सिद्धी निष्प्रभ करण्यासाठी, मंत्र-सिद्धी नष्ट करण्याच्या दिशेने, ४) जादू किंवा यातु विद्या : इस्लामी व सूफ़ी दृष्टिकोन' वशीकरण, १०५. सूरतुल्-फ़ील (हत्तीचे प्रकरण), बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम [१२४३], भाषांतर, १११. सूरतु-ल्लहब (अबू लहबचे प्रकरण), बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम [१२४४], भाषांतर, ५०. सूरतु-क़ाफ़ (क़ाफ़चे प्रकरण), बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम [१२४४], भाषांतर, ताईत आणि मंत्रतंत्र [१२४७] १) दुपाया : द्विपदी चौकोन, २) सुल्सी त्रिपदी चौकौन, हव्वाचे सुल्सी : त्रिपदी चौकोन, ३) रूबाई किंवा मुरब्बा : चौपाई चौकोन वा चौरस, ११३. सूरतुल् - फ़लक (उष:काल, अरुणोदयाचे प्रकरण), बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम [१२४९], भाषांतर, अल्लाहची ९९ प्रमुख नामे आणि त्यांचे मंत्रसामर्थ्य [१२५०], अल्लाहची उत्तमोत्तम -शुभनामे मुखोद्गत म्हणण्याची पद्धत' [१२५०], अल्लाहची ९९ शुभ नामे आणि त्यांचे मंत्र-सामर्थ्य', इस्म-ए-आज़म : सर्वश्रेष्ठ महामंत्रासाठी काही प्रेषित वचने [१२५४], १) 'हदीस शरीफ' मध्ये असे आहे, २) दुसऱ्या एका हदीसमध्ये असे आहे की, ३) आणखी एका हदीसमध्ये आहे, ५) आणखी एक हदीस शरीफमध्ये नमूद आहे की, संकीर्ण मंत्रांच्यामध्ये मूळव्याध बरी करण्यासाठी खालील मंत्र पाण्यावर म्हणावा [१२५५], जन्मकुंडली, ११४. सूरतु-न्नास (मानवाचे प्रकरण), बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम [१२५६], भाषांतर, (११३) सूरतुल-फ़लक़ आणि (११४) सूरतुन्नासचे मंत्रसामर्थ्य [१२५७], अध्याय ७२ : सूरतुल् - जिन्नचे मंत्र-सिद्धी आवाहन (दावत), बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम [१२५७], मंत्रसामर्थ्य असलेले काही कुरआनी अध्याय व श्लोक [१२६३], १) ३६. सूरतु-यासीन (यासीनचे प्रकरण), २) त्याचप्रमाणे ६७, सुरतुल् - मुल्क (राज्य किंवा शासनाचे प्रकरण), ३) तसेच ११२. सूरतुल् - इख़लास (निरपेक्षतेचे प्रकरण), मंत्रसामर्थ्ययुक्त काही कुरआनी श्लोक [१२६४], १) प्रगाढ प्रेमासाठी जंत्र-मंत्रामध्ये प्रयुक्त कौराणिक श्लोक, २) प्रेम आणि अंत:करणाच्या स्फूर्तिसाठी प्रयुक्त कौराणिक श्लोक, मोहिनीची तोंडओळख [१२६५], १) मोहिनी वशीकरण, २) मोहिनी माला, ३) मोहिनी मंत्र, ४) ''या बुदव्वह'' ची मन मोहिनी मंत्र-सिद्धी

**प्रकरण २६ वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र ..... १२६६**

क) संस्कृत देवनागरी वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र [१२६६], १) देवनागरी वर्णक्षरांचे अध्यात्मशास्त्र : सामान्य परिचय : सर्वसाधारण तोंडओळख [१२६६], भाषेची वर्णाक्षरमाला आणि देहविशिष्ट जीव-आत्म्याच्या अवस्था

: परस्पर सह–संबंध [१२७१], (१) : रेखाचित्र, परात्पर परब्रह्माच्या पाच स्वरूप–शक्ती आणि देवनागरी स्वर वर्णाक्षर–सृष्टी : सहसंबंध [१२७३], परात्पर परब्रह्माच्या पाच स्वरूप शक्ती, (२) तक्ता, अवस्था–विशेष आणि तदंतर्गत समाविष्ट वर्णाक्षरे आणि अवस्थांची स्वरूप, वैशिष्ट्ये, २) देवनागरी वर्णाक्षरांचे दार्शनिक स्पष्टीकरण [१२७५], ३) नादतत्त्व, वर्णमाला आणि सृष्टितत्त्व : दार्शनिक दृष्टिकोन [१२७६], पंचशून्ये, ख] अरबी वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र, १) अरबी वर्णाक्षरांचे इस्लामप्रणीत अध्यात्मशास्त्र, कूट–विमोचन, कूटाक्षरे : त्रोटक अक्षरे : हुरूफ़–ए–मुक़त्तेआत [१२८८], कौराणिक गूढाक्षरे (त्रोटक अक्षरे) आणि त्यांचे संभाव्य अनुमानित मथितार्थ [१२९०], कौराणिक गूढाक्षरांचे गटवार वर्गीकरण [१२९१], अवलोकन, कूटाक्षरां (गूढाक्षरां) चे गणितीय चमत्कार [१२९४], १९ (एकोणीस) या संख्येची कूटाक्षरांमधील किमया आणि कमाल! [१२९४], एकोणीस (१९) च का? याचे स्पष्टीकरण व विवेचन [१२९६], १९ (एकोणीस) ची आणखी एक ढोबळ कमाल [१२९७], भाषांतर, दयासागर कुरआनचे एक जीवित (नूतन) विलक्षण चमत्कार [१३०१], अंकगणिती चमत्काराचा पहिला नमुना?, दुसरा नमुना, तिसरा नमुना, चौथा नमुना, पाचवा नमुना, सहावा नमुना, २) अरबी वर्णाक्षरांचे सूफ़ी तत्त्वज्ञानप्रणीत अध्यात्मशास्त्र, गूढगुंजन : आकलनक्षमता, गूढ अध्यात्मवाद, अरबी वर्णाक्षरांची गुपिते (कूट) आणि त्यांचे स्वरूप [१३०५], अरबी वर्णांक शास्त्र–सूत्राचे प्रेषित प्रणीत भाष्य [१३०९], “अब्जद हव्वज़ हुत्ती कलिमन सअफस क़रशत सख़्ख़ज ज़ज्ज़ग”, वर्णाक्षराची गुह्ये, अरबी वर्णाक्षरांचे गुह्य–विवेचन [१३१०], १) अलिफ़ (ا) : अ, २) हे (ه) : ह [बिंदुहीन], ३) ऐन (ع) : अ़ [बिंदुहीन], ४) है (ح) : ह [बिंदुहीन], ५) गैन (غ) : ग़ [बिंदुयुक्त], ६) ख़ै (خ) : ख़ [बिंदुयुक्त], ७) क़ाफ़ (ق) : क़ [बिंदुयुक्त], ८) क़ाफ़ (ک) : क [बिंदुहीन], ९) जीम (ج) : ज [बिंदुयुक्त], १०) शीन (ش) : श [बिंदुयुक्त], ११) या (ی) : य [बिंदुहीन], १२) ज़ाद (ض) : ज़ [बिंदुयुक्त], १३) लाम (ل) : ल [बिंदुहीन], १४) नून (ن) : न [बिंदुयुक्त], १५) रे (ر) : र [बिंदुहीन], १६) तोय (ط) : त [बिंदुहीन], १७) दाल (د) : द [बिंदुहीन], १८) ते (ت) : त [बिंदुयुक्त], १९) ज़े (ز) : ज़ [बिंदुयुक्त], २०) सीन (س) : स [बिंदुहीन], २१) सॉद (ص) : स [बिंदुहीन], २२) ज़ोए (ظ) : ज़ [बिंदुयुक्त], २३) से (ث) : स [बिंदुयुक्त], २४) ज़ाल (ذ) : ज़ [बिंदुयुक्त], २५) फ़ा (ف) : फ़ [बिंदुयुक्त], २६) बा (ب) : ब [बिंदुयुक्त], २७) मीम

(م) : म [बिंदुहीन], २८) वाव (و) : व [बिंदुहीन], ३) अरबी वर्णाक्षरांचे सूफ़ी तत्त्वज्ञानप्रणीत विवेचन [१३१७], क) बिंदुमात्र (ज़ात बुहत) म्हणजेच विशुद्ध परम सत्ता, ख) बिंदु महात्म्य, ग) बिंदुचे मंडान आणि त्याच्या विविध श्रेणी, घ) अरबी वर्णाक्षरांच्या अध्यात्म निर्मितीमध्ये बिंदू ('नुक़्ता'), 'अ', ('अलिफ') व 'ब' ('बा') च्या भूमिका, ''निस हकीम क़ातअ लह सर'', परमेश्वर म्हणजे साक्षात् तेज:पुंज प्रकाश! [१३२५], १) नुक्ता : बिंदूची आद्य भूमिका, २) 'अलिफ़' : 'अ' ची श्रेष्ठता आणि केंद्रिय भूमिका, ३) द्वितीयक 'बा' ('ब') ची पण महती,

## विभाग – ५

**क) परिशिष्टे**


१) सूफ़ी कोण? ..... १३३७

२) सूफ़ींचा परमेश्वर कोण? ..... १३३९

३) भारतीय दर्शन व कुरआनप्रणित सूफ़ींचे शब्द – चित्र ..... १३४२

४) शब्द – ब्रह्म : भारतीय दार्शनिक आणि कुराणोक्त अभिप्राय ..... १३४५

५) सूफींचे आचरण व त्याचे स्वरूप ..... १३५०

६) काया-मनोचिकित्सकाच्या भूमिकेत सूफ़ी (व्याधि-निवारणकर्त्याच्या भूमिकेत सूफ़ी).. १३५४

७) सूफ़ींची ख़ानक़ाह – व्यवस्था आणि व्यवस्थापन (सूफ़ींची आश्रम-व्यवस्था स्वरूप) ..... १३५८

८) सूफ़ी शास्त्र (Theory) आणि सरावा (Practice) ची संरचना ..... १३६३

९) सूफ़ींवाद आणि विज्ञान ..... १३७०

१०) माझ्या दारी कोण आहे? ..... १३७५

११) प्रपत्तियोग आणि भक्तियोग ..... १३७७

१. (क) प्रपत्तियोग, ख) प्रपत्ति : इस्लामी संकल्पना व धारणा परिपूर्ण इस्लाम अर्थात प्रपत्तीचे तीस घटक (लक्षणे) क) १. पश्चात्तापदग्ध होऊन ईश्वराकडे क्षमा मागणे, ख) ११. प्रसन्नचित्ताने सातत्यपूर्ण भक्ती (नमाज संपन्न) करणे, ग) २१. ईश्वरास शरणागत, आत्मसमर्पित होणे, २) भक्तियोग

१२) नामयोग आणि मोक्ष (मुक्ती) ..... १३८६

१३) ''आपुले मरण पाहिले म्यां डोळां'' ..... १३९०

तत्संबंधी (क) संत तुकारामांचा दृष्टिकोन, (ख) इस्लामी व सूफ़ीप्रणीत धारणा

१४) मरणोत्तर जीवन ..... १४०५

१५) धर्माचे मर्म आणि सूफ़ी अध्यात्म : समाईक विचारधारा ..... १४२१

१६) भक्तीची सप्तसूत्रे (सात भक्तीसूत्रे) ..... १४३४

| | | | |
|---|---|---|---|
| १७) | साधकासाठी आचारसंहिता | ..... | १४३५ |
| १८) | आदर्श शिष्याची लक्षणे | ..... | १४३७ |
| १९) | पंचके किंवा पंचक-समूह | ..... | १४३८ |
| २०) | अमर आत्म्याचे चार अभेद्य परिभ्रमण-चक्र वा प्रवास-चक्र | ..... | १४३८ |
| २१) | परमेश्वरी कृपेचे पाच प्रकार : परमेश्वरी कृपेची कार्य-प्रणाली | ..... | १४३९ |
| २२) | साक्षात्कार | ..... | १४४० |
| २३) | गुरूमंत्र - साधना | ..... | १४४१ |
| २४) | ब्रह्म : स्वरूप वर्णन | ..... | १४४२ |
| २५) | विश्वोत्पत्ती (ब्रह्मांड निर्मिती) प्रक्रिया : नूतन संकल्पना | ..... | १४४४ |
| २६) | प्राणायाम | ..... | १४४७ |
| २७) | अनुसंधान | ..... | १४५१ |
| २८) | योग-प्रकार : एक दृष्टिक्षेप | ..... | १४५३ |
| २९) | शक्तिपात किंवा गुरूकृपा किंवा गुरूप्रसाद | ..... | १४५५ |
| ३०) | एकाग्रता व एकविधता | ..... | १४५९ |
| ३१) | लययोग | ..... | १४६० |
| ३२) | यंत्रयोग | ..... | १४६२ |
| ३३) | तारकयोग | ..... | १४६६ |
| ३४) | मंत्रयोग | ..... | १४६८ |
| ३५) | दहरविद्या | ..... | १४७२ |
| ३६) | प्रेम -साधना | ..... | १४७४ |
| ३७) | चिद्‌विलास | ..... | १४७७ |
| ३८) | अनन्यभक्ती | ..... | १४७९ |
| ३९) | मंत्रचैतन्य आण मंत्रसिद्धी | ..... | १४८२ |
| ४०) | चित्त आणि ध्यान | ..... | १४८४ |
| ४१) | प्राण आणि पंचप्राणांची ओळख | ..... | १४८६ |
| ४२) | भक्तीमधील ‘मर्कट किशोर न्याय’ आणि ‘मार्जार किशोर न्याय’ | ..... | १४८८ |
| ४३) | (महा)भूतांची पांच रूपे आणि त्यांचे स्वरूप | ..... | १४९० |
| ४४) | प्रारब्ध आणि मृत्यू | ..... | १४९१ |
| ४५) | बद्ध आणि मुमुक्षू | ..... | १४९३ |
| ४६) | साधक, सिद्ध आणि साधु-संत | ..... | १४९४ |
| ४७) | प्रारब्ध आणि प्रयत्न (कर्म) | ..... | १४९७ |
| ४८) | आवरण व विक्षेप | ..... | १५०० |

४९) व्यतिरेक आणि अन्वय ..... १५०१
५०) 'पराक्' व 'प्रत्यय' ..... १५०२
५१) आकाश आणि स्वरूप ..... १५०४
५२) समाधी आणि समाधीप्रक्रिया ..... १५०६
५३) चित्तवृत्ति आणि चित्तभूमिका ..... १५०८
५४) सुखदुःख आणि बंध मोक्ष ..... १५०९
५५) काल आणि कैवल्य ..... १५१०
५६) श्रेयस् व प्रेयस् ..... १५११
५७) सत्य व असत्य ..... १५११
५८) कृपा आणि कर्म ..... १५१२
५९) दार्शनिक संकल्पना : एका दृष्टिक्षेपात ..... १५१३
६०) पारमार्थिक संज्ञांच्या दार्शनिक व्याख्या ..... १५२५
६१) पारमार्थिक संकेतकोष ..... १५३२
६२) पारमार्थिक 'कोण?' आणि 'काय?' ..... १५३४
६३) भारतीय दार्शनिक संक्षिप्त परिभाषा कोश ..... १५३९
६४) सूफ़ी तत्त्वज्ञान संक्षिप्त परिभाषा कोश ..... १५५३
६५) शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर यांच्या 'दुचेश्मा' ..... १५६५
६६) ॐ : उत्पत्ती, महत्त्व आणि पूर्ण ब्रह्माचे प्रतीक ..... १५६७
६७) ईश्वरापासून विश्व-विकासाचे सहा-सहा टप्पे आणि श्रेणी ..... १५६९
(अबू नस्र बिन मुहम्मद इब्न तर्खन इब्न उज़लग, अल-फ़ाराबी कृत)
६८) भक्तांचे बारा प्रकार ..... १५७०
६९) नमाजमधील परिक्रमांचे (व सूफ़ीप्रणित साधनेमध्ये प्रयुक्त) ..... १५७२
क्रमशः सचित्र टप्पे, नमाज : इस्लामी उपासने (भक्ती)चे मर्म,
नमाज़शी निगडीत परिभाषा संज्ञा व इतर शब्द - संग्रह ..... १५८८
नमाज़मधील परिक्रमांचे (व सूफ़ीप्रणित साधनेमध्ये प्रयुक्त) क्रमशः टप्पे ..... १५९३
आचमन, अज़ान पासून ते असे सर्व नमाज़मधील विक्षेप एकाच ठिकाणी ..... १६०६

**ख) दार्शनिक चिंतनिका ..... १६११**
**ग) व्यक्ती - नाम - सूची ..... १६२३**
**• स्रोत ग्रंथ ..... १६४८**

# खण्ड - तीन

२५



## प्रकरण – २५

# मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या

**क) भारतीय दार्शनिक दृष्टिकोन**

**मंत्रशास्त्र विवेचन**[८१]

**१) आद्यमंत्र 'ॐकार' व बीजमंत्र : उत्पत्ती कशी व केव्हा?**

"मंत्र म्हणजे विशिष्ट क्रमाने केलेली ध्वनींची मांडणी. हे ध्वनी अक्षराने सुचविले जातात. इच्छित परिणाम होण्यासाठी वर्ण व त्वरा यांचा मेळ बसवून मंत्र योग्य रीतीने म्हटला पाहिजे. या कारणास्तव मंत्राचे भाषांतर केले तर तो मंत्र राहतच नाही. नुसते शब्द किंवा वाक्य इतकेच राहते." – वुड्रॉफ. मंत्र म्हणजे मननसाधन, अर्थात, स्तुतियुक्त छंदोबद्ध वचन.

शब्दब्रह्म ॐकाराचे व्यक्त रूप आहे. ॐकार हा विश्वाचा आदिघटक द्रव्य आहे. म्हणजेच तो स्वयंभू आहे. ॐकार किंवा प्रणव याला फार महत्त्व आहे. कारण शब्द सृष्टीतील प्रथम शब्द ॐकार आहे. हेच परमेश्वराचे प्रथम नाम आहे. ॐ हा ब्रह्मांडातील सर्वात पहिला ध्वनी समजला जातो.

हा सर्व प्रपंच नामरूपमय असल्यामुळे अविद्याग्रस्त जीव, नाम व रूप यांच्या द्वारेच बंधनास प्राप्त झाला आहे. यासाठी जीवाची मुक्ती ही 'दिव्यनाम' व 'दिव्यरूप' यांच्या साहाय्यानेच होणारी असते. "जो माझ्या जन्माचे आणि कर्माचे दिव्य स्वरूप जाणतो तो देहत्याग केल्यानंतर या भौतिक जगतात पुन्हा जन्म घेत नाही तर हे अर्जुना! तो माझ्या शाश्वत धामाची प्राप्ती करतो." ४:९ असे भगवंतांनी गीतेत चौथ्या अध्यायात सांगितले आहे. भगवंतांची जन्मकर्मे 'दिव्य' आहेत व जीवांची 'मलिन' आहेत. दिव्य जन्मकर्मांच्या यथार्थ ज्ञानाने मलिन जन्मकर्मांचा नाश होतो व तो जीव पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात न सापडता परमात्म स्वरूपालाच पावतो, असा भगवद्वाणीचा सिद्धांत आहे. इतर पदार्थांची नामे व भगवंताची नामे यातही असाच फरक आहे. भगवंताची नामेही दिव्य व रूपेही दिव्यच आहेत. अवतारमूर्ती अथवा त्याच्या प्रतिमा ही त्याची दिव्य रूपे आहेत. या दिव्य रूपांच्या प्रतिमांच्या साहाय्याने म्हणजे अर्चनध्यानादिकाने, भावसमाधीद्वारा साधक उच्च अधिकारास प्राप्त होऊन मोक्षभागी होऊ शकतो आणि दिव्य नामाच्या साहाय्याने मोक्षाधिकारी होतो.

शास्त्रात मंत्रांना 'दिव्यनामे' म्हटले आहेत. मूलप्रकृतीच्या दिव्यभावानुसार बनलेली मूर्तीही 'दिव्यरूप' म्हटली पाहिजे, त्याचप्रमाणे मंत्र हे त्या प्रकृतीच्या दिव्य राज्यातील स्पंदनजनित शब्द असल्यामुळे

'दिव्यनामे' संज्ञा पावतात. सर्वात आद्य मंत्र जो ॐकार त्यासहित इतर सर्व मंत्र हे प्रकृतिस्पंदन द्वाराच उत्पन्न झाले आहेत.

योगशास्त्रात सांगितले आहे की, जेथे कार्य म्हणून काही आहे, तेथे कंपन हे अवश्य असलेच पाहिजे व जेथे कंपन आहे तेथे शब्द हा असलाच पाहिजे. सृष्टिक्रिया हे एक प्रकारचे कार्य आहे. यासाठी सृष्टिकार्याच्या वेळी प्रकृतिप्रथम स्पंदनाने जो शब्द उत्पन्न होतो, तोच हा मंगलमय ॐकाररूप 'प्रणव' होय. सत्त्वरजतम या तिन्ही गुणांच्या साम्यावस्थेपासून वैषम्यावस्था होण्यास सुरुवात झाली, तेव्हा प्रथम जो धक्का बसला अथवा जे कंपन झाले, त्याचवेळी तिन्ही गुणांत एक समयावच्छेदे करून चलन झाले, तेव्हा जो ध्वनी झाला, तोच ॐकार होय. ॐ हा ब्रह्मांडातील सर्वात पहिला ध्वनी समजला जातो. ज्याप्रमाणे साम्यावस्थेशी संबंध ठेवणाऱ्या प्रकृतीचा शब्द ब्रह्माविष्णूशिवात्मक ॐकार आहे, त्याचप्रमाणे वैषम्यावस्थापन्न प्रकृतीचे नाना शब्द आहेत व हेच नाना शब्द नाना उपासनांचे बीजमंत्र आहेत.

वेदांमध्ये ॐकाराला 'उद्‌गीथ' म्हटले आहे. छांदोग्य उपनिषदात त्याविषयी पुष्कळ सांगितले आहे. भगवान पतंजलीने ॐकार हा ईश्वराचा वाचक म्हटले आहे. 'तस्य वाचकः प्रणवः।' ॐकार ईश्वराचा वाचक आहे, ॐकाराचा जप व त्याच्या अर्थाची भावना यांच्याद्वारे आत्मप्राप्ती व विघ्ननाश होतो, इत्यादी. यालाच अनुसरून भगवान श्रीशंकराचार्यांनी म्हटले आहे की, ज्याप्रमाणे आवडत्या नावाने हाक मारली असता लोक प्रसन्न होऊन उत्तर देतात, त्याप्रमाणे भावनांचे प्रिय नाम जो ॐकार त्याचा उच्चार करून त्याला बोलाविले असता भगवंतही प्रसन्न होऊन दर्शन देतो. ॐकार ईश्वराचा मंत्र आहे. याबद्दल गीतेतही म्हटले आहे – ''एकाक्षर – ब्रह्ममंत्र जो ॐकार त्याचा उच्चार करीत व भगवंताचे स्मरण करीत जो साधक प्राणत्याग करतो, त्याला परमधाम प्राप्त होते.'' ८:१३ तसेच ॐकार धनुष्य, जीवात्मा शर व ब्रह्म त्याचे लक्ष्य आहे.

सत्तानिरपेक्ष, अखंडित व पूर्णस्वरूप ॐकारच होय. ॐकार हा अ, उ आणि म या तीन अक्षरांनी बनलेला आहे. या अक्षरांचा अर्थ टीकाकारांनी अ = विश्वाचा निर्माता ब्रह्म, उ = विश्वाचा पालनकर्ता विष्णू आणि म = विश्वाचा संहारकर्ता महेश्वर असा लाविला आहे; परंतु एझुथाचन या मल्याळी कवीने ॐकाराचा अर्थ खालीलप्रमाणे सुचविला आहे – ॐ = अ + उ + म. अ = जिचा व्यावहारिक दृष्टीने विश्वाचे जड मूलस्वरूप म्हणजेच मूलद्रव्य अगर आद्यप्रकृती या रूपात आविष्कार झालेला आहे अशी परमसत्ता उ = विश्वातील विविध प्राणिमात्रांच्या निर्मितीला कारण झालेले जीवनतत्त्व. म = मानवात असलेली बुद्धिशक्ती अगर मन. मनुष्य म्हणजे प्रकृती व मन यांच्या संयोगाचे फळ होय.

'जीवात्म्यास पूर्वारणि व ॐकारास उत्तरारणि करून मंथन करण्याने ब्रह्माग्नीची उत्पत्ती होते' इत्यादी श्रुतिमंत्रांच्या द्वारे ॐकाराला ईश्वराचा मंत्र म्हटले आहे, त्याचा जप केल्याने ईश्वर प्रसन्न होत असतो. तात्पर्य असे की, शब्दसृष्टीमध्ये ॐकाराबरोबर ईश्वराचा व अन्य मंत्रांबरोबर अन्य देवतांचा 'आधिदैवसंबंध' आहे व याच कारणामुळे ॐकाराच्या जपाने ईश्वर व अन्य मंत्रांच्या जपाने तत्तन्मंत्राधिष्ठित देवता प्रसन्न होत असतात. प्रलयकाळाच्या वेळी समस्त जीवांचे संस्कार प्रकृतीमध्ये व प्रकृती ईश्वरामध्ये लय पावते (आश्रयाने असते), ही गोष्ट वेदसंमत आहे. ईश्वर व प्रकृती यांचा 'आधाराधेयभावसंबंध' आहे व प्रकृती

आणि प्रपंच यांचा 'कारणकार्यसंबंध' आहे, म्हणून प्रलयाच्या वेळी कार्यात्मक प्रपंच आपले उपादान कारण जी प्रकृती तिच्यात लय पावतो आणि प्रकृती ही स्वयंसिद्ध परमेश्वराच्या आधाराने राहते. पुनः प्रलयलीन जीवांचे समष्टी संस्कार फलोन्मुख झाले म्हणजे ईश्वरामध्ये 'मी एकातून अनेकरूप होईन व संस्कारानुसार, कर्मानुसार सृष्टी करीन' अशी इच्छा उत्पन्न होते. त्यावेळी ईश्वरात सृष्टीचा संकल्प उदय पावल्याबरोबर त्याच्या अद्वैत सत्तेत त्रिगुण समावेशानुसार ब्रह्माविष्णू महेश्वररूपी त्रिभावसत्ता परिस्फुट होऊ लागते व त्याच्या संकल्पाने उत्पन्न झालेल्या प्राणशक्तीच्या प्रेरणेने ब्रह्मांडप्रकृतीमध्ये - जेथे अद्याप सत्त्वरजतमोगुणांची समता होती तेथे - त्रिगुणांचे वैषम्य सुरू होते. त्रिगुणात्मक प्रकृतीचे गुणसाम्य हे प्रलयदशेचे लक्षण आहे व वैषम्य हे सृष्टिअवस्थेचे लक्षण आहे. अर्थात त्यावेळी परमात्म्याच्या संकल्पाबरोबर मूळ प्रकृतीत कंपन सुरू होते. योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे, 'जेथे कार्य आहे, तेथे कंपन आहे व कंपन आहे तेथे शब्द आहे.' या सिद्धांतानुसार मूलप्रकृतीमध्ये सृष्टिकार्याची प्रेरणा झाल्याबरोबर त्रिगुणात कंपन होते व ज्याप्रमाणे एका मोठ्या भांड्यात पाणी भरून ठेवून त्या भांड्यास धक्का देताच त्याच्यामधील सर्व पाण्यास एकदम धक्का पोचतो व नंतर पाण्याच्या भिन्नभिन्न प्रदेशात कंपन सुरू होऊन भिन्नभिन्न तरंग उठू लागतात, त्याचप्रमाणे सृष्टीची प्रेरणा होता क्षणी अखिल ब्रह्मांडाच्या मूल प्रकृतीस एकदम धक्का पोचल्यामुळे कंपनजनित प्रथम शब्द होतो, त्याचेच नाव ॐकार होय. त्यामुळेच प्रथमच्या अधिदैव सृष्टीमधील ॐ हा शब्द असल्यामुळेच ॐकाराबरोबर ईश्वराचा वाच्यवाचक संबंध घडला. वर सांगितल्याप्रमाणे सृष्टीक्रम असा निश्चित झाला आहे की, प्रथम परमात्म्याच्या अंतःकरणात सिसृक्षा (सृष्टीची इच्छा), नंतर त्रिगुणसमतायुक्त प्रकृतीमध्ये वैषम्यजनित गुणस्पंदन व तेणेकरून ॐकार ध्वनीची प्रकटता आणि म्हणूनच ॐकाराबरोबर परमात्म्याचा साक्षात अधिदैव संबंध आहे, नव्हे, ॐ हे त्याचे नावच आहे, असे समजावे. कारण की, गुणातीत – साम्यावस्था प्रकृतियुक्त निष्क्रिय ब्रह्मभावामध्ये ज्यावेळी सृष्टी संकल्प उत्पन्न झाला, त्यावेळी तो भावच 'सगुणब्रह्म' अथवा 'ईश्वरभाव' म्हणवू लागला. त्या भावाबरोबर साक्षात त्याचे ते प्रथम नाम झाले. याचप्रमाणे 'वैषम्यावस्थापन्न' प्रकृतीचा प्रधान भागांबरोबर ज्या ज्या शब्दांचा संबंध आहे, ते ते 'बीजमंत्र' झाले. ॐकाराच्या अकार-उकार-मकारांबरोबर ब्रह्माविष्णूमहेश्वरांचा व इतर मंत्रांबरोबर इतर देवतांचा संबंध होण्याचे हेच (वर लिहिलेले) कारण होय.

जेव्हा प्रकृती सृष्ट्याभिमुख होते, तेव्हा त्रिगुणांत पुन्हा स्पंदन होते, कारण त्रिगुणविकारांच्या द्वारेच सर्व सृष्टी होत असते. यामुळे 'आधिभौतिक' सृष्टीमध्ये गुणस्पंदनद्वारे पंचतत्त्वादिकांच्या क्रमविकासाबरोबर जडचेतनात्मक जगताची उत्पत्ती होते व शब्द सृष्टीमध्ये प्रकृतीच्या नाना प्रकारच्या स्पंदनांच्याद्वारे नाना प्रकारच्या शब्दांची उत्पत्ती होते. हेच सर्व शब्द प्रथम अवस्थेत नाना बीजमंत्र व त्यानंतर परिणामवस्थेत देवनागरी वर्णमाला (स्वरव्यंजनात्मक अक्षरे) व नंतर संस्कृत प्राकृत भाषांचे नानाविध शब्द होते. प्रकृतीच्या प्रथम स्पंदनाच्या द्वारे ॐ बीज उत्पन्न झाले व त्यानंतर दुसऱ्या स्पंदनामध्ये अष्टविध प्रकृती अनुसार अष्टबीज मंत्रांची उत्पत्ती झाली.

गीतेत ७:४ मध्ये सांगितले आहे – 'भूमी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी व अहंकार याप्रमाणे परमात्म्याची मायाशक्ती आठ भागात विभागली आहे.' त्याप्रमाणे प्रकृतीच्या अष्टस्पंदनानुसार अष्टबीजमंत्र

आहेत व त्यानंतर प्रकृतीच्या भिन्न भिन्न अंगांत अनेक स्पंदने व तदनुसार अनेक मंत्र होतात आणि यावरून हीही गोष्ट सहज सिद्ध होऊन जाते की, समस्त ब्रह्मांड प्रकृती स्पंदनजनित शब्द ॐकार, त्याच्याबरोबर ब्रह्मांडनायक ईश्वराचा अधिदैव संबंध झाल्यामुळे, ॐकार हा जसा त्याचा मंत्र आहे, त्याप्रमाणेच प्रकृतीच्या ज्या भागाच्या कंपनाने जे मंत्र उत्पन्न होतात, त्या विभागाचे अधिष्ठाने देव अथवा देवी यांचा त्या मंत्रांशी अधिदैव संबंध असल्यामुळे ते देव अथवा देवी यांच्या साधनांचे ते ते मंत्र होत, असे समजावे. महर्षीवर्यांनी प्रकृतीच्या भिन्न भिन्न भागांवर 'संयम' करून त्या त्या भागांवरील अधिष्ठात्री देवता शोधून काढली आहे. त्याचप्रमाणे प्रकृतीच्या त्या त्या भागांच्या स्पंदनद्वारा उत्पन्न झालेले ते ते शब्दही संयमद्वारे श्रवण करून त्या त्या देवतांच्या मंत्ररूपाने त्या त्या शब्दांचे विधान त्यांनी करून ठेवले आहे.

प्रकृतीच्या प्रथम स्पंदनाने व्यापक प्रकृतीत जो महान शब्द उत्पन्न केला, त्याच्याच परिणामरूपाने अनेक शब्द उत्पन्न होतात, हा सिद्धान्त उपरनिर्दिष्ट शब्दोत्पत्तिविज्ञानाच्याद्वारे स्पष्ट झाला. यावरून प्रथमचा महान शब्द जो ॐकार त्यातूनच इतर समस्त मंत्रांची उत्पत्ती झाली व सृष्टीत जितके शब्द व वर्णमालेचे वर्ण आहेत ते सर्व ओंकाररूपी महाशब्दाच्या विकारानेच उत्पन्न झाले आहेत, असे मानण्यास हरकत नाही, नव्हे ते शास्त्रसंमतच आहे असेसमजावे. केवळ संस्कृत वर्णमालेचे ककारादि शब्द प्रकृतीच्या साक्षात स्पंदनाबरोबर 'प्राकृतिक' संबंध ठेवीत असल्यामुळे व बीजमंत्राच्या ते निकट असल्यामुळे सर्व बीजरूप आहेत व संस्कृत भाषा ही सर्व भाषांची जननी आहे, त्याचप्रमाणे इतर भाषांतील शब्दांबरोबर प्रकृतीचा दूर परिणामसंबंध असल्यामुळे, तसेच साक्षात संबंधाचा अभाव असल्यामुळे ते शब्द प्रकृतिस्पंदन न होता 'विकृतिस्पंदनरूप'होत आणि म्हणूनच ते बीजमंत्र होऊ शकत नाहीत. शास्त्रात 'मंत्राणां प्रणवः सेतुः' म्हणजे 'प्रणव हा मंत्रांचा सेतू' असे सांगितले आहे. अर्थात ज्याप्रमाणे सेतूच्या आश्रयाने मनुष्य नदीपार होऊन जातो, त्याप्रमाणे प्रत्येक मंत्राच्या बरोबर ॐकार जोडून उच्चार केला असता, मंत्र आपल्या व्यापक शक्तीस संपादन करू शकतो. ॐकारात सर्व मंत्रांना सिद्धीप्रधान करण्याची शक्ती असल्यामुळेच ॐकार हा परम मंगलकारक आहे असे स्मृतीत सांगितले आहे. ॐकाराचे वर्णन मांडुक्योपनिषद, लिंगपुराण वगैरे अनेकानेक ग्रंथांत सांगितले आहे. त्याचा विस्तार येथे करणे शक्य नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ॐकारापासून सर्व वर्णांची उत्पत्ती अर्थशास्त्रात सांगितली असून ते सर्व वर्ण विराटपुरुषाचा भिन्नभिन्न अंगांपासून उत्पन्न झाले असल्याने प्रकृतिस्पंदनजनित मंत्र आहेत व या मंत्रांशी त्या त्या प्रकृतीच्या देवतांचा अधिदैव संबंध आहे. यासाठी, समष्टी प्रकृतीच्या स्पंदनाने उत्पन्न झालेला ॐकार शब्द परमेश्वराचे व्यापक नाम आहे. त्याच्या जपाच्या व अर्थभावनेच्याद्वारे ज्याप्रमाणे परमेश्वर प्रसन्न होतो त्याप्रमाणे भिन्न भिन्न भागांच्या स्पंदनाने उत्पन्न झालेले शब्दही त्या त्या प्रकृतीच्या देवतांची वाचक नामे आहेत व त्यांच्या जपाच्या व अर्थभावनेच्याद्वारे त्या त्या देवता प्रसन्न होतात व दर्शन देतात. योगशास्त्रात 'स्वाध्यायादिष्टदेवतासंप्रयोगः।' असे सांगितले आहे. याचा अर्थ असा आहे की, स्वाध्यायाच्याद्वारे इष्ट देवता प्रसन्न होते. येथे 'स्वाध्याया'चा अर्थ श्रीभगवान वेदव्यासकृत योगदर्शनभाष्यामध्ये 'मंत्रजप' असा केला आहे.

तात्पर्य, देवतेच्या प्रसन्नतेला त्या देवतेच्या मंत्राचा जप हेच अत्युत्कृष्ट साधन आहे.

## २) मंत्रांची उत्पत्ती

समष्टी प्रकृतीच्या बरोबर व्यष्टी प्रकृतीचा एकत्व संबंध असल्यामुळे समष्टी प्रकृती स्पंदनजनित सर्व शब्दांचा आविर्भाव व्यष्टी प्रकृतीच्याही द्वारा होऊन त्यांचा अनुभव येत असतो. अर्थात ॐकार धरून सर्व शब्दांचे व मंत्रांचे उच्चारण जीवशरीराच्या भिन्नभिन्न अंगांद्वारे होत असते. ज्याप्रमाणे समष्टी प्रकृतीचे प्रथम स्पंदन जो ॐकार, तो प्रकृतीच्या गर्भापासून उत्पन्न होतो, त्याचप्रमाणे व्यष्टी शरीरातही प्रकृतीचे स्थान मूलाधारचक्रस्थित (मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध व आज्ञाचक्र यांची शरीरातील स्थाने अनुक्रमे गुद, लिंगमूल, नाभी, हृदय, कंठ व भ्रूमध्य अशी आहेत. या चक्रांना 'कमले' असेही म्हणतात.) कुंडलिनीनाडीमध्ये असल्यामुळे आदिनाद प्रणवाची उत्पत्ती त्या कुंडलिनीतूनच होत असते व तदितर सर्व नाद तिकडूनच निघून इडा, पिंगला व सुषुम्नारूपी त्रिविध योगनाडीच्या द्वारा भिन्न भिन्न मार्गांनी प्रवाहित होऊन मंत्र व वर्णरूपांनी हृदय, तालू, कंठ, जिव्हा, ओष्ठ, दंत इत्यादी स्थानांमधून प्रगट होत असतात. शारदातिलकामध्ये सांगितले आहे की, कुंडलिनीमधून प्रकाशित होणाऱ्या 'परा' नावाच्या अक्षय्य वाणीतून शब्दाची उत्पत्ती होते. तीच जीवशरीरात अनेक प्रकारे चक्रावृत्तीला प्राप्त होऊन गद्यपद्यादिभेदाने विविध वर्णांत (अक्षरांत) प्रगट होते. त्याचप्रमाणे परमात्म्याची इच्छाशक्तीरूप 'मूलाधार' कमलस्थित जी कुंडलिनी, तिच्या शक्तीनेच उत्तम कमलामध्ये प्रथमत: 'परा' नादाची उत्पत्ती होते. त्यानंतर तो नाद 'स्वाधिष्ठान' कमलामध्ये (हे लिंग मूलस्थानी असते) उठून 'पश्यंती' नामाला प्राप्त होतो. तदनंतर हळूहळू तो वरती चढून 'अनाहत' कमलामध्ये (हे हृदयस्थानी असते.) बुद्धितत्त्वाबरोबर मिळून 'मध्यमा' नामाला प्राप्त होतो. त्याच्यावर कंठस्थानी असलेल्या 'विशुद्ध' चक्रात (कमलात) तो नाद गेला म्हणजे त्याला 'वैखरी' म्हणतात. (कोणी परेचे स्थान नाभी, पश्यंतीचे हृदय, मध्यमेचे कंठ व वैखरीचे मुख असे म्हणतात.) वर सांगितलेला शब्दनिष्पन्न वैखरी नाद हा कंठ, मस्तक, तालू, ओष्ठ, दंत, जिव्हामूल, जिव्हाग्र, जिव्हापृष्ठ, तसेच नासाग्र याद्वारे क्रमश: पुढे येऊन कंठतालू, ओष्ठकंठ, कंठोष्ठद्वयद्वारा प्रकाशित होतो व 'अ'कारापासून 'क्ष'कारापर्यंत वर्णमालेचा विकास करतो.

जीवशरीरात कुंडलिनी ही प्राणशक्तीरूप आहे. हिच्याशीच इडा, पिंगला व सुषुम्ना यांचा संबंध आहे व या तीन नाडींच्या द्वारानेच प्राण, अपान, व्यान, उदान, समान, तसेच नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय या दशविध वायूंचा प्रवाह होऊन सर्व शरीराला व्यापतो. प्राणशक्तीच्या द्वारे प्राणापानादि वायू संचालित होऊन सर्व शब्दांना प्रकाशित करतात. उपरोक्त तिन्ही नाडींबरोबर सर्व वायूंचा संबंध असल्यामुळे प्रकृतिस्पंदन जनित अकार ते क्षकारपर्यंत सर्व वर्णमालेची उत्पत्ती या तीन नाडींच्या द्वारेच होत असते. जसे – अ ते अ: पर्यंतची सर्व वर्णमाला 'इडा' नाडीमधून प्रवाहित होते, क ते म पर्यंतची सर्व वर्णमाला 'पिंगला' नाडीमधून प्रवाहित होते आणि य ते क्ष पर्यंतची सर्व वर्णमाला 'सुषुम्ने'मधून प्रवाहित होते. याप्रमाणे ॐ धरून सर्व मंत्रांची उत्पत्ती समष्टी प्रकृत्यानुसार व्यष्टिप्रकृतीमधूनही होते. इतकेच केवळ नव्हे तर व्यष्टी प्रकृती ही समष्टी प्रकृतीची प्रतिकृती अथवा प्रतिबिंब असल्यामुळे समष्टी प्रकृतीच्या प्रत्येक स्पंदनाचा आघात व्यष्टी प्रकृतीमध्ये व व्यष्टी प्रकृतीच्या प्रत्येक स्पंदनाचा आघात समष्टी प्रकृतीमध्ये होत असतो. तसेच व्यष्टी प्रकृतीच्या प्रत्येक लहरीचा समसंबंध समष्टी प्रकृतीच्या तशाच जातीच्या लहरीशी असतो. यामुळे हिच्या

नादाचे प्रतिबिंब तिच्यात व तिच्या नादाचे प्रतिबिंब हिच्यात येऊन पडते. यासाठी साधक आपल्या व्यष्टी प्रकृतीच्या ज्या ज्या लहरीवर चित्ताचा संयम करतो, त्या त्या जातीच्या समष्टी प्रकृतीच्या लहरीचा नाद त्याला ऐकू येतो. उदाहरणार्थ असे समजावे की, साम्यावस्था – प्रकृतीचा प्रथम शब्द प्रणव (ॐकार ध्वनी) असल्यामुळे, ज्यावेळी साधक आपल्या व्यष्टी प्रकृतीला अभ्यासबलाने साम्यावस्थेत पोचवील, त्याचवेळी आपल्या प्रकृतीमध्येही समष्टी प्रकृतीचा प्रथम नाद जो ॐकारध्वनी तो ऐकू शकेल.

हाच नाद मूलाधारचक्रास्थित जी कुंडलिनी तिच्यामधून निघून 'सहस्रदल' कमलामध्ये (शिखास्थानी) लय पावेल. याचप्रमाणे आपल्या व्यष्टी प्रकृतीच्या पूर्ण साम्यावस्थेहून भिन्न अशा ज्या लहरीवर योगी संयम करील, त्या लहरीबरोबर समष्टी प्रकृतीच्या ज्या लहरीचा समसंबंध असेल, त्या लहरीच्या नादाचे प्रतिबिंब आपल्या प्रकृतीत तो अनुभवील. याच रीतीने महर्षी लोक आपल्या प्रकृतीत समष्टी प्रकृतीचा नाद श्रवण करतात. त्या नादाच्या अनुसारेच श्रीभगवान व त्यांच्या शक्तीरूप भिन्न भिन्न देवतांच्या साधनार्थ मंत्रसमूह व संस्कृत वर्णमालेचा आविष्कार (प्रकाश) त्या अर्तींद्रियदर्शी महर्षींच्या द्वारेच जगात झालेला आहे. समष्टी प्रकृतीच्या प्रथम स्पंदनाद्वारे झालेल्या प्राणमंत्राच्या उत्पत्तीनंतर द्वितीय स्पंदनामध्ये गीतोक्त अष्टधा प्रकृतीचे कंपन झाले आहे व यामधूनच प्रधान अष्टबीजांची उत्पत्ती झाली आहे. यांची नावे मंत्रशास्त्रात खाली दिल्याप्रमाणे सांगितली आहेत –

''बीजमंत्र प्रथमचे तीन व नंतरचे आठ आहेत. जसे – १) गुरूबीज, २) शक्तिबीज, ३) रमाबीज, ४) कामबीज, ५) योगबीज, ६) तेजोबीज, ७) शांतिबीज व ८) रक्षाबीज.

१) गुरूबीज, – आ, ए व मकार मिळून (ऐं) होते; म्हणजेच ऐं – गुरूबीज.

२) शक्तिबीज – हकार, रकार, ईकार व मकार मिळून (ह्रीं) होते, म्हणजेच ह्रीं – शक्तिबीज.

३) रमाबीज – शकार, रकार, ईकार व मकार मिळून (श्रीं) होते; म्हणजेच श्रीं – रमाबीज.

४) कामबीज – क्, ल्, ई व मकार मिळून (क्लीं) होते; म्हणजेच क्लीं – कामबीज.

५) योगबीज – क्, र्, ई व मकार मिळून (क्रीं) होते; म्हणजेच क्रीं – योगबीज.

६) तेजोबीज – टकार, रकार, ईकार व मकार मिळून (ट्रीं) होते; म्हणजेच ट्रीं – तेजोबीज.

७) शांतिबीज – सकार, तकार, रकार, ईकार व मकार मिळून (स्त्रीं) होते; म्हणजेच स्त्रीं – शांतिबीज.

८) रक्षाबीज – हकार, लहार, ईकार व मकार मिळून (ह्लीं) होते. म्हणजेच ह्लीं – रक्षाबीज.

योगशास्त्रात सांगितले आहे की, ज्याप्रमाणे कारण ब्रह्माची अष्टधा प्रकृती आहे (जिच्यामुळेच कार्यब्रह्म उत्पन्न झाले आहे.) त्याचप्रमाणे शब्दब्रह्माची ही आठ बीजे म्हणजे अष्टधा प्रकृती आहे. यांनाच प्रधानबीजे म्हणतात. ही सर्व प्रकारच्या उपासनांमध्ये कल्याणकारी होत. शास्त्रांतरांत त्यांची नावे निरनिराळी सांगितली आहेत. याच्यानंतर प्रकृतिविस्तार होत गेला, तसतसे अनेक मंत्र निर्णीत केले गेले व ते भिन्नभिन्न देवतांच्या प्रीत्यर्थ निर्दिष्ट आहेत.

### ३) मंत्रांची सिद्धी

**मंत्र** म्हणजे जगदाधार गुह्य ध्वनी, शब्दब्रह्म. शक्तिपूर्ण (सशक्त) अक्षर वा वर्णसमुदाय म्हणजेच मंत्र होय. यांचे जप किंवा मनन केल्यामुळे आत्मदर्शन होते अथवा एखादी वांछित वस्तू किंवा स्थितीची प्राप्ती

संभव होते. मात्र अध्यात्मज्ञान गुप्त राखावे, ते वाटेल त्याला न देता फक्त काही विशिष्ट गुणसंपन्न शिष्यालाच सांगावे अशी अनादि कालापासून चालत आलेली रूढी आहे.

शास्त्रामध्ये मंत्रांची असाधारण शक्ती सांगितली आहे, त्या शक्तीच्या योगाने भगवान प्रसन्न होतो; देवता वशीभूत होतात व अनेक प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात. योगशास्त्रात सांगितले आहे की, ''मंत्रयोगी मंत्रसिद्धिद्वारा हठयोगी तप:सिद्धिद्वारा व लययोगी संयमसिद्धिद्वारा ईश्वरी विभूतींचा लाभ करून घेतो. मंत्रसाधनद्वारानेच देव व देवी वशीभूत होतात, मंत्रयोगसिद्धी प्राप्त झालेल्या योग्याला संसारातील समस्त वैभवांचा उपभोग घडतो.''

भगवान पतंजलीने आपल्या योगदर्शनामध्ये मंत्राच्याद्वारे सिद्धी प्राप्त होतात असे लिहिले आहे.

*''जन्मौषधिमंत्रतप:समाधिजा: सिद्धय: ।''*

**भावार्थ** – पूर्वकर्माच्या तीव्र संवेगाने केव्हा केव्हा कोणास जन्मत:च सिद्धी प्राप्त झालेली असते. तसेच औषधींच्या व मंत्रांच्या द्वारे सिद्धी प्राप्त होते. त्याचप्रमाणे तप व समाधीच्याद्वारेही सिद्धी प्राप्त होतात.

प्रकृती ही परमात्म्याची शक्तिस्वरूपिणी असल्यामुळे तिच्यात अनंत शक्ती भरलेली आहे. त्या शक्तीचा विकास सूक्ष्मापासून स्थूलापर्यंत समस्त प्राकृतिक पदार्थात झालेला दिसत आहे. प्रत्येक वस्तूची शक्ती, ती वस्तू स्थूलापेक्षा सूक्ष्मभावाला जेवढी प्राप्त झालेली असते, तेवढी तेवढी अधिक विकासाप्रत पावत असते. उदाहरणार्थ, असे समजावे की, अंत:करणाच्या विकासरूप स्थूल देहामध्ये जेवढी शक्ती आहे, तिच्या अनंतपट शक्ती सूक्ष्मदेहात आहे. स्थूल शरीर तीन वर्षेपर्यंत जिकडे जाऊन पोचू शकणार नाही, तिकडे मन हे शरीरापेक्षा सूक्ष्म असल्यामुळे एका पळात जाऊ शकते. इतकी शक्ती त्याच्यात साठविली आहे. याप्रमाणेच इतर सूक्ष्म वस्तूंमध्येही समजून घ्यावे. पाण्यात जी शक्ती आहे, तीपेक्षा पाण्याचे सूक्ष्म परमाणुरूप जी वाफ तिच्यात व बाष्पपुंजरूप मेघांत अनेकपटींनी अधिक शक्ती आहे. हीच शक्ती विजेच्या रूपाने मेघमंडळात विलास करते. प्रकृतीच्या विविध विकारांच्या द्वारे उत्पन्न झालेल्या 'लौकिक' शब्दांमध्ये इतकी शक्ती असते की, तिच्यायोगे माणसे वशीभूत होतात. इतकेच नव्हे तर रागरागिणींच्यायोगे तो प्रयोग केला असता क्रूर सर्प व मदोन्मत्त हत्तीही वश होऊन जातात. असे जर आहे तर मग प्रकृतीच्या विशेष स्पंदनांच्या द्वारे उत्पन्न झालेल्या 'दिव्य' शब्दांमध्ये ती अनंतपटींनी असली पाहिजे यात काय संशय आहे? कारण की, प्रकृतिस्पंदनजनित मंत्रसमूह प्रकृतीच्या सूक्ष्म सृष्टीचा परिणाम आहे आणि म्हणूनच सूक्ष्म दिव्यनामरूपी मंत्रांमध्ये अनंतशक्तिरूपिणी प्रकृतिमातेची अनंतशक्ती भरलेली आहे.

ज्याप्रमाणे समस्त सूक्ष्म ब्रह्मांड प्रकृतीच्या कंपनाने प्रणवनादाची उत्पत्ती झाली असल्यामुळे त्यात (प्रणवात) समस्त ब्रह्मांड प्रकृतीची अनंत शक्ती भरलेली आहे. त्याचप्रमाणे अन्य जे मंत्र प्रकृतीच्या ज्या विभागाला कंपन देऊन उत्पन्न झालेले आहेत अथवा होत आहेत त्या मंत्रांमध्ये प्रकृतीच्या त्या त्या विभागाची शक्ती साठवून राहिलेली आहे, असे खास समजावे. प्रत्येक सूक्ष्म सृष्टीच्या विभागाची जी अधिष्ठात्री देवता आहे, तीच त्या सृष्टी संबंधीय शक्तीची अधिपती होय. कारण की, दैवी संबंधावाचून शक्तीचा प्रयोग होऊ शकत नाही. जडकर्माचा चालक देवतागण असले, दैवी सहाय्यतेनेच शक्ती उत्पन्न होऊन कर्माची उत्पत्ती व कर्मफलाची प्राप्ती होत असते.

मंत्रांशी जर दैवी शक्तीचा साक्षात संबंध आहे तर मंत्रांच्या साहाय्याने यथावत शक्तीचा प्रकाश होणे स्वत:सिद्ध आहे व हाच मंत्राच्या शक्तीच्या आविर्भावाचा अनुभव होय. ज्या अक्षरांच्या परस्पर समन्वयाने (जोडणीने) मंत्र बनत असतो, ती अक्षरे अशा तऱ्हेने जोडली जात असतात की, धातू व रासायनिक द्रव्ये अमुक तऱ्हेने (युक्तीने) मिळविली असता त्यामधून वीज व तिची शक्ती ही प्रकाशित झालीच पाहिजे, हे जसे आहे, तसेच त्या त्या शक्तिमान अक्षर समूहाचा सूक्ष्म विचारपूर्वक मिलाफ केला असता त्याद्वारे त्यात (त्या मंत्रात) ती ती अद्‌भुत दैवी शक्ती उत्पन्न होत असते. (गोरखनाथांनी असेच काही नवीन दिव्यमंत्र निर्माण केले व शिष्यवर्गांना त्यांचा उपदेश केला; परंतु त्यांच्या अनाधिकारित्वामुळे त्या मंत्रांचा त्यांच्याकडून दुरूपयोग होऊ लागला. तेव्हा मंत्र निर्माणकर्त्या गोरखनाथांनी त्या मंत्रास शाप देऊन ठेवला.) आपल्या इच्छेनुसार अधिकारी पुरुषांनी नवीन मंत्र निर्माण करावे व त्यास शापही देऊन ठेवावे, असे मंत्रशास्त्रात सांगितले आहे. गायत्री मंत्रास सुद्धा विश्वामित्र वशिष्ठादिकांचा शाप आहे. हा शापोद्धार केल्याशिवाय त्या मंत्राचे पुरश्चरण करता येत नाही, ही गोष्ट शास्त्रज्ञास माहीत आहेच.

फळ हे कर्मावर नव्हे तर कर्म करणाऱ्याच्या भावावर अवलंबून असते आणि इष्टभाव उत्पन्न होण्याकरिता इष्ट मंत्राची योजना असते, पण मंत्रांचाअर्थ समजला तरच त्यातील भाव हृदयात उत्पन्न होतो आणि म्हणूनच अर्थ न समजता मंत्र म्हणणाऱ्या ब्राह्मणास शास्त्राने जड खांबासारखा भारवाही असे म्हटले आहे. 'साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठी' अशा तऱ्हेचे टोले संतांनीही मारले आहेत. मंत्र म्हणताना अर्थाकडे लक्ष देऊन भावोत्पादनाची काळजी घ्यावी.

रोग्याला आरोग्य मिळण्याकरता 'रामरक्षा' स्तोत्रप्रमाणेच शिवकवचाचा पाठ घालण्याचा संप्रदाय आहे. त्यातही रामरक्षेप्रमाणे अमुक अमुक स्वरूपाचा अथवा शक्तीचा शिव माझ्या अमुक अमुक अवयवांचे रक्षण करो, अमुक अमुक नामाचा शिव मला अमुक अमुक ठिकाणी आत-बाहेर, रानात-वनात, दिवसा-रात्री, खाली-वर व सर्व बाजूंनी माझे रक्षण करो; चोरांपासून राखो, शत्रूंपासून राखो, पिशाचांपासून राखो, राक्षासांपासून राखो, शाकिनींपासून राखो, डाकिनींपासून राखो, आधीपासून राखो, व्याधींपासून राखो, असे सर्व प्रकारचे रक्षण मागितले असून सर्व प्रकारचा अभ्युदय मागितला आहे. कवचातील ते ते शब्द उच्चारताना अर्थमय मन करून सर्वेश्वर प्रभू शंकर त्या त्या प्रमाणे मला देत आहे, माझे सर्व बाजूने रक्षण होत आहे अशी भावना करीत करीत ते म्हणावयाचे असते आणि असे स्वाग्रह - स्वत:चा आग्रह केले तरच योग्य फळ मिळत असते. भावामध्ये शक्ती आहे, तशी शब्दामध्येही आहे; पण शब्दशक्तीत भावशक्ती मिळवून अशी कार्ये केली, तर त्याचे किती उत्तम फळ येईल बरे! अलीकडील संमोहनविद्या ही 'भाव तैसे फळ' याचीच सुधारित आवृत्ती आहे. आपले मंत्र हे ध्वनीशास्त्र, मानसशास्त्र, योगशास्त्र, अध्यात्मशास्त्र इत्यादी शास्त्रांना धरून रचलेले आहेत, त्यांचा अर्थ जाणून, त्या त्या 'भावारूढ' मन करून ते म्हटले असता त्यांचे योग्य फल आलेच पाहिजे.

कित्येकदा असेही होते की, मंत्रातील भावाचा अभाव करतात, याप्रमाणे मंत्र जापक मंत्र म्हणताना स्वत:चाही अभाव करून घेतात म्हणजेच तोंडाने मंत्र म्हणत असताना मनाने ते दुसरीकडे असतात. त्यामुळेही फलप्राप्तीत अंतर पडते. सारांश, भावावाचून जशी भक्ती फोल तसेच भावेवीण मंत्र व्यर्थ!

### ४) मंत्रात असाधारण शक्ती कशाने व केव्हा उत्पन्न होते?

बाण, चंद्रज्योती, गर्नाल किंवा बंदुकीची दारू ही गंधक, सोरमीठ, कोळसा इत्यादी द्रव्यांच्या निरनिराळ्या प्रमाणशीर मिश्रणाने तयार होतात, पण ते ते अग्नी चमत्कार दृष्टीस पडण्यास ती दारू भरण्याची पात्रे अथवा यंत्रे निरनिराळ्या आकारांची बनवावी लागतात, त्याचप्रमाणे मंत्रांमधून विशिष्ट इष्ट शक्ती उत्पन्न करण्यास निरनिराळे विधी योजावे लागतात. हे विधी म्हणजे एक प्रकारची 'अभौतिक यंत्रेच' होत. सप्तशतीचे अनुष्ठान करणाऱ्यास हे माहीतच आहे की, नाना प्रकारच्या कामनांकरता सप्तशतीतील प्रत्येक मंत्रास निरनिराळे 'पल्लव' लावावे लागतात. हे 'पल्लव' म्हणजे एक प्रकारचे विधीच होत. या विधीशिवायही मंत्रानुष्ठान करणाऱ्याची मानसशक्ती व पावित्र्य यावरही मंत्रशक्तीची प्रगटता अवलंबून आहे. ज्याप्रमाणे एखाद्या सभेमध्ये वक्त्याच्या म्हणजे शब्दप्रयोक्त्याच्या प्राणशक्तीच्या व अंत:करणशक्तीच्या द्वारा शब्दामध्ये अशी एक अपूर्व शक्ती उत्पन्न होते की, जिच्यामुळे श्रोत्यांच्या अंत:करणावर विलक्षण परिणाम होतो. त्याचप्रमाणे मंत्रसाधकाच्या अंत:करणाची शुद्धशक्ती, भावशक्ती, प्राणशक्ती व संयमशक्ती यांच्याद्वारा मंत्राचा उपयोग झाला असता त्याच्यामध्ये असाधारण शक्ती उत्पन्न होते. त्याचा पाहिजे तिकडे उपयोग केला असता तो मंत्र ईप्सित फलप्रदान केल्यावाचून राहणारच नाही; परंतु शब्दांमध्ये स्वाभाविक वस्तुशक्ती असली तरी अशुद्ध उच्चारामुळे तसेच प्राणशक्तीहीन व हृदयहीन मनुष्याच्या द्वारा उच्चारला गेल्यामुळेही इच्छित फल देण्यास तो मंत्र समर्थ होत नाही, म्हणून वर सांगितलेला कोणताही दोष नसेल व अंत:करणाच्या पूर्ण शक्तीबरोबर साध्य वस्तूला लक्ष्य करून त्या मंत्राचा प्रयोग झाला असता, तो मंत्र अवश्य ईप्सित फल देणारा होईल यात मुळीच संदेह नाही. सांप्रतकाळी अनेक ठिकाणी मंत्राचे यथोक्त फल मिळत नाही, याचे कारण वर सांगितलेले दोषच होत असे पक्के समजावे. ज्या साधकाने पुरश्चरणादि प्रक्रियेच्या द्वारे मंत्र चैतनयुक्त करून बिनचूक साधन केले आहे. तो त्या मंत्रशक्तीला आपल्यास अनुकूल करून घेऊन जगात असाधारण दैवी शक्तीला प्राप्त करून घेईल यात तिळमात्र संदेह नाही. तो आपल्या प्राणशक्तीबरोबर मंत्रशक्तीचा प्रयोग करून जो पाहिजे ते करू शकेल. शास्त्रात सांगितलेल्या सर्व सिद्धी अशा प्रकारे प्राप्त करून घेता येतात. मंत्रशक्तीच्या बळाने देवता चक्रावर प्रभाव पाडून, प्रकृतीच्या त्या त्या अधिनायक देवतांना वर सांगितल्याप्रमाणे वश करून घेता येते. तसेच असुरी प्रकृतीवर विराजमान असलेल्या पिशाच, दैत्य, भूत, प्रेत, डाकिनी, शाकिनी इत्यादी तामसी शक्तींनादेखील याप्रमाणेच मंत्रशक्तीद्वारा साधक वश करून घेऊ शकतो. याचप्रमाणे आर्यांच्या शास्त्रांत वर्णिलेल्या नाना प्रकारच्या अस्त्रसिद्धीही याप्रमाणेच मंत्रशक्तिद्वारा प्राप्त करून घेता येतात. रामायण – महाभारतामध्ये आग्नेयास्त्र, पर्जन्यास्त्र, वायव्यास्त्र, पर्वतास्त्र, वज्रास्त्र, ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र, नारायणास्त्र वगैरे दिव्यास्त्र प्रयोगांचे प्रमाण मिळत आहे, ती याचप्रकारे मंत्रशक्तीच्या द्वारा सिद्ध केलेली अस्त्रे आहेत असे समजावे. त्या मंत्रसमूहांना चैतन्ययुक्त करून आपल्या प्राणशक्तीच्या साह्याने शत्रूवर प्रयोग केला असता प्राणशक्ती व मंत्रशक्ती यांनी भरलेला अस्त्रसमूह लक्ष्यस्थलावर जाऊन ईप्सित फल अवश्य उत्पन्न करील, यात मुळीच संदेह नाही.

तथाकथित पुरोगामी लोक या अस्त्रसिद्धीवर असा आक्षेप घेतात की, मंत्रामध्ये जर अशी शक्ती आहे तर उच्चारण करणाऱ्याची जिव्हा का नाही जळून जात? अशा बालिश प्रलापांची कीव करावी तेवढी थोडी

आहे! बंदुकीच्या गोळीत शत्रूची छाती फोडून टाकण्याची जर शक्ती आहे, तर त्या गोळीने ती बंदूक व ती धरणाऱ्याचा हात का नाही फुटून जात, असे म्हणण्यासारखेच हे आहे. दुसऱ्या सामान्य दृष्टांतानेही समजून येईल की, सूर्यकिरणात दग्ध करण्याची शक्ती असली तरी ती, जिकडे तिकडे व ज्यास त्यास दग्ध करू शकत नाही; परंतु स्थूलदर्शक भिंगाच्याद्वारे त्या किरणांचे केंद्रीभवन होऊन ती बिंदुधारेने ज्या वस्तूवर पडतात त्या वस्तूलाच ती जाळू शकतात. याचप्रमाणे मंत्रांत शक्ती असली तरी ती मंत्रांमध्ये सामान्यपणे व्यापून असते; परंतु ज्या वस्तूवर 'लक्ष्य' धरून, अंतःकरणाची एकाग्रता व प्राणशक्ती यांच्या द्वारा त्या मंत्राचा अस्त्राच्या साहाय्याने प्रयोग केला जातो, तेथे ती शक्ती जाळणे, मार देणे, मुग्ध करून सोडणे इत्यादी अद्भुत क्रिया प्रगट करते. सारांश, प्रत्येक मंत्राची सिद्धी भावशक्तिद्वारा अंतःकरणाच्या एकाग्रतेवर, शुद्धतेवर व प्राणशक्तीच्या केंद्रीकरणावर अवलंबून असते, नुसत्या मंत्रोच्चाराने ती हवी तेव्हा प्रकट होत नसते. ज्या साधकाच्या अंतःकरणात भावशक्ती व प्राणशक्ती यांची जितकी प्रबलता असेल त्या मानाने त्यांच्यामध्ये मंत्रद्वारा अस्त्रप्रयोग करणे, मंत्रसाधनद्वारा आसुरी शक्ती व देवता यांचे वशीकरण करणे, इतकेच नव्हे तर भगवंताला प्रसन्न करून घेण्याची पात्रताही राहील. 'भाव तसा देव' हे प्रसिद्धच आहे.

**५) मंत्रजपाने भावसमाधी**

मंत्रयोगामध्ये ज्या नामरूपांच्याद्वारे साधनाचा निधी सांगितला आहे, त्या दिव्य नामाच्या म्हणजे मंत्राच्याद्वारा वर सांगितलेल्या उपायाने इष्टदेवतेचे साधन साधता येते. इष्ट देवाला 'लक्ष्य' करून त्या इष्टदेवाच्या मंत्राचा 'जप' व त्याची 'अर्थभावना' करता करता तो साधक, प्रकृतीच्या ज्या भागाबरोबर इष्टदेवाचा व मंत्राचा संबंध आहे, त्या प्रकृतीभागामध्ये आपली चित्तवृत्ती लीन करू शकतो. ज्याप्रमाणे रूपाच्या अवलंबनाने भावामध्ये व भावद्वारे भावाग्राह्य भगवंतामध्ये आत्मा विलीन होतो, त्याचप्रमाणे मंत्रसाधनद्वारा मंत्रजतनशीला प्रकृती व त्या प्रकृतीचा अधिनायक इष्टदेव यांच्यामध्येही आत्मा विलीन होतो. त्याप्रमाणे व्यापक प्रकृतीबरोबर मंत्राच्या द्वारे आपल्या आत्म्याची जितकी 'एकतानता' होते, तितकी व्यापक प्रकृतीची शक्ती तो साधक प्राप्त करून घेऊ शकतो व अखेरीस मंत्र व देवता यातील भेदभाव विसरून, दैवी प्रकृतीमध्ये विराजमान असलेल्या इष्टदेवाच्या स्वरूपामध्ये साधकाचा आत्मा लीन होऊन भावसमाधी प्राप्त करून घेतो. ज्या नामरूपाच्या अवलंबनाने जीव संसारात बद्ध होऊन गेला होता, त्याच नामरूपाच्या 'दिव्य' भावाचा आश्रय करून तो या प्रकारे 'नामरूपनिर्मुक्त' अशा ब्रह्मपदाला येऊन मिळतो. नामरूपमय मंत्र योगाच्या साधनेद्वारेच अखेरीस सविकल्प समाधिरूप महत्भावसमाधीस पोचून साधक हा चिन्मय, निराकार व निर्गुण ब्रह्माच्या राजयोगोक्त साधनाच्या अधिकाराचा लाभ करून घेतो. या मंत्रयोगाची गुरूमार्ग प्रदर्शित षोडश अंगे आहेत. या षोडशांगसाधनाच्या अनुष्ठानाच्या द्वारे शेवटी साधक निर्विकल्प समाधीची पदवी प्राप्त करून घेतो व हेच सर्व साधनांचे अंतिम फल आहे.

**६) मंत्र प्रकार**

प्रार्थनेसोबत मंत्राचे महत्त्व वाढते. प्रार्थनेतून, मंत्रसाधनेतून मनाची शुचिता व आचरणाची नैतिकता वाढते, सत्कर्माच्या, सत् प्रवृत्तीच्या प्रेरणा वाढू लागतात. जप, मंत्रपठन, प्रार्थनेतून अंतर्मुख होऊन मनाची एकाग्रता वाढते. वर्धिष्णु एकाग्रता ही उपासनेच्या सफलतेची गुरूकिल्ली आहे.

मंत्र घेताना कल्याणेच्छू पुरुषाने चांगल्या मंत्रविद (मंत्रज्ञ) पुरुषाकडून विध्युक्त रीतीने घेतला पाहिजे. निरनिराळ्या कामसिद्धीचे निरनिराळे मंत्र असतात, निरनिराळ्या देवता असतात. किंबहुना एकाच देवतेचे, कामनाभेदाप्रमाणे मंत्रही भिन्न असू शकतात, तसेच आपल्या जन्मनक्षत्राचा अथवा नावाचाही, मंत्र ग्रहण करताना विचार करावा लागतो. कारण मंत्रामध्ये – १) सिद्ध, २) साध्य, ३) सुसिद्ध व ४) अरि असे चार प्रकार असतात. 'सिद्ध' मंत्र कालांतराने फलसिद्धी करून देणारा, 'साध्य' मंत्र त्यापेक्षा लवकर व थोड्या श्रमाने फळणारा, 'सुसिद्ध' मंत्र त्वरित फल देणारा व 'अरि' मंत्र जापकाचा नाश करणारा होतो. वरील चारांच्या मिश्रणाने – सिद्ध – अरि, साध्य – अरि, सुसिद्ध – अरि व अरि – अरि पुन: सूक्ष्म भेद होतात. या सिद्धादि चक्राप्रमाणेच – ऋण-धन चक्राचे शोधनही करावे लागते. मंत्र ऋणी असावा व जापक धनी असावा. असे नसता जापक ऋणी व मंत्र धनी असेल तर जन्मभर त्या मंत्राचा जप करूनही काही फल मिळावयाचे नाही.

१) वेदव्यासांनी – 'ब्रह्मसूत्रे' केलेली आहेत, त्याचप्रमाणे
२) जैमिनीने – 'कर्मसूत्रे'
३) नारदांनी – 'भक्तिसूत्रे'
४) पतंजलींनी – 'योगसूत्रे' व
५) परशुरामांनी – 'तंत्रसूत्रे' केलेली आहेत. (तंत्रशास्त्राचे रहस्य या सूत्रांनी अगदी व्यवस्थित मांडले आहे असे कळते.)

संप्रदाय व विश्वास यांनीच सर्व प्रकारची सिद्धी प्राप्त होते. 'संप्रदाय' म्हणजे गुरूपरंपरेच्या आचाराला अनुसरून वागणे व 'विश्वास' म्हणजे मंत्रामध्ये फलसाधन तत्त्वाचा निश्चय असणे. या दोहोंच्या योगानेच सर्व प्रकारची सिद्धी प्राप्त होते.

### ७) गायत्री मंत्राची मीमांसा*

### क) गायत्री मंत्राचे श्रेष्ठत्व

गायत्री मंत्राचे श्रेष्ठत्व सर्व द्विजांना कबूल आहे. कारण गायत्री मंत्र जपामध्ये संयम आणि शारीरिक व मानसिक पावित्र्य परम आवश्यक आहे. चारही वेदांचे सार म्हणजेच गायत्री मंत्र होय. गायत्री मंत्र जीवब्रह्मैक्य ज्ञानाचा बोध करून देणारा सर्व ऐहिक आणि पारलौकिक, इष्ट कामनांची पूर्ती करणारा आहे. अनादि कालापासून वसिष्ठादि ऋषिमुनींपासून गायत्री मंत्राच्या उपासनेची परंपरा चालत आलेली आहे. गायत्री उपासना सर्व प्रकारच्या पापांचे आणि आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक असे त्रिविध ताप नाहीशी करणारी आहे.

### ख) गायत्री मंत्र

''ॐ भू र्भुव स्व: । तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो न: प्रचोदयात्।।'' (ऋक् संहिता ३।४।१० यजुर्वेद अनुवाक् ३६ । क्रमांक ३)

**ग) ब्रह्मांड व परमात्माबोधक सरलार्थ**

१) ॐ भू: – भूलोक

२) भुव: – आकाश किंवा अंतरिक्षलोक

३) स्व: – स्वर्गलोक (यामध्ये महर्लोक, देवलोक, तपलोक आणि सत्यलोक यांचा समावेश आहे.)

४) तत् – तेजस्वी अग्नी

५) सवितु: – सूर्यदेवता

६) वरेण्य – प्रजापति देवता

७) भर्ग: – वरूण देवता

८) देवस्य – इंद्र देवता

९) धीमही – आत्मा

१०) धिय: – परमात्मा

११) य: – शिवपरमात्मा

१२) न: – संपूर्ण ब्रह्मांडव्यापक परमात्मा म्हणजेच परात्पर परब्रह्म.

**घ) गायत्री मंत्राचे निरूपण**

**१) व्याहृत्यर्थ**

भू: भुव: स: (: भूर्भुवस्व:) या तीन व्याहृति (उच्चार) आहेत. या तीन महाव्याहृति त्रयी विद्याचे सार आहेत. 'ॐ' शब्द ब्रह्मसंबंधी साम आहे. या सामची संज्ञा प्रणव आहे. ब्रह्माचा अर्थ वाणी आहे. हा साम व्याहृतींमध्ये गायला जातो. यालाच सत्यसाम म्हणतात. व्याहृति 'ॐ'च्याच व्याख्या करतात. हा 'ॐ' साम स्वर्गाचा द्वार आहे, ज्योति आहे. सामवेदाचे प्रवर्धन आहे. सामवेदीय व्रतांचा संबंध गाण्यां (गीतां) शी असतो.

भूर्भूव: स्व: या तीन व्याहृति आहेत. **भू:** – सत्ता तिन्हीही काळामध्ये नित्य अस्तित्वात असणाऱ्या वस्तूला भू: म्हणतात. **भुव:** – दृक चैतन्य समस्त दृश्य प्रपंचाला स्वस्वरूपभूत कधीही नाश न होता स्वयंसिद्ध स्वयंप्रकाशित चैतन्य प्रकाशित करते. त्या चिद्रूपवस्तूला भुव: म्हटले जाते. **स्व:** – आनंद म्हणजेच सर्व लोक ज्याची इच्छा करतात, त्या प्रार्थनीय किंवा पूजनीय 'सुखस्वरूपाला' स्व: म्हटले जाते. यावरून सिद्ध होते की, सच्चिदानंदस्वरूप युक्त प्रत्यगभिन्न ब्रह्मस्वरूपच भूर्भूव: स्व: शब्दांनी तैत्तिरीयारण्यकामध्ये स्पष्ट सांगितलेले आहे.

सत्यस्वरूप 'भू:' व्याहृतीच्या जपाने-चिंतनाने मृत्यूभयाची चिद्रूप 'भुव:' व्याहृतीच्या चिंतनाने बुद्धीमधील अज्ञानरूपी मिथ्याज्ञानादिरूप जडत्वाची आणि आनंदरूप 'स्व:'व्याहृतीच्या चिंतनाने आध्यात्मिकादि त्रिविध दु:खांची निवृत्ती होते.

'भूर्भुव: स्व:' या तीन व्याहृतींची सृष्टीच्या पूर्वी स्वयंभू ब्रह्माने आपल्या ज्ञानदेहाने व्याहृति म्हणजेच उच्चारणा केली. म्हणून त्यांना व्याहृति म्हटले जाते.

किंवा साधकांच्या विविध इच्छा सर्वभावाने परिपूर्ण करतात, तसेच विविध प्रकारची दु:खे नाश करतात. त्यांना व्याहृति म्हटले जाते.

आता गायत्री जपाच्या सफलतेचे घटक सांगतात - मनाची प्रसन्नता, शरीर इंद्रियांची शुद्धता, मौन (व्यर्थ वार्तालाप न करणे आणि हित-मित-सत्य-प्रिय बोलणे) मंत्रार्थाचे चिंतन, चित्तामध्ये व्यग्रतेचा अभाव आणि अनिर्वेद जपाने चित्ताचा लय न करणे - ही सहा अंगे जपाच्या सफलतेला कारणीभूत आहेत. म्हणजेच या सहा जपांगाच्या साहाय्याने जपसिद्धी प्राप्त होते. जपाचा प्रकार किंवा जपाची पद्धत शब्दादी विषयांच्यापासून मनाला परावृत्त करून मंत्राच्या अर्थावर लक्ष ठेवून जप अधिक जलद किंवा संथ न करता मोत्यांच्या हाराप्रमाणे सतत, अखंड, अविश्रांत करावा.

शौचस्नानादि करून निर्जन पवित्र ठिकाणी आसन दृढ करून, मंत्रन्यासादि करून, एकाग्र मनाने रुद्राक्षमाळ घेऊन एक हजार किंवा शंभर तरी गायत्री जप दररोज द्विजाने अवश्य केला पाहिजे. महर्षी याज्ञवल्क्य म्हणतात - अव्यग्र, शांत आणि प्रसन्न मनाने गायत्रीचा एक हजार जप केला पाहिजे. जर प्राणायामामध्ये आवड असेल तर प्राणायामासहित शंभर वेळेला केलेला जपसुद्धा चांगला आहे.

### २) मीमांसा

### अ) मंत्राचा सरळ भावार्थ

आम्ही सर्वांना पूजनीय, प्रार्थनीय असणाऱ्या परमात्म्याचे ध्यान करतो. जो सर्व विश्वाचा कर्ता आहे त्याला 'सवितु' असे म्हणतात. तसेच जो स्वत: प्रकाशमान असून सर्व विश्वाला प्रकाशमान करतो तो परमात्मा आमच्या बुद्धीला (चतुर्विध) पुरुषार्थासाठी प्रेरणा देवो. तो आमच्या बुद्धीला प्रकाशमान करो.

### आ) मंत्राची मीमांसा

सर्व लोक आणि शास्त्रात प्रसिद्ध असलेले, अत्युत्कृष्ट प्राणिमात्रांच्या हृदयात - अंत:करणात वसलेले, प्रत्यगात्मस्वरूप स्वयंसिद्ध परब्रह्म अथवा परमात्मा 'तत्' शब्दाचा अर्थ आहे. 'तत्त्वमसि' या श्रुतिवचनातील 'तत्' शब्द याचे प्रमाण आहे. गीतेमध्ये स्मृतीनेही 'ॐ तत् तत्' असे ब्रह्माचे प्रतिपादन करणारे तीन शब्द सांगितले आहेत. अर्थात 'तत्' शब्द ब्रह्मवाचक आहे.

सर्व सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलय यांना, अखिल नामरूपात्मक द्वैत प्रपंचाच्या भ्रमाला कारण असलेले म्हणजेच सृष्टीचे अधिष्ठान अथवा जगत्कारण असून ज्याच्यामधून सर्व पंचमहाभूते व प्राणिमात्र निर्माण होतात, चराचरातील प्राणिमात्रांचे अस्तित्व ज्याच्या सत्तेमुळे असते आणि सर्व पंचमहाभुते व प्राणिमात्र ज्याच्यामध्ये शेवटी लय पावतात, तेच जगाच्या उत्पत्ती, स्थिती आणि लयाचे अभिन्ननिमित्त उपादानकारण आहे. त्याला जाणून घेण्याची तू इच्छा कर, तेच ब्रह्म आहे, असे श्रुतिवचन आहे.

सर्व मुमुक्षूंनी वंदन करावे, प्रार्थना करावी, भजन करावे असेच ते ब्रह्म आहे. ते निरतिशय, अखंड, आनंद स्वरूप आहे. ब्रह्माचे स्वरूप अखंड आनंदस्वरूप नसते तर त्याच्याबद्दल जिज्ञासा झाली नसती; परंतु सर्वजण त्याची इच्छा करीत असतात.

अविद्या आणि तिचे कार्य याचे भर्जन करणारा, नाश करणारा, श्रुतीच्या साहाय्याने जाणण्यास योग्य आहे. असा 'भर्ग' या शब्दाचा अर्थ आहे. अज्ञानाचा नाश करणारे जे ज्ञान ते निर्विकार, नित्य, शुद्ध, बुद्ध,

मुक्त परिपूर्ण ज्योतिस्वरूप आहे तेच भर्ग. तोच भर्गपदाचा अर्थ आहे. 'एतद् ब्रह्म एतद् अमृतम् एतद भर्गः' हे श्रुतिवचन आहे. 'तत्ज्योतिः परमं ब्रह्म भर्गः तेजः यतः स्मृतम्' असे स्मृतिवचन आहे. म्हणजेच ब्रह्म अमृतस्वरूप, ज्योतिस्वरूप, चैतन्यस्वरूप आहे. अर्थात सच्चिदानंद स्वरूप आहे. श्रुतिस्मृतींच्या प्रमाणांनी भर्ग म्हणजे अज्ञाननाशक ज्ञान असाच अर्थ सांगितलेला आहे.

'देव' शब्दाचा अर्थ सर्व द्योतनात्मक अखंड चैतन्यस्वरूप असे ब्रह्म, सवितुः देवस्य असे षष्ठीपद वापरण्यात आले आहे. 'राहोः शिखत्' – राहूच्या मस्तकाप्रमाणे 'पुरुषस्य चैतन्यवद्वा' पुरुषाच्या चैतन्याप्रमाणे या दोन्ही ठिकाणी प्रतिपाद्य वस्तू आणि सांगितलेले स्वरूप यात भेद नाही. राहू आणि मस्तक किंवा पुरुष आणि चैतन्य यात पूर्णपणे अभेद आहे. त्याचप्रमाणे मंत्रातही 'सवितुः देवस्य भर्गः' यांच्यातही भेद निर्देशित केला आहे आणि अशा अभेद अर्थानेच षष्ठी विभक्तीचा अर्थ समजावून घ्यावयास हवा, कारण भेद केवळ औपचारिक किंवा कल्पित आहे.

या ठिकाणी कदाचित शंका येईल की, ते ब्रह्म प्रत्यगात्मस्वरूप नसून प्रत्यगात्मस्वरूपापासून भिन्न आहे, कारण ते ब्रह्म कर्तृत्व, भोक्तृत्व वगैरे संसारधर्माचा आश्रय नाही; परंतु प्रत्यगात्मा कर्तृत्वादि धर्मवान प्रतीत होतो. म्हणून त्यांच्यामध्ये भेद आहे. ऐक्य नाही. या शंकेचे निरसन करताना सांगितले आहे की, दोन्हीमध्ये भेद नाही. जे सच्चिदानंद स्वरूप आहे तेच ब्रह्म आहे. तेच अंतःकरणातील सर्व वृत्तींना प्रेरणा देणारे, प्रकाशमान करणारे, प्रत्यगात्मस्वरूप आहे. येथे 'यः' शब्द पुल्लिंगी असून तो नपुसकलिंगी अर्थाने म्हणजे 'जे ब्रह्म'असा घ्यावा.

बिंबस्थानीय असलेले निरूपाधिक ब्रह्मच सर्वांच्या अंतःकरणातील वृत्तीचे साक्षी आहे, प्रेरक आहे. तेच प्रत्यगात्मस्वरूप आहे असा भावार्थ आहे.

याचप्रमाणे 'प्रचोदयात्' पदाने निर्देशित केलेले प्रत्यगात्मस्वरूप असलेले परब्रह्म 'तत् सवितुः' पदाने स्पष्ट केले आहे आणि ते प्रत्यगात्मस्वरूपच ब्रह्म आहे असे समजले जाते. म्हणून प्रत्यगात्मस्वरूपापासून ब्रह्म भिन्न समजले जात नाही असा भाव आहे.

त्याच अभिन्न तत्त्वाचे आम्ही सतत चिंतन करतो, ध्यान करतो. ते ब्रह्म मन, बुद्धी, चित्त, अंतःकरण सर्वांना चेतना देते, स्फूर्ती देते. ते अंतःकरणाचे आश्रयस्थान आहे, आधार आहे. ते साक्षीरूप ब्रह्मच आमचे स्वरूप आहे. ते आमचे सर्वांचे अधिष्ठान आहे. ते परमानंदस्वरूप असून सर्व दुःखरहित आहे. स्वयंप्रकाशक आहे. चिदात्मस्वरूप आहे. त्या ब्रह्माचे आम्ही 'जे ते आहे ते मी आहे, जे मी आहे तेच ते आहे.' अशा भावनेने श्रद्धाभक्तियुक्त अंतःकरणाने चिंतन करतो.

अशा प्रकारे गायत्री मंत्र रज्जुसर्प न्यायाने आकाशादि सर्व प्रपंच, जो ब्रह्माचे विवर्त आहे, आभास आहे, त्याचे अधिष्ठान ब्रह्मच आहे. ज्या प्रपंचाचा बोध करून बाध समानाधिकरणाने ब्रह्माशी एकत्व दर्शविले आहे. त्याचप्रमाणे 'सोऽयं' या न्यायाने अंतःकरणातील बुध्यादि वृत्तींचा द्रष्टा प्रत्यगात्मा आणि ब्रह्म यांचे तादात्म्य किंवा एकत्वाचे स्पष्ट प्रतिपादन केलेले आहे आणि चराचर विश्वापासून अभिन्न, अखंड, एकरस परिपूर्ण, सर्वात्मरूप ब्रह्मतत्त्वाचा बोध होतो. श्रुतिवचनच आहे 'एकतत्त्वाने, एकस्वरूपाने, अभेद स्वरूपाने ब्रह्मास पाहावयास हवे.'

उपरोक्त स्पष्टीकरणाने मनन केल्यावर गायत्री मंत्र सर्व वेदांचे सार आहे. प्रत्यगात्मा (जीव) व ब्रह्माच्या एकत्वाचा बोध करणारा आहे. परमात्म्याचे सर्वावभासकत्व ज्योतिस्वरूप परमानंदस्वरूप, देवमय, सर्वात्मत्वादि दिव्यस्वरूप प्रकट करणारा आहे. याचे स्पष्ट निर्देशन होते. अशा या गायत्री मंत्रावर ॐकार, व्याहृति, शिरोमंत्रासहित आणि त्याच्या अर्थावर पूर्ण ध्यान देऊन लोकांनी, ब्रह्मनिष्ठांनी, संन्याशांनी प्राणायाम आणि जपाच्या द्वारे उपासना करावी. स्मृतिग्रंथातून सांगितले आहे की, गृहस्थ आणि ब्रह्मचाऱ्यांनी नियमाने १०८ वेळा जप करावा आणि वानप्रस्थाश्रमी, संन्यासी यांनी नियमाने एक हजाराहून अधिक जप करावा. याप्रमाणे सर्व वेदांत सिद्धांताचे अनुसरण करून गायत्री मंत्राचा वेदार्थ परमपूज्य आचार्यांच्या कृपेने किंवा अनुग्रहाने यथार्थपणे प्रकाशित केलेला आहे.

(* स्वामी स्वरूपानंद सरस्वती – 'गायत्री मीमांसा' – पृ. ३–१५)

संध्येच्या वेळी नुसत्या गायत्री मंत्राच्या दहा–पाच किंवा अष्टोत्तरान्त जपाने गायत्री मंत्राची सिद्धी मिळणार नाही. सिद्धी मिळविण्यासाठी त्या मंत्राचे 'विध्युक्त अनुष्ठानच' केले पाहिजे, त्या मंत्राची पुरश्चरणे केली पाहिजेत. ज्यांनी पुरश्चरण केले असेल, त्यांना त्यांच्या संवेगशक्तीप्रमाणे व कर्मशुद्धीप्रमाणे त्याचे अंशत: फळही अनुभवास आले असेल.

**च) गायत्रीमंत्रास शाप व त्याचे विमोचन**

शंकरांनी सप्त कोटी महामंत्रास शाप दिला आहे. सावित्रीनेही दिलेला आहे. काही राममंत्रांस स्वत: रामांनी शाप दिले आहेत. गायत्री मंत्रास वशिष्ठाचा, विश्वामित्राचा, ब्रह्मदेवाचा व वरुणाचा शाप आहे. शाप देण्यास तशी कारणे झालेली आहेत. स्थलसंकोचामुळे त्यांचा विस्तार करता येत नाही. मंत्राचे अनुष्ठान करताना मंत्राचे शापविमोचन केले पाहिजे.

ज्यांनी गायत्रीमंत्रास शाप दिले आहेत, त्यांचे नामोच्चारण करून नमस्कार करावा, म्हणजे शापमोचन होते.

*'वशिष्ठाय नम:, विश्वामित्राय नम:, ब्रह्मणे नम:, वरुणाय नम:'*

असे म्हटल्याने गायत्री मंत्राचे शापमोचन होते, असा एक संक्षिप्त विधी सांगितला आहे. कोणी व्याहृतित्रयाच्या उच्चारानंतर प्रणवोच्चार करून गायत्रीमंत्र म्हटला म्हणजे गायत्रीचे शापविमोचन होते असे म्हणतात.

१) शापमोचन, २) उत्कीलन व ३) संजीवन केल्यानंतर तो मंत्र फळ देण्यास समर्थ होतो. 'शापमोचन' करणे म्हणजे मंत्रशुद्धी करणे, 'उत्कीलन' म्हणजे पूर्वी मंत्र मलिन असतात. त्यास बीजाक्षरांनी जागृत करणे म्हणजे बाहेर काढणे व 'संजीवन' म्हणजे प्रथम मंत्र शापामुळे मृतप्राय असतात, त्यास सजीव करणे, त्यात चैतन्य भरणे. प्रथम शापोद्धार करून उत्कीलन व संजीवन करावयाचे व नंतर जप करावयाचा, असा विधी आहे.

शापविमोचन विधी वर सांगितला. उत्कीलनविधी म्हणजे वाग्बीज, भुवनेश्वरीबीज व लक्ष्मीबीज (ऐं ह्रीं श्रीं), यांचा उलट–सुलट जप करून त्याबरोबर तो (इष्ट) मंत्र एक सहस्र वेळ जपावा व संजीवनविधीत 'ह्रीं श्रीं ऐं क्लीं सौ:' मंत्राचा सहस्र जप करावा असे सांगितले आहे. हा तंत्रमार्ग होय. वैदिक मंत्राने संजीवन

करणे झाल्यास 'त्र्यंबक यजामहे' या मंत्राने तो इष्टमंत्र संपुटित करावा, म्हणजे संजीवन होते, असेही अन्यत्र सांगितले आहे.

रामतारक मंत्रास शाप नाही. गायत्री मंत्रास संजीवन केले पाहिजे, त्याशिवाय ते फलदायक होत नाही; परंतु सिद्धमंत्रास संजीवनादिकांची गरज नाही असेही म्हणतात.

वरील गोष्टींचा विचार करून जपानुष्ठान करावे, म्हणजे व्यंग पडणार नाही. संकल्पित संख्येचा जप झाल्यानंतर जपसंख्येच्या दशांशाने होम, त्याच्या दशांशाने तर्पण, त्याच्या दशांशाने मार्जन व त्याच्या दशांशाने ब्राह्मणभोजन घालावे, म्हणजे तो मंत्र सिद्ध होतो, इष्टकाल देणारा होतो.

'विश्वामित्रकल्पा'त जपानुष्ठाननियम सांगितले आहेत. तांत्रिक मार्गात दुप्पट संख्या सांगितली आहे.

| वैदिक मार्ग | | तांत्रिक मार्ग | |
|---|---|---|---|
| १,००,००० | जप | २,००,००० | जप |
| १०,००० | होम | २०,००० | होम |
| १,००० | तर्पण | २,००० | तर्पण |
| १०० | मार्जन | २०० | मार्जन |
| १० | ब्राह्मणभोजन | २० | ब्राह्मणभोजन |

("Comparative and Critical Study of Mantrashastra" (श्री. जैन कला साहित्य संशोधक माला क्र. १, प्रकाशक साराभाई मणिलाल नवाब, अहमदाबाद इ.स. १९४४) हा मोहनलाल भगवानदास झवेरी यांचा मंत्रशास्त्रावरील एक अत्यंत उत्कृष्ट ग्रंथ आहे.

मंत्रशास्त्राच्या सर्व अंगांचा विचार असलेली अभ्यासपूर्ण प्रस्तावना हा या ग्रंथाचा एक विशेष आहे. याशिवाय या ग्रंथांत उत्तम चित्रे दिली असून, मुद्रांचे व यंत्रांचे सुंदर फोटोही आहेत. जैनमंत्रवादावर जरी हा ग्रंथ लिहिलेला असला तरी हिंदू, बौद्ध, इस्लाम, पारशी यांच्या मंत्रशास्त्राचा तौलनिक विचार यात केलेला आहे, मंत्रशास्त्राची ऐतिहासिक पार्श्वभूमीही दिलेली आहे. मंत्रशास्त्रावरील एक अधिकृत ग्रंथ म्हणून या ग्रंथाचा गौरव करावयास हरकत नाही.)

### ८) मंत्रयोगाची सोळा अंगे

नामरूपमय मंत्रयोगाची साधनप्रणाली १६ (सोळा) अंगांमध्ये विभागली आहे. मंत्रयोग, हठयोग, लययोग व राजयोग असे चार योग आहेत, पैकी मंत्रयोगाची १६ अंगे योगशास्त्रात सांगितली आहेत, ती अशी :

चंद्राच्या सोळा कलांप्रमाणे मंत्रयोग सोळा अंगांनी पूर्ण होतो. ती सोळा अंगे अशी आहेत – १) भक्ती, २) शुद्धी, ३) आसन, ४) पंचांग सेवन, ५) आचार, ६) धारणा, ७) दिव्यदेशसेवन, ८) प्राणक्रिया, ९) मुद्रा, १०) तर्पण, ११) हवन, १२) बली, १३) याग, १४) जप, १५) ध्यान व १६) समाधी. पैकी भक्ती अंगाचे रहस्य सविस्तर तर इतरांचे रहस्य संक्षेपतः वर्णिले जात आहे.

## १) पहिले अंग 'भक्ती'

भक्तीचे वैधी, रागात्मिका व परा असे तीन भेद आहेत. खरोखर पाहिले असता ती दोनच भेदात विभागली जाते. दैवी मीमांसा दर्शनात म्हटले आहे – 'सा द्विधा गौणी परा च' म्हणजे गौणीभक्ती व पराभक्ती असे भक्तीचे दोन भेद आहेत. साधनदशागतभक्ती ही 'गौणी' व सिद्धिदशागत भक्ती ही 'परा' म्हटली जाते. गौणी भक्तीत पुन: 'वैधी' व 'रागात्मिका' असे दोन भेद आहेत. साधनद्वारा प्राप्त अशी जी भक्ती ती 'गौणी' भक्ती होय. यापैकी –

**अ) वैधी भक्ती –** 'विधिसाध्यमाना वैधी सोपानरूपा' म्हणजे 'विधींच्या' द्वारा जिचे साधन होते व उन्नत भक्तीच्या भूमिकेला जी सोपानभूत म्हणजे पायरीसारखी होते, ती 'वैधी'भक्ती होय. गुरूपदेशानुसार विधिनिषेधाच्या वरीवर्ती होऊन वैधी भक्तीच्या विविध अंगांचे नियमित अनुष्ठान करून, सत्साधक असतो. तो भक्तीच्या उन्नत राज्यात प्रवेश करण्याला अधिकारी होतो. ही वैधी भक्ती.

*''श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।*
*अर्चनं वंदतं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ।।''*

अर्थात श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन अशा नऊ अंगांत पुन: विभागली जाते. अशा नानाविधा भक्तीच्या नऊ प्रकारांच्या माध्यमातून आपल्याला ईश्वराजवळ जाऊन पोहोचता येते. या नऊ प्रकारांचे किंवा यातील काही प्रकारांचे साधन, भक्तियोगाच्या साधक शिष्याला श्रीगुरूदेव प्रथम उपदेशितात व त्याच्या विशेष साधनांचा अभ्यास करवितात. याच कारणामुळे या भक्तीला 'वैधी' असे म्हणतात. ह्या प्रकारे साधन करून भगवत्कृपा प्राप्त झाल्यानंतर साधकाला कोणती सिद्धी प्राप्त होते ते सांगतात. नियमांचे पालन करून मर्यादेमध्ये राहणे याला **वैधी भक्ती** म्हणतात.

आता सर्वप्रथम **नवविधा भक्तीचे स्वरूप** पाहू या.

**१) श्रवण :** पहिली भक्ती श्रवण. सर्वांगाचा कान करून, लक्षपूर्वक ऐकावे. अध्यात्मग्रंथ, देवादिकांचे चरित्र ऐकावे. सगुण चरित्र ऐकल्याने आपली भक्ती विकसित होते. सोबतच ज्ञानबोधही होतो.

**२) कीर्तन :** दुसरी भक्ती कीर्तन भक्ती. कीर्तन म्हणजे परमेश्वराचे गुणवर्णन करणे. देव-भक्त यांचे अद्वैत कसे असावे, कसे साधावे याचे विवेचन करतात, त्याला निरूपण म्हणतात. कथा-अद्वैतता यांचा संगम कीर्तनात असतो. कीर्तन ऐकल्यावर माणूस प्रेमाने भगवंताचा गुणानुवाद करू लागतो. संत तुकाराम महाराज अखंड कीर्तनानंदात रंगलेले असायचे.

**३) नामस्मरण :** ही तिसरी भक्ती. मानवी मनाला विस्मृतीचा शाप आहे. त्यामुळे त्याने सतत नामस्मरण करायला हवे. वैखरी नामस्मरण करता करता विषयांचे मलीन संस्कार नाहीसे होतात. चित्त शुद्ध होते. नामस्मरणाला स्थळ, काळ, वेळेचे बंधन नाही. सतत नामस्मरणाने आपल्याला भगवंताशी अनुसंधान ठेवता येते.

**४) पादसेवन :** चौथी पादसेवन भक्ती म्हणजे काया-वाचा-मने सद्गुरूला शरण जाऊन सेवा करणे. भारतात गुरू-शिष्यांची उत्तुंग परंपरा आहे. गुरू मुक्तीचा मार्ग दाखवत असतो. सस्वरूप हाच देव, हेच गुरूपद व सस्वरूप स्थिती अखंड अनन्यपणे भोगणे म्हणजेच पादसेवन होय.

**५) अर्चन :** पाचवी अर्चन भक्ती अर्थात पूजा होय. शरीराला निश्चयासाठी, आसनसिद्धीसाठी आणि मनाला, विचारांना स्थिरता येण्यासाठी या भक्तीचा उपयोग होतो. या भक्तीत मानसपूजा येते, म्हणजे मनानेच सारे भगवंताला अर्पण करणे, ध्यानातच देवाची षोडशोपचारे पूजा करणे. या भक्तीने देव भक्ताचा ऋणी होतो.

**६) वंदन :** वंदनभक्ती सहावी भक्ती. नमनानंतर मिळणारा आशिर्वाद मोलाचा असतो. देव, सद्गुरू, संत यांना वंदन करावे. वंदनामुळे अहंकार नष्ट होतो. मनात न-मन असावे. वंदन केल्याने मनातला उच्च-नीच भाव लोप पावतो.

**७) दास्य :** सातवी भक्ती दास्य भक्ती. देवाचे दास बनून राहावे यासारखा आनंद नाही. सर्वच अर्पण केल्यावर स्वामी एकमात्र राहतो. तुकाराम महाराज दासाला पाईक, शिपाई म्हणतात. हनुमान सदैव श्रीरामाची आज्ञा ऐकण्यासाठी तत्पर असतात. दास्यामुळे परम उन्नतता साधता येते.

**८) सख्य :** सख्य भक्ती आठवी भक्ती आहे. देवच आपला खरा सखा आहे, या श्रद्धेने देवाच्या सख्ख्यासाठी आपले सौख्य सोडून देहासकट देवाला सर्वस्व अर्पण करणे म्हणजे सख्यभक्ती.

**९) आत्मनिवेदन :** नवविधा भक्तीमध्ये आत्मनिवेदन भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. वरील आठही भक्तींच्या नंतर आत्मनिवेदनाची अवस्था येते. बुद्धी, मन, अहंकार सारे काही ईश्वराला वाहिल्यानंतर जो आपण उरतो ते भगवंताला अर्पण करणे म्हणजे आत्मनिवेदन होय. नवविधा भक्तीच्या आधारे माणसाला मोक्षप्राप्ती साध्य करणे शक्य आहे.

**नवविधा भक्ती**

भागवतात भक्तीचे नऊ प्रकार मानले जातात, तर नारद भक्तिसूत्रात दहा आसक्तींनी भक्ती करता येते. पुढील तक्त्यावरून हो गोष्ट सहज दिसून येते -

| | **श्रीमद्भागवत भक्ती** | **नारद भक्ती सूत्र आसक्ती** |
|---|---|---|
| **भाग-१ : नाम** | (१) श्रवण | (१) गुणमहात्म्यसक्ती |
| | (२) कीर्तन | (२) रूपासक्ती |
| | (३) स्मरण | (३) पूजासक्ती |
| **भाग-२ : रूप** | (४) पादसेवन | (४) स्मरणासक्ती |
| | (५) अर्चन | (५) दास्यासक्ती |
| | (६) वंदन | (६) कांतासक्ती |
| **भाग-३ : भाव** | (७) दास्य | (७) वात्सल्यासक्ती |
| | (८) सख्य | (८) आत्मनिवेदनासक्ती |
| | (९) आत्मनिवेदन | (९) तन्मयासक्ती |
| | | (१०) परमविरहासक्ती |

**नवविधाभक्ती विवेचन***

भक्ती करताना शरीर, मन आणि हृदय यांमध्ये एकतानता असली पाहिजे. ईश्वराचा जप वाणीने, भजन श्रवण कानांनी, चिंतन-मनन मनाने, पूजा-पादसेवन शरीराने, दास्य, सख्य आणि वात्सल्य हृदयातून प्रकट होतात. भक्तीची पहिली पायरी **श्रवण** आहे. ईश्वराचे घेतले जाणारे नाव, त्याचे गुणगान व संकीर्तन श्रवण करून भक्तास ईश्वरनामाची गोडी लागते. प्रल्हाद, अजामिल यांसारखी अनेक उदाहरणे आपणास देता येतील. आपणास जे कळले आहे किंवा आपणास जे जाणवले आहे, ते इतरांना सांगण्यात संतांना निरतिशय आनंद होत असतो. वास्तविक यात दुहेरी भक्ती असते. **कीर्तन** करण्यातच भक्ती आहे व या भक्तीत श्रोतृगणास समाविष्ट करून घेण्यास दुहेरी भक्तीचा आनंद आहे. ईश्वराचे **स्मरण** म्हणजे सातत्यपूर्ण भक्तीच आहे. उठता-बसता हे स्मरण करता येते. या अत्यंत साध्या साधनाने ब्रह्मप्राप्ती दुष्प्राप्य नाही. सर्व अवगुणांवरील उपाय म्हणजे स्मरण!

*''गणिका भारी अति व्यभिचारी । रामनाम लाग्यो हाथ ।।*
*जम काल के माथे पग धरी । चढे वैकुंठ को पंथ ।।''*

भक्तीच्या आड येणारा मोठा अडथळा म्हणजे माणसाचा अहंकार आहे. त्यासाठी ईश्वरचरणी लीन होण्यास **पादसेवन** म्हणतात. भक्ती संप्रदायात गुरूचे पादसेवन करतात, कारण गुरूलाच ईश्वर मानतात. सूफ़ींमध्ये गुरूंचे स्थान धार्मिक नियमांच्या पलीकडचे आहे.

*''गुरू चरण हमें सिर पर धरियो ।*
*एका जनार्दनी मन धीर करियो ।।''*

सगुण ईश्वराकडे भक्त सहजी आकृष्ट होतात. नामदेवांनी मूर्तिपूजेला विरोध दर्शविला, तरी विठ्ठलात ईश्वर केंद्रीभूत केला. संत एकनाथ सगुण आणि साकार ईशस्वरूप मानतात. स्वत: एकनाथ महाराज 'विजयी पांडुरंगाची' **पूजा-अर्चा** करीत. ईश्वरासमोर नतमस्तक होण्यास **वंदन** म्हणतात. ईशस्तवन केले जात असताना एकाठा चित्त होणेही वंदनात समाविष्ट होते. श्रीकृष्णाला ते परब्रह्म स्वरूप मानून अन्य देव त्याची पूजा करतात, असे संत एकनाथ म्हणतात. ईश्वराचे **दास्यत्व** स्वीकारून भक्ती करता येते. दास्यत्व स्वीकारणे म्हणजे ईश्वराला स्वामी मानणे. भक्त स्वत:ला हीन-दीन लेखून ईश्वराची करूणा भाकतो. सांसारिक मोहजालातून सुटण्यासाठी हा मार्ग अतिशय सुलभ आहे. **सख्य** भक्ती अजून वेगळ्या रंगाची आहे. मित्राचे नाते सर्वात जवळचे असते, असे म्हणतात. यासाठी ईश्वरालाच मित्र मानून त्याच्याशी जवळीक साधायची असते. श्रीकृष्ण आणि सुदामा हे सख्य भक्तीचे उदात्त उदाहरण आहे.

अनेकदा भक्त आपली विपन्नावस्था ईश्वरासमोर व्यक्त करतो. भौतिक जगात त्याच्यावर केला जाणारा अन्याय, जुलूम, अत्याचार यांविषयी त्याने दाद मागावी, असाही कुणी नसतो. जगच वैरी झालेले असते. काही वेळा झालेल्या पापांची टोचणी भक्ताला असते; परंतु त्या बरोबरच संकटातून ईश्वर निवारण करील, अशी त्याला खात्री असते. आपली कैफियत ईश्वरासमोर मांडणे, म्हणजे **आत्मनिवेदन** भक्ती आहे.

(* डॉ. अलीम वकील - 'एक़ाच पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी' - पृ. ३७०-७१)

**आ) रागात्मिका भक्ती -** वैधी भक्तीच्या पूर्ण साधनाने भगवत्कृपा प्राप्त होते व निशिदिनी इष्टदेव पदध्यान निमग्न अशा भक्ताचे हृदय कमल विकसित होऊन भगवंताकडे त्याचा ज्यावेळी तैलधारेप्रमाणे

निरवच्छिन्न, अविश्रांत व अपूर्व अमृतमयी प्रेमधारेचा प्रवाह वाहू लागतो, त्यावेळी त्या प्रेमधारेच्या मधुर आस्वादनाने परितृप्त होऊन भगवान भक्ताच्या हृदयकमलामध्ये विराजमान होऊन भक्ताच्या हृदयात निरंतर आत्मरती आनंद व शांतीचा उदय करून देत असतो. ह्याच अविश्रांत वाहणाऱ्या भगवत्प्रेमाचे नाव **'रागात्मिका' भक्ती** असे आहे. दैवी मीमांसेत म्हटले आहे –

*''रसानुभाविकाऽऽनन्दनशांतिदा रागात्मिका ।''*

भक्तीच्या ज्या भावामुळे श्रीभगवंतासंबंधी अपूर्व रसाचा म्हणजे प्रेमाचा अनुभव येतो व भक्ताच्या हृदयात ज्या आनंदाचा व शांतीचा उदय होतो, त्याचेच नाव **'रागात्मिका भक्ती'** होय. भक्तीच्या या भावात भगवंताकडे साधकाची प्रीती निरंतर लागून राहते. भक्तीच्या वैधी दशेमध्ये भगवत्प्रेमाच्या अभ्यासासाठी श्रवणकीर्तनादि अनेक विधींची आवश्यकता असली तरी, भक्तीच्या 'रागात्मिका' दशेमध्ये पतिप्राणा सतीच्याप्रमाणे भगवंताच्या ठिकाणी भक्ताचे अविरत प्रेम उत्पन्न झाले म्हणजे विधीच्या अभ्यासाची आवश्यकता राहात नाही. तो भक्त भगवंताच्या पवित्र प्रेमाने बद्ध होऊन त्याच्याच चरणकमलांच्या मधुर ध्यानामध्ये रात्रंदिवस निमग्न राहातो; त्या योगाने त्याच्या चित्तात दुःखलेशहीन आनंदाची व शांतीची दिव्य ज्योत्स्ना सर्वकाळ प्रफ्फुल्लित राहाते. भागवतात म्हटले आहे –

भगवंताच्या ठिकाणी मधुर प्रेमभाव उत्पन्न झाला असता भक्ताचे हृदय द्रवीभूत होऊन जाते. आनंदाने त्याचे सर्वांग पुलकित होऊ लागते, त्याचा कंठ भरून येतो, डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागतात, मुक्त पुरुषाप्रमाणे तो अहंभाव विसरतो. ह्याप्रमाणे इष्टदेवपदध्याननिमग्न भक्ताला प्रपंचाच्या ठिकाणी वैराग्य प्राप्त होऊन भगवद्भावाची प्राप्ती होते. त्या योगे भक्ताच्या हृदयात परमशांती चिरकाल वास करते.

भक्तीच्या रागात्मिका दशेमध्ये साधकाला – भक्ताला लोकलज्जा, लोकभय आदि करून काही राहात नाही. तात्पर्य, 'भक्ती' हा सर्व साधनांचा पाया आहे, हे लक्षात धरून चालले म्हणजे पुरे.

**इ) 'परा' भक्ती** – भावमय दृश्य संसार हा चतुर्दश प्रकारांनी विभक्त असल्यामुळे भावमूलक भक्तिरसही चतुर्दश प्रकारांत विभागला जातो. प्रकृतीची स्वाभाविक विचित्रता चतुर्दश प्रकारांतून प्रगट होते. ह्यासाठी भक्ति राज्यातील जीवामध्ये स्वभावतःच चतुर्दश प्रकारचे भक्तिभाव दिसून येतात. दैवी मीमांसा शास्त्रात सांगितले आहे –

भगवंताच्या ठिकाणी असलेल्या प्रीतिमूलक रसाचा बोध चतुर्दश प्रकारांनी होतो. त्यांत सप्तरस गौण आहेत, व सप्त मुख्य आहेत. हास्य, वीर, करूण, अद्भुत, भयानक, बीभत्स व रौद्र हे गौण रसाचे सात भाग आहेत; त्याचप्रमाणे दास्यासक्ती, सख्यासक्ती, कांतासक्ती, वात्सल्यासक्ती, आत्मनिवेदनासक्ती, गुणकीर्तनासक्ती, तन्मयासक्ती हे सप्तरस मुख्य आहेत. दास्यादि 'मुख्य' रसांच्याद्वारेच 'परा' भक्तीचा लाभ होत असतो; परंतु भक्तीच्या उन्नतीस गौण व मुख्य हे सर्वही रस कारण आहेत. श्री भगवान् रसरूप असल्यामुळे त्याच्याच सत्तेने लाभलेल्या मुख्य व गौण रसांच्यामध्ये त्याची 'आनंदसत्ता' विद्यमान असते. यासाठी सर्वच रसांच्या द्वारे उन्नतीलाभ होतो; पण दोहोंत भेद इतकाच की, हास्य, बीभत्स इत्यादी गौणरसांबरोबर बाह्य विषयांचा संबंध असल्यामुळे, तसेच त्यांच्या आधारे 'मलिन-शृंगारमय' अंत:करण झाल्यामुळे, गौणरसांद्वारे अद्वैतभाव निर्विकल्प समाधीप्रत जी पराभक्ती तिचा लाभ होत नसतो. त्यांच्याद्वारे भक्तिराज्यात फक्त उन्नती व

अंती 'सालोक्य' मुक्ती प्राप्त होते. परंतु दास्यासक्ती, सख्यासक्ती, कांतासक्ती आदी सप्त 'मुख्य' रसांचे फळ तसे नाही; कारण की, ह्यांच्या आधारे अंत:करण 'शुद्ध-शृंगारमय' बनत असल्यामुळे तसेच त्याबरोबर बाह्य विषयांचा संबंध राहत नसल्याने त्या (मुख्य) रसांच्याद्वारे साक्षात् पराभक्तीचा लाभ होतो.

भगवद्‌गीतेत आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त सांगितले आहेत. पैकी पहिले तीन अविद्यामुक्त व चौथा अविद्यारहित असा ज्ञानी. ज्ञानयुक्त भक्ती हीच 'परा' भक्ती होय. स्थूल-सूक्ष्म-कारण-महाकारण ह्या चारी देहांचे तादात्म्य सोडून ह्या सर्वांचा प्रकाशक जो आत्मा तो मी, ह्या प्रकारे 'अहमात्मा' भावना करणारा तो 'ज्ञानी'. हा प्रत्यगात्माच हरी व हरीच प्रत्यगात्मा जाणून मी पणा निखालस विसरणारा तो 'ज्ञानी भक्त'. अशा भक्ताचा भगवान् आपला आत्मा असे म्हणून गौरव करतात.

पण निर्गुण ज्ञानी व भक्त ह्यांत भेद काय? तर निर्गुणोपासक हे हा विश्वाकार म्हणजे मायेचा भास अतएव त्याज्य मानतात, आणि भक्तोत्तमास जग सर्व जगन्निवासच दिसते. 'जगदेव हरि हर्रिव जगत्' अशी त्यांची दृष्टी होते. असा विवेक अथवा अशी भक्ती प्राप्त होण्याचे साधन म्हणजे एक सत्संगती होय. सत्संगतीवाचून हे प्राप्त होणे शक्य नाही.

गुरूरूपाने परमेश्वर कृपा करील, तेव्हाच ही भक्ती हातास चढावयाची. आपल्या बुद्धिबळाने किंवा ग्रंथावलोकनात ही गोष्ट साध्य होणारी नव्हे. ईश्वरी कृपाकर्षणाची जी नानाविध साधने आहेत, त्यांपैकी 'भक्ती' हे पहिले अंग म्हणजे सर्वांचा पाया आहे असे समजावे. 'रागात्मिका' किंवा 'परा' भक्तीपर्यंत पोचलेल्या साधकास इतर अंगाची गरज नाही; पण त्याच्या खालच्या अधिकारी लोकांस आहे.

त्रिगुणभेदाने भक्तही विविध आहेत. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी; पैकी ज्ञानी हा त्रिगुणातीत आहे. ज्ञानी भक्तच पराभक्तीचा अधिकारी होऊ शकतो. त्रिगुणभेदाने उपासक तीन प्रकारचे होतात. ब्रह्मोपासक सर्वांत श्रेष्ठ आहे. ब्रह्मबुद्धीने सगुणोपासना (अखिल विश्व ब्रह्मरूपाने पाहाणे) व ब्रह्मबुद्धीने अवतारोपासना करणारे ह्याच श्रेणीत येतात. सकाम बुद्धीने ऋषी, देवता व पितर ह्यांची उपासना करणारे हे दुसऱ्या श्रेणीत मोडतात व क्षुद्र शक्तींची (देवतांची) उपासना करणारे लोक तिसऱ्या श्रेणींतील असतात. उपदेवता, भूतपिशाच्चादिकांची उपासना करणारे हे त्याही पेक्षा खालच्या वर्गातील होत.

**२) दुसरे अंग 'शुद्धी'**

मंत्रयोगाचे दुसरे अंग 'शुद्धी' हे होय. ह्या शुद्धीचे शरीर, मन, दिक् व स्थान असे चार भेद आहेत. ह्यांनाच स्थानशुद्धी, दिक्‌शुद्धी, वाक्‌शुद्धी व आभ्यंतरशुद्धी असे म्हणतात.

**अ) दिक्‌शुद्धी** – पूर्वमुख अथवा उत्तरमुख बसून नित्य यथाविधी जप करावा व रात्रीच्या वेळी उत्तरमुख बसून देवकार्य नेहमी करावे. दिक्‌शुद्धीद्वारा साधकाला साधनामध्ये सिद्धीची प्राप्ती होते व साधकाचे मन वशीभूत होते; ह्यासाठी दिक्‌शुद्धीचा विचार अवश्य राखला पाहिजे, असे योग संहितेत सांगितले आहे.

**आ) कार्यशुद्धी** – पूर्वमुख साधनक्रियेच्यासाठी मनुष्याला सर्वांच्या आधी स्नानकार्य केले पाहिजे. शास्त्रात (योगसंहितेत) स्नाने सात प्रकारची सांगितली आहेत. १) मांत्र, २) भौम, ३) आग्नेय, ४) वायव्य, ५) दिव्य, ६) वारूण व ७) मानस ह्याप्रमाणे स्नानाचे सात भेद आहेत. 'आपोहिष्ठा.' आदि मंत्राने जलप्रोक्षण करून घेणे हे 'मंत्रस्नान' होय. ओल्या वस्त्राने शरीर उत्तम प्रकारे घेणे ह्यास 'भौमस्नान' म्हणतात, भस्म धारण

केल्याने 'आग्नेयस्नान' होते; गोधूलीचा शरीरावर लेप अथवा त्याचा स्पर्श हे 'वायव्यस्थान' होय; पाऊस लागत असता सूर्याचे ऊनही पडते, त्यावेळी त्या वृष्टिजलात स्नान करणे, ह्यास 'दिव्यस्नान' म्हणतात; पाण्यात बुडून स्नान करणे ह्यास 'वारूणस्नान' म्हणतात, व अनंत सूर्यासारख्या प्रभेने युक्त, चतुर्भुज, कमलपत्राक्ष, सत्त्वगुणमय भगवंताच्या रूपाने ध्यान करणे, हे 'मानसस्नान' होय. ह्या प्रमाणे बाह्य शुद्धीच्याद्वारे आत्मप्रसाद व इष्टदेवाची कृपा उपलब्ध होते.

**इ) स्थानशुद्धी** – योग संहितेत सांगितले आहे –

ज्याप्रमाणे गंगाजलाने शरीराची शुद्धी होते व गोमयाने भूमीची शुद्धी होते, त्याप्रमाणे पंचाशाखायुक्त स्थान, अर्थात अश्वत्थ-वट-बिल्व-आमलकी (आवळा) – अशोक ह्या पंचवृक्षांनी युक्त, त्या वृक्षांखालील स्थान सिद्धी प्राप्त करून देणारे आहे. गोशाला, गुरूगृह, देवमंदिर, वनस्थान, तीर्थादी पुण्यश्रेत्रे व नदीतीर ही स्थाने सर्वकाल पवित्र समजली जातात. स्थानशुद्धीच्याद्वारे पवित्रता व पुण्यवृद्धी प्राप्त होते.

**ई) अन्तःशुद्धी** – अभय, सत्वसंशुद्धी, ज्ञानयोगनिष्ठा, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरलता, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती इत्यादि गीतेमध्ये जी दैवी संपत्तीची लक्षणे सांगितली आहेत, त्यांच्या अवलंबनाने अंतःशुद्धी म्हणजे अंतःकरणाची निर्मलता प्राप्त होते. गीतोक्त आसूरी संपत्तीचा त्याग करून दैवी संपत्तीचा स्वीकार करणे हीच 'आत्मशुद्धी' होय. हिच्याद्वारे इष्ट देवाचे दर्शन व समाधीची प्राप्ती होते.

**३) तिसरे अंग 'आसन'**

मंत्रयोगात हितप्रद असल्यामुळे मुख्यतः स्वस्तिकासन व पद्मासन ही दोन आसने घेतली आहेत. आसनभेद, आसनशुद्धी व आसनक्रीया ह्या तिन्हींच्या द्वारे आसनसिद्धी होत असते. सकाम-निष्काम विचार, उपासना पद्धती व कामनांचे तारतम्य इहींकरून आसनभेद निर्णीत झाला आहे. पटवस्त्र, कांबळ, कुशासन, सिंहचर्म व मृगचर्म ह्यांचे आसन अतिशुद्ध म्हटले आहे, व ही सर्व आसने सिद्धफल देणारी आहेत. काम्य कर्मासाठी कंबलासन श्रेष्ठ आहे; परंतु रक्तकंबलासनच सर्वांत उत्तम समजले जाते. कृष्णाजित म्हणजे काळ्या हरणाच्या कातड्याचे आसन, ह्याने ज्ञानसिद्धी व्याघ्रचर्माने मोक्षसिद्धी, दर्भासनाने आयुष्यवृद्धी व चैल म्हणजे रेशमाच्या आसनाने व्याधिनाश सांगितला आहे. प्रथम चैल, त्या खाली अजिन व सर्वांखाली कुशासन याप्रमाणे गीतोक्त 'चैलाजिनकुशोत्तरम्' ह्या क्रमामे आसन तयार केल्याने योगसाधनात सिद्धी प्राप्त होत असते. उचित आसनावर बसून 'पृथ्वी त्वया धृता लोका.' ह्या मंत्राने ऋषिनाम उच्चारणपूर्वक मेरूपृष्ठ इत्यादी क्रमाने छंद वगैरेंचा उच्चार करून 'आसने विनियोगः' द्वारे आसनशुद्धी करून सुखाने जप-पूजादी कर्मे केली असता सिद्धी प्राप्त होते. तसे न केल्यास साध्यकार्य निष्फल होते.

**४) चौथे अंग 'पंचांगसेवन'**

योगशास्त्रात सांगितले आहे की गीता, सहस्त्रनाम, स्तव, कवच व हृदय ह्यांस ज्ञाते लोक पंच-अंगे म्हणतात. आपापल्या उपासना संप्रदायानुसार गीता व आपापल्या पद्धतीप्रमाणे उपास्य देवतेचे सहस्त्रनाम, स्तवराज, कवच व हृदय यांचा नियमपाठ केल्याने योगी कल्मषरहित होऊन योगसिद्धी प्राप्त करून घेणारा होतो. पंचोपासनानुसार पाच गीता – भगवद्गीता, गणेशगीता, भगवतीगीता, सूर्यगीता व शिवगीता ह्या प्रसिद्ध आहेत. पंचोपासना ही ब्रह्मोपासनाच आहे.

## ५) पाचवे अंग 'आचार'

योगशास्त्रात दिव्य, दक्षिण व वाम असे तीन प्रकारचे आचार सांगितले असून, साधकाचे अधिकार, दीक्षा, महादीक्षा, पुरश्चरण, महापुरश्चरण, अभिषेक, महाभिषेक व सद्भाव असे सात प्रकारचे सांगितले आहेत. प्रत्येक उपासनेत दिव्य, दक्षिण व वाम असे तीन प्रकार आहेत; पैकी वामाचार हा गलिच्छ दिसणारा पण शीघ्रफलदायी आहे असे म्हणतात. शक्ति-उपासनेतील वामाचार लोकविश्रुत आहेच. ह्या वामाचारात मद्य-मांसादिकांचे सेवन शास्त्रातच सांगितले आहे, तरी ते अनाधिकाऱ्यांची अनीती वाढवणारे असल्यामुळे निंद्य मानले जाते. श्रीतुकाराम महाराजांनी ह्या वामाचाराची निंदा केलेली प्रसिद्ध आहे. 'दक्षिण' व 'दिव्य' आचार हे सर्ववंद्य आहेत.

जेव्हा गुरुदेव कृपा करून शिष्याला देवता व मंत्र ह्यांचा उपदेश देतात, तेव्हा साधकाच्या अधिकारास **'दीक्षा'** असे म्हणतात. पुढे त्या साधकाचा अधिकार वाढला असता गुरुदेव जेव्हा साधनाबरोबर गुरुलक्ष्ययुक्त योगक्रियेचा उपदेश देण्यास प्रारंभ करतात व शिष्यास प्रतिज्ञाबद्ध करून सोडतात, तेव्हा त्या उन्नत अधिकारास **'महादीक्षा'** म्हणतात; मग त्या गुरुलक्ष्ययुक्त साधनाच्याद्वारे साधक क्रमाने मंत्रसिद्धीला प्राप्त करून घेतो, त्यास **'पुरश्चरण'** म्हणतात. ग्रहणादि पर्वकाळात जे साधारण रीतीने मंत्रपुरश्चरण केले जाते, त्या क्रियेस पुरश्चरण असे नाम आहे, परंतु विशेष क्रियासाध्य, कालसाध्य व उपदेशसाध्य जे पुरश्चरण असे नाम आहे, परंतु विशेष क्रियासाध्य, कालसाध्य व उपदेशसाध्य जे पुरश्चरण होते, त्यास 'महापुरश्चरण' म्हणतात. पुरश्चरणाद्वारा सिद्धीलाभ झाल्यानंतर साधक उन्नत अधिकारास प्राप्त होत असतो. त्यानंतर जेव्हा श्रीगुरु शिष्याला साधनसंबंधी गुप्त रहस्याचा उपदेश करण्यास पात्र समजतात व संस्कार प्रदानद्वारा शिष्यास गुप्त रहस्याचा भेद दाखवून आनंद राज्याचा अधिकारी करतात, तेव्हा त्या विधीला **'अभिषेक'** असे म्हणतात. श्रीगुरुनाथ अत्यंत उन्नत अशा संस्काराच्या द्वारे साधकाला आपल्यासमान करून आपणास मिळवून घेतात, त्या संस्काराला **'महाभिषेक'** असे म्हणतात. कोणी त्याला 'पूर्णाभिषेक'ही म्हणतात. अशा पूर्णाभिषिक्त साधूपुरुषात 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' सामर्थ्य असते. अशा महात्म्यांना कोणावरही अनुग्रह करून घेऊन नामरूपाची ऐक्यता पदरात पाडून घेण्यास समर्थ होऊ लागतो, तेव्हा त्या सर्वोत्तम अधिकाराला **'तद्भाव'** असे म्हणतात. ह्या भावाच्याद्वारे साधकाची आपल्या इष्टदेवतेशी एकता स्थापन होऊ लागते व ह्याच अवस्थेने 'महाभावाची' प्राप्ती होत असते.

## ६) सहावे अंग 'धारणा'

'बाह्य' व 'अभ्यंतर' भेदाने धारणा दोन प्रकारची होते. मंत्र योगात धारणा परम साहाय्यक असते. बाह्य पदार्थामध्ये मनाचा योग केला असता 'बहिर्धारणे'चे साधन व सूक्ष्मातिसूक्ष्म अंतर्जगांतील विषयांमध्ये मनाचा योग केला असता 'अंतर्धारणे'चे साधन होते. धारणेची सिद्धी श्रद्धामूलक व योगमूलक आहे. योगशास्त्रात सांगितले आहे -

धारणेची सिद्धी प्राप्त करून घेतलेल्या योग्याला मंत्रसिद्धी, भक्ती, आचार, प्राणसंयम, देवतासान्निध्य, दिव्य देशांत दैवी शक्तीचा आविर्भाव व इष्टरूपदर्शन ही सर्व प्राप्त होतात. मंत्रामध्ये सिद्धी मिळवण्याकरता मंत्राला संस्कार व चैतन्य द्यावे लागते.  हे कार्य खाली दिलेल्या दहा प्रकारांनी होऊ शकते. सरस्वती तंत्रात सांगितले आहे -

मंत्रार्थ, मंत्रचैतन्य व योनिमुद्रा न जाणल्यामुळे चैतन्यविहीन व संस्कारविहीन मंत्राचा शतकोटी जप केला तरी सिद्धी प्राप्त होणार नाही. या करता मंत्राचा संस्कार अवश्य केला पाहिजे. जनन, जीवन, ताडन, बोधन, अभिषेक, विमलीकरण, आप्यायन, तर्पण, दीपन व गुप्ति असे मंत्राचे दहा संस्कार आहेत. मंत्राला हे संस्कार केले असता. सिद्धीप्राप्त होत असते. योगशास्त्रोक्त मातृकायंत्राच्या द्वारा मंत्रवर्णाचा उद्धार करणे ह्यास **'जनन'** म्हणतात. उधृत वर्णांच्या पंक्ती क्रमाने लिहून प्रत्येक वर्ण प्रणवाने संपुटित करून एकेकाचा शंभर वेळा अथवा निदान दहा वेळा जप करावयाचा, ह्या जप प्रक्रियेस **'जीवन'** म्हणतात. मंत्राचे वर्ण पृथक् पृथक् रीतीने 'वं' मंत्राद्वारा चंदनोदकाने दहा अथवा शंभर वेळा ताडन करणे ह्यास **'ताडन'** क्रिया म्हणतात. मंत्राचे वर्ण पृथक् पृथक् रीतीने लिहून मंत्रवर्णाच्या संख्येनुसार रक्तकरवीर पुष्पांनी 'रं' ह्या मंत्राने त्या मंत्रवर्णाचे हवन करणे ह्या क्रियेचे नाव **'बोधन'** असे आहे. मंत्रवर्ण लिहून मंत्रावर संख्येनुसार रक्तकरवीर पुष्पांच्या द्वारा 'रं' ह्या मंत्राने एकेक वेळ वर्णाला (अक्षराला) अभिमंत्रित करून त्या मंत्राच्या विधानानुसार अश्वत्थपल्लव द्वारा मंत्रवर्णाच्या संख्येनुसार अभिषिंचन करणे ह्यास **'विमलीकरण'** असे म्हणतात. स्त्रियांपासून उत्पन्न होणाऱ्या मलास 'मायिक', पुरुषांपासून उत्पन्न होणाऱ्या मलास 'कर्मण' व दोघांपासून उत्पन्न होणाऱ्या मलास 'आनव्य' म्हणतात. हे मलत्रय साधनास बाधक आहे. 'तार' म्हणजे ओम, 'व्योम' म्हणजे ह, 'अग्नि' म्हणजे र, 'मष्ट' म्हणजे औ व 'दंडी' म्हणजे म् ह्या सर्वांच्या मिलाफाने **''ॐ ऱ्हैं''** तयार होते, त्याला 'ज्योतिर्मंत्र' म्हणतात. मंत्रवर्णांना सुवर्णाच्या जलात, दर्भाच्या जलात किंवा पुष्पजलात वा लिहिलेल्या मंत्राने म्हणजे ज्योतिर्मंत्राने विधिपूर्वक आप्यायन करण्यास **'आप्यायन'** म्हणतात. पूर्वकथित ज्योतिर्मंत्रद्वारा जलाने मंत्रावर तर्पण करण्यास **'तर्पण'** म्हणतात. शक्तिमंत्राला मधाने, विष्णुमंत्रास कर्पूरमिश्रीत जलाने व शिवमंत्रास दुग्धाने तर्पण करावे, असा विधी शास्त्रात सांगितला आहे. 'तार' म्हणजे ॐ, माया म्हणजे ऱ्हीं, व 'रमा' म्हणजे श्रीं, ह्यांच्या द्वारे अर्थात ''ॐ ऱ्हीं श्रीं' ह्या मंत्राने मंत्रास दीपन करणे ह्याला **'दीपन'** क्रिया म्हणतात, व ज्या मंत्राचा जप केला जातो, तो गुप्त राखणे ह्यास **'गुप्ति'** क्रिया म्हणतात. मंत्राचे दशसंस्कार ते हेच. यांच्या द्वारे मंत्राला 'संस्कृत' व 'चैतन्ययुक्त' करून जप केल्याने साधक इच्छित फल प्राप्त करून घेऊ शकतो.

**७) सातवे अंग 'दिव्यदेशसेवन'**

योग शास्त्रात सांगितले आहे की ज्याप्रमाणे, गाईच्या सर्व शरीरात दुग्ध वाप्यून असले तरी केवळ स्तनांच्या द्वारेच ते बाहेर निघत असते, त्याप्रमाणे परमात्म्याची शक्ती सर्वव्यापक असली तरी तिचा विकास दिव्य देशांच्या द्वारेच होतो. तंत्रशास्त्रात सोळा प्रकारचे दिव्यदेश सांगितले आहेत.

वन्ही, अंबु, लिंग, स्थंडिल, कुड्य (भिंत), पट, मंडल, विशिथ, नित्ययंत्र, पीठ, भावयंत्र, मूर्ती, विभूती, नाभी, हृदय व मूर्धा हेच ते सोळा दिव्य देश आहेत. साधकाच्या अधिकारानुसार या दिव्य देशांमध्ये उपासना करण्याचा उपदेश गुरुकडून मिळत असतो. योगसिद्धी प्राप्त करून घेण्यास हे सर्व परम हितकारक आहे. 'धारणे'च्या साहाय्याने दिव्यदेशामध्ये इष्ट देवतेचा आविर्भाव होतो. मृण्मयादि मूर्तींमध्ये प्रथम देवतेचे आवाहन करून पूजारंभ करणे उचित असते; परंतु शालिग्राम, प्रतिष्ठित देवांच्या मूर्ती, संस्कृत अग्नी अथवा जल यांच्यामध्ये आवाहन विसर्जनाची आवश्यकता नसते.

## (८) आठवे अंग 'प्राणक्रिया'

मन, प्राण व वायू यांचा एकमेकांशी संबंध आहे, वायू व प्राण हे कार्य व कारणरूप आहेत. यासाठी प्राणायाम क्रियेबरोबर न्यासक्रियेचा एकत्व-संबंध येतो. मंत्रयोगामध्ये 'सहित' प्राणायाम ग्रहण केला असून, 'सहज' प्राणायामाचाही उपदेश कोणी कोणी आचार्य करतात. न्यासाचेही कित्येक भेद आहेत. त्यापैकी सात मुख्य आहेत. ते यथाधिकार गुरुकडूनच समजून घेतले पाहिजेत. साधारण उपासनेत करन्यास व अंगन्यास उपयोगी आहेत.

## ९) नववे अंग 'मुद्रा'

योगशास्त्रात सांगितले आहे की, मुद्रांच्याद्वारा देवतांना आनंद होतो व साधकाच्या पापसमूहाचाही नाश होतो; यामुळे यंत्रवेत्त्या मुनींनी याला मुद्रा हे नाव दिले आहे. पूजा, जप, ध्यान, आवाहन इत्यादि कार्यांमध्ये त्या त्या कार्याच्या लक्षणानुसार त्या त्या मुद्रांचे प्रदर्शन करणे उचित असते. आवाहनादि नऊ प्रकारच्या मुद्रा सर्वसाधारण मानल्या जातात. तसेच षडंग मुद्राही सर्व कर्मांकरता प्रशस्त आहेत. शंख, चक्र, पद्म, वेणू, श्रीवत्स, कौस्तुभ, वनमाला, ज्ञान, बिल्व, गरूड, नारसिंही, कूर्म, वाराही, हयग्रीवी, धनुष्य, बाण, परशू, जगन्मोहनिका व कम्यनामिका या एकोणीस मुद्रांच्याद्वारे श्रीविष्णू भगवान् आनंद पावतात. लिंग, योनि, त्रिशुल, माला, वर, अभय, भंग, खट्वांग, कपाल व डमरू या दहा मुद्रा श्री महादेवाला आनंदित करणाऱ्या आहेत. श्री सूर्य उपासनेसाठी एक पद्ममुद्रा मात्र सांगितलेली आहे. श्रीगणेश पूजेसाठी दंत, पाश, अंकुश, विघ्न, परशू लड्डूक व बीजपूर ह्याप्रमाणे सात मुद्रा सांगितल्या आहेत. शिवाय अन्य देवदेवी प्रीत्यर्थही अनेक मुद्रांचे वर्णन शास्त्रांत सांगितले आहे. ज्ञानमुद्रा, भक्तिमुद्रा, तपोमुद्रा, दानमुद्रा ह्या मुद्रांनी ऋषिगण प्रसन्न होतात.

## १०) दहावे अंग 'तर्पण'

योगशास्त्रात वर्णिले आहे की देवतागण तर्पणाच्याद्वारे शीघ्र प्रसन्न होतो. म्हणून यास 'तर्पण' म्हणतात. तर्पण हे निष्काम व सकाम भेदाने दोन प्रकारचे होते. कामनेनुसार तर्पणाचे द्रव्य (पदार्थ) निरनिराळे होत असते. तर्पण हे मंत्रयोगाचे एक प्रधान अंग आहे. इष्टदेव तर्पणानंतर ऋषि तर्पण, अन्यदेव तर्पण, व पितृ तर्पण करण्याचाही विधी आहे. तर्पणाची विशेषत ही आहे की, विधिपूर्वक तर्पण झाले असता, देवयज्ञ, भूतयज्ञ व पितृयज्ञ करण्याची आवश्यकताच राहात नाही. आपले इष्ट दैवत शीघ्र प्रसन्न करून घेण्याची कोणास इच्छा असेल तर त्याने विधिपूर्वक तर्पण करीत असावे. मधाने तर्पण केल्याने सकल अभीष्ट पूर्ण होते, मंत्राची सिद्धी होते व संपूर्ण महापातक नष्ट होऊन जाते. घृताने तर्पण केल्याने आयुष्याची वृद्धी होते. आरोग्यप्राप्तीसाठी दुग्धाने तर्पण केले पाहिजे. नारिकेल जलयुक्त जलाने तर्पण केले असता निखिल अभीष्ठांची सिद्धी होते, वगैरे भिन्न भिन्न प्रकारच्या तर्पणांचे फल आर्यशास्त्रात सांगितले आहे.

## ११) अकरावे अंग 'हवन'

योगशास्त्रात हवनाचा विधी खालीलप्रमाणे सांगितला आहे -

अर्घ्योदकाने भूमीवर प्रोक्षण करून तीन रेखा काढाव्या व विधीपूर्वक अग्नी आणून 'क्रव्यादेभ्यो नम:' या मंत्राचा व मूलमंत्राचा उच्चार करून कुंडात, स्थंडिलात अथवा भूमीवर तीन व्याहृतींनी अग्नी स्थापन करावा. स्वाहान्त मंत्राने तीन वेळा हवन करून षडंग हवन करावे; त्यानंतर आपापल्या संप्रदायानुसार इष्टदेवाचे आवाहन

करून मूलमंत्राने षोडश आहुती द्याव्या. या प्रकारे हवन करून स्तुती करावी व इंदुमंडळात त्याचे विसर्जन करावे. नित्य होमाच्याद्वारे इष्टदेव प्रसन्न होतो, सर्व देवांची तृप्ती होते व अभीष्ट सिद्ध होते. प्रथम आपल्या इष्टदेवाप्रीत्यर्थ आहुती देऊन, अन्य देवदेवतांना आपल्या इष्टदेवतेचे अंगीभूत समजून त्यांच्या संवर्धनार्थ, संतोषार्थही आहुतिप्रदान करणे योग्य आहे.

**१२) बारावे अंग 'बली'**

इष्ट उपासनेमध्ये विघ्नाच्या शांतीवाचून सफलता होत नाही. ह्या विघ्नशांती करताच बलिदान केले पाहिजे असते. बलीच्या साधनामध्ये आत्मबली हाच सर्वात श्रेष्ठ आहे. आत्मबलीच्या द्वारे अहंकाराचा नाश होऊन साधक कृतकृत्य होतो. (किंबहुना अहंकाराचा नाश हाच आत्मबली होय.) बलीच्या साधनात कामक्रोधादिक रिपूंचा बली द्वितीय स्थानी आहे. हा विषय अंतर्याग साधनाचा म्हणजे अंतरंग साधनाचा आहे. पूजेच्या नंतर अवशिष्ट द्रव्यद्वारा जो बली दिला जातो, तो इष्ट देवतेच्या प्रसन्नतेसाठी उत्तम फलाचा दिला जातो. काही संप्रदायांत यज्ञपशूचा बली देण्याचा विधी प्रचलित आहे. हे सर्व बलीचे भेद त्रिगुणाच्या भेदानुसार आहेत.

**१३) तेरावे अंग 'याग'**

'अंतर्याग' व 'बहिर्याग' असे दोन प्रकारचे याग आहेत. अंतर्यागाचा महिमा सर्वांत श्रेष्ठ आहे. मानसयात्रा, मानसजप व मानसकर्म ह्यांकरता कालशुद्धी, देशशुद्धी व शरीरशुद्धीची मुळीच अपेक्षा नाही. ही सर्व काळी समान होऊ शकतात. षोडश दिव्य देशांमधून कोणत्या तरी देशाचे अवलंबन करून याग साधन करणे उचित आहे. स्थूल देशापेक्षा सूक्ष्म देश कोटिगुण फलप्रद आहे. योगसिद्धी नंतर जपसिद्धी बरोबरच ध्यानसिद्धी होते व ध्यानसिद्धीने समाधी प्राप्त होते. योगसिद्धीच्या द्वारे देवता साक्षात्कार व दिव्यदेशामध्ये इष्ट देवाचा आविर्भावही होतो.

बाह्य पूजेमध्ये प्रथम मूलमंत्राचा उच्चार करून पुन्हा देय वस्तूचा उच्चार करावा. नंतर संप्रदानाच्या म्हणजे ज्याला वस्तू समर्पण करावयाची त्याचा उच्चार करून, समर्पणार्थक पदाचा उच्चार करावा. ह्या प्रमाणे सर्व उपचार देवाला अर्पण केले पाहिजेत. उपचार संख्येमध्ये एकविंशति, षोडश, दश व पंच असे चार प्रकारचे भेद योगतत्त्वज्ञ महर्षींनी केलेले आहेत. पैकी आवाहन, स्थापन, पाद्य, अर्घ्य, स्नान, वस्त्र, भूषण, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, आचमन, तांबूल, आरती व प्रणाम हे पंचोपचार (५) होत.

**१४) चौदावे अंग 'जप'**

योगशास्त्रात म्हटले आहे –

*''मननात् त्रायते यस्मात् तस्मान्मंत्रः प्रकीर्तितः ।*
*जपात्सिद्धिर्जपात् सिद्धिर्जपात् सिद्धिर्न संशयः ।।''*

मननामुळे त्राण म्हणजे रक्षण करतो; म्हणून त्यास मंत्र असे म्हणतात. जपानेच सिद्धी, जपानेच सिद्धी, जपानेच सिद्धी यात संशय नाही ! असा वरील श्लोकाचा अर्थ आहे व तो अनुभव पाहाण्याचाच आहे. आता जप कसा करावयाचा ते सांगतात. प्रापंचिक विषयांपासून मनाला हटवून मंत्राच्या अर्थाचे मनन करीत करीत व उच्चारणामध्ये फार त्वरा किंवा फार सावकाशपणा न करता मध्यम–वृत्तीने जप करावा. मंत्राचे वारंवार आवर्तन करणे ह्यास **'जप'** म्हणतात. हा जप तीन प्रकारचा असतो. मानस, उपांशू व वाचिक. ज्या मंत्राचा ध्वनी जप

करणाऱ्यालाही ऐकू येऊ शकत नाही, तो 'मानसिक' जप होय; जो जप करणाऱ्याला मात्र ऐकू येतो तो उपांशू होय व जो मंत्र वाणीने उच्चारला जातो व दुसऱ्यासही ऐकू येतो तो 'वाचिक' जप होय. वाचिक जपापेक्षा उपांशू जप श्रेष्ठ व उपांशू जपापेक्षा मानस जप श्रेष्ठ होय. ह्याचे आणखी एका ठिकाणी पुढे लिहिल्याप्रमाणे लक्षण सांगितले आहे -

''जप मोठ्याने करू नये. एकांतात, निरलसपणे, स्वस्थ चित्ताने, मुकाट्याने म्हणजे ओठ झाकून अथवा मनानेच चिंतन करावे. नाना प्रकारच्या स्थूल विधि यज्ञांपेक्षा जप यज्ञ दसपटीने श्रेष्ठ आहे. त्यांतही उपांशु जप शतपटीने व मानस जप सहस्त्रपटीने श्रेष्ठ आहे. उपांशु जप म्हणजे दोन्ही ओठ हळूहळू हलवीत, मंत्राचा हलक्या स्वराने म्हणजे दुसऱ्यास ऐकू न जाईल अशा स्वराने ओठांतल्या ओठात जप करणे.''

वाचिक व मानसिक जपाचे लक्षण उघडच आहे. प्रथम वाचिक, नंतर उपांशू व नंतर मानसिक असा हळू हळू अभ्यास करावा. दुसरे, अती त्वरेने जप करण्याने धनक्षय व अती सावकाश जप करण्याने रोग होतो; ह्या करता परस्परांस लागून असलेल्या पण विरल राहणाऱ्या मोत्यांच्या हाराप्रमाणे जप करावा. तिसरे, जो साधक जप करते वेळी आपल्या मनाचा शिव, शक्ती किंवा वायू ह्यांवर संयम करू शकणार नाही, तो पाहिजे तितके कल्पपर्यंत जप करीना का, त्यास सिद्धी दुर्लभ आहे. चौथे, उपासकाला हे ही आवश्यक आहे की देवमंदिरात किंवा साधनोपयोगी एकांताच्या घरात बसून जपसाधन करावे. साधनस्थान गोमय, गंगाजल वगैरेंनी शुद्ध केलेले असावे. तसेच उत्तम भावपूर्ण चित्रांनी ते सुशोभित केलेले असावे की, ज्या योगाने चित्रात पवित्रता उत्पन्न होईल. साधनगृहात म्हणजे आपल्या त्या ध्यानमंदिरात तामसिक व राजसिक कार्य, तसेच दुष्ट मनुष्याचा प्रवेश होता कामा नये. मोक्षाभिलाषी साधकाने तर गंगातीर, पंचवटी, अरण्य, स्मशान, तीर्थ आदिकरून प्रदेशांचे आपापल्या संप्रदायानुसार सेवन करून साधन करावे. विशेष सिद्धिलाभ करून घेण्याची इच्छा असेल, तर भूमीमध्ये खळगा खणून - भूयार करून - तेथे योगगुहा बसवून निरूपद्रव होऊन साधन करावे.

आपली, स्थानाची, मंत्राची, पूजासामग्रीची व देवतांची शुद्धी जोपर्यंत साधक करणार नाही, तोपर्यंत पूजा करणे व्यर्थ आहे. पंचशुद्धिविरहित पूजा अभिचारमात्र आहे. स्नान, भूतशुद्धी, प्राणायाम व सफल षडंगन्यासाने 'आत्मशुद्धी' होत असते. संमार्जन, लेपन, विज्ञान, धूप, दीप, पुष्पमाला इत्यादिकांनी शोभित व विविध रंगांनी भूषित करणे ह्यांनी स्थानशुद्धी होते. ह्या प्रमाणे पंचशुद्धिविधान करून पूजा करणे उचित आहे.

उपासनाभेदाने बीजमंत्र निरनिराळे आहेत. जसे - कृष्णबीज, रामबीज, शिवबीज, गणपतीबीज इत्यादी. हे सर्व आठ प्रकारच्या मूळ बीजांहून निराळे आहेत. विशिष्ट मंत्रांमध्ये बीज, शाखा व पल्लव केवळ भावमय आहेत व शक्ती ही बीजामध्ये साठविलेली असते. उदाहरणार्थ, 'ॐ क्लीं कृष्णाय नमः' ह्या मंत्रात ओम हा प्रणवरूप सेतू आहे, 'क्लीं' बीज आहे, 'कृष्णाय' शब्द शाखा व 'नमः' हा पल्लव आहे. जपापासून प्राप्त होणारी चित्तवृत्तीची शांती ही साधकाला पुष्परूप आहे व श्रीकृष्णरूप इष्टदेवाचा साक्षात्कार हा फलस्वरूप आहे, हेच मंत्रज्ञानाचे गूढ रहस्य आहे. काही मंत्र बीजरहीत व शाखापल्लवयुक्त असतात. त्यांस 'भावप्रधान' मंत्र म्हणतात. साधकाची प्रकृती, प्रवृत्ती, उपासनाधिकार व चित्तसंवेग ह्यांची परीक्षा करून मंत्रोपदेश दिला असता साधकाला पूर्ण फलाची प्राप्ती होत असते. प्रणव, प्रधान बीज, उपासना बीज, शाखापल्लव व संयुक्त

बीज व बीजरहित शाखापल्लवयुक्त मंत्र असे मंत्राचे पाच भेद आहेत. साधकाची प्रकृती, प्रवृत्ती व अधिकार ह्यांची परीक्षा करून यथावत् मंत्रोपदेश केला जातो.

पुन्हा मंत्रात सिद्ध, साध्य, सुसिद्ध व अरि असे चार प्रकार आहेत. 'सिद्ध' मंत्र कालेकरून सिद्धी देतो. 'साध्य' मंत्र जप-होमाने लवकर सिद्ध होतो. 'सुसिद्ध' मंत्र गुरूकडून मिळण्याची फुरसत, तात्काळ सिद्ध होतो व 'अरि' मंत्र साधकाचा नाश करतो. साधकाची नामाक्षरे व मंत्राचे वर्ण इत्यादीवरून त्याची परीक्षा करावयाची असते. मंत्रशास्त्रज्ञ गुरू ह्या सर्वांचा विचार करून साधकास मंत्र देत असतात.

**१५) पंधरावे अंग 'ध्यान'**

अध्यात्म भावनेनेच मंत्रयोगातील ध्यानाची प्रगटता झाली आहे. मंत्रशास्त्रानुसार योगिजनांनी विष्णुपूजेच्या संबंधात मुख्यत: सात प्रकारची ध्याने सांगितली आहेत. महादेवाच्या उपासनेमध्ये मुख्यत: पाच प्रकारची ध्याने मानली आहेत. आपापल्या इष्टदेवाच्या रूपाला मनाने जाणणे ह्यास **'ध्यान'** म्हणतात. ध्यानच मनुष्याच्या बंधनाला व मोक्षाला कारण आहे. जसजसा मनुष्य आध्यात्म करील, तसतशी त्याला समाधीची प्राप्ती होईल. आत्मा केवळ ध्यानाच्याच द्वारा वशीभूत होतो. ह्या प्रकारे करून ज्या मनुष्याचे मन जेथे प्रसक्त होते, तेथे त्याला समाधी प्राप्त होते. नदीचे पाणी ज्याप्रमाणे समुद्रात गेले असता समुद्र जलाशी अभिन्न होऊन जाते, त्याप्रमाणेच मनुष्याचा आत्मा ध्यानाच्या परिणामाने 'तद्भाव' प्राप्त करून घेऊन परमात्म्याशी अभिन्न होऊन जातो.

**१६) सोळावे अंग 'समाधी'**

ज्याप्रमाणे लय योगाच्या समाधीला 'महालय' व दृढ योगाच्या समाधीला 'महाबोध' म्हणतात. त्याप्रमाणे मंत्रयोगाच्या समाधीला 'महाभाव' म्हणतात. जोपर्यंत त्रिपुटी (ध्याता, ध्येय, ध्यान ही भावना) राहते, तोपर्यंतच ध्यानाधिकार राहतो. त्रिपुटीचा लय झाल्यानंतर महाभावाचा उदय होतो. मंत्रसिद्धीबरोबरच तात्काळ देवतेमध्ये मनाचा लय होऊन त्रिपुटीचा नाश झाला असता योग्याला समाधीची प्राप्ती होत असते. प्रथम मन, मंत्र व देवता ह्यांचा स्वतंत्र बोध असतो. परंतु हे तिन्ही बोध म्हणजे तिघांची पृथक् जाणीव, एक दुसऱ्या मध्ये लय पावली असता - ध्याता, ध्यान, ध्येय-रूपी त्रिपुटीही लय पावते. ह्याच अवस्थेमध्ये आनंदाश्रू व रोमांचादि लक्षणांचा विकास होतो व क्रमाने मनाचा लय होऊन समाधीचा उदय होतो. समाधी प्राप्तीने साधक कृतकृत्य होऊन जातो, 'महाभाव' प्राप्ती हेच मंत्रयोगाचे अंतिम ध्येय होय. ओम तत्सत् !

*''कोणा कारणे हें जालेंसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।*
*तुका म्हणे मी या अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असे ।।''*

## ९) मंत्र- क्रिया

### क) मंत्राची व्याख्या

''मननात त्रायते इति मंत्र:'' अर्थात ज्याद्वारे मनाचे संरक्षण होऊन मनाचे सामर्थ्य वाढते त्याला **'मंत्र'** असे म्हणतात. जो मनन केल्यामुळे तारतो तो **'मंत्र'** होय. मंत्र म्हणजे विशिष्ट प्रकारचा प्रत्यक्ष परिणाम घडवून आणणारा शब्दसमूह होय. अशा शब्दसमूहांत अर्थाला खरे महत्त्व नसून विशिष्ट शब्द, विशिष्ट पद्धतीचे त्या

शब्दांचे उच्चार व शब्दांची विशिष्ट क्रमाने एकामागून एक असे येणे ह्यालाच खरे महत्त्व असते. या मंत्रविषयक धारणेच्या मुळाशी शब्दांत उत्पादक शक्ती आहे अशी धारणा आहे.

मंत्र शब्दाची व्युत्पत्ती मनस् आणि त्रयी अशी आहे. म्हणजे मनाची शक्ती आणि त्रयी म्हणजे प्राणशक्ती यांचे एकीकरण ज्यात झाले आहे असा शब्दसमूह.

मंत्र साधकाचा ऋणी असावा, व जप करणारा धनी असावा. नाही तर मंत्राचे फल मिळत नाही. मंत्रात सिद्ध, साध्य, सुसिद्ध व अरि असे चार प्रकार असतात. बहुतेक सर्व मंत्र बीजयुक्त असतात. मंत्रजपामुळे मनोलय होतो, म्हणून त्याला मंत्रयोग असे म्हटले आहे.

विशिष्ट मंत्रांमध्ये बीज, शाखा व पल्लव तिन्ही असतात. प्रत्येक मंत्राचे शांती हे पुष्प, इष्ट साक्षात्कार हे फल, शाखा व पल्लव भावमय व शक्ती बीज असते. 'ॐ क्लीं कृष्णाय नम:' हा मंत्र घेतला, तर त्यांत ॐ हा सेतू, क्लीं बीज, कृष्णाय शाखा व नम: पल्लव आहे; चित्तवृत्तीची शांती हे पुण्य. श्रीकृष्णाचा साक्षात्कार हे फल होय.

सामर्थ्य शब्दांमध्ये नसून त्यांचे उच्चारण करणाऱ्या व्यक्तीच्या मनामध्ये असते. मंत्रांमध्ये शक्ती निर्माण करण्यासाठी त्यांचे तपस्यापूत जप नित्य करणे आवश्यक आहे. निरंतर विशिष्ट अनुशासनाने जप करत करत साधकाला मनामध्ये एवढे सामर्थ्य निर्माण होते की मंत्राचे मन:पूर्वक उच्चारण करताच इच्छित कार्य होऊन जाते. म्हणून सामर्थ्य मनांत असते. शब्दांमध्ये नव्हे. असे सामर्थ्यशील मन कोणत्याही मंत्राचे उच्चारण करताच कामनापूर्ती होते. एवढेच नव्हे, तर असला श्रेष्ठ साधक किंवा योगी कोणत्याच मंत्राचे उच्चारण न करता पण फक्त आपल्या इच्छामात्राने इच्छित कार्य करू शकतो.

### ख) मंत्र-क्रिया

भागवत संप्रदायामध्ये वैखानस आणि पांचरात्र-संहितांची विशिष्ट अशी मान्यता आहे. दक्षिण भारतामध्ये याच दोन संहितांच्या आधारे वैष्णव दोन भागामध्ये विभागले गेले होते. काही वैखानस सूत्रांनुसार तर काही पांचरात्र संहितांमध्ये विहित विधीनुसार मंदिरांमध्ये पूजा करीत होते. रामानुजाचार्य यांनी वैखानस संहितांच्या ऐवजी पांचरात्र संहितांचा प्रचार केला होता आणि वैष्णवांच्या दोन्ही संप्रदायांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचे प्रयत्न केले होते.

पांचरात्र संप्रदाय हा वेद आणि तंत्र या दोहोंना आधार मानून चाललेला आहे. मंत्र-क्रियामध्ये त्यांचा विश्वास आहे. मंत्रांना विष्णुची साक्षात् शक्ती मानली जाते. या शक्तीचा सर्वप्रथम प्रकाश अर्थात उदय नादमध्ये होतो. याची अनुभूती फक्त महायोग्यासच होऊ शकते. नाद नंतर बिंदु येतो. बिंदूपासून शब्दब्रह्माची उत्पत्ती होते. येथूनच नाद आणि बिंदु अर्थात नाम आणि रूप यांचे स्पष्ट अभिव्यंजन सुरू होते. अर्थात प्रत्येक आक्षरिक ध्वनीच्या विकासासोबत त्याच्याशी समांतर एक पदार्थ-शक्ती पण विकसित होत राहते. १६ व्या अध्यायामध्ये संहिताकाराने बिंदूपासून स्वर आणि व्यंजनांचा विकास दाखविला आहे. विष्णूच्या कुंडलिनी शक्तीच्या नृत्यामुळे १४ स्वर १४ प्रयत्नांपासून उत्पन्न होतात. हीच शक्ती आपल्या द्विविध सूक्ष्म शक्तीपासून सृजन आणि विध्वंस यांचे कारण बनते. ही शक्ती मूलाधारमध्ये उदय पावते. जेव्हा ती नाभीजवळ पोहोचते, तेव्हा तिला पश्यन्ती म्हणतात. योगी हिचेच साक्षात्कार करतात. यानंतर ती हृदय-कमलामधून होत कंठाद्वारे

वैखरी वाणीच्या स्वरूपामध्ये बाहेर येते (पडते). स्वर-ध्वनींची शक्ती सुषुम्ना नाडीमधून संचारित होते. व्यंजन-ध्वनी विश्व-शक्तीच्या अभिव्यंजन स्वरूपात किंवा त्यांच्या अधिष्ठातृ देवतांच्या स्वरूपामध्ये आहेत (असतात). काही वर्णांची एकत्र संगतीच कमल अथवा चक्र आहे. या चक्रांमध्ये मन:पूर्वक लक्ष लावल्याने त्यांच्याशी निगडित पदार्थांवर आधिपत्य प्रस्थापित होते.

नाथ-साहित्यामध्ये सृष्टि-तत्त्वाविषयी विचार प्रकट करताना असे सांगितले गेले आहे की निर्गुण-सगुण विवर्जित, परम शून्य निरंजन स्वरूप नाथापासून दोन प्रकारची सृष्टी उत्पन्न झाली - शिष्य परंपरेपासून नाद रूपा आणि पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेपासून बिंदु रूपा. नाद पासून नव-नाथ (उत्पन्न) झाले तर बिंदुपासून सदाशिव भैरव. शब्द-सृष्टिपासून अगोदर सूक्ष्म रूपिणी सृष्टी उत्पन्न झाली, नंतर स्थूल रूपिणी. सूक्ष्म रूपिणी सृष्टी आहे प्रणव, महागायत्री, योगशास्त्र आणि स्थूल-रूपिणी आहे ब्रह्म गायत्री आणि वेदत्रयी. 'शारदा तिलक' नावाच्या प्रसिद्ध तंत्र-ग्रंथामध्ये सृष्टि-तत्त्व विशद करताना म्हटले गेले आहे की शिवचे दोन रूप आहेत - निर्गुण आणि सगुण. जेव्हा शिवचे प्रकृतीशी संयोग होतो, तेव्हा सगुण शिवचे आविर्भाव होते. सगुण शिवपासून शक्ती उत्पन्न होते, आणि शक्तीपासून नाद आणि त्यापासून बिंदुची उत्पत्ती होते. विशुद्ध चैतन्य स्वरूप निर्गुण शिव आणि उपाधीयुक्त सगुण शिव यांच्या संयुगामुळे विश्वामध्ये जो एक विक्षोभ होतो, तोच नाद आहे आणि त्या विक्षोभाचे क्रियाशील होणेच बिंदु आहे. यांच्या पासूनच वर किंवा विशेषतायुक्त नाद, बीज आणि बिंदु उत्पन्न होतात. यांच्यापासूनच क्रमश: विष्णु, ब्रह्मा आणि रुद्र यांची उत्पत्ती होते.

### १०) मंत्र शक्तीचे वैज्ञानिक आधार*

मंत्र अंधविश्वासावर आधारित नसून तो शब्द विज्ञानावर निर्भर प्रक्रियेच्या परिणामस्वरूप आहे. प्राचीन भारतामध्ये मंत्र-तंत्र-यंत्र यावर पर्याप्त संशोधन झाले आहे. मंत्राचे मानसशास्त्राशी, तंत्रचे सूक्ष्म भौतिक विज्ञानाशी तर यंत्रचे सूक्ष्म आणि भौतिक विज्ञानाशी संबंध आहे.

मंत्र हा एक असा आदेश असतो की ज्याच्या उच्चारणामुळे संबंधित पात्र व्यक्तीवर त्याचा प्रभाव पडतो. ती पात्र व्यक्ती त्या मांत्रिकाच्या म्हणण्यानुसार कार्य करू लागते - त्याप्रमाणे वागते. वाणीचे नाव पण मंत्र आहे. मनुष्याच्या शरीरतंत्रा(यंत्रा)चे दोन भाग आहेत - बाह्य आणि आंतरिक. जेव्हा तन आणि मन हे दोन्ही चेतन अवस्थेमध्ये असतात. सक्रिय असतात, तेव्हा त्यांचे अखंड स्वरूपात चालणारे संग्रहण आणि संप्रेषणामुळे घार्षणिक आणि धारावाही - अशा दोन्ही प्रकारची विद्युत आमच्या शरीरामध्ये निर्माण होत असते. घार्षणिक विद्युतचे उत्पादन शरीर करते तर धारावाही विद्युत मेंदूमुळे निर्माण होते. मंत्रोच्चारणामुळे या विद्युत तरंगामध्ये एक वेगळीच गतिशीलता उत्पन्न होते. मंत्राच्या प्रयोगाने मेंदू आणि चेतनेस विस्तारित होऊ दिले जाते. विभिन्न तत्त्व आणि वस्तू, मानसिक प्रणालीच्या संपूर्ण रचनेच्या जागृतीसाठी ध्वनीची शक्ती, ध्वनीची वर्ग आवृत्ती, ध्वनीची गती आणि तापमान हे मंत्रास जबाबदार असतात. मंत्राचा उपयोग या भौतिक शक्तींना प्रभावित करण्यासाठी केला जातो. चारही वेद आणि उपनिषदे मंत्रांनी भरलेले आहेत. यांचे पठण-पाठ, शुद्ध उच्चारण आणि आरोह अवरोहासह केले जाते. मंत्र हे ध्वनिप्रधान आहेत. निरभ्र आकाशा (ईथर) मध्ये एका सेकंदामध्ये करोडोंच्या संख्येपर्यंत कंपने होत असतात. बत्तीस हजार सातशे पेक्षा जास्त कंपने मानवी कान ऐकू शकत नाही.

आपल्या शेवटच्या टोका (सीमे) पर्यंत पोहोचून ती कंपने 'क्ष-किरण' निर्माण करतात याचा वेग प्रकाशाच्या वेगासारखा आहे. (सामान्य प्रकाशाचा वेग दर सेकंदास तीन लाख किलोमीटर एवढा आहे.) वायूच्या कंपनासारखे निरभ्र आकाशाचे म्हणजेच 'ईथर'ची कंपने कधीच नष्ट होत नाहीत. असे ऐकीवात आहे की फ्रान्सचा एक शास्त्रज्ञ एका विशेष यंत्राच्या साहाय्याने भूतकाळातील थोर व्यक्तींच्या विचार कंपनाचा संग्रह ओळखण्याचा प्रयत्न करीत आहे.

हे एक वैज्ञानिक सत्य आहे की पृथ्वीच्या आदिकाळापासून ते आजतागायत जेवढे म्हणून व्यक्ती जन्मले आहेत, त्यांच्या विचारांनी निर्माण झालेली कंपने पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या पृष्ठभागावर स्थिर झालेली आहेत, आणि अति आवृत्तीचे विचारकण इतर ग्रहांवर पण पोहोचले आहेत. जर एखाद्या यंत्राच्या मदतीने या कंपनांना ग्रहण केले गेले तर आज भगवान् श्रीकृष्णद्वारा उद्‌भोदित गीतेचे पाठ पण ऐकू शकू.

**मंत्र जपाचा प्रभाव**

ज्याप्रमाणे प्रत्येक कंपनाची अधिदेवता असते, त्याचप्रमाणे स्वर, अक्षर आणि शब्दाचे पण अधिदेवता असतात. प्रत्येक मंत्रामध्ये अनेक स्वर आणि अक्षर असल्याकारणाने अनेक अधिदेवता आपल्या विशिष्ट शक्तींनिशी आरूढ असतात. मंत्राचे जाप होताच या सर्व अधिदेवतांच्या शक्ती श्रोत्याच्या मन:शक्तीस या अधिदेवतांच्या लोकांमध्ये पोहोचते करतात. मंत्राचे फल हे मंत्रपाठ करणाऱ्याच्या संकल्पावर निर्भर असते. ज्या अक्षराचे एक अधिदेव असतात त्यांना 'प्रणवाक्षर' असे म्हणतात. ज्या अक्षरामध्ये अनेक नायक अधिदेवतांचा समावेश असेल त्यास 'बीजाक्षर' असे म्हणतात. मंत्रामध्ये शब्द आणि नादसमूह निहित असतो. याच्यामुळे विचारतरंग निर्माण होतात. मंत्राचे उच्चारण केल्यावर हे विचारतरंग वातावरणामध्ये विशिष्ट शांतीचे वहन करून इच्छित ध्येय साध्य करतात. उपनिषदे सांगतात की विश्व आणि तत्संबंधी वातावरण यांचा जन्म गहनतम शक्ती तरंगाने झाला आहे. हल्लीच्या वैज्ञानिक युगामध्ये आपण तरंग-विज्ञानद्वारे मंत्र आणि आधुनिक भौतिक विज्ञान यांमधील गहनतम आणि अतूट संबंध जाणून घेऊ शकतो. विशिष्ट एकाग्रतेसह मंत्रांचे उच्चारण केल्याने मंत्र सिद्धी (प्राप्त) होतात. मंत्रसिद्ध व्यक्तीने वाट्टेल ते म्हटल्यावर सत्य स्वरूपात ते घडते. अनेक आधिदैविक आणि आधिभौतिक शक्तींशी संपर्क साधून ते आपले चमत्कारपूर्ण कार्य करण्यामध्ये समर्थ असतात.

मंत्रसाधनेचे साधक शक्ती तरंगांच्या मदतीने आपल्या निष्क्रिय मेंदूस सक्रीय करून दिक्कालातीत त्रिकालदर्शितेस प्राप्त करून घेतात.

(* श्री राधागोविंद पातर - 'मानव और धर्म' पृ. ८९-९१.)

**सिद्धी विवेचन**

**१) सिद्धावस्था (सहज समाधी)**

साधक वैयक्तिक साधनेच्या माध्यमाने विधी-निषेधाद्वारे मनास शुद्ध बनवून भक्तीच्या निच्छल आणि समर्पणयुक्त क्षेत्रामध्ये प्रवेश करतो. निरंतर नामस्मरणाची भावना आणि विरहानुभूतीमुळे त्याच्या प्रेमामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात मादकताजन्य तीव्रता येते की त्यास ब्रह्माची अद्वैतानुभूती होते. ज्ञाता आणि ज्ञेयाची तादात्म्य भावना त्याला अशा एका स्थितीमध्ये पोहोचविते की जेथे तो तन्मयतेच्या आनंदामध्ये आपली सर्व बाह्य चेतना हरवून मग्न होऊन जातो. दुसऱ्या शब्दांत साधक आणि साध्यामध्ये, आत्मा हा परमात्म्याशी पूर्ण

तादात्म्य प्रस्थापित करतो, आणि त्यामध्ये कोणत्याच प्रकारचा भेदभाव (शिल्लक) नसतो. आत्मा स्वत:स परमात्म्याचा एक भाग (अंश) समजू लागतो आणि त्यामध्ये अंगांगी भाव संबंध स्थापित होऊन जातो याला साधकाची पूर्ण **सिद्धावस्था** म्हटले गेले आहे. कारण त्या (साधका) च्या जीवनामध्ये अपूर्व कायापालट झालेला असतो. अशा स्थितीमध्ये आत्मा स्वत:मध्ये परमात्म्याचे अस्तित्व असल्याचे मानतो, आणि त्याच्यामध्ये परमात्म्याचे गुण प्रकट होतात. त्याचे स्वाभाविक निज गुण लुप्त होऊन जातात.

साधकामध्ये एक विचित्र स्थिती निर्माण होते. त्याला अपूर्व आनंदाची अनुभूती होऊ लागते. मनाने प्रभूचे ध्यान-नामस्मरण करताना शरीर विस्मृत होऊन जाते, आणि तत्त्वांची प्राप्ती होऊन जाते. शून्य-गगनामध्ये स्नान केल्यामुळे सर्व संताप दूर होऊन जातो, आणि अभूतपूर्व शीतलता प्राप्त होते. आपला आणि परका याची भेदभावना नष्ट होऊन जाते. त्याच्या स्वत:मध्ये आपले म्हणून काहीच शिल्लक राहात नाही. जे काही आहे ते सर्व तुझेच आहे. म्हणून तुझी वस्तू तुला अर्पण करण्यामध्ये माझे काय जाते? जेव्हा शेवटची स्थिती आपल्या पूर्णावस्थेस पोहोचते तेव्हा साधकास **'सहज-समाधी'** प्राप्त होते. साधकांची ह्याच एकमात्र दुर्लभ अवस्थेस **'सिद्धावस्था'** म्हणतात. या अवस्थेमध्ये सर्व कार्य-व्यापार अनायास होत राहतात, आणि त्याला काहीच करण्याची गरज नसते. कारण की त्या स्थितीमध्ये साधक आणि आराध्यामध्ये एवढी प्रगाढता येते की जे काही तो स्वत:साठी करतो ते आपोआप भगवंतास अर्पित होऊन जातात. इकडे-तिकडे चालणे हीच परिक्रमा बनून जाते; काम-काजच सेवा, झोपणेच प्रणाम, बोलणेच नाम-जप, खाणे-पिणेच पूजा आणि श्रीमंत-गरीबांमध्ये समदृष्टी येते. तो डोळे फिरवणे आणि कान बंद करणे या भानगडीपासून दूर होऊन उघड्या डोळ्यांनी भगवंताच्या रूप-माधुरीचे नयन-सुख घेतो आणि उघड्या कानांनी अनहद-नाद ऐकतो. सहज समाधीची अशी दुर्लभ स्थिती क्वचितच एखाद्या व्यक्तीच्यावाट्याला येते. तेव्हा तो अशी घोषणा करू शकेल -

*'राम हमारा जप करै, हम बैठे आराम'*

अर्थात प्रभू रामच आमचे जप करीत असतो; आम्ही मात्र आरामात निश्चिंत पहुडलेले असतो.

**२) सिद्धी प्राप्तीचे लक्षण**

विषयांमध्ये पसरलेले (गुंतलेले) मन प्रत्याहाराद्वारे एकवटून अंतर्मुख झाल्यावर कायिक मनापासून वेगळे होऊन जाते आणि उन्मनी दशेमध्ये प्राप्त ब्रह्मरूप माळेमध्ये ओवले जाऊन जीव-रूपी पुष्प उमलतो. सिद्धी प्रज्वलित झाल्यानंतर धूर निघू लागतो. हे धूर म्हणजे प्राणच आहे. जसे, धूर हे अग्नीचे अस्तित्त्व सिद्ध करते, तसेच प्राणांचे ऊर्ध्वरूप होऊन ब्रह्मरंध्रामध्ये स्थित होणे, हे सिद्धी प्राप्तीचे लक्षण आहे. योग्याची शेवटची अवस्था 'निष्पत्ती'ची आहे. याला प्राप्त करून योगी हा भेद-भाव विवर्जित समदृष्टीचा होऊन जातो. सिद्धींच्या लोभाशी असंपृक्त, काल प्रभावापासून मुक्त, असा निष्पत्ती प्राप्त योगी सर्वांसाठी वंदनीय असतो.

पांचरात्रच्या 'जयाख्यसंहिते'मध्ये असे नमूद आहे की भक्त हा योग-साधनेद्वारे ब्रह्मरंध्रापासून निघून वासुदेवाशी एकरूप होतो. भक्तांसाठी योगी असणे आवश्यक आहे. जीवाचे परमात्म्याशी संयोगच **योग** आहे. तसे पाहता मनाच्या कोणत्याही पदार्थाशी शांत संयोगास योग म्हटले जाते. मन एखाद्या कर्मावर स्थिरपणे केंद्रित होऊन जाते, तेव्हा **कर्मयोग** होतो आणि जेव्हा ज्ञानावर केंद्रीभूत होतो, तेव्हा **ज्ञानयोग** होतो. कर्मयोगामध्ये यम, नियम, व्रत, दान आणि इतर आत्मसंयमसंबंधी कर्म येतात. ज्ञानयोगामध्ये स्वाध्याय अर्थात श्रवण, मनन

आणि निदिध्यासन इत्यादीची गणना आहे. योगदर्शनामध्ये स्वाध्याय आणि ईश्वर-प्रणिधानास नियमाच्या अंतर्गत ठेवले आहे. ईश्वर-प्रणिधानच भक्तियोग आहे आणि आसक्तीचा विनाशक आहे. विशिष्ट साधक हे सर्व प्रकारच्या योगांच्या प्रयोगाने सिद्धलाभ करून घेतात.

गुरू नानक यांनी सहज-समाधीस सुख-दु:खातीत अशी आत्मानंदाची स्थिती मानली आहे. ना झोप सतावते ना भूक. येथे नामामृताचे निरंतर निवास असते, आणि सर्व प्रकारच्या चिंतेपासून मुक्त होऊन स्वत:मध्ये सामावलेला असतो.

जसे पाणी पाण्याशी मिसळून तदाकार होऊन जाते, तसेच आत्मस्थित वियुक्त परमात्म ज्योती परमात्म्याशी मिसळून तद्रूप होऊन जाते. जसे थेंबाचे पृथक् व्यक्तित्व समुद्रामध्ये मिसळून समुद्राची ख्याती धारण करते, तसेच साधक हा 'पूर्ण पुरुषा'शी मिसळून आपले नाम-रूप गमावतो आणि स्वत: परमात्म स्वरूप झाल्यामुळे स्वत:स ओळखतो. या स्थितीस शून्याच्या नावाने ओळखा किंवा 'सहज-समाधी' म्हणा, दोहोंमध्ये काहीच अंतर नाही, ते अभिन्न आहेत. या स्थितीस पोचलेली व्यक्ती स्वत:च गुप्त आणि मुक्त असते.

योगी इंद्रिय निग्रह करून संयमप्रधान होऊन राहतात. मौनाचा मनाशी संबंध असतो. मनात चित्तवृत्ती उठलेल्या नसाव्यात, तरच मौन होते. चित्त स्थिर झाले की धारणा सिद्ध होईल. ते धरून ठेवता येते. धरता आले तर पाहता येते. मनाला तद्रूप, तदाकार, तन्मय व्हायला हवे. तन्मय म्हणजे तन व मन एकरूप व्हायला हवे. तरच चित्त स्थिर होईल. धारणा सिद्ध होईल. तरच ध्यान लागेल. निर्विचार होता येईल. मग समाधीचा अनुभव. योगीराज हेच करतात.

### ३) सिद्धीचे स्वरूप आणि सिद्ध पुरुषाची लक्षणे

साधना ही कोणा व्यक्तिविशेषाची किंवा संप्रदायविशेषाची संपत्ती नाही. साधनेचा मार्ग हा क्रियात्मक पराविद्येचा मार्ग आहे. यावर विरळ व्यक्तीच चालू शकतात. प्राक्तन जन्मांचे पुण्यच मानवास या मार्गाचे पथिक बनविण्यामध्ये समर्थ असतात, आणि पथिकांमध्ये अत्यंत विरळे आहेत ते व्यक्ती जे सिद्धावस्थेपर्यंत पोचले आहेत.

*''मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चितति सिद्धये ।*
*यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वत: ॥''*

अधिकांश सर्व संत साधना मार्गाच्या या वैशिष्ट्याकडे निर्देश करत राहिले आहेत.

**सत्‌ची झलक :** मनुष्य ज्या वस्तूची इच्छा करतो, ती त्यास जरूर मिळून जाते. मात्र आवश्यकता असते त्या इच्छेसोबत अविचल निष्ठेची. ज्याप्रमाणे भ्रमर कमळाचे सौरभ आणि रसाच्या आस्वादाची आकांक्षा घेऊन अडथळ्यांच्या वन्हीमध्ये दग्ध होऊन पण पुढे पुढे जात असतो, आणि शेवटी आपले अभीष्ट प्राप्त करतो, त्याचप्रमाणे साधक हा प्रभु-प्राप्तीच्या अभिलाषेमध्ये त्याच्या नावाचे जप करत सांसारिकतेपासून उपरत परंतु उन्मनी अवस्थेकडे निरत होत जातो. तेव्हा एके दिवशी त्याला त्या सत् तत्त्वाची झलक प्राप्त होऊनच जाते.

ही आहे सत्‌ची झलक ज्याला आचार्य वल्लभ यांनी **'संधिनी शक्ती'** म्हटले आहे. तीच ही ज्योती आहे, जी आत्म्यास परमेश्वराशी जोडून देते.

'Plotinus believed in vision as on indispensible condition, but as a possibility for a pure soul to enjoy the sight of the supreme soul.' [A.M.A. Shushtery - 'Outlines of Islamic Culture', P. 391]

आज्ञाचक्र उघडताच योग्यास या ज्योतीचे दर्शन घडू लागते. परंतु ही ज्योती सर्वश्रेष्ठ ज्योती नव्हे. याहून उत्तर आणि उत्तम श्रेणीच्या ज्योतीपुढे येतात. ही ज्योती प्रभूच्या सामिप्याची एक झलक मात्र साधकास दाखविते. ही साधना क्षेत्रामध्ये पुरेशी समजली जात नाही. जोपर्यंत आपले अभीष्ट प्रिय प्रभू प्राप्त होणार नाहीत, तोपर्यंत साधकास चैन कोठे?

**आत्मदर्शन :** साधकाच्या अनुभूतीमध्ये त्राटक साधनेची जी विद्युज्योती दिसते, ती अंतिम शाश्वत आणि नित्य सिद्धी नाही. जर साधक यापुढे जात नसेल, तर त्याचे पतन होऊ शकते. हा पुराणांचा स्वर्ग आहे, जेथे जीव आपल्या सुकृतचे भोगांना भोगून पुन्हा मर्त्यलोकामध्ये परततो. हिच्यावर आत्मसाक्षात्काराची अचल स्थिती आहे. येथे मर्त्य लोकातील सर्व शुभाशुभ आकांक्षा आपसात टक्कर देत आपले डोके फोडून घेतात. परंतु त्याने त्यांच्या केसाला पण धक्का पोहोचत नाही. आत्मज्ञात्यास लौकिकता संपृक्त करू शकत नाही. तो या स्वरूपामध्ये पोचून पुन्हा येथे परत येत नाही. ही ती अमृत जडी आहे, जी स्वत: तर मरणापासून दूर असतेच, पण आपल्या संपर्कामध्ये येणाऱ्यास पण अमर बनविते. याला प्राप्त करण्यासाठी हिमालयरूपी आज्ञाचक्रास अतिक्रांत करावे लागते.

लाकडामध्ये निहित अग्नी जसा प्रज्ज्वलित होतो, तलावामध्ये जसे कमळ विकसित होते, त्याचप्रमाणे साधकाच्या हृदयामध्ये आत्मज्योती चमकू लागते. ही ज्योती जागृत अर्थात प्रदीप्त झाल्यानंतर ना पाप उरते, ना पुण्य, ना मर्त्य लोक राहतो ना स्वर्ग. आत्मप्रकाशापुढे मोती, माणिक, हीरे, रत्न आदींचा प्रकाश तर कुठे (सोडा) विद्युत, चंद्र आणि सूर्याचा प्रकाश पण निष्प्रभ होऊन जातो. ज्या मनास साधनेमध्ये स्थिर केले होते, ते या प्रकाशाने प्रदीप्त होते. सर्वरूप, सौंदर्याचा तेच स्त्रोत आहे. ब्रह्मांडातील नवखंड त्याच प्रकाशाची पडछाया ग्रहण करणारे, सूर्यादिपासून प्रकाशित होतात. त्याच्या रूपासारखे येथे कोणाचेच रूप नाही. आत्मसाक्षत्‌ची सिद्धी ही समस्त मनोकामनांची पूर्ती आहे. हीच सर्व दु:खाचा अंत आहे. सर्व आशा आणि अभिलाषांची अंतिम गती पण इथपर्यंतच आहे. निसर्गाचे उदात्त तत्त्व पवन, पाणी, चंद्र, सूर्य आणि त्यामुळे निर्माण होणारे रात्र आणि दिवस, कुणाचीही तिथपर्यंत पोहोच शक्य नाही. योगाच्या भाषेमध्ये आत्मसाक्षात् द्रष्ट्याचे आपल्या स्वास्थ्यामध्ये अवस्थान आहे. स्वत:स ओळखूनच साधक परमेश्वरास ओळखू शकतो. आत्मज्ञान आणि परमात्मज्ञान यामध्ये गुणांचे नव्हे, तर प्रमाणाचे अंतर आहे.

वेदाचे तप:पूत ऋषीने प्रर्थना केली होती – 'अगन्म ज्योतिरूत्तमम्' अर्थात प्रभू, आम्हास उत्तम ज्योती प्राप्त होवो. हीच उत्तम ज्योती, जिच्यापुढे अंधाराचीच काय बिशाद, साधारण ज्योती पण थांबू शकत नाहीत, साधकास प्राप्त होते. त्याच्या चोहीकडे प्रकाशच प्रकाश ओतप्रोत होऊन जातो. साधक हा जेथून निघाला होता, त्यामध्येच समाविष्ट होऊन जातो. प्रियकर आणि प्रेयसी दोन्ही मिळून एक झाले आणि मुक्तिरूपी मुक्ता–माणिक्यासोबत ज्योती ज्योतींमध्ये विलीन होऊन जाते. सिद्धावस्थेमध्ये अहंकाराच्या समाप्तीबरोबर जीवात्म्याचे अस्तित्वपण समाप्त केले जाते. हे इस्लामी एकेश्वरवादी धारणेनुसार आहे.

**सिद्ध पुरुषाची लक्षणे**

सिद्ध पुरुष निर्भयपणे रात्री भ्रमण करतात. जिकडे त्यांची दृष्टी वळते, तिकडेच ते चालू लागतात. त्यांना प्राणाची काहीच पर्वा नसते. ते मृत्युला भीत नाहीत. तलवारीवर प्राणार्पण करण्यासाठी ते आपली मान तुकवितात. जेथे प्राणांचे वध होते तेथे सिद्ध पोहोचतात. सिद्धांना सोडून दुसरा असा कोण आहे की ज्याने मृत्यूचे पंख धारण केले असावेत ! सिद्धांचे शरीर पाण्यासारखे अविनाशी असते. त्यास बळाने नव्हे, तर छळानेच मारले जाऊ शकते. सिद्धांची दृष्टी आकाशामधील गिधाडांसारखी असते. (अति तीव्र)

सिद्धांच्या सर्वच गोष्टी असामान्य असतात. त्यांच्या शरीरावर माशी बसत नाही. त्यांचे डोळे अनिमेष असतात. म्हणजे ते आपल्या डोळ्यांची पापणी लवत नाहीत. सिद्धांची छाया पडत नाही. त्यांच्यासाठी माया ममता आणि भूक यांचा अभाव असतो. ते प्रकट आणि गुप्त अशी सर्व दृश्ये पाहू शकतात. त्यांना गुह्यांची गुज असते.

सिद्ध पुरुष हा महायोगी असतो. साधकाची साधना जेथे समाप्त होते तेथूनच खरोखर योग्याची साधना सुरू होते. साधकाचे आदर्श विदेह कैवल्य आहे, तर योग्याचा आदर्श साकार पिंड-सिद्धी आहे. भगवत् प्रेम मनुष्य-जीवनाचे मुख्य आदर्श आहे. म्हणूनच योगी मुक्त अवस्थेमध्ये पण आकाररहित राहात नाहीत. अर्थात योग्याचे शरीर कधीच परित्यक्त होत नाही. या नित्य कायेस प्राप्त करून योगी अखंड कर्माच्या मार्गावर हळू हळू अग्रेसर होत असतात.

देहावस्थेमध्ये शक्तींचे पूर्ण शोधन अशक्य आहे. पक्षांतराने शक्तींची पूर्ण शुद्धी झाल्यानंतर विदेह कैवल्य अवशंभावी आहे. साधकास सिद्धावस्थेमध्ये अणुहीन, विकल्पहीन, मातृका संस्पर्शविहीन, देहहीन आणि मनहीन सिद्धी प्राप्त होते. परंतु योगी आपल्या प्रबळतर कर्माच्या प्रभावाने या सर्व मातृका-शक्तींना अंतरंग स्वरूपशक्ती रूपामध्ये, मातृरूपामध्ये परिणत करतात. जेव्हा या स्वरूपशक्तीरूपामध्ये परिणाम पूर्ण होतो, तेव्हा योग्यास सिद्धावस्था प्राप्त झाली म्हणून समजावे. परंतु ही विदेह अवस्था नव्हे. साधकाचे काम आहे अशुद्ध सत्तेस स्वत:पासून वेगळे करणे, परंतु योग्याचे काम अशुद्ध सत्तेची अशुद्धता काढून टाकून निर्मळ निज-शक्ती रूपात बदलणे, हे आहे. जे योगी जेवढ्या अधिक प्रमाणात या योजनाकार्यामध्ये अग्रेसर होतात ते तितकेच श्रेष्ठ योगी मानले जातात. वास्तविक सिद्ध योगी तेच आहेत, जे एकोणपन्नास (४९) मातृका-शक्तींमधून सर्वांना आत्मशक्ती स्वरूपात बदलण्यामध्ये समर्थ होतात. अशा प्रकारचे योगी नित्य काय-संपदालाभ करतात. म्हणूनच स्वत:स विशुद्ध अहम्‌च्या स्वरूपामध्ये ओळखण्याची योग्यता उपार्जित करतात. हीच योग्याची आत्मस्वरूपामध्ये स्थितीरूप सिद्धी आहे. या अवस्थेमध्ये देह असते, परंतु ते देह कालविजयी नित्य देह असते. योग साधनाच्या क्रमोत्कर्षामध्ये एक परावस्था असते. ही अशी अवस्था असते की ज्यामध्ये योगी फक्त आत्मरूप आणि नित्य देह प्राप्त करूनच संतुष्ट होत नाही, तर या जरा आणि व्याधीच्या विकारमय भौतिक देहास पण कालग्रास होण्यापासून वाचविण्यामध्ये समर्थ होतो (बनतो).

**४) अष्टसिद्धीची यथार्थ मीमांसा**

सिद्धी हे फल 'यथार्थ' पुरुषार्थसहित निश्चयाच्या संकल्पनात आहे. ऋद्धि सिद्धी 'स्वकर्म' स्थित विज्ञानाचे फल आहे. अकर्मात (स्वकर्मात) ज्ञान विज्ञानोत्पत्तीद्वारे आपल्या निजस्वरूपात मिळवून देण्याची म्हणजे

मोक्षभावाप्रत नेण्याची शक्ती आहे. आत्मभावात प्रतिष्ठित म्हणजे विलीन करण्यास कारणीभूत होणाऱ्या या स्वकर्माच्या तपात सिद्धीचे चमत्कार करून दाखविण्याची इच्छा नसून, सद्गुरूला (तत्त्वदर्शी विज्ञानी पुरुषाला) प्रत्यक्षत: अनुभवास येणाऱ्या –

*''अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा ।*
*प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्ट सिद्धयः ।।''*

अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व या अष्टसिद्धी स्वयमेव आपल्या आपण होऊन अनुभवरूपी स्वाधिष्ठानात मिळवितात. विश्वरूप परमेश्वराच्या अनन्य भक्तीने त्या प्राप्त होत नाहीत. अष्टसिद्धीची यथार्थ मीमांसा पुढीलप्रमाणे –

**१) अणिमा –** दिव्यदृष्टी मिळून सद्गुरूत्व स्थिर होताच ही सिद्धी प्राप्त होत असते. हिची शक्ती अदृश्य करण्याची आहे. आत्मानुभव येताच वृत्तीस अत्यंत सूक्ष्मत्व (अणुत्व) येऊन विश्वस्वरूपात लयभाव होणे हेच 'अणिमा' म्हणजे 'अणुत्व' संज्ञक अदृश्य होणे असून दृश्य स्थूल शरीराला अदृश्य करणे म्हणजे अणिमा नव्हे. विज्ञानोत्तर विज्ञानी पुरुष स्वत:ला सूक्ष्म अतएव अव्यक्त रूपानेच जाणतो.

**२) महिमा –** अणिमा सिद्धी प्राप्त झाल्यावर क्रमानेच मननरूपी दुसरी 'महिमा' सिद्धी प्राप्त होते. ही सिद्धी प्राप्त झालेल्या पुरुषाची जगात प्रशंसा होऊन सर्व लोक त्याची महिमा करू लागतात. कारण तो स्वत:चे शरीर फिरणारे, तुच्छ व तृणवत समजून वागत असल्याने आर्जवी नम्र होतो.

**३) लघिमा –** महिमा वाढल्याच्या योगाने तिसरी निदिध्यासरूपी 'लघिमा' सिद्धी प्राप्त होते. हिचे सामर्थ्य 'लघुस्वरूप' म्हणजे सूक्ष्म 'क्षररूप' होणे हे होय. 'स्थूल' – विराट म्हणजे क्षरातील पंचतत्त्वे व त्रिगुण, 'सूक्ष्म' – विराट म्हणजे महद् ब्रह्म अथवा त्रिगुण साम्यात्मिका मूळ क्षर प्रकृती.

**४) गरिमा –** हिचे लक्षण असे आहे – जो परमेश्वराला सर्वत्र अवलोकन करतो व सर्व ब्रह्मांडे परमेश्वरात पाहतो, परमेश्वर कधी त्याच्या दृष्टिआड होत नाही, व तो ही कधी परमेश्वराच्या दृष्टिआड होत नाही. (कारण दोघेही एकरूप असतात.)

वरील प्रकारचा अनुभव स्थिर होताच विज्ञानी पुरुष 'गरिमा' सिद्धीला प्राप्त होतो. ह्या सिद्धीचे सामर्थ्य गुरूत्वमूलक विशिष्ट रूप प्राप्त होणे हे होय.

**५) प्राप्ति –** गरिमा सिद्धीनंतर तिच्या योगाने विज्ञानयोगी पुरुषाला 'आस्तिक्य' रूप 'प्राप्ति' संज्ञक पाचवी सिद्धी प्राप्त होऊन स्वत:ला भोजनाच्छदनादि मिळविण्याची कोणत्याही प्रकारची इच्छा राहात नाही. सद्गुरूच्या यथार्थ बोधाने त्याचे अंत:करण तृष्णाक्षयाद्वारे शुद्ध झालेले असल्याने प्रथमत: त्याला ऐहिक भोगाची इच्छा होत नाही. परंतु जर ती उद्भवलीच तर इतरांच्या योगक्षेमापुरतीच असते, व ती महिमा सिद्धीनंतर चक्रगतीने स्वयमेव उदय पावते व अस्तास जाते. जी प्राप्त झाल्यानंतर पुनश्च काही 'प्राप्तव्य' राहात नाही. तिचेच नाव प्राप्ति होय. प्राप्ति म्हणजे तृप्तता होय. विज्ञानोत्तर आस्तिक्य ज्यांना प्राप्त झाले असेल त्यांनाच ही सिद्धी प्राप्त होते.

**६) प्राकाम्य –** ह्या सिद्धीच्या योगाने जो आनंद स्वत:स उपभोगावयास मिळाला तोच अखंड आनंद (म्हणजे तृप्ती) इतरांसही व्हावा अशी त्याची दृढ वृत्ती होते. या योगाने तो अनेकांस आत्मबोध करून अनेकांचे

आत्मकल्याण करीत 'समाधान' करीत असतो. याचेच नाव परमार्थ आहे आणि जेथे स्वार्थ व परमार्थ याची एकात्मता होते ते स्थानही हेच आहे.

**७) ईशित्व –** जेव्हा विज्ञानी पुरुष सर्वज्ञ व सर्वशक्तिमान ईश्वराच्या स्वरूपात मिळतो म्हणजे अक्षर-ब्रह्मात तद्रूप होतो, तिचेच नाव 'ईशित्व' सिद्धी आहे. 'सर्वज्ञा'चा अर्थ सर्व जाणणारा असा आहे. क्षेत्रज्ञ म्हणजे 'सर्व' क्षेत्र जे विराट, त्याचा साक्षी म्हणजे त्यास जाणणारा. 'सर्वशक्तिमान' म्हणजे ज्याने सर्वही प्राकृतिक शक्ती नियमाने धारण केल्या आहेत तो होय.

**८) वशित्व –** यानंतर अखेरची 'वशित्व' संज्ञक आठवी सिद्धी विज्ञानयोग्यास प्राप्त असते. ही भूमिका अपराजयावस्थेने युक्त असून सत्रूप स्थितीची द्योतक असल्यामुळे हिची 'वशित्व' अशी संज्ञा सार्थकच आहे. या स्थितीवर विज्ञानयोगी पोहोचला म्हणजे त्यास पराजयाचे भयच राहात नाही. अशा या अष्ट सिद्धी सद्गुरू मिळाल्यास 'अकर्म' (स्वकर्म, वर्णक्रम) रूपी तपाने प्राप्त होतात. इतर कोणत्याही प्रकारचा गुरू केल्याने या सिद्धीची प्राप्ती होणार नाही.

## तंत्र विवेचन

### १) तंत्र : आविर्भाव, स्वरूप आणि भेद (शिव-शाक्त तत्त्वज्ञान आधारे)*

### क) आविर्भाव

वैदिक साधनेच्या मुळात वेद आणि तांत्रिक साधनेच्या मुळात तंत्र आहेत. प्राचीन काळातच नव्हे, तर मध्ययुग आणि सध्या पण वैदिक साधनेचे पर्यालोचन आणि त्यावर मनन-चिंतन सुरू आहे. ऐतिहासिक, शाब्दिक, पौराणिक आणि इतर दृष्टिकोनातून या दिशेने शोध आणि संशोधन सुरू आहे. हे महत्त्वपूर्ण आहे. अर्वाचीन काळामध्ये योग-विज्ञानाच्या अनुसार श्रीअरविंद आणि त्यांच्या काही शिष्यांकडून या दिशेमध्ये फार जास्त प्रयत्न झाले आहेत. यांचे पण अत्यंत महत्त्व आहे; परंतु इतके करूनही या क्षेत्रामधील रहस्यावृत्त अंचलांची कमी नाही.

तांत्रिक साधनेच्या दिशेमध्ये पण काही दिवसांपासून कार्य सुरू झाले आहे. महात्मा शिवचंद्र विद्यार्णव, त्यांचे शिष्य जॉन उड्रॉफ, परम श्रद्धानंद स्वामी प्रत्यगात्मानंद इत्यादींद्वारा या क्षेत्रात विपुल प्रयत्न झाले आहेत. परंतु हे सर्व दिशाचे संकेतमात्र आहे. प्रचलित वैदिक-साधनाक्रमांचे अनुशीलन जसे बहिर्मुख आहे, तसेच तांत्रिक साधनेचे अनुशीलन झाले पण बहिर्मुख आहे. त्याचे जेवढे अनुशीलन झाले आहे, तेवढ्यावरून त्याच्या गूढ रहस्यांवर प्रकाश पडत नाही.

एखाद्या गोष्टीचे (वस्तूचे) स्वरूप-निरूपणासाठी तिचे अंतरंग जाणणे आवश्यक असते. संस्कृतीच्या प्रत्येक विभागामध्ये एक अशी दिशा अवश्य आहे की जी रहस्यपूर्ण आणि गूढ असण्यासोबतच फक्त विशिष्ट अधिकारी लोकांनाच बोधगम्य असते. ही फक्त भारतीय संस्कृतीचीच नव्हे तर जगामधील सर्व संस्कृतीची विशेषता आहे.

तांत्रिक साधनेशी येथे साधारणपणे अभिप्राय शाक्त-साधना आणि आनुषंगिक स्वरूपात शैव-साधनेशी आहे; परंतु वैष्णव आणि सौरादी साधनांच्या प्रणालीपण वास्तविक तांत्रिक परंपरेचेच प्रकार-भेद आहेत. हे

सत्य आहे की साधनेच्या सर्व क्षेत्रांवर बाह्य प्रभाव पडले आहेत. परंतु क्षेत्रांच्या वैशिष्ट्यानुसार त्यांच्या प्रणालीचे नामकरण झाले आहे. वैष्णव क्रमाचे दोन विभाग पांचरात्र आणि भागवत प्राचीन काळापासूनच प्रचलित आहेत. पुढे (चालून) दोन्ही प्रणाली मिश्रित होऊन गेल्या. पांचरात्र-तंत्र, सात्वत-तंत्र प्रभृती ग्रंथ प्राचीन काळापासून वैष्णवांमध्ये संभावित आहेत. शैव आणि शाक्तांचे तांत्रिक-वाङ्मय आणि संस्कृतीचे विविध अंगांची समीक्षा करणेच येथे अभिप्सित आहे.

वेद आणि तंत्र शब्दात्मक असूनही पण वास्तविक ते ज्ञानाचेच प्रकारभेद आहेत. हे ज्ञान दिव्य आणि अपौरुषेय आहे. बहिर्मुखी दृष्टिद्वारे वेद शब्दाचा तात्पर्य काही का असेना, वस्तुतः वेदांचे स्वरूप अतींद्रिय शब्दात्मक सूक्ष्म ज्ञानविशेष आहे. मंत्रदर्शी ऋषीगण याला प्राप्त करून सर्वज्ञ बनत असत, आणि शेवटी आत्म-ज्ञान प्राप्त करून आपले जीवन सफल बनवीत होते. म्हणूनच पुराकल्पमध्ये लिहिलेले आहे –

''ज्यांनी धर्मतत्वाचे साक्षात्कार केले आहे असे ते ऋषिगण नित्य इंद्रियातीत सूक्ष्मावाक्‌चे प्रदर्शन करतात, ज्यांना धर्मतत्त्वाचे साक्षात्कार झाले नाही, ते त्याचे दर्शन करू शकत नाहीत. अशा लोकांना सूक्ष्म-वाक्‌चे संवेदन करविण्यासाठी ऋषिगण त्या अतींद्रिय वाणीस इंद्रियगम्य वेद-वेदांग स्वरूपात प्रकट करतात. हे वेद-वेदांगच 'बिल्म'पदाचे वाच्य आहे.'' स्वप्नानुभूतीस प्रकाशित करण्यासाठी जसे स्थूलेंद्रियगोचर वाणीचा आधार द्यावा लागतो, तसेच अतींद्रिय सूक्ष्मा-वाक्‌चे निरूपण आवश्यक आहे. हे सूक्ष्मवाक्‌च परावाक् आहे.'' (सूक्ष्म-वाक्‌चे तात्पर्य परा-वाक्‌शी आहे. ह्यासंबंधी दोन मत प्रचलित आहेत. शब्दब्रह्मवादीच्या मतानुसार सूक्ष्म-वाक् पुरुष-समवायिनी आहे, आणि पुरुषांची अमृतकला आहे. सिद्धान्त-शैव मतामध्ये सूक्ष्म-वाक्‌च्या बिंदूस कार्यरूप आणि शब्दवृत्ती म्हणतात. शैव-दृष्टीमध्ये सूक्ष्मवाक् पुरुष-समवेता शक्ती नाही. ती आत्म्यासोबत अविभक्तपणे राहाणारी आहे.) वेद याच अतिंद्रिय नित्या-वाक्‌चे अवतीर्णरूप आहे, स्वरूप नव्हे, कारण की मंत्रद्रष्ट्यास सोडून इतरांसमोर वेदाचे स्वरूप प्रगट होईल, असे संभव नाही. वस्तुतः वेद एक आणि स्वरूपतः अभिन्न आहे. ते वागात्मक नसून बोधात्मक आहे. परंतु अभिव्यक्तीमध्ये वागात्मक स्वरूपात शब्दरूपाने प्रकाशित होते. याला छेद देऊन उत्तीर्ण होणेच ब्रह्म-प्राप्ती आहे. आचार्य भर्तृहरी प्रचलित वेदांना अनुकारच म्हणतात.

वस्तुतः वेदाचे यथार्थ स्वरूप प्रणव आहे, ''स हि सर्वः शब्दार्थ प्रकृतिः ।'' आत्म्याचे स्वरूपगत आंतरज्ञानच सूक्ष्म वाक् आहे. ते प्रथम शब्दरूपामध्ये प्रकट होते, ततः मनोभाव धारण करून, कायगत तेज अथवा कायाग्नीद्वारे पक्व होऊन प्राणवायुमध्ये प्रविष्ट होते, नंतर क्रमशः स्थूल शब्द उच्चारित होतो.

**ख) स्वरूप**

वेदाप्रमाणे तंत्र-क्रम पण बोधात्मक आणि वागात्मकच आहे. शिवमध्ये समवेता शक्तीची दोन रूपे आहेत – ज्ञान आणि क्रिया. ज्ञान-रूपिणी शक्ती ही पर आणि अपर या भेदाच्या आधारे द्विविध आहे. पर-ज्ञान बोधात्मक आणि अपर-ज्ञान वागात्मक आहे. वागात्मक ज्ञान शास्त्ररूपामध्ये प्रतिष्ठित आहे. बोधात्मक परज्ञान वागात्मक अपरज्ञान शब्दावर आरूढ (स्वार) होऊन अर्थ प्रकाशनामध्ये प्रवृत्त होतात. सात्वत संहितेमध्ये परज्ञानास शिवची साक्षात्-शक्ती आणि अपर-ज्ञानास **तंत्र** म्हणतात. शिवसृष्टीच्या उन्मेषावेळी भगवंत परापर मुक्ति संपादनासाठी ज्ञानास प्रकाशित करतात. सर्वप्रथम परमकारण निष्कल शिवपासून अवबोधारूप ज्ञानाचे

नादात्मक प्रसार होते, तदनंतर नादात्मक ज्ञान सदाशिव रूपाने **तंत्र** किंवा शास्त्राचे रूप ग्रहण करते. यामुळेच पौष्कर आगमने तंत्रास नादरूप म्हटले आहे. नादरूपात प्रसृत या अवबोधात्मक विमल ज्ञानाच्या पाच धारा (प्रवाह) आहेत, – पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर आणि ऊर्ध्व. निष्कल परमशिवमध्ये वागादि इंद्रियांची संभावना नसल्यानंतरही नादसंभूत असते. अयस्कांताच्या लोहाकर्षण–सामर्थ्या–समान ह्यास समजले (ओळखले) पाहिजे. शास्त्र वा तंत्र शुद्ध आत्म–वर्गाचे भाव–समुद्रापासून उद्धार करते.

शास्त्र–ज्ञानाचा प्रकाशच अशा प्रकारचा असतो. तंत्राच्या अनुसार हे ज्ञान परापर–भेदानुसार द्विविध आहे. वस्तुत: हे अनंत आहे. ज्या ज्ञानाद्वारे पशु किंवा जीवाचे तत्त्व जाणले जाऊ शकेल अथवा पाश किंवा मायिक जगताचे अर्थबोध शक्य असेल, ते अमर ज्ञान आहे. भगवत् तत्त्वाचे प्रकाशक ज्ञानच पर–ज्ञान आहे. भगवत्तत्वाच्या शिवात्मक प्रकाशापासून रुद्रप्रकाश वेगळे आहे. परम–शिवापासून प्रवृत्त शिवचे प्रकाश ज्ञानच शिव–ज्ञान आहे. आणव आत्म्याच्या मायाख्य आणि कर्मबंधनांना कापून आत्म्यास आणव–मलापासून पण मुक्त करणे ही शिव–ज्ञानाची महत्ता आहे. याचे प्रकाशित होण्यामुळे शिवत्वाची अभिव्यक्ती होते.

अद्वैत मतानुसार ज्ञानाचे अवतरण–क्रम याप्रमाणे आहे. परा–वाक् हे सर्व–मूल आहे. हे बोधस्वरूप आहे आणि पूर्ण–स्थिती आहे. समस्त भाव या स्थितीमध्ये पूर्ण असतात. याचेच पर्याय परम–परामर्श आहे. अनंत शास्त्र परबोध स्वरूपात परावाक्मध्ये अवतरित होतात, किंवा बहिर्मुख स्वरूपात प्रकाशित होतात. सर्वात प्रथम परमबोधपासून अहं ज्ञानाचा उदय अंतर हृदयामध्ये होतो. या स्थितीमध्ये परम–बोध स्फुट नसते. परंतु या विमर्श स्वभावामध्ये वाच्य–वाचक स्वभावपण राहात नाही (नसतो). ही पश्यंती–भूमी आहे. अशा अवस्थेमध्ये आंतर परामर्श असाधारण रूपाने उदित होतो. म्हणून प्रत्यवमर्शक आत्मा वाच्यार्थाच्या परामर्शनामध्ये अर्थास अहंतेने आच्छादित करून उल्लसित होतो. या मध्यमा–भूमीमध्ये परमेश्वर आपले स्वरूप दोन भागांमध्ये विभक्त करून स्वत:च गुरु आणि शिष्य रुप ग्रहण करतो. या कल्पित गुरू–शिष्य भावाच्या मदतीनेच गुप्त–ज्ञान प्रगट करतो. गुरू–शिष्य भाव धारण करून परमात्माच ज्ञान आणि क्रिया यांचा उपदेश करतो. (गुरू कोण आणि शिष्य कोण? वस्तुत: अद्वैत मार्गामध्ये परमार्थसत्ता–रूप संविद्च सर्व काही आहे. संशय आणि निश्चय वस्तुत: एक आहे. सामान्य प्रतीति संशयात्मिका आहे, तर विशेष प्रचीति निश्चयात्मिका आहे. वेदांत देशिकाचार्य 'तत्त्वमुक्ताकलाप' मध्ये म्हणतात की ईश्वरच अभिनय करीत आचार्य आणि शिष्याची भूमिका ग्रहण करतो. गुरू किंवा सदाशिवमध्ये परमेश्वर आपल्या पाच शक्ती – चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया – यांना पाच मुख स्वरूपामध्ये प्रगट करतो. सदाशिवच्या या पाच मुखांच्या संघटनेपासून पंचस्त्रोतोमय अभेद, भेदाभेद आणि भेदाच्या दशा प्रगट होतात. तत्त्वत्रभेदांनी युक्त निखिल शास्त्र अवतरित होतात. परंतु अद्याप मध्यमामध्ये ते अस्फुटच असतात, वैखरी दशेमध्ये आल्यावरच परिस्फुटित होऊन शास्त्राचे किंवा तंत्राचे रूप आणि आकार धारण करतात.

'मालिनी विजय वार्त्तिक' यामध्ये म्हटले आहे की विश्व वाच्य–वाचक भेदानुसार द्विविध आहे. वाचक दिव्य आणि मानव या भेदानुसार द्विविध आहे. शैवागम दिव्य–शब्द परम–विमर्शाचे स्थूल रूप आहे. ज्याप्रमाणे स्थूल मानवीय–वाक् हे स्थूल–विमर्शाचे रूप आहे, त्याचप्रमाणे दिव्य–वाक् विशुद्ध–विमर्शाचे रूप आहे.

अद्वैत आगमाचे सिद्धान्त आहे की ज्या शास्त्रांचे जगतामध्ये प्रकाश (प्रगट, उदय) झाले आहे आणि जे अद्याप प्रगट झाले नाहीत, आणि जे प्रगट होऊन लुप्त झाले आहेत, ते सर्व परा-वाक् मध्ये पर-बोध स्वरूपात नित्य वर्तमान (विद्यमान) आहेत. तंत्राचे हे परम स्वरूप आहे. पश्यंती-प्रभृति भूमींमध्ये पर-बोधात्मक शास्त्र तत्तत् (त्या त्या) भूमींच्या अनुरोधाने अभिव्यक्त होते.

पर-बोध क्रमशः ज्या प्रणाली पासून निम्नतम भूमीपर्यंत अवतीर्ण होते, तेच वस्तुतः तंत्र मनामध्ये आविर्भावाचा प्रकार आहे. हा कालविशेष ऐतिहासिक क्रम नव्हे. प्रथम ते महाज्ञान अहं ज्ञान स्वरूपात अंतरंगामध्ये स्फुरित होते. हे असाधारण रूपामध्येच होते. यामध्ये वाच्य-वाचक अर्थात शब्द आणि अर्थ परस्पर पृथक् स्वरूपात भासत नाहीत, आणि ना ते या अवस्थेमध्ये वाच्यार्थाचे भान इदं रूपाने पण होते. प्रत्यवमर्शक प्रमातापासून वाच्यार्थ परामृष्ट असतो. हे पश्यंती-भूमीचे विवरण आहे. बहिर्मुख भावच्या वृद्धीमुळे काही विलक्षणता प्रतीत होऊ लागते. प्रथम स्थितीमध्ये वेद्य-वेदक रूप प्रपंचोदय अंतरंगामध्येच होतो, ततः त्या महाज्ञानामध्ये वाच्य-वाचक स्वभावाचा उल्लास होतो, परंतु आतच. ही भूमी मध्यमा पद चे वाच्य आहे. यामध्ये विश्वगुरू परमेश्वर द्वारे अनंत शास्त्रांचे स्पष्ट अवतरण होते. यामध्ये नाना भेद-प्रभेद विद्यमान असतात.

**ग) भेद**

उपरोक्त चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया या पाच स्रोतांच्या प्रत्येकी दोन अवस्था आहेत. - एक उद्‌भवोन्मुख, दुसरी उद्‌भूत. शिवच्या या पाच मुखांची शास्त्रीय नावे आहेत. ईशान, तत्पुरुष. सद्योजात, वामदेव आणि अघोर. इतःपर ही नावे ई, त, स, वा, अ या आद्याक्षर संकेतांनी प्रयुक्त होतील. आगमानुसार महेश्वर-स्वरूप एक आहे, परंतु शक्तींच्या संबंध-भेदामुळे त्यामध्ये अनेकता आणि भेद निर्माण होतात; आणि त्यांच्या भेद-प्रधान, भेदाभेद-प्रधान आणि अभेद-प्रधान अवस्था प्रगट होतात.

महेश्वराची भेद-प्रधान दहा अवस्था आहेत आणि भेद प्रतिपादक आगम पण मुळात दहा आहेत. यांची आविर्भाव प्रणाली अशा प्रकारे आहे - उदभवोन्मुख ई, त, स च्या तीन मुखांपासून एक - एक; आणि ई, त, सच्या त्रिमुख संयोगामुळे एक अशा प्रकारे एकूण दहा भेद-प्रधान आगम प्रगट होतात. यांचे आचार्य जयरथप्रणीत दश शिवज्ञानाची नामे या प्रकारची आहेत - १. कामिक, २. योगज, ३. चिंत्य, ४. मुकुट, ५. अंशुमत, ६. दीप्त, ७. अजित, ८. सूक्ष्म, ९. सहस्त्र आणि १०. सुप्रभेद. किरणागमानुसार ही नावे अशी आहेत - कामिक, योगज, चिंत्य, कारण, अजित, सुदीप्त, सहस्त्र, सुप्रभेद आणि अंशुमत. किरणगामाच्या दृष्टीने उपरोक्त शिवज्ञान दहा आत्मज शिवचे वेगवेगळे ज्ञान आहेत. कामिक प्रणव शिवचे, योगज सुधाख्य शिवचे, चिंत्य दीप्ताख्य शिवचे, कारण करणाख्य शिवचे, अजित सुशिवचे, सुदीप्त ईश्वरचे, सूक्ष्म शिवचे, सहस्त्र काल शिवचे, सुप्रभेद गणेश शिवचे आणि अंशुमत अंशु शिवचे ज्ञान आहे.

परमेश्वराची भेदाभेद-प्रधान दशा किंवा रौद्रावस्था अठरा (१८) आहेत. यांनी निर्मित रौद्रागमांचे विवरण असे आहे -

वा - अ दोन्ही एकक आहेत, इतर तीन एकक अर्थात ई, त, स भेद-प्रधान अवस्थेच्या अंतर्गत आलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| वा – ई<br>अ – ई<br>वा – अ | } | हे तीन द्विक आहेत. |

दहा झाले पाहिजेत. ई–त, ई–स, त–स, भेद–प्रधान तंत्रामध्ये येतात. त आणि स मध्ये संगती बसत (मेळ बसत) नाही. त–वा, स–वा, स–अ, त–अ हे सुटलेले आहेत; कारण त, स, वा, अ मध्ये दोन–दोन चार–चार चा मेळ बसत नाही.

| | | |
|---|---|---|
| ई – स – त | १ | |
| ई – वा – स | १ | |
| ई – अ – त | १ | |
| ई – स – वा | १ | → हे अष्ट त्रिक आहे. ई–त–स, भेद प्रधान असल्यामुळे सुटलेले आहे आणि ई – वा – अ येथे नियोज्य नाहीत. |
| ई – स – अ | १ | |
| ई – वा – अ | १ | |
| त – स – वा | १ | |
| त – स – अ | १ | |
| त – वा – अ | १ | |
| स – वा – अ | १ | |
| ई – त – स – वा | १ | |
| ई – त – स – अ | १ | → हे चार चतुष्क आहेत त–स–वा–अ चा मेळ होत नाही म्हणून हे द्विक चतुष्कामध्ये मिसळून ज्ञानोत्पादन करत नाही. |
| ई – त – वा – अ | १ | |
| ई – स – वा – अ | १ | |

ई–त–स–वा–अ, हे एक पंचक आहे. अशा प्रकारे दोन एकक, तीन द्विक, आठ त्रिक, चार चतुष्क आणि एक पंचक मिळून अष्टादश (अठरा १८) रौद्रगमांची उत्पत्ती आहे. यांची नावे अशी आहेत – विजय, नि:श्वास, मद्‌गीत, परमेश्वर, मुखबिंब, सिद्ध, सन्तान, नारसिंह, चंद्रांशु, वीरभद्र, आग्नेय, स्वयंभू, विसर, रौख, विमल, किरण, ललित, सौमेय. कोठे कोठे मद्‌गीत ऐवजी प्रोद्‌गीत सारख्या नावांचा प्रयोग दिसून येतो.

ऊर्ध्व स्त्रोतामध्ये शिव आणि रुद्र असे दोन प्रकारचे ज्ञान आहेत. परमेश्वराची अभेदप्रधान ६४ दशा आहेत, त्यांना **भैरवावस्था** असे म्हणतात. शिवच्या दक्षिण वक्त्र यास योगिनी वक्त्र असे म्हणतात. हे शिव–शक्तीचे अद्वय आणि संघट्ट रूप आहे. इतर वक्त्रांपासून प्रत्येकाचे उद्‌भवोन्मुख, उद्‌भूत, विरोधानोन्मुख आणि तिरोहित असे चार रूप आहेत, आणि या चार वक्त्रांमध्ये १६ भेद निहित आहेत.

एकाच वेळेस जेव्हा चारही वक्त्र अंतर्लीन होऊन परस्पर मिळतात, तेव्हा ६४ प्रकारच्या अद्वयप्रधान भैरवावस्था आविर्भूत होतात. ही दक्षिण हार्द–लिंग सर्वसंहारक असल्यामुळे काळे आधि तिमिररूपी आहे. ही भेदभावाच्या मायीव तेजांशाचे ग्रासक आणि अंतर्गत अनंत सृष्टीच्या तत्त्वांनी पूर्ण आहे. हे दक्षिण वक्त्र

नैसर्गिक हार्द आणि स्वतंत्र शिव-स्वरूप आहे. जेव्हा याच्यामध्ये एकाच वेळेस इतर चारही मुखांचे लय होते, तेव्हा भैरव आगमांचे आविर्भाव होते. सोळा प्रकार भेद त्या वेळेस अस्तंगत होऊन जातात, म्हणूनच ही अवस्था अद्वय आहे.

प्रस्थानशः भैरवागमांचे खालील भेद आहेत. - (१) भैरवाष्टक, (२) यामलाष्टक, (३) मताख्याष्टक, (४) मंगलाष्टक, (५) चक्राष्टक, (६) शिखाष्टक, (७) बहुरूपाष्टक आणि (८) वागीशाष्टक.

हे सदाशिव चक्र आहे. याचे ६४ भेद (प्रकार) आहेत.

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की ज्ञानाची सत्ता भेद, भेदाभेद आणि अभेद स्वरूपामध्ये त्रिविध आहे. म्हणूनच शास्त्रे पण त्रिविध आहेत.

उपरोक्त क्रमामध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की, तंत्र चे मूळ स्वरूप परावाक् रूप आहे. तीच भगवंताची परा-शक्ती आहे. अवतरण क्रमामध्ये निखिल वेद्यांचे स्फुरण होते. येथे भूत, भविष्य आणि वर्तमान असे कालगत भेद राहात नाहीत, आणि भेद स्वात्मापासून अभिन्न आणि त्या स्वरूपात भासमान होतात. वस्तुतः हीच आत्म बोधावस्था आहे. येथे ना वाचक शब्दाचे अस्तित्वच आहे, ना अर्थाचे वाच्यत्वच आहे. दूसऱ्या भूमीमध्ये अर्थ इदंरूपाने प्रतीयमान असतात. त्या स्तरावर अर्थ वाच्य आणि शब्द भिन्नावस्थेमध्ये वाचक बनतो. त्या स्तरावर सूक्ष्म रूपाने सर्व शास्त्रांचे वाचक याचा शब्दाच्या आश्रयाने आविर्भाव होतो. आत्मा स्वतःच वक्ता गुरू आणि श्रोता हा शिष्य आहे. हा मध्यमा-भूमिचा विषय आहे. येथे समस्त शास्त्र प्रकाशित आहेत. यांचा अल्पांश वैखरीमध्ये रूप ग्रहण करून स्थूलेंद्रियापासून गम्य होऊन आमच्या समक्ष प्रगट होतो, बाकीचे तेथेच राहतात. मध्यमा भूमिमध्ये अनेकविध आणि अपरिमेय ज्ञान-विज्ञान विद्यमान आहे. योगी आणि ज्ञानी प्रयोजनानुसार तेथून ज्ञानाचे अवतरण करून घेतात. छांद्योग्यपनिषद्च्या दहर-विद्या प्रकरणामध्ये या विषयाचा किंचित् आभास आहे. आचार्य भर्तृहरि म्हणतात; ''ऋषीणामपि यद् ज्ञानं तदप्यागमहेतुकम् ।'' साधारण दृष्टीने प्रातिभ-ज्ञानास अनौपदेशिक म्हटले जाते. हा अक्रम आणि सर्वविषयक आहे. पूर्वदर्शित क्रमामध्ये अवतरणाची प्रथम भूमीच प्रातिभ-ज्ञान आहे. हे वाच्य-वाचक विभागरहित पश्यंती-भूमि उपदेशक आणि उपदेश्य असे भेद-रहित आहे. अनौपदेशिक ज्ञानाच्या मुळामध्ये आगमाचे असणे सत्य आहे, कारण की परावाक् किंवा आगमच पश्यंती किंवा प्रतिभेचे निदान आहे. तंत्रच्या अवतरण क्रमावर योगी अमृतानंदाची दृष्टी महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात; -

*''विमश्यरूपिणी शक्तिरस्य विश्वगुरोः सदा ।*
*परिस्फुरति सैकापि नानाभावार्थरूपिणी ।।''*

महास्वच्छंद तंत्रमध्ये म्हटले आहे; -

*''गुरुशिष्यपदे स्थित्वा स्वयंदेवः सदाशिवः ।*
*प्रश्नोत्तरपदैर्वाक्यः तत्रं समवतारयत् ।।''*

(* ''महामहोपाध्याय डॉ. गोपीनाथ कविराज - 'तांत्रिक वाङ्मयमें शाक्तदृष्टि' - पृ. ४२-४९)

### घ) तंत्र तत्त्वज्ञान

दुर्गा देवीची पूजा शक्ती (विश्वात असणारे सामर्थ) या स्वरुपात केली जाते आणि अशी पूजा करणाऱ्यांना शाक्त म्हणतात आणि त्या उपासनेला शाक्त सांप्रदाय म्हणतात. शाक्त आणि तंत्रे यांनी पुराणांवर मोठा परिणाम केला होता. 'शाक्त' या शब्दाचा अर्थ शक्तीचा उपासक अथवा पूजक असा आहे. शाक्त पंथ भारतात बंगाल आणि आसाम या प्रांतात प्रचलित झाला होता. शक्तीची पूजा त्रिपुरा, लोहिता, षडशिका, कामेश्वरी यांच्यासारख्या निरनिराळ्या नावांनी आणि सामान्यतः देवी या नावाने करण्यात येते. देवी महात्म्य हा शाक्त सांप्रदायाच्या प्रमुख ग्रंथांपैकी एक आहे. शाक्त सांप्रदायाची विशिष्ट लक्षणे म्हणजे देव अथवा देवी ही एकच असून ती माता आहे आणि विनाशक आहे अशी भावना करणे आणि तिच्या पूजेचा विशिष्ट प्रकार असून त्याला केव्हा केव्हा किळसवाणे स्वरुप येते. कूर्म पुराणात म्हटले आहे की कापाल, भैरव, यामल यांच्यासारखी वेदस्मृतीशी विरुद्ध असणारी शास्त्रे देवीने जगाला मोह उत्पन्न करण्याकरीता प्रकट केली आहेत. ब्रह्मपुराणमध्ये म्हटले आहे की मद्यमांस प्रभुती पदार्थ अर्पण करुन देवीची पूजा केल्यास ती संतुष्ट होते आणि मनुष्यांच्या इच्छा पुऱ्या करते. भद्रकाली हे देवीचे नाव प्राचीन आहे.

तंत्र हे विशिष्ट प्रकारचे ग्रंथ आहेत. तंत्र शब्दाचे अर्थ अमरकोशात मुख्य गोष्ट, अथवा मुख्य भाग, सिद्धांत, हातमाग अथवा लवाजमा असे दिले आहेत. तथापि त्यात तंत्र म्हणजे काही विशिष्ट प्रकारचे ग्रंथ असा अर्थ दिलेला नाही. ऋग्वेदामध्ये तंत्र हा शब्द आला असून त्याचा अर्थ 'हातमाग' असा असावा असे दिसते. अथर्ववेदामध्ये 'तंत्र' शब्द आला असून त्याचा अर्थ ऋग्वेदामधील अर्थासारखा जवळजवळ आहे. पाणिनिमध्येही तंत्र शब्द हातमाग या अर्थानेच घेतला आहे. कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथातील १५ व्या अधिकरणाला 'तंत्रयुक्ती' असा मथळा दिला आहे आणि त्याचा अर्थ 'एखाद्या शास्त्राच्या स्पष्टीकरणासंबंधी मुख्य सिद्धांत अथवा तत्त्वे' असा आहे. भागवत यात 'तंत्र' हा शब्द 'सिद्धांत' अथवा 'शास्त्र' या अर्थाने योजिला आहे. वेदांतसूत्रावरील शांकरभाष्यात श्रीशंकराचार्यांनी अनेक ठिकाणी सांख्य सांप्रदायाला 'सांख्य तंत्र' असे म्हटले आहे आणि पूर्वमीमांसेला 'प्रथम तंत्र' असे म्हटले आहे.

रुद्रयामल या ग्रंथात असे म्हटले आहे की 'सर्व देव कामविद्या आणि महाविद्या अथर्ववेदात वास करतात.' अथर्ववेदात जादूचे मंत्र विपुल असून काही गूढ अर्थाचे शब्द अथवा अक्षरे ऋग्वेदामध्ये देखील योजलेली आहेत. उदाहरणार्थ, ऋग्वेद (७.९९.७, ७.११.७) प्रभुति ऋचात 'वषट' हा शब्द आला असून ऋग्वेद (७.५५.५/८) मध्ये निद्रा उत्पन्न करणारा मंत्र आला आहे. ऋग्वेद (११.१४५) हे संपूर्ण सूक्त संपत्तीविरुद्ध योजावयाचे आहे. ऋग्वेदामध्ये जादुगारांचा अनेक वेळा उल्लेख केला असून अशा जादुगारांना अदेव, अनृतदेव, शिश्नदेव अशी विशेषणे लावली आहेत. असे अनेक जादूगार अनार्य असत. काही सूक्तात 'यातुधान' (कृष्ण जादूगार) आणि 'राक्षस' हे शब्द आले आहेत. 'यातु' हा शब्द म्हणजेच मराठी भाषेतील 'जादू' हा शब्द होय. ऋग्वेद (१०.८७.५ आणि १४) यांच्यासारख्या काही सूक्तात यातुधानांचा, राक्षसांचा, मूर देवांचा नाश करण्याबद्दल देवांची प्रार्थना केली आहे.

अथर्व वेद (३.२५, ६.१३०, २.३०, ५.३६) यांच्यासारखे अनेक जादूचे मंत्र आहेत.
आप. श्रौ. सू. मध्ये सोमवल्लीचा अभिचारांकरिता (दुष्ट हेतूने) उपयोग करावयाच्या कामात 'फट्' या ध्वनीचा

उपयोग केला आहे. तंत्र ग्रंथात देवीची पूजा करताना 'फट्' या ध्वनीचा पुष्कळ वेळा उपयोग केलेला असतो. असे असले तरी अथर्ववेदाचा आणि तंत्रांचा प्रत्यक्ष संबंध जोडणारा एखादा धागा अथवा सांधा सापडत नाही. श्री शंकराचार्य यांच्या नावावर प्रसिद्ध असलेल्या 'प्रपंचसार' या ग्रंथात (२३.५) स्तंभन, मारण, उच्चारण, यासारखी सहा क्रुर कृत्ये साधण्याकरीता उपयोग करावयाच्या 'त्रैलोक्यमोहन' नावाच्या जादूच्या मंत्राचे वर्णन केले आहे.

'मंत्र' हा शब्द 'मन्' (विचार करणे) हा धातू आणि 'तै' (रक्षण करणे) अथवा 'हा' या शब्द मिळून झाला असल्याची व्युत्पत्ती सांगण्यात येते. मंत्र साधकाचे सर्व भयापासून रक्षण करतो, साधकाला त्याच्या योगाने अमित तेजयुक्त आति एकतत्त्व असणाऱ्या देवाचे मनन करण्याकडे साधकाला प्रवृत्त करतो म्हणून त्याला मंत्र म्हणतात. 'असे कुलार्णव तंत्र (१७.५४) मध्ये सांगितले असून अशाच उपपत्त्या इतर तांत्रिक ग्रंथांत दिलेल्या आहेत. तांत्रिक ग्रंथात मंत्राचे पुरुष, स्त्री आणि नपुंसक असे वर्ग केलेले असतात. संपूर्ण फळप्राप्तीकरिता काही मंत्रांचा उच्चार सहस्रावधि अथवा लक्षावधि वेळा करावयाचा असतो.

पुराणांनी आणि काही स्मृतींनी सर्व हेतूंच्या सिद्धीकरीता अत्यंत उपयुक्त असे पाच, सहा, आठ अथवा त्याहून अधिक अक्षरे असलेले **मंत्र** सांगितले आहेत. **मंत्र** या शब्दाचा मूळचा अर्थ ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद यातील आणि वेदवेत्ते ज्यांचा मंत्र उपयोग करीतात असा भाग असा होता. वेदातील कल्पना अशी होती की मंत्रामध्ये फार सामर्थ्य असते आणि इच्छित हेतूच्या प्राप्तीकरीता तो चांगल्या रीतीने उच्चारला पाहिजे. दोषयुक्त मंत्र इच्छित अर्थ व्यक्त न करीता शब्दांच्या रुपाने वज्र बनून यजमानाचा नाश करतो. ऋग्वेदा (१.१०२.१/५) मध्ये असे म्हटले आहे की मंत्र आणि स्तोत्रे आपल्या प्रभावाने देवांची मने वळवून त्यांना यज्ञ प्रसंगी आणतात आणि ते मंत्र आणि स्तोत्रे म्हणणाऱ्यांना संरक्षण, शूरपुत्र, गोधन, संपत्ती, जय आणि सर्व प्रकारच्या वस्तू देववितात.

**मंत्र हा तंत्रशास्त्राचा अगदी गाभा आहे** आणि त्यात मंत्रांना इतके महत्त्व दिले आहे की त्या शास्त्राला पुष्कळ वेळा **मंत्रशास्त्र** असे म्हणतात. तांत्रिक ग्रंथांविषयी निरनिराळ्या उपपत्त्या दिल्या आहेत. शारदातिलक (१.५५-५७) मध्ये सांगितले आहे की सर्व मंत्र देवीची रुपे असतात. अक्षरे आणि वर्ण हे दोन्ही बोलण्यात व्यक्त होणारी आणि लिहिण्यात येणारी कुंडलिनीच असतात. मुळाक्षरांतील वर्ण हे सजीव चेतनायुक्त शक्ती असतात. सर्व मंत्र मुळाक्षरातील वर्णांपासून बनविलेले असतात. महानिर्वाणतंत्र (५.१८/१९) मध्ये म्हटले आहे की ऱ्हीं श्रीं, क्रीं, यांच्यासारखे **बीजमंत्र** देवतेचे स्वरुप व्यक्त करतात. अशा बीजमंत्रांना भाषा म्हणणे शक्य नाही कारण त्यांच्या योगाने सामान्य मुनष्यांना काही अर्थबोध होत नाही. ते मंत्र दिक्षा देतेवेळी अधिकृत गुरुंनी साधकाला दिलेल्या देवता असतात. देवता, मंत्र आणि गुरु या साधनेमधील महत्त्वाच्या गोष्टी असतात. केवळ ग्रंथात वाचून जर ते बीजमंत्र पाठ केले तर त्यांच्यापासून फलप्राप्ती होत नाही.

तांत्रिक ग्रंथात त्या सांप्रदायाचे स्वतःचे मंत्र असतात आणि त्यांत वैदिक मंत्रांचाही उपयोग केलेला असतो. 'जातवेदसे सुनवाम' (ऋग्वेद १.९९.१) हा मंत्र मूळचा अग्नीला उद्देशून असून मागाहूनच्या काळातील ग्रंथांत तो दुर्गेच्या प्रार्थनेकरीता योजिला आहे. 'त्र्यंबकं यजामहे' (ऋग्वेद - ७.५९.१२) हा मंत्र रुद्राला उद्देशून म्हटलेला आहे; परंतु तांत्रिक ग्रंथांनी त्या मंत्राला 'मृत्युंजय' अथवा 'मृतसंजीवनी' मंत्र असे

म्हटले असून त्याचा उपयोग चित्तशुद्धीकरीता करावयास महानिर्वाण (८.२४३) मध्ये सांगितले आहे. त्याचप्रमाणे गायत्री मंत्राचा (ऋग्वेद ३.६२.१०) तांत्रिकांनी उपयोग केला आहे. गुरुचे महत्त्व वर्णन करताना रुद्रयमलतंत्रात (२.६५) असे म्हटले आहे की ''जर शिव रागावला तर गुरु (शिष्याचे) संरक्षण करु शकतो; परंतु जर गुरु रागावला तर शिष्याचे संरक्षण कोणीही करु शकत नाही.''

वैदिक मंत्रांत आणि तांत्रिक मंत्रांत असा भेद असतो की वैदिक मंत्र अर्थपूर्ण असतो; परंतु तंत्रांनी या बाबतीत इतकी मजला मारली आहे की ज्या मंत्राला अर्थ नाही अथवा ज्याच्यामध्ये मंत्रांची अक्षरे उलट क्रमाने दिली आहेत अशा मंत्रांचा देखील जप करावयास तंत्रग्रंथांनी सांगितलेले असते. उदाहरणार्थ कालीविलासतंत्र (२२.२१) मध्ये म्हटले आहे की 'ओं दुर्गे' या मंत्राच्या तीन अक्षरांचा उलट क्रमाने 'र्गे दु ओं' असा जप केल्यास सर्व कामनांची प्राप्ती होते. असे जादू मंत्र प्राचीन काळच्या अनेक देशांत प्रचलित होते.

वैदिक त्याचप्रमाणे तांत्रिक मंत्रांच्या जपाला 'पुरश्चरण' अशी संज्ञा आहे. पुरश्चरणाचे संक्षिप्त आणि सविस्तर असे अनेक प्रकार तांत्रिक ग्रंथांत सांगितले आहेत आणि त्यात देवीची पूजा, जप, हवन, ब्रह्मनिष्ठ व्यक्तींना भोजन इत्यादिकांचा समावेश होतो.

मंत्रांपासून प्राप्त करुन घ्यावयाच्या साध्यांमध्ये मोक्षखालोखाल अद्भुत अथवा अतिमानुष शक्तीची प्राप्ती हे साध्य असते. अशा शक्तींना **अष्टमहासिद्धी** संज्ञा असून जर व्यक्तीला अणिमा, लघिमा आदि **आठ सिद्धी** प्राप्त झालेल्या असतात. तो जीवन्मुक्त असून त्याला **योगी** अथवा **सिद्ध** अशी संज्ञा असते. (प्रपंचसार - १९.६२/६३)

तांत्रिक मंत्र एखाद्या गुरुपासून **दीक्षा** घेऊन नंतर मिळवावा लागतो. प्रपंचसार, कुलार्णव, शारदातिलक इत्यादी अनेक तंत्रग्रंथात आणि लिंगपुराण यात दीक्षेचे विस्तृत वर्णन केले आहे. बहुतेक सर्व ग्रंथांनी **'दीक्षा'** शब्द 'दा', 'देणे' आणि 'क्षी' (नाश करणे) या धातूपासून निरनिराळ्या प्रकारांनी बनला असल्याचे सांगितले आहे. शारदातिलकात (४.२) म्हटले आहे की ''दीक्षा दिव्य ज्ञान देते आणि पातकांचा नाश करते म्हणून तंत्र जाणणारे आचार्य तिला दीक्षा नाव देतात.'' क्रियावती, वर्णमयी, कलावती आणि वेधमयी असे दीक्षेचे चार प्रकार होते.

*(भारतरत्न महामहोपाध्याय डॉ.काणे - ''धर्मशास्त्राचा इतिहास'' (सारांश रुप ग्रंथ) उत्तरार्ध अनुवादक : यशवंत आबाजी भट - पृ. ४१०-४३८ मधील वेचक अंश.)

**२) तंत्र आणि विद्यातंत्र : आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून**

**क) तंत्र आणि विद्यातंत्र : व्याख्या**

मानसिक विस्ताराच्या वैज्ञानिक प्रक्रियेस **'तंत्र'** असे म्हणतात. तंत्रचा शब्दशः अर्थ विस्ताराच्या माध्यमाने मोक्ष साध्य करणे हे होय. तंत्र-मार्गाने वृत्ती, रिपु, पाश यांसारखी बंधनांचे कटकन तुकडे केले जाऊ शकतात.

एखाद्या व्यक्तीचे इतर व्यक्तीच्या मनांत आपल्या विस्तारित मनाच्या परिघामध्ये आकर्षित करून सामावून घेण्याच्या प्रयत्नाला **'विद्यातंत्र'** असे म्हणतात. ही एक प्रकारची संमोहन विद्याच आहे.

**ख) तंत्र आणि विद्यातंत्र : मनाचा वैज्ञानिक विस्तार**

तन्मात्रांच्या माध्यमाने अर्थात शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध यांच्या अनुमानाने मानवप्राणी स्वत:स अनेक प्रकारे अभिव्यक्त करतो. बाह्य जगापासून प्राप्त अनेक अनुमानांपासून आपण आनंद प्राप्त करतो. भजी किती खमंग आहेत ! अन्न किती स्वादिष्ट आहे ! असे आपण आनंदाने उदगारतो, परंतु या तन्मात्रांना आत्मसात करण्याची आपली क्षमता मर्यादित आहे (असते). उदाहरणार्थ, एक अत्यंत जोरदार स्फोटाचा आवाज किंवा अति मुलायम (सूक्ष्म) ध्वनी कानांनी ऐकता येऊ शकत नाही. केवळ मध्यम पल्ल्याची तन्मात्रिक आंदोलने आपण ऐकू शकतो. बुद्धाने याला ''मझिमा मार्ग'' अर्थात मध्यम मार्ग असे म्हटले आहे.

जरी मानवी मनाची तुलना तंतु वाद्ययंत्राच्या तारांशी केली जाऊ शकते, तथापि त्याची तुलना एक ढगाशी करणे अधिक युक्तिसंगत होईल. ढग आकाशात भरून जाते आणि आपल्या क्षेत्रामध्ये सर्व वस्तूंना सामावून घेते. मग  मन कसा (ढगासारखा) विस्तारतो? कल्पना करा की आकाशाच्या एका कोपऱ्यात ढगाचा एक ठिपका आहे. तो ठिपका हळू हळू आपला आकार विस्तारत सर्व आकाश व्यापून टाकतो. याला बहिर्द्रव्यीय विस्तार असे म्हणतात.

जेव्हा मन सर्व दिशांमध्ये विस्तारते, तेव्हा ते सर्व वस्तूंना आपल्या कक्षेत घेते. यासाठी मनाने स्वत: आणि इतर वस्तूंमध्ये परिपूर्ण अनुकूलन कायम राखणे आवश्यक असते. मन चंचल असते. ते एकाच ठिकाणी स्थिर कधीच  नसते. मन एखाद्या वस्तूवर एकवटते आणि नंतर आकर्षणाच्या परिमाणानुसार एक वस्तुपासून दुसऱ्या वस्तूवर उड्या मारू लागते.

मानवी मनासारखेच 'विश्व–मन' पण आहे. ते अति विशाल असते; तर मानवी मन त्याच्या तुलनेने अति लघु असते. मानवी लघु मन हे फक्त बहिर्द्रव्यीय क्षेत्रामध्ये विस्तार पावते. जसे एखादे ढग हे आकाश व्यापते, तसेच सदरहू प्रक्रियेमध्ये लघु (एकक) मनांना ते आपल्या नियंत्रण–क्षेत्राच्या कवेत घेते. जेव्हा त्याचा अफाट विस्तार होतो, तेव्हा ते विश्व–मनावरसुद्धा आपले काहीसे प्रभाव टाकू शकते. जेव्हा मानव हा ईश्वराकडे करूणा भागतो तेव्हा तो (ईश्वर) द्रवित होऊन मानवावर (भक्तावर) दयेचा वर्षाव करतो. ही त्याच प्रक्रियेची फलनिष्पत्ती आहे.

**मंत्र विद्या किंवा यातु विद्या अथवा इंद्रजाल विवेचन**

**१) अमलियात (जंत्र–मंत्र), तावीज़ (ताईत) व फ़ाल (शकुन) : इस्लामी धारणा**

**क) अमलियात (जंत्र–मंत्र)**

यामध्ये मुळीच शंका नाही की सर्वश्रेष्ठ अल्लाहची पवित्र नामे आणि पवित्र कुरआनचे शुभान्वित श्लोक, मंत्र–जप आणि कृपा–याचनांमध्ये इतक्या प्रमाणात फायदे (लाभ) आणि कल्याण व चित्र–विचित्र प्रभाव आहेत की ज्यांच्याकडे पाहून नि:संशय ईश्वरी शक्तीचे प्रदर्शन होते. (घडते). असाध्य रोगामुळे निराश झालेले रुग्ण त्यामुळे रोगमुक्त झाले आहेत. सर्वश्रेष्ठ अल्लाहची शुभनामे (अस्माए हुसना) आणि पवित्र कुरआनच्या पवित्र श्लोकांच्या योग्य उपायामुळे मोठमोठे भयानक रोग अशाप्रकारे समाप्त झाले की त्यांचे नाव–निशाण बाकी राहिले नाही. जादू आणि भूतपिशाच्च बाधा इतकी भयानक असते की तज्ज्ञ व कुशल हकीम, वैद्य आणि डॉक्टरांचे उपाय कुचकामी ठरतात. फरंतु कृपा–याचना, मंत्र–जप आणि कौराणिक श्लोकांमध्ये ईश्वरी

क्रोधाच्या, तलवारीच्या तेज धारेमुळे जादू, टोणे, भूतबाधा हे सर्व घायाळ होऊन नष्ट होतात. जादूचा प्रभाव संपतो, भूत पळून जातो तर कधी कैद होऊन भस्मसात होऊन जातो.

**आमाल (जंत्र-मंत्र) आणि कृपा-याचनां (दुआ)च्या अटी**

योग्य प्रमाण आणि योग्य तऱ्हेने घेतल्यावरच ज्याप्रमाणे औषधांचा प्रभाव दिसून येतो, त्याचप्रमाणे जंत्र-मंत्र आणि ताईतांचे पण काही अटी व पद्धती आहेत. त्याशिवाय त्यांचा प्रभाव दिसून येत नाही. या अटींपैकी सात अटी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अति आवश्यक अशा आहेत. याशिवाय कौराणिक जंत्र-मंत्रांपासून प्रभावाची उमेद बाळगणे ही एक प्रकारची नादानी आहे. आणि या सात अटी पुढीलप्रमाणे आहेत –

**१) वैध-शुद्ध आहार :** म्हणजे वैध अन्न सेवन करणे आणि अवैध अन्नापासून अलिप्त राहणे.

**२) सत्य व्रत :** म्हणजे नेहमी सत्य बोलणे आणि असत्य व खोटेपणापासून सावध राहाणे व वाचणे.

**३) निष्कपटता :** म्हणजे योग्य संकल्प करणे, आणि संकल्प शुद्ध ठेवणे, कारण प्रत्येक सत्कर्म हे ईश्वरासाठीच करीत राहणे.

**४) संयम व इंद्रिय निग्रह :** म्हणजे धर्माचरणाचे नित्य पालन करीत राहणे.

**५) ईश्वरी निशाण्यांचा आदर राखणे :** म्हणजे अल्लाहच्या निशाणी जसे कुरआन, काबा, नमाज़, (उपासना), नबी (संदेष्टा) इत्यादींचा अदब राखणे.

**६) चित्ताची एकाग्रता :** म्हणजे मंत्र-जप किंवा पवित्र कुराणांचे श्लोक-पाठ मनःपूर्वक करावे.

**७) दृढ श्रद्धा :** म्हणजे जे जंत्र-मंत्र आणि मंत्र-जप यांचे वाचन केले जात असेल, तर त्याच्या परिणामांविषयी दृढ विश्वास बाळगावा. जर असंमजसपणा किंवा डळमळीत विश्वास असेल तर मंत्र-जप आणि जंत्र-मंत्रामध्ये प्रभाव राहणार नाही.

**मंत्र जपांची अनिवार्य पद्धत**

उपरोक्त सात अटींशिवाय जंत्र-मंत्र आणि मंत्र-जपांचे काही आवश्यक शिष्टाचार पण आहेत. प्रत्येक जंत्र-मंत्र करण्यास हे जरूरीचे आहे की त्याने हे पाळावेत. नाही तर कृपायाचना आणि श्लोक-जपांचा प्रभाव कमी होणे हे निश्चित आहे. काही प्रमुख शिष्टाचारांचा येथे उल्लेख करण्यात येत आहे –

**१) परमेश्वराच्या दरबारामध्ये विनम्र निवेदन :** म्हणजे प्रत्येक जंत्र-मंत्र म्हणताना आणि ताईत लिहिताना परमेश्वराच्या दरबारामध्ये अत्यंत विनयशील आणि विनम्र राहिले पाहिजे.

**२) दानधर्म :** म्हणजे प्रत्येक जंत्र-मंत्र आणि मंत्रजप सुरू करण्या अगोदर काही दानधर्म करावे.

**३) पवित्र अंतरासत्ती (दरूद शरीफ़) :** म्हणजे प्रत्येक जंत्र-मंत्र, कृपा-याचना आणि मंत्र जप यांच्या अगोदर आणि शेवटी दरूद शरीफ़ म्हणावे.

**४) पुन्हा पुन्हा कृपा-याचना करावी :** म्हणजे मंत्रजपानंतर जेव्हा आपल्या मनोकामनेसाठी कृपायाचना कराल, तर ती एकदाच करून थांबू नका, तर वारंवार अत्यंत दीनपणे कृपायाचना करीत राहणे.

**५) एकांतता :** म्हणजे यथाशक्य कृपायाचना आणि मंत्र जप इत्यादी एकांतात म्हणावे. जेथे कोणाचेही येणे-जाणे नसेल आणि कुणाचा आवाज पण नसेल.

**६) कुणाचेही नुकसान करू नये :** म्हणजे कोणालाही हानी पोहोचविण्याच्या हेतूने मुळीच जंत्र-मंत्र करू नये, तसेच मंत्र जप करू नये.

**७) मिताहार :** म्हणजे जंत्र-मंत्र किवा मंत्रजप करताना आहार थोडा असावा आणि तो साधा असावा. पोट भरून जेवू नये, कारण पोट भरलेल्या लोकांच्या कृपायाचनेमध्ये प्रभाव असत नाही.

**८) स्वच्छता व टाप टीप :** म्हणजे जंत्र-मंत्र आणि मंत्र-जप वाचताना आपले शरीर आणि कपडे स्वच्छ असण्याविषयी दक्षता घ्यावी. सुगंध वापरावे. बाह्य स्वच्छतेसोबत आपली नीतिमत्ता, चारित्र्य आणि आंतरिक शुचिता पण ठेवावी.

**९) स्वच्छ शाई :** किंवा केशरने लिहावी. शाई प्रवाहित पाण्यापासून किंवा ज़मज़मच्या पवित्र उदकापासून बनविलेली असावी.

**१०) शुभ मुहूर्त आणि शुभ संकल्प :** प्रत्येक जंत्र-मंत्र शुभ मुहूर्तावर करावे आणि शुभ मुहूर्तावर पश्चिम मुखी होऊन ताईत लिहावी. लिंहिताना कोणतीच लालसा मनामध्ये बाळगू नये. परंतु निष्कपटतेसह ताईत लिहून गरजवंतास द्यावी. जर लोक स्वखुशीने ताईतींचा नजराणा देत असतील तर त्याला नाकारू नका. त्याचा जरूर स्वीकार करा.

**ख) अमलियात, तावीज़ व फ़ाल यासंदर्भात कुरआनच्या प्रकरणांची विशेषता :**

जर कोणी अशी धारणा ठेवीत असेल कुरआन हे अमालियात (जंत्र-मंत्र) आणि तावीज़ी (ताईत) साठी अवतरित झाले आहे; तर हे अज्ञानाचे द्योतक आहे, आणि असे मानणे हे एक फार मोठे अपराध आहे, कारण की कुरआन वास्तविक जे अधिकार ईश्वराचे मानवावर आहेत आणि लोकांसाठी आपापसामध्ये जे अधिकार आणि जी कर्तव्ये आहेत ते परिपालन केल्याने किंवा न केल्याने इहलोकास आणि मृत्युनंतर परलोकामध्ये जे परिणाम भोगावे लागतात व भोगावे लागणार आहेत, त्या सर्वांचे निवेदन करण्यासाठी ईश्वराकडून अवतरित झाले आहे; परंतु त्या बरोबरच अनेक श्लोक आणि अध्यायांचे पठण जंत्र-मंत्र स्वरूपात महाप्रेषित[स.] त्यांचे सहचर आणि संत-महात्मे संकट निराकरणासाठी करीत असत. याच्या बरकतीमुळे ते संकट टाळले जाई. जो इसम ज्या हेतुने एखादे जंत्र-मंत्र म्हणत असेल आणि जगरहाटीस योग्य असे बाह्य प्रयत्न करीत नसेल तर तो निश्चितपणे असफल होतो. याचे दृष्टांत एक अशा रुग्णासारखे आहे जो औषध तर घेत असतो, परंतु पथ्य पाळत नाही. अपितु जंत्र-मंत्र म्हणण्याचा असा अभिप्राय असतो की जंत्र-मंत्रामुळे बाह्य प्रयत्न विफल होऊ नये. सर्व धर्मात्म्यांचा असा अनुभव आहे की श्लोकापर्यंत असलेल्या विषयास ज्या कार्यासाठी अनुरूपता असेल तर ते श्लोक त्या कामासाठी जंत्र-मंत्र म्हणून वाचले जाऊ शकते. उदाहरणार्थ, कुरआनमध्ये प्रेषित मूसा यांच्या विषयी असा उल्लेख आहे की त्यांनी अशी कृपायाचना केली -"(फ़िरऔनला ईश्वराज्ञानुसार उपदेश करण्यासाठी जाताना) मूसाने विनविले, माझे कार्य माझ्यासाठी सुलभ कर, आणि माझी जिव्हाग्रंथी उलगडून दे, जेणेकरून लोकांना माझे बोलणे कळेल." - २०:२५-२८. या श्लोकास प्रत्येक इसम कठीण, अवघड काम सुलभ होण्यासाठी वाचू शकतो आणि या हेतूने तो वाचू शकतो की त्याची वाणी प्रभावकारी होऊन जावी की जेणे करून इतर लोक त्याचे निर्णय मान्य करतील आणि आपल्या बुद्धिमत्तेमध्ये वाढ करण्यासाठी हे वाचण्यास मुळीच हरकत नाही. आणि तसेच अध्याय - ७१: 'नूह' मध्ये प्रेषित नूह यांनी श्रद्धाहीनांच्या विनाशासाठी कृपा-याचना केली - "आणि नूहने म्हटले (की), (हे) माझ्या विधात्या, धरतीवर श्रद्धाहीनांपैकी एकालाही राहू देऊ नकोस." - ७१:२६. शत्रूच्या विनाशासाठी हे श्लोक वाचले जाऊ शकते. कुरआनच्या जंत्र-मंत्रासाठी

विशेष वा विशिष्ट वेळ आणि वाचन संख्येचे निर्बंध नाही. परंतु प्रत्येक इसमाने स्वत: रात्र किंवा पहाटेच्या नमाज़ (उपासना) नंतर एखादे वेळ निर्धारित करून आणि वाचन संख्या पण निश्चित करून जंत्र-मंत्र करावे. जंत्र-मंत्र सुरू करण्याअगोदर व ते संपल्यानंतर 'दरूद' अर्थात अंतरासत्ती वा स्वस्तिश्री अवश्य म्हणावे. प्रत्येक वस्तूस विशुद्ध ठेवावे परंतु ही गोष्ट अनुभवाअंती सिद्ध झाली आहे की, जर एखादा इसम कुरआनचे श्लोक एखाद्या अयोग्य कामासाठी प्रयोगात आणत असेल तर ते सफल होणार नाही, काही वेळेस तो मांत्रिक वेडा होण्याची पण शक्यता नाकारता येत नाही.

**ग) कुरआनी अध्यायांचे जंत्र-मंत्र सामर्थ्य आणि ताईत :**

जवळ-जवळ सर्व कुरआनी अध्याय हे कोणत्या ना कोणत्या तरी आध्यात्मिक संकट वा भौतिक पीडा किंवा असाध्य अशा शारीरिक व्याधी अथवा गंडे, दोरे, ताईत, काळी बाहुली, पेटी, अंगारे, धुपारे, तांत्रिक - मांत्रिक, आसरा, भुताटकी, वारू, अंगात येणे, चालक बाऊ, भानामती, मूठ मारणे, सकून बघणे, गळ टोचून घेणे, चेटूक (चेटकीण), जादूटोणा, नवस फेडणे इत्यादींसाठी हमखास उपाय म्हणून उपयोगी सिद्ध होतात. अर्थात यासाठी योग्य त्या सर्व अटींची परिपूर्तता करणे परम आवश्यक असते, हे सांगण्याची गरज नाही. पैकी काही अध्याय जसे, अल्-फ़ातिहा (मंगलाचरण), यासीन, अर् रहमान, अल्-फ़लक, अन् नास आणि काही महाश्लोक जसे, आयतल् कुर्सी, 'बिस्मिल्लाह' (अल्लाहच्या नावाने) ''बिस्मिल्लाह लाहौल व ला कुव्वत इल्ला बिल्लाहियल अलियुलअज़ीमि' हे सर्व आत्मिक चिंता आणि भौतिक - ऐहिक पीडा यासाठी रामबाण उपायासारखे आहेत.

पुढे काही कुरआनी अध्यायांचे जंत्र-मंत्र सामर्थ्य आणि ताईत देण्यात येत आहेत -

**१) सूरतुल् - फ़ातिहा (अध्याय -१ ला)**

लोकांच्या मनांमध्ये धाक निर्माण करण्यासाठी, आपली गरज पूर्ण करण्यासाठी, डोकेदुखी थांबविण्यासाठी, अंगामधील ताप नाहीसे करण्यासाठी, विंचवाचे दंश उतरविण्यासाठी, कृपा-याचना मान्य होण्यासाठी, मृत्युव्यतिरिक्त प्रत्येक गोष्टींचे औषध, आप्तेष्टांवरील प्रत्येक प्रकारचे संकट निवारण करण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी, प्रत्येक रोग निवारण आणि प्रत्येक काम यशस्वी होण्यासाठी हा अध्याय अत्यंत उपयुक्त आहे. याची गणना संख्या ९४६१ आहे. याचे महाताईत असे आहे -

**९४६१** **ताईत** **९४६१**

**७८६**

| | | | |
|---|---|---|---|
| २३६५ | २३६८ | २३७१ | २३५७ |
| २३७० | २३५८ | २३६४ | २३६९ |
| २३५९ | २३७३ | २३६६ | २३६३ |
| २३६७ | २३६२ | २३६० | २३७२ |
| **९४६१** | **९४६१** | **९४६१** | **९४६१** |

**९४६१** **९४६१**

### २) सूरतु – यासिन (अध्याय – ३६ वा)

प्रेषित मुहम्मद[स.] यांनी या अध्यायास कुराणाचे हृदय वा अंत:करण असे नाव दिले आहे. याच्या पारायणाने प्राणोत्क्रमणाच्या वेळेची यातना शमते, म्हणून त्यावेळी हा वाचून ऐकविण्याचा सुयोग असतो. मृत्युसमयी प्राणहरणाच्या सुलभतेकरिता, अपराधांच्या क्षमेसाठी, वादविवादामध्ये वरचढ ठरण्यासाठी, वाईट नज़र दूर होण्यासाठी, गर्भपाताच्या सुलभतेसाठी, शिव्याशाप रोखून धरण्यासाठी, दाढदुखी कमी होण्यासाठी या अध्यायाचे पठण परीक्षित आहे. त्या पवित्र अध्यायाची गणना संख्या ३,३१,४११ एवढी आहे. या अध्यायाचे महाताईत पुढीलप्रमाणे आहे.

**३,३१,४११** **ताईत** **३,३१,४११**

**७८६**

| | | | |
|---|---|---|---|
| ८६८५२ | ८६८५५ | ८६८५९ | ८६८४५ |
| ८६८५८ | ८६८४६ | ८६८५१ | ८६८५६ |
| ८६८४७ | ८६८६१ | ८६८५३ | ८६८५० |
| ८६८५४ | ८६८४९ | ८६८४८ | ८६८६० |
| **३,३१,४११** | **३,३१,४११** | **३,३१,४११** | **३,३१,४११** |

**३,३१,४११** **३,३१,४११**

### ३) सूरतुर – रहमान (अध्याय – ५५ वा)

हा अध्याय म्हणजे साक्षात् 'कुरआन शरीफ़' (पवित्र)चे मुखच होय. नज़र लागणे, सूज कमी होणे, ताप कमी होणे या साठी हा अध्याय परीक्षित आहे. याचे अकरा वेळेस वाचन केल्याने सर्व हेतू साध्य होतात. या अध्यायास लिहून आणि ते धुवून पाजल्यास प्लीहेच्या रुग्णास अत्यंत लाभदायक आहे. या अध्यायाची गणना–संख्या १,२१,२१४ इतकी आहे. याचे महाताईत पुढीलप्रमाणे आहे.

**१,२१,२१४** **ताईत** **१,२१,२१४**

**७८६**

| | | | |
|---|---|---|---|
| ३०३०३ | ३०३०६ | ३०३०९ | ३०२९६ |
| ३०३०८ | ३०२९७ | ३०३०६ | ३०३०७ |
| ३०२९८ | ३०३११ | ३०३०४ | ३०३०१ |
| ३०३०५ | ३०३०० | ३०२९९ | ३०३१० |
| **१,२१,२१४** | **१,२१,२१४** | **१,२१,२१४** | **१,२१,२१४** |

**१,२१,२१४** **१,२१,२१४**

### ४) सूरतुल् – फ़लक़ (अध्याय –११३ वा)

मंत्र, जादू टोण्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी, जिन अर्थात यक्ष-किन्नर आणि मनुष्यांची नज़र लागल्यास ते कमी करण्यासाठी हा अध्याय उपयोगी आहे. जिन (यक्ष), शैतान आणि मत्सरी लोकांच्या मत्सरापासून, या सर्वांच्या उपद्रवापासून सुरक्षित राहण्यासाठी या अध्यायाचा असामान्य असा प्रभाव पडतो. जादू-टोणा करणाऱ्यांवर गंडे-दोरे बांधून, गाठी बांधून त्यावर फुंकतात. या अध्यायाची गणन-संख्या ८६७७ एवढी आहे. याचे महाताईत पुढीलप्रमाणे आहे.

**८६७७** **ताईत** **८६७७**

**७८६**

| | | | |
|---|---|---|---|
| २१६९ | २१७२ | २१७५ | २१६१ |
| २१७४ | २१६२ | २१६८ | २१७३ |
| २१६३ | २१७७ | २१७० | २१६७ |
| २१७१ | २१६६ | २१६४ | २१७६ |
| **८६७७** | **८६७७** | **८६७७** | **८६७७** |

**८६७७** **८६७७**

### ५) सूरतु-न्नास (अध्याय – ११४ वा)

सर्व दुःख हरण होण्यासाठी हा अध्याय अत्यंत उपयोगी आहे. दुष्ट विचारांच्या उपायांपासून वाचविण्यासाठीपण हा अध्याय उपयोगी आहे. या अध्यायाची गणना-संख्या ५२९६ इतकी आहे. याचे महाताईत असे आहे –

**५२९६** **ताईत** **५२९६**

**७८६**

| | | | |
|---|---|---|---|
| १३२३ | १३२७ | १३३० | १३१६ |
| १३२९ | १३१७ | १३२२ | १३२८ |
| १३१८ | १३३२ | १३२५ | १३२१ |
| १३२६ | १३२० | १३१९ | १३३१ |
| **५२९६** | **५२९६** | **५२९६** | **५२९६** |

**५२९६** **५२९६**

**घ) काही कुरआनी श्लोकांचे जंत्र-मंत्र सामर्थ्य**

जंत्र-मंत्र तीन प्रकारचे आहेत. (१) सिफ़ली अर्थात नीच. हे राक्षसी किंवा शैतानी असते. याचा संबंध चेटूक, जादूटोणा यांच्याशी असतो. (२) रहमानी किंवा उल्वी अर्थात उच्च. हिचा संबंध ईश्वराशी असतो. आणि (३) मुअक्किलाती अर्थात वेताळांशी निगडित. रहमानी अमलियात (जंत्र-मंत्र) चे दोन प्रकार आहेत. एक मुआक्किलाती की जे वेताळांमुळे साध्य केले जाते; तर दुसरे गैर मुअक्किलाती की ज्यामध्ये वेताळांचा संबंध येत नाही. जरी वेताळांशी निगडित जंत्र-मंत्र हे अत्यंत प्रभावशाली असतात; तरी पण यांमध्ये मोठ मोठे धोके आहेत. काही वेळेस प्राणास मुकण्याचे भय असते. म्हणून मुअक्किलाती अमलियातपासून नेहमी दूरच राहणे श्रेयस्कर असते. जे यांच्या चक्करमध्ये पडतात ते संकटाच्या भोवऱ्यात फसतात. काहीना कोढ फुटतो, काही वेडे होऊन जातात, तर काही आपले प्राण गमावतात. यासाठी परम सद्‌गुरूंची शिकवण व त्यांची परवानगीची जरूरी असते. धर्माचरण करणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषास ग़ैर मुअक्किलाती अमलियात अंमलात आणण्याची आणि ताईत बनविण्याची मुभा आहे.

**''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम'' चे मंत्र सामर्थ्य**

**१) मनोकामनापूर्तीसाठी –** 'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.' चे वाचन एक हजार वेळा करून दोन रकअत (नमन) ची नमाज़ (उपासना) पढून (संपन्न करून) दरूद शरीफ़ (पवित्र अंतरासत्ती) वाचून आपली मनोकामना पूर्तीसाठी कृपायाचना करावी. अशाच पद्धतीने 'बिस्मिल्लाह' हे एकूण बारा हज़ार वेळेस म्हणून प्रत्येक हजार वेळानंतर दोन रक़अतची नमाज पढावी व नमाज़ नंतर दरूद शरीफ़ वाचून आपल्या मनोकामनापूर्तीसाठी कृपायाचना करावी. ईश्वरकृपेने मनोकामना पूर्ण होऊन जाईल. (मख़्क़ा कलीमी व मुजर्रबाते दैरबी).

**२) ताप (ज्वर) आणि हिवताप (कंपज्वर) पासून बरे होणे –** ज्याला ज्वर चढत असेल आणि जो हिवतापाने ग्रस्त असेल, तर खालील ताईत लिहून रुग्णाच्या गळ्यामध्ये बांधावे. म्हणजे रुग्ण बरा होऊन जाईल. ती ताईत अशी आहे.

**७८६**

| | | | |
|---|---|---|---|
| बिस्मि | ल्लाह् | हिर्रमानि | र्रहीम |
| अल्लाह् | हिर्रमानि | र्रहीम | बिस्मि |
| हिर्रमानि | र्रहीम | बिस्मि | अल्लाह् |
| र्रहीम | बिस्मि | अल्लाह् | हिर्रमानि |

**३) भूतबाधा नाहीशी होण्यासाठी –** भूतबाधाग्रस्त इसमावर पुढील कुरआनी त्रोटक अक्षरांचे वाचन केल्यास ईश्वरकृपेने भूत निघून जाईल, आणि तो पुन्हा त्या इसमास घेरणार नाही. मांत्रिक हा ईशपरायण असावा. ईश्वरावर त्याची संपूर्ण निष्ठा असावी. त्याच्यामध्ये आत्मिक बळ असावे. त्याने मन:पूर्वक वाचन करावे. (फ़ुयूज़े क़ुरआनी).

''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम अलिफ़ लाम मीम स्वाद (अ ल म स). ता हा. ता सीन मीम (त स म). काफ़ हा या मीम स्वाद (क ह य म स). यासीन वलक़ुरआनिल् हकीमि. हा मीम स्वाद सीन क़ाफ़ (ह म स स क़). क़ाफ़ (क़). नून वलक़लमि व मा यस्तुरून.''

**४) संकटामध्ये असताना** – हज़रत मौला अली यांचे कथन आहे की जर कोणी संकटामध्ये सापडला असेल तर त्याने पुढील मंत्राचा जप करावे. ईश्वरकृपेने यांच्या बरकतीने संकट टळून जाईल.

''बिस्मिल्लाह ला हौल व ला कुव्वत इल्ला बिल्ला हिल अलीयुल अज़ीमि''

**भूतपिशाच बाधा नष्ट होण्यासाठी व जादूचा प्रभाव नाहीसा होण्यासाठी सहा कृपा–याचना**

या सहा कृपा याचनांना 'शश कुफ़्ल' अर्थात सहा टाळे किंवा सहा किल्ल्या पण म्हणतात. जो इसम रात्री नेहमी 'शश कुफ़्ल' वाचत राहील किंवा लिहून आपल्या सोबत ठेवत असेल तर तो प्रत्येक भिती (भय), संकट, जादू आणि प्रत्येक प्रकारच्या संकटापासून सुरक्षित राहील. तसेच 'शश कुफ़्ल' वाचून भूतपिशाच्चबाधित इसम किंवा जादू–टोण्याच्या प्रभावाखाली असलेल्या इसमाच्या कानामध्ये वाचून फुंकल्यास भूतपिशाच्च पळून जाईल व जादूचा प्रभाव नाहीसा होईल. (फुयूज़े कुरआनी).

**'शश कुफ़्ल' (सहा टाळे)**

**पहिले कुफ़्ल (टाळे) :** ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीमि. बिस्मिल्लाह अस्समी इलबसीरिल्लज़ी लैस कमिसिलि: शैयँ व हुव अला कुल्ल शयीं क़दीरन्''.

**दुसरे कुफ़्ल (टाळे) :** ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीमि. बिस्मिल्लाहल ख़ल्लाक़िल अलीमिल्लज़ी लैस कमिसिलि: शैयँ व हुवलफ़त्ताहुलअलीम.''.

**तिसरे कुफ़्ल (टाळे) :** ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीमि. बिस्मिल्लाहिस्समीइल अलीमिल बसीरिल्लज़ी लैस कमिसिलि: शैयँ व हुवलअलीमुलबसीर.''

**चौथे कुफ़्ल (टाळे) :** ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीमि. बिस्मिल्लाहिस्समीइल बसीरिल्लज़ी लैस कमिसिलि: शैयँ व हुवलग़नीयुल क़दीरु''

**पाचवे कुफ़्ल (टाळे) :** ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीमि. बिस्मिल्लाहिल्लज़ी लैस कमिसिलि: शैयँ व हुवलअज़ीज़ुलग़फ़ूरु''

**सहावे कुफ़्ल (टाळे) :** ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीमि. बिस्मिल्लाहिल्लज़ी लैस कमिसिलि: शैयँ व हुवलअज़ीज़ुलग़फ़ूरुलहकीमु. फ़ल्लाहुख़ैरन् हाफ़िजन् व हुव अर्रहमुर्राहिमीन.''

**''आयतलकुर्सी (महाश्लोकासन)चे वैशिष्ट्य''**

**''अल्लाहु ला इलाह इल्ला हुव अल्हय्युल्क़य्यूमु ला तअ्ख़ुज़ह् सिनतुंव्व ला नौमुन् लह् मा फ़िस्समावाति् व मा फ़िल्अर्ज़ि मन् ज़ल्लज़ी यश्फ़उ इन्दहु इल्ला बिइज़्निह यऽलमु मा बैन अैदीहिम व मा ख़ल्फ़हुम् व ला युहीतून बिशैइम्मिन् इल्मिह इल्ला बिमा शाअ वसिअ कुर्सिय्युहुस्समावाति वल्अर्ज़ व ला यऊ दुह् हिफ़्ज़ु हुमा व हुवल – अलिय्युल् – अज़ीमु.''** – २:२५५ (आयतल कुर्सी) अर्थात ''अल्लाह – त्याच्याशिवाय दुसरा कोणी ईश्वर नाही. तो चिरंजीव, (अवघ्या सृष्टीचा शाश्वत) सांभाळकर्ता आणि सर्वांना स्थैर्य देणारा आहे. त्याला तंद्रा (डुलकी) घेरीत नाही आणि निद्रा वेढीत नाही.

आकाश आणि भूमि यातील सर्व त्याचेच आहे. त्याच्या अनुज्ञेशिवाय त्याच्याकडे शिफारस करील असा कोण आहे ? जे काही लोकांच्या समक्ष आहे आणि जे काही त्यांच्यापासून अदृश्य आहे त्यालाही तो जाणतो, आणि तो इच्छिल त्या व्यतिरिक्त, त्याच्या ज्ञानातील अंशमात्र देखील त्या लोकांच्या आवाक्यातील नाही. त्याच्या (सत्तारूपी) सिंहासनाने आकाशे आणि भूमि यांना व्यापून टाकलेले आहे, आणि त्यांचा सांभाळ करण्याचा त्याला कंटाळा येत नाही, आणि तो (अति) परात्पर व महिमावंत आहे.'' – २:२५५ (ईश्वराचे महासन)

आयतल कुर्सीच्या श्रेष्ठतेविषयी असे म्हणता येईल की समाधी–यातना कमी करण्यासंबंधी हे महाश्लोक अत्यंत प्रभावी व उपयोगी आहे. प्रेषित मुहम्मदस. यांच्या एक हदीसनुसार जो ईश्वराचा श्रद्धाळु भक्त समाधिस्त लोकांच्या भल्यासाठी आयतल कुर्सी त्यांच्या समाधीसमोर वाचतो, तेव्हा समस्त विश्वांचा धनी परमेश्वर हा पश्चिमेपासून ते पूर्वेकडे असलेले सर्व श्रद्धाळूंच्या समाधी चाळीस प्रकारच्या प्रकाशाने उजळवील आणि त्यांच्या प्रकाशास वृद्धिंगत करील आणि त्यांच्यासाठी त्यांचे दर्जे अधिक वाढवील आणि सदरहू श्लोक वाचकांस साठ प्रेषितां (नबीं)चे पुण्य त्याच्या पदरी पडेल. प्रत्येक वर्णाक्षरापासून एक एक देवदूत वाचकासाठी प्रलय दिवसापर्यंत जप करीत राहील.

हे पवित्र कुरआनमधील सर्वात मोठे व सर्वात प्रमुख असे महाश्लोक आहे. याचे अनेक लाभ आहेत. जो इसम प्रत्येक नमाज़ (उपासने) नंतर प्रस्तुत 'आयतल कुर्सी' चे वाचन करील त्याला पुढील बरकतीचा लाभ होईल –

(१) मृत्युनंतर त्याला स्वर्गलाभ होईल, (२) तो शैतान आणि जिन्न (यक्ष) यांच्या सर्व षड्यंत्रांपासून सुरक्षित राहील, (३) जर तो मोताद असेल तर काही दिवसांनंतर त्याची मोतादी आणि गरिबी दूर होऊन जाईल, (४) जो इसम सकाळी व रात्री झोपताना 'आयतल कुर्सी' आणि त्यानंतरचे दोन श्लोक (अर्थात श्लोक क्रमांक २५६ व २५७ '' ..... अस्हाबुन्नारि हुम् फ़ीहा ख़ालिदून'' पर्यंत वाचील तर तो चोरी, पाण्यात बुडणे व आगीत जळण्यापासून सुरक्षित राहील. (५) याचे लिखाण असलेले शिलालेख घरी उंच जागी लटकविल्यास, ईश्वरकृपेने त्या घरी निराहार – अनशन घडणार नाही, तर उपजीविकेमध्ये वाढ होऊन त्यामध्ये बरकत येईल आणि त्या घरामध्ये चोराचा प्रवेश होणार नाही. (फ़ुयूज़े कुरआनी).

**च) आणखी काही कुरआनी अध्यायांचे जंत्र–मंत्र सामर्थ्य**

**१) सूरतु–न्निसा (अध्याय ४ था) ची विशेषता :–** या अध्यायास सात वेळा वाचून पाण्यावर फुंकर मारून नवरा–बायकोस प्यायला दिल्यास दोघांमध्ये एकोपा आणि प्रेम निर्माण होईल; आणि जर या अध्यायास कस्तूरी आणि केशरने लिहून ते धुवून प्यायला दिल्यास हृतकंपाचा रुग्ण हा हृदयरोगापासून बरा होऊन जाईल.

**२) सूरतु–यूनुस (अध्याय १० वा) चे वैशिष्ट्य :–** हा अध्याय तेरा वेळा वाचल्यास शत्रूवर विजय मिळवाल.

**३) सूरतु–इब्राहीम (अध्याय १४ वा) ची विशेषता :–** जो इसम जादूच्या जोरामुळे नपुसंक बनला असेल, तर त्याने दररोज तीन वेळा हे अध्याय वाचावे. ईश्वरकृपेने जादू नष्ट होईल आणि त्याचे नपुसंकत्व दूर होऊन जाईल.

**४) सूरतुल्–कहफ़् (अध्याय १८ वा) ची विशेषता :–** या अध्यायाचे नेहमी वाचन करणारा महारोग आणि कोढपासून आणि विशेषत: मायावी षड्यंत्रापासून सुरक्षित राहील.

**५) सूरतुल्–मर्यम (अध्याय १९ वा) ची विशेषता :–** दारिद्र्याने पीडित व्यक्ती जर सात वेळेस हे अध्याय वाचेल तर तो श्रीमंत होईल. हे अध्याय लिहून प्याल्यास सर्व संकटांपासून सुरक्षित राहण्याचे ताईत आहे. शेतामध्ये आणि बागेमध्ये याचे पाणी घातल्यास शेतीचे उत्पन्न वाढेल.

**६) सूरतु–ताहा (अध्याय २० वा) चे वैशिष्ट्य :–** ज्या मुलीचे लग्न होत नसेल तर तिने हा अध्याय एकवीस वेळेस वाचावे म्हणजे ईश्वरकृपेने एखाद्या भल्या गृहस्थाशी तिचे लग्न होईल. याचे अनेक वेळा वाचन करणाऱ्यास भरपूर उपजीविका प्राप्त होईल आणि त्याच्यावर जादूचा कोणताच परिणाम होणार नाही.

**७) सूरतुल्–अन्कबूत (अध्याय २९ वा) ची विशेषता :–** दु:ख दूर करण्यासाठी या अध्यायाचे सात वेळा वाचन करावे.

**८) सूरतुर्रूम (अध्याय ३० वा) चे वैशिष्ट्य :–** शत्रूवर विजय प्राप्त करण्यासाठी हे अध्याय एकवीस वेळा वाचावे.


**९) सूरतु–स्सिज्दा (अध्याय ३२ वा) चे वैशिष्ट्य :–** विशेषत: कोढ फुटलेले आणि क्षय रोग्यावर या अध्यायास सात वेळा वाचून फुंकर मारावी. ईश्वरकृपेने रोगी बरा होऊन जाईल.

**१०) सूरतु–हा–मीम–स्सिज्द: (अध्याय ४१ वा) चे वैशिष्ट्य :–** ज्याच्या डोळ्यांमध्ये काही व्याधी असेल तर या पवित्र अध्यायास लिहून स्वच्छ पाण्यामध्ये धुवून डोळ्यांना लावावे किंवा त्याच पाण्यामध्ये सुर्मा घासून डोळ्यांमध्ये लावावे. ईश्वरकृपेने बरे होईल.

**छ) आणखी काही ताईती**

**१) प्रेम–भाव निर्माण होण्यासाठी ताईत :–**

***पद्धत व प्रणाली*** – हे ताईत वीस अंतर्गत वीसचे आहे. म्हणजेच वीसा (२०) चे ताईत आहे. प्रेमासाठी फायदेशीर आहे. अनुभवाची अट आहे. (अर्थात अनुभव हीच खात्री.) ताईत असे आहे –



## २) भूतबाधितासाठी ताईत

**पद्धत व प्रणाली –** हे ताईत लिहून फ़तीला अर्थात वात बनवून नाकामध्ये धूनी द्यावी म्हणजेच धूर सोडावे. परीक्षित आहे. ईश्वरकृपेने सर्व काही बरे होऊन जाईल. ताईत असे आहे –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इब्लीस | फ़िरऔन | हामान | फ़िरऔन | इब्लीस |
| फ़िरऔन | हामान | फ़िरऔन | इब्लीस | हामान |
| इब्लीस | फ़िरऔन | हामान | फ़िरऔन | इब्लीस |

## ३) डोकेदुखीसाठी ताईत

**पद्धत वा प्रणाली –** मोम चढविलेल्या कापडामध्ये गुंडाळून डोक्यावर बांधावे. फरीक्षित आहे. ते ताईत असे आहे. –


**७८६**

| | | |
|---|---|---|
| ३७ | या मुहम्मद[स.] | ७ |
| | या दाफ़ियुलबलय्यात | |

## ४) ज्या स्त्रीस मूल होत नसेल त्यासाठी ताईत

**पद्धत व प्रणाली –** ज्या स्त्रीस मूल होत नसेल तर गुरू किंवा शुक्र ग्रहाच्या वेळी या ताईतास लिहून मोम चढविलेल्या कापडामध्ये गुंडाळून संबंधित स्त्रीच्या गळ्यात बांधावे. ईश्वरकृपेने त्या स्त्रीस मूल होईल. परीक्षित आहे. ते प्रतिष्ठित ताईत हे आहे.

**७८६**




## ५) दुष्ट नज़र लागली असेल तर त्यासाठी ताईत

**पद्धत व प्रणाली –** ज्याला नज़र लागली असेल त्याने या ताईतास लिहून मोम चढविलेल्या कापडामध्ये गुंडाळून, पुरुष अथवा बालकाने आपल्या उजव्या दंडास (हातास) बांधावे तर स्त्री अथवा मुलीने आपल्या डाव्या दंडास (हातास) बाधावे. या ताईतास गळ्यामध्ये सुद्धा लटकविले जाऊ शकते. ते प्रतिष्ठित ताईत असे आहे –

७८६

| | | | |
|---|---|---|---|
| ७९०६ | ७९०९ | ७९१२ | ७८९९ |
| ७९११ | ७९०० | ७९०५ | ७९१० |
| ७९०१ | ७९१४ | ७९०७ | ७९०४ |
| ७९०८ | ७९०३ | ७९०७ | ७९१३ |

**ज) फ़ाल (शकुन) (फ़ालनामा कुरआनी) (कौराणिक शकुन)**

ज्या इसमास कुरआन शरीफ़ (मजीद) पासून शकुन (फ़ाल) काढायचे असेल तर त्याने सर्वप्रथम आचमन (वज़ू) किंवा मृत्तिका प्रक्षालन (तयम्मुम) केले पाहिजे. नंतर दरूद शरीफ़ (पवित्र अंतरासत्ती), सूरए फ़ातिहा (मंगलाचरण अध्याय), आयतल कुर्सी (ईश्वरी महासन) एक-एक वेळा आणि सूरए इख़लास (निरपेक्षता अध्याय), तीन वेळेस वाचावे. यानंतर पुन्हा ही कृपायाचना म्हणावी. ''अल्लाहुम्म इन्नी तवक्कलतु अलैक व तफ़ाऽलतु बिकिताबिक फ़रीनियु मा हुव उल मक्तूमिम् नु सिर्रिक अल् मकनूनि फ़ी ग़ैबिक अल्लाहुम्म अन्त अल् हक़्क़ु अंज़िल अलियुलहक़्क़ि बिहक़्क़ि मुहम्मदनूल हक़्क़ बिरहमतिक् या अर्रहमर्रहिमीन.'' मग अकरा वेळेस दरूद शरीफ़ वाचावे आणि सच्च्या दिलाने (अंतःकरणाने) आणि विशुद्ध निष्ठेसह जर दिवसाचे प्रथम प्रहर असेल तर कलाम मजीदचे प्रथम भाग आणि जर दिवसाचे मध्य प्रहर (मध्यान्ह) असेल तर कुरआन शरीफ़चे शेवटचे भाग उघडावे आणि सात पाने मोजावीत आणि नंतर सातव्या पानाच्या सातव्या ओळीस पहावे की ओळीचे सुरुवातीचे अक्षर कोणते आहे. या अक्षराने या फ़ालनामाच्या अक्षरांमधून, जे पुढे दिले गेले आहेत, आपले उत्तर शोधावे. जर कुरआन शरीफ़ मधून पहावयाचे नसेल तर खाली दिलेल्या चौकटी नकाशावर दरूद शरीफ़ वाचून आणि डोळे मिटून (बंद करून) त्या नकाशाच्या एखाद्या चौखटीवर आपली तर्जनी (अंगुश्त-ए-शहादत) ठेवावी आणि ज्या अक्षरावर तर्जनी ठेवली गेली असेल त्या अक्षराच्या उत्तरांमधून आपले उत्तर शोधावे. तो नकाशा असा आहे -

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ح | ج | ث | ت | ب | ا |
| س | ز | ر | ذ | د | خ |
| ع | ظ | ط | ض | ص | ش |
| م | ل | ك | ق | ف | غ |
| ی | ء | لا | ه | و | ن |

**काही शकुन पहाण्याची रीत**

**१) ت ''या अय्युहल्लज़ीन आमनू तौबू इलिल्लाहि तौबतन् नुसूहा''**

(१) या संकल्पामध्ये काही दिवस संयम पाळले पाहिजे. सर्व काही ठीक होईल. (२) तुम्हास ज्याची भिती असेल त्याला मुळीच भिऊ नका. (३) जर एखादा आजार असेल तर एक शेळीचे दान करा. (४) जर गरीब असेल तर एक कोंबड्याचे दान करा, म्हणजे लवकर आरोग्य लाभेल. (५) हरवलेली वस्तू वाईट इसमाच्या हाती लागलेली आहे. ते सापडणे कठीण आहे. संयम-धीर राखा. (६) हरवलेला इसम फार लांब गेलेला आहे. मोठ्या प्रयासाने सापडेल. (७) प्रवास करणे बरे नाही. (त्यात) फार नुकसान आहे. (८) शत्रूपासून काही वस्तू प्राप्त होईल. त्यामुळे हर्ष होईल. दरूद (अंतरासत्ती) सय्यद आलम[स.] आणि प्रेषित आदम[स.] वर पाठवा.

**२) س ''यासीन् वल्कुर्आनिल् - हकीमि इन्नक लमिनल् - मुर्सलीन.''**

(१) सर्व गरजा पूर्ण होतील, (२) मनातील संकल्प तडीस नेले जातील. सुस्ती करू नका. (३) जर नाते करणे मंजूर असेल तर शुभेच्छा. (४) स्त्रियांशी परामर्श करू नका. (५) प्रवास करणे फार उत्तम. (६) हे काम करणे चांगले नव्हे. ग्रह अशुभ आहे. सय्यद आलम सल्लम वर दरूद पाठवा.

**३) ص ''फ़ सबिरु सब्रुन् जमीलन्''**

(१) कुठून तरी धनलाभ होईल. (२) हरवलेला सापडेल. (३) एखाद्या गोष्टीमुळे मन चिंताक्रांत असेलतर संयम पाळा, कामना पूर्ण होईल. (४) हरवलेला दुःखी आहे. ईश्वरावर भरवसा ठेवा. सुखरूप परत येईल. (५) एक इसम तुम्हास त्रास देत आहे. तुम्ही त्याचे ऐकत नाही. त्याचे ऐका आणि मानल्यास फायदा होईल. दरूद सय्यद आलमस. वर पाठवा.

**४) ن م ''नून वल्क़लमि व मयस्तुरून्''**

(१) जे संकल्प मनामध्ये आहे, उत्तम आहे. तडीस नेले जाईल. स्त्रियांशी परामर्श करू नका. त्यांच्याशी सल्ला मसलत नको. (२) जो संकल्प मनामध्ये आहे, त्यासाठी प्रार्थना करा. सर्व काही ठीक होईल. (३) नमाज़ (उपासने) मध्ये सुस्ती करू नका. उपजीविकेचे दार तुमच्यावर उघडेल. सय्यद आलमस. वर दरूद पाठवा.

**५) ० ''व नउज़्ज़ि मिंत्तशाऽवु तज़िल्लु मिंत्तशाअ''**

(१) संकल्प चांगला आहे, (२) सर्व कार्य उत्तम प्रकारे तडीस नेले जाईल. (३) चिंता करू नका. मनोकामना पूर्ण होईल. (४) या संकल्पास टाळू नये. (५) इमाम राज़ी म्हणतात की शकुन बघणाऱ्यास (साहब-ए- फ़ाल) आपल्या संकल्पाचे फळ मिळेल. म्हणा जर ईश्वराची इच्छा असेल. सय्यद आलमस. वर दरूद पाठवा.

**२) मंत्र सिद्धी (दावत) : सूफ़ी तात्त्विक धारणा[८२]**

सुप्रसिद्ध सूफ़ी साधक मुहम्मद ग़ौस ग्वाल्हेरी यांचा ''जवाहिर-ए-ख़म्सा'' हा ग्रंथ म्हणजे सूफ़ी मंत्र-सिद्धी-शास्त्राची साक्षात् 'गीता'च होय ! हा ग्रंथ म्हणजे मंत्र सिद्धीचा एक अनमोल खजिनाच होय ! तसेच मंत्र सिद्धी (दावत) चे विविध प्रचरण अर्थात टप्पे यांना सुस्पष्ट, सुबोध आणि सुव्यवस्थितपणे समजून घेण्यासाठी

मिर्ज़ा महमूद अली शफ़क़ यांचे "अर्वाहुल ज़फर" (भाग-१) (पृ. ६८-७३) ग्रंथ जिज्ञासू वाचकांनी जरूर वाचावे. जिन्न अर्थात यक्ष-किन्नर योनि यांना मंत्र-सिद्धी द्वारे कशा रीतीने आव्हान केले जाते, याविषयी सविस्तर माहितीसाठी मौलाना हाजी पीर सय्यद अब्रार उल्ला शाह साहब यांनी लिहिलेले "अमलियात-ए-नूरानी" - (भाग दुसरा) (पृ. ७४-९०) हा ग्रंथ जिज्ञासूंनी जरूर वाचावे. (अर्थात उपरोक्त दोन्ही ग्रंथ उर्दू भाषेत आहेत.) उपरोक्त विषयाचे विवेचन पुढे येणारच आहे.

सूफ़ी मंत्र-सिद्धी-शास्त्रामध्ये उपयोगी सिद्ध होणारी काही कोष्टके प्रथम येथे देण्यात येत आहेत, व नंतर विषय विवेचन मांडण्यात येत आहे.

**सूफ़ी मंत्र-सिद्धी क्रिया मध्ये उपयोगात आणली जाणारी काही कोष्टके.**[८२]

*** कोष्टक - १ ***

*"जदी दलव आमदः मक़ाम-ए-ज़ुहल । मुश्तरी रास्त क़ौस-ए हूत हमल ।।*
*जाए बहराम अक़्रब स्त व हमल । सौर मीज़ान व ज़ुहरा रोज़-ए-अज़ल ।।*
*जायगाह-ए-उतारद ऐ अल्लाम । बुर्ज जौज़ा व संबुल अस्त मुद्दाम ।।*
*असद अज़ आफ़ताब शुदा नूर । सर्तान अस्त जायगाह-ए-क़मर ।।"*

उपरोक्त काव्यचरणमय कोष्टकामध्ये बारा राशींना सप्त ग्रहांमध्ये अशा प्रकारे विभाजित केले आहे की प्रत्येक ग्रह दोन रकान्यात येतो; परंतु ग्रह मास आणि रवी यांचा एक-एक रकान्यामध्ये समावेश आहे. ज़ुहल (शनी) च्या रकान्यामध्ये जदी (मकर राशी) व दलव (कुंभ राशी) आहेत, मुश्तरी (गुरू) च्या रकान्यामध्ये क़ौस (धनु) हत व (मीन) राशी आहेत, मिर्रीख (मंगळ) च्या रकान्यामध्ये हमल (मेष) व अक़्रब (वृश्चिक) राशी आहेत. शम्स (रवी) च्या रकान्यामध्ये असद (सिंह) राशी आहेत, ज़ुहराच्या रकान्यामध्ये सौर (वृषभ) व मीज़ान (तूळ) राशी आहेत. उतारद (बुध) च्या रकान्यामध्ये जौज़ा (मिथुन) व संबुलः (कन्या) राशी आहेत आणि क़मर (सोम) च्या रकान्यामध्ये सर्तान (कर्क) राशी आहे.

*** कोष्टक - २ ***

**सप्तग्रह आणि त्यांचे कालखंड**

| शम्स<br>रवी | क़मर<br>सोम | ज़ुहल<br>शनी | मुश्तरी<br>गुरू | मिर्रीख़<br>मंगळ | ज़ुहरा<br>शुक्र | उतारद<br>बुध |
|---|---|---|---|---|---|---|
| एक वर्ष | २८ दिवस | ३० वर्ष | १३ वर्ष | दीड वर्ष | एक वर्ष | एक वर्ष |
| एक मास | दोन दिवस<br>एक प्रहर | अडीच वर्ष | एक वर्ष<br>एक मास | ४५ दिवस | एक मास | एक मास |
| | | साडेचार मास | चार मास | १७ दिवस | एक मास<br>वीस दिवस | वीस दिवस |

## * कोष्टक – ३ *

## अब्जद : वर्णांकशास्त्र : मालिनीविजय धारा

### वर्णाक्षरांचे महाभूते, ग्रह, राशी, दैवी गुण आणि मानवी शारीरिक अवयवांशी असलेले संबंध व मूल्यांक

| कवाकिब सप्तग्रह ↓ | ख़सायल : गुणधर्म | | | | हफ़्त सिफ़ात इलाही दैवी (ईश्वरी) सप्त गुण | ताल्लुक़ात–ए –हुरूफ़ बआज़ा शारीरिक अवयवांशी संबंध |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाभूते | | | | | |
| | मर्फ़ूअ आतिशी | मन्सूब बादी | मज्रूर आबी | मजज़ूम ख़ाकी | | |
| | तेज : प्रकोपी | वायू : शांत | आप : शीतल | पृथ्वी : विनम्र | | |
| (१) ज़ुहल शनी मूल्यभारांक→ | ا १ | ب २ | ج ३ | د ४ | (१) हयात जीवन | सर डोके |
| (२) मुश्तरी गुरू मूल्यभारांक→ | ه ५ | و ६ | ز ७ | ح ८ | (२) इल्म ज्ञान | दस्ते रास्त उजवा हात |
| (३) मिर्रीख़ मंगळ मूल्यभारांक→ | ط ९ | ى १० | ك २० | ل ३० | (३) कुद्रत सामर्थ्य | दस्ते चप डावा हात |
| (४) शम्स रवी मूल्यभारांक→ | م ४० | ن ५० | س ६० | ع ७० | (४) बसर दृष्टी | पुश्त पाठ |
| (५) ज़ुहरा शुक्र मूल्यभारांक→ | ف ८० | ص ९० | ق १०० | ر २०० | (५) समअ श्रवण | शिकम पोट (उदर) |
| (६) उतारद बुध मूल्यभारांक→ | ش ३०० | ت ४०० | ث ५०० | خ ६०० | (६) कलाम वाणी | राने रास्त उजवी जांघ |
| (७) क़मर सोम मूल्यभारांक→ | ذ ७०० | ض ८०० | ظ ९०० | غ १००० | (७) इरादत संकल्प | राने चप डावी जांघ |
| बारा बुरूज → राशी | हमल असद मेष सिंह (१) (२) | जौज़ा मीज़ान मिथुन तूळ (३) (४) | सर्तान अक़्रब कर्क वृश्चिक (५) (६) | संबुलः कन्या (७) | सौर वृषभ (८) | |
| | क़ौस धनु (९) | दलव कुंभ (१०) | हूत मीन (११) | जदी मकर (१२) | | |

## * कोष्टक – ४ *

**क) अब्जद : वर्णांकशास्त्राचे सूत्र व तदंतर्गत मूल्यभारांकन**

**'अब्जद' चे सूत्र पुढीलप्रमाणे आहे –**

| | | | |
|---|---|---|---|
| अब्जद | हव्वज़ | हुत्ती (ह त य) | कलिमन |
| सअफ़स | क़रशत | सख़ज़ | ज़ज़ग़ |

**उपरोक्त वर्णाक्षरांचे मूल्यभारांक**

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ब | ज | द | ह | व | ज | ह | त | य | क | ल | म | न |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | २० | ३० | ४० | ५० |
| स | अ | फ़ | स | क़ | र | श | त | स | ख़ | ज़ | ज़ | ज़ | ग़ |
| ६० | ७० | ८० | ९० | १०० | २०० | ३०० | ४०० | ५०० | ६०० | ७०० | ८०० | ९०० | १००० |

उपरोक्त 'अब्जद' पद्धतीस **अब्जद–ए–क़मरी** असेही म्हणतात.

**ख) अब्जद–ए–शम्सी : 'अबतस' पद्धती**

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्णाक्षर | ا | ب | ت | ث | ج | ح | خ | د | ذ | ر | ز | س | ش | ص |
| मूल्यभार | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | २० | ३० | ४० | ५० |
| वर्णाक्षर | ض | ط | ظ | ع | غ | ف | ق | ك | ل | م | ن | و | | |
| मूल्यभार | ६० | ७० | ८० | ९० | १०० | २०० | ३०० | ४०० | ५०० | ६०० | ७०० | ८०० | | |
| वर्णाक्षर | ہ | ی | | | | | | | | | | | | |
| मूल्यभार | ९०० | १००० | | | | | | | | | | | | |

अब्जद–ए–शम्सी प्रयोगामध्ये नसल्यातच जमा आहे. अब्जद–ए–क़मरीच उपयोगात आहे. याने जन्म तिथी, मृत्यू तिथी, राज्यारोहण, ग्रंथरचनेचा काळ, एखाद्या प्रसिद्ध घटनेचे सन इत्यादी गोष्टी माहीत होतात.

## * कोष्टक – ५ *

**वर्णांक्षरांचे बिंदु भारांक**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्णाक्षर | ا | ب ت ث | ج ح خ | د ذ | ر ز | س ش |
| बिंदुभारांक | ७ | ९ | ५ | ६ | ४ | ६ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्णाक्षर | ص ض | ط ظ | ع غ | ف ق | ك | ل | م | ن | و | ہ | ی |
| बिंदुभारांक | ८ | ११ | ५ | ४ | १५ | १० | ४ | ९ | १२ | ५ | ९ |

*** कोष्टक – ६ ***

**वर्णाक्षर उदरस्थ मूल्यांक व तत्संबंधी वेताळ (मुवक्किल)**

| क्रमांक | वर्णाक्षर | उदरस्थ मूल्यांक | संबंधित वेताळाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ا | ७८४ | या आईल किंवा इस्राफ़ील |
| २ | ب | २७२ | या बाईल किंवा ज़िब्राईल |
| ३ | ت | ६७० | या ताईल किंवा इज़्राईल |
| ४ | ث | ७७० | या साईल किंवा मीकाईल |
| ५ | ج | ४४३ | या जाईल किंवा कलकाईल |
| ६ | ح | २५८ | या हाईल किंवा तनक़फील |
| ७ | خ | ८७० | या ख़ाईल किंवा महकाईल |
| ८ | د | ५०० | या दाईल किंवा दर्दाईल |
| ९ | ذ | १४०६ | या ज़ाईल किंवा अहरातीलु । अबरातील |
| १० | ر | ४७० | या राईल किंवा अमवाकील |
| ११ | ز | २७७ | या ज़ाईल किंवा सर्फ़ाईल । क़र्फाईल |
| १२ | س | ५९२ | या साईल किंवा हमवाईल |
| १३ | ش | ८३८ | या शाईल किंवा हमराईल |
| १४ | ص | ८०५ | या साईल किंवा अहजमाईल |
| १५ | ض | १५१५ | या ज़ाईल किंवा अत्काईल |
| १६ | ط | २७९ | या ताईल किंवा इस्माईल |
| १७ | ظ | ११७० | या ज़ाईल किंवा नवज़ाईल । लरज़ाईल |
| १८ | ع | ६५१ | या आईल किंवा लवमाईल |
| १९ | غ | १५८१ | या ग़ाईल किंवा लवख़ाईल |
| २० | ف | ३५० | या फ़ाईल किंवा सर्माकील । सर्हमाईल |
| २१ | ق | ७७५ | या क़ाईल किंवा इमाईल |
| २२ | ك | ७९५ | या काईल किंवा हरूज़ाईल |
| २३ | ل | ७७४ | या लाईल किंवा ताताईल |
| २४ | م | ५२० | या माईल किंवा रूयाईल |
| २५ | ن | ६६० | या नाईल किंवा हवलाईल |
| २६ | و | ६४३ | या वाईल किंवा रफ़्तमाईल |
| २७ | ٥ | २७५ | या हाईल किंवा दरूयाईल । दोरियाईल |
| २८ | ی | २८० | या याईल किंवा सरअकीकाईल। सरअकीताईल |

**मुवक्किल अर्थात वेताळ निश्चित करण्याची पद्धत**

वेताळ निश्चित करताना प्रत्येक 'इस्म' म्हणजे नामाचे प्रथम अक्षर (वर्ण) विश्वसनीय मानले गेले आहे. म्हणून नामाच्या अक्षरास जाणले – ओळखले पाहिजे की प्रत्येक अक्षर कोणत्या वेताळावर निर्भर आहे. अशा प्रकारे प्रत्येक नामाचे वेताळ माहीत होऊन जाईल. वर्णाक्षर वेताळासह व्यक्त केले जातात, जेणेकरून ईश शुभ नाम इत्यादींचे वेताळ बरोबर माहीत होऊन जावेत.

प्रत्येक नामाचे एक वेताळ आहे आणि जगन्नियंता परमेश्वराने त्या नामाचा प्रभाव त्याच्या वेताळाच्या हवाली केले आहे. जेव्हा परमेश्वर त्या नामास प्रगट करण्याचा संकल्प करतो, तेव्हा त्या नामाचे वेताळ प्रत्येक नामाचे प्रभाव व्यक्त (प्रगट) करू लागते, आणि जर उशीराने काम होणार असेल तर तो स्थगित करतो आणि परम गुह्याच्या पडद्याआड ठेवून देतो. प्रत्येक वर्णाक्षराशी निगडित वेताळाची यादी वरील कोष्टक क्रमांक ६ मध्ये दिली आहे.

वेताळ निर्धारणेमध्ये प्रत्येक नामाचे प्रथम वर्णाक्षर विश्वसनीय मानले गेले आहे. यावरून कळून येते की प्रत्येक वर्णाक्षर कोणत्या वेताळाच्या अधीन आहे. यामुळे 'अस्मा ए हुस्ना' म्हणजेच ईश्वराच्या शुभनामाची वेताळे बरोबर – अचूक माहीत होऊ शकतील. या पद्धतीने काही ईश शुभनामांची वेताळे अशी निश्चित होतील.

१) (या) जब्बार अथवा (अल्) जब्बार – جبّار (ج) = याचे वेताळ 'कलकाईल' निश्चित होईल.

२) (या) माजिद अथवा (अल्) माजिद – ماجد (م) = याचे वेताळ 'रूयाईल' निश्चित होईल.

३) (या) क़ादिर अथवा (अल्) क़ादिर – قادر (ق) = याचे वेताळ 'इत्राईल' निश्चित होईल.

४) (या) हक़ अथवा (अल्) हक़ – حق (ح) = याचे वेताळ 'तनक़फील' निश्चित होईल.

**३) सूफ़ी मंत्र सिद्धी (दावत) : काही प्रक्रिया व पद्धती**[८२]

'दावत' चा शब्दशः अर्थ आहे आव्हान, दैवी सहायतेसाठी अभिचार किंवा मंत्राचे प्रयोग (उपयोग). हे वस्तुतः (वास्तविक) अपदूत–निरसन किंवा भूत–अपसरण आहे. याचे मुख्य प्रयोजन भूत–पिशाच्च–बाधा निवारण हे आहे. मांत्रिक हा ईश–शुभनामे उपयोगात आणून मंत्र–सिद्धीसाठी प्रयत्नशील असतो. ईश–शुभनामे ही दोन प्रकारची आहेत. – (१) अस्माउल जलालिया म्हणजेच उग्र गुणवादी शुभनाम किंवा रौद्र शुभनाम आणि (२) अस्माउल जमालिया अर्थात भद्र शुभनाम. मांत्रिक आवश्यकतेनुसार यांपैकी एक उपयोगात आणतो. सुप्रसिद्ध सूफ़ी साधक मुहम्मद ग़ौस ग्वाल्हेरी यांच्या 'जवाहिर–ए–ख़म्सा' या ग्रंथामध्ये अनेक प्रकारचे अभिचार किंवा मंत्र दिले गेले आहेत. हे शत्तारी सूफ़ी संप्रदायाचे एक प्रमुख सूफ़ी संत होते. ते सम्राट हुमायूनचे आध्यात्मिक गुरू होते.

शब्दकोशामध्ये 'दावत' या शब्दाचा अर्थ वाचणे किंवा पाठ म्हणणे असा आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराची नामे ही सर्वच्या सर्व त्याची स्तुतिपरक अशी आहेत. ती सर्व त्याच्या प्रशंसेची द्योतक आहेत. जेव्हा साधक त्या नामांपैकी एखादे नाम मंत्रस्वरूप उच्चारतो तेव्हा तो त्या नामाशी निगडित होऊन जातो. जो प्रभाव त्या नामामध्ये असतो तोच प्रभाव साधकामध्ये सुद्धा घडून येतो. म्हणून जेव्हा परमेश्वराचा दास किंवा भक्त हा ऋषि–मुनि

आणि पुण्यशील लोकांच्या श्रेणीस पोहोचतो, तेव्हा जर त्याने परमेश्वराच्या नामाचा जप सुरू करून त्यामध्ये तो तल्लीन झाल्यास ईश्वराची रहस्ये त्याच्यावर उघडतील आणि अंतरबाह्य चमत्कार त्याच्या वशामध्ये येतील.

'दावत' (मंत्र-सिद्धी) दोन प्रकारच्या आहेत - एक लघु किंवा लहान; दुसरे गुरु किंवा मोठे. ज्याची गणना एक हजारपेक्षा कमी असेल ती मंत्र-सिद्धी लघु किंवा लहान असते. जर गणना एक हजारपेक्षा जास्त असेल तर ती मंत्र-सिद्धी गुरु किंवा मोठी गणली जाते. मंत्र-सिद्धी-कला किंवा मंत्र-सिद्धी-शास्त्र ही सिद्धहस्त गुरुकडूनच शिकली पाहिजे.

या विद्यार्जनाच्या काही अटी आहेत, त्या अशा -

या अटी ईश्वराची नामे आणि मंत्रोपचाराशी निगडित आहेत. मांत्रिकाने या तंतोतंत पाळणे अनिवार्य असते. नामांच्या अटी माहीत करून घेण्यासाठी सर्वप्रथम अब्जद वर्णांक शास्त्रानुसार अरबी वर्णाक्षरांचे मूल्यभारांक जाणून घेणे आवश्यक असते. अब्जद वर्णाक्षरांक संगणना पद्धतीसाठी कोष्टक - ४ चे (क) भाग पहावे. मांत्रिकाने पाळावयाच्या अटींमध्ये पुढील गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत - विशुद्ध आहार व उपजीविका, सत्यभाषण (सत्यव्रती), अप प्रवृत्ती दमन, सद्गुणांचा अंगीकार, दुर्गुणांपासून परावृत्त व त्यांचे दमन, षड्रिपूंपासून अलिप्तता, इतरांविषयी तक्रारी आणि अशाच प्रकारच्या इतर गोष्टींपासून मांत्रिकाने अलिप्त असावे. या बाबतीत त्याने दक्ष असावे. उपरोक्त गोष्टी पाळल्याशिवाय मंत्रसिद्धी होणार नाही. त्याने 'इस्म-ए-आज़म' म्हणजेच महामंत्राविषयी गाफिल राहता कामा नये. बारा राशींशी अनुकूल अशी 'अब्जद' परिगणना करून त्याने आपली मंत्र-क्रिया सुरू करावी. बारा राशींचे वेताळ त्याने माहीत करून घ्यावेत आणि मंत्रोच्चाराच्या वेळी सात वेळा नामासोबत जोडून वाचावे, आणि त्याच्यापुढे आपली मागणी ठेवावी. मंत्रोच्चार क़िब्ल्याकडे म्हणजे पश्चिम दिशेस तोंड करून करावे. महाभूते, राशी आणि वेताळ यांचे परस्पर संबंध पुढील कोष्टकावरून स्पष्ट होईल.

*** कोष्टक - ७ ***

**बारा राशी, तत्संबंधी वेताळ आणि त्यांचे भौतिक गुणधर्म**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) महाभूते ➔ | तेज | पृथ्वी | वायू | आप | तेज | पृथ्वी |
| २) राशी ➔ | १) मेष | २) वृषभ | ३) मिथुन | ४) कर्क | ५) सिंह | ६) कन्या |
| ३) वेताळ ➔ | जिब्रईल | इज्राईल | इस्त्राईल | क़हक़ाईल | सरातील | सकहील |
| १) महाभूते ➔ | वायू | आप | तेज | पृथ्वी | वायू | आप महाशुभ |
| २) राशी ➔ | ७) तुला | ८) वृश्चिक | ९) धनु | १०) मकर | ११) कुंभ | १२) मीन |
| ३) वेताळ ➔ | सहराकील | सरसराईल | मताईल | समकाईल | सहमकाईल | फ़क़याईल |

राशी नामाचे वैशिष्ट्य माहीत झाल्यानंतर ग्रहांच्या अवस्थेवर लक्ष ठेवून पहावे की कोणता ग्रह कोणत्या राशीमध्ये आहे, आणि प्रत्येक ग्रह आपल्या राशीमध्ये कोणते वैशिष्ट्य धारण करतो आणि शुभाशुभ पाहून मंत्र-कर्म सुरू करावे.

## क) सूफ़ी मंत्र–सिद्धी–शास्त्राची प्रक्रिया व तिचे टप्पे

सूफ़ी मंत्र–सिद्धी–शास्त्रामध्ये ईश्वराची सर्व शुभनामे ही अत्यंत परिणामकारक भूमिका वटवितात. फैकी 'इस्म–ए–आज़म' अर्थात महामंत्र हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. दिवसा मंत्र म्हणताना ही सरळ आहेत त्या स्वरूपांमध्ये उच्चारली जातात. जसे अल्–ख़ालिकु; अल्–ग़फ़्फ़ारू; अल्–वह्हाबु; अल्–बासितु; अल्–क़ाबिज़ु; अर्रज़्ज़ाकु; अस्समियु; अश्शकूरु; अल्लतीफु इत्यादी, तर रात्रीच्या वेळी संबोधन स्वरूपामध्ये मंत्रोच्चार करणे हे अधिक प्रभावोत्पादक सिद्ध होते. जसे – या रहमानु; या रहीमु; या अज़ीज़ु; या मुइज़्ज़ु; या हफ़ीज़ु; या वदूदु; या हकीमु; या वकीलु; या हय्यु; या क़य्यूमु; या माजिदु; या वाजिदु वगैरे.

सूफ़ी मंत्र–सिद्धी–शास्त्राची प्रक्रिया व त्याचे टप्पे पुढील मंत्राच्या आधारे याप्रमाणे निर्दर्शनास येतात –

मंत्र : سُبحانك لا اِله الّا انت (یا) ربّ کُلّ شئی و وارثه رازقمه و راحمه

उपरोक्त मंत्र देवनागरी लिपीमध्ये असे लिहिले जाईल –

''सुबहानक् ला इलाह इल्ला अन्त (या) रब्ब कुल्लि शयी व वारिस: व राज़िक: व राहिम:'' म्हणजेच हे परमेश्वरा! तू परम पवित्र आहेस. तुझ्याशिवाय इतर कुणीच उपास्य नाही. हे विश्वंभरा ! तूच सर्वांचा प्रतिपालक (अभिभावक) आहेस व तूच अन्नदाता आहेस आणि तूच दया करणारा आहेस.

उपरोक्त संपूर्ण मंत्राचे अरबी वर्णांकशास्त्रानुसार म्हणजेच 'अब्जद' पद्धतीनुसार एकूण मूल्यभारांक २६१३ इतके होते. संबोधनसूचक अक्षरे गणतीमधून वगळायची असतात. या नियमानुसार सदरहू मंत्रामध्ये एकूण ४५ वर्णाक्षरे समाविष्ट आहेत. त्यांचे मूल्यभारांक क्रमश: या प्रमाणे आहेत –

| क्रमांक | अक्षर | मूल्य | क्रमांक | अक्षर | मूल्य | क्रमांक | अक्षर | मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | س | ६० | १६ | ا | १ | ३१ | ر | २०० |
| २ | ب | २ | १७ | ن | ५० | ३२ | ث | ५०० |
| ३ | ح | ८ | १८ | ت | ४०० | ३३ | ه | ५ |
| ४ | ا | १ | १९ | ر | २०० | ३४ | و | ६ |
| ५ | ن | ५० | २० | ب | २ | ३५ | ر | २०० |
| ६ | ک | २० | २१ | ب | २ | ३६ | ا | १ |
| ७ | ل | ३० | २२ | ک | २० | ३७ | ز | ७ |
| ८ | ا | १ | २३ | ل | ३० | ३८ | ق | १०० |
| ९ | ا | १ | २४ | ل | ३० | ३९ | ه | ५ |
| १० | ل | ३० | २५ | ش | ३०० | ४० | و | ६ |
| ११ | ه | ५ | २६ | ی | १० | ४१ | ر | २०० |
| १२ | ا | १ | २७ | ء | १ | ४२ | ا | १ |
| १३ | ل | ३० | २८ | و | ६ | ४३ | ح | ८ |
| १४ | ل | ३० | २९ | و | ६ | ४४ | م | ४० |
| १५ | ا | १ | ३० | ا | १ | ४५ | ه | ५ |
| | | | | | एकूण २६१३ मूल्यभारांक | | | |

उपरोक्त मंत्रोच्चार किंवा मंत्रपाठामध्ये एककांचे मूल्य शतकांमध्ये; दशकांचे सहस्त्रांमध्ये; शतकांचे लक्षां (लाखां) मध्ये आणि सहस्त्रांचे कोटींमध्ये परिगणना केली जाते. याचे एकूण सप्त–सोपान किंवा सात टप्पे आहेत. ते क्रमश: असे आहेत –

(१) निसाब म्हणजे नियत, (निश्चित) संपदा; (२) ज़कात अर्थात देय किंवा दान; (३) उश्र म्हणजे दशमांश; (४) कुफ़्ल अर्थात तालिका किंवा टाळे; (५) दौर म्हणजे चक्र अथवा दौर–म–दौर अर्थात चक्रानुचक्र; (६) बज़ल म्हणजे उपहार व (७) ख़त्म म्हणजे समापक. सगळ्यात शेवटी येते ते सरी–उल्–इजाबा म्हणजे शीघ्रगामी उत्तर वा प्रत्युत्तर.

**मंत्र–पठनाचे सप्त–सोपान**

१) निसाब म्हणजे (नियत संपदा) म्हणजे मंत्रामध्ये समाविष्ट एकूण वर्णाक्षराचे सहस्त्रकांमध्ये परिवर्तित करणे आहे.

$\therefore$ ४५ × १०० = ४,५००

२) ज़कात (देय वा दान) म्हणजे 'निसाब' मध्ये त्याचे पन्नास टक्के भाग जोडणे आहे.

$\therefore$ ४,५०० + २,२५० = ६,७५०

३) उश्र (दशमांश) म्हणजे 'जकात' मध्ये 'निसाब' चे पन्नास टक्के जोडणे आहे.

$\therefore$ ६,७५० + १,१२५ $\left(\frac{४५००}{४}\right)$ = ७,८७५

४) कुफ़्ल (तालिका) म्हणजे १,१२५चे बनविणे आहे. अपूर्णांकाचे पुढील पूर्णांक घेणे.

$\therefore$ १,१२५ × $\frac{१}{२}$ = ५६२.५ पुढील पूर्णांक ५६३ = ५६३

५) दौर (चक्र) म्हणजे 'कुफ़्ल' मध्ये 'उश्र' मिळवून त्याचे दुप्पट करणेचे आहे.

$\therefore$ ५६३ + ७,८७५ = ८,४३८

= ८,४३८ + ८,४३८ = १६,८७६ = १६,८७६

६) बज़ल (उपहार) म्हणजे 'अब्जद'वर्णांक शास्त्राच्या हिशोबाने
'बज़ल' (بذل) याचे वर्णमूल्यभारांक (२+७००+३०) = ७३२ इतके होते.
त्याचे सात सहस्रके होतात, म्हणजेच ७,००० एवढे वर्णमूल्यभारांक निश्चित होते.
म्हणून हे नियत संख्या स्वरूपात ७,००० इतके होते. = ७,०००

७) ख़त्म (समापक) म्हणजे हे पण नियत संख्या स्वरूपामध्ये १,२०० होते. = १,२००

८) याचे सरी–उल्–इजाबा म्हणजे शीघ्रगामी उत्तर पण एक नियत संख्या स्वरूपामध्ये १२,००० इतके होते. = १२,०००

**एकूण मूल्य भारांक ५६,७६४**

उपरोक्त मंत्र एकूण ५६,७६४ वेळा नियम व अटीचे पालन करून म्हटल्यास मनोकामना पूर्ण होते.

**ख) 'इस्म-ए-आज़म' (सर्वश्रेष्ठ महामंत्र) अल्लाहु, : या अल्लाहु**

सूफ़ी तत्त्वज्ञानामध्ये 'अल्लाहु' या परात्पर परब्रह्माच्या सत्तात्मक एकमेव नामास 'इस्म-ए-आज़म' म्हणजेच महामंत्राचा दर्जा आहे. परमेश्वराची इतर सर्व नामे (नावे) ही गुणवाचक किंवा गुणदर्शक आहेत. समस्त नामांमध्ये या एकमेव सत्तात्मक नामाची पराकाष्ठा आहे. काही विद्वानांच्या मते हेच 'इस्म-ए-आज़म' म्हणजेच महामंत्र आहे. पवित्र कुरआनमध्ये हे नाम दोन हजार तीनशे साठ (२,३६०) जागी आले आहे. नामांमध्ये हे सर्वश्रेष्ठ नाम आहे. सर्व नामांवर याचे वर्चस्व, श्रेष्ठत्व आहे. हे महामंत्र व्यापक आहे, अति विशाल आहे. सर्व नामे ही याच्यामुळेच सार्थक ठरतात. गुणवाचक नामे याच्या अधीन आहेत. या 'अल्लाह' नामाचे मूल्यभारांक आहे ६६. या ६६ ला ६६ ने गुणल्यास (६६ × ६६) ४,३५६ इतकी संख्या येते. म्हणून 'अल्लाह' हे महामंत्र ४,३५६ वेळा म्हणावे. याचे ४,३५६ वेळा नामोच्चार करावे. जो कोणी दररोज हजार वेळेस या नामाचे पाठकरीत असेल तर तो दृढ विश्वासी बनून जाईल, आणि जो कोणी नमाज (उपासने) नंतर शंभर वेळा याचे पाठ करीत असेल तर त्याचे अंतरंग उघडेल आणि तो अंतर्ज्ञानी बनून जाईल. ताप (आजार) निवारण करण्यासाठी पुढील चौरसाकृती नकाशा गळ्यामध्ये बांधावे.

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ११ | ४६ | १ |
| ४५ | २ | ७ | १२ |
| ३ | ४८ | ९ | ६ |
| १० | ५ | ४ | ४७ |

रोग व आजारापासून बरे होण्यासाठी जर याचे मूल्यभारांका इतके म्हणजे ६६ वेळेस लिहून धूवून रुग्णास पाजल्यास, जर ईश्वराची इच्छा असल्यास, रुग्ण बरा होऊन जाईल, आणि विषबाधा झालेला इसम व भूत-पिशाच्चबाधीत इसमास हे लिहून धुवून पाजल्यास जर भूतबाधीत इसम बरा झाला नसेल तर उपरोक्त महत्त्वूर्ण प्रमुख नकाशाची वात बनवून ती दिव्यामध्ये जाळून बाधाग्रस्त इसमास दाखविल्यास आणि त्याला हुंगविल्यास जर मांत्रिकाचा हेतू त्या भुतास, किंवा पिशाच्चास किंवा जिन्नला ठार मारण्याचा असेल किंवा त्यांना जाळून टाकण्याचा असेल किंवा त्याला सवाक म्हणजे बोलते करण्याचे असेल तर या सर्व गोष्टी या महामंत्रापासून प्राप्त होतील. हे महामंत्र सर्वांगपरिपूर्ण आहे. सर्व प्रकारचे आजार या सर्व गोष्टी महामंत्रापासून बरे होतात.

काही जुन्या (प्राचीन) विद्वानांनी असे मत नोंदविले आहे की जो कोणी 'अल्लाह' या नामास एखाद्या भांड्यावर यथा शक्य असंख्यपणे लिहून, त्याला धुवून त्याचे पाणी एखाद्या अपस्मारास किंवा भूताने बाधित व्यक्तीवर शिंपडेल तर त्याचे भूत जळून जाईल, आणि बूनी नावाच्या एक साधक विद्वानाने म्हटले आहे की चौतीस वर्षांपासून अपस्मारी किंवा भूत-पिशाच्चबाधीत असलेल्या मुलाच्या एका इसमास, जो त्याच्या या आजारामुळे फारच कंटाळलेला होता, त्याला हे महामंत्र अंमलात आणण्याचा सल्ला दिला गेला. त्या इसमाने या मंत्राची अंमलबजावणी सुरू केली. तो सदरहू महामंत्र लिहून त्या मुलास पाजत होता आणि शिंपडत पण होता. ईश्वराच्या कृपेने त्याचे भूत जळून गेले. तो बरा झाला. त्याला पुन्हा कधीच भूतबाधा झाली नाही.

**ग) सप्त पुनरावृत्त अष्ट–ईश–शुभनामांचा मंत्र**

काही कृपायाचना मंत्राचा दर्जा राखतात. जो इसम ही कृपायाचना रबी–उल्–अव्वल या महिन्यामध्ये बारा दिवस किंवा दररोज एक वेळा म्हणेल (वाचेल) तर तो संपूर्ण वर्षभर आनंदात व मजेत राहील आणि प्रेषित मुहम्मदस. यांचे असे उवाच आहे की या कृपायाचनेस मंत्र स्वरूपामध्ये वाचणारा वाचक हा आपल्या कर्मांच्या हिशोबाविना स्वर्गामध्ये प्रविष्ट होईल. हा सप्त पुनरावृत्त अष्ट ईश शुभनामांचा मंत्र असा आहे–

बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम

(कृपाळू कनवाळू अल्लाहच्या नावाने [आरंभ] )

१) या अल्लाहु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे परात्पर परब्रह्म !

२) या रहमानु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे करुणाशील !

३) या ग़फ़ूरू $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे क्षमावन्त !

४) या रहीमु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे दयाळू !

५) या हन्नानु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे कृपाळू !

६) या मन्नानु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे मुक्तिदाता !

७) या दय्यानु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे सत्यनिष्ठ !

८) या सुबहानु $^{७}$ (= सप्त आवृत्ती) : हे परम पवित्र !

**घ) सप्तग्रह किंवा सप्तदैहिक मंत्र (दुआए हफ़्त पैकर)**

या कृपायाचनेमध्ये खालील सात ईश शुभनामे म्हटली जातात.

१) या जलीलु : हे परमपुज्य !

२) या लतीफु : हे सूक्ष्मदर्शी !

३) या समीऊ : हे सर्वश्रोता !

४) या अलीमु किंवा या अज़ीमु : हे सर्वज्ञ किंवा हे महान!

५) या रहीमु : हे दयाळू !

६) या करीमु : हे कृपाळू !

७) या ग़फ़ूरु : हे क्षमावन्त !

**च) इहलोक व परलोकाचे भय (भिती) दूर करण्यासाठी मंत्र**

एकदा महादेवदूत जिब्रील यांनी प्रेषित मूसा यांना सांगितले की हे मूसा ! परमेश्वराचा आदेश आहे की जर कोणास इहलोक व परलोकाची भिती असेल तर त्याने २५ वेळेस ही कृपायाचना मंत्रस्वरूपात म्हटल्यास त्याचे उपरोक्त संकट टळेल. ही कृपायाचना अशी आहे –

*बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम*

*ला इलाह इल्लल्लाहुल् अलिय्युल् अज़ीमु*

*ला इलाह इल्लल्लाहुल् मन्नानुल क़दीमु*

*ला इलाह इल्लल्लाहुल् हय्युल क़य्यूमु*

*ला इलाह इल्लल्लाहुल् व्वसियुर्रहीमु*

*ला इलाह इल्लल्लाहु र्रहमानुर्रहीमु*

*ला इलाह इल्लल्लाहु र्रहीमुलकरीमु*

*ला इलाह इल्लल्लाहुल् हय्युल अलीमु*

*ला इलाह इल्लल्लाहु मालिकि यौमिद्दीन*

ला इलाह इल्लल्लाहु इय्याक नऽबुदु व इय्याक नस्तअीन लैस

*कमिसिलिहि शैयुँ व हुव स्समीयुलबसीरु*

*अल्लाहुम्म इन्नी असालुक बिइस्मिक*

*अल्–अज़ीमि व अन्तल अज़ीमुल क़य्यूमु*

*त्ताहिरुल क़ादिरुल मुक्तदिरु बिरहमतिक*

*या अर्रहमानिर्राहिमीन व सल्ले अल्लाहु अला*

*ख़ैरि ख़लक़िहि मुहम्मदिंव्व आलिहि अज्मईन.*

**छ) प्रथम नाम 'सुबहान' ची मंत्र–सिद्धी पद्धत : तरीक़–ए–दावत इस्म अव्वल**

प्रथम मंत्र 'सुबहान' हे पुढीलप्रमाणे आहे –

''सुबहानक ला इलाह इल्ला अन्त या रब्बु कुल्लि शैयँ व्व वारिसु: व राज़िकु: व रहमहु'' नियमानुसार या मंत्राच्या उदरामध्ये चारशे चौदा (४१४) वर्णाक्षरे आहेत आणि 'अब्दज'च्या हिशोबाने त्याचे मूल्यभारांक दहा हजार, सहाशे सत्तावन (१०,६५७) इतके आहे, आणि वास्तविक वर्ण व अंतर्गत वर्णांची संख्या (१२०) आहे. म्हणून एकदा विशिष्ट मुदतीपर्यंत वास्तविक वर्ण व अंतर्गत वर्णांच्या संख्येनुसार दररोज मूल्यभारांकानुसार दहा हजार, सहाशे सत्तावन (१०६५७) वेळेस म्हणावे आणि दुसऱ्या वेळेस अकरा लाख (लक्ष), वीस हजारास (११,२०,०००) एकशे वीस (१२०) ने भागून आलेली संख्या आहे ९,३३३. या मंत्राचे वाचन एकशे वीस (१२०) दिवसांपर्यंत करावे, आणि बाकी उरलेली ४० या संख्येस शेवटच्या दिवशी पूर्ण करावे. ईश्वराच्या कृपेने मंत्र प्रभावशाली सिद्ध होईल. इतर नामांची मंत्र–सिद्धीचे अनुमान याच धर्तीवर करावे.

**ज) सन्मार्गाच्या सरऴ मार्गाची मंत्र–सिद्धी : तरीक़–ए–दावत सिरात मुस्तक़ीम**

हे स्पष्ट आहे की सर्व मंत्र हे चित्र–विचित्र गोष्टी दाखवितात. ही मंत्र–सिद्धी मात्र अद्वैतवाद आणि ईश्वराच्या अस्तित्वास उद्घाटित करते. प्रत्येक नामाच्या मंत्र–सिद्धी दरम्यान अठरा हजार (१८,०००) विश्वांचे वास्तव प्रगट (व्यक्त) होते. रौद्रगुणी नामांच्या प्रभावाने रौद्र (स्वरूपी) जग, भद्र गुणी नामांच्या प्रभावाने भद्र

(स्वरूपी) विश्व आणि संमिश्र गुणी नामांच्या प्रभावाने संमिश्र (सुख-दुःखमय) जग प्रगट होते, आणि ते सर्व एकेश्वरवादाचे ज्ञानाचे बोध करून देतात, त्यामध्ये तल्लीन होऊन जातात. पुन्हा एक क्षणानंतर ज्यास ईशनामे असे म्हणतात तो सृष्टीचा पालनकर्ता साधकाच्या रूपामध्ये व्यक्त होतो. साधक या रूपांना पाहिल्यानंतर आत्मविस्मृत होऊन जातो, आणि परिणामी आश्चर्यचकित होऊन तो म्हणू लागतो की मी कोण आहे, काय आहे आणि काय होईल. जेव्हा तो जागा होतो तेव्हा साधक स्वतःस ईश्वरी गुणधर्मामध्ये पाहतो - ''तख़ल्लकुव बअख़लाक़ि अल्लाहि'' आणि मग स्वतःस सृष्टीच्या ईशनामांनी सुशोभित पाहतो आणि ही अवर्णनीय अशी स्थिती आहे.

**प्रथम नाम 'सुबहान' ची मंत्र-सिद्धी**

''सुबहानक ला इलाह इल्ला अन्त या रब्ब कुल्लि शैयँ व्व वारिसुः व राज़िकुः व राहिमुः'' या नामामध्ये मंत्राच्या अनिर्धारित सतरा (१७) वर्णाक्षरे आहेत. बिंदू रेषांच्या हिशोबाने एकशे बेचाळीस (१४२), एक लाख बेचाळीस हजार (१,४२,०००) आणि सतरा (१७) मूळ वर्णाक्षरांच्या हिशोबाने एक लाख सतरा हजार (१,१७,०००) आणि सव्वीस (२६) अंतर्गत वर्णाक्षरांच्या हिशोबाने सव्वीस हजार (२६,०००) आणि मूळ व अंतर्गत वर्णाक्षरांच्या मूल्यभारांकाप्रमाणे दोन हजार तीनशे पासष्ट (२,३६५) या सगळ्यांची एकूण बेरीज तीन लाख, बेचाळीस हजार, तीनशे पासष्ट (३,४२,३६५) इतकी होते. यास चाळीस (४०) दिवसांनी भाग दिल्यास दररोजची पाठावृत्ती (पाठसंख्या) आठ हजार, पाचशे एकोणपन्नास (८,५४९) इतकी होते. भागाकार केल्यानंतर पाच (५) ही जी संख्या उरते, त्यास शेवटच्या दिवशी वाचले पाहिजे म्हणजे निश्चित संख्या पूर्ण होऊन जाईल. इतर नामांची पद्धती याच धर्तीवर गृहीत धरावी.

**झ) प्रतिष्ठित नामांची वैशिष्ट्ये : प्रथम नाम (इस्म अव्वल)**

''सुबहानक ला इलाह इल्ला अन्त या रब्बु कुल्लि शैयँ व्व वारिसुः व राज़िकुः व राहिमुः''

प्रथम नाम भद्र (जमाली) आहे. याची विशेषता ही आहे की मनोकामना पूर्ण होण्यासाठी दररोज तीस हजार एकशे चाळीस (३०,१४०) वेळा म्हणावे. या मंत्राची सुरुवात रविवार दिवशी सूर्योदयाच्या वेळी करावी. जर कदाचित् पहिल्या चाळीस (४०) दिवसांमध्ये हेतू साध्य झाले नसेल, मनोकामना पूर्ण झाली नसेल तर तीन मंडळे (चाळीस दिवसांचे एक मंडळ यालाच 'चिल्ला' असे म्हणतात.) याच संख्येने पूर्ण करावीत. ईश्वर इच्छील तर त्याचे सर्व हेतू सफळ आणि सर्व मनोकामना पूर्ण होतील.

**ट) मंत्र कुप्रभाव आणि जादूचा प्रभाव नष्ट होण्यासाठी मंत्र-योजना**

जर एखाद्याने मांत्रिक किंवा एखाद्या दुसऱ्या व्यक्तीवर मंत्र फुंकलेला असेल किंवा जादू केलेली असेल किंवा करण्याचा निश्चय केला असेल तर ते निरस्त व नष्ट करण्यासाठी उपाय म्हणून (प्रतियोजना स्वरूपात) सूर्यास्ताच्या नमाजनंतर तेहतीस (३३) वेळा पवित्र कुराणांचे अध्याय क्रमाक ८०. अध्याय 'अबस' (नापसंती) चे वाचन (पठण) करावे. तो अध्याय पुढीलप्रमाणे आहे -

## ८०. सुरतुअबस

### बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम

अबस व तवल्ला (१) अन् जा । अहुल्–अऽमा (२) व मा युद्रीक लअल्लहु यज़्ज़क्का। (३) औ यज़्ज़क्करु फ़तन्फ़अ – हुज़्ज़िक्रा (४) अम्मा मनिस्तग़्ना (५) फ़अन्त लहु तसद्दा (६) व मा अलैक अल्ला यज़्ज़क्का (७) व अम्मा मन् जा।अक यस्आ (८) व हुव य़खशा (९) फ़अन्त अनहु तलह्हा (१०) कल्ला। अिन्नहा तज़्किरतुन् (११) फ़मन् शा।अ ज़करहु (१२) फ़ी सुहुफ़िम–मुकर्रमतिन् (१३) म्मर्फ़ूअतिम् – मुतह्हरतिम् (१४) बिऐदी सफ़्रतिन् (१५) किरामिम् – बररतिन् (१६) कुतिलल् – अिन्सानु मा। अक्फ़रहु (१७) मिन् अय्यि शैअिन् ख़लक़हु (१८) मिन् नुत्फ़तिन् ख़लक़हु फ़कद्दरहु (१९) सुम्मस्सबील यस्सरहु (२०) सुम्म अमातहु फ़अक़्बरहु (२१) सुम्म अिज़ा शा।अ अन्शरहु (२२) कल्ला लम्मा य़कज़ि मा। अमरहु (२३) फ़ल्यन्ज़ुरिल् – अिन्सानु अिला तआमिहि। (२४) अन्ना सबब्नल् – मा।अ सब्बन् (२५) सुम्म शक़क़्नल्अर्ज़ शक़्क़न् (२६) फ़अम्बत्न फ़ीहा हब्बन् (२७) व्व अिनबंव्व क़ज़्बन् (२८) व्व ज़ैतूनंव्व नख़्लन् (२९) व्व हदा।अिक़ ग़ुल्बन् (३०) व्व फ़ाकिहतंव्व अब्बन् (३१) म्मताअल–लकुम् व लिअन्आमिकुम् (३२) फ़अिज़ा जा। अतिस्सा। ख्खतु (३३) यौम याफ़िर्रुल् – मरऊ मिन् अख़ीहि (३४) व उम्मिह व अबीहि (३५) व साहिबतिह व बनीहि (३६) लि–कुल्लिम् – रिअिम् मिन्हुम् यौमअिजिन् शअ्नुंय्युग़्नीहि (३७) वुजू हुंय्योमअिजिम् मुसफ़िरतुन् (३८) ज़ाहिकतुम् – मुस्तब्शिरतुन् (३९) व वुजू हुंय्यौमअिजिन् अलैहा ग़बरतुन् (४०) तर्हक़ुहा क़तरतुन् (४१) उला।अिक हुमुल् – क़फरतुल् – फ़जरतु (४२)

### भाषांतर

### ८०. सुरतुअबस (नापसंतीचे अध्याय)

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

क्रोधित झाला आणि उपेक्षा केली, (१) या गोष्टीवर की तो अंध त्याच्याजवळ आला. (२) तुम्हाला काय कल्पना, कदाचित तो सुधरेल (३) अथवा उपदेशावर लक्ष देईल आणि उपदेश करणे त्याच्यासाठी लाभदायी ठरेल? (४) जो इसम दुर्लक्ष करतो (५) त्याच्याकडे तर तुम्ही लक्ष देता, (६) वस्तुतः जर तो सुधारला नाही तर तुम्हावर त्याची काय जबाबदारी? (७) आणि जो स्वत: तुमच्यापाशी धावत येतो (८) आणि भीत असतो (९) त्याची तुम्ही उपेक्षा करता ! (१०) कदापि नाही, हा तर एक उपदेश आहे. (११) ज्याची इच्छा असेल त्याने हा स्वीकारावा. (१२) हे अशा पवित्र पृष्ठांवर (नमूद आहे) (१३) (जी) उच्च दर्जाची व पवित्र (आहेत), (१४) (अशा) लेखनिकांच्या हाती, (१५) (जे) सन्माननीय आणि प्रामाणिक (सद्‌गुणी) आहेत. (१६) धिक्कार असो माणसाचा, सत्याचा किती कट्टर इन्कार करणारा आहे हा, (१७) कोणत्या वस्तूने अल्लाहने त्यास निर्माण केले आहे? (१८) वीर्याच्या एका थेंबाने अल्लाहने त्याला निर्माण केले, मग त्याचे भाग्य ठरविले (१९) मग त्याच्यासाठी जीवनाचा मार्ग सोपा केला, (२०) मग त्याला मृत्यु दिला आणि कबरीत पोहचविले. (२१) मग हवे तेव्हा त्याने त्याला पुन्हा उठवून उभे करावे. (२२) कदापि नाही, याने ते कर्तव्य बजावले नाही ज्याची आज्ञा अल्लाहने त्याला दिली होती. (२३) मग जरा माणसाने आपल्या आहाराकडे पहावे. (२४) आम्ही खूप पाणी ओतले, (२५) मग जमिनीला अजब तऱ्हेने फाडले, (२६) मग तिच्यात उगविली धान्ये

(२७) आणि द्राक्षे व भाज्या (२८) आणि जैतुन व खजुरी (२९) आणि घनदाट बागा (३०) आणि विभिन्न प्रकारची फळे व चारा (३१) तुमच्यासाठी आणि तुमच्या जनावरांसाठी जीवनसामग्री म्हणून. (३२) सरते शेवटी जेव्हा तो कान बधीर करणारा आवाज दुमदुमेल (३३) त्या दिवशी माणूस आपला भाऊ (३४) आणि आपली आई आणि आपले वडील (३५) आणि आपली पत्नी व आपल्या संततीपासून दूर पळेल. (३६) त्यांच्यापैकी प्रत्येक माणसावर त्या दिवशी अशी वेळ येऊन ठेपेल की त्याला आपल्याखेरीज कुणाचेही भान राहणार नाही. (३७) काही चेहरे त्या दिवशी चमकत असतील, (३८) प्रफुल्लीत, प्रसन्न आणि आनंदित व हर्षभरीत असतील, (३९) आणि काही चेहऱ्यांवर त्या दिवशी धूळ उडत असेल (४०) आणि काळिमा पसरलेला असेल. (४१) हेच अश्रद्धावंत व दुराचारी लोक असतील. (४२)

**कुमंत्र आणि जादूचा प्रभाव निष्प्रभ करण्यासाठी एकनिष्ठ एकेश्वरवादी भक्ताचे प्रमाण**

सूर्योदयानंतर एकवीस (२१) वेळेस खालील कृपायाचनेचे पाठ (पठण) करावे म्हणजे सर्व कुमंत्र आणि जादूचा प्रभाव निष्प्रभ होऊन जाईल. ती कृपायाचना ही आहे –

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.

या रब्बि दखलतु दखलियु अन्त वकीलियु व काफ़ियु यकुफ़ियुनियु हाफ़िजु हफ़ियुज़इयु यकुफ़ियुनियु हन्नानु मन्नानु यकुफ़ियुनियु ग़फूरू ग़फ़्फ़ारू यकुफ़ियुनियु हय्यु क़य्यूमु यकुफ़ियुनियु ख़ालिकु ख़ल्लाकु यकुफ़ियुनियु अलीमुन् अल्लामुन् यकुफ़ियुनियु राज़िकु रज़्ज़ाकु यकुफ़ियुनियु शाहिदु नाज़िरून् यकुफ़ियुनियु अल्लाहु यकुफ़ियुनियु यकुफ़ियुनियु यकुफ़ियुनियु फ़ल्लाहु ख़ैरून् हाफ़िज़न् मदहुव अरहमुर्राहिमीन. ला तख़ाफ़ियु व ला तख़फ़ियु इन्ना रआद्दुवु ला इलैक व जाइ(अि)लुव हु मिनलमुर्सलीन. या मूसा अक़बिलु व ला तख़फु इन्नक हामिन अल् आमिनीन. बिस्मिल्लाहिर्रिह्मानिर्रहीम. फ़रजिउव अफ़ारूजिऊव अफ़ारूजिऊव फ़रजिउव अफ़ारजिउव अफ़ारजिउव.

**मंत्र–सिद्धी निष्प्रभ करण्यासाठी**

मंत्र–सिद्धी निष्प्रभ करण्यासाठी ही काही नामे आणि कुरआनी श्लोक एका ठिकाणी गोळा (जमा) करून एकवीस (२१) वेळेस म्हणावे.

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.

अलियुक़न म्मलियुक़न् ख़ालिक़ुन् म्मख़लूक़न् काफ़ियन् शाफ़ियन् इर्तज़ा मुर्तज़ा बिहक़्क़ि या बुद्दूहु व नुज़्ज़िलु मिन–उल्–कुरआनी मा हुव शिफ़ाऽउँ व्व रहमतहु ल्लिलमोमिनीन. व ला य़जीदुज़्ज़ालिमीन इल्ला ख़सारन्. बिहक़्क़ि असातन् सालन् अल् सालुवसन्.

**मंत्र–सिद्धी नष्ट करण्याच्या दिशेने**

मंत्र–सिद्धी नष्ट करण्याच्या प्रयत्नामध्ये सुरुवातीस व शेवटी दारूद शरीफ (प्रेषितांवर अंतरासक्ती) आणि एक्केचाळीस (४१) वेळेस हे तंत्र–मंत्र वाचावे.

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.

बिस्मिल्लाहि मलासिहा निर्रहमानि अबरसमान अर्रहीमि हसयमानि तुलना या नारु कोनी बरदन् व्व सलामन आले इबराहीम बिहक़्क़ि अहिन् वहिन् व आयतिहिन् दूर शव दूर शव फ़रजिउव अफ़ारजिउव अफ़ारजिउव.

## ४) जादू किंवा यातु विद्या : इस्लामी व सूफ़ी दृष्टिकोन[८३]

सिमीया म्हणजे इंद्रजाल किंवा मंत्र विद्या. ही विद्या अध्यात्म शास्त्राचीच एक शाखा आहे. या विद्येचे दोन भाग पडतात. उच्च विभाग आणि निम्न वा अधोविभाग. उच्च विभागाला 'रहमानी' किंवा 'उल्वी' विद्या असे म्हणतात. हिचा संबंध ईश्वराशी असतो. दुसरा विभाग राक्षसी म्हणजे 'सिफ्ला' किंवा 'शैतानी' ('सैतानी') असून त्याचा चेटूक, जादूटोणा यांच्याशी संबंध आहे. मुसलमानांचे पुष्कळसे इंद्रजाल किंवा त्यांची जादूविद्या बाबिलोनियाशी संबंधित अशी आहे. बाबिलोनिया हे या विद्येचे माहेरघर मानण्यात येते. इस्लामी धर्मशास्त्राने अधिकृतरीत्या जादूविद्येचा निषेध केला आहे. जो थोडे बहुत फलज्योतिष शास्त्राचे ज्ञान मिळवितो तो जादूच्या एका शाखेचे ज्ञान मिळवितो. 'जो जादूगाराकडे जाऊन गूढ गोष्टींचे रहस्य विचारतो, आणि जादूगार सांगतो त्यावर विश्वास ठेवतो त्याला महंमद[स]. आणि त्यांचा धर्म (इस्लाम) आवडत नाही हेच खरे.' 'पण परमेश्वराशी इतर कशाचाही संबंध जोडीत नाहीत असे मंत्र करायला भीती नाही.' 'तुम्ही इस्लामवर श्रद्धा ठेवलेली आहे, म्हणून जादूवर श्रद्धा ठेवू नये.', असे पवित्र कुरआन निक्षून सांगते.

मुसलमानांच्या जादूविद्येचा मुख्य भाग भुताखेतांना आणि पिशाच्चांना आवाहन करणे हा आहे. हे आवाहन (दावत) पुढील आदेशासाठी आहे - जिन (यक्ष-किन्नर) आणि भुते यांच्यावर प्रभुत्व ठेवून गरजेनुसार त्यांच्याकडून काही गोष्टी घडवून आणणे, दोन व्यक्तींच्यामध्ये मित्रता अगर शत्रुत्व निर्माण करणे, शत्रूंचा मृत्यु घडवून आणणे, संपत्ती वाढविणे, मोफत किंवा गुप्तपणे द्रव्य मिळविणे, इहलौकिक अगर पारलौकिक इच्छांची पूर्ती करणे.

वास्तविक जादू म्हणजे हातचलाखी व नजरबंदीशिवाय दुसरे काहीच नसते. गंडे, दोरे, काळी बाहुली, ताईत, पेटी, अंगारे, धुपारे, तांत्रिक-मांत्रिक, आसरा, भुताटकी, वारू, अंगात येणे, चालक बाऊ, भानामती, जादूटोणा, मूठ मारणे, सकून (शकुन) बघणे, चेटूक (चेटकीण), गळ टोचून घेणे, नवस फेडणे, प्राणिमात्रांचा बळी देणे आणि नरबळी ही सर्व जादूटोण्याची उपांगे होत.

या जादूविद्येत जादूगाराला हवी असणारी साधने, त्यांनी पाळावयाचे नियम, जपावयाचे मंत्र, दानधर्म, भुते काढून टाकणे इत्यादी बाबींशी संबंध येतो. मांत्रिक जादूगाराने त्याचे ज्ञान त्या विषयातील विद्वान तज्ज्ञ गुरुकडूनच मिळविले पाहिजे. या गुरूला 'मुर्शद' म्हणतात. ज्याला ईश्वराची सर्वश्रेष्ठ नावे ज्ञात आहेत (इस्म-ए-आज़म) तोच गुरू होऊ शकतो. ईश्वराची नावे म्हणजे त्याची विशेषणे आहेत. परंतु ईश्वराची सर्वश्रेष्ठ नावे जादूचे मंत्र म्हणून वापरली जातात. काही नावे भीतिदायक आहेत. त्यांना 'इस्म-ए-जलालिया' असे म्हणतात. ही सर्व ईश्वराची नावे परिचित करून घेऊन ज्याने पिशाच्चांना प्रसन्न केले आहे तोच गुरू होऊ शकतो. मात्र मंत्रविद्येतील कोणत्याही तज्ज्ञाने स्वतःच्या सामर्थ्याचा गर्व बाळगू नये, या सामर्थ्याचा निष्कारण प्रयोग करू नये. स्वतःच्या श्रेष्ठतेविषयी आढ्यतेने बोलू नये, असे नियम आहेत. पवित्र कुरआनमधील अध्याय ६३. अल् मुनाफ़िकून आणि ६४. अल् तग़ाबुन ही दोन अध्याये जणू जादूची सूत्रे आहेत.

या शास्त्रातील काहीजण शास्त्रशून्य असतात, पण ज्ञानी असल्याचे ढोंग करतात. त्यांची शिकवण निरुपयोगी असते. उलट अशा अडाण्याच्या हाताखाली शिकणारा विद्यार्थी आपले जीवन धोक्यात आणतो. अशा भोंदू गुरूच्या नादी लागून अनेक जण आपले जीवन उद्ध्वस्त करून घेतात, काही वेडे होतात, काही

घाणीत लोळतात, आणि रानावनातून भटकतात. पण गुरू खरा ज्ञानी असला म्हणजे धोका नसतो. प्रस्तुत ग्रंथकर्ता ज़फ़र शरीफ़ यांच्या मते या क्षेत्रात अधिकारी म्हणजे महंमद ग़ौस ग्वाल्हेरी यांचा 'जवाहिर-ए-ख़म्सा' हा ग्रंथ होय. परमेश्वर त्यांच्यावर कृपा ठेवो. हा ग्रंथ म्हणजे मंत्र सिद्धीचा एक अनमोल खजिनाच होय.

हे शास्त्र उपयोगात आणणाऱ्या मांत्रिकास पुढील अटी पाळाव्या लागतात :-

या शास्त्रात प्रवेश करणाऱ्या शिष्यास (विद्यार्थ्यास) नितांत शुद्धता पाळली पाहिजे. कुत्रे, मांजर, अपरिचित व्यक्ती यांना घरात येऊ देऊ नये. उदासारख्या सुगंधी वस्तूचा धूप घरात दरवळत असावा. घराबाहेर जाताना विशिष्ट टोपी आणि लुंगी घालून बाहेर जावे. घरात प्रवेश करताना नेहमी हात धुवावे म्हणजे वज़ू अर्थात आचमन करावे. रात्री अगर दिवसा वीर्यस्खलन झाल्यास ताबडतोब स्नान करावे. चिल्लाच्या म्हणजेच मंडळाच्या चाळीस दिवसांत चटईवर झोपावे. काही लोक या काळात उपवास करतात. झोप व बोलणे थोडे असावे. मिताहार, मितभाषण आणि अल्प निद्रा असावी. ज्या ईश्वरी नावाचा जप चालू आहे, त्यानुसार आहार पाहिजे. 'जलाली' नावांचा जप चालू असेल तर मांस, मासे, अंडी, मध, कस्तुरी, कळीचा चुना आणि स्त्री समागम वर्ज्य करावे. 'जमाली' नावांचा जप असेल तर लोणी, दही, आंबट पदार्थ, मीठ निषिद्ध आहेत. ईश्वरी नामजप करताना लसूण, कांदा, वर्ज्य असतात. ऊ सुद्धा मारावयाची नाही. या कालखंडात धर्मसंमत म्हणजे 'हलाल' वस्तूंचेच सेवन करावे; 'हराम' म्हणजे निषिद्ध वस्तू खाऊ नयेत आणि फक्त सत्य बोलावे. 'जलाली' नावे जपावयाची असतील तर जप शनिवारी आरंभ करावा. 'जमाली' नावासाठी जपारंभ सोमवारी असावा. दोन्ही प्रकारची संमिश्र नावे असल्यास रविवारी जप आरंभ करावा. मंत्रजपाचा हेतु मित्रता असल्यास नवचंद्रदर्शनानंतर आरंभ करावा. जपापूर्वी तीन दिवस उपवास करावा. स्वयंपाक करणाऱ्यानेही मालकाच्यासारखा संयम पाळला पाहिजे नाही तर मालकाने स्वत:चे अन्न स्वत: शिजविले पाहिजे.

एखाद्या व्यक्तीसंबंधी नावे उच्चारण्यास आरंभ करण्यापूर्वी अरबी मुळाक्षराप्रमाणे त्या व्यक्तीच्या नावाच्या आद्याक्षराची माहिती करून घेतली पाहिजे. या आद्याक्षरास 'हुरूफ़-ए-तहज्जी' असे म्हणतात. पौर्वात्य भाषांतील सर्वत्र आढळणारी सात अक्षरे अरबीत नाहीत. त्यांच्या ऐवजी इतर सात अक्षरे पर्याय म्हणून आहेत. अरबी मुळाक्षरे २८ असून संबंध बारा राशिचक्र (बुरूज), सात ग्रह (सितारे) आणि चार मूलद्रव्ये (उन्सार) यांच्याशी आहे. कोणत्या ग्रहाबरोबर कोणता सुगंध असावा या विषयीचे नियम आहेत. तारीख मोजण्याची एक अरबी पद्धत आहे. तिला 'अब्जद' असे म्हणतात. या पद्धतीप्रमाणे प्रत्येक अक्षराला संख्येचे मूल्य आहे. हे मूल्य अलिफ १, बे २, जीम ३, या क्रमाने १० पर्यंत वाढते. यानंतर हे मूल्य दहा दहाने वाढते. उदाहरणार्थ काफ़ २०, लाम ३०, मीम ४०, या प्रकारे टिंबात्मक क़ाफ़ = १०० येथपर्यंत चालतो. नंतर क्रमाने शंभराने मूल्य वाढते. उदाहरणार्थ ग़ैनचे मूल्य १००० आहे. (पृ. क्र. ११२४ व ११२५ वरील अनुक्रमे कोष्टक-३ व कोष्टक-४ (क) पहा.) याबाबत प्रत्येक वाक्याची संख्या असते. उदाहरणार्थ 'ताज' सुलेमान 'अहल-ए-जन्नत' यातील क्रमाने अक्षरांची किंमत काढल्यास १०४५ हिजरी म्हणजे इ. स. १६३३ इतकी भरते.

आता समजा अहमद नावाच्या माणसाला जादूच्या साह्याने रूक़या नावाच्या स्त्रीशी मैत्री करावयाची असेल तर त्याबाबत पुढीलप्रमाणे विचार केला पाहिजे. अहमदचे आद्याक्षर अलिफ़, त्याचे महाभूत अग्नी (तेज), त्याचा ग्रह शनी, राशिचक्र मेष, सिंह, धनू आहे. रूक़याचे आद्याक्षर रे आहे, त्याचे महाभूत पृथ्वी

आहे, ग्रह शुक्र, राशीचक्रचे चिन्ह कन्या, मकर आहे. ही महाभूते परस्पर विरोधी आहेत. अहमदचा ग्रह शनी व रूक़याचा ग्रह शुक्र असल्यामुळे हा पुरुष व ही स्त्री आनंदाने राहू शकतील. या दृष्टीने पुढील तक्ता विचारात घेतला पाहिजे :-

**तक्ता**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शुक्र<br>व<br>शनि | शुक्र<br>व<br>सोम | गुरू<br>व<br>शुक्र | गुरू<br>व<br>सोम | रवि<br>व<br>सोम | गुरू<br>व<br>सोम | रवि<br>व<br>शुक्र | मैत्री |
| सोम<br>व<br>बुध | शनि<br>व<br>बुध | गुरू<br>व<br>बुध | मंगळ<br>व<br>बुध | शुक्र<br>व<br>बुध | मंगळ<br>व<br>शुक्र | रवि<br>व<br>बुध | उदासीन |
| शनि<br>व<br>रवि | शनि<br>व<br>सोम | मंगळ<br>व<br>सोम | मंगळ<br>व<br>रवि | शनि<br>व<br>मंगळ | गुरू<br>व<br>मंगळ | गुरू<br>व<br>शनि | शत्रुत्व |

अशी अनेक प्रकारची कोष्टके तयार केलेली आहेत. उदाहरणार्थ अलिफ, बे, जीम, दाल, ही आद्याक्षरे असली म्हणजे त्या व्यक्तीचा ग्रह शनी असतो. जर अलिफ, हे, तोय, मीम, फ़े, शीन, ज़ाल अशी आद्याक्षरे असली तर त्या व्यक्तीचे महाभूत अग्नी (तेज) असते आणि त्यांची राशी मेष, सिंह, धनु, यापैकी एक असते. (या सारख्या सर्व गोष्टींसाठी कोष्टक क्रमांक ३ चे निरीक्षण करावे. पृ. ११२४ ) प्रत्येक ग्रहाचे परिणाम आणि त्यासाठी लागणारी सुगंधी द्रव्ये यांचीही कोष्टके आहेत. व्यक्तीच्या प्रत्येक नावासाठी ईश्वराची विशेषणे किती वेळ उच्चारावीत हे ठरलेले असते. त्याने कोणती दाने करावीत, मंत्रोच्चार कसा करावा याबाबतचेही नियम ठरले आहेत. उदाहरणार्थ अहमद नाव जर घेतले तर त्यासाठी ईश्वरी नाव ४५०० वेळेला जपले पाहिजे. अशा प्रकारे मंत्र जपाच्या विषयी विविध नियम आहेत. प्रत्येक व्यक्तीला असणाऱ्या पिशाचांची नावे आहेत. उदाहरणार्थ अहमद या नावासाठी हुमारियाल व हमवाकील ही पिशाचे असून शतकिंस्त हे जिन (यक्ष, किन्नर) आहे. या जिनचे आवाहन करावे लागते. प्रत्येक जिनच्या आवाहनाची एक स्वतंत्र पद्धत आहे. म्हणजे प्रत्येक व्यक्तीसाठी मैत्रीचे मंत्र निराळे, शत्रुत्वाचे मंत्र निराळे असतात. ठराविक राक्षस, पिशाच आणि भुते असतात. मंत्रांची ठराविक संख्या असे सगळे आखून दिले गेलेले आहे.

ईश्वराची श्रेष्ठ विशेषणे जपल्यानंतर मांत्रिक जिन अगर पिशाचाला आवाहन करण्यासाठी जपाचा आरंभ करतो. चाळीस दिवसात हे नाव एक लक्ष सदतीस हजार सहाशे तेरा (१,३७,६१३) वेळा जपले पाहिजे. वर दिलेल्या नावाची अक्षरी किंमत २६१३ मिळून वरील जप होतो. हा जप जितक्या दिवसांत करावयाचा तितक्या दिवसांनी भागून दररोज पूर्ण केला जातो. या मंत्र जपाच्या योगाने जप करणाऱ्या (मांत्रिकाचे) मन कित्येकदा तूर्यावस्थेत जाते. त्याला जागृतीत व स्वप्नात नवे अनुभव येऊ लागतात. जिन व पिशाच आपणास उच्च स्वर्गात अगर पृथ्वीच्या तळापर्यंत (रसातळास) विहार करवितात असे वाटू लागते. जिन त्याच्यावर प्रसन्न होतात. ते इच्छा पूर्ण करतात. त्याच प्रमाणे मानव जातीवर प्रभुत्व गाजविण्याचे सामर्थ्य देतात.

ईश्वराचे नाव 'अस्मा-उल्-हुस्ना' म्हणजे वैभवशाली विशेषणे मानली जातात. या विशेषणांचे ज्ञान लेखक ज़फर शरीफ़ यांच्या कै. वडिलांनी त्यास दिले. हा अतिशय गुप्तपणे चालत आलेला वारसाच आहे. या नामाच्यामध्ये अरबी मुळाक्षराशी प्रत्येकाशी संबंधित असणारी दोन दोन नावे आहेत. उदाहरणार्थ या अल्लाहु, करकाइलू ही नावे अलिफशी निगडित आहेत तर या रहमान, अमवा किलू ही नावे बे शी निगडित आहेत. एखाद्याला आपली अपेक्षित इच्छा पूर्ण व्हावी असे वाटत असेल तर त्याने इस्म-ए-जलाली याच्याबरोबर इस्म-ए-हुस्नाचाही जप करावा. याही जपाची प्रत्येक वेळी एक स्वतंत्र पद्धत आहे. समजा, बुऱ्हान नावाचा माणूस याचे मन जिंकावयाचे आहे तर त्याच्या नावातील अक्षरांची किंमत, मग प्रत्येक अक्षराशी संबंधित ईश्वरी विशेषणे, पिशाचांची व भुतांची नावे यावरून एकूण जपाची पद्धत ठरत असते. कोणत्याही जपाच्यावेळी आरंभाला दोनदा असे म्हटले पाहिजे की, हे अल्लाह, तू महंमदा[स.] वर त्यांच्या वंशजावर कृपेचा वर्षाव कर. इब्राहीम व त्यांचे वंशज यांच्यावर कृपेचा वर्षाव कर. (याला दरूद म्हणजे अंतरासत्ती म्हणतात.) हे प्रभू, बुऱ्हानच्या मनात माझ्याविषयी इतकी आत्मीयता निर्माण कर की, त्याला रात्रंदिवस माझ्याशिवाय काही सुचूच नये. असेच दोन वेळेला जप संपतानाही म्हटले पाहिजे.

जिन किंवा पिशाच यांना प्रसन्न करून त्यांचे आवाहन करणे याला 'तश्किर-ए-जिन' असे म्हटले जाते. एखाद्या मांत्रिकाला जर हा पिशाचावरचा ताबा सिद्ध झाला तर तो त्याच्या मदतीने वाटेल ते करू शकेल. अन्न, पैसा त्याला कमी पडणार नाही. पिशाचसिद्धी करणाऱ्या मांत्रिकाने स्वत:ला घरात कोंडून घेतले पाहिजे. घराला लाल गेरूचा रंग दिला पाहिजे. प्रार्थनेची चटईसुद्धा लाल असावी. चाळीस दिवस म्हणजे एक मंडळपर्यंत जप केला पाहिजे. संयम पाळला पाहिजे. शरीराची शुद्धता सांभाळली पाहिजे. अशा जपासाठी समुद्राजवळ, गुहेत, शहराबाहेर एकांत स्थळीची जागा अधिक योग्य असते. जपाला आरंभ झाल्यावर एखाद्या आठवड्यात काही चमत्कार दिसू लागतात. आणि शेवटच्या आठवड्यात भुते आपल्या फौजेसहीत उपस्थित होतात. त्यांना घाबरू नये. त्यांना बोट हलवून बसण्यास सांगावे. आलेल्या भुतांना ईश्वराची प्रेषित सुलेमानची शपथ घालून परत जाण्यास सांगावे. आयुष्यभर अशा मांत्रिकाला व्यभिचारापासून दूर राहावे लागते. नवशिक्याने निष्णात गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय अशी कार्ये करू नयेत. कारण त्यात चूक झाली तर प्राणाला मुकावे लागते.

'जवाहिर-ए-ख़म्सा' या ग्रंथामध्ये प्रार्थनेची काही सामर्थ्ये सांगितलेली आहेत. जेव्हा कुणी माणूस, राजा, सरदार किंवा आपला धनी याच्या भेटीला जातो, तेव्हा त्याने स्वर्गाच्या दिशेने हात पसरून परमेश्वराचे सतरा (१७) वेळा स्तवन करावे व आपल्या ओंजळीत फुंकर मारून आपला चेहरा हातांनी कुरवाळावा. श्रेष्ठांच्या भेटीस गेले म्हणजे या माणसाकडे लक्ष जाताच लगेच राजा असो, सरदार असो, धनी असो तो प्रसन्न होईल. सकाळ संध्याकाळ नमाजनंतर चाळीस (४०) वेळा किंवा सत्तर (७०) वेळा अल्लाहचे स्तवन करावे. त्याचे मन निर्मळ आणि उन्नत होते. त्याला स्वप्नात भविष्य कळते. रविवारी सकाळी सूर्योदयापूर्वी ईश्वराचे चोवीस (२४) वेळा स्तवन करावे, त्याच्या इच्छा पूर्ण होतात. बुधवारी आंघोळ करून नवे कपडे घालावे, धूप जाळावा, अन्नावर अगर पेयावर १११ वेळा स्तवन करून फुंकर मारावी. हे अन्न अगर पेय ज्या व्यक्तीला दिले जाईल ती वश होईल. सकाळ संध्याकाळ ४१ वेळा प्रभुस्तवन करावे, कडवे शत्रू मित्र बनतील. चांदीची चौकोनी मुद्रा असलेली अंगठी करावी. त्यावर प्रार्थनेची अक्षरे लिहावी, ज्यांची किंमत २६१३ होते. ही अंगठी मंत्रून सिद्ध

करावी. पाच हजार (५,०००) वेळा प्रभुस्तवन करून अंगठीवर फुंकर मारून ती आपल्या करंगळीत घालावी. पिशाच्चावर ताबा मिळविण्यास हे सोयीचे होते. राजे व सरदार आज्ञाधारक होतात. अशा प्रकारचे सामर्थ्य मिळविले म्हणजे माणूस 'वली' म्हणजे संत होतो.

याखेरीज पवित्र कुराणामधील पुष्कळशी वचने आहेत. त्यांचाही मंत्राप्रमाणे उपयोग होतो. पण या बाबतीत या क्षेत्रातील एखाद्या तज्ज्ञालाच शरण गेले पाहिजे. अशा प्रकारची वचने गुप्त ठेवण्याची शपथ घातली जाते. एकमात्र सर्व प्रसिद्ध असल्यामुळे सांगता येते. पवित्र कुराणमधील अध्याय ४८ : 'अल्-फ़तह' (स्पष्ट विजय) चे प्रथम श्लोक - ''अिन्ना फ़तह्ना लक फ़त्हम् - मुबीनन्'' - अनुवाद ''(हे पैगंबरा ! हा 'हुदेबिया'चा तह म्हटला म्हणजे खरोखरीच आम्ही तुला एक प्रत्यक्ष (स्पष्ट) विजय (मिळवून) दिला आहे.'' - ४८:१. जर एखाद्याने सतत म्हणण्याचा परिपाठ ठेवला तर त्याच्या इच्छा पूर्ण करतो. पाच वेळच्या नमाजानंतर सतत दरवेळी चाळीस (४०) वेळा जर पुढील श्लोकचा जप केला तर संपत्ती मिळते. या श्लोकमध्ये असे म्हटलेले आहे, ''व अिन्दह् मफ़ातिहुल्गैबि ला यऽलमुहा। अिल्ला हुव व यऽलमु मा फ़िल्बर्रि वल्बह्रि व मा तस्कुतु मिंव्वरकतिन् अिल्ला यऽलमुहा व ला हब्बतिन् फ़ी ज़ुलुमातिल् - अर्ज़ि व ला रत्बिंव्व ला याबिसिन् अिल्ला फ़ी किताबिम् - मुबीनिन्'' - ६:५९ - अनुवाद : ''सृष्टीतील रहस्याच्या किल्ल्या त्या प्रभूजवळ आहेत. ही रहस्ये त्याच्याखेरीज कुणालाच ज्ञात नाहीत. जमिनीवर अगर समुद्रावर जे जे काही घडते ते सारे त्याला कळते. त्याला कळल्याशिवाय झाडाचे पानही गळत नाही. त्याला अज्ञात असा कणही नाही. हिरवी अगर वाळलेली अशी कोणतीही वस्तू त्याने जाणली नाही असे नाही. हे सर्व काही एका स्पष्ट ग्रंथात नमूद केलेले आहे.'' - ६:५९

अबू हुरैरा यांना मांजरे फार आवडत. म्हणून प्रेषित मुहम्मद[स.] यांनी त्यांना अबू हुरैरा म्हणजे मांजरांच्या पिलांचा बाप असे टोपण नाव दिले होते. ते म्हणतात की पाणी व पृथ्वी यांचा चिखल होतो. चिखलापासून आदम बनवला गेला. धूरविरहित अग्नीपासून भुते व पिशाचे बनविली गेली. संतांचे असे म्हणणे आहे की, पिशाचांना शरीर असते, पण ते अदृश्य असते. इब्लीस किंवा शैतान हा भुतांचा बाप आणि मारिया ही त्याची आई, असे म्हणतात. पिशाचांपैकी सुष्टांना जिन (यक्ष) म्हणतात; तर दुष्टांना शैतान म्हणतात. मंत्रसामर्थ्यामुळे जिन एखाद्याच्या मृत्युला कारणीभूत होतीलही, पण तो त्यांचा स्वभाव नव्हे. 'तफ़सीर-ए-बैज़ावी' (बैज़ावी या विद्वानाचे कुराणावरील भाष्य) आणि 'तवारीख़-इ-रौज़तुस्सफ़ा' या पवित्र कुराणावरच्या भाष्य ग्रंथात असे म्हटले आहे की शैतान हे जिनचे अपत्य होते. शैतानाने प्रभुआज्ञेचा भंग केला. त्याने आदमला नमन करणे नाकारले. आदम व हव्वा (या आद्य जोडप्यास) गहू खाण्याची भुरळ घातली. त्यामुळे त्याला 'इब्लीस' म्हणजे 'परमेश्वराच्या दयेचा आज्ञाभंग करणारा' असे नाव मिळाले. आज्ञाभंगाबद्दल जेव्हा आदमला श्रीलंका आणि हव्वाला मक्केच्या परिसरात हद्दपार करण्यात आले तेव्हा त्याला 'शैतान' हे नाव मिळाले. याह्याचा मुलगा सुमास, त्याचा मुलगा तारनुस, त्याचा मुलगा हुलियानस याचा मुलगा शैतान होता असेही सांगितले जाते. शैतानाचे चार खलीफ़ा म्हणजे उत्तराधिकारी आहेत. अलिकचा मुलगा मलिक, जानसचा मुलगा हामूस, बलबतचा मुलगा मब्लूत, यासिफ़चा मुलगा यूसुफ़ हे ते चार खलिफ़ा होत. शैतानाच्या पत्नीचे नाव अव्वा व त्याचे आडनाव अबुलमर्रत (म्हणजे दुष्टपणाचा पिता) असे आहे. आदमचे आडनाव अबुलबशर म्हणजे मानव

जातीचा पिता असे आहे. आदमला जसे हाबील, काबील, कैन आणि शीस अशी चार मुले होती, तशी शैतानाला नऊ (९) मुले आहेत. शैतानाची ही मुले आदमच्या वंशाचे शत्रू आहेत. ते त्यांना चांगली कृत्ये करू देत नाहीत. उलट त्यांना पापकर्म करण्यास प्रवृत्त करतात. मनुष्याच्या कुटुंबात एकाची वाढ झाली की शैतानाच्या कुटुंबात नऊ (९) मुलांची भर पडते.

अब्दुल्ला अन्सारीचा मुलगा जाबिर याने 'शरह-ए-बुख़ारी' मध्ये असे लिहिले आहे की परमेश्वराने सर्व प्राणिमात्रांची देवदूत, शैतान, जिन व मनुष्यप्राणी या चार वर्गांत विभागणी केली आहे. परंतु प्रेषितांचा साथी असलेल्या अबू दरदाने वेगळीच माहिती दिली आहे. तो म्हणतो की प्रथम सर्प व विंचू आणि त्यानंतर क्रमाने कीटक, भुते, आदमची मुले, सर्व चतुष्पाद प्राणी, पक्षी व तत्सम प्राणी आले.

मलिक गश्तान हा सर्व जिनचा राजा असून त्याचे क़ाफ नावाच्या पर्वतावर वास्तव्य आहे. हा पर्वत सखरात नावाच्या पाचूच्या दगडावर आधारित असून त्या पाचूपासून आकाशाला निळा रंग प्राप्त झाला आहे. या पर्वताच्या पूर्वेकडील प्रदेशात मलित गश्तानचे तीन लक्ष सेवक असून पश्चिमेकडील प्रदेशातील त्याचा जावई अब्दुल रहमान हा आपल्या तीन हजार सेवकांसहित राहतो. या दोघांना आदरणीय मुहमंद मुस्तफा[स.] यांनी ही मुस्लिम नावे दिलेली आहेत. मुस्लिम जिनचे राजे यांच्या नावाच्या शेवटी 'नूस' ही अक्षरे लावतात. उदा. तारनूस, हुलियानूस, दखियानूस. तरसाचे राजे आतिशपरस्त म्हणजे अग्नीचे उपासक असतात. त्यांच्या नावाच्या शेवटी 'नास' ही अक्षरे असतात. उदा. जालूनास हिंदू जिनच्या राजांच्या शेवटी 'तास' ही अक्षरे असतात. उदा. नकतास. हा नकतास जेव्हा प्रेषित शीसच्या सेवेत आला तेव्हा त्याने इस्लामचा स्वीकार केला. प्रत्येक जिनच्या खऱ्या रूपाबद्दल बोलावयाचे झाल्यास ते ९/१० चैतन्य आणि वायू तर १/१० शरीर असे असतात.

भूतबाधेने जे लोक पछाडलेले असतात त्यांपैकी काहींची वाचा बसते, काही डोळे हलवितात, काही वेडे होतात व नागवे फिरतात. ते सुप्त होऊन लोळतात, नित्याचे काम करावेसे वाटत नाही. अशा वेळी मांत्रिकाला बोलावून रोगी दुरूस्त करावा लागतो. भुतांना ताब्यात आणण्यासाठी जादूच्या वर्तुळाचा उपयोग करतात. मंत्रविद्येसाठी आवश्यक असणारी आकृती म्हणजे वर्तुळ किंवा चौरस जमिनीवर अगर फळीवर काढतात. त्यासाठी राख, कोळसा, विभूत, रंगीत पावडर, चंदन यांचा वापर करतात. बाधा झालेल्या माणसाला या आकृतीच्या मध्यभागी बसवतात व अफसून (मंत्र) म्हणतात. आकृत्यांच्या भोवती फळे, फुले, विडे, मिठाई व कित्येकदा मद्य ठेवण्यात येते. बकरी बळी देतात. भूत काढण्यासाठी राख, पाच प्रकारचे धान्य यांच्यावर मंत्र टाकतात आणि मंतरलेले पदार्थ बाधा पीडितांच्या अंगावर टाकतात. त्याच्यासमोर ऊद, अबीर यांसारखी सुगंधी द्रव्ये जाळतात. भूतग्रस्तांला डोळे मिटण्यास सांगतात आणि मांत्रिक म्हणतो, हे भुता, तू जर पुरुष असशील तर डोके उजवीकडे, स्त्री असशील तर डावीकडे आणि नपुसंक असशील तर समोर झुकव. मंत्र म्हणणे संपल्यावर मांत्रिक रोग्याला काही प्रश्नही विचारतात. मंत्रांच्यामध्ये फतूना, हबिबेका, आलमीन, सकीका, कहलात, महलान, सदीदान, नबियान इत्यादींना आवाहन असते. दाऊदचा मुलगा सुलेमान याच्या मुद्रेने त्यांना येण्यास आवाहन असते. भुताने रोग्याला पकडण्याची कल्पना ही मूर्खपणाची आहे, ती सामान्य माणसांच्या कल्पनाशक्तीतून निघालेली आहे.

एखाद्या माणसाला भूत लागले म्हणून म्हणावयाचे मंत्र पुष्कळ आहेत. पण ते वगळण्यात येत आहेत. भुताने एखाद्या माणसाचा ताबा घेतल्यानंतर दोन तीन आठवडे, कित्येकदा दोन, तीन महिने सोडीत नाही. काही भुते पळू नयेत म्हणून बाधा झालेल्या व्यक्तीच्या केसाला मंत्रपूर्वक गाठ मारून त्यावर फुंकर मारतात व मंत्र म्हणतात, ''हे सर्वज्ञ प्रभू ! तुझ्या कानाने तू सर्व ऐकतोस आणि सारे काही ऐकता येणे हेच तुझ्या कानाचे सामर्थ्य आहे.'' भूतबाधा झालेला माणूस कित्येकदा मोठ्याने ओरडतो, कोंबडे पकडून त्याला चावतो. पेटलेली वात तोंडात ठेवून इतरत्र पळत जातो. अशावेळी मांत्रिक भूतबाधा झालेल्या माणसाला मंतरलेल्या छडीने मारतो. भूत मोठ्याने ओरडू लागते. भूत शरण आल्यावर त्याला खाण्यापिण्यासाठी काय हवे हे विचारतात. ज्वारी, तांदूळ, दहीभात, मासे, कोंबडे, अंडी, बकरी, दारू, मिठाई, फळे इत्यादी वस्तू भूत मागते. या वस्तू बाधा झालेल्या माणसावरून ओवाळतात. नंतर नदीकडील किंवा झाडाच्या बुडाशी ठेवल्या जातात. भूतबाधा झालेला माणूस दोन दोन तीन तीन माणसास उचलणार नाही एवढा मोठा दगड घेऊन कित्येकदा पळतो. मांत्रिक त्याला केस धरून लोळवितो. पवित्र कुराणमधील आयतल कुर्सी हे महाश्लोक म्हणण्यात येते. (हा मुळ अरबीमधील श्लोक कृपया पृ. १११७-१८ वर पहावे.) तो श्लोक असा आहे, ''परमेश्वराखेरीज शाश्वत, जिवंत व जागृत कुणीच नाही. झोप त्याचा ताबा घेऊ शकत नाही. स्वर्गात अगर पृथ्वीवर जे जे आहे ते ते त्याचे आहे. त्याच्या परवानगीशिवाय त्याच्यापुढे मध्यस्थी कुणी करू शकत नाही. तो प्रभू भूत-भविष्याचा ज्ञाता आहे. त्याचे (सत्ता) सिंहासन सर्वोच्च व श्रेष्ठ आहे. त्याच्याशिवाय दुसरा कुणी प्रभू नाही.'' - २:२५५ हे म्हणताना मांत्रिक लोखंडाचा खिळा किंवा लाकडी खुंटी जमिनीत ठोकून त्यावर मंत्र फुंकतो. बाधा झालेल्या माणसाचे एक दोन केस उपटून एका बाटलीत घालून बूच लावतात व ही बाटली पुरून टाकतात.

भूतबाधा झालेला माणूस भूत निघून जाताच शुद्धीवर येतो. त्याच्या तोंडावर कुराणचे मंत्र म्हणून पाणी शिंपडतात. ''ला होल वला कुव्वता इल्ला बिल्लाहि अलिय्युल्-अज़ीम'' अर्थात ''त्या सर्वोच्च व महान परमेश्वरा शिवाय कुणाचीही सामर्थ्य-शक्ती नाही आणि कुणाचीही बिशाद नाही.'' असे म्हणण्यास सांगतात. अल्लाहशिवाय कुणी श्रेष्ठ नाही, कुणी स्तुतीपाठक नाही असा अर्थ आहे. या रोग्याला पुन्हा भूतबाधा होऊ नये म्हणून मांत्रिक विशिष्ट प्रकारचे ताईत त्याच्या गळ्यात किंवा दंडावर बांधतात.

एखादा माणूस फार दिवस आजारी असला तर या आजारीपणाचे कारण भूतबाधा आहे काय याची खात्री करून घेण्यासाठी खालील प्रकारची एक आकृती काढतात :

| | |
|---|---|
| भुते | पऱ्या |
| रोग | जादूटोणा करणारे |
| जिन | |

आजारी माणसाच्या हातात फुले देतात. मग मांत्रिक आपल्या हातात फुले घेतो. व फुंकर मारून रोग्याच्या हातावर टाकतो. रोग्याचे हात कोणत्या दिशेने वळतात हे पाहून त्या रोग्याच्या रोगाचे कारण हुडकतात. काही भुते झोपेतच एखाद्याला पछाडतात. त्यांना हाकलून लावण्यासाठी एक अभिमंत्रित वात तयार करण्यात येते. ही वात लावलेली असल्यास भुते तेथून निघून जातात.

काही वेळा जिन घरात शिरून अन्न चोरतात, घरात राहणाऱ्यांना नेहमी आजारी पाडतात आणि त्रास देतात. अशा वेळी सकाळ संध्याकाळ तीन दिवस पाण्यावर फुंकर टाकून एकवीस (२१) वेळा मंत्र म्हणतात व ते पाणी घरात शिंपडतात. लोखंडी खुंट्यावर मंत्र टाकतात आणि त्या खुंट्या घराच्या चारही कोपऱ्यात जमिनीत पुरतात. हा मंत्र पुढीलप्रमाणे आहे. :- ''ते माझ्याविरुद्ध कट रचतात, मी त्यांच्या विरुद्ध कट रचीन, म्हणून तू अश्रद्धांशी शांतपणे वाग, त्यांना एकटे सोड, त्यांचा विचार मी करीन.'' काही जण 'असहाब-उल्-कहफ़' म्हणजे प्रेषितांचे गुहेतील साथीदार यांची त्यांच्या कुत्र्यासहित नावे लिहितात व घराच्या भिंतीवर लावतात. अशा प्रकारे घरात शिरण्यापासून भुतांना परावृत्त केले जाते.

काही मंत्र धुराचे आहेत. पऱ्या, भीती, भुते, तीन दिवसांनी येणारा ताप, स्वप्ने इत्यादीच्यासाठी हे धुराचे मंत्र असतात. हे मंत्र म्हणून अग्नीवर ऊद टाकतात व रोग्याला हा मंतरलेला धूर देतात. ताप नाहीसा करण्यासाठी झाडाची पाने घेतात. शनिवारी एका पानावर, नरक भुकेला आहे, दुसऱ्यावर नरक तहानेला आहे, तिसऱ्यावर नरक ताजातवाना झाला आहे असे लिहितात. ही तीन पाने एका फडक्यात गुंडाळतात व रोग्याच्या डाव्या दंडावर बांधतात. एका कागदावर हात न उचलता परस्परांना छेदणारे दोन त्रिकोण काढतात व ते एका छोट्या कापडाच्या पिशवीत शिवून रोग्याच्या गळ्यात बांधतात. ताप उतरल्यावर हे सगळे नदीत किंवा विहिरीत टाकतात.

**वशीकरण :** मुसलमानांमध्ये वशीकरणही पुष्कळ आहे. नवरे जेव्हा आपल्या बायकांच्याकडे दुर्लक्ष करतात किंवा इतर स्त्रियांकडे आकर्षित होतात, तेव्हा स्त्रिया सामान्यपणे **मोहिनी** किंवा **वशीकरण** यांचा वापर करतात. अशा प्रकारच्या वशीकरणाला अनेकदा विड्याची पाने किंवा सुपारी देतात. म्हणून एखादा पुरुष जर एखाद्या स्त्रीच्या प्रभावाखाली येऊन तिच्या दुर्वर्तनाकडे दुर्लक्ष करीत असेल, तर तिने त्याला सुपारी दिली असेल असे म्हणतात. सरड्याचे मांस आणि जंगली वनस्पतीची मुळे यांचासुद्धा वशीकरणासाठी वापर होतो. घुबडाचे मांस हे वशीकरणाचे एक प्रभावी साधन आहे. जार स्त्रिया आपल्या नवऱ्याला हे खाऊ घालतात. हे मांस खाल्ल्यावर माणूस मुर्ख होतो. त्याची स्मरणशक्ती नाहीशी होते. स्त्रिया आपल्या दुर्वर्तनाकडे पतीचे दुर्लक्ष व्हावे म्हणून हा उद्योग करतात. काही स्त्रिया हिंदूंच्या स्मशानात जाऊन चितेतील राख मिळवितात व ती मंत्रून पुरुषाच्या अंथरूणावर टाकतात. यामुळे **मोहिनी** होते. पंजाबमध्ये दरोडेखोर अशी राख आपल्या जवळ ठेवतात आणि घरातील माणसंच्या अंगावर शिंपडतात. त्यामुळे ती माणसे जागी होत नाहीत. अजून एक प्रसिद्ध **मोहिनी** म्हणजे मोहिनी काजळ आहे. हे काजळ भुवयांना घासतात, डोळ्यात घालतात. थोडेसे आपल्या पतीच्या केसाला व पायाला लावतात. म्हणजे पती एकनिष्ठ राहतो. जाफ़र शरीफ़ म्हणतो, अधुनमधून कुराणची एखादी आयत (श्लोक) म्हणावी, ती पाणी पिण्यापूर्वी, जेवणापूर्वी म्हणावी म्हणजे त्या स्त्रीचे कल्याण होते. तिचा पती पापनिवृत्त होतो. मोहिनीचा एक फार चांगला वापर आहे. एखाद्या स्त्रीला वश करण्यासाठी मिठावर महिन्याच्या एक तारखेला मंत्र म्हणतात; ''मीठ! मीठ! सप्तसमुद्राच्या अर्का !'' पुढे त्या अपेक्षित स्त्रीचे नाव घेऊन म्हणतात, ''माझे मीठ खा आणि माझ्या पायाचे चुंबन घे.'' मोहिनी करणारा माणूस हे मीठ पाण्यात टाकून पिऊन टाकतो. त्याची प्रेयसी उत्कटपणे त्याच्या प्रेमात पडते. अजून वाङ्‌निश्चय झालेला नाही अशा मुलीने पिंजलेल्या कापसाचे सात किंवा नऊ दोरे एकत्र करून त्याला सात गाठी पाडतात. नंतर संबंधित स्त्रीला

परिणामाची सूचना देतात. तिने ऐकले नाही तर एक गाठ सोडतात आणि त्याबरोबरच तिच्या विजारीचा नाडा तुटतो. या मंत्राला 'विजार-नाडा-तोड' मंत्र असे म्हणतात.

जर एखाद्या जातीच्या पंचायतीसमोर निर्णयासाठी एखादी केस आली तर पंचायतीचा निर्णय आपल्याला अनुकूल लागावा म्हणून पुष्कळदा मंत्रतंत्र वापरतात. काही जण कड्यावर मंत्र कोरतात किंवा अभिमंत्रित ताईत आपल्या मनगटात किंवा दंडात घालतात. काही जण कागदावर मंत्र लिहितात आणि तो कागद जरीच्या अगर रेशमी कपड्यात बांधून गळ्यात घालतात किंवा पटक्यात घालतात. काही जण यासाठी विविध प्रकारच्या वनस्पतींच्या मुळ्या वापरतात. या मुळ्या ठराविक विधीनुसार आणाव्या लागतात. वनस्पतींची पूजा करून, वनस्पतींना कोंबडी, फळे व दारू अर्पण करतात, कोंबडी बळी देतात, नंतर वनस्पती घेतात. या शास्त्राचे ज्ञान हिंदू संन्यासी व बैरागी यांनाच चांगले असते. खरे म्हणजे यापैकी पुष्कळसे मंत्र हिंदूंच्याकडून उचलले आहेत.

दोन व्यक्तींच्यामध्ये वैर निर्माण करण्यासाठी पवित्र कुराणचे १०५ वा अध्याय सूरतुल्-फील म्हणजे हत्तीचे प्रकरणाचे वाचन करणे ही सामान्य प्रथा आहे. ते प्रकरण असे आहे -

**१०५. सूरतुल्-फ़ील (हत्तीचे प्रकरण)**

**बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम**

अलम् तर कैफ़ फ़अल रब्बुक बिअस्हाबिलिफ़ीलि (१) अलम् यज्अल् कैदहुम् फ़ी तज़्लीलिन (२) व्व अर्सल अलैहिम् तैरन् अबाबील (३) तर्मीहिम् बिहिजारतिम्-मिन् सिज्जीलिन् (४) फ़ज़अलहुम् कअस्फ़िम् - मअ्कूलिन् (५)

**भाषांतर**

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

तू हे पाहिले नाहीस काय की तुझ्या विधात्याने हत्तीवाल्या लोकांबरोबर कसा व्यवहार केला? (१) काय त्याने त्यांची योजना फोल ठरविली नाही? (२) आणि त्याने त्यांच्यावर पक्ष्यांचे थवेच्या थवे पाठविले. (३) की ती खंकरांचे खडे (वरून) त्यांच्यावर फेकीत होती; (४) येथपर्यंत की त्यांनी त्यास (गुरांनी) खाऊन टाकलेल्या पाल्याप्रमाणे (तळपट) करून टाकले. (५)

दुपारच्या वेळी कबरीवरील मातीवर ४१ वेळा मंत्र म्हणावा आणि ज्याच्यात वैर व्हावे अशी इच्छा आहे त्या मंडळींच्या घराकडे जाण्यायेण्याचा रस्त्यावर ती माती टाकावी. किंवा चाळीस मिरे घ्यावे, एक आठवडाभर तो मंत्र सकाळ संध्याकाळ जपून मिरे जाळून टाकावे किंवा स्मशानात अगर मशिदीत बोडख्याने (म्हणजेच शिरस्त्राण-टोपी, फेटा डोक्यावर न घालता) जावे. दुपारच्या वेळी ४१ दिवस आपल्या शत्रूच्या घराकडे तोंड करून ४१ वेळा मंत्र म्हणावा म्हणजे निश्चितपणे वैर निर्माण होते. हा मंत्र असा आहे - 'तुझ्या परमेश्वराने हत्तीच्या सैन्याचा प्रतिकार कसा केला हे तू पाहिले नाहीस का? त्याने त्यांची योजना उधळून लावली नाही काय? परमेश्वराने त्या हबशांच्यावर पक्षांच्या झुंडी पाठविल्या, त्याने त्यांच्यावर मातीची ढेकळे टाकली आणि त्यांना रोपट्यांच्या कापून उरलेल्या खुंटांप्रमाणे केले नाही काय?' - १०५:१-५. या मंत्राच्या शेवटी 'हे प्रबळा, हे सर्वशक्तिमान, हे मृत्युच्या देवदूता आम्ही त्याच्यामध्ये तिरस्कार व मत्सर निर्माण केला आणि हा तिरस्कार पुनरुत्थानाच्या दिनसापर्यंत टिकेल.' असा मंत्रही जोडतात. एखाद्या माणसाला आपल्या प्रबळ शत्रूचा

बदला घ्यायचा असेल तर पुढील पद्धत अवलंबितात. फरंतु प्रत्येकालाच यामध्ये यश मिळेल असे नाही. आणि संकटग्रस्तांच्या सुटकेसाठीच जाणकार हा मंत्र वापरतात. 'खऱ्या दुःखी माणसाच्या बाबतीत परमेश्वर त्याची प्रार्थना ऐकतो.' प्रबळ शत्रूच्या प्रतिकारासाठी पवित्र कुराणाचे १११ वे प्रकरण सूरतु-ल्लहब उलटीकडून म्हणजे शेवटाकडून आरंभाकडे म्हणावे. याला 'माकूस' अर्थात विपरीत असे म्हणतात.

**१११. सूरतु-ल्लहब (अबू लहबचे प्रकरण)**

**बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम.**

तब्बत यदा । अबी लहबिंव्व तब्ब (१) मा । अग़ना अनहु मा लुह व मा कसब (२) सयस्ला नारन् ज़ात लहबिन् (३) व्वम्रअतुह् हम्मालतल-हतबि (४) फ़ी जीदिहा ह्ब्लुम्-मिम्-मसदिन् (५)

**भाषांतर**

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

अबू लहबचे दोन्ही हात नष्ट होतील आणि तो ही नष्ट पावेल. (१) त्याची धनसंपत्ती आणि त्याने जे काही कमावलेले असेल ते त्याच्या काहीही कामी येणार नाही. (२). लवकरच तो (नरकाच्या) भडकत्या आगीत प्रविष्ट होईल; (३) आणि त्याची ती पत्नी (देखील) जी आगीमध्ये इंधन टाकीत असते, (४) तिच्या गळ्याभोवती खजूरीचा पिळदार दोर असेल. (५)

किंवा एक नऊ इंचाची हिंदू स्मशानातली राखेची किंवा कबरीवरील मातीची बाहूली करावी. कुराणाच्या १०५ व्या अगर १११ व्या प्रकरणाचा 'माकूस' म्हणजेच विपरीत जप करावा. २१ लहान लाकडी खुंट्यावर प्रत्येकीवर तीन वेळा मंत्र म्हणून या खुंट्या बाहुलीच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांत ठोकाव्यात. प्रेतावर आच्छादितात तसे बाहुलीवर कफन (प्रेतवस्त्र) घालावे. शत्रूचे नाव घेऊन ही बाहुली पुरावी म्हणजे शत्रू लवकर मरून जातो, असा विश्वास बाळगतात. अजून एक पद्धत म्हणजे जमिनीवर कच्च्या विटेवर एक मानवी आकृती काढतात. त्यावर पुढील मंत्र म्हणतात – 'हे सर्व शक्तिमान, तू भयंकर रागीट आहेस. तुझा सूड आणि क्रोध कुणीही सहन करू शकत नाही.' यामुळे प्रबळ शक्तीचा प्रतिकार होतो असे मानतात. किंवा कुराणचे प्रकरण ५० सूरतु-क़ाफ़ हे दररोज सकाळ संध्याकाळ ४१ वेळा ४१ दिवस म्हणावे.

**५०. सूरतु-क़ाफ़ (क़ाफ़चे प्रकरण)**

**बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम**

काफ़ । वल्कुर्आनिल् – मजीदि (१) बल् अजिबू । अन् जा । अहुम् मुन्ज़िरुम् – मिन् हुम् फ़कालल् – काफ़िरून हाज़ा शैउन् अजीबुन् (२) अअिज़ा मित्ना व कुन्ना तुराबन् ज़ालिक रज्उम् बअीदुन् (३) क़द् अलिम्ना मा तन्कुसुल् – अर्जु मिन्हुम् व अिन्दता किताबुन् ह्फ़ीज़ुन् (४) बल् क़ज्ज़बू बिल्हक़्क़ि लम्मा जा। अहुम् फ़हुम् फ़ी। अम्रिम् – मरीज़िन् (५) अ फ़ लम् यन्ज़ुरू। अिलस्समा।अि फ़ौक़हुम् कैफ़ बनैनाहा व ज़यन्नाहा व मा लहा मिन् फ़ुरूज़िन् (६) वल्अर्ज़ मद्दनाहा व अलक़ैना फ़ीहा खासिय व अम्बतना फ़ीहा मिन् कुल्लि ज़ौजिम् – बहीजिन् (७) तब्सिरतंव्व ज़िक्रा लिकुल्लि अबदिंम्-मुनीबिन् (८) व नज़्ज़ल्ना मिनस्समा।अि मा अम्-मुबारक़न् फ़अम्बत्ना बिह जन्नातिंव्व हब्बल-हसीदि (९) वन्नख़्ल बासिक़ातिल्लहा तल्उन् नज़ीदुन (१०) र्'रिज़्क़ल् – लिल्इबादि व अह्यैना बिह बल्दतम-मैतन् क़जालिकल-ख़ुरूजु (११)

कज़्ज़बत् क़ब्लहुम् क़ौमु नूहिंव्व अस्हाबुर्रस्सि व समूदु (१२) व आदुव्व फ़िर्औनु व इख़्वानु लूतिन् (१३) व्व। अस्हाबुल् – अैकति व क़ौमु तुब्बइन् कुल्लुन् कज्जबर्रुसुल फ़हक़्क़ वओदि (१४) अफ़अयीना बिल्ख़ल्क़िल् – अव्वलि बल् हुम् फ़ी लब्सिम् – मिन् ख़ल्क़िन् जदीदिन् (१५) व लक़द् खलक़्नल् – इन्सान व नऽलमु मा तुवस्विसु बिह नफ़्सुह् व नहनु अक़रबु इलैहि मिन् हब्लिल–वरीदि (१६) अिज़् यतलक़्क़ल् – मुतलक़्क़ियानी अनिल्यमीति व अनिश्शिमालि क़ओदुन् (१७) मा यल्फ़िज़ु मिन् क़ौलिन् इल्ला लदैहि रक़ीबुन् अतीदुन् (१८) व जा।अत् सक्रतुल् – मौति बिलहक़्क़ि ज़ालिक मा कुन्त मिन्हु तहीदु (१९) व नुफ़िख फ़िस्सूरि ज़ालिक यौमुल् – वओदि (२०) व जा।अत् कुल्लु नफ़्सिम – मअहा सा, अिकुंव्व शहीदुन् (२१) लक़द् कुन्त फ़ी गफ़्लतिम्– मिन् हाज़ा मा लदय्य अतीदुन् (२३) अल्क़िया फ़ी जहन्नम कुल्ल क़फ़्फ़ारिन् अनीदिन् (२४) म्मन्नाअिल – लिल्ख़ैरि मुऽतदिम् – मुरीबि (२५) अल्लज़ी ज़अल मअल्लाहि इलाहन् आख़र फ़अलक़ियाहु फ़िल् अज़ाबिश्शदीदि (२६) क़ाल क़रीनुह् रब्बना मा अत्ग़ैतुह् व लाकिन कान फ़ी ज़लालिम्–बओदिन् (२७) क़ाल ला तख़्तसिमू लदय्य व क़द क़द्दम्तु इलैकुम् बिल्वओदि (२८) मा युबद्दलुल्–क़ौलु लदय्य व मा'अना बिज़ल्लामिल्–लिल् अबीदि (२९) यौम नक़ूलु लिजहन्नम हलिम्तलअ्ति व नक़ूलु हल् मिम्–मज़ीदिन् (३०) व उज़्लिफ़तिल् – जन्नतु लिल् – मुत्तक़ीन ग़ैर बओदिन् (३१) हाज़ा मा तूअदून लिकुल्लि अव्वाबिन् हफ़ीज़िन् (३२) मन् ख़शियर्रह्मान बिलग़ैबि व जा।अ बिक़ाल्बिम् – मुनीबि (३३) अद्ख़ुलूहा बिसलामिन् ज़ालिक यौमुल्ख़ुलूदि (३४) लहुम् मा यशा।ऊन फ़ीहा व लदैना मज़ीदुन् (३५) व कम् अह्लक्ना क़ब्लहुम् मिन् क़र्निन् हुम् अशद्दु मिन्हुम् बत्शन् फ़नक़्क़बू फ़िल्बिलादि हल् मिम्–महीसिन् (३६) इन्न फ़ी ज़ालिक लाज़िक्रा लिमन् कान लह् क़ल्बुन् औ अल्क़स्सम्अ व हुव शहीदुन (३७) व लक़द् ख़लक़्नस्समावाति वल्अर्ज़ व मा बैनहुमा फ़ी सित्तति अय्यामिन् व्व मा मस्सना मिल् – लुग़ूबिन् (३८) फ़स्बिर् अला मा य़क़ूलून व सब्बिह् बिहम्दि रब्बिक क़ब्ल तुलूअिश्शम्सि व क़ब्लल्–गुरूबि (३९) व मिनल्लैलि फ़साब्बिहहु व अद्बारस्सुजूदि (४०) वस्तामि यौम युनादिल्मुनादि मिम्–मकानिन् क़रीबिन् (४१) य्यौम यस्मअूनस– सैहत बिल्हक़्क़ि ज़ालिक यौमुल–ख़ुरूज़ि (४२) इन्ना नहनु नुह्य व नुमीतु व इलनल् – मसीरु (४३) यौम तशक़्क़ कुल् अर्ज़ु अऩहुम् सिराअन् ज़ालिक हशूरून अलैना यसीरुन् (४४) नहनु अऽलमुबिमा य़क़ूलून व मा।अन्तअलैहिम् बिब्बारिन् फ़ज़क्किर् बिलकुर्आनि मंय्यख़ाफु वओदि (४५)

**भाषांतर**

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

क़ाफ़ (सर्व शक्तिमान). या गौरवशाली कुरआनची शपथ, (१) त्यांना (या गोष्टीचा) अचंबा वाटतो की त्यांच्या मधूनच त्यांच्या प्रत एक सावध करणारा हा आलेला आहे. आणि श्रद्धाहीन म्हणतात (की), 'ही एक अद्भूत गोष्ट आहे !' (२) 'काय जेव्हा आम्ही मृत झालेले असू व आमची माती झालेली असेल, तेव्हा (आम्हाला पुन्हा जिवंत करून उठवण्यात येईल)? हे (असे) परत येणे (शक्यतेच्या) फार पलीकडची गोष्ट आहे जो प्रत्येक गोष्टीचे) जतन करतो. (४) खरी गोष्ट अशी आहे की जेव्हा सत्य त्यांच्या प्रत आले तेव्हा त्यांनी त्याचा इन्कार केला, आणि म्हणून ते गोंधळून गेलेले आहेत. (५) त्यांनी आपल्यावर असलेल्या आकाशाकडे पाहिलेले नाही काय, की आम्ही ते कसे निर्माण केले आणि सजवले, आणि त्यामध्ये कोणत्याही

उणीवा नाहीत? (६) आणि ती भूमी – आम्ही तिला विस्तीर्ण पसरून ठेवली आहे, आणि ती मध्ये मजबूत पर्वत उभे केले आहेत; आणि ती मध्ये आम्ही प्रत्येक (प्रकारच्या) सुंदर वस्तू उगवल्या आहेत. (७) (ईश्वराकडे) वळणाऱ्या प्रत्येक भक्तासाठी ज्ञानाची व बोधाची (साधने) म्हणून. (८) आणि आम्ही आकाशातून कृपाप्रसादाने संपन्न (असलेले) पाणी (भूमीवर) पाठवले आहे, आणि त्याच्या सहाय्याने आम्ही बागबगीचे व अन्नधान्याची पिके उगवीत असतो. (९) आणि एकमेकांवर लगडलेले फळांचे घोस असलेले खजुरांचे उंच उंच वृक्ष (उगवीत असतो). (१०) (ते) (आमच्या) भक्तांच्या उपजीविकेसाठी आणि त्या (पाण्याच्या) सहाय्याने आम्ही मृतवत झालेल्या जमिनीला जीवन देतो. याच प्रकारे (मृत्युनंतर) पुनरुत्थान होणार आहे. (११) ज्यांच्या पूर्वी (सत्याचा) इन्कार नूहच्या जमातीच्या लोकांनी केला आणि खंदकवाल्या (जमातीच्या) लोकांनी आणि समूदच्या (लोकांनी). (१२) आणि आदच्या (लोकांनी) व फ़िरऔनने आणि लूतच्या भाऊबंदांनी, (१३) आणि 'वनवासी' लोकांनी व 'तुब्बा'च्या जमातीच्या लोकांनी. (त्या) सर्वांनी प्रेषितांना खोटे ठरवले (व) त्याचा परिणाम असा झाला की माझ्या भयंकर शिक्षेची (आपत्ती) (त्यांच्यावर) कोसळली. (१४) पहिल्यांदा निर्मिती करून आम्ही थकून गेलो (असे यांना वाटते की काय?) (अजिबात) नाही. तरीही हे लोक दुसऱ्या वेळेस निर्माण केल्या जाण्यासंबंधाने (निराधार) शंका घेत आहे. (१५) आणि निश्चितच, आम्ही मानवास निर्माण केलेले आहे आणि त्याचे मन जे काही ध्वनित करते ते आम्ही जाणून आहो; आणि (त्याच्या) कंठतील शीरेपेक्षा (धमनीपेक्षा) ही आम्ही त्याच्या अधिक निकट आहोत. (१६) जेव्हा एक उजव्या बाजूस व (दुसरा) डाव्या बाजूस असे बसून दोन (देवदूत) (मनुष्यांच्या कर्माची) नोंद करीत असतात, (१७) तेव्हा ते त्याच्या बाजूस (त्याची नोंद करण्यासाठी) एखादा प्रतिपालक (देवदूत) नसेल तर एक शब्द देखील उच्चारणार नाही. (१८) मृत्युची गुंगी अवश्य येईल; हीच ती गोष्ट होय, जी पासून तू पळून जाऊ पहात होतास. (१९) आणि शिंग फुंकण्यात येईल, 'हाच तो वचनाचा दिवस होय' (२०) आणि प्रत्येक मनुष्य समोर येईल (आणि) त्याच्याबरोबर एक हाकणारा (देवदूत) असेल. (२१) 'याकडे तू दुर्लक्ष केले होतेस; आता आम्ही तुझ्यावरून तुझा पडदा दूर केला आहे, आणि आज तुझी दृष्टी अतिशय तीक्ष्ण झाली आहे.' (२२) आणि त्याचा सोबती म्हणेल (की), 'माझ्याकडे तयार असलेला (कर्माचा लेखा) जो काही आहे तो हाच आहे. (२३) (हे) दोन (देवदूतांनो) नरकात ढकलून द्या (सत्याच्या) प्रत्येक कृतघ्न शत्रूला, (२४) सत्कृत्यास प्रतिबंध करणाऱ्यास, संशय उत्पन्न करणाऱ्यास, (२५) ज्याने अल्लाहशिवाय दुसऱ्याला ईश्वर ठरवले, म्हणून तुम्ही दोन (देवदूतांनो) त्यास कठोर शिक्षेमध्ये ढकलून द्या.' (२६) त्याचा साथी म्हणेल (की), 'हे आमच्या विधात्या, मी त्यास विद्रोह करायला लावलेले नाही; तर तो (स्वत:च) पथभ्रष्ठतेच्या बाबतीत फार (मर्यादेच्या) बाहेर गेलेला होता.' (२७) (त्यावर ईश्वर) म्हणेल (की) 'माझ्या समक्ष भांडण करू नका, (लक्षात ठेवा) या आधीच मी तुम्हाला (शिक्षेची) सूचना दिलेली आहे. (२८) माझ्या समक्ष कोणतेही कथन बदलता येत नाही. आणि मी (माझ्या) भक्तांवर मुळीच अन्याय करीत नसतो.' (२९) त्या दिवशी आम्ही नरकास (असे) म्हणू (की), 'तू भरून गेला आहेस का?' आणि तो असे उत्तर देईल (की), 'आणखी कोणी आहेत का?' (३०) आणि स्वर्ग सदाचरणी लोकांच्या (इतका) निकट आणण्यात येईल, (की) तो जास्त दूर नसेल. (३१) हीच ती (गोष्ट) होय जिचे तुम्हाला (आणि) जो नेहमी (ईश्वराची) ओढ बाळगतो आणि

(आपल्या कर्मांविषयी) सावधगीरी बाळगतो त्या प्रत्येकास, वचन देण्यात आले होते., (३२) (त्यास) जो मनात कृपाशील (ईश्वराचे) भय बाळगत होता, आणि अंत:करणात पश्चात्तापाची भावना ठेवून (त्याच्याकडे) आला होता. (३३) 'शांतीसह तुम्ही (स्वर्गात) प्रविष्ट व्हा. हा शाश्वत (सुखाचा) दिवस आहे. (३४) ते ज्या ज्या गोष्टीची इच्छा करतील ते ते त्यांना तेथे मिळेल. आणि (त्यांना देण्यासाठी) आमच्यापाशी आणखीही खूप आहे. (३५) आणि त्यांच्यापेक्षा अधिक सामर्थ्यशाली असलेल्या त्यांच्या आधी होऊन गेलेल्या कितीतरी जनसमूहांचा आम्ही विनाश केला आहे! (परंतु जेव्हा शिक्षेची आपत्ती आली तेव्हा) ते देशभर (सैरावैरा) भटकले. (त्यांना) कुठे सुरक्षित आसरा मिळाला होता का? (३६) त्यामध्ये त्या (व्यक्ती) साठी खरोखर बोध आहे जिच्याकडे अंत:करण आहे, किंवा (लक्षपूर्वक) कानाने ऐकण्याची प्रवृत्ती आहे, आणि जी विवेकी आहे. (३७) आणि नि:संशय, आम्हीच आकाश व पृथ्वी यांची आणि त्या दोहोच्यामध्ये जे काही आहे त्या सर्वांची सहा कालावधीत निर्मिती केली, आणि थकव्याने आम्हाला स्पर्शही केला नाही. (३८) म्हणून जे काही म्हणत आहेत ते धैर्याने सहन कर आणि सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तापूर्वी आपल्या विधात्याची स्तुती करून त्याच्या पावित्र्याचे गुणगान कर; (३९) आणि रात्रीच्या (एका भागात देखील), आणि (विहित) प्रणिपातानंतर (नमाजानंतर) त्याच्या पावित्र्याचे गुणगान कर. (४०) आणि ऐक! ज्यादिवशी पुकारणारा जवळच्या एखाद्या ठिकाणाहून पुकारील. (४१) ज्या दिवशी ते प्रत्यक्ष स्फोटाचे आवाज ऐकतील, तो दिवस (कबरीतून) बाहेर येण्याचा दिवस असेल. (४२) नि:संशय, आम्हीच जीवन प्रदान करतो व आम्हीच मृत्यू देतो, आणि (शेवटी) आमच्याकडेच परत यायचे आहे. (४३) ज्या दिवशी त्यांच्यावर असलेली भूमी दुभंगून जाईल, (आणि ते त्यातून) घाईघाईने (बाहेर येतील) - (त्यांना) एकत्र करून आणणे हे आमच्या दृष्टीने अतिशय सोपी गोष्ट आहे. (४४) ते जे काही म्हणतात ते आम्हाला चांगले ठावूक आहे; आणि त्यांच्यावर (कोणत्याही प्रकारे) सक्ती करण्यासाठी आम्ही तुला (नेमलेले) नाही. म्हणून जो माझ्या (शिक्षेच्या) इशाऱ्याने भय बाळगतो त्यास कुरआनच्या सहाय्याने मदत कर. (४५)

**ताईत आणि मंत्रतंत्र**

**मंत्रसिद्ध ताईत** मंत्राने सिद्ध करावयाच्या चौकोनावर आधारित असतात. त्यांना **जादूचे चौकोन** असे म्हणतात. यातील काही चौकोन इतके मोठे असतात की, त्यांना एकेका ओळीत शंभर शंभर घरे (रकाने) असतात. या चौकोनांना विविध प्रकारची नावे आहेत. काहींना **'दुपाया'** म्हणजे **द्विपदी** म्हणतात. त्यांच्यात शेवटी दोन पाय दिसतात. पण वर तीन घरे (रकाने) असतात. चौकोनाच्या खालची तीन घरे वापरली तर त्या चौकोनांला **'सुल्सी'** अर्थात **त्रिपदी** असे म्हणतात. चार घरे (रकाने) एका ओळीत असणाऱ्या चौकोनांना **'रूबाई'** किंवा 'मुरब्बा' म्हणजेच **'चौपाई'** म्हणतात. अशा प्रकारे चौकोनांची संख्या वाढत असते. त्यातील नमुन्यादाखल काही चौकोन दिले आहेत:

**१) दुपाया : द्विपदी चौकोन**

| | | |
|---|---|---|
| ३ | ८ | १ |
| २ | ४ | ६ |
| ७ | | ५ |

**जादूचा चोकोन**

| | | |
|---|---|---|
| १९५ | ५२६ | ६५ |
| १३० | २६० | ३९६ |
| ४६१ | | ३२५ |

वर दिलेल्या चौकानांस 'दुपाया' असे म्हणतात. शेवटच्या ओळीत दोन घरे (रकाने) असल्यामुळे दोन पाय फुटल्याप्रमाणे दिसतात. डावीकडील चौकोनात प्रत्येक घराचा अनुक्रम दिलेला आहे. त्या अनुक्रमानुसार तो चौकोन भरावयाचा आहे. समजा 'बिस्मिल्लाह' हा शब्द घेतला तर या शब्दाची अक्षरी किंमत ७८६ आहे. यावा १२ ने भागायचे म्हणजे ६५ येतात आणि ६ उरतात. आता जादूचा चौकोन भरावयाचा आहे. क्रमांक १ च्या घरात ६५×१=६५ ही संख्या लिहायची. क्रमांक २ च्या चौकोनात ६५×२=१३० ही संख्या लिहायची. अशा रीतीने सर्व घरातील संख्या लिहावयाच्या मात्र शिल्लक ६ आलेले आहेत, म्हणून सहाव्या क्रमांकाच्या घरात ६५×६+६=३९६ ही संख्या लिहायची. अशा रीतीने हा चौकोन सिद्ध झाला.

**२) सुल्सी त्रिपदी चौकौन**

सुल्सी चौकोन म्हणजे प्रत्येक ओळीत तीन अशी नऊही घरे (रकाने) असणारा चौकौन.

त्यातील घराचा अनुक्रम अशा प्रकारे असतो.

| | | |
|---|---|---|
| ४ | ९ | २ |
| ३ | ५ | ७ |
| ८ | १ | ६ |

हे सुल्सी चौकोन हव्वा म्हणजे प्रेषित आदमची धर्मपत्नी हव्वा यांच्या नावाने **'हव्वाचे चौकोन'** म्हणून ओळखले जातात. चार महाभूतांच्यासाठी हे चौकोन पुढीलप्रमाणे भरले जातात. – चौकोन अशा रीतीने भरावयाचे की, त्यांची उभी आडवी कशीही बेरीज केली तरी ती तितकीच असली पाहिजे. ही बेरीज हव्वाच्या चौकोनात १२ येत असते. हव्वाची अरबी 'अब्जद' पद्धतीप्रमाणे अक्षरी किंमत १५ येते. तिरपी बेरीज केली तर अक्षरी किंमत १५ सर्व वेळी आली पाहिजे. हे चौकोन खालीलप्रमाणे तयार केले जातात.

**हव्वाचे सुल्सी : त्रिपदी चौकोन**

**चार महाभूते**

**(१) पृथ्वी**

| | | |
|---|---|---|
| ६ | ७ | २ |
| १ | ५ | ९ |
| ८ | ३ | ४ |

**(२) आप**

| | | |
|---|---|---|
| ६ | १ | ८ |
| ७ | ५ | ३ |
| २ | ९ | ४ |

**(३) तेज**

| | | |
|---|---|---|
| ४ | ९ | २ |
| ३ | ५ | ७ |
| ८ | १ | ६ |

**(४) वायू**

| | | |
|---|---|---|
| २ | ७ | ६ |
| ९ | ५ | १ |
| ४ | ३ | ८ |

### ३) रूबाई किंवा मुरब्बा : चौपाई चौकोन वा चौरस

अशाच प्रकारे एक चार घरांचा (रकान्यांचा) चौकोन आहे. हा **मरियमचा चौकोन** मानला जातो. मरियमची 'अब्जद' पद्धतीप्रमाणे अक्षरी किंमत २९० आहे. हा चौकोन अशा प्रकारे आखला जातो.

मरियमचे मुरब्बा किंवा रूबाई अर्थात चौपाई चौकोन वा चौरस

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ११ | २७० | १ |
| २६९ | २ | ७ | १२ |
| ३ | २७२ | ९ | ६ |
| १० | ५ | ४ | २७१ |

हे जादूचे चौकोन वाटेल तितके मोठे म्हणजे एका ओळीत शंभर घरां (रकान्यां) पर्यंत असतात. हे चौकोन कशावर लिहावे, कशाने लिहावे, कोणत्या मंत्राचा जप करावा, किती करावा या प्रत्येकाच्या विषयी ठरलेले नियम आहेत. वशीकरण, वैर निर्माण करणे, वैर संपविणे, स्वप्ने पाडणे, स्वप्ने दूर करणे, भूकबाधा टाळणे, विविध रोग दूर करणे, स्त्रीचे दूध वाढविणे अशा अनेक कामांसाठी यांचा वापर होतो. **वशीकरणासाठी** वापर करताना द्वितीयेच्या दिवशी शुक्रवार, सोमवार, बुधवार आणि गुरूवार हा दिवस पाहून हे मंत्र चिनी मातीच्या बशीवर अगर कागदावर लिहितात, व ते धूवून त्याचे पाणी पितात. गुजरातमध्ये मेमन लोक भूतबाधा झाल्यास चिनी मातीच्या ताटात केशराने मंत्र लिहितात आणि पवित्र कुराणाचे 'अल्-फ़लक' हे ११३ वे प्रकरण लिहितात व धुवून ते पाणी रोगग्रस्ताला (रुग्णाला) देतात. कागदावर हे मंत्र लिहून ते उदाबरोबर जाळतात, व त्याचा धूर रोग्याला देतात. अंगठीवर मंत्र कोरतात. भूर्जपत्रावर मंत्र लिहितात, त्याची गुंडाळी करून धातूच्या पेटीत बंद करतात व तो ताईत गळ्यात, दंडावर, कमरेला किंवा पटक्यात बांधतात.

**११३. सूरतुल् – फ़लक (उष:काल, अरुणोदयाचे प्रकरण)**

**बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम**

कुल अऊज़ु बिर्ब्बिल् फ़लक़ि (१) मिन् शर्रि मा ख़लक़ (२) व मिन् शर्रि ग़ासिक़िन् इज़ा वक़ब (३) व मिन् शर्रिन्नफ़ासाति फ़िल्उक़दि (४) व मिन् शर्रि हासिदिन् इज़ा हसद (५)

**भाषांतर**

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

सांगा, मी शरण मागतो सकाळच्या पालनकर्त्याची, (१) त्या प्रत्येक वस्तूच्या अरिष्टापासून जी त्याने निर्माण केली आहे. (२) आणि गंड्यांत फुंकणाऱ्यांच्या अरिष्टापासून (४) आणि मत्सर करणाऱ्यांच्या अरिष्टापासून जेव्हा ते मत्सर करतात (५)

याखेरीज कुराणामधील वचने कोरलेला दगड म्हणजे 'नाद-ए-अली', 'अलीला आवाहन', चांदीमध्ये बसविलेली वाघनखे यांचेही ताईत तयार करतात. काही लोक रविवारी अमावास्या आली म्हणजे त्या दिवशी मोहांडूळ मारतात व त्याच्यावर मंत्र टाकून मडक्यात ठेवतात, आणि मडके जमिनीत पुरतात. मांस झडून जाते, हाडे शिल्लक राहतात. ती काढून त्यांच्या माळा तयार करतात. या माळा गंडमाळ हा रोग बरा करण्यासाठी

उपयोगी पडतात. विविध प्राणी आणि पक्षी यांचे पंख, हाडे इत्यादींचा भूतबाधा निवारण करण्यासाठी वापर करतात.

**अल्लाहची ९९ प्रमुख नामे आणि त्यांचे मंत्रसामर्थ्य**

अबू हुरैरा म्हणतात की, प्रेषित मुहम्मद[स.] म्हणाले, ''परमेश्वराची ९९ नावे आहेत. जो ही नावे जपतो, त्याला स्वर्गात प्रवेश मिळेल.'' सम्राट हुमायूनला ईश्वरी नावांच्या विषयी इतका आदर होता की त्याने 'मीर अब्दुल हे' या नावाच्या माणसाला बोलावताना फक्त 'अब्दुल' या नावाने बोलावले. कारण आंघोळ केल्याशिवाय तो फक्त अब्दुल म्हणजे गुलाम असतो. 'अब्दुल हे' म्हणजे ईश्वराचा दास नसतो. परमेश्वराच्या नामाचा जप करण्यासाठी खालील प्रमाणे माहिती दिली जाते. या यादीत ही नावे, त्यांचा अर्थ, त्यांच्या अक्षरांचे संख्यात्मक मूल्य आणि त्यांचा उपयोग यांचा समावेश आहे :

*''व लिल्लाहि अम्मा/उल् – हुसना''* – ७:१८०
*''आणि अल्लाहची सर्व नामे उत्तमोत्तम आहेत''* – ७:१८०

**अल्लाहची उत्तमोत्तम – शुभनामे मुखोद्गत म्हणण्याची पद्धत***

जेव्हा अल्लाहच्या शुभनामांचे मंत्रोच्चार करायचे असेल तेव्हा याची सुरुवात अशा प्रकारे करावी. – ''हुव्ल्लज़ी ला इला–ह इल्ला हुवर्रहमानुर्रहीमु'' शेवटपर्यंत एकसारखे (अखंडपणे) म्हणत राहावे. प्रत्येक नामाच्या शेवटच्या अक्षरास 'उ'काराने उच्चारण करावे, आणि पुढच्या दुसऱ्या नावामध्ये जोडावे. ज्या नावावर श्वास घेण्यासाठी थांबले जाईल त्याला जोडू नये आणि पुढचे दुसरे नाव (नाम) 'अल्ह' पासून सुरू करावे. जर एखाद्या नामा (नावा)चे च मंत्रोच्चार करावयाचे असेल तर सुरवातीस 'या' हे संबोधनकारी अव्यय जोडावे. जसे – 'रहमान'चे मंत्रोच्चार करावयाचे असेल तर ते 'या रहमान' स्वरूपामध्ये म्हणावे., 'अर्रहमानु' असे उच्चारण करू नये. याचप्रमाणे 'कुद्दूस' ऐवजी 'या कुद्दूस' म्हणावे. 'र्ज़्ज़ाक' ऐवजी 'या र्ज़्ज़ाकु' म्हणावे. 'मुग़नी' ऐवजी 'या मुग़नी' म्हणावे. याचप्रमाणे इतर सर्व नामे म्हणावीत.

पुढे अल्लाहच्या ९९ शुभ नामांची सविस्तर यादी कोष्टकस्वरूपात अर्थ, 'अब्जद' मूल्य भारांक, आणि संबंधित नामाचे मंत्र प्रभावासह देण्यात येत आहे.

**अल्लाहची ९९ शुभ नामे आणि त्यांचे मंत्र–सामर्थ्य***

| क्र. | अल्लाहची शुभनामे | 'अब्जद' मूल्यांक | मराठी प्रतिशब्द (समानार्थी) | नामांतर्गत मुख्य मंत्रसामर्थ्य व प्रभाव |
|---|---|---|---|---|
| १ | अल्लाहु | ६६ | सर्वश्रेष्ठ ब्रह्म | सकलकामनाप्रीत्यर्थ |
| २ | अर्रहमानु | २५८ | करुणाशील | मन उदात्त करण्यासाठी |
| ३ | अर्रहीमु | २५८ | दयाळू | प्रतिष्ठा वाढण्यासाठी |
| ४ | अल् मलिकु | ९० | अधीश्वर, नरेश | नि:स्पृह, निरपेक्ष बनण्यासाठी |
| ५ | अल् कुद्दूसु | १७० | निर्विकार, पवित्र | भीती घालविण्यासाठी |
| ६ | अस्सलामु | १३१ | शांतिदाता | आरोग्यासाठी |
| ७ | अल् मोमिनु | १३६ | निष्ठावंत | शत्रू निवारण्यासाठी |

| क्र. | अल्लाहची शुभनामे | 'अब्जद' मूल्यांक | मराठी प्रतिशब्द (समानार्थी) | नामांतर्गत मुख्य मंत्रसामर्थ्य व प्रभाव |
|---|---|---|---|---|
| ८ | अल् मुहैमिनु | १४५ | त्राता, रक्षक | स्वसंरक्षणासाठी |
| ९ | अल् अजीजु | ९४ | प्रबळ, शक्तिमान | मानसन्मानासाठी |
| १० | अल् जब्बार, | २०६ | ताडक | राजपुत्रापासून अभय |
| ११ | अल् मुतकव्विरु | ६६२ | प्रशंसनीय, श्रेष्ठ | संपत्ती मिळविण्यासाठी |
| १२ | अल् ख़ालिकु | ७३१ | निर्माता | काम सुलभ मिळण्यासाठी |
| १३ | अल् बारिउ | २१३ | कर्तार | वांझ स्त्रीस पुत्ररत्न होईल |
| १४ | अल् मुसब्बिरु | ३३६ | रूपनिर्माता | कर्जमुक्त होण्यासाठी |
| १५ | अल् ग़फ़्फ़ारु | १२८१ | क्षमाशील | पापमुक्तीसाठी |
| १६ | अल् क़ह्हारु | ३०६ | प्रकोपी, वर्चस्वी | वर्चस्व गाजविण्यासाठी, दु:खापासून अभय |
| १७ | अल् वह्हाबु | १४ | महादाता, वदान्य | हरवलेली वस्तू मिळण्यासाठी |
| १८ | अर्रज़्ज़ाकु | ३०८ | अन्नदाता | उपजीविकेच्या साधनासाठी |
| १९ | अल् फ़त्ताहु | ४८९ | विजयी | विजयासाठी |
| २० | अल् अलीमु | ४८९ | ज्ञाता, ज्ञानस्रोत | ज्ञानप्राप्तीसाठी |
| २१ | अल् क़ाबिज़ु | ९०५ | सार्वभौम | शत्रूविनाशासाठी |
| २२ | अल् बासितु | ७२ | विकासमय | उपजीविकेसाठी |
| २३ | अल् ख़ाफ़िज़ु | १४८१ | दलनकर्ता | शत्रूजयासाठी |
| २४ | अर्राफ़िअु | ३५१ | उन्नायक | प्रतिष्ठेसाठी |
| २५ | अल् मुअिज़्ज़ु | ११७ | प्रतिष्ठादायी | प्रतिष्ठेसाठी |
| २६ | अल् मुज़िल्लु | ७७० | संहारक | शत्रूनाशासाठी |
| २७ | अस्समीऊ | १८० | सर्वश्रोता | कानाचे रोग घालविण्यासाठी |
| २८ | अल् बसीरु | ३०२ | सर्वद्रष्टा | इतरांचे रहस्य जाणण्यासाठी |
| २९ | अल् हकमु | ६८ | शास्ता | गुह्ये स्पष्ट दिसतील |
| ३० | अल् अद्लु | १०४ | न्यायी | न्यायासाठी |
| ३१ | अल्लतीफु | १२९ | सूक्ष्मदर्शी | सुदैवासाठी |
| ३२ | अल् ख़बीरु | ८१२ | मर्मज्ञ | रहस्य जाणण्यासाठी |
| ३३ | अल् हलीमु | ८८ | सहनशील | दु:खमुक्तीसाठी |
| ३४ | अल् ऑजीमु | १०२० | महान् | मोठेपण मिळविण्यासाठी |
| ३५ | अल् गफूरु | १२८६ | क्षमाशील | पापमुक्तीसाठी |
| ३६ | अश्शकुरू | ५२६ | गुणग्राहक | दु:खमुक्तीसाठी |
| ३७ | अल् अलिय्यु | ११० | सर्वोच्च | मानमरातबामध्ये वाढ व कामनापूर्तीसाठी |
| ३८ | अल् कबीरु | २३२ | श्रेष्ठ | इच्छापूर्तीसाठी |
| ३९ | अल् हफ़ीज़ु | ९९८ | पालक, संरक्षक | भीती दूर करण्यासाठी |

| क्र. | अल्लाहची शुभनामे | 'अब्जद' मूल्यांक | मराठी प्रतिशब्द (समानार्थी) | नामांतर्गत मुख्य मंत्रसामर्थ्य व प्रभाव |
|---|---|---|---|---|
| ४० | अल् मुक़ीतु | ५५० | शक्तिदाता, जीविकास्रोत | यशासाठी |
| ४१ | अल् हसीबु | ८० | निरीक्षक | कैदेतून सुटण्यासाठी |
| ४२ | अल् जलीलु | ७३ | वैभवशाली | शत्रूला भिवविण्यासाठी |
| ४३ | अल् करीमु | २७० | उदार | संसारेच्छा पूर्तीसाठी |
| ४४ | अर्रक़ीबु | ३१२ | पालक | संरक्षणासाठी |
| ४५ | अल् मुजीबु | ५५ | वांछितेश्वर | इच्छापूर्तीसाठी |
| ४६ | अल् वासिउ | १३७ | विशाल | व्यापारात लाभ होण्यासाठी |
| ४७ | अल् हकीमु | ६८ | तत्त्वविद् | ज्ञानाचे दार उघडेल, न होणारे काम होईल |
| ४८ | अल् वदूदु | २० | प्रेमळ | प्रेमपूर्तीसाठी |
| ४९ | अल् मजीदु | ५७ | वैभवशाली | रोग मुक्तीसाठी |
| ५० | अल् बाअिसु | ५७३ | बीजरूप | उत्थानासाठी |
| ५१ | अश्शहीदु | ३१९ | साक्षीदार | मुले आज्ञाधारक होण्यासाठी |
| ५२ | अल् हक़्क़ु | १०८ | सत्य | ज्ञान प्राप्तीसाठी |
| ५३ | अल् वकीलु | ६६ | कार्यसाधक | अग्नीपासून संरक्षक |
| ५४ | अल् क़विय्यु | ११६ | सशक्त | शत्रूजयासाठी |
| ५५ | अल् मतीनु | ५५० | दृढ | आईचे दूध वाढविण्यासाठी |
| ५६ | अल् वलिय्यु | ४६ | अभिभावक, पालक | धन्याची मर्जी राखण्यासाठी |
| ५७ | अल् हमीदु | ६२ | स्तुत्य | असभ्य भाषा निवारण्यासाठी |
| ५८ | अल् मुहसी | १४८ | परिवेष्टक | स्मृती बळकट करण्यासाठी |
| ५९ | अल् मुब्दिउ | ५६ | सृष्टिनिर्माता, उद्‌गम | श्रम सुलभ करण्यासाठी |
| ६० | अल् मुअीदु | १२४ | आवर्त्तक | रहस्य समजण्यासाठी |
| ६१ | अल् मुहयी | ६० | जीवनदाता, गतिगान | भूतबाधा टाळण्यासाठी |
| ६२ | अल् मुमीतु | ४९० | मृत्युदाता, संहारक | शत्रूनाश |
| ६३ | अल् ह्य्यु | ६२ | चैतन्य | कीटकांचा नाश करण्यासाठी |
| ६४ | अल् क़य्यूमु | १५६ | अविनाशी | दीर्घायुष्यासाठी |
| ६५ | अल् वाजिदु | १४ | सर्वग्राही, शोधक | हरवलेल्या संपत्तीचा शोध घेण्यासाठी |
| ६६ | अल् माजिदु | ४८ | पावन | संपत्तीसाठी |
| ६७ | अल् वाहिदु | १९ | एकमेव | साहित्य ज्ञानासाठी |
| ६८ | अस्समदु | १३४ | शाश्वत | दारिद्र्यनाश |
| ६९ | अल् क़ादिरु | ३०५ | समर्थ | दुःख मुक्तीसाठी |
| ७० | अल् मुक़्तदिरु | ७४४ | सर्वसत्ताधीश | धन व मानासाठी |

| क्र. | अल्लाहची शुभनामे | ‘अब्जद’ मूल्यांक | मराठी प्रतिशब्द (समानार्थी) | नामांतर्गत मुख्य मंत्रसामर्थ्य व प्रभाव |
|---|---|---|---|---|
| ७१ | अल् मुक़द्दिमु | १८४ | आरंभ | दु:ख मुक्तीसाठी |
| ७२ | अल् मुवख़्ख़िरु | ८८६ | अंतिम | इच्छा पूर्तीसाठी |
| ७३ | अल् अव्वलु | ३७ | सर्वप्रथम, आदि | जन्मासाठी |
| ७४ | अल् आख़िरु | ८०१ | अंत | भीतिनाश |
| ७५ | अल् ज़ाहिरु | ११०६ | गोचर | नेत्र रक्षणार्थ |
| ७६ | अल् बातिनु | ४७ | अगोचर | कौटुंबिक दु:ख नाहीसे करण्यासाठी |
| ७७ | अल् वालियु | ४७ | शासक | अकस्मात संकटाच्या सुटकेसाठी |
| ७८ | अल् मुतआली | ५५१ | उदात्त | इच्छापूर्तीसाठी |
| ७९ | अल् बर्रु | २०२ | सत्यवादी, उत्तम | संकटमुक्तीसाठी |
| ८० | अल् तव्वाबु | ४०९ | क्षमावान | क्षमेसाठी |
| ८१ | अल् मुन्तक़िमु | ६३० | प्रतिशोधी | कबरीत विश्रांतीसाठी |
| ८२ | अल् अफ़ूवु | १५६ | क्षमी | पाप मुक्तीसाठी |
| ८३ | अल् रऊफ़ु | २८६ | दयासिंधू | पीडितांच्या मुक्तीसाठी |
| ८४ | या मालिकुल् मुल्कि | २१२ | विश्व सम्राट | संपत्तीसाठी |
| ८५ | जूल्‌जलालि वल् इक्रामि | ११०० | महातेजस्वी व औदार्यसंपन्न | इच्छा पूर्तीसाठी |
| ८६ | अल् मुक़सितु | २०९ | यथोचित फलदायक | वाईट विचार दाबण्यासाठी |
| ८७ | अल् जामिउ | ११४ | सर्वनिधान | भाऊबंदांच्या ऐक्यासाठी |
| ८८ | अल् ग़निय्यु | १०६० | नि:स्पृह, समृद्ध | वैभवासाठी |
| ८९ | अल् मुग़्नी | ११०० | समृद्धीदाता | पुरुषावलंबनापासून मुक्तीसाठी |
| ९० | अल् मानिउ | १६१ | विघ्नहारी, रक्षक | शत्रूपासून रक्षण |
| ९१ | अज़्ज़ार्रु | १००१ | संघातक, विनाशक | भूतबाधा निवारणासाठी |
| ९२ | अन्नाफ़िउ | २०१ | सिद्धिदाता | शेती व व्यापारात यश |
| ९३ | अन्नूरु | २५६ | प्रकाशरूप | मार्गदर्शनासाठी |
| ९४ | अल् हादियु | २० | मार्गदर्शक | संपत्तीसाठी |
| ९५ | अल् बदीउ | ८६ | अतुल, अनुपम | रहस्य जाणण्यासाठी |
| ९६ | अल् बाक़ी | ११३ | शाश्वत, नित्य | मान्यतेसाठी |
| ९७ | अल् वारिसु | ७०७ | सर्व उत्तराधिकारी | मन:शांतीसाठी |
| ९८ | अर्रशीदु | ५१४ | सन्मार्गदर्शक | इच्छापूर्तीसाठी |
| ९९ | अस्सबूरु | २९८ | धैर्यरूप | शत्रूपासून मुक्तता |

* (मुहम्मद बिन अल्‌ज़जरी शाफई – ‘हिस्न-ए-हिसैन’– पृ. ४४-५८.)

**इस्म-ए-आज़म : सर्वश्रेष्ठ महामंत्रासाठी काही प्रेषित वचने**

'अल्लाह' हे परमेश्वराचे परब्रह्मवाचक सर्वश्रेष्ठ नाम आहे. हे एक असे महामंत्र आहे की ज्याच्या दृढ सश्रद्ध उच्चारणामुळे शैतान आणि भूत-प्रेत दूर पळून जातात. त्यांची बाधा नष्ट होते.

१) **'हदीस शरीफ' मध्ये असे आहे.**

रसूल अल्लाह[स.] एकदा एका इसमास असे म्हणताना ऐकले :-

*"या ज़ुलजलालि वल् इक्रामि"*

अर्थात हे प्रताप व वैभवाचे स्वामी !

तेव्हा ते म्हणाले, तुझी कृपायाचना स्विकारली जाईल. आता तू वाटेल ते माग.

२) **दुसऱ्या एका हदीसमध्ये असे आहे की -**

परमेश्वराकडून एक देवदूत निर्धारित आहे. जो इसम तीन वेळा -

*"या अर्रहमार्राहिमीन"*

अर्थात सर्व दया करणारांमध्ये सर्वात जास्त दया करणारा.

असे म्हणतो, तेव्हा तो देवदूत त्या इसमास म्हणतो; नि:संशय सर्वात जास्त दया करणारा तुजकडे लक्ष देत आहे. आता तुला हवे ते माग.

३) **आणखी एका हदीसमध्ये आहे -**

(एकदा) रसूल अल्लाह[स.] एका इसमाजवळून गेले. तो

*"या अर्रहमार्राहिमीन"*

म्हणत होता. ते त्याला म्हणाले, - तू वाटेल ते माग. सर्वश्रेष्ठ परमेश्वराची कृपादृष्टी तुजवर आहे.

४) जो इसम सर्वश्रेष्ठ परमेश्वरापासून तीनदा स्वर्गप्राप्तीची याचना करतो, तेव्हा त्याला स्वर्ग म्हणते, "हे ईश्वरा ! त्या इसमास स्वर्गामध्ये प्रविष्ट कर." आणि जो इसम सर्वश्रेष्ठ परमेश्वरापासून तीनदा नरकापासून आश्रय मागतो, तेव्हा नरक म्हणते, "हे ईश्वरा ! तू त्या इसमास नरकाच्या अग्नीपासून वाचव,"

५) **आणखी एक हदीस शरीफमध्ये नमूद आहे की;**

जो इसम या पाच ब्रह्मसूत्रांसह कृपायाचना करील, जी कोणती याचना तो परमेश्वराशी करेल, सर्वश्रेष्ठ परमेश्वर ती जरूर पूर्ण करील. (ती पाच ब्रह्मसूत्रे [कलमे] आहेत):-

१] *"ला इला-ह इल्लल्लाहु वहदहु ला शरीक लहु"*

अर्थात अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही. तो एकमेव आहे. त्याचा कोणीच सहभागी नाही.

२] *"लहुल मुल्कु व लहुल हम्दु"*

अर्थात त्याचेच समस्त साम्राज्य आहे व त्याच्याचसाठी सर्व प्रशंसा आहे.

३] *"व हुव अला कुल्लि शैयिं क़दीरून्"*

अर्थात आणि तोच सर्व वस्तुमात्रांवर सामर्थ्य राखतो.

४]   *''ला इला-ह इल्लल्लाहु''*

अर्थात अल्लाहशिवाय अन्य कोणीच उपास्य नाही.

५]   *''व ला हौल व ला कुव्वत इल्ला बिल्लाहि''*

अर्थात अन्य कोणतीच शक्ती आणि कोणतेच सामर्थ्य अल्लाहच्या मदतीशिवाय शक्य (संभव) नाही.

**संकीर्ण मंत्रांच्यामध्ये मूळव्याध बरी करण्यासाठी खालील मंत्र पाण्यावर म्हाणावा,**

त्यावर पुंकर मारून ते पाणी रोग्याला पाजावे. मूळव्याध बरी होते. मंत्र असा आहे :

''निघून जा, जा, जा, जा. वाहत्यापाण्या सुकून जा. संत जलाल जहानियासाहेब जहाँगश्त यांची आज्ञा आहे. जा. थाबडतोब निघून जा.''

खालील चौकोन रोग्याच्या पाठीला बांधल्यास देवीचा आजार सौम्य होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| ८८८८ | १२२२१ | १५५५४ | १११९ |
| १४४४३ | २२२२ | ७७७७ | १३३३२ |
| ३३३३ | १७७५६ | ९९९९ | ६६६६ |
| ११११० | ५५५५ | ४४४४ | १६६६५ |

जेव्हा एखादे घर भूतबाधेने झपाटले असेल त्यावेळी पुढील मंत्र कागदावर लिहून दरवाजावर टांगता ठेवावा. म्हणजे भूतबाधा संपते. उजव्याबाजूला ''हे मुहम्मद ! हे अल्लाह ! निष्ठावंतांचा रक्षणकर्ता ! निष्ठावंतांना मान देतो.. निष्ठावंताला परमेश्वर यश देतो. खरोखर. तो खरोखर विजयपदाता आहे. तो श्रेष्ठ आणि खरा सहाय्यक आहे. तो प्रभूचा निवडलेला आहे. आमच्यासाठी सर्वात चांगला आहे. सर्व मानवजातीसाठी चांगला आहे. मदत करणाऱ्यात, काळजी वाहणाऱ्यात, तो सर्वश्रेष्ठ आहे.'' आणि डाव्या बाजूला असे लिहावे; - ''हे मिकाईल! हे अली! हे इस्राइल! हे जिब्राइल! हे अली! हे इस्राइल!'' घराच्याऐवजी जर एखादी व्यक्ती भूताने झपाटली असेल तर मोठ्या अक्षरांत पुढील मंत्र लिहून अशा रीतीने लावावा की रोगग्रस्तांची (रोग्याची) नजर पुन्हा पुन्हा त्याकडे जाईल. त्याने भूत गांगरून जाते. मंत्र असा - ''सुलेमानच्या नावाने, दयाळू परमेश्वराच्या नावाने माझ्या विरुद्ध राहू नको. तर ये आणि मुसलमानांना शरण जा.''

**जन्मकुंडली** हा एक कागद असतो. जन्मवेळ, त्यावेळचे ग्रह, राशी इत्यादींची नोंद असते. त्यावरून आयुर्मर्यादा, सवयी, आवडी, मनाचा कल, भविष्य यांचे वर्णन असते. याला **'जायचा'** असे म्हणतात. मुसलमानांच्या कुंडल्या तपासताना रोग्याचे नाव, त्याच्या आईचे नाव यांची अरबी 'अब्जद' पद्धतीने किंमत काढतात, व या बेरजेला बाराने भागतात. जर १ उरला तर रोग्याचे भवितव्य मेष चिन्हात असते, २ उरल्यास वृषभ, ३ उरल्यास मिथून, ४ उरल्यास कर्क, ५ उरल्यास सिंह अशा रीतीने पाहतात. त्या आधारे रोग्याचे भविष्य सांगतात. एकेका राशीला एकेक गंडांतर असेल, मृत्युभय असेल तर ते मंत्रतंत्राने दूर करतात. हे भविष्य

कळण्यासाठी रोग केव्हा उद्‌भवला हे कळणे आवश्यक असते. जर रोगाची तारीख कळणे अशक्य असेल तर रोगी व त्याची आई यांच्या नावाच्या किंमतीला ७ ने भागतात. भाग बरोबर तुटल्यास रोगाचा आरंभ शुक्रवारी, १ शिल्लक राहिल्यास शनिवारी, २ उरले तर रविवारी अशा रीतीने मोजतात.

अशुभ भविष्यावर गीविजय मिळविण्याच्या काही शांती आहेत. त्या निमित्ताने **'सदक़ा'** या नावाने दान दिले जाते. या दानात पैसे, फळे, अन्न. प्राणी, कपडे असतात. हे रोग्यावरून ओवाळतात. किंवा त्याला दाखवितात व फकिरांना देतात, किंवा चौरस्यावर ठेवतात. कुराणच्या मते स्त्रिया दोरीगाठीवर आपल्या आवडत्या माणसावर फुंकर घालून वाईट प्रयोग करतात. याचे प्रत्यंतर मुख्यत्वेकरून अध्याय ११३ – सूरतुल् – फ़लक आमि गौण स्वरूपात अध्याय ११४ – सूरतु–न्नास या दोन प्रकरणावरून येते.

(अध्याय ११३. सूरतुल् – फ़लक भाषांतरासह कृपया पृ. ११५४–५५ पहा.)

## ११४. सूरतु–न्नास (मानवाचे प्रकरण)

### बिस्मिल्लाहिर्रह्‌मानिर्रहीम.

कुल् अऊज़ु बिरब्बिन्नासि (१) मलिकिन्नासि (२) इलाहिन्नासि (३) मिन् शर्रिल–वस्वासि अल्ख़न्नासि (४) अल्लज़ी युवस्विसु फ़ी सुदूरिन्नासि (५) मिनल्‌जिन्नति वन्नासि (६)

**भाषांतर**

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

(तू असे) म्हण (की), 'मी शरण जाऊ इच्छितो (त्या) मानवजातीच्या विधात्याला, (१) (समस्त) मानवजातीच्या सर्वाधिपतीला, (२) (समस्त) मानवजातीच्या ईश्वराला (३) लपून छपून कानगोष्टी करणाऱ्या (शैतानाच्या) अपायापासून (वाचण्यासाठी), जो लोकांच्या मनात (वाईट विचार) भरवून देत असतो. (५) (तो) जिन्नांपैकी (असो) मनुष्यांपैकीही असो, (६)

आठवड्यातील प्रत्येक दिवसाचे शुभाशुभ स्वरूप आहे. शनीचा दिवस शनिवार अशुभ असतो. त्या दिवशी एखादा माणूस आजारी पडल्यास त्याचे कारण रक्तातील उष्णता, भुताची दृष्टी हे असते, आणि रोगाची लक्षणे अति तहान, निद्रानाश, नाकातून व मलाशयातून रक्त जाणे अशी असतात. हा आजार सात तास राहतो. रविवारी होणारा आजार हिरव्या मुखवर्णाच्या स्त्रीच्या वाईट नजरेमुळे होतो, जिच्या उपस्थितीत त्याने स्वादिष्ट अन्न खाल्लेले असते. तीव्र ताप, डोकेदुखी, सांधेदुखी, डोळे लाल होणे, अशी लक्षणे असतात. हा आजार चौदा दिवस टिकतो. सोमवारचा आजार स्नानानंतरच्या थंडीमुळे होतो किंवा अति श्रमाने होतो. चकरा येणे, ओकारी होणे, ग्लानी येणे, कंबर दुखणे ही याची लक्षणे आहेत. हा आजार पंधरा दिवस टिकतो. मंगळवारचा आजार पऱ्या अणि भुते यांच्यामुळे होतो. विशेषतः बेंबीभोवती कळा येतात, पोट दुखते, हा आजार आठवडाभर राहतो. बुधवारचा आजार मृतासाठी केलेले नवस न फेडल्यामुळे होतो. हा आजार नऊ दिवस राहतो. या आजारात मनगटे, पाय व मान दुखत असते. गुरुवारचा आजार पऱ्यांची सावली पडल्यामुळे होतो. दहा दिवस टिकतो, आणि त्यात अन्नावरची वासना निघून जाते. शुक्रवारी होणारा आजार शारीरिक त्रासामुळे होतो आणि तो बारा दिवस टिकतो. ग्लानी आणि थकवा ही त्याची लक्षणे आहेत.

## (११३) सूरतुल–फ़लक़ आणि (११४) सूरतुन्नासचे मंत्रसामर्थ्य

नास्तिक व मुख्यत्वेकरून यहूदी यांचे वैर हजरत पैगंबरांशी फारच वाढले होते. त्यांनी हजरत पैगंबर साहेबांस विष दिले व त्यांच्यावर जादू करविली. परंतु ज्याला परमेश्वर राखे त्याला कोण चाखे? शेवटी लुबैद बिन आस नावाच्या यहुद्याने आपल्या चेटकीणी मुलींच्या साहाय्याने एका गंड्यावर मंत्र पढून ११ गाठी मारून ते चेटूक एका विहीरीत दगडाखाली दाबून ठेवले; ह्याने हजरत पैगंबर साहेबांची प्रकृती बिघडली व ते आजारी झाले. तेव्हा जिब्रील देवदूताने ही सारी हक़ीक़त पैगंबरांना कळविला, व त्यांनी आपले जावई हजरत अली यांस पाठवून त्या विहीरातून त्याच जागेवरून ते चेटक आणविले. परमेश्वराने ह्याचे पुढील अध्याय मिळून ज्यात एकूण ११ श्लोक होतात ती प्रकटली. जिब्रील देवदूत हे श्लोक वाचीत जात होते, व त्या चेटकांतील एक एक गाठ आपोआप सुटत होती. येथपर्यंत की ११ गाठांही सुटून पैगंबर साहेब बरे झाले. या वृत्तांताकडे संकेत आहे. या गोष्टीला कोणी धर्मभोळेपणा समजू नये. ही मैली विद्या प्रचारात आहे. तात्पर्य; हे मलीन व अशुद्ध इच्छाशक्तीचे परिणाम होत. याला चेटक किंवा जादू असे म्हणतात.

सकाळ सत्यास उघड करते. तर रात्र असत्यास व्यक्त करते. अंधविश्वास, अंधश्रद्धा, खोटे ताईत हे सर्व अज्ञान म्हणजे अंधार आहे. अल्लाहच्या ज्ञानाच्या प्रकाशास शरण गेल्यास अज्ञानाचा अंधार दूर होईल,. त्याचेच आश्रय मागा. जगातील वाईटापासून आणि हेवा करणाऱ्यांच्या हेवेच्या प्रहारापासून वाचाल.

सारांश, या अध्यायामध्ये अंधश्रद्धा, वाईट चालीरिती, जादू-टोणा, खोटे ताईत आणि मत्सर करणाऱ्यांच्या वाईट परिणामांपासून वाचण्यासाठी एक मात्र अल्लाहचे आश्रय मागण्याचा उपदेश आहे.

या अगोदरच्या ११३ व्या अध्यायामध्ये सर्व प्रकारच्या वाईटाच्या मुळाशी शैतान, मग तो जिन्न स्वरूपामध्ये असो की मानव स्वरूपात, त्याच्या कुप्रेरणेपासून वाचण्यासाठी पण सर्व विश्वाचा स्वामी आणि सर्वांचा पालनकर्ता अल्लाहचा आश्रय मागण्याचा उद्देश आहे. तोच प्रत्येक कठीण प्रसंग आणि दुःखापासून वाचविणारा आहे.

### अध्याय ७२ : सूरतुल् – जिन्नचे मंत्र–सिद्धी आवाहन (दावत)

### बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम.

अल्लाहच्या नावाने, जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे.

''हे प्रेषिता ! सर्व लोकांस) सांगून दे की, मला (परमेश्वराकडून असे) प्रकटिले गेले आहे.''

[ कुल् अूहिय अिलय्य इन्नहुस्तम् नफ़रुम् – ]

हे परमेश्वरा ! मी तुजकडे (तुझ्याशी) विनवणी करतो, हे वर आकाशातून अवतरित करणारा तू की मी ज्या गोष्टीसाठी प्रयत्न करणार आहे, आणि ज्याची मी आकांक्षा ठेवतो तिला माझ्या अधीन कर, माझ्या या संकल्पित कामामध्ये ती माझे आज्ञापालन करील असे कर. निः संशय, प्रत्येक गोष्टीवर तुझा अधिकार आहे. तुझी सत्ता आहे. हे अल्लाह, ही ती सत्ता (ज़ात) वळणारे-पळणारे तुजकडे धावत वळतात. आकांक्षा बाळगणारे हे तुझ्या सत्तेच्या माफीची अपेक्षा बाळगून असतात. ''की जिन्नांना– यक्ष, किन्नर, दैवतातून काही इसमांनी (मला कुराण वाचताना) ऐकले;'' [मिनल जिन्नि] हे अल्लाह, मी तुजपाशी विनवणी करतो, हे ती सत्ता जी ऐकते आणि पाहते आणि ते विलक्षण दृश्य पाहिले जाऊ शकत नाही. 'आणि (ऐकल्यावर आपल्या

लोकांस जाऊन) सांगितले की, आम्ही विलक्षण (प्रकारचे कुराण ऐकले.)'' - (१) [फ़क़ालू अिन्ना समिऽना कुर्आनन् अजबन् -(१)] ''की ते सन्मार्ग दाखविते. म्हणून आम्ही त्यावर श्रद्धा ठेवली, आणि आम्ही तर कोणालाही आमच्या विधात्याबरोबर सहभागी कल्पिणार नाही.'' - (२) [य्यह्दी । अिलर्रुशदि फ़आमन्ना बिह व लन् नुश्रिक बिरब्बिना । अह्दन् - (२)] हे परमेश्वरा ! तुझा संदेशहर (नबी) आणि आपल्या (अन्य) संदेशहरांसोबत आणि याचना करणारांसोबत श्रद्धावंतांपैकी ज्यांनी मजसोबत श्रद्धा राखली, त्यासह खरोखर मी तुझा आश्रय मागतो. (तुझे शरण इच्छितो.) जे संकल्प मी करतो ते तडीस नेण्यासाठी - अशा परिस्थितीमध्ये सेवक अवस्थेमध्ये माझ्यासाठी अधीन कर. - ''आणि आमच्या विधात्याची थोरवी अत्युच्च होय, त्याने तर कोणालाही आपली (जन्माची) सोबतीण बनविली नाही, आणि कोणाला मुलगा मुलगीही (बनविली) नाही.'' (३) [व्व अन्नह् तआला जद्दु रब्बिना मत्तख़ज साहिबतंव्व ला वलदन् - (३)] आणि अल्लाह मी तुजपासन याचना करतो ही ती परम सत्ता की ज्याची न जनिता आहे न जन्य. (आणि हे की) माझ्या अंत:कराणास बुद्धिमत्तेसह आणि माझ्या जिव्हेस दिव्य ज्ञानासह बोलव आणि तू माझा सहाय्यक आणि साथी बनून जा आणि संपूर्ण विश्वाचे (प्राण्यांचे) मन माझ्या (साठी) वशीभूत कर. ''आणि नि संशय, मानवांतून काही लोक जिन्नांता-देवतांपैकी कित्येक लोकांचा आश्रय धरत होते. म्हणून या मानवांनी जिन्नातांस आणखीही जास्तच (गर्विष्ट करून) फसगतीत टाकले. - (६) आणि जसा तुम्ही (जिन्नातांनी) तर्क केला होता तसा माणसांनीही तर्क केला होता की (गतकाळी परमेश्वराने कोणालाही प्रेषित करून पाठविले नाही. व यापुढेही) परमेश्वर केव्हाही कोणाला (प्रेषित करून) पाठविणार नाही.'' - (७) [व्व अन्नहु कान रिजालुम्-मिनल्-अिन्सि यऊज़ून बिरिजालिम्-मिनल् -जिन्नि फ़जादू-हुम् रहक़न् - (६) व्व अन्नहुम् अन्नू कमा जनन्तुम् अल्लंयब् असल्लाहु अहदन् (७)] हे अल्लाह, मी तुजपाशी याचना करतो, हे आकाशांना उंच बनविणारे (निर्माण करणारे) आणि हे (दोहो) जगांना निर्माण करणारे, हे काळाचे दूरदर्शी (प्रबंधकुशल), आणि हे अवतरित करणारे तौरेत, इंजील, ज़बूर आणि कुरआनचे , आणि हे मानवास समस्त सृष्टीवर आधिपत्य व श्रेष्ठत्व प्रदान करणारे, हे नित्य, हे सजीव, हे जे काही नसते आणि हे ज्याने प्रेषित सुलेमान यांच्यासाठी शक्ति प्रदान करण्याकरिता जिन्न (दैवत) आणि मानवांना त्यांच्या वशीभूत करणारे, हे अल्लाह तुजपाशी हे मागणे मागतो की समस्त सृष्टी व तदंतर्गत सर्व वस्तूंना (गोष्टींना) मजसाठी वशीभूत कर आणि सत्कार्यामध्ये माझा उल्लेख मशहूर कर आणि जो चिरंजीव आहे आणि ज्याला निद्रा वेढीत नाही आणि (हे अल्लाह) तुजपाशी याचना करतो, रहस्याचे भांडार असलेले महामंत्रासह (इस्म-ए-आज़म) आणि प्रखर प्रकाशासह माझ्यासाठी आत्मवादा (रूहानियत) स अशा स्थितीमध्ये वशीभूत करून दे की ते माझा आदेश मानतील आणि माझ्या संकल्पास तडीस नेण्यासाठी निश्चितपणे सहाय्यक होतील. मी तुजकडेच तुझा वशीला धरला (पकडले) आहे. त्याच्याशिवाय कोणी अन्य उपास्य नाही जो समस्त विश्वाचा विश्वंभर आहे. हे विशुद्ध व पवित्र दिव्य देवदूतगणाचे आत्मे ! ज्या कामाचे मी संकल्प केले आहे ते काम यशस्वी होण्यासाठी तुम्ही माझे सहाय्यक बना, इथपर्यंत की सृष्टीमध्ये कोणीच माझे आदेश धुडकाविण्याचे धाडस करू नये. तुमच्या मदतीची याचना करण्याची गोष्ट तुम्ही कबूल करा. हे परमेश्वराच्या देवदूतांनो ! हे माझा सहाय्यकर्ता परमेश्वर ! माझे भले कर आणि तू माझा सहाय्यक हो आणि तुझी मदत मागतो, म्हणून तू माझी मदत कर आणि माझी याचना ऐक आणि

माझ्याशी मैत्री (सहायता) कर. शेवटी नि:संशय तुझ्याशिवाय माझा कोणीच मदतगार नाही, आणि तुझ्याशिवाय कोणीच माझ्या मदतीस येणार नाही, नाही तर हे अल्लाह ! तुझ्याशिवाय कोणाकडेच मी याचना केली असती. हे सप्त महाश्लोक आणि तत्त्वदर्शी जपाचा अधिकारी अल्लाह ! यांच्यासह मी याचना करतो की माझ्यासाठी देवदूतांचे आत्मे आणि त्या पवित्र अध्यायास वशीभूत कर. नि:संशय तू प्रत्येक वस्तूस समर्थ आहे. हे दोन्ही जगांच्या स्वामीचे देवदूतहो ! महामंत्राचा (इस्म-ए-आज़म) च्या प्रभावाखाली कबूल करा, आणि या मंत्र-सिद्धी आवाहनासाठी आणि त्या तत्त्वदर्शी (परमेश्वराच्या) जपासाठी. हे देवदूतहो मी तुम्हाला परमेश्वराची शपथ घालतो. परमेश्वराच्या शुभनामांचे आज्ञापालन करण्यासाठी कबूल करा. परम दयाळू व कृपाळू अल्लाहच्या नावे तुमची मी मदत मागतो. महामंत्राच्या अधिकारास्तव जे सूर्य-चंद्राच्या अंत:करणावर कोरलेले आहे आणि परम दयाळू व कृपाळू परमेश्वराच्या नावाने मी सुरू करतो. सर्व स्तुति, सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच योग्य होय. यासह हे **रूक़ियाईल**, दोन्ही जगांचा प्रभू आणि प्रबळ शासक असलेल्या परमेश्वराचा आदेश तुझ्यावर खरोखर बंधनकारक असलेले हे प्रतिष्ठित, सुसभ्य रूक़ियाईल, तू हजर हो आणि तुझे मदतगार आणि तुझे आदेश मानणारे समस्त गोतावळे (गोत्र), तुम्ही (सर्व) क़बूल करा आणि माझे मदतगार बना माझ्या संकल्प परिपूर्तीसाठी खरोखर महामंत्रासोबत जे काही मी म्हटले आहे. हे अल्लाह, तू माझा मदतगार बन (होऊन जा) आणि हे **समसाईल** मी तुला शपथ घालतो खरोखर, आकाश उंच करणाऱ्या (ईश्वरा) स आत्मसात करून घे हे **जिब्राईल** खरोखर, चंद्राच्या अंत:करणावर अंकित नामाने आणि एकमेव प्रकोपी अल्लाहच्या वास्तवतेसाठी, कबूल कर. हे शुभ्र अंड्याचा तेजस्वितेचा पिता (अबू अनवरुल बैज़) ज्याचा आदेश तुझ्यावर प्रबळ आहे त्या वास्तविक सम्राटासाठी (हे) **शमाइल** तू आणि तुझ्या अधीनस्थ आणि तुझे गोत्र आणि भक्त गण सर्व (जण) कबूल करा आणि माझे मदतगार बना आणि मी तुमच्याकडून जे अपेक्षितो ते करून टाका. अत्यंत पवित्र आणि निर्विकार असा देवदूत आणि आत्म्याचा प्रभू कबूल करा तुम्ही आणि त्याच्या नामांचे आज्ञापालन करणारे आणि ऐकणारे कबूल करून टाक (हे) **मीकाईल** ज्याने आकाशांना व पृथ्वीस निर्माण केले आणि जो प्रत्येक वस्तूस ओळखतो त्या तत्त्वविद् (परमेश्वराचे जप आणि त्याच्या निशाणांच्या अनुषंगाने ज्याचा आदेश तुझवर बंधनकारक आहे त्या (विश्व) सम्राटाच्या अनुषंगाने हे बर्क़ात तू कबूल कर (हे) **कस्फ़ाईल** तू आपले मदतगार व गोत्र आणि जे तुझ्या अधीन आहेत त्या सर्वांसह हजर हो. हे पार्थिव देवतागण, जनलोकाच्या देवतागणच्या अनुषंगाने त्या माझ्या घरामध्ये ह्या वेळेस लवकर आताच हजर हो अल्वहा, अल्वहा, अल्वहा; अल् अज़लु, अल् अज़लु, अल् अज़लु; अस्साअतु, अस्साअतु, अस्साअतु; अल्-अज़ल अर्थात सृष्टी निर्माण होणार नाही; मात्र (विस्फोटाचा) एक आवाज होईल. शेवटी अचानक ते मौन होतील. निराश लोक ज्यांच्याजवळ महाप्रेषित (रसूल) येईल (तेव्हा) ते त्याचा उपहास करतात. (करतील.) कबूल करा आमि आज्ञापालन करा. तुमच्यापैकी जो मागे राहील त्याला देवदूत आगीच्या उल्कावर्षावामध्ये जाळतील. ''आणि आम्ही आकाशालाही चाचपडून (ढुंढाळून) पाहिले तो, मोठ्या मजबूत रक्षकांच्या चौक्यांनी व उल्क्यांच्या (च्या ज्वालां) नी भरलेले असे त्याला पावलो. (८) आणि पूर्वी तर आकाशांत पुष्कळशी स्थळे होती की जेथे आम्ही ऐकण्यासाठी (जाऊन) बसत असूं. (परंतु) आता जो कोणी ऐकू पाहील, तर एक उल्का (- गोलक) तो आपल्या पाळतीत लागलेला (तयार) पावेल. (९) आणि आम्ही

जाणीत नाही की, (या व्यवस्थेने) जे कोणी पृथ्वीत (राहत) आहेत त्यांस नुकसान पोहोचविणे मंजूर आहे ! अगर त्यांच्या विधात्याचा हेतु त्यांचे कल्याण करण्याचा आहे ! (१०) आणि आमच्यातून कित्येक तर सदाचरणी होत आणि आम्हांपैकी काही ह्याशिवाय आणखी (दुसऱ्या प्रकारचे) होत. (सारांश) आम्हीही निरनिराळे पंथ (होत आलो) आहो. (११) आणि (आता) आम्ही समजून घेतले की, आम्ही पृथ्वीत (राहून) परमेश्वरास हरवू शकणार नाही, आणि (कोणीकडे) पळूनही त्याला हरवू शकणार नाही. (१२) आणि आम्ही जेव्हा सन्मार्गाची गोष्ट ऐकली तेव्हा आम्ही तिचा विश्वास धरला. तर जो कोणी आपल्या विधात्याचा विश्वास धरील, त्याने कोणाही नुकसानास व (कोणा) अन्यायासही भिऊ नये. (१३) आणि आम्हांपैकी कित्येक तर मुसलमान – आज्ञाधारक – (सेवक) होत व आमच्यातून कित्येक (आज्ञेहून) चळणारे होत. तर ज्यांनी (इस्लाम म्हणजे) आज्ञाधारण पत्करले. त्यांनी सरळ मार्ग शोधून काढला. (१४) आणि ज्यांनी शिरजोरी केली ते (वाकड्या मार्गाने चालले व अखेर) नरकाग्नीचे इंधन बनून गेले.'' [व्व अन्ना लमसूनस्समा।अ फ़वजद्नाहा मुलिअत् हर्सन् शदीदंव्व शुहबन् (८) व्व अन्ना कुन्ना नकुदु मिन्हा मक़ाअिद लिस्समूअि फ़मंय्यस्तमिअिल् – आन यजिद् लह् शिहाबर्रसदन् (९) व्व अन्ना ला नद्री । अशर्रून् उरीद बिमन् फ़िलअर्ज़ि अम् अराद बिहिम् रब्बुहुम् रशदन् (१०) व्व अन्ना मिन्नस्सालिहून व मिन्ना दून ज़ालिक कुन्ना तरा।अिक क़िददन् (११) व्व अन्ना अनन्ना । अल्लन् नुडज़िजल्लाह फ़िल्अर्ज़ि व लन् नुऽज़िजह् हरबन् (१२) व्व अन्ना लम्मा सामिऽनल्–हुदा । आमन्ना बिह फ़मंय्युअ्मिम्–बिरब्बिह् फ़ला य़खाफु बख्संव्व ला रहक़न् (१३) व्व अन्ना मिन्नल्–मुस्लिमून व मिन्नल्–क़ासितून फ़मन् अस्लम फ़उला । इक तहरौं रशदन् (१४) व अम्मल्–क़ासितून फ़कानू लिजहन्नम् हतबन् (१५) ] हे देवदूतगणाचे आत्मे तुम्हास माझी शपथ ! ईश्वरी शुभ नामाच्या आणि त्याच्या श्लोकांच्या अनुषंगाने खरोखर मी तुमच्यावर मंत्र टाकले त्यास कबूल करा, तुमच्यापैकी कोणी मागे राहू नये, ऐका आणि हजर व्हा आणि समस्त पृथ्वी (वर) मध्ये दाखल व्हा. हे पार्थिव गण, तुमच्यावर ईश शुभनामांमधून जे काही मंत्र फुंकले त्याचा स्वीकार करा आणि तुमच्यापैकी कोणीही मागे राहू नये. हे पार्थिव आत्मे ! जी शपथ मी तुम्हाला दिली तिचे आज्ञापालन करा आणि खरोखर ती शपथ तुम्ही जाणून असाल तर ती फार मोठी शपथ आहे. ''आणि हे प्रेषिता ! लोकांस सांग की, परमेश्वर म्हणतो की, मक्केचे लोक धर्माच्या सरळ मार्गावर कायम राहते,तर आम्ही त्यांना रेलचेल पाणी पाजतो. (१६) अशासाठी की आम्ही या (सुबत्तेच्या देणगी) त त्यां (च्या उपकाराची स्तुती) ची परीक्षा पाहावी. आणि जो कोणी आपल्या विधात्याच्या स्मरणापासून तोंड फिरवील, तर तो त्याला सक्त शिक्षेत नेऊन दाखल करील. (१७) आणि उपासनेची सर्व स्थाने (मशिदी) अल्लाहच्या उपासनेशाठी आहेत. तर (लोकांनो! त्यात) परमेश्वराबरोबर (आणखी) कोणाचा धावा करू नका. (१८) आणि जेव्हा परमेश्वराचा सेवक (म्हणजे मुहम्मद) परमेश्वराची उपासना करण्यास उभा राहतो तेव्हा (लोक गर्दी करून येतात व) जवळ जवळ त्याला चिकटून जातात. (१९) (हे प्रेषिता ! या लोकांस) सांग की मी तर केवळ आपल्या विधात्याची उपासना करतो आणि कोणालाही त्याचा सहभागी ठरवीत नाही. (२०) (हे प्रेषिता ! या लोकांस) सांग की तुमचे नुकसान किंवा कल्याण (काहीही) माझ्या अधिकारात नाही. (२१) (हे प्रेषिता ! या लोकांस) सांग की परमेश्वरा (चे कोपा) पासून कोणीही मला आश्रय देऊ शकत नाही, आणि त्याच्याशिवाय मला कोठे आसराही मिळू शकत नाही. (२२) माझा बचावतर यातच आहे की परमेश्वराकडून (जी आज्ञा आली आहे ती

लोकांस) पोहोचवून द्यावी आणि त्याचे निरोप (सर्वांस ऐकवावेत). आणि जो कोणी परमेश्वर व त्याचा प्रेषित यांची आज्ञा मोडील, तर काही संशय नाही की (शेवटी) त्याच्यासाठी नरकाग्नी) होय; त्यात ते निरंतर राहतील. (२३) (परंतु नास्तिक तर) त्यांना ज्या (शिक्षे) चा वायदा केला जातो ती (शिक्षा) पाहून घेईपर्यंत (या गोष्टीस मानणार नाहीत.) मग त्या वेळी यांना माहीत होऊन जाईल की, कोणाचे मदतगार नेभळे होत आणि (कोण) संख्येत अत्यल्प होत? (२४) (हे प्रेषिता ! या लोकांस) सांग की, ज्या (शिक्षे)चा तुम्हास वायदा केला जातो, मी जाणत नाही की, ती जवळ आहे ! किंवा माझा विधाता अमुक एका काळपर्यंत तिला दिरंगाईवर टाकील ! (२५) (तोच) अदृष्टाचा ज्ञाता होय, तर तो आपल्या अदृष्ट गोष्टी कोणालाही जाहीर करीत नसतो, (२६) पण ज्या प्रेषितास तो प्रसन्नतापूर्वक निवडून घेईल त्यालाच मात्र (कोणा प्रयोजनामुळे तो एखादी गोष्ट जाहीर करू इच्छितो), ते ही (अशा खबरदारीने की,) त्याच्या पुढून व त्याच्या मागून (देवदूतांचा) पहारा (त्याच्या संगती) ठेवतो. (२७) [व्व अल्लविस्तक़ामू अलत्तरीक़ति लअस्क़ैनाहुम् मा । अन्  गदक़न् (१६) ल्'लिनफ़ुतिनहुम् फ़ीहि व मंय्युऽरिज़् अन् ज़िक्रि रब्बिह् यस्लुक्हु अज़ाबन् (१८) व्व अन्नह् लम्मा क़ाम अब्दुल्लाहि यद्अुहु कादू यकूनून अलैहि लिबदन् (१९) कुल् इन्नमा । अद्अू रब्बी व ला । उश्रिकु बिह् अहदन् (२०) कुल इन्नी ला । अम्लिकु लकुम् ज़र्रंव्व ला रशदन् (२१) कुल् इन्नी लंय्युजीरनी मिनल्लाहि अहदुन् व्व लन् अजिद मिन् दूनिह् मुल्तहदन् (२२) इल्ला बलाग़म्-मिनल्लाहि (व रिसालातिह्) व् मंय्यऽसिल्लाह व रसूलह् फ़इन्न लह् नार जहन्नम ख़ालिदीन फ़ीहा । अबदन् (२३) हत्ता इज़ा रऔ मा यूअदून फ़सयऽलमून मन् अज़्अफु नासिरंव्व अक़ल्लु अददन् (२४) कुल् इन् अद्री । अक़रीबुम्-मा  तूअदून अम् यज्अलु लह् रब्बी । अमदन् (२५) आलिमुल्-ग़ैबि फ़ला युज़्हिरू अला ग़ैबिह् । अहदन् (२६) इल्ला मनिर्तज़ा मिर्रसूलिन् फ़इन्नह् यस्लुकु मिंबैनि यदैहि व मिन् ख़ल्फ़िह रसदन् (२७) ]

हे अल्लाह तुझी (वर्णाक्षरे) ता म्हणजे 'तूल' विलंब (उशीरा), बा म्हणजे 'बक़ा' चिरंतनता, काफ़ म्हणजे 'कुद्रत' सामर्थ्य, ता म्हणजे तबर्रुक प्रसाद आणि सा म्हणजे सबूत-ए-मुल्क साम्राज्याचे प्रमाण आणि तुझ्या 'कुर्सी' पादपीठाच्या विस्तीर्णतेसह, मी याचना करतो. हे ती परम सत्ता (ज़ात), त्याच्या साम्राज्यामध्ये त्याचे अनुमान सापडत नाहीत. हे ती परम सत्ता जिच्यापासून प्रत्येक वस्तू शरण मागते, आश्रय मागते. कोणतीच वस्तू अशी नाही की जी त्याचे आश्रय मागत नसेल आणि ना त्या साम्राज्यामध्ये आश्रय दिले जाते.  हे अल्लाह तुझ्यापाशी याचना करतो, शेवटी ना लाभ आणि ना हानीचा मी धनी आहे, मात्र तुझ्या आदेशाशिवाय हे घडत नाही. तू आपल्या प्रेषितांशी केलेल्या वायद्याबरहुकूम आणि त्यांच्यासोबतच संत-महात्म्यांना तू केलेल्या मार्गदर्शनानुसार, हे अल्लाह ! मी तुझी याचना करतो. हे वैभवशाली (जलील), हे वैभवशाली, हे  वैभवशाली, हे पवित्र, निर्विकार (कुद्दूस) हे पवित्र, निर्विकार, हे पवित्र निर्विकार, हे अल्लाह, हे अल्लाह, हे अल्लाह. हे ती परम सत्ता जिच्यासाठी आकाशे आणि पृथ्वीचे साम्राज्य आहे. ती परम सत्ता हे अल्लाह ! तो सर्व काही जाणतो आणि त्याच्याशिवाय कोणीच जाणत नाही., मी तुझ्या प्रतिष्ठेसह, प्रत्यक्ष ज्ञान आणि सद्गती (क्षमे)सह आणि वर्णाक्षर फ़ा म्हणजे 'फ़ज़ल' कृपा, काफ़ म्हणजे 'किब्रियाई' ईश्वरत्व (महत्ता), लाम म्हणजे 'लुत्फ़' अनुकंपा, आनंद, याए म्हणजे 'यक़ीन' दृढ विश्वास आणि अलिफ़ म्हणजे 'अल् हूवीय्यत' सोऽहम्, तदत्त्व आणि ज़ा म्हणजे 'ज़िया' ज्योती, चमक (या सर्वांसह) याचना करतो. हे अल्लाह, मी तुजपाशी वर्णाक्षरे

ज़ा म्हणजे 'ज़ीनत' शोभाश्री आणि शीन म्हणजे 'शिफा' स्वास्थ्यलाभ यांच्यासह याचना करतो. हे चिरंजीव, हे चिरंतन, हे अल्लाह तुझी उपासनालये (मशिदी), सदाचारी सेवक, नमन करणारे आणि कृपा करणारे यांच्या अनुषंगाने मी याचना करतो. शेवटी नि:संशय तूच उदार उदधि अल्लाह आहेस. ज्याने कृपायाचना केली तुझ्यापाशी माझ्या अधीन कर आणि माझी मनोकामना पूर्ण कर आणि माझा मदतगार बन (होऊन जा). ज्या इसमाने आपल्या प्रभूशी शंका उपस्थित केली नाही त्याच्या अनुषंगाने हे अल्लाह, मी तुझी याचना करतो आणि हे की माझ्यासाठी उपस्थित कर आणि सोपे कर (माझे काम) आणि मला मदत कर आणि माझे चांगले काम माझ्यासाठी सोपे कर. हे अल्लाह, हे ती परमसत्ता ज्याची वाणी आहे मी तुझ्याशी याच वाणीच्या अनुषंगाने हे अल्लाह, हे तो ज्याने प्रत्येक वस्तूची गणती करून ठेवली आहे आणि ज्याने नद्या प्रवाहित केल्या आहेत आणि सृष्टीतील सजीवांना नष्ट करतो आणि जो सदैव सदैव नित्य आहे हे ती परम सत्ता गुणगान करणारे तिचे गुणगान करू शकत नाहीत आणि ती अवर्णनीय आहे. स्थितप्रज्ञावस्था आणि उपविश्यासनासह त्याचे गुणगान केले जाऊ शकत नाही. अशी अवस्था आणि नामांच्या सेवकासाठी तू माझ्यासाठी अधीनस्थ कर. माझी सेवा आणि आज्ञापालन करावी. नि:संशय तुझा प्रत्येक वस्तूवर प्रभुत्व आहे. हे अल्लाह, हे या मंत्रसिद्धी आवाहनाचे सेवक देवदूतगण. हे अल्लाह, माझी शपथ तुम्हास हे महान देनदूतगण आणि आकाशाच्या वेताळासोबत त्या परम पवित्र सत्तेस की ज्याने तुम्हास आपल्या प्रकाशापासून निर्माण केले आणि आपल्या महा राजसिंहासनाखाली ठेवले आहे आणि हे की तुम्ही ऐकणारे कबूल करा, माझ्या संकल्पित कामामध्ये परिवर्तन आणि चमत्कार घडवून आणणारे, या मंत्रसिद्धी आवाहनाची, प्रभुनामांची आणि या अध्यायांची तुम्हास **अर्क़वश, अर्कवश; कलहुवश, कलहुवश; बततहुश, बततहुश; मकतहुवश, मकतहुवश; बहुवश, बहुवश; क़ानुवश, क़ानुवश;** यांच्या अनुषंगाने माझी शपथ ! रवी ग्रहाचे वेताळ हे **रूक़ियाईल** ! मी तुला शपथ घालतो. त्या परमेश्वराच्या अनुषंगाने ज्याच्याशिवाय अन्य कोणीच उपास्य नाही. प्रत्येक वस्तू नाश होणारी आहे. आणि सत्ता त्याच्यासाठीच आहे. आदेश त्याजकडेच रुजू केले जातील. सद्धर्माच्या व तुझ्या पंथाच्या हुजूरासह हे **रूक़ियाईल** तुला शपथ ! ज्याचा आदेश तुझ्यावर अनिवार्य आहे त्या सम्राटाच्या अनुषंगाने हे **रूक़ियाईल** व पंथ तू कबूल कर. याहु याहुच्या अनुषंगाने तू कबूल करावेस. अबैज़च्या उपस्थितीसोबत हे **जिब्रईल** मी तुला शपथ घालतो. तुझ्यावर अनिवार्य असलेल्या त्या सम्राटाचा आदेश खरोखर हे अबैज़ तू कबूल कर. आणि जो ऐकणारा आहे त्याचाही आदेश तू कबूल कर आणि घाई कर आणि मंगळ ग्रहाचे वेताळ हे समसाईल 'काफ़' आणि 'नून' (भव, हो) म्हणजेच नादब्रह्माच्या दरम्यान जिचा आदेश आहे अर्थात निमिषमात्रात मनोवांछित घटित होऊन जाणे, त्या परम सत्तेच्या अनुषंगाने शक्य आहे मी तुला आदेश देतो. नि:संशय त्याचा आदेश हा आहे की जेव्हा तो एखाद्या गोष्टीचा संकल्प करतो तेव्हा तो तिला होऊन जा एवढेच म्हणतो. शेवटी निमिषमात्रामध्ये ती गोष्ट होऊन जाते. 'कुन फ़यकून.' मलिक **अहमद**च्या हुजूरासह हे **समसाईल** कबूल कर आणि **समसाईल** तुझ्यावर त्या सम्राटाचा जो आदेश बंधनकारक आहे त्याच्या अनुषंगाने हे **अहमद** कबूल कर, आणि **दमखील**च्या अनुषंगाने हे तू कबूल कर आणि जो आदेश मी तुला दिला आहे त्याच्यासोबत बजाव. बुध ग्रहाचे वेताळ असलेले हे **मीकाईल** देवदूत त्या परम सत्तेच्या अनुषंगाने की दृष्टी त्याला पाहू शकत नाही. तो त्या दृष्टीचा द्रष्टा आहे. आणि ते सूक्ष्मदर्शी, मर्मज्ञ, दोषापहारी व सावध आहे, मी तुला शपथ घालतो.

**बुर्क़ानच्या** उपस्थितीत हे **मीकाईल** कबूल कर, ज्याचा आदेश तुझ्यावर बंधनकारक आहे. अशा त्या सम्राटाच्या हुजूर हे **बुर्क़ान** कबूल कर. अहिया अशराहियाच्या अनुषंगाने हे **मीकाईल** कबूल कर तू आणि घाई कर तू आणि शीघ्रता (लवकर) कर तू आणि त्याच्यासोबत तुला जो आदेश दिला आहे तो बजाव. गुरू ग्रहाचे वेताळ असलेले हे **सर्फ़याईल** देवदूत, आकाशांचा व पृथ्वीचा प्रकाश असलेले अल्लाहच्या अनुषंगाने मी तुला शपथ घालतो. **शमहूरश**च्या अनुषंगाने हे **सर्फ़याईल** कबूल कर. ज्याचा आदेश तुझ्यासाठी बंधनकारक आहे अशा त्या सम्राटाच्या अनुषंगाने हे **शमहूरश** कबूल कर. मेष राशीचे क्लेश हे **सर्फ़याईल** कबूल कर तू आणि घाई कर तू आणि लवकर कर तू आणि दिलेल्या हुकमाची अंमलबजावणी कर. शुक्र ग्रहाचे वेताळ असलेले हे **ऐनाईल**, प्रत्येक मादीचा गर्भ जो जाणतो आणि तिच्या उदरामध्ये जे काही कमी जास्त होत असते तेही जो जाणतो त्या पवित्र परम सत्तेच्या अनुषंगाने, तुला शपथ घालतो. आत्मा व देवदूतांचा अत्यंत पवित्र व निर्विकार असा जो प्रभू त्याच्या अनुषंगाने हे **ऐनाईल** कबूल कर. त्याच्यासह जो काही आदेश मी देत आहे तो कबूल कर. विध्वंसक ग्रहाच्या वेताळाच्या अनुषंगाने हे **सुफ़याईल** कबूल कर, शिवाय जो मर्म आणि ब्रह्मांडास जाणतो त्याच्या अनुषंगाने पण कबूल करावेस. मैमून (शुभ) **अबानूख़**च्या हुज़ूरात हे **कस्फ़याईल** कबूल कर. ज्याचा हुकूम तुझ्यासाठी बंधनकारक आहे त्या सम्राटाच्या अनुषंगाने हे मैमून (शुभ), अज़ल (अनादि), अज़ल, इद्राक (गोचर), इद्राक, अर्ज़याल अर्ज़याल याच्या अनुषंगाने, 'बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम' अर्थात अल्लाहच्या नावाने जो अत्यंत दयावंत व असीम कृपावंत आहे. – च्या अनुषंगाने हे पृथ्वीच्या प्रभूच्या देवदूतानो ! तुम्हांस शपथ घालतो आणि हे की त्या ऐकणाराच्या अनुषंगाने की ज्याने आकाशांना व पृथ्वीस आदेश दिला की तुम्ही दोघे स्वखुशीने या किंवा बळेच (जबरदस्तीने). त्या दोघांनी उत्तर दिले की आम्ही स्वखुशीने आलो. दृढ विश्वासाच्या वास्तविक सम्राटाच्या अनुषंगाने की जो मानवास प्रत्येक प्रकारच्या तंगीपासून वाचवितो आणि मुहम्मद[स.] आणि त्यांचे सत्यनिष्ठ सहचरां (साथी) च्या प्रतिष्ठेच्या अनुषंगाने हे की या पार्थिवास तू माझ्यासाठी अधीन कर, माझ्या आज्ञापालनामध्ये ते माझे मददगार व्हावेत. अहैया अहैया कर्शु यतमोशु अकशु कशलख़ च्या अनुषंगाने आणि निरपेक्षाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने की त्याच्यापासून कोणी जन्मला नाही, व तो ही कोणापासून जन्मला नाही ना त्याची जात आहे ना गोत्र (वंश) आहे आणि हे की तुम्ही घाई करा आणि तुम्ही कबूल करा आणि तुमच्यापैकी एक पण गैरहजर राहू नये, लवकरात लवकर याच क्षणी तुमच्यामध्ये आणि तुमच्यावर अल्लाह बरकत देओ. त्याच्यासह तुम्हास शपथ घातली आहे आणि निःसंशय जर तुम्ही ओळखत असाल तर ही फार मोठी अशी शपथ आहे.

### मंत्रसामर्थ्य असलेले काही कुरआनी अध्याय व श्लोक

#### १) ३६. सूरतु–यासीन (यासीनचे प्रकरण)

यासीन ही त्रोटक अक्षरे आहेत. या संबोधनसूचक अक्षरांचे अनुमानित अर्थ आहे 'हे परिपूर्ण नेत्या. सरदारा! यासीन म्हणजे हे सरदार, या पदवीद्वारे प्रेषित मुहम्मद[स.] यांना संबोधून परमेश्वराने सांगितले आहे की, तूही इतर प्रेषितांपैकीच एक प्रेषित आहेस. या अध्यायात या त्रोटक अक्षरांवरून हे नाव देण्यात आले आहे.

याला कुराणाचे हृदय वा अंत:करण असेही नाव प्रेषितांनी दिले आहे. याच्या पारायणाने प्राणोत्क्रमणाच्या वेळेची याचना शमते. म्हणून त्यावेळी हा वाचून ऐकविण्याचा सुयोग असतो.

**२) त्याचप्रमाणे ६७, सुरतुल् – मुल्क (राज्य किंवा शासनाचे प्रकरण)**

खरे राज्य परमेश्वराचेच होय. यास 'रक्षक' व 'तारक' असे दुसरे नावही होय; कारण हजरत पैगंबर साहेबांच्या वचनाद्वारे जो कुणी हा अध्याय मन:पूर्वक वाचील, परमेश्वर त्याला कबरेच्या – समाधीच्या यातनेतून तारील.

**३) तसेच ११२. सूरतुल् – इख़लास (निरपेक्षतेचे प्रकरण)**

याचे नाव ' सूरतुल् – इख़लास' म्हणजे शुद्ध व निर्मलभाव जो परमेश्वरसंबंधाने माणसाला ठेवलापाहिजे त्याचे प्रकरण असे आहे. याच्या मंत्रोच्चारामुळे हेवेखोराच्या हेवेस प्रतिबंध होतो.

**मंत्रसामर्थ्ययुक्त काही कुरआनी श्लोक**

**१) प्रगाढ प्रेमासाठी जंत्र–मंत्रामध्ये प्रयुक्त कौराणिक श्लोक.**

''(हे मूसा !) मी तुजवर आपल्याकडून प्रेम (– प्रतिबिंब) टाकले (की तुला जो पाहील तो प्रेम करू लागेल) आणि (ह्यात) उद्देश हा होता की माझ्या नजरेखाली तुझे पालन पोषण केले जावे. (३९) (हा त्याच) वेळेचा वृत्तांत होय की जेव्हा तुझी बहीण (परकी बनून 'फ़िरऔना'च्या लोकांस) चालता चालता बोलत जात होती की (म्हणाल तर) मी तुम्हाला अशी (एक दाई) दाखवून देईन की त्याची (चांगल्या प्रकारे) जोपासना करील. तर (या युक्तीने) आम्ही तुला पुन्हा तुझ्या आईकडे पोहोचवून दिले; की तिचे डोळे निवावेत – गार राहावेत व तिने (तुझ्या वियोगाचा) क्लेश करू नये.'' (४०) – २०:३९–४०

[''अलक़ैतु अलैक महब्बतम्मिन्नी व लितुस्नअ अला अैनी (३९) अिज् तम्शी' उख़्तुक फ़तक़ूलु हल् अदुल्लुकुम् अला मंयक्फुलुह् फ़रजाऽनाक अिला । उम्मिक कै तक़र्र अैनुहा व ला तहज़न'' (४०)]

**२) प्रेम आणि अंत:करणाच्या स्फूर्तिसाठी प्रयुक्त कौराणिक श्लोक:–**

क) ''आणि त्यानेच (अल्लाहच) त्यां (श्रद्धावंतां) च्या मनात परस्पर प्रीति उत्पन्न केली. जरी तू पृथ्वीवरील अवघे (खजिनेही) खर्च केले असते तरीही तू त्यांच्या मनात परस्परात प्रीति निर्माण करू शकला नसता. फरंतु परमेश्वरच (होता की) त्याने त्यांच्यात प्रीति उत्पन्न केली. नि:संशय तो फार सामर्थ्यवान् (व) बुद्धिमान् आहे.'' – ८:६३

[व अल्लफ़ बैन कुलूबिहिम् लौ अन्फ़क्त मा फिल्अर्ज़ि जमीअम्–मा। अल्लफ्तबैन टकुलूबिहिम् व लाकिन्नल्लाह अल्लफ़ बैनहुम् अिन्नह् अज़ीज़ुन् हकीमुन् – ८:६३]

ख) ''नवल नाही की तुम्ही आणि ज्यांच्याशी (सध्या) तुमचे वैर आहे ते लोक यांच्यात अल्लाह स्नेह निर्माण करील; आणि अल्लाह परम समर्थ आहे; आणि अल्लाह हा अतिशय क्षमाशील (व) दयाळू आहे.

[असल्लाहु अंय्यज्अल बैनकुम् व बैल्लजीन आदैतुम् मिन्हुम मवदत्तन् वल्लाहु क़दीरुन् वल्लाहु ग़फ़रूर् – रहीमुन् – ६०:७]

**मोहिनीची तोंडओळख**

१) **मोहिनी वशीकरण**

मोहिनीचे रहस्य :-

*''बिस्मिल्ला हक़ मोहिनी इल्लल्लाह*
*जग मोहिनी मुहम्मदुर्रसूलल्लाह ।।''*

२) **मोहिनी माला**

*''ला इलाह जगदीनी*
*इल्लल्लाह जग मोहिनी*
*मुहम्मदुर्रसूलल्लाह*
*जग मोहिनी ।।''*

३) **मोहिनी मंत्र**

*''मन मोहू, तन मोहू*
*मोहू सकल शरीर ।।'' - जिंदा शाह मदारकृत*

ही मोहिनी जिंदा शाह मदारची आहे, हे दस्तगीर (मदतगार) मदत करा!

४) **''या बुदव्वह'' ची मन मोहिनी मंत्र-सिद्धी**

सर्वसाधारणपणे अशिक्षित लोकांचा असा ग्रह (समज) आहे की, ''या बुदव्वह'' हे काल्पनिक नाव मंत्र-सिद्धीच्या मांत्रिकांनी ठेवले आहे. यद्यपि ''या बुदव्वह'' इबरानी भाषेमध्ये 'अल्लाह' स म्हणतात. (अल्लाहच याबाबतीत चांगले जाणतो.)

आता बऱ्याच लोकांना माहित नसलेली गोष्ट उघड करण्यात येत आहे. 'हुमा' हा एक असा विरळ पक्षी आहे की कदाचित लोकांच्या पाहण्यातच नसेल. फारसीचे प्रख्यात कवी शेख़ सादी यांनी आपल्या 'गुलिस्तान' या ग्रंथामध्ये याची कथा सांगितली आहे. हेतू हा आहे की याच्या पंखावर 'या बुदव्वह' असे लिहिलेले आहे.

याचप्रमाणे घुबडास अपशकुनी मानतात, आणि खरोखर दिसायला तो तसाच आहे. परंतु काही जाणकारांचे असे मत आहे की तो एक फार मोठा उपासक आणि तपस्वी आहे. कारण की तो रात्रभर उपासना करत असतो. याच्या पंखाकडे पाहिल्यास 'या बुदव्वह' हे उलट पद्धतीने लिहिलेले दिसून येईल. 'बुदव्वह' या शब्दाचा विकास पुढीलप्रमाणे दाखविता येईल. -

बोधि → बुद्धि → बुद्ध → बुदव्वह → अल्लाह → परमेश्वर → परात्पर परब्रह्म

बुद्ध ↓ संस्कृत; बुदव्वह ↓ इबरानी; अल्लाह ↓ अरबी

परमेश्वराखातर हा मंत्र वाईट आणि निषिद्ध कृत्यासाठी उपयोगात आणू नये. प्रलयदिनी याचे परिणाम भोगावे लागतील. कारण दुष्ट व निषिद्ध हेतुने मंत्रसिद्धीचा उपयोग करण्यात आल्यास त्या मांत्रिकावर ईश्वराचा प्रकोप होतो.

२६

प्रकरण २६

# वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र

**क) संस्कृत देवनागरी वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र**

**१) देवनागरी वर्णक्षरांचे अध्यात्मशास्त्र[८४] : सामान्य परिचय : सर्वसाधारण तोंडओळख**

शास्त्रांमध्ये प्रसिद्ध आहे की ब्रह्म सच्चिदानंद स्वरूप आहे. वास्तविक सत्, चित् आमि आनंद हे तिन्ही भाव अभिन्न आहेत. तरी पण यांच्यापैकी प्रत्येक एक विशिष्ट भावाचे द्योतक आहे. सत् भाव असत् भावापासून वेगळे होऊन सन्मात्ररूपामध्ये विद्यमान राहू शकते आणि चिद्भावाशी अभिन्न स्वरूपामध्ये पण स्वत:स प्रगट करू शकते. तसे पाहता चिद्भाव आनंदाच्या अतीत असलेले परमसत्तेमध्ये विराजमान होऊ शकते, म्हणून पक्षांतराने ते आनंदासोबत अभिन्न असूनही स्वत:स प्रगट करू शकते. एका दृष्टीने पाहिल्यास हे चिद्भाव पूर्ण सत्याच्या बहिरंग भावाचे आदि प्रकाश आहे. तांत्रिक वाङ्मयामध्ये हे चिद्भाव 'अनुत्तर' नावाने ओळखले जाते. निजसत्ता जेव्हा सत्च्या चिद्रूपामध्यबाहेर पडते, तेव्हा चित्ची स्थिती निर्माण होते. चित् जसे स्पंदन-वश आनंदाकडे अभिमुख आहे, तसेच दुसरीकडे ते सत्कडे पण अभिमुख आहे. मानवाच्या चित्तामध्ये जसे अंतर्मुख आणि बहिर्मुख या दोन वृत्तींचे आम्हास प्रत्यक्ष अनुभव होऊ शकते; ठीक त्याचप्रमाणे परम-सत्याच्या आतमध्ये पण चित् आणि आनंद या दोन्ही अंशांचे हे द्विविध स्पंदन गृहीत होऊन जाते. (धरावे लागते.) चित्च्या बहि:स्पंदनामुळे जेव्हा द्वितीय चित्चा आविर्भाव होतो, तेव्हा त्या द्वितीय चित्च्या आत आपले प्रतिबिंब पाहते, आणि पाहिल्यानंतर आपल्या सत्तेच्या स्वरूपात ओळखू शकते. शास्त्रामध्ये यालाच आनंद म्हटले गेले आहे. जसे आरशामध्ये आपले रूप पाहिले जाते, आणि तिची वेगळी प्रचिती असून पण, ही माझी सत्ता आहे, याचे भान होते; त्याचप्रमाणे चित्च्या विशिष्ट चित्सत्तेमध्ये चित् जेव्हा स्वत:स पाहते, तेव्हा तिचे आनंद स्वरूपामध्ये अनुभव करते. वास्तविक हे पृथक् असे काहीच नाही. (ती) आपलीच सत्ता आहे. जसे सत्पासून चित् वेगळे नाही. तरी पण ते वेगळे आहे, त्याचप्रमाणे चित्पासून आनंद वेगळे नाही परंतु असे असूनही त्यास वेगळे मानावे लागते.

मागे सांगितलेलेच आहे की 'चित्'चे शास्त्रीय नाव 'अनुत्तर' आहे, अर्थात वर्णाक्षरमालेचे प्रतीक 'अ', सर्व वर्णाक्षरांमध्ये अग्रेसर असलेले 'अ' या वर्णाक्षराद्वारे अनुत्तरासच निशाणा बनविले जाते. तद्वत 'आ' वर्ण आनंदाचे प्रतीक आहे. हे सत्, चित् आणि आनंद अखंड स्वरूपात गृहीत असूनही एक अद्वैत ब्रह्मरूपामध्ये

आपल्या निकट आपणच प्रकाशित होतात. जरी ही ब्रह्मसत्ता निरंश आहे. तरी पण समजण्याच्या सोयीसाठी तिच्यामध्ये दोन अंशांची कल्पना केली जाते. सदा अव्यक्त आणि अव्याकृत असलेले एक सन्मात्र आहे, ते आहे – चिरनिगूढ सत्याची गंभीरतम स्थिती. त्याच्याच आधारे त्याचा प्रकाश चिद्रूपामध्ये विराजमान आहे. हे चित् वास्तवमध्ये चित्–शक्तीचे स्वरूप आहे, आणि जेव्हा हे आपल्यामध्ये अभिमुख होते, आणि अनुकूल संवेदन रूपामध्ये प्रकाशमान होते, तेव्हा याला 'आनंद' म्हटले जाते. हे आनंद ल्हादिनी–शक्तीचे स्वरूप आहे. चित् अवस्थेमध्ये अनुकूल आणि प्रतिकूल भाव नाही. चित्–सत्तेमध्ये एकच एक आहे, दुसरा कोणी नाही, परंतु आनंद–सत्तेमध्ये एकच द्वितीयाचे ढोंग रचून स्वतःच खेळत असतो. ही सृष्टीच्या अगोदरची अवस्था आहे. सृष्टीच्या संपूर्ण सामुग्रीच्या अभिव्यक्तीची पूर्व अवस्था आहे. या आनंदापासूनच, ज्याला आपण सृष्टी म्हणतो, अभिव्यक्ती होते. म्हणूनच श्रुति म्हणते -- 'आनंदाद्ध्येच खल्विमानि भूतानि जायन्ते.' युगलभावाशिवाय आनंद (निर्माण) होत नाही, आणि आनंदभावाशिवाय सृष्टी (निर्माण) होत नाही. बृहदारण्यक उपनिषदामध्ये म्हटले गेले आहे ... 'स एकाकी न अरमत । तदात्मानं द्विधा अकरोत्' इत्यादी. 'अ' पासून 'आ' ची अभिव्यक्ती होते आणि एकापासून दोनची अभिव्यक्ती होणे ही एकच गोष्ट आहे. हीच आत्मरमण आणि आत्मारामाची अवस्था आहे. याचे आस्वादन ब्रह्मवेत्ते करतात.

जसे फव्वाऱ्यातून पाण्याचे थेंब उचंबळून निघतात, त्याचप्रमाणे या आनंदरूप स्त्रोतामधून निरंतर आनंदाचे कण उचंबळून बाहेर पडताहेत. वास्तविक बाह्य अशी (म्हणून) कोणती सत्ता नाही. तरी पण आभास रूपामध्ये एक काल्पनिक बाह्यसत्ता मानावी लागते. वास्तविक ते आनंदसत्तेचे अभावमात्र आहे, दुसरे काहीच नाही. आनंदाचे सूक्ष्मकण आनंदाच्या मूळ स्थानापासून निघताच एका आवरणाने आच्छन्न होतात, आणि आपल्या अंतःस्थित आनंदसत्तेचा अनुभव करू शकत नाहीत. शास्त्रीय परिभाषेमध्ये हेच इच्छेचे विकास आहे. याचे प्रतीक 'इ' आहे. जेथे आनंद पूर्ण आहे आणि अभाव शून्य आहे. तेथे इच्छा नावाची कोणतीच शक्ती कार्य करू शकत नाही. इच्छेच्या विषयास इष्ट म्हटले जाते. ते आनंदाशिवाय आणखी काहीच नाही. कारण, इच्छामात्रासच आनंद अपेक्षित असते ती त्याला आवडते आणि आनंद प्राप्त करून इच्छा चरितार्थ होऊन स्वतःच विलीन होऊन जाते. वास्तविक इच्छा आनंदाची अन्वेषण करणारी किंवा तिला शोधणारी शक्ती आहे. हे सांगणे अनावश्यक आहे की, इच्छेपासून जगण्याचीच जगाची सृष्टी होते. म्हणून संपूर्ण जगतामध्ये सर्वत्र अन्वेषणाचाच एक भाव विद्यमान असतो. अणु–परमाणुपासून ते ते सूर्यमंडलापर्यंत किंवा नक्षत्रमंडलापर्यंत, स्थूलपासून कारण–जगतपर्यंत, सर्वत्रच मग ते प्रगट स्वरूपात असो की गुप्त स्वरूपात, एक अदृश्य आकांक्षेचा परिचय प्राप्त होतो. हे हरवलेले धन पुन्हा प्राप्त करण्याच्या एक विशेष प्रकारच्या आंतरिक वासनेशिवाय आणखी काहीच नाही. हे हरवलेले धन इच्छेचे विषयीभूत आनंद आहे, दुसरे काहीच नाही. जोपर्यंत आनंद प्राप्त होत नाही, तोपर्यंत अन्वेषणास – शोधास विश्रांती नाही. म्हणून इच्छा पण तृप्त होत नाही आणि पूर्णत्वाची प्राप्ती पण होत नाही.

आनंदरूप ही इष्ट वस्तू अद्याप अमूर्त अवस्थेमध्ये विद्यमान आहे. जेव्हा इच्छाशक्ती घनीभूत होते, अथवा संवेग द्वारा स्पंदित होते, तेव्हा ईशन–शक्तीचा उदय होतो. याचे प्रतिक 'ई' आहे. ही ईशन शक्तीच त्या शक्तीचे प्राण आहे. वास्तविक हे इच्छेशिवाय आणखी काहीच नाही. ही इष्ट वस्तू या वेळेस (सध्या) एषणीय

आहे. म्हणजेच इच्छेचा विषय आहे. हिच्या परावस्थेमध्ये जेव्हा हे गुप्तधन प्रगट होते, तेव्हा ते ज्ञेय रूपामध्ये स्वत:स प्रगट करते, तेव्हा इच्छा शक्तीचे आकार ग्रहण करते. या ज्ञानशक्तीचे दुसरे नाव उन्मेष आहे. याचे प्रतिक आहे 'उ'.

उन्मेषरूप ज्ञानशक्ती आपला विषय ज्ञेय-सत्तेस प्रकाशित करते. जसे इच्छा आणि एषणीय पृथक् नसूनसुद्धा पृथक् प्रतीत होतात, तद्वत ज्ञानापासून ज्ञेय फरक नसूनसुद्धा पृथक् प्रतीत होते. ज्ञानशक्ती 'ऊ'-कार द्वारे वर्णित होते आणि त्याचा विषय ज्ञेय 'ऊ'-कार द्वारे वर्णाक्षरमालेमध्ये गुंफले गेले आहे. हा 'ऊ' वास्तविक 'ऊ'चीच घनीभूत अवस्था आहे. शास्त्रीय परिभाषेनुसार याला 'ऊनता' किंवा 'ऊर्मी' असे म्हणतात.

ज्याप्रमाणे पाण्यापासून बर्फ स्वरूपत: अभिन्न आहे. तसेच 'उ'कारापासून 'ऊ'कार अभिन्न आहे. पाणी जसे घनीभूत होऊन बर्फाचे रूप धारण करते, तसेच ज्ञानशक्ती पण घनीभूत होऊन ज्ञेयचे रूप धारण करते. फरंतु बर्फ घनीभूत असल्यामुळे पाण्यापासून वेगळे प्रतीत होऊन पण ते खरोखर पाणीच आहे, आणि पाण्यापासून उत्पन्न होऊन पाण्याचे आश्रयानेच विद्यमान आहे. ठीक त्याचप्रमाणे ज्याला आपण ज्ञेय म्हणतो, अर्थात जो ज्ञानाचा विषय आहे, ते पण ज्ञानापासून वेगळे नाही. ती ज्ञानाचीच मूर्त अवस्था आहे, आणि ज्ञानापासून उत्पन्न होऊन आणि ज्ञानाच्या आश्रयाने स्वत:स प्रगट करते.

यावरून ज्ञात होते की ज्ञेय पदार्थ हे ज्ञानापासून वेगळे नाही, अविद्यावश पृथक् प्रतीत होते. परंतु अविद्या निवृत्त (नाहीशी) झाल्यावर तो ज्ञानाहून वेगळा प्रतीत होत नाही. ज्या अविद्येचा येथे उल्लेख आहे, जिच्या प्रभावामुळे ज्ञानापासून ज्ञेयाची पृथक् सत्ता प्रतीत होते, ती शास्त्रानुसार क्रिया-शक्तीचे नामांतर आहे. या क्रिया-शक्तीच्या प्रभावाने ज्ञानापासून ज्ञेय वेगळा होतो. पूर्वोक्त दृष्टांतामध्ये पाण्याने निर्मित बर्फाचा तुकडा जोपर्यंत पाण्यामध्ये बुडालेला असतो, तोपर्यंत असे समजले पाहिजे की क्रिया-शक्तीचा व्यापार सुरू झाला नाही, परंतु जेव्हा बर्फाचा तुकडा पाण्यापासून हटविला जातो, जेव्हा पाण्यापासून बर्फ वेगळा दिसू लागतो, तेव्हा जाणावे की अविद्यारूपी क्रिया-शक्तीचा खेळ सुरू झाला आहे. वर्णाक्षरमालेमध्ये या क्रिया-शक्तीचे प्रकाशक वर्ण – ए, ऐ ओ आणि औ आहेत. क्रिया-शक्तीच्या अस्फुट, स्फुट, स्फुटतर आणि स्फुटतम या चार अवस्था, त्या चार स्वर-वर्णांच्याद्वारे प्रकाशित होतात, क्रिया-शक्तीचा खेळ जेव्हा संपतो, तेव्हा क्रियेची निवृत्ती होऊन जाते.

अशा प्रकारे आपणास आढळून येते की स्पंदच्या बहिर्मुख संवेगामुळे एकामागून एक शक्तींची अर्थात कलांची अभिव्यक्ती होते. स्थूल दृष्टीने या शक्ती किंवा कला पाच भागांमध्ये विभक्त आहेत – चित्, आनंद, इच्छा, ज्ञान आणि क्रिया. प्राचीन महात्म्यांनी शिव अथवा परमेश्वराच्या पाच मुखांची कल्पना करून या पाच शक्तींचे संकेत केले आहे. (कदाचित् 'पाचामुखी परमेश्वर' ही म्हण याच कारणामुळे प्रचारात आली असावी.) या पाच शक्तींपैकी चित् आणि आनंद स्वरूप-शक्तीच्या अंतर्गत आहेत. ते सच्चिदानंद-स्वरूपाच्या अंतर्गत आहेत, आणि आपोक्षिक दृष्टीने इच्छा, ज्ञान आणि क्रिया या तीन बहिरंग-शक्ती स्वरूपात कल्पित आहेत. बहिरंग-शक्तीच त्रिकोण-रूपी विश्व-योनी किंवा महामाया आहे. मुळात (या) पाचही शक्तींच शक्ती आहेत. यालाच आम्ही स्वरूप-शक्ती असे म्हटले आहे. शक्ती नव्हे तर, ती केवळ सत्ताच आहे, जी गुप्त रूपामध्ये त्या अंतरंग-शक्तीच्या पण अंत:स्तलमध्ये विद्यमान असते. हे सांगणे आवश्यक आहे की प्रत्येक स्थितीमध्ये

एक अंत:प्रवाह आहे तर प्रलयाची गती अंतर्मुख आहे. जेथे ना अंतर्मुख आहे ना बहिर्मुख, अशी पण स्थिती आहे. म्हणून 'अ' पासून ते 'ऊ' पर्यंत जी धारा आहे, जो प्रवाह आहे, जिला प्रवृत्तीधारा म्हटले जाते, ती शक्तीची बहिर्मुखधारा आहे, परंतु क्रियाशक्तीच्या पूर्णतेसोबतच बहिर्मुख धारेचा अंत होऊन जातो, आणि त्या वेळेस स्वाभाविकपणे अंतर्मुख धारेची अभिव्यक्ती होते. प्रवृत्तीची धारा जेव्हा या वेळेस निवृत्तीच्या धारेमध्ये बदलते, तेव्हा त्या सर्व वेगवेगळ्या भासणाऱ्या शक्ती किंवा कला स्पंदनवश एकीभूत होऊन समष्टीभावास प्राप्त होतात, ज्यांचे नाव 'बिंदु' असे होते. हा बिंदु संपूर्ण कलांच्या किंवा शक्तींच्या एकीभूत अवस्थेचे नामांतर आहे. बिंदुची अभिव्यक्ती झाल्यावर हे स्वाभाविकपणे अनुत्तर किंवा अकारचा आश्रय घेऊन प्रकााशित होते. कारण, अकारच चित्तशक्ती किंवा अनुत्तर आहे. त्याचे आश्रय घेऊनच सर्व काही प्रकाशित होते. 'तस्य भासा सर्वमिदं विभाति ।'

याचेच नाव अंकार अर्थात बिंदु-संयुक्त (बिंदुयुक्त) अनुत्तर आहे. प्रथम बहि:स्पंदनाच्या वेगापासून जो आविर्भाव होतो, तो सन्मात्र किंवा अव्यक्तापासून होतो. त्याच्यानंतर ज्या बहिर्मुख धारेचे निर्गम होते, ते चित् किंवा अकार पासून होते. तिचे अवसान 'औकारा' मध्ये अर्थात चित्शक्ती पासून ते क्रिया-शक्तीपर्यंत पाच शक्तींचे आविर्भाव संपूर्ण झाले. या वेळेस अनुत्तर पंचशक्ति समन्वित झाले, अर्थात बिंदुयुक्त झाले. आता जी सृष्टी होईल ती 'अं' पासून होईल, 'अ' पासून नव्हे. प्रथमची सृष्टी ही बैंदव सृष्टी (बिंदुपासून बनलेली सृष्टी) या वेळेस तो एक बिंदुच विभक्त होऊन स्वत:स दोन बिंदूमध्ये परिणत करतो. याचेच नामांतर आहे – विसर्ग (:); आता जी सृष्टी होईल, ती वैसर्गिक सृष्टी (विसर्गापासून बनलेली सृष्टी) असेल. ही वैसर्गिक सृष्टी वास्तविक व्यंजन वर्गांची सृष्टी आहे. तांत्रिक परिभाषेनुसार हीच तत्त्व-सृष्टी आहे. 'क' पासून 'ह' पर्यंतचे व्यंजन वर्ण विभिन्न तत्त्वांचे द्योतक आहेत. ही सर्व प्रतीके मात्र आहेत; हे सांगणे नलगे. जेव्हा या तत्त्वांच्या अभिव्यक्तीनंतर तत्त्वसृष्टीचे अवसान होते, तेव्हा असे समजले पाहिजे की 'ह'-कार पर्यंत सृष्टी (निर्माण झाली आहे.)

बैंदव सृष्टीच्या वेळेस जसे कला किंवा शक्ती बहिर्मुख वृत्तीनंतर अंतर्मुखगतीमुळे बिंदुरूप धारण करून अकारमध्ये संयुक्त होते, त्याचप्रमाणे या जागी पण प्रत्यावर्तन क्रमाने अकारपासून हकार पर्यंत सृष्टी अहंभावामध्ये पर्यवसित होते. या वेळेस कला सृष्टी आणि तत्त्व-सृष्टीचे अंत झाल्याकारणाने अहंभावाची अभिव्यक्ती झाली. हे सांगणे व्यर्थ आहे की हेच पूर्ण – 'अहम्' आहे, कारण याचा प्रतिस्पर्धी दुसरा अहम् नाही. सन्मात्र अवस्था अहम् नाही, हे सांगणे अनावश्यक आहे. चिदानंद अर्थात सच्चिदानंद अवस्थेमध्ये पण अहम् नाही आणि शक्ती किंवा कलासृष्टी जेथे समाप्त होऊन गेली, तेथे पण 'अहम्' नाही. तत्त्वसृष्टी पूर्ण झाल्यामुळे 'अ्हम्' ची प्रथम अभिव्यक्ती होते. या पूर्ण अहम् मध्ये सर्व (समस्त) तत्त्व असतात, समस्त शक्ती असतात; अर्थात बहिरंग आणि अंतरंग शक्ती आणि परम अव्यक्त गूढसत्ता पण असते. वास्तविक हे 'पूर्ण अहम्' परम-शिवावस्था आहे, ज्यांच्यासोबत अभिन्न स्वरूपात परमशक्ती विराजमान असते. आपण जिला सृष्टी म्हणतो, ती या परम-शिवपासूनच निर्माण होते.

परंतु याची एक सूक्ष्म अवस्था आहे आणि एक स्थूल अवस्था. समग्र विश्व किंवा अनंत भुवनांना आपण सृष्टी असे म्हणतो. अहं भावापासून इदं-भावाचे उदय झाल्याशिवाय ती प्राप्त होत नाही. जेव्हा पूर्णाहं पासून

स्वातंत्र्यवश इदंभावाचा प्रथम विकास होतो, तेव्हाच विश्व-सृष्टीची सूचना जाणली पाहिजे. परंतु या इदं-भावाच्या अविर्भावा अगोदर एक अहम्‌चा अनंत अहंरूपांमध्ये स्वत:स प्रगट करतो. तेव्हा ''सर्व खल्विदं ब्रह्म'' या श्रुतिवाक्याची सार्थकता होते. यानंतर इदं-भावाचे स्फुरण झाल्यानंतर सर्वप्रथम सर्वशून्य-रूप परमाकाशाचे आविर्भाव होते, आणि त्याच्या आश्रयाने तो अनंत-अहं द्वितीय रूपामध्ये प्रगट होतो. ही इदं-सृष्टी आहे. ही महासमष्टीरूप आहे, त्यावेळेस पण काळाचे आविर्भाव झाले नाही. काळाचे पूर्वाभास महाकाळामध्येच प्राप्त होते. म्हणून या सृष्टीमध्ये पण वास्तविक क्रम नाही. एक अंत:क्रम आहे जरूर, परंतु ते वास्तविक क्रम नाही. म्हणून त्या वेळेस भूत, भविष्य आणि वर्तमान या तीन काळांची क्रिया नसते. प्रचलित कार्य-कारण-भाव पण नसतो. मात्र, अनंत विचित्रता असते. सर्व सत्तांमध्ये सर्व सत्ता अनुस्युत असतात. देशगत भेद रहात नाही, परंतु एक प्रकारचा भेद जाणवत असतो. यानंतर त्या महासृष्टीपासून खंड सृष्टींचा आविर्भाव होतो. त्याच ऐश्वरिक सृष्टी आहेत. त्यामध्ये काल-गत, देश-गत आणि स्वरूप-गत अनंत वैचित्र्ये आहेत. समष्टी-सृष्टी आणि व्यष्टी-सृष्टी याच्याच अंतर्गत आहेत. महासमष्टी-सृष्टी यापासून काहीशी वेगळी-निराळी आहे. महासमष्टी-सृष्टीमध्ये समष्टी-सृष्टी सारखे (तुल्य) कर्म, जन्म, मृत्यु, सृष्टी, प्रलय इत्यादी व्यापार होत नाहीत. आतापर्यतच्या विवेचना वरून हे समजून येईल की प्रचलित धारणे-नुसार विश्वसृष्टी परम-शिवपासूनच होते.

सृष्टीच्या मुळात बिंदु असतो. हाच महाबिंदु नावाने ओळखला जातो. प्रकाश अथवा शिवांश आणि विमर्श अथवा शक्त्यंश जेव्हा संतुलन स्वरूपात असतात तेव्हा ते 'बिंदु' या नावाने अभिहित होतात. फरंतु यामध्ये एक रहस्य असे आहे की स्थूल सृष्टीव्यापाराच्या अगोदर चित्शक्तीचा खेळ विद्यमान असतो. चित्शक्ती आपले स्वरूप अर्थात आत्म्यास आधार बनवून त्यावरच विश्वाची रचना करते. अर्थात त्यात निहित अव्यक्त विश्वास अगोदर परिस्फुट करते, तदनंतर त्यास इदं स्वरूपात ग्रहण करते. अशा प्रकारे आधारा (भिंती) वर प्रकाशमान चित्ररूपी विश्वाचे इदं स्वरूपात भाव होऊ लागतो.

जरी सृष्टीच्या मुळात बिंदु असतो, तरी वास्तविक नाद व ज्योती हे सृष्टीच्या मुळात असतात. कारण बिंदु क्षुब्ध झाल्यावर नाद आणि ज्योतीची अभिव्यक्ती होते. बिंदु स्वभावत: साधारणपणे निरंतर क्षरण-शील असतो. यामुळेच तो अक्षरास प्राप्त होत नाही. बिंदु क्षरित होऊन खंड-खंड वर्णरूपामध्ये प्रगट होत असतो. फरंतु हे सर्व वर्ण परस्पर मिळून एका आकारास प्राप्त होत नाहीत. (एक आकार ग्रहण करीत नाहीत.) वर्णक्षरांच्या संयोग-वियोगानेच पद, वाक्य आणि भाषेची उत्पत्ती होते. जर नाना वर्णाक्षरे विलीन होऊन एक रूप ग्रहण करतील, तर त्यामुळे पद, वाक्य काहीच बनू शकत नाहीत. तेव्हा जे काही (बाकी) राहील, ते ऊर्ध्व प्रवाहशील नादरूपी शब्द असेल. वर्णाक्षरसमूहाने आमच्या व्यावहारिक विकल्प-ज्ञानाचा उदय होतो. म्हणून नाद-भावाच्या अभिव्यक्ती सोबतच परमार्थ-ज्ञानाचा मार्ग खुला (मोकळा) होतो.

पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या शब्दांच्या तीन अवस्था आहेत. तेच प्रणवचे 'अ'कार, 'उ'कार आणि 'म'कार आहेत, अथवा ऋक्, यजु आणि साम या वेद-त्रय स्वरूपामध्ये ज्ञातीच्या दृष्टीमध्ये प्रतिभास होतात.त्रिलोक, त्रिदेवता, त्रिकाल प्रभृतीअखंड परावाक् अथवा तुरीयवाक्‌चेच त्रिविध परिणाम मात्र आहेत. बिंदुगर्भित जे महात्रिकोण समस्त विश्व-ब्रह्मांडाच्या मुळामध्ये शास्त्रांत सर्वत्र व्याख्यात आहे, ते याच चतुर्दिक शब्दांच्या संबंधाने प्रगट होते. या त्रिकोणाच्या तीन रेषा पश्यंती, मध्यमा आणि वैखरी स्वरूपात तीन प्रकारचे

शब्द; सृष्टी, स्थिती, आणि संहार स्वरूपात तीन प्रकारचे व्यापार; वामा, ज्येष्ठा आणि रौद्री क्रिया, ब्रह्मा, विष्णु आणि रुद्ररूपातील तीन त्रिकोणांचा मध्यबिंदु परावाक् अथवा अंबिका आणि शांता या दोन शिव-शक्त्यंशाचे साम्यभावापन्न स्वरूप आहे. यद्यपि बिंदुमध्ये शिव आणि शक्ती दोहोंचाच अंश आहे, आणि त्रिकोणामध्ये पण तेच आहे, तथापि बिंदु मुख्यत: 'शिव' रूपामध्ये परिणत होऊन जातो. या बिंदु-समन्वित त्रिकोण-मंडलापासून समस्त बाह्य जगताचे आविर्भाव होते.

शास्त्रामध्ये तत्त्वातीत आणि अनुत्तर अवस्थेचे वाचक स्वरूपात आदिवर्ण 'अ'कारचा प्रयोग होतो. यानंतर 'अ'कार रूप प्रकाशाशी 'ह'कार रूप विमर्शाशी सामरस्य अवस्था आहे, अर्थात अग्नीशी सोमचे साम्यभावच 'काम' अथवा 'रवि' नावाने प्रसिद्ध आहे. शास्त्रामध्ये ज्या अग्निषोमात्मक बिंदुचा उल्लेख आढळतो, तो पण हाच आहे. शिवच 'अ' आणि शक्तीच 'ह' आहे - बिंदुरूपामध्ये हेच 'अहं' अथवा पूर्णाहन्ता आहे. साम्य-भंग झाल्यावर हा बिंदु प्रस्पंदित होऊन शुक्ल आणि रक्त बिंदु रूपामध्ये आविर्भूत होतो. या प्रस्पंदन कार्यामुळे जे अभिव्यक्त होते, त्यालाच शास्त्रामध्ये संवित् किंवा चैतन्य म्हणतात. याचेच दुसरे नाव चित्कला किंवा चित् शक्ती आहे.

**भाषेची वर्णाक्षरमाला आणि देहविशिष्ट जीव-आत्म्याच्या अवस्था : परस्पर सह-संबंध**

देहविज्ञानामध्ये प्रवीण असलेल्या लोकांचे असे मत आहे की आमचे हे मानव शरीर सर्वमय आहे - यामध्ये सर्व काही आहे. केवळ एवढेच नव्हे तर, सर्व काहीच्या पलीकडे जे काही आहे, ते पण याच्यामध्ये आहे. पिंड हे केवळ ब्रह्मांडापासून अभिन्न आहे एवढेच नसून, ब्रह्मांडातीत किंवा विश्वातीत सत्य तत्त्वाचे पण पिंडामध्ये प्रकाश दिसून येते.

या देहचक्राचे विश्लेषण करून याचे सांकेतिक यंत्र स्वरूपात निरीक्षण केल्यावर एका दृष्टीने चौकोन स्वरूपात तर दुसऱ्या दृष्टीने षट्कोन स्वरूपामध्ये याचे वर्णन केले जाऊ शकते. जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन अवस्थांचे जीवभावाशी संबंध आहे, म्हणून या तिघांना जीव-अवस्था म्हणू शकतो. तुरीय अवस्थेचे नाव शिव-दशा किंवा अवस्था आहे. या शरीराचे आश्रय ग्रहण करून तीन जीव-अवस्था आणि एक शिव-अवस्था अर्थात एकूण चार अवस्था प्रकाशित होतात, म्हणून याची चौकोन स्वरूपात कल्पना केली जाते. परंतु तुरीय अवस्थेच्या अवांतर भेदांची पण कल्पना केली जाऊ शकते, कारण की या अवस्थेमध्ये जागृत, स्वप्न आणि सुषुप्तिचे औपचारिक संबंध असू शकतात. या औपाधिक संबंधाच्या दृष्टीकोनाने तुरीयास पण तीन प्रकारचे मानले जाते आणि शिव-दशा पण तीन आहेत, म्हणून शिव पण त्रिकोण पदवाच्य आहे. देह-चक्रामध्ये अशा दोन प्रकारच्या अवस्थांचे परस्पर संमिलन आहे. म्हणून देहचक्रास सांकेतिक भाषेमध्ये जर षट्कोन म्हटल्यास आपत्तीजनक ठरू नये.

म्हणून तुरीयला एक दशा मानल्यावर शरीर चौकोनाच्या नावाने अभिहित होते. आणि जेव्हा जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति या तीन जीवावस्थेसोबत जागृत, स्वप्न आणि सुषुप्ति उपाधिसंपन्न शिवावस्था रूपाने तुरीयला तीन प्रकारचे मानून जोडल्यास हे शरीर षट्कोन म्हटले जाते. देहचक्रामध्ये एक नाभि (बेंबी) किंवा मध्यबिंदु आहे. तोच सर्व चक्रांना धारण करणारा आणि नियंत्रण करणारा आहे. ज्याला आपण तुरीयातीत - अवस्था म्हणतो, तेच याच स्वरूप आहे; तोच देहचक्राचा केंद्र आहे.

जागृत एक सक्रिय अवस्था आहे; तर सुषुप्ति निष्क्रिय अवस्था. या दोन्ही अवस्थांच्या दरम्यान आणखी एक अवस्था आहे, तिचे नाव आहे स्वप्न सुषुप्तिच्या निवृत्ती पूर्व विविध प्रकारचे मानसिक विकल्पज्ञानांचा उदय होतो. त्यांचेच नाव स्वप्न आहे. सुषुप्ति ही संसाराची बीज-दशा आहे. तर स्वप्न उन्मेश दशा. जागृत अवस्था ही संसाराची गाढ आणि वृद्धिंगत अवस्था आहे. तुरीय प्रकाशित होण्यासाठी अन्य अवस्थेचे निवृत्त होणे आवश्यक नसते. चित्चे अनुसंधान होणेच तुरीय अवस्थेची विशेषता आहे. प्रत्येक अवस्था ही चित्पासून उत्पन्न होते. कार्यामध्ये जसे कारण व्याप्त असते. तसेच जागृत, स्वप्न आणि सुषुप्तिमध्ये तुरीय अवस्था व्यापक स्वरूपात विद्यमान असते.

जागृत, स्वप्न, सुषुप्ति, तुरीय आणि तुरीयातीत या सर्व अवस्था देहविशिष्ट जीवात्म्याच्या आहेत; विदेही केवलात्म्याच्या नव्हेत. स्वरूप दृष्टीने आत्मा सर्व भावांपलीकडे सर्वभावांतीत आहे. या दृष्टीने तो निर्विकार, द्वंद्वातीत, निर्दोष आणि समरस आहे. परंतु व्यवहारभूमिमध्ये आणि प्रतिभास स्थळी याचे अवस्थाकृत भेद दिसून येतात. याच्या उपरोक्त पाच अवस्था आहेत.

ढोबळ मानाने उपरोक्त पाच अवस्थांच्या उपपादनासंबंधामध्ये म्हटले जाऊ शकते की आत्मा, मन, इंद्रिय आणि बाह्य विषयांच्या परस्पर संबंधाच्या वैशिष्ट्यामुळेच या सर्व अवस्थांचा उदय होतो. आत्मा आणि मनाचा संसर्ग, मन आणि इंद्रियांचा संसर्ग तथा इंद्रिये आणि विषयांचा संसर्ग ज्या अवस्थेमध्ये विद्यमान असते, तिला **जागृत अवस्था** म्हणतात. फरंतु ज्या अवस्थेमध्ये इंद्रिये आणि विषयांचा संसर्ग नसतो, इतर दोन संसर्ग पूर्ववत अक्षुण्ण असतात, तिचे प्रचलित नाव **स्वप्नावस्था** आहे. ज्या अवस्थेमध्ये इंद्रिये आणि विषयांचा संबंध नसतो, त्या व्यतिरिक्त मन आणि इंद्रियांचा संबंध पण नसतो, एकमात्र आत्मा आणि मनाचाच संबंध विद्यमान असतो, त्याचे **सुषुप्ति अवस्था** या नावाने वर्णन केले जाते. मनाचे जागरण, मनाचे उद्धार किंवा मनाचा त्राण अर्थात ज्ञानाचा उन्मेषच **तुरीय अवस्थेचे** नामांतर आहे. जेव्हा एकमात्र आत्माच आपल्या स्वरूपामध्ये विराजमान असतो आणि स्वत:शीच स्वत: क्रीडा करतो, तेव्हा **तुरीयातीत अवस्थेचा** जन्म होतो.

हे जे विभिन्न अवस्थांचे वर्णन केले गेले आहे, याच्या सोबतच अकारादी वर्णाक्षरांचा एक घनिष्ठ आणि गूढ संबंध आहे. कालिदासाने 'रघुवंश'च्या मंगलाचरणच्या श्लोकामध्ये शक्ति आणि शिव यांचे अभेद्य संबंध दाखविण्यासाठी उपमाच्या बहाण्याने (अनुषंगाने) शब्द आणि अर्थाचे परस्पर घनिष्ठ संबंधाचा उल्लेख केला आहे. सृष्टीच्या प्रसंगामध्ये शब्दाचे अर्थरूपामध्ये विवर्त होते, असे भर्तृहरिने म्हटले आहे. वैदिक आणि तांत्रिक साधनाशास्त्रांमध्ये सर्वत्र शब्द आणि अर्थाच्या निगूढ संबंधाचीच चर्चा केली गेली आहे. ईसाई (ख्रिश्चन) योगीपण हे जाणत होते, आणि या विषयासंबंधी अनेक गूढ तत्त्वे त्यांच्या साधन-साहित्यामध्ये आढळतात.

शब्द अध्वा किंवा धारेचे मूळ वर्णाक्षर आहे. वर्णाक्षरापासून मंत्र, पद आदींचे आविर्भाव होते. अर्थ अध्वाचे मूळ कला (शक्ती) आहे, जिच्यामुळे तत्त्व, भुवन इत्यादी कार्य-वर्गाचे क्रमिक स्फुरण होते. दोन्ही धारांचे परस्पर संबंध प्रत्येक स्तरामध्ये विद्यमान असते.

या संदर्भात वर्णाक्षरास आत्मिक दशेचे ज्ञापक किंवा व्यंजक आपण मानू शकतो. म्हणून तदनुसार दशा (अवस्था) आणि वर्णाक्षरांदरम्यान व्यंग - व्यंजकभाव संबंध आहे, असे म्हटले जाऊ शकते. तात्पर्य हे की

वर्णाक्षरांपासूनच अवस्थांची अभिव्यक्ती होते. ज्या निमित्ताने दोहोंमध्ये या संबंधाची कल्पना मांडण्यात आली आहे., ती दोहोंचे सादृश्य आहे. क्रमशः विवेचनामध्ये हा विषय स्पष्ट होईल.

अ पासून विसर्ग पर्यंत स्वर वर्णाक्षरे देह विशिष्ट जीव-आत्म्याच्या **सुषुप्ति अवस्थेचे** द्योतक आहेत. ककार पासून ते मकार पर्यंत पंचवीस स्पर्श वर्णाक्षरे **जागृत अवस्थेचे** द्योतक आहेत. य, र, ल आणि व ही चार अंतस्थ वर्णाक्षरे **स्वप्नावस्थेचे** परिचायक आहेत. श, ष आणि स ही तीन उष्म वर्णाक्षरे **तुरीयवाचक** आहेत, आणि कूटाक्षर 'क्ष' हे वर्णाक्षर **तुरीयातीतरूप** मानले जाते. आपाततः याचा विचार तुरीय सोबत करावा लागतो. ज्याला तुरीय म्हटले गेले आहे, ते जागृत अवस्थेमध्ये आविर्भूत सुषुप्तिचे नामांतर आहे. याचीच परिभाषिक संज्ञा आहे योगनिद्रा.

वर्णाक्षरांचे उच्चार करण्यासाठी ज्या प्रयत्नांची आवश्यकता असते, त्याची वैशिष्ट्य-अवस्था सर्वांच्या वैशिष्ट्यानुरूप आहे. उच्चारणाचे संकोच आणि विकास याकडे लक्ष ठेवूनच हे कथन केले गेले आहे. स्पर्शवर्णाच्या उच्चारणामध्ये स्पृष्ट प्रयत्नाची आवश्यकता असते. हे जागृत अवस्थेचे द्योतक आहे. या प्रयत्नामध्ये संकोचाचे भाव मुख्य असते. परंतु विवृत्त प्रयत्नांमध्ये संकोचचा भाव नाहीसा होतो, त्यामध्ये प्रसाराची प्रधानता असते. स्वर वर्णांचे उच्चारण विवृत्त प्रयत्नाद्वारेच होते. स्वर वर्ण सुषुप्ति अवस्थेचे ज्ञापक आहेत, हे अगोदर सांगितले गेलेच आहे. स्वर वर्ण नादकल्प आहेत. म्हणून त्यांचे नादरूपामध्येच ग्रहण केले जाते. स्पर्श वर्ण सृष्टी प्रलयविषयक आहेत. स्पृष्ट प्रयत्न म्हणजे कंठ, तालु, मूर्द्धा, दंत आणि ओष्ठ या उच्चारण स्थानांचे खालच्या आणि वरच्या भागाचे संगठन समजले पाहिजे. याचेच नाव संकोच ग्रहण आहे. विवृत्त प्रयत्नाचा उद्देश आहे पूर्वोक्त संगठित कंठ, तालु, मूर्द्धा, दंत आणि ओष्ठ यांच्या दोन्ही भागांचे पुन्हा विघटन. याचे नामांतर संकोच-त्याग आहे. जागृत अवस्थेमध्ये घट, पट इत्यादी पदार्थांचे ज्ञान होते. अशा अवस्थेमध्ये आत्म्यामध्ये संकोचभावाचा उदय होतो. सुषुप्ति-अवस्था विश्रामची अवस्था आहे, त्या वेळेस आत्म्यामध्ये पूर्णतेचा प्रकाश होतो.

जरी वर्णाक्षरे अवस्थांचे अभिव्यंजक आहेत, तरी पण संकोच ग्रहण आणि संकोच त्यागमूलक अवस्था-सादृश्य वर्णाक्षरांच्या प्रयत्नांची अपेक्षा बाळगते. म्हणून प्रयत्नास उपचाराने अवस्था-व्यंजक मानले जाते. स्वप्न अवस्थेचे ज्ञापक अंतस्थ वर्णाक्षरांमध्ये ईषत् स्पृष्ट प्रयत्न असतो. या उच्चारण प्रयत्नामध्ये स्पृष्टताच मुख्य आहे - परंतु गौण स्वरूपात विवृतता पण यामध्ये आहे. म्हणून याला मिश्र प्रयत्न किंवा ईषत् स्पृष्ट प्रयत्न म्हटले जाते. तुर्यावस्थेचे ज्ञापक ऊष्म वर्णाक्षरांमध्ये ईषत् विवृत्त प्रयत्न आहे. हे विवृत्त प्रयत्न स्पृष्टता मिश्रित आहे, म्हणून हे पूर्ण नाही - हे संकीर्ण किंवा ईषत् आहे.


वरील सर्व विवेचन सुबोध होण्यासाठी पुढील आकृती (रेखाचित्र) आणि तक्ता उपयोगी सिद्ध होईल, असा विश्वास आहे.

### (१) : रेखाचित्र

*** परात्पर परब्रह्माच्या पाच स्वरूप-शक्ती आणि देवनागरी स्वर वर्णाक्षर-सृष्टी : सहसंबंध ***

परात्पर परब्रह्म हा सच्चिदानंदस्वरूप आहे. **सत्** म्हणजे नित्य स्वयंसिद्ध अस्तित्व. वास्तविक सत् चित् आणि आनंद हे तिन्ही भाव अभिन्न आहेत.

**परात्पर परब्रह्माच्या पाच स्वरूप-शक्ती**




वैसर्गिक (:) 'अ:' सृष्टी ही वास्तविक व्यंजन वर्गांची सृष्टी आहे.

**(२) तक्ता**

*** अवस्था-विशेष आणि तदंतर्गत समाविष्ट वर्णाक्षरे आणि अवस्थांची स्वरूप वैशिष्ट्ये ***

| क्रमांक | अवस्था | समाविष्ट वर्णाक्षरे | विशेषता |
|---|---|---|---|
| १ | जागृत अवस्था | ककारपासून मकारपर्यंत २५ स्पर्शवर्ण | जागृत अवस्था संसाराची गाढ आणि वृद्धींगत अवस्था आहे. |
| २ | स्वप्नावस्था | य,र,ल आणि व हे चार अंतस्थ वर्ण | स्वप्नावस्था संसाराची उन्मेष दशा आहे. |
| ३ | सुषुप्ति अवस्था | अ पासून ते विसर्गपर्यंत स्वर वर्णाक्षरे | सुषुप्ति संसाराची बीज-दशा आहे. |
| ४ | तुरीयावस्था | श, ष आणि स ही तीन ऊष्म वर्णाक्षरे | चित्ताचे अनुसंधान होणेच तुरीयावस्थेची विशेषता आहे. उपरोक्त तीन अवस्थांसोबत ही ओतप्रोत रूपात विद्यमान असते. |
| ५ | तुरीयातीत अवस्था | कूटाक्षर 'क्ष' | तुरीयातीत अवस्था सर्व अवस्थांची प्राणस्वरूप आहे. ही अवस्था वास्तविक साक्षात महाशक्तिचेच प्रतिपादन करते. |

## २) देवनागरी वर्णाक्षरांचे दार्शनिक स्पष्टीकरण

अहिर्बुध्न्य संहितेनुसार परात्पर परब्रह्माची अंतिम सत्ता ही अनादि, अनंत, शाश्वत, नाम-रूप-रहित, अविकारी आणि वाणी व मनापासून अतीत अशी आहे. या केवल वा परम सत्तेपासून संकल्प उत्पन्न होतात. ही परम सत्ता स्वत:मध्ये परपूर्ण आणि अव्याकृत आहे.

पांचरात्र संप्रदाय हा वेद आणि तंत्र हा दोहोंचा आधार घेऊन चालतो. मंत्र-क्रियामध्ये या संप्रदायाचा विश्वास आहे. मंत्रांना विष्णुची साक्षात शक्ती मानली जाते. या शक्तीचा सर्वप्रथम प्रकाश नादमध्ये होतो. याचा अनुभव फक्त महायोगीच करू शकतो. नाद नंतर बिंदु येतो. बिंदुपासून शब्दब्रह्माची उत्पत्ती होते. येथूनच नाद आणि बिंदु अर्थात नाम आणि रूपाचे स्पष्ट अभिव्यंजन प्रारंभ होऊन जाते. अर्थात प्रत्येक आक्षरिक ध्वनीच्या विकासासोबत तिच्या समानांतर एक पदार्थशक्ती पण विकसित होत असते. बिंदुपासून स्वर आणि व्यंजनांचे विकास होते. विष्णुच्या कुंडलिनी शक्तिच्या नृत्यापासून १४ स्वर १४ प्रयत्नांपासून उत्पन्न होतात. हीच शक्ती आपल्या द्विविध सूक्ष्म शक्तीपासून सृजन आणि विध्वंसाचे कारण बनते. ही शक्ती मूलाधारामध्ये उदय पावते. जेव्हा ही नाभी (बेंबी) जवळ पोहोचते, तेव्हा तिला पश्यंती म्हणतात. योगी हिचेच साक्षात्कार करतात. या नंतर ही हृदय-कमलामधून कंठाद्वारे वैखरी वाणीच्या स्वरूपात बाहेर येते. स्वर-ध्वनींची शक्ती सुषुम्ना नाडीच्या मध्यभागामध्ये संचारित होते. व्यंजन-ध्वनी विश्व-शक्तीच्या अभिव्यंजन स्वरूपामध्ये अथवा त्यांच्या अधिष्ठातृ देवता लावल्यास संबंधित पदार्थांवर आधिपत्य प्राप्त होते.

[डॉ. मुंशीराम शर्मा - 'भक्ति का विकास', पृ. २७२-७३]

निर्गुण-सगुण विवर्जित, परम शून्य निरंजन स्वरूप नाथापासून दोन प्रकारची सृष्टी उत्पन्न झाली - शिष्य क्रमाने नाद रूपा आणि पुत्र-पौत्रादी क्रमानुसार बिंदु रूपा. नादपासून नवनाथ झाले आणि बिंदुपासून सदाशिव भैरव. शब्द सृष्टीमध्ये प्रथम रूपिणी सृष्टी उत्पन्न झाली, मग स्थूल रूपिणी. सूक्ष्मरूपिणी सृष्टी आहे प्रणव, महागायत्री, योगशास्त्र आणि स्थूलरूपिणी आहे ब्रह्म, गायत्री आणि वेदत्रयी. 'शारदा तिलक' नावाच्या प्रसिद्ध तंत्र-ग्रंथामध्ये सृष्टी तत्त्वाचे स्पष्टीकरण करताना म्हटले गेले आहे की शिवची दोन रूपे आहेत - निर्गुण आणि सगुण. जेव्हा शिवचे प्रकृतीशी संयोग होते तेव्हा सगुण शिव आविर्भूत होतात. सगुण शिवपासून शक्ति उत्पन्न होते आणि शक्तिपासून नाद (पर) आणि त्यापासून बिंदु (पर) ची उत्पत्ती होते. विशुद्ध चैतन्य स्वरूप निर्गुण शिव आणि उपाधियुक्त सगुण शिवच्या संयोगाने विश्वामध्ये जो एक विक्षोभ होतो, तेच नाद आहे आणि त्या विक्षोभाचे क्रियाशील होणेच बिंदु आहे. कधी कधी याला अपरनाद आणि अपर बिंदु पण म्हटले जाते. यांच्यापासूनच पर किंवा विशेषतायुक्त नाद, बीज आणि बिंदु उत्पन्न होतात जे क्रमश: इच्छा, ज्ञान आणि क्रियेचे प्रतीक आहेत. यांच्यापासूनच क्रमश: विष्णु, ब्रह्मा आणि रूद्र यांची उत्पत्ती होते. त्रिगुणांपैकी सत् गुणाचा संबंध विष्णुशी, रजचा ब्रह्माशी आणि तमचा रूद्राशी संबंध दाखविले जाते. या (पर) बिंदुपासून जे (अपर) नाद आणि (अपर) बिंदु उत्पन्न झाले, तेच या कोड्यात टाकणाऱ्या प्रश्नांच्या मुळाशी आहे की प्रथम नाद प्रकटले की बिंदु.

[डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी - 'कबीर', पृ. ४१-४२]

### ३) नादतत्त्व, वर्णमाला आणि सृष्टितत्त्व : दार्शनिक दृष्टिकोन[८५]

जन्माला आल्यावर पहिल्यांदा वाणीचा आविष्कार केवळ रडण्यातून प्रकट होतो. हा ध्वनीचाच एक प्रकार आहे. जन्मल्याबरोबर एकमात्र मानव शिशुच रडतो. मानवाला आत्मबोध व परमेश्वराशी त्याचे असलेले एकत्व स्वतःच्या अंतरंगात कळू शकते. पण बाहेरच्या विश्वात अनेक रूपांनी प्रकट झालेल्या याच परमेश्वराशी एकरूपता, संवाद व संपर्क साधण्यासाठी प्राणिमात्रांना मिळालेली यंत्रणा म्हणजे ध्वनीची सोय (मानवजातीसाठी बोलण्याची सोय). हाच नाद, हेच स्पंदन संपूर्ण विश्वात भरलेले असते, म्हणून नादातून (वा वेदवाणीतून) सर्व विश्वाची उत्पत्ती झाली असे समजले जाते.

अखिल ब्रह्मांडामध्ये व्याप्त अनाहत नादाचे व्यष्टीमध्ये व्यक्तरूप नाद आहे. अर्थात जो नाद संपूर्ण समाजामध्ये व्याप्त आहे, त्याचेच प्रकाशन जेव्हा एका व्यक्तीमध्ये होते, तेव्हा त्यास 'नाद' असे म्हणतात. बद्ध-जीव त्या नाद श्रवणाशी वंचित असतो. नाद मूळात एक असून पण औपाधिक संबंधामुळे सात स्तरांमध्ये विभक्त आहे. शास्त्रामध्ये ज्याला प्रणव किंवा ॐकार म्हणतात, तेच उपाधिरहित **'शब्द-तत्त्व'** आहे. शब्दप्राप्तीमुळे आत्म्यामध्ये परमात्मा त्याचप्रमाणे दिसतो, ज्याप्रमाणे पाण्यामध्ये चंद्राचे प्रतिबिंब. शब्दापासूनच शरीर सिद्ध होते. गोरखनाथाचे म्हणणे आहे की शब्दच टाळे आहे, तोच परमतत्त्वास बंदीस्त करून ठेवतो. शब्दाची धाराच (प्रवाहच) सूक्ष्म परम तत्त्वावर स्थूल आवरणांना बांधून सृष्टीचा निर्माण करते. म्हणून मूळ अधिष्ठानापर्यंत पोहोचण्यासाठी शब्दाची धारा (प्रवाह) पकडून परत यावे लागते, म्हणून शब्द चावी पण आहे की ज्यामुळे टाळे उघडले जाते. जेव्हा अशा प्रकारे शब्दाद्वारे सूक्ष्म शब्दाशी परिचय होऊन जातो तेव्हा स्थूल शब्द सूक्ष्म शब्दामध्ये समाविष्ट होतो.

आत्मस्वरूपामध्ये पुन्हा पुन्हा प्रतिष्ठित होण्यासाठी शास्त्रामध्ये जेवढे उपाय निर्दिष्ट आहेत त्यामध्ये नादसाधना किंवा नादानुसंधानाची उत्कृष्ट उपायांमध्ये गणना होते. नंतर संतांनी 'सुरतशब्दप्रयोग' नाव देऊन आणि मनाचे स्थैर्य साधण्यासाठी आणि मूढ चित्ताच्या बोधनासाठी नादची परम उपयोगितेचा स्विकार केला. योग आणि तांत्रिक साधनेमध्ये मंत्रजपामध्ये सर्वात अतिशय महिमा नादाचीच गणली गेली आहे.

आत्मा निर्विकल्प प्रकाशात्मक स्वातंत्र्यमय शिवस्वरूप आहे. हा नित्य, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त आहे. परंतु जीव पतित दशेमध्ये आपले पर स्वरूप आणि केवल - चिद्रूप अपर स्वरूप दोघांना विसरतो. इतकेच नव्हे तर तो अनाम वस्तूस आत्मा मानून त्यामध्ये अहंभावाचा आरोप करतो आणि तदनुसार कर्म संपादन पूर्वक सुख्-दुःख-रूपामध्ये मध्ये त्याचे फळ उपभोगतो. हेच त्याचे मायाधीन सांसारिक जीवन आहे. आणि सांसारिक माया-मोहामुळे त्याचा आत्मा कलुषित होतो. भरीस भर म्हणून वासना सावलीप्रमाणे त्याच्या पाठीमागे लागते. मलिन विकल्प वासनेच्या शोधनासाठी परिष्करणासाठी शुद्ध विकल्पाशिवाय इतर साधनांची गरज भासते. ही साधने विभिन्न प्रकारची असू शकतात. त्यांपैकी तीन मुख्य आहेत :-

१) एक ध्यानरूप आहे. हे बुद्धिचे कार्य आहे. बुद्धिचे असाधारण धर्म अनुसंधान आहे.
२) दुसरे स्थूल स्वरूपामध्ये उच्चारणात्मक आणि सूक्ष्म स्वरूपामध्ये वर्णाक्षरात्मक आहे.
३) तिसरे करण, मुद्रा, आसनादी क्रियात्मक आहे. हे देह (शरीर), इंद्रिय इत्यादीचे व्यापार आहेत. इंद्रिय, विषय, प्राणादी सर्वांचे पिंड स्वरूपामध्ये एकीभावापासूनचे संस्थानच देहाचे - शरीराचे विशिष्ट धर्म आहे.

जे बुद्धिच्या स्तरामध्ये अभिमान राखतात, त्याच्यासाठी उच्चारणच प्रधान (मुख्य) उपाय आहे. ज्या साधकांचा देहात्मभाव अत्यंत प्रबळ आहे त्यांच्यासाठी करण, मुद्रा, आसन इत्यादी उपाय विकल्पाच्या शमनासाठी अधिक उपयोगी असतात. परंतु या सर्वांसाठी पृष्ठभूमिस्वरूप असलेल्या शून्यभूमिमध्ये साधनाचा काहीच उपयोग होत नसतो.

संवित् अथवा चैतन्यशक्ती शून्यता प्रकट करून त्यानंतर प्राणरूप धारण करते. मग प्राण काय आहे? किंचित चलन-वळण अथवा स्पंदनाचा प्रथम प्रसार **प्राण** आहे. वास्तविक बुद्धीच्या आविर्भावा अगोदरच प्राणाचा उल्लास होऊन जातो, कारण की अंत:करण तत्त्वाची सारभूत बुद्धी प्राणाच्या आश्रयानेच स्वत:स प्रकट करण्यामध्ये समर्थ होते.

म्हणून प्राणभूमीमध्ये उच्चारण, बुद्धिभूमीमध्ये ध्यान आणि देहभूमीमध्ये करण आदी उपाय रूपस्वरूप गणले जातात. यांपैकी उच्चारण आदी सर्वांपेक्षा अंतरंग उपाय आहेत. ध्यानादी त्यांच्या तुलनेमध्ये बहिरंग गणले पाहिजेत. प्राणादी जड आणि अपारमार्थिक आहेत, तरी ध्यानादी त्यांच्या तुलनेमध्ये बहिरंग गणले पाहिजेत. प्राणादी जड आणि अपारमार्थिक आहेत, तरी पण त्यांच्या उच्चारादीच्या पारमार्थिक स्वरूप प्राप्तीमध्ये सहाय्यक असण्यामध्ये बाधा नाही.

नादतत्त्वास जर जाणायचे असेल तर आपल्याला पूर्ववर्णित तीन प्रकारच्या साधनांपैकी प्राणगत उच्चाराचे रहस्य चांगल्या प्रकारे अवगत झाले पाहिजे. प्राणाचा स्वाभाविक धर्मच उपचार आहे. याच्या दोन प्रकारच्या वृत्ती आहेत. - एक सामान्य किंवा स्पंदनात्मक आणि भेदहीन आहे, तर दुसरी विशिष्ट आहे. सामान्यवृत्ती ही विशिष्ट वृत्तिराशिची आधारस्वरूप आहे. हिने देहास आपले अधीन करून ठेवले आहे. म्हणूनच देह अचेतन असूनही पण चैतन्यवत् प्रतीत होते.

या प्राणात्मक उच्चारापासून एक अव्यक्त ध्वनी निरंतर स्फुरित होत राहतो. यास **अनाहत नाद** म्हणतात. हा प्राणिमात्राच्या हृदयामध्ये स्वाभाविकपणे नेहमीच चाललेला असतो. याचा कोणी कर्ता नाही, आणि याला थांबविणारा पण कोणी नाही. अविभक्त स्वरूपात सर्व वर्ण यामध्ये विद्यमान असतात. हा वर्णोत्पत्तीचा निमित्त आहे. म्हणून हा पण वर्णपदवाच्च आहे. सर्व वर्ण यामध्ये विद्यमान असतात. - हा वर्णोत्पत्तीचा निमित्त आहे. म्हणून हा पण वर्णपदवाच्च आहे.

अनाहत नादाचे मुख्य अभिव्यक्ती-स्थान दोन बीजे आहेत - एक सृष्ट-बीज 'स'कार आणि दुसरे संहार-बीज 'ह'कार या दोन बीजांच्या आश्रयानेच नाद अभिव्यक्त होतो. बिंदुयुक्त 'ह'कार (हं) परम पुरुषाचे आणि विसर्गयुक्त 'स'कार (स:) परमाप्रकृतीचे वाचक आहे. दोघांच्या संयुक्त अवस्थाच आदि हंसाचे रूप आहे. याला नि:स्पंद आणि स्पंदतत्त्वाचे संधिस्थळ मानले जाऊ शकते. या आदि प्राणासच संवित्चे प्रथम परिणाम म्हणतात. हीच सृष्टीच्या सर्व तत्त्वांना धारण करणारी शक्ती आहे. आम्हा लोकांच्या शरीरामध्ये श्वास-प्रश्वासाचा चाललेला खेळ हा या हंसरूपी प्राणाचाच व्यापार आहे. हंकारापासून बहिर्मुखगती अथवा अनंताकडे गती असते, आणि सकारापासून अंत:प्रवेश अथवा देहामध्ये प्रत्यावर्तन सूचित होते. या गमनागमनाचा नियामक आपातत: त्रिगुणस्थ ईश्वर आणि मुळात कुलाकलमध्ये स्थित परमहंस आहे. हेच **अजपामंत्र** आहे. याचे जप प्रत्येक मनुष्य अहोरात्री २१,६०० वेळा करीत असतो.

सृष्टीक्रमामध्ये शब्दाची गती परा वाक्पासून वैखरी वाक्कडे आहे, परंतु साधन-क्रमामध्ये संहार अथवा प्रत्याहार-प्रवाहाचे अवलंबन होते. तेव्हा शब्दाची आगेकूच होते. क्रमश: वैखरीपासून मध्यमा आणि पश्यंतीपासून सुरू होऊन परा वाक्कडे वागेंद्रियाद्वारे ज्या शब्दाचे उचाचरण होते आणि कानांनी ज्याचे श्रवण होते, ती शब्दांची वैखरी अवस्था आहे. हेच शब्दाचे स्थूल रूप आहे. जप आणि कीर्तनामध्ये वैखरी वाक्च्या आश्रयानेच साधन कार्य आरंभ होते. या कार्याच्या मुळामध्ये इच्छा आणि कर्तृत्वाचा अभिमान विद्यमान असतात. इतर संकल्पमूलक कर्मांसारखेच हे आहे. परंतु गुरूदत्त मंत्र अथवा भगवन्ननामाचे निष्ठापूर्वक यथाविधी उच्चारण करत करत क्रमश: अशी एक अवस्था निर्माण होते की तेव्हा प्रयत्नपूर्वक उच्चारणाची गरजच नसते. मंत्र अथवा नाम तेव्हा आपोआप कंठापासून निघत असतो, किंवा कंठ-निरोध झाल्यावर हृदयामध्ये चालत असतो.

**नाद** अव्यक्त अक्षर मात्र आहे. वैखरीमध्ये शब्द आणि अर्थाच्या दरम्यान परस्पर भेद (अंतर) असतो, मध्यमामध्ये दोहोंमध्ये भेद पण असतो आणि त्यासोबतच अभेदपण असतो. फरंतु पश्यंतीमध्ये शब्द आणि अर्थ अभिन्न होऊन जातात. याचेच नाव **मंत्रसाक्षरता** आहे. परा ही पश्यंतीची पृष्ठभूमी आहे. पश्यंतीमध्ये अखंड ज्योतिर्मंडल दिसून येते.

बिंदुमध्ये विक्षोभ निर्माण झाल्यानंतर नाद आणि ज्योती प्रकटतात. हेच सृष्टीचे मूळ आहेत. या ठिकाणी नाद संबंधी हे रहस्य लक्षात ठेवले पाहिजे. प्राणच्या संचलनामुळे वर्णादीचा उदय होत असतो. प्राणाचे संचलन दोन प्रकारचे आहे. - एक स्पंदनात्मक, दुसरे क्रियात्मक आणि प्रयत्नजन्य. जे स्पंदनरूप स्वाभाविक संचलन आहे, त्यामुळे स्वाभाविकच वर्णाक्षरांचा उदय होतो. वर्णाक्षरांच्या उदयामध्ये कुणाचीही इच्छा अथवा प्रयत्नांची गरज नसते. सर्व वर्ण नियतरूप आणि सर्वत्र अविशिष्ट आहेत. परंतु मंत्रपदादीचे उदय योगीच्या इच्छेशिवाय होऊ शकत नाही. हे अगणित व अनियत आहेत. वर्णाक्षरांसारखे परिगणित व नियत नाहीत. सारांश, समग्र विश्वच प्राण-प्रतिष्ठित आहे.

नादापासून संपूर्ण विश्वाची सृष्टी होते आणि सृष्ट विश्वामध्ये नादच प्राण अथवा जीवनी शक्तिस्वरूपात निहित असतो. हाच अनंत विश्वास गर्भामध्ये धारण करून प्रसुप्त सर्पाकारामध्ये असतो. आगमवेत्ता लोक याला स्वयं उच्चरणशील अनच्क हकार किंवा परमबीज म्हणतात. हा प्राणच हंस आहे, हा आपल्या स्वभावानुसार खाली-वर संचरण करतो. 'ह'कार विमर्शरूपाने त्याग (हान) करतो; तर 'स'कार विमर्श रूपाने ग्रहण (समादान) करतो. त्याग आणि ग्रहण याचा स्वभाव आहे. हेच नादात्मक हंसाचे नित्य उच्चारण आहे. अनच्क (ह) जे अभिव्यंजक अकार आहे. हा नादाच्या शीर्षस्थ कल्पित आहे. या आकाराशी जुडल्यानंतर उकार अध: ऊर्ध्व संचारक असल्यामुळे चरण रूपात कल्पित आहे. उकार जुडल्यानंतर बिंदु आदी प्रमेयाच्या प्रकटनाचे सूत्रपात होते. तो अनुस्वार अथवा प्रकार मात्रामध्येच होतो. अशाप्रकारे अ-उ-म स्वरूपामध्ये किंवा प्रणव रूपामध्ये या उच्चारणाची उपलब्धी शक्य होते. हेच वर्णाक्षराचे उच्चार आहे.

नाद स्थूल अनुभूती आहे. नादचा ज्योतीशी संबंध आहे. नादच्या भिन्नते अनुरूप ज्योतिमध्ये सुद्धा भिन्नता होत असते. विशुद्ध ज्योती तीच आहे की ज्यामध्ये कोणतेच रंग नसते. हा शुभ्र प्रकाश किंवा अवर्ण प्रकाश असतो. विशुद्ध नादच पण तेच आहे की ज्यामध्ये स्वरगत, मात्रागत आणि गुणगत कोणतेच विभाग नाही.

नादक्रिया अ-उ-म स्वरूपामध्ये संपन्न होते. योगाभ्यासामुळे ती क्रमशः अधिकाधिक सूक्ष्मतेस प्राप्त होते. मकार-मात्रानंतर ते उच्चार भ्रूमध्यामध्ये बिंदुरूप धारण करते. अकारादी तीन मात्रांमध्ये स्थूल, सूक्ष्म आणि कारणरूपाने प्रसिद्ध सर्व भेद विद्यमान आहेत. हे सर्व भेद एकीभूत होऊन अविभक्त स्वरूपात जेथे विदित होतात. तोच बिंदु आहे. येथे वेद्य किंवा ज्ञेयच मुख्य आहे. योग्याच्या नऊ (९) योगभूमि अथवा चिन्मय अनुभूतींमध्ये बिंदुच प्रथम आहे. या नऊ (९) भूमी पण 'नवनाद' या नामाने प्रसिद्ध आहेत. स्थूल प्रमाणेच सूक्ष्ममध्ये पण नऊ (९) विभाग कल्पित आहेत. बिंदुचा उच्चारण-काल अर्धमात्रा आहे. अर्धमात्रामध्ये प्रविष्ट होण्यापर्यंत या सर्व योगभूमी प्राप्त होत नाहीत. एकमात्राहून अर्धमात्रामध्ये प्रवेश अत्यंत दुरूह आहे. मनाच्या लौकिक स्थितीमुळे अर्धमात्रा मध्ये प्रवेश अजिबात होत नाही. कारण की एकाग्रता आणि निरोधच्या संधिस्थळामध्ये अर्धमात्रा स्थित आहे. प्रज्ञेचा उत्कर्ष जर विभूतीकडे होत असेल तर सर्वज्ञतेचा आविर्भाव होतो, परंतु जर तो चित्प्रकाशकडे होत असेल तर अशा परिस्थितीमध्ये सर्वज्ञतेचा निरोध आणि विवेकाचा उदय हेच या उत्कर्षाचे लक्षण आहे. अस्मिताच ग्रंथी आहे. याच्या उघडण्याने पूर्ण मुक्ति होण्यापर्यंत जो विवेक-प्रवाह चाललेला असतो. तोच पूर्ण निरोधाकडे घेऊन जातो. याचेच नाव **उन्मनी** आहे. मात्रा - ऱ्हासानुसार काळाचा संबंध जेवढा कमी होतो तेवढाच जडचा संबंध पण कमी होत असतो, आणि त्याच प्रमाणात चित्प्रकाशाची उज्ज्वलतापण वाढत असते. म्हणूनच निरोध किंवा उन्मनीमध्ये काळ नसतो.

देहतत्त्व अत्यंत जटिल आहे. याचे भेद करावयाचे झाल्यास देहाचे स-कल, स-कलनिष्कल आणि निष्कल या तीन स्तरांचे भेद केले पाहिजे. अकुलापासून आज्ञाचक्रपर्यंत प्रदेशाची भावना स-कल आहे, बिंदुपासून उन्मनीपर्यंत स-कलनिष्कल आहे आणि महाबिंदु निष्कल आहे.

भ्रूमध्यामध्ये काहीसे वर ललाटामध्ये बिंदुचे स्थान आहे. हे वर्तुळाकार आहे. 'मतंगपरमेश्वर' नावाच्या आगमानुसार ज्या परम तत्त्वास लय अवस्थेमध्ये शिव म्हटले जाते, व्यक्त अवस्थेमध्ये त्यालाच बिंदू पण म्हटले जाते. सृष्टीची उन्मुख अवस्थाच **बिंदु** आहे. सकल अवस्थेमध्ये साधक सीमेमध्ये विद्यमान असतो. आज्ञाचक्रामध्ये एकाग्रतेचा पूर्ण विकास होतो. पातंजल मतामध्ये संप्रज्ञात समाधीचा पूर्व विकास अस्मिता या नावाने अभिहित आहे.

बिंदुच्या भूमिमध्ये ज्योतिर्मय ज्ञानापासून ईश्वरबोधाची सूचना प्राप्त होते. येथे प्रवेश केल्याशिवाय जागतिक ज्ञान लुप्त होऊ शकत नाही. समाधिजनित प्रज्ञेहून ही फार वरची अवस्था आहे, कारण की समाधीजनित ज्ञान उत्कृष्ट असून पण जागतिक ज्ञानच आहे. परंतु अर्धमात्रेचे ज्ञान चिन्मय अनुभव आहे. म्हणूनच हे श्रेष्ठ आहे. लौकिक ज्ञानामध्ये त्रिपुटीचा लोप होत नाही. योग्यांना ज्या पंचशून्यांची ओळख होते त्यांमध्ये बिंदुच प्रथम शून्य आहे. बिंदुच्या स्तरावर बीज असत नाही. अर्थात प्रकृतीचा स्फुरण असत नाही. यामुळेच त्यास पुरुषाचे अभिन्नस्वरूप पण म्हटले जाऊ शकते.

बिंदुनंतर अर्धचंद्र आहे. ही दुसरी भूमी आहे. त्याची मात्रा १/४ आहे. हे बिंदुवर स्थित आहे. याच्या चारीकडे चार आणि मध्ये एक अशा एकूण पाच कला आहेत. परंतु हे शुन्य नव्हे.

यानंतर तृतीय भूमीचे नाव निरोधिका किंवा रोधिनी आहे. याची मात्रा आणखीन सूक्ष्म अर्थात १/८ आहे. या निरोधिका भूमीचे लंघन करणे अत्यंत कठीण आहे. एकमात्र योगीच याला वेधून नाद-पथ मध्ये प्रवेश करू शकतात. वास्तविक हे बिंदु-आवरणाचेच शेष प्रांतमात्र आहे.

निरोधकांच्यानंतर नाद आणि नादानंतर नादान्त अशा क्रमश: दोन भूमी आहेत. नादची मात्रा १/१६ आहे, आणि नादान्तची मात्रा १/३२ आहे. या नादास घेरून असंख्य मंत्र-महेश्वर विराजमान असतात. नादचे स्थान ब्रह्मरंध्राच्या तोंडामध्ये आहे. विशुद्ध त्रिगुणातीत आणि चित्चे आभासयुक्त शब्द येथे अनुभूत होतो. विशुद्ध चित्चा प्रवाह येथूनच सुरू झाला आहे, असे म्हणणे अनुचित ठरणार नाही. नादान्त शून्य आहे – हेच तृतीय शून्य आहे.

यानंतर शक्तीस्थान आहे. हेच षष्ठ चिद्‌भूमी आहे. हे स्थान ब्रह्मरंध्राच्या वर आहे. ऊर्ध्वकुंडली याच शक्तीचे नामांतर आहे. ही विश्वाची आधार आहे. हे चार कलांनी वेष्टित आहे. हिच्या केंद्रामधील कलेचे नाव व्यापिनी आहे. शक्तीची मात्रा १/६४ आहे. शक्तीमध्ये आनंदसत्तेचा अनुभव होतो. शक्ती शून्यात्मक नाही, परंतु व्यापिनी शून्यस्वरूप आहे. पंचशून्येंमध्ये हीच चतुर्थ शून्य आहे. शक्तीपासून व्यापिनी वेगळी आहे.

व्यापिनीनंतर समनाचे स्थान आहे. हीच पराशक्ती आहे. या शक्तीवर आरूढ होऊनच शिव समग्र विश्वाचे सृष्टी, रक्षा, संहार, निग्रह आणि अनुग्रहस्वरूप पाच कार्यांचे संपादन करतात.

व्यापिनाची मात्रा १/१२८ आणि समनाची मात्रा १/२५६ आहे.

यानंतर उन्मना आहे. अन्य मतान्वये याची मात्रा १/५१२ आहे. मतांतरामध्ये याचे उच्चारण-काल नाही, कारण की ही मनापासून अतीत आहे. याच स्थळी नादरूपी शब्दब्रह्माची समाप्ती होते.

स्थूल वर्णाच्या उच्चारण-काळास मात्रा म्हणतात. विश्वपासून समनापर्यंत सूक्ष्म वर्णाचा उच्चारण-काळ अर्धमात्रापासून पूर्वोक्त विवेचनानुसार एक मात्राचे १/५१२ भागपर्यंत आहे. कालांश क्रमश: आहे. अधिकतर सूक्ष्म असतो. प्राचीन आचार्यांनी सूक्ष्मतम काळाच्या अवयवाचे नाव 'लव' असे ठेवले आहे. पद्‌मच्या एक दलाचे भेद करण्यामध्ये जो वेळ लागतो त्याचे नाव 'लव' आहे. त्यांच्या मतानुसार यापेक्षा सूक्ष्मतर काळ आणखी कोणतेच नाही. वास्तविक हे बरोबर नव्हे.

**पंचशून्ये :-** स्वच्छंदागम मतानुसार (क) ऊर्ध्वशून्य = शक्तिपद आहे, जेथे नादान्तपर्यंत सर्व पाश प्रशांत आहेत. (ख) अध:शून्य = हृदयक्षेत्र आहे, ज्यामध्ये या वेळेपर्यंत पण प्रपंचाचे उल्लास झाले नाही. (ग) मध्यशून्य = कंठ, तालु, भ्रूमध्य, ललाट आणि ब्रह्म रंध्र आहे. व्यापिनी ब्रह्मरंध्रानंतर आहे. ब्रह्मरंध्रच शक्तिस्थान आहे. म्हणून व्यापिनी चतुर्थ शून्य आहे. तीन शून्य चल आणि हेय आहेत, कारण की ते अपेक्षित आहेत. वास्तविक चतुर्थ शुन्य पण तसेच आहे. या मतामध्ये समनामध्ये पंचम शून्य आणि उन्मनामध्ये षष्ठ शून्य आहे. हे पण चल आणि हेय आहे. परतत्त्वापेक्षा उन्मनामध्ये पण काही चलत्व आहे. परंतु हे सर्व शून्य तत्त्व पण परम शिवद्वारे अधिष्ठित आहेत. म्हणून सिद्धिप्रद आहेत. म्हणून स्वच्छंद शास्त्राच्या व्याख्येमध्ये सहा शून्यांचा त्याग करून सातव्या (शून्या) मध्ये प्रवेश आवश्यक आहे. तेच वास्तविक परमपद आहे. सहाही शून्य अवस्था आहेत आणि मार्गांतार्गत आहेत. सप्तमच योग्याचे महालक्ष्य आहे. हे सप्तम शून्यच अखंड महासत्ता आहे.

उपरोक्त मात्रांना सहजपणे समजण्यासाठी पुढील कोष्टक उपयोगी पडेल -

स्थूल वर्णाची एक (१) मात्रा गणली जाते. योग्यांच्या नऊ (९) योगभूमी असतात.

| क्रमांक | योगभूमीचे नाव | मात्रा (उच्चारण काल) |
| --- | --- | --- |
| १ | बिंदु (नादस्तरीय) | $\frac{१}{२}$ |
| २ | अर्धचंद्र | $\frac{१}{४}$ |
| ३ | निरोधिका वा रोधिनी | $\frac{१}{८}$ |
| ४ | नाद | $\frac{१}{१६}$ |
| ५ | नादान्त | $\frac{१}{३२}$ |
| ६ | शक्ती | $\frac{१}{६४}$ |
| ७ | व्यापिनी | $\frac{१}{१२८}$ |
| ८ | समना | $\frac{१}{२५६}$ |
| ९ | उन्मना | $\frac{१}{५१२}$ |

शास्त्रामध्ये लिहिले आहे की अनादि अनंत शब्द नामक ब्रह्मतत्त्वच अर्थरूपात विवर्तित होतो आणि जगताची (विश्वाची) रचना करतो - 'वागेव विश्वा भुवनानि जज्ञे' - तेच हे आहे. सर्व वर्ण मातृका या शब्दब्रह्माचेच भाग (अंग) वा अवयव आहेत. मानस-मात्राच्या अवलंबनाने वर्णांचा अवतरण होतो अव्यक्त पासून व्यक्त जगतामध्ये. वाक्सोबत प्राणाचा प्रवाह आणि मनाचा प्रवाह अर्थात युक्त (जोडलेला) आहे. हे अवतरण आज्ञा-चक्रामधून सोम आदि तीन मंडलांना गठित करण्यासाठी होते. देहाच्या रचनेमध्ये आणि षट्चक्राच्या प्रकाशामध्ये मातृकांचे विशेष कार्य असते. नादस्थ ईश्वरासोबत वर्णमातृका योगिनी रूपामध्ये सृष्टिकार्याचे निर्वाह करतात.

**मालिनीविजयधारा** म्हणजे अक्षरमाला होय. लोक जिला वर्णमाला म्हणतात ती खरोखरच माला आहे - अकारादि क्षकारांत क्रमाने सजविलेली माला आहे. ही पूर्वमालिनी नावाने प्रसिद्ध अशी मातृका आहे. परंतु उत्तरमालिनी पण आहे. तिच्या अनुसार वर्णमालेचा क्रम वेगळा आहे. त्यामध्ये प्रथम वर्णाक्षर न आणि अंतिम वर्णाक्षर फ आहे, मध्ये कोणताच क्रम नाही. याचे पण प्रयोजन आहे. स्वच्छंद तंत्रामध्ये जसे पूर्वमालिनीच्या प्रयोगाची व्यवस्था आहे तसेच मालिनीविजयोत्तरमध्ये उत्तरमालिनीच्या व्यवस्थेचे विधान आहे.

उत्तरमालिनीच्या मतानुसार फ=पृथ्वी आहे. द पासून झ पर्यंत तत्त्वांचे वाचक आहेत. ई पासून घ पर्यंतची वर्णाक्षरे शुद्ध विद्या, ईश्वर आणि सदाशिवचे वाचक आहेत. ग पासून न पर्यंत १६ वर्णाक्षरे षोडश वर्णात्मक शिवचे वाचक आहेत. परात्रिंशिखाच्या व्याख्येमध्ये लिहिले आहे – अ – अः हे सोळा शिव–तत्त्वाचे वाचक आहेत, क––ङ पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांचे, च––ञ शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ही पंच तन्मात्रे, ट –– ण हात, पाय, वाणी, जननेंद्रिय व गुद पंच कर्मेंद्रिये, त –– न नेत्र, कर्ण, त्वचा, जिव्हा आणि नासिका (नाक) ही पंच ज्ञानेंद्रिये, प –– म ही मन, अहंकार, बुद्धि, प्रकृती आणि पुरुष यांचे वाचक आहेत. य –– व अर्थात वायु प्रभृती राग, विद्या, कला आणि माया यांचे वाचक आहेत. श ष ह क्ष हे महामाया, विद्या, ईश्वर, सदाशिव आणि शक्तीचे वाचक आहेत. मात्र उत्तरमालिनी मतानुसार वर्णमालेचा क्रम निराळा आहे. तो असा –

पृथ्वी = फ; जल = द; तेज = औ; वायु = ओ; आकाश = ऐ; पाच तन्मात्रा = ए, त, अ, श, म; अकरा (११) इंद्रिये, अहंकार, बुद्धि आणि प्रकृती = क्ष, ष, ह, अः, स, आ, ल, ज, प, ट, र, ज, झ; पुरुष पासून मायापर्यंत = ठ, ढ, ड, य, भ, ब, अ; शुद्ध विद्या = इ; ईश्वर = ङ; सदाशिव = घ, शिव = ग, ख, क, ब, ऊ, उ, ण, ई, ध, च, थ, लृ, लॄ, ऋ, ॠ, न (सोळा वर्णाक्षरे).

स्थूल विश्वाची अनुभूती समग्र मात्रेस घेऊन होते, परंतु त्या मात्रेमध्ये सूक्ष्म अनुभूतीची धारणा नसते. केव्हा मात्रांचे प्रसार वाढवावे लागते अर्थात मात्रांना स्वच्छ आणि तरल करावे लागते. मात्रांची घनता जेवढी कमी होऊ लागते तेवढीच त्यांची स्वच्छता वाढते. अर्धमात्रेपासूनच सूक्ष्म अनुभूतीचे सूत्रपात होते. नवनादांच्या प्रसंगामध्ये त्यांनी दाखवून दिले आहे की प्रथम नाद–स्तर बिंदुमध्ये अर्धमात्रा आहे, हिचे स्थान भ्रूमध्यामध्ये आहे. येथे प्रथम शून्य आहे. नवम नाद–स्तर उन्मना आहे, तिची मात्रा १/५१२ आहे. तेथे पंचम शून्य आहे. यानंतर पुन्हा नाद नाही. उन्मनामध्येच शब्दब्रह्माचे नादरूप समाप्त होऊन जाते. तिच्यापुढे महानाद परसंवित, अद्वैत, आत्मा अथवा परब्रह्मस्वरूप आहे.

सांप्रदायिक मतानुसार काळाच्या परमाणूस लव असे म्हटले जाते. उपलब्धियोग्य सूक्ष्मतम काळच काळाचा परमाणु किंवा लव आहे. कुणी कुणी म्हणतात की २५६ लवापासून एक मात्रा होते. ते लघुस्वराचे उच्चारण–काल आहे. योगिना हृदयाच्या मनाप्रमाणे ५१२ लवांची एक मात्रा होते. बिंदुचा काळ अर्धमात्रा आहे. त्यानंतर प्रत्येकाचे काळ अर्धे अर्धे (निम्मे निम्मे) आहे. अर्थात उन्मनास एक लव मानल्यावर बिंदुमध्ये २५६ लव अथवा अर्धमात्रा होते. उन्मनापासून काळाची प्रवृत्ती आहे. उन्मनेच्या वर काळ नाही. काही तंत्रामध्ये लिहिले आहे की बिंदुची मात्रा १/२ आहे, अर्धचंद्राची १/४, निरोधिकाची १/८, नादाची १/१६. नादान्त एक प्रकारे नादाचेच पल्लवित रूप आहे. शक्तीची १/३२, व्यापिनीची १/६४ आणि समनाची १/६४ मात्रा आहे. उन्मना अमात्र आहे अर्थात कालस्पर्शहीन आहे. या मतामध्ये व्यापिनी + समना = १/३२, त्याच्याशी शक्तीचा योग झाल्यावर मात्रा = १/३२ + १/३२ किंवा १/१६ आहे. तिच्याशी नाद जुडल्यावर १/८, तिच्याशी निरोधिकाच्या योगाने १/४. अर्धचंद्राच्या योगाने ती होते १/२ तिच्याशी बिंदुच्या १/२ मात्राचे योग झाल्यास होते एक मात्रा. यापुढे असे म्हटले जाऊ शकते की प्रणव च्या अकाराची मात्रा १, उकाराची मात्रा २ आणि म कारची मात्रा ३ = सर्व मिळून ६ मात्रा होतात. म्हणून समनापर्यंत मात्रांची संख्या ७ होते. निष्कलनाथ

अमात्र उन्मना परतत्त्व स्वरूप आहे. त्यामध्येच पूर्वोक्त ७ (सात) मात्रारूपी सात देवी आहेत ही जी मात्रा आहे ती, सूक्ष्म मंत्रकलेचे उच्चारण-काल आहे. मंत्रावयाचा काल अति सूक्ष्म आहे. येथे थोडक्यात नमूद केले जाऊ शकते की मतविशेषमध्ये अकारचे अनुभव स्थान हृदय आहे, त्यानंतर क्रमशः कंठ (उ चे), तालु-मध्य (म चे), भ्रूमध्ये (बिंदु चे), ललाटान्त (निरोधी चे), मुर्द्धा (नाद चे), ३६ अंगुल रंध्रात (शक्ति चे) त्वक्शेष (व्यापिनीचे) आणि केशमेष (समना चे) स्थान समजले पाहिजे. शेवटच्या तिघांच्या स्थानामध्ये भेद नाही. समनाच चरम आहे. उन्मना हिच्या अतीत आहे.

अर्थसृष्टी शब्दाच्या अधीन असते, अर्थात सृष्टीचा हा क्रम आहे की अगोदर ज्ञानापासून शब्दाचा उगम होतो. तदनंतर त्यापासून अर्थाचा आविर्भाव होतो. ज्ञानामध्ये ज्या सत्तेची आत्मरूपाने प्रचिती होते, शब्दामध्ये त्याचेच अनात्मरूपाने स्फुरण प्रतीत होते. यानंतर शब्दापासून अर्थाच्या स्तरामध्ये पोहोचल्यावर सृष्टिक्रिया पूर्ण होते. रहस्यवित् आचार्य भर्तृहरिने म्हटले आहे की शब्दतत्त्वापासूनच अर्थाचा आविर्भाव (आविष्कार) होतो. अनादि आणि अनंत शब्द तत्त्वासच त्यांनी मूल तत्त्व मानले आहे. तेच अक्षर स्वरूप आहे. तेच अर्थरूपाने विवर्तित होते. या विवर्तामुळेच या जगताची सृष्टिप्रक्रिया चालत असते. ज्या सिद्धांतानुसार शब्दब्रह्माचे सिद्धान्त मानले जाते त्या सिद्धान्तानुसार शब्दातीत परब्रह्मापासून शब्दापासून अर्थ स्वाभाविकच प्रकट होतो.

सारांश, शब्दानंतरच अर्थाचा आविर्भाव होतो, अर्थ प्रकटतो, अर्थात अर्थाची स्फूर्ति होते शब्दापासून, आणि शब्दाचे स्फुरण होते शब्दातीत चैतन्यापासून. शब्दच अर्थरूपामध्ये परिणत होतो. वास्तविक शब्द पण शक्तीच आहे आणि अर्थ त्याचे बाह्य विकासमात्र.

मुळात जे निष्कल परमपद आहे, तेच परमशिव आहे, तीच पराशक्ति किंवा महाशक्ति आहे आणि तोच विश्वाचे परमस्वरूप आहे. वास्तविक ती एक अखंड सत्ता आहे. असे असूनही शिवच्या अखंड स्वरूपामध्ये सांशता व्यक्त होते. या अंशाचे नाव आहे शक्ती. फरंतु शक्ती पण सांश आहे. या अंशाचे नाव आहे विश्व. हे शक्तिच्या गर्भामध्ये प्रकट होते आणि शक्तिने युक्त असते. याला एका दृष्टीने शक्तीचे गर्भाशय समजले जाऊ शकते. यानंतर जेव्हा विश्व शक्ति-गर्भापासून वेगळे होऊन जाते तेव्हा त्याचे नाव होते सृष्टी. हे प्रसव क्रियेसारखी एक क्रिया आहे. यामध्ये शक्ती सृष्टी करते आणि शिव तटस्थ असतो.

शाक्त दृष्टीने आदि स्पंदनाचा प्रसार असा आहे - मुळात जी निष्कल आणि निःस्पंद सत्ता आहे, स्पंदनाच्या अनुषंगाने तीच शिव-शक्ती रूपामध्ये भासते. याचे मूळ आहे बिंदु. त्यास ब्रह्मबिंदु पण म्हटले जाते. सृष्टीच्या उन्मुख अवस्थेचे नाव आहे बिंदु. तो प्रपंचहीन आणि निराकार आहे. वर्णमालेमध्ये त्याचे प्रतीक 'अः' आहे, अर्थात शून्याकार विसर्गांत बिंदु. वास्तविक हे स्पंदना व्यतिरिक्त काहीच नाही. हे प्रकाशस्वरूप आहे. ब्रह्म पण प्रकाशस्वरूप आहे. सामराख्यस्थिती किंवा काम सृष्टीचे प्रवर्तक आहे. आगमांच्या परिभाषेमध्ये याचे नाव 'रवी' आहे. क्षोभ अवस्थेमध्ये जेव्हा याचे साम्य भंग पावते, तेव्हा दोन बिंदु वेगळे होऊन जातात. त्यापैकी एक बनतो. 'अग्नी' तर दुसरा बनतो 'सोम'. अग्नी आणि सोमची साम्यावस्थाच काम किंवा रवि आहे. वैषम्यावस्थेमध्ये अग्नी आणि सोम वेगवेगळे राहतात (असतात). साम्यभंग झाल्यावर अग्नीची क्रिया वेगळी होते आणि सोमची क्रिया पण वेगळी होते. अग्नी सक्रिय होऊन जेव्हा सोमबिंदु स्पर्श करतो,. तेव्हा सोमबिंदु विरघळून क्षरित (प्रवाहित) होऊ लागतो. दुसरीकडे सोम सक्रिय होऊन जेव्हा अग्नीबिंदुचा स्पर्श करतो, तेव्हा

अग्नी प्रदीप्त होऊन सोम शोषित करतो. सोमच्या क्षरणामुळे सृष्टी उत्पन्न होते, आणि क्षरण बंद झाल्यावर संहार निर्माण होते. संहार काळामध्ये सोमचे क्षरण होत नाही, आहुति होते. आहुतिमध्ये संहार होतो तर क्षरणमध्ये सृष्टी होते. स्थितीमध्ये आहुतिपण नसते आणि क्षरण पण नसते.


साम्यरूपी कामबिंदुमध्ये दोन कला (शक्ती) असतात – एक आहे अग्निरूपी, जिचे स्वरूप आहे रक्तवर्ण बिंदु आणि दुसरे आहे सोम अथवा शुक्लवर्ण बिंदु. या महाबिंदुपासून बैंदव चक्र किंवा मध्य चक्राची रचना होते. याचे उपादान पूर्वोक्त क्षरित अग्निसृष्ट सोमधारा आहे. याची चित्कला वा हार्धकला नावाने प्रसिद्धी आहे. ही सोमप्रधान असूनही पण अग्निषोमात्मक आहे.

ज्या स्थितीमध्ये शिव आणि शक्ती सर्वथा अभिन्न असतात, ती (अवस्था) निष्कल आहे. त्यामध्ये कोणत्याच प्रकारचे अंश नाही. त्या स्थितीत शिव पण निरंश आहे आणि शक्ती पण. ज्या स्थितीमध्ये स्पंदन होते, त्यामध्ये परम शिव पण सांश आहे आणि पराशक्ति पण सांश आहे. परम शिवचे अंबिका नावाने आणि पराशक्तिचे अंश शांता नावाने प्रसिद्ध आहे. अंबिका आणि शांताचे जे सामरस्य आहे, तेच महाबिंदु आहे. कामरूप महाबिंदु पण जात आहे, अजात नाही, अर्थात तो पण सृष्टीच्याच अंतर्गत आहे.

जेव्हा विमर्शरूपा पराशक्ति परम शिवचे स्फुरण पश्यंती, मध्यमा या क्रमाने वैखरी पर्यंत पाहू इच्छिते, तेव्हा आपले अंश शांता आणि प्रकाशांश अंबिका – या दोहोंच्या सामरस्यावस्थेस प्राप्त होते. त्या सामरस्य अवस्थेचे नाव आहे परा वाक्. या परावाक्मध्ये छत्तीस (३६) तत्त्वमय विश्वे बीजरूपामध्ये असतात. जसे बीमध्ये वृक्ष असते. अनेक बाबतीत हे पण असेच आहे. जेव्हा विश्वास गर्भापासून परिस्फुट किंवा निस्सारित केले जाते, तेव्हा त्या शक्तिचे नाव होते वामा. वामा अंकुशासारखी वाटते. ही मूळ त्रिकोणाची डावी रेषा आहे. ही इच्छाशक्तीरूप पश्यंती आहे. ज्ञान शक्तीरूप ज्येष्ठा मध्यमा वाक् आहे. ही मूळ त्रिकोणाची अग्ररेषा किंवा सरळ रेषा आहे. अंबिका आणि शांता शक्तीचे साम्य झाल्यावर शब्दब्रह्माचे ज्या स्वरूपात प्रकाश होते, त्याचे नाव आहे परा वाक्. इच्छा आणि वामा शक्तिच्या साम्यामुळे पश्यंतीचा आविर्भाव होतो. ज्ञान आणि ज्येष्ठा शक्तीच्या साम्याने मध्यमाचा आविर्भाव होतो. रौद्री क्रिया आणि रौद्री शक्तिच्या साम्यावस्थेमुळे वैखरी शक्तीचे आविर्भाव होते.

या विवेचनावरून स्पष्ट होते की प्रकाशाची आंशिक शक्ति अरूप आहे. परंतु जेव्हा ती विमर्शाच्या आंशिक शक्तीशी समरस होते, तेव्हा ती रूपमयी होऊन जाते. त्या रूपाचे नाव आहे वाक्. वाक्च्या गर्भामध्ये समग्र विश्व विद्यमान असते. विश्व तत्त्वात्मक आहे. सृष्टीच्या मुळात जे त्रिकोण आहे, ते वाङ्मय आहे. त्रिकोणाच्या तीन रेषा पश्यंती, मध्यमा आणि वैखरी तीन प्रकारच्या वाक् आहेत, आणि मध्य बिंदु परावाक् आहे.

एक गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. ती ही की परावाक्मध्ये विश्व आहे, परंतु ते तिच्या गर्भात आहे. वामामध्ये अर्थात डावीकडे तो प्रसूत होतो. ज्येष्ठामध्ये त्याचा आणखी विकास होतो, आणि वैखरीमध्ये तो पूर्ण विग्रह–रूपात येतो. वैखरी क्रियाशक्तीचे थर आहे. त्यामध्ये साकारता सर्वात जास्त प्रमाणात स्पष्ट असते. अर्थात, पश्यंतीमध्ये अर्थवाक्पासून अभिन्न रूपात आविर्भूत होतो, मध्यमामध्ये भिन्न आणि अभिन्न रूपांत आणि वैखरीमध्ये भिन्न रूपात प्रकाशित होतो. येथे ज्याचे निर्गम होते, तो पूर्व असतो.




फ क आणि क ख सृष्टी, ख ग स्थिती आणि ग क आणि क प संहार आहेत. बिंदुंपासून सृष्टी होते आणि संहार मध्ये बिंदु मध्येच प्रवेश होतो. हा मध्य त्रिकोण अंबिकारूपी आहे. याच्या तीन रेषा १५ स्वरांनी बनलेल्या आहेत. डाव्या रेषेमध्ये अ पासून उ पर्यंत अ, आ, ई, ई आणि उ असे पाच स्वर आहेत, वरच्या रेषेमध्ये तिच्यापुढचे पाच स्वर म्हणजे ऊ ए ऐ ओ आणि औ हे आहेत, आणि उजव्या रेषेमध्ये शेवटचे पाच स्वर म्हणजे अं ऋ ॠ ऌ आणि ॡ हे आहेत. या त्रिकोणामध्ये अः हा सोळावा स्वर आहे. तेच सदाशिवरूपी आसन आहे, ज्यावर शिव-शक्ति किंवा परमेश्वर - परमेश्वरी नित्य आसनावर अधिष्ठित असतात. सृष्टी चित्कलापासून निर्माण होते आणि संहार होतो प्रकाशरूपी संहारानलपासून. चित्कला, बहिर्मुख आहे, तर प्रकाश अंतर्मुख आहे, परंतु आहेत दोन्ही अभिन्न. छत्तीस (३६) तत्त्वांचा विलय होतो त्या अग्नीमध्ये आणि त्यांचे आविर्भाव होते चित्कलेपासून. तो अग्नी वास्तविक प्रकाशाचेच प्रतीक आहे. याचे द्योतक अवर्णाने होते. चित्कला अंतिम कला आहे, याचे नामांतर हार्धकला आहे. ते 'ह' आहे. दोन्ही मिळून बिंदुरूपाने अभिन्न अवस्थेमध्ये अहंपदवाच्य होतात. त्रिकोणाच्या तीन्ही रेषा परस्पर समान आहेत. मध्य बिंदुपासून उत्पन्न झाल्यामुळे त्रिकोणाचे नाव अंबिका आहे.

अंतरतम बैंदव चक्रापासून नऊ (९) त्रिकोण नवयोनिचक्र नावाने उदय पावतात. प्रमाता जीव, प्रमेय आणि प्रमा. हे नवयोनिचक्र आतबाहेर चिदानंदमय आहेत, अर्थात चैतन्यकलामय आणि पूर्णाहंता स्फुरणात्मक आनंदमय आहेत. हे देश, काल आणि आकारद्वारे परिछिन्न नाहीत. बैंदव चक्र अभ्यंतर आणि नवयोनिचक्र बाह्य आहे. हे नवयोनिचक्र वैखरीवाङ्मय आहेत.

त्रिकोणाच्या तीन स्पंदनाने अष्टकोनाचा उगम होतो. हा त्रिकोणास वेष्टित करून असतो. दशकोन दोन आहेत. एक आभ्यंतर आणि दुसरे बाह्य. आभ्यंतर दशकोन नऊ (९) त्रिकोण आणि बैंदवाच्या चारी बाजूस स्फुरणशील प्रभांनी निर्मित आहे. यापासून य र ल व श ष स ह ल आणि क्ष या दहा वर्णांची स्फूर्ती होते. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश हे पंचमहाभूत आणि शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच तन्मात्रा या दहा वर्णांनी प्रकाशित होतात. वर्ण शक्तिरूप आहेत, तर अर्थ शिवरूप आहेत. यामध्ये प्रकाश-विमर्शमय दहा कोन आहेत. हे सर्व मध्यस्थित शिवशक्तिमय प्रभात्मक आहेत. द्वितीय दशकोन, अर्थात बाह्य दशार आतील दहा कोनांची छाया आहे. यामध्ये क पासून ते ञ पर्यंत दहा वर्ण आहेत. शब्दादि पाच आणि वचनादि पाच इंद्रियार्थांचे स्फुरण यांच्यापासून होतो. या द्वितीय दशारचा परिणाम आहे चतुर्दशार. यामध्ये चौदा (१४) अर

आहेत, ज्यांच्यामध्ये बैंदव, त्रिकोण, अष्टकोन आणि प्रथम दशारच्या चार प्रभा आहेत. दूरस्थ असल्यामुळे प्रभाच दृष्टिगोचर होते. अयवयांचे दर्शन होत नाही. शेष दहा आणि द्वितीय दशारच्या प्रभा आहेत. या ठिकाणी अवयवांचे दर्शन होते. हे चतुर्दशार वास्तविक संवित्रिकरणात्मक १४ शक्तींची रूपे आहेत. – बाह्य इंद्रिये दहा आणि अंत:करण चार (मन, बुद्धी, अहंकार आणि चित्त). येथे ट पासून भ पर्यंत चौदा वर्ण विद्यमान असतात. त्यानंतर मध्यवर्ती अष्टदल आणि षोडशदल – या दोन कमळांसोबत तीन वृत्त (वर्तुळ) आहेत. या नंतर चार चतष्कोन किंवा भूपुर आहेत. हे पण चक्राचे बाह्य प्राचीर किंवा सीमा आहेत.

**ख] अरबी वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र**

**१) अरबी वर्णाक्षरांचे इस्लामप्रणीत अध्यात्मशास्त्र**

अरबी वर्णाक्षरांचा इस्लामप्रणीत अध्यात्मशास्त्राचा प्रयोग पवित्र कुरआनच्या काही अध्यायांमध्ये आढळतो. ह्याने सर्वश्रेष्ठ परमेश्वराची रहस्ये – गूढ अभिव्यक्त होतात, असे काही भाष्यकारांचे मत आहे. अरबी वर्णमालेमध्ये एकूण २८ वर्णाक्षरे आहेत. 'हमज़ा' या 'अलिफ' वर्णाक्षराचे समतुल्य असलेल्या वर्णास जर स्वतंत्र वर्ण मानले तर एकूण २९ वर्णाक्षरे होतात, मात्र २८ वर्णाक्षरे असल्याचे मतच जास्त प्रचलित आहे. रूढ असलेली अरबी वर्णमाला पृ. क्र. १३२१ वर कोष्टकामध्ये दिली आहे. वर्णांकशास्त्रानुसार उपरोक्त अरबी वर्णाक्षरांचे दोन गट पडतात. एक 'अब्जद' पद्धती म्हणून ओळखली जाणारी प्रसिद्ध अशी 'अब्जद–ए–कमरी' पद्धती, तर 'अबतस' पद्धती म्हणून ओळखली जाणारी 'अब्जद–ए–शम्सी' ही दुसरी पद्धती आहे. याचप्रमाणे अध्यात्मशास्त्रानुसार अरबी वर्णमाला ही दोन प्रकारांमध्ये विभागली जाते. पहिला प्रकार हा प्रकाशमान वर्णाक्षरांचा आहे; तर दुसऱ्या प्रकाराचे नाव आहे अंधुक वर्णाक्षरे. जी वर्णाक्षरे 'हुरूफ़–ए–मुक़त्तेआत' म्हणजेच त्रोटक अक्षर स्वरूपात कुरआनी अध्यायांच्या आरंभी येतात, त्यांना 'हुरूफ़ नूरानिया' म्हणजेच प्रकाशमान वर्णाक्षरे असे म्हणतात. यांना तेजोमय वर्णाक्षरे किंवा श्वेत वर्णाक्षरे असेही पण म्हणतात. आणि जी वर्णाक्षरे कुरआनी अध्यायांच्या आरंभी उपयोगात आणली जात नाहीत, त्यांना 'हुरूफ़ जुल्मानिया' म्हणजेच अंधुक वर्णाक्षरे असे म्हणतात. यांना अस्पष्ट किंवा कृष्ण वर्णाक्षरे असेही म्हणतात. ही अध्यात्मशास्त्रामध्ये कुचकामी असल्यामुळे त्यांना स्वत:चे तेज नसल्यामुळे कदाचित त्यांना अंधुक किंवा अस्पष्ट म्हटले गेले असावे.

उपरोक्त विवेचनानुसार अरबी वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्रीय वर्गीकरण असे करता येईल. –

१) हुरूफ़ नूरानिया : प्रकाशमान वा श्वेत वर्णाक्षरे –

ى ه ن م ل ك ق ع ط ص س ر ح ا = एकूण १४ वर्ण

२) हुरूफ़ जुल्मानिया : अंधुक वा कृष्ण वर्णाक्षरे –

و ف غ ظ ض ش ز ذ د خ ج ث ت ب = एकूण १४ वर्ण

श्वेत वर्णाक्षरांचा उपयोग पवित्र कुरआनमध्ये ईश्वरी गुह्यांसाठी कशा प्रकारे करण्यात आला आहे, हे पुढील एक नमुन्याखातर उदाहरणावरून दिसून येईल –

अध्याय दुसरा : सूरतुल् – बकर: (धेनूचे, गायीचे प्रकरण)

अ. ल. म. (अलिफ–लाम–मीम.) – २ : १

**कूट–विमोचन :** पवित्र कुरआनमध्ये अरबी मूळाक्षरांपैकी असली काही काही अक्षरे कित्येक अध्यायांच्या प्रारंभी आली आहेत. त्यांना 'हुरूफ़–ए–मुक़त्तेआत' म्हणजे तुटक अक्षरे म्हणतात. त्यांचा गूढार्थ समजाविण्यासाठी विद्वानांनी आणि भाष्यकारांनी प्रयत्न केले आहेत व आपापली सयुक्तिक व समर्पक मते प्रदर्शित केली आहेत. उदाहरणार्थ : 'अलिफ' अल्लाहसाठी; 'लाम' जिब्रईल – पवित्र आत्मा –या देवदुतासाठी, आणि 'मीम' मुहम्मदसाठी; म्हणजे परमेश्वराने जिब्रील देवदूता – पवित्र आत्म्या – द्वारे हज़रतर मुहम्मद पैगंबर यांस कुराण प्रकट केले, इत्यादी इत्यादी.

अ. ल. म. ही विशिष्ट त्रोटक अक्षरे या अध्यायाच्या सुरुवातीस उपसर्ग स्वरूपात आढळतात, तद्वत् ती पुन्हा पुढील अध्याय क्रमांक ३, २९, ३०, ३१ आमि ३२ (सर्व मिळून सहा) मध्ये सुद्धा आढळतात. या दुसऱ्या आणि तिसऱ्या अध्यायामध्ये राष्ट्रांचे उत्कर्ष आणि अपकर्ष (अध:पतन), इतिहासामध्ये त्यांचे भूतकाळ आणि भविष्यकाळ, नव वैश्विक इस्लामी लोकांच्या आचारसंहितेसह युक्तिवाद प्रस्तुत करण्यात आला आहे. मानवाच्या वैयक्तिक इतिहासामध्ये जीवन आणि मृत्यु, यशापयश, भूतकाळ आणि भविष्यकाळ याकडे नेणाऱ्या समाजाच्या – राष्ट्राच्या गूढगुंजनाविषयी असाच युक्तिवाद २९ व्या अध्यायामध्ये आहे. ३० व्या अध्यायाचा भार हा आहे की सर्व वस्तूमात्रांचा निर्माता परमेश्वर असून त्या सर्व वस्तू त्याच्याकडे परततात. अध्याय ३१ आणि ३२ मध्ये तोच धडा लादला गेला आहे : ईश्वर हा विश्वनिर्माता आहे. अंतिम न्यायाच्या दिवशी तोच निवाडा करील. म्हणून एक सामाईक धागा आहे सुरुवात आणि शेवट, जीवन आणि मृत्यु याचे कोडे.

अशा कूटाक्षरांच्या अर्थाविषयी बरेच लिहिले गेले आहे, परंतु त्यापैकी बहुतांश अनुमान वा अटकळ मात्र आहे. काही भाष्यकार त्यांना काही कूट प्रतीके मानण्यातच समाधान पावतात. काल्पनिक तर्क म्हणून त्यांचा विचार करण्यात काहीच अर्थ नाही. गूढवादामध्ये तात्कालिक स्वरूपात प्रतीके ग्रहीत केली जातात. त्यांचा गूढार्थ अंतर्ज्ञानानेच उकलला जातो. पवित्र कुराणचे गाढे अभ्यासक व आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त विद्वान अब्दुल्लाह यूसुफ़ अली[८६] यांच्या भाष्यानुसार श्रद्धावंतांना ही कूटाक्षरे आत्मिक बळ देतात.

दोन लाघवी सिद्धांताचे अनुमान करता येते. पैकी एक असे आहे की प्रत्येक आद्याक्षर हे ईश्वराच्या एका गुणाचे निदर्शक आहे. गुणांपैकी या त्रोटक अक्षरांशी समर्पक असे तीन गुण निवडण्यामध्ये काही अडचण नाही. दुसरा सिद्धांत बैज़ावी या भाष्यकाराचा आहे. ही वर्णाक्षरे अल्लाह, जिब्रील आणि मुहम्मद या तीन नामांचे आद्य, अंत्य आणि मध्य (किंवा पुन्हा आद्य) अशी या तीन नामांची अक्षरे आहेत – म्हणजेच दैवी अवतराचा स्त्रोत, ते अवतरण आणणारा दिव्य दूत, आणि मानवी दूत ज्याने मानवाच्या वाणीमध्ये याचा प्रसार केला. हे प्रथम अध्याय (खरोखर 'बकर:' हा प्रथम अध्याय आहे, जर आपण 'फ़ातिहा' या अध्यायास मंगलाचरण कल्पिले तर) : परंतु जर ते इतरांशी उपसर्ग स्वरूपात जोडल्यास, मग या सहा अध्यायांचेच ते उपसर्ग म्हणून का आहे?

जर आपण अक्षरांच्या ध्वनीच्या स्वरूपाकडे पाहिले तर आपणास असे आढळेल की 'अ' हा एक श्वास आहे, आणि तो कंठापासून निघतो. ल वर्त्स्य पार्श्विक सघोष ध्वनी आहे. हे तोंडाच्या मध्यभागापासून उच्चारित

होते. आणि म द्व्योष्ठ ध्वनी आहे. त्यांना आपण आद्य, मध्य आणि अंत्य या प्रतीकात्मक स्वरूपामध्ये ग्रहण करू शकत नाही काय? 'नवा करार' च्या ग्रीक धर्मग्रंथामध्ये, ग्रीक वर्णमालेचे प्रथम आणि शेवटचे वर्णाक्षर अल्फा आणि ओमेगा हे आरंभ आणि अंत साठी प्रतीकात्मक आहेत, आणि (ती) ईश्वराची नावे प्रदान करतात : ''मी अल्फा आणि ओमेगा आहे, आदि आणि अंत, प्रभू म्हणतो, वर्तमान, भूत आणि भविष्याचा सर्व शक्तिमान परमेश्वर आहे.'' (Rev. i.8) तीन अक्षरांशी निगडित प्रतीकवाद तीन गोष्टींशी समर्पक (असेच) आहे.

**कूटाक्षरे : त्रोटक अक्षरे : हुरूफ़–ए–मुक़त्तेआत**

काही अध्यायां(सूरे)च्या सुरुवातीस उपसर्ग स्वरूपात आलेल्या त्रोटक आद्याक्षरांना 'कूटाक्षरे' किंवा 'त्रोटक अक्षरे' असे म्हणतात. त्यांच्या अर्थाविषयी अनेक तर्क लढविण्यात आले आहेत; नाना अनुमान काढण्यात आले आहेत. एक विशिष्ट अक्षर किंवा अक्षर समूहाच्या अर्थाविषयी मतभेद आहेत, परंतु त्यांना एखाद्या गूढ अर्थाचे वलय आहे, याविषयी एकमत आहे.

कुरआन एक 'सुस्पष्ट ग्रंथ' असल्याच्या वैशिष्ट्याशी, प्रथम दर्शनी दुर्बोध वाटणाऱ्या गूढ अर्थाशीस विसंगत आहे असे वाटणार नाही. निसर्गाचा ग्रंथ एक सुस्पष्ट ग्रंथ असूनसुद्धा ते फारच थोडे लोक कसे बरे संपूर्णपणे समजू शकतील? प्रत्येक जण, आपल्या जीवनासाठी आध्यात्मिक अनुभूती व प्रबोधनाकरिता यथाशक्ती स्पष्ट मार्गदर्शन प्राप्त करून घेऊ शकतो. जसजशी त्याची ग्रहणशक्ती वाढेल तसतशी त्याची समज–बुद्धी वाढेल. विकसित होईल. संपूर्ण (पवित्र) ग्रंथ हा चिरकालासाठी एक प्रलेख आहे. मानवतेच्या कल्याणासाठी हळूहळू उघडणारी सत्येच त्यामध्ये असली पाहिजेत. गूढार्थाने भरलेल्या कथा आणि दृष्टांत यामध्ये प्रतीकवाद उपयोजिलेले आहे. ज्याप्रमाणे एखाद्या सैनिकास राष्ट्रध्वज सहाय्यक ठरतो त्याचप्रमाणे सर्वसाधारण माणसास प्रतीकवाद सहाय्यक वाटू लागेल.

बुद्धिला न पटणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवण्यास भाग पाडणाऱ्या ''गुह्यांच्या'' श्रेणीपैकी हे तसे एक गुह्य नव्हे. एक तीन आहे आणि तीन एक आहे यावर जर आपणास विश्वास ठेवण्यास सांगण्यात आले, तर आपण अशा शब्दांना सुबोध अर्थ देऊ शकणार नाही. काळाची संपूर्णता अथवा परिपूर्ण आध्यात्मिक उन्नतीमध्ये समजून येईल, असे एखाद्या अर्थाची विशिष्ट त्रोटक अक्षरे यामध्ये विश्वास ठेवण्यास जर आम्हाला सांगण्यात आले तर आम्हास श्रद्धा ठेवा असे सांगण्यासारखे आहे, परंतु सद्सद्विवेक बुद्धीची प्रतारणा करा असे सांगण्यासारखे नव्हे.

कुरआनमध्ये आढळणारे एखादे त्रोटक अक्षर समूहाच्या काही संभाव्य अर्थांविषयी येथे चर्चा करण्याविषयी प्रयत्न करण्यात येईल. त्रोटक अक्षरांविषयी विविध मते जाणून घेण्यासंबंधी मदत व्हावी या हेतुने त्यांच्या येण्याविषयी – वारंवारतेविषयी सर्वसाधारण तथ्ये समजून घेणे इष्ट होईल. मात्र या अगोदर सुप्रसिद्ध सूफी तत्त्वज्ञ इब्न अरबी यांचे कूटाक्षरांसंबंधी मत जाणून घेणे श्रेयस्कर ठरेल. ते आपल्या ''फ़तूहात मक्किया'' या प्रसिद्ध ग्रंथामध्ये स्पष्ट करतात की कौराणिक कूटाक्षरे ही देवदूतांची नावे आहेत. काही प्रसंगाच्या बाबतीत आम्ही याविषयी सहमत आहोत. प्रत्येक देवदूताने यासंबंधी माहिती (ज्ञान) दिली आहे, जी आम्हास यापूर्वी माहित नव्हती. यापैकी काही शंका देवदूतांच्या बाबतीत आहेत. ज्यावेळेस कुरआन पाठक 'अलम' म्हणतो,

त्याच्यासारखे तीन देवदूत म्हणतात की ‘तू म्हणालास, म्हणतोस.’ जेव्हा पाठका (वाचका) ने यानंतर म्हटले तेव्हा त्यांनी म्हटले की “तू खरे सांगितलेस, जर ते अधिक चांगले आहे. ते म्हणाले हा श्रद्धावंत आहे. कारण तो सत्यासह बोलला. अंततः त्यांनी त्याच्यासाठी मोक्षाची इच्छा केली, ती कूटाक्षरे चौदा आहेत, त्यांपैकी शेवटचे ‘नून’ (ن) आहे. वेगवेगळ्या कारणांसाठी कुरआनच्या अध्यायांमध्ये हे व्यक्त झाले आहेत, आणि काही अध्यायांवर तर एक-एक, जसे ص-ق-ن- आणि काही ठिकाणी दोन-दोन पण, जसे -طس - حم. इथपर्यंत की ते १०७९ आहेत. प्रत्येक देवदूतामध्ये श्रद्धेची एक शाखा आहे आणि श्रद्धेच्या शाखेच्या पण सत्तर श्रेणी (टप्पे) पेक्षा जास्त आहेत, आणि काही एक पासून ते नऊ पर्यंत शाखा आहेत. जो यावर चिंतन करील, त्याच्यासाठी चमत्कार प्रकट होत जातील आणि वर्णाक्षरांचे देह धारण करणारे देवदूतांचे आत्मे आज्ञाधीन बनतील, आणि त्यांच्या हाती असलेल्या श्रद्धेच्या शाखा त्यांना मदत करतील आणि मृत्युपर्यंत ते त्यांचे संरक्षण करतील.”

पवित्र कुरआनमध्ये प्रयुक्त त्रोटक अक्षर किंवा त्रोटक अक्षर-समूह म्हणजे साक्षात् गुह्यसूत्रेच होत. या अक्षर किंवा अक्षर-समूहांची फोड केल्यास संभावित किंवा अनुमानित अर्थ प्रगट होतो. त्यामुळे गुह्यांचा उलगडा होण्यास मदत मिळते. अरबी वर्णमालेच्या एकूण २८ अक्षरांपैकी, १४ अक्षरे ही गुह्य सूत्रांमध्ये वापरण्यात येतात. अशा त्रोटक अक्षरांना ‘हुरूफ़ नूरानिया’ म्हणजेच सुस्पष्ट, वा प्रकाशमय किंवा श्वेत वर्णाक्षरे असे म्हणतात. उरलेली १४ वर्णाक्षरे ही गुह्यसूत्रांमध्ये वापरली जात नसल्याकारणाने गुह्यांच्या उलगड्यामध्ये ती निरूपयोगी असतात. त्याने कसलाच प्रकाश पडत नाही. ती अंधुक व अस्पष्ट असतात. म्हणून त्यांना ‘हुरूफ़ ज़ुल्मानिया’ म्हणजेच अंधुक किंवा अस्पष्ट वा कृष्ण वर्णाक्षरे असे नाव आहे. अशी श्वेत वर्णाक्षरे आणि कृष्ण वर्णाक्षरांची यादी पृष्ठ क्रमांक १२८६ वर दिलेली आहेच. त्याची पुनरावृत्ती करण्याचे मुळीच कारण नाही. श्वेत वर्णाक्षरे संपूर्ण कुरआनमध्ये कोणकोणत्या अध्यायाच्या आरंभी आलेली आहेत, त्या कशा पद्धतीने आली आहेत, त्यांचे स्वरूप काय आहे, त्यांचा अनुमानित किंवा संभाव्य मथितार्थ काय आहे, याची स्पष्ट कल्पना पुढे दिलेल्या कोष्टकावरून येईल. या यादीवरून त्यांचे वर्गीकरण करणे पण शक्य होईल. त्यांच्या जुळणीची पण कल्पना येईल. याशिवाय काही विद्वानांनी सखोल अभ्यास करून काही अत्यंत आश्चर्यकारक गणितीय आणि संख्याशास्त्रीय तथ्ये शोधून काढली आहेत. ही बाब पण आवश्यक वाटल्याने तिचेही पण विवेचन करण्यात येत आहे. संख्याशास्त्रीय आधारावर, ज्याला वैज्ञानिक प्रमाणामध्ये ब्रह्मवाक्य म्हटले जाते असे एक अचूक आणि प्रयोग-योग्य प्रमाण जगासमोर मांडून प्रख्यात विद्वान अल्लामा (महापंडित व महामहोपाध्याय) अहमद दीदात यांनी पवित्र कुरआन हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ परमेश्वराची (अल्लाह तआला) सर्वात प्रामाणिक आणि सत्य कृती असल्याचे सिद्ध केले आहे. गणितशास्त्रीय आधारावर पण त्रोटक अक्षरांसंबंधी काही आश्चर्यकारक तथ्ये पण दृष्टिगोचर होतात. यांचे सोदाहरण विवेचन पुढे प्रस्तुत करण्यात येणारच आहे. महान इस्लामी चिंतक पंडित (उस्ताद) अब्दुर्रज़्ज़ाक़ नोफ़िल यांच्या कुरआनच्या दूरदर्शितेच्या फलस्वरूप अंकगणितशास्त्राच्या प्रकाशामध्ये काही सांख्यिक चमत्कार शोधून काढले आहेत. यांचाही समावेश पुढील विवेचनामध्ये आहे. संगणकांची परिपूर्ण अशी गणितीय आणि संख्याशास्त्रीय तथ्ये या संदर्भात तंतोतंत लागू पडतात.

## कौराणिक गूढाक्षरे (त्रोटक अक्षरे) आणि त्यांचे संभाव्य अनुमानित मथितार्थ

| क्रमांक | त्रोटक अक्षरे | विद्वानप्रणीत अनुमानित अर्थ | प्रयुक्त अध्याय क्रमांक व त्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | अलिफ़ लाम मीम | मी अल्लाह आहे. सर्वज्ञ. | २. सूरतुल्-बकर: [१] |
| | अ ल म | मी सर्वज्ञ अल्लाह आहे. | ३. सूरतु-आले-इम्रान [२] |
| | | मी सर्वज्ञ आहे. | २९. सूरतुल्-अन्कबूत [३] |
| | | | ३०. सूरतुर्रूम [४] |
| | | | ३१. सूरतु-लुक्मान [५] |
| | | | ३२. सूरतु-स्सिज्दा [६] |
| २ | अलिफ़ लाम मीम सॉद | मी अल्लाह आहे, मी जाणतो | ७. सूरतुल्-आअराफ़ [७] |
| | अ ल म स | व समजवतो | |
| ३ | अलिफ़ लाम रा | मी अल्लाह आहे, जो सर्वसाक्षी आहे. | १०. सूरतु-यूनुस [८] |
| | अ ल र | मी सर्वसाक्षी अल्लाह आहे | ११. सूरतु-हूद [९] |
| | | | १२. सूरतु-यूसुफ़ [१०] |
| | | | १४. सूरतु-इब्राहीम [११] |
| | | | १५. सूरतुल्-हिज्र [१२] |
| ४ | अलिफ़ लाम मीम रा | मी सर्वज्ञ व सर्वसाक्षी अल्लाह आहे | १३. सूरतु-र्रअद [१३] |
| | अ ल म र | | |
| ५ | काफ़ हा या ऐन सॉद | हे सर्वज्ञ सत्यवान ईश्वरातू सर्वांसाठी | १९. सूरतु-मर्यम [१४] |
| | क़ ह य अ स | पर्याप्त आहेत व तूच मार्गदर्शक आहेस. | |
| ६ | ता हा | हे सर्वगुणसंपन्न महापुरुषा! | २० सुरतु-ताहा [१५] |
| ७ | ता सीन मीम | कृपाशील, सर्व काही ऐकणारा, | २६. सूरतुल्-श्शोअरा [१६] |
| | त स म | सर्वज्ञ ईश्वर | २८. सूरतुल्-क़सस् [१७] |
| ८ | ता सीन | कृपाशील, सर्व काही ऐकणारा | २७. सूरतु-न्नमूल् [१८] |
| | त स | | |
| ९ | या सीन | हे परिपूर्ण नेत्या! हे मानवा! | ३६. सूरतु-यासीन [१९] |
| | य स | | |
| १० | सॉद | सत्यवचनी ईश्वर | ३८. सूरतु-सॉद [२०] |
| | स | | |
| ११ | हा मीम | स्तुतिपात्र, सन्मानाचा स्वामी | ४०. सूरतुल्-मोमिन [२१] |
| | ह म | स्तुतिपात्र, (व) सर्व सन्मानांचा स्वामी | ४१. सूरतु-हा-मीम सिज्द: [२२] |
| | | | ४३. सूरतु-ज्जुखरूफ़ [२३] |
| | | | ४४. सूरतु-द्दुखान [२४] |
| | | | ४५. सूरतुल्-जासिय: [२५] |
| | | | ४६. सूरतुल्-अहकाफ़ [२६] |
| १२ | हा मीम -ऐन सीन क़ाफ़ | स्तुतिपात्र सन्मानाचा स्वामी सर्वज्ञ, | ४२. सूरतु-श्शूरा [२७] |
| | ह म -अ स क़ | सर्व काही ऐकणारा,शक्ती बाळगणारा. | |
| १३ | क़ाफ़ | सर्व शक्तिमान | ५० सूरतु-क़ाफ़ [२८] |
| | क़ | | |
| १४ | नून | सर्वज्ञ | ६८. सूरतुल्-क़लम [२९] |
| | न | | |
| | | | **एकूण अध्याय = २९** |

**कौराणिक गूढाक्षरांचे गटवार वर्गीकरण**

एक श्वास किंवा प्रयत्नामध्ये उच्चारित होणाऱ्या ध्वनीस किंवा ध्वनिसमूहास अक्षर असे म्हणतात. एका अक्षरामध्ये सामान्यपणे एक स्वर अवश्यपणे असतो. भाषेचे सर्वात लहान एकक म्हणजे ध्वनी होय. भाषेच्या ध्वनींना वर्ण म्हणतात. या वर्णांचा प्रयोग प्राय: ध्वनी आणि ध्वनि-चिन्ह दोहोंसाठी होतो. हे वर्ण भाषेच्या मौखिक आणि लिखित दोन्ही रूपांचे प्रतीक असतात. या वर्णांच्या समूहास 'वर्णमाला' असे म्हणतात.

ध्वनिशास्त्र आम्हास सांगते की कंठापासून निघणारे आमचे ध्वनी हे फुप्फुसापासून बाहेर निघणाऱ्या हवेमुळे उत्पन्न होतात. ध्वनीच्या सृष्टीमध्ये वाग्यंत्राचे विविध अवयव सक्रिय असतात. ध्वनींच्या उच्चारणाचा मुळ आधार आहे – मुख आणि नाकामधून निघणाऱ्या वायूचे अल्प घर्षण किंवा संघर्षण. हे वायु-घर्षण कधी संपूर्ण असते, कधी आंशिक तर कधी नाममात्रच.

सर्व वर्ण तोंडावाटे निघतात. फरंतु तोंडा (मुख) मध्ये पण कंठापासून ते ओष्ठपर्यंत भिन्न भिन्न अनेक स्थाने आहेत की ज्यांच्यामुळे वेगवेगळे वर्ण उच्चारित होतात. श्वसोच्छवास करताना एक तर श्वास फुप्फुसाद्वारे आत तरी ओढला जातो किंवा बाहेर सोडला जातो. हाच वायू जेव्हा श्वास नलिकेमधून निघून कंठापासून ते ओठापर्यंत एखाद्या उच्चारण अवयवा (वाग्यंत्र) द्वारे अवरूद्ध होतो, तेव्हा विशेष प्रकारची ध्वनी प्रकट होते. याला उच्चारण म्हणतात. ज्या स्थानापासून ज्या वर्णाचे उच्चार होते, त्यालाच त्या वर्णाचे उच्चारण-स्थान असे म्हणतात. ज्या वर्णांच्या उच्चारणामध्ये फुप्फुसपासून वायू अबाधपणे मुखापासून बाहेर निघतो, त्या वर्णांना स्वर म्हणतात; तर ज्या वर्णांच्या उच्चारणामध्ये फुप्फुसापासून निघणारा वायू मध्ये अपूर्ण किंवा पूर्ण स्वरूपात अवरूद्ध होऊन पुन्हा सोडला जातो आणि मुखावाटे बाहेर पडतो अशा वर्णांना व्यंजन असे म्हणतात. सारांश वर्णाक्षर उच्चारामध्ये कंठ, जिव्हा (अग्र, मध्य व पश्च भाग), तालु, दंत आणि ओष्ठ या वाकयंत्राची (अवयवांची) फार मोठी भूमिका असते.

पवित्र कुरआनमध्ये विविध कूटाक्षर समुच्चयामध्ये प्रयुक्त एकूण १४ वर्णाक्षरे अशी आहेत –

ى ه ن م ل ك ق ع ط ص س ر ح ا = एकूण १४ (कूट) वर्णाक्षरे अशी आहेत.

**गट – १)** आता समुच्चयांचे परीक्षण करू या.

यापैकी तीन वर्णाक्षरे एकल स्वरूपात उपस्थित होतात. हे सर्व फक्त एकच अध्यायात उपसर्ग स्वरूपात आलेले आहेत. वर्णाक्षरे आणि अध्याय असे आहेत :-

ص सॉद : सूरत (अध्याय) – ३८ सूरतु – सॉद

ق क़ाफ़ : सूरत (अध्याय) – ५० सूरतु – क़ाफ़

ن नून : सूरत (अध्याय) – ६८ सूरतुल् – क़लम

**गट – २)** दोन वर्णाक्षरांचे समुच्चय खाली दर्शविल्याप्रमाणे दहा अध्यायांमध्ये आलेले आहेत. यांपैकी तीन प्रत्येकी एकदाच आलेली आहेत, परंतु चौथे समुच्चय हे सात एका पाठोपाठ एक अध्यायामध्ये उपस्थित आहे.

طٰهٰ ताहा : सूरत (अध्याय) – २० सूरतु–ताहा

طٰسٓ ता सीन : सूरत (अध्याय) – २७ सूरतु–न्नम्ल्

يٰسٓ या सीन : सूरत (अध्याय) – ३६ सूरतु–यासीन

حٰمٓ हा मीम : सूरत (अध्याय) – ४० सूरतुल्–मोमिन

सूरत (अध्याय) – ४१ सूरत–हा–मीम सिज्दः

सूरत (अध्याय) – ४२ सूरतु–श्शूरा

सूरत (अध्याय) – ४३ सूरतु–ज़्ज़ुखरुफ़

सूरत (अध्याय) – ४४ सूरतु–द्दुख़ान

सूरत (अध्याय) – ४५ सूरतुल–जासियः

सूरत (अध्याय) – ४६ सूरतुल–अहकाफ़

लक्षात घ्या की सूरत–४२ मध्ये कूटाक्षरांचे एक समुच्चय द्वित्व आहे, दोनचा एक आणि त्यानंतर तीनचा एक समुच्चय आहे. खाली पाचच्या समुच्चय गटामध्ये पहा.

**गट – ३)** तीन अक्षरांचे तीन अक्षर–समूह आहेत. ते पुढील १३ अध्यायांमध्ये आढळतात.

طٰسٓمٓ ता सीन मीम
: सूरत (अध्याय) – २६ सूरतु–श्शोअरा
: सूरत (अध्याय) – २८ सूरतुल–क़सस्

الٓمٓ आलिफ़ लाम मीम
: सूरत (अध्याय) – २ सूरतुल–बकरः
: सूरत (अध्याय) – ३ सूरतु–आले–इम्रान
: सूरत (अध्याय) – २९ सूरतुल–अन्कबूत
: सूरत (अध्याय) – ३० सूरतुर्रूमः
: सूरत (अध्याय) – ३१ सूरतु–लुक्मान
: सूरत (अध्याय) – ३२ सूरतु–स्सिज्दा

الٓر आलिफ़ लाम रा
: सूरत (अध्याय) – १० सूरतु–यूनुस
: सूरत (अध्याय) – ११ सूरतु–हूद
: सूरत (अध्याय) – १२ सूरतु–यूसुफ़
: सूरत (अध्याय) – १४ सूरतु–इब्राहीम
: सूरत (अध्याय) – १५ सूरतुल–हिज्र

**गट – ४)** चार अक्षरांचा समुच्चय दोनदा, प्रत्येकी एकाच वेळेस आलेला आहे.

الٓمٓصٓ आलिफ़ लाम मीम सॉद : सूरत (अध्याय) – ७ सूरतुल – आअराफ़

الٓمٓر आलिफ़ लाम मीम रा : सूरत (अध्याय) – १३* सूरतु – र्रअद (*लक्षात असू द्या की या अध्यायाच्या पूर्ववर्ती तीन आणि परवर्ती दोन सूरा (अध्याया) मध्ये الٓر हे त्रिअक्षरी कूट आहे.)

**गट – ५)** शेवटी पाच अक्षरांचा समुच्चय उरतो, पैकी प्रत्येकी फक्त एकदाच आलेला आहे.

كٓهٰيٰعٓصٓ काफ़ हा या ऐन सॉद : सूरत (अध्याय) – १९ सूरतु–मर्यम

حٰمٓ عٓسٓقٓ हा मीम–ऐन सीन क़ाफ़ : सूरत (अध्याय) – ४२ सूरतु–श्शूरा

सूरत ४२ मध्ये حٰمٓ आणि عٓسٓقٓ या कूटाक्षरांना (दोन) वेगळ्या श्लोकांमध्ये ठेवण्यात आले आहे. या दृष्टीने पाहता त्यांना दोन वेगळे समुच्चय मानण्यात येईल. पहिला समुच्चय हा दोन – अक्षरी समुच्चयाच्या गटामध्ये नोंदविला गेला आहे.

**अवलोकन**

या गणितीय विश्लेषणामुळे काही तथ्ये ठळकपणे समोर येतात. 'मुक़त्तेआत' च्या आंतरिक अर्थाशी ती किती प्रमाणात निगडित असतील याची कल्पना करवत नाही.

एका मालिकेमध्ये सलगपणे येणारे कूटाक्षर–समूह हे लक्ष वेधून घेतात. उदाहरणार्थ, حٰمٓ हे कूटाक्षर समूह सूरत ४० पासून ते ४६ पर्यंत अशा सात सलग अध्यायांमध्ये आलेले आहे. सूरत १० पासून १५ पर्यंत الٓر हे कूटाक्षर–समूह सहा सलग अध्यायांमध्ये आलेले आहे; परंतु त्यांपैकी एकामध्ये (सूरत–१३) ते थोडा बदल करून الٓمٓر या स्वरूपात आल्यामुळे ते الٓمٓر या मालिकेशी जुळले जाते. الٓمٓ मालिकेमध्ये सहा सूरां (अध्यायां) चा समावेश आहे. त्यांची सुरुवात अध्याय २ आणि अध्याय ३ शी होते. जवळ जवळ कुरआनचा येथूनच आरंभ होतो, आणि चार सलग अध्याय क्र. २९ ते ३२ मध्ये ही मालिका समाप्त होते. अध्याय १ मध्ये कुरआनची एक सामान्य प्रस्तावना मंगलाचरण स्वरूपात असल्यामुळे, आणि पहिला 'सिपारा' (खंड) हा, अध्याय–२ चे पहिले श्लोक الٓمٓ या नावाने ओळखला जातो. म्हणून प्रत्यक्ष कुरआनची सुरुवात अध्याय–२ पासून मानण्यास काहीच हरकत नाही. طٰسٓمٓ हे उपसर्ग स्वरूपामध्ये अध्याय २६ आणि अध्याय २८ शी जोडले गेले आहे, परंतु या दोहोंमधील अध्याय–२७ चे समुच्चय طٰسٓ आहे. यास अक्षरलोप स्वरूपात मानण्यात येईल किंवा طٰسٓمٓ यास طٰسٓ चे परिवर्धित (वाढीव) रूप म्हणून मानण्यात येईल. पुन्हा येथे असा प्रश्न उपस्थित होतो की الٓمٓ, حٰمٓ आणि طٰسٓمٓ मधील م चा अभिप्राय असाच असेल काय अथवा प्रत्येक बाबतीत याचा निराळा अर्थ असेल काय? सामान्य विधान स्वरूपात आपण म्हणू की सहाच्या तीन मालिका आहेत, आणि तीनची एक मालिका आहे, आणि इतर सर्व एकत्र स्वरूपात दिसून येतात.

एक समान आद्याक्षर असलेल्या सूरां (अध्यायां) मध्ये एक समाईक घटकाची सयुक्तिक रीतीने आपण वाट पाहिली पाहिजे, आणि इतर (दुसरी) आद्याक्षरे असलेल्या सूरांचा घटक हा वेगळा असला पाहिजे. जेथे जेथे त्रोटक अक्षरे आलेली आहेत, अशा सर्व ठिकाणी कुरआन अथवा ग्रंथाचा काहीसा उल्लेख आहे. अध्याय २९ – सूरतुल्–अन्कबूत, अध्याय ३० – सूरतुर्रूम आणि अध्याय ६८, सूरतुल्–नून (सूरतुल्–क़लम) या तीन 'सूरा' (अध्यायां) च्या बाबतीत ठामपणा अपवाद ठरवितो. परंतु सूक्ष्म अवलोकनाने आपणास असे आढळून येईल की या 'सूरा' पण अपवाद नाहीत. अध्याय २९ : २७ मध्ये प्रेषित इब्राहीमच्या वंशामध्ये ग्रंथ बाकी असल्याबद्दलचा निर्देश आहे. (संदर्भ आहे), आणि नंतर एक संपूर्ण विभाग (रुकू क्रमांक ५) ग्रंथाविषयी आहे, पूर्ववर्ती ग्रंथांमध्ये आणि कुरआनमध्ये दिव्य प्रकटनाच्या सातत्याचा विशेष संदर्भ आहे. (२९:४५–५१)

अध्याय ३०:५८ मध्ये कुरआनचा स्पष्ट उल्लेख आहे, आणि या 'सूरा' संपूर्ण युक्तिवाद निसर्गामध्ये ईश्वरी ''संकेत'' पुरेपूर भरलेले असल्याबद्दल आहे. (३०:२०-२७) निसर्गामधील ईश्वराच्या ''खुणा'' आणि त्याचे कुरआनमधील दैवी प्रकटन यामध्ये फार घनिष्ट संबंध असल्याचे निदर्शनास येते. अध्याय ६८ मध्ये पहिलेच श्लोक लिखाणाचे साधन असलेल्या लेखणीच्या विषयाने सुरू होते. दैवी संदेश खंबीरपणे जाहीर करण्यास मुस्तफ़ा साधन असलेल्या लेखणीच्या विषयाने सुरू होते. दैवी संदेश खंबीरपणे जाहीर करण्यास मुस्तफ़ा यांना बजावून सांगितले जाते आणि तो सर्व जगांसाठी हितोपदेश असल्याचे घोषित करण्यास सांगितले जाते (६८:५२) आणि याने अध्याय समाप्त होतो.

या संदर्भात हे सामान्य विचार आहेत.

**कूटाक्षरां (गूढाक्षरां) चे गणितीय चमत्कार**

''आणि आम्ही तुम्हास फारच थोडे ज्ञान दिले आहे.'' या ईश्वर-वचनानुसार मानवास सर्वच गोष्टींचे ज्ञान असेलच असे नाही. काही बाबतीत मानवी बुद्धी हतबल होते. अशा वेळेस श्रद्धेशिवाय पर्याय नसतो. सर्वज्ञ असल्याचे मानवाचा दावा फोल ठरतो. तर्कापेक्षा अनुमानावर भिस्त ठेवावी लागते. म्हणूनच 'वस्तुस्थिती किंवा खरे काय ते देवच जाणो !' असे म्हणण्याची इस्लामी प्रथा आहे. तरी पण मानवी बुद्धी ही नूतन शोधांचा पाठलाग करीतच असते. याची फलनिष्पत्ती म्हणजे आधुनिकतम वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात्मक नवीन शोध ! या शोधांच्या अपत्यापैकी एक म्हणजे 'कंप्युटर' अर्थात संगणक - महासंगणक होय. संगणकांच्या तत्त्वांच्या आधारे काही सिद्धातांनी कौराणिक कूटाक्षरांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांमध्ये इस्लामी विद्वानांमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रख्यात असे सर्वात अग्रणी नाव आहे, अहमद दीदात यांचे. त्यांनी प्रस्तुत केलेले कौराणिक कूटाक्षरांचे गणितीय आणि संख्याशास्त्रीय असे काही चमत्कार पुढे नोंदण्यात येत आहेत. प्राप्त गणितीय आणि संख्याशास्त्रीय तंतोतंत उत्तरावरून त्यांनी असे सिद्ध करून दाखविले आहे की पवित्र कुरआन हे अपौरूषेय असून ती ईश्वराचीच वाणी आहे.

या संदर्भात अहमद दीदात प्रणीत गणितीय आणि संख्याशास्त्रीय चमत्कार[८७] सविस्तर मांडण्यात येत आहेत-

**१९ (एकोणीस) या संख्येची कूटाक्षरांमधील किमया आणि कमाल !**

अल्लाह (परमेश्वर) चे पवित्र कुरआनमध्ये निवेदन आहे - ''अलैहा तिसअत अशर'' - ७४:३० म्हणजेच ''त्यावर एकोणीस (१९) (पहारेकरी तैनातीस) होत.'' **किंवा** ''एकोणीस (१९) कर्मचारी त्याच्यावर नियुक्त आहेत.'' **अथवा** ''त्यावर एकोणीस (१९) (देवदूत) आहेत.''

आपल्या पवित्र ग्रंथाचा आरंभ ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.'' म्हणजेच ''अल्लाहच्या नावाने, जो कृपाशील (व) दयाळू आहे.'' (मी आरंभ करतो). या स्तवन-विधानाने करणारा परमेश्वर हा प्रशंसित गुणधारी परमसत्ता स्वरूप आहे. आणि उपरोक्त स्तवन-विधानाचे मुकुट घालण्यात आले आहे, याने सुशोभित करण्यात आले आहे. **'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.'** याचे अरबी लिप्यंतरण करून त्याची अक्षरे मोजल्यास आपणास असे आढळून येईल की ती एकूण बरोबर (तंतोतंत) एकोणीस (१९) भरतात. जसे -

بسم الله الرحمن الرحيم

ب س م ا ل ل ه ا ل ر ح م ن ا ل ر ح ي م

١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١ ١

१९ १८ १७ १६ १५ १४ १३ १२ ११ १० ९ ८ ७ ६ ५ ४ ३ २ १

'अलैहा तिसअत अशर' अर्थात 'त्यावर एकोणीस आहेत.' – ७४:३०. हे स्पष्टपणे सिद्ध होते.

उपरोक्त एकोणिस (१९) वर्णांक आणि स्तवन–विधानाचे प्रयोजन आणि त्यांचे रहस्य जाणून घेण्यासाठी आपणास यांचे संदर्भ जाणून घेणे आवश्यक ठरते. प्रथम एकोणीस या वर्णांकाची उकल करण्याचा प्रयत्न करू या.

सर्वप्रथम लक्षात ठेवण्याची गोष्ट ही आहे की एकूण एक सर्व कूटाक्षरांचे वर्णांकशास्त्रीय मूल्यांस १९ ने भाग दिल्यास निःशेष भाग जातो. बाकी काहीच उरत नाही. दुसरे असे की पवित्र कुराणाचे एकूण अध्याय ११४ आहेत. यास १९ ने भाग दिल्यास निःशेष भाग जातो. बाकी शून्य उरतो. शिवाय 'त्यावर १९ आहेत'. हे परमेश्वराचे विधान सत्य असल्याचे आढळून येईल, कारण जरी उपरोक्त स्तवन–विधान प्रत्यक्षात ११३ अध्यायांवर असले व नवव्या (९ व्या) अध्यायाच्या शीर्षस्थानी नसले (त्यामुळे परमेश्वराच्या सत्य वचनास बाधा उत्पन्न होते, कारण अध्याय–११४; मात्र स्तवन–विधान–११३. त्यामुळे १ ची कमी येते.) तरी त्याची भरपाई सत्तावीसाव्या अध्यायाच्या श्लोक क्रमांक तीस (२७:३०) मध्ये प्रयुक्त उपरोक्त स्तवन–विधानाने होते. म्हणून एकूण अध्याय ११४; तर एकूण स्तवन–विधान ११४ च भरतात. अशा प्रकारे परमेश्वराचे विधान की, 'त्यावर एकोणीस आहेत.' हे खरे ठरते, सत्य सिद्ध होते. हे थोडे सविस्तर पाहण्यास मुळीच हरकत नाही.

पवित्र कुराणाच्या प्रत्येक अध्यायावर उपरोक्त १९ अक्षरी स्तवन–विधान शीर्षस्थानी ठेवणे सोपे आहे, मात्र त्या विधानांतर्गत घटक स्वरूप असलेल्या प्रत्येक शब्दाची संपूर्ण ग्रंथामध्ये असलेली (आलेली) आवृत्ती–स्ख्या ही १९ या संख्येची पूर्ण गुणाकार असल्याचे आढळून येईल. आता आपण उपरोक्त स्तवन–विधानामधील संमिलित शब्दांना वेगवेगळे करून त्यांची स्वतंत्रपणे ग्रंथांतर्गत एकूण आवृत्ती – संख्या नोंदवून त्या १९ या संख्येच्या पूर्ण गुणाकार कशा प्रकारे सिद्ध होतात हे पाहू या.

'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम.'

या स्तवन विधानामध्ये एकूण चार शब्द समाविष्ट आहेत. तेव्हा उपरोक्त योजनेचे स्वरूप असे होईल –

| क्रमांक | घटक शब्द | ग्रंथामधील एकूण आवृत्ती–संख्या | १९ या संख्येशी गुणोत्तर |
|---|---|---|---|
| १ | इस्म | १९ | १९ × १ = १९ |
| २ | अल्लाह | २६९८ | १९ × १४२ = २६९८ |
| ३ | (अल्) रहमान | ५७ | १९ × ३ = ५७ |
| ४ | (अल) रहीम | ११४ | १९ × ६ = ११४ |

उपरोक्त कोष्टकाचे अवलोकन केल्यास आपणासमोर हे तथ्य उघडकीस येईल की प्रत्येक घटक शब्दाच्या, ग्रंथामधील एकूण आवृत्ती – संख्येस, '१९' या 'गुरू–किल्ली' संख्येने भाग दिल्यास त्याचा भागाकार नि:शेष स्वरूपातच येईल. बाकी शून्य उरणार, आणि गुणोत्तर पूर्ण होणार. याला तुम्ही '१९' या संख्येचा 'कमाल' म्हणणार नाही तर आणखी काय म्हणणार ! म्हणून 'अलैहा तिसअत अशर' म्हणजेच 'त्यावर एकोणीस आहेत.'– ७४:३० हे सिद्ध होते.

**एकोणीस (१९) च का? याचे स्पष्टीकरण व विवेचन**

हे एकोणीसच का, या संदर्भात पवित्र कुराणामधील याच अध्यायामधील श्लोक २७ ते ३१ हे आमच्या उपरोक्त जिज्ञासेचे निराकरण करणारे ठरणार आहेत म्हणून ते श्लोक असे आहेत –

''आणि (हे पैगंबरा !) तू काय समजलास की नरकाग्नी आहे तरी काय ? तो (फडशा केल्याशिवाय) राखून (शिल्लक) ठेवणार नाही व (भस्म केल्याखेरीज) सोडणार नाही (आणि तो मनुष्याच्या) शरीरत्वचेस (मारून) होरपळून टाकील. त्यावर एकोणीस (पाहरेकरी तैनातीस) होत. आणि आम्ही नरकाग्नीचे पाहरेकरी (मनुष्ये नव्हे तर) देवदूतच बनविले आहेत. आणि त्यांची (एकोणीस) ही गणतीही यासाठी ठरवली आहे, की जे लोक (पुनरूत्थानास) नाकारतात त्यांची (या गोष्टींच्याद्वारे) परीक्षा (कसोटी) व्हावी; (आणि) ग्रंथधारक व श्रद्धावंतांना कोणतीही शंका राहू नये, आणि ज्या लोकांच्या मनात (दांभिकपणाचा) रोग आहे व जे (उघड उघड) नास्तिक आहेत त्यांनी (ऐकून) म्हणावे की असल्या गोष्टींचा दृष्टांत सांगण्यात परमेश्वराचा कायउद्देश आहे? अशा प्रकारे अल्लाह ज्याला इच्छितो त्याला पथभ्रष्ट करतो आणि ज्याला इच्छितो मार्गदर्शन प्रदान करतो. आणि तुझ्या पालनकर्त्याच्या (सृष्टीच्या) लष्करांची स्थिती त्याच्याशिवाय कोणीच जाणीत नाही. आणि हे अन्य काही नव्हे तर केवळ मानवासाठी हितोपदेश आहे.'' – ७४:२७–३१.

**भाष्य :** नास्तिकांस, एकोणीस देवदुतांचे ठरविणे ऐकून आश्चर्य झाले (वाटले); की एकोणीसच का? पण वास्तविक पाहता ह्या गोष्टी ईश्वरी गूढांपैकी होत. यात जास्त माथेफोड करणे व्यर्थ. काही प्रयोजन असेल की त्याचे सेवकांस जाहीर (प्रकट) करणे योग्य समजले गेले नसेल. पण ग्रंथधारी लोक म्हणजे यहूदी व ख्रिस्ती असल्या गोष्टी मान्य करण्यास कचरत नाहीत. कारण त्यांच्या ग्रंथात अशा पुष्कळ गोष्टी आहेत की, ज्या ईश्वरी आदेश समजल्या जातात; व ते त्यांचा विश्वास ठेवतात. मात्र दांभिक आणि नास्तिक सर्वच गुप्त गोष्टी जाणू पाहतात ही त्यांची चूक होय.

''नरकाग्नी आहे तरी काय?'' ..... येथपासून ते ''तुझ्या पालनकर्त्याच्या (सृष्टीच्या) लष्कराची स्थिती त्याच्याशिवाय कोणीच जाणत नाही.'' पर्यंतचा सर्व मजकूर हरकतीचा मुद्दा म्हणून आहे. भाषणाच्या मध्येच वक्तव्यक्रम खंडित करून आक्षेप घेणाऱ्यांच्या उत्तरादाखल तो सांगणयात आला आहे. आक्षेप घेणाऱ्यांनी अल्लाहचे प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या तोंडाने हे ऐकून की नरकाच्या पाहरेकऱ्यांची संख्या केवळ १९ असेल, याची थट्टा उडविणे सुरू केले होते. त्यांना ही गोष्ट मोठी विचित्र वाटली की एकीकडे आम्हाला असे सांगितले जात आहे की आद्य प्रेषित आदम यांच्या काळापासून प्रलयापर्यंत जगात जितक्याही मनुष्यांनी द्रोह आणि महापातके केलेली आहेत; ते नरकात टाकले जातील व दुसरीकडे आम्हाला असे कळविले जात आहे की इतक्या मोठ्या नरकात इतक्या असंख्य प्रमाणातील माणसांवर प्रकोप करणाऱ्यांसाठी १९ पाहरेकरी – कर्मचारी – देवदूत

नियुक्त असतील. मात्र ग्रंथधारक आणि श्रद्धावंतांना देवदूतांच्या असामान्य शक्तीची जाणीव आहे. म्हणून त्यांना याबाबतीत कोणतीही शंका असू शकत नाही की १९ देवदूत नरकाची व्यवस्था राखण्यासाठी पुरेसे आहेत.

मानवासाठी बोध किंवा हितोपदेश म्हणजे लोक नरकाग्नीचा अहवाल ऐकून बोध धरतील व देवदुतांच्या १९ या गणतीत शंका उपस्थित करून वितंडवाद करणार नाहीत.

**१९ (एकोणीस) ची आणखी एक ढोबळ कमाल**

पृथ्वीतलावर पवित्र कुरआनच एक असा ग्रंथ आहे की जिच्या अनेक अध्यायांच्या आरंभी त्रोटक किंवा कूट अक्षरे संयुक्त (संबद्ध) केली गेली आहेत. यांना अरबी भाषेमध्ये 'हुरूफ़े मुक़त्तेआत' म्हटले जाते, याचा अर्थ आहे संक्षिप्त त्रोटक अक्षरे. गूढाक्षरांचे अर्थ वर वर स्पष्ट नसतात.

अरबीची एकूण वर्णाक्षरे २८ आहेत. यापैकी निम्मे म्हणजे १४ वर्णाक्षरांपासून 'मुक़त्तेआत' म्हणजे कूटाक्षरांची निर्मिती केली गेली आहे. या १४ वर्णाक्षरांच्या साहाय्याने विविध जोडण्यांनी कूटाक्षरे बनविली गेली आहेत. पवित्र कुरआनच्या एकूण २९ अध्यायांमध्ये यांचा प्रयोग झाला आहे. जर आपण १४ वर्णाक्षरे आणि १४ कूटाक्षरे यांना संयुक्त करून, २९ अध्यायांना जोडल्यास पुढील नकाशा तयार होतो. :

| | | |
|---|---|---|
| १) | प्रमुख वर्णाक्षरे | १४ |
| २) | कूटाक्षरे ('मुक़त्तेआत') | १४ |
| ३) | एकूण अध्याये की ज्यांमध्ये कुटाक्षरे आहेत | २९ |
| | **एकूण बेरीज** | **५७** |

वरील तीन्ही मदची बेरीज केल्यास ५७ येते. या आकड्यास १९ ने नि:शेष भाग जातो.

कूटाक्षरांचे सिंहावलोकन केल्यास आपणास असे आढळून येईल की काही कूटाक्षरे ही दोन अक्षरांनी, काही तीन अक्षरांनी, काही चार अक्षरांनी तर काही पाच अक्षरांनी संयुक्त आहेत. मात्र एकल स्वरूपात तीन कूटाक्षरे आहेत. ती आहेत – नून (न), क़ाफ़ (क़) आणि सॉद (स). एकाक्षरी कूटाक्षर असलेल्या अध्यायांपैकी आपण ६८ वे अध्याय सूरतुल्-कलम हे निवडू शकतो. दिव्य प्रकटन स्वरूप या नात्याने कूटाक्षरी अध्यायांमध्ये हे पहिले (प्रथम) अध्याय आहे आणि क्रमांकाच्या दृष्टीने ते ६८ वे आहे. या सूरतुल-क़लमची सुरुवात नून (न) च्या संख्येस का बरे मोजू नये ! नून (न) हे अक्षर सूरतुल्-क़लमचे आद्य (प्रथम) अक्षर आहे. मोजल्या नंतर ते अक्षर त्या प्रकरणामध्ये १३३ वेळा आल्याचे आढळते. मग १३३ या संख्येस १९ ने भागल्यास नि:शेष भाग जातो. बाकी शून्य उरते. १९×७=१३३. आहे की नाही गंमत!

याशिवाय आणखी दोन अध्याये एकल एकाक्षरी कूटाक्षराने आरंभ होणारी आहेत. ही ५० सूरतु-काफ़ आणि ३८. सूरतु-सॉद आहेत. याशिवाय दोन अध्याये अशी पण आहेत की ज्यामध्ये 'क़ाफ़' हे काहीशा संयुक्त प्रमाणात आलेले आहे. ते आहे अध्याय-४२. सूरतु-श्शूरा. यामध्ये पंचाक्षरी कूट अक्षरे आढळतात. हा अध्याय हा मीम-ऐन-सीन क़ाफ़ (ह म – अ स क़) या कूटाक्षरांनी सुरू होतो. याचा शेवट क़ाफ़ (क़) ने होतो. याची एकूण संख्यात्मक आवृत्ती ५७० आहे आणि याचा १९ ने भागल्यास (१९×३०=५७०) असा नि:शेष भाग जातो.  बाकी शून्य उरते. आमच्या पवित्र ग्रंथकर्त्याच्या बाणाचे लक्ष्य साधले गेले !

आता आपण फक्त 'क़ाफ़' च्या बाबतीत विचार करू, जे अध्याय-४२ चे हा मीम-ऐन सीन क़ाफ़ आणि अद्याप ५० क़ाफ़चे काहीसे संयुक्त आहे. नैपुण्याची गरज नसताना कशासाठी इतका आटापीटा करायचा ! म्हणून 'क़ाफ़' चीच चर्चा करून निष्कर्षाची अचूकता पडताळावी. कोणताही इसम हा स्वत: व्यावहारिकपणे या चमत्कारास पाहू शकतो आणि या गोष्टीचे सत्यापन करू शकतो की हे महान कुरआन पौरूषेय नसून ईश्वरनिर्मित आहे ! या थक्क करणाऱ्या चमत्कारमय आश्चर्यकारक वास्तवाच्या अनुभूतीसाठी तुम्हास न अरबी भाषा जाणण्याची (येण्याची) आवश्यकता आहे न कोणत्याच प्रकारचे विचार, अनुमान आणि नैपुण्याची गरज आहे, अपितु फक्त 'क़ाफ़' (ق) या वर्णक्षराचे एक डोके आणि त्यावरीस दोन बिंदू मोजलात तर हे ५७ भरतील (होतील). (१९×३=५७) आणि अध्याय-४२ सूरतु-श्शूरामध्ये हा मीम-ऐन सीन क़ाफ़ (ह म - अ स क़) हे पंचाक्षरी कूट आहे. यामध्ये पण ५७ क़ाफ़ असतील (असणार). (१९×३=५७). काय एखादे माणूस किंवा यंत्राने असे आश्चर्यकारक कार्य संपन्न होणे शक्य आहे !

उपरोक्त अध्याय क्रमांक ४२ आणि ५० मधील दोहोंचे मिळून 'क़ाफ़' (ق) ची गणती (५७+५७)= ११४ आहे. (१९ ×६ = ११४). ق (क़ाफ़) चा अभिप्राय 'कुरआन' शी आहे असे जरूरी मानल्यास ते समर्पक आणि सार्थक वाटते यासाठी की पवित्र कुराणाची ११४ प्रकरणे आहेत. जणू की 'कुरआन' चा लेखक आम्हास सांगतो की त्याचे प्रत्येक प्रकरण कुरआन आहे आणि कुरआन शिवाय काहीच नाही ! या दोन्ही प्रकरणामधील ق (क़ाफ़) ची गणनी करण्यामध्ये (मोजण्यामध्ये) फक्त काही मिनिटांचाच अवकाश लागेल आणि तुम्हास महान कुरआनचे आश्चर्यजनक स्वरूप माहित होऊन जाईल.

आता आपण तिसरे एकाक्षरी कूटाक्षर सॉद ص घेऊ या. हे सॉद या प्रकरणाशिवाय इतर दोन प्रकरणांमध्ये (सातवे आणि एकोणीसावे) काहीशा संयुक्त स्वरूपामध्ये आढळते. जर आपण तीन प्रकरणांच्या सॉद या अक्षरास मोजले तर त्या सर्वांची एकूण बेरीज १५२ येते आणि १५२ हा आकडा (अंक) १९ ने पूर्ण भाग जाणारा आहे ! (१९×८=१५२). जणू येथे पण एकोणीसचेच राज्य दिसून येते ! आणि ''अलैहा तिस्‌अत अशर'' चेच (म्हणजे 'त्यावर एकोणीस (पहारेकरी तैनातीस) आहेत.)' तत्त्वज्ञान कार्यरत असल्याचे दिसून येते.

परंतु येथे मी आपणास या गोष्टीची आठवण करून देऊ इच्छितो की आमचा ग्रंथकर्ता (परमेश्वर) हा फक्त एकाक्षरी कूटवर्णांमध्येच मनोरंजक दिसून येत नाही, अपितु अध्याय. क्रमांक ७ आणि १९ मध्ये क्रमश: चार आणि पाच अक्षरी कूटाक्षरे आढळतात. या चार अक्षरी आणि पंचाक्षरी कूटांमध्येपण तोच आत्मा कार्यरत दिसून येतो. जर यांची संख्या व गणती संगणकांच्या हवाली केली तर तुमच्या आश्चर्यास सीमाच उरणार नाही.

सॉद ص चा नकाशा अशा प्रकारे बनतो.

| अध्याय क्रमांक | कूटाक्षरे | संयुक्त वर्णाक्षरे | संख्या |
|---|---|---|---|
| ७ | अ ल म स المص | ص | ९८ |
| १९ | क ह य अ स كهيعص | ص | २६ |
| ३८ | स ص | ص | २८ |

(१९ ×८ = १५२) एकूण बेरीज : १५२

∴ ''अलैहा तिसअत अशर'' : त्यावर एकोणीस आहेत. प्रमाण १ : ८

प्रकरण क्रमांक ७ الٓمّٓصٓ चा नकाशा अशा प्रकारे बनतो :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | वर्णाक्षर ا | ची संख्या | २५७२ |
| २) | वर्णाक्षर ل | ची संख्या | १५२३ |
| ३) | वर्णाक्षर م | ची संख्या | ११६५ |
| ४) | वर्णाक्षर ص | ची संख्या | ००९८ |

एकूण बेरीज = ५३५८ (१९ × २८२ = ५३५८) प्रमाण १ : २८२

आणि प्रकरण क्रमांक १९ كٓهٰيٰعٓصٓ चा नकाशा असा बनतो :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | फक्त ک | ची संख्या | १३७ |
| २) | फक्त ه | ची संख्या | १६८ |
| ३) | फक्त ی | ची संख्या | ३४५ |
| ४) | फक्त ع | ची संख्या | १२२ |
| ५) | फक्त ص | ची संख्या | ०२६ |

एकूण बेरीज = ७९८ (१९ × ४२ = ७९८) प्रमाण १ : १४२

प्रकरण क्रमांक ७ अर्थात الٓمّٓصٓ मध्ये आपणास सर्वसमर्थ परमेश्वराच्या तत्त्वदर्शितेचे आणि त्याचे गहनतम गुह्य आणि द्रष्टेपणाची साक्ष पटते. ही बाब पवित्र कुराणास दिव्य आणि अपौरूषेय ग्रंथ सिद्ध करण्यास पुरेशी आहे, आणि हा सुस्पष्ट आणि योग्यतम पुरावा आहे. तो दिव्य संकेत असा आहे – ''ब स्स त त न'' (खूप धष्टपुष्ठ)'' بَصۜطَةً ''

या सातव्या अल् आअ़राफ़ प्रकरणाच्या ६९ व्या श्लोकामध्ये प्रयुक्त शब्द ''ब स्स त त न'' चे चांगले लक्षपूर्वक निरीक्षण करा. हे ب ص ط आणि ت या वर्णाक्षरांशी लिहिले जाते. परंतु याचे वर्णाक्षर ص च्या वर (डोक्यावर) एक लहान आकारामध्ये ''س'' हा वर्ण अश स्वरूपात जोडला गेला आहे. याचा अर्थ असा आहे की जरी येथे ص लिहिला गेला आहे, परंतु उच्चार मात्र س चेच केले पाहिजे. अरबीसारख्या समृद्ध भाषेमध्ये, हिच्या हजारो शाखा आहेत. कुठेच ص पासून بصطة चा (सारखा) शब्द आढळत नाही. अरबी भाषेमध्ये ध्वनिशास्त्राची सर्व वैशिष्ट्ये आढळतात. यामध्ये प्रत्येक ध्वनीसाठी एक विशिष्ट वर्ण आढळतो. शिवाय कंठाग्रतेकडे विशेष लक्ष दिले जाते. इंग्रजी भाषेमध्ये knife लिहिले जाते, परंतु 'नाइफ' असे उच्चारले जाते. परंतु अरबी भाषा अशा प्रकारच्या दोषांपासून मुक्त आहे. येथे प्रत्येक ध्वनीसाठी एक विशिष्ट वर्णाक्षर निर्धारित आहे.

परंतु तुम्ही प्रकरण क्रमांक २ : सूरतुल्-बकरःचे श्लोक क्रमांक २४७ वर सूक्ष्म लक्ष द्याल तर तुम्हास हे जाणून आश्चर्य होईल की येथे بسطة च लिहिले गेले आहे म्हणजे س चा प्रयोग झाला आहे. ص चा नव्हे.

س आणि ص च्या प्रयोगामुळे अर्थामध्ये कोणताच फरक पडत नाही. जसे इंग्रजीमध्ये recognize लिहा, किंवा recognise लिहा; अर्थामध्ये काहीच फरक होत नाही, तर मग का बरे जिब्राईल या महादूताने प्रेषित मुहम्मद[स.] यांना उपरोक्त ''ब स् त त न'' या शब्दास ''बस्‌तन' (स) या स्वरूपामध्ये लिहिण्यास सांगितले असावे?

हजार वर्षांपेक्षा अधिक कालावधी पासून पवित्र कुरआनचे लिखाण हातानेच होत असे. त्या काळी हस्तलेखनाचाच प्रचार होता. मुद्रणयंत्रे नव्हती. हस्तलेखक लिहीत. प्रत्येक हस्तलेखक जेव्हा अध्याय क्रमांक २ चे, २४७ वे श्लोक लिहीत असे तेव्हा त्यामधील بسطةً हा शब्द त्याच स्वरूपात निक्षून लिहीत असे. بصطةً या स्वरूपात लिहिण्याची कोणाचीही हिम्मत झाली नाही. जर एखाद्या विद्वानाने आपल्या विद्वत्तेच्या बळावर शुद्ध लिहिण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार अरबीच्या मूळ लेखनशैलीनुसार लिहिले असते तर आज आपणास ص या वर्णाची संख्या एकाने कमी भरलेली आढळली असती, आणि ص सॉद चे सातवे, एकोणीसावे आणि अडतीसावे या तिन्ही अध्यायांमधील ص बेरीज १५२ न होता, १५१ भरली असती आणि १५१ या संख्येस १९ ने नि:शेष भाग गेला नसता, परंतु आपण पाहतो की अत्यंत चातुर्याने ص ची संख्या अर्थात गणती १५२ च ठेवण्यात आली आहे, जेणे करून १९ या संख्येचे 'गुरूकिल्ली' हे पद कायम राहून जावे.

आम्ही येथे س आणि ص या दोन्ही वर्णविन्यासाचे श्लोक नोंदवित आहोत. ते लक्षपूर्वक पहा –

१)''क़ाल अिन्नल्लाहस्तफ़ाहु अलैकुम व ज़ादह् **बस्ततन्** फ़िलअिल्मि वल जिस्मि'' – २:२४७.

२)''वज़ुरू! अिज़् ज़अलकुम ख़ुलफा।अ मिंबऽदि कौमि नूहिंव्व ज़ादकुम् फ़िलख़ल्कि **बस्ततन्** (स)'' – ७ : ६९

**भाषांतर**

१) ''त्यावर प्रेषित उत्तरले, अल्लाहने त्यास तुमच्यापेक्षा श्रेष्ठ ठरवून निवडले आहे आणि (त्याने) त्याच्या ज्ञानांत व शारीरिक (सामर्थ्यातही) खूपच वाढ केली आहे.'' – २:२४७.

२) ''(अल्लाहने नूह जनसमूहानंतर) तुम्हाला उत्तराधिकारी बनविले आणि शरीराने चांगले धडधाकट बनविले.'' – ७: ६९.

पवित्र कुरआनच्या ज्या प्रत्येक अध्यायामध्ये जी कूटाक्षरांनी सुरू होते हेच चातुर्य कार्यरत असलेले दिसून येईल की वर्णाक्षरांना अध्यायांतर्गत मोजून त्यांना १९ या संख्येने भाग दिल्यास भागाकार हा नि:शेष येईल, त्यामध्ये कधीच बाकी उरणार नाही. इतकी काटेकोर जागरूकता बाळगण्यात आलेली आहे. परिणामी १९ या गुरूकिल्ली कूटाक्षराची किमया मांडणारा स्वत: सर्वशक्तिमान सर्वज्ञ अल्लाहच आहे; आणि या खेळाच्या संरक्षणाची हमीची जबाबदारी स्वत:वर घेतली आहे. ही हमी त्याच्याच शब्दांत पहा –

''नि:संशय आम्हीच कुराण प्रकटिले आणि निर्विवाद आम्हीच त्याचे संरक्षकही आहोत.'' – १५:९

पवित्र कुराणांतर्गत कूटाक्षरांचे गणितीय व संख्याशास्त्रीय चमत्कारांचे वर्णन समाप्त करण्याअगोदर अलिफ़ लाम मीम इत्यादी कूटाक्षरांनी सुरू होणाऱ्या अध्यायांच्या सिंहावलोकनासाठी पुढील तक्ता उपयोगी सिद्ध होईल, असे वाटते.

**तक्ता**

| क्रमांक | अध्याय क्रमांक | अध्यायाचे शीर्षक | ا ची गणती | ل ची गणती | م ची गणती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | अल् बकर: | ४५९२ | ३२०४ | २१९५ |
| २ | ३ | आले-इम्रान | २५७८ | १८८५ | १२५१ |
| ३ | ७ | अल्-आअराफ् | २५७२ | १५२३ | ११६५ |
| ४ | १३ | अ्-रंअद | ६२५ | ४७९ | २६० |
| ५ | २९ | अल्-अन्कबूत | ७८४ | ५५४ | ३४७ |
| ६ | ३० | अ् - रूम | ५४५ | ३९६ | ३१८ |
| ७ | ३१ | लुक़्मान | ३४८ | २९८ | १७७ |
| ८ | ३२ | अ् - स्सिज्दा | २६८ | १५४ | १५८ |
| | | **एकूण बेरीज** | **ا → १२३१२** | **८४९३** | **५८७१** |
| | | | ل → ८४९३ | ← | |
| | | | م → ५८७१ | ← | ← |
| | | **सर्वांची एकूण बेरीज** | **२६६७६** | | |

∴ १९ × १४०४ = २६६७६ (१९ ही गुरूकिल्ली सिद्ध होते.)

''अलैहा तिसूअत अशर'' : ''त्यावर एकोणीस (देवदूत) आहेत.'' – ७४:३०.

**दयासागर क़ुरआनचे एक जीवित (नूतन) विलक्षण चमत्कार**

खालील विवेचनामध्ये अंकगणतीच्या प्रकाशामध्ये जी चमत्काराची किमया प्रस्तुत करण्यात येत आहे, ती एक फार महान इस्लामी चिंतक पंडित अब्दुर्रज़्ज़ाक नोफ़िल यांच्या क़ुरआनवरील दूरदर्शी चिंतनाचा परिणाम आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्यांना क़ुरआनच्या या सेवेप्रीत्यर्थ सर्व मुसलमान बंधूंच्या कृतज्ञेसह उत्तम सत्कर्मफल देवो!

**अंकगणिती चमत्काराचा पहिला नमुना?**

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने ब्रह्मांडातील सर्व वस्तूंना संबोधण्यासाठी ''कुल'' या शब्दाचा प्रयोग ३३२ वेळा केलेला आहे. जसे, आज्ञा दिली आहे :

''कुल् इन्नल्-अम्र कुल्लहू लिल्लाहि'' अर्थात ''(हे पैगंबरा ! तू त्यांना) सांगून दे की सारी कामे परमेश्वराचेच अखत्यारात आहेत.'' – ३:१५४

हे ''कुल''चे एक दृष्टांत-उदाहरण आहे. मग अल्लाहच्या सृष्टीतील सर्व सजीवांनी पण, म्हणजेच देवदूत, जिन्न, (यक्ष, किन्नर) आणि मानव पण ''कौल'' या शब्दाचा प्रयोग पण ३३२ वेळाच केले आहे. एक वेळ ना अधिक (जास्त) ना कमी !

देवदूतांच्या वाणीमधून निघणारे (नि:सृत होणारे) 'क़ौल' या शब्दाचे एक उदाहरण : ''कालू ! अ तज्अलु फ़ीहा मंय्युफ़्सिदु फ़ीहा व यास्फ़िकुद्दिमा।अ'' २-३० . म्हणजेच ''तेव्हा (देवदूत) बोलले, पृथ्वीत तू का अशा (मनुष्या) स (प्रतिनिधी) बनवितोस की जो तिच्यात दंगल माजवील व रक्तपात करील?'' - २:३०.

आणि मानवापासून सादर होणाऱ्या 'क़ौल' चे उदाहरण : ''कुल या अय्युहन्नासु इन्नी रसूलुल्लाहि इलैकुम् जमीअनिल्लजी'' अर्थात ''(हे पैगंबरा ! तू लोकास) सांग की अहो लोकांनो ! मी खरोखरीच त्या अल्लाहकडून, तुम्हा सर्वांच्या प्रती पाठवण्यात आलेला एक प्रेषित आहे.'' - ७:१५८.

आणि जिन्न (यक्ष, किन्नर) च्या तोंडून असे वदवण्यात आले आहे - ''कुल् अूहिय इलय्य अन्नहुस्तमअ नफ़रूम-मिनल्-जिन्नि फ़कालू। इन्ना समिऽना कुर्आनन् अजबन्'' - ७२:१ म्हणजेच, ''( हे पैगंबरा ! सर्व लोकांस) सांगून दे की, मला (परमेश्वराकडून असे) प्रकटिले गेले आहे की, जिन्नातां-दैवतां-किन्नरां-तून काही इसमांनी (मला कुराण वाचताना) ऐकले; आणि ऐकल्यावर आपल्या लोकांस जाऊन) सांगितले की, आम्ही विलक्षण (प्रकारचे) कुराण ऐकले.'' - ७२:१

**सारांश :** ज्याप्रमाणे सवश्रेष्ठ परमेश्वराने शब्द 'कुल' दयापूर्ण कुरआनमध्ये ३३२ वेळा प्रयुक्त केले आहे त्याचप्रमाणे त्याची सृष्टी देवदूत, जिन्न, आणि मानव यांनी पण ३३२ वेळा क़ौलचा प्रयोग केला आहे. याचे एक उदाहरण देण्यात आले आहे. हा विचित्र परस्पर संबंध म्हणजे एक विलक्षण चमत्कारच होय.

**दुसरा नमुना**

पवित्र कुराणामध्ये समष्टि स्वरूपात उल्लेख आहे की आकाशे सात आहेत (सप्त आकाश) ! तर तुम्ही संपूर्ण कुराणचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास तुम्हास सप्त आकाशंचा उल्लेख विविध अध्यायांमध्ये केवळ सात अध्यायांमध्ये आलेला आहे.

**तिसरा नमुना**

विश्वाच्या प्रभूने सांगितले आहे -

''इन्न इद्दतश्शुहरि इन्दल्लाहिस्ना - अशर शहरन् '' म्हणजे ''वस्तुस्थिती अशी आहे की, महिन्यांची संख्या, अल्लाहच्या लेखी बाराच आहे.'' -९:३६.

तर मग संपूर्ण कुरआनमध्ये 'शहर' (अर्थात महीना) (या शब्दाचा) प्रयोग बाराच वेळेस झालेला आहे! अशा प्रकारे यांमध्ये वर्षाचे बारा महिने असतात याकडे संकेत आहे. अंतत: ती दयाळू परमसत्ता विशुद्ध आहे की, ज्याने महिन्यांनी गणती बारा दाखविली (त्यामुळे) बाराच वेळेस शब्द 'शहर' (महिना) चे उल्लेख केले आहे!

**चौथा नमुना**

श्रद्धा आणि श्रद्धावंत चा उल्लेख पवित्र कुरआनमध्ये २५ वेळेस झालेला आहे. शब्द 'अीमान' अर्थात श्रद्धाचा प्रयोग १७ वेळेस झालेला आहे. याचे उदाहरण :

*''बिससल इस्मुल फ़ुसूक़ु बाद अल् ईमान''*

आणि आठ वेळेस 'अीमान' (श्रद्धा) आणि 'आमनू' (श्रद्धावंत) हे शब्द सोबत एकाच ठिकाणी आले आहे. जसे:

*''फ़अम्मल्लज़ीन आमनू फ़ज़ादत-हुम ईमानंव्व'' - ९:१२४.*

अर्थात ''पण जे (पहिल्यापासूनच) श्रद्धावंत आहेत, त्यांच्या श्रद्धेमध्ये ही (सूर: अर्थात हा अध्याय) निश्चित वाढ करते.'' - ९:१२४.

सारांश, २५ वेळा आवृत्ती आहे. तर अशाच प्रकारे 'कुफ्र' (अश्रद्धा) या शब्दाचा पण प्रयोग २५ वेळेसच झाला आहे. १७ वेळेसच फक्त 'कुफ्र' (हा शब्द) आला आहे, जसे म्हटले आहे.

*''व ला य़हज़ुन्कल्लज़ीन युसारिऊन फिल्कुफ्रि'' - ३:१७६.*

म्हणजे ''(हे पैगेबरा !) जे लोक आज अश्रद्धेच्या मार्गात खूपच धावपळ करीत आहेत, त्यांच्या धावपळीने तू खिन्न होऊ नको.'' - ३:१७६.

आणि हे आठ (८) वेळेस, कुराणच्या स्पष्ट अर्थ व्यक्त करणाऱ्या श्लोकांनुसार आले आहे.

*''अल अराबु अशद्दु कुफ़्रव्वँ निफ़ाक़न्''*

म्हणजेच या अश्रद्धे (कुफ्र) सोबत पाखंड (निफ़ाक) चा पण उल्लेख आहे.

अंततः विशुद्ध आहे ती सत्ता की ज्याने श्रद्धे (ईमान) ची पंचवीस (२५) वेळेस आवृत्ती केली आहे आणि अश्रद्धे (कुफ्र) ची पण तेवढीच आवृत्ती केली आहे; परंतु श्रद्धा आणि अश्रद्धेच्या अन्य साधित श्रद्धांमध्ये फरक आहे; तरी पण एक दुसऱ्या दृष्टीकोनाने चमत्कार आहे !

**पाचवा नमुना**

शब्द 'मलायका' अर्थात देवदूता (चांगुलपणाचे प्रतिनिधी) चा उल्लेख पवित्र कुरआनमध्ये ६८ वेळेस झालेला आहे; तर शब्द 'शैतान' (वाईटांचा प्रतिनिधी) चा उल्लेख पण ६८ वेळेसच झाला आहे. याचप्रमाणे शब्द 'दुनिया' अर्थात इहलोक चा उल्लेख ११५ वेळेस झाला आहे; तर परलोकची पण आवृत्ती ११५ आहे. मानवाची निर्मिती मृत्तिका (माती) आणि वीर्यबिंदू या दोहोंपासून झाली आहे. म्हणून शब्द 'नुल्फा' अर्थात वीर्यबिंदूचा उल्लेख १२ वेळेस आहे आणि शब्द 'तैन' म्हणजे मातीचा उल्लेख पण १२ वेळेसच झाला आहे.

याचप्रमाणे मानवाचे कर्म आणि आचरणाच्या आधारावर कर्मफळ प्राप्त होते. म्हणून 'फ़ेल' म्हणजे कर्मचा उल्लेख १०८ वेळेला आला आहे, तर शब्द कर्मफळ अर्थात 'अज्र' चा पण उल्लेख १०८ वेळेस आला आहे. म्हणजेच जितक्या वेळेस कर्म आणि आचरणाचा उल्लेख आहे, त्याच प्रमाणात 'अज्र व सवाब' म्हणजेच पुण्यलाभाचा पण उल्लेख आहे.

शब्द 'हिसाब' म्हणजे हिशोब चा २९ वेळेस उल्लेख आहे, तर न्याय 'अद्‌ल व किस्त' अर्थात न्यायचा पण २९ वेळेसच उल्लेख आहे, म्हणजे हा निवाडा संपूर्णपणे न्यायासह होईल.

याचप्रमाणे शब्द 'कुरआन' आणि तिच्यापासून साधित शब्दांचा उल्लेख ७० वेळेस आहे, तर शब्द 'वही' म्हणजेच दैवी प्रकटन, प्रज्ञान आणि त्याचे समानार्थी इतर शब्दांचा उल्लेख पण ७० वेळेसच झाला आहे.

आपत्ती आणि संकटे आणि त्यावर संयम, धैर्य बाळगण्याचा उल्लेख पण समसमान आहे म्हणजेच संकट व तत्सम यांचा उल्लेख १०२ वेळा आहे, तर संयम आणि तत्सम यांचा उल्लेख पण १०२ वेळेस झाला आहे.

**सहावा नमुना**

काही गोष्टी काही गोष्टींच्या दुप्पट नमूद आहेत. उदाहरणार्थ -

शब्द 'रहमान' चा उल्लेख ५७ वेळेस आहे, आणि 'रहीम' चा उल्लेख ११४ वेळेस आहे. याचप्रमाणे शब्द ('फ़ाजिर' चे अनेकवचनी रूप, याचा अर्थ आहे दुष्टाचारी) 'फ़ज्जार' (लंपट) चा उल्लेख ३ (तीन) वेळेस आहे; तर 'अब्रार' (ऋषि-मुनि) चा उल्लेख ६ (सहा) वेळेस आहे. 'मग्फ़रत' (मोक्ष) चा उल्लेख पण 'ज़जा' (प्रतिफल, पुण्यलाभ) च्या तुलनेत दुप्पट आहे. 'ज़जा' चा उल्लेख ११७ वेळेस आहे तर 'मग्फ़रत' चा २३४ वेळेस. जणू मूळच्या बदल्याच्या तुलनेमध्ये शब्द 'बख्शिश' (दान, पुरस्कार) ला अधिक लोकप्रचलित आणि विस्तृत बनवले गेले आहे !

या आणि अशा प्रकारची काही उदाहरणे नमुन्याखातर महापंडित अब्दुर्रज़्ज़ाक़ नोफ़िल यांनी जे आपलेपुस्तक कुरआनचे सांख्यिक चमत्कारांसंबंधी लिहिले आहे, हे गणितीय प्रमाण आणि संख्यांचे समतोल, जे वेगवेगळ्या नमुन्यांमध्ये दृष्टोत्पत्तीस आले आहेत, त्यावरून दोन तथ्ये स्पष्ट होतात : प्रथम हे की पवित्र कुरआन हे कोणत्याच मानवाची कृती (रचना) होऊ शकत नाही. म्हणजेच ते अपौरूषेय ग्रंथ आहे, दुसरे हे की पवित्र कुरआनमध्ये कोणत्याच प्रकारचे बदल घडून आले नाहीत. त्यामध्ये ढवळाढवळ मुळीच नाही. ते मूळ स्वरूपात आहे तसेच आहे. त्यामध्ये कानामात्राचाही फरक नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट आपल्यासमोर येते, ती ही की पवित्र कुरआन हे नेहमीपासून एक अटळ चिरस्थायी चमत्कार म्हणून आहे. चौदा शतके संपलीत परंतु कुणीच (याच्याशी) स्पर्धा करू शकले नाही. शिवाय या संख्याशास्त्रीय चमत्कारांव्यतिरिक्त न जाणो आणखी किती गुह्य गोष्टी यामध्ये दडलेल्या असतील की ज्यांच्यावर अद्याप कुणाचीच दृष्टी पोहोचू शकली नाही. अनेक गोष्टींमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सम-समानता ठेवली आहे, आणि अनेक ठिकाणी एक दुसऱ्याशी दुप्पट असल्याचे उल्लेख केले आहे. यामध्ये काय इंगित आहे. काय गुप्त हेतु आहे, काय तत्त्वदर्शिता आहे, त्या वास्तवांपर्यंत आमची (मानवी) दृष्टी पोहोचू शकत नाही!

**२) अरबी वर्णाक्षरांचे सूफ़ी तत्त्वज्ञानप्रणीत अध्यात्मशास्त्र[८८]**

**गूढगुंजन : आकलनक्षमता**

सूफींचा भर आध्यात्मिक आणि रहस्यवादी - गूढवादी व्याख्या व विवेचनावर जास्त असतो. ते अक्षरार्थावर विशेष लक्ष देत नाहीत. सूफींचे असे म्हणणे आहे की ते, परमेश्वराचे विशेष कृपापात्र आहेत. त्यांना अंतर्दृष्टी प्राप्त आहे. यामुळेच त्यांना परम सत्याचे ज्ञान प्राप्त होते. आणि म्हणून ते प्रेषित मुहम्मद[स.] यांची वचने आणि आणि पवित्र कुराणांच्या श्लोकांचे गूढ अर्थ समजू शकतात. त्यांना समजणे हे सर्वांना शक्य नाही आणि हे सोपे पण नाही. गूढार्थ समजण्याचे एकमात्र अधिकारी तेच आहेत.

जर एखाद्या गोष्टीविषयींचे समर्थन सूफ़ी पवित्र कुराणात प्राप्त करू शकत नसतील, तर त्याचा संदर्भ ते हदीसां (प्रेषित वचनां) मध्ये शोधतात. हदीसांमध्ये प्रेषित मुहम्मदस. यांची अशी काही वचने आहेत की, ज्यांच्याविषयी मुसलमानांचा असा विश्वास आहे की, कुराणोक्त गोष्टींव्यतिरिक्त त्यांना बरेच काही दिव्य दृष्टींमुळे ज्ञात होत असे आणि त्याच्या मदतीने ते अनेक धार्मिक, नैतिक अथवा सैद्धांतिक समस्यांच्या बाबतीत अधिकारपूर्वक आदेश देत असत.

त्याकाळी अशा व्यक्तीस गूढवादी किंवा रहस्यवादी मानले जायचे की जिला परमेश्वराविषयी ज्ञान आणि गूढ यांचे आकलन होत असे. सूफींना गूढ उकलण्याचे ज्ञान त्यांना त्यांच्या सद्‌गुरूकडून मिळत असे, परंतु या गोष्टीवर विशेष भर दिला जाई की, सदरहू गुह्य ज्ञान स्वत:पुरतेच मर्यादित ठेवले पाहिजे (जावे) परंतु जे यास ग्रहण करण्यास स्वत:स सच्चे सिद्धहस्त अधिकारी म्हणून सिद्ध करीत, फक्त त्यांनाच गुह्ये प्रकट केली जात. घुह्यांचे ज्ञान हे सहजासहजी प्राप्त होत नसते, तर कठीण साधनेमुळे हे प्राप्त होते आणि त्या सिद्धहस्ताचे अंत:करण हे आकलनामुळे प्रकाशमान होऊन जाते.

सर्वसाधारणपणे गूढ ज्ञान प्राप्त करणे आणि त्याचे रहस्य जाणणे हे शक्य नसावे. गुह्यज्ञानी साधकास 'आरिफ़' असे म्हणतात. याचा अर्थ असा की ते परमेश्वराचे विशेष कृपापात्र भक्त असतात. परमेश्वर त्यांच्यावर, अनुग्रह करून त्यांच्या या रहस्याशी – गूढाशी साक्षात्कार घडवून आणतो. परंतु अशा जाणकारांची संख्या, अर्थातच सीमित असणार. तेच या रहस्यास जाणण्याचे अधिकारी असतात. त्यानांच गुह्य ज्ञानाची प्राप्ती होत असते. म्हणून हे सुस्पष्ट आहे की गूढवाद किंवा रहस्यवाद हा परमात्मा आणि आत्म्याचे अंतरंग आणि त्यांचे घनिष्ट संबंध यावर अवलंबून असतो.

**गूढ अध्यात्मवाद**

पौर्वात्य विचारवंतांनी गूढ अध्यात्मवादाचा संबंध धार्मिक श्रद्धांशी किंवा विचारांशी जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. गूढ अध्यात्मवादाचे विवेचन तीन सूत्रांचा अवलंब करून करता येऊ शकते.

पहिले सूत्र असे सूचित करते की, गूढ अध्यात्मवाद मानवी मनाला शांती व समाधान प्राप्त करून देते.

दुसऱ्या सूत्रानुसार गूढ अध्यात्मवादामुळे मानवास नैतिक तटस्थतेची जाणीव प्राप्त होत असते.

तिसऱ्या सूत्रान्वये स्वत: च्या कठोर परिश्रमांतून व स्वयंशिस्तीच्या माध्यमातून व्यक्तीचे उन्नयन होत असते. आध्यात्मिक परिभाषेत असे सांगता येईल की जाणीव व नेणीव यांच्या पलीकडची श्रेष्ठ साधकावस्था मानवाला प्राप्त करून देण्याचा प्रयत्न गूढ अध्यात्मवाद करीत असतो. एवढेच नव्हे तर, श्रेष्ठ साधकावस्था मानवाला प्राप्त होणे म्हणजेच जीवनाची खरी मुक्ती होय.

**अरबी वर्णाक्षरांची गुपिते (कूट) आणि त्यांचे स्वरूप**

अरबी भाषेच्या वर्णाक्षरांमध्ये सुद्धा काही गुह्ये दडलेली आहेत. या संदर्भात एकच उदाहरण पुरेसे होईल. यास्तव आपण प्रथम वर्णाक्षर 'अलिफ़'(ا) घेऊ या. प्रथम वर्णाक्षर 'अलिफ़' चे गूढ रहस्याची उकल काहाशी अशी आहे. –

जेव्हा विश्वंभराने – अल्लाहने – लेखणीस आदेश दिला की हे लेखणी, प्रलय दिवसापर्यंत जे काही घडणार आहे, ते सर्व तू लेख पट्टिकेवर ('लौह'वर) लिही. मग लिहिण्या अगोदर लेखणीने भयभीत होऊन त्या पाटीवर आपले डोके टेकले, तेव्हा परिणामी एक चकचकीत (घामाचा) बिंदू त्यावर प्रकट झाला. मग तो बिंदू विस्तारित होऊन उभ्या सरळ रेषेचा 'अलिफ'(।) बनला. याची प्रक्रिया आकृती स्वरूपात अशा दाखविता येईल. –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पहिला टप्पा | – | • | = | बिंदू |
| दुसरा टप्पा | – | ⁝ | = | बिंदूचा प्रसार (समुच्चय स्वरूपात) |
| तिसरा टप्पा | – | ا | = | (अलिफ) (बिंदूची अंतिम परिणती) |

अरबी भाषेमध्ये 'अलिफ़' या वर्णाक्षराचे स्वरूप ' ا' याच स्वरूपात नंतर रूढ झाले.

अधिक उष्णतेमुळे घाम येतो. या संदर्भात उष्णता म्हणजे प्रकोप; आणि प्रकोपाचा परिणाम भितीमध्ये होतो. प्रकोप आणि भयामध्ये कारण–कार्याचा संबंध असतो. प्रकोप आणि उष्णता समशील असतात. उष्णता हा अग्नीचा गुणधर्म आहे. अग्नी हा एक महाभूत आहे. म्हणून 'अलिफ़' (ا) – हा अग्निजन्य म्हणजेच प्रकोपी स्वभावाचा मानला जातो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे नाम 'अल्लाह' ची सुरुवात याच 'अलिफ़' (ا) – 'अ' ने होते. खरोखर, वर्णाक्षरांचे उच्चारणच त्यांचा जप असतो.

तद्वत काही कौराणिक गूढ अक्षरांचे संभाव्य मथितार्थ याप्रमाणे आहेत –

ता हा (طٰهٰ) = हे सर्वगुणसंपन्न महापुरुषा !

ता सीन (طٰسٓ) = हे कृपाशील सर्व काही ऐकणारा.

या सीन (يٰسٓ) = हे परिपूर्ण नेत्या !

सॉद (ص) = सत्यवचनी ईश्वर

क़ाफ़ (ق) = सर्वशक्तिमान.

वर्णाक्षरे प्राचीन काळापासून प्रचलित आहेत. हे सुर्यानी भाषेत अवतरित झाले. यांच्यामध्ये विशेष असे अभिप्राय निहित आहेत. परमेश्वराचे भक्त आणि ज्ञानी हे यांच्या गुह्यांशी चांगल्या प्रकारे परिचित असतात.

पाहा ! अरबी वर्णाक्षरे एकूण अठ्ठावीस (२८) आहेत आणि नक्षत्रे पण अठ्ठावीस आहेत. (मात्र भारतीय नक्षत्र विज्ञान किंवा ज्योतिषशास्त्रानुसार २७ नक्षत्रे मान्य आहेत. परंतु अरबीमध्ये २८ नक्षत्रे मान्य आहेत. त्या अठ्ठाविसाव्या नक्षत्राचे अरबीमध्ये नाव आहे 'रिशा'. यालाच 'बैतुलहूत'पण म्हणतात. याचे भारतीय समानार्थी नाव आहे 'अभिजित'.) पैकी चौदा (१४) आकाशात आहेत, आणि इतर चौदा पृथ्वीतलावर आहेत, आणि याच कारणास्तव १४ वर्णाक्षरे ही बिंदुधारी (टिंबधारी) आहेत आणि उरलेली १४ हे बिंदुविरहित (टिंबविरहित) आहेत. बिंदुधारी वर्णाक्षरांमध्ये १० (दहा) एक बिंदुधारी, २ (दोन) दोन बिंदुधारी, तर उरलेली २ (दोन) तीन बिंदुधारी आहेत. यापैकी दोन बिंदू हे मध्यम श्रेणीचे अभिप्राय धारण करतात आणि तीन बिंदुधारी वर्णाक्षरे हे परम शुभकारी मानले जातात.

निष्कलंक अल्लाहने पण आपली पवित्र वाणी 'पवित्र कुरआन' मध्ये कृपेचे श्लोक हे कृपेचे अधिकारी असलेल्या सज्जन लोकांसाठी, तर शिक्षेचे श्लोक हे शिक्षेस योग्य असे अपराधी लोकांसाठी का बरे अवतरित केलेत? यासाठी की जर हा फरक नसता तर मानव हा शुभाशुभांची लक्षणे जाणू शकला नसता. या अरबी अक्षरांचे चार दर्जे आहेत –

१) प्रथम उष्ण.

२) द्वितीय ओलसर

३) तृतीय शीत

४) चतुर्थ शुष्क.

उपरोक्त श्रेणींमध्ये प्रत्येकी सात सात वर्णाक्षरे समाविष्ठ आहेत. या सर्व वर्णाक्षरांचे गुण, गुणधर्म व स्वभाव, तसेच परमेश्वर, सप्तग्रह आणि मानवाशी त्यांचे सह-संबंध निदर्शक कोष्टक पुढे सादर करण्यात येत आहे : (सदरहू कोष्टक पुढील पानावर पहा.)

ज्याप्रमाणे मानवाचा आपला स्वभाव असतो - जसे शांत, क्रोधी (तापट), प्रक्षुब्ध, विनम्र, उद्धट इत्यादी -; त्याची प्रकृती असते, तद्वत् ही अक्षरे पण चार प्रकारचे स्वभाव धारण करून असतात. काही प्रकोपी स्वभावाचे आहेत, तर काही शांत, तसेच काही विनम्र आहेत, तर काही शीतल स्वभावाचे आहेत. आदिभूतापासून पृथ्वी, आप, तेज व वायू ही चार मौलिक तत्त्वे निर्माण झालेली आहेत. ही चार महाभूते (सूफ़ी तत्त्वज्ञानात आकाश हे महाभूत मान्य नाही.) सर्वप्रथम रूप ग्रहण करणारी हीच चार तत्त्वे होती. यांपैकी सर्वात वर अग्नी आहे, त्यानंतर वायू, तदनंतर आप (जल) आणि मग पृथ्वी. या सर्वांचे आपले वेगळे गुण आहेत, आणि काही सारखे गुण पण आहेत. म्हणून या समान सामाईक गुणांमुळे हे एकापासून दुसऱ्या गुणामध्ये बदलत असतात.

जसे अग्नी शुष्क आणि उष्ण आहे; वायू उष्ण आणि ओलसर आहे, आप (पाणी) ओलसर आणि शीत आहे, आणि पृथ्वी शीत व शुष्क आहे. अशा प्रकारे एक संपूर्ण चक्र पूर्ण होते. अग्नी आणि वायूमध्ये सामाईक गुण उष्णतेचा आहे. या सामाईक गुणामुळे एकाचे दुसऱ्या रूपामध्ये परिवर्तन होते. हाच प्रकार इतर तत्त्वांमध्ये सुद्धा आहे. हा बदल सप्त ग्रहांच्या प्रभावामुळे होतो. यामुळे धातू, उद्‌भिज आणि जीव-जंतूंचा उद्‌भव होतो. यामुळे सप्तग्रहांना 'पितृसप्तक' ('अबा-ए-सबा') असे म्हणतात. तर चार तत्त्वांना 'मातृ चतुष्ट्य' ('उम्महात-ए-अरबा') असे म्हणतात. सर्वात शेवटी मानवाचा उद्‌भव होतो. जीव-जंतूची चरम परिणती मानवामध्ये मिळून समाप्त होते. जीवांच्या जगामध्ये मानव हा अन्यतम आहे आणि मानवात पण उच्चतम व अन्यतम 'पुरुषोत्तम' वा 'नरोत्तम' (इन्सानुल कामिल) आहे.

सुप्रसिद्ध सूफ़ी संत बू अलीशा क़लंदर पानीपती यांनी निज़ामुद्दीन औलिया यांना संबोधून लिहिलेल्या एका रूबाई (चौपाई) मध्ये गूढ गुंजनाचे स्वरूप याप्रमाणे विशद केले आहे -

*"असरारे अज़ल रा ना तू दानी ना मन*
*अीं हर्फ़े मुअम्मा ना तू ख़्वानी व ना मन*
*हस्त अज़ पसे परदा गुफ़्तगूए मन व तू*
*चूँ परदा बर उफ़्तद ना तू मानी व ना मन ।।"* - बू अलीशा कलंदर पानीपती

अर्थात प्रारब्धा (भाग्या) ची रहस्ये ना तू जाणतोस ना मी. हे गूढ अक्षर ना तू वाचू शकतोस ना मी. या पडद्याआड तुझ्यात आणि माझ्यात संवाद आहे. पडदा उठताक्षणीच (दिसून येते की) ना तुझी वास्तविकता आहे ना माझी. दोघेही अस्तित्वशून्य होऊन जातात.

*** वर्णाक्षरांचे गुण, गुणधर्म व स्वभाव, तसेच परमेश्वर, सप्तग्रह आणि मानवाशी त्यांचे सहसंबंध निदर्शक कोष्टक ***

| क्र. | गुण | वर्णाक्षरे | | | | | | | गुणधर्म | स्वभाव | तत्त्व (महाभूते) | समतोलाअभावी भावी नैसर्गिक आपत्ती (संकट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | बुरूज : राशी |
| १ | उष्ण असलेली सात अक्षरे आहेत→ | ا<br>१ | ہ<br>५ | ط<br>९ | م<br>४० | ف<br>८० | ش<br>३०० | ذ<br>७०० | अग्निमय | प्रकोपी | तेज तत्त्व | अग्निकांड | हमल असद क़ौस<br>मेष सिंह धनु |
| २ | ओलसर असलेली सात अक्षरे आहेत→ | ب<br>२ | و<br>६ | ی<br>१० | ن<br>५० | ص<br>९० | ت<br>४०० | ض<br>८०० | वायुमय | शांत | वायू तत्त्व | वादळ | जौज़ा मीज़ान दल्व<br>मिथुन तूळ कुंभ |
| ३ | शांत असलेली सात अक्षरे आहेत→ | ج<br>३ | ز<br>७ | ك<br>२० | س<br>६० | ق<br>१०० | ث<br>५०० | ظ<br>९०० | जलमय | शीतल | आप तत्त्व | अतिवृष्टीमुळे महापूर<br>वृष्टीअभावामुळे अवर्षण वा दुष्काळ | सर्तान अक्रब हूत<br>कर्क वृश्चिक मीन |
| ४ | शुष्क असलेली सात अक्षरे आहेत→ | د<br>४ | ح<br>८ | ل<br>३० | ع<br>७० | ر<br>२०० | خ<br>६०० | غ<br>१००० | मृत्तिकामय | विनम्र | पृथ्वी तत्त्व | भूकंप | संबुल: सौर जदी<br>कन्या वृषभ मकर |
| ५ | हफ़्त सिफ़ाते इलाही (परब्रह्माचे सप्त गुण) | हरकत जीवन | इल्म ज्ञान | कुद्रत शक्ती (सामर्थ्य) | बसर दृष्टी | समाअ श्रवण | कलाम वाणी | इरादत संकल्प | | | | ज्याप्रमाणे योगशास्त्राची म्हणजेच योग–सूत्रांची गुपिते जाणून घेणे आध्यात्मिक आणि भौतिक दोन्ही पातळ्यांवर फायदेशीर ठरते, त्याचप्रमाणे अरबी वर्णाक्षरांचे गूढ गुंजन समजून घेणे, हे सुद्धा लाभदायकच ठरते. शेवटी संसारात होणारी दुःखे डाव्या व उजव्या ओढाताणीतून तयार झालेली असतात तर समत्वात व संतुलनात असते सुख. | |
| ६ | अस्मा–ए–कवाकिब (सप्तग्रहांची नावे)→ | ज़ुहल शनि | मुश्तरी गुरू | मिरींख़ मंगळ | शम्स रवि | ज़ुहरा शुक्र | उतारद बुध | क़मर सोम | | | | | |
| ७ | मानवी शारीरिक→ अवयवांशी अक्षरांचा संबंध | डोके | उजवा हात | डावा हात | पाठ | पोट | उजवी जांघ | डावी जांघ | | | | | |

### अरबी वर्णांक शास्त्र–सूत्राचे प्रेषित प्रणीत भाष्य

अरबी वर्णांकशास्त्राचे नाव आहे 'अब्जद' पद्धती. याचे दुसरे नाव आहे 'अब्जदे क़मरी' म्हणजेच चंद्रवर्णांकशास्त्र. भारतीय तत्त्वज्ञानामध्ये यास उत्तरमालिनी विजयधारा म्हणता येईल. या पद्धतीमध्ये अक्षरांना १ पासून १,००,० पर्यंत मूल्य दिलेले असते. हे मूल्य 'अब्जद' या सूत्रामध्ये गुंफलेल्या अक्षरांच्या क्रमानुसार दिलेले असते आणि हेच वर्णांकशास्त्र सर्वमान्य असून अद्याप प्रचलित आहे. हे सूत्र आहे–

**''अब्जद हव्वज़ हुत्ती कलिमन सअफस क़रशत सख़्खज ज़ज्ज़ग''**

| गट क्र. | सूत्रांश | | मूल्यांक | मूल्यांक |
|---|---|---|---|---|
| १. | अब्जद | (ابجد) | = १–४ | अर्थात १, २, ३, ४; |
| २. | हव्वज़ | (هوز) | = ५–७ | अर्थात ५, ६, ७; |
| ३. | हुत्ती | (حُطی) | = ८–१० | अर्थात ८, ९, १०; |
| ४. | कलिमन | (كلمن) | = २०–५० | अर्थात २०, ३०, ४०, ५०; |
| ५. | सअफस | (سعفص) | = ६०–९० | अर्थात ६०, ७०, ८०, ९०; |
| ६. | क़रशत | (قرشت) | = १००–४०० | अर्थात १००, २००, ३००, ४००; |
| ७. | सख़्खज | (ثخذ) | = ५००–७०० | अर्थात ५००, ६००, ७००; |
| ८. | ज़ज्ज़ग | (ضظغ) | = ८००–१००० | अर्थात ८००, ९००, १०००; |

प्रेषित मुहम्मद[स.] यांनी अरबी वर्णांकशास्त्राच्या उपरोक्त सूत्राचे भाष्य पुढीलप्रमाणे केल्याचे मानले जाते.

'अब्जद' या सूत्रखंडामध्ये 'अ' 'अलिफ़' हा अल्लाहचे संकेत देतो; 'ब' (बे) हा बैतुल्लाह म्हणजेच परमेश्वरगृह – काबाचे निदर्शक आहे, आणि 'ज' (जीम) म्हणजे जमाल–उल्ला अर्थात सौंदर्य–सुंदरम् आणि 'द' (दाल) म्हणजे दीन–उल्ला म्हणजेच परमेश्वराचा धर्म सत्य असल्याचे जाणावे. 'हव्वज़' म्हणजे वेगवेगळे केले. 'हुत्ती' म्हणजे अपराधांचे स्तंभ. 'कलिमन' म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आदेश दिले. 'सअफ़स' म्हणजे (प्रत्येकाचे) वेगवेगळे हिशोब घेईल. 'क़रशत' म्हणजे कुरेश ही ज्ञाती परमेश्वराच्या आश्रयाखाली आहे. 'सख़्खज़' चा मथितार्थ आहे – सर्वश्रेष्ठ अल्लाह हा सर्व प्रकारचे दोष आणि सहभागीत्वापासून अलिप्त आहे आणि शेवटी 'ज़ज़्ज़ग़' म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहचा कोप हा श्रद्धाहीनांवर आहे, तर त्याची कृपा ही श्रद्धावंतांवर आहे.

### वर्णाक्षराची गुह्ये

अरबी भाषते एकूण २८ वर्णाक्षरे आहेत. त्यांचे अध्यात्मिक महत्त मान्य करण्यात आले आहे म्हणून २८ परिपूर्ण असे दैवी नावांच्या अधीन म्हणजेच, त्यांच्या पालकत्वाखाली २८ भौतिक – लौकिक नावे क्रमशः त्यांचे पाल्य या नात्याने स्वीकृत (मान्य) आहेत. कंठ, जिव्हा आणि ओष्ठ हे या वर्णाक्षरांचे उच्चारण स्त्रोत आहेत. यानाच ध्वन्यंग असे म्हणतात. उच्चारणामुळे त्यांचे अस्तित्व प्रकट होते. त्यावरून असे ज्ञात होते की

या वर्णाक्षरांमध्ये दैवी रहस्ये दडलेली आहेत. आणि प्रत्येक वर्णाचे – गूढ-रहस्य हे ऊर्ध्व लोकांमध्ये (परलोकात) विद्यमान आहे. वर्णाक्षराची नावे व तथ्ये ही आध्यात्मिक देवदूतीय (दैवी) अशी आहेत. दैवी नावे पण उच्चार व लेखन या दृष्टीने याच वर्णाक्षरांचे समूह आहेत. म्हणून दैवी नामांचे प्राण पण देवदूत आहेत. ते आपापल्या नामांचे संरक्षक आणि वेताळ (मुवक्किल) आहेत आणि त्यांच्यामुळे ही नामे इतर आत्म्यांप्रमाणे असतात. या दिव्यत्वांची पण रूपे मानवी आत्म्यामध्ये आपले स्थान ठेवून आहेत आणि ती वर्णाक्षरे या नावाने ओळखली जातात. मुखोच्चारामुळे ध्वनी स्वरूपात ही बाहेर निघतात, आणि लिखाणात (लेखनात) लिपिबद्ध होतात. आत्म्याच्या लोकात या अध्यात्मवादाचे एक – एक नाव असते. जो आपापल्या अक्षरवर्णासह ओळखला जातो. उदाहरणार्थ, मलक-उल-ऐन, मलक-उल-काफ़, मलक-उल-हा इत्यादी. हे देवदूत त्या वर्णाक्षरांचे आत्मे असतात, आणि ही वर्णाक्षरे त्या देवदूतांचे देह (शरीर). ही शरीरे उच्चारित (स्वरूपात) पण असतात, तसेच लिखित पण. ही वर्णाक्षरे आपल्या आत्म्यांद्वारे प्रभाव पाडतात. शरीरांद्वारे नव्हे. प्रत्येक वर्णाक्षराचे आपले पावित्र्य व आपली प्रतिष्ठा आणि प्रशंसा असते. हा अध्यात्मवाद आपल्या वर्णाक्षरांपासून कधीच पृथक होत नसतो. या वर्णाक्षरांमध्ये साम्य ग्रहांप्रमाणेच असते. ग्रहांना देवदुतीय आत्मे असतात. हे आत्मे त्या ग्रहांची योजना करतात. ज्याप्रमाणे शरीराची जिवंत अवस्था प्राणवायू ठेवतो, त्याचप्रमाणे ग्रहांचा प्रभाव हा त्यांच्या अध्यात्मवादामुळे होत असतो. याचप्रमाणे वर्णाक्षरांचा प्रभाव पण त्यांच्या आध्यात्मिक शक्तींद्वारे होतो. ब्रह्मांडामधील सर्व पदार्थ परमेश्वराद्वारेच प्रकट झालेले आहेत. मानवी श्वासाच्या माध्यमानेच वर्णाक्षर उच्चारित स्वरूपात प्रकट होतात; परंतु या सर्व शाखा उपशाखांच्या मुळात तोच परमेश्वर आहे, जो समस्त ब्रह्मांडामधील समस्त पदार्थांचा मूळ (निर्माता) आहे.

''जे काही दिसते ते तुझ्याशिवाय काहीच नाही. एक तर तू तर असतोस किंवा तुझा वास (गंध) वा तुझा स्वभाव.'' या आशयाचे निदर्शक, सुप्रसिद्ध सूफ़ी कवी अमीर खुसरो यांचे, काव्य-चरण असे आहे –

*''हर्चे आयद दर नज़रगैरे तू नीस्त*
*या तूई या बू-ए-तू ख़ू-ए-तू''* – अमीर ख़ुसरो

**अरबी वर्णाक्षरांचे गुह्य-विवेचन**

**१) अलिफ़ (ا) : अ**

याचे पालक स्वरूप दैवी नाव (इस्मे इलाही) 'बदीअ' म्हणजेच अनुपम स्त्रष्टा असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक (लौकिक) नाव 'अक़्ल-ए-कुल' म्हणजेच विश्व-ज्ञान, 'क़लम-ए-आला' म्हणजे सर्वोच्च लेखणी असे आहे. याचे नक्षत्र 'शर्तैन' म्हणजे अश्विनी आहे.

ही पात्रता विशेष करून सर्व श्रेष्ठ परमेश्वराशी कायम आहे, आणि निर्मितीची सक्षमता आणि पात्रता यांचे मूळ आहे. याने त्याकडे लक्ष दिले. हा पालक बनला सर्वप्रथम ज्ञानाचा. (अक़्ल-ए-अव्वल). लेखणी हे त्याचे नाव. हा सृष्टीचा दृश्यरूप आहे, कारण की लेखणीने 'भव' – 'हो' ('कुन') पासून आपले अस्तित्व धारण केले आहे. मूल पदार्थ, काळ आणि समरूपता या सर्वांशी लेखणीने सरशी केली. 'बदीअ' (अनुपम स्त्रष्टा) हे नाव 'अलिफ़' वर्णाक्षराच्या निर्मितीकडे पण आकृष्ट झाले. याच्यापासूनच इतर सर्व सत्तावीस (२७) वर्णाक्षरे निर्माण झाली आणि शिवाय 'शर्तैन' – आश्विनी नक्षत्राच्या निर्मितीकडे आपले लक्ष वळवले.

**२) हे (ه) : ह [बिंदुहीन]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'बाअस' म्हणजेच बीजरूप असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'नफ्स-ए-कुल' म्हणजे विश्वात्मा, 'लौह-ए-महफूज' म्हणजे सुरक्षित पट्टिका (पाटी), सुस्पष्ट ग्रंथ असे आहे. नक्षत्र 'बुतैन' म्हणजे भरणी आहे.

'बाअस' हे बीजाच्या योग्यतेचे मूळ कारण आहे. बुद्धीचा शरीरावर अधिकार हा आत्म्याच्या आधिपत्त्यामुळे असतो. प्रथम बुद्धीची निर्मिती ही ईश्वराज्ञा म्हणजेच 'कुन' अर्थात 'भव' या आज्ञेमुळे झाली. 'नफ़्स-ए-कुल' म्हणजेच विश्वात्मा याला 'लौह-ए-महफूज' अर्थात सुरक्षित पट्टिका किंवा सुस्पष्ट ठांथ म्हणतात. हे सर्वप्रथम अस्तित्व आहे. 'अक्ल-ए-कुल' म्हणजे विश्व ज्ञानाच्या मदतीने हिला अस्तित्व प्राप्त झाले.

**३) ऐन (ع) : अ़ [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'बातिन' म्हणजेच अगोचर असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'तबीअत-ए-कुल' म्हणजे समष्टिगत स्वभाव असे आहे. याचे नक्षत्र सुरैया म्हणजेच कृत्तिका किंवा कीर्तिका आहे.

हे स्वभावांच्या योग्यतेचे मूळ आहे. पदार्थ याच्यात लपलेले आहेत. 'नफ्स-ए-रहमानी' म्हणजेच ईश्वरीय आत्म्यामुळे हा अस्तित्वात आला.

**४) है (ح) : ह [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'आख़िर' म्हणजेच अंत, शेवट आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'हुबा' म्हणजे पदार्थ आहे. हे समस्त ब्रह्मांडाचे समष्टिगत स्वरूप आहे. याचे नक्षत्र मिहर किंवा दरबान म्हणजेच रोहिणी आहे.

जौहर-ए-हुबा अर्थात पदार्थ शरीराचे प्रतिरूप आहे. हे अस्तित्वाच्या प्रकटीकरणाच्या शेवटच्या टप्प्यापैकी आहे. या टप्प्यात अस्तित्व अतिसौंदर्यावस्थेत असते, कारण की अति स्थूलतेमध्ये अति सूक्ष्मता अवतरित झाली. संमिश्र जगाचा शरीरनिर्मित ध्वनी यामध्ये प्रगट झाला.

**५) गैन (غ) : ग़ [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'ज़ाहिर' म्हणजेच गोचर असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'शक्ल-ए-कुल' म्हणजेच विश्वरूप असे आहे. हे संपूर्ण आकार, संपूर्ण ब्रह्मांडाचे समष्टिगतरूप आहे. याचे नक्षत्र 'हक़्अ:' म्हणजे मार्गशीर्ष अथवा मृगशिरा किंवा मृग आहे.

विश्वरूपावर ('शक्ल-ए-कुल') प्रतिरूपाचे प्रकटीकरण स्थगित आहे. रूप आकाराविना जडतत्त्व होऊ शकत नाही. रूप एक प्रकारचे बंधन, एक प्रकारची कैद आहे, जे स्वत:स एखाद्या व्यक्त रूपामध्ये आबद्ध करते. तिला आकृती असे म्हणतात. जे काही तपशीलात व्यक्त आहे ते दैवी स्वरूपात आबद्ध आहे. जर पदार्थ स्वरूपात हे रूप नसते तर दैवी स्वरूप व्यक्त (प्रकट) झाले नसते. विश्वरूप हे समस्त रूपाकारामध्ये समाविष्ट आहे. हे तंतोतंत सर्वोपरि आकाशासारखे आहे. हे राशी, ग्रह आणि नक्षत्रांमध्ये असलेल्या प्रत्येक वस्तूवर (स्थित) आहे.

**६) ख़ै (خ) : ख़ [बिंदुयुक्त]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'हकीम'म्हणजेच तत्त्वविद् आहे. हे समस्त ब्रह्मांडाचे समष्टिगत शरीर आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'जिस्म-ए-कुल' म्हणजेच विश्वशरीर आहे. याचे नक्षत्र हनअ: म्हणजे आर्द्रा आहे.

तत्त्वज्ञानापासून विविध स्वभावांचा समूह उदयास आला. विश्वशरीर स्वभावाचे ते प्रथम रूप आहे की ज्यामध्ये विविध स्वभाव आपले आदेश व्यक्त करतात. म्हणूनच विश्वशरीर हे उष्णता, आर्द्रता, शीतलता आणि शुष्कता यांचा स्वीकार करते. सर्वश्रेष्ठ परमेश्वर संपूर्ण ब्रह्मांडाची रूपे विभिन्न पात्रतेनुसार व्यक्त करतो.

**७) क़ाफ़ (ق) : क़ [बिंदुयुक्त]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'मुहीत' म्हणजेच सर्वसमावेशक आहे. हेच त्याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव आहे. याचे नक्षत्र 'जिराअ' म्हणजे पुनर्वसु आहे.

दिव्य सिंहासन समस्त पदार्थांना घेरून आहे. घेरा करणे किंवा चक्रमय असल्यामुळे 'अर्श-ए -आज़म' म्हणजे सर्वात महान सिंहासन हा शरीरापैकी आहे.

**८) क़ाफ़ (ك) : क [बिंदुहीन]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'शकूर' म्हणजेच गुणग्राहक आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'कुरसी' म्हणजेच पादपीठ वा आसन आहे. याचे नक्षत्र 'नसर:' म्हणजे पौष वा पुष्य आहे.

धर्मशास्त्रीय विधि-विधानांचा तो तपशिल (विवरण) आहे. त्याचे हे बाह्य रूप आहे आणि कृतज्ञता ज्ञापन योग्य वाणीचे कारण स्वरूप आहे.

**९) जीम (ج) : ज [बिंदुयुक्त]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'ग़नी' म्हणजेच नि:स्पृह, निरपेक्ष आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-उल-अतलस' म्हणजे सर्वोपरि आकाश. 'फ़लक-उल-बुरूज' म्हणजे रात्रीचे आकाश असे आहे. नक्षत्र 'तरफ:' म्हणजे आश्लेषा आहे.

'ग़नी' या नामास 'ग़नि-उ-द्दहर' पण म्हणतात. 'दहर' म्हणजे काळ, युग. म्हणून 'ग़नि-उ-द्दहर' म्हणजे काळापासून मुक्तअसा अर्थ होतो. 'दहर या नामापासून सहायता प्राप्त होते. 'फलक-उल-अतलस' म्हणजे सर्वोपरी आकाशाजवळच 'फलक-ए-बुरूज' अर्थात बारा राशी आहेत. सर्वोपरि आकाश हे तारेविरहित आहे. हे राशिविहीन आहे.

**१०) शीन (ش) : श [बिंदुयुक्त]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'मुक्तदर' म्हणजेच सत्त्व आहे. त्याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-उल-मनाज़िल' म्हणजे नक्षत्र आकाश आहे. याचे नक्षत्र 'जबहतल् असद' वा 'जबह' म्हणजे मघा आहे.

मूल तत्त्वाच्या जगामध्ये हे नक्षत्र भौतिक जग व त्यामधील खळबळ यांचे कारण स्वरूप असते. हे नक्षत्र म्हणजे जहन्नुम म्हणजे नरकाचे छत आहे. हे राशिविहीन आहे.

**११) या (ى) : य [बिंदुहीन]**

याचे पालकस्वरूप दैवी नाव 'रब्ब' म्हजेच प्रभू आहे. त्याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-ज़ुहल' म्हणजे शनी आहे. याचे नक्षत्र 'सर्तान' किंवा 'ज़ुब्रा' म्हणजे पूर्व फाल्गुन अथाव पूर्वा फाल्गुनी आहे.

सर्वप्रथम आकाशाचा ग्रह शनि आहे. तो सर्व ग्रहांहून अधिक उंचीवर आहे. हा शनिवारशी संबंधीत आहे. हा अमीर आणि थोरामोठ्या लोकांचे टाळे आहे. 'बैतुलमामूर' (देवदूतांचे वंद्य स्थळ) आणि 'सिद्रतुल मुंतहा' (कल्पवृक्ष आणि स्वर्गातील लक्ष्मणरेषा) यांचे स्थळ आहे. प्रेषित इब्राहीम येथे वास्तव्यास आहेत. 'बैतुलमामूर' हे आकाशात ठीक काबागृहाच्यावर येते. याला पश्चिमेस एक आणि पूर्वेस एक असे दोन दरवाजे आहेत. पूर्वेकडचे द्वार हे प्रकाश प्रकटनाचे द्वार आहे. येथून दररोज सत्तर हजार देवदूत आत प्रवेश करतात. पश्चिमेकडील द्वार हे हे प्रकाश विलुप्तीचे द्वार आहे. येथून ते देवदूत लुप्त होतात, आणि प्रलय काळापर्यंत पुन्हा दिसून येत नाहीत.

'सिद्रतुल मुंतहा' (स्वर्गातील सीमादर्शक बोरीचे वृक्ष) पण याच आकाशात आहे. संदिग्ध भाषेत हा असा एक वृक्ष आहे की, ज्याची पाने ही हत्तीच्या कानाएवढी आणि फळे ही माठासारखी असतात. सदाचारी लोक त्याची फळे सेवन करतात. त्यामुळे त्यांच्या मनातील कलुषता नाहीशी होते. त्याच्या पानांवर 'सुब्बूहुन क़ुद्दूसुन् रब्बुल मलायिकति - वर्रूहि' [विशुद्ध आहे आणि परम विशुद्ध आहे आमचा प्रभू आणि देवदूतांचा व आत्म्यांचा प्रभू !] असे लिहिलेले आहे. मानवाची कर्मे येथे समाप्त होतात. याच कारणास्तव याचे नाव 'सिद्रतुल मुंतहा' म्हणजेच 'शज्रतुल' मुंतहा अर्थात शेवटचे वृक्ष ठेवण्यात आले आहे. कारण प्रेषित मुहम्मद[स.] यांच्याखेरीज. इतर सर्वांसाठी - महादूत जिब्रईलसाठी पण ही शेवटची हद्द आहे. त्याच्यापुढे जाण्यास इतर कोणालाच परवानगी नाही व कोणाचे धाडसही पण होत नाही. म्हणून ईश्वरानेच आखलेली ही लक्ष्मण रेषाच आहे !

**१२) ज़ाद (ض) : ज़ [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'अलीम' म्हणजेच परमज्ञानी, ज्ञानस्त्रोत आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-मुश्तरी' म्हणजे गुरू आहे. याचे नक्षत्र 'सर्फ़:' वा 'जबह' म्हणजे उत्तरा फाल्गुन आहे.

दुसऱ्या क्रमांकाच्या आकाशाचा ग्रह गुरू आहे. वार त्याचा गुरूवार आहे. दैवी वाणी प्रज्ञान ('वही'), सुखकर्ता व विघ्नहर्ता दैवी शक्ती ('इल्का'), दैवी प्रेरणा - अंत:स्फुरण ('इलहाम') आणि विज्ञानांच्या अंत:करणांना ज्ञान, विद्या, सद्गुणांनी जीवंत ठेवणे, हे नाव आणि या आकाशाशी संबंधित आहेत. चरितार्थ किंवा उपजीविका पोहोचविणे आणि आजाऱ्यांना आजारमुक्त करणे पण याच्याशीच संबंधित आहेत. प्रेषित मूसा यांचे हे निवासस्थान आहे आणि मीकाईल देवदूत येथील वेताळ (मुवक्किल) आहेत.

**१३) लाम (ل) : ल [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'क़ाहिर' म्हणजेच प्रकोपी असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-मिरीख़ म्हणजे मंगल (ग्रह) आहे. याचे नक्षत्र 'अव्वा' म्हणजे हस्त आहे.

तिसऱ्या आकाशाचा हा ग्रह आहे. मंगळवार हा त्याचा वार आहे. (दिवस आहे.) प्रेषित हारून आणि प्रेषित यहिया हे येथे स्थायिक आहेत. हे आकाश ईश्वराचे माहात्म्य आणि त्याचा प्रतिशोध प्रवृत्तीचे द्योतक

आहे. सुदूर (फार लांब) असलेल्यास जवळ करणे, अव्यक्तास व्यक्त करणे, मनामध्ये श्रद्धा बिंबवणे, श्रद्धाहीनांचा बेमालूमपणे (रीतीने) नि:पात करणे आणि त्यांचा बदला घेणे आणि प्राण हरण करणे येथील देवदूतांची उपासना आहे. देवदूत इज्राईल हे येथील उपासक आहेत. तलवारबहाद्दर आणि बदला घेणाऱ्यांना मदत करणे ही त्यांची आत्मिक शक्ती आहे आणि ते त्यांचे वेताळ (मुवक्किल) आहेत की ज्यांची मदत करण्याचा परमेश्वराचा इरादा करतो.

**१४) नून (ن) : न [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'नूर' म्हणजेच प्रकाशरूप आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-शम्स' म्हणजे रवि (ग्रह) आहे. याचे नक्षत्र 'सिमाक आज़ल' म्हणजे चित्रा आहे.

चौथ्या आकाशाचा ग्रह रवि आहे. त्याच्यामध्ये प्रचंड प्रमाणात प्रकाशाची शक्ती आहे. तो जगास प्रकाशमान करतो. हे आकाश सर्व आकाशांच्या केंद्रस्थानी आहे. पृथ्वी व आकाशाचा हा केंद्रबिंदू आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्याला ऊर्ध्वस्थान म्हणून संबोधले आहे. प्रेषित इद्रीस व सुलेमान, दाऊद व जर्जीस आणि बरेच संदेष्टे आणि स्थिरचित्त लोक (संयमी, निग्रही लोक) येथील निवासी आहेत. मुहम्मदी स्थळांपैकी हे एक स्थळ आहे. दिवस याचा रविवार आहे आणि येथील वेताळ (मुवाक्किल) देवदूत इस्राफ़ील हे आहेत. दैवी गुह्यांचे प्रकाशाचे अवतरण होण्याची ही जागा आहे. उच्च-नीचता, आकुंचन व प्रसरण, सर्वोच्च आकाशापासून ते रसातळापर्यंतच्या सर्व कार्यभाराची जबाबदारी येथील देवदूतांवर आहे.

**१५) रे (ر) : र [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'मुसव्विर' म्हणजेच रूपनिर्माता आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-ज़ुहरा' म्हणजे शुक्र आहे. याचे नक्षत्र 'सफर:' म्हणजे स्वाती आहे.

पाचव्या आकाशाचा ग्रह शुक्र आहे. दिवस याचा शुक्रवार आहे. प्रतिकृती जगाचे हे ठिकाण आहे. प्रेषित यूसुफ़ यांचे स्थळ आहे. येथील वेताळ (मुवाक्किल) सुराईल हे आहेत. याचे देवदूत धावा करणाऱ्यांना प्रतिसाद देतात. हे मातेच्या गर्भात जन्मणाऱ्या बाळाचे स्वरूप निर्धारित करतात. दैवी वाणी, मुलांचे संगोपन आणि शिक्षण, दु:खितांना दिलासा, स्नेह व प्रेम निर्माण करणे, प्रेमी युगुलांच्या अंत:करणात प्रेमाग्नी भडकविणे व त्यांच्या मनात प्रेमास्वादाचे रूप सुरक्षित ठेवणे व त्यांचा संदेश पोहोचविणे ही कामे या देवदूतांवर सोपविण्यात आली आहेत.

**१६) तोय (ط) : त [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'मुहसी' म्हणजेच परिवेष्टक असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-उतारद' म्हणजे बुध (ग्रह) आहे. याचे नक्षत्र 'ज़बाना' म्हणजे विशाखा आहे.

सहाव्या आकाशाचा ग्रह बुध आहे. हा आकाशाचा रेखाटक आहे. दिवस याचा बुधवार आहे. प्रेषित नूह याचे निवासस्थान आहे. येथील वेताळ नुहाईल आहे. बऱ्या वाईटाचा हिशोब, ज्ञानदान, प्रेम प्रकाशाकडे मार्गदर्शन आणि आत्म्यांना शरीरामध्ये वसविणे या आकाशाशी संबंधित आहे.

**१७) दाल (د) : द [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'मुबीन' म्हणजेच सुस्पष्ट व्यक्त आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'फलक-ए-क़मर' म्हणजे सोम (ग्रह) आहे. याचे नक्षत्र 'इक्लील' म्हणजे अनुराधा आहे.

सातव्या आकाशाचा म्हणजेच जगाच्या आकाशाचा ग्रह सोम (तारा चंद्र) हा आहे. दिवस त्याचा सोमवार आहे. प्रेषित आदम यांचे निवासस्थान आहे. इस्माईल हे येथील वेताळ आहेत. पृथ्वीची आकाशाशी तोच संबंध आहे, जो शरीराशी आत्म्याचा संबंध आहे. पृथ्वीच्या योजनेचा तो विश्‍वस्त आहे. भाग्यासंबंधी द्रष्टेपणा याच्याच साहाय्याने प्राप्त होतो.

**१८) ते (ت) : त [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'क़ाबिज़' म्हणजेच अधिष्ठाता व्यक्त आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'कुर्र-ए-ऩार' किंवा 'कुर्र-ए-ऐसर' म्हणजे तेज महाभूत आहे. याचे नक्षत्र 'क़ल्ब' म्हणजे ज्येष्ठ किंवा ज्येष्ठा आहे.

तेज महाभूत आणि तदंतर्गत सर्व काही जे आहे ते उष्णतेचे समष्टिगत रूप आहे. उष्ण असल्यामुळे यापासून उष्णतेचा लाभ इतरांना होतो.

**१९) ज़े (ز) : ज़ [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'हय्यी' म्हणजेच चैतन्य आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'कुर्र-ए-हवा' म्हणजे वायू महाभूत आहे. याचे नक्षत्र 'शौल:' म्हणजे मूला वा मूल आहे.

अर्थात वायू महाभूत आणि त्यामध्ये जे काही आहे ते सर्व म्हणजे शीतलता, ओलसरपणा आणि उष्णता ह्या गुणांपासून हा महाभूत सजीव प्राण्यांचा जीवनाधार आहे.

**२०) सीन (س) : स [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'मुह्यी' म्हणजेच जीवनदाता आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'कुर्र-ए-आब' म्हणजे आप महाभूत आहे. याचे नक्षत्र 'नआयम' म्हणजे पूर्वाषाढा आहे.

सर्वश्रेष्ठ परमेश्‍वराने प्रत्येक वस्तूस पाण्यापासून उत्पन्न केले आहे. म्हणजे आप महाभूत. जसे की पवित्र कुराणात तो निवेदन करतो – 'आणि आम्ही पाण्यापासून प्रत्येक सजीवाची निर्मिती केली आहे.' – २१. सूरतुल् अंबिया : ३०.

**२१) सॉद (ص) : स [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'ममैत' म्हणजेच मृत्युदाता आहे. याचे पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'कुर्र-ए-अरज' किंवा 'कुर्र-ए-खाक' असे आहे. म्हणजेच पृथ्वी महाभूत आहे. याचे नक्षत्र 'बलआ' म्हणजे उत्तराषाढा आहे.

अर्थात पृथ्वी महाभूत हे मृत्युस्थळ आहे आणि अधिकांश प्राण्यांना यामध्ये आराम नसतो.

**२२) ज़ोए (ظ) : ज़ [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'अज़ीज़'– प्रबळ आहे. पाल्य स्वरूपातील भौतिक नाव 'मादनियात' म्हणजे खनिजे आहे. याचे नक्षत्र 'सादुज़ाबिह' म्हणजे श्रावण आहे.

हे पदार्थ लोकांसाठी बहुमुल्य आहेत. म्हणजेच बहुमुल्य पदार्थ येथे आढळून येतात.

**२३) से (ث) : स [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'रज़्ज़ाक' म्हणजे अन्नदाता आहे. याचे पाल्य स्वरूपातील **भौतिक** नाव 'नबातात' म्हणजे उद्‌भिज किंवा वनस्पती आहे. याचे नक्षत्र 'साद-ए-तबा' म्हणजे दहिष्णुत किंवा धनिष्ठा आहे.

वनस्पतीमध्ये अन्न आहे प्राण्यांसाठी. किंबहुना अन्नदाता (रज़्ज़ाक) याने या नामांतर्गत प्रत्येक प्रकारची उपजीविका ठेवली आहे. प्रत्येकाच्या संगोपनाची व्यवस्था उपजीविकेमध्ये असते आणि सर्व प्रकारच्या वनस्पती या याच नामाचे प्रकटीकरण आहेत. तर दृश्य वा अदृश्य स्वरूपातील सर्व उपजीविका वनस्पती पुरवठा करू शकतात. म्हणून तर जडीबुटींमध्ये सुद्धा परमेश्वराने फार मोठे सामर्थ्य ठेवले आहे.

**२४) ज़ाल (ذ) : ज़ [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'मुज़िल' म्हणजे पराभूतकारी आहे. याचे पाल्य स्वरूपात **भौतिक** नाव 'हैवानात' म्हणजे प्राणी आहे. याचे नक्षत्र 'सादुस्सऊद' म्हणजे बृहस्पती किंवा शतभिषा किंवा शततारका हे आहे.

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने इतर सर्व प्राण्यांना मानवाच्या सेवेसाठी अप्रतिष्ठित केले आहे. त्याच्या अधीन केले आहे. हिंस्र पशू पण प्राण्यांमध्ये समाविष्ट आहेत आणि ते 'मुज़िल' (पराभूतकारी) या नामांतर्गत अधीन आहेत.

**२५) फ़ा (ف) : फ़ [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'क़व्वी' म्हणजे प्रबळ शक्तीशाली आहे. याचे पाल्य स्वरूपातील **भौतिक** नाव 'मलायका' म्हणजे देवदूत आहे. याचे नक्षत्र 'सऊदुल अख़बियः' म्हणजे पूर्वा भाद्रपद आहे.

देवदूतांना सर्वश्रेष्ठ परमेश्वराने शक्तिशाली बनवले आहे.

**२६) बा (ب) : ब [बिंदुयुक्त]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'लतीफ' म्हणजे सूक्ष्मदर्शी आहे. याचे पाल्य स्वरूपातील **भौतिक** नाव 'जिन्नात' म्हणजे दैवते, यक्षयोनी किंवा किन्नर आहे. याचे नक्षत्र 'वाली' म्हणजे उत्तरा भाद्रपद आहे.

यक्षयोनी वा किन्नर हे सूक्ष्म शरीरधारी असतात, आणि ते दिसून येत नाहीत. - दिसत नाहीत.

**२७) मीम (م) : म [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'जामेअ' म्हणजे सर्वनिधान असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील **भौतिक** नाव 'इन्सान-ए-नाक़िस' म्हणजे सामान्य मानव आहे. याचे नक्षत्र 'मुक़ख़र' म्हणजे रेवती आहे.

मानव हा आध्यात्मिक दैवी नावे आणि लौकिक वास्तवतेचा समष्टिरूप असतो - आहे. तो जगाचा आत्मा असतो - आहे.

**२८) वाव (و) : व [बिंदुहीन]**

याचे पालक स्वरूप दैवी नाव 'रफ़िउदर्जात' म्हणजेच उत्तुंग प्रतिष्ठा असे आहे. याचे पाल्य स्वरूपातील **भौतिक** नाव 'इन्सान-ए-कामिल' म्हणजे बहुगुण संपन्न प्रतिष्ठा असलेला मानव म्हणजेच पुरुषोत्तम किंवा नरोत्तम असे आहे. याचे नक्षत्र 'रिशा' म्हणजे अभिजित आहे.

या समष्टिचा संकेत आहे 'हक़ीक़त-ए-मुहम्मदिया' अर्थात् मुहम्मदीय वास्तविकतेकडे हा 'हक़ीक़त-ए-इन्सानिया' म्हणजेच मानवी वास्तविकतेपेक्षा अधिक उच्च आणि श्रेष्ठ आहे. हा सर्वश्रेष्ठ मानव म्हणजेच महामानव असतो. यालाच पुरुषोत्तम किंवा नरोत्तम असे म्हणतात.

भारतीय नक्षत्र विज्ञान वा ज्योतिष शास्त्रानुसार एकूण उपरोक्त प्रथम २७ नक्षत्रे मान्य आहेत – ग्रहीत आहेत. परंतु मुसलमान लोक, अरबीमधील मान्य अशी २८ नक्षत्रे मानतात. म्हणून अठ्ठाविसाव्या नक्षत्राचे अरबीमध्ये नाव आहे 'रिशा'. यालाच 'बैतुलहूत' पण म्हणतात. याचे भारतीय समानार्थी नाव आहे 'अभिजित'.

### ३) अरबी वर्णाक्षरांचे सूफ़ी तत्त्वज्ञानप्रणीत विवेचन

#### क) बिंदुमात्र (ज़ात बुहत) म्हणजेच विशुद्ध परम सत्ता

'नुक़्ता' अर्थात बिंदू म्हणजे ज्याचे विभाग, अंग वा अवयव होऊ शकणार नाहीत म्हणजेच त्याचे कोणतेच परिमाण नसेल आणि तिची दशा व अवस्था आणि अल्पाधिकता व त्रुटी संबंधी काहीच सांगता येणार नाही. मात्रा किंवा परिमाण त्यास म्हणतात की जे कमी जास्त होऊ शकते. अंततः बिंदु तो आहे जो मात्रा वा परिमाणापासून मुक्त आहे. त्यामध्ये ना वाढ होते नी कमी येते.

त्या विशुद्ध परम सत्तेचा अर्थ उघड होऊ दे, किंवा अक्षर-विन्यासामध्ये प्रकट होऊ दे, अथवा अंतरंगामध्ये स्पष्ट किंवा अस्पष्ट असू दे, कोणत्याही वैभवामध्ये किंवा रंगामध्ये असू दे आणि कोणत्याच रितीने किंवा पद्धतीने असू दे, तिचे वास्तव आणि मूळ यामध्ये परिवर्तन आणि बदल होत नाही. अंततः उद्देशाचे वास्तव आणि मूळ यामध्ये परिवर्तन आणि बदल होत नाही. शब्द 'नुक़्ता' म्हणजेच बिंदूपासून जटिल समस्येचे निराकरण होऊ शकत नाही – झाले नाही. म्हणून संकेताकडे वळून म्हटले गेले की बिंदू ती वस्तू – ते तथ्य आहे की जिचे काहीच – मुळीच परिमाण वा मात्रा नसते. म्हणजेच ती परमसत्ता तन्मात्राविहिन आहे. त्या सत्तेचे बिंदु स्वरूपातील अवस्था ही वर्णनातीत – शब्दातीत अशी आहे. तद्वत ती संकेतामध्ये बंधन-सापेक्ष (पण) दिसत नाही. यावरून सिद्ध होते की याचे ज्ञान आणि याची व्याख्या यासाठी परमेश्वराचे ते वचनच पुरेसे आहे की – ''काय तुझा प्रभू (तुझ्यासाठी) पुरेसा नाही की जो प्रत्येक वस्तूचा द्रष्टा व साक्षी आहे?'' ज्ञानप्राप्ती म्हणजे ऐन (प्रत्यक्ष) अज्ञानच ! विवश होऊन या निष्कर्षाप्रत पोचावे लागते की 'नुक़्ता' अर्थात बिंदूस काहीच परिमाण नसते. त्याची कोणतीच मात्रा नसते. म्हणजेच तो काहीच नाही. ''लैस बिशैयुँ'' म्हणजेच तत्सम कोणतीच वस्तू नाही हे विधान चरितार्थ ठरते. तोच अ-पदार्थ आहे, तोच पदार्थ आहे, तोच कःपदार्थ आहे, तोच नाही, तोच आहे, तोच निरस्तित्व आहे. तोच अस्तित्व आहे, अदृश्य तोच, दृश्य तोच. म्हणूनच तो अनुमान, तर्क आणि विचार व अनुभूती यांपासून मुक्त आणि निरपेक्ष आहे आणि तोच परम,-शून्य-स्थल म्हणजे 'वरा-उल्-वरा' आहे. कारण की तो सर्वांसाठी मूळांचा मूळ आणि निरपेक्ष आहे आणि ऐन – साक्षात, एकतत्त्व ('वहदत') आहे. नाही ('ला') पण तोच आणि आहे ('इल्ला') पण तोच. ज्याप्रमाणे तो काही आहे पासून विशुद्ध आहे त्याचप्रमाणे काही नाही पासून मुक्त आहे.

*''ला व इल्ला हर दो लफ़्ज़ी साख़्तंद*

*ख़ल्क़ रा दर दामे वहम अंदाख़्तंद ।।''*

म्हणजेच 'नाही' आणि 'आहे' हे दोन शब्द निर्माण झाले आहेत. त्यामुळे लोक भ्रमाच्या जाळ्यामध्ये फसलेले आहेत. लोक बुचकळ्यात पडले आहेत.

*''न तू दर हेच मकानी, न मकानी ज़ तू ख़ाली''*

अर्थात तू कोणत्याही स्थळी नाहीस, (आणि) कोणतेच स्थळ (ठिकाण) तुझ्याशिवाय मोकळे नाही.

निष्कर्ष हे की हाती काहीच लागत नाही. जे काही नाही, तोच बिंदू आहे; आणि जो बिंदू आहे, तो काहीच नाही म्हणजे जे काही नाही तेच आहे, आणि जे आहे तेच काही नाही.

ना तू आहेस ना नाहीस; आहे पण आणि नाही पण; अव्यक्त पण आणि व्यक्त पण; होकार पण आणि नकार पण; ज्ञात पण आणि अज्ञात पण तोच. प्रत्येक बोध आणि विचार; प्रत्येक वचन आणि वस्तुस्थितीचे मुळाचे मूळ आणि साक्षात तोच (बिंदूमात्र) आहे.

अंततः 'बिंदू' ('नुक्ता') तो आहे, जे काही नाही म्हणजेच प्रत्येक वस्तू (गोष्टी) चे अस्तित्व काहीच नाहीच्या माध्यमाने कायम आहे, ते वास्तविक याच काही नाहीची अभिव्यक्ती (प्रकटीकरण) आहे. ''कुछ नहीं सब कुछ है यारो और सब कुछ कुछ नहीं।'' यावरून सिद्ध होते की जेथे पहावे, जिकडे दृष्टी वळवावी, जिच्यासंबंधी विचार करावे, ते म्हणजे बिंदु ('नुक्ते') चे अस्तित्व व्यक्त, स्पष्ट आणि परिचित स्वरूपात आहे. बिंदुच्या आडव्या सरळ प्रसरणामुळे रेषा निर्माण झाली म्हणजे केवळ लांबी (आयाम) आणि रेषेच्या गतिपासून – हालचालीपासून वरचा थर आणि थरापासून शरीर (देह) निर्माण झाले. शेवटी ('बिंदू') हा या सर्वांच्या अस्तित्वाच्या मुळाशी आहे, आणि रेषा, वरचा थर आणि शरीर, प्रत्येक ठिकाणी बिंदुच बिंदु आहे. सुरुवात पण बिंदु आणि शेवट पण बिंदूच.

अंततः नास्ति (विध्वंस) प्रत्येक अस्ति आणि तिच्या अस्तित्वाचा स्त्रोत आहे, आणि स्वतः काहीच नाही, परंतु जे काही आहे, त्यापासूनच आहे. जेव्हा थरावर बिंदुचे निशाण बनविले गेले, तेव्हा हा शब्द काही नाहीच्या वैभवापासून निघून काही असूनही पण ऐन काही नाहीच्या वैभवामध्ये प्रविष्ट आणि विद्यमान आहे. कारण की ''आहे'' आणि ''नाही'' (या) सर्वांमध्ये बिंदूचे अस्तित्व सिद्ध आहे. जे काही आहे, तोच बिंदू, आणि जे काही (च) नाही तोच बिंदू आहे. म्हणूनच बिंदुच बिंदू. सर्व काही बिंदू, सर्वच बिंदूपासून, सर्वच बिंदुमध्ये सर्व बिंदुसह, सर्वच बिंदुहीन. जो आहे, तोच नाही, आणि जो नाही तोच आहे. असे बिंदु (दर्शना) चे पाच टप्पे आहेत. बिंदु म्हणजे तिळाच्या आत पर्वत, बीजामध्ये वृक्ष, संपूर्ण सृष्टीने, अस्तित्वाच्या या बिंदुपासून म्हणजे विशुद्ध सत्ते ('ज़ात बुहत') पासून, ज्याला काहीच नाही म्हणतात, (त्याने) अस्तित्व आणि अभिव्यक्ती प्राप्त केली म्हणजेच अनेकतेमध्ये एकतेचे दर्शन ! आणि एकतेमध्ये विविधता दडलेली आहे. जसे, ज्याला ब्रह्मांड ('ख़फ़ी-उल-ख़फा') आणि त्रिवेणी ('मकाम-ए-मेहमूद') म्हणतात, तसेच तत्त्ववेत्ते ज्याला 'केंद्रक' (Focus) म्हणतात, त्या डोक्यामधील मेंदूच्या शंकास्पद जागेच्या बिंदुमध्ये समस्त ब्रह्मांडाची विविध रूपे समाविष्ट असून नेत्र-बिंदुने त्यांची यातायात (रहदारी) दिसते. सर्व वस्तुमात्रांमध्ये तो बिंदु आणि त्या बिंदुमध्ये सर्व वस्तुमात्रांचा समावेश असतो. जसे, वृक्षांमध्ये बीज, आणि बी मध्ये वृक्ष अंतर्भूत असतो,

विद्यमान असतो. हा बिंदुच अंत:करणाचा आधार आहे, हाच बिंदू प्रेम आणि प्राण याचे वास्तव्य आहे. याचप्रमाणे विशुद्ध परम सत्ते ('ज़ात बुहत') चा (पण) बिंदु आहे, की ज्यामध्ये संपूर्ण ब्रह्मांड लपलेले आहे. वास्तवतेचा आरसा, मुहम्मदी वास्तवतेच्या आड, मानवी वास्तव इत्यादीवर नाना स्वरूपात स्थिर करतो आणि (या) वृत्तांताची दशा ही आहे की तोच परम विशुद्ध सत्तेचा बिंदू प्रत्येक वस्तूमध्ये स्वत:च विद्यमान आणि अव्यक्त पण आहे, मग तोच काही नाही जो सर्व काही आहे.

*''तौबा कर्दम जांचे गुफ़्तम जांकि नीस्त*
*दर सख़ुन मानी व दर मानी सख़ुन ।।''*

म्हणजे ज्याचे अस्तित्व नाही त्याबद्दल मी बोललो, यास्तव मी पश्चाताप व्यक्त करतो शब्द सार्थक असतात. (शब्दामध्ये अर्थ असतो.) आणि अर्थ (आत्म्यासह) शब्दमय (शरीर धारण करतात) असतात.

''अव्वलु मा ख़लक़ अल्लाहु नूरी ('ज़हूर-ए-नुक़्ता')

हे प्रथम प्रकटीकरण आहे. या परिसीमेस बिंदुदर्शन असे म्हणता येईल.

''अना मिन्नूरि अल्लाहि व कुल्लु शैयुँ मिन् नूरी'' ('कस्रत-ए-नुक्ता')

हे द्वितीय प्रकटीकरण आहे. या परिसीमेस बिंदू वैविध्य असे म्हणता येईल.

**ख) बिंदु महात्म्य**

ब्रह्मांडा (विश्वा) मधील सूक्ष्मातिसूक्ष्म स्वरूप परमाणुचे असते. हा सर्वात लहान घटक होय. हा नाद स्वरूपी असतो. यामध्ये प्रचंड शक्ती, अचाट शक्ती सामावलेली असते. हा विस्फोटक असतो. परमाणुच्या विध्वंसकारी शक्तीचे प्रत्यंतर म्हणजे दुसऱ्या महायुद्धामध्ये अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर केलेला विध्वंसक अणुबॉंब वर्षाव होय. परमाणुमध्ये अशी महाभयंकर शक्ती सुप्त स्वरूपात असते. परमाणु म्हणजे एक अतिसूक्ष्म बिंदुच ! बिंदु हा भाषेचा परमाणुच होय !

जन्मल्याबरोबर मानवी शिशुचे रडणे म्हणजे हा वाणीचा प्रथम आविष्कार होय. बाह्य विश्वामध्ये नाना रूपांनी प्रकट असलेल्या परमेश्वराशी संवाद, संपर्क आणि एकवाक्यता साधण्यासाठी मानवास मिळालेली यंत्रणा म्हणजे ध्वनीच्या माध्यमातून बोलण्याची सोय होय यालाच 'नाद' म्हणतात. हाच नाद, हेच स्पंदन संपूर्ण विश्वात भरलेले असते. या नादातून सर्व विश्वाची उत्पत्ती झाली असे समजले जाते.

अखिल ब्रह्मांडामध्ये अनाहत नाद व्यापलेले आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीमधून याची अभिव्यक्ती होते, त्यास 'नाद' असे म्हणतात. शास्त्रामध्ये ज्याला प्रणव किंवा ओंकार म्हणतात, तेच उपाधि-रहित शब्द-तत्त्व आहे. शब्द याचा शाब्दिक अर्थ ध्वनि संकेत असा आहे. अध्यात्माच्या मते संपूर्ण जीवसृष्टीच्या प्रत्येक घटकात अंतर्भूत असणारे हे ध्वनितरंग आहे. हा ध्वनि स्वत: उत्पन्न होतो. याला घर्षणाची आवश्यकता नाही. जीव आणि ईश्वरातील संपर्काचे हे माध्यम आहे. हा ध्वनी म्हणजे साक्षात अंत:करणातील आवाज होय. तो अनुभवला जाऊ शकतो. थोडक्यात, प्रत्येक जीवाला प्राप्त झालेला हा ईश्वरी अंशच आहे. म्हणूनच म्हटले जाते, शब्द ब्रह्म आहे.

मानवामध्ये एक अलौकिक शक्ती आहे. ती शक्ती म्हणजे वाणीचे वरदान. वाणीचे वरदान फक्त माणसासच प्राप्त आहे. याच वाणीच्या वरदानामुळे मानव समाजाने उन्नती गाठली आहे. म्हणूनच मानव हा

सृष्टीचा मुकुटमणि गणला जातो. शिवाय लिपीच्या वरदानामुळे त्याने भाषेस स्थायित्वाच्या पराकाष्ठेस पोहोचविले आहे. शिवाय भाषा मनुष्य-जीवनाचे मेरूदंड आहे. ती मानवी संस्कृतीचे ध्रुवालंबन आहे.

तसे पाहता भाषा म्हणजे शब्दांचा खेळ होय. ध्वनी आणि अर्थ यांची सांगड रचनेद्वारा घालणारी यंत्रणा म्हणजे भाषा. शब्दाची स्पष्ट शब्दांमध्ये व्याख्या करणे कठीण आहे. महाभाष्यकार पतंजलि यांच्या मतानुसार "शब्द कानाने प्राप्त, बुद्धिद्वारे ग्राह्य आणि प्रयोगाने स्फुरित होणारा आकाशव्यापी ध्वनि आहे." प्रसिद्ध भाषावैज्ञानिक ब्लूमफिल्ड यांच्या मते "शब्द लघुतम मुक्त रूप आहे." शब्दांचे घटक अक्षर असतात. अक्षर भाषेचे एक मूलभूत उच्चारणात्मक आणि प्रसरणिक एकक असते. कारण की हा एकाच श्वासोच्छवासामध्ये उच्चरित होतो. मुळाक्षरे किंवा वर्णाक्षरे भाषेच्या लिखित स्वरूपामधील घटक असतात.

सूफ़ी तत्त्वज्ञान मुळात अरबी-फारसी भाषेमध्ये आहे. म्हणून त्या भाषांचे - विशेषतः अरबी भाषेच्या वर्णाक्षरांची तोंडओळख करून घेणे आवश्यक आहे. अरबी भाषेची भाषिक दृष्टीने प्रचलित वर्णमाला पृष्ठ क्रमांक १३२१ वर कोष्टकामध्ये दिलेली आहे. याता आपण तिची तोंडओळख करून घेऊ या.

अरबी वर्णमालेवर दृष्टिक्षेप केल्यास आपणास असे आढळून येईल की ती रेषा आणि बिंदुंनी युक्त अशी आहे. आडवी, उभी आणि वक्र रेषांनी युक्त अक्षरे आहेत. काही गोलाकार आणि अर्धगोलाकार अशी अक्षरे आहेत. काही बिंदुधारी अक्षरे आहेत. त्यांपैकी काही एक बिंदुधारी, काही दोन बिंदुधारी, तर काही तीन बिंदुधारी अक्षरे आहेत. या सर्व घटकांचे प्रातिनिधिक स्वरूप धारण करणारी वर्णाक्षरे त्यांचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान स्पष्ट करण्यास पुरेसे आहेत. म्हणून उभी रेषा धारण करणारे सर्वप्रथम वर्णाक्षर 'अलिफ़' ( ا ), तर आडवी रेषा धारण करणारे सर्वप्रथम अक्षर 'बा' (ب) तसेच बिंदुधारी वर्णाक्षरांमधून आद्य एकच बिंदु धारण करणारे सर्वप्रथम वर्णाक्षर 'बा' (ب) आणि सर्वात शेवटचे वर्णाक्षर 'नून' (ن) यांचे कूट विवेचन पुरेसे आहे. ही वर्णाक्षरे प्रातिनिधिक आहेत.

ब्रह्मांडामध्ये स्फोट स्वरूपात जो सर्वप्रथम ध्वनी निर्माण झाला तो 'ॐकार' होय. हा बिंदुपासून निर्माण झालेला आहे. 'मूर्ति लहान, पण कीर्ति महान !' अस्तित्वाचे सर्व प्रथम दृश्यरूप म्हणजे सूक्ष्म बिंदु होय. विश्वनिर्मिती, विश्वविकास आणि विश्वाचे सातत्य यामध्ये बिंदुचाच विचित्र खेळ आहे. कारण सर्व सजीवांचे सातत्य बिंदूमुळेच टिकून आहे.

वंशनिर्मिती, वंशसातत्य आणि वंशवृद्धीसाठी परमेश्वराने प्राणिमात्रांमध्ये - सर्व सजीवांमध्ये एका बिंदुचीच व्यवस्था करून ठेवली आहे. तो बिंदु म्हणजे क्षुल्लक वीर्यबिंदु होय. सक्षम वीर्यबिंदुमुळेच गर्भधारणा होते व तिचे रूपांतर यथासमय प्रजोत्पत्तीत होते, आणि त्या त्या प्रजातिमध्ये वाढ होते. वीर्यबिंदुचे महत्त्व विशद करताना सूफ़ी वाङ्मयामध्ये म्हटले गेले आहे की, वीर्यबिंदु हा विश्वात्म्या ('आफ़ाक') चा आत्मा आहे. पहा एक साधारण क्षुल्लक बिंदुचा केवढा मोठा महिमा आहे ! विश्वात्मा हा प्रकाश आणि मूल द्रव्ये (मूल तत्त्वे) यांचा संयुग आहे आणि त्यापासूनच तीन मूल द्रव्ये निर्माण होतात. यापैकी कुणामध्येच अनुभूती नाही. मूलद्रव्ये अनुभूतीशून्य असतात. पूर्वोक्त विवेचनात सांगितल्याप्रमाणे ईश्वराने वाणीचे म्हणजे ध्वनींचा सवाक् प्रयोग, वाणीच्या उद्भवाचे टप्पे असे आहेत -

उत्कंठा, (लालसा)→वांछा→इच्छा→संकल्प→विचार→बोध (बोधि)→प्रेममय →प्रक्षुब्धता→वाणी

## अरबी वर्णाक्षरमाला

| क्रमांक | अरबी वर्णाक्षर | समोच्चारित देवनागरी वर्णाक्षर |
|---|---|---|
| १ | ا | अ |
| २ | ب | ब |
| ३ | ت | त |
| ४ | ث | स़ |
| ५ | ج | ज |
| ६ | ح | ह |
| ७ | خ | ख़ |
| ८ | د | द |
| ९ | ذ | ज़ |
| १० | ر | र |
| ११ | ز | ज़ |
| १२ | س | स |
| १३ | ش | श |
| १४ | ص | स़ |
| १५ | ض | ज़ |
| १६ | ط | त़ |
| १७ | ظ | ज़ |
| १८ | ع | अ़ |
| १९ | غ | ग़ |
| २० | ف | फ़ |
| २१ | ق | क़ |
| २२ | ك | क |
| २३ | ل | ल |
| २४ | م | म |
| २५ | ن | न |
| २६ | و | व |
| २७ | ه | ह़ |
| २८ | ى | य |

### ग) बिंदुचे मंडान आणि त्याच्या विविध श्रेणी

बिंदुचा मथितार्थ असा आहे की बिंदुपासून संपूर्ण मंडान – ब्रह्मांड प्रगट झाले आणि त्या बिंदुच्या पाच श्रेणी उत्पन्न (निर्माण) झाल्या. सर्वप्रथम बिंदु होता. मग त्याचे अलिफ़ (अ) मध्ये रूपांतर झाले, आणि 'अलिफ़' (अ) चे ज़ेर (इकार) झाले आणि त्या ज़ेरचे ज़बर (अकार) झाले आणि त्या ज़बरचे पेश (उकार) झाले आणि त्या पेशचा अलिफ़ (अ) बिंदु स्वरूपात संग्रहित झाला (तो संग्रह म्हणजे पवित्र कुरआन) पवित्र कुरआनच्या पाच श्रेणी झाल्या. प्रथम शरीअत (कर्मकांड), द्वितीय तरीक़त (उपासना कांड – भक्तिकांड), तृतीय हक़ीक़त (मुक्तिकांड), चतुर्थ मारिफ़त (ज्ञानकांड, आणि पंचम तौहीद (एकेश्वरवाद). तौहीद (एकेश्वरवाद) च्या पाच श्रेणी आहेत. पहिली नासूत, (भूव:लोक), दुसरी मलकूत (देवलोक), तिसरी जबरूत (तप:लोक), चौथी लाहूत (सत्यलोक) आणि पाचवी हाहूत (कौमारलोक). हाहूतच्या पाच श्रेणी आहेत. पहिली ज़िब्रईल, दुसरी मीकाईल, तिसरी इस्त्राफ़ील, चौथी इज्राईल आणि पाचवी नूराईल. नूराईलच्या पाच श्रेणी आहेत. पहिली काफ़िर (श्रद्धाहीन), दुसरी मोमिन (श्रद्धावंत), तिसरी मुसलमान, चौथी इस्लाम (ईश्वर शरणागती), आणि पाचवी फ़कीर (निरासक्त). फ़कीर (निरासक्त) च्या पाच श्रेणी आहे. पहिली जिक्र जली (सस्वर जप, प्रकट जप), दुसरी ज़िक्र कल्बी (हृदयस्थ जप), तिसरी ज़िक्र रूही, (आत्मिक जप), चौथी ज़िक्र सिर्री (मर्म जप) आणि पाचवी ज़िक्र–ए–हक़ (नाम जप). ज़िक्र–ए–हक़च्या पाच श्रेणी आहेत. त्या अशा, पहिली नफ्स अम्मारा, (दुष्टात्मा, भ्रष्ट आत्मा), दुसरी नफ़्स मुल्हिमा (प्रशांत आत्मा, संतुष्ट आत्मा), तिसरी नफ़्स लव्वामा (दुषित करणारा आत्मा), चौथी नफ़्स मुल्हिमा (ईशप्रेरित आत्मा) आणि पाचवी नफ़्स नूरी प्रकाशमान आत्मा, कृपाशील विशुद्ध निरासक्त झाला. त्याच्यासाठी चार देहाच्या पाच श्रेणी झाल्या. त्या अशा – पहिली वाजिब–उल्–वजूद (स्थूल देह), दुसरी मुमकिन–उल्–वजूद (लिंग देह), तिसरी ममतन–अल्–वजूद (कारण देह), चौथी आरिफ़–उल्–वजूद (महाकारण देह), पाचवी नूरी खाली (विशुद्ध प्रकाशरूप सूक्ष्म देह), फ़कीर (निरासक्त). फ़कीर (निरासक्त) च्या पाच श्रेणी आहेत. पहिली जिस्म (देह) (शरीर), दुसरी जान (प्राण), तिसरी अक़्ल (बुद्धी), चौथी फ़हम (विवेक) आणि पाचवी ज़बान (जिव्हा). फ़ुक्र (निरासक्ती) च्या पाच श्रेणी आहेत. पहिले नाव दिव्य सिंहासना ('अर्श') वर एकच निरासक्तीचे ('फ़ुक्र–ए–अहद'), मग सृष्टीच्या सर्व वस्तू आणि प्राणी यांच्या प्रेमापासून आकाशावर एक तारा उदित झाला (उदय पावला) तो अधिनायक ('क़ुत्ब') च्या आत्म्यावर. नंतर मानवतेच्या डोक्यामध्ये होता. दुसरे नूर (प्रकाश) पासून अहमदचे नाव (निर्माण) झाले. (ते) आकाशावर आले. तेथून पित्याच्या माथ्यापासून अवतरित होऊन आईच्या पोटात होता (तो) आला. तिसरे त्याने अहमद हे नाव धारण केले. तेथून निघून पृथ्वीवर आला. चौथे त्याचे नाव 'रसूल' झाले. रसूल (महाप्रेषित) हा व्यक्त आणि अव्यक्ताची बातमी (वार्ता पोहोचविते) देतो. जसे की कुरआन शरीफ़ (पवित्र) त्यांच्यावर अल्लाह–परमेश्वराकडून अवतरित झाले आणि सर्वात उंच अशा आठव्या स्वर्गामध्ये दिव्य सिंहासना ('अर्श') वर ब्रह्मसूत्र ('कल्मा') लिहून घेऊन ईश्वराच्या सामर्थ्याच्या ग्वाहीसह लोकांना साक्षीस्वरूप ब्रह्मसूत्र वाचण्यास सांगितले आणि पाचवे नाव मुहम्मद[स.] हे झाले. 'कल्मा' (ब्रह्मसूत्र) असे आहे –

‘‘ला इलाहा इल्लल्लाह, मुहम्मदु रस्‌लुल्लाह’’

पूर्वार्ध — उत्तरार्ध

**भावार्थ :** अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही, मुहम्मद॰ हे त्याचे प्रेषित आहेत.

**विवेचन :** ‘ला’ अश्रद्धा (‘कुफ्र’) आहे; ‘इलाहा’ खंडन (‘नफ़ी’) आहे; ‘ इल्लल्लाह’ स्वीकृत कार्य (मुस्तहब) – पुनीत कर्म आहे; ‘मुहम्मद रस्‌लुल्लाह’ सहभागित्व (‘शिर्क’) आहे. शेष ‘हू’ म्हणजेच ‘अल्लाहू’ अर्थात परमेश्वराचे नाम-रूप (‘जात’ व ‘सिफ़ात’) (सत्ता व गुण) चे स्थान मंडन स्वरूप (‘असबात’) आहे.

**घ) अरबी वर्णाक्षरांच्या अध्यात्म निर्मितीमध्ये बिंदू (‘नुक़्ता’), ‘अ’ (‘अलिफ’) व ‘ब’ (‘बा’) च्या भूमिका**

अरबी वर्णमालेमध्ये सर्व प्रथम वर्णाक्षर ‘अलिफ़’ म्हणजे ‘अ’ असून द्वितीय वर्णाक्षर ‘बा’ आहे; तर सर्वप्रथम ‘नुक्ता’ म्हणजे बिंदूचे दर्शन ‘बा’ च्या अधोस्थानी घडते. दर्शनाच्या दृष्टीने पाहता ‘नुक्ता’, ‘आलिफ़’ आणि ‘बा’ हे तिन्ही, वर्णमालेमध्ये येणारी सर्वप्रथम अक्षरे आहेत. निर्मितीक्रमाच्या दृष्टीने पाहता ‘नुक्ता’ म्हणजे बिंदु आद्यस्थानी आहे. तर ‘आलिफ़’ म्हणजे ‘अ’ प्रथम स्थानी असून ‘बा’ म्हणजे ‘ब’ हा द्वितीय स्थानी आहे. अध्यात्म निर्मितीमध्ये मात्र ‘अलिफ़’ म्हणजे ‘अ’ ची केंद्रीय भूमिका आहे; तर ‘नुक्ता’ अर्थात बिंदुची प्रमुख भूमिका आहे.

अरबी वर्णमालेमधील एकूण २८ अक्षरांपैकी १४ अक्षरे कूटाक्षरांमध्ये प्रयुक्त आहेत; तर १४ नाहीत. कूटाक्षरांमध्ये प्रयुक्त वर्णाक्षरे आहेत –

ى ه ن م ل ك ق ع ط ص س ر ح ا = एकूण १४ अक्षरे.

उपरोक्त १४ वर्णाक्षरे कूट शब्द निर्मितीमध्ये उपयोगात आणली जातात. म्हणून यांना ‘हुरूफ़ नूरानी म्हणजेच प्रकाशमान वर्णाक्षरे, तेजोमय वर्णाक्षरे किंवा श्वेत वर्णाक्षरे म्हणतात. ती लक्षात ठेवण्यासाठी पुढील सूत्र उपयोगी ठरते–

**‘‘निस हकीम क़ातअ लह सर’’**

उपरोक्त सूत्रांतर्गत प्रयुक्त क्रमानुसार एकूण १४ त्रोटक वा कूट अक्षरे ही आहेत. १) नून (न), २) सॉद (स), ३) है (ह), ४) क़ाफ़. (क), ५) या (य), ६) मीम (म), ७) काफ़ (क़), ८) आलिफ़ (अ), ९) तोए (ता), १०) ऐन (अ) ११) लाम (ल) १२) हा (ह) १३) सीन (स) १४) रे (र).

उरलेले इतर १४ म्हणजे و ف غ ظ ض ش ز ذ د خ ج ث ت ب ही १४ (चौदा) अक्षरे आहेत.

‘हुरूफ़ जुल्मानी’ म्हणजेच अंधुक वर्णाक्षरे किंवा कृष्ण वर्णाक्षरे या नावांनी ओळखली जातात. कारण ही कूट शब्द निर्मितीसाठी कुचकामी आहेत. उपरोक्त यादीचे सूक्ष्म निरीक्षण केल्यावर आपणास असे आढळून येईल की, वर्णाक्षर ا ‘अलिफ़’ म्हणजे ‘अ’ आणि वणाक्षर ب ‘बा’ म्हणजे ‘ब’ हे आपापल्या गटामधील सर्व

प्रथमस्थानी आहेत. म्हणजेच ا 'अलिफ़' अर्थात 'अ' हे आद्य श्वेत वर्णाक्षर आहे; तर ب 'बा' अर्थात 'ब' हे आद्य कृष्ण वर्णाक्षर आहे. स्थान क्रमाच्या दृष्टीने पण दोघांचे प्रमुखत्व दृष्टव्य आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या प्रमुख भूमिका पण लक्षणीय आहेत; हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईलच.

मात्र तत्पूर्वी विश्वोत्पत्ती प्रक्रियेची उजळणी करणे आवश्यक वाटते. म्हणून उपनिषद्‌प्रणीत विचारांनुसार, विश्वोत्पत्तीपूर्वी परमात्मा एकटाच होता. त्याच्याशिवाय काहीच नव्हते. त्याने विचार केला की, आपण अनेक व्हावे. हा संकल्प उठल्यावर परमात्म्याची जी अवस्था तिलाच ईश्वर म्हणतात. या ईश्वराने नंतर पंचमहाभूते निर्माण केली. या पंचमहाभूतांच्या सहाय्याने अनेक प्राणी, तसेच जड वस्तू निर्माण केल्या व प्राणीमात्रात त्याने जीवनरूपाने प्रवेश केला. ईश्वराचा जगत् उत्पन्न करण्याचा पहिला संकल्प म्हणजेच मूळ माया. हिलाच आदि माया म्हणतात.

ब्रह्मांड निर्मितीपूर्वी सर्जक, परमेश्वर हा अस्पृष्ट संपूर्ण सत्तास्वरूपात होता. त्याची विशुद्ध सत्ता म्हणजे केवल तत्त्व होय. हाच ब्रह्म होय. तो अगम्य आहे. त्याची व्याख्या केली जाऊ शकत नाही. त्याच्यासंबंधी आपण फक्त नास्तित्वाची विधाने करू शकतो. त्याच्या आविष्कारद्वाराच आपणास त्याचे ज्ञान होऊ शकते. दुसऱ्या वर्गात सर्जक आणि सृष्ट अशा संपूर्ण सत्तेचा अंतर्भाव होतो. ही संपूर्ण सत्ता मूल कारणांची किंवा मूल जातीची बनलेली असून तिच्यावर सर्व प्रकारची सान्त पूर्णत्वे अवलंबून असतात. तिसऱ्या वर्गात सृष्ट परंतु सर्जक नसलेल्या संपूर्ण सत्तेचा हा समावेश असतो. इंद्रियगोचर जग ह्यात मोडते. मूल कारणांचे परिणाम असलेल्या सर्व व्यक्तींचा हा वर्ग असतो. सर्जन ही तत्कालिक प्रक्रिया नसून ती एक नित्य प्रक्रिया आहे. मनुष्य हा दृश्य व अदृश्य अशा सर्व सृष्टीचे प्रातिनिधिक स्वरूप आहे.

इस्लामी संकल्पनेप्रमाणे विश्वोत्पत्तीपूर्वी सर्वत्र घोर तिमिराचे, गहन-घनदाट अंधाराचे साम्राज्य पसरलेले होते. अंध:कारावर ना हवा होती, ना (तिच्या) खाली. निर्वात अशी शून्य अवस्था होती. संपूर्ण निर्वात शून्य प्रदेश होता. त्याने आपल्या दिव्य सिंहासनास पाण्यावर प्रकट केले. परमेश्वर हा एकटाच होता. त्याच्या सोबत कोणीच नव्हते. आपल्या सत्तेच्या गुप्त खजिन्यास प्रकट करण्याची त्याची इच्छा झाली. आणि म्हणून त्याने सर्वप्रथम 'मुहम्मदीय नूर' अर्थात प्रकाश प्रकट केले, आणि त्याच्या प्रकाशाच्या अनुषंगाने इतर सर्व वस्तू निर्माण केल्या. म्हणजेच ब्रह्मांडाच्या सर्व श्रेणींमध्ये परमेश्वराचा प्रकाश मिसळला गेला. याचे सांकेतिक अर्थ असे विशद करण्यात आले आहे की 'वहदत' अर्थात एकत्वतेच्या स्थानापासून 'नुक्ता' म्हणजे बिंदु उत्पन्न झाला. बिंदुच्या प्रकरणामुळे - हालचालीमुळे रेषा - सरळ रेषा बनली, रेषेच्या (जाडी स्वरूपात) वाढीमुळे थर किंवा वरचा भाग बनला आणि शेवटी थराच्या प्रसरणामुळे 'जिस्म' म्हणजेच देह (शरीर) निर्माण झाले.

सर्वत्र घोर अंधाराचे साम्राज्य असताना, स्वत:स अभिव्यक्त करण्याची इच्छा 'अल्लाह' अर्थात परमेश्वरामध्ये उत्पन्न झाली. म्हणून अंधारास चिरण्यासाठी व चिरडण्यासाठी त्याने आपल्या तेजांशाचे म्हणजेच प्रकाशाचे अस्त्र वापरले. मग पाहता पाहता सर्वत्र प्रकाश उजळून गेला. सर्व अव्यक्त सृष्टी, अदृश्य सृष्टी व्यक्त आणि दृश्य स्वरूपात उघडली गेली. प्रकाश-पर्वामुळे ब्रह्मांड निर्माण झाले.

प्रकाश हे सर्वव्यापी आणि सर्व निर्माणकारी असून, ते सर्व स्रोतांचे स्रोत आहे. हे ब्रह्मांड एक प्रकारचे प्रकाश-मंडल आहे. ते प्रकाशाचे निवासस्थान आहे. आणि प्रकाशाने उत्क्रांतीला घडवले. उत्क्रांती ही

ब्रह्मांडाच्या वाढीमध्ये आणि विकासामध्ये सहाय्यक ठरते. ती ब्रह्मांडाला गतिमान अवस्थेत ठेवते. आपल्या उत्क्रांतीच्या प्रवासामध्ये ब्रह्मांड हे 'सुजलाम् सुफलाम्' मध्ये बुडून निघाले, आणि मग पृथ्वी या ग्रहावर जीवन विराजमान झाले. प्रकाशामुळे जीवन निर्माण झाले आणि उत्क्रांतीने तिचे पालन पोषण केले. ''अल्लाह आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे.'' -- २४:३५.

**परमेश्वर म्हणजे साक्षात् तेज:पुंज प्रकाश !**

विश्वपुरुषाची कल्पना केली तर त्याच्या नाभीस्थानी असणारा सूर्य हे शक्तिस्थान आहे. म्हणूनच सूर्यापासून मिळणाऱ्या प्रकाशावर संपूर्ण सृष्टीचे पोषण होते हे समजायला हरकत नाही. जडाचा विकास होत असता एक वेळ अशी येते की त्या ठिकाणी जडत्व संपते व प्रकाशगती निर्माण होते व मग सुरू होते प्रकाशाचे साम्राज्य.

प्रकाशामुळे जग दृश्य होते, म्हणून ज्ञानाला प्रकाश म्हणण्याची प्रथा रूढ झाली. प्रकाशात संशय दूर होतो व ज्ञानानेही मनुष्य नि:संशय होतो. संशयामुळे अशांती व संशयनिवृत्तीमुळे शांती व समाधान मिळते. एकूण सूर्यमहिमा अर्थात सूर्याच्या प्रकाशाचा महिमा अगाध आहे.

ब्रह्मांड निर्मितीमध्ये प्रकाशाइतकीच ध्वनीची भूमिका राहिली आहे. भारतीय तत्त्वज्ञानानुसार 'ॐ' हा ब्रह्मांडातील सर्वात पहिला ध्वनी समजला जातो, आणि शब्द याचा शाब्दिक अर्थ ध्वनी संकेत असा आहे. अध्यात्माच्या दृष्टीने संपूर्ण जीवनसृष्टीच्या प्रत्येक घटकात अंतर्भूत असणारे हे ध्वनितरंग आहे. हा ध्वनी स्वत: उत्पन्न होतो. जीव आणि ईश्वरातील संपर्काचे हे माध्यम आहे. ध्वनी हा प्रत्येक जीवाला प्राप्त झालेला ईश्वरी अंशच आहे. म्हणूनच म्हटले जाते, शब्द ब्रह्म आहे. शब्दब्रह्म ॐकाराचे व्यक्त रूप आहे. ॐकार हा विश्वाचा आदिघटक द्रव्य आहे. म्हणजेच तो स्वयंभू आहे.

ध्वनीच्या मन:पूर्वक श्रवणामुळे आत्मसाक्षात्काराचा मार्ग मोकळा होतो. वेगवेगळ्या धर्मांमध्ये ध्वनीस वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. वेदांती याला 'नाद', 'आकाशवाणी', 'श्रुती' अशा संज्ञा देतात. कठोपनिषदात याला 'उद्गीत' म्हटले आहे. ग्रीक संस्कृतीत याला Logos (लोगोस) आणि चिनी तत्त्वज्ञानी लाओत्से ने याला 'ताओ' नाव दिले आहे. कुराणात याला 'कल्मा' म्हटले आहे. शीख धर्मात या 'शबद' आणि 'नाम' असे नाव दिले गेले आहे.

*शब्द हा आपल्या अर्थाचा वाचक होतो तो 'स्फोट' या त्याच्या वास्तविक स्वरूपामुळे होय. ध्वनी अथवा नाद हे नित्य असलेल्या शब्दांची ओळख पटवून देण्यात, त्याचा आविष्कार करतात. उत्तरोत्तर निर्माण होणाऱ्या वर्णांमुळे अखंड स्फोट अधिकाधिक स्पष्ट होतो. तोच प्रकार स्फोटाच्या बाबतीत घडतो.

वाणीचे 'स्फोट' हे रूप (म्हणजेच परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी ह्या चारीपैकी 'मध्यमा' नावाची वाणी) अर्थाचे वाचक आहे. कंठ्य तालुक्यादी वर्णांमुळे नित्य आणि अखंड असलेल्या स्फोटाचे केवळ प्रकटीकरण होते.

पदातील वर्णांच्यासाहाय्याने अखंड आणि नित्य असलेल्या स्फोटांची प्रचिती येत असते. भर्तृहरीने आपल्या 'वाक्यपदीय' या ग्रंथाच्या पहिल्या कारिकेत म्हटले आहे की हे शब्दतत्त्व अथवा स्फोट म्हणजेच 'अनाद्यनन्त अक्षरब्रह्म' होय. त्याच्यामुळेच सृष्टिप्रक्रिया अर्थरूपाने भासते.

(* श्री. ह. दीक्षित : 'मराठी तत्त्वज्ञान – महाकोश (त्रिखंडात्मक)' खंड : ३, पृ. २८७.)

प्रणवपुरुष हे शब्दब्रह्माचेच नामांतर आहे. शब्द ब्रह्मामध्ये 'मी ब्रह्म आहे' अशा प्रकारचा एक अभिमान उदित झाला. अ पासून ते ह पर्यंत समस्त वर्णाक्षरात्मक जगतच 'अ --- ह' आहे. बिंदू त्यास घेरलेला असतो. त्यामुळे हा 'अह', 'अहं' म्हणजेच अहम् किंवा अहंकार बनतो. अहंकाराचा जो बिंदु आहे तो शून्याच्या नामांतर स्वरूपात आहे. यामध्ये वाच्यवाचक असे काहीच नाही.

'ॐ'कार हे विश्वाचे आदि घटक द्रव्य असून ते स्वयंभू असल्याचे आणि शब्दब्रह्म ओम्काराचे व्यक्त रूप असल्याचे वर नमूद करण्यात आलेच आहे. ॐ या शब्दाची फोड केल्यास आपणास पुढील घटक आढळतील. ॐ = अ+उ+म्. जवळ जवळ असेच समीकरण इस्लामप्रणीत 'अल्लाह' या शब्दाच्या संदर्भात मांडता येईल. सर्वश्रेष्ठ अल्लाहने सर्वप्रथम प्रेषित मुहम्मद[स.] यांना आपल्या ज्योतीपासून निर्माण केले असल्याचे पण मागे सांगितले गेले आहेच. तदनुसार ''सर्वप्रथम <u>**अल्लाह**</u> <u>व</u> (तदनंतर पुरुषोत्तम – नरोत्तम) <u>**मुहम्मद**</u> यांचे स्थान आहे.'' हे पूर्वोक्त 'कल्मा' (बृह्मसूत्रा) वरून सुद्धा स्पष्ट होते. म्हणून उपरोक्त अवतरणयुक्त विधानामधील अधोरेखांकित तीन शब्दांच्या आद्याक्षरांची जुळणी केल्यास याप्रमाणे सूत्र बनते.

अ+व+म = अवम् (त्वरेने उच्चार केल्यास 'ओम' स्वरूपातच उच्चारण होतो.) काय हा दुर्मिळ व सुंदर योगायोग !

प्रकाशाचे महत्त्व आणखी एका तऱ्हेने स्पष्ट करता येऊ शकते. ब्रह्मांड निर्मितीच्या कथेची सुरुवात ही प्रकाशाच्या कथेशी होते. कारण ईश्वराने म्हटले – "Let there be light, and there was light!" said God. म्हणजेच ईश्वराने आज्ञा केली की प्रकाश प्रकट होऊ दे. आज्ञा होताच प्रकाश प्रकट झाला. ब्रह्मांडनिर्मितीचा हा गूढ प्रवास आहे.

ब्रह्म हा सच्चिदानंद आहे. सत्, चित् आणि आनंद या तिन्ही एकच गोष्ट आहेत. परंतु प्रत्येकामध्ये भावगत अंतर (भेद) आहे. तदनुसार तीन पृथक भाव दृष्टी आहेत, परंतु गोष्ट अभिन्न आहे. सद्भाव व्यापक आहे. सत्चे काही अंश चित् आहे आणि काही अंश आनंद आहे. चित्–ब्रह्म् शब्दापासून सत्–चित् ब्रह्माची प्रचिती होते, तर आनंद–ब्रह्म शब्दाचे तात्पर्य सदानंद ब्रह्म आहे. प्रथम अक्षरब्रह्म आहे तर द्वितीय रसब्रह्म आहे.

ब्रह्मच्या चित्–अंशामध्ये अक्षर ब्रह्म आहे. हे चित्स्वरूप आहे. याची प्रकृती चित् शक्ती आहे. इच्छा, ज्ञान आणि कर्म याचेच गुणधर्म आहेत. वस्तुतः अक्षर ब्रह्म असंग, निर्गुण, निर्मल, मात्राहीन, शब्दहीन, स्वरव्यंजनहीन, बिंदु–नाद–कलाविहीन प्रणव अक्षरमात्र आहे.

या संदर्भात इस्लामी धारणा पण तंतोतंत अशीच आहे. अल्लाहचा आदेश (संकल्प) होता क्षणीच निमिषमात्रामध्ये त्याची मनोतीत गोष्ट संपन्न होते. त्याची आज्ञा असते 'कुन' म्हणजे 'हो' – 'भव'. आणि लगेच 'फ़यकून' म्हणजे 'ती गोष्ट होते.' पवित्र कुराणमध्ये आहे – ''य़कूलु लह् कुन् फ़यकून'' अर्थात ''जेव्हा तो (अल्लाह) एखादी गोष्ट करण्याचा निर्णय घेतो तेव्हा तो त्या (गोष्टीस) आज्ञा देतो की हो ! आणि (तत्काळ) ती होते.'' – १९ : आणि ३६:८२. उपरोक्त दोन्ही श्लोकांमध्ये प्रयुक्त 'कुन' म्हणजे नाद होय, तर 'कुन फ़यकून' म्हणजे 'नादब्रह्म' होय. 'कुन' या शब्दामध्ये प्रयुक्त ک (क) आणि ن (न) ही दोन तेजोमय

धवल वर्णाक्षरे दिसून येतात. फैकी 'ں' (न) या बिंदुधारी धवल वर्णाक्षरामुळे प्रखर तेजस्वी प्रकाश फैलावतो व परिणामी ईश्वरवांछित गोष्ट तत्काळ निमिषमात्रामध्ये दृष्टोत्पत्तीस पडते. असा आहे बिंदुचा महिमा !

प्रणव-पुरुष बिंदुचा अभिमानी आहे. बिंदु क्षुब्ध झाल्यावर वेगवेगळ्या गुणांचा आविर्भाव होतो. शुद्ध भागामध्ये विशुद्ध तत्त्वाचे प्रकाश असते, आणि मिश्र भागामध्ये सत्त्व, रज आणि तम या तीन मिश्र गुणांचा आविर्भाव होतो. हे चार बिंदुंचेच अंतर्विभाग आहेत.

चित् ज्योतिस्वरूपात भासते. बिंदु क्षुब्ध झाल्यावर चित् शक्ती अभिव्यक्त होते आणि ही अभिव्यक्तीच ज्योती आहे. संपूर्ण सृष्टी या ज्योतीमुळेच आविर्भूत होते. ही ज्योतीस्वरूप मूल शक्ती जड वस्तूमध्ये सर्वत्र निहित आहे.

ज्योती प्रकाशाचे स्त्रोत आहे. प्रकाशाचा स्वभावच विमर्श आहे. किंवा प्रकाश विमर्शाचा धर्म आहे. विमर्शाचा स्वभाव पसरणे आहे. प्रकाशाच्या आधाराशी संलग्न होऊनच प्रत्येक वस्तू स्वसत्ता प्राप्त करते. प्रकाशाबाहेर सत्ता असतच नाही. हे जगत् प्रकाश आणि विमर्श (शिव-शक्ती) चा परिणामआहे. सर्व वस्तू स्फुरणाअभावी सत्ताहीन आहेत आणि स्फुरण प्रकाशाच्या अधीन असते.

**१) नुक्ता : बिंदूची आद्य भूमिका**

पवित्र कुराणाच्या भाष्यकारांनी 'अर्श' म्हणजे ईश्वरी दिव्य सिंहासनाच्या संदर्भामध्ये एक निवेदन (प्रेषित वचन) नमूद करून असे निवेदन केले आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्वप्रथम एक चमकदार चकचकीत मोती निर्माण केले. यास 'नूर-ए-मुहम्मदी' म्हणजेच मुहम्मदीय प्रकाश असे म्हणतात. (याची वर्तुळाकृती आणि महात्म्य त्याच्या ज्ञानकक्षेत होते). मग त्यावर आपले प्रखर दैदिप्यमान प्रकाश पाडले (टाकले.) भयकंपित होऊन गाळण उडाल्यामुळे तो मोती विरघळून पाणी झाला, आणि उकळी येऊन खदखदू लागला आणि त्यामधून धूर येऊ लागला आणि वेगवगळे वारे निर्माण झाले. त्या धुराने आकाशे बनली. आणि हवेच्या तरंगामुळे पाण्यावर फेस निर्माण झाले. त्यातून जमीन-पृथ्वी तयार झाली. मग त्या चार महाभूतांना - तेज, वायू, आप आणि पृथ्वी - पासून समस्त आकाशीय ग्रह, तारे आणि भौतिक चराचर निर्माण झाले. ''ईश्वर हा एक गुप्त कोष होता, आणि त्याला वाटले की आपण ओळखले जावे आणि म्हणून त्याने ज्ञात होण्यासाठी जग निर्माण केले.'' या हदीस-ए-कुदसी मध्ये स्पष्ट आहे. सारांश, विश्व-ब्रह्मांड व तदंतर्गत जे काही आहे ते सर्व आप म्हणजेच पाण्याच्या कृपेने आहे. म्हणून यावरून सिद्ध होते की पृथ्वी आणि आकाश इत्यादींचे मूळ पाणी असून समस्त वस्तूंचे - (सजीवांचे) प्राण पाणी आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो,''नि:संशय, तुमचा विधाता अल्लाहच आहे, ज्याने सहा कालावधीत आकाशांना आणि पृथ्वीस निर्माण केले, मग तो दिव्य सिंहासनावर विराजमान झाला (की तो तेथूनच) प्रत्येक कामाची व्यवस्था लावीत राहतो.'' १०:३० ''आणि आम्ही पाण्यापासून प्रत्येक सजीव वस्तू निर्माण केली.'' २१:३० परमेश्वराचे दिव्य सिंहासन इतके मोठे सृजिले आहे की यच्चयावत् सर्व सृष्टीस ते व्यापून आहे व त्यावर सर्वव्यापी परमेश्वर आपली सत्ता व प्राबल्याने विराजमान असतो, म्हणजे कोणतीही वस्तु त्याच्या सत्तेच्या व आटोक्याच्या बाहेर नसते. यावरून सहजच असे ठरते की परमेश्वर सर्वत्र आहे. व त्याचे विशेष मर्यादित स्थळ आहे असे म्हणणे दोषास्पद होय. पुन्हा एक ठिकाणी परमेश्वर निवेदन करतो, ''आणि परमेश्वराने सर्व (चालत्या फिरत्या) प्राण्यांस पाण्यापासून निर्माण केले आहे.''

– २४:४५. कित्येक भाष्यकारांनी पाण्याचा वीर्यबिंदु असा अर्थ घेतला आहे. तर चालत्या फिरत्या प्राण्यांत मनुष्य व चतुष्पाद वगैरे जनावरे यांचा समावेश होईल. नाही, तर बहुतेक प्राणी कीटक वगैरे मातीतून निपजतात, पण या प्राण्यांच्या बनावटीत मातीप्रमाणे पाण्याचाही भाग असतोच. आणि सर्वोत्तम कारण मीमांसा ही होय की सृष्टीच्या आरंभी पाणीच पाणी होते. मग परमेश्वराने लाटा उत्पन्न केल्या व त्याने फेस निर्माण केले. फेस जमून जाऊन जमीन बनली. तर या मानाने पाणी सर्व प्राण्यांचे मूळ ठरले. ह्यात तर काहीच संशय नाही की प्राणीमात्रास पाणी हा जीवनाधार, जीवनरेषा, जीवनोपाय होय. नवल नाही की यामुळेच पाण्यातून प्रत्येक वस्तूचे निर्माण करणे सांगितले असावे. याच विषयी हदीस शरीफ़ म्हणते, 'सर्व वस्तू पाण्यापासून निर्मित आहेत.' आणि पाण्याचे मूळ वास्तविक एकत्व म्हणजे ईश्वर आहे. म्हणून सर्व वस्तुंच्या अस्तित्वाच्या मुळाशी ईश्वर अवश्य विद्यमान आहे, जसे प्रत्येक वस्तूमध्ये पाण्याचे वास्तव.

आता संख्यांकडे लक्ष द्या आणि निरीक्षण करा. तर तुम्हास आढळून येईल की 'आलिफ़' ने म्हणजेच एक (१) या संख्येचे अस्तित्व तन्मात्राविहीन सत्तेच्या एतत्त्वतेच्या **बिंदूपासून** प्रकट झाले आहे; आणि सर्व संख्या याच एक (१) पासून सुरू होऊन नऊ (९) वर समाप्त होऊन जातात. आणि यापुढे तेच शून्य आणि एकमेव परमेश्वराच्या एकत्त्वतेचा एक हा प्रत्येक संख्येमध्ये विद्यमान आहे. उदाहरणार्थ, १, २ (१+१), ३ (२+१), ४ (३+१), ५ (४+१), ६ (५+१), ७ (६+१), ८ (७+१), ९ (८+१), आणि जर या एक (१) चे वास्तविक एकत्त्व इतर संख्यांमध्ये नसते तर कोणतीच संख्या कायम राहू शकत नाही आणि ९ (नऊ) ही संख्या संपूर्णत: परिपूर्ण आहे. ज्या अर्थी वास्तविक एकतत्त्वने नऊ (९) या संख्येस पराकाष्ठेच्या दर्जापर्यंत पोहोचवून दिले आहे त्याअर्थी याच्यापुढे शून्याशिवाय कोणतीच संख्या नाही. आणि ज्या काही संख्या आहेत. त्या याच एक ते नऊपर्यंतच्या शाखा आहेत, बाकी मात्र शून्य. उदाहरणार्थ, एकपासून नऊ पर्यंतच्या संख्यांनी एकमेकांशी बेरीज, वजाबाकी करता येते. तद्वत गुणाकार आणि भागाकार पण होऊ शकतो. या संख्यांच्या सहाय्याने कोणत्याही प्रकारचे गणित केले जाऊ शकते. सारांश, एक पासून ते नऊ पर्यंत सर्व जगाच्या हिशोबाची इतिश्री आहे. हेच एकम आहेत, दशम आहेत, शतम आहेत, सहस्र आहेत, लक्ष आहेत, करोड (कोटी) आहेत इत्यादी. फक्त बिंदु आणि श्रेणींचा हेरफेर आहे, आणखी काहीच नाही. मात्र जेथे कोठे कोणती संख्या असेल तेथे एक ही संख्या जरूर असतेच. हे तथ्य वर प्रस्तुत केलेले आहेच. याच प्रमाणे सत्तेचे एकत्त्व हे प्रत्येक वस्तूमध्ये आपल्या वास्तविक एकत्त्वमध्ये कायम असते. अप्रत्यक्षपणे गणितशास्त्रामधील शून्य हा अध्यात्मशास्त्रामधील बिंदूच असतो. आणि वीर्यबिंदु हा प्रजोत्पत्तीचा मूळ कारण असतो. सर्व सजीवांचा तोच मूळ आहे. बिंदूच सर्व निर्मितींचा आदिस्रोत आहे.

*एकदा हजरत अली (प्रेषित मुहम्मदस. यांचे जावई) आपल्या प्रवचनामध्ये एवढे तल्लीन झाले होते की त्यांच्या तोंडून उत्स्फुर्तपणे पुढील उद्‌गार निघाले – ''मी 'बिस्मिल्लाह्' या शुभनामांतर्गत असलेला एक बिंदू आहे. मी (प्रारब्धाचे लिखाण करणारी दैवी) लेखणी आहे, मी सुरक्षित पट्टिका (लौहे महफ़ूज़) (सुस्पष्ट ग्रंथ) आहे, मी अर्श (परमेश्वरी सिंहासन) आहे, मी कुर्सी (पादपीठ) आहे आणि मी आकाश (समावात) आहे.''

परमेश्वराचे सत्ता-नाम 'अल्लाह' हे व्याख्यातीत असल्यामुळे युक्लिडच्या बिंदुप्रमाणे नकारार्थी आहे. परमेश्वराचे नाम (ज़ात) काय आहे हे सांगण्यापेक्षा ते काय नाही, हे सांगणे जास्त शक्य आहे. जेव्हा ज़ात

(नाम) ने आपली छाया – सावली पसरविण्यास सुरुवात केली. तेव्हा ते बोधगम्य ज्ञेय झाले. पवित्र कुराणात याचे संकेत अशा प्रकारे आहे -- ''तू हे पाहिले नाहीस काय की तुझा विधाता सावली कशी पसरवितो?'' – २४:४५. जेव्हा ज़ात (ईश्वरी नामा) चा हा बिंदू सप्तबिंदूपर्यंत विकसित झाला (विस्तारित झाला), तेव्हा ते ज्ञेय स्वरूपात आले.

अरबी सुलेखक, अरबीचे प्रथम वर्णाक्षर 'अलिफ़' ('अ') हे सप्तबिंदुच्या विस्तारापर्यंत (उंचीपर्यंत) लिहितात. जसे ⁞ जेव्हा हे सप्तबिंदु उदयास आले, तेव्हा अहदियत (सर्वदा मुक्त सुषुप्तावस्था) हे वाहिदियत (जीवनमुक्त जागृतावस्था) मध्ये परिणत झाले. हे सप्तबिंदू म्हणजेच ईश्वराचे सप्तगुण होत. परमेश्वराचे सप्तगुण असे आहेत – १) ज्ञान (इल्म), २) प्रकाश (नूर), ३) जीवन (वजूद), ४) संकल्प – इच्छा (इरादत), ५) श्रवण (समाअ), ६) दृष्टी (बसर), आणि ७) वाणी (कलाम). या गुणोद्भवामुळे आणि शिवाय पुन्हा अधिक अंतरणामुळे स्थूल देह (वाजिबूल वजूद) हे लिंग देह (मुमकिनुल वजूद) बनले. उभे 'अलिफ़' हे वर्णाक्षर आडवे झुकले आणि त्याने 'बा' ('ब') या वर्णाक्षराचे स्वरूप धारण केले. 'बा' हे खरोखरच आडव्या स्वरूपातील खाली एक बिंदू असलेले 'अलिफ़'च आहे. जसे [ ا → ب ] 'अलिफ़' हा अरबी वर्णमालेच्या सर्व २८ वर्णाक्षरांमध्ये सरळ वा वक्राकार रूपाने विद्यमान आहे. म्हणजेच स्थूल देह हा सर्व प्रकारच्या व्यक्त आणि अव्यक्त जगांमध्ये व्याप्त आहे. [* डॉ. मुहम्मद आज़म – 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' – पृ. ९१-९२.]

अरबी वर्णाक्षरांमध्ये बिंदू (.) ची आद्य भूमिका आणखी एक तऱ्हेने पुढीलप्रमाणे समजून घेता येऊ शकते. – बिंदुपासूनच अस्तित्वाचा उदय होतो. कारण बिंदू हा निर्मितीचा आद्य स्त्रोत आहे. बिंदुचा विस्तार दोन प्रकारे होऊ शकतो. एक उभे स्वरूपात; तर दुसरे आडव्या स्वरूपात. बिंदुचा सात पटीने उभे विस्तार झाल्यास वर्णाक्षर 'अलिफ़' ('अ') मध्ये त्याची निर्मिती होते. हे आपण वर पाहिलेच आहे. तद्वत जर बिंदुचा विस्तार सात पटीने आडव्या स्वरूपात झाल्यास वर्णार 'बा' ('ब') मध्ये त्याचे रूपांतर होते. कार्यभार उरकल्यानंतर 'अलिफ़' मध्ये बिंदु अंतर्धान होतो, तर 'बा' मध्ये त्याच्या खाली आपले दर्शन घडवतो. जसे ا ب एकूण २८ वर्णाक्षरांपैकी १४ वर्णाक्षरांमध्ये बिंदु हा आपले दर्शन घडवितो. अशा प्रकारे बिंदुची आद्य भूमिका स्पष्ट आहे.

**२) 'अलिफ़' : 'अ' ची श्रेष्ठता आणि केंद्रिय भूमिका**

'बिंदू' ची सातपट शक्ती ग्रहण करून 'अलिफ़' इतका सशक्त, प्रबळ बनलेला आहे की त्या शक्तीच्या बळावर त्याने इतर सर्व वर्णाक्षरांची रूपे बनवली आहेत. काहीमध्ये तो सरळ स्वरूपात, तर काहीमध्ये अर्धवर्तुळाकार स्वरूपात 'अलिफ़' आपले रूप प्रकट करतो. मात्र 'बिंदू'चे निम्या १४ वर्णाक्षरांवर त्याचे वरपांगी वर्चस्व दिसून येते. तर इतर सर्व २७ वर्णाक्षरांवर 'अलिफ़' चेच प्रभुत्व दिसून येते. 'अलिफ़' हा जणू काही ईश्वराचा प्रतिरूपच ! कारण ईश्वराची सर्व चराचरावर अप्रतिहत सत्ता आहे. स्वत: परमेश्वराने पण म्हटले आहे -- ''सर्व वस्तुमात्रावर त्याची सत्ता आहे'' – ५७:२. यावरून 'अलिफ़' ची श्रेष्ठता सिद्ध आहे.

'अलिफ़' हा वरीय अशा 'नुक्ता' अर्थात बिंदूच्या अगोदर पण आहे आणि नंतर पण. बिंदु अगोदर तो गुह्यांतर्गत गुह्यामध्ये आहे ('ग़ैबुल ग़ैब') आणि त्याच्यानंतर अशा पद्धतीने आहे की तो दिसत नाही, ज्याप्रमाणे शब्द 'अना (अहंकार) मध्ये 'انا' या अरबी शब्दामध्ये 'अलिफ़' 'अना' च्या बिंदु अगोदर पण आहे आणि नंतर

पण. ज्या समष्टी स्वरूपात तो आद्य आहे त्याच समष्टी रूपामध्ये तो शेवटी पण आहे. आद्यतेमध्ये सुद्धा तो बिंदु ('नुक्ता') चाच विस्तार दिसतो आणि शेवटी पण. त्याच बिंदुच्या विस्तारास आद्यन्त 'अलिफ़' असे म्हणतात. 'अलिफ़' हा स्वतः अनुपस्थित आहे. लुप्त आहे. आणि या श्लोकाचा संदर्भ हेच 'अना' (अहंकार) आहे. ''तुम्ही त्यांचे पोशाख आहात आणि ते तुमचे पोशाख (स्वरूप) आहेत.'' 'अलिफ़' पुरुषस्थानी आहे, तर 'नुक्ता' (बिंदू) पत्नीसमान आहे. यालाच आंतरिक विवाह आणि वास्तविक मैथून म्हणतात. म्हणजे 'तदत्त्व' 'सोऽहम्' ने बिंदूस हे अस्तित्व स्थान निरपेक्ष 'अना' (अहंकार) शी विवाह करून आणले आहे. ते 'तदत्त्व', 'सोऽहम्' हे मानवी अहंकार बनले, आणि ही 'अना', हे अहंकार उच्च तदत्त्व आहे. 'अलिफ़' म्हणजे अहद अर्थात एकमेव (ईश्वर) हे दिव्य लेखणीच्या स्थानापन्न आहे आणि बिंदू (नुक्ता) दऊत आहे. त्यामध्ये शाई आहे. लेखणी आणि शाईच्या संमेलनामुळे सर्व बिंदुयुक्त आणि बिंदुहीन वर्णाक्षरे विचाराच्या पाटीवर विस्तारित होऊन 'जग' या नावाने ओळखले गेले.

'अहद' (एकमेव एक) या ईश्वरवाचक शब्दामध्ये-त्याच्या वर्तनीमध्ये तीन वर्णाक्षरे आहेत.د३-ح२-ا१ हे तिन्ही वर्ण बिंदुहीन आहेत. हे अद्याप मैथुन न झाल्याचे प्रमाण आहे. 'अहदियत' (एकत्त्वता) या शब्दाच्या वर्तनीमध्ये पाच वर्णाक्षरे समाविष्ट आहेत. ت५-ی४-د३-ح२-ا१ 'अहद' या 'अहदियत'मध्ये आपल्या निर्दोष समष्टीसह बिंदु विरहित अवस्थेमध्ये उपस्थित आहे, आणि वर पण आहे. हा मैथून आहे. आता येथे 'अहद' आणि 'अहदियत' मध्ये फरक बाकी नाही; यद्यपि स्थल निरपेक्षततेच्या अवस्थेमध्ये ते संबंधाच्या बंधनापासून मुक्त आहे; परंतु अहदियतमध्ये ते खाली - वर बिंदुच्या स्वरूपामध्ये व्यक्त आहे. याला असेच म्हणावे लागेल की हे त्याच 'अहद' चे विस्तार आहे. म्हणजे तेच 'अलिफ़' आदि (आद्य) आहे आणि तेच 'अलिफ़' शेवटी आहे, आणि तोच 'अलिफ़' चा बिंदू आदि आहे आणि तोच 'अलिफ़' चा बिंदू शेवटी आहे. अर्थात बिंदुची सत्ता ही 'अलिफ़' च्या सत्तेपासून वेगळी नाही आणि ना बिंदूस 'अलिफ़' (अ) म्हटले जाते आणि ना 'अलिफ़' (अ) ला बिंदुपेक्षा आद्य म्हटले जाऊ शकते आणि ना शेवटचे. म्हणजे 'अलिफ़' (अ) हा सर्वस्वी जातीने 'अलिफ़' (अ) आणि बिंदू (नुक्ता) आणि मग (नंतर) 'अलिफ़' आहे आणि बिंदू जातीनिशी बिंदू. आणि 'अलिफ़' (अ) आद्य आहे आणि 'अलिफ़' (अ) अंत्य आहे. आता जेवढे म्हणून दर्जे (श्रेणी) या 'अना' ('انا') पासून निघतील ते निर्मित - सृष्ट्य असतील. हे (सर्व) बिंदू आणि 'अलिफ़' (अ) च्या संयोगाने उत्पन्न (झालेले) आहेत, यद्यपि बिंदुसोबत 'अलिफ़' (अ) विद्यमान आहे कारण की तो ऐन बिंदू आहे, परंतु बिंदुपासून वेगळे पण 'अलिफ़' (अ) चे अस्तित्व असे दोषरहित आहे की ते असा दावा करू शकते की ''आम्ही त्याच्या कंठाच्या धमनीपेक्षा अधिक जवळ आहोत,'' - ५०:१६. याचे ''त्याच्या'' ('इलैहि') हे सर्वनाम आत्मिक अस्तित्वाकडे प्रवृत्त - अभिमुख आहे जे ''मी माणसामध्ये आपला प्राण (आत्मा) फुंकला'' यावरून सिद्ध झाले आहे. आणि आत्मा जातीने स्त्रीलिंगी आहे. यास्तव ''अधिक'' ('नूहनु') सोबत ''जवळ'' हा शब्द जोडलेला आहे, आणि सामिप्य वा मिलन वास्तविक मैथूनला म्हणतात. म्हणून ही गोष्ट सिद्ध होते की जोपर्यंत अव्यक्त सहभागित्व ('शिर्क ख़फी') बाकी असते, तोपर्यंत साधकाच्या साधनेचा उपयोग नसतो. जोपर्यंत मोठेपणाच्या शिस्तीमधील भौतिक उबूदिय्यत म्हणजेच सर्वोच्च दृष्टिपात कायम होणार नाही आणि ''तुम्ही त्यांचे पोशाख आहात व ते तुमचे पोशाख आहेत,'' याची घनिष्टता प्राप्त होऊ शकणार

नाही. म्हणूनच सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो – ''तो किती तरी पवित्र आहे (परमेश्वर) ज्याने सर्वांच्या जोड्या निर्माण केल्या, मग त्या जमिनीतील वनस्पतीपैकी असोत अथवा खुद्द यांच्या स्वजातीय (अर्थात मनुष्य) पैकी, अथवा त्या वस्तूंपैकी ज्यांची यांना माहिती देखील नाही.'' – ३६:३६.

ज्याप्रमाणे बिंदू हा समस्त वर्णाक्षरांमध्ये म्हणजेच ब्रह्मांडामधील सर्व वस्तुंमध्ये अखंडित व अविभाजित स्वरूपात विद्यमान आहे, त्याचप्रमाणे 'अलिफ़' (अ) हा समस्त वर्णाक्षरांमध्ये म्हणजेच ब्रह्मांडामधील सर्व वस्तुंमध्ये बिंदुस्वरूपात विद्यमान आहे. आणि या प्रभावा व्यतिरिक्त 'अलिफ़' चे वैभव व त्याची प्रतिष्ठा ही आहे की ते संपूर्णपणे बिंदुपेक्षा अगोदर (आद्य) आणि बिंदुपासून शेवटी (अन्त्य) आहे आणि पुन्हा ऐन शेवटमध्ये अग्रेसर आणि अग्रेसरतेमध्ये सर्वात शेवट आहे. आणि हे वैभव, ही प्रतिष्ठा सर्वश्रेष्ठ परमेश्वराची पण; ज्याला आपण वैभव म्हणतो, म्हटली जाऊ शकत नाही, जो की सापेक्षतेपासून निरपेक्ष आणि अलिप्त आहे. कारण दृष्टीस पडणारे जे काही आहे किंवा नाही, ते बिंदुच आहे; 'अलिफ़' (अ) तर आपल्या ठिकाणावरसुद्धा नाही, तो तिथून लुप्त आहे, तो तिथून अंतर्धान पावलेला आहे. आणि यालाच 'ग़ैबुल ग़ैब' म्हणजेच परम गुह्य, गुह्यांतर्गत गुह्य म्हणतात. याचा अर्थ असा आहे की कुठूनही पण पत्ता लागत नाही आणि जर पत्ता लागलाच तर ब्रह्मांडामधील सर्व वस्तूंमध्ये त्यांचा तन्मात्रापासून लागेल आणि त्या वस्तू (गोष्टी) आहेत परमेश्वराची नाम–रूपे. नाम–रूपांच्या माध्यमानेच परमेश्वरास ओळखले जाऊ शकते कारण की त्याची कशी का बंधनमुक्त अवस्था असेना, त्यामध्ये त्याचे सप्तगुण अवश्यच विद्यमान असतात. परमेश्वराचे सप्तगुण आहेत – १) ज्ञान, २) प्रकाश, ३) जीवन, ४) संकल्प, ५) श्रवण, ६) दृष्टी आणि ७) वाणी. या सप्तगुणांना 'उम्महात अस्मा' म्हणजेच सप्त मातृका नाम म्हणतात.

### ३) द्वितीयक 'बा' ('ब') ची पण महती

पवित्र कुराणच्या प्रत्येक अध्यायाच्या आरंभी 'बा' ('ब') प्रथम स्थानी आहे. यावरून त्याची महती, त्याचे महत्त्व दिसून येते. 'बा' चा जीवात्मा आहे आणि हाच अंधुक किंवा कृष्ण वर्णाक्षर आहे ('हर्फ़ ज़ुल्मानी'). संपूर्ण 'ब' 'बिस्मिल्लाह' मध्ये यांच्याशिवाय कोणतेच वर्णाक्षर कृष्ण वर्णाक्षरांपैकी नाही. कृष्ण वर्णाक्षरांशी अभिप्राय या १४ वर्णाक्षरांशी आहे –

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | |
| ب | ج | و | ز | ف | ش | ت | ث | خ | ذ | ض | ظ | غ | د | = कृष्ण वर्णाक्षरे |
| ब | ज | व | .ज | .फ | श | त | स | ख़ | ज़ | ज़ | ज़ | ग़ | द | |

तेजोमय किंवा श्वेत वर्णाक्षरे ('हुरूफ़ नूरानिया') ती आहेत की जी पवित्र कुराणाच्या अध्यायांच्या आरंभी येतात. यांना त्रोटक अक्षरे किंवा कूटाक्षरे ('हुरूफ़ मुक़त्तेआत') असे म्हणतात. ती उरलेली १४ श्वेत वर्णाक्षरे ही आहेत.

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | |
| ا | ه | ح | ط | ى | ك | ل | م | ن | س | ع | ص | ق | ر | = धवल वर्णाक्षरे |
| अ | ह | ह | त | य | क | ल | म | न | स | अ | स | क़ | र | |

'बा' या वर्णाक्षरास पवित्र कुराणच्या प्रत्येक अध्यायाच्या आरंभी आणण्याचे (ठेवण्याचे) प्रयोजन हे आहे की सर्वात प्रथम पडदा (पटल) जीवात्मा आणि परमात्मा अर्थात परमेश्वराची सत्ता यांच्या दरम्यान जो आहे तो म्हणजे जीवात्म्याच्या अस्तित्वाचा अंधार. शेवटी जेव्हा जीवात्म्याचे अस्तित्व नाहीसे (नष्ट) होईल आणि त्या (परमेश्वरा)च्या शिवाय काहीच बाकी नसेल तेव्हा त्याची नाम-रूपे, जी त्यापासून आहेत ती त्याच्यावर पडदा होतील (बनतील). अंततः ही उपरोक्त सर्व वर्णाक्षरे श्वेत आहेत, 'बा' ('ब') या वर्णाक्षरास वगळून. 'बा' शी अभिप्राय आहे जीवात्म्याचे अस्तित्व. शेवटी ते कृष्ण आहे आणि 'बिस्मिल्लाह' मधील बाकीचा सर्व वर्णाक्षरे ही धवल-श्वेत आहेत. आणि याच कारणास्तव 'बा' (ب) बिंदूवर आच्छादन स्वरूप आहे आणि आच्छादन पोशाखावर असते. पुन्हा (शिवाय) 'बा' ('ब') हे अंधार आहे बिंदूच्या प्रकाशावर. अवगुंठित बिंदुच्या प्रकाशापासून त्याच्या अस्तित्वापासून जे जग - शाब्दिक सौंदर्याचे जग प्रकट झाले ते बिंदुचे तत्त्वज्ञान प्रकट होण्याचे 'बा' (ब) व्यतिरिक्त या गोष्टीचे सल्लागार आहे की दैवी आज्ञा आदेश त्या आदेशाच्या व्यतिरिक्त आहे, की जो प्रकट - व्यक्त झालेला आहे, की जेव्हा बिंदु हा 'बा' (ب) शी निगडित झाला, तेव्हा 'बा' (ब) हे वर्णाक्षर वाणीमध्ये मागे राहून कार्यरत झाले आणि जेव्हा बिंदुची दृष्टी 'बा' (ब) कडे वळवी तेव्हा 'बा' हा अरबी भाषेमध्ये फिर्याद स्वरूप मदतीच्या पुकारासाठी प्रयुक्त झाले, ते संबोधनवाचक अक्षर ठरले; आणि ज्या अर्थी 'बा' साठी त्याच्या आत्म्याच्या वृक्षावर तेजस्वी अग्नी प्रदीप्त झाला तेव्हा अंधार, पडदा असलेल्या स्थळी परोक्षमध्ये त्याने रात्री स्वतःस योग्य अशी सहल घडविली की जेणे करून अग्नी हा बिंदूस प्रकाशामध्ये ठेवेल; एक तर स्वतःच्या जातीमध्ये, जातीशिवाय, जातीपासून मार्गदर्शन प्राप्त करावे. अल्लाहचे नाम (नाव) असलेले 'अलिफ़' (अ) च्या वृक्षापासून स्थायित्वाच्या दिशेकडे आवाज दिले गेले (संबोधले गेले) की 'तू आपले दोन्ही पायतणे उतरव' (काढून टाक). म्हणजेच आपल्या गुण-नामास, गुण आणि सत्तेस वेगळे कर. कारण की तू पवित्र दऱ्यात (खिंडीत) आहेस. यद्यपि तू तुच्छ आणि मळलेल्या जागी आहेस. पवित्र कुराणमध्ये प्रेषित मूसा यांच्या संदर्भात असाच प्रसंग घडल्याचे नमूद आहे ..... "मग जेव्हा मूसा तेथे आला, तेव्हा त्याला वाणी (ऐकू) आली की, 'हे मूसा ! (हा तर) मी आहे तुझा विधाता; तर तू आपली (दोन्ही) पादत्राणे पायातून काढून टाक; का तर (या वेळी) तू 'तुवा' (नावा) च्या पवित्र दऱ्यात (खिंडीत) (उभा) आहेस." - २०:११-१२. आणि तुझ्यासाठी बिंदुच्या पवित्र खोऱ्यामध्ये स्थान (जागा) नाही - जोपर्यंत तू आपली तुच्छ सत्ता आणि मलिन गुणांना स्वतःमधून बाहेर टाकून देणार नाहीस, इथपर्यंत की पवित्र जागेमध्ये परम पावित्र्याशिवाय बाकी काहीच नसेल.

म्हणजे जेव्हा 'बा' आश्वस्त मनाने परम सत्य म्हणजेच 'अलिफ़' (अ) कडे वळला तेव्हा त्यास या अभिमुखतेमुळे परम गुह्याच्या मनोकामनेने आपल्या रंगामध्ये रंगून घेतले. - संपूर्णपणे आत्मसात करून घेतले. परमेश्वराचे वचन आहे - "श्रद्धावंत लोक लगेच बोलले की आम्ही स्वतःला अल्लाहच्या रंगात रंगवून घेतले आहे. अल्लाहपेक्षा अधिक चांगला कोणाचा रंग आहे? आणि आम्ही तर त्याची उपासना करण्यावर कायम आहोत." - २:१३८. जेव्हा 'बा' (ब) स पडदा असलेल्या परोक्षाच्या स्थानामध्ये पात्र होण्याची पात्रता लाभली एकत्तवतेच्या समान रंगामुळे या गोष्टीची पात्रता निर्माण झाली की आपल्या आत्म्याच्या वृक्षामध्ये तेजस्वी अग्नी प्रदीप्त असलेला पहावे आणि त्या प्रकाशमान रात्रीमध्ये 'त्या प्रकाशापासून ज्योतिर्बिंदू प्रकटेल'

यापासून बिंदुचा अग्नी प्रज्वलित करावे किंवा 'बा' (ब) आणि बिंदुच्या अनुषंगाने त्यांच्या एकत्वतेमुळे आपल्या जातीमध्ये, जातीसाठी आणि जातीपासून मार्गदर्शन प्राप्त करावे आणि त्या पवित्र खोऱ्यामध्ये आपले पाय मजबूत ठेवावे आणि त्याचे उत्पत्तीस्थान बनावे की अल्लाहचे नाम (नाव) असलेले 'अलिफ़' (अ) च्या वृक्षाशी संवाद घडावे की 'तू आपले दोन्ही पायतणे पायातून काढून टाक.' शेवटी पात्रतेच्या हाताने त्याची लगाम धरली आणि 'अलिफ़' (अ) च्या प्रकाशाखाली त्याची सावली पडली आणि लिखाणामध्ये 'बा' हे वर्णाक्षर उभ्या 'अलिफ़' चे आडवे रूप घेऊन आपल्या खाली बिंदूसह प्रकट झाले. अशा प्रकारे 'बा' ने आपले रूप धारण केले.

# खण्ड - तीन

# विभाग - ५

## क) परिशिष्टे

# १) सूफ़ी कोण?*

धर्म आपल्या अनुयायांना एक ओळख प्राप्त करून देतो, आपलेपणाची एक भावना निर्माण करतो. अनुयायी विश्वास वाटून घेतात आणि त्यांच्यामध्ये एक समाईक श्रद्धा असते. आपल्या धर्माशी निगडित चालीरीति आणि कर्मकांडाच्या माध्यमाने त्यांची श्रद्धा बहुधा प्रदर्शित होते. तथापि परंपरा आणि कर्मकांडे ही एखाद्या धर्माची बाह्य रूपे असतात. ते सामाजिक परिस्थितींवर अवलंबून असतात. दुसरीकडे 'तसव्वुफ' किंवा सूफी आध्यात्मिकता ना रीतिरिवाज (रस्म) वा कर्मकांड आहे, ना ज्ञान (इल्म). जर आध्यात्मिकता कर्मकांडापासून शिकता आली असती, तर ती सरावामुळे आत्मसात करता आली असती, आणि जर फक्त ते ज्ञान असते तर वाचनामुळे तिला साध्य करता आले असते. आध्यात्मिकता म्हणजे सत्याचा शोध, त्याचे अन्वेषण आणि 'स्व' ची जाणीव, त्याची ओळख होय. ज्ञानाविषयी असे म्हणता येईल की आत्मा हा सर्वत्र सारखाच असतो.

लोकांना या वास्तवाची जाण नसते, आणि म्हणून धर्माच्या नावाने भांडत असतात. मौलाना रूम म्हणाले की, द्राक्षांना लोक विविध नावांनी ओळखतात. इराणी त्यांना 'अंगूर' म्हणतात, तुर्की 'उज़ुम' म्हणतात, तर अरब लोक 'इनाब' म्हणतात आणि ग्रीक त्यांना 'स्टॉफिल' म्हणतात; तर भारतीय 'द्राक्षे' म्हणून ओळखतात. नाव काही का असेना, प्रत्येकास द्राक्षे म्हणायचे असते. सर्वांना तीच वस्तू हवी असते, मात्र त्यांना कळत नाही. हा समज त्यांच्यामध्ये नसतो. ती आंतरिक इच्छा, आंतरिक गरज आणि तो आंतरिक अभाव असतो. यांच्या परिपूर्ततेची आवश्यकता असते. 'तसव्वुफ' हा सर्वसाधारणपणे 'सूफ़ीवाद' चा समानार्थी गणला जातो. हे यास्तव की, आपली उदारमतवादी शिकवण आणि महान सहिष्णुतेमुळे सूफ़ीवाद एक वैश्विक श्रद्धा बनली आहे. सूफ़ीवाद मोठ्या प्रमाणात आत्मसात होण्याचे सगळ्यात मगत्त्वपूर्ण गुण म्हणजे सूफ़ींचे मानवता प्रेम, अंत:करणाची विशुद्धता आणि आचार शुचिता.

सूफ़ीवाद एक जीवन-प्रणाली आहे. ते ना एक धर्म आहे ना एक तत्त्वज्ञान. मुस्लिम सूफ़ींप्रमाणेच हिंदू सूफ़ी आणि ख्रिश्चन सूफ़ी पण आहेत. 'सूफ़' म्हणजे लोकर. लोकर गरम असते. जर अंत:करण प्रेमळ असेल तर त्यामध्ये प्रेम वसते. प्रेमळ अंत:करणाचा संत हा एक सूफ़ी असतो. गूढवादाशी निगडित असल्यामुळे लोकांमध्ये सूफ़ीवादाविषयी आपुलकी जागृत होते. सूफ़ींच्या ज्ञानाचे गूज फारच कमीप्रमाणात ज्ञात आहे. अनेक वेळा लोक सूफ़ीवादाशी संबंधित कर्मकांडे आचरणात आणतात, परंतु अनेकदा त्यांना त्याचे अर्थ अवगत नसते. सूफ़ीवादाचे सैद्धांतिकपणे स्पष्टीकरण करता येऊ शकत नाही; प्रत्यक्ष सहभाग आणि सरावामुळेच त्याची जाण होऊ शकते.

सूफ़ीवाद आचाराचा एक विषय आहे. आध्यात्मिक दीक्षेच्या माध्यमाने तिचा सराव करता येऊ शकतो. नंतर एखादा सूफ़ी स्वानुभवाने आणि आध्यात्मिक सरावाच्या सहभागाच्यामाध्यमाने आपला विकास व्यक्त करू शकतो. इतरांशी सामंजस्य प्रस्थापित करून 'स्व'च्या उत्क्रांतीची ती एक प्रक्रिया आहे. सूफ़ींची अशी धारणा आहे की स्वानुभव आणि आत्मज्ञानाच्या बळावर अज्ञाननाश करून लोक आपला विकास करून घेऊ शकतात.

सूफ़ी तो असतो की ज्याने सर्वस्वापासून स्वत:स रिकामे ठेवले आहे, ज्याने सर्वस्वाचा त्याग केला आहे. त्याला धर्म नसतो. त्याला कसलेच बंधन नसते, तो कुठल्याच 'वादा'च्या फंदात पडत नाही. त्याने आपल्या अंत:करणाच्या आरशावरील सर्व धूळ – मळ काढून टाकले आहे. आता तो हृदय–दर्पण निर्मळ झाला आहे. आता तो स्वच्छपणे प्रतिबिंबित होतो. आता तो सत्याच्या तळपत्या वैभवानिशी चकाकतो.

[* इंग्रजी लेखाचा अनुवाद : R. K. Gupta - "Who is a Sufi?" The Speaking Tree, The Times of India, Pune, September 29, 2013]

# २) सूफ़ींचा परमेश्वर कोण?*

सूफ़ीवाद हा ना ईश्वरवाद आहे ना निरीश्वरवाद, कारण ईश्वरवाद म्हणजे सुदूर स्वर्गामध्ये निवास करणारा एक ईश्वर यामध्ये श्रद्धा होय; तर निरीश्वरवाद म्हणजे ईश्वरामध्ये श्रद्धेचा अभाव होय. सूफ़ींची ईश्वरामध्ये अपार श्रद्धा असते. कोणता ईश्वर? त्याच्या अंतर्बाह्य – अवती भोवती असलेल्या ईश्वरापासून, स्वत: विभक्त झालेल्या ईश्वरामध्ये बाईबलमध्ये म्हटल्याप्रमाणे आम्ही राहतो, हालचाल करतो, स्वत:स ईश्वरामध्ये (असल्याचे) समजतो – अशा ईश्वरामध्ये त्याची श्रद्धा असते. हीच सूफ़ीची शिकवण आहे.

जीवनामध्ये आदर्शीकृत आत्मा स्वरूपात, सामूहिक चेतना रूपाने, आणि दोन्ही जगांचा प्रभू स्वरूपात, न्यायनिवाड्याच्या शेवटच्या दिवसाचा धनी असणारा, अशा ईश्वरामध्ये सूफ़ीचा विश्वास असतो. तो सन्मार्गाचा प्रेरक असतो, आणि सर्वच (सर्वजण) त्याच्याचकडे परतणारे असतात.

वास्तविक अनेक धर्म असूच शकत नाहीत; फक्त एकच धर्म आहे. दोन सत्ये असूच शकत नाहीत; दोन धनी असू शकत नाहीत; ज्याअर्थी एकच धनी-स्वामी आहे आणि फक्त एक (च) सत्य आहे. मानवाची नेहमीची खरी अडचण ही आहे की तो स्वत:स परिचित असलेल्या गोष्टीलाच सत्य समजतो, न ऐकलेली अथवा त्याच्या ध्यानी-मनी नसलेली अपरिचित गोष्ट त्याला भयभीत करून सोडते.

**तुमच्यासाठी चांगले, वाईट माझ्यासाठी**

सुदूरवर्ती एखाद्या अपरिचित प्रदेशामध्ये एखादा परका इसम ज्याप्रमाणे अनभ्यस्त असतो, त्याचप्रमाणे अनभ्यस्त असलेल्या वस्तूंच्या गुणधर्माविषयी जीवात्मा हा अपरिचित असतो. परंतु अनंताकडील परिपूर्णतेचा प्रवास म्हणजे मर्यादा ओलांडण्याचा असतो, मर्यादा अतिक्रमित करण्याचा असतो. या बाबतीत इतकी उंची गाठायची असते की आपण एक राष्ट्र किंवा एक खंडच नव्हे, तर अख्ख्या जगाचे क्षितिज पाहण्यास समर्थ बनून जाऊ. जसजसे आपण उंच जाऊ, तसतसे, आपल्या दृष्टीक्षेपातील क्षितिज अधिक विस्तृत होत जाते.

सूफ़ी कोणासाठीही नियम वा सिद्धान्त आखून देत नाही. जर सूफ़ीचे सिद्धान्तच नसतील तर मग काही लोकांना याचे आश्चर्य वाटते की मग सूफ़ीवादाचे अनुसरण कसे बरे करता येईल. परंतु याचे उत्तर असे आहे की जे एकासाठी चांगले असेल तेच दुसऱ्यासाठी वाईट असू शकेल. कारण एखाद्यास जोगीण बनणे अथवा संपूर्ण दिवसभर एखाद्या उपासनालयामध्ये अर्थात चर्चमध्ये अथवा एखाद्या मशिदीमध्ये बसून राहणे आवडत असेल, परंतु दुसऱ्या इसमासाठी तेच वाईट असेल, आणि इतर काहींना एखादे पथिकाश्रम किंवा उपहारगृहामध्ये चहा-पाणी आणि सहभोजनासाठी जाणे म्हणजे शिकण्यासारखी एखादी अनुभूती पण ठरू शकेल.

पौर्वात्य राष्ट्रांमध्ये बोडके असणे हे शिष्टाचारविरोधी गणले जाते. थोरां-मोठ्यांसमोर लहानग्यांनी डोक्यावर टोपी न घालता किंवा पागोटे न बांधता, येणे हे अशिष्ट समजले जाते; तर या उलट पाश्चात्य

राष्ट्रांमध्ये डोक्यावरील 'हॅट' काढून हातात धरण्यास शिष्टाचार समजले जाते. तसेच पौर्वात्य राष्ट्रांमध्ये, मंदिर, मशीद गुरूद्वारा किंवा अन्य पवित्र अशा धार्मिक स्थळी म्हणजे दर्गा यांमध्ये प्रवेश करताना पायातील पादत्राणे (पायतणे) काढून बाहेर ठेवावी लागतात; तर पादत्राणे वा बुटांसह लोक चर्चमध्ये प्रार्थनेस जातात. अशा श्रद्धा किंवा असले नियम स्थळ-काळानुरूप आस्तित्वात आलेले आहेत.

सिद्धान्तांखातर लोक नेहमी भांडत आले आहेत. त्यांना वाटते की आपलेच सिद्धान्त सर्वोत्तम आहेत, तर इतरांचे सामान्य व गौण. तथापि, सूफ़ींसाठी चांगले किंवा वाईट असे काहीच नसते. सहृदय व दयाळू असणे हीच फक्त त्यांची नीतिमत्ता ! हेच जग समजू शकत नाही; कारण जगाची इच्छा सिद्धान्तांसाठी असते. हे चांगले, ते वाईट असे सांगितले जावे, असे त्या(जगा)स वाटते. आपल्या पाहण्याच्या दृष्टीकोनावरून एखादी गोष्ट चांगली की वाईट, हे ठरते. म्हणून सर्वप्रथम दृष्टीकोनास प्रशिक्षित केले पाहिजे. सूफ़ी आपल्या प्रत्येक कृतीस आध्यात्मिकतेमध्ये परिणत करतो. तो फक्त ऐक्य आणि समतोल पाहतो. सूफ़ीचा धर्म फक्त प्रेमच आहे. म्हणून विविध धर्मांची तत्त्वे ही त्याच्यासाठी काहीच नसतात. सिद्धान्तांविषयीचा झगडा तो कूपमंडुक वृत्तीच्या लोकांवर सोपवतो.

जेव्हा तत्त्वज्ञान या शब्दाचा उल्लेख होतो, तेव्हा प्रत्येकास वेदांत, अफ़लातून (प्लेटो) आणि अरस्तू (ॲरिस्टॉटल) यांचे तत्त्वज्ञान समोर येते. हे आणि इतर तत्त्ववेत्त्यांनी भौतिक जगाचा अभ्यास केला आहे. आत्मा किंवा चित् हे जडतत्त्वकिंवा पुद्‌गलद्रव्य कसे बनले याचा त्यांनी अभ्यास केला आहे, आणि तसेच त्यांनी सत्ताशास्त्राचाही पण अभ्यास केला आहे; परंतु या तत्त्वज्ञानांमध्ये आपणास आदर्शकल्पन किंवा भक्ती आढळून येत नाही; तर सूफ़ीवादामध्ये ईश्वराचे आदर्शकल्पन आढळते.

सूफ़ींचा प्रत्येक प्रकारच्या उपासनेमध्ये विश्वास असतो, परंतु इतकेच नव्हे तर मूर्तिपूजासुद्धा सूफ़ीस एक प्रकारची श्रद्धाहीनता (कुफ्र) किंवा श्रद्धाहीन - नास्तिक म्हणण्यास भाग पाडत नाही; कारण मूर्तिव्यतिरिक्त त्याच वेळेस तो इतर सर्वांची उपासना करीत असतो. जगास (लोकांना) असे वाटावे की तो मूर्तिपूजा करतो, परंतु वास्तविक तो सर्वांभूती परमेश्वराचाच उपासना करीत असतो.

सूफ़ीची पण एक मूर्ती असते; परंतु ती एक सजीव मूर्ती असते. हैद्राबादमध्ये ररस्त्यावर मला एक 'फ़कीर' (निरासक्त) भेटला. त्याने मला विचारले, ''अहो! मुर्शद! (सद्‌गुरू) अमुक रस्त्यावर जाण्याचा मार्ग कोणता?'' मी त्या वेळेस तत्त्वज्ञानाचे अध्ययन करीत होतो. मी विचार केला, ''तो मला 'मुर्शद' (सद्‌गुरू) म्हणतो; कदाचित त्याला माझ्यामध्ये काही तरी माहात्म्य आढळले असावे !'' परंतु नंतर त्याने एक रहदारी नियंत्रक पोलीसास विचारताना मी ऐकले, ''अहो! मुर्शद! त्या घराचा हाच मार्ग होय ना?'' आणि मग मला उमजले की तो प्रत्येकास 'मुर्शद' म्हणून संबोधतो. नंतर याविषयी जेव्हा मी माझ्या सद्‌गुरूंना विचारले असता त्यांनी मला सांगितले की ही ''फ़नाफ़िश्शेख़'' अर्थात सद्‌गुरूलीन अवस्था आहे. या अवस्थेमध्ये शिष्य हा आपले 'मुर्शद' अर्थात सद्‌गुरूस प्रत्येकामध्ये आणि प्रत्येक वस्तुमध्ये पाहतो - वृद्ध असो की युवक, मूर्ख असो वा ज्ञानी, मांजर असो की कुत्रे, वृक्ष असो अथवा दगड. सर्वांभूती परमेश्वर पाहणारा हा खरोखर साक्षात् परमेश्वरासच पाहतो.

**नामा (नावा) पासून मुक्त**

धर्मांमध्ये सूफ़ीवाद हे एक तत्त्वज्ञान आहे आणि तत्त्वज्ञानांमध्ये तो एक धर्म आहे. सूफ़ीच्या विचार स्वातंत्र्याच्या अनुषंगाने धर्मांमध्ये तो एक तत्त्वज्ञान आहे; तर तत्त्वज्ञानांमध्ये सूफ़ीकृत ईश्वराचे आदर्शकल्पन, त्याची भक्ती आणि उपासना यांमुळे तो एक धर्म आहे. इतर लोक सूफ़ींना सूफ़ी असे म्हणतात. मात्र ते स्वत:साठी कोणतेच नाव धारण करीत नाहीत. ते नावापासून, खूणचिठीपासून; व्यक्तिमत्त्वाच्या काल्पनिक भेदापासून मुक्त आहेत, म्हणूनच जग त्यांना सूफ़ी म्हणते. सूफ़ी हा शब्द अरबीमध्ये 'सफ़' या शब्दापासून व्युत्पन्न झाला आहे की ज्याचे अर्थ 'विशुद्ध' असे आहे.

[* Hazrat Inayat khan - 'Who's The Sufi God?' The Times of India, Pune, April 28, 2013]

## ३) भारतीय दर्शन व कुरआनप्रणित सूफ़ीचे शब्द – चित्र

फारसी आणि उर्दू भाषेमध्ये 'सूफ़ी' हा शब्द एकल स्वरूपात प्रयुक्त होतो; मात्र मराठी भाषेमध्ये तो 'सूफ़ी संत' या स्वरूपात सामासिक शब्द पद्धतीने रूढ आहे, प्रचलित आहे. 'सूफ़ी संत' शब्दाच्या अर्थवत्तेमध्ये कैक पटीने वाढ झाली आहे. 'सूफ़ी संत' हा शब्दच मुळी संतांच्या लक्षणांचा आरसा आहे. सूफ़ीमध्ये संताची समस्त लक्षणे एकवटलेली असतात. म्हणून मराठी भाषेमध्ये प्रचलित उपरोक्त 'सूफ़ी संत' हा शब्द अत्यंत समर्पक असाच आहे.

सूफ़ी हे संत असतात, ही गोष्ट निर्विवाद आहे. सूफ़ींची कार्यप्रणाली द्विविध असते – (१) आध्यात्मिक आणि (२) भौतिक. यास्तव त्यांच्या जबाबदाऱ्या पण दुहेरी असतात. पहिली जबाबदारी ही परमार्थिक असते. ती परमेश्वराशी निगडीत असते. परमेश्वराची उत्कट भक्ती संपन्न करणे ही त्यांची आद्य जबाबदारी असते. त्यांची दुसरी जबाबदारी ही प्रापंचिक असते. ती मानवजातीशी संबंधित असते. यासाठी लोक कल्याणासाठी झटणे, जिवापाड मेहनत घेणे ही त्यांची जबाबदारी असते. म्हणून एक तर आपल्या उत्कट भक्तीच्या माध्यमाने ईश्वराकडे प्रवृत्त होऊन ते अध्यात्माकडे वळलेले असतात; तर दुसरीकडे ऐहिकतेच्या प्रांतामध्ये विहार करून जनसामान्याच्या कल्याणासाठी जबाबदारीची धुरा वाहणे, या बिकट कार्यासाठी कटिबद्ध असतात.

मनुष्य जन्माचा हेतू स्पष्ट करताना अल्लाह पवित्र कुराणाच्या माध्यमाने असे निवेदन करतो की, ''मी जिन्न (किन्नर, यक्षयोनी) आणि माणसे यांना यासाठीच निर्माण केलेले आहे की त्यांनी माझी उपासना (भक्ती) करावी.'' – ५१:५६. या श्लोकावरून असे विदित होते की सर्वसामान्य लोकांसाठी, ईश्वराची माफक अपेक्षा आहे की त्यांनी त्याची भक्ती करावी. एवढी जरी जबाबदारी त्यांनी चांगल्या प्रकारे उचलली (पार पाडली) तरी पुरेसे आहे. मात्र सूफ़ी संतांसाठी हे पुरेसे नाही. त्यांच्यासाठी भक्ती तर अनिवार्य आहेच. शिवाय इतरेजनांच्या कल्याणासाठी झटणे, ही पण त्यांची एक महत्त्वाची जबाबदारी आहे. सूफ़ी हे प्रेषितांचे वारसदार गणले जातात. म्हणून त्यांना प्रेषिततुल्य जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यांना प्रेषितांसारख्याच खस्ता खाव्या लागतात.

मानवजातीच्या कल्याणाची कळकळ सूफ़ींच्या नसानसात भिनलेली असते. म्हणून लोकनिंदेची पर्वा न करता, अनेक प्रकारच्या यातना सहन करत, अहिंसेच्या मार्गाने शांतीचा ध्वज आपल्या खांद्यावर घेऊन, ते समाज – सुधारणेच्या खडतर मार्गावर निर्भयपणे अग्रेसर होत असतात. ते मानवतेची सेवाच नव्हे, तर पूजा

करतात. ते मानवतेचे खरे पुजारी आहेत. या खडतर मार्गामध्ये संतांना कोण-कोणत्या बिकट परिस्थितीतून जावे लागते, हे आपण सर्वजण जाणतोच. संतांची चरित्रे याचे प्रमाण आहेत.

**(क) उत्कट भक्तीचे स्वरूप : भारतीय विचारधारा**

'सूफ़ी' म्हटल्यानंतर सर्वप्रथम त्यांची भक्तीच आपल्या डोळ्यासमोर येते. त्यांच्या दुहेरी जबाबदाऱ्यांपैकी ही पहिली जबाबदारी होय. या उत्कट भक्तीची मराठी संत ज्ञानेश्वर आणि संत एकनाथप्रणित सप्तसूत्रे आहेत. ती खरोखर द्रष्टव्य अशी आहेत. म्हणून प्रथम आपण ती सप्तसूत्रे पाहू या -

''भक्तीस मूळ विरक्ती, ज्ञानास मूळ अग्नी, अंत:करणास मूळ मन, आठव तो ब्रह्म, नाठव तो भावभ्रम, नाम आहे की नाही? दृष्टी आहे की नाही, वस्तू आहे की नाही?''

पहिली चार सूत्रे साधकाने करावयाची तयारी सांगणारी असून, नंतरची तीन सूत्रे साधन मार्गाविषयी आहेत. 'भक्तीस मूळ विरक्ती व ज्ञानास मूळ अग्नी,' हे सूत्र ज्ञानेश्वरीत आहे. 'आठव तो ब्रह्म, नाठव तो भावभ्रम' हा चरण एकनाथांच्या अभंगातील आहे.

'भक्तीसाठी विरक्ती हवी' याचा अर्थ असा की प्रपंच न टाकता, पण हळूहळू त्यातील आसक्ती कमी करून तो कर्तव्यपुरता करावा, आणि परमार्थाकडे अधिक जावे. कारण देवाकडे - भगवंताकडे प्रेम लागले तर हळूहळू आसक्ती कमी होते. प्रेमभाव वाढल्यास आपोआपच नामस्मरण अधिकाधिक होऊन ईश्वराच्या दर्शनाची प्राप्ती होऊ लागले.

'ज्ञानास मूळ अग्नी' म्हणजे आत्मज्ञानासाठी तसेच ईश्वराच्या अनुभूतीसाठी तळमळ लागली पाहिजे. 'अंत:करणास मूळ मन' म्हणजे सद्गुरूकडून प्राप्त नामाचे स्मरण करून अंत:करणातील अंत:करण म्हणजे कूटस्थानला भाव देवाला अर्पण करावा. 'आठव तो ब्रह्म, नाठव तो भावभ्रम' अर्थात् मन नेहमी बाह्य विषयातच रमलेले असते. त्याची आठवण होऊ न देता परब्रह्माची प्राप्ती करून देणाऱ्या सद्गुरुंची आणि त्यांनी दिलेल्या नामाची आठवण ठेवावी.

नंतरची तीन सूत्रे साधनमार्गाची आहेत. त्यात नामाची आठवण ठेवावी. डोळ्यांपुढे देवाचे स्वरूप विशेषत: निर्गुणाचे (तेज, बिंदू, नाद, रंग, आकार इत्यादी) दिसते का याकडे लक्ष ठेवावे. हे झाले उत्कट भक्तीचे संक्षिप्त स्वरूप.

**(ख) आदर्श भक्त स्वरूपात सूफ़ींचे पवित्र कुराणोक्त शब्द - चित्र**

आता आपण आदर्श भक्ताचे स्वरूप पाहू या. यासाठी आपण पवित्र कुराणाचे आधार घेऊ या. सूफ़ी संत साधकांची वैशिष्ट्ये पवित्र कुराणमध्ये जागोजागी विखुरलेली आहेत. ते सर्व श्लोक एकत्रितपणे सुसंगत क्रमाने ठेवल्यास सूफ़ी संत साधकांची रूपरेषा ठळक होते व परिणामी त्यांचे एक सुंदर शब्द - चित्र डोळ्यांपुढे उभे राहते. याच पद्धतीने मांडणी केल्यावर त्यांचे स्वभाव - गुण पुढील प्रमाणे दिसून येतात -

''तुम्ही एक सर्वोत्तम संप्रदाय आहात; ज्यांना मानवजातीच्या कल्याणासाठी उभे करण्यात आलेले आहे. तुम्ही सत्कर्मांची शिकवण देता आणि दुष्कृत्यांपासून परावृत्त करता व अल्लाहवर श्रद्धा ठेवता.'' - ३:११०. ''हेच ते लोक आहेत जे सत्कर्मे त्वरेने करतात, आणि हेच ते लोक होत जे, त्याबाबतीत सर्वात

पुढे (अग्रेसर) असतात.'' – २३:६१. ''ते चांगल्या (गोष्टीं)द्वारे वाईट (गोष्टींना) दूर सारतात.'' – १३:२२. ''ते अल्लाहव्यतिरिक्त कोणाचेही भय बाळगत नाहीत.'' – ९:१८. ''ते अल्लाहवरील प्रेमाच्या बाबतीत अतिशय दृढ असतात.'' – २:१६५. ''खरे श्रद्धावंत तेच आहेत ज्यांची हृदये अल्लाहच्या (नावाचा) उल्लेख करताच थरारतात, आणि जेव्हा त्याची वचने त्यांच्यापुढे वाचली जातात, तेव्हा ती (वचने) त्यांची श्रद्धा (आणखी) वाढवितात, आणि जे आपल्या विधात्यावरच भरवसा ठेवतात.'' – ८:१२. ''त्यामुळे जे आपल्या विधात्याचे भय बाळगतात त्यांच्या त्वचेवर रोमांच उभे राहतात व त्यांची गात्रे आणि अंत:करणे अल्लाहच्या नामस्मरणाने मृदु होतात.'' – ३९:२३. ''जे स्थिरचित्त – संयमी, सत्यवादी व विनम्र आणि परमेश्वरासाठी (आपले धन) खर्च करणारे आणि रात्रीच्या सरत्या प्रहरात क्षमा याचना करणारे आहेत.'' – ३:१७. ''खरोखर, अल्लाह त्या ईशभिरूंवर प्रेम करतो.'' – ३:७६. ''जे संपन्न आणि निर्धन अवस्थेमध्ये (अल्लाहच्या मार्गात) खर्च करतात, आणि जे क्रोध आवरतात व लोकांना क्षमा करतात, आणि जे उपकारक कृत्ये करतात त्यांच्यावर अल्लाह प्रेम करतो.'' – ३:११४. ''जे उभे असताना, बसलेले असताना आणि कुशीवर (पहुडले) असताना अल्लाहचे स्मरण करतात व आकाश आणि पृथ्वी यांच्या निर्मितीच्या संबंधात चिंतन करतात.'' – ३:१९१. ''आमच्या वचनांविषयी श्रद्धावंत तेच, जे आमच्या वचनांची आठवण देताच, प्रभूला प्रणिपात करतात, आणि आपल्या प्रभूच्या स्तुतिसह, त्या पवित्रतमाचे स्मरण करतात. आणि गर्व करीत नाहीत. ते अंथरूणाला पाठ लावीत नाहीत, (व) भीतीने आणि आशेने, आपल्या प्रभूचा धावा करतात, आणि आम्ही जे काही प्रदान केलेले आहे. त्यातून (अल्लाहच्या मार्गात) खर्च करतात.'' – ३२:१५-१६.

भक्ताचे असे आदर्श स्वरूप व्यक्त करून शेवटी परमेश्वर इतरेजनांना असे आवाहन करतो की, ''आणि तुमच्यामध्ये असा एक गट असायला हवा की जो (लोकांना) कल्याणाकडे (यायचे) आवाहन करील आणि सदाचरणाची शिकवण देईल व दुराचारांपासून परावृत्त करील. अशाच लोकांना साफल्य (यश) लाभेल.'' – ३:१०४.

# ४) शब्द – ब्रह्म : भारतीय दार्शनिक आणि कुराणोक्त अभिप्राय

**(क) भारतीय दार्शनिक अभिप्राय** – परमेश्वर हा विश्वामध्ये नाना स्वरूपात प्रकट असतो. त्याच्याशी संपर्क, संवाद आणि एकरूपता साधण्यासाठी मानवास मिळालेली यंत्रणा म्हणजे ध्वनीची सोय होय. अखिल ब्रह्मांडात व्याप्त अनाहत नाद, हाच व्यष्टि स्वरूपामध्ये नाद म्हणून ओळखला जातो. हाच नाद, हेच स्पंदन संपूर्ण विश्वात भरलेले असल्यामुळे या नादातून सर्व विश्वाची उत्पत्ती झाली असे समजले जाते. आणि ॐ हा ब्रह्मांडातील सर्वात पहिला ध्वनी समजला जातो. शास्त्रामध्ये ज्याला प्रणव किंवा ओंकार म्हटले जाते, तेच उपाधि – रहित शब्द – तत्त्व आहे. समस्त सृष्टीस निर्माण करणारे आणि तिला जीवन प्रदान करणारे जे प्रज्ञायुक्त ब्रह्मांडीय स्पंदन आहे, तेच ईश्वराचे शब्द आहे, तीच परमेश्वराची वाणी आहे, तेच अनंताचे प्रकटीकरण आहे, त्या वाणीचे – शब्दाचेच प्रत्येक वस्तुमध्ये निवास आहे. ओम् (ॐ) चेतन, नादब्रह्म, शब्द – ब्रह्म किंवा पवित्र आत्मा हे सर्व ब्रह्मांडीय – ध्वनी आहेत. भगवंत ब्रह्मांडीय – स्पंदन असल्याकारणाने 'शब्द' आहे. भगवंत शब्द रूपामध्ये सर्व परमाणुद्वारे गुंजन करीत असतो. शब्दाची शक्ती ध्वनी स्वरूपात स्पंदनाच्या माध्यमाने व्यक्त होते. विभिन्न भाषांचे प्रकंपन हे भगवंताच्या विश्व-स्पंदनाने उत्पन्न होतात. भगवंत स्वत: विश्व-स्पंदन असल्यामुळे त्याला सर्व भाषा अवगत असतात, कळतात. भाषा तरी काय आहे? ती एक प्रकारची विशेष स्पंदन असते. स्पंदन म्हणजे काय? ती एक विशेष शक्ती आहे. आणि शक्ती काय आहे? तर एक विशेष विचार आहे.

ओम् (ॐ) हा परमतत्त्वाचे सृजन आणि पालन करणाऱ्या पैलूचे, अर्थात् ब्रह्मनाद किंवा ब्रह्मांडीय स्पंदनाचे संकेत करणारे बीज शब्द किंवा बीज ध्वनी आहे. वेदांचा 'ओम्', तिबेटींचा 'हुम', मुसलमानांचा 'आमीन' हा मिस्र (इजिप्त), ग्रीक, रोमन, यहूदी आणि ईसाई (ख्रिश्चन) लोकांचा 'आमेन' बनला. जगातील सर्व मोठे धर्म म्हणतात की सृष्टीमधील प्रत्येक वस्तू 'ओम्' किंवा 'आमेन' किंवा शब्द किंवा पवित्र आत्मा त्याच्या स्पंदनात्मक ब्रह्मांडीय ऊर्जेपासून उत्पन्न झाली आहे. "सुरुवातीस फक्त शब्द होते आणि शब्द हा ईश्वराजवळ होता आणि शब्दच ईश्वर होता... प्रत्येक वस्तुचे सृजन त्याच (शब्द वा ओम) ने केले होते; आणि जे काही निर्माण झाले आहे. त्यामध्ये त्याच्याशिवाय काहीच नव्हते."

(इंजील (बायबल) यहून्ना १:१३)

'लोगॉस' म्हणजेच शब्दब्रह्म चिद्रूप हा ईश्वर व मनुष्य यातील मध्यस्थ आहे.

शब्द – तत्त्वाचे माहात्म्य निर्दिष्ट करताना 'ज्ञान – तिलक' मध्ये नमूद आहे की शब्दच कुलूप आहे. यामध्ये ब्रह्म बंदिस्त आहे, आणि शब्दच ती चावी आहे की जिच्यामुळे ते कुलूप उघडले जाते. आणि

परमेश्वराचे साक्षात् दर्शन होते. ज्याप्रमाणे काट्याने काटा काढला जातो आणि चावीने कुलूप उघडले जाते. त्याचप्रमाणे शब्दाने शब्द पण उघडले जाते – उलगडले जाते. अशा प्रकारे शब्दाद्वारे अंतरतममध्ये प्रकाश निर्माण होतो. भर्तृहरीने म्हटले आहे की, शब्द – तत्त्व म्हणजेच 'अनाद्यनन्त अक्षरब्रह्म' होय. त्यामुळेच सृष्टीप्रक्रिया अर्थरूपाने भासते.

शब्दाचा शाद्बिक अर्थ होतो ध्वनी संकेत. मात्र अध्यात्माच्या क्षेत्रामध्ये शब्द म्हणजे संपूर्ण जीवसृष्टीच्या प्रत्येक घटकात अंतर्भूत असणारे ध्वनी – तरंग होय. हा ध्वनी स्वत: उत्पन्न होतो. जीव आणि ईश्वरामधील संपर्काचे हे माध्यम आहे. हा ध्वनी म्हणजे अंत:करणामधील आवाज होय. थोडक्यात सांगायचे झाले, तर प्रत्येक जीवाला प्राप्त झालेला हा ईश्वरी अंशच आहे. म्हणूनच म्हटले जाते, शब्द ब्रह्म आहे.

सत्तानिरपेक्ष, आनंदित व पूर्णस्वरूप ओंकारच होय. ओंकार हा अ, उ आणि म या तीन अक्षरांनी बनलेला आहे. या अक्षरांचा अर्थ टीकाकारांनी अ = विश्वाचा निर्माता ब्रह्म, उ = विश्वाचा पालनकर्ता विष्णू, आणि म = विश्वाचा संहारकर्ता महेश्वर असा लाविला आहे; परंतु एझुथाचन या मल्याळी कवीने ओंकाराचा अर्थ खालीलप्रमाणे सुचविला आहे. ॐ = अ + उ + म. अ = जिचा व्यावहारिक दृष्टीने विश्वाचे जड मूलस्वरूप म्हणजेच मूल द्रव्य अगर आद्य प्रकृती या रूपात अविष्कार झालेला अशी परम सत्ता. उ = विश्वातील विविध प्राणीमात्रांच्या निर्मितीला कारण झालेले जीवनतत्त्व. म = मानवात असलेली बुद्धीशक्ती अगर मन. मनुष्य म्हणजे प्रकृति व मन यांच्या संयोगाचे फळ होय. शब्दब्रह्म ॐकाराचे व्यक्त रूप आहे. ॐकार हा विश्वाचा आदिघटक द्रव्य आहे. म्हणजेच तो स्वयंभू आहे.

**(ख) कुराणोक्त दार्शनिक अभिप्राय :** नादब्रह्म किंवा शब्द – ब्रह्माची संकल्पना पवित्र कुराणमध्ये सुद्धा आढळते. पण ती वेगळ्या स्वरूपात, दोन प्रकारांनी दिसून येते. पहिला प्रकार हा 'शब्द' किंवा 'वचन' स्वरूपात आढळतो; तर दुसरा प्रकार हा 'आज्ञा' किंवा 'आदेश' स्वरूपात दिसून येतो. याचे प्रत्यंतर पुढीलप्रमाणे येते –

**(१) प्रकार पहिला :– 'कल्मा (शब्द) :** ''आणि जरी धरतीवर असलेले सर्व वृक्ष लेखण्या झाले आणि महासागराला नंतर आणखी सात महासागर मिळून (ते सर्व शाई) झाले तरी अल्लाहचे शब्द (लिहून) संपणार नाहीत.'' – ३१:२७

'कल्मा' (वचन) : ''(हे पैगंबरा ! लोकांना) सांग की, 'माझ्या विधात्याची वचने (लिहिण्यासाठी) समुद्रांना शाई बनविले गेले, तरी माझ्या विधात्याची, वचने संपण्यापूर्वीच (संपूर्ण) समुद्रांची शाई संपून जाईल (पण माझ्या विधात्याची वचने संपणार नाहीत) आणि जरी आम्ही समुद्रावर समुद्र आणणे सुरू ठेवले तरी (समुद्र संपत जातील, पण असीम महान असलेल्या विधात्याच्या, गुणांचे वर्णन कधी संपू शकत नाही).' – १८:१०९.

'कल्मा' अर्थात 'शब्द' किंवा 'वचन' म्हणजे त्या परमेश्वराची स्तोत्रे, त्याचे पराक्रम, त्याची सत्ता व अधिकार आणि त्याचे जगच्छालन व व्यवस्था वगैरे असा अभिप्राय होतो. परमेश्वर जसा अमर्यादित होय. तसेच त्याचे शब्दही अमर्यादित होत; आणि समुद्र कितीही झाला तरी मर्यादितच असणार. म्हणजे मर्यादित ते अमर्यादिताच्या पासंगासही पोचणार नाही. शिवाय असेच इतर मर्यादित समुद्र त्याच्या भरीस घातले तरी

ते अमर्यादित होऊ शकणार नाहीत. सारांश, 'शब्द' म्हणजे परमेश्वराची अगाध महिमा, अधिकार, सत्ता, त्याची जगत संचालनाची सुव्यवस्था असा अभिप्राय होतो.

मानवी भाषाही समस्त सृष्टीमध्ये व्याप्त ध्वनी – शब्द, संकेत आणि ईश्वराची अपार कृपा याचे गुणगान करण्यास तोकडी पडते; मग कल्पनातीत अशी किती साधने उपयोगात आणली गेली तरी ते सर्व अपुरेच पडतील.

''ईश्वराचे शब्द'' : परमेश्वराचे आश्चर्यकारक संकेत आणि आज्ञा व आदेश असंख्य व अनंत आहेत. जरी पृथ्वीवरील सर्व वृक्ष लेखण्या झाले आणि महासागराला नंतर आणखी सात महासागर मिळून ते सर्व शाई झाले तरी त्यांना अभिव्यक्त करता येऊ शकत नाही. परमेश्वराद्वारे अवतरित कुठलेही ग्रंथ मानव हा समजू शकेल आणि आपल्या जीवनामध्ये उपयोगात आणू शकेल असल्याच बाबींशी निगडीत असते. मानव हा ज्यांची कल्पनाही कधीच करू शकणार नाही अशा गुह्यांपलिकडे गुह्ये आहेत, अनंत साधनांनी परमेश्वराचे कितीही गुणगान केले तरी सुद्धा ते त्याचे सामर्थ्य, वैभव आणि ज्ञान यांचे वर्णन करण्यास अपुरेच ठरेल.

**(२) प्रकार दुसरा :– 'कुन्' (भव, तथास्तुत, हो) :** आज्ञा किंवा आदेश, अथवा योजना. ('अम्र') ''व इजा कजा अम्रत फइन्नमा यकूलु लह कुन् फयकूनु'' – २:११७ अर्थात् ''आणि जेव्हा तो (परमेश्वर) कोणतीही गोष्ट करण्याचा निर्णय करतो तेव्हा तो तिच्याबाबतीत केवळ ''कुन'' (भव, हो, तथास्तु) असे म्हणतो आणि ती (तत्काळ क्षणार्धात निमिषमात्रात) होते.'' – २:११७ ''तो जे इच्छितो ते निर्माण करतो. जेव्हा तो (एखादी गोष्ट निर्माण करण्याचा) निर्णय घेतो, तेव्हा तो त्या गोष्टीबाबत केवळ इतकेच म्हणतो – 'अस्तित्वात ये' आणि (लगेच) ती गोष्ट अस्तित्वात येते.'' – ३:४७. ''जेव्हा आम्ही एखादी गोष्ट इच्छितो तेव्हा तिच्या बाबतीत आम्ही एवढेच म्हणतो की 'हो', आणि ती (तत्काळ) होते.'' – १६:४०.'' तो तर असा (सामर्थ्यशाली) आहे की, जेव्हा तो (एखादी गोट घडवू इच्छितो) तेव्हा त्याची आज्ञा केवळ अशी असते की तो फक्त एवढेच म्हणतो, 'हो' आणि ती (ताबडतोब) होते.'' – ३६:८२.'' आणि जेव्हा तो एखादी गोष्ट करण्याचा संकल्प करतो, तेव्हा तो केवळ तिला असे म्हणतो, 'हो.' (क्षणार्धात) ती होऊन जाते.'' – ४०:६८'' आणि (काहीही निर्माण करताना) आम्ही फक्त एकदा आदेश देतो आणि तिची अंमलबजावणी लगेच डोळ्याच्या लवण्याप्रमाणे होते. (म्हणजे इकडे आदेश – तिकडे लगेच अंमलबजावणी).'' – ५४:५०

''अल्लाह आपल्या वचनां (शब्दां) द्वारे असत्य मिटवितो आणि आपल्या आदेशांनी सत्य प्रस्थापित करीत असतो.'' – ४२:२४.

उपरोक्त भारतीय आणि कुराणोक्त अभिप्राय हा दोहोंची तुलना केल्यास आपणास असे स्पष्ट आढळून येते की, ॐ हा ब्रह्मांडामधील सर्वात पहिला ध्वनी किंवा नाद समजला जातो. या आद्य नाद अथवा प्रकंपनामुळे समस्त लोक अर्थात् ब्रह्मांड प्रकट होते. हा परम तत्त्वाचे सृजन आणि पालन करणारे पैलूंचे अर्थात् ब्रह्मनाद, शब्द ब्रह्माचे संकेत करणारे बीज ध्वनी किंवा बीज शब्द आहे. कुराणोक्त 'कुन' मध्ये सुद्धा अल्लाहच्या आज्ञेने निमिषमात्रात त्याची सृजन शक्ती कार्यान्वित होऊन त्याची मनोवांछित गोष्ट तत्काळ

दृष्टिगोचर होते. ‘कुन’ हा पण आदि नाद किंवा आद्य ध्वनी आहे. या दोन्ही संकल्पनांमध्ये अशा प्रकारे आश्चर्यजनक साम्य आढळते.

परमेश्वराने आपले इच्छेपोटी ब्रह्मांड निर्माण केले आहे. सर्व धर्मग्रंथ मानतात की प्रभू हा सुरुवातीस एकटाच होता. आपण स्वत: एकापासून अनेक होण्याचा त्याने संकल्प केला आणि त्याने दोन रूप धारण केले. एक प्रभुची ज्योती आणि दुसरे प्रभुचे शब्द. सृष्टीमधील नानाविधतेची सुरुवात येथूनच झाली. परिणामी एकतेमधून अनेकता निर्माण झाली.

अल्लाहचा संकल्प किंवा इच्छावाचक शब्द ‘कुन’ म्हणजेच ‘हो’ आहे आणि त्याची तत्काळ क्षणार्धात निमिषमात्रात परिणती‘फयकून’ अर्थात ‘होते’ अशी आहे. याच प्रक्रियेद्वारे अल्लाहने प्रत्येक वस्तुचे सृजन केले आहे. म्हणून असे म्हटल्यास वावगे होणार नाही की प्रत्येक वास्तुचे सृजन हे अल्लाहच्या ‘‘कुन् फयकून’’ या आदेशान्वये होते. ‘कुन’ अर्थात ‘भव’, ‘हो’ ‘तथास्तु’ या आदेशात्मक किंवा आज्ञावाचक शब्दाच्या परिपालनाची परिणती (‘फयकून’) ‘झाली’ (अशी) आहे. जसे कारणाशिवाय कोणतेच कार्य घडत नाही. तद्वत प्रयत्नाशिवाय फळ मिळत नाही. या न्यायाने परमेश्वराच्या उपरोक्त कृतीची कसोटी घेतली तर आपणास असे आढळेल की, त्याच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये वेळ – स्थळांमधील अंतर, परिस्थिती, प्रसंग, योजना ही सर्व एकच क्रिया असते. मात्र सृष्ट्य किंवा निर्मित वस्तूंमध्ये एक निश्चित ‘‘प्रमाण व मात्रा’’ असते. त्यांच्यासाठी वेळेचे अंतर, स्थळांचा लांब पल्ला, दीर्घ अंतर किवा परिस्थिती या बंधनकारक अटी असतात. मात्र परमेश्वरास सृष्टी निर्माण करण्यासाठी कोणतीच अट लागू नसते. तो स्वयंभू आहे, तोच विश्व निर्माता, विश्वाचा पालनकर्ता आणि संहारकर्ता आहे. मात्र ईश्वरासाठी त्याची आज्ञा, योजना, शब्द (आदेश), अंमलबजावणी आणि परिणती या समस्त कृती भिन्न – भिन्न स्वरूपात प्रकट होत नसून त्या सर्व त्याची एकच कृती असते. यासाठी डोळ्याची पापणी लवणेची उपमा देण्यात आली आहे (उपरोक्त श्लोक क्रमांक ५४:५० पाहा.). एक सामान्य माणसाच्या दृष्टीत हा सर्वात कमी कालावधी आहे, कमी वेळ आहे : पापणी लवण्याचे कारण, तिच्याशी संबंधित (निगडीत) स्नायूंची हालचाल, पापण्यांची उघड – झाप या सर्व जवळजवळ एकापाठोपाठ घडणाऱ्या क्रिया आहेत. हिच्या व्यत्यास स्वरूपात मानवाच्या कृती कष्टसाध्य, वेळखाऊ, प्रयत्नाची निकड असलेल्या असतात. वांछित ध्येय गाठण्यासाठी अनेक टप्पे पार पाडावे लागतात. परमेश्वराच्या आदेशामधील ‘भव’, ‘हो’, ‘तथास्तु’ (‘कुन’) या शब्दामध्ये सर्व काही (एकाच वेळेस) आहे. त्यामध्ये कोणत्याच प्रकारचा अवरोध वा अडथळा किंवा परावलंबित्व मुळीच नाही आणि हा पण एकेश्वरवादी एकत्वतेच्या तत्त्वज्ञानाचा दुसरा एक टप्पा आहे.

परमेश्वराच्या आदेशाची फलनिष्पत्ती तत्काळ होत असल्यामुळे त्याला काळाचे बंधन मुळीच नाही. कारण काळाची कल्पना दोन घटनेमुळे निर्माण होते. मात्र ईश्वरी मायेचे कार्य अत्यंत अगाध आहे.

अल्लाहच्या **पवित्र वचना (‘कल्म ए तय्यबा’)** चा उल्लेख पवित्र कुणामध्ये असा आहे – ‘‘काय तू पाहिले नाहीस अल्लाहने **पवित्र वचनाचे** उदाहरण कसे स्पष्ट करून सांगितले आहे? (ते) एका अशा चांगल्या वृक्षासारखे (आहे) ज्याचे मूळ अतिशय दृढ आहे आणि त्याच्या फांद्या आकाशाला (भिडलेल्या) आहेत. तो त्याच्या विधात्याच्या आज्ञेने सर्वकाळ आपले फळ देत असतो.’’ – १४:२४.

उपरोक्त **'कल्म ए तय्यबा'** हा आहे –

| ला इलाह इल्लल्लाह | मुहम्मदुर्रसूलुल्लाह |
|---|---|
| १ | २ |
| पूर्वार्ध | उत्तरार्ध |

'कल्म ए तय्यबा' (पवित्र वचन) हा 'कल्मा' (शब्द, वचन) चा विस्तारीत रूप आहे. याचा पूर्वार्ध हा 'अल्लाह' अर्थात् परमेश्वराशी; तर उत्तरार्ध हा त्याचा सेवक व महाप्रेषित मुहम्मद स. यांच्याशी निगडीत आहे. या 'कल्म ए तय्यबा'स **ब्रह्मसूत्र** असे म्हणता येईल उपरोक्त ब्रह्मसूत्राचे मराठी अनुवाद याप्रमाणे होईल – ''अल्लाहशिवाय (दुसरा) कोणी उपास्य नाही.'' – ३७:१५ (आणि) ''मुहम्मद स. अल्लाहचा प्रेषित आहे.'' – ४८:२९. ही इस्लामी श्रद्धा या ब्रह्मसूत्रामध्ये एकवटलेली आहे.

# ५) सूफींचे आचरण व त्याचे स्वरूप*

प्रेषित महंमद यांचे वचन आहे– ''शिष्टाचार (हुस्नुल आदाब) ईमान (श्रद्धे) चा एक हिस्सा आहे.'' ते असेही म्हणतात, ''माझ्या स्वामीने मला दुरुस्त केले आणि माझी उत्तम दुरुस्ती केली.'' माणसामाणसांमध्ये संबंध निर्माण करण्यासाठी भीड (मुरब्बत) असते. धार्मिक संबंधांसाठी सुन्ना (प्रेषित मार्ग) आहे. शरीअत (कर्मकांड) प्राण असेपर्यंत नियमांचे पालन करावे लागते; कधी प्रामाणिकपणे तर कधी भिडेखातर ! नियम तोडणारा संत असू शकत नाही. ज्याच्यावर ईश्वराचे प्रेम आहे, तोच शिष्टाचार पाळतो. प्रेषित मुहम्मद यांना जिब्रील यांनी सांगितले, जसे स्वामींसमोर सेवक बसतो तसे बसले पाहिजे. अदीब–ए–कामंदी यांनी वीस वर्षे कुठेच पाठ टेकली नव्हती. प्रेषितांचे [स.] ईश्वरासमोर जेव्हा आरोहण झाले, तेव्हा त्यांनी भौतिक जगाबद्दल आणि पारलौकिक जगाबद्दल आकर्षण न दर्शवता स्वयंनियंत्रणाचे उत्कृष्ट दर्शन घडवले.

प्रेषित महंमद[स.] यांच्या वचनांचा भावार्थ असा आहे की, तीन गोष्टींनी तुमच्या धर्मबंधूंचे तुमच्याविषयीचे प्रेम अधिक दृढ होते. (१) तुम्हाला ते भेटले, तर प्रथम तुम्ही त्यांना सलाम (प्रणाम, नमस्कार) करा. (२) तुमच्या शेजारी तो बसायला आला तर त्याच्यासाठी जागा करून द्या आणि (३) त्याला जे नाव आवडते, त्याने त्याला हाक मारा.

**१. साहचर्यासंबंधी नियम**

हदीस आहे – शैतान एकट्या माणसाबरोबर असतो. पण तो दूर असतो दोन लोकांपासून, जे बरोबर असतात. कुरआनमध्ये आले आहे, ''तीन लोकांमध्ये खासगी चर्चा नसते, त्यात ईश्वर चौथा असतो.'' जुनैद यांचा शिष्य हा सूफीपणाच्या पूर्णत्वास पोहोचला असल्याने त्याने एकटे राहावे, असे ठरवले. जुनैद यांचा शिष्य एकांतवासात गेला. रात्रीच्या पहिल्या प्रहरात एक उंट येई व त्याला म्हणत असे की, तो त्याला स्वर्गात घेऊन जाईल. मग शिष्य उंटावर बसे. त्याला सुंदर जमिनीची मालकी मिळे. तिथे अतिशय सुंदर लोक राहत. चवदार अन्नपदार्थ असत. वाहणारे झरे असत. सकाळपर्यंत तो तेथे राही. सकाळी पुन्हा आपल्या खोलीच्या दारात पडलेला असे. हा अनुभव मोठ्या गर्वाने तो आपल्या गुरूबंधूंना सांगत असे. जुनैद यांना ही गोष्ट कळल्याबरोबर ते त्यांच्या शिष्याला भेटायला गेले. त्याच्याकडून सर्व वृत्तांत ऐकून शिष्याला म्हणाले की, तू तुझ्या कार्यक्रमात 'कुठेही सामर्थ्य नाही, पण फक्त ईश्वरात जो खूप थोर आहे, महान आहे.' असे तीन वेळा म्हण. नेहमीप्रमाणे उंट आला. प्रवास सुरू झाला. शिष्याला गुरूची आठवण झाली व गुरूंनी सांगितल्याप्रमाने शिष्य बोलला आणि काय आश्चर्य ! त्याने पाहिले की, तो शेणाच्या

ढिगाऱ्यावर बसलेला आहे आणि आजूबाजूस हाडे पडलेली आहेत. शिष्याला धडा मिळाला की, सहकाऱ्यांच्या सहवासात राहिले पाहिजे.

वास्तव्यास असलेले सूफ़ी फिरणाऱ्या दरवेशांना श्रेष्ठ समजतात, तर फिरणारे दरवेश वास्तव्य करून असलेल्या दरवेशांना श्रेष्ठ समजतात. वृद्ध सूफ़ींनी तरुण सूफ़ींना मान द्यायचा असतो, कारण तरुणांनी पाप कमी केलेले असते. तरुण सूफ़ींनी वृद्धांना मान द्यावा, कारण त्यांची प्रार्थना तरुणांच्या प्रार्थनेपेक्षा जास्त असते.

**२. रहिवासी सूफ़ींसाठी नियम**

रहिवासी सूफ़ीकडे प्रवासी सूफ़ी आला असेल, तर त्याची सेवा प्रेषित इब्राहीम जशी करत तशी केली पाहिजे. त्याचे नाव, गाव विचारायचे नाही. तो त्याच्या गावाहून केव्हा बाहेर पडला, याची चौकशी करायची नाही. त्याला राहण्यासाठी स्वतंत्र खोली हवी की नको, हे विचारावे. त्यास चांगले अन्न द्यावे. प्रवासी सूफ़ीने पाय चेपण्यास हरकत घेतली नसेल, तर त्याचे पाय चेपावेत. त्यास आंघोळ घालावी. हात पाय घासून द्यावेत, त्याचे कपडे धुवावेत. गावातल्या मोठ्या सूफ़ीकडे त्यास घेऊन जावे. जर त्याची इच्छा नसेल, तर आग्रह करू नये.

**३. प्रवासाविषयी नियम**

सूफ़ीने केवळ ईश्वरासाठी प्रवास करावा. आंतरिक बाबतीत त्याने वासनांचा त्याग करून शुद्ध व्हावे. त्याने पवित्र ठिकाणी यात्रा करण्याचा व नास्तिकांविरुद्ध लढा देण्याचा उद्देश डोळ्यांसमोर ठेवावा. प्रवासात लज्जा रक्षणासाठी ठिगळे लावलेला झगा, नमाज़ पढण्यासाठी जानमाज (आसनवस्त्र) बादली, दोरखंड, जोडे किंवा खडावा, रक्षणासाठी काठी जवळ ठेवावी. नमाज़ व इतर धार्मिक कृत्यांबाबत सजग असावे.

**४. खाण्यापिण्याविषयी नियम**

माणसाने जास्त खाऊ नये व जास्त पाणीही पिऊ नये. 'भुके' विषयी मोठ्या सूफ़ींना खूप आकर्षण वाटे. 'भूक' काय असते, हे माहीत असते तर मीच तुमचा स्वामी, ईश्वर आहे असे लोकांना फिरऔन म्हणाला नसता. प्रचंड खजिना बाळगणाऱ्या कारूनला भूक माहिती असती, तर तो बंडखोर झाला नसता. भूक माहिती नसल्याने नको असणारे धारिष्ट्य त्यांनी दाखवले. एकटे खाऊ नका, पहिला घास थोड्याशा मिठास लावून खा. खाताना आपल्यासोबतच्या मित्रांना व्यवस्थित खाता येईल, हे बघा. जो सूफ़ी जाहीर करतो की, मी जगाशी संबंध तोडला आहे आणि अन्नाच्या एका घासाचा लोभ धरतो. हे अयोग्य आहे. उजव्या हाताने जेवावे. फक्त स्वत:च्या घासाकडे पाहावे. जेवताना पाणी पिऊ नये. तहान लागली तर तोंड ओले करण्यासाठी पाणी प्यावे. जेवताना मोठे घास घेऊ नयेत. घास नीट चावून खावा. घाई करू नये. अपचन होईल असे खाऊ नये. जेवण झाल्यावर ईश्वराचे आभार मानावेत.

**५. चालण्याविषयीचे नियम**

कुरआनमध्ये ईश्वराने सांगितले आहे की, जमिनीवर नम्रपणे चाला. दरवेश विचारपूर्वक चालत नसतील, तर ते त्यांच्या निष्काळजीपणाचे लक्षण आहे. जे काही जगात आहे, ते केवळ दोन पावलांमध्ये प्राप्त करण्यासारखे आहे. एक पाऊल स्वत:च्या हितसंबंधाबाहेर टाकायचे, तर दुसरे ईश्वरी आज्ञांच्या क्षेत्रात !

**६. घरात व प्रवासात झोपण्याविषयीचे नियम**

या विषयावर सूफ़ींमध्ये खूप वाद आहेत. नव्या सूफ़ीने झोप घेऊ नये, जोपर्यंत ती अनावर होत नाही. प्रेषित मुहम्मद[स.] झोपेला मृत्यूचा बंधू मानतात. झोपणारा त्याच्यात व ईश्वरात पडदा निर्माण करतो, कारण झोपेच्या कालावधीपुरता तो दुर्लक्ष करणारा बनतो. पण त्याच्या पाप-पुण्यासंबंधी नोंद होणेही थांबते. मुले वयात येईपर्यंत व वेडा शहाणा होईपर्यंत निद्रिस्त समजला जाऊन बऱ्यावाईट कृत्यांची नोंद होत नाही. समाजविघातक काम करणारे लोक झोपले, तर समाज त्यांच्या दुष्कृत्यांपासून सुरक्षित असतो. इब्लिससाठी पापी माणसाची झोप अतिशय क्लेशकारक असते. इब्लिसला सारखे वाटते की, पापी माणसांची झोपेतून लवकर उठून पापमालिका पुढे सुरू ठेवावी.

जुनैद आणि इस्फ़हानी यांच्यात 'झोप' या विषयावर मतभेद आहेत. इस्फ़हानी म्हणतात की, झोप म्हणजे ईश्वराकडे दुर्लक्ष आहे. प्रियकराने रात्रंदिवस जागायचे असते. साधकाची अवस्था स्थानक झोपेत विसरले जाण्याची दाट शक्यता असते. जुनैद झोपेला ईश्वराकडून मिळालेली भेट समजतात. ईश्वरावर प्रेम करणाऱ्यांना झोपेची भेट मिळते.

**७. बोलण्याविषयी व मौनाविषयी नियम**

ईश्वराने माणसाला 'वाणी' ही मोठी देणगी दिली आहे, जिच्या साह्याने ईश्वराच्या सर्व गुणवैशिष्ट्यांची ग्वाही माणूस देतो. इतर प्राण्यांमध्ये आणि माणसात वाणीमुळे फरक पडतो. प्रेषितांच्या म्हणण्याचा भावार्थ असा आहे की, माझ्या लोकांबद्दल जी सर्वाधिक वाईट भीती वाटते, ती त्यांच्या जिभेमुळे ! बोलण्याची माणसाला नशा चढते व सवय होते. 'ज्याने मौन धारण केले, तो वाचला,' हे प्रेषितांचे प्रसिद्ध वचन आहे. बोलणे बहुधा ढोंगीपणाचे असते. ईश्वरासंबंधी बोलणे नाकारले तरी साधकाच्या ब्रह्मज्ञानाच्या साराला धक्का लागत नाही. 'वाणी' ला अधिक महत्त्व देताना म्हटले जाते. की, ईश्वराने ज्या असंख्य देणग्या लोकांना दिल्या आहेत, त्याबद्दल आभार मानले पाहिजेत. काही वेळा बोललेच पाहिजे अशी परिस्थिती येते. लाजेमुळे मौन असेल, तर मग वाणीमुळे जीवन आहे.

**८. भिक्षा मागण्यासंबंधी नियम**

भिकाऱ्यांना हाकलून लावू नका, अशी ईश्वराची आज्ञा आहे. पण त्याबरोबरच सर्वांनाच आज्ञा आहे की, भिक्षा मागू नका. भिक्षा मागणे म्हणजे ईश्वर सोडून इतरांसमोर हात पसरणे आहे. राबियांना एका रईसजाद्याने काहीतरी मागा, अशी विनंती केली. तेव्हा राबियांनी उत्तर दिले, सृष्टीच्या सृजकाकडून काही मागण्याची मला लाज वाटते; तुझ्याकडून काय मागायचे ? तेज:पुंज चेहऱ्याच्या लोकांकडून आपल्या गरजा पूर्ण करून घ्या, असा प्रेषितांच्या वचनाचा भावार्थ आहे. काही सूफ़ी गुरू तीन कारणांमुळे भिक्षा मागण्याची परवानगी देतात, (१) मन इतरत्र न अडकता स्वतंत्र राहावे म्हणून ईश्वराच्या आराधनेत आपल्याला काही दिवस अन्न मिळाले नसेल तर, (२) ज्या वेळी आपल्या कनिष्ठ आत्म्याला प्रशिक्षण द्यायचे असेल , तेव्हा आणि (३) ईश्वराबद्दलच्या अत्यादराने सूफ़ी त्याच्याकडून मागण्यापेक्षा त्याने निर्माण केलेल्या मानवजातीकडून मागतात.

तुम्हाला (सूफ़ींना) भीक मिळाली नसेल, तर अधिक आनंदी राहा. तुम्ही आणि ईश्वर यामध्ये दुसऱ्या कुणाला आणू नका. स्त्रियांकडून व बाजारात ज्याच्याकडून तुम्ही भिक्षा घेता, त्याची कमाई हरामाची नको. हलाल कमाई करणाऱ्यांना तुमचे गुपित सांगण्यास हरकत नाही. भिक्षेच्या कमाईने घर चालवू नका व संपत्ती उभारू नका. ईश्वराच्या नावाने फालतू भौतिक कमाई करू नका. एका वृद्ध सूफ़ींबरोबर एक चिमणी असायची. ईश्वराच्या नावाने काही द्या असे म्हणण्याऐवजी या चिमणीच्या नावाने काही द्या, अशी भिक्षा ते मागत.

**९. विवाह व ब्रह्मचर्यासंबंधी**

स्त्रिया पुरुषांसाठी वस्त्रे आहेत आणि पुरुष स्त्रियांसाठी, असे कुरआनमध्ये म्हटलेले आहे. सुंदर चेहऱ्याच्या, ज्यांच्या निर्वाहासाठी कमी पैसा लागेल अशा आणि ज्या कमीत कमी मेहर घेतील अशा स्त्रिया जास्तीत जास्त आनंददायी असतात. इस्लाममध्ये सर्व स्त्री-पुरुषांसाठी व जे स्वत:ला अनैतिक बाबींपासून सुरक्षित ठेवू शकत नाहीत, अशांना विवाह करणे अनिवार्य आहे. वासनामुक्तीसाठी विवाह आवश्यक आहे. स्त्रिया सुंदर असतात किंवा श्रीमंत असतात किंवा घरंदाज असतात म्हणून किंवा धार्मिक असतात म्हणून त्यांच्याशी विवाह करतात. धार्मिक स्त्रियांशी विवाह करणे सर्वोत्तम आहे. एकमेकांना शोभणारे दांपत्य एक दुसऱ्यासाठी सुखकर असते तर बेजोड दांपत्य एक दुसऱ्याला तापदायक असते.

ब्रह्मचर्याने वाममार्गी लागण्याची खूप शक्यता असते. दुसरा महत्त्वाचा दोष असा की, त्यात प्रेषितांच्या आज्ञेचा भंग होतो. विवाह करण्यातही दोष आहेत. ईश्वराखेरीज इतरत्र मन गुंतण्याची शक्यता असते. शरीर वैषयिक बाबतीत रमण्याची शक्यता असते. समाजात राहणाऱ्यांसाठी विवाह श्रेयस्कर व जे समाजातून निवृत्त होऊ इच्छितात, त्यांच्यासाठी ब्रह्मचर्य हा दागिना आहे. सूफ़ींनी विवाह केला तर हलाल कमाईने त्यांनी कुटुंबाचे पालन-पोषण करायचे असते.

वासनांना पळवायचे असेल, तर स्वत:वर नियंत्रण करावे लागते. भूक त्यासाठी उत्तम साधन आहे. दुसरे साधन ईश्वराची भीती आणि त्याच्यावर असणारे शुद्ध प्रेम आहे. खरा माणूस विवाहात भ्रष्ट होतो, असे नाही. स्वत:च्या इच्छांवर व वासनांवर नियंत्रण करता यायला पाहिजे. धार्मिक दिनचर्येत खंड पडावयास नको. त्याच्या अवस्थेतील पकड त्याने ढिली होऊ द्यायची नसते. वेळ वाया घालवायचा नसतो. त्याच्या पत्नीशी त्याची वागणूक अतिशय चांगली हवी. जुलमी शासकाच्या पदरी त्याने नोकरी करू नये. (*डॉ. अलीम वकील - ''एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी'' पृ. २४१-४६.)

## ६) काया-मनोचिकित्सकाच्या भूमिकेत सूफ़ी
## (व्याधि-निवारणकर्त्याच्या भूमिकेत सूफ़ी)

वास्तविक आरोग्य हेच मनुष्याची खरी संपत्ती. त्याचे आरोग्य बिघडले की अस्वस्थता वाढते. आजारांमुळे त्याचे आरोग्य बिघडते. त्याचा आजार दोन प्रकारचा असतो - (१) शारीरिक आणि २) मानसिक. प्राय: त्याच्या व्याधी शारीरिक असतात. क्वचित मानसिक पण असतात. योग्य औषधोपचारांमुळे त्याचे शारीरिक आजार बरे होतात. परंतु काही दुर्धर असाध्य व्याधी नाना प्रकारचे औषधोपचार करून सुद्धा बऱ्या होत नाहीत. डॉक्टरी उपचार कुचकामी ठरतो. कंटाळून, हताश होऊन अशी आजारी माणसे मंत्रोपचारांकडे वळतात. त्याने काही आजाऱ्यांना गुण येतो. त्यामुळे त्यांची श्रद्धा साहजिकच मांत्रिकांकडे वळते व ती बळावते.

काही साधु-संत असाध्य व्याधी बरे करण्यामध्ये पारंगत असतात. ते मंत्रोपचार आणि कृपायाचनेसारख्या आध्यात्मिक व आत्मिक शक्तीच्या बळावर काही दु:साध्यच नव्हे तर असाध्य व्याधींपासून आजाऱ्यास मुक्त करतात. या क्षेत्रात काही सूफ़ी संत आपली महत्त्वाची भूमिका यशस्वीपणे वटविताना (बजावताना) दिसतात. यासाठी ते इस्लामी आध्यात्मिक उपचारांची कास धरतात.

आध्यात्मिक औषधोपचारांमध्ये मानवी व्यथेचे निर्वचन हे एक विशालतर आत्मिक आणि नैतिक चौकटीचा भाग (हिस्सा) आहे. इस्लामी मानसशास्त्रान्वये मानवी व्यक्तित्वाचे दोन मूलभूत घटक आहेत, 'नफ़्स' किंवा व्यक्तीची वासना आणि 'रूह' किंवा तिचा आत्मा; विविध वासना आणि आत्मे यांचा समष्टी स्वरूपात विचार केला जातो. हीनतर वासनेचा भ्रष्ट इच्छा-आकांक्षा, पाप आणि दुष्ट शैतानाच्या कुजबुजीशी असलेल्या जवळीकीमुळे ती मानसिक आजारांची जननी मानली जाते. अशा प्रकारे, हीनतर दुर्वासनेपासून ते संतुष्ट आत्म्यापर्यंत वासने ('नफ़्स')ची उतरंड असते. मानसिक आजारांचे सर्वसाधारणपणे भूत-पिशाच्चबाधा आणि यक्षयोनीबाधा स्वरूपात भाष्य केले जाते.

सूफ़ी संप्रदायांचे सद्गुरू हे पारंपरिक धार्मिक उपाय करणारे मानले जातात. ते कुरआनचे काही प्रभावी श्लोक पठण करून, ताईत, तोडगा करून आणि आचारमूलक आणि कर्मकांडविषयक औषधयोजना करून भूत-पिशाच्च बाधा सारतात आणि इतर रोग बरे करतात. या बरे करण्याच्या कर्मकांडाचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे सूफ़ी संतांचे दर्गे आणि त्यांच्या समाधींचे दर्शन करण्यासाठी यात्रा होय. येथे प्राय: उपाय करणारे बसतात. येथे हमखासपणे आजार बरे करण्याची स्वप्ने ठसविली जातात आणि ही एक सर्वसामान्य प्रथा

आहे. लोकोपचारांमध्ये संतांची भविष्यवाणी पण औषधाची भूमिका बजावते आणि ताईत गंडा, शकुन, जादूचा प्रभाव असलेले औषधी प्याले, फलज्योतिष यासारख्या जादू-टोणा पद्धतींचा समावेश होतो. काही वेळेस जादुई औषधयोनेमुळे आजार बरा होतो; परंतु बहुधा भूतबाधा किंवा असाध्य रोगापासून बचाव केला जातो.

सूफ़ी संतांविषयी अशी धारणा आहे की ते परमेश्वराचे विशेष कृपापात्र असतात. परमेश्वराने त्यांना अलौकिक शक्ती प्रदान केलेली असते. सर्वसामान्य लोक याच विश्वासावर आपले दुःख निवारण करण्यासाठी त्यांची आठवण काढतात (करतात). त्यांच्या समाधीवर गोडधोड अर्पण करतात आणि नवस फेडतात. आजारापासून बरे होण्यासाठी, पुत्रप्राप्तीसाठी, एखाद्या कामात यशलाभ होण्यासाठी लोक सूफ़ी संतांच्या समाधीवर दृष्ट ('नज़र') चढवितात. मनोकामनापूर्तीनंतर त्यांच्या समाधीवर बळी अर्पण करतात. समाधी दर्शनानंतर श्रीमंत लोक गरीबांना दान देतात, पैसे वाटतात, जेवू घालतात. सूफ़ी संतांच्या समाधीसंबंधी एक हदीस (प्रेषित-वचना)चा हवाला (संदर्भ) दिला जातो की, 'जर तुमचे अंतःकरण शोक-संतप्त असेल तर पवित्र आत्म्यांच्या समाधीजवळ जा आणि शांतीचा शोध घ्या.' मोग़ल सम्राट जहाँगीर एकदा आजारी पडला. प्रयत्नांची पराकाष्ठा करून सुद्धा त्याचा आजार काही बरा होईना. हताश होऊन त्याने अजमेरचे सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख्वाजा मुइनुद्दीन चिश्ती यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यांच्या समाधीची पुन्हा बांधणी केली आणि त्याचा आजार बरा झाला.

मानसिक आजाराच्या उपायांमध्ये दचक (हबक) उपाय (Shock Therapy) किंवा काळिमोपचार (Shame Therapy) सारखे मानसोपचार केले जात. असे सांगतात की ख़लिफ़ा हारून रशीदच्या एका दस्यु-कन्येस दचक उपायाने बरे करण्यात आले होते.

रोग बरे करण्याच्या अनेक औषधयोजना अस्तित्वात होत्या. अनेक कृपायाचना (प्रार्थना) आणि कुरआनचे गुणकारी श्लोक असलेले ताईत यामध्ये हमखास गुणकारी शक्ती असल्याचा अनुभव आहे. अनेकदा एका कागदाच्या चिठ्ठीवर किंवा चिनीमातीच्या भांड्यावर काही विशिष्ट क़ौराणिक श्लोक लिहिले जातात आणि मग त्यांना पाण्यामध्ये विरघळतात. नंतर ते पाणी आजाऱ्यास पिण्यास सांगितले जाते. आजारी पाणी पितो आणि काही दिवसांनी तो बरा होतो. आग्नेय आशिया खंडातील राष्ट्रांमध्ये, आजारी लोक मशिदीबाहेर थांबतात आणि नमाज पढून बाहेर येणारे श्रद्धावंत कुरआनचे काही अध्याय वाचून आजारी लोकांवर फुंकर मारतात. यामुळे त्यांचा आजार बरा होतो, अशी श्रद्धा आहे.

'ख़वास्सल कुरआन' ('कुरआनचे आश्चर्यकारक गुण') : अनेक प्रकारच्या रोगांसाठी उपचारक गुण असलेले 'कुरआन'मधील आश्चर्यकारक वेचे-निवडक वेचे-निवडून आजार बरा करण्यासाठी उपयोगात आणली जातात. असे म्हणतात की, 'कुरआन'चा अध्याय क्रमांक ३८ : सॉदचे वाचन एखाद्या दमा असलेल्या निजलेल्या व्यक्तीवर केल्यास तिची श्वासोच्छ्वासाची समस्या समाप्त होते. जागे असताना ते लिहून वाचल्यास आजाऱ्यांचे आजार बरे होतात. एखादी व्यक्ती, तिचे निरंतन वाचन केल्यास ती होणाऱ्या सर्व प्रकारच्या त्रासापासून निर्भय होऊन जाते.

मानसिक विकारांविषयी इस्लामप्रणीत यूनानी कारणमीमांसा पुढीलप्रमाणे आहे–

मानसिक विकृती आणि आजारांविषयी यूनानी सिद्धान्ताचे निर्वचन हे गॅलन (मृत्यू इ.स.२००) आणि इब्न–सीना (अविसिना) (मृत्यू इ.स.१०३७) यांचे सिद्धान्त आणि मानवी शरीरभर पसरलेले चार धातूंचे (रक्त, कफ, कृष्ण पित्त आणि पिवळे पित्त) शरीरशास्त्र यावर अवलंबून आहे. उक्त सर्व धातू हे पृवी, आप, तेज आणि वायू या चार महाभूतांचे एक संयोग किंवा मिश्रण आहे. उष्ण, शीत, शुष्क आणि ओलसर असे चार मूलभूत गुण धातूंमध्ये असतात. व्यक्तीचे आरोग्य हे धातूंच्या सापेक्ष समतोल अवस्थेवर अवलंबून असते. विशिष्ट धातूच्या प्रभुत्वावर व्यक्तीचा स्वभाव निश्चित होतो. उदाहरणार्थ, कफ किंवा कृष्ण पित्ताच्या प्रभुत्वामुळे व्यक्ती (माणूस) ही क्रमशः शांतचित्त किंवा खिन्नचित्त–विमनस्क स्वभावाची बनते. धातुंमधील बदल आणि आधिक्यामुळे विकार बळावतात, रोग निर्माण होतात, विशेषतः कृष्ण पित्ता (शीत आणि शुष्क)मुळे खिन्न मानसिक आजार, रोग निर्माण होतो. पिवळे पित्ता (उष्ण आणि शुष्क) चा अतिरेक झाल्यास फेपरे आणि वेडेपणाचा आजार निर्माण होतो.

प्रख्यात सूफ़ी संत अल्–ज़हबी (मृत्यू उ.स.१३४८) यांचे असे मत होते की इस्लामी धार्मिक विधी स्वरूपातील उपासना अर्थात् 'सलात' म्हणजेच 'नमाज़'मधील शारीरिक ठेवणीतील विशिष्ट बदल चार प्रकारचे आहेत : (१) आत्मिक किंवा आध्यात्मिक, (२) मानसिक, (३) शारीरिक आणि (४) नैतिक. ते पुढे असे म्हणतात की हृदय, पोट आणि आतड्यांमधील वेदना नमाज़मुळे नाहीशा होतात. नमाज़मुळे सुख व मानसिक समाधान लाभते, चिंतेचे दमन होते आणि क्रोधाग्नी शांत होतो, सत्यप्रियता आणि नम्रता वृद्धिंगत होतात, अंतःकरण कोमल बनते, प्रेमोदय होतो, क्षमा करण्याची सद्‌वृत्ती बळावते, सूड घेण्याच्या दुर्गुणाविषयी नावड निर्माण होते. याशिवाय जटिल समस्यांविषयी, एकाग्रचित्तता साध्य झाल्यामुळे, प्रायः योग्य निर्णय घेता येतो आणि समस्यांची अचूक उत्तरे प्राप्त होतात, विस्मृत गोष्टी आठवतात. भौतिक आणि आध्यात्मिक पेचप्रसंगांसंबंधी समर्पक उपाय दृष्टिपथात येतात. नमाज़मध्ये विशेषकरून घडणाऱ्या जोरदार व्यायामामुळे परिणामकारकरित्या आत्मावलोकन आणि आत्मपरीक्षण करणे शक्य होते. अशा रीतीने नमाज़ ही आरोग्यास पोषक अशी साधना आहे. ज्या गोष्टी औषधोपचारांनी साध्य होत नाहीत त्या नमाज़मुळे विनासायास प्राप्त होऊ शकतात, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. कृपायाचनेप्रमाणेच ('दुआ') 'नमाज़' पण शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ करण्यामध्ये उपयोगी सिद्ध होते.

सर्वात जास्त विलक्षण चमत्कार म्हणजे ग़ाज़ी मियाँचा दर्गाह (समाधी–स्थळ) येथील होय. महारोग बरा करण्यामध्ये या दर्ग्याची ख्याती आहे. यांचा 'मज़ार शरीफ़' म्हणजेच पवित्र समाधी धुतल्यानंतरचा पाणी हा महारोगासाठी अत्यंत गुणकारी असल्याचे मानले जाते. हे पाणी भाविक लहान बाटल्यांमध्ये गोळा करतात. ते जवळच असलेल्या चंदन वृक्षाजवळ जमा झालेले पाणी आपल्या हातांनी बाटल्यांमध्ये भरून घेतात आणि त्या बाटल्या सोबत घेऊन आपल्या घरी परत जातात. ते पाणी महारोग आणि कोड झालेल्या रुग्णास पाजतात आणि त्यांच्या शरीरावर मळतात. काही दिवसांनी रोगी बरा होतो. 'क़िला–ए–कलान'च्या आतल्या बाजूस असलेला चंदनाचे जुने झाड (वृक्ष) हे भाविकांसाठी, मुख्यत्वेकरून स्त्रियांसाठी विशेष आकर्षणाचे एक केंद्र

आहे. या बाबतीत असा विश्वास आहे की, कुमारिकांना सुयोग्य वरांची प्राप्ती होते, वांझ स्त्रीस मूल प्राप्त होते, भाग्यवान संततीचा लाभ होतो आणि सर्व प्रकारच्या मनोकामना व आकांक्षा पूर्ण होतात. आशीर्वाद प्राप्त करणारास या वृक्षास सोने-चांदीचे एखादे तार किंवा दोरे गुंडाळावे लागते. आपल्या मुला-बाळांचे कल्याण इच्छिणारे पिता हे या वृक्षाखाली आपले डोक्याचे मुंडण करून घेतात, मुख्यत्वेकरून मेळा ('उर्स') च्या दिवसांत. समाधीस धुतलेले पाणी हे एका पन्हाळ्यामधून वाहत-वाहत चंदन वृक्षाजवळील एका हौदात जमा होते. तो हौद याच हेतुने तेथे मुद्दाम बांधलेला आहे. श्रद्धाळू भाविक हे पाणी आपल्या ओंजळीत घेतात आणि मोठ्या भक्तिभावाने आपले डोळे धुतात. याचा मनोनीत प्रभाव हमखास होतो.

महारोगी स्वत: मोठ्या संख्येने या दर्ग्यास भेट देतात. 'क़िला-ए-कलान'च्या ईशान्य कोपऱ्यामध्ये एक मोठा हौद आहे. 'मज़ार शरीफ़' म्हणजेच पवित्र समाधीच्या फरसबंदीपर्यंत एक लांबलचक पन्हाळ्याने हे हौद जोडले गेले आहे. या मोठ्या हौदास 'कोढ़ीखाना' म्हणजेच महारोगी निवास असे संबोधतात. महायात्रेच्या काळामध्ये या 'कोढ़ीखान्या'जवळ असंख्य महारोगी जमलेले असतात. समाधीस्नानाच्या वेळेस हे महारोगी ग़ाज़ीमियाँ यांना आपल्या विलक्षण चमत्काराने त्यांचा आजार बरे करण्यास आळवितात, विनवणी करतात. येथे हौदाजवळ महारोग्यांना राहण्यासाठी झोपड्या बांधलेल्या आहेत. याशिवाय, 'क़िला-ए-कलान'च्या आतल्या बाजूस असलेल्या मशिदीच्या बाहेर उपासकां (नमाज़ी)च्या आचमना ('वज़')चे बाहेर येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाजवळ कधी-कधी ते बसतात. तेथील संचित पाणी पण औषध समजून उपयोगात आणतात. वर्षानुवर्षे अशा ठिकाणी महारोगी बरे होऊन जात आहेत. पुष्कळ जण बरे होईपर्यंत तेथेच भक्तिभावाने मुक्कामास असतात किंवा वेळोवेळे दर्ग्यास भेट देत असतात आणि महान ग़ाज़ी यांच्या आशीर्वादाची वाट पाहात थांबतात. या समाधीपाशी हजारो महारोगी बरे झाल्याचे सांगण्यात येते. बरे झालेल्या महारोग्यांची नोंद त्यांच्या पत्त्यासह दर्ग्याच्या नोंदवहीमध्ये नोंदविले जाते. या नोंदवहीमध्ये माहितीचे इतर बरेच रकाने आहेत.

बरा झालेला महारोगी 'अनारकली' तलावाकडे धाव घेतो आणि तेथे पवित्र स्नान करतो. मग घरी परततो आणि नंतर आगामी महायात्रेच्या वेळेस पुन्हा येऊन मोठी दक्षिणा देतो.

अशा प्रकारे दुर्धर व्याधिपीडित रुग्णांना व्याधिमुक्त करून सूफ़ी संत हे रुग्णसेवकाची भूमिका यशस्वीपणे वटवितात.

# ७) सूफ़ींची ख़ानक़ाह* – व्यवस्था आणि व्यवस्थापन (सूफ़ींची आश्रम–व्यवस्था स्वरूप)

गुरू–शिष्य परंपरा जपण्यासाठी, ज्ञानदानासाठी, शिष्यांचे जीवन शिस्तबद्ध करण्यासाठी आणि चर्चासत्रांसाठी ख़ानक़ाह (मठ आणि आश्रम) या संस्था सुरू करण्यात आल्या. गुरूंच्या आश्रमासारखे या संस्थांचे स्वरूप असे. धावपळीच्या जीवनापासून लांब राहून अध्ययन, अध्यापन करणे सुलभ असते. माणसातील संन्यस्त प्रवृत्तीपासून इस्लाममधील गूढवादी चळवळ निर्माण झाली. सुरुवातीच्या टप्प्यात या चळवळीचे प्रतिनिधीत्व अशा स्त्री–पुरुषांनी केले, ज्यांनी केवळ ईश्वरसेवेसाठी आपले आयुष्य बहाल केले होते. त्या नंतरच्या काळात सूफ़ी सिद्धान्त आणि व्यवहार यांची वाटचाल हातात हात घालून झाली. एक किंवा अनेक शिष्यांना सूफ़ी गुरूंनी अध्यापन केले. या प्रथेमधून ख़ानक़ाह अर्थात आश्रमाची निर्मिती झाली. महत्त्वाच्या अवस्थांमधून जाऊन अनुभूती प्राप्त झालेल्या संतांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानार्जन करणाऱ्यांसाठी ख़ानक़ाहाचे योगदान महत्त्वाचे होते, जेथे गुरू आणि शिष्य एकत्र राहू शकतील, शिकविण्यापेक्षा मार्गदर्शनावर जास्त भर दिला जाई.

'मारेफ़त' अर्थात ब्रह्मज्ञानप्राप्तीची अवस्था कशी होईल याचे सूफ़ींच्या प्रायोगिक क्षेत्रात मार्गदर्शन केले जाई. शिकविण्याची पद्धती नसायचीच. फरंतु हे करतांना पारंपारिक पद्धतीने क़ुरआन व हदीस (प्रेषित–वचनां) चे शिक्षण दिले जायचे. सूफ़ी पद्धतीने क़ुरआन व हदीसकडे कधीच दुर्लक्ष केले नाही, म्हणून सूफ़ींच्या लोकप्रियतेत तसूभर घट झाली नाही. अनेकदा असा गैरसमज पसरविला जातो की, सूफ़ींनी परंपरागत इस्लामविरुद्ध बंड केले. वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांच्या लोकप्रियतेविरुद्ध उलेमां (विद्वानां) नी आवाज उठविला. आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, एखाद् दुसरा अपवाद वगळला, तर सूफ़ी संतही आलिम (विद्वान, पंडित) होते, आणि 'हाफ़िज' अर्थात पवित्र क़ुरआनचे कंठस्थ ग्रंथ पाठक होते. क़ुरआन मुखोद्गत असणाऱ्या मुस्लिमास 'हाफ़िज' म्हटले जाते.

इस्लामच्या विश्वकोशात १७५ सूफ़ी संप्रदायांची नोंद आहे. यामधील काही महत्त्वाचे संप्रदाय असे – जियाउद्दीन अबू नजीब सुहर्वर्दी (मृत्यु इ. स. ११६८) यांचा सुहर्वर्दी संप्रदाय, अब्दुल क़ादिर जीलानी (मृत्यु इ. स. ११६६) यांचा क़ादरिया संप्रदाय,अहमद इब्न रिफ़ाई (मृत्यु इ. स. ११८२) यांचा रिफ़ाईया संप्रदाय, अहमद अल्–यसावी (मृत्यु इ. स. ११६६) यांचा यसाविया, नज्मुद्दीन कुब्रा (मृत्यु इ. स. १२२१) यांचा कुब्रविया, मुईनुद्दीन चिश्ती, (मृत्यु इ. स. १२३६) यांचा चिश्तिया, अबू मदियन शुलैब (मृत्यु इ. स. ११९७) यांचा शाज़िलिया, अहमद अल्–बदवी (मृत्यु इ. स. १२७६) यांचा बदाविया, मौलाना रूम (मृत्यु इ. स. १२७३)

यांचा मौलविया संप्रदाय, या सर्व संप्रदायांच्या ख़ानक़ाह होत्या. या ख़ानक़ाहांना ज़ावियाह, तक़िए, राबिता, जमातखाना असेही म्हणतात. 'ज़ाविया' म्हणजे कोपरा. चर्चच्या इमारतीमध्येसुद्धा कोपरा असे. अशा कोपऱ्यात ख्रिश्चन धर्मगुरू राहत असत. यावरून मुस्लिम संतांनी अशा मशिदीच्या कोपऱ्यात आपले वास्तव्य केले. ते तेथेच ध्यान करीत. इमाम ग़ज़ालींनी अशा प्रकारच्या खोलीत वास्तव्य केले होते. या खोलीला 'ज़ावियाह-ए-ग़ज़ाली' नाव पडून जगप्रसिद्ध झाले.

इब्न बतूता याने वर्णन केल्याप्रमाणे 'ज़ावियाह' म्हणजे सूफींच्या राहण्यासाठीच्या खोल्या पौर्वात्य देशात आणि भारतात अशी व्यवस्था त्याला दिसून आली. 'ज़वा' या शब्दाचा अर्थ 'लपविणे' किंवा 'एखाद्या कोपऱ्यात जाऊन बसणे' असा आहे. ज़ावियाहची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. तिच्या सभोवती भिंत बांधलेली असते. मध्यभागी घुमट असतो. पूर्वी होऊन गेलेल्या गुरूंच्या कबरी (समाधी) (थडगे) इथेच असतात. काही खोल्यांमध्ये अरबीचे शिक्षण दिले जाई, तर काही खोल्या सूफ़ी प्रशिक्षणासाठी असत. क़ुरआन 'हिफ़्ज़' (मुखोद्गत) करणे, क़ुरआनचे शास्त्रीय पद्धतीने पठण करणे ('क़िरअत') आणि अशा पाठकास 'क़ारी' असे म्हणतात. 'फ़िक्ह' (धार्मिक कायदे) यांचे शिक्षण दिले जात असे. तसेच गुरूंचे कुटुंब 'ज़ावियामध्येच राहत असत. सर्व गुरूंची व्यवस्था तेथेच केले जाई. ज़ाविया जवळच शेती व इतर उपजीविकेची साधने आणि पशुधनही असे. विशेष म्हणजे, प्रवाशांसाठी व पाहुण्यांसाठी खोल्या राखून ठेवलेल्या असत.

मध्य आशियात ज़ावियाहला ख़ानक़ाह, तुर्कस्थानमध्ये दरगाह किंवा तकिए, भारतात जमातखाना किंवा दरगाह म्हटले जाते. भारतामध्ये ख़ानक़ाह या शब्दाचा वापरही मोठ्या प्रमाणावर केला जातो. 'ख़ान' या शब्दाचा फारसी भाषते 'टेबल' (मेज), तर 'गाह' चा अर्थ 'ठिकाण' असा होतो. चिश्तिया संप्रदायाने जमातखाना हा शब्द प्रचलित केला. जमातखान्यात विद्यार्थी जमिनीवर बसून शिक्षण घेत, जेवत आणि झोपत असत. सुहर्वर्दी संप्रदायाने ख़ानक़ाह या शब्दाला प्राधान्य दिले. सतराव्या आणि अठराव्या शतकात 'दायरा' निर्माण झाला. दायराचा उपयोग ध्यानासाठी केला जाई. ज़ावियाहपेक्षा त्याचे आकारमान कमी असे. 'तकिया' हा अरबी शब्द असून 'इत्तिका' म्हणजेच आश्रयपासून निर्माण झाला आहे. 'इत्तिका' अर्थात आश्रय, आश्रमामध्ये वीस ते चाळीस दरवेशांची व्यवस्था केलेली असायची. विवाहित दरवेशांना इत्तिकामध्ये राहण्याची परवानगी असे. त्यांच्या जेवण्याची व निवासाची व्यवस्था केली जाई. मौलवींच्या जमातखान्यात विवाहित दरवेशांना राहू दिले जात नसे.

अरबी 'रबात' म्हणजे पथिकाश्रम या शब्दापासून 'राबता' किंवा 'राबिता' हे शब्द निर्माण झाले. राबिताचा फारसी भाषेत लष्करी संस्था असा अर्थ होतो. सीरिया, इराण आणि इराकमध्ये अशा संस्थांना पुष्कळशा देणग्या मिळत. करमिया संप्रदायाने प्रथम अशी संस्था काढली होती. त्याच धर्तीवर ही संस्था काढण्यात आली. अर्मेनियाची राजधानी डाबिल येथे खास सूफ़ींसाठी अशा संस्था होत्या. दमास्कस, इस्कंदरिया, रमल्लाह अशा ठिकाणी सूफ़ींच्या अशा प्रशाला होत्या.

पहिली ख़ानक़ाह कुठे सुरू झाली, याबद्दल विद्वानांमध्ये एकमत नाही. इब्न तमिय्या यांच्या मते, सूफ़ींसाठी पहिली ख़ानक़ाह बसरामध्ये सुरू झाली. जामींच्या मते ती सीरियामध्ये एका ख्रिश्चन राजपुत्राने

बांधून दिली. हेन्री मॅसे यांच्या मते, सातव्या शतकात ख़ानक़ाहची सुरुवात झाली. आणि तेराव्या व चौदाव्या शतकात सीरिया आणि मिसर (इजिप्त) मध्ये सूफ़ी स्त्रियांसाठी व पुरुषांसाठी मोठ्या प्रमाणावर ख़ानक़ाह तयार झाल्या. इ. स. ११५० ते १२५० या शतकभरात फक्त अलेप्पोमध्ये सूफ़ी महिलांसाठी सात ख़ानक़ाह होत्या. इ. स. ११२७ मध्ये फ़ातिमा रज़िया ही ख़ानक़ाह प्रसिद्ध होती. मॅसिग्नानच्या मते, सातव्या किंवा आठव्या शतकात कूफ़ा येथे ख़ानक़ाह सुरू झाली. त्याच दरम्यान बसरा येथेही ख़ानक़ाह सुरू झाली. नवव्या शतकाच्या उत्तरार्धात बग़दादला ख़ानक़ाह स्थापन करण्यात आली. ख़ुरासानमध्ये दहाव्या शतकाच्या शेवटी खानक़ाहचा उदय झाला. अबू सईद अबील ख़ैर यांनी खानक़ाहसंबंधी नियमावली तयार केली.

ज्या सूफ़ींना घर नसे, त्यांच्यासाठी खानक़ाहमध्ये निवासाची सोय केली जात असे. त्यामुळे सूफ़ींना एकमेकांच्या सहवासात राहता येई. वैचारिक देवाण-घेवाण होत असे. एकमेकांचे दोष दूर करता येत. काही सूफ़ी कायम स्वरूपात, तर काही प्रवासी - हंगामी स्वरूपाचे असत. प्रवासी तीन दिवसांसाठी राहू शकत. त्यापेक्षा जास्त काळ वास्तव्य करावयाचे असेल, तर खानक़ाहची कामे करावी लागत. मालिक शाहचा वज़ीर निज़ामूल मुल्क याने अनेक खानक़ाह बांधून तेथील गुरूंना मानधन बांधून दिले. तेथील गरजू लोकांसाठी वेतन दिले जात असे. इराण, बुख़ारा, अनातोलिया, तुर्कस्थान आणि भारत या देशांमध्ये अनेक खानक़ाह होत्या. त्यांमध्ये उपवास आणि समाअ (कीर्तन श्रवण) वर भर दिला जाई. शासनाची देणगी सुहर्वर्दी घेत असत, परंतु चिश्तियांनी ही मदत कधीच स्वीकरली नाही. त्यांचा व्यवहार 'फ़ुतूह' (स्वेच्छा देणगी) वर चाले. भेट देणारे लोक जी देणगी देत, तिला 'फ़ुतूह' म्हणतात. फ़ुतूहने मिळणारी रक्कम अनिश्चित असेल, हे उघड आहे. सुहर्वर्दी संप्रदायाच्या खानक़ाहमध्ये विद्यार्थ्यांसाठी आणि प्रवाशांसाठी चांगल्या खोल्या असत. प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र खोली असे. तिच्यात सर्व विद्यार्थी असत. दोन्ही संप्रदायांचे लंगरखाने सतत सुरू असत. खानक़ाहमध्ये इस्लाम आणि सूफ़ी शिक्षण व प्रशिक्षण दिले जाई. निज़ामुद्दीन औलियांचा जमातखाना एक आध्यात्मिक केंद्र म्हणून सर्व मुस्लिम जगताचे लक्ष पंचवीस वर्षे वेधत होता.

सूफ़ींच्या संस्थामध्ये इतर धर्मीयांना मुक्त प्रवेश होता. चिश्ती संप्रदायातील सूफींची राहणी अतिशय साधी होती. सुहर्वर्दी यांनी शासकीय मदत स्वीकारल्याने त्यांचे राहणीमान चांगले होते. मुल्तानचे शेख बहाउद्दीन सुहर्वर्दी यांनी आपल्या सात मुलांना सात लाख टके वाटून दिले. सुहर्वर्दी यांनी राजकारणात भाग घेतला. सुलतानांबरोबर शेख बहाउद्दीन ज़करिया मिसळत, राजकीय सन्मान स्वीकारीत आणि संपत्ती साठवीत. याखेरीज त्यांना फ़ुतूहसुद्धा मिळत असत. आलेले पैसे ते त्वरीत वितरित करीत नसत. एकदा सोन्याच्या पाच हजार नाण्यांची थैली हरवली. ह्या बाबीची गंभीर दखल घेण्यात आली नाही. यावरून त्यांच्या सांपत्तिक स्थितीची कल्पना यावी. त्यांची धान्य कोठारे भरलेली असत. त्यांना जहागिरी असत, गरीब आणि सर्वसामान्यांसाठी सुहर्वर्दी खानक़ाह नसत, तर ख़ास लोकांसाठी असत असे बहाउद्दीन स्पष्टपणे म्हणत. ते मुलाखतीसाठी ठराविक वेळ देत. त्या व्यतिरिक्त काळात ते भेट नाकारीत. चिश्ती संप्रदायाचा कारभार या उलट होता. त्यांचा जमातखाना गरीबांना व इतर धर्मीयांना सतत खुला असे, पण त्यांच्या धान्याची कोठारे अपुरी असत. पैशांची वानवा असे. गरीब-श्रीमंत असा भेद त्यांनी केला नाही.

चिश्तींच्या जमातखान्याचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, खानक़ाह वा जमातखान्यात सामूहिक जीवन जगता आले पाहिजे, अशी अपेक्षा होती. खानक़ाहचे प्रमुख शेख असत व त्यांना एक मदतनीस (हारिस) असे. ते ब्रह्मचारी असत आणि इतरांसाठी – विवाहितांसाठी दुसऱ्या खोल्या असत. जप करण्यासाठी सर्व विद्यार्थी एका मोठ्या खोलीत बसत. प्रत्येजण स्वत:साठी जानमाज़ म्हणजे प्रार्थनेची व्यक्तीगत सतरंजी आणे. हनफ़ी, शाफ़ई, मालिकी आणि हंबली या संप्रदायांचे कायद्याचे, हदीसचे शिक्षण दिले जाई. कुरआनमधील भाष्य व इतर संबंधित बाबी शिकविल्या जात. त्यांचे स्थूल स्वरूप मदरसा (पाठशाळा) असले, तरी सूफ़ी पैलू प्रभावी होता. सूफ़ी, दरवेश हिवाळ्यामध्ये खानक़ाहमध्ये थांबत, नंतर प्रवासासाठी निघत. इस्तंबूलमध्ये १८८० च्या दशकात ५२ खानक़ाह (तकिए) होत्या.

बाल्कन आणि आशिया मायनरमध्ये किझिलबश टोळ्यांनी हाजी बेकताश यांचे शिष्यत्व स्वीकारले होते. त्यांचे प्रतिनिधी खेड्यापाड्यांत जाऊन वर्गणी गोळा करीत असत. जवळ जवळ ३६२ खेड्यांमधून वर्षाला साठ हजार स्टर्लिंग पौंड एवढी रक्कम गोळा केली जात असे. त्यांनी तकिए उत्तम रीतीने चालविले. अलीकडच्या काळातही अल्बानियामध्ये त्यांचे कार्य समाधानकारकरीत्या चालले आहे. दीड ते दोन लाख सूफ़ी, प्रवासी, सर्व सामान्य लोक या तकियांचा फायदा घेतात.

सर्व ठिकाणच्या अशा संस्थांनी लोकांच्या आणि साधकांच्या केवळ आध्यात्मिक गरजाच भागवल्या नाहीत, तर सामाजिक गरजाही भागविल्या. लोकांच्या संपर्कात संस्था सतत राहिल्या. त्यांनी लोकांची गाऱ्हाणी शासनापर्यंत नेली. प्रवासी आणि आजारी लोकांची त्यांनी सेवा केली. आध्यात्मिकदृष्ट्या या संस्थांमध्ये सोपान परंपरा असते. सर्वोच्चपदी 'ग़ौस' असतात, नंतर 'कुत्ब'. बाबा फ़रीद यांचे शिष्य बद्रुद्दीन इसहाक़ हे एकदा नमाज़ पढत होते, आणि त्यांना त्यांच्या गुरूंनी हाक मारली, तेव्हा त्यांनी नमाज़ थांबवून गुरूंकडे धाव घेतली. शेख यांना मदतनीस 'ख़लीफा' असतात. शेखांच्या अनुपस्थितीत ते कामकाज पाहतात. संस्थेचा कारभार अधिक असेल, तर 'ख़लीफा' एकापेक्षा जास्त असत. सुहर्वर्दी खानक़ाहांचा पसारा मोठा असल्याने ख़लीफांची संख्या जास्त असे. शेख, त्यांचे मदतनीस, व्यापारी, शासकीय अधिकारी आणि विद्वान अशा संस्थांचे कायमस्वरूपी सदस्य असत. संस्था व्यवस्थित चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असे. इतर गौण अधिकाऱ्यांमध्ये मुक़ाद्दम व त्याला मदत करणारा वकील (कार्यसाधक) असे. संस्थेच्या संपत्तीची व पैशांची व्यवस्था वकील पाही. सर्व संस्थांच्या मुकादमांची सभा वर्षांतून दोनदा होई. या सभेला 'हज़रत' नाव होते. मुक़ादम गावी परत आल्यावर 'जलाल' आयोजित करीत व हज़रतमध्ये झालेल्या चर्चेचा तपशील देत.

काही सूफ़ी संत 'वली' या दर्जाचे असत. 'कुरआन'मध्ये आले आहे की, वलींना कसलीही भीती नाही. बेकतशीस मानतात की, माणसाचा जन्म दोनदा होतो – एकदा मातेकडून व दुसऱ्यांदा आपल्या गुरूंकडून. अनुक्रमे पहिल्या प्रसवास 'अंधाराचा प्रकाश' म्हणतात, तर आध्यात्मिक गुरूचा शिष्य झाल्यावर 'मार्गदर्शनाचा प्रकाश' हे नाव दिले जाते. गुरू मिळाल्याशिवाय ईश्वरप्राप्ती होऊ शकत नाही. एवढेच नव्हे, तर गुरूशिवाय माणूस पशू असतो. प्रा. गिब्ज यांनी या संदर्भात महत्त्वाचे भाष्य केले आहे की, सूफ़ी विचारांनी समाजातील सृजनशील, सामाजिक व सांस्कृतिक ऊर्जेला संघटित करून ते सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचे अग्रदूत झाले.

सूफ़ींची विनम्र वागणूक, माणसाबद्दलची त्यांची अपार सहानुभूती, खानक़ाहमधील वर्गविहीन पद्धती

पीडित लोकांचे आकर्षण ठरून ते त्यांच्याकडे ओढले गेले. त्यांच्या समाजापेक्षा अगदी वेगळी व्यवस्था त्यांना पाहावयास मिळाली, सर्व एकत्र राहत, एकत्र खात व एकत्र झोपत. 'कुरआन' हा धार्मिक ग्रंथ वाचण्यास व शिकवण्यास सर्वांनाच खुला होता. एकेश्वरवाद हे इस्लामी सामाजिक जीवनाचे तत्त्व आहे, हे दर्शविण्यासाठी मध्ययुगीन खानक़ाह मुस्लिम संस्कृतीचे प्रभावी साधन बनल्या. या काळात जे नैतिक अध:पतन झालेले होते, ते दूर करून संतुलित नैतिक व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य खानक़ाहांनी केले. त्यामुळे धार्मिक व सांस्कृतिक उत्थापनाचे कार्यही झाले. तेराव्या शतकात एकेश्वरवादाबरोबर मानवी बंधुभावाचा संदेश खानक़ाहांनी दिला. शेख हमीदुद्दीन नागोरी यांच्या मते, माणसाची आध्यात्मिक शक्ती वाढावी हा खानक़ाह, मदरसा आणि मशीद बांधण्याचा हेतू आहे; परंतु त्यांना एक सामाजिक व शैक्षणिक पैलूही आहे. मोठ्या शहरातील मशिदी शिक्षणाची मोठी केंद्रे असतात. खेड्यातल्या मशिदींनी तिथल्या लोकांच्या धार्मिक गरजा भागवायच्या असतात. शहराबाहेरील वा गावाबाहेरील मशिदी सूफ़ींसाठी असतात. घर नसलेल्यांसाठी मशिदीत निदान झोपण्यासाठी जागा मिळते.

मदरशाचे कार्य विविध अभ्यासक्रम शिकविणे, हे आहे. शासनामार्फत चालविणाऱ्या जाणाऱ्या मदरशांना कसलीच कमतरता नसते, तर खासगी पातळीवर चालणाऱ्या मदरशांची स्थिती चांगली असेलच, असे नव्हते. विद्वानांनी चालविलेल्या खासगी मदरशांमध्ये विद्यार्थ्यांकडून फी (शुल्क) घेतली जात नसे. असे मदरसे 'फ़ुतूह' (स्वेच्छा देणगी) वर चालत. मदरशामध्ये जे शिक्षण दिले जाई, ते दर्गाहमध्येही दिले जाई. दर्गाहशेजारी मशिदी असत. तिथे बौद्धिक शिक्षण देण्याऐवजी सूफ़ी शिक्षणाकडे अधिक लक्ष असे. मुसलमानांमधील हनफ़ी, शाफ़ई, मालिकी आणि हंबली या संप्रदायांपैकी हंबलीने सूफ़ींना, त्यांच्या खानक़ाहांना व समांअना खूप विरोध केला. सूफ़ी तत्त्वज्ञान, पद्धती शरीयतच्या (इस्लामी कर्मकांड) विरुद्ध आहे, अशी त्यांची भूमिका आहे.

(* डॉ. अलीम वकील – ''एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी'' – पृ. ४५९-६५)

# ८) * सूफ़ी शास्त्र (Theory) आणि सरावा (Practice) ची संरचना *

इ. स. दहाव्या शतकाच्या अखेरीस सूफ़ीवाद वास्तविक एक निश्चित मजबूत आणि परिभाष्य अशी जीवन पद्धती आणि विचारप्रणाली बनून गेले होते. जेव्हा अल्-कुशैरी यांनी आपला 'रिसाला' (सूफ़ींना पत्र) इ. स. १०४६ मध्ये लिहिला, तेव्हा त्यांच्यासमोर अनुमान काढण्यासाठी अनेक संक्षिप्त ग्रंथ उपलब्ध होते, आणि खरोखर अल-सर्राज आणि अल्-सुलमी यांच्या लिखाणांमधील अनेक उदाहरणे ते मुक्तपणे उधृत करीत असल्याचे आपणास आढळते. गूढ पैलूच्या बाबतीत सूफींकडून सूफ़ी सिद्धान्तांचे अभिजात सूत्रीकरण नेहमी प्रतिपादले गेले आहे. शेवटी ते कुशैरीकडून तडीस नेले गेल्याचे दिसते. सनातनी सुन्नी ईश्वरशास्त्र आणि धर्मशास्त्रीय कायदे यांच्याशी तिचा मेळ आणि एकरूपता प्रस्थापिण्याचे कार्य, सुप्रसिद्ध सूफ़ी विचारवंत अबू हामिद अल-गज़ाली (मृत्यु इ. स. ११११) यांनी टप्पाटप्प्याने आपल्या अनेक लहान ग्रंथांमध्ये करून, ते सर्व एकत्रित स्वरूपात इ. स. १०९९ ते ११०२ च्या दरम्यान लिहिले गेलेले आपले प्रख्यात महान ग्रंथ ''इह्या उलूम अद्दीन'' लिहून पूर्ण केले.

एक छोटीशी प्रस्तावना नंतर 'रिसाला' ची सुरुवात सूफ़ी सिद्धान्त हा सनातनी ईश्वरशास्त्राच्या विरोधात कधीच नव्हता या ठाम प्रतिपादनाने होते. मलामतिया संप्रदायाच्या बेताल नामवाद विरोधाने उघडकीस आणून दिलेल्या दोषापासून आणि बदनामीपासून वाचविण्याच्या स्पष्ट हेतूने 'रिसाला' चे लेखन झाले आहे. प्रसिद्ध सूफी संतांच्या संक्षिप्त जीवन चरित्राच्या मालिकेमधून लेखक आपले उपरोक्त ठाम प्रतिपादन सोदाहरण स्पष्ट करून यथायोग्य रितीने पटवितो. जीवन चरित्राची ही मालिका इब्राहिम बिन अधम (या सूफ़ी संता) पासून सुरू होते. तत्पूर्वी तो युक्तिवाद करतो की 'ज़ाहिद' (संयमी, विरक्त) अथवा 'आबिद' (भक्त, योगी) हा शब्द सामान्यपणे संत-महात्मा लोकांसाठी वापरला जाई; परंतु विच्छेदवादी संप्रदायाच्या उदयानंतर सनातनी (सुन्नी) मधील धर्मनिष्ठ हे 'सूफ़ी' या नावाने प्रसिद्धीस आले. जीवन चरित्राची प्रस्तुत यादी अबू अब्दल्लाह् अल्-रूदबारी (मृत्यु इ. स. ९८०) या नावाने समाप्त होते.

नंतर सूफी साहित्यामध्ये प्रचलित काही विशिष्ट पारिभाषिक शब्दांचा एक विभाग येतो. 'मक़ाम' (स्थळ, स्थानक) आणि 'हाल' (अवस्था) यामधील एक मुलभूत फरक दाखविण्यात आला आहे. संक्षिप्तपणे, 'मक़ाम' म्हणजे साधकाच्या साधनायात्रेमधील ईश्वराकडील प्रगतिपथावरील आध्यात्मिक योग्यतेचा एक टप्पा. ही द्रष्टा रहस्यवादीच्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेची परिणती असते; तर 'हाल' ही एक आध्यात्मिक भावदशा असते. ही रहस्यवाद्यावर अवलंबून नसते, परंतु ईश्वरावर अवलंबून असते. अल्-कुशैरी यांचे कथन आहे की, 'अवस्था या ईश्वरी कृपेच्या देणग्या असतात, तर स्थानके ही स्वप्रयत्नसाध्य असतात.'

**१) प्रथम स्थानक तौबा (पश्चाताप)** असल्याचे सांगितले जाते. सूफ़ीचे हे सर्वसाधारण मत आहे. या शब्दाचा अर्थ अर्थात इस्लामप्रणित (दुष्कर्माची) औपचारिक उघड कबुली नसून, ते प्रौढ मुस्लिमांचे, ऐहिक (सुखमय) जीवनाचा त्याग करून स्वत:स ईश्वरी सेवेसाठी समर्पित करण्याचे, जाणीवपूर्वक निश्चय (संकल्प) करणे, असा आहे. याच अर्थी, एक विधीज्ञ आणि एक ईश्वरशास्त्रज्ञ म्हणून फार मोठी कीर्ति प्राप्त केल्यानंतर अल्-ग़ज़ालीने औपचारिक धार्मिक शिक्षणापासून आपले तोंड फिरविले, आणि पश्चाताप व्यक्त करून स्वत:स एक सूफ़ी म्हणून घोषित केले. पुढे, अल-कुशैरी खालील प्रतिमानाप्रमाणे, पश्चात्तापीच्या अग्रभागी साधना-प्रवासाचा माग काढतात.

**२) मुजाहदा, (तपस्या, पराक्रम)** 'जिहाद' (तथाकथित ''पवित्र धर्मयुद्ध'') चे एक गौण रूप, याचा अर्थ, तपस्वी जीवन अंगिकारल्यानंतर त्यासाठी केले जाणारे **आटोकाट प्रयत्न** असा होतो. हा शब्द क़ौरानिक संहितेवर आधारित आहे, ''आणि जे आमच्या मार्गात **जीवापाड प्रयत्न** करतात, त्यांना आम्ही निश्चितच आमचा मार्ग दाखवू.'' [''वल्लजीन जाहदू फ़ीना लनह्दियन्नहुम् सुबुलना'' - २९:६९] एका हदीसमध्ये प्रेषित मुहम्मद[स.] यांनी ''महानतम युद्धा''स (अल्-जिहाद अल्-अक्बर), ''लहानतम युद्धा'' पेक्षा (अल्-जिहाद अल्-अस़्ग़र म्हणजेच श्रद्धाहीनांविरोधाशी युद्ध) मोठा दर्जा बहाल केल्याचे नमूद आहे, आणि पुढे स्पष्ट करताना ते म्हणतात की ''महानतम युद्ध'' म्हणजे वासनेच्या विरोधामध्ये जीवापाड प्रयत्न (मुजाहदत अल-नफ्स) होय.

**३) खल्व व उज़्ल (एकांतवास व माघार).** आपल्या सोबत्यापासून एकटे एकांतवासामध्ये राहण्याची सवय नवदीक्षित शिष्याने स्वत:स लावून घ्यावी, आणि शिवाय त्याने आपल्या वाईट सवयी सोडून दिल्या पाहिजेत.

**४) तक़्वा (ईश्वराचा दरारा व भय).** उघड कबुलीस बळकटी आणण्यासाठी आणि दैवी शिक्षेपासून वाचविण्यासाठी (हे आवश्यक आहे).

**५) वर्अ (वर्ज्य, विभक्त).** म्हणजेच सर्व अनावश्यक आणि अयोग्य, गैरशिस्त व्यवहारापासून विभक्त राहणे.

**६) ज़ुहद (संन्यास, त्याग).** अनुज्ञेय सुखोपभोग सुद्धा सोडून देणे.

**७) सम्त (मौन).** प्रेषितांनी असे सांगितल्याचे उधृत केले जाते की ''जो कोणी ईश्वर आणि अंतिम (प्रलय) दिवसावर श्रद्धा (विश्वास) ठेवतो, त्याने चांगले बोलावे नाही तर त्याने मौन राखावे.'' मौनाचे शब्दश: आणि रूपकात्मक दोन्ही पद्धतीने अर्थ विशद करण्यात आले आहे. शब्दश:, माणसाने आपली वाचा ताब्यात ठेवण्याचे शिकावे, तर रूपक स्वरूपात असा अर्थ होतो की ईश्वराचा जो काही आदेश वा निवाडा असेल, मनाने निमुळतेपणे त्याचा स्वीकार करावे.

**८) ख़ौफ़ (भीति, भय).** भविष्यामध्ये आपल्या दुराचाराचे भयंकर दुष्परिणाम भोगावे लागतील याची मनामध्ये धास्ती.

**९) रजा (आशा).** भविष्यामध्ये एखादी इच्छित आकस्मिक गोष्टीची प्रतीक्षा करणे.

**१०) हुज़्न (शोक, दु:ख).** भूतकाळातील (मागील) पापासाठी खेद व्यक्त करणे.

**११) जूअ, तर्क अल्-शह्व** (भूक, अन्नवासना नकार), हे क़ौरानिक संहितेवर आधारित आहे. ''आणि काहीशी भिती, **भूक**, द्रव्यहानी, प्राणहानी आणि फळांची हानी यांद्वारे आम्ही अवश्य तुमची कसोटी बघू, आणि सोशिकांना शुभ समाचार दे.'' - २:१५५

**१२) ख़ुशूअ, तवाजु (भीतिदायकता आणि विनम्रता)**. नित्य विनम्रभाव अंगी बाळगावा.

**१३) मुख़ालफ़त अल-नफ्स व ज़िक्र उयूबिहा** (वासना विरोध आणि तिचे दुर्गुण लक्षात ठेवणे) : दोन दुर्गुण विशेषत्वेकरून आहेत, म्हणजेच (अ) हसद (मत्सर, हेवा), (ब) ग़ीब (निंदा).

**१४) क़नाअ (संतोष) :** प्रेषित म्हणाले, ''संतोष एक अक्षय भांडार आहे.''

**१५) तवक्कल (विश्रंभ) :** परमेश्वर म्हणतो, ''जो कोणी ईश्वरावर विसंबतो, त्यास ईश्वर पुरेसा आहे.'' **किंवा** ''जो अल्लाहवर भिस्त ठेवील त्याच्यासाठी तो पुरेसा आहे.'' - ६५:३.

**१६) शुक्र (कृतज्ञता) :** परमेश्वर म्हणतो, ''जर तुम्ही कृतज्ञ व्हाल तर मी तुमच्यावर निश्चितच अधिकाधिक (उपकार) करीन.'' - १४:७.

**१७) यक़ीन (दृढ विश्वास, अढळ श्रद्धा)**. नेहमी परमेश्वरावर दृढविश्वास असावा.

**१८) सब्र (सहनशीलता, स्थिरचित्तता)**. सहनशीलतेची सवय ठेवावी.

**१९) मुराक़बा (मनन, ईश्वराचा निरंतर ध्यास)**, प्रेषित वचनान्वये, ''सदाचरण या (गोष्टी) मध्ये आहे की तुम्ही परमेश्वराची उपासना अशा पद्धतीने करावी की जणू तुम्ही त्यास पाहात (बघत) आहात; जर तुम्ही त्यास पाहू शकत नाही, तर तो तुम्हास निश्चितच पाहतो.''

**२०) रिज़ा (समाधान, संतोष)**. काही सूफ़ी यास शेवटचे ''स्थानक'' आणि प्रथम ''अवस्था'' मानतात, क़ौरानिक संहितेनुसार, ''अल्लाह त्यां (खऱ्यां) च्यावर प्रसन्न आहे आणि ते त्याच्यावर प्रसन्न आहेत.'' - ५:११९. असे स्पष्ट दिसून येते की परमेश्वराचे मानवाशी संतुष्ट होणे ही मानवाची परमेश्वराशी संतुष्ट होण्यासाठी पूर्व अट आहे. अल्-कुशैरी यांच्या मते, 'तवक्कुल' पासून एक विकास असल्यामुळे ख़ुरासनी संप्रदाय 'रिज़ा'स एक 'मक़ाम' अर्थात स्थानक मानते; तर इराकी संप्रदाय त्यास एक 'हाल' म्हणजेच अवस्था मानते. 'रिज़ा'चा प्रारंभ एक 'मक़ाम' आणि तिचा शेवट एक 'हाल' मानून अल्-कुशैरी यांनी दोन्ही मतांमध्ये सुवर्णमध्य साधले आहे.

शेवटचे ''स्थानक'' खाली दिलेल्या नंतर येते :-

**२१) उबूदिया (दास्यत्व)**, प्रभू (रब्ब) ईश्वराच्या संपूर्ण अधीन असल्याची एक सच्ची भावना.

**२२) इरादा (संकल्प, इच्छा)**, म्हणजेच स्वत:ची वैयक्तिक इच्छाच मुळी नसणे, ईश्वराच्या इच्छेतच सर्वस्व मानणे.

**२३) इस्तिक़ाम (सचोटी, प्रामाणिकपणा)**, अशी एक ''अवस्था' की ज्या मध्ये परमेश्वराची कृपा शाश्वत, चिरस्थायी बनते. कारण त्यामध्ये ईश्वराच्या नि:सीम भक्तीचा समावेश आहे.

**२४) इख़्लास (सद्भाव)**, म्हणजेच ईश्वराच्या आज्ञापालनाच्या प्रत्येक कृतीमध्ये ईश्वराचा शोध घेणे.

**२५) सिद्क़ (सत्यता)**, विचारामध्ये आणि आचारामध्ये (कृती) मध्ये सत्य असावे.

**२६) हया (लज्जा),** यास प्रेषितांनी ''श्रद्धेचा एक भाग (ईमान)'' म्हणून घोषित केले आहे, खरेपणाच्या अभावाची लज्जा वाटावी.

**२७) हुर्रिय (औदार्य),** 'एक' स्वतंत्र व्यक्ती' या नात्याने, 'स्वतंत्र' (हुर्) असल्याचे गुण धारण करणे. स्वहितापेक्षा इतरांच्या हिताची जाणीव ठेवणे किंवा भौतिक लाभदायी वस्तूंचे एक 'गुलाम' नसल्याचे दर्शविणे.

**२८) ज़िक्र (नाम-स्मरण),** चित्त आणि मनामध्ये निरंतर ईश्वराचा (नि)वास असल्याची जाणीव ठेवणे.

**२९) फ़ुतूव (उदात्तता),** संपूर्णपणे आत्म-उपेक्षित भावनेने, प्रेषित वचनांमधील शब्द पाळणे, ''जोपर्यंत ईश्वराचा दास आपल्या मुस्लिम बांधवांच्या गरजांकडे लक्ष देतो, तोपर्यंत परमेश्वर आपल्या दासाच्या गरजांकडे कानाडोळा करणार नाही.''

**३०) फ़िरास (अंतर्दृष्टी, सूक्ष्मदृष्टी),** प्रेषित म्हणाले, ''श्रद्धावंतांच्या अंतर्दृष्टीपासून सावधान रहा, कारण तो ''परमेश्वराच्या प्रकाशाने' पाहातो.''

**३१) ख़ुलुक़ (नैतिक चारित्र्य),** परमेश्वराने स्तुती केलेल्या आपल्या प्रेषिताचा सर्वोत्तम गुण आहे. या संदर्भात परमेश्वर वदतो, ''आणि नि:संशय तुझी नीतिमत्ता मोठ्या उच्च पायरीची होय.'' - ६८:४.

**३२) जूद, सख़ा (औदार्य, ज्ञानशीलता),** कारण प्रेषित म्हणाले, ''दानशील माणूस हा ईश्वरासमीप असतो, स्वर्गाजवळ असतो, (मात्र) नरकापासून फार लांब (दूर) असतो.''

**३३) ग़ैर (द्वेष, मत्सर, हेवा),** ईश्वराच्या भक्तीविषयी हेवा वाटणे या अर्थी की मनामध्ये त्या व्यतिरिक्त इतर कोणतेच विचार येऊ देण्यास मज्जाव करणे, ईश्वर भक्तीच्या विचाराशिवाय इतर सर्व विचारांचा हेवा वाटणे. हा खुद्द ईश्वराचाच एक गुण आहे. आपल्या भक्ताने कोणत्याच प्रकारचे पाप करू नये म्हणजेच तो त्याच्या पापाचा हेवा करतो.

**३४) विलाय (ईश्वराच्या सुरक्षित छत्रछायेखाली असणे, संतत्त्व),** हे क़ौराणिक संहितेवर आधारित आहे, ''ध्यानात ठेवा की परमेश्वराचे खास मित्र (दोस्त) (अशा चैनीत होत की पुनरूत्थानाचे दिवशी) त्यांना (कोणा तऱ्हेचे) भय राहणार नाही व ते (कोणा तऱ्हेने) दु:खीही होणार नाहीत.'' - १०:६२.

**३५) दुआ (कृपायाचना, प्रार्थना),** नित्य ईश्वराची विनवणी करणे, कारण ईश्वर म्हणतो, ''आणि तुमचा विधाता म्हणतो (की), 'माझी प्रार्थना करा,' मी तुमच्या (प्रार्थनेला) प्रतिसाद देईन.'' - ४०:६०.

**३६) फ़क्र (निरासक्ती),** कारण प्रेषित म्हणाले, ''श्रीमंतापेक्षा गरीब हा स्वर्गामध्ये पाचशे वर्षे अगोदर पोहोचेल.''

**३७) तसव्वुफ़ (शुद्धता, पावित्र्य),** कारण इथे अल्-कुशैरी हे या शब्दाची व्युत्पत्ती 'सूफ़' (लोकर) पासून न मानता 'सूफ़्व' (शुद्ध असणे) या धातूपासून मानणे, श्रेयस्कर समजतात.

**३८) अदब (शिष्ट आचार),** प्रेषितांनी म्हटल्याप्रमाणे, ''ईश्वराने मला घडवले, आणि त्याने मला शिष्टाचार शिकविले.'' म्हणजेच धर्माचरण.

उपरोक्त (२१ ते ३८) हे सर्व अल्-कुशैरी यांच्या मते ''स्थानकां'' चे स्पष्टपणे विस्तार आहेत.

**३९) सफ़र (विहार, यात्रा),** एखाद्याच्या सोबतीस पवित्र स्थळाच्या यात्रेस निघणे.

**४०) सुहब (सख्य, साहचर्य)** एकाच स्थळी आजीवन राहण्यापेक्षा नित्य (इतरत्र) संचार करण्यामध्ये लाभ असतो.

**४१) तौहीद (एकेश्वरवाद),** विशुद्ध एकेश्वरवादी निष्ठा बाळगावी.

**४२) ममात [मौत] (मृत्यु),** निर्भयपणे ईश्वरचरणी भव्य मृत्युस सामोरे जावे.

**४३) मआरिफ (गूढ ज्ञान, रहस्य ज्ञान),** हे 'स्थानका' पासून ते 'अवस्थे' पर्यंतचे संक्रमण पूर्ण करीत असल्याचे वाटते. कारण जेव्हा द्रष्टा गूढ ज्ञानी आपल्या चित्तवृत्तीच्या सर्व हालचाली शांत करतो तेव्हा त्याच्या अंत:करणामध्ये अशा प्रकारचे गूढ ज्ञान परमेश्वर निर्माण करतो.

**४४) महब्ब (प्रेम),** ईश्वराचे मानवाप्रती प्रेमाची ही एक परिणती आहे.

**४५) शौक़ (लालसा, उत्कंठा),** नित्य परमेश्वरासोबत असण्याची उत्कट भक्ताची लालसा असते.

आपणास असे निदर्शनास येईल की, रहस्यदर्शींचे नैतिक आणि मानसशास्त्रीय प्रगतीचे विश्लेषण काळजीपूर्वक करूनसुद्धा अल्-कुशैरी यांना, नंतरच्या सिद्धान्तवाद्यांनी ज्याप्रमाणे 'मक़ाम' आणि 'हाल' यामधील फरक काळजीपूर्वक निदर्शनास आणून दिले, त्याप्रमाणे फरक मांडता आले नाही. ते आपले पूर्वाधिकारी अल्-सर्राजशी पण मतभेद दर्शवितात. अल्-सर्राज यांनी फक्त सात स्थानके (पश्चात्ताप, संयम, संन्यास (त्याग), निरासक्ती, विश्रंभ, धैर्य आणि संतोष) आणि दहा अवस्था (ध्यान, ईश्वर सामिप्य, प्रेम, भय, आशा, उत्कंठा, आत्मीयता, मन:शांती, अविरत चिंतन आणि निश्चिती) सांगितल्या आहेत. परंतु कुशैरी यांचे विश्लेषण अन्यथा स्पष्ट आणि चतुर आहे, आणि कदाचित सूफ़ी शास्त्रा (सिद्धान्ता) च्या शाखेमध्ये सर्वोच्च बिंदू गाठल्याचे निदर्शनास येते.

सूफ़ीवादाच्या प्रथम चार शतकांमध्ये स्पष्ट प्रामाणिकपणा, पावित्र्य आणि अंतर्ज्ञान असलेले पुष्कळ विद्वान होऊन गेलेत, परंतु जेव्हा अबू हामिद मुहम्मद बिन मुहम्मद अल्-ग़ज़ाली, हुज्जत अल्-इस्लाम (''इस्लामचे गमक, प्रमाण'') यांनी स्वत:स त्याचे कैवारी, खंदे पुरस्कर्ते घोषित केले तेव्हा त्यांच्यापेक्षा जास्त प्रेम कोणीच संपादन केले नाही. त्यांच्या सेवानिवृत्तीपासून ते त्यांच्या इ. स. ११११ मधील मृत्यूपर्यंत अल्-ग़ज़ाली हे एक रहस्यदर्शी योग्याचे अत्यंत साधे जीवन जगले. मध्ये फक्त अभ्यासाचा आणि एका पाठोपाठ पुस्तके लिहिण्याचा सपाटा होता. आपल्या या पुस्तकांमध्ये त्यांनी नैतिक, आध्यात्मिक आणि रहस्यात्मक पद्धतीमधील वेगवेगळे पैलू उलगडून दाखविले, आणि सूफ़ीवादाचा मुस्लिम सनातनतेशी समन्वय साधला आणि सूफ़ी आचाराचे अवलंबन केल्याशिवाय एकेश्वरवादी ईश्वरनिष्ठेचे मुस्लिम जीवन परिपूर्ण रीतीने जगता येऊ शकत नाही, हे त्यांनी सिद्ध करून दाखविले. त्यांचे कोणतेच लहान पुस्तक दुर्लक्षित करण्यासारखे नाही, त्यापैकी काहींचे विशेष महत्त्व आणि मूल्य आहे. त्यांची उत्तम कृती आणि अनेक प्रकारे एक मुस्लिम लेखकाने लिहिलेले सर्वात महान धार्मिक ग्रंथ म्हणजे त्यांचे ''इह्या उलूम अद्दीन'' ('अध्यात्मशास्त्रांचे पुनरूज्जीवन') हे होय. या सुप्रसिद्ध प्रबंधामधील चर्चित विषयांचे एक ढोबळ पृथ:करण एकीकडे तिचे सनातनी ईश्वरशास्त्र आणि धर्मविधी; तर दुसरीकडे व्यावहारिक आणि वैचारिक गूढवाद यामधील संबंध आपणास दाखवून देते. सदरहू बृहत ग्रंथ चार खंडांमध्ये विभाजित असून, प्रत्येक खंडांमध्ये अनेक अध्याय, पुढीलप्रमाणे उप-विभाग स्वरूपात आहेत.

**[अ] उपासना (भक्ती)**

| | |
|---|---|
| १) ज्ञानाचे (इल्म) स्वरूप<br>२) श्रद्धेचा पाया | → ज्ञानशास्त्र आणि ईश्वर शास्त्र |
| ३) पापक्षालनाचा आंतरिक अर्थ<br>४) उपासना (प्रार्थनेचा) आंतरिक अर्थ<br>५) धर्मादायाचे आंतरिक अर्थ<br>६) महायात्रेचे आंतरिक अर्थ | → धार्मिक विधी आणि प्रमाण कायदा |
| ७) कुरआन पठनाच्या बाबतीत<br>८) संस्मृती आणि प्रार्थना<br>९) नियत वेळेच्या (अनिवार्य) प्रार्थना | → भक्तिपरक रचना |

**[ब] वैयक्तिक आचार**

| | |
|---|---|
| १) आहारसेवन<br>२) पेय प्राशन<br>३) कमाई<br>४) वैध आणि वर्ज्य गोष्टी | → धार्मिक कायदा |
| ५) सख्य, साहचर्य<br>६) चारित्र्य<br>७) उत्कंठा, कळकळ<br>८) प्रवास (विहार)<br>९) (काव्य, संगीत) श्रवण, परमानंद<br>१०) उत्तम समुपदेशन<br>११) सक्रिय जगणे आणि प्रेषितत्त्व | → गूढ प्रशिक्षण |

**[क] महापातके**

(१) अंत:करणाचे आश्चर्यकारक स्वरूप
(२) आत्मानुशासन
(३) अधाशीपणा आणि विषयासक्तता
(४) वाणीचे दुर्गुण
(५) क्रोध, द्वेष (आकस), मत्सर (हेवा)

→ मानसशास्त्र आणि आध्यात्मिक अनुशासन

(६) भौतिक मालमत्ता
(७) संपत्ती आणि हाव
(८) उच्चपद आणि दंभ
(९) घमेंड (आढ्यता) आणि अहंभाव
(१०) गर्व

**[ड] मुक्ती (मोक्ष) मार्ग**

१) पश्चात्ताप (तौबा)
२) मनोधैर्य, सहनशक्ती (सब्र) व कृतज्ञता (शुक्र)
३) भय (खौफ़) आणि आशा (रजा)

→ आध्यात्मिक अनुभूती

४) निरासक्ती (फ़क्र) आणि नि:स्वार्थीपणा (ज़ुहद)
५) एकेश्वरवादी निष्ठा (तौहीद) आणि विश्रंभ (तवक्कुल)
६) प्रेम (महब्ब), उत्कट इच्छा (शौक़) सलगी, सामिप्य (उन्स) आणि संतोष (रिज़ा)
७) संकल्प (नियत), सत्यता (सिद्क़) आणि सद्भाव (इख़्लास)
८) मनन (मुराक़बा) आणि आत्म-परीक्षण (मुहासबा)

९) चिंतन (तफ़क्कुर)
१०) मृत्युची संस्मृती (आठवण)

→ युगान्त-विज्ञान (जग-बुडी-शास्त्र)

[* A. J. Arberry - 'Sufism' - pp. 74-82 ]

# ९) सूफ़ींवाद आणि विज्ञान

उपरोक्त शीर्षक 'सूफ़ींवाद आणि विज्ञान' हे वाचून कदाचित् आश्चर्य वाटेल. वास्तविक आश्चर्य वाटण्याचे मुळीच कारण नाही. कारण की धर्म हा सूफ़ींवाद आणि विज्ञान या दोघांना जोडणारा समाईक दुवा आहे. धर्माचा सूफ़ींवादाशी जितका घनिष्ठ संबंध आहे; तितका विज्ञानाशी नसेल. मात्र संबंध अवश्य आहे. कदाचित हाही जवळचा संबंध आहे. हे सर्वज्ञात आहे की सूफ़ीं तत्वज्ञान किंवा सूफ़ीवादाचा आधार धर्म हा आहे. कारण सूफ़ीं विचारधारांचा पाया इस्लाम धर्माची मूलभूत तत्त्वे असल्यामुळे त्यावर सूफ़ीं तत्त्वज्ञानाची सुंदर इमारत सूफ़ी संतांनी उभी केली आहे. किंबहुना इस्लाम धर्माची उदात्त तत्वे हा सूफ़ींवादाचा प्राणवायूच ! अध्यात्म हा त्याचा पाया आहे; आणि अध्यात्म म्हणजे सदाचरण, ईश्वरनिष्ठा आणि धर्माचे पालन. तिकडे भेद असूनसुद्धा धर्म आणि विज्ञान यामध्ये जवळचे संबंध असल्यामुळे धर्म आणि विज्ञान हे दोन्ही परस्पर सहयोगी आहेत, असे म्हणावयास हरकत नाही.

प्रथम धर्म आणि विज्ञान यामधील संबंध उलगडून पाहू या. धर्म सत्याची व्याख्या त्याच्या संपूर्णतेमध्ये करतो. त्याचे प्रतिपाद्य समग्र विश्व असते; तर विज्ञान हे सत्याचे एकांगी ज्ञान असते. धर्माचे जग तात्विक, वास्तविक व वस्तुनिष्ठ असते; तर विज्ञानाचे विश्व काल्पनिक असते. त्याची सुरुवात प्राक्कल्पनेपासून होते. ते एका मर्यादेपर्यंत कल्पनेची सृष्टी असते. धर्म विश्वाची व्याख्या प्रयोजनात्मक आधारावर करतो; तर विज्ञान विश्वाचा अभ्यास कारणतेच्या आधारावर करतो, प्रयोजनाच्या आधारावर नव्हे. धर्म सत्याचा साक्षात्कार करतो; तर वैज्ञानिक निर्णय हे मानवाच्या तार्किक मनाचे प्रक्षेपण असतात. धर्माचा संबंध आध्यात्मिक मूल्यांशी असतो; तर विज्ञानाचा संबंध यथार्थ वस्तूंशी आहे. धर्माच्या अध्ययनाची पद्धती निगमनात्मक आणि अंतर्बोधमूलक असते; तर विज्ञानाच्या अध्ययनाचा विधी हा आगमनात्मक असतो, प्रयोगात्मक असतो; इंद्रियानुभूतिमूलक असतो. विज्ञान निर्वैयक्तिक असतो. धर्माचा संबंध 'सत्यं शिवं सुंदरमशी' आहे; तर विज्ञानाचा संबंध फक्त 'सत्यम्' शी असतो. धर्म सद्वृत्तींच्या मदतीने परमसत्यापर्यंत पोहोचतो; तर विज्ञान नैसर्गिक नियमांच्या आधारे सत्यापर्यंत पोहोचतो. धर्म आदर्शमूलक असतो; तर विज्ञान यथार्थमूलक. म्हणून 'काय असावे' ही धर्माची अपेक्षा असते; तर विज्ञान 'काय आहे' यामध्येच रस घेतो. धर्म सत्याच्या उद्घाटनामध्ये श्रद्धेची कास धरतो; तर विज्ञान सत्याच्या उद्घाटनामध्ये तर्काचा आधार घेतो.

अशाप्रकारे धर्म आणि विज्ञान या दोघांच्या मार्ग-प्रणाली भिन्न आहेत, असे निदर्शनास येते. तरीपण दोघांच्या कार्य-प्रणालीमध्ये समानता पण आढळून येते. यास्तव आपणास असे दिसून येते की, धर्म आणि विज्ञान दोघे मानवतेच्या सेवेमध्ये तत्पर असतात, यात मुळीच शंका नाही. दोघांचे उद्दिष्ट आहे सत्याचा

सुव्यवस्थित शोध. दोघांमध्ये मानव-चेतनेचा ज्ञानात्मक पैलू सक्रिय असतो. विज्ञानाप्रमाणेच परिवर्तन आणि परिवर्धनाच्या दिशेमध्ये धर्म हा स्वत: युग-सापेक्ष बनतो. धर्म विश्वामध्ये असलेली सुव्यवस्था आणि सामंजस्याकडे पाहून व्यवस्थापक या नात्याने ईश्वरी सत्तेस स्वयंसिद्ध मानतो. विज्ञान विश्वामध्ये व्यवस्थेचा शोध घेतो. विज्ञान सर्वत्र विभिन्नतेमध्ये एकतेचे दर्शन करतो. 'जगामध्ये एकरूपतेचा नियम कार्यरत आहे', हा सिद्धान्त विज्ञानाची देणगी आहे. धर्म विश्वास किंवा श्रद्धेच्या आधारावर ईश्वराचा अभ्यास करतो. प्रसिद्ध पाश्चात्य तत्त्वज्ञ कांटचे पण असे मत होते की ईश्वर हा सिद्धी-असिद्धीच्या पलीकडे विश्वास किंवा श्रद्धेचा विषय आहे.

धर्म सार्वजनिक प्रेय आणि श्रेय ह्यांना पोषक असला पाहिजे, आणि याची इमारत सर्वधर्मसमभाव आणि सदाचाराचा दृढ पायावर उभारलेली असली पाहिजे. 'सत्त्वसंशुद्धी' हे जीवनध्येय असावे. 'सत्त्वसंशुद्धी' म्हणजे माणुसकीने भरलेले जीवन. हे जीवन स्वसुखाचा शोध करण्याऐवजी जगाच्या हितात व कल्याणात रममाण होत असते. 'स्वांत:सुखाय'च्या संकुचित प्रवृत्तीऐवजी 'परान्तसुखाय' च्या विशाल प्रवृत्तीस सद्धर्म जन्म देत असतो. विज्ञानास आत्मसात करून धर्म 'वसुधैव कुटुंबकम्' च्या भावनेस चरितार्थ करू शकतो. विज्ञानाच्या संपर्कामुळेच धर्म विश्वव्यापी होऊ शकतो आणि विश्वधर्माची कल्पना साकार होऊ शकते. धर्माच्या अभावी विज्ञान आंधळे, तर विज्ञानाच्या अभावी धर्म पांगळे बनतो कारण विज्ञानाच्या खांद्यावर स्वार होऊन धर्म मानवाच्या कल्याणासाठी कार्य करतो. विज्ञानच धर्मास युगानुकूल बनवितो. आजचा मानव विज्ञानाच्या ऋणाखाली दबलेला आहे. त्याचे उत्थान करण्याचे कार्य धर्म व पर्यायाने सूफ़ींवाद करू शकतो.

सूफ़ींवादाचे मूळ इस्लाम आहे. म्हणून सूफ़ीं तत्त्वज्ञानाचा उगम इराणी, चीनी, भारतीय वेदान्त तत्त्वज्ञान आणि बौद्ध मतापासून झालेला आहे, असे मानणे योग्य ठरणात नाही. बौद्ध मत तर ईश्वराचे अस्तित्वच नाकारते, आणि सूफ़ींपाशी ईश्वराशिवाय दुसरे काहीच नाही. अधिकांश वेदान्ती 'जगत् मिथ्या' हे तत्व मान्य करतात आणि मायेची कल्पना त्यांच्यासमोर असते; तर सूफ़ीं प्रथमपासून सर्वसाधारण मुसलमानांप्रमाणे आणि इस्लामच्या मूळ शिकवणीनुसार जगास ठोस वास्तव मानतात. जर सूफ़ींच्या काही गोष्टी भारतीय संत-महात्म्यांच्या शिकवणीसारख्या असतील तर त्यात आश्चर्य वाटण्याचे मुळीच कारण नाही. कारण आम्हा सर्व मानवांचे खाणे, पिणे, झोपणे, जागणे, जीवनाच्या सर्व गरजा पण समाईकच आहेत. आणि इस्लामने तर हा दावा मुळीच केला नाही की तो एक सर्वस्वी वेगळा किंवा नवीन धर्म आहे. त्याने तर सदासर्वदा हेच म्हटले आहे की अंतिम प्रेषित मुहम्मद स. अगोदर जेवढे म्हणून प्रेषित होऊन गेले आहेत ते सर्वच्यासर्व खरे होते, सत्य होते. त्यांची शिकवण पण खरी होती. दीर्घकाल पटलावर त्यांची शिकवण कमी-जास्त झाली असेल किंवा त्यांच्यामध्ये थोडा-फार बदल झाला असेल, इतकेच. म्हणून तर संपूर्ण शिकवण आणणारे शेवटचे प्रेषित मुहम्मद.स. हे होत. याचा उल्लेख पवित्र कुराणामध्ये असा आहे - ''आज मी तुमच्या भल्यासाठी तुमचा धर्म परिपूर्ण केलेला आहे, आणि तुमच्यावर माझा अनुग्रह पूर्ण केला आहे आणि तुमच्यासाठी धर्म म्हणून इस्लामची निवड केली आहे.'' ५:३ 'इस्लाम' चा अर्थ आहे, अल्लाहच्या इच्छेला स्वत:ला समर्पित करून टाकणे. अतएव ही गोष्ट मान्य करण्यात काहीच हरकत नाही की काही शिकवणी कमी होऊन, वाढून किंवा बदलूनही पूर्वीच्या शिकवणींपैकी काही ना काही मूळची शिकवण शिल्लक राहिलीच असली पाहिजे. हीच गोष्ट आमच्यात आणि त्यांच्यात समाईक आहे आणि हा काय दोष नाही!

इस्लामी सूफ़ींवादाच्या आजपर्यंत जेवढ्या व्याख्या करण्यात आलेल्या आहेत त्या कमी-जास्त प्रमाणात सीमित वा मर्यादित आहेत. येथे त्यांची पुनरावृत्ती करण्यात काहीच अर्थ नाही. कारण की या व्याख्या सूफ़ीं तत्त्वज्ञानाच्या प्राप्त सर्व ग्रंथांमध्ये आढळून येतात. मला येथे फक्त एवढेच नमूद करावयाचे आहे की यापैकी कदाचित कोणत्याच व्याख्येने सूफ़ींवादास समजून घेण्याचे आणि समजाविण्याचे संपूर्ण न्याय मिळवून दिलेले नाही. त्यांनी दिलेल्या व्याख्यांपैकी कोणत्याच व्याख्येमुळे सूफ़ींवादाच्या संपूर्ण वैशिष्ट्यांचे प्रत्यंतर येत नाही आणि हे शक्य पण नाही. कारण की भारताच्या प्राचीन तत्त्वेवेत्त्यांच्या कल्पनेप्रमाणेच सूफ़ींवादाचा संबंध तीन अत्यंत महत्त्वपूर्ण पारिभाषिक शब्दांशी आहे. - (१)'हद', (२) 'बेहद' आणि (३)'अन् हद' हे तिन्ही शब्द 'विश्व' आणि 'विश्वंभर' म्हणजेच परम सत्ता याच्याशी संबंधित आहेत. व्याख्यांच्या संदर्भात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की शाब्दिक व्याख्या कोणती का असेना ती 'हद्' पर्यंत जाऊ शकते, परंतु 'बेहद' आणि 'अनहद' पर्यंत तिची संपूर्ण पोहोच शक्य नाही. कारण की शब्दांच्या निर्मितीमध्ये शेकडो वर्षे लागलेले असताना पण शब्द शेवटी कोणत्याही परिस्थितीत मर्यादित, सीमितच असतात. शब्दांचे अर्थविस्तार आणि अर्थविशेषीकरण यासाठी पारिभाषिक शब्द निर्माण केले जातात. परंतु यांची पोहोच पण धनुष्यापासून सुटलेला बाणाच्या अंतरापर्यंत असते. हे मोजले जाऊ शकते, एवढेच ! येथे ज्याचा उल्लेख अपेक्षित आणि ग्राह्य आहे अर्थात् ती परम विशुद्धसत्ता म्हणजेच परमेश्वर हा असीम आहे. ती सत्ता अशी आहे की तिच्यासारखे इतर कोणीच नाही ! या तथ्याची उद्घोषणा पवित्र कुराण या शब्दात करते - ''लैस कमिस्लिहि शैअुन्'' अर्थात् ''त्याच्या सदृश कोणतीही वस्तू नाही.''-४२.११

जर आपण सूफ़ींच्या ''वहद्तुल वजूद'' म्हणजेच अद्वैतवाद या सिद्धांताशी सहमत नसू, तरी पण एवढी गोष्ट मान्यच करावी लागेल की हजारो वर्षांपूर्वी धर्माने हे वास्तव दाखवून दिले होते की, जे काही अस्तित्वात आहे ते असीम आहे. दृष्टीपलीकडील किनारापण नाही. त्याचा अंत नाही, आणि किनारा नाही. ते सर्वोच्च आहे ना त्याच्या आदिस मोजले जाऊ शकते ना त्याच्या अंताचा पत्ता !

धर्माची ही जिज्ञासा मामूली जिज्ञासा नव्हे. या जिज्ञासेने आमचे जीवन आणि त्याचे प्रयत्न, त्याच्या प्रवासास संपवून टाकले नाही, तिला चालू ठेवले. ज्या लोकांनी धर्मास अफूची गोळी किंवा नशा म्हणून ठरविले ते आपल्या भौतिक सत्तेच्या नशेमध्ये या गोष्टीस विसरून गेले आणि आपल्या 'हद्दी' च्या मर्यादेमध्ये असे जखडून गेले की त्यांना एवढेसुद्धा कळले नाही की मानवाचा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नित्य शोधामध्ये व्यस्त राहणे, हे वास्तविक धर्माच्या त्याच जिज्ञासेचा परिणाम होता की ज्याने पहिल्या दिवसापासूनच हे सांगितले होते की जे काही अस्तित्वात आहे, ते असीम आहे आणि तिचा संभाव्यता अगणित आहेत. म्हणून आमचे प्रयत्न किती का मोठे असेनात, हे प्रयत्न किती का यशस्वी होईनात, प्रेमाची परीक्षा-कसोटी आणि नूतन आकाशांना जाणून घेण्याची परंपरा समाप्त होत नाही. म्हणजेच शोधाची तृष्णा कधीच तृप्त होत नाही. निराशा पराजित अभिलाषेचे नाव आहे. एका सूफ़ीं महात्म्याने निराशेस जीवनाचे रत्न यासाठीच म्हटले होते की जर सर्व काही प्राप्त झाले तर माणूस निश्चिंत होऊन बसून राहील. उपहासगर्भित टोमणे मारणारे काही लोक सूफ़ींना निराशावादी दुःखप्रिय पात्रता धारण करणारे समजतात. परमेश्वर करो ! त्यांनी सुप्रसिद्ध सूफ़ीं संत ख्व्वाजा निजामुद्दीन औलिया यांच्या जिव्हेवर खेळणारे हे काव्य चरण ऐकले असते तर किती बरे झाले असते!

''मर्दां हजार दरिया खुर्दंद व तिश्ना रफ्तंद'' अर्थात् साहसी मर्द पठ्ठे सहस्त्रभर समुद्रांचे पाणी प्राशन करूनसुद्धा तृषार्तच राहून गेले! त्यांचे हे कथन त्याच वास्तवतेकडे संकेत करते की सृष्टीचा मुकुटमणीच असलेल्या मनुष्याच्या जीवनात संपृक्त बिंदू कधीच येत नसतो.

साधकाची साधना पण संशोधकाच्या शोधासारखीच असते. तो ईश्वराच्या शोधात सतत प्रयत्नशील असतो आणि जर येथे मला आपण एक नवीन शब्द प्रयोग करण्याची परवानगी द्याल तर मी असे म्हणेन की साधक पण एक वैज्ञानिक शास्त्रज्ञच असतो; परंतु हा शास्त्रज्ञ आपल्या संशोधनास भौतिक जगापासून अग्रेसर होऊन इंद्रियातीत अशा आध्यात्मिक जगाकडे आपणास ओढून नेतो. भौतिक जग म्हणजेच हे दृश्य जग आपल्या डोळ्यांनी दिसते. दृष्टीच्या सीमेपर्यंत त्याची 'हद' असते; परंतु त्याचे आध्यात्मिक साधक म्हणजेच सूफ़ींनी असे सांगितले आहे की, ''हद''च्या पुढे एक गोष्ट ''बेहद'' पण आहे, आणि त्याच्या पलिकडे पण आणखी एक गोष्ट ''अन हद'' नावाची आहे !

ज्याप्रमाणे आपण ''हद'' पासून ''बेहद'' आणि ''अनहद'' कडे प्रयाण करतो अर्थात् ससीमपासून असीमकडे, ज्ञातापासून अज्ञाताकडे आणि आपल्याला कळून येते की मार्ग फक्त पुढचाच आहे आणि तो पुढचा मार्ग खुला आहे; त्याचप्रमाणे हे पण समजून घेतले पाहिजे की ''हद'' व ''बेहद'' आणि ''अनहद'' ची अवस्था त्या मजलां (उद्दिष्टां) ची पण आहे, ज्यांना आपण वर-वर सर केल्याचे समजत होतो आणि ज्यांना आम्ही मागे सारले होते. म्हणजेच मार्ग ज्याप्रमाणे पुढे असीम होता त्याचप्रमाणे मागच्या बाजुने जिथून आम्ही येत होतो तो पण असीम आहे, अनंत आहे. म्हणजे ज्या मजलांपर्यंत आम्ही पोहोचलो आणि असे समजून होतो की त्यांना आम्ही सर केले आहे त्या पण खरोखर संपूर्णपणे पादाक्रांत केलेल्या मजला नव्हेत. त्यांची ओळख, त्यांची माहिती पण सीमित व मर्यादितच आहे. त्यांच्या साऱ्या संभाव्यतांशी यथाशक्य आमचा परिचय झालेला नाही म्हणून अग्रेसर होण्यासोबतच पिछेहाट होणे हे पण जरूरीचे आहे. स्वत: छोटेसे आढळून येणारे स्थानाच्या संभाव्यता-शक्यता पण असीम आणि वस्तूत: असंख्य असतात. जणू काही मोठेपण, सामर्थ्य, पराकाष्ठा, यश, लहानशा गोष्टीपासून मोठ्या गोष्टीकडे घेऊन जाण्यातच नसते, अपितु मोठ्या गोष्टीकडून छोट्या गोष्टीकडे येण्यात पण आहे. थेंब, समुद्रकण, पर्वत आणि किरणच सूर्य नव्हे, तर समुद्र थेंब; पर्वत कण आणि सूर्य पण किरण आहेत. प्राचीन काळी ही गोष्ट समजण्यास थोडी अवघड होती; मात्र या अणु युगात ही गोष्ट समजण्यास फार सोपी आहे. समुद्राचा सर्वसामान्य लाभ हा कालवे, लहान प्रवाह, पाण्याचे लहान लहान थेंब यांच्यामुळे होतो. पर्वताची उपयोगिता ही कोसळणाऱ्या दरडींच्या बनणाऱ्या लहान लहान दगडांमुळे सिद्ध होते. तद्वत किरणांमुळेच सूर्याचा लाभ जगास होतो.

असंख्य विश्वे आणि त्यांचे स्वरूप निर्माण करणारा विश्वंभर हा स्वत: कसा अप्रतिम, अजोड आणि कल्पनातीत होऊ शकतो याचा अंदाज बांधणे पण शक्य गोष्ट नाही. परंतु ही गवेषणा धर्माचीच गवेषणा आहे आणि अत्यंत महत्त्वपूर्ण अशी गवेषणा आहे की ती अप्रतिम सत्ता म्हणजेच त्या विश्वंभरास त्याच्या सृष्टीमध्येच शोधले जाऊ शकते. ते स्थळ-काळापासून निरपेक्ष आहे. तो दिक्कालातीत आहे; परंतु सर्वत्र विद्यमान आहे. जर आम्ही त्याची सृष्टी, त्याने निर्माण केलेले ब्रह्मांड किंवा अनंत विश्वे यांची अनुभूती घेऊ शकत नसू, त्याचे बोध घेण्यास असमर्थ असू आणि फक्त सृष्टीसच पाहात राहू, स्रष्ट्याकडे पाहात नसू आणि सृष्ट्यास सृष्टीपासून वेगळे समजू तर अशा अवस्थेत सूफ़ींच्या परिभाषेमध्ये 'भेद' (फर्क) असे म्हणतात.

अर्थातच विश्व आणि विश्वंभर हे दोन्ही वेगवेगळे आहेत म्हणजेच द्वैताची संकल्पना मान्य करणे होय. याच्या समांतर विरूद्ध 'जमा' (अभेद) ची संकल्पना आहे. ईश्वराच्या शोधात असलेला साधक, ईश्वराचा मार्गस्थ हा जर परमेश्वरास पाहात असेल, विश्वंभराचे दर्शन घेत असेल, आणि विश्व त्याच्या नजरेआड असेल, तर अशा प्रकारे विश्वंभर हा विश्वासाठी स्वत: एक आडपडदा बनून जातो. मनुष्य जेव्हा सर्वस्व त्याग करून म्हणजेच संन्यासवृत्ती धारण करून त्या एक विशुद्ध परम सत्तेमध्ये मग्न होऊन जातो तेव्हा तो 'फना' म्हणजेच निर्वाण अवस्थेमध्ये पोहोचतो. काही जण या अवस्थेस 'फनाफिल्ला' म्हणजेच ब्रह्मलीन अवस्था असे म्हणतात. परंतु या व्यतिरिक्त आणखी एक गोष्ट अशी आहे की सृष्टीस स्रष्ट्यासोबत अशा प्रकारे पाहिले जावे की परमेश्वराचे दर्शन समस्त सृष्टीमध्ये होऊन जावे, दुसऱ्या शब्दात कणाकणामध्ये प्रभू-दर्शन घडून जावे. परमेश्वर हा प्रत्येक ठिकाणी एक वेगळ्या गुणामध्ये आणि एक वेगळ्या वैभवामध्ये प्रकट होतो. याला 'अभेदाभेद' ('जमुलजमा') असे म्हणतात. हे 'बकाबिल्ला' चे (शाश्वतता) स्थान आहे. यापेक्षा उच्च असे कोणतेच स्थान नाही. कारण की या अवस्थेमध्ये जी वस्तू जशी आहे तशीच दिसते. वैज्ञानिक सिद्धांतांचीपण अशीच अपेक्षा असते की जी वस्तू जशी आहे तिला आपण तिच्या वास्तविक स्वरूप व स्थितीमध्ये ओळखावे. आध्यात्मिक परिभाषेमध्ये ही गोष्ट अशाप्रकारे सांगितली जाईल की साधक हा एकतेस अनेकतेमध्ये आणि अनेकतेस एकतेमध्ये पाहतो, अशा पद्धतीने की ना सृष्टी ही स्रष्ट्यासाठी आडपडदा बनते ना स्रष्टा सृष्टीसाठी आडपडदा बनतो. 'एकोऽहं बहुस्याम !'

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की विज्ञानाची दौड किंवा आगेकूच ही 'हद'पासून 'बेहद' पर्यंत असते. याहीपुढे अग्रेसर होऊन विज्ञान 'अनहद' च्या प्रांतात शिरू इच्छितो. त्याच दिशेने विज्ञानाच्या प्रगतीची वाटचाल सुरू आहे. या वाटचालीच्या प्रयत्नाचे फलित म्हणजे नुकताच लागलेला 'ब्रह्मकणा'चा शोध ! अशा प्रकारे अनंत विश्वाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात विज्ञान असतो; तर सूफ़ीं हा त्या वरची पायरी म्हणून आपल्या उत्कट भक्तीच्या बळावर अतीत असलेल्या परमेश्वरासच मिठी मारू इच्छितो. तो त्याची गळाभेट घेऊ इच्छितो. त्याच्या कृपाछत्राखाली सदैव राहू इच्छितो.

सूफ़ींवाद आणि विज्ञान यांच्यामधील परस्पर निकटवर्ती असलेल्या संबंधांच्या संदर्भास शेवटी सूत्ररूपात असे मांडता येईल.

'मीमांसा' म्हणजेच सुव्यवस्थित शोध हा दोघांसाठी समाईक सूत्र-बिंदू आहे. सूफ़ींवाद ईश्वराचा शोध घेतो. तो यासाठी एकाग्र भक्तीचे साधन वापरतो; तर विज्ञान सत्याचा शोध घेतो. वैज्ञानिक दृष्टिकोन हे त्याचे साधन. सूफ़ींच्या उत्कट भक्तीने ईश्वर द्रवतो व तो त्याच्यावर कृपेचा वर्षाव करतो. सूक्ष्म निरीक्षण व परिक्षणाच्या बळावर विज्ञान निष्कर्षाप्रत येऊन ठेपतो. ईश्वर प्राप्ती हे सूफ़ींचे उद्दीष्ट असते, तर सत्यापर्यंत पोहोचणे हे विज्ञानाचे साध्य असते. ईश्वराचेच दुसरे नाव परम सत्य असल्यामुळे, ईश्वर आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. याबाबतीत पवित्र कुराणाने पण पुढील शब्दात याची ग्वाही दिली आहे-

''अल्लाहच सत्य आहे'' किंवा ''अल्लाह अंतिम सत्य आहे'' - ३१:३० व २२'६. सुप्रसिद्ध पाश्चात्य तत्वज्ञ पायथॅगोरसचे खालील विधान उपरोक्त मताचे समर्थन करणारे असे आहे. - 'सत्य हा परमेश्वराचा आत्मा आहे व प्रकाशाचा देह आहे.'

## १०) माझ्या दारी कोण आहे?

त्याने विचारले, "कोण आहे माझ्या दारी?"
मी उत्तरलो, "तुमचा नम्र सेवक."
त्याने विचारले, "काय काम आहे?"
मी म्हणालो, "महाराज ! आपल्याला अभिवादन करायचे आहे."
तो म्हणाला, "किती काळ असा भटकणार?"
मी म्हणालो, "जोपर्यंत तुम्ही थांबवत नाही." – (१)

त्याने विचारले, "अग्निमध्ये किती काळ उकळत बसणार?"
मी म्हणालो, "जोपर्यंत मी विशुद्ध होत नाही."
ही माझ्या प्रेमाची शपथ आहे,
प्रेमासाठी
मी धनसंपत्ती आणि पदप्रतिष्ठेचा त्याग केला आहे. – (२)

तो म्हणाला, "तू आपल्या लवादाचे युक्तिवाद केले आहेस
परंतु तुजपाशी पुरावा नाही."
मी म्हणालो, "माझे अश्रूच माझा पुरावा आहे;
माझ्या चेहऱ्याची निस्तेजता
माझा पुरावा आहे." – (३)

तो म्हणाला, "तुझा पुरावा
विश्वसनीय नाही; तुझे डोळे
पण (अश्रुने) पाणावलेले दिसतात."
मी म्हणालो, "तुमच्या न्यायाच्या प्रतापामुळे
माझे डोळे निर्मळ
आणि स्वच्छ आहेत." – (४)

त्याने विचारले, "तुला काय हवे आहे?"
मी म्हणालो, "तुम्ही माझे नित्य सखा रहावे."
त्याने विचारले, "मजकडून तुला काय हवे आहे?"
मी म्हणालो, "तुमची असीम कृपा." – (५)

–रूमी : प्रेयसीच्या बाहुपाशात

(* इंग्रजी अनुवाद : जोनाथन स्टार–The Times of India, Pune, March 4, 2012)

**ख) प्रेमाच्या गावा**

तू झपाटून जा
माझ्या प्रेमानं !
प्रियतमा कुजबुजली माझ्या कानात
"प्रेमात 'शिकारी' बनण्यापेक्षा
ज्याची होते 'शिकार' तोच तू बन !
प्रेमातल अस सावज बनणं,
एक समर्पित प्रेमी बनणं कधीही चांगलं !

तू झपाटून जा माझ्या प्रेमानं !
कशाला घेतोस सूर्य बनण्याचा ध्यास?
थांबव तो ध्यास आणि बन एक धूलिकण !

विसरून जा तू तुझं घरदार नि ये माझ्याकडं.
माझ्यात वसती कर !

ज्योत असल्याचा आव कशाला आणावा उगाच?
त्यापेक्षा तू हो ज्योतीवर झेपावणारा पतंग !

असं करशील तर घेऊ शकशील तू जगण्याची खरीखुरी चव !
आणि कळेल तुला खरी ताकद प्रेमातल्या समर्पणाची !"

**– प्रख्यात फ़ारसी गूढवादी कवी जलालुद्दीन रूमी**

# ११) प्रपत्तियोग आणि भक्तियोग

## १. (क) प्रपत्तियोग*

प्रपत्तियोग म्हणजे काय, हे उत्तम प्रकारे समजून घेण्यासाठी कर्मयोग आणि ज्ञानयोग यांचे स्वरूप संक्षिप्तपणे पूर्वपिठीका या स्वरूपात समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. तसे पाहता कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग ही सर्व परमेश्वर प्राप्तीची साधने आहेत. कर्मयोग म्हणजे फलावर दृष्टी न ठेवता बुद्धीने कर्म करण्याचा मार्ग. कर्मयोग म्हणजे प्रपंचात राहून स्वस्थ न बसता कर्म करीत जाणे. गीतेत म्हटले आहे की, कर्मयोग आणि ज्ञानयोग ह्या दोन्ही मार्गांपासून अंती कल्याण होते, म्हणणे मोक्ष प्राप्त होतो; परंतु कर्मांचा त्याग करून संन्यास घेऊन ध्यान करीत बसणे याच्यापेक्षा कर्म करीत जाणे, हा मार्ग पहिल्यापेक्षा अधिक सुलभ आहे. मात्र कर्म करीत असताना त्यापासून होणाऱ्या फलाकडे दृष्टी नसावी. ते कर्म आपणास कर्तव्य आहे याच बुद्धीने करावे, किंवा परमेश्वराकडेस दृष्टी लावून त्याला ती कर्मे प्रिय आहेत म्हणून करावी. अशा बुद्धीने कर्मयोग करीत गेले, म्हणजे त्या कर्मांचे बंधन आपणास लागत नाही. त्याच्यायोगे दुस्संकार मनावर उत्पन्न होत नाहीत. काम, लोभ, मत्सर यांस मनुष्य वश होत नाही. दृष्टी एक कर्तव्यतेकडे, सत्याकडे, न्यायकडे, परमेश्वराकडे असे होऊन साधकाची वृत्ती उन्नत होते. कर्मयोगाच्या सतत अभ्यासाने साधक षड्रिपुंच्या विकारवशतेपासून विमुक्त होतो आणि तो ब्रह्मनिष्ठ होतो. कर्मयोगाच्या योगे ज्ञानयोगाचाच लाभ होतो. हा कर्मयोग म्हणजे नीतीचा योग; परंतु संस्कृतमध्ये नीतीला शाश्वतधर्म असे नाव आहे. तेव्हा कर्मयोग म्हणजे शाश्वत धर्माचा योग.

परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन ते स्वरूप अंत:करणापुढे ठेवणे व त्याचे सतत ध्यान करणे आणि तदर्थ कर्मांचा त्याग करणे, हा एक उन्नतीचा मार्ग भगवद्गीतेत सांगितला आहे. ह्याला ज्ञानयोग असे म्हणतात. परमेश्वर अनादि आहे, सर्वात मोठा आहे, सर्व प्राण्यांमध्ये विज्ञान म्हणून जे आहे ते त्याचा अंश आहे. या विज्ञान म्हणजेच विवेक रूपाने परमेश्वरच मनुष्याच्या हृदयामध्ये वास करतो, आणि ह्या रूपाने परमेश्वरच त्या ठिकाणी (अंत:करणामध्ये) वास करतो, हे समजावयाचे. तो परमेश्वर सर्वांचा वशी, म्हणजे सर्वात आपल्या हस्तगत करणारा असा आहे, तो सर्वांचा ईश्वर आहे, तो सर्व भूतांचा चालक आहे, मालक आहे. असंख्य पदार्थ जे आहेत त्यांच्या धर्मांचे सांकर्म होऊ नये म्हणून प्रत्येकामध्ये नियत धर्म ठेवून सर्वत्र व्यवस्था ठेवणारा आनंदमय, रम्यस्वरूप तो परमात्मा आहे. ह्या प्रकारच्या स्वरूपाचे सतत ध्यान केले असता मनुष्याची वृत्ती उन्नत होते, शांत होते आणि समाहित होते.

दुसऱ्या शब्दात ज्ञानयोग म्हणजे परमेश्वराचा जो महिमा, जे गांभीर्य, जो आनंद आणि जे प्रेम विश्वामध्ये नांदत आहे, त्याचे जे अद्‌भुत व्यापार अनादिकालापासून सतत चालत आले आहेत आणि त्याचे जे देशत: आणि कालत: अनादि अनंत स्वरूप अनुभवास येत आहे, ह्या सर्वांचे मनन आणि ध्यान एकसारखे करून त्यात निमग्न होणे. ज्ञानयोग आणि कर्मयोग या दोन्ही योगांमध्ये परमेश्वरास दूर ठेवून साधन करणे, अशा रीतीचा हा मार्ग आहे. अशा मार्गांमध्ये परमेश्वरापासून साहाय्य जे मिळावयाचे त्याचा विचार नसतो; परंतु आपले सामर्थ्य अत्यंत अल्प आहे, हे सर्व साधुसंतांच्या अनुभवास अत्यंत कठीण आहे. नाना प्रकारची विघ्ने येतात आणि ती विघ्ने प्रायश: आपल्याच उच्छृंखल वृत्तीच्या योगे उत्पन्न होतात, म्हणून तिसरा एक योग आहे, तो ह्या दोन योगांस आधारभूत धरला पाहिजे. त्याचे नाव भक्तियोग. हे तिन्ही योग परस्परांपासून भिन्न अशी तीन साधने आहेत, असे कोणी म्हणतात, मात्र वस्तुस्थिती ही योग परस्परांपासून भिन्न अशी तीन साधने आहेत, असे कोणी म्हणतात, मात्र वस्तुस्थिती ही आहे की प्रपत्तियोग तर त्या दोन्ही योगांचा पाया आहे, आणि ते त्याच्या योगे करून सुसाध्य होतात.

प्रपत्ति म्हणजे शरणागति. तिची चिन्हे (लक्षणे) समानुजपंथाच्या ग्रंथांमध्ये दिली आहेत, ती अशी :-

*''आनुकूलस्य संकल्प: प्रातिकूल्यस्य वर्जनम्‌।।*
*रक्षिष्यतीति विश्वास: गोप्तृत्ववरणं तथा।।*
*आत्मनिक्षेपकार्पण्ये षड्‌विधा शरणागति: ।।''*

(१) ईश्वरास प्रपन्न जो झाला, त्याच्यामध्ये ईश्वरास अनुकूल अशा रीतीने वागण्याचा निश्चय किंवा ईश्वराचे जे यावत्‌ सर्व प्राणी आहेत, त्यांच्याशी स्नेहाने चालण्याचा निर्धार; (२) परमेश्वराशी किंवा त्या प्राण्यांशी प्रतिकूल किंवा वैराचा भाव, याचा त्याग करणे, (३) परमेश्वर आपले रक्षण करीलच, असा भरवसा धरणे; (४) आपले संगोपन करणारा तो अशा रीतीने त्याला वरणे अथवा माझे संगोपनकर अशी सतत भिन्न भिन्न प्रकारे प्रार्थना करणे; (५) आपला सर्व आत्मा त्याला समर्पण करणे, म्हणजे जीवभाव त्याच्यापायी ठेवणे आणि (६) आपण सर्वथा अनाथ आहो अशी बुद्धी जागृत ठेवणे, हे शरणागतीचे सहा प्रकार असतात. याशिवाय भगवद्‌गीतेत पण असे म्हटले आहे की, ''हे भारता! पूर्णपणे त्या (भगवंता)ला शरण जा. त्याच्या कृपेने तुला दिव्य शांती आणि सनातन परमधामाची प्राप्ती होईल.'' - १८:६२ आणि ''परमेश्वर प्रत्येक जीवाच्या हृदयात स्थित आहे, आणि तो सर्व जीवांचे भ्रमण निर्देशित करीत आहे.'' - १८:६१

तुकारामासारख्या संताच्या हे प्रकार साहजिक रितीने अनुभवास येऊन ते त्यांचे अवलंबन करीते झाले, 'तुका म्हणे जीव देवाजीचे हाती। दिला त्याची गति तोचि जाणे।।' या वचनामध्ये त्यांनी आत्मनिक्षेप आणि परमेश्वर आपले रक्षण करील असा विश्वास, हे प्रकटित केले आहेत. या अभंगाच्या दुसऱ्या एका चरणातही 'कासे लागे तया न लगती सायास। पोहणारा त्यास पार पावी।।' हा जो दृष्टांत दिला आहे त्याच्या योगे तो विश्वास स्पष्ट रीतीने उद्‌घाटित केला आहे आणि 'घालोनियां उडी यावें बा तांतडी। मज पैलथडी तारावया।।' अशा असंख्य प्रार्थना त्यांनी केल्या आहेत. त्यांच्या योगे तो माझा मला अशा रीतीने त्यांनी वरिले आहे, असे स्पष्ट होते.

आता या प्रकारच्या शरणागतीचा परिणाम काय होतो, हे तुकाराम महाराजांनी

*''दिला जीवभाव। तेव्हा सांडिला म्यां ठाव।।*
*आतां वर्ते तुझी सत्ता। येथे सकळ अनंता।।*
*माझिया मरणें। तुम्ही बैसविले ठाणे।।*
*तुका म्हणे काही। मी हे माझे येथे नाहीं।।* -१
*जालों बळिवंत। होऊनिया शरणागत।।*
*केला घरात रिघावा। ठायी पडियेला ठेवा।।*
*हाता चढे धन। ऐसें रचलें कारण।।*
*तुका म्हणे मिठी। पायी देऊनि केली लुटी।।''* - २

वरील पहिल्या अभंगात स्पष्ट करून सांगितले आहे. 'दिला जीवभाव', म्हणजे आत्मनिरपेक्ष केला, अर्थात मी आपला आत्मा तुला समर्पण केला, तेव्हा झाले काय, तर माझा जो ठाव माझ्या अंत:करणात होता तो नाहीसा झाला आणि तो नष्ट होताच माझ्या अंत:करणात तुम्ही आपले ठाणे बसविले आणि मी आणि माझे हा भाव सर्वथा निरस्त झाला म्हणजे भगवंतच अंत:करणात येऊन राहिला. भक्ताचा मीपणा सर्वथा नाहीसा झाला. तेव्हा सर्व काही वृत्ती आणि विचार आणि त्यांच्यापासून घडणारे आचरण ही सर्व काम, क्रोध, लोभ, अहंकार इत्यादिकांच्या योगेकरून कर्मयोग करीत असता म्हणजे शाश्वतधर्मास अनुसरून चालत असता जे भगवंताचे साहाय्य होते, ते अशा प्रकारचे आहे. भगवंत पूर्वी दूर होता तो आता अंत:करणात जवळ आला; तेव्हा नीतीच्या किंवा शाश्वतधर्माच्या आचरणासाठी परमेश्वराविषयी एकनिष्ठता ही अत्यंत आवश्यक आहे, हे उघड आहे. ''कारण पवित्र कुराण म्हणते - 'आणि केवळ प्रामाणिक निष्ठेनेच अल्लाहचा अनुग्रह प्राप्त होत असतो.' - ३९:३''

या अभंगामध्ये भक्ताचा आपलेपणा जाऊन त्याच्या मनामध्ये परमेश्वराचे ठाणे येऊन बसले म्हणजे त्याच्या घरी परमेश्वर राहिला आणि गृहस्वामी झाला, अशा रीतीने या विषयाचे प्रतिपादन केले आहे. तोच विषय परमेश्वराच्या घरी जाऊन भक्ताने आपले कार्य साधले अशा रितीने दुसऱ्या अभंगात प्रतिपादला आहे. तुकाराम महाराज म्हणतात की, भगवंतास शरण जाऊन आपणास बळ प्राप्त झाले, त्यामुळे भगवंताच्या अंत:प्रदेशामध्ये मी प्रविष्ट झालो आणि उन्नतीचे तत्त्व एतद्रूप जो ठेवा तो मला सापडला. भगवंताच्याच प्रदेशामध्ये वावरू लागलो. तेव्हा केवळ उच्च पदापर्यंत नेणारी अशी जी साधने ती माझ्या हाती आली, म्हणजे मला प्राप्त झाली. भगवंताच्या पायी मिठी दिली, म्हणजे अनन्यभावे भगवंतास शरण गेलो असे झाले असता भगवंत आणि भगवंतास अनुकूल जे त्याच्याच ठायी मी नांदावयास लागलो. प्रतिकूलचा विचार गेला आणि मोक्षसाधस्वरूप धन यथेच्छ लुटले. याचा सारांश असा की, अनन्यभावे शरणागतीच्या योगे मनुष्यास बळ प्राप्त होऊन तो सर्व दुर्विचार व दुर्वृत्ती निरस्त करून उन्नत पदापर्यंत नेणारी अशी उदार सत्कृत्ये करावयास समर्थ होतो. परमेश्वर त्याचा सौंगडा होऊन सर्व अडचणी नाहीशा करून सरळ उन्नतीच्या मार्गाने त्याला हाती धरून नेले.

तेव्हा सर्व जी उन्नतीची साधने त्यांचा पाया प्रपत्ति हा आहे. दुसऱ्या इतर साधनांमध्ये आपल्याच सामर्थ्यावर भरवसा ठेवून मनुष्य चालतो, पण प्रपत्तिचे अवलंबन केले म्हणजे परमेश्वराचा अति निकट समागम होऊन शाश्वत धर्माचे आचरण हा एक आपणावरती बोजा आहे असे न होता विमल आनंदाचा तो झरा होऊन त्याच आनंदामध्ये मनुष्य मग्न होऊन शाश्वतधर्माचे आचरण करतो आणि सुखी होतो; तेव्हा नीतीचे आचरण यातच मनुष्याने रमावे, परमेश्वराचा महिमा चिंतन करण्यात समर्थ व्हावे, असे पाहिजे आहे तर परमेश्वरास प्रपन्न झाले पाहिजे. प्रपत्ति हे धर्माचे मुख्य साधन आहे. म्हणून प्रपन्नद्वशा आपणामध्ये आणण्याविषयी सतत झटले पाहिजे. वेळोवेळी आपल्या अंतःकरणाची स्थिति कशी आहे याचा विचार करून ती जर प्रपन्न झालेल्याच उचित नाही असे आढळून आले, तर ती निरस्त करण्याविषयी प्रयत्न केला पाहिजे. आणि अशाच्या योगे तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे 'जीवभाव पायांवरि ठेवून' आम्ही सुखी होऊ.

*(प्रपन्नप्रलपित डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर – 'धर्मपर लेख व व्याख्याने' – पृ. ३७८-८१)

**ख) प्रपत्ति : इस्लामी संकल्पना व धारणा**

विशुद्ध एकेश्वरवादी इस्लाम – रूढीवाढी (सनातनी) इस्लाम आणि सूफ़ीप्रणित सर्वेश्वरवादी इस्लाम तरी काय हे दोन्ही खरोखर शतप्रतिशत – शंभर टक्के प्रपत्तियोगच आहेत. शिवाय इस्लाम धर्माचे 'इस्लाम' हे नामाभिधान प्रपत्तियोगाशिवाय दुसरे तिसरे काहीच नाही! म्हणून इस्लामचा अर्थ आहे. शांति आणि ईश्वरशरणता. ईश्वरशरणता, त्या करूणावंत अल्लाहचे अनुसरण – आज्ञापालन व सर्वस्व समर्पण – शांतीचे सोपे साधन आहे.

'इस्लाम'चा अर्थ आहे. स्विकृती – परिपूर्ण आत्म – समर्पणाची आत्म-स्विकृती आत्म-स्विकृतीचा अर्थ आहे दृढ प्रतिज्ञा, आणि दृढ विश्वास आहे. नाव सत्यापनाचे आणि सत्यापनाचा मथितार्थ आहे दृढ प्रतिज्ञा, आणि दृढ प्रतिज्ञा म्हणजे परिपालन आणि परिपालनास म्हणतात कर्म, म्हणजेच 'इस्लाम' हे प्रत्यक्ष कर्म आचरणाचे नाव आहे, श्रद्धा हा धर्माचा गाभा आहे. श्रद्धेत मोठी शक्ती असते ताकद असते. श्रद्धेचा अर्थ आहे मनाने – अंतःकरणाने ओळखणे, वाचेने स्विकार करणे, शरीरावयांनी अंमलात आणणे. उत्कटपणे कृतिशील झालेली विवेकशक्ती म्हणजे श्रद्धा. कृतिशीलता हा श्रद्धेचा गुणधर्म आहे.

श्रद्धेची सुरुवात ही अंतःकरणापासून होते, आणि ती बाह्य आचरण स्वरूपात प्रकट होऊन परिपूर्ण बनते; तर 'इस्लाम' म्हणजेच सर्वस्व समर्पण भाव हा बाह्य आचरणापासून सुरू होऊन अंतःकरणापर्यंत पोहोचल्यावर परिपूर्ण समजला जातो. जर अंतःकरणातील निष्ठा बाह्य वचनबद्धता आणि उपासनेपर्यंत पोहोचत नसेल तर श्रद्धेवरील निष्ठा विश्वसनीय नसते. तद्वत जर बाह्य उपासना आणि वचनबद्धता अंतःकरणातील निष्ठेपर्यंत पोहोचत नसेल तर तो 'इस्लाम' अर्थात सर्वस्व समर्पण भाव विश्वासार्ह नसतो.

प्रपत्ति म्हणजे शरणागति. सर्वभावाने ईश्वराला शरण जाणे म्हणजे प्रपत्ति होय. प्रपत्ति हे भक्तीचे प्रधान अंग होय. प्रपत्तिची सहा लक्षणे वर सांगितले आहेतच. परमेश्वराचे अभयहस्त व वरहस्त असे दोन कृपाहस्त आहेत. अभयहस्ताने तो भक्ताला अभय देऊन त्याचे रक्षण करतो; तर वरदहस्ताद्वारे तो भक्तांची मनोकामना

पूर्ण करतो. परब्रह्माची भक्ती किंवा उपासना (१) अभिगमन, (२) उपादन, (३) इज्या, (४) स्वाध्याय आणि (५) योग या पाच प्रकारची असते.

कर्माचा सिद्धान्त भटळ आहे. म्हणून "(प्रत्येक) जीवाने आपण उद्यासाठी काय पुढे पाठवीत आहोत याकडे लक्ष ठेवले पाहिजे." – ५९:१८. जे मृत्यूनंतरही साक्ष देतात ते म्हणजे कर्म. चांगल्या कर्मांनी वाईट कर्मांचे प्रायश्चित होते. सवार्त चांगले कर्म आहे जीवनदाता परब्रह्म परमात्म्याला संपूर्णतः समर्पित होणे. त्याला संपूर्णपणे शरण जाणे म्हणजेच शरणासाठी, प्रपत्ति.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने पवित्र कुराणमध्ये, "निःसंशय, अल्लाहच्या लेखी असलेला (खरा) धर्म इस्लाम (पूर्ण समर्पण) हाच आहे." – ३:१९ असे निःसंदिग्धपणे घोषित करून श्रद्धावंत लोकांना तो आज्ञामूलक आवाहन करताना असे म्हणतो की, "अहो श्रद्धावंत लोकहो! पूर्णतः शरणागत व्हा आणि शैतानाच्या मार्गांचे अनुसरण करू नका, निःसंशय तो तुमचा उघड शत्रू आहे." – २:२०८; तर प्रेषित मुहम्मद स. यांना तो अशी आज्ञा करतो की, "तुम्ही संपूर्ण समर्पण भावासह अल्लाहचीच उपासना करा. लक्षात ठेवा! संपूर्ण समर्पणभावासह आज्ञा पालन हा केवळ अल्लाहचाच हक्क आहे." – ३९:२–३. "त्यांना सांगा, 'मी पूर्ण समर्पण भावासह केवळ अल्लाहचीच उपासना करतो." – ३९:१४ "(पैगंबर ! तुम्ही लोकांना) सांगा, 'मला अशी आज्ञा देण्यात आलेली आहे की, मी केवळ अल्लाहचीच उपासना करावी, त्याच्याप्रति पूर्ण समर्पणभाव बाळगून आणि मला अशी आज्ञा देण्यात आली आहे की, सर्वप्रथम मी स्वतः त्या लोकांपैकी व्हावे जे अल्लाहला पूर्णपणे समर्पित होतात – त्यास शरण जाणाऱ्यांमध्ये मी सर्वात अग्रणी असावे." – ३९:११–१२. तसेच प्रेषित नूह यांना पण अशीच आज्ञा करण्यात आली होती की, "आणि मला आज्ञा देण्यात आलेली आहे. की, मी (पूर्णपणे) स्वतःला अल्लाहच्या स्वाधीन करून टाकावे." – १०:७२. प्रेषित युसूफ यांनी तर शरणागत अवस्थेमध्येच स्वतःच्या मृत्यूची कामना व्यक्त केली आहे – "हे आकाश आणि पृथ्वी यांच्या निर्मात्या इहलोकात आणि परलोकातही तू माझा रक्षणकर्ता आहेस. मी पूर्णतः (तुला) शरणागत असतानाच मला मरण येऊ दे आणि मला सदाचरणी लोकांमध्ये समाविष्ट कर." – १२:१०१. प्रेषित इब्राहीम आणि प्रेषित याकूब यांनी तर आपल्या पुत्रांना उपदेश करताना असे स्पष्ट सांगितले आहे की त्यांनी संपूर्ण शरणागति पत्करलेल्या अवस्थेमध्येच मृत्यूला कवटाळावे. जसे, "इब्राहीमने आपुल्या पुत्रांना आणि तसेच याकूबने (देखील आपल्या पुत्रांना) तसेच बजावले (व म्हटले), "हे माझ्या पुत्रांनो, खरोखर अल्लाहने या (इस्लाम) धर्माची निवड तुमच्यासाठी केलेली आहे, म्हणून तुम्ही (अल्लाहला) पूर्णतः शरण गेलेले असाल त्या (स्थिती) व्यतिरिक्त इतर (स्थितीत) मृत्यूला तुमच्यावर मात करू देऊ नका." – २:१३२. शरणागतीचा मार्ग म्हणजेच खरा सन्मार्ग होय असे समीकरण पुढील श्लोकात मांडण्यात आले आहे – "जो अल्लाहला शरण गेला त्याला निश्चितच सन्मार्ग मिळाला (असे समजा)." – ३:१०१ आणि पुढे त्याचा सदुपदेश असा आहे – "(म्हणून) हे श्रद्धावंतांनो, तुम्ही सवर्वजण अल्लाहची शरण जा (ते) यासाठी की तुम्ही सफल व्हावे.," – २४:३१.

अल्लाहवरच विसंबून राहायला हवे." – ३:१२२ "(अल्लाहवर) जे भरवसा ठेवतात त्यांच्यावर निःसंशय अल्लाह प्रेम करतो." – ३:१५९. आपल्या भक्तांमध्ये कृतघ्नतेची भावना असणे त्याला

अजिबात आवडत नाही.'' - ३९:७ मात्र ''मी (माझ्या) भक्तांवर मुळीच अन्याय करीत नसतो.'' - ५०:२९ असे शेवटी अल्लाहने ठाम आश्वासन दिले आहे.

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की, इब्राहीम, याकूब, नूह आणि यूसुफ़ सारख्या प्रतिष्ठीत प्रेषितांनी नित्य प्रपत्तीचीच कामना केली असून याचेच अनुसरण करण्याविषयीची आज्ञा प्रेषित मुहम्मद स. यांना अल्लाहने वारंवार केली आहे. यावरून इस्लामी भक्तीच्या क्षेत्रामधील प्रपत्तीचा असाधारण महिमा कळून येतो. तद्वतच महाराष्ट्रातील थोर साधु - संत तुकाराम, ज्ञानेश्वर व नामदेव इत्यादिकांनी सुद्धा या प्रपत्तीचीच सदैव कामना केलेली दिसून येते.

शेवटी इस्लाम धर्मप्रणित प्रपत्ती (परिपूर्ण शरणागति)चे तीस घटक किंवा लक्षणांची नोंद घेण्यासारखी आहे -

**परिपूर्ण इस्लाम अर्थात प्रपत्तीचे तीस घटक (लक्षणे)**

**क) १. पश्चात्तापदग्ध होऊन ईश्वराकडे क्षमा मागणे,**
२. उपासना करणे,
३. ईश्वरमार्गात भ्रमण (यात्रा) करणे,
४. ईशस्तवन करणे,
५. नमन करणे,
६. प्रणिपात करणे,
७. सत्कृत्यांचा आदेश देणे,
८. दुष्कृत्यांपासून परावृत्त होणे (करणे),
९. अल्लाहने घालून दिलेल्या मर्यादांचे पालन करणे,
१०. ईश्वरावर नितांत श्रद्धा ठेवणे,

- ९. सूरए (अध्याय) तौबा (बरात) - ११२.

**ख) ११. प्रसन्नचित्ताने सातत्यपूर्ण भक्ती (नमाज संपन्न) करणे,**
१२. व्यर्थ व निरर्थक गोष्टींपासून अलिप्त राहणे,
१३. नियत धर्मदान करणे, ('जकात')
१४. गुप्तांगांचे रक्षण अर्थात शील रक्षण करणे,
१५. अमानतीत (ठेवीत) फेरफार न करणे,
१६. दिलेले वचन पाळणे,
१७. भक्तीत (नमाजची) स्थिती राखणे व तिच्या वेळेविषयी अत्यंत दक्ष राहणे,
१८. अंतिम निवाड्याचा दिवस सत्य असल्याचा विश्वास बाळगणे,
१९. विधात्याच्या शिक्षेचे भय बाळगणे,

२०. प्रामाणिक साक्षीबद्दल अटळ असणे,

– ७० सूरए (अध्याय) मआरिज – २२-३४.

ग) **२१. ईश्वरास शरणागत, आत्मसमर्पित होणे,**

२२. प्रामाणिक निष्ठा राखणे,

२३. पवित्र कुरआन वाचन करणे (व त्यावर मनन करणे) (व तदनुसार आचरण करणे),

२४. सत्यभाषण करणे,

२५. संयम राखणे,

२६. नम्रता बाळगणे,

२७. दानधर्म करणे, ('खैरात')

२८. उपवासव्रत ठेवणे,

२९. अपकर्मां (पापां) पासून अलिप्त (सुरक्षित) राहणे,

३०. नित्य प्रचुर प्रभुनामस्मरण करणे.

– ३३. सूरए (अध्याय) अहजाब – ३५.

प्रपत्तीची अशी सविस्तर एकूण तीस लक्षणे पवित्र कुणामध्ये निर्दिष्ट करण्यात आली आहेत.

## २) भक्तियोग

भक्ती ईश्वरप्राप्तीसाठी आध्यात्मिक आराधना, उपासना असते. भक्ती म्हणजेच मानसिक श्रद्धा! श्रद्धेचे स्वरूपच भक्तीचे रूप दर्शनीत असते. भक्ती हीच सर्वश्रेष्ठ कर्तव्यपूजा होय. भक्ती ही हृदयमंदिरातून कृतीरूपाने दिसत असते.

भक्ती म्हणजे प्रेममय योग! ईश्वराविषयीचा प्रेमभाव आणि ब्रह्मज्ञान यांचा समन्वय म्हणजे भक्तियोग! ईश्वराविषयी पराकोटीचे आकर्षण निर्माण झालेल्या प्रेमाची परिणती भक्तीत होते. (१) विवेक, (२) विमोक, (३) अभ्यास, (४) क्रिया, (५) कल्याण, (६) अनवसाद आणि (७) अनुद्धर्ष या सात प्रकारच्या अभ्यासामुळे परमात्म्याची प्राप्ती होते. हीच सात भक्तीची साधने आहेत. परमेश्वराचे नामस्मरण जिव्हेने; तर त्याचे कृतज्ञतापन अंत:करणाने व्यक्त झाले पाहिजे. हीच खऱ्या भक्ताची उक्ती आणि कृती असते.

** ''आता तुज कळेल ते करी। तारिसी तरि तारीं मारीं।*
*जवळी अथव दुरी धरी। घालीं संसारी अथवा नको।।१।।*
*शरण आलों नेणतेपणें। भाव आणि भक्ति काहींच नेणें।*
*मतिमंद सर्व ज्ञानें। बहु रंक उणे रंकाहुनी।।२।।*
*मन स्थिर नाही माझिये हातीं। इंद्रिये धावतां नावरती।*
*सकळ खुंटलिया युक्ति। शांति निवृत्ति जवळी नाही।।३।।*

*सकळ निवेदिला भाव। तुझिये ठायी ठेविला जीव।*
*आता करी कळेल तो उपाय। तूंचि सर्व ठाव माझा देवा।।४।।*
*राहिलो धरूनि विश्वास। आधार नेटीं तुझी कास।*
*आणीक नेणे मी सायास। तुका म्हणे यास तुझें उचित।।५।।*

तुकोबा म्हणतात, ''देवा, तुझे पाय प्राप्त व्हावे, त्यामध्ये माझे मन रंगून जावे, आणि प्रेमातिशये करून तुजशी एकरूप व्हावे, मनात दुसरे विचार काही येऊ नयेत, अशी माझ्या अंत:करणाची उत्कट इच्छा आहे; परंतु काय करावे? मन माझे स्थिर नाही, भिन्न भिन्न विषयांवर जाऊन पडते. इंद्रिये विषयांकडे धावतात, त्याचे आवरण करण्याचे मजमध्ये सामर्थ्य नाही आणि ते मन आणि ती इंद्रिये स्थिर राखण्याविषयी नाना प्रकारच्या युक्ती करतो, पण त्या सगळ्या युक्ती, पण त्या सगळ्या युक्ती खुंटून गेल्या आणि शांति नाहीशी झाली आणि निवृत्तीचा मार्ग दूर राहिला, असे झाले आहे. भाव आणि भक्ती करावी, असा सज्जनांचा उपदेश आहे; पण भाव म्हणजे काय आणि तो ठेवावा कसा, भक्ति म्हणजे काय आणि ती करावी कशी, हे मला काहीच कळत नाही. आणि ज्ञान प्राप्त करून घ्यावे म्हटले तर माझी मतिमंद आहे आणि एखाद्या क्षुद्र माणसापेक्षा मी क्षुद्र माणूस आहे. तेव्हा आता दुसरे काय सांगावयाचे आहे! नेणता मी, तुला शरण आलो, आता तू तारशील तर तार, मारशील तर मार. सगळा भाव काय होता, तो तुला निवेदन केला आहे. तुझ्या पायी आपला जीव मी ठेवला आहे; कळेल तो उपाय कर आता. संकट पडले म्हणजे तुझ्या कांसेचाच आधार म्हणून तुझाच विश्वास धरून मी राहिलो आहे. दुसरा सायास मला काही कळत नाही; आता तुला जे उचित वाटत असेल ते कर.'' ह्यामध्ये दीनता, देव आपले रक्षण करील असा विश्वास, आत्मनिक्षेप म्हणजे सर्व जीवभाव देवाच्या पायी ठेवणे आणि तूच मला तार, तारक मला दुसरा कोणी नाही, अशी देवाची प्रार्थना करणे, ही चार प्रकारची आपली प्रपन्नता अथवा शरणागति तुकोबांनी दर्शविली.

अशा प्रकारची प्रपत्ति झाली म्हणजे त्या प्रपन्नावर देव कृपा करतो. निंबार्काचार्याने म्हटले आहे :- दैन्यादि शरणागतीचे प्रकार ज्या मनुष्याच्या ठायी नांदतात. त्याच्यावर देवाची कृपा होते आणि तिच्या योगे करून महात्मा परमेश्वर ज्याला कोणी दुसरा ईश्वर म्हणजे अधिपति नाही अशाविषयी विलक्षण प्रकारचे प्रेम एतद्रूप भक्ति योजते. ही भक्ती दोन प्रकारची आहे :- एक सर्वोत्तम अशा प्रकारची आणि दुसरी साधनरूप.

तुकोबांनी वर सांगितलेल्या प्रकारात मनुष्य देवास शरणागत झाला म्हणजे त्यावर देवाची कृपा होते; तेव्हा शरणागतावर देवाची अशी कृपा झाल्यानंतर त्याच्या अंत:करणामध्ये प्रेमरूप भक्ति उत्पन्न होऊन तो कोणा तरी ज्ञानी पुरुषाकडे जाऊन देवाच्या स्वरूपाविषयी आणि तत्संबंधी जी अनेक तत्त्वे आहेत. त्यांचे ज्ञान संपादन करावयास लागतो, आणि सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्ये जे असंख्य ग्रंथ याविषयाच्या संबंधाने निर्माण झाले आहेत. त्यांचे अवलोकन करून परिचय करतो, यास **श्रवणभक्ती** असे म्हणावे. मग याविषयी दुसऱ्यांशी संभाषण करतो, जिकडे जावे तिकडे तेच ध्यान आणि त्याविषयी त्याचे बोलणे, ही **कीर्तनभक्ती** झाली. पुढे देवाचे स्वरूप ध्यानात आणून पूज्यत्वबुद्धीने त्याला नमन करतो किंवा वंदन करतो आणि सतत एकचित्ताने त्याचे स्मरण करतो, ह्या दोन **वंदन** आणि **स्मरण** तत्त्वाच्या भक्ति झाल्या. असे जे भक्तीचे

अनेक प्रकार आहेत, त्यांना **साधनभक्ती** असे म्हणतात. कर्मयोग हा साधनभक्तीमध्ये अंतर्भूत होतो अशा प्रकारच्या भक्तीने ज्ञानयोग परिपुष्ट होतो, तेव्हा तो ज्ञानयोग साधनभक्तीचाच प्रकार जाणावा.

या प्रकारच्या साधनभक्तीच्या योगे जो परिणाम होतो, तो भगवद्गीतेतील खालील श्लोकामध्ये दर्शविला आहे. 'जो मनुष्य सर्व परिस्थितीत एकनिष्ठ होऊन पूर्ण तया भक्तीमध्ये संलग्न होतो तो तात्काळ त्रिगुणांच्या (सत्त्व, रज व तम) पलीकडे जातो आणि ब्रह्मास्तरापर्यंत उन्नत होतो.' - १४:२६. म्हणून **भक्तियोग** म्हणजे भगवंत, भक्त आणि त्यांचे परस्परातील प्रेमाचे आदानप्रदान होय. मनुष्याने गुणात्मकदृष्ट्या ब्रह्माशी एकरूप झाले पाहिजे. ब्रह्मप्राप्ती झाल्यावर तो आपले जीवात्मा म्हणून ब्रह्मस्वरूप गमावत नाही.

दुसऱ्या प्रकाराने हाच ब्रह्मभाव दुसरीकडे सांगितला आहे, तो असा:- 'जो मिथ्या अहंकार, मिथ्या बल, गर्व, काम, क्रोध आणि भौतिक गोष्टींचा स्वीकार इत्यादी गोष्टींपासून मुक्त असतो, ममत्वरहित आणि शांत असतो, तो मनुष्य आत्मसाक्षात्काराच्या स्तराप्रत निश्चितच प्रगत होतो.' - १८:५३. याप्रकारे तो जेव्हा तिच्या अहंकारापासून पूर्णपणे मुक्त होतो. तेव्हा सर्व भौतिक गोष्टींपासून अनासक्त होतो आणि हीच ब्रह्म - साक्षात्काराची अवस्था होय. या अवस्थेलाच ब्रह्मभूत स्थिती असे म्हटले जाते. देहात्मबुद्धीतून मुक्त झाल्यावर तो शांत होतो आणि कोणत्याही प्रकारे प्रक्षुब्ध होत नाही. तद्नंतर,

'याप्रमाणे ब्रह्मभूत अवस्था प्राप्त झालेल्या मनुष्याला तात्काळ परब्रह्माचा साक्षात्कार होतो आणि तो पूर्णपणे आनंदी होतो. तो कधीही शोक करित नाही आणि कशाची आकांक्षाही करीत नाही. तो सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी समभाव ठेवतो. अशा अवस्थेमध्ये त्याला माझ्या विशुद्ध भक्तीची प्राप्ती होते.' - १८:५४. म्हणजेच ईश्वराविषयी परमभक्ति भक्ताच्या अंत:करणात उदय होते. वर आचार्यांनी जी उत्तम भक्ति असे म्हटले आहे, तीच ही परमभक्ती.

पुढे :- 'मनुष्य मला माझ्या पुरुषोत्तम भगवान या यथार्थ स्वरूपात केवळ भक्तीद्वारेच जाणू शकतो. अशा भक्तीद्वारे मनुष्य जेव्हा माझ्या भावनेने पूर्णपणे युक्त होतो. तेव्हा तो भावद्धामात प्रवेश करू शकतो.' - १८:५५.

मुंडकोपनिषदामध्येही एक वचन आहे. ते असे - 'देवाची प्राप्ती झाल्यानंतर ऋषि ज्ञानाने तृप्त होतात, त्यांचे आत्मे सुसंस्कृत होतात, राग दोष त्यांचे नष्ट होतात, अत्यंत शांतिसंपन्न होतात आणि बुद्धिशाली आणि पवित्र आत्मे असे जे त्यास सर्वव्यापी देव सर्वत्र प्राप्त होऊन ते सर्वांच्या ठायी प्रविष्ट होतात.

याप्रमाणे शरणागतीच्या योगे देवाची कृपा, तिच्या योगे त्याच्याविषयी प्रेमस्वरूप भक्ति, तिच्या योगे कर्मयोग, ज्ञानयोगपर्यंत साधनभक्ति आणि तिच्या योगे ब्राह्मी शांति आणि सर्व भूतांविषयी समत्वबुद्धी, अंती पराभक्ती आणि त्या परम भक्तीच्या योग मोक्षसुख अथवा शाश्वतसुख अशी प्रणाली आहे

*(प्रपन्न प्रलपित डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर - 'धर्मपर लेख व व्याख्याने' - पृ. ३८२-८५)

# १२) नामयोग आणि मोक्ष (मुक्ती)

**क) नामयोग** म्हणजे ज्या योगात सर्व योगांचा विलय होतो असा महायोग आहे. सर्वच संतांनी नामाचे महत्त्व आणि श्रेष्ठत्व दर्शविले आहे. 'ज्याच्या मनी आर्त, तेथे भगवंत' हा परमेश्वराचा नियमच आहे. परमेश्वर जाणणे इतके सोपे नाही. मात्र नामजप सोपे वाटते. म्हणून जाणण्याचा काथ्याकूट करण्यापेक्षा देव स्मरणाचा धंदा बरा. त्यामुळेच भक्तांस देवही कळतो. म्हणून शेवटी नामभक्तीच सर्वात श्रेष्ठ. देवाला भक्ताची नम्रता, त्याचा हृदय भाव फार आवडतो. म्हणून तो द्रवतो व भक्ताच्या इप्सित कामना पूर्ण करतो. भक्तांवर कृपेची पाखर घालतो. त्याला आपला म्हणतो.

प्रभुनामस्मरण हे खरोखर खूप सोपे आहे. नामस्मरण करण्यासाठी स्थळकाळवेळेचे बंधन नाही. नामस्मरणासाठी कोणताही विधी नाही. त्यासाठी कहीही खर्च नाही. उठता, बसता, कुशीवर पहुडता नामस्मरण करता येतो. त्यासाठी कोणतीही अट लागू नाही.

*"नाम साराचेही सार। शरणागत यमकिंकर।*
*उत्तमा उत्तम । वाचे बोला पुरुषोत्तम॥"* - संत तुकाराम.

अध्यात्मशास्त्रात ईश्वरप्राप्तीचे तीन प्रमुख मार्ग सांगितले आहेत. ते म्हणजे (१) कर्म, (२) ज्ञान आणि (३) भक्ती. त्यापैकी भक्ती हा अत्यंत महत्त्वाचा आणि तुलनेने सुलभ मार्ग आहे. भक्ती मार्गात असणाऱ्या नवविधा भक्तींमध्ये **'नामसंकीर्तन'** या भक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संत तुकाराम नामसंकीर्तनाला **'नामयोग'** असे संबोधतात. परमकल्याण प्राप्त करू देतो तो योग. असे परमकल्याण प्राप्त करून देणाऱ्या सर्व योगांमध्ये नामयोग सर्वश्रेष्ठ होय. तो अथपासून इतिपर्यंत आनंददायी आहे. मोक्ष ही प्रत्येकाची नित्य अपेक्षा असते. मोक्षाचा मार्ग सोपा करण्याचे सामर्थ्यही नामात आहे.

नामसाधनेने इंद्रिये कामवासना विसरतात. नामाच्या चिंतनाने देव भक्तांच्या अधीन होतो. नाम - प्रभावाने पापे जळतात. नामसाधनेमुळे पूर्वजांचा वैकुंठाचा मार्ग सुलभ होतो. नामसाधनेची वाट स्वल्प आहे. निश्चित फल देणारी आणि अधिकार निरपेक्ष आहे. नामाने कामक्रोधाचे दहन होते. अहंकार देशोधडीला लागतो. स्वादामृतापेक्ष, उन्मादामृतापेक्षा तृप्तमृतापेक्षा नामाचे परम अमृत श्रेष्ठ आहे.

हे जग सोडनू जाताना आपल्याबरोबर कोणीही येत नाही. येतात ती फक्त आपली कर्मे आणि नामस्मरण. इहलोकातील कर्मांची फळे परलोकी भोगावी लागतात. म्हणून प्रत्येकाने सदैव चांगल्या कर्माचाच विचार करावा. प्रत्येक प्राणीमात्रात देव पहायचा व सदैव परमेश्वराची आठवण ठेवायची. एवढे केले की, जीवनात दु:ख कधीही वाटेला येत नाही; आणि मन:शांती कधीही ढळत नाही. थोडक्यात,

नामस्मरण हा भक्तीचा एक सहजसुलभ असा मार्ग आहे. नामभक्तीला जर डोळस भक्तीची जोड मिळाली, तर भक्त हा भक्ती अधिक जाणतेपणे करू शकेल.

नाम हे भक्तीचे – परमात्मप्राप्तीचे बीज आहे, तो उघडा मंत्र आहे, ते आत्मतत्त्व आहे. नाम म्हणजे गुरूने शिष्याला सांगितलेला (वा दिलेला) गुजमंत्र आहे वा भक्तीची खूण होय. नाम संतांनी सांगितलेले वर्म आहे, नाम वेद आहे, नाम विधान (ठेवा) आहे. आत्मा म्हणजे हरी हे स्वरूप लक्षात घेता, नाम म्हणजे आत्मा असेही त्याचे वर्णन केले जाते. नाम हे भक्त आणि परमेश्वर यांच्यात ऐक्य घडवून आणणारे सरळ, सोपे, सुलभ, पवित्र, मंगल, गोजिरे, सुमन, बरवे, उचित, निष्कपट आणि अमृताची खाण असणारे माध्यम आहे.

नाम हे अविकारी असून, परब्रह्माचे ज्ञान करून देणारे सशक्त साधन आहे. याने द्वैताचा जसा निरास होतो; तसेच त्यामुळे भगवंत आणि भक्त यात एकत्वही निर्माण होते. निर्गुण ब्रह्मत्मैक्याचे ज्ञान करून देणारे नाम – अविनाशी, शाश्वत, सत्य, सर्वस्व आणि एकतत्त्व आहे. थोडक्यात, ते सर्वांचे सार आहे. चराचरसृष्टीत भरून उरणारे नाम चैतन्यमयी, रोकडे अन् फुकाचेही आहे. त्यासाठी कोणतीही आर्थिक किंमत मोजावी लागत नाही.

संतांनी 'नामा'चे महत्त्व लक्षात घेऊन नामस्मरणाचा मार्ग स्वीकारला व इतरांपुढेही ठेवला. नामस्मरण ही भक्तिसाधना आहे. अखंड भक्ती हा धर्म मानला. भक्तीपेक्षा मुक्ती कधीच श्रेष्ठ मानली नाही. आपली भक्ती अनन्यभक्ती असून, ती अभेद्य असल्याचे संतांनी म्हटले आहे. ''जळो ती मुक्ती मज न लगे।'' अशा शब्दांत मुक्तीचा तिरस्कार करणाऱ्या संतांनी नाम, नामस्मरणभक्तीचाच अवलंब केला होता.

**'आठव तो परब्रह्म'**

ईश्वर हा जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी असा सर्वत्र असतो. तरी पण तो सात्त्विक विचार नि स्वच्छ व्यवहारातून अनुभवता येतो. उत्कट प्रार्थनेच्या – भक्तीच्या क्षणी माणूस स्थलकालातील अशा विदेही अवस्थेत स्थिरावतो. मेल्यानंतरच मोक्ष प्राप्त होतो. असा सर्वत्र समज आहे. ही धारणा खोटी असल्याचे संताचे मत आहे. 'मेल्यावरी मोक्ष मिळती 'ऐसे जे म्हणती। ते अति मूर्ख।।' असा संतांचा सिद्धान्त आहे.

१. **'याचि देही याच डोळा भोगीजे। मुक्तीचा सोहळा।'**

२. **'आपुले मरण पाहिले म्या डोळा। जाहला तो सोहळा अनुपम्य।।'** असे संत तुकाराम निर्धाराने सांगतात. रोकडा परमार्थ म्हणतात तो यालाच. म्हणून 'देवाचा आठव' हे खऱ्या अर्थाने अमृत होय.

एकनाथ महाराज सांगतात,

*'आठव तो परब्रह्म। नाठव तो भवभ्रमा।।'*

'भवभ्रम' नाहीसा होऊन जीवन कृतार्थ होण्यासाठी 'देवाचा आठव' ही गोष्ट अतिव महत्त्वाची आहे. परंतु खरे सद्गुरू भेटल्याशिवाय 'देवाचा आठव' ही जीवनाची गुरूकिल्ली साधकाच्या हातात येत नाही. परंतु खरे सद्गुरू भेटेपँत नाम हा सर्व रोगांवर रामबाण उपाय आहे. म्हणून भक्ती भावाने देवाचे नित्य नामस्मरण करणे जीवाला परम कल्याणकारक असून सुखी जीवनाचा तो मूलमंत्र आहे.

**ख)इस्लामी नामयोगाचे वैशिष्ट्य :** 'जिक्र' हा इस्लामचा नामयोग होय. यालाच नामस्मरण किंवा जप असेही म्हणता येईल. 'जिक्र' म्हणजे आठवण. ईश्वराची आठवण ठेवणे, त्याचे स्मरण करणे म्हणजेच 'जिक्र होय. ईश्वरी कोप व शिक्षेपासून वाचविण्याचे साधन प्रभुनामस्मरणाशिवाय दुसरे कोणतेच नाही. परमेश्वराचे खूप नामस्कमरण करणारे स्त्री – पुरुषच अग्रेसर होतात. नामस्मरण करणारी मंडळी जेव्हा आणि जेथे बसतात तेव्हा आणि तेथे देवदूत त्यांना घेरतात आणि ईश्वरी कृपेची छाया त्यांच्यावर पसरते आणि परमेश्वर स्वत: त्यांचा उल्लेख करू लागतो. पुनरूत्थानाच्या दिवशी सर्वात श्रेष्ठ व उच्च दर्जावर नामस्मरण करणारे लोक राहतील.

परमेश्वराने मानवासाठी 'नमाज' म्हणजेच भक्ती ही अनिवार्य ठरविली आहे. त्याच्या जन्माचा हेतुच मुळी हा आहे. भक्तीसाठी आवश्यक असलेली इतर समस्त कर्मकांडे ही नामस्मरणाच्या प्रस्थापनेसाठी आणि ते दृढ आणि कायम करण्यासाठी प्रचलित करण्यात आली आहेत. जणू सर्व सत्कर्मांचा मूळ हेतु हा नामयोगाचे परिपालन करणे, असा आहे.

सर्वश्रेष्ठ कर्माविषयी विचारणा केल्यानंतर उत्तरादाखल इब्न अब्बास यांनी असे सांगितले की, सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे नामस्मरणच सर्वश्रेष्ठ कर्म आहे; तर सलमान यांनी असे उत्तर दिले की काय तुम्ही कुरआनमध्ये वाचले नाही की, ''परमेश्वराचे नामस्मरण हे सर्वोत्तम आहे.'' – २९:४५. ते सर्वोत्कृष्ट सत्कृत्य आहे. कारण जो परमेश्वराचे नामस्मरण करतो, परमेश्वर त्या भक्ताचे स्मरण ठेवतो. नामस्मरणाचा महिमा शेखुलइस्लाम इब्न तैमिया यांच्या एका वचनातच असे सांगता येईल की नामस्मरण हे श्रद्धावंताचे स्वर्ग आहे. भक्ती (उपासना) व नामस्मरण हे साक्षात् जुळे आहेत.

दोन गोष्टींमुळे मानवाचे मन दूषित बनते – एक बेसावधगिरी आणि दुसरे अपराध. आणि दोनच गोष्टींमुळे ते प्रकाशमान बनते आणि उजळते. ते म्हणजे क्षमायाचना आणि प्रभूनामस्मरण. बेसावध आणि वासनेचे दास बनलेली व्यक्ती ही मनाने सुद्धा आंधळी बनते, आणि दूरदृष्टीपासून पण ती अंध बनते. कारण, ''नव्हे! वस्तुस्थिती ही आहे की, त्यांच्या दुष्कृत्यांचा, त्यांच्या ह्रदयावर गंज चढलेला आहे.'' – ८३:१४. हे उघडच आहे की नामस्मरण हे चित्तास उजळून सोडते, मनावरील मळ दूर सारते, चित्तास निष्कलंक बनविते.

नामस्मरणाने सर्वश्रेष्ठ परमेश्वर (भक्तांवर) प्रसन्न होतो. त्याने कुप्रेरणा नाहीशा होतात. मनातील चिंता, काळजी आणि सर्व दु:ख यांचे निराकरण होते. चित्तामध्ये प्रसन्नता, उल्लास आणि आनंद निर्माण होतो. नामस्मरणाने देह आणि आत्म्यास बळ प्राप्त होते. अंत:करण प्रकाशमान बनते. चेहऱ्यावर तजेलपणा येतो, त्यावर टवटवी निर्माण होते, ईश्वरप्रती प्रेम निर्माण होते. आणि ईश्वर – प्रेम हा इस्लामचा आत्मा आहे. नामस्मरण ईश्वरसान्निध्यास कारणीभूत ठरते. शिवाय, नामस्मरण हे अंत:करण आणि आत्मा य दोहोंचे खाद्य आहे. ईश्वरचाचे नामस्मरण समस्त अपराध आणि अपकर्मे यांना नाहीसे करते. ते ईश्वरी कोपापासून मुक्त होण्याचे साधन आहे. समस्त उपासनांमध्ये नामस्मरण हे सर्वात सोपे व श्रेष्ठ आहे. याला कोणतीही अट लागू नाही.

**ग) इस्लामचा मोक्षदायक नामयोग**

इस्लामचा मोक्षदायी नामयोग हा सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे मांडता येईल –

१) **प्रेरणा – स्त्रोत :** 'कल्मा' अर्थात सं–विधान किंवा ब्रह्मसूत्र अथवा महामंत्र. हा इस्लामचा सुप्रसिद्ध विशुद्ध महामंत्र आहे. हे प्रथम ब्रह्मसूत्र आहे. यास 'अव्वल कल्मए तय्यबा' असे संबोधतात. यात जगत् आणि जगदीश्वरामधील परस्पर संबंध प्रकट होते.

२) **प्रेरणा – सूत्र :**

| | |
|---|---|
| ला इलाहा इल्लल्लाह, | मुहम्मदु रसूलुल्लाह |
| १) पूर्वार्ध : ३७:३५ | २) उत्तरार्ध : ४८:२९ |

**अल्लाह – स्रष्टा, निर्माता : (अ) पूर्वार्ध :** अल्लाह हाच एकमेव परमेश्वर आहे, (अल्लाहशिवा कोणीच उपास्य नाही)

**मुहम्मद – सृष्टीनिर्मिती : (आ) उत्तरार्ध :** (आणि) मुहम्मद हा त्याचा महाप्रेषित आहे.

३) **सूत्र – निरूपण :** **१) स्रष्टा – पारलौकिक निष्ठा :** श्रद्धाभाव व परमभक्ती : आदर्श जीवन
**२) सृष्टी – इहलौकिक आचार :** नैतिक सदाचरण : शुद्ध आचरण

४) **परिणती – फलनिष्पत्ती :** मोक्ष – प्राप्ती, मुक्ती आणि प्रभु–दर्शन

५) **खुलासा (विवेचन) :** श्रद्धा आणि आचरण यांना सोबत चालावे लागते. त्यांच्यामध्ये परस्पर सहसंबंध असावा लागतो. पारलौकिकनिष्ठा हा सद्‌गुण श्रद्धेतून निर्माण होतो. श्रद्धा भावानेच परमभक्ती संपन्न होते. निष्ठा, श्रद्धा आणि भक्ती या त्रयींनी आदर्श जीवन निर्माण होतो. श्रद्धा ही परमेश्वराप्रती असलेल्या दृढ विश्वासामधून निर्माण होते. आणि विश्वास अनुभूतीपासून येतो.

श्रद्धेच्या उड्डाणावर बंधुभाव (भ्रातृत्वभाव) आरूढ असतो. नितांत श्रद्धाभाव विश्वबंधुत्वाच्या मुळाशी असतो. भ्रातृत्वभाव हा इस्लामचा कणा आहे. म्हणून इस्लाम हा विश्वधर्म ठरतो.

इहलौकिक आचरणामधील कर्मे परलोकात प्रतिबिंबित होणारी असतात. ऐहिक नैतिक सदाचरणाने मानवाचे शुद्ध आचरण प्रस्थापित होते. मानवाचे असले शुद्ध आचरणच त्याच्या मोक्षास कारणीभूत ठरून, मोक्षमार्ग सुलभ करून देतो.

इस्लामचा असा हा साधा, सरळ, सोपा उपरोक्त मोक्षदायक नामयोग आहे. तो शेवटी प्रभु – दर्शन घडवून मोक्ष – सुख प्राप्त करून देतो.

आणखी एक विचारणीय मुद्दा असा आहे की धर्माविना आचार आंधळा असतो, तर आचारविना धर्म हा पांगळा असतो. संस्कृतीच्या पायामध्ये धर्म, तर शिखरावर मोक्ष असतो. त्यामुळे प्रत्येकाचे आचरण धर्माप्रमाणेच झाले पाहिजे. धर्म म्हणजे नीती, न्याय, सदाचार व सत्यवचन यांचे आचरण करणे होय. धर्मयुक्त व्यवहार करणाराच पुरुष होय. मानवाने धर्माज्ञांचे पालन करावे, अशी ईश्वराची इच्छा व अपेक्षा असते. त्या अपेक्षांना खरे उतरून मानवाने मोक्ष साध्य करून घ्यावे, अशी प्रभूची इच्छा असते. उपरोक्त ब्रह्मसूत्रामध्ये गाढ श्रद्धा व प्रखर निष्ठा हे मोक्ष प्राप्तीचे प्रचंड ऊर्जा – स्त्रोत आहेत.

# १३) ''आपुले मरण पाहिले म्यां डोळां''*

**''आपुले मरण पाहिले म्यां डोळां''***

*''आपुले मरण पाहिलें म्यां डोळां।*
*तो जाला सोहळा अनुपम्य।।१।।*
*आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवनें।*
*सर्वात्मकपणे भोग झाला।।२।।*
*एकदेशी होतों अहंकारें आथिला।*
*त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा।।३।।*
*फिटले सुतक जन्ममरणाचें।*
*मी माझ्या संकोचें दुरी जालों।।४।।*
*नारायणें दिला वसतीस ठाव।*
*ठेवूनियां भाव ठेलों पायीं।।५।।*
*तुका म्हणे दिले उमटूनि जगीं।*
*घेतलें ते अंगी लावूनियां।।६।।''*

तुकोबांचा हा अभंग सुप्रसिद्ध आहे, आणि यामध्ये मी आपले मरण आपल्या स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले, म्हणजे मला स्वतःला आपल्या मरणाचा प्रत्यक्ष अनुभव आला, असे तुकोबा म्हणत आहेत. ह्या म्हणण्याचा आपल्याला वाटते की, काय हा विलक्षण प्रकार ! नेहमींचा ह्या लोकींचा अनुभव असा आहे की, मरण प्राप्त झाले तर त्याचा अनुभव घेऊन तो अनुभव दुसऱ्यास निवेदन करणारा असा शरीरात कोणी रहात नाही; आणि इकडे तुकोबा तर म्हणताहेत की, मी आपले मरण स्वतः पाहिले, इतकेच नव्हे, तर तो सोहळा अनुपम्य असा झाला, इतका की, तिन्ही भुवने आनंदाने दाटली! एथपँत तुकोबांच्या अर्थाचा आपल्याला सुगावा लागत नाही, सर्वच काही विपरीत वाटते परंतु तिसऱ्या चरणाचे मनन केले म्हणजे मग आपल्याला तुकोबांच्या अर्थाची कल्पना होऊ लागते, किंवा अर्थाचा सुगावा लागू लागतो. पूर्वी मजमध्ये अहंकार ओतप्रोत भरलेला होता. अहंकाराने मला व्यापून टाकलेले होते; आढ्यतेने मला पूर्णपणे घेरलेले होते; माझेपणा मजमध्ये अतिशय होता; मी माझे, ह्या विचारांतच मी मग्न असे, ज्या त्या गोष्टींमध्ये माझे तुझे करीत असे आणि अशाच्या योगे इतर जणांहून अत्यंत भिन्न, स्वार्थनिष्ठ अशी एक व्यक्ती मी बनून गेलो होतो. अशा स्थितीचा मुलभूत जो अहंकार त्या अहंकाराचा आता त्याग केला म्हणून आत्म सुकाळ झाला

असे तुकोबा सांगताहेत, माझी आढ्यता, गर्व, ताठा वाढावयास काही अवकाशच नव्हता व मी आपल्या स्वत:च्याच विचारांत गुरफटून गेलेलो होतो; परंतु आता सुकाळाचा काळ आला आहे. पूर्वीचा संकुचितपणा जाऊन आता विस्तृतभाव मजला प्राप्त झाला आहे; तेथे जन्ममरणच नाही! मी, माझे, हाच भाव मनात असणे हा संकुचितपणा होय; तो आता नाहीसा होऊन त्याच्या जागी उदार भावाचा लाभ झाला आहे; आता मला हे ज्ञान झाले आहे की, आजपर्यंत मी आणि माझे ह्याच्यामध्येच मी गुरफटलेलो होतो. हा माझा अत्यंत संकुचितपणा नाहीसा झाला म्हणजे दुसऱ्यांचा जीव तो माझे जीव, दुसऱ्यांचे सुखदु:ख ते माझे सुखदु:ख असे वाटू लागले, म्हणजे उदार भाव उत्पन्न होतो.

आपल्या शरीराची हालचाल करण्याची शक्ती नष्ट होणे, श्वासोच्छवास न होता शरीरास विश्लेष्टावस्था प्राप्त होणे, हे लौकिक मरण कोणास ठाऊक नाही? पण हे ह्या शरीराचे मरण कोण स्वत: आपल्या डोळ्यांनी पहात असतो? तर तुकोबांच्या दृष्टीने एकदेशीपणा नष्ट होणे, अहंकाराचा ठाव पुसून निघणे, हे मरण होय; ते मी माझे पाहिले. अर्थात हा सोहळा अनुपम्य नव्हे तर काय? कितीही प्रयत्न केले, तरी आपला अहंकार काही सुटत नाही; कोणत्यांना कोणत्या रूपाने आणि केव्हांना केव्हा तरी तो आपल्याला नकळत सुद्धा बाहेर पडून सगळा घात करतो व आपल्या सद्वृत्तींवर पगडा बसवून आपल्या हातून भलतेच काही तरी करावयास लावतो आणि आपणास केवळ स्वार्थपर करून टाकतो. असा जो अहंकार त्याचा संपूर्णपणे त्याग झालेला पाहणे व त्याच्या जागी उदारभाव आल्याचा अनुभव येणे हा अनुपम्य सोहळा नव्हे काय! पूर्वीचा तो सर्वपरी हानिकारक संकुचितपणा जाऊन त्याच्या जागी इतका विशालपणा अथवा विकासभाव येणे ही स्थिती असाधारण होय. अशा प्रकारची उन्नत स्थिती प्राप्त झाल्यावर पुन्हा अहंकारजन्य संकुचितपणा यावयाचा नाही.

तुकोबांना जो अनुभव आला, त्यांस जी स्थिती प्राप्त झाली, तीस वेदांत्यांनी वर्णिलेली आत्मस्थिती असे कोणी तरी म्हणेल, परंतु खुद्द तुकोबांनी वेदांत्यांची आत्मस्थिती आपल्याला नको असे

*"नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितीभाव।*
*मी भक्त तूं देव ऐसे करी।।१।।"*

ह्या अभंगात अगदी स्पष्टपणे म्हटले आहे. परंतु आत्मस्थितीभाव जर नको, तर सर्व प्रकारची अहंता नष्ट होऊन, मी माझेपण निरस्त करून, शुद्ध आत्मस्वरूप होऊन राहणे, ही आत्मस्थिती नव्हे काय? जेथे दर्शन नाही, आघ्राण नाही, श्रवण नाही, स्वत:लाही जाणणे नाही, ती वेदांत्यांची आत्मस्थिती. परंतु वरील अभंगामध्ये तुकोबांनी जी वर्णिली आहे, ती ह्या प्रकारची आत्मस्थिती नव्हे. कारण 'सर्वात्मकपणे' भोग झाला,' 'आनंदें दाटलीं तिन्ही भुवनें' ही स्थिती शुद्ध आत्मस्थितीहून भिन्न आहे. कारण ह्या स्थितीमध्ये भोग झाला, त्रिभुवनांचे ज्ञान राहिले, तेव्हा ही द्वैतपणाची स्थिती असून अद्वैत आत्मस्थिती नव्हे. तुकोबांनी जी आपली स्थिती झाली असे वर्णिले आहे, ती ही, दुसऱ्यांचा जीव तो आपला जीव; दुसऱ्यांचे सुखदु:ख ते आपले सुख व दु:ख सर्व पृथ्वीवरील मनुष्ये आपल्याच कुटूंबातील माणसे – 'वसुधैव कुटुंबकम्' – असा जो उदार भाव तोच तुकोबांना इष्ट आहे. त्यांना 'मी भक्त आणि तूं देव' हा भाव सतत कायम राहणे फार अगत्याचे वाटत आहे. त्या भावावाचनू भक्ती नाही, त्या भावावाचून आत्मपरीक्षण नाही, त्या भावावाचून

आपल्या अहंकाराने केलेल्या घाताची व तो निरस्त असता होणाऱ्या लाभाची कल्पना होणे नाही. सारांश, हा भाव कायम ठेवून जी एकरूपता होणे इष्ट व शक्य आहे, ती तुकोबांना हवी आहे. जेथे मीच केवळ एकटा राहिलो, तेथे भक्त व देव नाते असेल कसे? मी भक्त व तू देव हे नाते आपणास जे ब्रह्मज्ञानी म्हणवितात त्यांचे राहत नाही. वेदांत्यांची आत्मस्थिती आमच्या तुकोबांना नको आहे.

ह्याप्रमाणे सर्वांचा आत्मा तो आपला आत्मा असे झाले, सर्वांचे आत्मे आपल्यासारखे मानून मनुष्य सर्वांशी समदृष्टी झाला म्हणजे त्याला सर्वांच्या आत्म्यांमध्ये राहणारा जो परमात्मा त्याचे जणू काय प्रत्यक्षच होते.. अंत:करणाचा भाव उदार झाला म्हणजे सर्व व्यापक जो परमात्मा त्याचाच साक्षात्कार मनुष्यास होतो, आणि त्याचा समागम सतत होऊन, सर्वत्र त्याला पहात आहे असे होऊन, देवाविषयी परम भक्ती अंत:करणात उत्पन्न होते व त्याच्याशी समरसाने सतत भक्त वागतो हे तुकोबांनी 'नारायणे दिला वसतीस ठाव। ठेवूनियां भाव ठेलो पायीं ।।' ह्या चरणामध्ये दर्शविले आहे. अशा प्रकारचा उदार भाव झाला की, आपले राहण्याचे ठिकाण नारायणच होतो आणि त्याच्या विषयी हृदयामध्ये अत्यंत प्रेमभाव वागून भक्त जो आहे तो आनंदामध्ये नांदतो; त्याला असेच वाटत असते की, मी सतत भगवंताच्या सहवासात आहे. मग तो जणू काय असेच उद्‌गार काढतो की, देवाच्या सेवेवाचून, दयेवाचनू व नित्य सहवासावाचून मला आता कशाची अपेक्षा नाही. मला धन नको, द्रव्य नको, लोकांतील मानमान्यता नको; लोकांचा तो मोठेपणा नको आणि लोकांनी माझी सेवा करणे हे तर मला बिलकुल नको. जे काय हवे ते नारायणाचा सहवास. अशी स्थिती एकदा झाली, सर्वांच्या ठिकाणी ईश्वरी अंश पाहण्याचा क्रम असला, की मग संकोच गेलाच. माझ्या स्वत:च्या योग्यतेचा ताठा गेला की, मग अहंता राहिली कोठे? तितका उदार भाव अंत:करणात जागृत झाला की, मग अहंतेच्या योगे जो आकुंचित भाव मनामध्ये सदैव वास करून असतो. त्यास अवकाशच राहत नाही. मग सर्वांचे हित ते माझे हित, सर्वांच्या हितामध्ये माझे हित आहे असे वाटते. सर्वांच्या सुखापेक्षा माझ्या एकट्याचे सुख निराळे आहे हा भाव राहत नाही. सर्वांचे सुख तेच माझे सुख असे वाटते. सर्वांवर सारखे प्रेम करणे हाच विचार मनामध्ये सतत जागृत असतो. कोणास गांजण्याचा विचार मनाला केव्हाही शिवत नाही. इतरांचे दु:ख ते आपले दु:ख असे वाटते आणि इतरांचे दु:ख टाळण्यासाठी करण्यास आपण एकदम प्रवृत्त होतो. आपण इतरांच्या साह्यासाठी धावून गेल्यावाचनू राहत नाही. अशा प्रकारे जर समदृष्टी झाली, मी तू पणा नष्ट झाला, सर्वांच्या सुखाची व त्याचप्रमाणे सर्वांच्या दु:खाची जर मला काळजी लागली, सर्वांवर सारखे प्रेम करण्याकडेच मन सदा लागले, सर्वांच्या कल्याणाचीच मला सदा चिंता लागून राहिली, तर मग संकुचित भावाला जागाच राहत नाही.

ह्याप्रमाणे अहंकाराचा त्याग होऊन, संकुचितपणा नष्ट झाल्यावर जो देव वसतीस ठाव देतो, तो ह्या प्रकारचा आहे. ह्याच प्रकारचा अर्थ दुसऱ्या एका अभंगात 'रूसावे फुगावे आपुल्या वरी। उरला तो हरि पांडुरंग ।।' ह्या चरणामध्ये तुकोबांनी आणला आहे. आपलेपणा जो आहे, स्वार्थबुद्धी जी आहे, तिच्यावर रूष्ट व्हावे, ती हरिपासून आपणास अलग करते आणि तिचा नाश केला असता मग हरिशी समागम झाला, म्हणजे स्वार्थाचा परित्याग केला. म्हणजे परमार्थाची स्थिती – म्हणजे हरीची प्राप्ती होते.

ह्या अभंगाच्या शेवटच्या चरणात तुकोबा म्हणतात, 'तुका म्हणे दिले उमटुनि जगी। घेतले ते अंगी

लावूनियां।।' जे आम्ही आपल्या अंगी लावून घेतले होते ते म्हणजे सर्वांचा आत्मा तो आपला आत्मा, अशा उदार भावाच्या योगे परमेश्वराचे दर्शन होऊन त्याच्याच ठायी मनुष्य निमग्न होऊन अत्यंत सुखाची, शांतीची आणि समाधानाची स्थिती प्राप्त होते, हे प्रत्ययास आणावे, हे आता आम्ही जगात उमटून दिले आहे, म्हणजे सिद्धीस नेले आहे.

*(प्रपन्नप्रलपित डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर – 'धर्मपर लेख व व्याख्याने' – पृ. २७५-७९)

**'आपुले मरण पाहिले म्यां डोळां' विषयी इस्लामी व सूफ़ीप्रणीत धारणा**

**(क) मृत्यू : इस्लामी धारणा**

पवित्र कुरआन हे इस्लाम धर्माचे मुखपत्र आहे. ते इस्लामी तत्त्वज्ञानाचा आरसा आहे. म्हणून त्याचेच प्रतिबिंब त्यात उमटलेले दिसून येते. जीवन आणि मृत्यूविषयी त्यामध्ये तात्त्विक विचार आढळून येतात. त्या विचारांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे –

जीवनदाता व मृत्यूदाता हा अल्लाहशिवाय कोणीच नाही. यास्तव कुरआनमध्ये उद्घोषणा आहे – ''(पैगंबर!) त्यांना सांगा, अल्लाह तुम्हाला जीवन व मृत्यू देतो.'' – ४५:२६. ''खरोखर आम्हीच जीवन प्रदान करतो आणि आम्हीच मृत्यू घडवून आणतो.'' – १५:२३. ''मृत्यू हा इष्ट व अटळ आहे'' – २९:५७ व ५६:६०. मृत्यू ही ऐहिक जीवन आणि पारलौकिक जीवन या दोन जीवनादरम्यानची मधली अवस्था आहे. मृत्यूमुळे देहाच्या योगाने आत्म्यावर घातलेल्या बंधनापासून आत्मा मुक्त होत असतो.

जीव हा शरीरात विकसित होणारा आणि गर्भाशयात संगोपन होणारा एक सूक्ष्म प्रकाश आहे. हा जीवात्मा शरीरामध्येच विकास पावत असतो. पूर्ण विकसित होऊन जेव्हा तो शरीराबाहेर पडतो तेव्हा तो सजीव अवस्थेत सशरीर अस्तित्वात येतो व येथूनच त्याच्या जीवनाची सुरुवात होते, व मग त्याची जीवनयात्रा सुरू होते. आजीवन त्याला कर्मस्वातंत्र्य असल्यामुळे आपल्या इच्छेप्रमाणे तो कर्म करीत असतो – तो सत्कर्मे तरी करील किंवा दुष्कर्मे. ही इहलोकातील कर्मेच त्याच्यासाठी परलोकाकरिता शेती ठरते. मग त्याला तदनुसार बरे वाईट फळ मिळते. हे फळ उपभोगण्यासाठी पुनरुत्थानाची परमेश्वरी योजना अनिवार्य ठरते.

अशा प्रकारे इस्लाली धारणेसार दृष्टोत्पत्तीस येते की मृत्यू म्हणजे जीवनाचा अंत नव्हे. तो तर परलोक गाठण्यासाठी जीवनाकरिता एक सेतू असतो. त्या आधारे जीवात्मा हा मरणोत्तर जीवनामध्ये प्रवेश करतो व बरे – वाईट परिणाम भोगतो. सदाचरणाने आणि धर्माला अनुसरून वागणाऱ्या व्यक्तींना मृत्यू सुखकारक असतो; तर दुराचारी माणसांचा मृत्यू हा दुःखकारक व यातनादायक असतो. – ८:५० व १६:२८-३२. स्वर्ग हे अखंड सुखाचे शाश्वत स्थान व अवस्था आहे. – ३:१५ व ९:२१-२२. 'तर वाईट कृत्ये करणारे आणि अहंकारी लोक कायम नरकातच राहतील.' – १४:१७ व २०-७४. ''जेव्हा मरणासन्न मनुष्याचा शेवटचा श्वास कंठाशी येतो आणि त्याला खात्री होते की, हीच या जगाला निरोप देण्याची वेळ आहे. मृत्यू होताना होणाऱ्या तीव्र वेदनेमुळे एक पाय दुसऱ्या पायावर घासू लागेल.'' – ७५:२६-२९. ''लोकांच्या मरणापलीकडे एक 'बर्जख' म्हणजेच मध्यवर्ती जग होय, की तेथे त्यांना जेव्हा (पुन्हा जिवंत करून) ठरवून उभे केले जाईल, त्या दिवसांपर्यंत (राहावे लागेल).'' – २३:१००.

मरणोत्तर जीवन हे इस्लामचे सर्वात शेवटचे मुलभूत तत्त्व आहे. पवित्र कुराणाच्या शिकवणीनुसार मृत्यू हा माणसाच्या जीवनाचा अंत नसतो. तो उच्चतर पारलौकिक जीवनासाठी प्रवेशद्वाराची भूमिका वटवितो. प्राय : श्रद्धे ('इमान')चा सिद्धान्त सारांशरूपाने असा मांडला जातो की, त्यानुसार परमेश्वर आणि मरणोत्तर जीवन यावर गाढ श्रद्धा व दृढविश्वास दाखविला जातो. जसे "जे कोणी अल्लाहवर आणि (निवाड्याच्या) अंतिम दिवसावर (प्रामाणिक) श्रद्धा ठेवीत असतील आणि सत्कर्मे करीत असतील, नि:संशय त्यांच्यासाठी त्यांच्या विधात्याकडे उचित मोबदला ठेवलेला आहे आणि त्यांना भय (राहणार) नाही आणि ते दु:खी होणार नाहीत." – २:६२.

परलोक हे थडग्यापलीकडील एखादे गूढ नव्हे; तर परलोकाची सुरुवात याच ऐहिक जीवनात होत असते. चांगल्यास स्वर्गीय सुखम जीवनाचा लाभ होतो – "खरोखर, सदाचरणी लोकांसाठी त्यांच्या विधात्याकडे सुखसमृद्धींची नंदनवने आहेत." – ६८:३४; तर वाईटास नारकी यातनामय जीवन जगावे लागेल." (अपराधी लोकांवर या जगातही) अशा प्रकारे शिक्षा केली जाते. पण यानंतरच्या जगातील शिक्षा तर याहूनही भयंकर मोठी आहे. कदाचित या लोकांना याची जाणीव झाली असती, तर (त्यांचे भले झाले असते)." – ६८:३३. अशा प्रकारे इस्लामचा कर्म – सिद्धान्त हा फार सरळ व सोपा आहे. चांगल्यासाठी बक्षीस व वाईटासाठी शिक्षा असे त्याचे संक्षिप्त सूत्र आहे. या कर्म – सिद्धान्ताची अंमलबजावणी, पुनरूत्थानाशिवाय शक्य नाही, हे उघडच आहे. "जो कोणी सत्कृत्य करील त्याचा मोबदला आम्ही वाया जाऊ देत नसतो." – १८:३०. सारांश, "प्रत्येक जीव हा त्याने जे काही केलेले आहे, त्याच्या बदल्यात गहाण आहे." – ७४:३८.

अल्लाहने माणसाच्या जीवनातील कर्मांचे मूल्यांकन करण्यासाठी मृत्यूची योजना केली आहे. 'ऐहिक जीवन कर्माची फळे भोगण्यास पुरेसे नाही. म्हणून दुसऱ्यांदा पुनरूज्जीवन होणे आवश्यक आहे.' – १०:४. पुनर्जन्म नव्हे, तर पुनर्जीवन आवश्यक आहे, हे चांगले लक्षात ठेवावे. 'सत्कृत्ये करणाऱ्यांना त्यांचा मोबदला मिळणे ही न्यायाची निकड आहे. तिच्या पूर्ततेसाठी परलोक आवश्यक आहे.' – ३:५. "प्रत्येक जीवाला मृत्यूची चव चाखावयाचीच आहे. आम्ही तुम्हा (सर्वांची) चांगल्या आणि वाईट (परिस्थितीद्वारे) परीक्षा घेत असतो, (तुमची) पारख करण्यासाठी आणि (शेवटी), तुम्हा सर्वांना आमच्याकडेच यायचे आहे.' – २१:३५. 'जे ऐहिक जीवनात सत्कर्मे करतात त्यांच्यासाठी चांगले पुण्यफल निश्चित आहे.' – ३५:१०.

मृत्यूच्या अटळ स्वरूपाविषयी पवित्र कुराणमध्ये जागोजागी असे निवेदन आहे – "प्रत्येक सजीवाला मरणाची चव चाखावयचीच आहे." – ३:१८५ व २१:३५. "प्रत्येक प्राणिमात्राला मृत्यूचा आस्वाद घ्यावा लागणार आहे. (प्रत्येक जीव मृत्यूची चव चाखणार आहे.) – २९:५७. "अल्लाहच्या आज्ञेशिवाय कोणताही जीव मरण पावू शकत नाही, पण (अल्लाहकडून) अगदी ठरवलेल्या वेळेवरच (प्रत्येक जीव मरण पावेल." – ३:१४५. "आणि तुम्ही जिथे कुठे असाल (तुमची ठरलेली वेळ आल्यावर), मृत्यू तुम्हाला गाठेल." – ४:७८ "अपराध्यांना सांगा, ज्या मृत्यूपासनू तुम्ही दूर पळत आहात, तो तुमच्यावर अटळरित्या येणार आहे." – ६२:८. "आम्ही तुम्हा सर्वांसाठी मृत्यू अटळ ठरविले आहे. आणि (तसे करण्यापासून)

आम्हला रोखू शकेल असा कोणीही नाही.'' - ५६:६०. ''कुणीही जीवाला तो कोणत्या ठिकाणी मरेल हे माहीत नसते.'' - ३१:३४.

खोटारडे, घमेंडखोर, पथभ्रष्ट, श्रद्धाहीन, नास्तिक अशा अभागी लोकांसाठी मरणोत्तर, नरक हेच वास्तव्याचे ठिकाण असेल, याची सूचना पवित्र कुराण पुढील शब्दात देते - ''अल्लाहविषयी खोट्या गोष्टी रचणारे आणि घमेंडखोर यांना (अल्लाह म्हणेल), आता तुम्ही आमचेकडे ते सर्व सोडून अगदी एकटे आलात, जे आम्ही तुम्हाला (तुमच्या जीवनकाळात) दिले होते, जसे आम्ही तुम्हाला प्रथम (एकटे जन्म दिला) निर्माण केले होते. तुमचे आणि तुमच्या पृथ्वीवरील जीवनाचे सर्व संबंध आता संपुष्टात आलेले आहेत. आणि तुमच्या आधीच्या सर्व सुंदर कल्पनांनी (आता) तुमचा साथ सोडलेला आहे.'' - ६:९३-९४. ''नरकामध्ये प्रत्येक दिशेने त्या (नास्तिका)च्या कडे मृत्यू येईल, (तरीही) तो मरणार नाही. (म्हणजे तो भयानक स्वरूपाच्या गुदमरून टाकणाऱ्या अवस्थेत असेल)'' - १४:१७. ''नि:संशय, जो मनुष्य आहे; तो त्यात मरणारही नाही आणि जिवंतही राहणार नाही. (म्हणजे गुदमरून सोडणाऱ्या अवस्थेत तो कायमस्वरूपी राहील).'' - २०:७४. ''जो अभागी असेल तोच भयानक आगीत प्रवेश करेल, जिथे तो ना मरेल, ना जगेल (म्हणजे तडफडेल).'' - ८७:११-१३. श्रीमद्भागवतमध्ये पण असे म्हटलेले आहे की, ''काम, क्रोध आणि लोभ ही नरकामध्ये जाण्याची तीन द्वारे आहेत. प्रत्येक बुद्धीमान मनुष्याने त्यांचा त्याग केला पाहिजे.'' - श्रीमद्भागवत - १६:२१.

याउलट श्रद्धाहीन - नास्तिक माणसाची मनोभूमिका पवित्र कुराण या शब्दांत मांडते - ''आमच्या या ऐहिक जीवनाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही जीवन नाही.'' - २३:३७. ''आपल्या मनोकामनांनाच आपले उपास्य ठरवणारे पथभ्रष्ट लोक म्हणतात (की), आमच्या इहलोकीच्या जीवनाखेरीज दुसरे कोणतेही जीवन नाही; (येथेच) आम्ही मरतो आणि (येथेच) जगतो, आम्हाला काळाशिवाय अन्य कोणीही मारत नाही. (हा काळाचा खेळ आहे). (नाही!) त्यांना यासंबंधाने काहीच माहीत नाही. ते केवळ तर्क लढवित आहेत.'' - ४५:२३-२४.

मात्र ऐहिक जीवनाच्या वास्तविक स्वरूपाविषयी अल्लाहचा मानवास स्पष्ट उपदेश आहे की, ''(इहलोकात) ज्या गोष्टी तुम्हाला देण्यात येतात. त्या ऐहिक जीवनाच्या क्षणिक मनोरंजनाची व श्रृंगाराची साधने आहेत.'' - २८:६०. ''हे ऐहिक जीवन म्हणजे दुसरे काही नसून केवळ खेळ - करमणूक आहे, आणि खरोखर परलोकीचे घर हेच खरे जीवन आहे.'' - २९:६४. ''(लोकांनो!) या गोष्टीचा कदापि विसर पडू देऊ नका की, या जगातील जीवन अन्य काही नसून केवळ खेळ व तमाशा आहे आणि (क्षणभंगुर) शोभेचा एक देखावा मात्र आहे व आपसात बढाई मिरविण्याचा (खेळ) आहे. आणि संपत्ती व संततीच्या बाबतीत एकमेकांच्या पुढे जाण्याची व्यर्थ स्पर्धा आहे. .... तर इहलौकिक जीवन अन्य काही नव्हे तर केवळ क्षणभंगुर व फसवे सुख (मायाजाल) आहे.'' - ५७:२०. शेवटी निष्कर्ष स्वरूपात अल्लाह वस्तुस्थिती एक विधानस्वरूपात असे मांडतो - म्हणून ''तुम्ही ऐहिक जीवनाच्या फसवणूकीस बळी पडू नका.'' - ३१:३३.

एका विचारवंताने मृत्यू सत्य असल्याची वस्तुस्थिती अत्यंत संक्षिप्तपणे, मृत्यू आणि जीवन यांच्या संवादरूपाने, मार्मिकपणे मांडली आहे. ती मांडणी अशी आहे –

मृत्यूने जीवनास विचारले :– प्रत्येक जण तुझ्याशी प्रेम का करतो आणि माझा तिरस्कार का करतो? जीवनाने उत्तर दिले :– कारण **मी** एक सुंदर **असत्य** आहे आणि **तू** मात्र एक **दु:खद** सत्य ओस.

जीवात्म्याचा जन्मापासून ते मरणोत्तर जीवनापर्यंतचा प्रवास कोष्टरूपाने पुढीलप्रमाणे दर्शविता येईल:–

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| **जन्म (जीवन)** | **मृत्यू** | **मरणोत्तर जीवन** |
| इहलोक | स्व – र्लोक | परलोक |
| जग | मध्य जगत् | स्वर्ग (नरक) लोक |
| ऐहिक जीवन | स्थगन–स्थळ | पारलौकिक जीवन |
| ↓<br>स्वरूप<br>''ऐहिक जीवन खेळ–करमणूक आहे.''<br>– २९:६४. ''ते केवळ क्षणभंगुर व फसवे सुख (माया जाल) आहे.'' – ५७:२० | (प्रतिक्षालय)<br>अंतिम निवाड्याच्या दिवसापर्यंत सर्व आत्मे येथेच विसावतील. | ↓<br>स्वरूप<br>''परलोकीचे घर हेच खरे जीवन आहे.'' – २९:६४. |

**ख) प्रेषित उवाच – 'मोतू कब्ल अन तमू तू' अर्थात् ''मरणाअगोदर मरून जा.'**

श्रीसंत तुकाराम महाराजांच्या 'आपुले मरण पाहिले म्यां डोळां' या अनुभूतीची साक्ष प्रेषित मुहम्मद स. यांनी कित्येक शतके अगोदर आपल्या 'मोतू कब्ल अन तमतू' या वचनाद्वारे नोंदवून ठेवली आहे. उपरोक्त दोन्ही वचनांचा आशय जवळ – जवळ सारखाच आहे; फक्त शब्द – रचना वेगळी आहे, एवढाच काय तो फरक!

*आपल्या मृत्यूचे रोज स्मरण करा, मात्र मृत्यूची कामना कधीच करू नये, असा हितोपदेश देऊन प्रेषित मुहम्मद स. यांनी मृत्यूविषयी विविधांगी प्रकाश टाकला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे :– ज्याने ही गोष्ट जाणून आपल्या मनामध्ये पक्की ठसविली की कोणत्याही परिस्थितीत या जगातील माझा शेवट मृत्यू आहे आणि थडगे हे माझे ठिकाण आहे, मुनकिर नकीर हे प्रश्नकर्ते वेताळ ('मुवक्किल') आहेत, पुनरूत्थान (होणे) सत्य आहे, स्वर्ग किंवा नरकात मला जायचे आहे; तो माणूस जर बुद्धीमान असेल तर तो मृत्यूपेक्षा जास्त इतर कोणत्याच गोष्टीची काळजी, चिंता करणार नाही आणि इतर सर्व गोष्टींहून जास्त परलोकासाठी शिदोरी प्राप्त करण्याची योजना बनविण्यास तत्पर राहील, जसे की महाप्रेषित स. यांचे वचन खरा बुद्धीमान तोच आहे की ज्याने आपल्या वासनेस नियंत्रणामध्ये ठेवले, तिला आपले वश केले आणि मृत्योत्तर परिणाम लक्षात घेऊन कर्म केले, आणि तो (आपल्या) थडग्यास स्वर्गोद्यानांपैकी एक सदाबहार उद्यान स्वरूपात पाहील आणि जो मृत्यूचे विस्मरण करील तो ऐहिक ऐशआरामात लिप्त राहून परलोकाच्या परिणामाविषयी गाफिल राहील आणि (आपल्या) थडग्यास नरकाच्या (घोर यातनात्मक अग्निमय) खड्ड्यांपैकी एक घोर

यातनामय खड्डा म्हणून पाहील. आणि अशा प्रकारे जो मृत्यूचे विस्मरण करील तो भौतिक वैभवामध्ये गुरफटून पारलौकिक परिणामांविषयी बेसावध राहील आणि शेवटी नरक – यातना भोगील. याच कारणास्तव मृत्यूस स्मरण करणे ही फार मोठी श्रेष्ठ गोष्ट आहे. महाप्रेषित स. पुढे म्हणतात की, हे भौतिक – ऐहिक सुख स्वादांमध्ये लिप्त–मग्न लोकांनो! तुम्ही त्याचे अत्यंत स्मरण करा. जे आस्वादास बरबाद करते म्हणजेच मृत्यूचे आणि पुढे सांगतात की, जर तुम्ही जाणत असलेली मृत्युविषयी (ही) वस्तुस्थिती जर पशू जाणत असते तर मोठे ताजे धष्ट – पुष्ट मांस कोणत्याच माणसाच्या खाण्यात मुळीच आले नसते अर्थात् मृत्यूच्या भितीने जनावर सडपातळ राहिले असते.

याशिवाय मृत्यूविषयी त्यांचे विविध विचार खालीलप्रमाणे आहेत :–

जो माणूस दिवसभरात वीस वेळा मृत्यूची आठवण ठेवतो, तो हुतात्म्यांच्या दर्जास पोहोचतो. मृत्यूचे वारंवार स्मरण केल्यामुळे माणूस धर्मात्मा बनतो आणि हे त्याच्या अपराधांचे निराकरण असते. मृत्यू हा लोकांना उपदेश करण्यासाठी पुरेसा आहे. जो मृत्यूचे सतत स्मरण ठेवतो आणि चांगल्या परलोकासाठी व्यवस्था करून ठेवतो तो माणसांमध्ये सर्वांत जास्त ज्ञानी आणि उदार ठरतो.

**तीन प्रकारे मृत्यूचे स्मरण : तीन प्रकारच्या लोकांसाठी**

**१) बेसावध लोकांचे मृत्यूस स्मरण करणे –** भौतिक लाभांच्या कार्यांमध्ये गुंग असलेले लोक मृत्यूची आठवण करून करून त्याच्याविषयी आपली नापसंती आणि नाराजी व्यक्त करतात. त्यांना अशी भिती वाटते की मृत्यूमुळे जगाची लालसा आणि त्याचे आस्वाद हे सर्व हातातून सुटून जातील, ते सर्व नाहीसे होतील. यास्तव मृत्यूविषयी तक्रार मांडून ते म्हणतात की हे मोठे संकट येणार आहे. खेद आहे याविषयी! सर्व सुख – समृद्धी येथेच सोडून जायची पाळी आहे. सुख – वैभवाशी ताटातूट होणार आहे. अशा प्रकारे मृत्चे स्मरण त्यांना ईश्वरापासून आणखी लांब – दूर घेऊन जाते. परंतु जर इतर कारणामुळे जग त्यांना वाईट वाटू लागेल आणि त्यांचे मन जगाची घृणा करू लागेल तर त्यांना लाभ झाल्याशिवा राहणार नाही.


**२) पश्चात्तापदग्ध लोकांचे मृत्यूस स्मरण करणे –** पश्चात्तापदग्ध माणूस यासाठी मृत्यूस स्मरण करतो की त्यास त्याचे फार भय असते आणि पश्चात्ताप करण्यामध्ये तो आटोकाट प्रतन करतो. अशा पद्धतीने मृत्यूची आठवण करण्यामध्ये फार मोठे श्रेयांक – लाभ ('सवाब') असते. पश्चात्ताप व्यक्त करणारा मृत्यू नापसंत नसतो; परंतु लवकर येणारा मृत्यू त्यास नापसंत असतो. या कारणास्तव की लवकर मृत्यू आल्यास परलोकासाठी योग्य त्या शिदोरीविना कदाचित जावे लागेल. जर या कारणासाठी एखादी व्यक्ती मृत्यूस नापसंत करीत असेल तर त्यात वावगे काहीच नाही.

**३) ज्ञानी साधु – महात्मा लोकांचे मृत्यूस स्मरण करणे –** मृत्यूस स्मरण करण्याचा तिसरा प्रकार हा ज्ञानी ('आरिफ') लोकांचा आहे. ज्ञानी माणूस यासाठी मृत्यूचे स्मरण करतो की प्रभू–दर्शनाचा वायदा हा मृत्यूनंतरचा आहे आणि मित्राच्या वायद्याचे विस्मरण कोणीही करत नाही. त्याच्या वायद्याच्या वेळेची नेहमी प्रतीक्षा केली जाते. एवढेच नव्हे तर त्याची इच्छा – आकांक्षा केली जाते. जसे की हजरत (श्री.) हुजेफा यांनी मृत्यूसमयी म्हटले होते की, मित्राचे आगमन झाले आणि निकडीच्या वेळी झाले. त्यावेळी त्यांनी ईश्वर – प्रार्थना ('मुनाजात') केली की, हे परमेश्वर! जर तू हे जाणतोस की मी गरीबीस श्रीमंतीपेक्षा, आजारपणास

आरोग्यापेक्षा आणि मृत्यूस जीवनापेक्षा जादा प्रिय मानीत असेन तर तू मृत्यूस माझ्यासाठी सोपे – सुलभ कर की जेणेकरून तुझ्या दर्शनामुळे मी संतुष्ट होऊन जावे. या दर्जाशिवाय आणखी एक त्याच्यापेक्षा मोठा दर्जा आहे की ज्यामध्ये माणूस ना मृत्यूस कंटाळतो ना तो त्याचा इच्छुक असतो, ना तो मृत्यू लवकर यावा अशी अपेक्षा ठेवतो, ना तो उशीरा यावा; याउलट तो सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या इच्छेसच प्रमाण मानून त्यावर राजी असतो. तो आपले भोग आणि अधिकार – क्षेत्र सोडून देतो आणि आज्ञापालन व प्रसन्नतेच्या श्रेणीस पोहोचतो. ही गोष्ट तेव्हा साध्य होते जेव्हा मृत्यूचे त्यास स्मरण तर होते; मात्र मृत्यूचा विचार प्राय: येत नाही. ते यासाठी की तो इहलोकातच प्रभू – दर्शनामध्ये असतो आणि प्रभु – नामस्मरण त्याच्या अंत:करणावर अधिकार – प्रभुत्व गाजवीत असतो. मरणे – जिणे त्याच्यासाठी दोन्ही एकसमान असतात. म्हणून कोणत्याही परिस्थितीत तो प्रभु – नामस्मरण आणि त्याच्या प्रेमात मग्न असतो.

एकदा मृत्यूविषयी चर्चा चालू असताना प्रेषित मुहम्मद स. यांनी आपल्या सहचरांसमोर एक चौरसाकृतीच्या साहाय्याने मृत्यूचे सुंदर विवेचन प्रस्तुत केले होते. ते असे – त्यांचे एक सहचर अब्दुल्ला इब्न मसऊद यांनी म्हटले आहे की सर्वप्रिय प्रेषित मुहम्मद स. यांनी एक चौरसाकृती काढली. तिच्या मधोमध एक सरळ रेषा ओढली. आणि त्या सरळ रेषेच्या दोन्ही बाजूस लहान – लहान रेषा ओढल्या आणि त्या चौरसाबाहेरपर्यंत ती मधली सरळ रेषा ओढली आणि म्हणाले की, ही चौरसाच्या मधोमध असलेली जी रेषा आहे, जणू तो माणूस (मनुष्य) आहे, आणि तो चौरस त्याचा मृत्यू आहे. हा चारीकडे त्याला वेढून आहे. तो (मनुष्य) त्याच्यापासून पळू शकत नाही, आणि या लहान – लहान रेषा ज्या दोन्हीकडे आहेत, त्या सर्व आपत्ती आणि संकटे आहेत, ती त्या (माणसावर) कोसळणारी आहेत. समजा जर तो एका संकटापासून वाचला, तर तो दुसऱ्या संकटापासून वाचणार नाही; इथपर्यंत की तो मरण पावेल; आणि जी रेषा चौरसाबाहेर आहे ती त्या (माणसाची) इच्छा – आकांक्षा दर्शविते. तो नेहमी अशा कार्याबद्दल विचार करीत असतो की, ईश्वराच्या ज्ञानकक्षेनुसार ते काम त्याच्या मृत्यूनंतर होणार असते. ते पुढे म्हणतात की, मनुष्य हा दिवसेंदिवस वृद्ध होत जातो आणि त्याच्यामध्ये दोन गोष्टी अशा आहेत की त्या नव – तरूण होत जातात. एक आहे धन – संपत्तीची हाव (लालसा) आणि दुसरी जिवंत राहण्याची इच्छा.

महाप्रेषितद्वारा प्रस्तुत ती चौरसाकृती अशी होती –



आकृतीचे स्पष्टीकरण

१) चौरस = मृत्यू; जो मनुष्यास सर्व बाजूंनी वेढून आहे.

२) मधली सरळ रेषा = मनुष्य.

३) मधल्या लहान - लहान रेषा = माणसावर कोसळणारी नानाविध संकटे, दु:खद प्रसंग, व्याधि-व्यथा इ.

४) चौरसाच्या मध्यभागी असलेल्या रेषेचा चौरसाबाहेरील भाग = माणसाच्या अतृप्त आशा - आकांक्षा.

(इमाम गजाली = ''कीमियाए सआदत'' - पृ. ६०८-११)

इहलोकाचे जीवन हे फसवे सुख व मायाजाल असून, परलोकाचे धाम हेच खरे जीवन आहे. याची झलक घ्यायची असल्यास त्यासाठी प्रेषित मुहम्मद स. यांनी एक साधा सरळ उपाय सांगताना असे म्हटले आहे की, मरणाअगोदर मरून जा. ('मोतू कब्ल अन तमूतू' याची अनुभूती थोड्या - फार प्रमाणात किंवा काही अंशी का होईना. पुढील तऱ्हेने घेता येणे शक्य आहे - मनुष्य हा आपल्या जीवनाचे खरे प्रयोजन विसरून आजीवन ऐहिक मोहमय मायायुक्त जीवनाच्या प्रलोभनास बळी पडलेला आहे. ईश्वराचे नामस्मरण व त्याच्या भक्तीस विस्मरून तो भौतिक मायाजालामध्ये सापडलेला - गुरफटलेला आहे. मायिक लोभाने त्याला आंधळे बनून सोडले आहे. नाना आशा - आकांक्षांच्या तो आहारी गेला आहे. ऐहिक भोग - लालसा व धन - तृष्णा म्हणजेच जीवन असे त्यास वाटते. जर त्याने आपल्या ऐहिक जीवनात उपरोक्त मायाजालाचा त्याग करून स्वार्थ, अहंकार, गर्व, अभिमान मान मरातब, संकुचितपणा, काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, ईर्ष्या अशा सारख्या दुर्गुणांच्या मालिकेस मूठ - माती देऊन स्वत:मध्ये सद्गुणांची वाढ करून सद्वर्तनाकडे वाटचाल केल्यास संसारामध्येच गुरफटून मेलेल्या त्या माणसास नव - जीवन प्राप्तीची अनुभूती यावयास फारसा वेळ लागणार नाही. पूर्वीचे भोग्य वाटणारे फसवे ऐहिक जीवनास तिलांजली म्हणजे साक्षात् त्या व्यक्तिचे मरणच होय. त्या व्यक्तीमध्ये बदल होऊन त्याच्या जीवनाचे नूतन सदाचारयुक्त जीवन हेच त्याचे खरे जीवन होऊन बसते. हा होणारा बदल किंवा कायापालट त्या व्यक्तीस 'मरणाअगोदर मरून जा' ची अनुभूती प्राप्त करून देतो.

**ग) मृत्यू : सूफ़ीप्रणीत भाष्य**

**१) ख्वाजा बदां नवाज 'गेसू दराज' प्रणीत 'दुर्रे असरार' ग्रंथोक्त भाष्य-**

नैसर्गिक ऐहिक मृत्यू येण्याअगोदरच मरून जाणे चांगले असते. मात्र प्रश्न असा आहे की मृत्यू अगोदर मरावे तरी कसे? काही लोक म्हणतात की स्त्रीची भोगेच्छा, हाव, वासना, कपट इत्यादी इच्छांचा ज्याने त्याग केला असेल तोच मृत्यूअगोदर मेलेला असतो. काय हे खरे नव्हे की, जो वरील वासनांपासून मुक्त होऊन निर्मळ झालेला असेल तो मरून पण मेलेला नसतो का? याचा खुलासा, नव्हे मर्म, असे आहे की ईश्वराच्या आज्ञापालनाशिवाय कोणीच ज्ञानोपासक व ज्ञानी बनू शकत नाही. वासना - भंजन या भाष्याचा आधार आहे. वासनांचा उपभोग घेणे हेच सर्वसामान्य लोकांसाठी जीवनाचे स्वारस्य असते. त्यांच्यासाठी वासनेचे दमन करून इंद्रिय - निग्रह करणे हे मृत्यू समान असते. त्यांचा इंद्रिय - निग्रह हा त्यांच्या दृष्टीने मृत्यू असतो. यात ते सफल झाले तर ते नैसर्गिक मृत्यू अगोदर मरून गेलेले असतील. निरिच्छ असणे म्हणजे मृत्यूच होय.

**२) शेख नज्मुद्दीन कुब्रा प्रणीत 'रिसाला आदाब तरीक अहल–ए–जज्ब' ग्रंथोक्त भाष्य –**

साधकांच्या श्रेणींवर कुब्रा यांचे भाष्य अवलंबून आहे. त्यांनी साधकांचे तीन प्रकार मानले आहेत – (१) अखयार म्हणजेच धार्मिक (पुण्यवान) लोक, (२) अब्रार अर्थात ऋषि – मुनी आणि (३) शत्तार म्हणजेच शीघ्रगामी साधक. साधकाचा उत्कट भाव आणि साधनेची वा भक्तीची अनन्यता हा या भाष्येचा मूळ आधार आहे.

शेख नज्मुद्दीन कुब्रा म्हणतात की मनुष्यांच्या श्वासांच्या गणतीइतके उपासनेचे वा भक्तीचे नाना – असंख्य मार्ग आहेत. या असंख्य मार्गांना तीन प्रकारांमध्ये विभाजित केले जाऊ शकते. अधिकांश भक्ती – मार्ग या तीन प्रकारांवर अवलंबून आहेत.

**१) अखयार चा भक्ती – मार्ग :–** यांचा नित्यकर्मांवर भर असतो. 'नमाज' (उपासना) 'रोजा' (उपवास व्रत), 'तिलावत' (पवित्र कुराण पाठ), 'जिहाद' (वासना दमन वा धर्म रक्षणासाठी प्राणार्पण) अशा सारख्या बाह्य आचारांवर यांचा भर असतो. या भक्ती मार्गामध्ये सर्वोच्च पदावर पोहोचलेले साधक हल्ली फार कमी प्रमाणात आढळतात.

**२) अब्रार चा भक्ती – मार्ग :–** धार्मिक योद्धा आणि इंद्रिय – निग्रही साधकांचा मार्ग हा चित्त शुद्धी, आत्म्याची विशुद्धता आणि अंत:करणाची निर्मळता असा असतो. हा अब्रारचा भक्तिमार्ग आहे. या मार्गात शिखरावर पोहोचलेले सुरुवातीपासून पुष्कळ असून ते प्रतिष्ठीत पण आहेत. सूफ़ी साधक मन्सूर यांनी दुसरे एक साधक इब्राहीम खवास यांना विचारले की साधनेत तुम्ही कोणत्या प्रगति स्थळावर आहात. त्यांनी उत्तर दिले की मी गेली तीस वर्षे विश्रंभ अवस्थेमध्ये पाय रोवून आहे आणि तेहापासून तपस्या करीत आहे. हे ऐकून मन्सूर म्हणाले की, इतका सुदीर्घ काळपर्यंत आपण अंतर्शासनामध्ये खर्च केल्यानंतर आपणास ब्रह्मलीनता केव्हा प्राप्त होईल? सर्वांग योग केव्हा साध्य होईल?

**३) शत्तारींचा भक्ति – मार्ग :–** हा तिसरा भक्ति – मार्ग ईश्वराकडे विहार करणारे आणि उडणाऱ्यांचा मार्ग आहे. शत्तारी हे भक्ति – मार्गामध्ये सुरुवातीच्या टप्प्यातच ईश्वराकडे उड्डाण करणारे, झेप घेणारे असतात. हे ईश्वर – प्रेमी जन आणि ब्रह्मलीन साधकांपैकी असतात. अग्रेसरत्वाच्या दृष्टीने त्यांच्यापैकी सुरुवातीचे हे शेवटच्यापेक्षा जास्त असतात. स्वेच्छा मरण ही त्यांची पद्धती आहे. यांची ही पद्धत 'मोतू कब्ल अन तमूतू' या आदेशानुसार असते. यांचे 'मरणाअगोदर मरून जा' हे धोरण पुढील दहा घटकांवर अवलंबून असते –

(१) तौबा, (२) जुहद, (३) तवक्कल, (४) कनाअत, (५) गोशानशीनी, (६) जिक्र, (७) तौहीद, (८) सब्र, (९) मुराकबा आणि (१०) रजा.

१) प्रथम आधार 'तौबा' म्हणजेच प्रायश्चित आहे. हे परमेश्वराकडे निश्चयासह प्रवृत्त होणे आहे. आपल्या अपराधांपासून मुक्त होऊन निष्कलंक बनण्याचे नाव आहे 'तौबा' हे आपल्या अस्तित्वापासून पण बाहेर पडण्याचे नाव आहे. 'हे श्रद्धावंतांनो! सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडे मन:पूर्वक पश्चात्ताप व्यक्त करा.'

२) दुसरा आधार आहे 'जुहद' म्हणजे धर्मनिष्ठा. सर्व दुष्कर्मांचा त्याग करून ईश्वराची उपासना करणे हे 'जुहद फ़िदुनिया' आहे. समस्त सांसारिक कामवासना आणि धन – संपत्तीची इच्छा यापासून मुक्त राहणे,

अलिप्त राहणे. 'विनष्ट गोष्टीविषयी खेद व्यक्त करू नका आणि जे काही परमेश्वराने तुम्हास दिले आहे. त्याविषयी आनंदाने आपली ऐट दाखऊ नका.' (मिरवू नका.)

३) 'तवक्कल' अर्थात् विश्रंभ हे तिसरे आधारस्तंभ आहे. परमेश्वरावरच सर्वस्वी अवलंबून राहण्याचे नाव आहे विश्रंभ. याविषयी दृढचित्त राहणे. 'श्रद्धावंतांना पाहिजे की त्यांनी परमेश्वरावरच संपूर्ण भरवसा ठेवावे.'

४) चौथा आधार आहे 'कनाअत' म्हणजेच संतोष वा संयम. हे वासनांचे त्याग करणे आहे. मिताहारी राहणे आहे. 'मानवाची प्रत्येक इच्छा कधी पूर्ण झाली आहे काय?'

५) 'गोशानशीनी' अर्थात् एकांतवास हे पाचवे आधारस्तंभ आहे. हे लोकांपासून अलिप्त राहणे आहे. जसे की मृत्यू. परंतु संरक्षक निष्णात सद्‌गुरूच्या सेवेमध्ये शिष्यास अशा प्रकारे राहिले पाहिजे की शव ज्याप्रमाणे स्नान घालणाऱ्या व्यक्तीच्या हाती असते. एकांतवास ग्रहण केले पाहिजे. आत्म्यासाठी सर्व संकटे ही इंद्रियांमुळेच कोसळतात. अध:पतनास हेच कारणीभूत असतात. वासनेस सहाय्यक हेच असतात. इच्छा आणि काम – वासना पण यांच्यामुळेच निर्माण होतात. भ्रष्टतेची स्वच्छता आणि निरंतर नाम – स्मरणाशिवाय दुसरा इलाज उपाय नाही. 'तो लोकांपासून एकांतवास ग्रहण करतो.'

६) सहावे आधार आहे 'जिक्र' म्हणजेच नाम स्मरण. ईश्वरावाचून इतर सर्वांचे म्हणजेच 'उपाधी' चे विस्मरण हे 'ला इलाहा इल्लल्लाह' म्हणजेच अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही.' या ब्रह्मसूत्रांशाच्या साहाय्याने ईश्वराचे नामस्मरणात आपले अनिवार्य कार्य ठरविणे. हे नाम – स्मरण विधी –निषेधाचे एक संमिश्र अवलेह आहे. निषेधामुळे सर्व प्रकारचे वाईट विचार प्रभावहीन होऊन जातात. हे मानसिक आजाराचे कारणस्वरूप असतात. जसे दुर्गुण, दृष्ट प्रवृत्ती. विधीमुळे (होकारार्थी कर्मामुळे) स्वस्थ मन आणि आरोग्यदायी जीवन ईश्वरीय प्रकाशामुळे प्राप्त होतात आणि आत्म्याचा मृत्यू हा सर्वस्वी दुर्गुणांमुळे घडून येतो. 'उपाधीचा त्याग करणे आणि ईश्वर – नामामध्ये मग्न राहण्याचे नाव नाम – स्मरण आहे.'

७) 'तौहीद' म्हणजेच एकेश्वरवादी निष्ठा हे सातवे आधार आहे. एकेश्वरवाद म्हणजे 'उपाधी' अर्थात ईश्वरावाचून इतर सर्वांचा त्याग करणे आणि प्रत्येक गोष्टीपासून निरपेक्ष असणे होय. यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहशिवा इतर कोणतेच ध्येय वा लक्ष्य, हेतू असू नये आणि त्याला सोडून इतर कोणतीच गोष्ट प्रिय असू नये. जर यासाठी सर्व प्रतिष्ठीत पदे पण मिळत असतील तर त्यांच्याकडे ढुंकूनही पाहू नये, हीच त्याची खरी कमाई आहे. 'सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुम्हास जन्म दिले आणि तुमच्या कर्मांना निर्माण केले.'

८) आठवा आधार 'सब्र' अर्थात् संतोष व संयम आहे. वासनांध बनून तिच्या मिटक्या घेण्यापासून यम – नियम पाळणे, दृढचित्त असणे, परमप्रिय अशा ऐहिक लोभांच्या गोष्टी टाळणे, या बाबींचे परिपालन झाले पाहिजे. चित्तशुद्धी आणि दैदिप्यमान आत्म्याच्या कारण स्वरूप उपरोक्त दोषांपासून मुक्त होणे शक्य आहे. 'हे श्रद्धावंतांनो! संयम पाळा.'

९) 'मुराकबा' म्हणजे मनन – चिंतन हे नववे आधार आहे. हे एखाद्या शूर – वीरासारखे आपल्या ताकदीने व शक्तीने बाहेर येण्याचे नाव आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे अनुग्रह आणि त्याच्या दयेची प्रतिक्षा करणे, 'उपाधी'शी विमुख होणे आणि ईश्वराच्या संपर्काच्या समुद्रामध्ये बुडूनजाणे, आणि अल्लाहच्या

भेटीची अभिलाषा बाळगणे की जेणेकरून त्या भक्तासाठी ईश्वरी कृपा आणि दयेचे दरवाजे उघडले जावेत आणि त्याच्या उज्ज्वल प्रकाशामुळे वासनेचा अंध:कार क्षणार्धात नाहीसा व्हावा. वासनेचा हा अंधार यम – नियम आणि घोर तपस्येमुळे तीस वर्षांमध्ये सुद्धा नाहीसा होत नाही. 'आपले भाग्य पालटण्याचे विचार सोडून देण्याचे नाव मनन – चिंतन आहे.'

१०) शेवटचे दहावे आधार 'रजा' अर्थात् इच्छा वा आज्ञा हे आहे. हे वासनेच्या वांछेपासून बाहेर येणे आणि होकारासह ईश्वरेच्छा वा ईश्वराज्ञेमध्ये दाखल होणे आहे. अनादि आज्ञांचे हस्तांतरण आणि नित्य प्रयत्नांचे कालचक्रामध्ये तो भक्त मृत्यूसारखा असावा. शेवटी या मृत्यूमध्ये तो स्वेच्छा मरणास शरण जातो. सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यास आपल्या कृपेच्या प्रकाशाने जिवंत करतो. जसे की त्याने म्हटले आहे, जो कोणी दुर्गुणांमुळे मरून जाईल आम्ही त्यास दैवी सद्गुणांनी जिवंत करू, आणि त्यास आमच्या सुंदर प्रकाशापासून एक प्रकाश प्रदान करू की जेणेकरून तो लोकांच्या दरम्यान चालेल – फिरेल, त्यांची दशा आणि आपल्या चिंतनाने. एकदा एक ज्येष्ठ माणसाने म्हटले की मी प्रात:काळची नमाज पढून ईश्वर – प्रार्थना ('मुनाजात') केली की, हे अल्लाह तू माझ्याशी संतुष्ट रहा आणि मी तुझ्याशी संतुष्ट राहीन. आवाज आला की, हे खोटारडे मनुष्या! जर तू आमच्याशी संतुष्ट राहिला असतास तर तू माझ्या संतोषाची मागणी का बरे केला असतास! 'सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्याशी संतुष्ट आणि ते सर्वश्रेष्ठ अल्लाहशी संतुष्ट.'

### घ) मृत्यू : सूफ़ी आचार्य शाह सय्यद मुहम्मद जौकी प्रणीत 'सिर्रे दिलबराँ' ग्रंथोक्त विवेचन

**१) हयातोममात : मौत व हयात – जीवन – मरण, मृत्यू व जीवन :–** 'हयात' म्हणजे जीवन होय. प्राय : मानवाच्या भौतिक जीवनास – ऐहिक जीवनास 'हयात' असे म्हणतात. जीवन म्हणजे प्राणांचा शेवटपर्यंत चालणारा खेळ. श्वासोच्छवास व हालचाल हे जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण होय. श्वासासोबत हालचाल पण थांबली म्हणजे मृत्यू झाला असे म्हणतात. मृत्यू म्हणजे सामूहिक स्वरूपाचे वियोग – ताटातूट. गतप्राण होणे हे मृत्यूचे व्यवच्छेदक लक्षण होय. मृत्यू हा इहलोकाशी ताटातूट घडवून आणणारी एक दुर्घटना होय. मृत्यू हा कोणत्याही जीवास टाळता येत नाही. तशी देवाज्ञाच आहे. म्हणून एखाद्याचे निधन झाल्यास परलोकवास किंवा देवाज्ञा झाली म्हणून संबोधण्यात येते. मृत्यू हे एक कटू सत्य आहे. ते अटळ आहे.

**२) मृत्यूचे प्रकार** – मृत्यूचे दोन तऱ्हेने प्रकार मांडण्यात (पाडण्यात) येतात. पहिली तऱ्हा ही इच्छेवर अवलंबून आहे, तर दुसरी तऱ्हा ही वर्ण वा रंगावर निर्भर आहे. म्हणून –

**क) इच्छेवर आधारित मृत्यूचे प्रकार**

**१) मौत–ए–इक्तजाई : ऐच्छिक किंवा स्वेच्छा मृत्यू :–** जो मृत्यू स्वेच्छा जातीने घटित होतो. त्यास ऐच्छिक मृत्यू म्हणतात. जसे की, सादृश्याची 'नूतनता' आणि तिच्या प्रकटनामध्ये घटित होत असते.

**२) मौत – ए – इज्तरारी : आतुर मृत्यू :–** आत्म्याचे शरीरापासून पृथक होणे, ज्यास सर्वसाधारणपणे 'मृत्यू' असे म्हणतात. मृत्यूमुळे शरीरामध्ये बंदिस्त आत्म्याची त्यापासून सुटका होते. तो

आत्मा स्वतंत्र व मुक्त होऊन जातो. शरीर हे आत्म्यासाठी कारागृह असते. मृत्यूमुळे त्याचा बंदिवास संपतो. शरीराची चेतना निघून गेल्यामुळे ते सडून, कुजून नष्टप्राय होते.

**३) मौत – ए – इख्तियारी : स्वाधीन मृत्यू :–** प्राणवायूचे निष्क्रमण. शारीरिक संवेदना व आस्वादापासून परावृत्त व विमुख होणे. पश्चात्ताप 'मोतू कब्ल अन तमूतू' म्हणजे वास्तविक भौतिक मृत्यू अगोदर मरून जाण्याकडे संकेत आहे. या स्वाधीन मृत्यूचे पण काही प्रकार आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत – आणि हे रंगाच्या प्रकारावर आधारभूत आहेत.

**ख) रंगावर आधारित मृत्यूचे प्रकार –**

**१) मौत – ए – अबयज : धवलतम मृत्यू :–** हा पांढराशुभ्र मृत्यू म्हणजेच क्षुधा, तृष्णा आणि निद्रा यावर नियंत्रण प्राप्त करणे असते. ज्याअर्थी यामुळे उज्ज्वलता वाढते म्हणून याला पांढराशुभ्र मृत्यू असे म्हणतात.

**२) मौत – ए – अहमर : लालभडक मृत्यू :–** हा तांबडा मृत्यू म्हणजेच वासनांवर अधिकार प्राप्त करणे; स्वादिष्टता आणि भोगेच्छा यांचे हनन केले जाते, त्यांचा बळी दिला जातो आणि त्यांचे रक्त सांडले जाते आणि रक्ताचा रंग तांबडा असतो, व पुन्हा बलिदान हे सफलतेचे द्योतक असते, म्हणून यास लालभडक मृत्यू असे म्हणतात.

**३) मौत – ए – अखजर : हरित मृत्यू :–** हिरवे मरण. म्हणजे भावी उमंग व उत्साहास निरोप देणे. यामुळे प्रगती आणि समृद्धी, उन्नती सुरू होऊन जाते. म्हणून या मृत्यूस हरित हिरवे कल्पिले गेले आहे. हा हिरवेगार मृत्यू असतो.

**४) मौत – ए – अस्वद : कृष्ण मृत्यू :–** काळे मरण. म्हणजे इहलोक व परलोकापासून पराङ्मुख होणे, विमुख होणे, डोळे बंद केल्यावर सर्वत्र अंधारच दिसून येतो. प्रकाश अभावी अंधाराचे साम्राज्य निर्माण होते. तद्वत इहलोक व परलोक या दोन्ही जगांपासून डोळे बंद केले जात असल्यामुळे त्यास काळे म्हणजेच कृष्ण म्हटले जाते. हा मृत्यू विशुद्धतेशी संबंधित आहे, हा काळ ठिक्कर मृत्यू असतो.

**हयात : जीवन :–** जिणे, जाणीव, अभिव्यक्ती, प्रकटन, ओळख. मृत्यूच्या समानांतर जीवनाचे पण इक़्त ज़ाई (ऐच्छिक); इज़्तरारी (आतुर) आणि इख्तियारी (स्वाधीन) असे प्रकार पडतात.

**१) हयात – ए – इक्तजाई : स्वेच्छा जीवन :–** स्वतःच्या जाती इच्छेनुसार घटित होते. जसे सादृश्याची नूतनता आणि तिचे प्रकटन.

**२) हयात – ए – इज्तरारी : आतुर जीवन :–** हे शाश्वत जीवन आहे. हे स्व–र्लोक व मध्य जगत् ('आलम – ए – बर्जख') आणि देव लोक ('आलम – ए – मलकूत') यामध्ये यथाशक्य आणि यथास्थिती प्रदान केले जाते. यास 'हयात बाद – अल् – मौत' म्हणजेच मरणोत्तर जीवन म्हणतात.

**३) हयात – ए – इख्तियारी : स्वाधीन जीवन :–** पावित्र्य, चित्तशुद्धी आणि अध्यात्मज्योतिर्मयतेसाठी चिरंतन आत्मिक जीवन.

**हयातोममात :** जीवनमृत्यूचे दोन प्रकार आणखी आहेत. यांना 'हिस्सी' अर्थात इंद्रिय संबंधी आणि 'मानवी' म्हणजे आंतरिक असे म्हणतात.

**१) हयात – ए – हिस्सी : इंद्रियसंबंधी जीवन :–** हे ते पशुजीवन आहे जे समस्त पशुंसाठी समाईक असते.

**२) हयात – ए – मानवी : आंतरिक जीवन :–** हे वास्तविक आणि आत्म्यासंबंधी जीवन आहे, जे विशिष्ट अशा मानवांशी निगडीत असते. हे जीवन पुढील प्रमाणे प्राप्त होते –

१) अज्ञान आणि नादानीच्या मृत्यूपासून निघून ज्ञान आणि प्रबोधनाच्या जीवनामध्ये येणे (प्रवेश करणे).

२) वियोगाच्या मृत्यूपासून निघून वास्तवाकडे प्रवृत्त होण्यासाठी हिम्मत – धाडस – साहस पणास लावणे

३) अभाव आणि अप्राप्याच्या मरणापासून निघून, अस्तित्व आणि उत्कोचाच्या जीवनापासून जिवंत होणे आणि आपल्या सत्तेपासून विनष्ट होऊन ईश्वराच्या शाश्वतेपासून बाकी (जिवंत) राहणे, उपरोक्त विवेचनावरून ममात – ए – हिस्सी (इंद्रियसंबंधी मृत्यू) आणि ममात – ए – मानवी (आंतरिक मृत्यू) यांच्यातील पण 'अंतर' (फरक) माहीत केले जाऊ शकते.

# १४) मरणोत्तर जीवन

मृत्यूविषयक अज्ञान हेच मृत्यूला भयानक रूप देते. जी व्यक्ती आपल्या जीवनाचे रहस्य जाणते, आत्मस्वरूप ओळखते तीच आपल्या शरीराच्या मृत्यूसाठी योग्य वेळी निर्भयपणे सिद्ध राहते. आपले शरीर तरंगीत होत असते, क्षणाक्षणाला बदलत असते. हे शरीर प्रत्येक क्षणाला मरत असते, प्रत्येक क्षणाला जिवंत होत असते. म्हणून मृत्यूचे भय बाळगण्याची गरज नाही. माणसाला चार प्रकारचे देह असतात. १. स्थूल, २. सूक्ष्म, ३. कारण आणि ४. महाकारण. माणूस मरण पावल्यानंतर त्याची यात्रा सूक्ष्म शरीरासह चालूच राहते. स्थूल शरीर निष्प्राण झाल्यावर माणूस मरण पावला असे वाटते, परंतु सूक्ष्म शरीरामध्ये त्याची यात्रा चालूच असते. आपल्या डोळ्यांची क्षमता मर्यादित असते. त्यामुळे सूक्ष्म शरीर आपल्याला दिसत नाही. म्हणून आपण तो माणूस मरण पावला असे म्हणतो. जेव्हा भौतिक शरीर निष्प्राण होते. तेव्हा कृत्रिम मृत्यू होतो, कारण त्याचे सूक्ष्म शरीर कार्यरत असतेच. जेव्हा सूक्ष्म शरीर गळून पडते तेव्हा माणसाचा खरा मृत्यू होतो. आपण झोपेत असतो तेव्हा आपले सूक्ष्म शरीर किती तरी वेळा बाहेर जाऊन फेरफटका मारून येते. त्यामुळे एखादी घटना वा एखादे स्थळ बघितल्यावर ते पूर्वी प्रत्यक्षात बघितलेले नसतानाही बघितल्यासारखे वाटते. आपण आयुष्यभर ज्या गोष्टींचा विचार केलेला असतो त्याच गोष्टी मृत्यूच्या क्षणी आपल्याला आढळतात. गुरूकडून याच जन्मात पूर्ण ज्ञान जर मिळाले तर मृत्यूच्या वेळी सत्याचे विचारच मनात येतील.

पृथ्वीवरील जीवन आणि सूक्ष्म शरीरांचे जीवन यांची कालगणना वेगवेगळ्या पद्धतीने होते. त्यामुळे सूक्ष्म शरीराची आयुर्मर्यादा किती हे येथील भाषेत सांगता येत नाही. एवढे मात्र खरे की सूक्ष्म शरीराचे आयुष्य येथील जीवनाच्या कितीतरी पट जास्त असते. याविषयी कुरआनोक्त प्रमाण असे आहेत–''तुझ्या विधात्याकडचा एक दिवस हा तुमच्या गणनेच्या एक हजार वर्षांच्या बरोबरचा असतो.'' २२:४७ ''तोच आकाशापासून पृथ्वीपर्यंत प्रत्येक गोष्टीची व्यवस्था पाहतो. मग शेवटी सर्व गोष्टींचा अहवाल (निवाड्यासाठी) त्याच्याकडेच अशा एक दिवशी पुन्हा परत जाणार, जो दिवस तुमच्या गणतीनुसार एक हजार वर्षे इतका आहे.''–३२:५ ''देवदूत व आत्मा (अशा) एक दिवसात त्याच्याकडे जात असतात ज्याची गणती पन्नास हजार वर्षे इतकी आहे.''–७०.४; परंतु या दिवसाचा अवधी हा ज्याअर्थी पन्नास हजार वर्षांचा काल आहे, त्याअर्थी सुस्पष्टपणे ते मृत्यू आणि पुनरुत्थान या दरम्यान व्यतीत होणारे कालखंड संकेतित करते, म्हणजेच प्रतिकृती जगाच्या ('आलम–ए–मिसाल') कालावधीशी.

मनःचक्षू उघडे ठेवलेल्या सूफीस, मरणोत्तर जीवन हे स्वप्नवत् वाटत नसून ते त्याला वास्तव साकार जग वाटते आणि ऐहिक जीवन त्याच्यासाठी एक स्वप्न असते, कारण की प्रेषित मुहम्मद स. म्हणाले होते, लोक

निद्राधीन आहेत, पण मृत्यूनंतर ते जागे होतील. परलोक हे स्वप्नांचे भांडार नसून ते इहलोका इतकेच वास्तव आहे. हे ऐहिक जीवनाचे प्रक्षेपण आहे. यासंदर्भात पवित्र कुराण उद्घोषित करते, ''त्या दिवशी ही धरती बदलून दुसरी धरती आणण्यात येईल-''१४.४८.

मृत्यू आणि पुनरुत्थान या दोहोमधील अवस्थेस 'बर्जख' (स्व-र्लोक) असे म्हणतात. बांध, अडसर किंवा विभाजक असे याचे शाब्दिक अर्थ आहेत. मृत्यूनंतर पुनरुत्थान होईपर्यंत आत्म्याचे ज्या अवस्थेत वास्तव्य असते तिचे नाव 'बर्जख' होय. मुळात 'बर्जख' चा अर्थ अडकण आहे, म्हणूनच मरणापासून पुनरुत्थानापर्यंत जी स्थिती राहील तिला 'बर्जख' म्हटले आहे; जणू की हे इहलौकिक आयुष्य व पुनरुत्थान यांच्यामध्ये ती वेगळेपणाची एक हद्द आहे. अशाप्रकारे एकूण तीन अवस्थांचा उल्लेख आहे. १. मृत्यू, २. कब्र (थडगे) आणि ३. पुनरुत्थान. अर्थात् यापैकी निःसंशय 'कब्र' हे 'बर्जख' स्वरूप आहे. याचे प्रत्यंतर पवित्र कुराणात अशा प्रकारे येते-''वीर्याच्या एका बिंदूपासून त्यास (माणसास) तो (परमेश्वर) निर्माण करतो व त्यास प्रमाणबद्ध करतो. मग तो त्याच्यासाठी मार्ग सोपा करतो. मग तो त्यास मरण देतो व त्यास कबरीमध्ये (थडग्यात) प्रविष्ट करतो; मग जेव्हा इच्छितो तेव्हा तो त्यास पुन्हा उठवून उभा करतो.''-८०:१९:२२. पुनरूत्थानाच्या दिवशी मृतांना पुनरपी जिवंत करणे हे कबरीतून मृतास जिवंत करून उठविण्यासारखे आहे.

स्वर्ग-नरक या मरणानंतरच्या गोष्टी नाहीत. प्रत्येक जण आपला स्वर्ग व नरक बरोबर घेऊन हिंडत असतो. नरकाची भीती आणि स्वर्गाची लालसा लोकांना सत्कर्माला प्रवृत्त करण्यासाठी दाखवण्यात येते. पुनर्जन्म फक्त सर्वांच्या अंतर्यामी असणाऱ्या चैतन्याचा होतो. पुनर्जन्म हा शरीराचा होत नाही. शरीर पुन्हा जन्माला येते ही धारणा चुकीची आहे; पुनर्जीवन मात्र नक्की आहे. याचा पुरावा पवित्र कुराण असे सादर करते-''तोच पहिल्यांदा (निर्माण) करतो व (तोच पुनरूत्थानात) पुन्हाही करील.'' - ८५:१३. शरीराची पाच तत्त्वे-पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही मृत्यूनंतर पंचत्वात विलीन होतात. रूप, रस, गंध, स्पर्श व शब्द यांचा अनुभव घेणाऱ्या इंद्रियांद्वारे विषयाशी जोडला गेलेला माणूस स्थूल शरीराद्वारे कार्य करीत असतो. जेव्हा तो कल्पना किंवा इच्छा करतो तेव्हा तो आपल्या सूक्ष्म शरीराद्वारे कार्य करीत असतो. जेव्हा तो गंभीरपणे चिंतन व ध्यान करीत असतो तेव्हा तो आपल्या कारण शरीराची अभिव्यक्ती करीत असतो. सूक्ष्म जगत् हे प्रकाश आणि रंग यांच्या सूक्ष्म तरंगांनी बनलेले आहे आणि या स्थूल जगापेक्षा ते शेकडो पटींनी मोठे आहे. जगण्यासाठी माणूस प्राणशक्ती मिळवतो. परंतु सूक्ष्म जगाचे रहिवासी दिव्य ज्योतीने, तेजप्रकाशाने शक्ती मिळवतात. प्रेम, करुणा, सेवा आणि धैर्य अंगी असणारे जे लोक पृथ्वीवर असतात ते मरणोत्तर आपल्या मनाच्या शुद्धतेच्या अनुसार उच्च उपखंडात पोहोचतात. परलोकात सर्व क्रिया विचारांद्वारे होतात. विचार हीच तेथील शक्ती असते. प्रख्यात सूफी आचार्य इमाम गजाली यांनी याबाबतीत आपली भूमिका पुढील शब्दात 'कीमियाए सादत' नावाच्या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथात 'भावी जगाचे ज्ञान' या सदराखाली अशा प्रकारे मांडली आहे-''जेव्हा आत्मा हा शरीरापासून विभक्त होतो, तेव्हा तो आपल्यासोबत कल्पनाशक्ती धारण करतो. इहलौकिक जीवनापासून त्याच्यासोबत इतर काहीच जात नाही. मृत्यूसमयी त्याला शरीर आणि इहलोकापासून ताटातूट होणे हे अवगत असते. इहलोकात मृतक ज्या विचारांविषयी चिंतन करीत असे, ते

विचार त्याच्या कबरीत (थडग्यात) आकार घेतात. सद्‌विचार हे सुंदर आकार धारण करतात आणि इहलोकातील त्याचे कुविचार संकटास आमंत्रण देतात. म्हणून वास्तविक कबर (थडगे) हेच जग आहे. सद्‌विचार हे उपवने, नद्या आणि मधाची रेलचेल असलेले स्वर्ग स्वरूपात व्यक्त होतात. म्हणूनच प्रेषित मुहम्मद स. म्हणाले होते, कबर एक तर स्वर्गीय भूमीवरील सुंदर उद्यान असते नाही तर नरकातील खोल खड्ड्यांपैकी एक खड्डा असते.'' सारांश, कबरीपलीकडे आत्म्यासोबत कल्पनाशक्ती असते, विचार असतो.''

मृताच्या आत्म्यास शांतीलाभ होण्यासाठी कृपायाचना करण्याची जी प्रथा रूढ आहे. तिचे गूज येथे स्पष्ट होते. कृत्रिम मृत्यूनंतर रडत बसण्याऐवजी त्या मृत व्यक्तींसाठी प्रार्थना करावी. त्या व्यक्तीला लवकरात लवकर आपली पुढची यात्रा सुरू करता यावी यासाठी प्रार्थना उपयुक्त ठरेल. प्रार्थनेत मोठी ताकद असते. सूक्ष्म शरीराला पुढच्या यात्रेचे महत्त्व जास्त असते. म्हणून त्याच्यासाठी रडू नये उलट प्रार्थना करावी. सूक्ष्म शरीरात सर्वात जास्त विचार काम करतात. म्हणून नेहमी शुभ-विचार-शुभचिंतन करावे. सूक्ष्म शरीराला दगड आणि छडी यांनी हानी पोहोचवता येत नाही. मात्र शब्दांनी म्हणजेच दुसऱ्या कुणाची 'हाय' घेतल्याने, दुसऱ्याचा शाप घेतल्याने-नुकसान करता येते. म्हणून कोणाचाही मृत्यू झाल्यावर त्याची निंदा करू नये. त्याच्यासाठी प्रार्थना मात्र जरूर करावी. ज्यांनी आत्महत्या (शरीर हत्या) केली आहे. त्यांना सूक्ष्म शरीरावस्थेत त्रास होऊ शकतो. कदाचित् याच कारणास्तव इस्लाममध्ये 'आत्महत्येस' सक्त मनाई आहे. अशा मृत्यूस 'हराम की मौत' म्हणजेच निषिद्ध, त्याज्य मृत्यू असे म्हणतात. मात्र जैन धर्मामध्ये प्रचलित असलेला 'संथारा व्रत' यास अपवाद मानला गेला आहे. कारण संथाराव्रतामध्ये माणूस मृत्यूला सहर्ष, सोल्लास व सानंद कवटाळतो. उलट आत्महत्येमध्ये माणूस हताश होऊन, दुःखी-कष्टी होऊन विमनस्क अवस्थेमध्ये, निराश अवस्थेत बळेच मृत्यूच्या जबड्यात प्रवेश करतो. कोणत्याही सजीवास मृत्यूचा अधिकार नाही. तो सर्वस्वी ईश्वराचा सर्वाधिकार आहे. जीवास आपल्या हाती त्याचा अधिकार घेण्याचा मुळीच हक्क नाही. म्हणून आत्महत्येचा मार्ग मुळीच स्विकारू नये. मधुर शब्द हे मधासारखे गोड असतात. ते आत्म्यासाठी मधुर, पौष्टिक आणि शरीरासाठी आरोग्यदायक असतात. म्हणूनच मृताच्या आत्म्यास शांती लाभ होण्यासाठी कृपायाचना - प्रार्थना केली जाते. कारण कृपायाचनेचे शब्द अत्यंत मधुर असतात.

इस्लाममध्ये मृताच्या आत्म्यास शांतीलाभ व्हावे या सदिच्छेने त्या (ति) च्या समाधी (थडग्या) चे दर्शन घेऊन आपली कृपायाचना प्रस्तुत करण्याची प्रथा रुढ आहे. कारण स्वतः प्रेषित मुहम्मद यांनी असे सुचविले आहे की कधी -कधी स्मशानभूमीस (कबरस्तानास) भेट देत जा. कारण त्यामुळे माणसाच्या मनात मृत्यूची आठवण जागृत होते. माणसाने मृत्यू आठवावे, मात्र मृत्यूची कामना कधीच करु नये, मृत्यूच्या आठवणीमुळे माणूस सदाचाराकडे प्रवृत्त होतो. मृत्यूच्या कामनेची पराकोटी म्हणजे आत्महत्या ! आणि इस्लाममध्ये तर आत्महत्या निषिद्ध आहे. सर्वसामान्य मुस्लिम समुदायासाठी संत महात्म्यांच्या समाधींचे दर्शन घेणे ही नित्याची बाब आहे.

माणसाच्या जन्माअगोदरपासून ते मृत्यूनंतरच्या सर्व अवस्थांचा निर्देश अल्लाहने पवित्र 'कुरआन' मध्ये केला आहे. तो याप्रमाणे–

"तेच तर आहे त्याने तुम्हाला मातीपासून निर्माण केले, मग वीर्यापासून, मग रक्ताच्या गोळ्यापासून, मग तो तुम्हाला अर्भकाच्या रुपांत काढतो, मग तुम्हाला वाढवितो" – ४०:६७ "(लोकांनो !) परमेश्वरानेच (प्रथम) तुम्हास मातींतून निर्मिले व मग वीर्यबिंदूतून व मग (स्त्री पुरुष बनवून) तुम्हास जोडपी जोडपी बनविली." – ३५:११.

"अल्लाहने प्रत्येक सजीव प्राण्यास पाण्यापासून निर्माण केले आहे." – २४:४५

"(लोकांनो !) का आम्ही तुम्हांस तुच्छ पाण्यां (म्हणजे वीर्या) तून पैदा केले नाही?" – ७७:२०

"आणि आत्म्याची (शपथ) व त्याने त्याला कसे घडविले ? मग तिला चांगले व वाईट समजण्याची प्रेरणा दिली. ज्याने त्यास पवित्र केले तोच यशस्वी होईल. तो नाश पावणार, ज्याने त्या आत्म्यास अपवित्र बनविले." – ९१:७-१०.

"मी सडलेल्या चिखलमाच्या खणखणीत मातीपासून मानवाची निर्मिती करणार आहे. आणि जेव्हा मी त्याला पूर्ण आकार देऊन, त्यात माझ्या आत्म्याची फुंकर मारेन, तेव्हा तुम्ही सर्वजण त्याच्यासमोर नतमस्तक व्हा." १५:२८-२९.

"अल्लाह माणसांच्या मृत्यूची वेळ आल्यावर त्यांचे आत्मे (शरीरातून कायमस्वरुपी) काढून घेतो आणि ज्यांची वेळ अजून आली नाही त्यांचे आत्मे झोपेच्या अवस्थेत आपल्याकडे घेत असतो आणि मग त्यांना मृत्यू देण्याचे त्याने ठरविलेले असते त्यांच्या आत्म्यांना स्वतःकडेच ठेवून घेतो आणि इतरांचे आत्मे निर्धारित अवधीपर्यंत परत पाठवितो. खरोखर यामध्ये विचार मनन करणाऱ्यासाठी निश्चितच संकेत आहेत." – ३९:४२.

"लोकांच्या (मरणा) पलिकडे एक आड (बर्जख) (मध्यवर्ती जग-स्व-र्लोक)आहे. मरणोत्तर जीवनाच्या दिवसांपर्यंत" २३:१००. बर्जख म्हणजे इहलोक आणि परलोक यांच्या दरम्यान असलेला आडपडदा (अवगुंठन) होय.

"अल्लाहने तुम्हाला मातीमधून एक (चांगली) निपज म्हणून निर्माण केले आहे. नंतर तो तुम्हाला तिच्यामध्येच परत आणील आणि (पुनरुत्थानात) तुम्हास (त्याच मातीतून पुन्हा) काढून उभे करील" – ७१:१७-१८.

"आणि ज्यावेळी आत्मे (आपापल्या शरीराशी) जोडले जातील – ८१:७ आणि ज्यावेळी (लोकांचे) कर्मपट उघडले जातील आणि जेव्हा आकाश सोलण्यात येईल आणि जेव्हा नराकाग्नी भडकविण्यात येईल आणि जेव्हा स्वर्ग समीप करण्यात येईल तेव्हा प्रत्येक जीवाला, त्याने काय कर्म केले आहे ते कळेल." – ८१:१०-१४.

"(पण सदाचारी माणसाला अल्लाह म्हणेल) हे शांती लाभलेल्या आत्म्या ! तू अशाप्रकारे आपल्या पालनकर्त्याकडे परत ये तू त्याच्याशी संतुष्ट आणि तो तुझ्याशी संतुष्ट. माझ्या (सदाचारी) भक्तांत सामील हो. माझ्या स्वर्गात प्रवेश करुन." – ८९ : २७-३०.

''(अल्लाहचे) भय बाळगणाऱ्यांसाठीच मृत्यूनंतरच्या जीवनात उत्तम स्थान आहे.'' – ७ : १६९.

''अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांचेच शेवटी भले होणार आहे.'' – ७:१२८.

पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांपैकी आकाश हे सर्वात अत्यंत सूक्ष्म आहे. हे सर्वविदितच आहे की आकाशापासून नाद उत्पन्न होतो. नाद, ध्वनी, शब्द, वाणी, भाषा आणि संगीत यामुळे मानवी जीवन समृद्ध आणि रमणीय झाले आहे. बाह्य विश्वामध्ये अनेक रुपांनी प्रकट झालेल्या परमेश्वराशी एकरुपता, संवाद व संपर्क साधण्यासाठी मानवास मिळालेली यंत्रणा म्हणजे ध्वनीची सोय. हाच नाद, हेच स्पंदन संपूर्ण विश्वात भरलेले असल्यामुळे नादातून सर्व विश्वाची उत्पत्ती झाली आहे असे समजले जाते. म्हणून सृष्ट विश्वामध्ये नादच प्राण अथवा जीवनी शक्ती स्वरुपामध्ये निहित असतो. ॐ हा ब्रह्मांडातील सर्वात पहिला ध्वनी समजला जातो. नाद हा अनंत विश्वास गर्भामध्ये धारण करुन प्रसुप्त सर्पाकारामध्ये असतो. याला 'नादब्रह्म' किंवा 'शब्दब्रह्म' पण म्हणतात.

पंचमहाभूतांच्या तन्मात्रा या त्यांचे विषय असतात. पृथ्वी आणि आप यांच्या क्रमशः तन्मात्रा गंध आणि रस स्थानगत असल्यामुळे सीमित असतात. पृथ्वीवरील तप्त जमिनीवर पावसाच्या सर्वप्रथम येणाऱ्या सरीमुळे मातीचा (सु) गंध आसमंतात दरवळतो. या गंधास आपल्या खांद्यावर घेऊन वायू तेजा (उष्णते) च्या माध्यमाने आकाशात सर्वत्र संचार करतो. म्हणजेच वारा घोंघावणारा ध्वनी काढत अवकाशात वाहतो. घ्राणशक्ती ही गंध ग्रहण करते; तर श्रोतृशक्तीचा संबंध भौतिकतेशी आहे, तर श्रोतृशक्तीचा संबंध परमार्थकतेशी आहे. प्रथमचा संबंध इहलौकिकाशी आहे. तर द्वितीयचा संबंध पारलौकीकाशी आहे. एकाचा संबंध शरीराशी आहे; तर दुसऱ्याचा संबंध आत्म्याशी आहे आणि आत्मा व शरीर यांचा अतिशय गूढ असा परस्पर संबंध आहे.

शरीर ही (जीव) आत्म्याची जननी आहे. (जीव) आत्मा हा शरीरात विकसित होणारा आणि गर्भाशयात संगोपन होणारा एक सूक्ष्म प्रकाश आहे. (जीव) आत्मा हा शरीरामध्येच विकास पावत असतो आणि तो स्वयंभू नसून निर्मित आहे; परंतु परमात्मा हा स्वयंभू असून अनिर्मित आहे. ज्याप्रमाणे शुक्रबीजामध्ये आत्मा प्रविष्ट केला जातो त्याप्रमाणे सर्व प्रामाणिक आचार विचारांमध्ये आत्मा प्रविष्ट झालेला असतो. आचारविचारांच्या विकसित शरीरासोबत त्यामध्ये प्रविष्ट झालेला आत्माही विकसित होऊ लागतो आणि जेव्हा ते शरीर पूर्णपणे विकसित होते तेव्हा त्यातील आत्मा आपल्या संपूर्ण तेजानिशी प्रकाशमान होतो व आपले आत्मिक स्वरुप व्यक्त करतो. या अवस्थेमध्ये ते सर्व आचार विचार पूर्णपणे चैतन्यमय होतात. सर्व आचार विचारांच्या दृष्टीने योग्य अशी अवस्था परिपूर्णपणे विकसित झाल्यानंतर त्यामध्ये आत्मा प्रकाशमान होत असतो आणि त्याचे कर्तेपण ईश्वराने स्वतःकडेच घेतलेले आहे; कारण ऐहिक जीवन समाप्त झाल्यानंतरच ती अवस्था परिपूर्ण होत असते.

पंचमहाभूतांमध्ये परस्पर अनुबंध असल्यामुळे त्यांच्यामध्ये परस्पर समन्वय असतो. त्यामुळेच भौतिकता आध्यात्मिकतेशी जोडली जाते. आत्म्याचे स्वरुपगत आंतरज्ञानच सूक्ष्म वाक् आहे. ते प्रथम शब्द या रुपामध्ये प्रकट होते. ततः मनोभाव धारण करुन कायागत तेज अथवा कायाग्नीद्वारे पक्व होऊन प्राणवायूमध्ये प्रविष्ट होते, नंतर क्रमशः स्थूल शब्दाचे उच्चारण होते. मृताच्या आत्म्यास शांतीलाभ होण्यासाठी त्या (ति) च्या

समाधी (थगडा) जवळ एखादी व्यक्ती मनोभावे परमेश्वराकडे कृपायाचना करते तेव्हा कृपायाचनेचे स्थूल शब्द सूक्ष्म वाक्‌मध्ये परिणत होऊन स्व-र्लोकात मृताच्या आत्म्यासाठी संरक्षक कवच बनतात आणि त्याचे पापक्षय करण्यास मदत करतात. परिणामी तो जीवात्मा स्वर्गाच्या समीपस्थ जात असतो. पवित्र कुराणात नमूद आहे. ''सद्‌वचन देवाकडेच पोहोचते आणि सत्कर्म त्याला वर पोचविते.'' - ३५:१०. कृपायाचना तर सद्‌वचनांचेच समूह असतात. ती निश्चितच वायूच्या प्रचंड वेगाने परमेश्वरापर्यंत पोहोचतात.

माणसास आपले शरीर पुष्ट करण्यासाठी ज्याप्रमाणे पौष्टिक अन्नोदकाची जरुरी असते. त्याचप्रमाणे मृताच्या आत्म्यास परिपुष्ट करण्यासाठी सद्‌वचनांच्या खाद्याची जरुरी असते. जिवंत राहण्यासाठी प्राणवायूची नितांत गरज असते, तद्वत मृताच्या आत्म्यास सुगंधाच्या शक्तीवर्धकाची टॉनिकची फार गरज असते. या दोन्ही गरजा मृताच्या थगड्याजवळ उभे राहून कृपायाचनेचे मधुर गोड शब्द आणि त्यावर वाहिलेली सुगंधी फुले यामुळे पूर्ण होतात. मृतात्म्यास कृपायाचनेची अत्यंत गरज असते. ती त्याच्यासाठी लाभदायक असते. म्हणून तर मृताच्या आत्म्यास शांतीलाभ होण्यासाठी समाधी दर्शनाची प्रथा इस्लाममध्ये रुढ आहे.

मात्र काही पुराणांत आणि निबंधग्रंथात असे प्रतिपादन केले आहे की एखादा मनुष्य मरण पावल्यानंतर त्याचा जीव **अतिवाहिक** संज्ञा असणारा देह धारण करतो. हा देह तेज, वायू आणि आकाश या तीन मूल तत्त्वांचा बनलेला असतो आणि उरलेली आप आणि पृथ्वी ते दोन मूल तत्त्वे या लोकी राहतात. ''मृताचा आत्मा अतिवाहिक देहाने सुगंधाचा उपभोग घेण्यास पात्र असतो.''

(भारतरत्न महामहोपाध्याय डॉ. काणे - धर्मशास्त्राचा इतिहास (सारांशरुप ग्रंथ - उत्तरार्ध) अनुवादक : यशवंत आबाजी भट - पृ. ६०)

मरणोत्तर जीवनाविषयी प्रख्यात सूफी विद्वान व सर्वश्रेष्ठ वार्ताकार (मुहद्दिस) अबुल फजल अब्दुर्रहमान इब्न कमाल अबू बकर जलालुद्दीन सयूती यांनी ''शरहु स्सुदूर'' म्हणजेच मृतकाच्या मरणोत्तर आत्म्याचे विवेचन, नावाचा अत्यंत सुंदर ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्यांनी मृतकाच्या थडग्या (समाधी) मधील अवस्थेचे सविस्तर व सप्रमाण विवेचन आणि भाष्य प्रस्तुत केले आहे. त्यापैकी काही वेचक अंश पुढे नमूद करण्यात येत आहे.

धन-संपत्ती नष्ट झाल्यावर किंवा एखाद्या यातनामय असाध्य दुर्धर आजारास कंटाळून किंवा भयानक संकटापासून वाचण्यासाठी कोणीही मृत्यूची आशा बाळगू नये किंवा त्यासाठी ईश्वरास साकडे घालू नये. यासंबंधी प्रेषित उवाच आहे की तुमच्यापैकी कोणीही मृत्यूची कामना करु नये आणि त्याच्या योग्य वेळेवर येण्याआधी त्याला बोलवू नका. कारण की जेव्हा कोणी मृत्यू पावतो त्याची कर्मे पण नष्ट होऊन जातात आणि श्रद्धावंतासाठी त्याच्या दीर्घ आयुष्यामध्येच भले असते. प्रेषित पुढे म्हणतात की मृत्यूची आशा बाळगू नका कारण तो इसम जर स्वर्गात प्रवेश करणाऱ्या लोकांपैकी असेल तर त्याच्यासाठी जगणे हे श्रेयस्कर असते आणि जर तो नरकवास्यांपैकी असेल तर त्याने घाई का बरे करावी !

प्रसन्नतेची सर्वात प्रथम गोष्ट जी श्रद्धावंतास प्राप्त होणारी असते ती म्हणते मृत्यू होय. कारण की तो मृत्यूमध्ये अल्लाहची दया व कृपा पाहतो. त्याला त्याचे श्रेयांक (सवाब) दिसून येतात.

पवित्र कुराणाच्या एका श्लोकामध्ये नमूद आहे की, ''तुमच्यापैकी कर्म करण्याच्या दृष्टीने कोण चांगला आहे हे अजमाविण्यासाठी याची सत्त्व परीक्षा घेण्यासाठी त्या परमेश्वराने मृत्यू आणि जीवन निर्माण केले आहे.'' प्रेषित जामात हजरत अली म्हणत की इहलोक ही कर्मभूमी आहे, मृत्यूनंतर तुम्हास आणि आम्हास याचे वास्तव कळून येईल. प्रेषित वचन आहे की इहलोकातील चांगली धर्मपरायणता म्हणजे मृत्यूची आठवण ठेवणे होय. मृत्यूच्या आठवणीमुळे जो भयभीत होतो त्याचे थडगे हे स्वर्गाचे रमणीय उद्यान बनून जाईल. ते एके ठिकाणी म्हणतात की समाधी दर्शन करीत जा कारण की यामुळे मृत्यूची आठवण ताजी होते. त्यामुळे इहलोकी धर्मपरायण प्रवृत्ती आणि परलोकाची आठवण निर्माण होते. त्याने अंतःकरण मऊ बनते आणि डोळ्यांत अश्रू तरळतात. मृत्यू अटळ असल्यामुळे त्याला कधीच बरे न होणारे रोग असे म्हटले गेले आहे. धर्मपरायणाचा मृत्यू विनाश नसलेले असे जीवन असते. काही लोक जरी मेलेले असले तरी वास्तविक ते जिवंतच असतात. दिवंगत व्यक्तीसोबत तीन गोष्टी असतात १) नातलग, २) धन आणि ३) कर्म. पैकी प्रथम दोन परत फिरतात आणि उरलेले तिसरे कर्म बाकी राहते.

माणसाचा मृत्यू, मरणोत्तर जीवनाची गरज आणि त्याचे प्रमाण व पुरावे, परलोकामधील त्याची स्थिती इत्यादीविषयी पवित्र कुराणात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

''प्रत्येक प्राणिमात्राला मृत्यूचा आस्वाद घ्यावा लागणार आहे आणि परतून त्याला अल्लाहकडेच जायचे आहे'' २९:५७. ''प्रत्येक सजीवाला मृत्यूची चव चारवावयाची आहे. चांगल्या किंवा वाईट अवस्थेत त्याची परीक्षा घेतली जात असते.'' २१:३५ .''सरतेशेवटी प्रत्येकाला मृत्यू आहेच आणि तुम्ही सर्वजण आपापले पुरेपूर मोबदले प्रलयाच्या दिवशी प्राप्त करणार आहात.'' – ३:१८५. ''तुम्ही जेथे कोठे असाल तेथे मृत्यू तुम्हाला गाठणारच. मग तुम्ही कितीही मजबूत व भक्कम इमारतीत असा.'' – ४:७८. ''मृत्यूसमयी प्राणहरण करणारे देवदूत आपल्या कर्तव्याची अंमलबजावणी करण्यात कसलीही कसूर करत नाहीत.'' – ६ : ६१. ''तुमच्यासाठी नियुक्त केला गेलेला देवदूतच तुमचे प्राणहरण करील.'' – ३२:११ ''प्राण जेव्हा कंठात येऊन घरघरतो तेव्हा मरणारा माणूस तुलनेत अल्लाहच्या अधिक जवळ असतो.'' – ५६:८३–८५. ''जेव्हा प्राण कंठात येईल तेव्हा कसल्याही मंत्रतंत्राचा उपयोग होणार नाही.'' – ७५:२६:३०. ''मृत्यू पावल्यापासून प्रलयाच्या काळापर्यंत अश्रद्धावंतांना सकाळ संध्याकाळ नरकाग्नी समोर हजर केले जाईल.'' – ११:१०३–१०८. ''मार्गभ्रष्ट झालेले लोक प्रलयाच्या दिवशी आंधळे, मुके व बहिरे होऊन उठतील.'' – १७:९७–९९. ''प्रलय अकस्मात येऊन ठेपेल आणि लोकांना कळणारही नाही.'' – ४३:६६–६७. ''प्रलयाच्या दिवशी कर्मनोंद प्रत्येकाच्या पुढ्यात ठेवले जाईल, ज्यात लहानमोठ्या सर्व गोष्टींची नोंद असेल.'' – १८:४९. ''(प्रलयाच्या दिवशी) कबरीत दफन केलेल्यांना बाहेर काढले जाईल आणि उरात जे काही लपलेले आहे तेही काढले जाऊन तपासणी केली जाईल'' – १००:९–१०. ''जीवन आणि मृत्यू अल्लाहच्याच अखत्यारीत आहेत.'' – १५:२३.

''ऐहिक जीवन कर्माची फळे भोगण्यास पुरेसे नाही. म्हणून दुसऱ्यांदा पुनरुज्जीवन होणे आवश्यक आहे.'' – १०:४. ''कर्माबद्दल पकड करण्यासाठी परलोक आवश्यक आहे आणि कर्मानुसार पक्कड करणे ही न्यायाची निकड आहे'' – ७:४–९. ''माणसाची निर्मिती अल्लाहने शून्यातून केली आहे. तोच दुसऱ्यांदाही

त्याला निर्माण करु शकतो.'' – १९:६६–६७. ''तो जीविताला मृतातून काढतो व मृताला जीवितातून काढतो.'' – ३०:१९. ''विभिन्न लोकसमूहांवर प्रकोप कोसळणे ही प्रलयाची निशाणी आहे.'' – ७७:१–७. माणसाच्या रचनेत त्याच्या मरणोत्तर जीवनाचे पुरावे आहेत.'' – ८६:५–८.

थडग्या (समाधी, कबरी), मधील यातना ही सत्य गोष्ट आहे. कारण थडग्यामध्ये सुद्धा हिशोब आहे आणि परलोकामध्ये सुद्धा हिशोब आहे, आणि ज्यांचा हिशोब थडग्यामध्ये पूर्ण झालेला नसेल त्यास पुनरुत्थानाच्या दिवशी शिक्षा होईल. तर श्रद्धावंताचा हिशोब थडग्यामध्येच पूर्ण झालेला असतो, त्यामुळे न्यायदिवस त्याच्यासाठी अत्यंत सोपा होऊन जातो.

जेव्हा तुम्ही ओळखीच्या लोकांच्या थडग्याजवळून जाल तेव्हा ''अस्सलाम अलेकुम या अहलुलकुबूर'' असे संबोधन करा, तर अनोळखी लोकांच्या थडग्याजवळून जाताना ''अस्सलाम अलैकुल मुस्लमीन'' असे संबोधन करीत जा.

१) 'हे समाधिस्थ जनहो! तुमच्या आत्म्यांना शांति लाभ होवो.'

२) 'हे मुसलमानांनो! तुमच्या आत्म्यांना शांति–लाभ होवो.'

विद्वानांचे असे मत आहे की थडग्याची यातना ही खरोखर 'बर्जख' म्हणजेच मध्यवर्ती जग अर्थात स्व–र्लोकाचीच यातना असते; परंतु थडग्याकडे निर्देश यासाठी केला गेला आहे की सर्वसाधारणपणे लोकांना थडग्यामध्येच दफन केले जाते. नाही तर एखाद्या इसमास आगीमध्ये भस्मसात होण्याचा प्रसंग घडलेला असेल, किंवा त्याला जलसमाधी मिळाली असेल किंवा कृमी–कीटकांनी त्याला खाल्लेले असेल किंवा हिंस्त्र पशूंनी भक्षण केले असेल किंवा त्याचे मृत अवशेष हवेत उडविले गेले असतील, या सर्वांवर मध्यवर्ती जगाची शिक्षा ठरलेली असते. प्रेषितमार्ग अनुसरण करणाऱ्या लोकांचे याबाबतीत एकमत आहे की बक्षिसी आणि दंड हे आत्मा आणि शरीर या दोहोंसाठी आहे. प्राणोत्क्रमण झालेल्या मृतकाचा आत्मा त्याचा देह सोडून बाहेर निघतो तेव्हा त्याला (इतर) आत्मे भेटतात आणि विचारपूस करतात. सर्वश्रेष्ठ परमेश्वराची उपासना भक्ती केली असेल त्याच्यासाठी थडगे हे सर्वोत्तम ठिकाण आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह म्हणतो की जो अल्लाह आणि त्याचे प्रेषित यांचे अनुसरण करील तो अल्लाहचे कृपाप्राप्त लोक म्हणजेच. प्रेषित, सत्यनिष्ठ, हुतात्मा आणि सदाचारी लोकांसोबत असेल आणि हे लोक अत्यंत चांगले असे सोबती, आहेत. त्यांची ही सोबत इहलोकामध्ये पण आहे, मध्यवर्ती जगा (बर्जख) मध्ये पण आहे आणि परलोकमध्ये सुद्धा आहे. या तीन्ही अवस्थांमध्ये मनुष्य त्यांच्यासोबत असेल ज्यांच्याशी त्याचे प्रेम असेल. अल्लाहचे आणखी एक कथन आहे की जे लोक ईश्वराच्या मार्गात प्राणार्पण करतील (कत्तल केले जातील), त्यांना तुम्ही कदापी मृत समजू नका प्रत्युत ते जिवंत आहेत. येथे असा प्रश्न उपस्थित होतो की हे कसे बरे शक्य आहे की ते (एकाच वेळेस) मृत पण आहेत व जिवंत पण आहेत? तर याचे उत्तर असे आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह हा त्यांच्या शरीराच्या एखाद्या भागामध्ये आत्मा घातलेला असेल की ज्यामुळे यातना आणि आस्वाद या दोहोंची अनुभूती होऊन जाईल. हे तंतोतंत तशाच प्रकारचे आहे की जसे शरीराच्या एखाद्या भागामध्ये जर उष्णता किंवा थंडीचा प्रभाव असेल तर संपूर्ण शरीरावर त्याचा प्रभाव घडतो. काहींचे असे मत आहे की त्यांचे जिवंत असण्यासंबंधी असा अभिप्राय आहे की त्यांच्या शरीराचे सांधे उघडणार नाहीत ना त्यांच्या शरीराचे विघटन होईल ना ते सडून

जाईल, जणू काही ते आपल्या थडग्यामध्ये जिवंत असल्यासारखे आहेत. जिवंत आणि मृत लोकांचे आत्मे झोपेच्या अवस्थेमध्ये परस्पर भेटीगाठी करतात. इब्न कय्यम यांचे असे मत आहे की मृतकाच्या भेटीसंबंधी एक प्रमाण हे आहे की जिवंत माणूस मृतास झोपेत स्वप्नामध्ये पाहतो आणि ती मृत व्यक्ती त्या जिवंत माणसास अदृश्य गोष्टीविषयी माहिती देते आणि ती त्याने सांगितल्याप्रमाणेच असते. जी गोष्ट मृतक सांगतो ती सत्य असते. कारण की तो सत्याच्या घरामध्ये असतो.

प्रख्यात सूफी विद्वान अबुल कासिम अल्-कुशेरी यांनी 'रिसाला कुशेरी' या आपल्या ग्रंथामध्ये एक प्रसंग उधृत केला आहे. तो प्रसंग असा - मृतकांचे कफनी चोरणारा एक चोर होता. एक स्त्रीचे निधन झाले. तो तिच्या प्रेतयात्रेत सामील झाला आणि त्याने तिचे थडगे पाहून घेतले. रात्र झाली तो त्या वृद्धा स्त्रीचे थडगे खोदू लागला. इतक्यात ती मृत वृद्धा बोलू लागली - हे परमपवित्र परमेश्वरा ! एक क्षमाप्राप्त व्यक्ती इसम, क्षमाप्राप्त स्त्रीचे कफन (प्रेमवस्त्र) चोरतो आहे, कारण की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने मला पण क्षमा केली आहे आणि माझ्या प्रेतयात्रेत सामील झालेल्या सर्व लोकांना पण क्षमा केली आहे आणि (हे चोरा) तू पण त्यांच्यामध्ये सामील होतास. हे ऐकताच त्याने तात्काळ थडग्यावर माती पसरुन त्यास झाकून टाकले आणि मनःपूर्वक तो पश्चात्तापदग्ध झाला. इतःपर चोरी न करण्याची शपथ घेतली. अशाप्रकारे मृतकाचा अमर आत्मा हा जिवंत माणसामध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडवू शकतो, आपल्या अकस्मात संबोधनाने !

आणखी एक प्रसंग अली इब्न अबी तालिब यांच्या संदर्भात नमूद करण्यासारखा आहे. तो असा - एकदा हजरत अली हे आपल्या काही सोबत्यासह मदीना येथील कबरस्तान (स्मशानभूमी) मध्ये गेले असता त्यांनी ''अस्सलाम अलेकुम या अहलुल कुबूर व रहमतुल्लाह'' असे सर्व मृतकांना संबोधित केले. तेव्हा एक थगड्यामधून आवाज निघाला ''व अलेकुम उस्सलाम व रहमतुल्लाहि व बरकातह'' तर दुसऱ्या एका थडग्यामधून आवाज निघाला कफन (प्रेतवस्त्र) फाटले गेलेत, केस विखुरले गेलेत, त्वचेचे तुकडे तुकडे झालेत, डोळ्यांनी चेहऱ्यावर अश्रू वाहिलेत आणि नाकपुड्या पू बनून गेल्या आहेत, जसे केले तसे भरले आणि जे काही आम्ही मागे सोडून आलो आहोत त्यामध्ये तोटा झाला आणि आम्ही कर्माच्या बदल्यात गहाण आहोत.

वरील (उपरोक्त) दोन प्रसंगावरुन असा निष्कर्ष काढण्यास मुळीस हरकत नाही की मृतकाचे आत्मे हे बोलू शकतात, संवाद साधू शकतात.

### आत्म्या ('रुह') संबंधी मथिथार्थ

यापैकी अधिकांश इब्न कय्यमकृत ''किताबुर्रुह'' या ग्रंथातून घेतलेले आहेत.

पवित्र कुराणात आत्म्यासंबंधी असे निवेदन आहे की, ''लोक तुला आत्म्याविषयी विचारीत आहेत. सांग-आत्मा माझ्या प्रभूच्या आज्ञेने आहे आणि तुम्हाला याबाबतीत अत्यल्प ज्ञान देण्यात आले आहे.'' १७:८५. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या समस्येस 'कुरआन', 'तौरात' आणि 'इंजील' मध्ये गुप्त ठेवले आहे.

प्रख्यात सूफी आचार्य अबुल कासिम कुशेरी म्हणतात की सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ते यांनी या समस्येविषयी मौन धारण केले आहे आणि त्यांनी असे मत व्यक्त केले की प्रारब्ध भाग्याप्रमाणेच हे एक गुह्य आहे. इब्न बताल

म्हणतात की लोकांना याच्या ज्ञानापासून लांब ठेवण्याचा हा फायदा आहे की त्यांनी आपल्या विवशतेस जाणून घ्यावे. कर्तबी यांचे असे म्हणणे आहे की याच्यामध्ये अशी चेतावणी आहे की हे मानवा ! जेव्हा तू आपल्या स्वतःच्या वास्तवास ओळखण्यास असमर्थ आहेस तर अशा परिस्थितीत तू आपल्या विधात्याच्या वास्तवास कसे बरे ओळखू शकशील ? हे तंतोतंत असेच आहे की मानवाची दृष्टी खुद स्वतःस पाहू शकत नाही.

एक संप्रदायाने याच्या वास्तवाविषयी चर्चा केली आहे. इमाम नववी म्हणतात की, यामध्ये सर्वात योग्यतम मत इमामुल्हमैंन यांचे आहे की हे एक सूक्ष्म शरीर आहे. हिरव्या लाकडामध्ये ज्याप्रमाणे पाणी सामावलेले असते त्याचप्रमाणे हे स्थूल देहामध्ये प्रविष्ट असते.

अधिकांश मुसलमानांची अशी धारणा आहे की आत्मा (रुह) पण एक देह आहे. मात्र सूक्ष्म देह. ग्रंथ, प्रेषित मार्ग आणि मतैक्याने पण हे सिद्ध आहे. कारण की याच्यासाठी देहांचे गुण प्रमाण स्वरुप आहेत. जसे, कब्जा करणे, सोडणे, घेणे, काढून टाकणे, निघणे, आराम प्राप्त करणे, दुःख झेलणे, जाणे, परत येणे, राजी होणे, नाराज होणे, स्थानांतर करणे, खाणे-पिणे, सहल करणे, प्रवास करणे, लटकणे, बोलणे, ओळखणे, न ओळखणे इत्यादी. हे सर्व ते गुण आहेत जे एखाद्या जमिनीस निर्भर असू शकत नाहीत. पुन्हा ही गोष्ट पण शंकेपासून दूर आहे की आत्मा (रुह) आपल्या निर्मात्यास ओळखतो आणि उचित गोष्टींना ओळखतो. या सर्व भौतिक गोष्टी (ज्ञान) आहेत. आणि जर आत्म्यास पण जमीन संबोधले तर भूमिसह भूमि स्थिर मानावे लागेल आणि हे असंभव आहे. आचार्य अबुल कासिम कुशेरी म्हणतात की आत्म्याच्या स्वरुपाचे सूक्ष्म देहांशी असणे हे तंतोतंत देवदूत आणि शैतानां (दैवते) सारखे आहे.

खरी गोष्ट ही आहे की आत्मा (रुह) आणि प्राण (नफ्स) एकच वस्तू आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सांगितले आहे की ''हे शांत समाधानी आत्म्या ! तू आपल्या प्रभूकडे परत चल'' - ८९-२७-२८. दुसऱ्या ठिकाणी असे सांगितले आहे की, ''प्राणास (नक्स) लालसेपासून थांबविले.'' म्हणजेच मेला आणि प्राणोत्क्रमण झाले.

काहींचे असे मत आहे की जो आत्मा उत्क्रमित केला जातो तो प्राणाहून भिन्न आहे. याचे अनुमोदन इब्न अब्बास यांचा हवाला देऊन इब्न अबी हातिम यांनी प्रस्तुत केलेले भाष्य करते. परमेश्वराचे वचन आहे की ''अल्लाहने जीवन आणि मृत्यू निर्माण केले आहे.'' - ६७:१-२ यावरुन असे निदर्शनास येते की मानवांमध्ये आत्मा (रुह) आणि प्राण (नफ्स) आहे आणि यांचा संबंध असा आहे जसे की सूर्य आणि त्याची किरणे. शेवटी झोपेत अल्लाह प्राणास आपल्या ताब्यात घेतो आणि आत्म्यास सोडून देतो. तो मानवातच राहतो. आता जरी अल्लाहची इच्छा त्यास ताब्यात घेण्याची असेल तर तेव्हा तो आत्म्यास आपल्या ताब्यात घेतो आणि मनुष्य मरुन जातो, त्याचे निधन होते आणि जर अद्याप त्याचे आयुष्य बाकी असेल तर तो प्राणास त्याच्या जागी परत करतो.

मकातिल यांचे असे मत आहे की मानवासाठी जीवन, प्राण आणि आत्मा या तीन्ही गोष्टी आवश्यक असतात. जेव्हा मनुष्य झोपतो तेव्हा त्याचा प्राण निघून जातो की ज्याच्या साहाय्याने तो वस्तूंना ओळखतो आणि तो संपूर्णपणे निघत नाही; परंतु अशा प्रकारे की दोऱ्यास ओढून घ्यावे, त्याप्रमाणे. तेव्हा तो प्राण स्वप्न

पाहतो आणि जीवन आत्म्यासह देहासोबतच राहते की ज्यामुळे मनुष्य श्वास घेत असतो. जेव्हा देहास हलविले जाते तेव्हा निमिषमात्रात तो परततो. जेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वर त्यास मृत्यू देण्याचा संकल्प करतो तेव्हा त्या प्राणास थांबवून धरतो. ते पुढे म्हणतात की, हा प्राण स्वप्न पाहून परत फिरतो आणि आत्म्यास अवगत करतो आणि आत्मा अंतकरणास, चित्तास याची कल्पना देतो अशा प्रकारे मनुष्य जाणून घेतो की त्याने काय पाहिले आहे आणि काय नाही.

अबू शेख यांनी ''किताबुल अज्मा'' मध्ये आणि इब्न अब्दुल बर यांनी ''तमहीद'' मध्ये वहब बिन मन्बा यांच्या हवाल्याने कथन केले आहे की माणसाचा प्राण पण चतुष्पाद प्राण्यांप्रमाणे निर्माण केला गेला आहे की त्यास इच्छा आकांक्षा असतात. तो मानवास वाईट गोष्टीकडे प्रवृत्त करतो आणि त्याचे विश्राम स्थळ उदर (पोट) आहे. मानवाचा गौरव, त्याची श्रेष्ठता ही त्याच्या आत्म्यामुळे आहे. त्याचे निवासस्थान मेंदू आहे. मनुष्य त्यामुळे जिवंत राहतो आणि हाच (विवेकबुद्धीच्या बळावर) मानवास सत्कृत्याकडे प्रवृत्त करतो, त्याकडे निमंत्रित करतो. नंतर वहब यांनी आपल्या हातावर नाकातून फुंकरीने हवा बाहेर काढून सांगितले की पहा ही थंड (शीत) आहे, कारण की ती आत्म्यापासून निघालेली आहे आणि मग हवा बाहेर सोडली आणि ते म्हणाले की, (ही पहा) ही उष्ण (गरम) आहे, कारण की हे प्राणापासून निघाली आहे. याचे दृष्टांत पति-पत्नी सारखे आहे की जेव्हा आत्मा पळून प्राणाजवळ येतो तेव्हा मनुष्य आराम अनुभवतो आणि निद्राधीन होऊन जातो आणि जेव्हा तो जागृत असतो तेव्हा आत्मा आपल्या जागी येतो. याचा खुलासा असा आहे की, जेव्हा झोपेतून तुम्ही उठता तेव्हा तुम्हाला अशी अनुभूती होते (येते) की तुमच्या डोक्यात काही तरी हालचाल होत आहे. अंतःकरण मनाचे दृष्टांत शासकासारखे असून शरीराचे इतर सर्व अवयव हे त्याच्या सेवकासारखे असतात. जेव्हा प्राण (मन) वाईटाकडे प्रवृत्त होते - वाईट करण्याचा आदेश देतो तेव्हा त्याप्रमाणे शरीराचे अवयव हालचाल करु लागतात; परंतु आत्मा त्याचा प्रतिरोध करतो आणि चांगुलपणाचे निमंत्रण देतो. जर मन हे श्रद्धाळू असेल तर ते आत्म्याचे अनुसरण करते, आणि तर जे श्रद्धाहिन असेल तर ते प्राणाचे अनुसरण करते, वासनेचे अनुसरण करते आणि आत्म्यास ते विरोध करते.

इब्न साद यांनी आपल्या ''तबकात'' या ग्रंथामध्ये वहब बिन मन्बा यांच्या हवाल्याने असे कथन केले आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने इब्न आदम यांस माती आणि पाण्यापासून निर्माण केले. मग यामध्ये प्राण उत्पन्न केले. त्यामुळे तो उभे राहतो, बसतो, ऐकतो, पाहतो आणि जाणतो आणि त्या गोष्टींपासून चतुष्पाद प्राणी स्वतःस वाचवितात त्यांपासून तोही स्वतःस वाचवितो. नंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने आत्मा उत्पन्न केले. त्यामुळे तो सत्य आणि असत्यास ओळखतो. मार्गदर्शन आणि मार्गभ्रष्टता यामधील फरक तो जाणतो. यामुळेच तो घाबरला आणि अग्रेसर झाला आणि त्याने कर्माच्या शेवटास जाणून घेतले.

इब्न अब्दुल बर यांनी ''तमहीद'' या ग्रंथामध्ये म्हटले आहे की अबू इसहाक मुहम्मद बिन कासिम बिन शोबान यांनी उल्लेख केला आहे की अब्दुर्रहमान यांनी सांगितले आहे प्राण हा मानवाच्या देहाप्रमाणे एक देह आणि प्रवाहमान आत्मा हा पाण्यासारखा आहे आणि याचे प्रमाण कुराणोक्त हा श्लोक आहे की, ''अल्लाह जीवांना - प्राणास मृत्यू देतो.'' पुन्हा हे की अल्लाह निद्राधीन व्यक्तीच्या प्राणास मृत्यू देतो आणि त्याचा आत्मा चढत व उतरत राहत असतो आणि प्राण जागोजागी भटकत असतो. जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या प्राणास

देहामध्ये परतण्याचा आदेश देतो तेव्हा देह जागरुक होतो. त्यांच्यामते प्राण आणि आत्मा हे दोन वेगवेगळे वस्तू आहेत आत्मा हा बागेत प्रवाहित होणाऱ्या पाण्यासारखा असतो आणि जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या बागेस नष्ट करु इच्छितो तेव्हा तो पाण्यास थांबवून धरतो. अशीच मानवी आत्मा व त्याच्या देहाची अवस्था असते.

इब्न इसहाक म्हणतात की, अबीदुल्ला बिन अबी जाफर यांनी म्हटले आहे की मयता (मृता) स जेव्हा शववाहिकेमधून घेऊन जातात तेव्हा त्याचा आत्मा हा एका देवदूताच्या हातामध्ये असतो. तो त्याच्यासोबत चालतो. नंतर जेव्हा त्याच्या दफनविधीसाठी संपन्न होणाऱ्या 'नमाज' उपासनेसाठी त्याचे शव ठेवतात, तेव्हा तो देवदूत थांबतो. नंतर त्याला दफन करण्यासाठी उचलून घेऊन लोक चालू लागतात तेव्हा पण सोबत चालू लागतो आणि जेव्हा त्याला थडग्यामध्ये ठेवले जाते तेव्हा अल्लाह मृताच्या आत्म्यास परत करतो की जेणेकरुन देवदूतांनी त्याला प्रश्न विचारुन त्याच्याकडून उत्तरे घ्यावीत. जेव्हा प्रश्न विचारणारे देवदूत मृताच्या अवतीभोवती फिरु लागतात तेव्हा एका देवदूतास आदेश दिला जातो की त्याने प्राण हरण करावे आणि अल्लाहच्या आदेशानुसार त्याने तेथे पोहोचवावे. हा देवदूत यमदूताच्या मदतनीसांपैकी एक असतो. शेख अजद्दीन इब्न सलाम म्हणतात की प्रत्येक माणसामध्ये दोन आत्मे असतात. एक जागृती उत्पन्न करणारा आत्मा म्हणजेच 'रुह-ए-यकजा' असतो. हा तो आत्मा असतो की जो देहामध्ये असताना सवयीनुसार मनुष्य जागा असतो आणि जेव्हा तो आपल्या सवयीनुसार झोपून जातो तेव्हा हा माणूस स्वप्न पाहतो. दुसरा 'रुह-ए-हयात' आहे. देहामध्ये असताना हा सवयीनुसार जिवंत असतो आणि जेव्हा त्याला काढून घेण्यात येते तेव्हा सवयीनुसार तो मरुन जातो आणि जेव्हा तो आत्मा परत येतो तेव्हा देह जिवंत बनतो. हे दोन्ही आत्मे मानवाच्या अंतःस्थळामध्ये असतात. त्यांचे योग्य ठिकाण अल्लाहसच ठाऊक असते.

काही वक्त्यांचे असे मत आहे की आत्मा मानवाच्या अंतःकरणाजवळ असतो. इब्न अब्दुस्सलाम म्हणतात की हे अत्यंत संभवनीय आहे की आत्मा हा अंतःकरणामध्ये असावा. पुन्हा हे की सर्व आत्मे सूक्ष्म असले पाहिजेत, हेही शक्य आहे आणि ही गोष्ट श्रद्धावंतांच्या आत्म्यांच्या बाबतीत विशेष करुन असली पाहिजे, हे संभवनीय आहे. 'रुह-ए-हयात' आणि 'रुह-ए-यकजा' यांच्या आस्तित्वाविषयी सदरहू कुराणोक्त श्लोक प्रमाण प्रस्तुत करतो की, ''अल्लाह प्राणां (जीवां) ना मृत्यू प्रदान करतो.'' म्हणून ज्यांच्यासाठी त्याने मृत्यूचा निर्णय केला (घेतला) असेल त्यांना तो (ईश्वर) थांबून धरतो, आणि हा आत्मा 'रुह-ए-हयात' आहे आणि ज्यांच्या भाग्यामध्ये जिवंत राहणे असेल त्यांना तो (ईश्वर) सोडून देतो आणि हा आत्मा 'रुह-ए-यकजा' आहे. 'रुह-ए-हयात' हा आत्मा मरत नाही, प्रत्युत हा आकाशाकडे वर झेप घेतो. जर तो आत्मा श्रद्धाहीनाचा नास्तिकाचा असेल तर आकाशाचा दरवाजा उघडला जात नाही, त्याला पृथ्वीतलावर परत पाठविण्यात येते. मात्र श्रद्धावानाच्या आत्म्यासाठी आकाशाचीदारे उघडी ठेवली जातात. की जेणेकरुन तो दोन्ही विश्वांच्या प्रभूसमोर हजर होऊ शकेल. शेख अजद्दीन यांच्या मताप्रमाणेच प्रख्यात सूफी तत्त्वज्ञ व आचार्य इमाम गजाली पण आत्म्यासाठी अंतःकरणासच प्रतीक्षास्थान किंवा थांबा मानतात. या संदर्भात एक हदीस प्रोषित वचन पण प्राप्त आहे. दुसऱ्या एक वार्ता (हदीस) अन्वये असे ज्ञात होते की प्राणाचे वास्तव्य (स्थळ) हृदय-मन आहे आणि हा लोकांमध्ये रक्त प्रवाहित करतो. जेव्हा अंतःकरण मरुन जाते तेव्हा नाड्या कापल्या जातात.

याबाबतीत मतभेद आहे की आत्मा प्रथम उत्पन्न झाला की देह. काही म्हणतात की आत्मा हा अगोदर उत्पन्न झाला. यासाठी ते पुढील प्रेषित वचनाचे प्रमाण प्रस्तुत करतात –

प्रेषित [स.] म्हणाले की सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसांच्या आत्म्यांना माणसांच्या दोन हजार वर्षे अगोदर निर्माण केले. तर ज्यांची एक दुसऱ्यास ओळखले ते आपसात मिसळून गेले आणि ज्यांनी ओळखले नाही ते वेगळे झाले. पुन्हा हे की आदिमानव आदमच्या वंशास त्याच्या पाठीतून वाढवितो. अल्लाहने जेव्हा आदमला जन्म दिला तेव्हा त्याने त्याच्या पाठीवर हात फिरविले. म्हणून प्रलय दिवसापर्यंत निर्माण होणारा त्याचा वंश पाठीतूनच निघेल. हे त्याचा देह निर्माण झाल्यानंतर घडले. या विधानाचे भाष्य करताना म्हटले गेले आहे की अल्लाहने त्या सर्वांच्या आत्म्यांना काढले. त्याचे स्वरुप निर्धारित करुन त्यास वाक् शक्ती प्रदान केली. त्यांनी आपसात संवाद साधला आणि ते सर्व अल्लाहशी वचनबद्ध झाले. काही लोक म्हणतात की देह अगोदर निर्माण झाले. जसे की पवित्र कुराणामध्ये नमूद आहे – ''निःसंशय मनुष्य जातीवर (इतक्या मोठ्या प्रशस्त) काळात एक अशी वेळही येऊन चुकली आहे की, तो वर्णनीय अशी काही वस्तुच नव्हता.'' – ७६:१

जेव्हा तुझ्या विधात्याने देवदूतांना म्हटले (की), 'मी लवकरच मातीपासून मनुष्य निर्माण करणार आहे आणि जेव्हा मी त्यास (पूर्णपणे) घडवलेला असेन व त्यात माझा आत्मा फुंकलेला असेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा.' – ३८:७१:७२.

असे म्हणतात की मानवाचा पुतळा हा त्यात आत्मा फुंकण्याच्या अगोदर चाळीस वर्षे अगोदरपर्यंत थांबून राहिला. इब्न मसऊदचे कथन आहे की तुमचा जन्म अशा प्रकारचा आहे की तुम्ही चाळीस दिवसापर्यंत आईच्या पोटात राहिलात. ''वीर्याच्या एका बिंदूपासून रक्ताची एक गुठळी निर्माण केली'' – ४०:६७. ''निःसंशय, आम्ही माणसाला मातीच्या सत्वापासून निर्माण केले; मग एका सुरक्षित स्थानी (गर्भाशयात) त्यास वीर्याच्या एका बिंदूच्या रुपात ठेवले, मग आम्ही वीर्यास गोठलेल्या रक्ताचे रुप दिले, नंतर आम्ही त्या रक्तास मांसाचा (निराकार) गोळ्याचे रुप दिले; मग आम्ही त्या मांसाच्या (निराकार) गोळ्यातून हाडे तयार केली, नंतर आम्ही त्या हाडांवर मांस (चढवले), मग आम्ही त्यास वेगवेगळ्या रुपात घडवले.'' – २३:१२-१४. नंतर देवदूताने येऊन आत्मा फुंकला. आत्म्याचे फुंकणे (नफख-ए-रुह) आणि आत्म्याची निर्मिती (खल्क-ए-रुह) या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. यांच्यामध्येक भेद हा आहे की आत्मा (रुह) बऱ्याच काळापासून निर्मित आहे.

मुसलमानांच्या धारणेनुसार देह नष्ट झाल्यानंतर सुद्धा आत्मा बाकी राहतो. याबाबतीत तत्त्ववेत्त्यांमध्ये मतभेद आहे. आमचे प्रमाण सर्वश्रेष्ठ अल्लाहचे ते विधान आहे की, ''प्रत्येक जीवन मृत्युची चव चाखणार आहे.'' – २९:५७ आणि हे उघड आहे की चाखणारा हा चाखली जाणाऱ्या वस्तूंच्या नंतर पण बाकी राहतो. काही म्हणतात की प्रलयाच्या दिवशी तो नष्ट होईल आणि पुन्हा परत करण्यात येईल. कारण की परमेश्वराचे वचन आहे की ''जे काही पृथ्वीतलावर आहे ते सर्व नष्ट होणार आहे.'' तर काही म्हणतात की, ''ईश्वराची इच्छा असल्यास'' याला अपवाद आहे.

देह नष्ट झाल्यानंतर काय आत्मा बाकी असतो की तोही नष्ट होतो ? खरे हे आहे की आत्मा नष्ट होणार नाही. याबाबतीत इब्न कय्यम यांनी ''किताबुर्रुह'' या आपल्या ग्रंथात असा निर्णय दिला आहे की जर

‘‘मृत्युची चव’’ चा आशय देहापासून विभक्त होणे असेल तर ते खरे आहे आणि जर ते लुप्तप्राय किंवा नष्ट होते असा अर्थ घेतल्यास तो मान्य नाही, कारण की आत्मा निर्माण झाल्यानंतर समष्टिगतपणे तो बाकी राहणारा आहे, भलेही सुखात किंवा दुःखामध्ये का होईना. इब्न असाकर यांनी ‘दमिश्कचा इतिहास’ या ग्रंथामध्ये असा उल्लेख केला आहे की एका व्यक्तीचे असे म्हणणे आहे की आत्मा पण देहासोबत मरुन जातो. यावर ते आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना असे मत नोंदवितात की हे तर उन्मार्गमार्गी लोकांचे कथन (मत) आहे.

आत्मा यद्यपी एकच जिन्नस आहे, तरी पण आपल्या गुणांच्या दृष्टीने वेगवेगळा असतो. प्रत्येक प्रकारचा आत्मा हा आपल्यासारख्या इतर आत्म्याशी प्रेमसंबंध ठेवतो आणि विरोधकाशी घृणा करतो. असे का बरे होते ? प्रेषित अनुसरण कर्त्यांच्या दृष्टीने याचे उत्तर असे आहे की आत्मा एक सत्ता आहे. ती सत्ता चढते आणि उतरते, मिळून जाते आणि विभक्त होते, येते आणि जाते, गतिशील असते आणि स्थिर असते. याविषयी शंभराहून अधिक प्रमाण आहेत.

प्रेषित वचन आहे की आत्म्यांचे पण एक सैन्य-दळ-लष्कर असते. ते एक दुसऱ्यास ओळखतात ते आपापसात मिळून जातात आणि जे ओळखत नाहीत ते आपापसात मिसळत नाहीत.

सर्वश्रेष्ठ अल्लाह निवेदन करतो की, ‘‘आत्म्याची (माणसाची) व ज्याने त्याला नीटनेटके बनविले त्याची शपथ !’’ - ९१:७ यावरुन स्पष्ट होते की प्राणास (नफ्स) नीटनेटके केलेले आहे, जसे की देहाच्या बाबतीत म्हटले गेले आहे तो परमेश्वर ज्याने तुला निर्माण केले म्हणजेच प्राणास आत्म्यानुसार करुन टाकले. त्यामुळे देहाची बरोबरी ही प्राणच्या बरोबरीने झाली. येथूनच हे पण ज्ञात झाले की प्राण हा देहापासून असे स्वरुप प्राप्त करतो की जिच्यामुळे तो अन्य इतर जीवांहून प्रतिष्ठित गणला जातो. कारण की ज्याप्रमाणे देह हा प्राणाशी प्रभावित होतो तद्वत प्राण देहाशी प्रभावित होतो आणि अशाप्रकारे तो एक प्रतिष्ठा प्राप्त करतो. जीवांची प्रतिष्ठा ही देहांच्या प्रतिष्ठेहून अधिक असते. कधीकधी देह एक दुसऱ्या समान असतात; परंतु जीव कदापि एक दुसऱ्यापासून प्रतिष्ठित असतात. याचे प्रमाण हे आहे की आम्ही प्रेषितांच्या शरीराचे कधीच निरीक्षण केले नाही. यद्यपि ते एक दुसऱ्याशी प्रतिष्ठित असल्याचे आम्हास जाणीव आहे आणि ही प्रतिष्ठा त्यांच्या देहांमुळे नसून त्यांच्या आत्म्यामध्ये असलेल्या गुणांच्या फरकामुळे आहे. आम्हास दोन भावांच्या स्वरुप आणि चेहऱ्यामध्ये बेहद्द साम्य आढळून येते; परंतु त्यांच्यामध्ये पूर्ण भेद (फरक) आढळून येतो. पुन्हा अनेकदा आपण घृणास्पद आणि वाईट चेहरापण पाहतो, तेव्हा त्या व्यक्तीच्या आत्म्यास पण त्याच्या वाईट चेहऱ्याशी काहीना काही संबंध जरुर असतो. जेव्हा एखाद्याचे शरीर दुःखग्रस्त असते तेव्हा त्याचा आत्मा पण काही ना काही प्रमाणात दुःखग्रस्त असतो. म्हणून तर जाणकार लोक चेहऱ्यावरुन अंतःकरणामधील भाव-भावना समजून घेतात.

जेव्हा आपण एखादा सुंदर व रुपवान चेहरा पाहतो तेव्हा तेच सौंदर्य आणि रुप त्याच्या आत्म्यामध्ये पण पाहतो. म्हणून अशरीरी असून पण देवदूत एक दुसऱ्याहून प्रतिष्ठित असतात. यास्तव जिन्न (यक्ष, किन्नर) आणि मानवांचे आत्मे तद्वत प्रतिष्ठित असतील. प्रख्यात सूफी तत्त्वज्ञ आणि आचार्य इमाम गजाली यांनी लिहिले आहे - मुसलमानाचा आत्मा हा मधमाशासारखा असतो; तर इतरांचा आत्मा हा टोळासारखा

असतो; परंतु याचे प्रमाण हदीसमध्ये कोठेच आढळत नाही. तर हदीसमध्ये तर असे आहे की यमदेवदूत इस्राफील हा जेव्हा आत्म्यांना बोलावील तेव्हा श्रद्धावंतांचे आत्मे प्रखर प्रकाशासारखे तेजस्वी स्वरुपात येतील तर श्रद्धाहीनांचे नास्तिकांचे आत्मे काळ्याकुट्ट अंधःकारासारखे येतील. मग सगळ्यांना एकत्र करुन तो आपले रणशिंग ठेवील व मग त्यातून सूर फुंकेल तेव्हा अल्लाह म्हणेल की, मला माझ्या इभ्रतीची व जाज्वल्य स्वरुपाची शपथ ! प्रत्येक आत्म्याने आपल्या शरीराकडे परतावे. तेव्हा आत्मे हे मधमाशासारखे पृथ्वी व आकाश स्वतःनी भरतील, आणि प्रत्येक आत्मा हा आपल्या शरीराकडे वाटचाल करील आणि शरीरामध्ये अशाप्रकारे दाखल होईल जसे की विष शरीरामध्ये वेगाने पसरतो. तेव्हा प्रेषित यांनी आपल्या विधानामध्ये आत्म्यांची स्वरुपामध्ये मधमाशांची तुलना केली नसून ते फक्त निघून विखुरले जातात. या तुलनेशी साम्य अशा प्रकारचे आहे की जसे सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे ते थडग्यांमधून विखुरलेल्या टोळाप्रमाणे निघतील. या हदीस (प्रेषित वचन) मध्ये हे पण नमूद आहे की श्रद्धावंतांचे आत्मे हे 'जाबिया' पासून आणि श्रद्धाहीन नास्तिकांचे आत्मे 'हूत' पासून येतील आणि ते आपल्या शरीरांना अशाप्रकारे ओळखतात जसे की तुम्ही आपल्या स्वारांना ओळखता, प्रत्युत त्याहून अधिक चांगल्या प्रकारे ओळखता. श्रद्धावंतांचे आत्मे धवल पांढरे शुभ्र असतील, तर नास्तिकांचे आत्मे हे काळेकुट्ट !

प्रलयाच्या दिवशी लोकांमध्ये मतभेद निर्माण होईल, इथपर्यंत की आत्मा व शरीर यांच्यामध्ये पण मतभेद निर्माण होईल. आत्मा शरीरास म्हणेल की हे सर्व कर्म तुझेच आहे आणि शरीर आत्म्यावर आरोप ठेवेल (करील). तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह हा एक देवदूतास निर्णयासाठी पाठवून देईल. तो देवदूत म्हणेल की तुमचे दुष्टांत तर त्या अंध आणि पंगुसारखे आहे की ते एका बागेत दाखल झाले आणि फळ खाऊ लागले. मालकाने त्यांना धरले. तर आता तुम्हीच सांगा की दोषी अपराधी कोण आहे. तेव्हा आत्मा व शरीर दोन्ही म्हणाले की दोघेही अपराधी आहेत, कारण की फळ तोडणारा हा पंगु (लंगडा) होता आणि ते फळ आणणारा हा अंध होता. हे ऐकून देवदूत म्हणाला, पुरे करा ! तुम्ही स्वतःच आपल्या विरोधात निर्णय केला आहे. म्हणजे शरीर हे आत्म्यासाठी स्वारासारखे आहे.

दार कतबी यांनी अनस यांच्या हवाल्याने असे निवेदन केले आहे की देह (शरीर) हे प्रलयाच्या दिवशी म्हणेल की मी तर लाकडाच्या मोठ्या दांडुकासारख्या पडलेला होतो. हा सर्व खेळखंडोबा आत्म्याचा आहे. तर आत्मा म्हणेल की मी तर हवेसारखा होतो. हे सगळे दुष्कर्म शरीराचे आहे. हे ऐकून देवदूताने त्यांची तुलना पंगु आणि अंधाशी केली, हा प्रसंग अब्दुल्ला बिन अहमद यांनी ''जवायदज्जुहद'' या ग्रंथामध्ये नमूद केले आहे. त्यांनी आत्म्याऐवजी अंतःकरणाचा उल्लेख केला आहे. यावरुन कळून येते की आत्म्याचे थांबण्याचे स्थळ हे अंतःकरण आहे.

प्रेषित [स.] यांनी ''यासीन'' या अध्यायास कुराणाचे हृदय वा अंतःकरण असे नाव दिले आहे. याच्या पारायणाने प्राणोत्क्रमणाच्या वेळेची यातना शमते, म्हणून त्यावेळी हा वाचून ऐकविण्याचा सुयोग असतो. प्राणोत्क्रमणाच्या अवस्थेचे वर्णन पवित्र कुराण या शब्दांत मांडते – ''जेव्हा (मरणासन्न असलेल्या मनुष्याचा) आत्मा कंठाशी येतो, तेव्हा तुम्ही त्यावेळी इकडे तिकडे पहात बसता आणि तुमच्यापेक्षाही आम्ही त्याच्या अधिक समीप असतो; परंतु तुम्हाला दिसत नाही.'' – ५६:८३:८५

उहुदच्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या हुतात्म्यांच्या आत्म्यांना शांतीलाभ होण्यासाठी दरवर्षी आपल्या सोबत सहचऱ्यांना घेऊन प्रेषित हे त्यांच्या कबरी (थडग्या) चे दर्शन करीत. याच प्रथेच्या अनुसरणार्थ महदवी संप्रदायामध्ये अद्यापर्यंत दर गुरुवारी सकाळी आपल्या सद्गुरुसोबत त्यांचे शिष्य सामूहिकपणे आपल्या दिवंगत नातलगांचे समाधी दर्शन करुन त्यांच्या आत्म्यांना शांतीलाभ व्हावे या उद्देशाने कृपायाचना करीत. मात्र अलिकडे ही चांगली प्रथा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. ही खरोखर खेदाची गोष्ट आहे.

इमाम नववी हे 'शरह मुहज्जिब' मध्ये नमूद करतात की समाधी दर्शन करणाऱ्यासाठी हे एक स्वीकृत कर्म आहे की त्याने समाधी दर्शनानंतर संपूर्ण कुरआन वाचावे (संपूर्ण कुरआन चे संक्षिप्त वाचन करावे. मंगलाचरण अध्याय (सुरए फातिहा) एकदा आणि परमेश्वरी एकत्त्वतेचा (सुरए इखलास) हा अध्याय तीनदा वाचल्यास संपूर्ण कुराण पठणाचे श्रेय प्राप्त होते कारण हा अध्याय म्हणजे १/३ कुराण होय.) यानंतर प्रेषित वर अंतरासत्ती करुन कृपायाचना करावी. ही समाधी दर्शनाची प्रचलित व सुयोग्य प्रथा आहे व मृतात्म्यांना शांतिलाभ होण्यासाठी विनवणी करावी.

# १५) धर्माचे मर्म आणि सूफ़ी अध्यात्म : समाईक विचारधारा

**क) धर्माचे मर्म**

**१) धर्माचे दोन अर्थ :** सर्व आस्तिक धर्मांचा केंद्रबिंदू ईश्वर आहे. धर्माचे ढोबळ दोन अर्थ होतात : १) कर्तव्यकर्म व २) ईश्वरचरणी सर्वस्व अर्पण करण्याचा मार्ग. पवित्र गीतेत म्हटलेले आहे, 'सर्व धर्मात परित्यज्य मामेकं शरणं ब्रज' म्हणजे सर्वस्व ईश्वरचरणी सर्वस्व अर्पण करणे हा खरा धर्म. ईश्वरचरणी सर्वस्व अर्पण करणारा हा खरा हिंदू आणि ईश्वरचरणी सर्वस्व अर्पण करणारा हा खरा मुसलमान, तसेच ईश्वरचणी सर्वस्व अर्पण करणारा हा खरा धार्मिक. मार्ग भिन्न भिन्न जरी असले तरी ईश्वर बदलत नाही व निरनिराळे धर्म जरी असले, तरी ईश्वर बदलत नाही. आपली निरनिराळी घरे असली तरी गल्ली एक असते. निरनिराळा गल्ल्या असल्या तरी  पेठ एकच असते. निरनिराळा पेठा असल्या तरी गाव एकच असते. वेगवेगळी गावे मिळून एक देश व वेगवेगळे देश मिळून एक जग आणि वेगवेगळी जगे मिळनू एक विश्व व त्यांतील सर्व काही निर्माण करणारा एकच निर्माता, विश्वकर्मा परमात्मा होय. ही सर्व घरे, गल्ल्या वगैरे एक करणे जसे अशक्य आहे, तसे सर्व धर्म एक करणे कसे शक्य होईल?

(शेख अब्दुल रझाक शाह बियाबानी – 'धर्माचे मर्म,' पृ. १२)

**२) पीर व संतांत धर्माचा केंद्रबिंदू :** पंडित व मौलवींच्या पंक्तीतील सर्वांना सर्व धर्माचा केंद्रबिंदू सापडणे फार कठीण आहे व तो सहजगत्या पीर व संतांना सापडलेल्या आहे व ते आणि साधक अवस्थेतील त्यांचे शिष्य रज आणि तम गुणांच्या आहारी जात नाहीत व त्यांच्यातील सत्वगुणांचा प्रभाव दिवसेंदिवस वाढतच असतो. ज्ञान संपादन करण्याविरूद्ध कोणताही धैर्य नाही. परंतु विद्वत्तेच्या विस्तीर्ण मैदानात, विचारांच्या हातघाईत श्रद्धेचे तुकडे झाल्याविना राहणार नाहीत. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याच्या जोडीला संतांच्या दृष्टीकोनाची व अनुभवाची श्रद्धापूर्वक सांगड घातल्याविना सर्वज्ञाची सरी ओळख होणे अशक्य. 'मध' हा शब्द कागदावर लिहून आपण चघळीत बसलो तरी मधाचा स्वाद घेता येणे शक्य नाही. त्यास मधच खावयास हवा. म्हणजे मधाची गोडी कळेल. त्या गोडीचे वर्णन शब्द कोशातील कोणत्याही शब्दाने करणे शक्य नाही. त्याचप्रमाणे देवाची ओळख शब्दभांडारतून होणे दुरापास्त आहे.

तुकोबारांनी याबद्दल सांगितले आहे की,

*'देव पाहावयासी गेलो आणि देवच होऊनी ठेलो.'*

(शेख अब्दुल रझाक शाह बियाबानी – 'धर्माचे मर्म,' पृ. १५)

**३) धर्म म्हणजे काय? :** धर्म हे भारतीय संस्कृतीचे किंवा समाजाचे प्राणतत्त्व आहे. आधुनिक मानवशास्त्राचे प्रवर्तक एडवर्ड टायलर ह्यांनी अगदी मोजक्या शब्दात धर्माची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, ''धर्म म्हणजे अध्यात्मिक शक्तीतील विश्वास होय.'' (Religion is the belief in Spirtual Being.) सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ दुर्खीम म्हणतो, **धर्म** महणजे श्रद्धा व आचारविधी ह्यांचे संकलन होय. सुरेंद्रनाथ दासगुप्ता यांच्या मते, ''ज्याच्यामुळे अभ्युदय व निःश्रेयस यांची सिद्धी (प्राप्ती) होते तो **धर्म** होय.'' धर्म म्हणजे समग्र मानवाची समग्र सत्तेबाबत होणारी प्रतिक्रियाच होय. या प्रतिक्रियेचा आविष्कार ईश्वरवाद व सर्वेश्वरवाद असा दोन प्रकारचा होतो. धर्म हा आचारनिष्ठ आहे. धर्म हा न्यायाशी संबद्ध असलेला सद्गुण आहे; कारण धर्माच्या रूपाने आपण ईश्वराचे ऋण फेडीत असतो. धर्मामुळे जीवन समृद्ध होते. धर्म हे जीवनाला दिलेले वळण असते; कृतार्थ जीवनाचे विशदीकरण असते. धर्माचा संबंध मूल्यांशी असतो, वस्तुस्थितीशी नसतो. ''भावनोत्कटतेचा स्पर्श झालेली नीति म्हणजे **धर्म** होय,'' असे आर्नोल्डने म्हटले आहे. तत्त्वाचा विचार, सत्याचा आचार, न्यायाचा व्यवहार, करूणा आणि उपकार हा **खरा धर्म** आहे. समता धर्माचा आत्मा (गाभा) आहे. बाह्य आडंबरात धर्म नसून तो माणसाच्या आंतरिक उदात्ततेत आहे.

**४) धर्माचे मुख्य सार :** सर्व धर्माचे रहस्य सत्य आणि सत्याचे रहस्य दम. सत्य हाच लोकांमध्ये ईश्वर, सत्य हाच सर्वांचा आधार. सत्यास अनुसरून वागावे ही सर्व धर्मांची आज्ञा. सत्य एकंदर व्यवहाराचे बीज आहे. सत्यास अनुसरून निस्पृह बुद्धीने एखादी गोष्ट आपले कर्तव्य म्हणून करणे हेच धर्माचे मुख्य सार आहे. सत्याविषयी पूज्यत्वबुद्धी मनात वागविण्याविषयी आपल्या अंतःकरणात वास करणारी ईश्वराची वाणी आपणास सांगते. सत्य हे सर्व व्यवहारास मूलभूत आहे असा आपला अनुभव आहे. सत्याचे रहस्य जे दम, त्यामध्ये दया, समता, क्षमा, न्याय इत्यादी सद्गुण समाविष्ट असतात. यांच्या संवर्धनामुळे धर्मास बळकटी प्राप्त होते. जीवात्म्याचे परमात्म्याशी पुन्हा योग करून देणे हे धर्माचे काम आहे.

**५) धर्माचे तात्पर्य व रहस्य :** आपले अवगुण पालटावे आणि त्याकरिता देवाच्या ठायी अंतःकरणाचा खरा भाव ठेवून त्याची भक्ती करावी, हे धर्माचे तात्पर्य सतत लक्षात ठेवले पाहिजे. चांगले संस्कार आपल्या अंतःकरणात दृढ करणे, हेच धर्माचे रहस्य आहे. धर्मशास्त्र याचे रहस्य सत्य हे आहे.

सत्य म्हणजे सद्गती आणि सदाचार. सद्गती आणि सदाचार यांचे रहस्य दम हे आहे. म्हणून इंद्रियाचे आणि कामक्रोक्षादिकांचे दमन हे धर्माचे रहस्य आहे. ते दमन केल्याशिवाय उच्च दशा प्राप्त व्हायची नाही. यास्तव देवाचे दर्शन जर पाहिजे असेल तर काम, क्रोध, दंभ, अभिमान हे आपल्या आळ्यात आणले पाहिजेत.

**६) धर्माचा विषय व धर्माचे काम :** योग्य रितीने वागण्याचे ज्ञान परमात्म्याच्याच प्रेरणेने होते. योग्य ते ग्रहण करावे व अयोग्य ते टाकावे. तसेच योग्य वृत्तींस अनुसरावे हे ज्ञान देणे, हा धर्माचा विषय होय. याच्या उलट जर आपण नाना प्रकारचे विधी करून तेवढ्यानेच आपणास कृतकृत्य मानू लागलो, तर आपण खऱ्या धर्मास मुकलो असे समजावे. सर्व प्रसंगी व सर्व गोष्टींत परमेश्वराच्या इच्छेस अनुसरून अधिकाधिक वागविणे हा धर्माचा विषय होय आणि बाह्य विश्वामध्ये जे काही दिसत आहे त्यावरून त्याचे सद्हेतू मनात

आणून त्याच्या इच्छेचे आकलन केल्यानंतर तद्नुरूप वर्तन करण्यात आनंद मानावयास लागणे हे धर्माचे काम आहे.

**७) खरा धर्ममार्ग, धर्मनिष्ठ आणि धर्मनिष्ठता :** आपल्या अंत:करणातून दुर्विचार व दुर्वासना विगलीत करणे आणि परमेश्वराने लावून दिलेल्या व्यवहारात क्षमा, शांती इत्यादी गुणांची वृद्धी होईल अशा रितीने वागणे, हाच खरा धर्म मार्ग होय. जो ह्या मार्गाकडे मन लावून अंतर्यामाची विघटित झालेली घडी पुन: ठीक बसवितो आणि आपला आत्मा परमेश्वराच्या इच्छेस अनुसरणारा होण्याविषयी खबरदारी घेतो, तोच खरोखर धर्मनिष्ठ होय. देवाच्या इच्छेस अनुसरून प्रापंचिक कृत्ये करण्याचा व वागण्याचा सतत प्रयत्न करणे, याचे नाव धर्मनिष्ठता अथवा धार्मिकपणा. आपणास प्रतिकूल गोष्ट झाली असता ती मनात घुमते व त्रास होतो. ही क्षुब्धतेची वृत्ती परम दयाळू परमात्मा आपले अहित करणार नाही या दृढ विश्वासाने नाहीशी करून जो परमात्म्याकडे धाव घेतो आणि आपले अंत:करण पुन: शांत करून घेतो, तोच धर्मनिष्ठ समजावा. त्याचप्रमाणे ज्याच्या योगाने चित्त व्यग्र होऊन अनेक वेळा अन्न गोड लागत नाहीसे होते, आनंदमय परमात्मा प्रेममूर्ती, जो सर्वांचा पिता त्यानेच मला निर्मित केले, त्याच्यावरच माझ्या सर्व संकटांचा व चिंतेचा बोजा आहे, आणि तोच तो बोजा दूर करील, असा विश्वास ठेवून जो संसारात चालतो. तोच खरा धार्मिक मनुष्य होय. प्रपंचात अनेक वेळा कामक्रोधादिक रिपुवर्ग छळतो आणि चिंता, क्षुब्धता व भीती अनेक प्रसंगी जेरीस आणतात. तेव्हा गडबडून न जाता ज्या परमेश्वराने आपणास प्रपंचात घातले तोच संकटातून आपला अवश्यमेव उद्धार करील अशा दृढ विश्वासाने उद्वेगाचे निरसन करून

*''माझे वागवावें ओझें। दिधलीयासी क्षेम कीजे।।*
*धरीतसे पायां तुका। देवा आतां उशीर नका।।''*

अशी तुकोबासारखी अंत:करणपूर्वक देवाची प्रार्थना जो करतो तोच धर्मनिष्ठ होय.

आपली धर्मनिष्ठा केवळ खरोखर जागृत राहून आपल्या धर्माचरणाला सवलत द्यावयाची, तर देवास अनन्यभावे शरण जाऊन त्याची याचना व प्रार्थना करणे हेच एक साधन होय. ही अनन्यगतिक प्रार्थना विलक्षण गुणकारक अमृतवल्ली आहे. ह्या एक विद्यभाव अमृतवल्लीच्या योगे मोठे व्रण व जखमा बऱ्या होतील. या अमृतवल्लीच्या योजनेत मानसिक आधिव्याधींचा हटकून परिहार होईल. अशा प्रकारे खरी धर्मनिष्ठा आपल्या अंत:करणात वागली पाहिजे. धर्मनिष्ठा म्हणजे आनंदस्वरूप, प्रेममय परमात्म्याचा समागम, त्याच्या योगे शांती, उन्नती व समाधान यांचा अनुभव घेणे. प्रापंचिक काय, पारमार्थिक काय, एकंदर बाबतीत आपली व परम पवित्र परमात्म्याची इच्छा एक करणे, हेच धर्माचे मुख्य तत्त्व व खरे स्वरूप होय.

धर्माचा मूल विषय परमात्मा, तो अंत:करणाच्या ठायी धर्म काय अधर्म काय हे सांगणारा आहे, तो खऱ्या धर्ममार्गाचा आदेश करीत असतो. खऱ्या धर्मनिष्ठेचा अथवा धार्मिकपणाचा परिणाम असा झाला पाहिजे की, चित्ताची क्षुब्धता जाऊन शांती आली पाहिजे, व कामक्रोधिकांचा अंमल नाहीसा होऊन त्यांच्यावर आपला पगडा बसला पाहिजे; भीति जाऊन धैर्य येईल आणि चिंतेचे निरसन होऊन समाधान

राहील, असा परमार्थत: धर्म असला पाहिजे. आपली धर्मनिष्ठा सफल व सबळ करण्यासाठी सर्व शक्तिमान मंगलमय परमेश्वराची एकनिष्ठेने व लीनतेने प्रार्थना केली पाहिजे.

सच्ची धर्मनिष्ठा असेल तर आध्यात्मिक उन्नती साध्य करता येते. आणि आध्यात्मिक उन्नती म्हणजे सत्यनिष्ठा, देवाविषयी प्रेम आणि सर्व जनांविषयी प्रेम होय.

**८) धर्माची मूलतत्त्वे :** (१) ईश्वर एकच आहे, त्याशिवाय दुसरा ईश्वर नाही. सर्व उत्पन्न करणारा एकच ईश्वर आहे. तो निराकार आहे. त्याचे मानसिक भजन पूजन करणे योग्य व आपले कर्तव्य आहे. मूर्तिपूजा हा असन्मार्ग असून ईश्वरास अपमानकारक आणि मनुष्यास नीचत्व आणणारा व दुराचारणाप्रत नेणारा आहे. परमेश्वराने हे सर्व ब्रह्मांड निर्माण केले. तोच एक खरा ईश्वर. तो नित्य, अनंत, ज्ञानस्वरूप, कल्याणनिधान, आनंदमय, निरवव, निरांकार, एकच, अद्वितीय, सर्वांचा नियंता, सर्वज्ञ सर्वव्यापी, सर्वशक्ती, कृपानिधी, परमपवित्र व पतितपावन असा आहे (२) केवळ त्याच्याच उपासनेच्या योगे इहलोकी व परलोकी शुभ प्राप्त होते. (३) त्याच्या ठायी प्रीति, पूज्यत्वबुद्धी व अनन्य भाव ही ठेवून तत्पूर्वक त्याचे मानसिक भजनपूजन करणे व त्यास प्रिय अशी कृत्ये करणे हीच त्याची खरी उपासना. (४) प्रतिमा व इतर स्पृष्ट पदार्थ यांची पूजा अर्चा किंवा आराधना करणे हा ईश्वरोपासनेच खरा प्रकार नव्हे. (५) परमेश्वर सावयवरूपाने अवतार घेत नाही; पण तो दिव्य ग्रंथ अवतरितो (६) सर्व मनुष्य एका परमेश्वराची लेकरे आहेत. म्हणून भेदभाव न राखता परस्परांशी बंधुभावाने वागावे हे ईश्वरास प्रिय आहे आणि हे मनुष्याचे कर्तव्य आहे.

**९) धर्माचे मुख्य ध्येय :** सदासर्वकाळ नाम-स्मरण करून, ईश्वराचा नाम-घोष करून, त्याचे ध्यान व मनन करून आपल्या चित्तास समाधान प्राप्त होते, सर्व प्रकारचे सुख प्राप्त होणे; अंतरात्मा भूषित होतो; आणि आम्ही आनंदाने डुलतो, आहो कोठे याचे भानच राहत नाही. देहामध्ये असून देहाचे स्मरणच नाही, केवळ आत्मलय झालो असा अनुभव येतो; आणि मग आमची अशी भीती होते की, कोणत्याही प्रकारचे पाप आम्हास स्पर्श करू शकत नाही. अग्नी जसा तृणकाष्टादिकांस जाळून टाकतो, तशा प्रकारे ते पाप आम्ही जाळून टाकतो. तेव्हा ईश्वराच्या ध्यानाने, मननाने, तो आमच्या अंतरात्म्यापुढे उभा राहिला म्हणजे आमची वृत्ती तन्मय होते, सर्व दुःख नाहीसे होते, क्षुद्रता लयास जाते, पाप नष्ट होऊन मति विमल होते, म्हणजे इहलोकीच मुक्तदशेची झांक अंतरात्म्यावर पडते. आणि आमच्या धर्माचे मुख्य ध्येय हेच आहे की, यावज्जीव तुकोबा म्हणतात तशा प्रकारच्या आचरणाने मुक्तदेशची झांक आमच्या आत्म्यावर पडावी, मग देहपात झाला असता हीच स्थिती परलोकी स्थिर व्हावाची आणि ज्ञानोबांनी म्हटले आहे. ‘सर्व चेष्टा मजला उद्देशून माझ्या प्राप्तीकारणे जे करतात ते मरणाच्या अगोदरच मजप्रत येऊन पोहोचतात, आणि मग मरण प्राप्त झाल्यावर दुसरीकडे कसे जातील?’ एका उपनिषदात असे म्हटले आहे ‘जे या लोकीं ते परलोकी. परलोकी जे आहे त्याला अनुसरून इहलोकीचे आहे. असा परलोक इहलोकाचाच पुढचा भाग असे मानले असताना मृत्यू म्हणजे काहीच नाही असे होते. मृत्यू त्याच मनुष्याला प्राप्त होतो, जो परलोक इहलोकापासून भिन्न समजतो. तेव्हा इहलोक आणि परलोक हे दोन लोक नव्हेत, एकच आहे.

**१०) शाश्वत धर्म आणि शुद्ध आचरणाची आवश्यकता :** शाश्वत धर्माचा आधार परमेश्वर आहे. शाश्वत धर्म म्हणजे सर्व मनुष्यांस लागू. मग ते कोणत्याही वर्णाचे असोत; सर्व आश्रमांस लागू, त्याला कोणत्याही काळी बाध यावयाचा नाही. आज जे सत्य व न्याय्य ते भूतकाळीही तसेच आणि भविष्यकाळी ही तसेच; म्हणून शाश्वत धर्म याचा अर्थ व्यवहारात आपण ज्यास नीति असे म्हणतो तो. त्याचा आधार परमेश्वर, म्हणजे तो धर्म परमेश्वराची इच्छा एतद्रूप आहे. तेव्हा त्या धर्माचे उल्लंघन करणे म्हणजे परमेश्वराच्या इच्छेचे उल्लंघन करणे, त्याशी विरोध करणे, असे होते. म्हणून अन्यत्र गीतेमध्ये ''शाश्वत धर्मगोत्रा'' म्हणजे शाश्वत रक्षण करणारा असे भगवंतास (ईश्वरास) म्हटले आहे. शाश्वत धर्माचे ईश्वर रक्षण करतो म्हणजे जेव्हा पाप अर्थात असत्य, अन्याय, द्वेष, अत्याचार इत्यादी लोकांमध्ये माजते, तेव्हा ईश्वराच्या योजनेने पापाचा नाश होऊन पुण्याचा उत्कर्ष होतो.

निष्काम धर्माचे आचरण करणे, हा खरा मार्ग आहे. त्याच्या योगे अंतरात्मा उन्नत पदाप्रत पावतो. मात्र निष्काम धर्मप्रवृत्ती अंत:करणामध्ये उत्पन्न होणे, ही सहजसाध्य गोष्ट नव्हे. सद्धर्म हे ज्याचे स्वरूप, सत्य, न्याय आणि प्रेम हे पूर्णपणे ज्याचे गुण, जो परम दयाळू, जो सर्व विश्वाचा अधिपति, ज्याचा महिमा सर्व विश्वामध्ये अत्यंत रम्य स्वरूपाने नांदत आहे, जो सर्व पदार्थांच्या ठायी आणि आमचे अंत:करणाच्या ठायी वास करून सर्वांस उन्नत देशप्रत नेत आहे. त्याला शरण जावे, त्याच्या आनंदाची, प्रेमाची भावना करावी. तोच माझा रक्षक असा अनन्यभाव अंत:करणामध्ये दृढ धरावा. हा मुख्य उपाय आहे. भगवद्गीतेत म्हटले आहे :- 'मोठा दुराचारी जरी मनुष्य असला, तो जर अनन्यभावे मजला भजतो – माझी भक्ती करतो – तर त्याला साधूच समजले पाहिजे. तो आपल्या निश्चयामध्ये योग्य प्रकारे स्थित झालेला असतो. तो तत्काळ धर्मात्मा अर्थात सदाचरी होतो आणि त्याला शाश्वत शांती प्राप्त होते. माझ्या भक्ताचा कधीही नाश होत नाही.' – ९:३०–३१. अशा प्रकारच्या अनन्य भक्तीच्या योगे मनुष्य पापी असला तरी पवित्र होतो, आणि धर्मात्मा होतो.

**११) सत्यधर्माचा राजमार्ग –** भक्तिमार्ग : शुद्ध भावाने, शुद्ध चित्ताने, विवेकाने परमेश्वराचे भजनपूजन करावयाचे, त्याची इच्छा तीच आपली इच्छा, नव्हे, त्याच्या इच्छेबाहेर आपली इच्छा नाही, असे मानून चालणे, हाच राजमार्ग आहे, हाच मार्ग सर्व ठिकाणच्या संतांस, भक्तास मान्य आहे. साधु संतांच्या उपदिष्ट भक्तीमार्ग तोच सत्यधर्माचा राजमार्ग होय. वास्तविक पाहता अशा रीतीने परमेश्वराचे सामर्थ्य व त्याची सत्ता मानण्याकडे अंत:करणाची साहजिक प्रवृत्तीच असते. ह्या जगतांत जे सर्व सामर्थ्य दिसत आहे ते माझे नव्हे. ते सर्व सामर्थ्य त्या परम थोर व परम सामर्थ्यवान परमेश्वराचे; सर्वस्वी मी त्याच्या स्वाधीन, तो सर्वांहून उच्च, सर्वांहून श्रेष्ठ आहे असे मानून सर्व व्यवहार त्याच्या इच्छेस अनुसरून करणे हा विश्वास खरा होय, हीच खरी श्रद्धा होय. सर्व भगवद् भक्तांचा असा विश्वास असे. अशा प्रकारचा दिव्य विश्वास तुकोबांचा होता म्हणून त्यांनी म्हटले आहे की, –

*''हरीचियां भक्तां नाही भय चिंता।*
*दु:ख निवारिता नारायण।।''*

याचा अर्थ असा समजावयाचा नाही की, जो हरीचा भक्त त्यास काही उपाधी अर्थात् भय, चिंता नाहीत, त्याचेवर काही प्रसंगच येणे शक्य नाही. तर त्याचा परमेश्वरावर अशा प्रकारचा विश्वास असतो की, कोणत्याही प्रकारचा प्रसंग (संकट) वगैरे आला असता, तो टाळण्यासाठी शक्य ते साध्य उपाय वगैरे करूनही आपणास नको असाच जर परिणाम झाला, तर परमेश्वर आपला साह्यकर्ता रक्षक आहे ह्या विचारात भक्तांस समाधान असते व ते अशा वेळी सर्व भरिमार त्याचेवर टाकून प्राप्त स्थितीत समाधान मानून राहतात. तेव्हा परमात्म्याच्या ठिकाणी त्याला निर्धाराचा विश्वास आहे त्याची भव व्यथा तुटून गेली याविषयी शंका नाही. त्याला सर्वत्र त्याची (परमेश्वराची) इच्छा व योजना दिसू लागते. तो आत आहे, त्याचप्रमाणे तो बाहेर आहे, हे त्यास स्वानुभवाने कळू लागते. मोठे वादळ झाले, आणि आपल्या घराचा नाश झाला तरी त्याच्या मनाची शांती ढळत नाही व त्याचा परमेश्वरातील अनुपमेव विश्वास तिळमात्र कमी होत नाही. तेव्हा ईश्वराच्या मन:पूर्वक भक्तीने जर हा प्रकार अनुभवास येत आहे, तर हा राजमार्ग सोडून आडवाटेने जाण्याची इच्छा का व्हावी?

### ख) सूफ़ी अध्यात्माची समाईक विचारधारा*

### १) पिंडी ते ब्रह्मांडी – ब्रह्मांडी ते पिंडी

'पिंडी ते ब्रह्मांडी – ब्रह्मांडी ते पिंडी म्हणजेच 'नुक्तेमें कायनात और कायनात में नुक्ता.'' कोणत्याही वस्तूपासून आपण दूर दूर जाऊ लागलो तर ती वस्तू लहान लहान होत गेलेली दिसते. बऱ्याच अंतरावरून ती फक्त टिंबाएवढी दिसते. शुक्र या ग्रहावरून आपली पृथ्वीसुद्धा त्या टिंबाएवढीच दिसेल. जे टिंब तेच पिंड. आकार आणि अंतर यांचा हा खेळ आहे. आपल्याजवळ अंतर कमीत कमी करणारी आणि जडाचा छेद करणारी दुर्बिण नाही. तशा प्रकारच्या दुर्बिणीतनू शुक्रावरून पृथ्वीकडे पाहिल्यास आपल्याला आपल्या पृथ्वीवरील घरातील पिंजऱ्यातील पोपट काय करीत असेल ते स्पष्ट दिसू शकेल आणि विशिष्ट यंत्रणेद्वारे तो काय बोलतो ते ऐकता आले असते, तसेच आपल्याला त्या पोपटाशी बोलतासुद्धा आले असते.

हृदयाच्या पिंडीमध्ये परमात्मा आहे. तो तेजोमय चैतन्यस्वरूपी प्रकाश आहे. तोच तर सर्वव्यापी, सर्व ठायी, सर्वज्ञ आणि सर्व शक्तिमान आहे. त्यालाच पवित्र कुराणात ''नूरून – अला – नूर'' असे म्हटले आहे. आपण नेहमी पाहतो त्या प्रकाशाला वेळेचे आणि आणि अंतराचे नैसर्गिक कायदे बंधनकारक आहेत. परंतु प्रकाशरूपी परमात्म्यास काळ, वेळ आणि अंतर यापैकी कशाचेही आणि कसलेही बंधन नसते. कारण तो इतका सलग्न आहे की, एकाच वेळी पिंडीतील प्रकाशज्योत हजारो प्रकाशवर्षे अंतरावर असते. सूर्यकिरण एका सेकंदात एक लक्ष ऐंशी हजार मैल प्रवास करू शकतो. (सुमारे ३,००,००० किलोमीटर्स) क्ष–किरण, अति–तील–किरण, लेझर–बीम वगैरे प्रकारचे प्रकाशकिरण अव्यक्त स्वरूपात सारे ब्रह्मांड निर्माण करणाऱ्या चैतन्यस्वरूपी तेजोमय प्रकाशात आहेतच. अद्वैत सिद्धांतात तो तर खल्विदं ब्रह्म आहे व सारे विश्व निर्माण कणारा चैतन्यस्वरूपी तेजोमय प्रकाश – 'नूरून – अला – नूर म्हणजेच 'खल्विंद ब्रह्म', जो हृदयस्थ आहे तोच साऱ्या ब्रह्मांडात आहे. याचाच अर्थ हृदयाच्या पिंडीमध्ये ब्रह्मांड सामावले ना?

ईश्वराने पवित्र कुराणात म्हटले आहे की, ''मी तुमच्या मूळ रक्तवाहिनीपेक्षाही जवळ आहे म्हणजेच हृदयस्थ आहे. ('नहुन अकरब इल्लै ही मिन हबलिल वरीद.')

तसेच पुढे ईश्वराने म्हटले आहे की, ''माझी आठवण करायची असल्यास सकाळी आणि संध्याकाळी आपल्या श्वासाखाली हृदयात आठवण करा.'' यालाच 'मुराकेबा' म्हणजेच ध्यास, मनन म्हणतात.

पैगंबर स. साहेब स्वतः म्हणाले होते की, ''मन अरफा नफ्स हू फकद् अरफा रब्बहू'' याचा अनुवाद म्हणजे तू स्वत:ला ओळख म्हणजे तुला खल्विदं ब्रह्माची ओळख होईल.

विचारांना जर पिंडीतील प्रकाशाचा वेध घेता आला, तर ब्रह्मांडात कोठे काय चालले आहे ते सहज कळू शकेल, प्रत्यक्ष दिसू शकेल, तसेच त्या दृश्यात स्वत:ला भागही घेता येईल.

विचार आणि भावना यांच्या दरम्यान अहंकारयुक्त 'मी' वास करीत असल्याने विचारांना पिंडीतील खल्विदं ब्रह्मांशी संधान साधणे शक्य होत नाही. हा अहंकारयुक्त 'मी' फक्त ईश्वरावरील निस्सीम सात्त्विक प्रेमातच विरघळू शकतो. जसा तो विरघळल्यास स्वयं सद्‌गुरूचे परमंगल दर्शन पिंडात होईल आणि त्यांच्याच कृपेने त्या चैतन्यस्वरूपी तेजोमय प्रकाशदिपका (सिराजुम्मुनिरा) च्या प्रकाशात अखिल विश्व न्हाऊन निघाल्याचे विलोभनीय दृश्य साकार होत जाईल.

## २) हिंदु धर्मातील एकेश्वरीवाद

हिंदु धर्मात एकेश्वरीवादास जी ग्लानी आली होती ती संत - महंतांनी दूर केली. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात अज्ञानी भक्तांची लक्षणे सांगताना (अध्याय १३, श्लोक ११ वरील टीका, ओव्या ८१५ ते ८२१) ईश्वर एक आहे हे तळमळीने पटवून दिले. यात श्री ज्ञानेश्वर महाराजांनी कोणाच्याही श्रद्धेला किंवा भावनेला धक्का लावण्याचे संभवतच नाही.

*''द्विधा मन, द्विधा भक्ति।*
*कदा न मिळे त्यास मुक्ति।।''*

शिवाय ते म्हणतात,

''तुज सगुण म्हणू की निर्गुण तू एकची गोविंद रे!'' म्हणजेच
''तुझे ला कहूँ या इल्लल्लाह, तू एकही अल्ला रे!''

## ३) निर्गुण - निराकारात चैतन्य स्वरूप

हिंदु धर्माप्रमाणे निर्गुण - निराकारात स्वानुभवाची प्रबळ इच्छा (स अकायमत) निर्माण झाली. त्यावेळी त्याने चैतन्यस्वरूप धारण केले. या चैतन्य - स्वरूपाचे मूळ घटक जिवंत प्रकाश, प्रेम व आनंदाचे सागर आहेत. त्यातून त्याने तीन मुख्य गुण धारण केले. (१) उत्पत्ती, (२) स्थिती आणि ३) लय, व त्यातूनच तो सर्वगुण संपन्न झाला. कालांतराने उत्पत्ती करणारा, स्थितीचे पालन करणाला व नष्ट करणारा यास अनुक्रमे ब्रह्मा, विष्णू, महेश या नावांनी आपण ओळखू लागलो. त्यातूनच त्याने निरनिराळे पोटगुणात्मक स्वरूप धारण केले. शंकर, पार्वती, लक्ष्मी, सरस्वती, गणपती वगैरे गुणात्मक नावे त्याने धारण करून तो सर्वगुण संपन्न झाला. इस्लामधर्माप्रमाणे सुद्धा किंबहुना हेच सांगितले आहे की, ईश्वरास स्वानुभवाची प्रबळ इच्छा निर्माण झाली व त्यातील गुप्त खजिन्यातून त्याने सर्व विश्व निर्माण केले.

त्याने मूळ ९९ गुणात्मक नावे धारण केली. त्यातील काहींचा मी उल्लेख करतो. (१) खालिक उत्पत्ती करणारा – म्हणजे. अब्द म्हणजे दास. अब्दुल खालिक म्हणजे ब्रह्मादास. (२) रज्जाक – अन्नदाता पालन करणारा म्हणजे विष्णू अब्दुल रज्जाक म्हणजे विष्णुदास (३) कादिर – सर्व शक्तिमान म्हणजे भगवान. अद्बुल कादिर म्हणजे भगवानदास. बनारस हिंदु विद्यापीठाचे उप कुलगुरू कै. भगवानदास यांनी लिहिलेल्या "The Essential Unity of all Religions" या इंग्रजी पुस्तकात पान नं. ६६ वर स्पष्ट म्हटले आहे की, माझे नाव भगवानदास म्हणजे अब्दुल कादिर आहे. शिक्षण खात्याने हे पुस्तक शाळा, महाविद्यालयामधून, क्रमिक पुस्तक म्हणून लावल्यास राष्ट्रीय एकात्मकता व जातीय सलोखा निर्माण करण्यास पुष्टी मिळेल व पर्यायाने भारतमातेची सेवा केल्याचे श्रेय प्राप्त होईल. तसेच सत्तार, गफ्फार, वहाब कौर्य ईश्वराची म्हणजे अल्लाहची गुणात्मक नावे आहेत. ईश्वरी गुणात्मक रूपांची जशी हिंदुधर्मात निरनिराळी देवालये कालांतराने अस्तित्वता आली तशी इस्लाम धर्मात सुद्धा अस्तित्वात आली असती आणि आपणास कादिर, वहाब, सत्तार, रज्जाक कहार वगैरेंची देवळे पाहावयास मिळाली असती. परंतु मूर्तिपूजा इस्लाम धर्मात कटाक्षाने वर्ज्य करण्यात आल्यामुळे ती आपणास दिसत नाहीत. तरी त्यातील कोणत्याही एका ईश्वरी गुणात्मक नावाचा जप केल्यामुळे त्या गुणाची सिद्धी प्राप्त होऊ शकेल परंतु सर्व गुणसंपन्नाचा पूर्ण अनुभव होण्यासाठी मूळ चैतन्य स्वरूपाकडे म्हणजे 'नूर'कडे वळावे लागेल आणि त्यासाठी सद्‌गुरू चरणी लीन होऊन त्यांनी दिलेल्या परवलीच्या नामाचा जप करीत राहिल्याने आध्यात्मिक उन्नती होत जाईल.

निरनिराळ्या चालीरितींचे व वागणुकीचे उगमस्थान देशपरत्वे आणि कालपरत्वे 'परमेश्वरच' आहे. त्याचे पूर्ण अनुभवसिद्ध ज्ञान अवतार – पैगंबरांना झालेले असते व त्यांच्याकरवी ईश्वरी जनसमूहापुढे मांडले जाते व त्यांना जो कोणी प्रसन्न करतो, त्यासच ते अनुभवसिद्ध ज्ञानाचे दान करतात. काही खास शिष्यांना सद्‌गुरूपद अर्पण केले जाते व ती परंपरा चालू होते. अवतार पैगंबर यांना प्रसन्न करण्यासाठी त्यांच्या वागणुकीचे बऱ्याचप्रमाणात अनुकरण करावे लागते तसेच, त्या परंपरेतील पीर व सद्‌गुरू यांना प्रसन्न करण्यासाठी त्यांचे अनुकरण करून त्यांनी घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे लागते. यावरून उलगडा होईल, की निरनिराळी वेशभूषा का करावी लागते व जप जाप्याच्या पद्धती भिन्न भिन्न का आहेत? शेंडी आणि दाढीमध्ये अगर वेशभूषेत धर्म नाही, परंतु सद्‌गुरूस प्रसन्न करण्यासाठी हे सर्व करावे लागते. काही नाथपंथी कान फाडून घेतात कान फाडण्यात धर्म नाही. परंतु सद्‌गुरूस प्रसन्न करण्यासाठी हे सर्व करावे लागते.

**४) धर्मांतर – खरा अर्थ**

धर्मांतर याचा अर्थ धर्म बदलणे असा न समजून धर्मा – धर्मातील अंतर कमी करणे किंवा पूर्ण नाहीसे करणे असा समजावयास हवा. प्रत्येक शहरात ज्याप्रमाणे निरनिराळी महाविद्यालये किंवा शिक्षण संस्था असतात. परंतु अंतिम पदवी देणारे विद्यापीठ एकच असते, त्याचप्रमाणे धर्म जरी निरनिराळे असले, वर्तनाचे त्यांचे नियम जरी भिन्न भिन्न असले, तरी प्रत्येकाचे अंतिम ध्येय एकच असते, ते म्हणजे ईश्वरासंबंधी अनुभवसहित पूर्ण ज्ञान – केवल ज्ञान प्राप्त करून घेणे.

सर्वधर्म समभाव जागृत करणाऱ्या कार्यकर्त्यांनी प्रथम सर्व धर्मांचा अभ्यास करावयास हवा.

**क) धर्माचे चार विभाग :** प्रत्येक महत्त्वाच्या धर्माचे महत्त्वाचे चार विभाग असतात. ते याप्रमाणे –

**१) देहपूजा** – याचा अर्थ देहाने करावयाच्या पूजेचे नियम. माणुसकी, नीतिमत्तेचे नियम वगैरे.

**२) मानसपूजा** – याचा अर्थ मनाने एकाग्रचित्त होऊन स्वखुशीने व प्रेमाने, आनंदाने कोठेही केव्हाही केलेली पूजा.

**३) जीवनभक्ती** – याचा अर्थ अखिल विश्वाचा जो मालक ईश्वर, त्याने प्रत्येक व्यक्तीस काही ठराविक कारणासाठी निर्माण केलेले असते आणि ती व्यक्ती आपले नेमून दिलेले कार्य करीत असताना 'मी ईश्वराची भक्ती करीत आहे' असे समजून ते कार्य केले तर चोवीस तासांच्या आत भक्तीचे श्रेय त्या व्यक्तीस मिळेल. यातच जनसेवा ही जनार्दन सेवा केल्याचा लाभ होतो.

**४) तादात्म्य** – याचा अर्थ ईश्वरमय होणे. यातच विश्वमय, जनमय आणि अहंकारयुक्त 'मी' ते सर्वस्व समर्पण करून टाकल्यावर सर्वमय होणे होय. म्हणजेच, द्वैतातून अद्वैतात जाणे होय. या अवस्थेत कोणताही भेदभाव उरत नाही.

**ख) इस्लाम धर्मातील चार विभाग :** इस्लाम धर्मातील चार विभाग आदी वरीलप्रमाणेच आहेत.

**१) शरीयत** – याचा अर्थ देहाने करावयाचे धार्मिक नियम, वर्तणुकीचे नियम (आचार नियम), ईश्वराच्या उपासनेचे नियम, माणुसकीचे, नीतिमत्तेचे नियम वगैरे.

**२) तरीकत** – याचा अर्थ ईश्वराच्या प्रार्थनेच्या नियमांचे पालन करीत असताना राजीखुशीने, आनंदाने आणि प्रेमाने, मन एकाग्र करणे.

**३) हकीकत** – याचा अर्थ पवित्र कुराणातील वाक्याचा भावार्थ असा आहे की, 'जीवन ही भक्ती आहे' तसेच ईश्वर म्हणतो, 'मी प्रत्येक व्यक्तीस काही ठराविक कामासाठी निर्माण केले आहे,' म्हणून, जे काही कराल ते ईश्वराची भक्ती करीत आहोत असे समजनू करा. म्हणजे कर्म – भक्तीचे श्रेय मिळेल. पवित्र गीतेत म्हटले आहे की, 'कर्म कर आणि मला अर्पण कर..'

**४) मारेफत** – याचा अर्थ अनुभवसहित सर्वज्ञता. केवल ज्ञान म्हणजे ईश्वराशी असलेले द्वैत नाहीसे करणे. पवित्र कुणातील वाक्य आहे – 'सिजदा (प्रणिपात) कर आणि जवळ ये.' म्हणजे ईश्वराशी जवळीक साधणे, याचाच सारांश, की जवळीकीची अंतिम सीमा म्हणजे तादात्म्य. फक्त शरीयत आणि सनातन धर्म (देहपूजा – देहाते करावयाची पूजा) याची कटाक्षाने पालन करणाऱ्यांच्या हातून, सर्वधर्म समभाव निर्माण कसा होईल? दोन व्यक्ती एक ठिकाणी आल्यास प्रेमाने अलिंगण देताना छातील छाती भिडवून गळ्याला मिठी मारतात. तेव्हा पाय आपल्या जागेवर असतात. ते कापून बाजूला काढावे लागत नाहीत. पायाला पाय भिडवून आलिंगन संभवत नाही. झालीच तर लाथाळीच होईल तरीही पाया तर मुळीच सोडता येत नाही. शरीयत – सनातन. धर्म (देहपूजा) हा धर्माचा पाया आहे. सनातन धर्माचे पालन झालेच पाहिजे.

मानसपूजा आणि तरीकत हे जवळ आणू शकतील. जीवनभक्ती आणि हकीकत हे अधिकाधिक जवळ येऊ शकतील. तादात्म्य आणि मारेफत हे इतकी जवळीक निर्माण करू शकतील की, आम्ही 'महाकारण देह' म्हणजे 'वहेदतुल वजूद' चेच (अद्वैत) दृश्य स्वरूपातील भिन्न भाग आहोत. याचे ज्ञान म्हणजेच केवळ

ज्ञान प्राप्त होईल. अशा परिस्थितीत पायाजवळ पाय आल्यास लाथाळी संभवत नाहीच, उलट धर्माधर्मातील अंतर संपूर्ण नाहीसे होईल.

सर्व धर्माचा अभ्यास केलेली काही समंजस, विद्वान मंडळी हे कार्य आपापल्या पद्धतीनुसार करीत आहेत. त्यांना योग्य ती साथ देणे हे सर्वधर्म समन्वय साधणारांचे आद्य कर्तव्य आहे.

**५) ईश्वरकृपेने सद्‌गुरू अहंकार नष्ट करतात**

सर्वव्यापी सर्वात्मा सर्वज्ञ असून, अणुरेणूतून पसरलेला आहे. तो आपल्या सर्वांच्या हृदयमंदिरात आहे. त्याची जाणीव होणे म्हणजे केंद्रबिंदू गाठणे होय. लोहचुंबकाजवळ लोखंडांचा तुकडा ठेवल्यास त्यात लोहचुंबकत्व निर्माण होते, कारण लोखंडातील कणांची मांडणी लोहचुबंकाच्या कणांच्या मांडणीसारखी बनते त्याचप्रमाणे पूर्ण अवस्थेच्या संतांच्या सान्निध्यात काही प्रमाणात सात्त्विक आनंदाशी एकरूप झाल्यासारखे वाटते व स्वर्गीय मदिरा प्याल्यासारखे वाटू लागते. परंतु लोखंडाचा तुकडा लोहचुंबकापासून दूर केल्याबरोबर त्यातील कणांची रचना पूर्ववत होते व त्यातील विस्तवात घालून लाल करून एका ठराविक प्रतीचे पोलाद करून नंतर लोहचुंबकाजवळ नेल्यास त्यात जी आकर्षणशक्ती निर्माण होते, ती त्यापासून दूर केल्यावर सुद्धा टिकून राहते लोखंडासमान साधकास धार्मिक कायदे व नियमांचे पालन करून बराच काळ जपजाप्यामध्ये व तपश्चर्येत घालवून आपल्या हृदयावर काम, क्रोध, मोह, मद, मत्सर, दंभ आदि संस्काराचे चढलेले कवच हळूहळू तोडून टाकावे लागते. नंतर प्रेम, भक्ती आणि पूजनाने उरलेला 'मी'पणा व अहंकाराचे कवच जळू लागते व साधक पोलाद बनतो आणि सद्‌गुरूच्या प्रसन्नेत व सान्निध्यात जो काही स्वानुभाव येतो तो टिकून राहतो. म्हणजे तो स्वत: लोहचुंबक बनतो, म्हणजेच संत बनतो. तुकाराम महाराज म्हणतात, 'आपुले मरण पाहिले म्या डोळा,' इस्लामधर्मात सांगितले आहे. 'मूतू कबल, अंता मूतू.' म्हणजे मरणापूर्वी मर; याचाच अर्थ आपल्या अहंकारयुक्त 'मी' पणास मारावयाचे आहे व ते भक्ती व पूजनामध्ये अलोट प्रेम निर्माण करून करावयाचे आहे. ईश्वरीकृपेच्या सद्‌गुरूप्रेरणेने शेख अब्दुल रज्जाक शाह बियाबानी यांना लिहिलेल्या इंग्रजी 'ग्लिम्प्सेस ऑफ रियालिटी' या पुस्तकातील दोन कडवी खाली देण्यात येत आहेत–

The Power of Love is stronger than
The Atom Bomb and Atomic Clan,
Of Scientists and their Frankesteins,
And silver, gold and diamond mines
The Ego burns in Love's sweet Fire,
The Soul is freed from dirty mire,
There's love and light, let us advance,
To ecstasy and Blissful Trance...

आधिभौतिक प्रेम ज्या वस्तूवर जडतो, ती वस्तू आपणास हवीशी वाटते. परंतु आध्यात्मिक पातळीवरील निस्सीम प्रेम सर्वस्व सर्मपण करते व त्या ऐवजी काही मागत नाही, कारण मागणाराच

स्वयंसमर्पण झालेला असतो व ईश्वराशिवाय काही उरतच नाही. अशा तऱ्हेच्या प्रेमसागरातील जीवात्मा चैतन्यरूपी परमात्मा याच्याशी एकरूप होऊन परत महाकारण देहातून कारण देह, सूक्ष्मदेह व जडदेहात वास करीत असतो व सहज समाधी अवस्थेत ब्रह्मानंदाचा आस्वाद घेत असतो व समतोल जीवन जगतो.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

*''जाणतेणे गुरू भजीजे। तेणे कृत कार्य होईजे।*
*मूळ सिंचिणे सहजे। शाखा पल्लवे संतोषती।।''*

ईश्वर एकच असून तो सर्वांच्या हृदयात आहे आणि पीर, सद्‌गुरूंच्या हृदयात जाणीवेने आहे, त्यालाच उद्देशून जो 'गुरूब्रह्म गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरः। गुरू साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।' असे म्हणतो तो जाणता समजावा.

गुरू हा एक वेगळा देव आहे आणि परमेश्वर हा वेगळा देव आहे असे निरनिराळे देव जो मानतो त्यास नेणता (अजाणता) समजावे.

मूळ ईश्वर एकच आहे, तो सद्‌गुरूंच्या हृदयात जाणीवेने आहे आणि शाखा, पल्लवे ही ईश्वरी गुणात्मक आणि पोटगुणात्मक नावे आहेत. त्यांची वेगवेगळे देव म्हणून उपासना केल्यास सिद्धी प्राप्त होतील. पण ईश्वर मिळणार नाही. म्हणनू सर्वगुणांचे मुळास पाणी घातले तरच सर्वगुण संपन्न ईश्वराची जाणीव होईल. म्हणून सिद्धी प्राप्त केलेले योगी १४०० वर्ष मृत्यू टाळू शकतात. पण त्यांचेवर शेवटी श्री ज्ञानोबारायांना कोरा कागद पाठविण्याची वेळ येते.

**६) क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे**

पुष्कळ निरनिराळे प्रयोग करून बरेच शोध लावून शास्त्रीय सिद्धान्त जगापुढे मांडले गेले आहेत. बऱ्याच लोकांनी योग्य त्या मार्गदर्शकाच्या देखरेखीखाली हे प्रयोग स्वतः करून निष्कर्ष पडताळून पाहिलेले आहेत. इतर बहुसंख्य लोकांनी वरीलप्रमाणे प्रयोग न करता देखील त्या त्या सिद्धान्तावर आपली अंधश्रद्धा ठेवली आहे.

सर्वसाधारण तुलनात्मक विचार करता पवित्र गीता, पवित्र कुराण, पवित्र बायबल, पवित्र झिंदावेस्ता वगैरे त्या त्या धर्मांचे आधारभूत ग्रंथ आहेत. त्या त्या धर्मग्रंथांच्या शिकवणुकीप्रमाणे योग्य त्या पीर, सद्‌गुरूंच्या नजरेखाली व मार्गदर्शनाखाली जर आपण प्रयोग केला तर ईश्वरी अस्तित्वाबद्दल शंभर टक्के खात्री पटेल. हा प्रत्येकाच्या जीवनाचा प्रयोग असल्याने प्रयोग करणाऱ्या प्रत्येकातील रज, तम आणि सत्त्व गुणांचे प्रमाण पाहून पीर, सद्‌गुरू हे प्रयोगात किंचित फेरफार करून प्रयोग करवून घेतात. म्हणून या प्रयोगास कमी – जास्त कालावधी लागतो. ज्यांनी हा प्रयोग केलेलाच नाही. त्यांना धर्माबद्दल तसेच ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल कसे बोलता येईल?

*'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे।*
*विचारे मना तूचि शोधूनी पाहे।।'*

### ७) केवलज्ञाना (इम्ले लदुन्नी) ची ओझरती मीमांसा

विचारांच्या साहाय्याने भावनांचा वेध घेणे म्हणजे स्वानुभव आणि तेही रज आणि तम गुणांची आवरणे बाजूस सारून सत्त्वगुणांच्या झरोक्यातून तेजोमय प्रकाश दीपकाचे दर्शन होणे शक्य आहे. या अवस्थेपर्यंत पोहोचयाच्या मार्गावर 'मी' पणाचा जबरदस्त अडथळा येतो आणि तो फक्त सात्त्विक प्रेमातच विरघळू लागतो. 'मी'पणा विरघळता विरघळता मर्यादित ईश्वरी दर्शन शक्य आहे आणि पूर्णपणे विरघळण्याच्या शेवटच्या अवस्थेतच अनुभवसहित ईश्वरी दर्शन शक्य आहे.

ही शब्दातीत अवस्था आहे 'मी' जर पूर्णतः विरघळून गेलो तर कोणकोणांचे दर्शन घेणार? द्वैताच्या सीमोल्लंघनाचे वेळी अद्वैताबद्दल एकाने म्हटले आहे, 'जहाँ दीद है न शनीद है न सलाम है न पया है' याचा अर्थ, जेथे दृश्य नाही, ऐकणे नाही, सलाम (नमस्कार) नाही, निरोप नाही. म्हणून साधुसंत, पीर अवलिये अद्वैताशी एकरूप होऊनसुद्‌धा द्वैतात वावरतात आणि विश्वरूपी नाटकातील पात्रांना समक्ष अगर पर्यायाने मार्गदर्शन करून जनसेवा करतात आणि स्वयं प्रेम, भक्ती आणि पूजनामध्ये मग्न राहून ब्रह्मानंद, परमसुख आणि केवलज्ञानाचा स्वाद घेतात, आणि त्यांच्या उमाळीच्या धुंद अवस्थेत कोणी असेही वदतो, 'अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंद भरीन तीन्ही लोक.' याचा स्वर्गीय मदिरेचा स्वाद घेण्यासाठी संत तुकाराम महाराजांनी मुक्तीसुद्धा नको अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली आहे. ते म्हणतात –

*"हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।।१।।*
*गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी।।२।।*
*नलगे धन मुक्ति संपदा। संतसंग देई सदा।।३।।*
*तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी।।४।।"*

प. पू. मुहम्मद पैगंबर स. यांचे बोल आहेत की, स्वाद घेण्यासाठी ईश्वराने सारे विश्व निर्माण केले आहे. याचा अनुवाद असा –

विश्वनिर्मितीची कारणमिमांसा

*निर्गुणपोटी सगुण जन्मले। सगुणामाजी अमृत भरले।।*
*अमृतमंथन करण्यासाठी। ब्रह्मचि द्वैतामध्ये आले।।१।।*
*अमृतसेवन करितो आत्मा। आनंदे डोले परमात्मा।।*
*द्वैताचा तव होईल नाश। सुटतील द्वैताचे बहु पाश।।२।।*

माणुसकी व प्रेम हा धर्माचा गाभा आहे आणि साधु – संत, पीर, अवलियांनी समजावून सांगितलेला धर्म प्रेम आणि सात्त्विक भावना जागृत करतो, तसेच पुण्याई बद्दल आदर आणि पापाविषयी तिटकारा निर्माण करतो.

ज्यावेळी माणुसकीचा ऱ्हास होतो, अधर्म बोकाळतो आणि समाजास काही करता येत नाही त्यावेळी दैवी कोप निर्माण होतो आणि ईश्वर रूद्रावतार धारण करून कंटकांचे सरसकट निर्दालन करतो. हे धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीकोनातून इतिहासाचे सिंहावलोकन केल्यास सहज लक्षात येईल.

भगवंतांनी 'भगवद् गीतेत' आश्वासन दिले आहे, की –

*''यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।*
*अभ्युत्थानमधर्मस्य तदात्म्यानं सृजाम्यहम्।।''* – ४:७

म्हणजेच, जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचा अभ्युदय होतो, तेव्हा सज्जनांच्या रक्षणासाठी, दुर्जनांच्या विनाशासाठी आणि धर्माची संस्थापना करण्यासाठी मी अवतार घेतो. – ४:७

ईश्वर एकच आहे व तो सर्वांच्याच हृदयात आहे, आणि अवतार प्रेषित व पैगंबराचे हृदयात तर तो जाणीवेने आहे. देव भावाचा भुकेला, भाव प्रेमाचा भुकेला. भावविना भक्ती पूजन आणि नमाज तांत्रिक, यांत्रिक आणि कृत्रिम ठरते आणि अशा प्रकारच्या भक्ती, पूजन व नमाजाची कसरत म्हणजे भक्ती, पूजन आणि नमाजाचे विडंबन होय. जीव व शिव यांचा मेळ साधणारा श्वास आहे. जीवन ही भक्ती आहे. परस्पर द्वेष झटकून टाकावे हे सर्व धर्माचे मूळ व ही शिकवण एकच आहे.

(शेख अब्दुल रझाक शाह बियाबानी – 'धर्माचे मर्म' – पृ. १६–३५)

## १६) भक्तीची सप्तसूत्रे (सात भक्तीसूत्रे)

भक्तीस मूळ विरक्ती, ज्ञानास मूळ अग्नी, अंत:करणास मूळ मन, आठव तो ब्रह्म, नाठव तो भावभ्रम, नाम आहे की नाही? दृष्टी आहे की नाही, वस्तू आहे की नाही ? आदी.

पहिली चार सूत्रे साधकाने करावयाची तयारी सांगणारे असून, नंतरची तीन सूत्रे साधनामार्गाविषयी आहेत. 'भक्तीस मूळ विरक्ती व ज्ञानास मूळ अग्नी,' हे सूत्र ज्ञानेश्वरीत आहे. 'आठव तो ब्रह्म नाठव तो भावभ्रम' हा चरण एकनाथांच्या अभंगातील आहे.

'भक्तीसाठी विरक्ती हवी' याचा अर्थ असा की प्रपंच न टाकता, पण हळू हळू त्यातील आसक्ती कमी करून तो कर्तव्यापुरता करावा आणि परमार्थाकडे अधिक जावे. कारण देवाकडे प्रेम लागले तर हळूहळू आसक्ती कमी होते. प्रेमभाव वाढल्यास आपोआपच नामस्मरण अधिकाधिक होऊन ईश्वराच्या दर्शनाची प्राप्ती होऊ लागते.

'ज्ञानास मूळ अग्नी' म्हणजे आत्मज्ञानासाठी तसेच ईश्वराच्या अनुभूतीसाठी तळमळ लागली पाहिजे. 'अंत:करणास मूळ मन' म्हणजे सद्गुरूकडून प्राप्त नामाचे स्मरण करून अंत:करणातील अंत:करण म्हणजे कूटस्थातला भाव देवाला अर्पण करावा. 'आठव तो ब्रह्म नाठव तो भावभ्रम' अर्थात् मन नेहमी बाह्य विषयातच रमलेले असते. त्याची आठवण होऊ न देता परब्रह्माची प्राप्ती करून देणाऱ्या सद्गुरूंची आणि त्यांनी दिलेल्या नामाची आठवण ठेवावी.

नंतरची तीन सूत्रे साधनामार्गाची आहेत. त्यात नामाची आठवण ठेवावी. डोळ्यांपुढे देवाचे स्वरूप विशेषत: निर्गुणाचे (तेज, बिंदू, नाद, रंग, आकार इत्यादी) दिसते का याकडे लक्ष ठेवावे.

# १७) साधकासाठी आचारसंहिता

**(क) साधकाने कोणती पथ्ये सांभाळावीत?**

परद्रव्य, परस्त्री व परनिंदा कटाक्षाने टाळणे. नीती, सदाचार व कर्तव्य यांचे काटेकोरपणे पालन करणे, क्रोधादी विकार आवरण्याचा व घरीदारी सर्वांशी प्रेमाने वागण्याचा मन:पूर्वक व जागरूकतेने प्रयत्न करणे; फळाची अपेक्षा वा आसक्ती न बाळगता व्यवहारात उचित प्रयत्न करणे; अहंभाव टाकून कोणत्याही गोष्टीचे कर्तेपण आपल्याकडे न घेता, श्रीसद्‌गुरूच सर्व कर्तेकरविते आहेत, त्यांच्या इच्छेने व सत्तेनेच प्रत्येक घटना घडत आहे व म्हणून ती माझ्या कल्याणाचीच असणार असे मानण्याचा अभ्यास करणे व ती आपल्या मनाजोगती असो वा नसो, चित्तात अखंड समाधान राखणे, या सर्व गोष्टी साधकाने कडक पथ्य म्हणून सांभाळाव्यात. अत्यंत नीतीने वागावे, धर्म शक्य तितका पाळावा आणि सतत नाम घ्यावे, म्हणजे साधकाला योग्य असे जीवन घडवले जाते. आपल्या वासना व विकार क्षीण करण्याचा प्रयत्न करीत असावे. ज्याच्या योगाने आपल्या गुरूला किंवा उपासनेला कमीपणा येईल असा आचार, उच्चार किंवा विचार करू नये. नामावाचून वेळ वाया घालवू नये.

सर्वात प्रथम **'शरीराचे आरोग्य'** सांभाळण्याचा बुद्धि पुरस्पर व लक्षपूर्वक प्रयत्न झाला पाहिजे. शरीराचे आरोग्य हे प्रपंचाप्रमाणे परमार्थालाही अत्यंत अवश्य आहे. 'सात्त्विक आहार' हा आरोग्याला साधक असला तरी तो मिताहार पाहिजे. नुसता मिताहार हाही एक रोग्याचे पथ्य होईल, करता तो नामस्मरण पूर्वक करावा, म्हणून तो अन्नरस हा भगवद्रस–ब्रह्मरस होऊन पोटात उतरेल व कर्मादिकांनी न साधणारी हृदयशुद्धी लीलेने होईल. **'ब्रह्मचर्य'** (पूर्ण अथवा मितकामसेवन) हे आरोग्याला तर साधक आहेच, पण परमार्थालाही आवश्यक आहे.

विषयासक्तीचा अनादरच भगवंताला व संतांना अपेक्षित आहे. शास्त्रांनी व संतांनी कामाचा निषेध केला नाही, कामासक्तीचा निषेध केला आहे. परस्त्रीबद्दल कटाक्षासारखे अध:पतन व कुलनाशाचे साधन दुसरे नाही. भक्तिमार्गात सर्व भोग भगवदर्पण करावेत म्हणजे ते बाधत नाहीत. साधकापाशी व्यतिरेक दृष्टी व अन्वयदृष्टी असावी. ब्रह्माकारवृत्तीची भक्ती बाणल्यानंतर चित्ताने विषयाला विसरलेच पाहिजे. 'ब्रह्मरूप सृष्टी पाहावी, सृष्टीरूप ब्रह्म पाहू नये.'

मुक्तांची अथवा सिद्धांची जी स्वाभाविक लक्षणे ती साधकांची ज्ञानसाधने असतात, म्हणून साधकांनी तशा दृष्टीने विषयोपसेवन करावे. संसारसुस्थिती साधण्याकरता आरोग्य, मिताहार व ब्रह्मचर्य याप्रमाणेच 'मितव्यय' म्हणजे काटकसरही साधकांनी अवश्य अवलंबिली पाहिजे. ''ऋण काढून सण'' कधीही करता

कामा नये. पैसे खर्चण्यात काटकसरी असावे, पण कृपण असू नये. तथापि वेळ खर्चण्यात कृपणच असावे. 'परांतास ढका' न लागेल अशा काळजीने बोलणे बोलावे. आपण कोणाला हलका शब्द बोलू नये, लोकांनी बोलल्यास तो सोसावा. 'सत्य पण अप्रिय असेल तरी बोलू नये व प्रिय पण असत्य असेल तरी बोलू नये; तर सत्य व प्रिय असेल तेच बोलावे हा सनातन धर्म होय.' (मनुस्मृति)

'मौन' या गुणाचाही साधकांनी अभ्यास केला पाहिजे. वाङ्मौन, इंद्रियमौन, काष्ठमौन, सुषुप्तिमौन इत्यादि मौनांपेक्षा मनोमौन हेच सर्वात श्रेष्ठ आहे; तथापि हे मौन (वृत्तिशून्य अवस्था) साधण्याकरता वाङ्मौनाचाच प्रथम अभ्यास केला पाहिजे. हा फारच हितकारक आहे. बारा वर्षे वाङ्मौन साधणाऱ्यास वाक्सिद्धी प्राप्त होते असे शास्त्रांत सांगितले आहे. 'स्वाध्याय' म्हणजे पवित्र ग्रंथांचे मननपूर्वक वाचन करण्याचा रोजचा नियम धरावा. मुमुक्षूला सद्ग्रंथाचे वाचन साधक आहे.

दानधर्म करावा, अहिंसाव्रताचे पालन करावे. सत्य, अस्तेय, निर्लोभता, दया, क्षमा, शांती, उद्योगप्रियता, निरालस्य, प्रिय व नम्रतेचे भाषण, अदंभित्व, निष्कपटपणा, विश्वास धैर्य, लज्जा, कुलाचार पाळणे, श्राद्धादि नैमित्तिक कार्ये श्रद्धेने करणे, आपल्यापेक्षा वयाने, विद्येने व गुणाने श्रेष्ठ माणसांना योग्य मान देणे, तेज, बल, निर्भयता, निःस्पृहता, निर्मत्सरता, कृपालुत्व, प्रेम, सज्जनांशी मैत्री, दीन जनांची करुणा, पुण्यवान लोक पाहून मुदिता म्हणजे मोद अथवा आनंद आणि पापी लोकांबद्दल उपेक्षा म्हणजे उदासीनता इत्यादि इत्यादि दिव्य गुणांचा अभ्यास साधकांनी करावा.

**ख) साधकाने कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?**

साधकास स्वाभिमान असावा. सृष्टिसौंदर्य पाहून भगवंताच्या सौंदर्यगुणाची उपासना करावी. 'विश्वरूपाने विश्वेश्वर' पाहाण्याचा अभ्यास करावा. 'चैतन्याचे अन्यथा भान । तें हें जाण चराचर' या वचनाचा निदिध्यास लावून घ्यावा. सतसंग आणि संतसंग लाभ करावा. साधकांनी गुरुभक्ती करावीच, पण ईश्वरभक्तीही सोडू नये. उपासकाला एकच खरा नियम आहे. तो हा की, कोणत्याही काली, कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे विस्मरण होता कामा नये. त्याचे नाम चालू असावे. भगवंत अशा भक्तसाधकांचा हरएकप्रकारे योगक्षेम वाहतो. 'योग' म्हणजे नसलेले देणे व 'क्षेम' म्हणजे दिलेले सांभाळणे, ही अनुकूलता भगवंतच करून देतो. साधकाने भगवंताचे नाम आवडीने मनापासून घ्यावे. आपण कोणाचा द्वेष, मत्सर करू नयेच व आपला कोणी द्वेष-मत्सर करीत असेल ही कल्पना नसावी. एखादी अप्रिय गोष्ट घडली असता दुसऱ्याला दोष देण्याची वृत्ती सोडून द्यावी. 'भगवंत आहे' या भावनेपासून साधकाने सुरुवात करावी आणि 'भगवंत आहेच' या भावनेमध्ये समाप्ती करावी.

## १८) आदर्श शिष्याची लक्षणे

ज्याला भगवत् प्राप्तीची तळमळ लागली आहे त्यालाच **शिष्य** म्हणावे. जो गुरूआज्ञेबाहेर जात नाही, गुरू हेच भगवंत प्राप्तीचे साधन मानतो आणि गुरूपरता देवधर्मच मानीत नाही तो **खरा शिष्य** होय. मी जे जे करतो ते ते भगवंताकरिता करतो असे जो म्हणतो तो खरा व **उत्तम भक्त** होय.

आदर्श शिष्याची पुढीलप्रमाणे लक्षणे सांगता येतील –

१) कोठेही मानसन्मान व्हावा ही अपेक्षा ठेवू नये.

२) कुणाही माणसाचा मत्सर करू नये.

३) आळस संपूर्ण पणे टाकून द्यावा.

४) अहंकाराचे संपूर्ण विसर्जन करावे.

५) सद्गुरूबद्दल नितांत प्रेम व सेवाभाव ठेवावा.

६) गुरूवचनावर दृढ श्रद्धा असावी.

७) परमार्थाबद्दल मनात अत्यंत प्रेम असावे.

८) ह्रदयात तीळभर सुद्धा असूयेला थारा नसावा.

९) बुद्धी धर्मशास्त्रात पारंगत असूनही वादरहित संवादी अशी असावी.

## १९) पंचके किंवा पंचक-समूह

| | |
|---|---|
| १) ईश्वराचे स्वरूप | १. पर, २. व्यूह, ३. विभव, ४. अंतर्यामिन् आणि ५. अर्चा |
| २) जीवाचे पांच प्रकार | १. नित्य, २. मुक्त, ३. बद्ध(संसारिन्) ४. कैवल्य आणि ५. मुमुक्षु |
| ३) सदाचाराची पांच ध्येये | १. धर्म, २. अर्थ, ३. काम, ४. स्वर्गानुभव (कैवल्य) आणि ५. भगवद्नुभव |
| ४) ब्रह्मप्राप्तीची पांच साधने | १. कर्म, २. ज्ञान, ३. भक्ती, ४. प्रपत्ति आणि ५. आचार्याभिमान |
| ५) पांच प्रकारची विघ्ने | १. अन्य देवतांवर विश्वास, २. अन्य साधनांवर विश्वास, ३. स्वरूपज्ञानाविषय चुकीची श्रद्धा, ४. नास्तिकता आणि ५. प्रपत्तीतील गोंधळ |

## २०) अमर आत्म्याचे चार अभेद्य परिभ्रमण-चक्र वा प्रवास-चक्र

१) प्रथम चक्र - रूपांतर : 'नस्ख'चे - हे देहांतरण असते. एक देहामधून दुसऱ्या देहामध्ये प्रवेश.

२) द्वितीय चक्र - परिवर्तन : 'रस्ख'चे - पशूंमध्ये देहांतरण.

३) तृतीय चक्र - विकृती : 'मस्ख'चे - पशूंपासून वनस्पतींमध्ये देहांतरण.

४) चतुर्थ चक्र-भंग विच्छेद : 'फस्ख'चे - वनस्पतींपासून खनिजांमध्ये रूपांतरण.

## २१) परमेश्वरी कृपेचे पाच प्रकार : परमेश्वरी कृपेची कार्य–प्रणाली

विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ईश्वरस्वरूपाचे (१) पर, (२) व्यूह, (३) विभव, (४) अंतर्यामिन् आणि (५) अर्चा अशा पाच रूपात वर्णन केले जाते व शेवटचे रूप 'अर्चा' हे परमेश्वरी कृपेचे मुमुक्षुला सहजप्राप्य असे रूप आहे. उपरोक्त पाच हेच परमेश्वरी कृपेचे पांच प्रकार आहेत : 'पर' ही वैकुंठातील ब्रह्माची कृपा मेघांतील जलबिंदूसारखी दूर असते. 'व्यूह' ही ब्रह्मांडाभोवती असणाऱ्या पाण्यासारखी आहे. 'अंतर्यामिन्' ही कृपा जमिनीतील अदृश्य झऱ्यासारखी आहे. 'विभव' ही नदीतील कधी–कधी येणाऱ्या व जाणाऱ्या अदृश्य झऱ्यासारखी आहे. 'अर्चा' ही कृपा विभवकृपा ओढल्यावर राहते आणि ईश्वरप्राप्तीची तळमळ असणाऱ्या चेतनेस ती केव्हाही मिळू शकते.

परमेश्वर हा उपायही आहे आणि उपेयही आहे. प्रपत्तीचा खरा अर्थ स्वप्रयत्नांनी परमेश्वरी कृपा प्राप्त करून घेणे नव्हे; तर सतत वाहणाऱ्या त्या कृपेच्या प्रवाहाला अप्रत्यक्षपणे साथ देणे होय.

भक्ती म्हणजे भक्ताची परमेश्वराकडील तीव्र ओढ तर परमेश्वरी कृपा म्हणजे परमेश्वराकडून भक्तावर आपली कृपा–वृष्टी होय. म्हणजेच एकीकडे परमेश्वराकडून भक्ताचा शोध म्हणजेच 'परगत स्वीकार' सुरू असतो; तर दुसरीकडे भक्ताकडून परमेश्वराचा शोध अर्थात् 'स्वगत स्वीकार' याची क्रिया सुरू असते. ही परस्पर शोधाशोध मोहीम सुरू असते. परमेश्वरी कृपा ही मातेच्या दुधाप्रमाणे सतत स्रवणारी, परमेश्वराची विनामूल्य प्राप्त होणारी देणगी आहे. तीच कृपा प्रयत्न करून मिळाली तर गोशालेतून किंवा डेअरीतून आणलेल्या दुधासारखी समजावी. ही कृपा स्वत:बद्दल व स्वत:च्या सदाचाराबद्दल भक्ताच्या मनात गर्व उत्पन्न करते आणि त्यामुळे आत्मा कलंकित होतो. म्हणून या कृपेला तितके महत्त्व नाही. पहिली परमेश्वरी कृपा श्रद्धा आणि शरणागति यांनी मिळते व ती कायम टिकणारी असते. जेव्हा भक्त परमेश्वराला शोधतो तेव्हा प्रपत्ती देखील व्यर्थच ठरते, परंतु परमेश्वराने भक्ताला निवडले तर त्याच्या पापांचाही विचार केला जात नाही. परमेश्वराची आणि भगवंतांची निरहंकारपणे व विनम्रभावाने सेवा करणे यातच प्रपत्तीची फलद्रूपता आहे. भक्तीमुळे आत्मोन्नती साधता येते. भक्ताने परमेश्वरावरील आत्यंतिक प्रेमाने भक्ती केली पाहिजे. परमेश्वर हा न्यायी आणि दयाळू आहे. जातिनिरपेक्ष सेवा हे परमेश्वर प्राप्तीचे सर्वश्रेष्ठ व एकमेव साधन आहे.

# २२) साक्षात्कार

साक्षात्कार म्हणजे ईश्वराची प्रत्यक्ष, अपरोक्ष प्रातिभ अनुभूती. आत्मसाक्षात्कारात शांतपणे ईश्वरचिंतनाचा आनंद अनुभवणे अंतर्भूत आहे. हा अनुभव अतींद्रिय व अंतःस्फूर्त असतो. प्रातिभ अनुभूती साक्षात्कारासाठी आवश्यक असते. तसेच ईश्वर व भक्त या दोघांमधील नात्यास विशेष महत्त्व असते. ईश्वर हा भक्तप्रिय असून, संकटविमोचन हे त्याचे ब्रीद आहे. त्याच्या साहाय्याशिवाय उदंड प्रयत्नानेसुद्धा इष्ट सिद्धीचे यश मिळणार नाही. साक्षात्काराचे एकमेव साधन म्हणजे सद्‌गुरूकडून मिळालेल्या नामाचे स्मरण. नामस्मरण साधनाने इंद्रियज्ञानासारखे वाटणारे पण वस्तुतः अतींद्रिय अनुभव येतात. हे अनुभव ईश्वराचे आविष्कार होत. साक्षात्काराने सृष्टीचे कोडे उलगडते. मायापाश, स्थितप्रज्ञता, सर्वात्मभाव, जीवब्रह्मैक्य, केवलद्वैताचा अनुभव, परमानंद व सायज्यमुक्ती हे साक्षात्काराचे फलनिश्चिती स्वरूप असतात.

उन्मनी अवस्थेत ईश्वराचा साक्षात्कार होतो. ज्या वेळेला मनुष्याला साक्षात्कार होतो, त्या वेळेला त्याला ईश्वरीशक्तीचे ज्ञान होते. अज्ञान गळून पडते. त्या शक्तीचा अनुभव शब्दातीत असतो. परंतु त्या शक्तीचा प्रभाव लोकांना दिसतो. अनुभवाला येतो. अनभवाचं वर्णन करता येत नाही. याचा प्रयत्न हा प्रत्येक ठिकाणी दाखवता येत नाही. साक्षात्कार हा कधी कल्पनेत बसत नाही. तो कल्पनेच्या पलीकडे असतो. साक्षात्कार होतोय किंवा होण्याची शक्यता आहे याची जाण त्या (साक्षात्कारी. व्यक्तीलाही नसते; परंतु ती व्यक्ती एका विशिष्ट मनोवस्थेत असते. त्या विशेष मनोवस्थेत असणं हे महत्त्वाचे आहे. तिथे द्वैत कधीही नसते. आपण कोणीतरी निराळे आहोत, आपण अधिक काहीतरी महत्त्वाचं जाणणारे आहोत एवढीच भावना सांगता येईल. ही भावना आली की ते साक्षात्काराचं लक्षण आहे, यालाच 'निर्बीज समाधी' सुद्धा म्हणायला हरकत नाही. हे सगळं स्वयंप्रज्ञेनेच येतं. ज्या वेळेला प्रश्न उपस्थित केला जातो, त्या वेळेला, पुढच्या क्षणाला त्याचं उत्तर देण्याची ताकद साक्षात्कारामुळे येते. परमेश्वराचे साक्षात्कार एकमात्र सद्‌गुरूकृपेने संभव आहे.

साधनेची साक्षात्कारात झालेली फलश्रुती नागेश संप्रदायाचे एक प्रमुख संतकवी आलमखान पुढील शब्दांत मांडतात– '

*'चिन्मय चिद्रूप घनदाट । पाहता दिसे लखलखाट।।*
*यातूनि करावी वाट । मीनमार्गासी नीट।।*
*स्वयंज्योति प्रकाश । अलक्ष्य रूप अविनाश ।।*
*काय करू विलास । संतजन लोकास ।।*
*नागेशकृपे वरदान । आलमखान संतचरण ।।*
*सबाह्य ब्रह्म परिपूर्ण । मन हे माझे उन्मन ।। '*

## २३) गुरूमंत्र – साधना

उपासना कराल तर सिद्धी प्राप्त होईलच, हे लिखित वचन आहे. अट ही आहे की, याला केवळ कर्मकांडाचे ढोंग बनवू नये. सिद्धीचा अर्थ जादू किंवा चमत्कार असाही मानू नये. आपण स्वत:ला परमेश्वराचा अंश मानणे, हीसुद्धा एक सिद्धी आहे. आपण साधना करताना म्हणतो, जे माझे आहे तेच तुझे, तो म्हणतो, माझेही तुझेच आहे. हे भावनेचे आदानप्रदान आहे. या संवादात शब्दाला स्थान नसून भावनेला असते. भक्त आणि ईश्वराच्या दरम्यान शब्द असूनही एक रहस्यमय मौन वाढत असते. भक्ताला तर अशी सिद्धी प्राप्त होते की, तो मौनही ऐकू शकतो. यासाठी साधनेला सिद्धीमध्ये रूपांतरित करण्यासाठी एक साधन, माध्यमाची गरज भासते. हे साधन म्हणजे गुरूमंत्र होय. गुरूमंत्र म्हणजे शब्द जरी असले तरी त्याचे अर्थ अदृश्य असतात.

चिंतामणी लौकिक सुख देऊ शकतो. कल्पवृक्ष स्वर्गप्राप्ती करून देऊ शकेल; परंतु सद्‌गुरू प्रसन्न झाल्यावर योग्यांनाही दुर्लभ असे वैकुंठधाम शिष्याला प्राप्त करून देतात. तसे पाहता एक मात्र ईश्वरच विश्वाचा मार्गदर्शक आणि सद्‌गुरू आहे.

## २४) ब्रह्म : स्वरूप वर्णन

परब्रह्म सत्य, सर्वश्रेष्ठ, अविनाशी आणि असीम आहे. त्याचे दर्शन दिव्यदृष्टीने होते, चर्मचक्षूंनी नव्हे. जे शाश्वत आहे ते ब्रह्म, जे क्षणिक आहे ती माया, तो ब्रह्मच समस्त ब्रह्मांडाचे रहाटगाडगे चालवितो, तो स्वत: चलायमान होत नाही. तो त्रैलोक्याची उत्पत्ती, स्थिती आणि प्रलयाचे खेळ खेळत असतो. तो पूर्ण आहे, श्रेष्ठ आहे, मंगलमय आहे, अवकाश-रहित आहे, निर्विकार आहे, प्रकाशरूप आहे, अनादि आहे, त्रिगुणातीत आहे, प्रकृतीच्या पलीकडे आहे, तो राग-द्वेषरूपी विष आणि दु:ख व मोहशून्य आहे. तो प्राण्यांवर निरंतर कृपा करीत असतो. तो सर्व गुणांनी अलंकृत आहे. प्रेमाने फक्त स्मरण करताच तो हृदयास आनंदित करतो. तो शांत, शुद्ध, पुरातन आणि तिन्ही लोकांचा आश्रय आहे.

निर्गुण ब्रह्म भेदाचे निषेध करतो, तर सगुण ब्रह्म भेदाचे अभेद करतो. ब्रह्म सदा एकसमान असतो. तो कोणत्याच नियमाने बांधला गेलेला नाही. तो ज्योतिर्मय आहे, चिन्मय आहे. तो कृत-कृत्य आहे. तो सत्यस्वरूप आणि ज्ञानस्वरूप आहे. तो समस्त रूपांचा अंगीकार करू शकतो. तो एकटाच या संसाराचा स्वामी आहे. तो संसाराच्या समस्त क्षणिक वस्तूंचा अरम तत्त्व आहे. ती सर्व वस्तूंमध्ये चेतना आणि स्फूर्ती भरतो. तो सच्चा आनंदाचा एकमात्र कारण आहे. तो परम शुद्ध आहे. तो या सर्व चराचर जगतास निर्माण करतो आणि त्याचे संवर्धन करतो. तो तिन्ही लोकांना विकसित करतो. त्याची अगणित रूपे आहेत. तो अनुभवानेच जाणला (ओळखला) जाऊ शकतो.

तो शांत आणि तेजस्वी आहे. तो वाणी आणि मतासाठी त्यांच्या पोहोचण्यापलीकडे आहे. तो व्यक्त पण आहे आणि अव्यक्त पण. तो मायाविहीन आहे. तो ना आहे, ना नाही. तो जगदंकुराचा एकमात्र बीज आहे. वेदांनी ज्याच्याविषयी 'नेति नेति' ('एवढेच नव्हे तर') म्हणून वर्णन केले आहे. तो निराकार असूनही पण तिन्ही लोकांच्या रूपामध्ये दिसून येतो. भ्रमामुळे त्याच्यामध्ये जगताचे भान होते. तो पूर्ण एक, अद्वितीय, सर्वव्यापक, सौंदर्यस्वरूप आहे. त्याला न ओळखल्यामुळे असत् पदार्थ पण सत् प्रतीत होतात. जो 'अहं ब्रह्मास्मि'स ओळखतो, तो सर्व काही जाणतो.

ब्रह्मापासूनच हे संसार उत्पन्न होते, त्याच्यामध्येच ते निवास करते आणि त्याच्यामध्येच विलीन होऊन जाते. ब्रह्माच्या प्रकाशामुळेच हे जगत् भासमान होत आहे. तो ब्रह्म सहज आनंदरूप आहे, उज्ज्वल आहे, शांत, शाश्वत आणि निष्क्रिय आहे. ज्ञानी आपल्या ज्ञान-ज्योतीच्या बळावर अंधार दूर करून त्याच्यामध्येच विलीन होऊन जातात. तोच परमात्मा आपल्या ब्रह्मा, विष्णु आणि महेश रूपांमध्ये जगाचे सर्जन, पालन आणि संहार करतो. त्याच्याच अधीन सर्व प्राण्यांचे बरे-वाईट कर्म असतात.

तो (ब्रह्म) सर्वमय आहे, भव्यआहे, सर्वश्रेष्ठ आहे. सर्वेश्वर्ययुक्त आहे. तोच सर्वांसाठी शरण आहे, सदा संतुष्ट आहे, अगोचर आहे, शून्य आहे आणि सदा प्रकाशमान आहे. तो सर्व उपाधींपासून मुक्त आहे, स्वतः कल्याण-स्वरूप आहे. तो अमृत आहे. तो फक्त आत्मज्ञानामुळेच ओळखला जाऊ शकतो. त्याच्याच इच्छेमुळे सर्व पुरुष, परमाणु, कर्म, शरीर इत्यादी सर्व कारणांनी स्वत: असमर्थ असून पण या विश्वप्रपंचाची रचना करण्यास समर्थ होऊन जातात.

'प्रियं ब्रह्म' ईश्वर प्रेममय आहे, असे श्रुति-वचन आहे. भक्तिमार्गाचे बीजमंत्र तर हेच आहे. 'अहं ब्रह्माऽस्मि'मध्ये 'तत्त्वमसि'चा निषेध नाही. 'अहं ब्रह्माऽस्मि'च्या अनुभूतीमुळे इच्छा नष्ट होऊन जाते; उपयोगच बाकी राहतो. ब्रह्मज्ञान बुद्धिने होत नाही. ब्रह्मज्ञान हृदयामध्ये होते.

## २५) विश्वोत्पत्ती (ब्रह्मांड निर्मिती) प्रक्रिया : नूतन संकल्पना

ब्रह्मांड निर्मितीच्या कथेची सुरुवात ही प्रकाशाच्या कथेशी होते. ''Let there be light : Mysterious Journey of Cosmic Creativity.'' (प्रकाश पसरू दे : ब्रह्मांड निर्मितीचा गूढ प्रवास) या आपल्या नवीन ग्रंथामध्ये हेन्रिक स्कोलिमोवस्की यांनी अत्यंत सुंदरपणे आपल्या ब्रह्मांडाच्या निर्मितीक्षम शक्तींना उलगडून दाखवले आहे.

**प्रकाश** हा सर्वव्यापी आणि सर्वनिर्माणकारी असून, तो सर्व स्रोतांचा स्रोत आहे. हे ब्रह्मांड हे एक प्रकारचे प्रकाश-मंडल आहे. ते प्रकाशाचे निवासस्थान आहे. प्रकाश संश्लेषण जीवनाशी पृथ्वीच्या सुपीकतेच्या म्हणजेच सुजलाम् सुफलाम् धरतीच्या कथेची सुरुवात होय. ब्रह्मांडाच्या अनंत विस्तारामध्ये सजीव उत्क्रांती ही ब्रह्मांडाच्या प्रवासासाठी अत्यावश्यक आहे.

**उत्क्रांती** ही ब्रह्मांडाची सर्वव्यापक अशी दुसरी शक्ती आहे. ती ब्रह्मांडाच्या वाढीमध्ये आणि विकासामध्ये सहाय्यक ठरते. ती ब्रह्मांडाला गतिमान अवस्थेत ठेवते. प्रत्येकाचे नूतनीकरण घडते. यासाठी आपण उत्क्रांतीचे आभार मानायला हवे (पाहिजे). प्रकाशाने जेव्हा उत्क्रांतीला घडवले त्या क्षणापासून उत्क्रांती ही नित्य कार्यरत आहे. आपल्या उत्क्रांतीच्या प्रवासामध्ये ब्रह्मांड हे सुपीकतेकडे म्हणजेच सुजलाम् सुफलाम्‌मध्ये बुडून निघाले आणि मग पृथ्वी या ग्रहावर जीवन विराजमान झाले. प्रकाशामुळे जीवन निर्माण झाले, आणि उत्क्रांतीने तिचे पालन पोषण केले.

ब्रह्मांडाच्या निर्मिती यात्रेवर सर्वव्यापक प्रभाव टाकणारा तिसरा घटक म्हणजे **काळ** होय. ब्रह्मांड-काळ-परिमाण हे आपल्या भौतिक जीवनाच्या काळ परिमाणाहून वेगळे आहे. हे भौतिक (पार्थिव) काळाहून वेगळे आहे. सर्व ब्रह्मांडीय घटना या ब्रह्मांड काळ परिमाणानुसार घडत असतात. उत्क्रांतीची आपल्या निर्मितीची एक विशिष्ट गती असते. ती काळाने पुरवलेली असते.

**काळ** हा उत्क्रांतीला वाहून नेणारा एक ब्रह्मांडीय (वैश्विक) रथ आहे. काळ हा ब्रह्मांडाच्या प्रत्येक अस्तित्वास अर्थात चराचरास तिच्या चौकटीमध्ये बसवतो. काळ हा एका विशिष्ट वेळेस अस्तित्वाच्या स्वरूपांची इतिश्री (समाप्त) करतो. ब्रह्मांडाची अवस्था, ही एका विशिष्ट वेळेस, प्रकाश, उत्क्रांती आणि काळ या त्रयींच्या संयुक्त परिणाम असते. ब्रह्मांड हे समाकलित असते, आणि ते एकत्वामध्ये कार्यरत असते. उत्क्रांतीसुद्धा एकत्वतेमध्ये कार्यरत असते. मानव जातीचा उद्‌भव (उगम) ही काही उत्क्रांतीची एखादी बाह्य प्रक्रिया नव्हे. उत्क्रांती क्रमश: आणि अनुभवातीतपणे घडते. मानवजात सुद्धा उत्क्रांतीचा क्रमिक आणि लोकोत्तर अंश प्रस्तुत (व्यक्त) करते, आणि मानव जातीच्या माध्यमाने उत्क्रांती ही आपल्या कर्तव्याची भूमिका

बजावीत (वटवीत) असते. स्कोलिमोवस्कीय सिद्धान्तानुसार ब्रह्मांड हे प्रबुद्ध जीवन निर्माण करण्यासाठी आहे. सहभागित्वाचा स्वभाव हे मानवी मनांचे एक अत्यंत आश्चर्यकारक वैशिष्ट्य आहे. स्कोलिमोवस्की यांचे असे मत आहे की, मानवी सहभागित्वाचे मन हे ब्रह्मांडाइतकेच अत्यंत विशाल आणि विदग्ध आहे; कारण ब्रह्मांड हे मनाचे एक अंश आहे.

मानवाचा मेंदू हा निसर्गाचा एक अत्यंत जागरुक असा अवयव आहे. मेंदू म्हणजे ब्रह्मांडास, प्रकाश, उत्क्रांती आणि काळ (प्रउका) यांनी दिलेली एक अप्रतिम अशी देणगी आहे. ते विश्वाचे एक आश्चर्यकारक असे संशोधन आहे. वास्तविक (खरोखर) उत्क्रांती ही स्वत:च आपले गूढ उलगडत आहे, आणि ती मेंदू आणि मनाची एक विशेष देणगी लाभलेल्या मानवजातीस आकर्षित करते. आपल्या सभोवतालचे वातावरण व त्यामधील समस्त प्रक्रिया, संपूर्ण विश्व आणि त्यामधील आश्चर्ये यांना जाणून घेण्याची क्षमता ही मानवी बुद्धी आणि मनामध्ये देणगीरूपाने विद्यमान आहे. ब्रह्मांडाच्या नाडीपरीक्षणाची अनुभूती मानवी मनास असते, आणि ते विश्वाचे कोडे उलगडण्याचे प्रयत्न करते; तिच्या दुविधांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करते. जीवनाला जीवनाशी प्रेम असते. जीवन हे वर्धिष्णू असते. वृद्धिंगतेकडे तिचा कल असतो. विश्वाची निर्जीवाकडून सजीवाकडे वाटचाल अशी उत्क्रांती हा जीवनाचा नियम आहे, आणि हेच विश्वनिर्मितीचे अंतिम उद्दिष्ट आहे. यालाच विश्वाची सुपीकता अर्थात संसेचन असेही म्हणता येईल. विश्वाच्या संसेचनाच्या-सुपीकतेच्या प्रक्रियेमध्ये प्रकाश-उत्क्रांती-काळ (प्रउका) या त्रयीस मानवजातीची गरज (आवश्यकता) भासते. कारण पृथ्वीवर जीवनासाठी अभिरक्षकाची जबाबदारी मानवावर सोपवण्यात आली आहे. ब्रह्मांडास सुजलाम् सुफलाम् करण्याच्या वैश्विक यज्ञामध्ये प्रकाश-उत्क्रांती-काळ (प्रउका) या त्रयीस मानव हा देणगीस्वरूप लाभलेला आहे. पृथ्वीवरील चराचर सृष्टीस सुरक्षित ठेवणे, तिला टिकवणे व तिचा विकास घडवून आणणे या जबाबदारीबरोबरच पृथ्वीवर जीवन प्रफुल्लीत करण्याची संपूर्ण हमी देणे - ग्वाही देणे ही मानवाची जबाबदारी ठरते. सदरहू जबाबदारी योग्य रीतीने पार पाडल्यास एक सजीव पृथ्वी ही जीवन सत्त्वे ब्रह्मांडाच्या इतर ग्रहांवर विखरू शकेल.

### प्रकाशाचे असाधारण महत्त्व : प्रकाश पर्वाचे महत्त्व[५१-अ]

अभावरूपापासून अभावाशिवाय काहीच निर्माण होत नाही. फक्त अष्टपाद कोळी स्वत:मधील द्रवापासून स्वत:चे जाळे विणू शकतो. होय, येथे आपण प्रकाशाबद्दल विचार करत आहोत. प्रकाशाची रचना अनंत असून जबरदस्त आहे. प्रकाशाने गतिमान ग्रह आणि आकाशगंगा यांना निर्माण केले. हे सर्व उत्क्रांतीत आहेत. ते अप्रतिम सौंदर्य आणि अफाट शक्ती असलेली दृश्ये निर्माण करतात. त्यामध्ये मानवाची स्वप्ने कायमस्वरूपी संवर्धित होऊ शकतात, आणि त्याचे छोटे पार्थिव घर म्हणजेच पृथ्वी, मोठे बनून जाऊन सार्थक वाटते. ग्रह आणि आकाशगंगा समस्त भावी जीवनाची रूपरेषा प्रस्तुत करून त्यास प्रत्यक्षपणे अवतरित करतात. ते साक्षात सार्थ प्रक्रिया घडवून आणणाऱ्या प्रयोगशाळा आहेत, जसे कर्ब निर्मितीमधून प्राणी व वनस्पतीसंबंधी सेंद्रीय जीवन आणि मानवी जीवशास्त्रीय जीवन उद्भूत होउ शकते.

प्रकाश हा ब्रह्मांडाचा सहज सजीव ईश्वर आहे. त्याने जीवधारी (सजीव) निर्माण केले – किड्यापासून ते काळविटापर्यंत व तेथून पुढे मानव प्राणी, तुम्ही आणि मी, आईन्स्टाईन आणि बाख. आम्ही सर्वजण प्रकाशाची संतती, मूर्त रूप, दीपस्तंभ आणि त्याचे प्रसारक आहोत.

प्रकाशाने जीवनाच्या प्राथमिक अविकसित स्वरूपांमध्ये प्रथम प्राथमिक अविकसित बुद्धीस निर्माण केले. नंतर त्याने अधिक विकसित प्राण्यांचे मेंदू निर्माण केले आणि मग मानव प्राण्यांमध्ये मनाची निर्मिती केली. शेवटी अति विकसित मानवामध्ये विचारतत्त्व किंवा चिद्रुप वा शब्दब्रह्म म्हणजेच प्रगल्भ बुद्धीस निर्माण केले. विचारतत्त्व हे मनाचे एक रूप आहे. ते मनाच्या इतर प्रकारांहून अधिक सखोल पाहू शकते. ते फक्त स्वयंविद् मनच नसून स्वत: चित्स्वरूप मन आहे. त्याच्यामध्ये प्रत्येकास परावर्तित करण्याची एक विलक्षण क्षमता आहे. ही एक महत् सिद्धी आहे. शेवटी तेजस्वी मनाद्वारे प्रकाश हा आपल्या निर्मितीचे वैभव पाहू शकतो.

प्रकाशाची ही सर्व आश्चर्यजनक कार्ये विकास किंवा उत्क्रांती दर्शवितात. प्रकाश हे उक्रांतीस उघड करून सांगण्याचे एक प्रमुख साधन आहे. ही ब्रह्मांडामधील सर्वात शक्तिशाली अशी ऊर्जा आहे. ते आपल्या विकासाकरिता सर्वात प्रबळ असे साधन आहे. ते आपल्या अस्तित्वाचे असामान्य असे जाळे विणते.

आपल्या क्षमतांना जाणून असणारे आणि विशेषेकरून ज्यास चिद्रूप मनाची देणगी कायमस्वरूपी लाभलेली आहे, असे मानवप्राणी हे ब्रह्मांडीय अष्टपाद कोळीच असतात. ते प्रकाशाच्या वतीने वैश्विक वेलबुट्टीदार कापड विणत असतात. विशेषकरून तो (मानव) जाणीव किंवा बुद्धी विणत असतो. ज्ञानाची प्रत्येक पद्धती ही मनाची सर्वोत्कृष्ट रचना असते. चिद्रूप (शब्द-ब्रह्म) हे प्रकाशाचे सूक्ष्म आणि गुंतागुंतीचे धागे विणत असते. शेवटी ते यथार्थ वाटते. त्याचे आपणास आकलन होते आणि आपण असे उद्‌गार काढण्यास विवश होतो – ''अहाहा! आता मी पाहतो (मला दिसते)!'' ते माहितीचे लहान अंश नसतात. माहितीचे अंश म्हणजे निरुपयोगी ज्ञान! परंतु ते चिद्रूप (शब्द-ब्रह्म) प्रखर ज्ञान असते; ते प्रफुल्लित करणारे अशा प्रकाशाशी निगडित असते.

# २६) प्राणायाम

मनुष्याचे जीवन प्राणशक्तीवर बेतलेले असते. प्राण नसला तर काहीच नाही. जणू काही जगण्याच्य विशेष संकल्पनेला **प्राण** म्हणतात आणि प्राण हे भगवंतांनी दिलेले आश्वासन आहे. 'जोपर्यंत प्राणाची उपासना, प्राणाशी संबंध, प्राणाशी जवळीक राहील तोपर्यंत जीवन व्यवस्थित चालेल.' या परमेश्वराच्या आश्वासनावर जीवन निर्धास्त चालू राहते.

फुफ्फुसे श्वसनसंस्थेचा मुख्य आधार आहे. बाहेरून आत येणाऱ्या हवेत असतो प्राणवायू आणि प्राणवायूमध्ये असतो प्राण. जो सर्वात महत्त्वाचा आहे. या प्राणाचे आकर्षण, संवर्धन करणे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते, कारण या प्राणावरच आयुष्य चालते, याच्या जोरावरच मनुष्य जिवंत असतो व कार्य करतो. म्हणून उठता, बसता, खाता-पिता, झोपता परमेश्वराचे नाव घेऊन, नामस्मरण करून, जीवन सार्थकी लावावे असे बरेच संत सांगतात.

विशिष्ट मंत्रोच्चाराने विशिष्ट कार्य सिद्ध होऊ शकते, असे म्हटले तर त्याचे कारण श्वसन व त्याचे नियम यावर अवलंबून असते. म्हणून **योगशास्त्रात** (ज्यात जड व चैतन्य, शरीर व प्राण यांना जोडण्याची क्रिया केली जाते.) **प्राणायामाचे महत्त्व** अवर्णनीय आहे. हवा आत घेणे, बाहेर सोडणे ही श्वसनाची क्रिया सतत चालूच राहते. श्वसनावर लक्ष न ठेवल्यास परमेश्वराने दिलेल्या आश्वासनाचा काहीच उपयोग होणार नाही. म्हणून श्वसनावर लक्ष ठेवणे ही **प्राणायामाची पहिली पायरी** असते.

प्राण ही जीवनशक्ती आपल्या दृश्य जगताच्या पलीकडची आहे. त्या प्राणाची नीती किंवा आयाम याचा अभ्यास म्हणजे **प्राणायाम**. प्राण प्रकट होतो श्वासातून म्हणजेच श्वासाबाहेरील वायुतत्त्वाद्वारे. या वायुतत्त्वाचे बीज ''यं''. तेव्हा या वायुतत्त्वाद्वारे प्राणापर्यंत पोचण्याच्या अभ्यासास म्हणतात. **प्राणायाम**. (प्राण+यम्) श्वसनाचे विकार झाले की जीव खरोखर मेटाकुटीला येतो. प्राणाचा संबंध मनाशी असल्यामुळे प्राणायामामुळे मनःशक्ती वाढून मन शांत होईल.

प्राणायाम म्हणजे ध्यानाने भगवत् प्राप्ती होत असते. भगवत् प्राप्ती म्हणजे शांती, समाधान, तणावरहित अवस्था व निरामय आरोग्य. पतंजली मुनींनी त्यांच्या अष्टांगयोगात ध्यानाला समाधीच्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा दर्जा दिलेला आहे. अष्टांगयोगात यम-नियम, आसन-प्राणायाम, प्रत्याहार-धारणा, ध्यान-समाधी अशा चार जोड्या आहेत. यम-नियम, आसन-प्राणायाम ही चार अंगे एका बाजूला आहेत, यातील यम व आसन हे बहिर्मुख असतात, त्यांचा उपयोग बाह्य शरीराला अधिक होतो; तर नियम व प्राणायाम अंतर्मुख असतात. बाह्य शरीराला अनुशासन लावण्यासाठी आसने असतात, तर अंतर्शरीराला अनुशासित करण्यासाठी

प्राणायाम असतो. यानंतर येते प्रत्याहार–धारणा ही जोडी. नको असलेल्या गोष्टींचा त्याग करणे म्हणजे प्रत्याहार व ज्या गोष्टी हव्या आहेत त्यांना धरून ठेवणे, त्या सुटणार नाहीत हे पाहणे म्हणजे धारणा. यानंतर येते ध्यान व समाधी. ध्यान हीच समाधी आहे व समाधी हेच ध्यान आहे. ध्यान व समाधी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण चित्ताच्या निरंतर अंतर्मुखतेस 'ध्यान' असे म्हणतात.

प्राणायामाच्या प्रकाशात श्वास आत घेणे, काही काळ आत धरून ठेवणे व सोडणे अपेक्षित असते. सुरुवातीला डाव्या बाजूने श्वास घेऊन उजव्या बाजूने सोडणे आणि उजव्या बाजूने श्वास घेऊन डाव्या बाजूने सोडणे अशी प्राथमिक प्रक्रिया करणे इष्ट असते.

शरीराची दुरवस्था एकवेळ माणसाला जगवील; पण प्राणांची दुरवस्था म्हणजे जीवनाचा नाशच. प्राणशक्तीलाच जीवन म्हटले पाहिजे. श्वासोच्छवास ही प्राणशक्तीची केवळ बाह्य निशाणी आहे. जुन्या कल्पनेप्रमाणे आपण रोज एकवीस हजार सहाशे श्वासोच्छवास करीत असतो. आपल्या शरीरातून हा प्रभंजन, वायु आत बाहेर जात असताना

*'धरितां सो सोडितां हं ।*
*अखंड चाले सोहं सोहं ।।'*

असा 'सोऽहं' चा जप सारखा करीत असतो. श्री समर्थ रामदासांनी 'दासबोधांच्या सतराव्या दशकातील पाचवा समास याच 'सोऽहं' वर लिहिलेला आहे. यालाच 'अजपाजप' असेही म्हणतात. ॐ किंवा प्रणव हाही याच 'सोऽहं' पासून निघाला आहे, असेही म्हणण्याला एक प्रघात आहे. 'सोऽहं' मधून 'स' व 'हं' अशी दोन अक्षरे काढून टाकली तर शेवटी उरले ते ॐ!

ज्या ठिकाणी श्वास व उच्छवास जाता–येताना स्पर्श करतो ती जागा, भ्रमध्ये अगर नाकाचा शेंडा यावर एकाग्र होऊन हा जप केला तर योग्य ते फळ प्राप्त होते अशी समजूत आहे, मात्र तेथे नित्य लक्ष ठेवले पाहिजे. नामजप करीत असताना सोहं मंत्राचे साहाय्य घेतले तर तो नामजप लवकर सफल होतो अशी एक कल्पना आहे.

नाशिकचे गजानन महाराज यांनी सोहंसंबंधी पुढील उद्‌गार काढले आहेत –

''हं या अक्षराच्या मानसिक जपाने उष्णता उत्पन्न होऊन त्याचा परिणाम कुंडलिनीवर पडतो व सः या अक्षराच्या जपाचा परिणाम इच्छाशक्तीवर होतो. मूलधार चक्रांतील प्राणवायूचे ठिकाणी सूर्य व चंद्र असतात आणि हंसः याच्या अंतस्थ जपाने कुंडलिनीचे उत्थापन होते. 'हं' च्या जपाने कुंडलिनी जागृत होते आणि 'सः' चा जप तिला सहस्त्रदलाकडे वर चढवितो. त्याच्या योगाने आपण शक्तिमान झालो आहो असे साधकाला वाटते. जीव व शिव एक झाले आहेत असे वाटून त्या साधकाची तेथे पूर्ण एकाग्रता होते आणि तेथे तो अत्यंत सुखाचा उपभोग घेतो.''

(गजानन महाराज – 'आत्मसाक्षात्काराचा मार्गप्रदीप प्र. २, पृ. २१')

'सोहं' चा जप हा प्राणशक्तीवर ताबा आणण्यासाठीच आहे. प्राणशक्तीवर ताबा आणणारा पुरुषच जगात मोठेपणा प्राप्त करतो.

श्री विवेकानंद आपल्या 'राजयोग' ग्रंथात प्राणशक्तीसंबंधी लिहितात–

''प्राण म्हणजे केवळ श्वासोच्छ्वास नव्हेत हे प्रथम लक्षात बाळगणे महत्त्वाचे आहे. ज्यामुळे हे श्वासोच्छ्वास सुरू राहिले आहेत, त्या चालकशक्तीला प्राप्त अशी संज्ञा आहे. या दृश्य अथवा जड श्वासोच्छ्वासांतील जे चैतन्य अथवा सूक्ष्मरूप त्यास प्राण असे म्हणतात. आपल्या विविध इंद्रियांस विविध प्रकारची शक्ती प्राप्त झाली आहे तीही प्राणामुळेच होय. डोळ्यांनी पाहाणे, कानांनी ऐकणे आणि मनाने विचार करणे या क्रियासुद्धा प्राणशक्तीमुळेच घडून येतात. एकंदरीत प्राण याचा अर्थ शक्ती असा समजावा.''

(श्री विवेकानंद–'राजयोग', द्वितीय खंड, पृ. १७३–७४)

प्राण शब्दाचा वर दिलेला अर्थ एक शक्ती, मानसिक शक्ती असली, तरी प्राणायाम ह्या समासातील 'प्राण' शब्दाचा अर्थ श्वासउच्छ्वास (व त्यांचे नियमन) असाच घेतला पाहिले. म्हणून प्राणायाम म्हणजे श्वासोच्छ्वासाची क्रिया चालू असताना घेतलेला विराम, श्वासोच्छ्वासाचे नियमन करणे होय.

**प्राणायाम**

आपल्या देहापासून उत्पन्न होणारा जो वायू त्यास 'प्राण' असे म्हणतात व प्राणाचा ''आयाम'' म्हणजे निरोध करणे यासच 'प्राणायाम' अशी संज्ञा आहे.

**पूरक**

बाहेरील वायू नासा पुटाने अथवा मुखावाटे उदरात भरणे ह्याला पूरक म्हणतात.

**रेचक**

उदरातील वायू नासापुटाने बाहेर सोडणे, याला रेचक म्हणतात.

**कुंभक**

घागरीत जसे पाणी भरतात त्याप्रमाणे पूरकाने वायू उदरात भरून तो तसाच धारण करणे याला कुंभक म्हणतात.

**प्राणायामाचे प्रकार**

प्राणायाम तीन प्रकारचा सांगितला आहे. १) पूरक, कुंभक व रेचक सहित, २) सहित कुंभक, ३) रहित कुंभक.

**सहित कुंभक –** रेचक व पूरकसहित असलेला. रहित कुंभक–रेचक व पूरक नसलेला. यालाच केवलकुंभक म्हणतात.

आपल्या शरीरातील प्राणशक्ती जरी एकच असली, तरी स्थाने व कार्यभेदाने त्या प्राणशक्तीचे प्राणरूपी दहा स्थूल प्रकार सांगितले आहेत. प्राण, अपान, ध्यान, उदान व समान असे मुख्य पाच प्राण आहेत; तर नाग, कूर्म, कुकल, देवदत्त आणि धनंजय हे पाच उपप्राण आहेत. त्यांची स्थाने पुढीलप्रमाणे आहेत – प्राण–हृदय; अपान–गुद; समान–नाभि; उदान–कंठ, व्यान–सर्व शरीर. नागवायूने ढेकर येतात. कूर्म नेत्रांचे उन्मीलन करतो, कृकल, शिंका आणतो तर देवदत्त जांभई आणतो. धनंजय सर्व शरीर व्यापून असतो, तो मरणानंतरही काही वेळ शरीर सोडत नाही.

प्राणायाम, पूरक, कुंभक, रेचक आणि केवल कुंभक अशा चार प्रकारचा आहे.

**पूरक, कुंभक व रेचक कसे करावे?**

प्रथम पूरक करावयाचा तो 'इडेने' (डाव्या नाकपुडीने) करावयाचा, नंतर कुंभक करून मग रेचक करावयाचा तो 'पिंगलेने' (उजव्या नाकपुडीने) करावयाचा, पुन्हा 'पिंगलेने' पूरक करून 'इडेने' रेचक करावा. साधारणपणे पूरक, कुंभक यांचे प्रमाण १:४:२ असे असावे.

प्राणायाम म्हणजे सूक्ष्म अशा ज्ञानतंतूंशी, मेंदूशी, नव्हे आपल्या शरीरांतर्गत मूल शक्तीशी केलेला भयंकर खेळ आहे. योग्य गुरूचे साहाय्य नसेल तर उन्माद, वेड, अपस्मार, बधिरता, गात्रशैथिल्य इत्यादी अनेक रोगांनी आपण जर्जर होऊ. तेव्हा नीट माहिती घेऊन, तज्ज्ञांकडून प्राणायाम शिकले पाहिजे.

# २७) अनुसंधान

संतांच्या मते, मनःशांती, समाधान, मिळविण्याचा मार्ग आत आहे. आतमध्ये राहणारा भगवंत समाधान रूप आहे. मनाने भगवंताची संगत ठेवता येते. संगतीने सहवास घडतो. सहवासाने तो जवळ बाळगता येतो. तो जवळ बाळगला तर त्याच्याबरोबर त्याचे समाधान आपोआप येते. मनाने भगवंताची संगत घडण्यास त्याचे अनुसंधान ठेवणे हा अनादि राजमार्ग आहे.

अनुसंधान या शब्दाचा अर्थ सतत जोडणे, सतत ऐक्य ठेवणे, पुनःपुनः हेच चिंतन करणे असा आहे. भगवंताच्या अनुसंधानामध्ये 'चित्त' एका ठिकाणी गोळा झालेले असते. मनाचा प्रवाह एकाच दिशेने वाहतो. ईश्वर दर्शन हे साधकाचे जीवन ध्येय निश्चित झालेले असते. ईश्वररूपी संधानाच्या मागे मनाने सतत राहणे याचे नाव अनुसंधान होय.

ईश्वराच्या अनुसंधानाच्या तीन पायऱ्या आहेत -

१) विहित कर्मे करून दिवसाचा नियमित वेळ ईश्वर चिंतनात घालवणे ही पहिली पायरी होय.

२) ईश्वराचे अधिष्ठान देवून व्यवहारात वागणे ही दुसरी पायरी. कोणतेही कर्म किंवा कार्य करीत असताना, ईश्वर आपल्यामागे आहे ही भावना ठेवल्यामुळे अंगी साधकपणा येतो.

३) ईश्वर जीवाला आत बाहेर व्यापून राहणे ही अनुसंधानाची तिसरी पायरी होय.

या पायरीवर जागृती, स्वप्न आणि सुषुप्ति (गाढ झोप) या तिन्ही अवस्थांमध्ये ईश्वराच्या अस्तित्वाचे सतत भान असते.

भगवंताचे अखंड अनुसंधान ठेवण्याचे साधले तर जीवन समाधान पावते, असा सर्व संतांचा स्वतःचा अनुभव आहे. भगवंत कसा आहे, हे ध्यानात येण्यास माणसाच्या अनुभवांचा अर्थ आकलन व्हावा लागतो.

आपल्याला झालेल्या अनुभवातून प्रत्येक माणसाला तीन गोष्टी पदोपदी प्रत्ययास येतात. पहिली म्हणजे माणसाचे जगाबद्दलचे व स्वतःबद्दलचे ज्ञान अपूर्ण असते. दूसरी म्हणजे त्याचे कर्तेपण अपूर्ण असते. तिसरी म्हणजे मृत्यू हा अटळ असतो. प्रत्येकाला आज ना उद्या हे जग सोडून जायचे असते.

माणूस हा अज्ञान, अपूर्णता, अल्पव्यक्तित्व आणि अंतवंत (सान्त) याचे उत्तम उदाहरण आहे. पूर्णाला परमात्मा म्हणतात. त्या परमात्म्यालाच संत आपलेपणाने भगवंत म्हणतात. माणसाला स्थल, कालाच्या मर्यादा असतात याउलट भगवंत असीम, अनंत व अपार आहे. भगवंताच्या ठिकाणी, भूत, वर्तमान आणि भविष्य असा काळाचा भेद नाही.

जागृती, स्वप्न आणि सुषुप्ति या माणसाच्या अवस्था आहेत. या अवस्था येतात आणि जातात. भगवंताला अवस्था नाहीत. भगवंत सत्य, सर्वज्ञ, नित्य, अनंत, अपार, सर्वशक्ती समन्वित, आनंदरूप, अमृत व समाधान रूप आहे. अशा भगवंताचे अनुसंधान ठेवण्यास संत शिकवतात.

मला कळत नाही, ही परमार्थाची पहिली पायरी व मी आणि भगवंत एकच, ही जाणीव परमार्थाची शेवटची पायरी होय. वास्तविक सूर्य व त्याचे किरण हे जसे वेगळे नाहीत त्याप्रमाणे 'मी' व 'भगवंत' वेगळे नाहीत. सत्याची जाणीव झाल्याशिवाय भगवंताची ओळख होत नाही. सत्य वस्तूला उपाधी फार असते. सत्य म्हणजे अखंड टिकणारे ते, म्हणजे परमात्म स्वरूपच होय. सच्चिदानंद स्वरूपाच्या ठिकाणी मन चिकटून राहणे यालाच **अनुसंधान** म्हणतात. भगवंतावाचून इतर सर्व म्हणजेच **उपाधी** होय. 'मला कळत नाही', असे वाटणे ही परमार्थाची पहिली पायरी आहे. जे जे घडते त्याचा कर्ता परमात्मा आहे. 'मी फक्त कर्तव्यापुरता आहे,' असे वागणे यालाच **निष्काम कर्म** असे म्हणतात. शुद्ध भावनेने नाम घेतले की भगवंत वश होतो. दर्शन देतो. नामात शेवटचा एकच श्वास गेला पाहिले. यातच जीवनाचे सर्वस्व आहे.

# २८) योग-प्रकार : एक दृष्टिक्षेप*

हठयोगपासून कुंडलिनी योगापर्यंत चित्तावर ताबा आणणे ही एकच गोष्ट आपल्याला अनुभवास येते हे थोडक्यात पाहिले म्हणजे पुरेसे आहे.

१. **हठयोग** : शरीरावर ताबा आणून, चित्तवृत्ती स्थिर करणे.

२. **राजयोग** : ध्यान-धारणादी गोष्टींनी चित्तवृत्तीवर ताबा आणणे.

३. **ज्ञानयोग** : स्थूलाचे ज्ञान करून घेऊन, वा एकदमच सूक्ष्मांकडे वळून, ज्ञानाने ऐहिक गोष्टीपासून परावृत्त होऊन चित्तावर ताबा मिळविणे.

४. **कर्मयोग** : आपल्याला आवडणारे, पवित्र, देहादिक ऐहिक गोष्टींच्या पलीकडे असणारे कर्म करीत राहून, निरंतर कर्मरत स्वभाव बनविणे व चित्त तेथे लावणे.

५. **भक्तियोग** : विश्वांतील आद्यशक्ती अनंत रूपाने नटलेली आहे, भजन-पूजनादी शुभ कर्मांनी तिला शरण जाऊन, चित्तावर चांगला संस्कार करवून ते मंगल गोष्टींवर लावून नंतर आपल्या स्वाधीन करवून घेणे.

६. **लययोग** : ध्यानावस्थेत जर अनाहत नाद येत असेल, किंवा ज्योतिदर्शन होत असेल तर त्या ठिकाणी एखाद्या विचारावर, वृत्तीच्या हालचालीवर चित्ताची लय तयार करून, अशी लयावस्था वाढवीत जाऊन, वृत्तींवर व नंतर चित्तावर ताबा वाढणे.

७. **मंत्रयोग** : गुरूने दिलेल्या, वा अन्य मार्गाने मिळालेल्या मंत्राक्षरांचा सतत जप करीत मंत्रदेवतेशी, मंत्रांतील शक्तींशी, मंत्रभावनेशी, तादात्म्य पावून चित्रावर जय मिळविणे.

८. **यंत्रयोग** : भूमितीच्या अनेक आकृतींनी युक्त असलेल्या यंत्रावर, संप्रदायांतील संकेताप्रमाणे भावना आरोपित, करून यंत्रपूजा करीत असताना यंत्रावर एकाग्र होऊन, त्यांतील संकेतात्मक शक्तींशी तन्मय होऊन, शेवटी, चित्तस्थैर्य मिळविणे.

९. **तारकयोग** : आरशात स्वतःच्या प्रतिबिंबाकडे पाहात असताना, आपल्या डोळ्यांतील बाहुलीकडे पाहता-पाहता मन एकाग्र करणे व चित्त ताब्यात आणणे.

१०. **गुरूदत्तयोग** : शक्तिपातदीक्षे (गुरुकृपे) नंतर जे अनुभव येतात, त्यांच्याकडे द्रष्टेपणाने पाहता-पाहता चित्तवृत्ती एकाग्र करून चित्तावर ताबा आणणे.

चित्त ताब्यात आले की, जवळ जवळ पाऊण लढाई जिंकली असे म्हणावयास हरकत नाही. अर्थात् कलावंत व लेखक, यंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, संशोधक, गणिती यांचेही चित्त त्यांच्या विषयांशी एकाग्र होतेच. किंवा सामान्य माणूसही नाटक, सिनेमा पाहताना किंवा एखादी कादंबरी वाचताना एकाग्र होतोच. पण ही एकाग्रता,

स्थूल, सूक्ष्म भेद करूनही योगात प्राप्त होणाऱ्या एकाग्रतेपेक्षा निराळी असते. म्हणजेच योगात मिळणारे चित्तैकाग्र्य निराळ्याच स्वरूपात असते. एकदा ते साधले की, 'यत्गत्वा न निवर्तन्ते' अशी योग्याची स्थिती असते. म्हणून तुकारामांनी,

*"मन हे मोगरा । अर्पुनि ईश्वरा । पुनरपि संसारा । येणे नाही ।।*
*मन हे शेवंती । अर्पू भगवंती । पुनरपि संसृति । होणे नाही ।।*
*मन हे तुलसी । अर्पू हृशीकेषी । पुनरपि जन्मासी येणे नाही ।।*
*तुका म्हणे ऐसा । जन्म द्यावा देवा । सदा घास व्हावा । वैकुंठासी ।।"*

असे म्हटले आहे.

योगाचे विविध पैलू किंवा भाग आणि त्यांचे एकमेकांशी असलेले सर्वसामान्य परस्पर संबंध हे संक्षिप्तपणे पुढील सारणीत दाखविल्याप्रमाणे मांडता येईल –

| | **योगाचा प्रकार** | **प्रभुत्व प्रस्थापणे** | **योगिक नियंत्रणाकडे अग्रेसरता** |
|---|---|---|---|
| I | हठयोग | श्वासावर | भौतिक शरीर व मानसिक सामर्थ्य. |
| II | लययोग<br>१) भक्तियोग<br>२) शक्तियोग<br>३) मंत्रयोग<br>४) यंत्रयोग | संकल्पावर<br>प्रेमावर<br>ऊर्जेवर<br>ध्वनीवर<br>रूप–आकारावर | मनाच्या शक्ती.<br>दिव्य प्रेमाच्या शक्ती.<br>निसर्गशक्तींना प्रोत्साहन.<br>ध्वनीच्या शक्ती. कंपनशक्ती.<br>भौमितीक आकाराच्या शक्ती. |
| III | ध्यानयोग | विचारावर | विचारप्रणालीच्या शक्ती. |
| IV | राजयोग<br>१) ज्ञानयोग<br>२) कर्मयोग<br>३) कुंडलिनी योग<br>४) समाधी योग | पद्धतीवर<br>ज्ञानावर<br>क्रियेवर<br>कुंडलिनीवर<br>'स्व' वा 'आत्मत्'वर | तारतम्यशक्ती.<br>विवेकशक्ती.<br>क्रियाशक्ती.<br>आत्मिक उमेदाचे बळ.<br>परमानंदशक्ती. |

(* प्रा. श्री. शं. खानवेलकर – 'श्री गुरूदत्तयोग' (शक्तिपात रहस्य)– पृ. ५४३–५४४)

## २९) शक्तिपात किंवा गुरूकृपा किंवा गुरूप्रसाद

सद्गुरूने दिलेला योग तो गुरूदत्त योग. गुरूदत्तयोगाला अन्यत्र महायोग, सिद्धयोग, शक्तिंसचार, शक्तिपात संप्रदाय इत्यादी अनेक नावे दिलेली आढळतात. सद्गुरूने नाम दिले, एखादे साधन दिले, मंत्र दिला वा अन्य एखादी उपासना दिली की शिष्याला त्याच क्षणाला एखादा अनुभव येऊ लागतो. असा नवा अनुभव आला की तो शक्तिपात झाला, असे म्हणजे क्रमप्राप्तच होते. परंतु गुरूदत्त योगाचे वैशिष्ट्य अशा एखाद्या नव्या अनुभवात नसून, शिष्याला त्या दिवसापासून अनुभवाचे नवे जग खुले होते, त्याच्या स्वतःच्या मार्गाने त्याचा विकास होऊ लागतो व त्याला आपोआप ज्ञान प्राप्त होऊ लागते आणि हाच ह्या योगाचा विशेष आहे.

आपली विद्या, कला, आध्यात्मिक अनुभव, स्थूल वा सूक्ष्म ज्ञान, शब्दशक्ती, क्रियाशक्ती, अनुभवशक्ती किंवा ज्ञानशक्ती यांच्याद्वारा शिष्याच्या ठिकाणी संक्रांत करणे म्हणजे **शक्तिपात** होय. शिष्य ज्या मानाने, मृदू, मध्य किंवा तीव्र संवेगाचा असेल त्याप्रमाणे त्याच्या ठिकाणी त्या शक्तिपाताचा अनुभव मृदू, मध्य, तीव्र प्रकारे दृग्गोचर होतो. एकनाथांनी लिहिल्याप्रमाणे, चकमकीतून उडालेल्या ठिणगीचा जसा तुळईवर परिणाम होत नाही पण कापसावर मात्र ताबडतोब परिणाम होतो, त्याप्रमाणेच, तीव्र संवेगाच्या शिष्यावर शक्तिपाताचा फार लवकर परिणाम होतो. तद्वतच गुरू आणि शिष्य यांच्या एकमेकांना पूरक होण्याच्या क्षमतेवर अवलंबून असतो.

यासाठीच अध्यात्ममार्गात गुरूला–सद्गुरूला फार महत्त्व आहे. शिष्याच्या वासना जाळून टाकून, त्याचा माया–मोह दूर करून, त्याच्या अणुमय मनाला शुद्ध करून, ते विभुमय मनाशी जोडून, त्याला साक्षित्व देऊन, परमेश्वरी सामर्थ्यात एकरूप करून साक्षात्कार देणारा सद्गुरू सर्वश्रेष्ठ आहे. सद्गुरूच्या महिमानाचे वर्णन करावे तेवढे थोडे आहे. कैवल्याचा दाता, मोक्षपेठेचा धनी, अज्ञानाचा अंधकार दूर करणारा ज्ञानसूर्य, शिष्याच्या जीविताची, मनाची, आत्म्याची काळजी घेणारा रक्षक, प्रेममय दृष्टींनी शिष्याकडे पाहून त्याला सन्मार्गावर आणणारा अत्यंत प्रेमळ असा पालक अशा अनेक विशेषणांनी गौरविले. तरीसुद्धा सद्गुरुची योग्यता कळावयाची नाही. अशी महान 'विभूतीच' शक्तिपाताला योग्य असते. शिष्यामध्ये ज्ञान संक्रांत करणारे गुरु स्वभावभेदाप्रमाणे व साधनांच्या अनेकतेमुळे अनेक प्रकारचे असू शकतात.

श्री. आण्णा कामतांनी, 'नामचिंतामणि' ग्रंथात बारा प्रकारच्या गुरुंची यादी व माहिती दिली आहे. त्यांची नावे अशी – १) धातुर्वादी गुरु २) चंदन गुरु ३) विचार गुरु, ४) अनुग्रह गुरु, ५) परिस गुरु, ६) कच्छप गुरु, ७) चंद्र गुरु, ८) दर्पण गुरु, ९) छायानिधि गुरु, १०) नादनिधी गुरु, ११) क्रौंचपक्षी गुरु आणि १२) सूर्यकांत गुरु.

श्री. आण्णा कामत म्हणतात, ''शिष्याच्या अंतरंगात गुरुप्राप्तीची तळमळ उत्पन्न झाल्यावर परमात्मा शिष्याच्या प्रकृतिभेदानुसार अथवा सुकृततारतम्यानुसार निरनिराळ्या अधिकाराचे गुरु गाठ घालून देतो.''

आपली शक्ती शिष्याच्या ठिकाणी संक्रांत करून, शिष्याची अध्यात्मिक शक्ती जागृत करून त्याला अनेक अनुभव घेण्याची पात्रता आणण्याचे कार्य शक्तिपातदीक्षा करते. हा अनुभव शिष्याला स्पर्श, शब्द, दृष्टि व संकल्प ह्या माध्यमांच्या द्वारा देता येतो.

पक्षी आपल्या पंखांच्या स्पर्शाने अंडी उबवितो आणि पिलांचे संवर्धन करतो, त्याप्रमाणे गुरू स्पर्शदीक्षा घेऊन शिष्याला स्पर्श करून शक्तिपात करतो.

मासे केवळ दृष्टिद्वारा आपल्या अपत्यांचे पोषण करतात; त्याप्रमाणे केवळ दृष्टिपाताने गुरू शिष्याला दृक्‌दीक्षा (शिष्याकडे कृपाळू दृष्टीने पाहून) देऊन कृतार्थ करतो. गुरूदृष्टीला अमृतदृष्टि, कृपालदृष्टि इत्यादी म्हणण्याचा प्रघात आहे, तो या प्रकारच्या दीक्षेला अनुसरून असावा.

कासवी कोठेही असली तरी मनातल्या मनात पिलांचे चिंतन करून त्यांचे पोषण व्हावे अशी इच्छा करते. त्याचप्रमाणे शिष्याला अनुभव प्राप्त व्हावा असा गुरूने संकल्प केला की ती संकल्पदीक्षा किंवा ध्यानदीक्षा होते.

या सर्व प्रकारच्या दीक्षांना **वेधदीक्षा** असेही म्हणतात. कारण त्यात षट्‌चक्रांचा वेध करणे हे मुख्य कार्य असते.

स्पर्श, दृष्टि व संकल्प याप्रमाणेच शब्ददीक्षाही देता येते. शिष्याला दीक्षा देतो असे सांगण्याचाच अवकाश की त्याचे काम होते. सर्व दीक्षाप्रकारांच्या बुडाशी सद्‌गुरूंची संकल्पशक्ति, हे एकच मूळ कारण असते; मग ती संकल्पशक्ति स्पर्श, दृष्टि, संकल्प या द्वारा किंवा नुसत्या पत्रलेखनाद्वाराही प्रकट होते. सद्‌गुरूची इच्छा मात्र पाहिजे. स्पर्श, शब्द, दृष्टि (चाक्षुषी) आणि संकल्प ह्या चतुर्विध दीक्षांचा मूळ हेतू जरी सद्‌गुरूसंकल्प असला तरी माध्यामानुरूप त्या दीक्षांच्या स्वरूपात थोडा फरक पडतो. स्पर्श, भाषण, दर्शन आणि संकल्प यांच्या माध्यमांच्या द्वारा स्थूल, सूक्ष्म, सूक्ष्मतर व सूक्ष्मतम दीक्षा देता येतात. अशी दीक्षा मिळाल्यावर कित्येकांना **गुरूसाम्य** प्राप्त होऊन तेही दुसऱ्याला दीक्षा देण्यास समर्थ होतात, तर काही स्वतःचीच उन्नती करतात.

वटवृक्ष अक्कलकोट, स्वामी महाराजांचा उपदेश फक्त चक्षूने होत असे. ते आलेल्यास कृपादृष्टीने पाहून, त्याची वृत्ती एकाग्र करून त्याचे अंतःकरणात प्रेमबोध भरून सोडत असत. या संदर्भात प्रसिद्ध सूफ़ी संत व सद्‌गुरू ख्याजा बाक़ी बिल्लाह यांचे दृष्टांत प्रख्यात आहे. त्यांनी आपल्या एका दृष्टिक्षेपात परम इच्छुक सच्छिष्य जनाबाई (आचारी) यास हुबेहूब आपल्यासारखेच बनवून सोडले.

ही गुरूसाम्याची पराकाष्ठा आहे. कारण पाहणाऱ्यांना या दोघांपैकी वास्तविक गुरू कोण आहे. याविषयी त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता. नाशिकच्या गजाननमहाराजांनी ज्यांना 'सोऽहं' मंत्राची दीक्षा दिली त्यांपैकी बहुतेकांना प्रकाशाचा, तेजाचा व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दृश्यांचाच अनुभव आला.

श्रीसमर्थांच्या दीक्षापद्धतीत 'कल्पना मोडून मनाचा एकदम लय लावावा' अशी एखादी पद्धत असावीसे वाटते. ज्ञानाच्या कपाटाची किल्ली सद्गुरुकृपेने प्राप्त झाली की कल्पना मोडून निर्विकल्प अवस्था प्राप्त होते.

शक्तिपातदीक्षा झाली की गुरूचे काम जवळ जवळ शिल्लक राहात नाही. आकाशात फेकलेला स्वयंचलित अग्निबाण (रॉकेट) जसा मधून मधून आपोआप होणाऱ्या स्फोटांतून वरवर जात असतो तसेच साधकाचे होते. शक्तिपातदीक्षा झाली की, साधकाला अनेक प्रकारचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक व काही प्रसंगी अतींद्रिय स्वरूपाचे अनुभव येतात.

जर दीक्षा बरोबर झाली व शक्तिपात झाला तर त्याची लक्षणे प्रबोध व आनंद होतील, कारण ती परमशक्ति प्रबोध व आंनंदरूपिणी आहे. प्रबोध व आनंदाची चिन्हे कंप, रोमांच, स्वर, नेत्रादिकांची विक्रिया या रूपाने आत अनुभवाला येतात. मालिनी -विजय तंत्रात सांगितले आहे की, तीव्र शक्तिपात झाल्याने निम्नोक्त लक्षणे विनाप्रयत्न प्रकट होतील-शिवाच्या ठिकाणी दृढ भक्ती, तत्काल प्रत्ययकारक मंत्रसिद्धी, सर्व प्राण्यांना स्वाधीन ठेवण्याची योग्यता, प्रारब्धकर्माचा शेष, कविता रचण्याची आणि समस्त शास्त्ररहस्य समजण्याची योग्यता.

दीक्षेचे अनेक प्रकार आहेत. अग्निपुराणात क्रियावती व ज्ञानवती असे दोन प्रकार सांगितले आहेत. शारदातिलकात क्रियावती, वर्णमयी, कलात्मा आणि वेधमयी अशा चार प्रकारच्या दीक्षा सांगितल्या आहेत.

शक्तिपाताचा हेतू मोक्ष आहे असे कोणी मानतात, तर शिवशक्ति सामरस्य आहे असे कोणी मानतात. बहिर्मुखतेतून अंतर्मुखतेकडे जाण्याचा, म्हणजेच नीचतेतून उन्नतीकडे जाण्याचा हा मार्ग आहे असे कोणी मानतात, तर स्वतः शिवस्वरूप होणे हेच शक्तिपाताचे ध्येय आहे. असे मानणारेही आहेत. गुरूस्वरूप होणे एवढेच शक्तिपात दीक्षेचा हेतू मानणारेही आहेत. जे. कृष्णमूर्ती यांनी 'ज्ञानाचा उदय' हे शक्तिपाताचे ध्येय सांगितले आहे. त्यांच्या मते साधकाला ज्ञानाच्या शोधार्थ कोठे जावे लागत नसून ज्ञानच आपोआप त्याच्याकडे चालत जाते. पण त्यासाठी साधनाची आवश्यकता मात्र आहे. - १) सर्व पूर्व संस्कार काढून टाकणे, २) उत्स्फूर्त क्रिया; ३) मनाची निःस्तब्ध व शांत अवस्था आणि ४) ज्ञानोदय.

आपल्याला जे प्राप्त झाले आहे ते ज्ञान, तो अनुभव दुसऱ्याला जशाचा तसा देणे किंवा ते ज्ञान व अनुभव मिळविण्याला पात्र करणे हे शक्तिपाताचे ध्येय आहे. शक्तिपात म्हणजे अध्यात्म मार्गावरील साक्षरतेची सुरुवात. साधक साधन करीत राहिला, जागरूकपणे त्याने आपल्या अनुभवांकडे पाहिले, वृत्ती स्थिर करता करता आपले जीवन पवित्र व शुद्ध करण्याचा प्रयत्न केला की त्याला त्याच्या मार्गात सिद्धी मिळते.

शक्तिपात दीक्षेने साधकाला 'द्रष्टेपणा' प्राप्त होऊन तो अधिकाधिक अंतर्मुख होतो आणि विश्वात्मक मनाशी स्वतःच्या मनाचा लय करण्यास समर्थ होतो. हेच शक्तिपात रहस्य होय ! यासाठीच सद्गुरूची आवश्यकता असते.

सारांश, सद्गुरूने केलेल्या शक्तिपातदीक्षेने साधकांची अंतःशक्ती (कुंडलिनी) जागृत होते. आपल्या पूर्वार्जित संस्काराप्रमाणे ज्ञानाची एखादी शलाका योगी ज्ञानतंतूंच्या पडद्यावर प्रतिबिंबित करतो. अनंत व अगाध सागरातील एखादे मोती रत्न त्याला त्याच्या कुवतीप्रमाणे मिळते. कुंडलिनी जागृती म्हणजे हेच !

''ते कुंडलिनी जगदंबा । जी चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ।।''
– (ज्ञानेश्वरी –६:२७२) असे ज्ञानदेवांनी म्हटले ते याचसाठी. प्राणशक्ती आणि ज्ञानशक्ती यांचे शुद्धीकरण होऊन, सबल अवस्थित, सुषुम्ना मार्गात त्यांचे परिणामकारक व प्रयत्नपूर्वक केलेले मीन म्हणजेच कुंडलिनीचा उदय ! या उदयानंतर साधकास विविध प्रकारचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक अनुभव येऊ लागतात त्यामुळे तो 'द्रष्टा' होतो आणि अनुभवांकडे लक्ष देतां देतां एकाग्र होतो. त्या एकाग्रतेतूनच त्याचा पुढचा मार्ग खुला होतो.

ह्या सर्व अनुभवांत 'प्रज्ञा' जागृत होणे हा अनुभव अतिश्रेष्ठ असून, जागृत झालेल्या प्रज्ञेच्या योगे साधक् महाज्ञानाचा अधिकारी होतो, त्याला जगात मिळविण्यासारखे काही राहात नाही आणि जीवनाचे महाव्रत आचरण करणे त्याला साधते !

## ३०) एकाग्रता व एकविधता

एकाग्रता व एकविधता या मनातील टोकाच्या अवस्था आहेत. एकाग्रता व एकविधता हे दोन्ही प्रकार एकाच स्वरूपाचे आहेत. अशी फार मोठी चुकीची समजूत सामान्य लोकांमध्ये प्रसृत आहे. वास्तविक एकाग्रता आणि एकविधता हे दोन प्रकार संपूर्ण भिन्न असून, त्या दोन्हीमध्ये कुठेच व कसलेही साम्य नाही. किंबहुना, एकाग्रता नेमका उलट प्रकार एकविधतेचा आहे. एकाग्रता या प्रकारात सर्व गोष्टी बाजूला सारून एका विशिष्ट ठिकाणी मन स्थिर करायचे असते. याच्या उलट एकविधता या प्रकारात सर्व गोष्टींचे भान घेत असताना अनुसंधान मात्र एकाच गोष्टीचे असते.

थोडक्यात काम किंवा अभ्यास करताना एकाग्रता साधायची असते. तरच ते काम करण्यात माणूस यशस्वी होतो किंवा अभ्यास करण्यात विद्यार्थी उत्तम यश संपादन करतो; परंतु परमार्थाच्या क्षेत्रात महत्त्व आहे ते एकविधतेला. लोक समजतात त्याप्रमाणे एकविधतेला नाही. परमार्थाच्या क्षेत्रात बहुतेक सर्व साधक मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करतात आणि मन एकाग्र होत नाही, म्हणून नैराश्य व वैफल्य यांनी ग्रस्त होऊन साधनाच करायची सोडून देतात. अनेक साधक त्राटकसारखे प्रकार करून डोळे बिघडवून घेतात किंवा मन एकाग्र करण्याच्या कल्पनेच्या आहारी जाऊन मेंदू बिघडवून घेतात.

याचे कारण एकच की, अशा साधकांना सद्‌गुरूंचे योग्य मार्गदर्शन नसते. सद्‌गुरूंच्या कृपाप्रसादाशिवाय परमार्थ नाही, हे सर्व संतांनी निक्षून सांगितले आहे. अर्थात् माळमंत्र देणारे गुरू संतांना अभिप्रेत नाहीत, तर 'शाब्दे परेच निष्णात' असे सद्‌गुरू संत-महात्म्यांना अभिप्रेत असतात. कुठल्याही व्यक्तीचे किंवा वस्तूचे अनुसंधान साधण्यासाठी त्या व्यक्तीचे किंवा वस्तूचे प्रथम दर्शन किंवा अनुभव असावा लागतो. कारण, त्याशिवाय कोणालाही अनुसंधान करता येणे शक्यच होणार नाही. त्याचप्रमाणे परमार्थाच्या क्षेत्रात सद्‌गुरूकडून देवाची ओळख झाल्याशिवाय किंवा दर्शन झाल्याशिवाय साधकाला देवाचे अनुसंधान साधता येणे शक्यच नाही. असे हे देवाचे अनुसंधान साधण्याची युक्ती सद्‌गुरू आपल्या शिष्यांना, साधकांना शिकवतात आणि सद्‌गुरूंच्या त्या युक्तीलाच खरा योग म्हणतात.

# ३१) लययोग*

लययोगाचे प्रवर्तक हा योगप्रकार सर्वश्रेष्ठ मानतात; इतकेच नव्हे तर भक्ती, ज्ञान, वैराग्य इत्यादी गुणांचा उत्कर्ष स्वतःच्या ठिकाणी करावयाचा असेल तर साधकाला लययोगाचा आश्रय केल्यावाचून चालणार नाही असे लययोगाच्या अभिमान्यांचे म्हणणे आहे. लययोग व त्याचे प्रकार समजून घेतले तर या म्हणण्यात बरेच तथ्य आहे असे दिसून येते. हठयोग, राजयोग, मंत्रयोग किंवा अन्य प्रकारांतून जे साधावयाचे असते, वृत्तीच्या सर्व अवस्थांचा एका मंगल ठिकाणी जे लय करावयाचा असतो तोच या योगात प्रमुख समजला जातो.

मंत्रयोग, हठयोग, लययोग व राजयोग असे चार योग प्रकार 'शिवसंहितेत' सांगितले आहेत. श्री. शंकराचार्यांनी, 'योगतारावलि', 'मनोलय', 'नादानुसंधान' या स्फुट प्रकरणात लययोगाचा पुरस्कार केला असून श्रीशंकरांनी लययोगाचे सवालक्ष प्रकार सांगितले असून, त्यांत नादानुसंधान श्रेष्ठ आहे असे म्हटले आहे. 'हठयोगप्रदीपिकेत' तर आदिनाथने लययोगाचे सवाकोटि प्रकार सांगितले आहेत व त्यांत नादानुसंधान मुख्य आहे असा उल्लेख आहे.

वासनांचे संयमन करून त्याचा क्षय करता करता वृत्तीच्या सर्व अवस्थांसहित तिचा आत्मस्वरूपात लय करणे हे लययोगाचे साध्य असून, शरीरांतर्गत नवचक्रांवर लय करणे, नादानुसंधान, प्रकाशानुसंधान, प्रणवजप करीत असताना प्रणवाच्या मात्रांच्या ठिकाणी मनाचा लय करणे, वृत्ति अवस्थांचा लय, अहंभावाचा लय, कुंडलिनी जागृतीनंतर सहस्रदल कमलात प्रकृति पुरुषांच्या द्वैतभावाचा लय करून त्यातून जीवात्मा व परमात्मा यांच्यातील अद्वैतभावाचे ज्ञान करून घेणे इत्यादी प्रकार लययोगात मोडतात. इतकेच नव्हे तर, लययोगी ज्ञानाच्या सप्तभूमिका सहज ओलांडू शकतो.

हा लय कसा साधावयाचा याचे विविध मार्ग आहेत. हठयोगामध्ये बऱ्याच पुढे गेलेल्या साधकालाच लययोग साधतो असेही काही ठिकाणी म्हटले आहे. तर काही ठिकाणी अष्टांगयोग व लययोग एकच असाही उल्लेख आढळतो. अर्नेस्ट वुड् हे कुंडलिनीयोग व लययोग एकच आहे असे मानतात. अर्थात् लययोगातील विविध पद्धतीमुळे असे भिन्न नामकरण होणे शक्य वाटते.

भगवान व्यासांनी शरीरांतर्गत नवचक्रांवर लय करावा असे म्हटले असून, त्यापासून अनेक सिद्धी प्राप्त होतात व साधकाला मुक्ति मिळते, असे म्हटले आहे. नवचक्र लयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे –

१) **मूलाधार** : भगाकृति. येथे तेजोरूपा कुंडलिनी साडेतीन फेटे घालून झोपली आहे. तेथे लय केला की मुक्ति मिळते.

२) **स्वाधिष्ठान** : प्रवालांकुराप्रमाणे येथे उड्डियानपीठ आहे. येथे चिंतन केले की जगाला आकर्षण करता येते.

३) **मणिपूर** : या ठिकाणी विजेसारखी चित्तस्वरूपा भुजंगी शक्ती पाच फेटे घालून बसलेली आहे. या ठिकाणी लय केला की सर्व सिद्धी प्राप्त होतात.

४) **अनाहत** : या ठिकाणी ज्योतिस्वरूप हंस आहे, त्याचे ज्ञान झाले की सर्व जग वश होते.

५) **विशुद्ध** : या जागी निर्मल ज्योति आहे. तिच्या ध्यानाने साधक सिद्धपुरुष होतो.

६) **ललना** : तालुमूलाच्या ठिकाणी हे ललनाचक्र असून, त्यालाच दशमद्वार म्हणतात, त्या ठिकाणी चित्ताचा लय केला की साधक मुक्त होतो.

७) **आज्ञा** : या स्थानी असलेल्या वर्तुलाकार ज्योतीचे ध्यान केले की साधकाला मोक्ष मिळतो.

८) **ब्रह्मरंध्र** : हे सुईच्या टोकाप्रमाणे धूम्राकार असून याला जालंधर असे नाव आहे. येथे लय केल्याने निर्वाणपद प्राप्त होते.

९) **सोमचक्र** : या स्थानी सच्चिद्रूपा अर्धशक्तीचा वास असतो.

ह्यानंतर दुसरा प्रकार म्हणजे **नादानुसंधान** होय. आपल्या नाड्या शुद्ध झाल्या की आपल्याला अनाहत नाद ऐकू येतो. त्या अनाहत नादाच्या ठिकाणी मनाचा लय केला की ध्येय साध्य होते. नादानुसंधान करीत असताना, नादातच वृत्तीचा लय होतो. इंधन संपल्यावर जसा अग्नी नाहीसा होतो तद्वतच नादांतर्गत झालेले चित्त नादासह विलीन होते. हठयोग व लययोग हे उपाय राजयोगाच्या सिद्धीसाठी आहेत व राजयोगसिद्धी नादानुसंधानाने प्राप्त होते. नादानुसंधानाने पापसंचयाचा क्षय होतो, असे हठयोगप्रदीपिकेत वर्णिलेले आहे.

लययोगाच्या ध्यानाला बिंदुध्यान असेही म्हणतात. या प्रकाराने साधन करणारा साधक प्रकृतीच्या सूक्ष्म रूपाचे बिंदूरूपात दर्शन घेतो. गुरू मुखाने गूढ लयक्रिया जर त्याला प्राप्त झाल्या तर अंतिम समाधी साधणे त्याला कठीण जात नाही. लययोगाच्या समाधीला 'महालय' असे नाव आहे. लयक्रियांच्या साधनाने कुंडलिनी जागृति होते व ती कुंडलिनी पुरुषामध्ये लीन होते, म्हणूनच तो लययोग होय, अशी लययोगाची उपपत्ती दिलेली आहे.

लययोगाच्या सिद्धांताप्रमाणे समष्टिरूपी ब्रह्मांड व्यष्टिरूपी मनुष्यपिंडात वास्तव्य करीत असते, त्यामुळे लययोगी शरीरातील अलौकिक बिंदूच्या ठिकाणी लय करून सर्व ब्रह्मांडाचे ज्ञान आपल्या आसनावर बसून करून घेऊ शकतो.

# ३२) यंत्रयोग*

मंत्र, तंत्र आणि यंत्र असे शब्द आपल्या नित्य कानावर येतात. पण तज्ञ व्यक्तीशिवाय ह्या शब्दांचे परस्परांशी संबंध कोणते आहेत ते कळत नाही. मंत्रयोगाचा विचार केला की त्याबरोबरच यंत्रयोगाचा विचार करावा लागतोच. वास्तविक पाहता ''यंत्रयोग'' असा काही निराळा योग आहे, असे नाही. काही ठिकाणी तसे वर्गीकरण केलेले आढळले तरी तंत्राचाच तो भाग आहे, हे यंत्रांची माहिती घेतली की सहज ध्यानात येईल.

शास्त्र संप्रदायात मंत्र व यंत्र यांना फार महत्त्व आहे. प्रत्येक मंत्राच्या बीजाक्षरांत त्या त्या देवतेचे नाम, रूप, गुण आणि कर्म यांचा बोध उपासना क्रमाप्रमाणे होतो. बिंदू, त्रिकोण, पंचकोन, षट्कोन, वर्तुळे इत्यादी एक किंवा अनेक आकृतींनी लिहिलेले देवताबोधक चिन्ह म्हणजे **यंत्र** होय. देवतेचे सर्व स्वरूप ते बिंदुकोणात्मक चिन्हांनी नियंत्रित करते म्हणून त्याला **यंत्र** म्हणतात. प्रत्येक देवतेला मंत्र व यंत्र असतेच आणि त्या देवतेची उपासना पद्धती ज्या ग्रंथात सांगितलेली असते तो ग्रंथ म्हणजे **तंत्र** होय. मंत्र, तंत्र, व यंत्र यांचा संबंध असतो, असे शास्त्रात म्हटले आहे. साधक व उपासना ह्यांच्या भेदाप्रमाणे यंत्रे विविध प्रकारची असतात व ती यंत्रे कशी व कोठे वापरावयाची याचे नियम ठरलेले असतात.


जारण, मारणादि साधनांत गजचर्म, खरचर्म यांवर माणसांच्या अस्थीने यंत्रे काढावयाची पद्धत आहे, असे मंत्र महोदधीत म्हटले आहे. ज्याच्यावर यंत्र काढावयाचे तो पृष्ठभाग, शाई व टांक साधनभेदाप्रमाणे निरनिराळी असू शकतात. यंत्राचा पृष्ठभाग सपाट असतोच असे नाही. यंत्र लिहून झाले की, त्यात मंत्र बीजांचा विन्यास करतात आणि ते पूजेला योग्य होते.

साधकाने स्वतः देवता स्वरूप होणे हे शक्तिसाधनेचे ध्येय असल्यामुळे मूर्तिपूजेची कल्पना शास्त्र संप्रदायात मुख्यत्वेकरून आढळत नाही. यंत्रपूजा काही काळ केल्यानंतर शेवटी त्या यंत्राची म्हणजेच देवतेची आपल्या शरीरावर कल्पना करून यंत्र मूळ शक्तिपीठाच्या ठिकाणी अर्पण करावयाची पद्धत उच्च साधनात प्रगति केलेल्या तांत्रिकांत आहे.

शक्तिसाधनांत पशु, वीर आणि दिव्य अशा तीन अधिकाराचे साधक असतात व ते या यंत्रांचा निरनिराळा उपयोग करतात. पशु साधक बाह्य, जड यंत्रांची पूजा करतात, वीरसाधक स्त्रीच्या शक्तिमय शरीरावर यंत्राची कल्पना करून स्त्रीदेहाची उपासना करतात आणि दिव्यसाधक स्वतःच्याच शक्तिमय देहावर यंत्ररचना करून अंतर्यजन करतात.

शास्त्र साधनेत स्त्री देहाचा उपयोग करून घेतलेला आहे, त्यांत महान अर्थ आहे. शास्त्रांच्या साधनांत मंत्र हे प्रधान साधन असून, मंत्राची वाचक शक्ती हे शक्तित्वाचे मूलस्वरूप आहे. ह्या मंत्राची वाचक शक्ती मंत्राच्या वाच्यदेवतेला प्रकट करणे असे शास्त्रसाधनेचे मत आहे. सांख्य व वेदांत्याप्रमाणे केवळ ज्ञान, त्याग आणि वैराग्यावर शास्त्रांनी भर दिलेला नसून भोग आणि मोक्षाची एक वाक्यता करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या साधनात व तत्त्वज्ञानात केला आहे. स्त्री जातीची प्रतिष्ठा आणि वंदनीयता यांना शास्त्रात फार किंमत दिली जाते. स्त्री ही धर्मसाधनेत फार मोठी सहायक आहे असे ते मानतात आणि आचरणात आणतात. मंत्र जेव्हा वाच्यदेवता स्पष्ट करतो तेव्हा त्याला **विद्या** म्हणतात. विद्यामय शरीर होणे हे मंत्राचे रहस्य आहे. 'विद्याशरीरवत्ता मंत्ररहस्यम्।।'

देवतेचे शरीर बीजाक्षरांतून प्रकट होते. परमशिवाचे, परमदेवतेचे शक्तिमय स्वरूप, शब्दब्रह्म अथवा नादब्रह्माच्या आश्रयाने साधकाच्या चित्तात प्रकट होते. स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा साधकांच्या तीन भूमिकांप्रमाणे ते स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन रूपात प्रकट होऊ शकते. मूळ परदेवतेचे स्वरूप चिन्मय व आनंदमय असून त्या आनंदघन चेतनांतून तीन रेखा प्रकट होतात. मध्य केंद्राला परबिंदु किंवा प्रधानदेवता म्हणतात आणि त्या आनंदघन परबिंदूतून प्रकट होणाऱ्या तीन रेखा ज्ञान, क्रिया व इच्छा ह्या तीन अपरबिंदूंना जोडतात. असा हा सबिंदु त्रिकोण मुख्य चिदाकाशात प्रकट होतो. हे आद्य विमर्शशक्तींचे सूचक असे यंत्र आहे व त्याला **शाक्त-परबिंदु** म्हणतात. (खालील आकृती पाहा.)




ह्या यंत्रात परबिंदूला शून्य अशी संज्ञा देतात, परंतु 'शून्य' चा अर्थ अभाव असा नाही. सच्चिदानंदाचे मूलतत्त्व स्वतःच्या अंतर्गत सामर्थ्याने प्रकट होण्याइतके उद्योगशील नसने म्हणून ते शून्य आहे इतकेच. ज्या वेळी शून्यात महाकालाच्या प्रभावाने अहंभाव उत्पन्न होतो. त्यावेळी त्याला स्वरूपाचे ज्ञान होऊन, त्याचे सबिंदु वर्तुळ निर्माण होते. ज्यावेळी हे सबिंदु वर्तुळ कार्याला सुरुवात करते त्यावेळी ते कार्यबिंदु वर्तुळ होते व त्याला 'काली' असे नाव प्राप्त होते. त्याचेच दुसरे नाव 'आद्या' अथवा 'विद्याराज्ञी' असे आहे. मंत्रोदयाच्या वेळी ते प्रथम प्रगट होते आणि भविष्यकालात सर्वज्ञता देणाऱ्या विद्येला जन्म देते. ही आद्या विद्याराज्ञी, चिन्मय, आनंदमय अशा स्वभावाची असल्यामुळे कार्यबिंदूला स्वस्वरूपाचे, अस्तित्वाचे भान

होते व त्याला आपण नित्यतृप्त व आनंदमय आहोत अशी जाणीव होते. ह्या कार्यबिंदूपासून अपरबिंदू, नाद आणि बीज अशा तीन गोष्टी निर्माण होतात. त्यांतील अपरबिंदु चेतनमय असतो, नाद जडाजड असतो व बीज जड असते. परंतु हे अजड, जडाजड व जड असे तीन अंग एकमेकांत गुंतलेले असतात. ज्याप्रमाणे पक्षाच्या अंड्यांतील पिवळा बल्क, पाणी आणि कवच हे एकाच शक्तीचे तीन निरनिराळे परिणाम आहेत. त्याचप्रमाणे एकाच कार्यबिंदूतून हे तीन अंडी परिणत होतात. अपरबिंदूचेच दुसरे नाव 'शब्दब्रह्म' असून ते प्रत्येक सचेतन प्राण्याच्या अर्थव्यक्तीचे साधन आहे. शास्त्र परबिंदूच्या वरील आकृतीत अ-अपरबिंदु, ब-बिंदू आणि क-बीज आहेत. परंतु ह्या तिघांचा जो परस्पर संबंध आहे, तो रेखांच्या द्वारा दाखविलेला आहे. अब मधून रौद्री शक्ती व  रूद्र पुरुष, बकमधून ज्येष्ठा शक्ती व ब्रह्मा पुरुष आणि कअ मधून वामा शक्ती व विष्णु पुरुष अशा जोड्या प्रगट होतात. ह्या तीन रेखांमुळे जो त्रिकोण उत्पन्न (निर्माण) होतो, त्या त्रिकोणाला मांत्रिक **त्रिपुरबीज** असे म्हणतात. वर दिलेल्या जोड्या रूपकात्मक असून पहिल्या जोडीत ज्ञानशक्तीचे प्राधान्य, संहारकर्म, अग्निज्योति आणि तमोगुण दिसतो. दुसऱ्या जोडीत इच्छाशक्तीचे प्राधान्य, उत्पत्तीकर्म, सोमज्योति आणि रजोगुण असतो, तर तिसऱ्या जोडीत क्रिया शक्तीचे प्राधान्य, पालनकर्म, सूर्यज्योति आणि सत्वगुण असतो. ह्याप्रमाणे कार्यबिंदूपासून तीन निरनिराळ्या शक्ती व पुरुषांचा अविर्भाव तीन प्रकारांची कर्मे, तीन प्रकाशक ज्योति व तीन गुण व्यक्त होतात व ह्या सर्व वस्तूंवर एकच पराशक्ती (परबिंदु) ताबा ठेवते. त्या पराशक्तीला **त्रिपुरांबा** असे नाव आहे. म्हणून शाक्त, सबिंदु त्रिकोण हे परमशक्तीचे रहस्य सुचविणारे **यंत्र** मानतात.

शाक्त संप्रदायातील लहानांत लहान यंत्र म्हणजे सबिंदु त्रिकोण असून मोठ्यांतले मोठे यंत्र श्री चक्र (श्री यंत्र) आहे. श्रीचक्राची पूजा ही अतिश्रेष्ठ विद्या आहे असे सर्वच मानतात. आपल्या देहातच हे श्री चक्र आहे. श्रीमत् शंकराचार्यांना श्रीचक्राची उपासना प्रिय होती. त्यांचे 'सौंदर्यलहरी' हे काव्य श्री चक्राच्या उपासनेला (श्री विद्येला) वाहिलेले आहे. यंत्रातील केंद्रबिंदू गाठणे, स्वतः शून्य होणे, शिवस्वरूप होणे ही साधकाची अंतिम भूमिका आहे. या अंतिम भूमिकेत सर्वशक्तिसमन्वित परमेश्वराचा अपरोक्षानुभव येतो. कुंडलिनी योगातील षट्चक्रवेध श्री चक्राच्या उपासनेत येतो.

कुंडलिनी-शक्तीच्या उपासकांचे स्थूल मानाने दोन भाग पडतात. श्रीमत् शंकराचार्यासारखे समय मार्गाचे उपासक शिव आणि शक्ती यांचे अद्वैत मानतात व कौलमार्गाचे उपासक शिवापासून निराळ्या असलेल्या व मूलाधारात निद्रिस्त असलेल्या कुंडलिनी शक्तीची उपासना करतात. कौलमार्गीय साधकांना निद्रिस्त कुंडलिनीची उपासना करून ऐहिक सुखोपभोग मिळाले तरी चालतात. ही उपासना बहूंशी बहिरंग साधन आहे. अर्थात् कुंडलिनी शक्ती जागृत झाली की मुक्ती मिळते असे कौलमार्गीयांनाही वाटते. कौलमार्गी साधक अंतरंग व बहिरंग साधनांचे अवलंबन करून मुक्ती मिळवितात. ते श्री चक्रात प्रविष्ट होऊन क्रमशः तत्त्वातीत अवस्थांत जातात. चतुष्कोनापासून त्रिकोणापर्यंत, बिंदूपासून उन्मनापर्यंत व उन्मनापासून महाबिंदूपर्यंत जाणे असे तत्वातीत अवस्थेत जाण्याचे तीन मार्ग आहेत.

निरनिराळे रोग, भूत, बाधा, पीडा, मानसिक दुःखे यावर उपचार म्हणून अनेक यंत्रे उपयोगात आणली जातात. विशिष्ट प्रकाराने ती लिहून ताईतांत घालून शरीरावर धारण केली की या पीडा जातात. अशी यंत्रे केव्हा व कशी लिहावयाची, कोणत्या मंत्रजपाने अभिमंत्रित करून त्यात शक्ती आणावयाची, ती कोणत्या अवयवावर केव्हा व किती दिवस धारण करावयाची यासंबंधी बरेच नियम आहेत. ग्रहादिकांच्या यंत्रांच्या उपासनेने त्या त्या ग्रहांची पीडा जाते असे मानतात. शुक्राच्या पंचकोणात्मक यंत्राचा विशिष्ट रीतीने वापर केला की अनेक रोग बरे करता येतात हे अनुभवसिद्ध आहे. षट्कोन विशिष्ट रीतीने घराच्या भिंतीवर काढला की भूतप्रेत पिशाचाही बाधा त्या घराला कधीच होत नाही. श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती अशी यंत्रे देऊन आर्तांना पीडामुक्त करीत असत, हे त्यांच्या चरित्रवाचनाने कळून येते.

# ३३) तारकयोग*

तारकयोग या योग प्रकारासंबंधी फारच थोडी माहिती मिळते. शिवाय 'तारक' या शब्दाच्या अर्थासंबंधीही बरेच घोटाळे आढळून येतात. 'तारक' म्हणजे 'तारणारा' भवसागर तरून जाण्याला साहाय्य करणारा, असा एक अर्थ आढळतो. योगसूत्रांतील, 'ज्या ज्ञानाच्या योगाने सर्व विषयांचे ज्ञान एकाच काली होते व त्यांतील भेद समजतात, तेच विवेकजन्य तारकज्ञान होय.' भगवद्गीतेच्या काही प्रतींत, गीतेच्या आठव्या अध्यायात हा तारकब्रह्म योग सांगितला आहे असे लिहिलेले आढळते. ''संसारजन्य कर्म, क्लेश, विपाक, जन्म-मरण आदी यावद् दुःख परंपरापासून तारल्या कारणानेच 'तारक' हे नाव अन्वर्थक, समर्पक आहे. एका मंत्रविशेषद्वारे प्राप्त ज्ञानास तारक योग म्हणतात. यामध्ये ब्रह्मसाक्षात्काराचे रहस्य सांगितले जाते. यास परा ब्रह्मविद्या पण म्हणतात. याचे मुख्य साधन प्रेम हे आहे. जोपर्यंत सच्चे प्रेम उत्पन्न होत नाही तोपर्यंत तारकयोग सिद्ध होत नाही. याचे बळ प्रेमाविता प्रगट होत नाही. अन्य क्रियांद्वारे मदत मिळते; परंतु याचे प्राण तर प्रेमच आहे. प्रेमाचे स्पर्श लागताच तारकज्ञान अपूर्व योगास प्राप्त होऊन जाते.''- आचार्य श्रीधनीदासजी.

तारकयोगात तारक शब्दाचा वर दिलेला अर्थ अभिप्रेत नसावा. तारका म्हणजे डोळ्यांतील बाहुल्या, शांभवी मुद्रा, नासाग्रदृष्टी, भ्रूमध्यदृष्टी, शरीराच्या आत हृदयाच्या ठिकाणी किंवा सहस्त्राराकडे लावलेली दृष्टी कशी लावावी त्यासंबंधीचे जे प्रकार आहेत, त्यावर हा योग बसविलेला असावा.

'तारकयोगाचा विशेष म्हणजे षट्चक्रभेदन करून प्रकाशरूप आत्म्याचे दर्शन करून घेणे अगर ब्रह्मसाक्षात्कार होणे होय.' - श्री. दिवेकर. यालाच श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर यांनी तारकखंडण, असाही शब्द वापरला आहे. त्यांच्या मते, तारकयोग हा एकप्रकारे दृष्टियोगच होय. तेव्हा तारकयोग हा दृष्टीच्या सहाय्याने मनावर ताबा ठेवण्याचा योग आहे. असे म्हटले तरी चालण्यासारखे आहे. ज्या ठिकाणी आपली दृष्टी जाते तेथेच बुध्या आपले मन जाते, ह्या व्यावहारिक सिद्धांतावर आधारलेला हा योग आहे. आपण आपली दृष्टी आत नेऊन, शरीरांतर्गत पोकळीवर स्थिर केली की तेथेच मन स्थिर होते व ध्यानविषयक ग्रहण करते.

**क) तारकयोग लक्ष्य विभाग** : डोळ्यांमधील निळी बुबुळेच जीव चैतन्यास आधार असल्यामुळे या तारकद्वयाने पाहण्याचे लक्ष्य तीन प्रकारचे आहे. १) अंतर्लक्ष्य, २) बाह्यलक्ष्य, ३) मध्यलक्ष्य, यात बाह्यलक्ष दृष्टीस्वरूप, अंतर्लक्ष्य अदृष्ट स्वरूप आणि मध्यलक्ष्य दृष्टादृष्ट स्वरूप होत - बाळमुकुंद.

**ख) तारकयोगाभ्यास** : वरील मुद्रा व्यक्तपणे जाणून अभ्यास करण्याचा क्रम चंद्रसूर्य म्हणविणाऱ्या वामदक्षिण नेत्रांमधील तारकारूप बुबुळे ऊर्ध्वमुख झाली की प्रकाशू लागतात ती, मूलप्रकृतिरूप असून,

जीवचैतन्य सूत्रांस आधार असून, लौकिक वस्तू साक्षात्कारास कारण असून, अतिसूक्ष्मद्वाराने युक्त असलेले दोन्ही नीलबिंदू, श्रीगुरूपदेशाने, उत्तम रीतीने ऐक्य करून तारक ब्रह्माभ्यास करावा. त्या दोन मंडळामागेच 'तत्त्वमसि' या महावाक्यार्थाने होणारे जीवपरमैक्य असून तेच आत्मब्रह्मसामरस्य होय.

**ग) तारकांचे मुख्य प्रकार :** तारकांचे मुख्य प्रकार दोन आहेत :

१) तारक २) अमनस्क किंवा राजयोग. तारकांत बाह्यसृष्टी पाहण्याचे डोळ्याचे कार्य थांबवून त्यांना अंतःसृष्टीत खेचावयाचे असते. सूर्य आणि चंद्र यांना ज्याप्रमाणे सृष्टीचे दोन डोळे समजतात त्याचप्रमाणे आपल्या शरीररूपी सृष्टीचे चंद्र सूर्य म्हणजे आपले दोन डोळे आहेत. चंद्र आणि सूर्य ज्याप्रमाणे आकाशात फिरत असतात त्याप्रमाणे साधकाने आपले डोळे आपल्या मस्तकाच्या आकाशात फिरवावे आणि शुद्धाकाश, पराकाश, ज्ञानाकाश व तत्त्वाकाश व सूर्याकाश यांचा अनुभव घ्यावा, सहस्त्रारांतील सहस्त्र सूर्याचा प्रकाश पहावा आणि आकाशमय होऊन अमनस्क योगांतील सिद्धी मिळवावी, अशी तारक योगाची परिभाषा आहे. आपल्या शरीरांतील पोकळीला, अवकाश, आकाश संज्ञा असून, जसजसे आपले साधन वाढत जाईल, आपण शुद्ध होत जाऊ, आपल्या विकारवासनादिकांचा क्षय होईल तेव्हा आपण स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाऊ, म्हणजे स्थूलकाशातून महदाकाशाकडे आपली वृत्ती जाईल. तेथून ती चिदाकाशाकडे जाऊन चिदाकाशमय होईल आणि तीवर विकार उठणार नाही.

ह्या तारकांतही दोन प्रकार आहेत. १) मूर्तितारक, २) अमूर्तितारक. ज्यात पंच ज्ञानेंद्रियांचा संबंध असतो तो तारकयोग मूर्तितारक समजतात. यात शरीरांतर्गत मूर्तीची, सुषुम्नादंडाची, कुंडलिनीची अशी कल्पना करावयाची असते. पण अमूर्तितारकात भ्रूमध्यदृष्टी ठेवून केवळ शुद्ध, सत्वयुक्त, श्वेततेजयुक्त ब्रह्म पहावयाचे असते. अमूर्ततारकाला **अमनस्कयोग** किंवा **राजयोग** समजतात.

योग आचरताना इंद्रिये व प्राण आपल्या ताब्यात ठेवावेत. यामुळे ब्रह्मज्ञानाचे फल मिळते.

# ३४) मंत्रयोग*

मंत्रयोग हा अत्यंत गहन, कठीण, फार थोड्यांना साधणारा असा योग आहे. वेदांपासून हा मंत्रयोग सुरू झाला असे मानतात. इतकी ह्या प्रकाराची परंपरा प्राचीन आहे. पुढे, पुढे तिबेट, चीन, जपान, इराण, अरबस्तान, अफगाणिस्तान इकडेही ह्या योगाचा प्रसार झाला असून सर्व जगभर मंत्रयोग कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारात चालू असलेला दिसतो. भारतातही ऋग्वेदकालांतील मंत्र काहीसे मागे पडले आणि शक्तिमार्ग किंवा तंत्रमार्गातील मंत्रशास्त्र बरेच पुढे आले आणि मंत्रशास्त्राच्या अभ्यासूंना, आचरण्यास अत्यंत कठीण अशा साधनांतून जाण्याचे अग्निदिव्य करणे भाग पडले. मंत्रशास्त्रांतील पहिला पहिला सोपेपणा जाऊन नंतर त्यात अनेक अवघड अशी न्यासादिक साधने आली.

आकाशापासून नाद उत्पन्न होतो ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. नाद, वाणी, भाषा, शब्द, संगीत या सर्व गोष्टींपासूनच आजचे मानवी जीवन समृद्ध झाले आहे. ब्रह्मांडात जर नादवत्त्व, नादब्रह्म नसते तर मानवी जीवनांतील साहित्य, संगीत, विचारांची देवघेव, ज्ञान इत्यादी अनेक रमणीय आणि आवश्यक गोष्टींना आपण मुकलो असतो आणि आपले जीवन उदास, दीनवाणे आणि विकासाचा अभाव असलेले असे झाले असते. म्हणूनच 'नादाला' आपल्या जीवनांत फार महत्त्व आहे, नव्हे त्याला पहिले स्थान दिले पाहिजे. म्हणूनच भाषा ईश्वरनिर्मित आहे, प्रकाशाइतकेच तिचे महत्त्वाचे स्थान आहे, असे कित्येक जुन्या ग्रंथात म्हटले आहे. भाषा, मंत्र, मंत्रशक्ती ह्यामध्ये फार मोठे अर्थ आहे असे अनेक पंडितांनी सांगितले आहे आणि ह्या नादब्रह्मांतूनच मंत्रशास्त्र, मंत्रयोग निर्माण झाला असा मंत्रयोगप्रवर्तकांचा दावा आहे.

श्री. बाळशास्त्री हरदास वैदिक मंत्र व मंत्रशास्त्र ह्यासंबंधी म्हणतात – ''मंत्र म्हणजे विशिष्ट प्रकारचा प्रत्यक्ष परिणाम घडवून आणणारा शब्दसमूह होय. अशा शब्दसमूहांत अर्थाला खरे महत्त्व नसून विशिष्ट शब्द, विशिष्ट पद्धतीचे त्या शब्दांचे उच्चार व त्या शब्दांची आनुपूर्वी अथवा क्रमाने एकामागून एक असे येणे ह्यालाच खरे महत्त्व असते. या मंत्रविषयक धारणेच्या मुळाशी शब्दांत उत्पादक शक्ती आहे अशी धारणा आहे. ही धारणा वेदांत व वैदिक संस्कृतीतून उत्पन्न झालेल्या झरथुष्ट्री अथवा पारशी इत्यादी धर्मांतच आहे असे नव्हे तर ज्यांना वृक्षपाषाणादिकांची पूजा करणारे संस्कृतिहीन असे समजण्यात येते त्या सर्व रानटी लोकांच्याही धर्मात मंत्रशास्त्रावरील विश्वास व विशिष्ट शब्दांत विशिष्ट प्रकारचे सामर्थ्य असते, अशी श्रद्धा आढळून येते. ..... ग्रीक भाषेतील 'Logos' शब्द मंत्रविद्येचा वाचक असून वैदिक 'ऋक्' शब्दाचा तो अपभ्रंश आहे अशी पुष्कळ जाणत्या लोकांची कल्पना आहे.'' (साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास – 'वेदांतील राष्ट्रदर्शन – पृ. १४६–१४७')

'Shakti and Shakta' ('शक्ति आणि शाक्त') ह्या ग्रंथात आर्थर ॲव्हॉलॉन (सर जॉन वुड्राफ) यांनी मंत्रशास्त्रावर लिहित असतांना नादब्रह्माचे व शब्दांच्या सामर्थ्याचे केलेले विवेचन फार मार्मिक आहे. ॲव्हॉलॉन (एवलॉन) म्हणतात –

'' 'शब्द' चा शब्दशः आणि सामान्यपणे भाषांतरित अर्थ आहे ध्वनी. 'शब्दा'च्या मूळापासून येणारा शब्द म्हणजेच ध्वनी होय. तथापि कानाने ऐकू येणारा किंवा आघाताच्या परिणाम स्वरूप निर्माण होणाऱ्या ध्वनीशी याचे साम्य समजू नये. ..... अशा प्रकारे जेथे जेथे कुठल्याही प्रकारची गती (हालचाल) किंवा कंपन वा स्पंदन असेल तेथे तेथे 'शब्द' हा असणारच. आता असे म्हटले जाते की धन विद्युत् कार्याच्या वर्तुळामध्ये (कार्यक्षेत्रामध्ये) विद्युत् परमाणु हे गतीच्या प्रचंड प्रमाणामध्ये फिरत असतात. जर (त्यापैकी) काही विद्युत् परमाणु आण्विक प्रणालीपासून दूर फेकले गेले तर क्ष किरण विसर्जन दृष्टोत्पत्तीस पडते. परिभ्रमणशील आणि वेगवान असे दोन्ही प्रकारचे विद्युत् परमाणु 'शब्द' स्वरूपातील स्पंदनाचे प्रकार असतात, यद्यपि मानवी कानासाठी तो ध्वनी नसतो. अशा प्रकारच्या सर्व हालचाली एखाद्या आध्यात्मिक कानासाठी कार्यक्षेत्राचे संगीत असेल.

जर मानवाचे कान अति सूक्ष्म (ध्वनी ऐकणारे) असते, तर एका सजीव वृक्षाचे नैसर्गिक शब्द एका विशिष्ट ध्वनी स्वरूपात त्याला ऐकू आले असते. त्यास आकाशाचे गुण किंवा स्पंदनाचे गुण अथवा कोणत्याही प्रकारचे कंपन असे म्हणतात. ती भौतिक तत्त्वाची अशी अवस्था (प्रकृति) की जिच्यामुळे कोणत्याही प्रकारची गती किंवा कंपन निर्माण होणे शक्य होते. (शब्द, गुण, आकाश). 'ब्रह्मस्वरूप' किंवा 'चित्' हे स्थिर म्हणजेच गतिशून्य असते. त्यास 'चिदाकाश' पण म्हणतात; परंतु हे 'आकाश' निर्मित नव्हे. 'चिदाकाश' हे ब्रह्म असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा स्वराघात हे स्वतः अभिव्यक्त (प्रगट) होते. या एका अवस्थेपासून संपूर्ण सृष्टीनिर्मितीची सुरुवात होते. हे 'चिदाकाश' 'शब्दब्रह्म' म्हणून ओळखले जाते. यामधून 'मायाशक्ती' उत्पन्न होते. ती कानास ऐकू येणारा ध्वनी निर्माण करण्यास, स्पर्शेंद्रियास स्पर्श स्वरूपात, डोळ्यास आकार स्वरूपात, जिव्हेस चव (स्वाद) स्वरूपात आणि घ्राणेंद्रियास (नाकास) गंध स्वरूपात कारणीभूत ठरते. सर्व प्रकारचे मानसिक कार्यसुद्धा 'स्पंदना'चाच एक प्रकार असतो. विचार हे मानसिक स्तराचे एक कंपन, स्पंदन असते, की ज्याप्रमाणे विचाराची अभिव्यक्ती ही उच्चरित शब्द स्वरूपामधील कानाचे कंपन असते.''

प्रत्येक वस्तूच्या मूलभूत असलेल्या नादलहरींची ही मीमांसा ग्रीक तत्त्वज्ञ पायथागोरस ह्यालाही मान्य होती. 'सर्व तारे, जगत्, जगतावरील चराचरच नव्हे अखिल ब्रह्मांड मधुर गायन करीत आहे.' असे त्याने म्हटले आहे. अणुसंगीताचे प्रयोग सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ चंद्रशेखर रमण यांनी केलेले जगाला विदितच आहे.

शब्दाचा, नादाचा आणि मानवाचा अगदी निकटचा संबंध असून नादामुळेच मानवी जीवनाला अर्थ प्राप्त झाला आहे हे पाहिल्यावर मंत्रशास्त्राचा मानवी जीवनाशी किती निकटचा आणि सूक्ष्म संबंध आहे हे कळून येईल.

शब्द याचा शाब्दिक अर्थ ध्वनी संकेत असा होतो. अध्यात्म्याच्या मते संपूर्ण जीवसृष्टीच्या घटकात अंतर्भूत असणारे हे ध्वनितरंग आहे. हा ध्वनी स्वतः उत्पन्न होतो, दोन वस्तूंच्या घर्षणामुळे नव्हे, ध्वनी हे

जीव आणि ईश्वरामधील संपर्काचे माध्यम आहे. हा ध्वनी अंतःकरणातील आवाज अनुभवला जाऊ शकतो. थोडक्यात सांगायचे झाले, तर प्रत्येक जीवाला प्राप्त झालेला हा ईश्वरी अंशच आहे. म्हणूनच म्हटले जाते, शब्द ब्रह्म आहे. गुरू आपल्या शिष्याला हा ध्वनी ऐकण्याची क्षमता देऊन त्याला आत्मसाक्षात्काराचा मार्ग मोकळा करून देतो. 'शब्दा'लाच वेदांती 'नाद' म्हणतात. कठोपनिषदात याला 'उद्‌गीत' म्हटले आहे. ग्रीक संस्कृतीत याला 'लोगोस' असे नाव आहे, तर चिनी तत्त्वज्ञानांमध्ये हे 'ताओं' या नावाने ओळखले आहे. इस्लामचा धर्मग्रंथ 'कुरआन' मध्ये याला 'कल्मा' म्हटले आहे. शीख धर्मात याला 'शबद' आणि 'नाम' असे नाव दिले गेले आहे.

बाह्य विश्वामध्ये अनेक रूपांनी प्रकट झालेल्या परमेश्वराशी एकरूपता, संवाद व संपर्क साधण्यासठी मानवास मिळालेली यंत्रणा म्हणजे **ध्वनीची** सोय. हाच **नाद,** हेच स्पंदन संपूर्ण विश्वात भरलेले असते म्हणून नादातून सर्व विश्वाची उत्पत्ती झाली असे समजले जाते. ॐ हा ब्रह्मांडातील सर्वात पहिला ध्वनी समजला जातो. शास्त्रामध्ये ज्याला प्रणव किंवा ॐकार म्हणतात, तेच उपाधिरहित **शब्द-तत्व** आहे. 'नाद' मुळेच संपूर्ण विश्वाची सृष्टी झाल्याकारणाने सृष्ट विश्वामध्ये **नादच** प्राण अथवा जीवनी शक्ती स्वरूपामध्ये असतो.

शास्त्रसिद्धान्त असा आहे की, आकाशतत्त्वापासून पृथ्वीपर्यंत मूलद्रव्याने जी उत्तरोत्तर स्थूल स्वरूपे धारण केलेली आहेत, त्यांतील आकाश हे सर्वात अत्यंत सूक्ष्म आहे व या मूळ आकाशाची प्रचिती येण्याइतके मनुष्याच्या पांचही इंद्रियातून फक्त श्रवणेंद्रियच सूक्ष्मतर होऊ शकते. जर मनुष्याला आपल्या इंद्रियांची शक्ती वीणेंच्या तारेप्रमाणे हवी तशी कमी जास्त करता आली तर कोणत्याही वस्तूची स्थूल इंद्रियाने प्रचिती येत असता अथवा नसताही मूलद्रव्याच्या सूक्ष्म आंदोलनाची शब्दात्मक प्रतीती त्याला घेता येईल. मूलद्रव्याच्या कोणत्याही स्थूल सूक्ष्म संधानाची अशी शब्दात्मक सूक्ष्म प्रचिती हीच अर्थात् त्याची आद्यवाचक आहे आणि हा वाच्य-वाचक संबंध यथार्थतेने 'तो पन्नयोः पश्चात्' असा आहे, म्हणजे स्वयंभू आहे आणि म्हणूनच शब्दामध्ये उत्पादक सामर्थ्य आहे ही भाषा संभवते.

'मननात् त्रायते इति मंत्रः' जो मनन केल्यामुळे तारतो तो **मंत्र** होय अशी मंत्राची व्याख्या करतात. **मंत्र** शब्दाची व्युत्पत्ती मनस् आणि त्रयी अशी आहे. म्हणजे मनाची शक्ती आणि त्रयी म्हणजे प्राणशक्ती यांचे एकीकरण ज्यात झाले आहे असा शब्दसमूह.

**मंत्रयोग** आणि लययोग जवळजवळ एकच आहेत असेही काही ठिकाणी आढळते. मंत्रजपामुळे मनोलय होतो म्हणून त्याला **मंत्रयोग** असे म्हटले आहे. 'मंत्रजपान्मनोलयो मंत्रयोगः।'

अधिकारी गुरूकडूनच मंत्रदीक्षा घेतली पाहिजे. तो मंत्र शुद्ध करून सिद्ध केला पाहिजे. म्हणजेच त्याचा योग्य तो उपयोग होतो. नाहीतर त्याचे फार घातुक परिणाम होतात; आणि साधकाला वेड लागते किंवा अन्यप्रकारे त्याचा नाश होतो. म्हणूनच तुकाराम महाराजांनी मंत्रापेक्षा नामजप श्रेष्ठ असे प्रतिपादन केले आहे. मंत्रजपांत अनेक बंधने असल्याने दत्तात्रेय संहितेत मंत्रयोग एक अधम साधन आहे असे म्हटले आहे.

प्रत्येकाने मंत्रयोगाच्या मार्गावरील धोक्यांचा स्पष्ट इशारा देऊन ठेवला आहे, तरीही यंत्रमार्गाचा आश्रय करावा असे बहुसंख्य साधकांना वाटते, याचे कारण असे की ह्या मार्गाने गेले असता फल फार लवकर मिळते. आणि हेच साधकांना हवे असते. खात्रीचा आणि सद्यःफलदायी असा मार्ग धोक्याचा असला तरी

कोण पत्करणार नाही ? मंत्र जपावयास आरंभ केला की त्याचे फल सात दिवसांत दिसू लागते; नव्हे याक्षिणी मंत्रासारखे काही मंत्र असे आहेत की, त्यांचा अनुभव अवघ्या तीन तासांत येतो. पण म्हणूनच या मार्गात धोके फार आहेत. सप्तशतीचा किंवा अन्य मंत्रमय ग्रंथांचा नित्यपाठ करुन काही चुकल्यामुळे भ्रमिष्ट झालेले किंवा प्रखर तेजोदर्शन झाल्यामुळे अंध झालेले, शक्तीच्या रुद्र स्वरुपाचा अनुभव आल्याने पंगु, अशक्त झालेले कित्येक साधक पाहण्यात येतात, याचे कारण हेच आहे. म्हणूनच धोक्याच्या लाल कंदिलांची रांग या मार्गावर लावलेली आढळते आणि ती साधकांना सारखी बजावीत असते, मंत्र हे फार नाजूक आणि तितकेच भयंकर प्रकरण आहे. पुस्तकांतून मंत्र वाचून त्याचा जप करु नये, अनाधिकाऱ्याकडून मंत्र घेऊ नये. केवळ काम्यकर्मासाठी मंत्राचे अनुष्ठान करु नये.

या मंत्रयोगाची सोळा अंगे सांगितली आहेत, ती अशी :

१) भक्ती, २) शुद्धी ३) आसन, ४) पंचांगसेवन, ५) आचार, ६) धारणा, ७) दिव्यदेशसेवन, ८) प्राणक्रिया, ९) मुद्रा, १०) तर्पण, ११) हवन, १२) बलि, १३) याग १४) जप, १५) ध्यान आणि १६) समाधी.

सर्व मंत्र ग्रंथांतून मंत्रसिद्धीसाठी षट्कर्मे करावी लागतात, असे म्हटले आहे. शांती, वशीकरण, स्तंभन, विद्वेषण, उच्चाटन आणि मारण अशी ही षट्कर्मे आहेत. ही षट्कर्मे योग्य वेळ पाहून, ग्रह नक्षत्रे पाहून योग्य गुरुच्या हाताखालीच केली पाहिजेत.

# ३५) दहरविद्या*

ध्यानयोगांतील अत्यंत श्रेष्ठ अशी विद्या म्हणजे हृदयस्थ ध्यानाची विद्या होय. ही अत्यंत गूढ, श्रेष्ठ, सद्यःफलदायी, गुरुकृपेशिवाय आणि भाग्याशिवाय प्राप्त न होणारी अशी आहे. छांदोग्य उपनिषदांतील अतिश्रेष्ठ 'दहरविद्या' ती हीच होय. या विद्येविषयी अतिश्रेष्ठ पडितांनी आणि योग्यांनी प्रशंसेचे उद्‌गार काढले आहेत. आपल्या हृदयकमलाच्या ठिकाणी परमेश्वराची मूर्ति कल्पून करावयाचे ध्यान अशी स्थूलमानाने ह्या दहरविद्येची कल्पना आहे. अर्थात् आपले स्थूल हृदय ध्यानाकरिता घेऊ नये, तर बरगड्यांच्या मधला भाग, दोन्ही स्तनांच्यामधील खड्डा, म्हणजे स्थूल हृदयाच्या उजव्या बाजूस असलेली पोकळी ध्यानासाठी घ्यावी, असे तज्ञांचे मत आहे. श्री. रमणमहर्षींच्या 'रमणगीतेत' पांचव्या अध्यायांत ही दहरविद्या सांगितलेली आहे. त्यात महर्षि म्हणतात, हे आध्यात्मिक हृदय शरीरशास्त्रातील रक्तपिंडात्मक हृदयाहून निराळे आहे. येथे हृदय या शब्दाने आत्मरूप सांगितले आहे असे समजावे. त्याचे आविर्भवन स्थान छातीच्या उजव्या बाजूस आहे. डाव्या बाजूस (रक्तपिंड आहे तेथे) नाही. तेथूनच ज्योति सुषुम्ना मार्गाने मस्तकातील सहस्त्रदलाकडे जाते. आणखी एका ठिकाणी श्री रमणमहर्षींनी असे म्हटले आहे की, हृदयाचे ठिकाणी मन स्वस्थ करणे हेच श्रेष्ठ कर्म, हीच भक्ती, हाच योग, हेच ज्ञान असे निश्चितपणे समजावे.

संत एकनाथ,, तुकाराम महाराज, सावता माळी आदी संतांनींही ह्याच ध्यानाची सुंदर वर्णने आपल्या अभंगातून केली आहेत.

''का हिंडता देउळी । देव हृदयाच्या राउळी।।'' असे श्री सावता माळी यांनी उगीच म्हटले नाही. आणि ''काया ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल ।।'' असे म्हणताना श्री. तुकाराम महाराजांच्या मनात हृदयस्थ नारायणाचे ध्यान नसेल असे कोणी म्हणावयाचे ? संत एकनाथ महाराज तर स्वच्छच सांगतात –

*''हृदयीचं स्नान हृदयीचं ध्यान । हृदयीचं भजन सर्व काळ ।।१।*
*हृदयीचं दान हृदयीचं धर्म । हृदयीचं नेम सर्व जोडें ।।२।।*
*हृदयीचं कथा पुराण श्रवण । हृदयीचं चिंतन सर्व सदा ।।३।।*
*हृदयीचं दिसे एका जनर्दनी। । हृदयीचं एकपणीं बिंबलासें ।।४।।''*

*हृदयीचं देव हृदयीचं भक्त । हृदयीचं होत पूजा सर्व ।।१।।*
*हृदयीचं ध्यान हृदयीं जे मन । हृदयीं तें आसन देव वसे ।।२।।*
*हृदयीं तें भुक्ति हृदयी तें मुक्ति । हृदयीं सर्व स्थिति देव जाणे ।।३।।*
*एका जनार्दनी हृदयीचं पहाल । ते सुख घ्याल हृदयामाजीं ।।४।।*

*हृदयस्थ जया नाहीं ठावा देव । पूजा करती बाव सर्व भानें ।।१।।*
*जाणाचा अंतरी मानाना हृदयीं । पहावा सर्वांतरी परमात्मा ।।२।।*
*एका जनार्दनीं व्यापक सर्वां ठायीं । भरूनी उरला ठाई जेथें जेथें ।।३।।*

(*गाथापंचक, गाथा तिसरी, श्री एकनाथ महाराज यांच्या अभंगांची गाथा, पृ. ४१०, अभंग २२००, २२०१, २२०२.)

[ ३१) लययोग, ३२) यंत्रयोग, ३३) तारकयोग, ३४) मंत्रयोग आणि ३५) दहरविद्या यांचे संपूर्ण विवेचन प्रा. श्री. शं. खानवेलकर यांच्या 'श्री गुरुदत्तयोग' (शक्तिपातरहस्य) या ग्रंथावरून साधार.]

## ३६) प्रेम –साधना

प्रेम – साधना एक उच्च साधना आहे. प्रेमास भक्ती पण म्हणतात. प्रेम एक महान स्फूर्तिमय, गतिशील अंत:स्फुरण आहे. प्रेम परमेश्वराचे स्वरूप आहे. ज्याला शास्त्रकारांनी परमानंद, सच्चिदानंद म्हटले आहे. ते मानवामध्ये संपूर्णपणे आढळते. प्रेम अमृतरूप आहे. प्रेम अमर आहे. प्रेम अंत:करणाच्या गुह्य गुफेची झलक आहे. अंत:करणात असलेले प्रेम हे विभिन्न अवयवाद्वारे बाहेर प्रवाहित होते. अंत:करणामधील प्रेम – प्रवाहच चक्षुंमध्ये येऊन रूपास माधुर्य प्रदान करते, कानांमध्ये प्रवाहित होऊन शब्दांना मधुरात मधुर बनविते, वाचेमध्ये प्रवाहित होऊन रसास रसमय, मधुमय बनविते. प्रेम पूर्ण – आनंदस्वरूप आत्मा हा बाहेर स्फुरित होऊन विषयांना रसमय बनवितो.

प्रेम – साधनेमध्ये (१) तन अर्थात शरीर, (२) मन अर्थात अंत:करण आणि (३) आत्मा हे तीन मानवी घटक कार्यरत असतात. मानवाचे चेतन शरीर हे चितिभगवतीचे मंदिर आहे. म्हणून या शरीरास तुच्छ समजू नये प्रथम आपल्या शरीराचे विज्ञान करा. जर तुम्ही आपल्या अंतराचे पूर्ण विमर्श कराल तर तुम्हाला कळून येईल की शरीर मिथ्या नाही, परंतु ते एक महान विज्ञानमय सुंदर मंदिर आहे. याच्यावर प्रेम केल्याने तुमचे प्रेमस्त्रोत विकसित होऊन जाईल. यानंतर प्रेमास वाढवा. त्याचा विकास करून आपल्या शरीरातून बाहेर प्रवाहित होऊ द्या.

प्रेम प्राप्त करण्यासाठी प्रेमाचे निवास स्थान असलेले शरीर याविषयी विमर्शपूर्ण जाणीव असणे आवश्यक आहे. शरीराचे तत्त्व – घटक आणि त्यांच्या कार्याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. तुम्हाला आपल्या शरीराशी पवित्र, मैत्रीपूर्ण आणि सन्माननीय स्नेह असणे जरूर आहे. मानव शरीर हे बहुजन्माचे, बहुकाळाचे, अनेक प्रकारच्या यात्रेचे सुख – दु:खाचे साथी आहे. हे शरीर साधनेचे आश्रय, मोक्षनगरची शिडी, अंतरात्म्याचे एक उत्तम मंदिर आहे. या शरीररूपी मंदिरामध्ये प्रेमनाथ परमेश्वर हा अंतरंगाहून अंतरंगामध्ये, अंतरतम होऊन निवास करतो.

मानवाचे शरीर पंच महाभूतांनी बनलेले आहे. ते आत्म्याचे निवासस्थान आहे. सुख – दु:खाची भोगभूमि आहे; आत्म्याचा सेवक आहे. शरीर हे नित्य तुमच्या आज्ञाधीन असते. जिथे कुठे घेऊन जाल तिथे येण्यास तत्पर. तुम्ही जर त्यास नरकगामी बनवाल तर ते नाटकी बनेल. तुम्ही त्यास स्वर्गाकडे घेऊन जाल तर ते राजीखुशीने स्वर्गामध्ये जाईल. पंचमहाभूतांनी बनलेले या शरीरामध्ये चैतन्य आत्मा पूर्ण व्याप्त आहे. अशा सुंदर, निर्विकारी शरीरास प्रथम संपूर्णपणे ओळखा, तद्नंतर त्याच्याशी परमेश्वरासारखे प्रेम करा. शरीररूपी रथामधून मोक्ष यात्रा करायची आहे, हे चांगले ओळखा. मानवी शरीर परमेश्वराची एक महान

अद्भुत कला आहे. त्यामध्ये रहस्यमय विज्ञान आहे. शरीरामध्ये ज्ञानाची खाण आहे. तुम्हास परमेश्वराच्या दरबारामध्ये, वैकुंठाच्या यात्रेसाठी, कैलासच्या दर्शनासाठी अथवा निर्विकल्प नगरीच्या सहलीसाठी याच शरीरासोबत जायचे आहे! ध्यानामुळे तुमची खरी ओळख या शरीरामध्येच होते. ज्ञानाद्वारे या शरीरामध्येच स्वत:स ओळखले जाते. अनुभवसिद्ध गोष्ट आहे की जो स्वत:स ओळखतो तो भगवंतास ओळखतो. प्रेमरसाने भरलेले – ओथंबलेले तुमचे शरीरच परमेश्वरामध्ये तुम्हास विलीन करील.

ज्याला शरीराची ओळख होते, तो त्यास योगपूर्ण, प्रेमपूर्ण आणि ध्यानपूर्ण बनवून सोडतो. संकल्पविकल्पात्मक मन शरीरास जिकडे तिकडे घेऊन जाते. संकल्पाच्या मागे आहे शरीर. संकल्प आहे मनाच्या पाठीमागे. मनाच्या म्हणण्यानुसार शरीर, इंद्रियादी व्यवहार करीत असतात. मन चंचल आहे. विकारी पण आहे. तो त्रास पण देतो. मनास नियंत्रणामध्ये ठेवण्यासाठीच तर समस्त साधना आहेत. मनाच्या नियमनासाठीच योगीजन योगाच्या अनेक क्रियांची साधना करतात. मन मन एक महान सृजनात्मक शक्ती आहे. मनाच्या चंचलतेविषयी विमर्श केले पाहिजे. मनाची अस्थिरताच सिद्धयोगाच्या महान ज्ञानाकडे तुम्हास आकर्षित करते. मनाची चंचलता तर पहा. आज रूपामध्ये तर उद्या रसामध्ये, तद्नंतर गंधामध्ये, मग शब्दामध्ये किंवा इतरत्र कुठेही त्याचे संचार असेल. मात्र खरी गोष्ट ही आहे की मनास अस्सल प्रेमाची ओढ असते, पूर्ण समतेची त्यास इच्छा असते; परमेश्वराशी एकीकरण प्रस्थापित करण्यासाठी आतुर असते. मनाच्या चंचलतेमागे एक रहस्यपूर्ण विमर्श आहे; आणि ते हे की मन पूर्ण विश्रांती इच्छिते. जोपर्यंत मन आत्मध्यानामध्ये पूर्ण समरस होत नाही, तोपर्यंत ते चंचल आणि चपळ राहते. परमेश्वराशिवाय अन्य कोठेही मन स्थिर बसत नाही. त्याच्या या प्रवृत्तीमुळेच शांती (मन:शांती)चा पत्ता लागला. हे तर मनाचे मोठे उपकार आहे. मनाची चंचलता ही अत्यंत सहाय्यक असते, कारण यामुळे ध्यानयोगाविषयी प्रेम निर्माण झाले. मनाच्या चंचलतेनेच लोकांना सिद्धकृपापात्र बनवून सोडले.

शरीराप्रमाणेच तुम्ही मनावर पण प्रेम करा. मनाच्या रूपाने चिति भगवतीचे स्फुरण होत आहे, असे समजून, मनाशी मैत्री प्रस्थापित करून म्हणा, 'तुम्ही अंतरात्म्याकडे प्रयाण करा.' असे समजणेच तर ध्यान आहे. मनास चितिमय समजून त्यास प्रेममय बनवून मनास जिंकले जाते. म्हणून प्रेमपुजारी बना. प्रेम कायापालट करणारी एक मोठी अणुशक्ती आहे. प्रेमच मोहाच्या शत्रूस जिंकण्याची किल्ली आहे, अहंकाराने भरलेले योग, पांडित्य, ज्ञान हे सर्व प्रेमाच्या विरोधात असतात. म्हणून अहंकाराचा संपूर्णपणे त्याग करावे. हे त्याग फक्त प्रेमामुळेच शक्य आहे. हृदयामध्ये जेव्हा – जेव्हा वासनारहित प्रेमाचा उदय होतो तेव्हा – तेव्हा जीवनामध्ये परम शांतीची अनुभूती होते. चित्ताचे निरोध करण्याऐवजी प्रेममय बना. चित्तास जबरदस्तीने, प्राणापानच्या निरोधाने तप्त करण्याऐवजी त्याला कुरवाळून आत्म्याकडे घेऊन चला. तुमच्या सर्वेंद्रियांचे सर्व विषय परमात्ममय बनले पाहिजेत. संत तुकाराम महाराजांचे म्हणणे आहे की ज्याचे एक मात्र विषय नारायण असेल तर तो जगास प्रेममय (दृष्टीने) पाहतो.

तुम्ही प्रेममय आहात. तुमची साधना प्रेममयी आहे. प्रेमच तुमची व्याप्ती आहे. प्रेम परमेश्वर आहे. प्रेमच जगत आहे. जगताच्या रूपाने परमेश्वरच प्रकट झालेला आहे. प्रेम ईश्वर – प्राप्तीचे पूर्ण साधन आहे. प्रेम एक आंतरिक महान अनुभूती आहे. तुम्ही अंतरात्म्यात शोध घ्या.

मानवास सर्वत्र व्यापक, सर्वमय अशा आपल्या आत्म्याशी निष्ठावत् प्रेम केले पाहिजे. प्रेम मानवास सुख – सागर, शांती – विग्रह आणि ज्ञान – मंदिर बनवून सोडतो प्रेम मानवाचे आत्मरूप आहे. प्रेम मानवाचे सौंदर्य आहे. प्रेम मानवाच्या मानवतेची महिमा आहे. म्हणून अगोदर तुम्ही स्वत:शी प्रेम करा, नंतर शेजाऱ्यांशी, तद्नंतर समस्त जगाशी. हीच भक्ती आहे. यामुळेच ज्ञानानंदची प्राप्ती आहे. यामुळेच योगानंदची तृप्ती आहे. प्रेमामध्ये सर्व साधने आपोआपच येतात. प्रेमच भगवंत नित्यानंद आहे. याशिवाय प्रेम म्हणजे देहभानरहित होऊन केलेली ईश्वराची भक्ती. हेच जीवनाचे मूलतत्त्व व सर्व ध्येयांचे आणि महत् कृत्यांचे स्फूर्तिस्थान आहे. परमेश्वर भक्ताला दृष्टीद्वारे प्रेम देतो. त्या प्रेमामुळे त्याचे त्रिदोष तत्काळ नाहीसे होतात.

# ३७) चिद्‌विलास

ब्रह्म सच्चिदानंदरूप व सजातीय – विजातीय – स्वगतभेद शून्य, देशकाल वस्तू परिच्छेद शून्य असे अनंत आहे. आणि म्हणून ते एकच आहे. ते अनिर्वाच्य आहे. त्याचे यथार्थ वर्णन निषेधमुखाने 'नेति नेति' हेच आहे. 'जगत् झालेच नाही' यासच 'अजातवाद' म्हणतात. जगत् ब्रह्माचे कार्य नव्हे अथवा ब्रह्मावर केलेला आरोप नव्हे. ते ब्रह्मस्वरूपच आहे. मोती व त्यावरील तेज अथवा समुद्र आणि त्यावरील लाटा हे एकच असल्यामुळे त्यांची वेगळीक करता येत नाही. त्याचप्रमाणे ब्रह्म व जगत् वेगळे करता येत नाहीत. वास्तविक, जगत् म्हणजे वस्तूप्रभा किंवा वस्तूचा विलास आहे. याच मतास स्फूर्तिवाद किंवा चिद्‌विलासवाद असे म्हणतात.

म्हणून यथार्थ सत्य हे आहे की हे जगत् 'चिद्‌विलास' आहे, चित्‌शक्तीचे उन्मीलन आहे, म्हणून चिति किंवा चित्‌चे ज्ञान नसल्यामुळे जगताचा आभास होतो. जेव्हा चितिचे ज्ञान होईल, तेव्हा जगत दिसणार नाही, सर्वत्र चितिच दिसून येईल, दिसू लागेल. स्वयंप्रकाशरूप, संवित् देवता चितिशक्तीचा विलास हे जगत आहे की ज्यामध्ये आपण व्यवहार करत असतो. ज्याचे दृष्टीकोन अशा प्रकारचे आहे. त्याच्यासाठी जगत् परमेश्वरी शक्तीचे विलास मात्र आहे. त्याच्यासाठी ना बंधन आहे ना मोक्ष. ना साधन आहे, ना साध्य, ना कोणतेच (कसल्याही प्रकारचे) संकोच आहे; कारण की गुरूच्या प्रसादामुळे त्याचे ज्ञानचक्षु उघडले गेलेले असतात. द्वैतनिदर्शक भेदाचा पडदा फाटून गेलेला असतो. वसुगुप्ताचार्यांचा हाच निर्णय आहे की जगत् ही काही दुसरी वस्तू नाही. ते संवितरूप चिद्‌चे क्रीडामात्र आहे. या चिद्‌चे स्वरूप परम स्वतंत्र आहे, स्वप्रकाशमय आहे. ते आपल्यामध्ये सृष्टी – स्थिती – लय करणाऱ्या शक्तीस धारण करून विद्यमान आहे. हेच चिद् सर्वांचे मूल कारण बनून सर्वांच्या सुखाचे उपाय आहे. हे चिद् देश, काल, आकार यापासून पृथक् असूनही पण देश, काल आणि आकाररूप भासते. सर्व देश, सर्व काल आणि सर्व आकार याच चिद्‌पासून प्रकट होतात. चिद् जगतस्वरूपात प्रकट होऊन सुद्धा सर्व व्यापक सदा परिपूर्ण, नित्य प्रकाशरूप असल्याकारणाने आपले अखंडत्व आणि एकत्वमध्ये पूर्ण आहे. जेव्हा परमशिवास सृष्टी (निर्माण) करण्याची इच्छा होते तेव्हा ते चिद् आपल्या स्वातंत्र्याच्या आधारे स्वतःचे प्रसरण करून, स्वतःमध्येच भेदास अंगीकार करून, अनंत पदार्थरूप बनून व्यक्त होऊन जाते.

हे चिद् प्रवृत्तिरूपाने बाह्य जगतामध्ये संपूर्ण विश्वाकार बनून स्वतःच प्रकाशित होते. यास चिद्‌चे विश्वात्मक रूप असे म्हणतात. विश्वाकार असून सुद्धा हे चिद् विश्वातीत बनून स्वतः प्रकाशमय, परमशुद्ध,

निर्मळ असते. बाह्य विश्वाकार बनूनसुद्धा चिद्‌ची शुद्धता आणि निर्मळता जशीच्या तशीच असते. जशाच्या तश्यातच अवस्थेमध्ये हे चिद् बहिरंग जगामध्ये विलास करते. विश्वातीत दशेमध्ये ते जागृतीहून वेगळे, जागृत अवस्थेच्या शरीराच्या बऱ्या – वाईट कर्मांपासून भिन्न (वेगळे); स्वप्नाहून भिन्न, स्वप्नावस्थेच्या स्वप्नाच्या सर्व व्यवहारापासून भिन्न; सुषुप्तिहून भिन्न, सुषुप्ति अवस्थेच्या शून्याहून, भिन्न; महाकारणरूप तुरियामध्ये तुरियातीत होऊन, केवळ स्मृती मात्र, या संपूर्ण विश्वाची ग्वाही होऊन, समस्त विश्वाच्या दरम्यान विश्वाहून भिन्न स्वरूपामध्ये असते.

या चिद्‌चे दोन रूपे आहेत – एक ग्राह्यभाव, दुसरे ग्राहक भाव. जे 'इदम्' म्हणून जाणीवेत येणारे यावन्मात्र प्रपंच समुदाय आहे, ते ग्राह्यभाव आहे. 'इदम् घटः,' 'इदम पटः' असे वेगवेगळे करून, 'इंदम्'ला आंतरिक मनाने ओळखण्याची जी शक्ती आहे ती ग्राहक भाव आहे. हे संपूर्ण विश्व ग्राह्य आहे. याचा ग्राहक विश्वात्मा आहे. या ग्राहकाशी अनुरूप असे, त्याच्याचसाठी हे गाह्य प्रपंच आहे. अनंत चमत्कारयुक्त, सामर्थ्यवान असे चिद्‌च ग्राह – ग्राहक भाव स्वरूपात विश्व – विश्वात्मा स्वरूपात असते. तेच चिद् जगद् – विलास आहे आणि ते जगत् चिद् (शक्ती) विलास आहे. वस्तुतः भेदाभेद स्वरूपाने हे चिद्‌च आपले विलास करीत असते.

समस्त शास्त्रांचा हाच सिद्धान्त आहे की, ब्रह्म सच्चिदानंदमय आणि सुखस्वरूप आहे. ब्रह्मापासून निर्माण झालेले हे जगत् ब्रह्मापासून वेगळे नाही. मी तू असे जे दिसते ते सर्व ब्रह्माचेच विलास आहे. भेदामध्ये अभेद, अभेदामध्ये भेद असा तो परमेश्वरच आहे. हाच खरा सिद्धान्त आहे. जसे समुद्रामधील असंख्य जलबिंदू, फेस, बुडबुडे, लाटा असूनसुद्धा ते सर्व समुद्राहून काही वेगळे नाहीत, तसेच या विश्वाचे सर्व रूप, नाम, गुण चिद्‌हून यत्किंचित पण वेगळे नाहीत. पाण्याच्या शीतलतेचा स्पर्श हा जसे पाण्याहून भिन्न नसतो, तसेच चिद्‌चे विलासरूप हे चिन्मय जग तुमच्या आमच्याहून वेगळे नाही. जसे कापड असूनही पण विचार दृष्टीने ते केवळ सूतच असते, सुताविना वस्त्र बनूच शकत नाही, तद्वत जग हे विश्व स्वरूपात दिसत असून पण परमार्थ दृष्टीने ते परब्रह्मच आहे, ब्रह्माशिवाय जगत् असूच शकत नाही. जगत हे ब्रह्मविलास आहे. याचेच नाव संवित्ति क्रीडा आहे. असे पाहणेच पराशक्तीची पूजा आहे आणि हेच सत्य श्रीगुरूबोध आहे.

# ३८) अनन्यभक्ती*

जी गोष्ट किंवा जो मनुष्य विष्णुदासास लववीतो, म्हणजे नम्र करतो, त्या गोष्टी किंवा मनुष्याबरोबर तो विष्णुदास म्हणजे संतजन लवतो, नम्र होतो, अभिमानाने नाठा धरत नाही. सरळपणाचे लेणे म्हणजे अलंकार विष्णुदासास अथवा संतजनास शोभतो. दंभ आणि कपट अशा प्रकारचे भाव त्यांच्या ठायी वसत नाहीत. अशा प्रकारच्या भोळ्या भावाने देवाची भक्ती केली, म्हणजे देवाचे भजन, ध्यान, त्याचे स्वरूप हृदयापुढे उभे ठेवून त्याजपाशी आपले सुखदुःख निवेदन करणे व त्याची प्रार्थना करणे हा प्रकार घडला असता सर्व भूतांविषयी दया, कोणी आपला अपराध केला असता तरी त्याच्याविषयी प्रतिकार करण्याची इच्छा नसून अंतःकरणाच्या ठायी क्षमा आणि सर्व प्रकारचा हृदयक्षोभ जाऊन शांती, हे भाव अंतःकरणाच्या ठायी वसू लागतात. अंतःकरण शुद्ध व पवित्र होते; दुर्वृत्तींचा त्यामध्ये लेश नाही असे होऊन त्या संतजनास सर्व ब्रह्मांड सोवळे दिसते, विटाळाचे तोंडही त्यास दिसत नाही. भगवद्गीतेत म्हटले आहे -

''जरी कोणी अत्यंत दुराचारी असला तरी तो अनन्य भक्तीमध्ये जर युक्त झाला तर त्याला साधूच समजले पाहिजे. कारण तो आपल्या निश्चयामध्ये योग्य प्रकारे स्थित झालेला असतो. तो तात्काळ धर्मात्मा (सदाचारी) होतो आणि त्याला शाश्वत शांती प्राप्त होते.'' - ९:३०-३१.

ह्याप्रमाणे परमेश्वराचे ध्यान, भजन आणि प्रार्थना येणेकरून अंतःकरण शुद्ध, उदार आणि उन्नत होते. ह्याचप्रमाणे नारायण सर्व भूतांच्या ठायी दिसत आहे, जिकडे पहावे तिकडे त्याचे प्रेमळ व आनंदभाव स्वरूपच गोचर होत आहे, अशी स्थिती या भजन, ध्यान, प्रार्थनेच्या योगे होते आणि कोठेच दुःख नाही, भक्ताच्या गावी दुःखाचा वास नाही, असे होते. आपणावर मोठमोठे प्रसंग (संकट) गुदरले असता, नारायण सर्व भूतांच्या ठायी दिसत आहे, अंतर्बाह्य तोच भरला आहे. असे जाणले म्हणजे त्या संकटांपासून दुःख होत नाही, गंभीर शांतीच अंतःकरणामध्ये वागते

भागवतात म्हटले आहे की, ''मीच परमात्मा अंतरी वसत असल्यामुळे ज्याचे हृदय संतुष्ट झाले आहे आणि ज्याच्या ठायी शम आणि दम वागतात, त्याच्या चित्तामध्ये समता असते, तो अकिंचन म्हणजे अत्यंत दरिद्री असला, तरी सर्व दिशा त्याला सुखाने भरलेल्या अशा वाटतात.'' देवाचे ध्यान, भजन व प्रार्थना केल्याने आपला आत्मा शुद्द व पवित्र होतो आणि सर्व सृष्टी सुखमय होते.

अनेक वर्षेपर्यंत देवाचे ध्यान, भजन, प्रार्थना करून सुद्धा जर आमचे अंतःकरण शुद्ध झाले नसेल, क्रोध नष्ट झाला नसेल, अहंकार निरस्त झाला नसेल, मत्सर शांत झाला नसेल, लोभ आमची दैना करीत असेल,

स्थिती नीच करीत असेल, सर्व संकट प्रसंगी आमची वृत्ती शांत सुखमय राहत नसेल; तर हा संस्कार आम्ही संपादिला आहे काय? हे चांगल्या प्रकारे पहावे लागेल. नाही तर मग साधुसंतांची वचने मिथ्याच आहेत काय? असेही नव्हे. भगवद्गीतेने 'अनन्यभाक्' (म्हणजेच अनन्य भावाने) असा एक शब्द घालून सर्व वचनांचा बोज राखिला आहे. साधक भक्त तो 'अनन्यभाक्' असला पाहिजे, देवच एक त्याला प्रमाण – दुसऱ्या कशाच्या अनुसंधानाने तो चालत नाही.

देवाशिवाय आम्हास दुसरा सखा सोयरा कोणी नाही, तोच अंतःकरणाचे दुःख नाहीसे करून शांती देणारा, पूर्ण अनन्यभावाने त्याचे ध्यान, भजन आणि प्रार्थना केली असता अंतःकरण शांत होते, समाहित होते, असा अनुभव येतो. देवाच्या मांडीवरच आम्ही बसलो आहोत अशी वृत्ती होते. अशा वेळी मद, मोह, मत्सरादि सर्व दोष निरस्त होतात आणि मनुष्य धर्मात्मा होतो.

दुसरा एक अनन्यभाव घेण्याचा प्रकार असा आहे. गृहधनापेक्षाही मानप्रतिष्ठेवर आसक्ती फार असते. लोकांमध्ये आपला बडेजाव व्हावा, मानमरात वाढावा, अशा प्रकारची इच्छा एकदा मनामध्ये उद्भवली की, ती अनिवार होते. त्यांच्या योगे मनुष्याच्या जिवास विश्रांती नाही असे होते. मन अस्वस्थ होते. मग अशा स्थितीमध्ये देवाचे चिंतन, त्याची उत्कट भावाने प्रार्थना व ध्यान ही सर्वथा अशक्य होतात, आणि अंतःकरणात अभिमान उत्पन्न होतो. एकदा का अभिमान उत्पन्न झाला की, त्याचे ते धर्मसाधन, भजन, प्रार्थना, कीर्तन, वक्तृत्व ही सर्व निष्फळ होतात. आपण आपणास पूज्य होतो, मग देवाची पूज्यता कोठे राहिली? दंभ, मान हे भक्ताचा घात करू पाहतात. देवाचे पाय त्याच्यापासून दूर अंतरतात. लोकप्रियता आणि मानप्रतिष्ठेमुळे भक्ताचे मन देवाकडे कळत नाही. याउलट उदार कृत्ये करण्याचा ध्यास भक्तास असला पाहिजे.

मानदंभापासून सुटका होण्याचे प्रबळ साधन आहे जनप्रताडना त्यामुळे होणाऱ्या दुःखाने देवाशिवाय कोणी प्रिय नाही, असा अनन्यभाव भक्तामध्ये उत्पन्न होऊन तो सावकाश देवाचे ध्यान करीत राहतो. मानखंडणा तर त्याच्यासाठी फार उत्तम असते. कारण त्यामुळे भक्त हा आपला खरा सखा देवाकडे जाईल आणि त्या ठिकाणी निरंतर एकनिष्ठेने, सुखाने आणि शांतीने राहून आपल्या दुःखाचे तो निरसन करून घेईल. याप्रमाणे मानखंडणा झाल्यामुळे देवाविषयी अनन्यभाव अंतःकरणामध्ये उत्पन्न होतो आणि त्या अनन्यभावाने देवाचे ध्यान, भजन आणि प्रार्थना ही केली असता शांती प्राप्त होते आणि मनुष्य धर्मात्मा होतो.

अनन्य प्रार्थनेने देव अंतःकरणात उदित होऊन आपणास साहाय्य करेल. आम्हास वाट दाखवितो, इतकी सिद्धी झाली; परंतु गती पुढे चालून पूर्ण सिद्धी होण्याकरिता भगवद्गीतेत सांगितलेल्या खालील श्लोकाप्रमाणे वागणूक ठेवली पाहिजे :-

''माझा शुद्ध भक्त जरी सर्व प्रकारची कर्मे करीत असला तरी माझ्या आश्रयाखाली, माझ्या कृपेने त्याला शाश्वत आणि अविनाशी धामाची प्राप्ती होते. सर्व कर्मामध्ये माझाच आश्रय घे आणि सदैव माझ्या संरक्षणाखाली कर्म कर. अशा भक्तीयोगामध्ये, पूर्ण तया माझ्या भावनेने युक्त हो.'' – १८:५६–५७.

सदासर्वकाळ विमल, उन्नत, उदार कृत्ये मनुष्याने केली म्हणजेच त्याच्या योगाने देवाची त्याने उत्तम पूजा केली असे होऊन एका देवाच्याच ठायी त्याचे चित्त परिनिष्ठीत होते आणि देवाविषयी प्रेम अत्यंत वाढून त्या प्रेमामध्येच मनुष्य गुंग होतो आणि त्या प्रेमरसाने देवाच्या ठायी एकरूप होतो. म्हणून अर्जुनास श्रीकृष्ण उपदेश करतात की, आपल्या चित्ताने सर्व कृत्यांचा भार मजवर टाकून, माझ्याच ठायी एकनिष्ठ हो आणि बुद्धीचे योगे सदासर्वकाळ माझ्याच ठायी तुझी चित्तवृत्ती सतत राहो.

याप्रमाणे एखादे वेळेस अनन्य भावाची प्रार्थना होऊन आपले अंत:करण शांत व विशुद्ध झाले म्हणजे सर्व काही साध्य झाले, असे समजू नये. आपल्या दोषांची परीक्षा करावी, त्यांचा निरास करण्याविषयी प्रयत्न करावा. देवास मान्य होतील अशी कर्मे सदासर्वकाळ करावी, देवाविषयी आणि जनांविषयी अंत:करणात प्रेम वाढवावे. त्यामुळे अंत:करणास असा संस्कार लागतो की त्याच्या योगे मनुष्य शाश्वतपदावर जाण्यास योग्य होतो. *प्रपन्न प्रलपित डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर – 'धर्माचार लेख व व्याख्याने' – ३६२:६८)

## ३९) मंत्रचैतन्य आणि मंत्रसिद्धी*

मंत्र चैतन्य झाल्यावरच सिद्धी देतो. कुलार्णवतंत्र, बृहन्नीलतंत्र, गंधर्वतंत्र आणि मंत्रयोग संहितेत लिहिले आहे की, ''चैतन्यमंत्र एकवार उच्चार करण्याने अचानक ही लक्षणे प्रकट होतील – हृतकंप, ग्रंथिभेद, सर्व अवयावांचे वर्धन (वायूने सर्व अंग फुगणे), आनंद, अश्रू, पुलक, देहामध्ये देवतेचा आवेश आणि गद्‌गद वचन, ज्या ठिकाणी ही लक्षणे दिसतात त्याला **पारंपर्य** म्हणतात. ज्याच्यामध्ये पाश अथवा बंधनाचा नाश होईल. परम तेजाने रंगून जाईल आणि ध्यानाच्या विषयाचा लाभ होईल त्याला **पारंपार्य** म्हणतात.''

शाक्तानंदतरंगिणीत सांगितले आहे की, आनंद, अश्रू, रोमांच आणि देहावेश ही मंत्रचैतन्याची उत्तम चिन्हे आहेत. त्यानंतर ज्ञान लाभाकरता मंत्रजपात अधिक यत्न केला पाहिजे. ज्ञानलाभ झाल्याने कृतार्थता व संसारमुक्तता होईल.

मंत्राची स्थूल, सूक्ष्म आणि परम अशी तीन रुपे असतात – १) स्थूलरुप = शब्द अर्थात मंत्रोच्चार करण्याने जो शब्द होतो, ते मंत्राचे बाह्य शरीर होय. २) ज्योतिर्मय सूक्ष्म रुप = याच्यात मन व्यापारशील होते. ३) परमरुप = मनोलय अवस्था. असे अग्नीपुराणात सांगितले आहे.

**क) मंत्रचैतन्याची अन्योन्य लक्षणे व नियम :**

मनसर्वदा मंत्रस्मरण करते. गंधर्वतंत्रात लिहिले आहे की, मंत्राचा एक कोटी जप केल्याने मन मंत्रस्वरुप होऊन जाते. चैतन्य मंत्र जपाला विधी निषेध नाही. ''मंत्र एकवार चैतन्य करुन त्याचा जप सर्वदा करावा. त्या जपाला पवित्रता अपवित्रता याचा विचार करु नये,'' असे कामधेनुतंत्रांत सांगितले आहे. विश्वसार तंत्रांत सांगितले आहे की, जागेपणी, झोपताना, उठता, बसता, फिरता, खाता, पिता अथवा अपवित्र अवस्थेत सिद्धमंत्राचा जप करण्यात दोष नाही. पद्म पुराणातही सांगितले आहे की, जप सर्वदा केला पाहिजे, त्यात दोष नाही. जप आणि ध्यान बरोबर (एकानंतर दुसरे) चालले पाहिजे. जपद्वारा देवता जप करणाऱ्याच्या दृष्टिगोचर होते.

जपाची उत्तम रीति ही आहे की, तो मनात व्हावा, आपणालाही ऐकू येऊ नये. मन विक्षिप्त झाले तरी जप सोडू नये. मंत्र घेतल्यानंतर पुनः प्रतिदिवशी त्याचा जप न केला तर सर्व कर्म निष्फळ होते व देवता अनिष्ट करते. म्हणून जपात कधी खंड पाडू नये. आपला मंत्र दुसऱ्या कोणालाही सांगू नये.

**ख) योग लाभाची चिन्हे :**

ज्यावेळी योग आपोआप होऊ लागेल, त्यावेळी ती योगाची निष्पत्ती अवस्था असे समजावे. श्वेताश्वतर उपनिषदात सांगितले आहे की, योगाग्निमय शरीर झाल्याने रोग–जरा–मृत्यू येत नाही. शरीर हलके,

आरोग्यलाभ, वासनानाश, उत्तमवर्ण, सुस्वरता, शुभगंध, अल्पमलमूत्र ही लक्षणे होतात. शक्तिपात झाल्याबरोबर साधकाला पुढील अनेक अनुभव येतात - साधक आनंदाने हसतो, प्रसन्न होतो, प्रेमाने खेळतो, आनंदित होतो, महासुखी होतो, संसारपासून विमुक्त होतो. दुःखाचा निरोध करतो, संपत्तीला मोहित होत नाही, शत्रुत्वाची (द्वेषाची) कल्पना मनात आली की थरथर कापतो, कामविकारांचा कार्यकारण भाव जाणतो व सर्वकामना ताब्यात ठेवतो. गुरुच्या शक्ती संचाराने तो स्वतः महायोगी होतो.

**ग) मंत्रसिद्धीची लक्षणे :**

**१) अधम सिद्धीची लक्षणे :**

गंधर्वमंत्र, नीलमंत्र आणि तंत्रसार यात याप्रकारे सांगितली आहेत - ख्याती, वाहनप्राप्ती, दीर्घजीवन, लोकांना वश करण्याची योग्यता, महाऐश्वर्य, पुत्रदारादिकांची प्राप्ती ही मंत्रसिद्धीची कनिष्ठ लक्षणे आहेत. पांडित्य, आरोग्य, चमत्कार करण्याची, रोगहरण करण्याची, विषयहरण करण्याची योग्यता हीही कनिष्ठ सिद्धीची लक्षणे आहेत.

**२) मध्यम सिद्धीची लक्षणे :**

गौतमीय आणि गंधर्व तंत्रात अशाप्रकारे सांगितली आहेत. - वैराग्य, मुमुक्षुत्व, त्याग, सर्ववश्यता, अष्टांगयोग अनुष्ठान, भोगेच्छुविसर्जन, सर्वभूतदया, सर्वज्ञता ही सर्व मध्यम सिद्धीची लक्षणे आहेत.

**३) उत्तम सिद्धीची लक्षणे :**

गंधर्वतंत्रात अशा प्रकारची सांगितले आहेत - सर्व प्राण्यांच्या ठिकाणी क्षमताभाव, मानापमान, शत्रु-मित्र, माती दगड व सोने यांच्या ठिकाणी समत्व बुद्धी, ब्रह्मचिंतनात आनंदानुभव, बाह्य चिंतननिवृत्ती, सर्व दशेत समता व निर्विकारता, डोळ्याच्या पापण्या न हालणे, मधुरता आणि मंद हास्ययुक्त बोलणे हे अमृत तत्त्वाचे गुण आहेत.

*(४५) ते (५०) प्रा. श्री. शं. खानवेलकर यांच्या 'श्रीगुरुदत्तयोग' (शक्तीपातरहस्य) या ग्रंथावरुन साधार).

# ४०) चित्त आणि ध्यान

मानवी जीवनात परमेश्वरास प्राप्त करण्यासाठी साधन स्वरूपामध्ये विपुल संपत्ती आहे. या सर्व संपत्तीमध्ये चित्त ही एक महान संपत्ती आहे, अमूल्य अशी संपत्ती आहे. चित्त चंचल असते. एकदा हा हातामधून निसटले तर ते पुन्हा ताब्यात यायचे नाही. म्हणून चित्तास मजबूत, दृढ, निर्मळ, शक्तीशाली, दीर्घकाळापर्यंत सत्य - स्फुरणयुक्त बनविण्यासाठी आपल्या आर्य संस्कृतीमध्ये उपासनेचे प्रावधान आहे. मंत्रपाठ, स्तोत्रपाठ, ईश - चिंतन जी काही आपली उपासना आहे, ती सर्व चित्तपूजन अर्थात् चित्ताचीच पूजा आहे.

चित्त सर्वात महत्त्वपूर्ण आहे. चित्तामध्ये सर्व काही आहे. चित्त अत्यंत मौल्यवान आहे. त्याला साधारण समजू नका. चिति किंवा चित्प्रकाशाची संकोचदशा चित्त आहे प्रत्यभिज्ञाहृदयाचे एक सूत्र आहे - 'चेत्यसंकोचिनी चित्तम।' त्याच्या भाष्यामध्ये लिहिले आहे की चित्त साक्षात् भगवती आहे. म्हणजे भगवती चिति ही कुंडलिनी आहे. चित्ताच्या आधारेच समष्टि जगत निर्माण झाले आहे. चित्ताच्याच आधारे व्यष्टि जगतामध्ये जीव - प्रपंच आहे. चित्त चितिशक्तीचे एक स्फुरण आहे. चित् प्रकाशरूप परमेश्वर हा अनंत शक्तीचा भांडार आहे. परमेश्वर हा चित्त स्वरूपात तुमच्यामध्ये राहून कर्मांचे फल देतो. जरा विचार तरी करा, तुमचे कोणते गुप्तकर्म परमेश्वरापासून लपलेले आहेत ! म्हणूनच ध्यान करा. चित्तामध्ये उच्च भावाने श्रीगुरू - चिंतन करा.

जसे चिंतन असेल तसे फल चित्त देतो. मानव हा चित्तामुळेच शांत, चित्तामुळे भ्रांत, चित्तामुळे मेधावी, बुद्धीमान, चित्तामुळे योगी बनतो. चित्तामुळे शास्त्रांमध्ये उपाधी आणि चित्तापासूनच समाधी प्राप्त होते, चित्तच गुरू, चित्त हा शक्ती - संचालक आणि चित्तच निर्विकल्प पद आहे. चित्तभ्रष्ट हा सदैव कष्टी, कर्माचार - भ्रष्टी, मोक्षमार्ग - नष्टी असतो. मलिन चित्तच घोर नरक आहे.

चित्तास सांभाळावे. चित्त हा आपला सुखद मित्र आहे. गुरूजनांचा परम प्रेमाचा अधिकारी शुद्ध चित्त आहे. म्हणून तुम्ही शांतचित्ताने ध्यान करा. चित्तात निवास करणारा परमेश्वर हा तत्काळ प्रसन्न होऊन तुम्हाला संपूर्ण विश्वास ध्यानामध्ये दाखवून देईल. या चित्तप्रसादाने तुम्हाला आत्म-विमर्श सहजच होऊन होऊन जाईल.

भगवंत हा सर्वांमध्ये व्याप्त असल्यामुळे तो तुमच्या प्रपंचास, ध्यानावस्थेमध्ये असताना सुद्धा, आनंदसंपन्न करेल. परमगुरू परशिवाच्या शक्तीने संपुटित होऊन प्राप्त होणारा मंत्र, हा मंत्रच नसून, एक

महामहिमामय सार्वभौम गुप्त दिव्यशक्ती आहे. मंत्रामध्ये परशिव आणि गुरू एकत्र असतात. म्हणून मंत्र हा चैतन्य आहे. त्याच्यामध्ये सर्वज्ञतेचे बळ असते. 'मंत्राः सर्वज्ञबलशालीनः।'

ध्यान हा परमार्थाचाच नव्हे, तर तो आमच्या प्रपंचाचा पण एक महान मित्र असतो. यामध्ये मुळीच शंका नाही, यात असत्य काही नाही. ध्यानामुळे चित्त निर्मळ बनते, त्यामुळे उच्च श्रेयांक प्राप्त होते. ध्यानाच्या काळामध्ये चित्त निरोधामुळे चित्त शांत आणि मन सहजपणे स्थिर होऊन जाते. प्राणाची गती साधारण गतिहून मंद होऊन जाते. आंतरिक शांती मनःशांती प्राप्त झाल्यावर जीवनामध्ये एक नवीन स्फूर्ती निर्माण होते.

ध्यान हा चित्ताच्या चंचलतेवर विजय प्राप्त करून देणारा एक अमोघ उपाय आहे. ध्यानच इच्छित फळ देणारा कल्पवृक्ष आहे. ध्यानच ईश्वराच्या शक्तीस ओढून घेणारा लोहचुंबक आहे. म्हणून ध्यानास साधारण समजू नये. ध्यान हा योगाचा हृदय, साधनेचा मूळ, ज्ञानाची गुरू किल्ली, प्रेमाचा प्रवाह आणि श्रीगुरूंचे कृपेचे धन मिळवून देणारा महायज्ञ आहे. ध्यान हे श्रीगुरूचेच एक रूप आहे.

गीतेमध्ये म्हटले आहे – 'ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानम्' म्हणजे ध्यानामुळे आत्म-दर्शन होते. श्रीमद्भागवतमध्ये सांगितले आहे की 'ध्याने ध्याने तद्‌रूपता।' ध्यानामध्ये साधक हा परमात्मरूप होऊन जातो,. भृंगाच्या तीव्र ध्यानामुळे कीटकपण भृंग होऊन जातो. त्याचप्रमाणे साधक हा ध्यान करत – करत तद्‌रूपतेस प्राप्त करतो.

ध्यान म्हणजे चित्तास परमेश्वरामध्ये भावपूर्ण बनविणे हे होय. हे कठीण नाही, परंतु सोपे पण नाही. ध्यानचा संपूर्ण अर्थ आहे – 'निर्विषयं मनः।' मनाचे मननरहित, चिंतनरहित, प्रज्ञा – स्मृतिरहित बनणे, मनाचे अमनामध्ये रूपांतरीत होणे, हे उच्चतम ध्यानाचे स्वरूप आहे. आपल्या डोळ्यांनी जे काही पाहता, हे सर्व ईश्वरमय आहे, अशी जाणीव ठेवावी. जे जे दृष्टीगोचर होते ते सर्व भगवंतानी भरलेले आहे. सर्वत्र भगवंताचा वास आहे, असे समजल्यास फार मोठे ध्यान साध्य होते. हे ज्ञानोत्तर ध्यान आहे. यामध्ये परमेश्वराचे ज्ञान मुख्य आहे. हे पूर्ण सत्य आहे की सारे जग परमेश्वराचेच पूर्ण रूप आहे.

# ४१) प्राण आणि पंचप्राणांची ओळख

मानवशरीर हे फक्त एक मांसमय पिंड नव्हे, भले ही ते तसे दिसत का असेना. मानवी देह ७२,००० नाड्यांच्या समुदायाची एक उत्तम रचना आहे. या ७२,००० नाड्या षट्चक्र, सप्तधातू, नऊ द्वार इत्यादी मिळून एक घरासारखे आहेत. या ७२,००० नाड्यांपैकी तीन अत्यंत प्रमुख आहेत. त्यापैकी मधली सुषुम्ना ही नाडी सर्वात महत्त्वपूर्ण आहे. सुषम्ना नाडीद्वारे जीवनाचे सर्व कार्ये होत असतात. ही सुषम्ना नाडी परमशिवाचे वासस्थान, सहस्त्रापासून कुंडलिनी नाडीचे स्थान मूलाधारपर्यंत अखंडरूपाने व्याप्त या स्वरूपाचे असते.

शरीरामध्ये प्राण हे मुख्य आहे. प्राणोत्क्रमण झाले की सर्व काही गेले (म्हणून समजा). मग त्या शरीराची किमत शून्य. प्राणामुळेच हे जग आहे. प्राणामुळेच मानव (जिवंत आहे). प्राणामुळेच आनंद, प्राणामुळे शक्ती, प्राणामुळे सिद्धी, प्राणामुळे आरोग्य, प्राणामुळे लोक - परलोक गमन, प्राणाश्रयामुळे संतती उत्पत्ती, प्राणामुळे रोग आणि चिंता, प्राणामुळे भ्रम आणि भ्रमिष्टता, प्राणामुळे सौंदर्य, प्राणापासूनच पुनर्जन्म आणि प्राणापासून जीवनमुक्ती आहे. म्हणून प्राणच ब्रह्म, शिव, शक्ती आणि कुंडलिनी आहे. 'प्राक् संवित्प्राणे परिणता' - ते संवित देवता प्राणरूपामध्ये परिणत ज्ञानेंद्रिय होतात. म्हटले गेलेले आहे की 'सर्व प्राणे प्रतिष्ठितम्।' ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये हे सर्व प्राणांमध्ये प्रतिष्ठित आहेत. जसे रथचक्राच्या नाभीमध्ये आरे जोडलेले असतात आणि ते (सर्व) त्यावर आश्रित असतात, त्याचप्रमाणे शरीर, इंद्रिये, मन आणि बुद्दी हे सर्व प्राणावर आश्रित आहेत. हा प्राण शरीरामध्ये विभागून भिन्न - भिन्न कार्य करतो किंवा करवून घेतो. हा चितिमय प्राण शरीरास सुव्यवस्थित बनविण्यासाठी शारीरिकक्रियांना नीति-नियमानुसार चालविण्यासाठी पाच स्वरूपांमध्ये - (१) प्राण, (२) अपान, (३) समान, (४) ध्यान आणि (५) उदान परिणत होतो. एकाच प्राणाचे, एकाच शक्तीचे असूनसुद्धा विविध कार्य संपन्न करण्यासाठी तो पिंड - ब्रह्मांडामध्ये पाच स्वरूपांमध्ये संपूर्णपणे व्याप्त असतो.

**पंच प्राणांचे कार्य**

प्राण हा हृदयामध्ये कार्यरत असतो (कार्य करतो).

'अपनयतीति अपानः।' खाली जाऊन विसर्जन करणाऱ्या शक्तीचे नाव अपान आहे. गुदा आणि उपस्थ या इंद्रियांद्वारे मलमूत्र विसर्जनाचे कार्य जो करत तो अपान होय.

'समं नयतीति समानः।' जे समान रूपामध्ये सर्वत्र काम करते ते समान होय. खाल्लेल्या अन्नरसास जो संपूर्ण शरीरामध्ये पोहोचविण्याचे काम करतो तो समान होय.

'व्याप्रोतीति व्यान:।' जे व्यापक आहे ते व्यान. शाखा – प्रशाखा स्वरूपात संपूर्ण ७२,००० नाड्यांमध्ये जी शक्ती संचार करते ती व्यान होय.

'ऊर्ध्वं नयतीत्युदान:।' जो वरच्या बाजूस घेऊन जातो तो उदान होय. वायु हा साधकाचा महान मित्र आहे. याच्या बळावर योगी ब्रह्मचर्याचे पालन करतो. तो 'उदान'द्वारे वीर्यास वर ओढून घेऊन ऊर्ध्वरेता बनतो. त्याचा वीर्य – रेतस् प्राणांमध्ये मिसळून प्राण बनून जातो की ज्याच्या प्रभावाच्या साहायने तो स्वर्गाच्या नर्तकीवर पण संपूर्ण विजय प्राप्त करतो. शक्तिपात करण्याच्या क्षमतेचा मूळ स्त्रोत हा ऊर्ध्वरेतस् आहे. हाच शक्ती, बळ, तेज आणि पराक्रमाचा दाता आहे. उदानवायुच्या आश्रयाने (आधारे) पापी जीवात्मा हा पापलोकात आणि पुण्यवान पुण्यलोकामध्ये आणि तेथून मानवलोकामध्ये जातो. हाच उदान वायू शुद्ध बनून क्रियायोगमध्ये समाधिसुखाची अनुभूती करवून देतो. उदानशक्ती सुषुम्नेमध्ये राहते.

आपापल्या क्रियांद्वारे जीवन धारण करणे या पाच प्राणांचे कार्य आहे. परमेश्वराच्या अनंत शक्तींमध्ये प्राण मुख्य आहे. प्राण हा हृदयक्रियेच्या मुलभूत आधारस्वरूपात शरीरास धारण करतो. हृदयक्रियेस सतत चालू ठेवणारा प्राणच (तर) आहे. प्राणशक्तीच्या क्रियेवर जीवात्मा हा जिवंत असतो.

# ४२) भक्तीमधील 'मर्कट किशोर न्याय' आणि 'मार्जार किशोर न्याय'

श्रद्धापूर्वक केलेली ब्रह्माची उपासना म्हणजेच भक्ती. ईश्वराच्या ठिकाणी परम अनुरक्ती म्हणजे भक्ती होय. कर्म, ज्ञान व योग यापेक्षा भक्ती ही श्रेष्ठ होय. भक्ती जो करतो तो अमृतत्व प्राप्त करतो. भक्ती – भावना उत्पन्न होणे हे देखील भगवंताच्या कारूण्यामुळे किंवा कृपेमुळेच शक्य आहे. भक्तीचे अंतिम साध्य मोक्ष असून ईश्वराचे आनंदमय स्मरण, संकीर्तन हे त्याचे साधन होय.

परमेश्वर भक्ताला दृष्टीद्वारे प्रेम देतो. त्या प्रेमामुळे विकार, विकल्प व स्वभाव हे त्याचे तीनही दोष तत्काळ नाहीसे होतात आणि प्रेमदान करणारी परमेश्वरमूर्ती हेच आपले साध्यसाधन होय, अशी प्रचीति त्याला होते. ईश्वराकडून ज्ञानियाला ब्रह्मानंद मिळणे म्हणजे त्याने त्याला पाठीशी घालणे होय; पण भक्ताला मात्र तो पोटाशी धरतो, त्यामुळे भक्ताचा आनंद मोठा असतो. ज्ञानी साध्यानंदात पूर्ण बुडून जातो तर भक्त हा सावध राहून त्या आनंदाचा उपभोग घेतो. ईश्वराचे दर्शन दृष्टीने नव्हे तर श्रद्धेने घडते, आणि श्रद्धा भक्तीचे प्रमुख घटक असते. शिवाय, भगवत् प्राप्तीकरिता केवळ भक्ती हाच एकमेव आध्यात्मिक साक्षात्काराचा मार्ग आहे.

सर्वोत्तम आणि प्रिय भक्ताची लक्षणे भगवद्गीतेमध्ये याप्रमाणे सांगितली गेली आहेत. जे दृढ दिव्य श्रद्धेने माझी सतत उपासना करण्यामध्ये संलग्न झालेले असतात ते माझ्या मते सर्वोत्तम आहेत. १२:४. जो हर्षितही होत नाही किंवा दु:खही करीत नाही, शोकही करीत नाही किंवा आकांक्षाही करीत नाही आणि ज्याने शुभाशुभ गोष्टींचा त्याग केला आहे, असा भक्त मला अत्यंत प्रिय आहे. जो ज्ञानामध्ये स्थित आहे आणि भक्तीमध्ये सलग्न झालेला आहे. तो मला अत्यंत प्रिय आहे. १२:१७ व १९.

भक्तीयोगमध्ये भगवंत आणि भक्त यांच्यामधील परस्परसंबंधनिर्देशक अशा दोन धारणा अध्यात्म क्षेत्रात प्रचलित आहेत – एक आहे 'मर्कटन्याया'ची तर दुसरी आहे 'मार्जार न्याया'ची.

**१) मर्कट किशोर न्याय :**

माकडाचे पिलू आई उड्या मारीत असताना स्वत:च्या प्रयत्नाने तिच्या पोटाला चिकटून बसते. ते आईला घट्ट धरून ठेवते. येथे स्वप्रयत्नाला संपूर्णपणे डावललेले नाही. तशा प्रकारची विचारसरणी येथे असल्याने तिला 'मर्कट किशोर न्याय' म्हणतात. याच साम्यतत्त्वाच्या न्यायाने असे म्हटले जाते की भक्ताने परमेश्वराला घट्ट धरून ठेवले पाहिजे, ही मर्कटप्रवृत्ती.

**२) मार्जार किशोर न्याय :**

मांजरी आपले पिलू तोंडात धरून नेत असता ते संपूर्णपणे तिच्या स्वाधीन असते; ते काही प्रयत्न करीत नाही; म्हणून या विचारसरणीला 'मार्जार किशोर न्याय' म्हणतात. यात ईश्वराच्या निर्हेतुक कृपेवर विश्वास आहे. येथे स्वप्रयत्नाला स्थान नाही. मांजरी ज्याप्रमाणे पिल्लाला आपल्या तोंडात धरून त्याला इजा न पोहोचता आपल्या इच्छेनुरूप कुठेही नेते त्याप्रमाणे भक्त परमेश्वरावर सर्व सोपवतो आणि परमेश्वर त्याची योग्य ती चिंता वाहून त्याला इष्ट त्या ठिकाणी नेऊन ठेवतो. ही मार्जारप्रवृत्ती.

## ४३) (महा)भूतांची पांच रूपे आणि त्यांचे स्वरूप

भूतांची पांच रूपे आहेत - स्थूल, स्वरूप, सूक्ष्म, अन्वय आणि अर्थतत्त्व, त्यांपैकी स्थूल रूप आहे - द्रव्यात्मक, आकारादिसहित पार्थिव आदि, शब्द रूप, रस, गंध आदि ज्याचे विशेष आहेत.

दुसरे रूप स्वसामान्य आहे, ज्याची विशेषात्मक रूपे आहेत पूर्वोक्त शब्द, रूप, रस, गंध आदी जसे पृथ्वीचे सामान्यरूप मृत्तिका म्हणजे माती आहे, गंध आदी तिचे विशेष आहेत. जल(आप) चे सामान्य रूप स्नेह आहे, रस आदि त्याचे विशेष आहेत. अग्नी (तेज)चे सामान्य रूप उष्णता आहे, रूपादी त्याचे विशेष आहेत. वायूचे सामान्य रूप प्रवाहित्व आहे. स्पर्श आदी त्याचे विशेष आहेत. आकाशाचे सामान्य रूप विभुत्व (सर्वतो गति) आहे, शब्द त्याचा विशेष आहे.

तिसरे रूप सूक्ष्म म्हणजे तन्मात्र आहे, ज्याचे एक अवयव परमाणु आहे.

चौथे रूप अन्वय नावाचे आहे, ख्याति (प्रकाशन) प्रवृत्ती आणि स्थितीशील हे तीन गुण कार्याच्या स्वभावाचे अनुयायी असतात अर्थात् जसे कार्याचे स्वभाव असते तसेच त्यांचे पण स्वभाव असते.

पाचवे रूप आहे अर्थवत्ता भोगार्थता आणि अपवर्गार्थता अर्थात् ज्याची पुरुषाच्या भोगसाधनामध्ये उपयोगिता अथवा पुरुषाच्या अपवर्ग साधनमध्ये उपयोगिता असते. ते जे स्वरूप (अर्थतत्त्व) आहे ते तीन गुणांनी अन्वित (अनुवृत्त) असते. गुणरूपी स्वरूप गुणकार्य तन्मात्र, तन्मात्रकार्य भूत आणि भूतकार्य भौतिकांमध्ये अन्वित (अनुवृत्त) असते. पंचरूपात्मक प्रत्येक भूतामध्ये संयमद्वारे त्या त्या स्वरूपाचे दर्शन आणि जय असते. भूतांच्या जयामुळे भूतप्रकृती तशाच प्रकारे योग्याच्या संकल्पाने अनुसरण करते जसे की गायी आपल्या वासरांचे अनुसरण करतात.

(महामहोपाध्याय डॉ. गोपीनाथ कविराज-''तांत्रिक वाङ्मय में शाक्तदृष्टि'', पृ. २३३)

# ४४) प्रारब्ध आणि मृत्यू

जन्म व मृत्यूला प्रारब्धच कारण असते. प्रारब्धभोगाने प्रारब्धाचा क्षय होतो. त्याच क्षणाला वर्तमान प्रयोजन संपले. म्हणजे प्रारब्धानेच मृत्यू घडतो व प्रारब्धच दीर्घायुष्य मिळवून देतो. मृत्यू लवकर वा उशीरा येत नाही, तर तो ठरलेल्या वेळीच येतो. मृत्यु पुढे ढकलता येत नाही की टाळता येत नाही. तो कुणाच्याही हाती नसतो. केवळ प्रारब्धाच्या अधीन असतो.

मृत्यू हा विश्वाचा-निसर्गाचा धर्म आहे. ''मृत्यू म्हणजे जीवनाच्या वृक्षाला लागलेले गोड फळ ! मृत्यू हे ईश्वराचेच एक स्वरूप.'' जीवन व मरण दोन्ही परम मंडल भाव. जीवन व मरण वस्तुत: एकरूपच आहे. निशेतूनच शेवटी उषा प्रकट होते व उषेतून पुन्हा निशा निर्माण होते. जीवनाला मरणाचे फळ येते व मरणाला जीवनाचे फळ येते. मृत्यू म्हणजे महायात्रा, मृत्यू म्हणजे महाप्रस्थान, मृत्यू म्हणजे महानिद्रा ! दररोजच्या धडपडीनंतर आपण झोपतो. झोप म्हणजे लघु मरण ! मरणाची झोप मोठी असणे, एवढाच फरक. मरण म्हणजे एक प्रकारे विस्मरण. झोपेत आपण सर्व काही विसरतो.

मृत्यू म्हणजे अंधार नव्हे, मृत्यू म्हणजे अमर प्रकाश, अनंत प्रकाश. मरण म्हणजे निर्वाण, म्हणजेच अनंत जीवन पेटविणे. स्वत:ची सर्व आसक्ती निसटणे, स्वत:च्या देहाच्या, मनाच्या, इंद्रियांच्या स्वार्थी वासना विसरणे म्हणजेच मरणे. हे मरणे या देहात असूनही अनुभवता येते. नारळातील गोटा नारळापासून अलग होऊन जसा खुडखुड वाजतो, त्याप्रमाणे देहेंद्रियांपासून आत्म्याला अलग करून वागणे म्हणजे मरण. तुकाराम महाराज म्हणूनच म्हणत असत :

*''आपुले मरण पाहिले म्यां डोळां*
*तो अनुपम सुखसोहळा''*

हे मरण ज्याने एकदा अनुभवले, त्याला पुनश्च मरण नाही. जिवंतपणी जो मरावयास शिकला, तो चिरंजीव झाला. मरण आपणास सावध करते. सारे सोडून जावयाचे आहे, असे स्पष्टपणे समजून येते.

मरण म्हणजे शांती. मरण म्हणजे नवजीवनाचा आरंभ. मरण म्हणजे आनंदाचे दर्शन. मरण म्हणजे पर्वणी. जिवाशिवाच्या ऐक्याचे संगीत. मरण म्हणजे प्रियकराकडे जाणे. मरण म्हणजे जगाचा वियोग, परंतु जगदीश्वराशी योग !''

(साने गुरुजी – 'भारतीय संस्कृती' – विविध पृष्ठे)

निसर्गनियमाने जे जे निर्माण होते ते ते काळामध्ये नाश पावते. निसर्गनियमानेच चालणारा मृत्यू प्रत्यक्षात कार्य करतो तेव्हा तो लवकर आला, अकाली आला, असे बोलले जाते. काहीवेळा 'मृत्युची वाट'

पाहूनही तो येत नाही. प्रारब्धाने शरीराला गती मिळत असते. आपण स्वकर्तृत्वाने मिळविले, अशी शेखी मिरविणाऱ्या बुद्धिवाद्यांना आयुष्यात सगळेच दिवस सारखे नसतात, हे जाणवते. दु:खाचे आघात होताना हे माझेच कर्तृत्व आहे असे म्हटले जात नाही, तेव्हा प्रारब्धा (नशिबा)ची आठवण येते. एकामागे एक दु:ख येऊ लागले की कोट्याधीशालाही जीवन निराश व भकास दिसते.

मी म्हणणारा अहंकार परिस्थितीत चारीमुंड्या चीत होतो. कर्म व कर्मफळ अविभाज्य घटक आहेत. ते टाळता येणार नसल्याने प्रत्येकाला भोगावेच लागते. सातत्याने कर्म करण्यातून फळ मिळत राहते. जीवनात चांगले कर्म केल्याचे फळ निश्चितच चांगले मिळते. आपण शरीराने कर्म करत असतो तरी त्यामागे संकल्प, इच्छाशक्ती असते. संकल्पात शक्ती, बळ, सामर्थ्य असते तेव्हा तो सिद्धीस जाण्यासाठी शरीराला प्रवृत्त करतो. चांगले संकल्प चांगले कर्म करून घेतात. संकल्पाचे बीज सुप्त मनात साठविले जाते. साठविलेल्या कर्माला संचित कर्म म्हटले जाते. प्रारब्ध शरीराला जन्म देते. जिवंत ठेवते, गतीमान करते, शरीराच्या मृत्यूलाही प्रारब्धच कारण असते.

# ४५) बद्ध आणि मुमुक्षू

माणसात बद्ध, मुमुक्षू, साधक व सिद्ध अशा चार कोटी असतात. 'बद्ध' म्हणजे केवळ प्रापंचिक, फक्त इहलोकाचाच – देह – इंद्रियसंबंधी सुखाचाच – विचार करणारे लोक, 'मुमुक्षू' म्हणजे या संसारात कितीही सुखे भोगली तरीही ती दुःखमिश्रित व दुःखपरिणामी आहेत, हे जग नश्वर आहे, जीवाला जन्मानंतर मरण व मरणानंतर जन्म घ्यावे लागतात, म्हणून या जन्म – मरणाच्या परंपरेतून कशी सुटका होईल म्हणजे मोक्ष केव्हा व कसा मिळेल अशी इच्छा करणारा होय.

**बद्ध** : आत्मज्ञानाचा अभाव हेच बद्ध माणसाचे लक्षण होय. तो तीर्थ, व्रत, दान, पुण्य आदी काहीच जाणत नाही. त्याच्यामध्ये दया, करुणा, नम्रता, मैत्री, शांती वा क्षमा असत नाही. त्याला सारासार विचार, स्वधर्म आचार, परोपकार आणि दान-पुण्य काहीच दिसत नाही. त्याच्यामध्ये भूतदया नसते. तो भक्ती, ज्ञान, ध्यान, वैराग्य इत्यादी काहीच जाणत नाही. त्याला ना संतांचा विवेक समजतो ना मायाचे कौतुक. ज्याच्यामध्ये अनेक कुलक्षण भरलेले असतात तोच बद्ध आहे.

तो उद्धट, बेपर्वा आणि दुसऱ्यांचे भले न इच्छिणारा व पाहणारा असतो. तो नेहमी वाईट कामामध्ये लागलेला असतो. परमार्थाचा अनादर आणि प्रपंचाचा आदर करतो. तो गृहस्थीचे ओझे मोठे आनंदाने उचलतो. त्याला सत्संग आवडत नाही, मात्र संतांची निंदा मोठ्या आवडीने तो करतो. तो हातामध्ये द्रव्याची जपमाळ घेऊन हिंडतो. तो नेहमी आपल्या डोळ्यांनी द्रव्य आणि दारासच पाहतो, नेहमी त्यांचीच चिंता करतो. त्याच्यासाठी द्रव्य आणि दाराच तीर्थ परमार्थ आणि सर्व स्वार्थ असतो. तो जागता-झोपता, रात्रं-दिवस विषय-वासनेच्या चिंतेमध्येच असतो.

**मुमुक्षू** : आपले सर्व दोष आणि दुर्गुण आठवून, एक प्रकारची उपरती आणि पश्चात्तापाची भावना ठेवून मुमुक्षू हा अध्यात्म – निरूपणाकडे वळतो आणि आपले दोष व दुर्गुण बदलण्याचा प्रयत्न करतो. तो पुण्य-मार्ग आठवतो, सत्संगाची कामना करतो आणि गृहस्थीपासून विरक्त होऊन जातो. तो आपले दुर्गुण पाहतो, समजतो विरक्तीच्या बळावर आणि दुःखी होऊन आत्मनिंदा करू लागतो.

मुमुक्षू स्वतःस दुर्भिमानी, अत्यंत क्रोधी (तापट) आणि अनेक दुर्व्यसनामध्ये फसलेला जाणतो. तो स्वतःस सर्वात नीच आणि कुलक्षणी समजतो, अवगुणांची खाण समजतो. आपला जन्म म्हणजे भूमिस-पृथ्वीस भार (ओझे) समजतो. अशा प्रकारे मुमुक्षू आपली निंदा स्वतःच करतो. गृहस्थधर्माच्या झंझटीपासून दुःखी होऊन तो सत्संगतीसाठी उत्सुक होऊन जातो. तो संतांची शरण शोधतो. अहंकाराचा त्याग करून मोक्षाची कामना करतो. तो आपल्या मोठेपणासाठी लज्जित होतो, परमार्थासाठी कष्ट झेलतो आणि त्याच्या मनामध्ये संतांच्या चरणी विश्वास उत्पन्न होतो. ज्या मनुष्यामध्ये अशा प्रकारची लक्षणे आढळतील, त्याला मुमुक्षू समजावे.

## ४६) साधक, सिद्ध आणि साधु-संत

**साधक** म्हणजे संत सद्गुरूंचा आश्रय करून त्यांनी सांगितलेले साधन करीत असणारा आणि **सिद्ध** म्हणजे साधन उत्तम रीतीने - तीव्र संवेगाने करून साध्य प्राप्त करून घेतलेला. **साधु-संत** म्हणजे नेहमी आपल्या स्वरूपाचे अनुसंधान करणारा, स्वरूपाने निर्विकार, निरूपाधी असा तो, निर्भय आणि मोहातीत असा तो.

**साधक** : जो आपल्या दुर्गुणांचा त्याग करून सत्संग ग्रहण करतो, त्यास साधक म्हणतात. जो संतांना शरण जातो, आणि ज्याला संत लोक आश्वासन देतात, त्याला शास्त्रांमध्ये साधक म्हणतात. संतांपासून आत्मज्ञानाचे उपदेश प्राप्त झाल्यावर त्याचे सांसारिक बंधन गळून पडतात आणि तो दृढपणे साधन आरंभ करतो. त्याला अध्यात्माच्या गोष्टी ऐकणे आवडते, अद्वैताच्या निरूपणाकडे त्याची प्रवृत्ती असते आणि तो त्याचे सारांश जाणण्याचा प्रयत्न करतो. तो शंकांच्या निरसनासाठी सत्संगती करतो. तो आपल्या विवेकाने देहबुद्धीस थांबवितो, आत्मशुद्धीस दृढ करतो, श्रवण व मनन करीत राहतो. तो द्वैतभाव सोडून अद्वैताचे साधन करतो आणि एकतेची भाव समाधी लावतो. तो आपले जीर्ण आणि जर्जर आत्मज्ञानाचे जीर्णोद्धार करतो आणि विवेकाच्या मदतीने भव-सागर पार करतो. तो साधुंची चांगली लक्षणे आत्मसात करून परमात्म्याच्या स्वरूपप्राप्तीचा उद्योग करतो. तो अहंभावाचा त्याग करतो आणि स्वत: स्वत:सच शोधू लागतो, आणि तुरीयावस्थेहून पण पुढे निघून जातो. त्यानंतर उन्मनी अवस्थेच्या शेवटी तो अखंड आत्मानुभव प्राप्त करून घेतो; आणि ज्याला अखंड अनुभव प्राप्त होते, तोच साधक असतो.

तो कामवासनेपासून मुक्त होतो, क्रोधापासून लांब पळतो आणि मद व मत्सरास एका किनाऱ्यावर टाकून देतो, तो कुलाभिमानाचा त्याग करतो, लोक लज्जेस तर जणु लज्जितच करून टाकतो आणि विरक्तीच्या साहाय्याने यथेष्ट परमार्थ करतो. तो अविद्यापासून दूर जातो, प्रपंचापासून बाजूस होतो. तो आपले मोठेपण जमीनीवर आपटतो, वैभवास पायाखाली तुडवितो आणि महत्त्वास हलवून सोडतो. तो भेदभावास ध्वंस करतो, अहंकारास मारून टाकतो आणि संदेह रूपी शत्रूस पाय धरून आदळतो. तो विकल्पाचा वध करतो. तो भव-भयास भयभीत करून सोडतो, काळाचे पाय मोडतो आणि जन्म-मृत्युचे डोके उडवितो (छाटतो) तो संकल्पावर आक्रमण करतो आणि कल्पनांचे अकस्मात् घात करतो. लिंग-शरीर किंवा वासनात्मक सूक्ष्म शरीरास जिंकतो आणि विवेकाच्या बळावर पाखंडास चीत करून सोडतो. तो गर्वास आपले गर्व दाखवितो, मोहास मध्येच तोडून टाकतो. तो द्वेषास निर्वासित करतो, नास्तिकतेचा गळा दाबतो.

तो ज्ञानाने विवेक आणि विवेकापासून वैराग्य-संबंधी सिद्धान्त निश्चित करतो आणि त्या वैराग्याच्या मदतीने दुर्गुणांचा संहार करतो.

जो अशा प्रकारे अध्यात्म्याचे निरूपण करून सर्व अवगुणांचा-दुर्गुणांचा त्याग करतो, त्यालाच साधक समजले पाहिजे. जो दृढपणे सर्वांचा परित्याग करून परमार्थाचे साधन करतो, तोच साधक म्हणविला जातो.

**सिद्ध :** त्यागाशिवाय मनुष्य साधक बनूच शकत नाही. मुमुक्षुतेमध्ये बद्धतेचे दुर्गुण राहात नाहीत आणि मुमुक्षुताचे लक्षण साधक असण्याच्या दशेमध्ये राहात नाहीत. पुढे जाऊन साधकाच्या संदेहाची निवृत्ती होऊन जाते; म्हणून ज्याच्यामध्ये कोणतेच प्रकारचे संदेह असत नाहीत, त्याला साधू म्हणून ओळखले पाहिजे. संशयरहित ज्ञानच साधूचे लक्षण आहे आणि सिद्धास कधी संशयच होऊ शकत नाही. ज्याला संशय असेल त्याचे जीवन आणि सर्वस्व व्यर्थ आहे. संशय असल्यास मोक्ष प्राप्ती अशक्य आहे. संशयामध्ये समाधानास मुळीच वाव नसतो. म्हणूनच संदेह-रहित ज्ञान आणि निश्चयासंबंधी समाधानच सिद्धांची लक्षणे आहेत.

ज्याने सर्व चराचराची निर्मिती केली आहे, त्याचाच विचार केला पाहिजे आणि शुद्ध विवेकाने परमेश्वरास ओळखले पाहिजे. ईश्वरास ओळखून मी कोण आहे, हे पाहिले पाहिजे. बंधनाचे संशय तोडून टाकावे, मोक्षाचे निश्चय करावे आणि पंचभूतांचे विश्लेषण करून हे पाहिले पाहिजे की त्यांची रचना कशी झाली आहे. आत्मबुद्धीचे निश्चय दृढ ठेवले पाहिजे. देह-बुद्धीची आठवण होताच विवेक नष्ट होऊन जातो, म्हणून आत्मबुद्धीस अत्यंत दृढ राखले पाहिजे. आत्मबुद्धीचे निश्चय होऊन जाणेच मोक्ष दशेस प्राप्त होणे आहे, म्हणून याचे कधीही विस्मरण होऊ देऊ नये की मीच आत्मा आहे. संतांच्या शरणी गेल्यामुळेच संशयाचा नाश होतो.

नि:संदेह असणेच **संताचे** मुख्य लक्षण आहे. सिद्धाचे कोणतेच शारीरिक रूप असत नाही. मग त्यामध्ये संदेह कुठून येणार? म्हणून सिद्ध तोच आहे ज्याला कोणत्याच प्रकारचे संदेह, संशय नसते. सिद्ध निर्मळ वस्तू किंवा निर्गुण ब्रह्मासारखा असतो. त्याच्यामध्ये लक्षण कुठून असणार? लक्षणाचा अर्थ फक्त गुण आहे आणि तो ब्रह्म निर्गुण आहे, आणि त्या निर्गुण ब्रह्मासारखे असणेच सिद्धांचे लक्षण आहे.

**साधु-संत** : साधुचे मुख्य लक्षण हे आहे की तो नेहमी आपल्या स्वरूपाचे अनुसंधान करीत असतो. शोध घेत असतो, आणि सर्व लोकांमध्ये मिसळून पण त्यांच्यापासून अलिप्त असतो. त्याची दृष्टी त्याच्यावर पडताच, त्याच्या सांसारिक चिंता नष्ट होऊन जातात आणि अध्यात्म निरूपणाप्रती ममता उत्पन्न होते. हे आहे तर साधकाचे लक्षण, परंतु सिद्धांमध्ये पण हेच लक्षण आढळते. संदेह-रहित साधनच सिद्धांचे लक्षण आहे आणि त्यांच्या आत मनात आणि बाहेर पण अचल समाधान असते. ज्याचे मन परमेश्वरामध्ये लागते, तोच **साधू** आहे. त्याचे बाह्य रूप आणि कार्य कसे का असेना, परंतु त्याचे मन सत्स्वरूपामध्ये लागले पाहिजे. ही लक्षणे साधुंमध्ये स्वाभाविकपणे दिसतात. फक्त अभ्यासामुळे ही लक्षणे उत्पन्न होत नाहीत. निर्गुणामध्ये वृत्ती लागून राहणेच अभ्यासाचे मुकुटमणी आहे.

साधुंना काम-वासना नसते. साधुंची संपत्ती अक्षय असते आणि ती त्यांच्यापासून कधीच निसटत नाही. आणि म्हणूनच ते क्रोधरहित असतात. संतांना याची जाणीव असते की भौतिक पदार्थ नश्वर असतात, म्हणून

ते त्यांचा त्याग करतात. साधु स्वरूपानेच निर्विकार असतो. मग त्याच्यासाठी तिरस्कार काय वस्तु आहे ! साधुना अनायासच वस्तु वा ब्रह्मस्वरूप असतो, म्हणून त्यांच्यामध्ये मत्सर असतच नाही. मद आणि मत्सराचे पिशाच साधुंपाशी फटकू शकत नाहीत. साधु स्वयंभू स्वरूप असतो, मग त्याच्यामध्ये दंभ कसा असू शकतो ! तेथे तर द्वैताचा आरंभच नाही. साधु लोक निष्प्रपंच असतात. समस्त ब्रह्मांड त्यांचे घर असते. ते नेहमी शोकरहित असतात. ते मोहातीत असतात. ते निर्भय असतात. ते शांत असतात. साधु मृदुतेमध्ये आकाशासमान असतो, म्हणून त्याचे वचन कठोर नसतात. तो नेहमी राग-द्वेषरहित असतो. तो निरुपाधी असतो. तो मानापमानावर लक्ष देत नाही. तो अक्षयाकडे आपले लक्ष ठेवतो; म्हणून तो परम दक्ष असतो आणि परमार्थाचे पक्ष ग्रहण करतो. तो निर्मळ असतो. तो सर्व धर्मांहून श्रेष्ठ असा आपला धर्म समजतो की तो ब्रह्मस्वरूपामध्ये स्थित असला पाहिजे, आणि यालाच साधुचे मुख्य लक्षण समजले पाहिजे.

# ४७) प्रारब्ध आणि प्रयत्न (कर्म)

प्रारब्ध म्हणजे पूर्वकृत (पूर्वी केलेले) कर्म; कर्म म्हणजे प्रयत्न. पूर्व जन्मी केलेले कर्म ह्या जन्मी प्रारब्ध होऊन बसले; नव्हे, पूर्व वयी केलेले कर्म उत्तर वयाला प्रारब्ध, काल केलेले कर्म आजला प्रारब्ध, सकाळचे कर्म दुपारला प्रारब्ध; दुपारचे सायंकाळला; पूर्व घटकेचे ह्या घटकेला आणि पूर्व क्षणाचे उत्तर क्षणाला प्रारब्ध होऊन बसते व ते अपरिहार्य होते असा अनुभव येतो. अनुभवापुढे शास्त्र व युक्ती लंगडी पडतात !

संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण अशी कर्माची तीन रूपे आहेत. जीवाने अनंतकालापासून अनंत जन्मांत करून ठेवलेल्या कर्माचा जो संग्रह अथवा साठा त्याला **'संचित'** म्हणतात. हे किती अनंत अपार असते ह्याचा पत्ता नाही. त्या संचितामधून तूर्त भोगण्यासाठी म्हणून निराळा काढून घेतलेला जो कर्माचा अंश त्याला **'प्रारब्ध'** म्हणतात. ह्या प्रारब्ध (प्राक्-आरब्ध) कर्माचा संबंध चालू देहापुरताच असतो. यानंतर चालू देहाच्या आयुष्यात अहंकर्तृत्वबुद्धीने (मी कर्ता ह्या अहंभावनेने) केलेले जे कर्म जे देहाच्या पश्चात् संचित्त कर्मात सामील होऊन राहावयाचे, त्यास **'क्रियमाण'** अथवा 'आगामी कर्म' म्हणतात.

संचित कर्म वाढतच राहते. हे संपूर्ण नाहीसे झाल्याशिवाय मोक्ष मिळत नाही. श्रवण-मनन-निदिध्यासाने साक्षात्कार घडतो. ह्या साक्षात्कारालाच आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान म्हणतात. हे ज्ञान झाले म्हणजे अतिलंबायमान कर्मश्रृंखलेचे मागील संचित व पुढील क्रियमाण हे दुवे ताडकन तुटून जातात; फक्त मधला प्रारब्ध-अंश शिल्लक राहतो. हा प्रारब्धांश भोगानेच क्षय पावतो, ज्ञानाने पावत नाही. केळ किंवा कोणतेही झाड मुळातून तोडले तरी तत्काळ मरत नाही, त्यांतील ओलसरपणा कालांतराने हळूहळूच नष्ट होतो, तसे प्रारब्धाचे आहे. ज्ञानोदय झाल्याबरोबर संचित व क्रियमाण नष्ट होते, मात्र प्रारब्ध शिल्लक राहते व राहाणेच अवश्य आहे, असे शास्त्रांचे व संतांचे मत आहे. म्हणून भक्तिमार्गी संतवर्य श्री तुकाराम महाराज ह्या त्रिविध कर्माविषयी असेच म्हणतात -

*"प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ।।*
*अवघा देवचि झाला पाहीं । भरोनियां अंतर्बाही ।।"* इत्यादी

पण असे म्हणण्याचा अधिकार त्यांचाच आहे की, ज्यांनी आपले सर्वस्व देवाला वाहिले आहे. खऱ्या भक्ताचाच देव ऋणी होतो व त्याला कर्माकर्मांतून मुक्त करतो.

पापाचे फळ दुःख व पुण्याचे फळ सुख हा सिद्धान्त ठरलेला आहे. सुष्टकर्माने दुष्टकर्माचा बाध होतो. पुण्यकर्माने पापकर्माचा परिहार होतो. पूर्वीचे क्लिष्टकर्म म्हणजे प्रारब्ध, त्याचा परिहार आताच्या पुण्यकर्माने

म्हणजे प्रयत्नाने करावयाचा, तर त्या प्रारब्धाची जात व त्याचे बळ समजले पाहिजे, म्हणजे कोणत्या जातीचा व किती बळाचा प्रयत्न केला पाहिजे हे समजेल व त्या प्रारब्धाला हा प्रयत्न जिंकील. प्रारब्धापेक्षा प्रयत्न दुर्बळ होईल तर प्रारब्धाचा जय होईल व त्या प्रारब्धापेक्षा प्रयत्न प्रबळ होईल तर प्रयत्नाचा जय होईल व त्या प्रारब्धापेक्षा प्रयत्न प्रबळ होईल तर प्रयत्नाचा जय होईल. 'बळी तो कान पिळी' हा नियम येथे लागू आहे.

कर्मगती अनिवार व अचिंत्यही आहे. कित्येक प्रसंगी असेही घडून येते की, पुण्यकरता करता पाप होते व पाप करीत असता पुण्य होऊन बसते. कर्मबंध तोडणे हे तर कर्तव्य आहे; पण कर्मानेच कर्म तोडले जाते; लोखंडाची बेडी पोलादाच्या शस्त्राने तुटते तसे निष्कृष्ट कर्म उत्कृष्ट कर्माने पराभूत होते, हे वर्म जाणून उत्कृष्ट कर्माची कास कल्याणेच्छूने धरली पाहिजे. पुण्यकर्माने पापाच्या परिहार होतो याचा अर्थ आत्ताच्या पुण्यात मागील पाप वजा होते, असा होतो.

कर्माप्रमाणे फळ हे तर ठरलेलेच आहे. 'फुलावरून झाड ओळखावे, बोलावरून अंतर पारखावे व या जन्मींच्या भोगावरून त्याचे मागील जन्मींचे कर्म जाणावे' असे ज्ञानेश्वरीतही एके ठिकाणी म्हटलेले आहे. हे समजून सुखाची इच्छा असणारांनी निरंतर सत्कर्माकडेच प्रवृत्ती ठेवावी, स्वतःच्या व वंशजांच्या कल्याणाकरता कायावाचा मनानेही असत्कर्म वर्ज्य करावे. स्वकष्टार्जित शुद्ध द्रव्यानेच पुण्यकर्म केले पाहिजे. अन्यायोपार्जित द्रव्याने केलेले सुकृत व्यर्थ होते, इहलोकांतही त्याची कीर्ती होत नाही व परलोकीही त्याचे फळ मिळत नाही. यासाठी न्यायार्जित द्रव्यानेच नेहमी सुकृत करीत असावे. त्यायोगे या लोकात कीर्ती व परलोकात सुख प्राप्त होते.

सूर्य उगवतो त्या दिशेला आपण पूर्व म्हणतो व मावळतो त्या दिशेला पश्चिम म्हणतो; पण सूर्यास पूर्व व पश्चिम काहीच नाही. तसेच देहाच्या दृष्टीने प्रारब्ध व प्रयत्न सत्य आहेत, पण स्वरूपाच्या ठिकाणी दोन्ही मिथ्या आहेत. देहच मिथ्या, तिकडे देहाच्या दृष्टीने त्याला भूत, वर्तमान व भविष्य अशी नावे पडली आहेत. देहाच्या पूर्वी, देह असताना व देहानंतर याप्रमाणे 'पूर्वी', 'आता' व 'नंतर' ही नावे कालाला देहाच्या उपाधीने आलेली आहेत; तसेच प्रारब्ध प्रयत्नांचे.

या देहाच्या पूर्वी जे कर्म ते **'प्रारब्ध'** व देहाकडून हल्ली जे कर्म होत आहे तो **'प्रयत्न'** अशी नावे देहाच्या उपाधीनेच आली आहेत. वस्तुतः चालला आहे हा प्रकृतीचा स्वभावच होय. कर्माला विवेकाने ज्ञानाग्नीत जाळून टाकून आपण मोकळे व्हावयाचे नाही काय? प्रारब्धालाच **'प्राक्तन'** म्हणतात. प्राक्तन म्हणजे पूर्वीचा यत्न, प्रयत्न म्हणजे जन्माच्या पोटात जसा मृत्यू तसा प्रारब्धाच्या पोटातच प्रयत्न. अशा रीतीने प्रारब्धाचा व प्रयत्नाचा एकमेकांत संबंध आहे. प्रारब्धालाच **'दैव'** म्हणतात; मग दैवाने केलेले ते आपले कसे म्हणता येईल ? याला **'अदृष्ट'** म्हणतात; मग जे आपल्या दृष्टीच्या आड आहे ते आपल्या दृष्टीत आणून त्याचे सव्यापसव्य करण्यात व बळे आपल्यावर ओढून घेण्यात काय अर्थ आहे ? याला **'ब्रह्मलिखित'** म्हणतात. मग ब्रह्मदेवाने लिहिलेले आपणास पुसण्याचा काय अधिकार? याला **'विधी'** म्हणतात; मग त्याचा आपण निषेध करून आपल्यास काय कर्तव्य आहे ? आले तसे जाईल, म्हणून त्याचा

विधिनिषेधच नको. यालाच **'कर्मरेषा' 'कर्ममर्यादा'** म्हणतात; मग आपले स्थान सोडून आपण कर्माच्या मर्यादेत कशाला जा ? सारांश, या पूर्व प्रारब्धाने आपल्याशी जो अपूर्व संबंध जोडला आहे व आपल्याला पुढे करून आपण मागे राहिलो आहे, त्याला विचाराच्या चव्हाट्यावर आणलेला झट्दिशी त्याचा निकाल लागतो. तो असा की, प्रारब्ध म्हणजे पूर्वी आरंभिलेले, पूर्वी कधी ? अर्थात् जगदुत्पत्तीच्याही पूर्वी, जगच्चालकाचा जो 'एकोऽहं बहुस्याम्' असा संकल्प उत्पन्न झाला त्याच वेळी ! अमुक काळात अमुक गोष्टी घडावयाच्या अशा प्रकारचे बीज जगदीशाच्या संकल्पात उत्पन्न झालेले आहे तेच वृक्षरूपाने पुढे फळाला येत असते. ते बीज वृक्षरूपाने व्यक्तीला आले म्हणजे प्रयत्नरूपाने चमकते, अव्यक्रांत लीन असले म्हणजे प्रारब्धरूपाने अदृष्ट स्थितीत असते. अव्यक्तापर्यंत आपल्या अज्ञानी जीवाची मती पोचत नाही. प्रारब्ध प्रयत्न ही देखील जगदीशाच्याच सृष्टीतून देहात आलेली आहेत.

कोणते प्रारब्ध टळते व कोणते टळत नाही, याविषयी श्रीगुलाबरावमहाराजांनी त्रिपुरारहस्याच्या आधारे उत्तम खुलासेवार सांगितले आहे. **प्रारब्ध** अथवा **दैव** दोन प्रकारचे आहे. एक 'जन्मांतरभोगद' व दुसरे 'कल्पांतरभोगद'. पहिल्याला **प्रारब्ध** व दुसऱ्याला **नियती** म्हणतात. जीवाचे फलोन्मुख पूर्वकर्म ते **प्रारब्ध** आणि ईश्वरसंकल्प ती **नियती**, हा ईशसंकल्प सृष्टीच्या नियमनाकरता सर्गाच्या पूर्वीच निर्माण झाला आहे. नियती अनुकूल असेल तर पुरुष प्रयत्नाने प्रारब्धजय होतो. नियती प्रतिकूल असेल तर प्रारब्धजय होत नाही. 'पुरुषप्रयत्न' व्याप्ती दैव पराजयाचे कारण असते; तर 'दैवप्रधान' नियतिरूप असते.

नदीतील जलचर प्राणी आपल्या वेगाने फिरतात आणि नदीवेगानेही वाहवतात, तसे प्राणी (जीव) आपापल्या प्रारब्धाने वर्ततात व नियतिसंज्ञक भावत्संकल्पानेही प्रवाहपतिताप्रमाणे फळे भोगतात. जीवशक्तीपेक्षा भगवत्संकल्प प्रबळ आहे, हे सांगण्याचे कारण नाही. जीवाला परमेश्वराने 'किंचित्' स्वातंत्र्य दिले आहे. त्यास 'दत्तस्वातंत्र्य' अशी शास्त्रांत संज्ञा आहे. या दत्तस्वातंत्र्याला अनुलक्षूनच शास्त्रांत विधिनिषेध सांगितले आहेत. ईश्वराने जीवाला स्वातंत्र्य दिले आहे, पण ते बोलून चालून 'किंचित्' आहे. अधिक देण्यास जीव पात्र नाहीत. जे जीव आपल्या अंगी पात्रता आणतात, त्यांना ईश्वर अधिक स्वातंत्र्य, 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं' शक्ती देत असतो. ती देखील मर्यादित असते आणि असे करण्यात जीवाच्या कल्याणाचाच हेतू परमेश्वराच्या मनात असतो, हे विसरता कामा नये.

ईशप्रसादाचे सामर्थ्य विलक्षण आहे. 'कर्मानुरूप फळ' हा ईश्वरी कायदा, तसाच 'न मे भक्तः प्रणश्यति' हाही ईश्वरी कायदाच. प्रारब्ध व नियती ही अभक्तांना बाधक, भगवत् भक्तांना नाही.

(साधार:रामचंद्र कृष्ण कामत – 'नामचिंतामणी– – पृ. २८९–३२५)

# ४८) आवरण व विक्षेप

ब्रह्म किंवा आत्मा नित्य अपरोक्षच आहे, पण त्याचा प्रत्यय आला पाहिजे.

*'तैसा तूं सहज असती ।*
*परी आलें पाहिजे प्रत्ययासी ।।'* परमामृत

हा प्रत्यय न येण्यास कारण जीवाला अविद्येने झालेला भ्रम. अविद्येच्या 'आवरण' व 'विक्षेप' अशा दोन शक्ती आहेत. आवरण म्हणजे ज्ञानास झाकणे, ते लुप्तप्राय करणे आणि विक्षेप म्हणजे विपरीत भासविणे. आत्मा चित्स्वरूप – शुद्धचैतन्यरूप – आहे असे न जाणणे हे 'आवरण' होय. एवढे आवरणच असते तर फारसे बिघडले नसते; पण ते चित्‌च्या (चैतन्याच्या) उलट म्हणजे जड आहे असे भासविणे हा 'विक्षेप' व हाच मोठा घातक आहे. 'मी कोण' हे न जाणल्याने तेवढे नुकसान नाही, पण मी देह नसताना 'मी देह' असे समजण्याने मोठे नुकसान आहे. ह्या विपरीत ज्ञानामुळेच लक्ष चौऱ्यांशीचे फेरे जीवाला भोगावे लागतात; पण आवरणच विक्षेपाला कारण असते हे मात्र विसरता कामा नये; म्हणून प्रथम आवरणाचाच नाश झाला पाहिजे, मग विक्षेपाचा. (ब्रह्मावर जग दिसणे हा विक्षेप.)

## ४९) व्यतिरेक आणि अन्वय

'आवरणभंग' व्यतिरेकज्ञानाने होतो आणि 'विक्षेपभंग' अन्वयज्ञानाने होतो. मातीत घर नाही, तंतूत पट नाही, सुवर्णात अलंकार नाही असे जे पाहाणे यास 'व्यतिरेक' म्हणतात व घटात माती आहे, पटात तंतू आहे, अलंकारात सुवर्ण आहे असे जे पाहाणे त्यास 'अन्वय' म्हणतात. याप्रमाणे ब्रह्मात जग नाही असे जे पाहाणे त्यास 'व्यतिरेक' व जगात ब्रह्म आहे असे जे पाहाणे त्यास 'अन्वय' म्हणतात. 'मातीत घटाचा व्यतिरेक व घटात मातीचा अन्वय' अशीही भाषा बोलतात. याप्रमाणे ब्रह्मात जगाचा व्यतिरेक व जगात ब्रह्माचा अन्वय, असे म्हणतात. अगदी सोप्या भाषेत बोलावयाचे म्हणजे ब्रह्मात जग नाही, पण जगात ब्रह्म आहे. (असे जे जाणणे याचे नाव ज्ञान व याहून इतर जे चौदा विद्या चौसष्ट कलादि सर्व ते अज्ञान.) आवरणभंग हा व्यतिरेकाने म्हणजे 'प्रत्यग्वृत्ती'च्या अभ्यासाने होतो.

*''मी कोण हे न कळे मज । या आवरणाचा भंग होतसे कळतां निज ।*
*जडसाक्षी चित्स्वरूप हा उमज । होतां, आवरण नासतें ।।*
*एसें नासलें आवरण । चित्तीं झालें चित्स्फुरण ।*
*प्रत्यावृत्ती पुन: पुन: योजणे अंत:करण । यास म्हणावा 'अभ्यास' ।।''*

– यथार्थ दीपिका, अ. १२

# ५०) 'पराक्' व 'प्रत्यय'

पराङ्मुख म्हणजे बहिर्मुख व प्रत्यङ्मुख म्हणजे अंतर्मुख अर्थात् 'आत्माभिमुख'. (प्रत्यक म्हणजे आत्मा व पराक् म्हणजे अनात्मा.) इंद्रियांची वृत्ती स्वभावतःच बहिर्मुख असते. बाह्य विषयात सुख (नव्हे, सुखाभास) आहे असा बुद्धीचा निश्चय असेपर्यंत म्हणजे विषयात सत्यमती असेपर्यंत विषय हे अंतःकरणवृत्तीला इंद्रियांच्या द्वाराने खेचून बाहेर ओढीत असतात. त्या विषयांच्या ठिकाणी विचारदृष्टीने दोषदर्शन होऊ लागले, विषय हे जड आहेत, अनात्मरूप आहेत, असुखरूप अर्थात् दुःखात्मक किंवा दुःखपरिणामी आहेत आणि आत्माच सर्व सुखाचा उगम आहे – सुखाचा सागर आहे, सुखस्वरूप आहे, अशा श्रवणमताने बुद्धीचा निश्चय झाला, म्हणजे वृत्ती बहिर्मुखता सोडून अंतर्मुख होऊ लागते. वृत्तीला बहिर्मुख होण्याचा अभ्यास अनंत काळाचा (अनंत जन्मांचा) असल्यामुळे ती एकाएकी अंतर्मुख होत नाही; 'पराङ्मुख'च होत असते. तिला प्रथम बलात्काराने पण हळूहळू (शनैः शनैः) 'प्रत्यङ्मुख' करण्याचा प्रयत्न म्हणजे अभ्यासच केला पाहिजे. ह्या प्रत्यङ्मुखतेच्या वृत्तीला 'प्रत्यग्वृत्ती' म्हणतात.

चैतन्याकडे वृत्ती आकर्षण करण्यासाठीच शास्त्रकारांनी स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण देह; अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय कोश; जागृती, स्वप्न, सुषुप्ती, अवस्था इत्यादी अनात्मवस्तूंचे स्वरूप सांगून ह्या सर्वांच्या पलीकडे राहाणारा, ह्या सर्वांना आपल्या प्रकाशाने प्रकाशित करणारा तो आत्मा, अशा नाना तऱ्हेच्या प्रक्रिया सांगितल्या आहेत. ह्या प्रत्यावृत्तीच्या चिराभ्यासाने सच्चिदानंदस्वरूप जो अनुभव येतो, त्यास 'त्वंपदसाक्षात्कार' म्हणतात; पण एवढ्यानेच काम भागत नाही; ज्ञानाची पूर्णता होत नाही; कारण जडनिषेधाने आत्मा कळल्यावरही जडद्वैत शिल्लक राहतेच. असे द्वैत राहिल्यानंतर त्याला 'अद्वैत-ज्ञान' झाले असे कसे म्हणता येईल? ज्या ज्ञानाने सर्व जड जग चिन्मय भासू लागेल तेच खरे अथवा पूर्ण ज्ञान होय. त्यालाच 'तत्पदसाक्षात्कार' म्हणतात.

नुसत्या व्यतिरेकाने म्हणजे त्वंपदसाक्षात्काराने जीवन्मुक्ती लाभत नाही. ती अन्वयाने म्हणजे तत्पदसाक्षात्कारानेच लाभते, हे रहस्य साधकांनी लक्षात ठेवावे. त्वंपद म्हणजे 'आत्मा' व तत्पद म्हणजे 'परमात्मा' आत्मा म्हणजे घटाकाश व परमात्मा म्हणजे मठाकाश अथवा महाकाश, हाही दृष्टान्त लक्षात ठेवल्यास पुरे. आत्म्यालाच 'कूटस्थ' किंवा 'प्रत्यगात्मा' म्हणतात आणि परमात्म्याला 'ब्रह्म' किंवा 'परब्रह्म' म्हणतात. अनंतकोटि ब्रह्मांडांना अंतर्बाह्य व्यापून असणारे जे चैतन्य त्याचे नाव 'परब्रह्म-परमात्मा' आणि व्यष्टिगत अंतःकरणोपहित जे चैतन्य त्याचे नाव 'कूटस्थ-आत्मा'; चिदाभास जो जीव त्याचे मूळस्वरूप – शुद्धस्वरूप आत्मा आणि हा आत्माच परब्रह्म परमात्मा, अशी अद्वैत वेदांताची विचारसरणी आहे. अगोदर 'अहं ब्रह्मास्मि' व नंतर 'सर्वं खल्विदं ब्रह्म.'

जड जगत् (अंतर्बहिरिन्द्रियगोचर विश्व) हे मिथ्या आहे, अधिष्ठान आत्माच सत्य आहे. प्रथम 'मी ब्रह्म' असा अनुभव, नंतर 'सर्वब्रह्म' असा प्रत्यय. 'मी देह' असे अज्ञानवस्थेत स्फुरत होते, तो भ्रम ज्ञानोत्तरकाली अथवा ज्ञानसमकाली नष्ट होऊन 'मी ब्रह्म' सच्चिदानंदस्वरूप असे स्फुरण होऊ लागते, ही प्रतीती मग सर्व जगतात येऊ लागते. म्हणून प्रथम व्यतिरेकाने 'अहं ब्रह्मास्मि'चा अनुभव, नंतर अन्वयाने 'सर्व खल्विदं ब्रह्म' चा अनुभव. आणि अशी अखंड प्रतीती येऊ लागली म्हणजेच जीवन्मुक्त होतो.

सर्वात्मभाव ही केवळ कल्पना नाही. सर्वात्मभाव हे सर्व सत्यांचे सत्य आहे. सारांश, दुधात साखर किंवा पाण्यात मीठ ज्याप्रमाणे एकरूपाने दिसत असते, त्याप्रमाणे जगात ब्रह्म पाहाणे याचे नाव ज्ञान नव्हे; तर तरंगात जसे पाणी किंवा अलंकारात जसे सुवर्ण, तसेच चराचरात ब्रह्म पाहणे याचे नाव 'ज्ञान' होय.

*"ज्ञान याचेंचि नाम । ज्या ज्ञानें कळे चराचर ब्रह्म ।*
*जडजगी पाहणें चैतन्य परम । तें ज्ञान, सोनें जैसे पाहणें अलंकारी ।।"* – यथार्थ दीपिका

घटाचे स्वरूप माती, अलंकाराचे स्वरूप सुवर्ण, तसेच पटाचे म्हणजे वस्त्राचे स्वरूप (निजरूप, खरे रूप, मूळ रूप) काय आहे हे स्पष्ट दाखविण्याकरता ज्याप्रमाणे त्या वस्त्राच्या अगदी अखेरच्या दशा (सुताच्या दोऱ्या) दाखवाव्या लागतात, त्याप्रमाणे आत्म्याचे निजरूप म्हणजे शुद्धरूप दाखविण्याकरता व्यतिकरेकज्ञानाने जिज्ञासू शिष्याला प्रथम जडाहून आत्मा निराळा आहे असे समजावून द्यावे लागते. देह, इंद्रिये, प्राण, मन, बुद्धी व तिच्या एकंदर वृत्ती दृश्य आहेत, त्या सर्व वृत्तींचा साक्षी आपण (आत्मा) त्यांहून निराळा आहे, वृत्ती या साक्षिभास्य आहेत, क्षणिक आहेत आणि साक्षी हा स्वयंप्रकाश आहे, शाश्वत आहे, म्हणजे 'प्रत्यगात्मा' ब्रह्म आहे असे जाणणे, हा स्वयंप्रकाश आत्म्याचा साक्षात्कार होणे, हा व्यतिरेक म्हणजे **'त्वंपदसाक्षात्कार'** होय आणि मग देहेंद्रियादि सर्व चराचर जगत् हे ब्रह्म आहे असे जाणणे हा अन्वय म्हणजे **'तत्पदसाक्षात्कार'** होय. प्रथम 'अहं ब्रह्मास्मि' व मागाहून 'सर्व खल्विदं ब्रह्म' हीच ज्ञानाची पूर्णता.

मन राजसतापस वृत्तीने वृद्धीला प्राप्त होऊन अति स्थूल होत असते. ते स्थूल मन आत्मसाक्षात्काराला योग्य नाही; कारण दुर्विज्ञेयतेमुळे आत्मा अति सूक्ष्म आहे. अशा सूक्ष्म आत्म्याचा स्थूल मनाने साक्षात्कार होत नाही. स्थूल कुदळीने सूक्ष्म वस्त्र शिवता येत नाही. त्याला सूक्ष्म सुईच लागते; तसे सूक्ष्म मनानेच सूक्ष्म आत्म्याचा साक्षात्कार संभवतो. अती सूक्ष्म बुद्धीनेच आत्म्याचा साक्षात्कार सांगितला आहे. वाणी, मन ही आत्मसाक्षात्काराला कारण नाहीत.

श्रवणमनननिदिध्याससंस्कारजन्य शुद्ध मनाला (बुद्धीला)च आत्मा अथवा ब्रह्मसाक्षात्काराचे करण मानणे योग्य आहे ! (तत्त्वानुसंधान). अशा शुद्ध मनालाच 'तनुमानसा' नामक निसरी ज्ञानभूमिका म्हणतात. ह्या तिसऱ्या भूमिकेवर साधक आरूढ झाला म्हणजे ब्रह्मसाक्षात्काराची चौथी भूमिका तो सहज चढू शकतो. अधिष्ठानरूप ब्रह्माच्या ज्ञानाने जगाचा बोध झाला म्हणजे जे ब्रह्म राहते, ते आपण आहो असे ज्ञान 'प्रत्यभिज्ञेने' होते. हे ज्ञान, हा अनुभव सुलभ होण्याकरता; शास्त्रकारांनी षट्समाधींचा अभ्यास सांगितला आहे.

# ५१) आकाश आणि स्वरूप

जीवात्माच्या निर्मितीमध्ये पंचमहाभूतांपैकी पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार भूतांची प्रमुख भूमिका आहे. आकाश या महाभूताची त्याच्या स्वरूप निर्मितीमध्ये नगण्य भूमिका आहे. म्हणूनच आकाश आणि स्वरूप यांमध्ये भेद आहे.

सुवर्णादि नाना धातू, रत्ने, काष्ठ, वृक्ष, पाषाण इत्यादी मिळून होणारी पृथ्वी, ही जड व कठीण अशी आहे.

पृथ्वीपेक्षा जलतत्त्व व्यापक व मृदू असे आहे. पृथ्वीवरील समुद्र, नद्या, तेल वगैरे पातळ पदार्थ, तसेच शरिरातील वीर्य, रक्त, मूत्र, लाळ वगैरे पदार्थ जलतत्त्वात मोडतात.

तेजतत्त्वात चंद्र, सूर्य, तारांगणे, विद्युल्लता, अग्नी (समुद्रांतील वडवाग्नी व शरिरातील जठराग्नी इत्यादी) धातूरत्ने इत्यादिकांची व शरिराची कांती तसेच डोळ्यांतील पाणी (अश्रु) ह्या सर्वांचा समावेश होतो. हे तेज-तत्त्व जलतत्त्वापेक्षा सूक्ष्म (विरल) व व्यापक आहे.

वायू हा तेजापेक्षा सूक्ष्म (विरल) व चंचल आहे. वृक्षादिकांचे हालणे, डोलणे, शरिराची एकंदर हालचाल (चलन, वलन, प्रसारण, निरोधन, आकुंचन, प्रसरण इत्यादी) हे सर्व वायूमुळे होते. आकाशात मेघमंडळ व चंद्रसूर्यादि गोल हे बहुतेक वायूमुळेच धरले जातात. ब्रह्मांडातील चारही खाणीतील जीवांचे जीवन वायूवरच अवलंबून आहे. पृथ्वी, आप व तेज या तीन तत्त्वांच्या साठ्यावाचून प्राणी (जीव) काही काळ जगू शकेल; परंतु साधारणतः वायुतत्त्वावाचून क्षणभरही जगणे शक्य नाही. ब्रह्मांडातील हे वायुतत्त्व तेजतत्त्वापेक्षा मृदू (विरल) व व्यापक आहे.

आकाशतत्त्व हे तर पृथ्वी, आप, तेज व वायू या चारही तत्त्वांपेक्षा सूक्ष्म म्हणजे विरल आणि व्यापक आहे. जगताला कारणीभूत अशी ही पंचमहाभूते एकापेक्षा एक विरल आणि व्यापक होत गेली आहेत. (विरलता ही व्यापकतेस कारण म्हटल्यास चालेल अथवा व्यापकतेमुळेच विरलता असेही म्हणता येईल.) पृथ्वीपेक्षा आप व्यापक, आपापेक्षा तेज व्यापक, तेजापेक्षा वायू व्यापक व वायूपेक्षाही आकाश सूक्ष्म व व्यापक आहे. फार काय, ब्रह्मासारखीच आकाशाची व्याप्ती आहे.

ब्रह्म हे सर्वव्यापक, अचल, अढळ, निर्मळ निश्चल, निरवयव व निरंश आहे, त्याचप्रमाणे आकाशही सर्वव्यापक, अचल अढळ, निर्मळ, निश्चल, निरवयव व निरंश आहे. मग आकाशालाच ब्रह्म का म्हणू नये? तर आकाश हे जड आहे व ब्रह्म हे चैतन्यरूप आहे. आकाशाला शास्त्रात उत्पत्ती सांगतात, 'आत्मन आकाशः संभूतः।'

ब्रह्म हे आकाशाच्या उलट म्हणजे अज आहे. असा परस्परभेद असल्यामुळे आकाश हे ब्रह्म होऊ शकत नाही. 'आकाशस्ताल्लिंगात्' ह्या ब्रह्मसूत्रावरील शारीरभाष्यात आकाश व ब्रह्म यांतील भेदाचे आचार्यांनीही सुंदर विवरण केलेले आहे. आकाशाला व स्वरूपाला पाहाण्याची खूण श्रीसमर्थ रामदास पुढील ओळीत सांगतात; ती साधकांनी सर्वांगाने कान करून ऐकण्यासारखी आहे-

*'आकाश वेगळेपणे पहावें । स्वरूपीं स्वरूपचि व्हावें ।*
*वस्तूचे पहाणें स्वभावें । ऐसें असे ।।''*

– दासबोध, ८।६

ते भूत आकाश आणि ब्रह्मच्या अनंत स्वरूपांमध्ये कधीच समानता होऊ शकत नाही – दोन्ही कधीच एक(समान) होऊ शकणार नाहीत. आकाशास आपण वेगळे किंवा दूर (लांब) ठेवून पाहतो. परंतु ब्रह्मचे स्वरूप पाहण्यासाठी आपणास खुद्द स्वरूपमध्ये मिसळून जावे लागते. तो ब्रह्म स्वाभाविकपणे अशाच प्रकारे पाहिला जाऊ शकतो. अशा प्रकारे शंकेचे निरसन होते आणि संदेह वृत्ती नष्ट होते. ब्रह्मच्या स्वरूपाचे अनुभव त्याच्याशी भिन्न होऊन घेतले जाऊ शकत नाही. आकाशाचे तर अनुभव होते, परंतु स्वरूप अनुभवातित आहे; आणि म्हणूनच आकाशाशी त्याचे साम्य होऊ शकत नाही. दुधात मिसळलेले पाणी हे दुधाचे अंश होऊन राहते; मात्र राजहंसच पाण्यास दुधापासून वेगळा करू शकतो. तद्वत ब्रह्मचे स्वरूप आणि आकाशामधील भेद (फरक) संत लोकच जाणतात. संतांच्या संगतीमध्ये राहूनच या समस्त मायेचे रहस्य समजून घेतले पाहिजे आणि त्यांच्याच समागमाने मोक्षाची प्राप्ती होते. सारांश, आकाश हे आपणाहून निराळेपणाने पाहावयाचे (म्हणजे पाहाता येते किंवा दिसते) तसे स्वरूप हे निराळेपणाने पाहावयाचे नाही अथवा पाहाता येत नाही, तर ते आत्मत्वाने म्हणजे स्वरूपच आपण होऊन पाहावयाचे आहे.

# ५२) समाधी आणि समाधीप्रक्रिया

**क) समाधी :** योगमतांतर्गत धर्मतत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र या दोहोंचे ध्येय समान असून, समाधी हे त्या ध्येयाच्या प्राप्तीचे सर्वोच्च साधन आहे. समाधीचे दोन प्रकार होतात : पहिल्या प्रकारात चित्त एकाग्र अवस्थेत असते. त्यास समापत्री, सबीज किंवा संप्रज्ञात समाधी किंवा क्वचित प्रसंगी ध्यान असेही म्हणतात. त्यात चित्त स्थूल किंवा सूक्ष्म अशा इष्ट विषयावर केंद्रित केलेले असते. त्यात चित्ताला अन्य विषयातून निवृत्त करून केवळ ध्येयविषयाशी तदाकार केले जाते. समाधीच्या दुसऱ्या प्रकारास निर्बीज, असंप्रज्ञात किंवा सहजसमाधी म्हणतात. त्यात चित्ताच्या सर्व वृत्तींचा निरोध होऊन ते निवृत्तिक होते. ही अवस्था एकदा प्राप्त झाली की सर्वार्थता आणि एकाग्रता, व्युत्थान आणि समाधी, अशी द्वंद्वे संपूर्णपणे व कायमची नष्ट होतात. जीवनातील नेहमीच्या व्यवहारांनी ती अवस्था विचलित होत नाही, ही सहज-समाधी विषयीची अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्ट आहे, कारण तीत प्राप्त आणि अप्राप्त हा ध्येयविषयक भेद संपूर्णपणे नष्ट होऊन सर्वच मनोव्यवहार, मग ते बाह्य जगताविषयी असोत की आंतरिक असोत, त्या सहज अवस्थेच्या एकरस, अखंड सत्तेत सुलभतेने नांदतात परंतु व्यवहारात मात्र 'समाधी' या शब्दाने निरोधाच्या अवस्थेपेक्षा एकाग्रतेची अवस्था असाच अर्थ अधिक प्रचलित आहे. यमनियमादि योगांतील सर्व साधने समाधीला पूरक व पोषक असल्यानेच त्यांचे महत्त्व आहे.

**ख) समाधी प्रक्रिया :** समाधीच्या अवस्थेत चित्ताची एकाग्रता साधण्यासाठी धारणा आणि ध्यान अशा दोन पायऱ्या ओलांडाव्या लागतात. भ्रूमध्य, नासाग्र, नाभिकमल इत्यादी शरीराच्या बाह्य वा आभ्यंतर भागांना किंवा इष्ट देवतेच्या सगुण रूपावर चित्तवृत्तीचे जे स्थिरीकरण केले जाते, त्यास **'धारणा'** असे म्हणतात. धारणेत चित्तवृत्ती एकाच विषयाशी संबंधित असतात. धारणेचा अभ्यास पक्व दशेला आल्याने चित्तात जेव्हा एकच एक वृत्ती सातत्याने उदित होऊ लागते व त्या वृत्तिप्रवाहांतून इतर वृत्ति संपूर्णपणे नष्ट होतात तेव्हा चित्तगत प्रत्ययाच्या एकतानतेच्या त्या अवस्थेस **'ध्यान'** असे म्हणतात. ध्यानाची परिणति पुढे समाधी अवस्थेत होताना ध्येय विषयाशी चित्त इतके तदाकार होते की, मी ध्यान करीत आहे, हा अनुभव चित्तात उदित होण्याचा थांबतो व केवळ ध्येय वस्तूच्या स्वरूपाचा बोध एवढा एकच अनुभव चित्तात उदित होत राहतो. हीच **'सबीज समाधी'** किंवा **'समापत्ति'** होय.

धारणा ध्यान आणि समाधी या तिन्ही अवस्था एक विषयक होतात तेव्हा त्या तिहींना मिळून **'संयम'** हे नाव दिले जाते. संयमाच्या अभ्यासाने चित्तात समाधीप्रज्ञेचा उदय होतो. या प्रज्ञेच्या साहाय्याने स्थूलता सूक्ष्म विषयांवर चित्ताची एकाग्रता झाल्याने त्या त्या विषयासंबंधी पूर्ण ज्ञान प्राप्त होते. या ज्ञानाला

दिक्कालाच्या मर्यादा नसतात. अशा ज्ञानाने अनेक प्रकारच्या **सिद्धि** प्राप्त होतात, असे यौगिक मानसशास्त्रात मानले जाते.

चित्तस्थिरीकरणाच्या या क्रियेत चित्ताचे तीन प्रकारचे परिणाम होतात. त्यांना अनुक्रमे एकाग्रता परिणाम, समाधीपरिणाम व निरोधपरिणाम असे म्हणतात. नेहमीच्या अवस्थेत चित्तात एक प्रत्यय शांत होऊन दुसरा उदित होणे, मग तो शांत होऊन निराळा प्रत्यय उत्पन्न होणे, असा अनेक प्रत्ययांचा क्रम सतत चालू असतो. त्यांत, शांत झालेला प्रत्यय व उदित झालेला प्रत्यय हे जेव्हा तुल्य होतात तेव्हा त्यास **'चित्ताची एकाग्रता'** असे म्हणतात.

एकाग्रतापरिणामाच्या सातत्याने पुढे चित्ताच्या सर्वार्थततेचा क्षय होऊन एकाग्रता हाच चित्ताचा स्वभाव होणे यालाच **'समाधीपरिणाम'** असे म्हणतात. याच्याही पुढे समाधीतील स्थूल वा सूक्ष्म विषयांचे आलंबन सुटल्याने चित्त जेव्हा पूर्णपणे वृत्तिशून्य होते तेव्हा चित्ताचा **'निरोधपरिणाम'** होऊ लागतो. या अवस्थेला **'निर्विकल्प, निर्बीज** किंवा **असंप्रज्ञात समाधी** असे नाव आहे. यौगिक मानसशास्त्रातील ही सर्वोच्च अवस्था प्राप्त झालेल्या व्यक्तीच्या चित्तातून क्लेशरूपी मल, अज्ञान, अविवेक इत्यादी गोष्टी पूर्णपणे व कायमच्या नष्ट होतात. स्वरूपास्थिति किंवा सहजावस्था ती हीच. ती एकदा प्राप्त झाल्यावर चित्तातून सुख, दुःख, प्राप्ति, अप्राप्ति इत्यादी द्वंद्वे आणि मोह नष्ट होतात. अशा अमनस्क, उन्मनी अवस्थेत जीवनावश्यक व्यवहार प्रकृतीच्या प्रवाहाशी सुसंगत अशा रीतीने चालू राहतात; परंतु त्यात क्लिष्ट वृत्तींचा अभाव असतो. त्या वृत्तींना **'अक्लिष्ट वृत्ति'** म्हणतात. त्यावर आधारित मनोव्यवहार अविद्याजन्य बंधनापासून मुक्त असतो.

(का. स. जोशी - 'मराठी तत्त्वज्ञान - महाकोश : खंड-२'- पृ.४४०)

# ५३) चित्तवृत्ति आणि चित्तभूमिका

ज्यांचा निरोध करावयाच्या अशा वृत्ति जरी अनंत आहेत तरी त्यांचे मुख्यत्वे पांच प्रकार आहेत : १) प्रमाण, २) विपर्यय, ३) विकल्प, ४) निद्रा आणि ५) स्मृति.

**१) प्रमाण :** प्रत्यक्ष अनुमान आणि शब्द अशी सत्य ज्ञानाची सांख्य मनात सांगितलेलीच तीन प्रमाणे आहेत.

**२) विपर्यय :** म्हणजे मिथ्याज्ञान. त्यात संशय आणि अनिश्चित ज्ञानाचाही समावेश होतो.

**३) विकल्प :** म्हणजे ज्याचे केवळ शब्दानेच ज्ञान होते, मात्र त्या नावाची वस्तु कोठेच नसते. उदा. शशशृंग, वंध्यापुत्र, 'उन्का' पक्षी.

**४) निद्रा :** या वृत्तीत कोणत्याही बाह्य पदार्थाचे ज्ञान होत नाही. हीच सुषुप्ति होय. या वृत्तीत ज्ञानाभावाची अनुभूती असते.

**५) स्मृति :** म्हणजे अनुभूत विषयांचे कालांतराने पुन्हा जसेच्या तसे भान होणे.

या सर्व वृत्ति चित्ताच्या आहेत; परंतु केवळ सांनिध्यामुळे अविवेक होऊन आत्म्याच्या ठिकाणी या वृत्ति असल्याचा भास होतो. चित्तनदी ही 'उभयतोवाहिनी' असते. या चित्तनदीचा प्रवाह जेव्हा विषयांच्याकडे वाहणारा असतो तेव्हा ती नदी पापवहा होते. या उलट जेव्हा ती विवेकख्यातीकडे प्रवाहित होते तेव्हा तीच कल्याणप्रद सिद्ध होते.

या चित्ताच्या पांच भूमिका सत्त्व, रज आणि तम गुणांच्या तारतम्याने उत्पन्न होतात.

**१) 'क्षिप्त'** या भूमिकेत चित्त रजोगुणाच्या आधिक्याने बहिर्मुख होते. इंद्रियांच्या द्वारा ते बाह्य पदार्थांकडे फेकले जाते. **२) 'मूढ'** या भूमिकेत तमोगुणाचे अधिक्य होते. अज्ञान, पाप, निद्रा, आळस याकडे चित्ताचा कल होतो. **३) 'विक्षिप्त'** अवस्थेत सत्त्वगुणामुळे चित्ताची मधूनमधून एकाग्रता होते, परंतु फिरून ते विचलित होते. **४) 'एकाग्र'** अवस्थेत रजतमांचा नाश होऊन सत्त्वाचा संपूर्ण उदय होतो. चित्त अंतर्मुख होऊन विशिष्ट आलंबनावर एकाग्रता दीर्घकाळ होते. **(५) 'निरूद्ध'** ही योगस्थिती होय. येथे ऋतंभरा प्रज्ञा प्राप्त होते. शेवटल्या दोन भूमिका योगास अनुकूल होत.

## ५४) सुखदु:ख आणि बंध मोक्ष*

''भोगांनी इंद्रिये तृप्त झाल्याने त्यांची जी उपशांति होते ते सुख, व भोगेच्छेमुळे, म्हणजेच लौल्यामुळे जी अशांती होते तेच दु:ख'' अशी व्यासकृत व्याख्या आहे. विवेकी पुरुषाला सुखोपभोग देखील दु:खमयच वाटतात, त्याचे कारण सांगताना व्यासांनी म्हटले आहे की, सुखोपभोगाने शाश्वत शांति मिळत नाही, म्हणून दु:ख उद्भवते तेच **'परिणामदु:ख'** होय. सुखोपभोगाच्या वेळीही त्यात बाधा आणणाऱ्या गोष्टींविषयी द्वेषभावना असते, तेच **'तापदु:ख'**. त्याने युक्त सुखोपभोगाचे जे संस्कार चित्तात उद्भवतात त्यांना **'संस्कारदु:ख'** म्हणतात. जीवनातील सर्वच उपभोग या तीन प्रकारच्या दु:खानी युक्त असल्याने, विवेकी पुरुषाला सर्वच दु:खमय वाटते. सुखदु:ख हे बुद्धीचे धर्म द्रष्ट्यावर असे आरोपित होतात जसे की, जय आणि पराजय हे योद्ध्यांचे असूनही सेनापतीचे किंवा राजाचे म्हटले जातात, यालाच त्यांचा भोक्ता म्हटले जाते, तसेच बंधमोक्ष हे बुद्धीचे असूनही पुरुषावर आरोपित होतात. बुद्धीची जी पुरुषार्थप्रवृत्ति तोच **बंध** व त्या प्रवृत्तीची कृतार्थता हाच **मोक्ष** होय.

# ५५) काल आणि कैवल्य*

**काल** : व्यासांच्या मते 'काल' हा नैयायिक व वैशेषिक मानतात तसा स्वतंत्र पदार्थ नाही. ती बुद्धीने निर्मिलेली कल्पना मात्र आहे. काळाची कल्पना ही केवळ शब्दज्ञानानुपाती असून वस्तुशून्य आहे, परंतु जागृतीतील अनुभवांनी ती वस्तुस्वरूप असल्याचा आभास होतो इतकेच.

**कैवल्य** : सत्त्वपुरुषाची शुद्धिसाम्यावस्था म्हणजे कैवल्य, याचे व्यासकृत स्पष्टीकरण उल्लेखनिय आहे. ते म्हणतात, ''परमार्थतः ज्ञानाचे स्वरूप म्हणजे काही नवीन उपलब्धि असे नसून त्याने अदर्शन (म्हणजे अविद्या) निवृत्त होते. अदर्शनाच्या निवृत्तीने क्लेशांचा अभाव होतो. त्याने कर्मविपाक नष्ट होतो. त्या अवस्थेत त्यांची पुरुषार्थना संपून ते चरितार्थ होतात व पुन्हा कधीही पुरुषाच्या 'दृश्य' किंवा 'स्व' या भावास प्राप्त होत नाहीत. तेच पुरुषाचे कैवल्य.''

(*का.स. जोशी–मराठी तत्त्वज्ञान–महाकोश : खंड – ३ पृ.१०३)

## ५६) श्रेयस् व प्रेयस्

कल्याण वा हितकारी म्हणजे **श्रेयस्** व प्रिय वा सुखकारी म्हणजे **प्रेयस्**. या दोहोंनी मनुष्य बांधला जातो. त्यांपैकी जो श्रेयस्चा स्वीकार करतो त्याचे शुभ (कल्याण) होते व जो प्रेयस्ला वरतो तो पुरुषार्थहीन ठरतो. विवेकी मनुष्य प्रेयस् सोडून श्रेयसाचाच स्वीकार करतो; तर मूढ मनुष्य योगक्षमतेसाठी प्रेयसालाच वरतो. सर्वसामान्यपणे माणूस इंद्रियसुखाच्या म्हणजे प्रेयसाच्या मागे लागतो, ही वस्तुस्थिती आहे. नीतिशास्त्रीय दृष्टीने श्रेयस् म्हणजे शिवतत्त्व किंवा परमकल्याण. पुरुषार्थाच्या भाषेत बोलायचे तर **प्रेयसचा स्वीकार** म्हणजे अर्थ व काम या पुरुषार्थाची उपासना, तर **श्रेयसचा स्वीकार** म्हणजे धर्म व मोक्ष या पुरुषार्थाची उपासना. श्रेयस् हे केवळ नैतिकच नव्हे तर संपूर्ण जीवनाचे ध्येय होय. या तात्त्विक दृष्टीने त्यास **नि:श्रेयस** वा **मोक्ष** म्हटले जाते. शंकराचार्यांनी श्रेयस्ला विद्या व प्रेयस्ला अविद्या असे संबोधले आहे. श्रेयस् हे अविनाशी, तर प्रेयस हे विनाशीच नव्हे तर क्षणभंगूर आहे. श्रेयस् व प्रेयस् हे द्वंद्व सनातन आहे. विवेकी माणूसच फक्त श्रेयाच्या मार्गाने जातो. सर्वसामान्य माणूस प्रेयसाच्याच आराधनेत दंग असतो. तत्त्वज्ञान, धर्म, नीति ही सर्व श्रेयस्च्या प्राप्तीसाठीच आहेत ही भारतीयांची मूलभूत धारणा आहे.

## ५७) सत्य व असत्य

सत्य म्हणजे यथार्थ व असत्य म्हणजे अयथार्थ. असत्य म्हणजे सत्याचा अभाव. सत्याचा अर्थ काय? यासंबंधी अनुसंवाद, सुसंवाद व साफल्य असे तीन सिद्धान्त प्रसिद्ध आहेत. सामान्यत: वास्तववादी, चिद्वादी व फलवादी यांच्या नावावर ते अनुक्रमे खपतात. सत्य म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून, कल्पनांचे सुसंवादित्व किंवा सुसूत्र सुसंवाद असतो. सर्वसाधारणपणे सत्ता व मन यात मिळते जुळतेपणा असणे हे 'सत्य' यामध्ये गर्भित आहे.

# ५८) कृपा आणि कर्म

अध्यात्ममार्गामध्ये कृपा आणि कर्माचा परस्पर संबंध विशेष स्वरूपात अनुसरण करण्यास योग्य असा आहे. साधकाच्या जीवनामध्ये कृपेचे स्थान मुख्य असते, तर कर्माचे स्थान गौण. वास्तविक साधकाचे यथार्थ कर्म एका प्रकारे मुळीच नसते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जे कर्म स्वरूपात प्रतीत होते ते कर्माचे आभासमात्र असते. पक्षांतराने योग्याच्या कर्ममार्गामध्ये कर्मच मुख्य असते. कृपा अवश्यच सर्वत्र अपेक्षित असते, परंतु कृपेपेक्षा कर्माचा महिमा अधिक आहे. त्यातच खंड आणि महाखंड योगांमध्ये कर्माचे प्राधान्य आणि उत्कर्ष असून ही अपेक्षतया कृपाच मुख्य असते. परंतु अखंड योगमध्ये कृपा गौण असते. कर्मच आपल्या मुख्यत्वेसह खंड कृपेस दाबून आत्मप्रकाश करते. कर्माचे अशा प्रकारे स्वप्रतिष्ठित असल्यामुळे पूर्ण पुरुषार्थ प्रकट होतो आणि महाकृपा स्वतः प्रकट होते. महाकृपा आणि परम पुरुषार्थ अभिन्न स्वरूपात एका क्षणामध्ये अभिव्यक्त होतात.

योग्याच्या साधन-जीवनामध्ये कर्मच मुख्य असते. परिणामी या जीवनामध्ये गुरूपासून जी कृपा प्राप्त होते ती पूर्णपणे चुकविली (परतफेड केली) पाहिजे. कृपेमुळे स्वशक्तीचा विकास थांबतो, परंतु साधकाच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये कृपेशिवाय एक पाऊल पण पुढे जाता येत नाही. म्हणून योग्यासाठी नियम हा आहे की त्याने प्रथम गुरूपासून कृपा ग्रहण करून नंतर स्वकर्माने त्याने गुरूस त्याची परतफेड केली पाहिजे. गुरुप्रदत्त कृपेस ऋणस्वरूपात ग्रहण करून स्वोपार्जित कर्माद्वारे परत फेडले पाहिजे. तेव्हा कुठे भविष्याचा कर्ममार्ग प्रशस्त होतो, तत्पूर्वी नव्हे. हे साधना-मार्गाने होते, योग-मार्गाने पण होते. परंतु साधनमार्गामध्ये फक्त काळापासून शिष्याचे उद्धार करूनच गुरूची कृपा निवृत्त होते. ती त्यास कालातीत अशा उच्च पदापर्यंत नेत नाही. योग-मार्गामध्ये कर्माचे प्राधान्य असल्यामुळे कालातीत राज्यामध्ये योग्यास विशिष्ट अधिकारसंपन्न स्थान प्राप्त होतो.

कृपा आणि कर्म दोन्ही मुळात एकच शक्ती आहे. एकाच्या अखंड सत्तेने अविभक्त असून पण स्वतःस लीलेस व्याजस्वरूपात दोन भागांमध्ये विभक्त केले आहे. अशा प्रकारे, एकीकडे बृहत् तर दुसरीकडे लघु, अशा प्रकारचे दोन परस्पर विरोधी भाव उदयास आले. जर लघुस बृहत्कडे जायचे असेल, तर कर्माचे अवलंबन करावे लागते. बृहत् अशा कृपा शक्तीस लघुस्वरूप कर्मशक्तीसाठी सहकारिणी बनणे आवश्यक आहे. साधारणपणे पाहिल्यास असे दिसून येते की कर्मसापेक्ष कृपा आणि कृपासाक्षेप कर्म दोन्ही आवश्यक आहेत. जसजसी ऐश्वरिक कृपा वाढते तसतसी आत्म्यास कर्मानुरूप ऊर्ध्व गती प्राप्त होते आणि गतीच्या शेवटी परमात्म्याच्या स्वरूपामध्ये एकत्त्वप्राप्ती होते. सारांश साधकास कृपेची आवश्यकता असते, तर योग्यास कर्माची गरज असते.

# ५९) दार्शनिक संकल्पना : एका दृष्टिक्षेपात

**१) जीवाच्या सात अवस्था**

१. अज्ञान २. आवरण

३. विक्षेप ४. परोक्षज्ञान

५. अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान

६. शोकनिवृत्ती आणि

७. निरंकुशातृप्ती

**२) ज्ञानाच्या सप्त (सात) भूमिका**

१. समुदाहृता

२. तनुमानसा

३. सत्वापत्ती

४. संसक्तिनामिका

५. परार्थभाविनी

६. शुभेच्छा आणि

७. तुर्यगा

प्रथम 'अहं ब्रह्मास्मि' व मागाहून

'सर्वं खल्विदं ब्रह्म' हीच ज्ञानाची पूर्णता.

**३) षट्समाधी**

१. अंतर्दृश्यानुविद्ध सविकल्प समाधी

२. अंत:शब्दानुविद्ध सविकल्प समाधी

३. अंतर्निर्विकल्प समाधी

४. बाह्य दृश्यानुविद्ध सविकल्प समाधी

५. बाह्य शब्दानुविद्ध सविकल्प समाधी

६. बाह्य निर्विकल्प समाधी

**४) चार योग**

१. मंत्रयोग

२. हठयोग

३. लययोग

४. राजयोग

**५) चार कांड**

१. कर्मकांड : शरीयत (शरीअत)

२. भक्तिकांड : तरीकत

३. ज्ञानकांड : मारिफत

४. मुक्तिकांड : हकीकत

**६) अष्टाक्षरी मंत्राचे अनुष्ठान**

'सर्वे भद्राणि पश्यंतु

('होवो कल्याण सर्वांचे')

**७) मंत्रयोगाची सोळा अंगे**

१. भक्ती २. शुद्धी

३. आसन ४. पंचांगसेवन

५. आचार ६. धारणा

७. दिव्यदेशसेवन ८. प्राणक्रिया

९. मुद्रा १०. तर्पण

११. हवन १२. बली

१३. याग १४. जप

१५. ध्यान १६. समाधी

**८) प्रज्ञेचे चार प्रकार**

१. बुद्धी
२. स्मृती
३. मेधा
४. धृती

**९) मानवी आत्म्याच्या नऊ (९) श्रेणी**

१. मोमिन : धर्मनिष्ठ, श्रद्धावन्त
२. आबिद : भक्त, उपासक
३. जाहिद : विरक्त, तपस्वी
४. आरिफ : ब्रह्मज्ञानी
५. वली : सतं-महात्मा
६. नबी : संदेष्टा, प्रेषित
७. रसूल : महाप्रेषित
८. ऊलूल्-अज़्म : सुप्रतिष्ठित प्रेषित
९. ख़ातिमुन्नबी : प्रेषित परिसमापक

**१०) सत्याच्या चार श्रेणी**


१. नम्रता
२. अनुकंपा
३. चित्तशुद्धी
४. तन्मयावस्था (गूढ अनुभव)

(पाश्चात्य गूढवादी सेंट(संत) बर्नार्डच्या मतानुसार)


**११) गौतमबुद्ध प्रणीत आर्याष्टांगिक मार्ग**

| | | |
|---|---|---|
| क) ज्ञान(प्रज्ञा) मार्ग - | १) सम्यक् दृष्टी | (१) |
| | २) सम्यक् संकल्प | (२) |
| ख) शील (सदाचार) मार्ग- | १) सम्यक् वचन | (३) |
| | २) सम्यक् कर्म | (४) |
| | ३) सम्यक् जीविका | (५) |
| ग) योग (समाधी) मार्ग - | १) सम्यक् प्रयत्न | (६) |
| | २) सम्यक् स्मृती | (७) |
| | ३) सम्यक् समाधी | (८) |

**१२) ईश्वरनिष्ठेचे गमक**




**१३) इस्लामचे त्रिविध अंग**




**१४) शरणागति तत्त्व दशक**

**धर्माची दहा अंगे**

| | | |
|---|---|---|
| क) यम (गुण) - | १. सत्य | (१) |
| | २. अहिंसा | (२) |
| | ३. दया | (३) |
| | ४. शिवसंकल्प | (४) |
| | ५. दातृत्व | (५) |
| ख) नियम (तत्त्व)- | १. पवित्र आचरण | (६) |
| | २. ब्रह्मचर्य | (७) |
| | ३. तप | (८) |
| | ४. स्वाध्याय | (९) |
| | ५. ईश्वर प्रणिधान | (१०) |

## १५) ज्ञानी, योगी आणि भक्त यांचे निवेदन

१. ज्ञानी म्हणतो – सर्व काही ईश्वरातच आहे.
(In God is All)

२. योगी म्हणतो – सर्व काही महाऊर्जा आहे.
(All is Energy)

३. भक्त निवेदितो – सर्व काही ईश्वर-लीला आहे.
(All is the play of God)

## १६) भूमिकेच्या स्थिती

१. अन्नभूमिकेच्या आत प्राणभूमिका
२. प्राणभूमिकेच्या आत मनोभूमिका
३. मनोभूमिकेच्या आत विज्ञानभूमिका

## १७) दिव्य आत्मानुभूतीचे द्वादश (बारा) मार्ग

१. उत्कंठा, उत्कट इच्छा
२. मन:शांती
३. नम्रता
४. निर्भयता
५. श्रद्धा
६. कर्तव्यपरायणता, प्रामाणिकता
७. प्रेमास्पद नियंत्रण
८. नि:स्वार्थ सेवा
९. त्याग, संन्यास
१०. आज्ञापालन
११. शरणागति
१२. प्रेम, अनुराग

## १८) साधकाची बारा लक्षणे

१. देह समर्थ असावा
२. त्याला आत्मबल असावे
३. मृदुत्व, स्नेह
४. आत्मज्ञानाचे दान
५. आत्मज्ञानाची प्राप्ती
६. मुमुक्षा
७. वैराग्य
८. कर्माविषयी सद्सदविवेक
९. प्राणिमात्राबद्दल मित्रत्वाची भावना
१०. शास्त्राचे ज्ञान
११. भगवद्भक्ती
१२. लोकसंग्रह

## १९) भक्ताची दश (दहा) लक्षणे

१. शरणागत
२. श्रद्धावान
३. आज्ञाधारक
४. सत्यभाषी
५. धैर्यवान
६. विनम्र
७. दाता
८. मितभाषी
९. पावित्र्य रक्षक
१०. ईश्वर-स्मरणशील ('पवित्र कुराण':३३:३५)

## २०) मनाचे त्रिविध विभाजन

१. जाणीव
२. भावना
३. प्रेरणा

(स्टाउट. जी. एफ्. प्रणीत)

## २१) चित्तचतुष्टय : चार अंत:करण

१. मन
२. बुद्धी
३. अहंकार
४. चित्त

## २१अ) मुक्तीच्या चार अवस्था

१. सलोकता
२. समीपता
३. सरूपता
४. सायुज्यता

**२२) मानवाची उतरंड**

१. आलम-ए-नासूत (नरलोक) : अन्नभूमिका (Gross Sphere) : पृथ्वी : सामान्यमानव (मनुष्य)

२. आलम-ए-मलकूत (देवलोक) : प्राणभूमिका (Subtle Sphere) : वायू : श्रद्धावंत लोक


३. आलम-ए-जबरूत (ऐश्वर्यलोक) : मनोभूमिका (Mental Sphere) : आकाश : संत-महात्मे

४. आलम-ए-लाहूत (माधुर्यलोक) : विज्ञानभूमिका (Spiritual State) : सूर्य (तेजोवलय) : प्रेषित
'आलम-ए-लाहूत' ला 'अर्श-ए-आला' पण म्हणतात.

**२३) गुह्याकडे अग्रेसर होणारे सप्तचरण**

(१) जिस्म : शरीर(२) नफ्स : वासना, (३) कल्ब : चित्त/अंत:करण, (४) रूह : आत्मा
(५) सिर्र : मर्म, (६) ख़फी : गुह्य, (७) अख़्फा : ब्रह्मंड

**२४) तजल्ली (आलोक) : प्रभुप्रकाश विकीरणचे रेखाचित्र**



**२५) शरीअत (कर्मकांड)चे दोन परिवृत्त (वर्तुळ)**

**शरीअत : कर्मकांड**

| | |
|---|---|
| **(१)** | **(२)** |
| **उलिया** | **सिफ़ली** |
| **(आकाशीय ऊर्ध्व परिवृत्त)** | **(रसातळीय अधो परिवृत्त)** |
| ↑ | ↓ |
| **अहले कश्फ़ अर्थात प्रेरक लोकांसाठी** | **अहले फ़िकर अर्थात चिंतक-विचारक लोकांसाठी** |

कारण ऐन 'शरीअत' म्हणजे कर्मकांड हे ऐन 'हक़ीक़त' म्हणजेच मुक्तिकांड आहे.

**२६) नवविधा भक्ती**

(१) श्रवण, (२) कीर्तन, (३) स्मरण, (४) पादसेवन, (५) अर्चन, (६) वंदन, (७) दास्य, (८) सख्य, (९) आत्मनिवेदन.

**२७) सत् (ईश्वरी सत्ते) च्या शक्ती**

परात्पर परब्रह्म हा 'सच्चिदानंद (सत् चित् आनंद) आहे. सत् ही त्याची सत्ता ('ज़ात') आहे. त्याच्या सत्तेमध्येच त्याच्या शक्ती एकवटलेल्या असतात. त्याच्या शक्तीस 'कला' पण म्हणतात.

**सत् ('ज़ात') च्या शक्ती**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(१) अंतरंग** | | **(२) बहिरंग** | | |
| **(१)** | **(२)** | **(१)** | **(२)** | **(२)** |
| **चित्** | **आनंद** | **इच्छा** | **ज्ञान** | **क्रिया** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |

**अल्लाहची इच्छाशक्ती → 'हो', 'भव' = 'कुन्' =** كُن

**२८) त्रिविध रूप**

| | |
|---|---|
| १. तीन प्रकारचे **शब्द** | १) वैखरी, २) मध्यमा, ३) पश्यंति |
| २. तीन प्रकारचे **व्यापार** | १) सृष्टी, २) स्थिती, ३) संहार |
| ३. तीन प्रकारच्या **क्रिया** | १) वामा, २) ज्येष्ठा, ३) रौद्री |
| ४. तीन प्रकारचे **शिवांश** | १) ब्रह्मा, २) विष्णु, ३) रूद्र |
| ५. तीन प्रकारचे **शक्त्यंश** | १) इच्छा, २) ज्ञान, ३) क्रिया |
| ६. तीन प्रकारचे **गुण** | १) सत्त्व, २) रज, ३) तम |
| ७. सूफी साधना मार्गावरील तीन सहाय्यक - | १) गुरू-कृपा २) 'रसूल'ची दया ३) प्रभूची कृपा |

**२९) पंचविधता (पंचकालिक इस्लामी पंचोपासना : इस्लामपुरस्कृत दैनंदिन पाच वेळच्या नमाज)**

**१) पंचप्राण :** १) प्राण, २) अपान, ३) समान, ४) व्यान, ५) उदान.

**२) पंच प्रहर :** १) प्रात:काळ, २) सकाळ, ३) दुपार, ४) सायंकाळ, ५) रात्र.

कदाचित याच कारणास्तव इस्लामपुरस्कृत दिवसभरच्या प्रातिनिधीक स्वरूपातील अनिवार्य अशा पंचोपासना निर्धारित करण्यात आल्या असाव्यात. (इस्लाममध्ये दररोज पाच वेळेस ईश्वराची उपासना – भक्ती करणे म्हणजेच 'नमाज' पढणे अनिवार्य आहे.) त्यांच्या वेळापण पंचप्रहरास अनुरूप अशाच आहेत. कारण परमेश्वराने माणसास आपली भक्ती करण्यासाठी निर्माण केले आहे. याचे प्रत्यंतर पवित्र कुराण मधील पुढील श्लोकावरून येते – ''आणि मी जिन्न आणि माणसे यांना यासाठीच निर्माण केलेले आहे की त्यांनी माझी उपासना भक्ती करावी.'' ५१:५६ इतकेच नव्हे तर संपूर्ण सृष्टीच प्रार्थनेमध्ये मग्न असते. सृष्टीचा जप अगम्य आहे. (१७:४४), सावल्या प्रणिपात करतात (१३:१५), मेघ–गर्जना जप करते (१३:१३), पक्षी प्रभु–स्तवन करतात. (२४:४१) सृष्टीचा प्रणिपात पहा कसा आहे ! त्यांनी हे पहिले नाही काय की अल्लाहने निर्मिलेल्या सर्व वस्तू आणि त्यांच्या सावल्या नम्र होऊन, उजवीकडे आणि डावीकडे वळून, अल्लाहला प्रणिपात करीत आहेत ? आणि ती नम्र आहेत ! आणि आकाशात जे काही आहे (ते सर्व) आणि पृथ्वीवर जे काही प्राणिमात्र आहेत (ते सर्व) आणि देवदूत (देखील) (नम्रपणे) अल्लाहपुढे नतमस्तक होतात, आणि ते कदापी अहंकार करीत नाहीत. ते आपल्या प्रभूची जो त्यांच्या शिरावर आहे, भीति बाळगतात, आणि (त्यांना) जशी आज्ञा दिली जाते, तसे(च) करतात.'' १६:४८–५०

**३०) ओळख–खरी ओळख !**

१) अल्लाहस ओळखणे म्हणजे सद्धर्मास (दीन) ओळखणे आहे.

२) वासनेस (नफ्स) ओळखणे म्हणजे प्रभूस (रब्ब) ओळखणे आहे.

३) ईश्वरी सत्तेस (जात) ओळखणे म्हणजे ब्रह्मांडास (आलम) ओळखणे आहे.

**३१) सप्तमातृका**

१) माहेश्वरी

२) वैष्णवी

३) ब्रह्माणी

४) ऐन्द्री

५) कौमारी

६) नारसिंही

७) वाराही

काही वेळा यात चामुंडा देवीचाही समावेश केला जातो. तेव्हा या विस्तृत समूहाला अष्टमातृका म्हणतात.

**३२) सहा अधिकारी इंद्रिये –** बुद्धी आणि पाच कर्मेंद्रिये

**सहा निराधिकारी इंद्रिये –** मन आणि पाच ज्ञानेंद्रिये

### ३३) योग तत्त्वानुसार मनाच्या आचरणाचे पाच विविध प्रकार

१. क्षिप्तावस्था

२. मूढावस्था

३. विक्षिप्तावस्था

४. एकाग्रावस्था (एकाग्रता)

५. निरूद्धावस्था

### ३४) जीवात्म्याचे चार शरीर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शरीर | → | स्थूल | सूक्ष्म | कारण | महाकारण |
| २. | प्रमाण | → | औटहात | अंगुष्ठ | पर्वार्ध | मसुर |
| ३. | वर्ण | → | रक्त | श्वेत | कृष्ण | नील |
| ४. | अवस्था | → | जागृत | स्वप्न | सुषुप्ति | तुरीय |
| ५. | नाम | → | विश्व | तैजस | प्राज्ञ | तुर्य |
| ६. | स्थान | → | नेत्र | कंठ | हृदय | सहस्रार |
| ७. | मात्रा | → | ‘अ’कार | ‘उ’कार | ‘म’कार | अर्धमात्रा |

### ३५) प्रख्यात संत मेहेरबाबा प्रणीत पाच आध्यात्मिक तथ्ये

| | | |
|---|---|---|
| १) | सामान्य मानव (‘आम **इन्सान**’) | **मानव** या नात्याने मानव हा **स्वत:स** प्रत्येकामध्ये आणि सर्व काही मध्ये पाहतो. |
| २) | सत्पुरुष (‘**पीर**’) (सहाव्या भूमिका – आकाशामधील) | **मानव** या नात्याने मानव हा **ईश्वरास** प्रत्येकामध्ये आणि सर्व काहीमध्ये पाहतो. |
| ३) | ब्रह्मलीन (‘**मजज़ूब**’) (सातव्या भूमिका – आकाशामधील) | **ईश्वर** या नात्याने ईश्वर हा **स्वत:स** प्रत्येकामध्ये आणि सर्व काहीमध्ये पाहतो. |
| ४) | सद्गुरू (‘**कुतुब**’) | **मानव** या नात्याने **ईश्वर** हा एकाच वेळेस (युगपत्) स्वत:स प्रत्येकामध्ये आणि सर्व काहीमध्ये पाहतो. |
| ५) | महाप्रेषित (मुक्तिदाता) (‘**रसूल**’) | **ईश्वर आणि मानव** या नात्याने **ईश्वर** हा एकाच वेळेस (युगपत्) स्वत:स प्रत्येकामध्ये आणि सर्व काहीमध्ये पाहतो. |

**३६) अक़्ल (प्रज्ञा, विवेक, बुद्धी) च्या सप्त (सात) श्रेणी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अक़्ल हेवलानी | = | प्राकृतिक विज्ञान किंवा भूतानुगत विज्ञान |
| २. | अक़्ल मुस्तफ़ाद | = | अभ्यस्त विज्ञान |
| ३. | अक़्ल मुद्रिक | = | ज्ञाता विज्ञान |
| ४. | अक़्ल फ़आल | = | अधिकरण विज्ञान |
| ५. | अक़्ल (नफ़्स) फ़ेअली | = | क्रिया विज्ञान |
| ६. | अक़्ल कुल्ल | = | विश्व विज्ञान किंवा सार्वभौमिक मन |
| ७. | अक़्ल मुत्लक़ | = | परम विज्ञान |

**३७) पंच ज्ञानेंद्रिये आणि त्यांचे विषय व पंच कर्मेंद्रिये**

१. श्रोत्रेंद्रिय (कानांमध्ये स्थित असणारे इंद्रिय) – शब्द हा याचा विषय आहे.

२. स्पर्शनेंद्रिय (त्वचेमधील इंद्रिय) – स्पर्श हा याचा विषय आहे.


३. दर्शनेंद्रिय (डोळ्यात राहणारे इंद्रिय) – रूप हा याचा विषय आहे.

४. रसनेंद्रिय (जिभेत राहणारे इंद्रिय) – रस अर्थात चव हा याचा विषय आहे.

५. घ्राणेंद्रिय (नाकात राहणारे इंद्रिय) – गंध हा याचा विषय आहे.

वाक् (वाणी), पाणि (हात), पाद (पाय), पायु (मलमूत्र विसर्जन करणारा अवयव) आणि उपस्थ (जननेंद्रिय) ही पाच कर्मेंद्रिये आहेत. ही कर्मेंद्रिये आपापल्या अवयवांमार्फत प्रत्यक्ष क्रिया करून घेणारी असतात. शारीरिक पातळीवरची सर्व ऐच्छिक कामे कर्मेंद्रियांमार्फत होत असतात.

**३८) यशोशिखर गाठण्याचे दार्शनिक उपाय**



**३९) वजूद (जीवात्मा, देहा) चे जग व त्याच्या अवस्था**

| वजूद (जीवात्मा) | आलम (लोक वा जग) | जिस्म (देह) | लोक | अवस्था |
|---|---|---|---|---|
| १ वाजिबुल वजूद | १ आलम-ए-शहूद=नासूत | १ स्थूल देह | भूलोक | १ जागृत अवस्था |
| २ मुमकिनुल वजूद | २ आलम-ए-अमसाल=मलकूत | २ लिंग देह | देवलोक | २ स्वप्न अवस्था |
| ३ मुमतनुल वजूद | ३ आलम-ए-अर्वाह=जबरूत | ३ कारण देह | तप:लोक | ३ सुषुप्त अवस्था |
| ४ आरिफुल वजूद | ४ आलम-ए-वाहदियत=लाहूत | ४ महाकारण देह | सत्यलोक | ४ तुर्या अवस्था |
| ५ वहदतुल वजूद | ५ आलम-ए-अहदियत=हाहूत | ५ सूक्ष्म देह | शक्तिलोक | ५ तुर्यातीत अवस्था |

**४०) समावात (आकाश), ग्रह, अर्ज़ (पृथ्वी) आणि पाताळ लोक व सप्तर्षी**

| समावात : सप्त आकाश | सप्त ग्रह | अर्ज़:सप्त पृथ्वी | सप्तपाताळ (सिज्जीन) | सप्तर्षी |
|---|---|---|---|---|
| १ रूक़ैया : प्रथम आकाश | १ क़मर = सोम | १ अर्ज़ुल-नुफ़ूस : प्रथम पृथ्वी | १ अतल | १ अंगिरस |
| २ माऊन वा फ़ैदूम : द्वितीय'' | २ उतारद = बुध | २ अर्ज़ुल इबादात : द्वितीय पृथ्वी | २ वितल | २ क्रतु |
| ३ मलकूत वा हार्योन : तृतीय'' | ३ जुहरा = शुक्र | ३ अर्ज़ुल तबा : तृतीय पृथ्वी | ३ सुतल | ३ पुलह |
| ४ ज़ाहिरा : चतुर्थ आकाश | ४ शम्स = रवि | ४ अर्ज़ुल शहव : चतुर्थ पृथ्वी | ४ रसातळ | ४ मरीचि |
| ५ मसहरा वा मज़ीजा : पंचम'' | ५ मिर्रीख़ = मंगळ | ५ अर्ज़ुल तुग़यान : पंचम पृथ्वी | ५ तलातळ | ५ पुलस्त्य |
| ६ ख़ालसा : षष्ठम् आकाश | ६ मुश्तरी = गुरू | ६ अर्ज़ुल इल्हाद : षष्ठम् पृथ्वी | ६ महातल | ६ अत्रि |
| ७ लाबिया : सप्तम आकाश | ७ जुहल - शनि | ७ अर्ज़ुल शकावत : सप्तम पृथ्वी | ७ पाताळ | ७ वसिष्ठ |

**४१) 'मावरा' अर्थात अतीतचे पाच प्रकार**

१) मावरा-ए-अक़्ल = दुर्बोध

२) मावरा-ए-तख़य्युल = कल्पनातीत

३) मावरा-ए-नज़र = अगोचर

४) मावरा-ए-फ़हम = अज्ञेय

५) मावरा-ए-हिस = अतींद्रिय

**४२) सैर वजूद (अस्तित्वाची – जीवात्म्याची सहल) (आलम–ए–मलकूत : सूक्ष्म जगत – अंतरंग वायुमय विहार)**

| | आलम | लोक : जगत् | जन्नत : स्वर्ग | फ़ना : निर्वाण, संभूति |
|---|---|---|---|---|
| १ | नासूत<br>आलम–ए–वक़्तिया<br>मलकूत | भूलोक, इहलोक<br><br>देवलोक | जन्नत : स्वर्ग गाठण्यासाठी प्रयत्न<br>जन्नतुस्सलाम | –<br>फ़ना (मात्र) |
| २ | आलम–ए–रूहानी<br>जबरूत | तप:लोक | जन्नतुल मकासिब | फ़ना–ए–बातिनी |
| ३ | आलम–ए–कुद्सी<br>लाहूत | सत्यलोक | जन्नतुल मवाहिब | फ़ना–ए–ज़ाहिरी |
| ४ | आलम–ए–महफ़ूज़<br>बाहूत (याहूत) | कौमारलोक | जन्नतुल इस्तिहक़ाक़ | फ़ना–ए–मलकूती |
| ५ | आलम–ए–अस्रार<br>हाहूत | शक्तिलोक | जन्नतुल फ़िरदौस | फ़ना–ए–जबरूती |
| ६ | आलम–ए–जानान<br>माहूत | शिवलोक | जन्नतुल फ़ाज़िलात | फ़ना–ए–महिबूबी |
| ७ | आलम–ए–मौला<br>नसीरा | विष्णुलोक | जन्नतुस्सिफ़ात | फ़ना फ़िल्लाह |
| ८ | आलम–ए–हैरत<br>मक़ाम–ए–महमूद | परम सत्यलोक<br>(वंद्य सिद्धी स्थळ) | जन्नतुज़्ज़ात<br><br>(फक्त महाप्रोषित मुहम्मद(स.)<br>यांच्यासाठी राखीव) | मक़ाम–ए–महमूद<br>(वंद्य सिद्धी स्थळ)<br>(फक्त महाप्रोषित मुहम्मद(स.)<br>यांच्यासाठी राखीव) |

**टीप :** आलम–ए–नासूत हे स्थूल जगत असून ते इहलोक आहे. उपरोक्त सर्व परलोकाच्या वाऱ्या आहेत.

**४३) तीन प्रकार**

**त्रिलोक**

१) नासूत (इहलोक), २) मलकूत (स्व–र्लोक, मध्य जगत्, 'बुर्ज़ख'), ३) जबरूत (परलोक). या त्रिलोकांमध्ये सप्त भूमिकांचा समावेश आहे.

**अल्लाहची तीन प्रमुख नामे**

१) अल्लाह हे नाव नामात्मक (ज़ाती) आहे. २) अलीम हे रूपात्मक (सिफ़ाती) आहे तर ३) ख़ालिक़ हे सृजनात्मक (अफ़आली) आहे.

**त्रिगुण**

१) मलकात-ए-फ़ाज़िला = सत्त्वगुण

२) मलकात-ए-रदीया = रजोगुण आणि

३) मलकात-ए-मज़मूम = तमोगुण

**अल्लाहचे तीन सर्वप्रमुख अंग**

१) रहमान (रहमानियत) = ब्रह्म

२) रहीम (रहीमियत) = विष्णू आणि

३) मालिक (मालिकियत) = शिव, रुद्र

**४३) (अ) चार प्रकार**

**आवागमन, देहांतरण, पुनर्जन्म किंवा परकाया प्रवेशाचे चार प्रकार :**

याचे चार प्रकार पुढीलप्रमाणे आहेत -

१. नस्ख़ = मानवी शरीरामध्ये आत्म्याचे आवागमन (मानव) : १

२. मस्ख़ = प्राण्यांच्या शरीरामध्ये आत्म्याचे आवागमन (प्राणी) : २

३. फ़स्ख़ = वनस्पतींमध्ये आत्म्याचे आवागमन (वनस्पती) : ३

४. रस्ख़ = खनिज पदार्थांमध्ये आत्म्याचे आवागमन (खनिज) : ४

**ज्ञानाचे चार प्रकार**

१) विश्वज्ञान, २)अंतर्ज्ञान, ३) आत्मज्ञान आणि ४) सर्वज्ञान.

**४४) आत्म्यापासून शब्दाची निर्मिती आणि पुन्हा शब्दाचे उड्डाण आत्म्यापर्यंत - हे कसे?**

आत्म्याचे स्वरूपगत आंतर ज्ञानच सूक्ष्म वाक आहे. ते प्रथम शब्द या रूपामध्ये प्रकट होते. ततः मनोभाव धारण करून काया-गत तेज अथवा कायाग्नीद्वारे पक्व होऊन प्राणवायूमध्ये प्रविष्ट होते. नंतर क्रमशः स्थूल शब्दाचे उच्चारण होते. मृताच्या आत्म्यास शांती लाभ होण्यासाठी त्याच्या समाधी वा थडग्याजवळ जेव्हा एखादी व्यक्ती मनोभावे परमेश्वराकडे कृपायाचना करते तेव्हा कृपायाचनेचे तिचे स्थूल शब्द सूक्ष्म वाक् मध्ये परिणत होऊन स्व-र्लोकात ('बर्ज़ख़'मध्ये) मृताच्या आत्म्यासाठी संरक्षक-कवच बनतात आणि त्याचे पाप-क्षय करण्यास मदत करतात. परिणामी जीवात्मा हा स्वर्गाच्या समीपस्थ जाण्यास लायक ठरतो.

सत्त्व, रजस व तमस हे जीवात्म्याचे गुण आहेत, तर जीव म्हणजेच प्राण हा आत्म्याचा 'गुण' आहे व आत्मा हा परमात्म्याचा गुण आहे. या गुणास परमेश्वराने मानवामध्ये सुरक्षित ठेवले आहे. ''त्या (मानवी शरीरा) त माझ्या आत्म्याची फुंकर मारेन.'' (१५ : २९)

शरीर पाण्याने, मन सत्याने, आत्मा धर्माने आणि बुद्धी ज्ञानाने पवित्र होते. बुद्धी, अहंकार व मन यांच्या समष्टीचे नाव म्हणजेच अंतःकरण होय.

**४५) पंचमहाभुतांची उतरंड (सोपानक्रम)**

| | १<br>क्रमांक | २<br>स्थान | ३<br>पंचमहाभुते | ४<br>स्वरूप | ५<br>तन्मात्रा | ६<br>कार्य | ७<br>धर्म (गुण) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिखर ↑ | (५) | उच्चतम | आकाश | सूक्ष्मतम | ध्वनी (शब्द) | सच्छिद्रता | अवकाश |
| | (४) | उच्चतर | वायू | सूक्ष्मतर | स्पर्श | सर्वत्र संचार | चंचलता |
| | (३) | उच्च | तेज | सूक्ष्म | रूप | पचन(जठराग्नी) | दहन |
| | (२) | निम्नतर | आप | स्थूलतर | रस | क्लेदनत्व (स्निग्ध करणे) | द्रवत्व |
| पाया | (१) | निम्नतम | पृथ्वी | स्थूलतम | गंध | धारण | कठीणता |

कृपायाचनेमुळे प्रकाशा (तेज) वरील आवरण अथवा क्लेश क्षीण होते. कृपायाचनेत खरे तर परमेश्वराचे नामस्मरणच असते, शिवाय त्यास आवाहन पण!

''परमेश्वराचे नामस्मरण आणि त्याच्या चिंतनाने आपल्या कलुषित अंतरात्म्यास शुद्ध करून घ्या.'' - प्रख्यात सूफ़ी संत हसन अल्-बसरी.

## ६०) पारमार्थिक संज्ञांच्या दार्शनिक व्याख्या*

१. **नाम** – नाम म्हणजे भगवंताचे नित्य स्मरण. आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळी म्हणजे भगवंताचे नाम होय. नाम हे प्रारब्धाने येत नाही आणि कर्माने जात नाही. 'मुखी नाम हाती मोक्ष।' – तुकाराम महाराज. 'नाम श्वासोच्छवासी वसे। तेथे ब्रह्म उभे असे।।' – श्रीगोंदवलेकर महाराज. 'तुम्ही घ्यावे नाम। म्हणजे होईल तुमचे काम।।' नाम हे शाश्वत आहे. 'नाम हेच एक त्रिभुवनात सत्य आहे' म्हणून घ्यावे,. नामाची गंमत अशी आहे की, नामात मनाला उलटे केले जाते. (म – न हे ना – म बनते.)

२. **परमार्थ** – आपल्यासारखे दुसऱ्यांना ओळखणे व त्यांच्याशी तसे वागणे हाच परमार्थ होय. परमार्थ म्हणजे भागवद्प्राप्तीचा मार्ग. भगवंताच्या स्मरणात प्रपंच सुखाचा करणे हाच खरा परमार्थ. प्रपंच आसक्तीने करू नये. मला कळत नाही ही परमार्थाची पहिली पायरी व मी आणि भगवंत एकच, ही जाणीव परमार्थाची शेवटची पायरी होय. प्रपंच करताना एकसारखे अनुसंधान भगवंताचे असावे. प्रपंच परमार्थाच्या आड न येईल अशा बेताने व युक्तीने करावा. आपले कर्तव्य शेवटपणे करीत राहणे हा परमार्थ होय.

३. **अनुसंधान** – सच्चिदानंद स्वरूपाच्या ठिकाणी मन चिकटून राहणे यालाच अनुसंधान म्हणतात.

४. **उपाधी** – भगवंतावाचून इतर सर्व म्हणजेच उपाधी होय.

५. **निष्काम कर्म** – 'मी फक्त कर्तव्यापुरता आहे,' असे वागणे यालाच निष्काम कर्म असे म्हणतात.

६. **कर्मानुष्ठान** – कर्मानुष्ठान म्हणजे ईश्वराज्ञापालन होय.

७. **व्रत** म्हणजे स्वतःच्या इच्छेने केलेला संकल्प व त्याचे आचरण.

८. **धर्म** – भावोत्कटतेचा स्पर्श झालेली नीति म्हणजे धर्म होय. हे कृतार्थ जीवनाचे विशदीकरण असते.

९. **मोक्ष** – निरतिशय सुखाचा अनुभव म्हणजे मोक्ष होय. मोक्ष ही आत्म्याची शुद्धावस्था होय. ईश्वरानुग्रहामुळे मोक्ष प्राप्त होतो.

१०. **पराभक्ती** – अखंड नामात जगणे यालाच पराभक्ती म्हणतात. भक्ती (उपासना) भगवंताला ओळखून करावी. सर्वव्यापी परमेश्वरास सर्वांभूती पाहणे ही निर्गुण उपासनाच होय.

११. **साधु** – जो सर्व ठिकाणी देवास पाहतो तो साधु. सर्व चराचरात भगवद्रूप जो पाहतो तो साधु.

१२. **संत** – जो नामात अखंड गुंतला त्यालाच संत म्हणतात. संत व्हायचे म्हणजे सुखाने नेहमी हसायचे.

१३. **ब्रह्मवेत्ता** – ज्याच्या श्वासात परमेश्वराचे नाम तोच एक ब्रह्मवेत्ता जाणावा.

१४. **ध्यान** – ध्यान म्हणजे चित्ताची निरंतर अंतर्मुखता.

१५. **प्रज्ञा** – शुद्धीकरण झालेली बुद्धी म्हणजे प्रज्ञा. 'प्रज्ञा ही प्रचितीची कन्यका आहे.' – लिओनार्डो

१६. **पराविद्या** – 'निर्गुण ब्रह्माचे ज्ञान ही परा विद्या होय. म्हणजतेच परब्रह्माचे साक्षात ज्ञान होणे, आत्मदर्शन होणे ही 'परा विद्या.'

१७. **अपरा विद्या** – केवळ सगुण ब्रह्माचे ज्ञान होणे ही अपरा विद्या होय.

१८. **निर्वाण** – वासनाक्षय व उन्मनी अवस्था म्हणजेच निर्वाण होय.

१९. **अभ्यास** – आज जे करण्याची आपल्या मनाला सवय नाही ते बळजबरीने त्याला करायला लावणे. याचे नाव अभ्यास होय. कधी चुकणे, कधी बरोबर येणे याचेच नाव अभ्यास होय.

२०. **भगवंताची कृपा** – आपला दोष कळून तो जावा अशी प्रवृत्ती होणे हीच भगवंताची कृपा होय.

२१. **बद्धपणाचे लक्षण** – काळजी, तळमळ आणि दु:ख बद्धपणाचे लक्षण आहे.

२२. **मुक्तपणाचे लक्षण** – कोणत्याही परिस्थितीत आनंदात असणे हे मुक्तपणाचे लक्षण आहे.

२३. **कर्तव्य** – फळाची अपेक्षा सोडून कर्म करणे याचे नाव कर्तव्य होय.

२४. **नीती** – देवाला मानावे आणि त्याला आवडेल तेच करावे, याचेच नाव नीती होय. भगवंताच्या अधिष्ठानाशिवाय नुसती नीती ही पोरकी असते.

२५. **व्यवहार व परमार्थ** – जग काय म्हणेल म्हणून वागणं याचे नाव व्यवहार. भगवंत काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव परमार्थ.

२६. **श्रद्धा** – प्रपंचात ज्याला विश्वास म्हणतात. त्यालाच परमार्थात श्रद्धा म्हणतात. श्रद्धा ईश्वरास कार्यप्रवृत्त करते.

२७. **'अनासक्ती'** – 'असेल तर असू दे नसेल तर नसू दे,' अशा मनाच्या अवस्थेला अनासक्ती असे म्हणतात.

२८. **भगवत्सेवा** – उद्योगामध्ये राहणे हीच खरी भगवत्सेवा होय.

२९. **चांगला व वाईट मनुष्य** – जो इतरांना आवडतो तो चांगला मनुष्य होय. जो फक्त स्वत:लाच आवडतो, तो वाईट मनुष्य होय.

३०. **सहज कर्म** – आले तर भोगले, गेले तर सोडले हे सहज कर्म होय.

३१. **वाचेचे तप** – अंत:करण न दुखवता बोलणे हे वाचेचे तप असे म्हणतात.

३२. **आत्महत्या** – भगवंताला विसरणे ही आत्महत्या आहे.

३३. **स्वतंत्र बुद्धी** – बंधनामध्ये काम करणारी बुद्धी ही खरी स्वतंत्र बुद्धी होय.

३४. **स्वैराचारी बुद्धी** – बंधनाला न जुमानता मनाप्रमाणे वागणारी ती स्वैराचारी बुद्धी होय.

३५. **एकांत** – कोणी भेटायला यावा असे म्हणू नये आणि कोणी न यावा असे म्हणू नये, यालाच एकांत म्हणतात.

३६. **स्वाध्याय** – ध्येयाचा अखंड ध्यास याचेच नाव स्वाध्याय होय.

३७. **वृत्ती** – बाह्य जगाचे जे आघात आपल्यावर होतात त्याला आपल्या मनाची जी प्रतिक्रिया होते तिचे नाव वृत्ती होय. शास्त्राचे नियम हे वृत्तीला स्थिर करतात. विस्मरण ही वृत्ती आहे.

३८. **आत्मघात –** दुराचाराने स्वत:चे हिंसा करणे हा आत्मघात होय.

३९. **अज्ञान –** जे खरे आहे असे कळून सुद्धा आचरता येत नाही, त्याला अज्ञान असे म्हणतात.

४०. **खरे समाधान –** शुद्ध भावात व निष्ठेत खरे समाधान आहे. ही निष्ठा अनुसंधानाने उत्पन्न होते.

४१. **प्रेम –** भगवंताच्या दास्यात जे प्रेम आहे ते जगाच्या मालकीत नाही. प्रेम म्हणजे देहभानरहित होऊन केलेली ईश्वराची भक्ती. प्रेम हे आत्म्याचे भोजन आहे.

४२. **दु:ख, काळजी आणि आनंद –** काल जे झाले (भूतकाळाविषयी) त्याबद्दल दु:ख करू नये, उद्या काय होणार (भविष्याविषयी) याच्याबद्दल काळजी करू नये; आज (वर्तमानकाळात) मात्र आनंदात आपले कर्तव्य करीत राहावे. आनंद म्हणजे आत्मचिंतनाने येणारे मानसिक समाधान. कोणतीही अवस्था नसणे हा आनंद होय.

४३. **परमार्थाचे बीज –** अपेक्षा न करणे हे परमार्थाचे बीज आहे.

४४. **गरज –** 'मला' भगवंताची गरज आहे आणि प्रपंचाला 'माझी' गरज आहे.

४५. **आचार, विचार आणि उच्चार –** आचार व विचार ही दोन जुळली, की उच्चारही तसाच येतो. आपले विचार ब्रह्मांडाला आदेश देत असतात. आपण जसा विचार, करतो तशी घटना यातून घडत असते. यामुळे विचार आणि भावनांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असते.

४६. **पश्चात्ताप –** खरा पश्चात्ताप हा फार भयंकर दाहक आहे. तो मागचे सगळे जाळून टाकतो. पश्चात्ताप म्हणजे उपरति; इत:पर तशी घोडचूक न करण्याची प्रतिज्ञा.

४७. **समाधान –** जेथे कर्तव्याची जागृती व भगवंताची स्मृती आहे. तेथेच समाधानाची प्राप्ती होते. शुद्ध भावनेत व निष्ठेत खरे समाधान आहे. ही निष्ठा अनुसंधानाने उत्पन्न होते. समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे समाधान आहे. ही निष्ठा अनुसंधानाने उत्पन्न होते. समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे भाग्य आणि हेच खरे ऐश्वर्य होय.

४८. **नियम –** नियम थोडाच करावा; तो शाश्वताचा असावा, पण तो प्राणाबरोबर सांभाळावा.

४९. **नास्तिक व दांभिक –** नास्तिक बरा पण दांभिक वाईट. पहिला प्रामाणिक असतो; पण दुसरा प्रामाणिक नसतो.

५०. **यज्ञ –** यज्ञ म्हणजे दुसऱ्याला अर्पण करणे होय.

५१. **सुख –** सुख म्हणजे इंद्रियगम्य शारीरिक साधन.

५२. **विरक्ती –** कर्तव्याच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट बाजूला सारणे यालाच विरक्ती म्हणतात.

५३. **तपश्चर्या –** तपश्चर्या म्हणजे चिकाटी होय.

५४. **दान –** ज्या दानाची आठवण राहत नाही ते दान खरे होय.

५५. **मन –** मन म्हणजे कल्पनांचे मूर्त स्वरूप होय. मन कोरीपाटी असून, वेदनांचे संस्कार त्याच्यावर उमटतात.

५६. **अनुसंधान व ज्ञानाची पहिली पायरी –** आपण प्रयत्न करीत असता भगवंत आपल्या मागे आहे. ही भावना ठेवणे, ही अनुसंधानाची पहिली पायरी आहे. जगाचा स्वभाव कळणे ही ज्ञानाची पहिली पायरी होय.

५७. **अवगुण** – जे गुण भगवंताच्या आड येतात ते अवगुण समजावेत.

५८. **स्मरण** – स्मरण ही कृती आहे. विस्मरण ही वृत्ती आहे.

५९. **कल्पना** – जे निश्चित नाही, त्याचे नाव कल्पना होय.

६०. **विवेक** – आनंदाला बळकटी येण्यासाठी जे करणे त्याचे नाव विवेक होय.

६१. **परोपकार** – ज्यामध्ये कर्म करीत असतानाच समाधान मिळते, तोच खरा परोपकार समजावा.

६२. **भगवंताचे प्रेम** – ताकात लोणी असते, ते वर दिसत नाही; पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते, तसे भगवंताचे नाम आपण घेतले की, त्याचे प्रेम आपोआप वर येते.

६३. **आपले मरण** – वासनेच्या क्षयामध्ये आपले मरण आहे. आपले मरण आपल्या डोळ्यांनी पाहण्यासाठी. भगवंताच्या स्मरणामध्ये अभिमानाचे मरण आहे.

६४. **नम्रता** – भगवंताच्या कृपेमुळे सर्व होत आहे ही भावना असली म्हणजे नम्रता अंगी येते. आत भगवंत असावा, बाहेरून कर्तव्य करावे.

६५. **गुरू** – शब्दातील गकार सिद्धी देणारा, रकार पापहारक व उकार हा अव्यक्त विष्णू आहे. गुरू हा शांत, इंद्रियदमन करणारा, कुलीन, विनीत, आचारशील, पवित्र, दक्ष, चांगल्या बुद्धीचा, आध्यात्म्यावर निष्ठा असणारा, मंत्रतंत्र जाणणारा, कृपा व शासन दोन्ही करू शकणारा असावा.
*(डॉ. प्र.न. जोशी. ''ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज (चरित्र व शिकवण)''– पृ. २६५–७५.)

६६. **अनाहत नाद** – अनाहत नाद म्हणजे दैवी संगीत व स्वरमाधुर्य, मधुर सारंगी, सृष्टिकर्त्याची दुंदुभी. अनाहत नाद ऐकणे म्हणजे ब्रह्माला जाणणे

६७. **आर्षज्ञान** – आर्ष ज्ञान म्हणजे मनाला ईश्वराच्या उपस्थितीची होणारी जाणीव असते.

६८. **नीतिशास्त्र** – सदाचाराचे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र.

६९. **पद्धती** – पद्धती म्हणजे तात्त्विक प्रश्नाबद्दलच्या प्रबल युक्तिवादाचे एक तर्कशास्त्र किंवा विवरण देण्याचा प्रयत्न होय.

७०. **भगत (भक्त) ('दरवेश')** – धार्मिकदृष्ट्या ज्याचे आमूलाग्र परिवर्तन झाले आहे अशी व्यक्ती.

७१. **वर्तन** – वैराग्य – मनात ज्ञान, मुखात भक्ती आणि कृतीत वैराग्य याचेच नाव वर्तन – वैराग्य.

७२. **आत्मा** – आत्मा म्हणजे विचार करणारा शरीराचा भाग. काल ही आत्म्याची रंगभूमी आहे.

७३. **संस्कृती व सभ्यता** – कोणत्याही समाजाची सर्जनात्मक क्रिया ही त्याची संस्कृती आणि त्याच्या तात्त्विक विचारधनाचा विस्तार आणि भौतिक सुखसाधने ही त्याची सभ्यता होय.

७४. **पुरुषार्थ** – पुरुषार्थ म्हणजे जीवनव्यापी ध्येय. पुरुषार्थ म्हणजे साध्यरूप मूल्य.

७५. **कर्माचे प्रकार** – (क) संचित – पूर्वजन्मींच्या कर्माचे फळ. (भूतकालीन). (ख) प्रारब्ध – या जन्मात घडलेले कर्माचे फळ. (वर्तमानकालीन). (ग) क्रियमाण – या जन्मात हातून पुढे घडण्याच्या कर्माचे फळ. (भविष्यकालीन).

७६. **अनुग्रह किंवा शक्तिपात** – ईश्वरकृपा अवतरणे यास अनुग्रह किंवा शक्तीपात असे म्हणतात.

७७. **प्रत्यक्ष** – प्रत्यक्ष (संवेदन) म्हणजे वस्तूचे साक्षात् आकलन होय. आपल्या ज्ञानेंद्रियाद्वारा होणाऱ्या बाह्यवस्तूंच्या बोधनास अथवा ज्ञानास 'प्रत्यक्ष' अथवा 'प्रत्यक्षज्ञान' म्हणण्याचा प्रघात आहे.

७८. **प्रत्यभिज्ञा** – प्रत्यभिज्ञा म्हणजे ओळखणे. आपला आत्मा व शिव यात तादात्म्य असल्याची जाणीव म्हणजे प्रत्यभिज्ञा.

७९. **चित्त** – विचार, स्मृती, बोध, भावना इत्यादी मनोव्यापाराचे जे इंद्रिय त्यास योगात 'चित्त' अशी संज्ञा आहे. त्यासच मन, बुद्धी, सत्त्व, स्व अशीही नावे आहेत.

८०. **विदेहमुक्ती** – यामध्ये जीवात्मा परमात्म्याशी एकरूप होतो व स्वत:चे नित्यत्व जाणतो.

८१. '**भूमन्** म्हणजे ब्रह्म ध्यानावस्थित मनुष्याला ओतप्रोत भरलेले दिसते.' – डॉ. रा. द. रानडे.

८२. **विकास** म्हणजे अव्यक्ताला व्यक्त रूप प्राप्त होण्याची प्रक्रिया होय. विकास म्हणजे कालकल्पनेच्या अलीकडील अवस्तूपासून, कालामधून कालापलीकडील नित्यवस्तूकडे जाणे.

८३. **व्यक्ती** – जगाच्या रंगभूमीवर ईश्वराने दिलेली भूमिका पार पाडणारा मानव म्हणजे व्यक्ती.

८४. **परब्रह्म** – सर्व उपाधींचा निरास करणारे ते परब्रह्म होय.

८५. **अपरब्रह्म, सगुण ब्रह्म, कार्यकाल, ईश्वर** – सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, कृपाळू उपास्यास म्हणतात.

८६. **अष्टांग मार्ग** – अष्टांग मार्ग म्हणणे वितृष्णेची साधना होय.

८७. **परमेश्वर** – प्रेम आणि कृपा यांचा खजिना म्हणजे परमेश्वर.

८८. **अध्यारोप** – अध्यारोप म्हणजे सच्चिदानंद, अनंत, अद्वय अशा वस्तूवर अवस्तूचा म्हणजे अज्ञानादि जडसमूहाचा आरोप.

८९. **तीन नाड्या** – इडा, पिंगला व सुषम्ना या तीन नाड्या आहेत. या आध्यात्मिक शक्तीच्या वाहिन्या आहेत.

९०. **भक्ती** – श्रद्धापूर्वक केलेली ब्रह्माची उपासना म्हणजेच भक्ती. ईश्वराच्या ठिकाणी परम अनुरक्ति म्हणजे भक्ती होय.

९१. **प्रपत्ती** – ईश्वराला अनन्य भावाने शरण जाणे म्हणजे प्रपत्ती.

९२. **उत्क्रांती** – कोणत्याही क्षेत्रात उत्क्रांति म्हणजे सरलतेकडून संकीर्णतेकडे जाणे होय, आणि एकदा या दिशेने गेले म्हणजे विरूद्ध दिशेने जाता येत नाही. उत्क्रांतिच्या तीन ढोबळ अवस्था आहेत : 'जीवपूर्व', 'जीव' आणि 'विचार.'

९३. **श्रेयस् व प्रेयस्** – कल्याण वा हितकारी म्हणजे श्रेयस् व प्रिय वा सुखकारी म्हणजे प्रेयस.

९४. **सत्य व असत्य** – सत्य म्हणजे यथार्थ व असत्य म्हणजे अयथार्थ. असत्य म्हणजे सत्याचा अभाव. सत्य म्हणजे दुसरे - तिसरे काही नसून, कल्पनांचे सुसंवादित्व किंवा सुसूत्र सुसंवाद असतो. सर्वसाधारणपणे सत्ता व मन यात मिळतेजुळतेपणा असणे हे 'सत्य' यामध्ये गर्भित आहे.

९५. **शिव** – जो एखादी वस्तू मिळवू पाहत आहे किंवा ज्याच्यापाशी ती आहे त्याला ती योग्य असणे म्हणजे 'शिव' होय.

९६. **सौंदर्य** – सौंदर्य म्हणजे ज्याची जाणीव स्वयं – सुखद असते ते. त्याला ज्ञानशक्तीची अपेक्षा असते. मनुष्याची जाणीव संवर्धित करते. म्हणून सौंदर्य हे एक मूल्य आहे. 'सौंदर्य' म्हणजे वास्तवता प्राप्त झालेली भावना किंवा आनंद होय.

९७. **प्रमाद** – प्रमाद म्हणजे सदाचरणात चूक होणे. सदाचाराविषयी जागरूक नसणे म्हणजेच मृत्यू होय. काम, क्रोध, मोह, ही प्रमादाची रूपे होत.

९८. **सहिष्णुता** – सहिष्णुता ही अशी वृत्ती आहे की, जी इतरांच्या मतांना व आचारांना, ते आपल्या आचारविचारांहून भिन्न असले तरी, प्रतिबंध करीत नाही. पुष्कळदा सहिष्णुता ही, मनाची उदारता आणि नम्रता ह्यांचा ज्यात अंतर्भाव आहे, अशा सद्गुणांच्या रूपाने आढळते.

९९. **संशय** – जेव्हा एखाद्या ज्ञेयासंबंधी ते हे की ते हे असे निश्चित करता येत नाही. तेव्हा त्या संभ्रमित अनिश्चित ज्ञानावस्थेस 'संशय' असे म्हणतात. कोणत्याही कल्पना – विश्लेषणात संशय उत्पन्न होऊ शकतो. संशय म्हणजे विकल्पक ज्ञान.

१००. **संसार** – जीवात्मा जन्म – मरणांचा अखंड प्रवास म्हणजे संसार होय. जन्म – मरणाच्या फेऱ्यांतून अथवा संसारापासून सुटका म्हणजेच मोक्ष व मोक्ष हे माणसाचे परम – प्राप्तव्य.

१०१. **संस्कार** – संस्कार म्हणजे 'गुणांतराधान' – उत्कृष्ट गुणांचा लाभ व परिपोष – असे चरकाने म्हटले आहे. संस्कार याचा व्युत्पत्यर्थ शुद्ध करणे, एखाद्या वस्तूच्या ठिकाणी अधिक चांगले गुण उत्पन्न करणे.

१०२. **स्थितप्रज्ञ** – स्थितप्रज्ञ म्हणजे ज्याची प्रज्ञा स्थिर झाली वा आहे तो.

१०३. धर्मसंस्थांचे कार्य मानवांमध्ये प्रेम व सद्भाव निर्माण करणे आणि उत्तम मूल्यांचे संरक्षण करणे, हेच असायला पाहिजे.

१०४. **आध्यात्मिक जागृतीचे घटक** – चित्तवृत्ती – निरोध, सत्संग – अनुरोध आणि आत्मबोध – प्रबोध हे आध्यात्मिक जागृतीचे घटक आहेत.

१०५. **कर्मविपाक** – कर्मविपाक ह्याचा अर्थ वाईट कृत्यांची फलनिष्पत्ती असा होतो. फलनिष्पत्ती जाति (पशु, कीटक इत्यादिक जन्म); आयु (अल्प मुदतीपर्यंत जगणे) आणि भोग (नरक यातना इत्यादिकांचा अनुभव घेणे) अशी तीन प्रकारची होते असे योगसूत्र (२.१३) ह्या ग्रंथात सांगितले आहे.

१०६. **अंत:करण** – बुद्धी, अहंकार व मन यांच्या समष्टीचे नाव म्हणजेच अंत:करण होय.

१०७. **माया** – ईश्वराची उपाधी असलेले भावरूप अज्ञान म्हणजे माया.

१०८. **अविद्या** – जीवाची उपाधी असलेले अज्ञान म्हणजे अविद्या. अमर्याद स्वरूपात व्यक्त होण्याचे ईशतत्त्वाचे अमर्याद सामर्थ्य म्हणजे माया होय, असे योगी अरविंद यांचे मत आहे.

१०९. **परमेश्वराची अनुभूती** – "जगात केवळ एकच सत्य आहे. हे सत्य आपल्याच मनात दडलेले असते. ज्यावेळी आपल्याला या सत्याविषयीचे ज्ञान अवगत होते. तेव्हाच आपल्याला परमेश्वराची आत्मानुभूती होते." – प्रख्यात सूफी संत व विद्वान हजरत इनायत खान, वडोदरा. (बडोदा)

११०. **एकाग्रता** – एक विषयक धारावाहिक वृत्ती असणे याला चित्ताची एकाग्रता म्हणतात. विज्ञानातील शोध, सर्वकल्याणाची विचार रहस्ये, एका एकाग्रतेतून केलेल्या चिंतनातून लाभलेली आहेत.

१११. **प्रार्थना** – आत्म्याचा आवाज परमात्म्यापर्यंत घेऊन जाणारा संदेशवाहक म्हणजे प्रार्थना!

**११२. मृत्यू** – मृत्यू हे प्राण उत्क्रमणाचे दुसरे नाव आहे; प्राणज्योत विझण्याचे – मावळण्याचे नाव आहे.

**११३. योग** – विश्वामध्ये सर्वत्र एका चैतन्याचाच प्रत्यय येणे म्हणजे योग होय; म्हणून चित्तचैतन्य संयोग तो योग. ज्ञान प्राप्त झाल्यावर त्याच्या परिपाकासाठी प्रयत्न करणारा तो योगी हो.

**११४. प्रपन्न** – प्रपन्न म्हणजे साधारण देवावर भरवसा ठेवणारा असा.

**११५. प्रपित्सु** – प्रपित्सु म्हणजे प्रपन्न होण्याविषयी ज्याचे मनामध्ये इच्छा अथवा मनोरथ वागतो तो असा.

**ख) हे 'काय'?**

१) प्रपंच म्हणजे काय? – मीतूंपणा हाच.
२) शांती काय? – निर्हेतु.
३) सुख म्हणजे काय? – चिंता तळमळ नाही ते.
४) दुःख म्हणजे काय? – तळमळ हेच.
५) हानी काय? – चित्त स्थिर नाही.
६) लाभ काय? – समाधान वृत्ती.
७) जन्म काय? – आत्मसुख भोगणे.
८) मृत्यू काय? – आत्मघात करणे.
९) मळ काय? – द्वैत हाच.
१०) निर्मल काय? – द्वैत नाही ते.
११) पाप काय? – कल्पनायुक्त.
१२) पुण्य काय? – निर्विकल्प.
१३) कीर्ती काय? अपकीर्ती काय? – भगवंतास आवडेल ती कीर्ती. देवाचा गुन्हेगार ही अपकीर्ती.
१४) खरे काय? – काही नाही हे समजून खाली राहील ते.
१५) खोटे काय? – पराचे अंतर दुखणे, आपले मन व अहंकार.
१६) नाशवंत काय? – ज्याचा लय होतो, वीट येतो ते.
१७) शाश्वत काय? – वीट नसून नाश होत नाही ते.
१८) स्नेह काय? – तो आणि मी दोन वाटत नाही तो.
१९) प्रीती म्हणजे काय? – त्याहून दुसरे जास्त काही नाही ते.
२०) दुष्कर्म कोणते? – वेद – गुरू – आज्ञेविरूद्ध वर्तन.
२१) परलोक म्हणजे काय? – आपलेहून भिन्न ते.
२२) बरे काय? – विदेही होऊन साक्षीने वागणे.
२३) वाईट काय? – अहंकार.
२४) स्त्रिया कोणत्या? – अश्रद्धा, श्रद्धा या दोन.
२५) सत्कर्म काय आहे? – स्वानंदात काळ काढणे हेच पुण्य सत्कर्म.
२६) विवेक काय आहे – समदृष्टीने आत्मतत्त्व पाहणे.
२७) वैराग्य काय आहे? – ममत्व त्याग करून सर्व सुख सोडणे.

[* डॉ. प्र.न. जोशी – 'ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज (चरित्र व शिकवण') पृ. २४८–५७ व २६०–६२]

## ६१) पारमार्थिक संकेतकोष

**क)**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चार देह | – | १. स्थूल, २. सूक्ष्म, ३. कारण, ४. महाकारण. |
| २) | चार वाचा | – | १. परा, २. पश्यंती, ३. मध्यमा, ४. वैखरी. |
| ३) | चार अवस्था | – | १. जागृती, २. स्वप्न, ३. सुषुप्ती, ४. तुर्या. |
| ४) | चार खाणी | – | १. स्वेदज, २. अंडज, ३. उद्‌भिज्ज, ४. जारज. |
| ५) | पंच तत्त्वे | – | १. पृथ्वी, २. आप, ३. तेज, ४. वायू, ५. आकाश. |
| ६) | पंच विषय | – | १. रूप, २. रस, ३. गंध, ४. स्पर्श, ५. शब्द. |
| ७) | पंच प्राण | – | १. प्राण, २. अपान, ३. व्यान, ४. उदान, ५. समान. |
| ८) | पंच कोश | – | १. अन्नमय, २. प्राणमय, ३. मनोमय, ४. विज्ञानमय, ५. आनंदमय. |

**ख)**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मणिपूर | – | पिंडी ब्रह्मांडीच्या मध्ये साक्षी. |
| २) | पाताळ लोक | – | मूळधार चतुर्दकाखाली. |
| ३) | मृत्यू लोक | – | हृदय आकाश. |
| ४) | स्वर्ग लोक | – | त्रिपुटीचे वर. |
| ५) | विराट | – | विश्वरूप. |
| ६) | चवदा भुवने | – | सात पिंडात व सात ब्रह्मांडाचे शिवेपावेतो. |
| ७) | प्रणव | – | अहंब्रह्मास्मि. |
| ८) | अहंक्ष | – | सत्तात्मक प्रकाश. |
| ९) | अकार | – | त्रिपुटी स्थानी. 'अ' कार = 'फतहा' |
| १०) | उकार | – | श्री हठस्थानी. ॐ कार (अउम)= 'उ' कार = 'जम्मा' |
| ११) | मकार | – | गोल्हाटस्थानी. 'म' कार = 'कसरा' |
| १२) | अनाहत | – | पिंडब्रह्मांडाचा ध्वनी. |
| १३) | अर्धमात्रा | – | स्वस्वरूप पाहण्याचा डोळा. |
| १४) | अर्धचंद्र | – | स्वस्वरूपाचा अंशरूप ईश्वर. |
| १५) | ॐकार | – | स्वस्वरूपगुरूज्ञान, शब्द वसे तेथे. |

१६) षोडशकला - अविद्यात्मकजीव.

१७) त्वंपद - जीव.

१८) तत्पद - ईश्वर.

१९) असिपद - परमपद परमेश्वर.

२०) शून्य - काहीच नाही; सर्वलय.

२१) उन्मनी - मनाचा रीग नसणे.

२२) तुर्या - नामाचे फक्त स्मरण जाणणे.

२३) सूक्ष्म - स्थूलाहून भिन्न, लिंगदेह, वासनारूप.

२४) कारण - द्रष्टा.

२५) महाकारण - स्वयंभू.

२६) हिरण्यगर्भ - सर्वद्रष्टा.

२७) ॐ नमः शिवाय - हा एक महान तारक मंत्र आहे. याचा अर्थ आहे. 'शिवला नमन' शिव अंतरात्म्याचे प्रतीक आहेत, ''नमः शिवाय'' हा मंत्र पाच अक्षरांनी बनलेला आहे. म्हणून यास 'पंचाक्षरी मंत्र' म्हणतात. मुक्ती प्राप्त करण्याचा हा महान मंत्र आहे, कारण की यामध्ये सांसारिक सुखांसोबतच मोक्ष प्राप्त करून देण्याची पण शक्ती आहे. हा सिद्धांचा मुख्य दीक्षा मंत्र आहे.

## ६२) पारमार्थिक 'कोण?' आणि 'काय?'

**(क) हे 'कोण?'***

१. कर्म कोणते? - सकाम भक्ती, अध्ययन, दान वगैरे.

२. धर्म कोणता? - स्वधर्म रक्षण करून परमेश्वर प्राप्तीचा उपाय करणे तो.

३. विद्वान कोण? - विद्येचा गर्व नसोन कोणाचा अपमान न करणारा, अविद्येचा नाश करून, भगवद्शक्ती अति उत्तम; सर्वांभूती नम्र फार, समदृष्टी समान सर्वांभूती अतिलिन.

४. शास्त्री कोण? - शास्त्राप्रमाणे वागून जगास वागविणारा.

५. सिद्ध कोण? - पुन्हा जन्मास न येणे, सिद्धी केल्यावर कर्तुं अकर्तुंची शक्ती जयास तो व गुरूवचनी विश्वासपूर्ण.

६. फकीर कोण? - फिकीर सोडून चारी खाणींचा आत्मा एक समजणारा.

७. विदेही कोण? - देहाचे ममत्व न धरणारा.

८. ब्रह्मचारी कोण? - ब्रह्मकर्माचा शोध करणारा, वेदविद्येचे सार पाहणारा, परद्रव्य, परपीडा, परअन्न, परस्त्रीसंग व परधर्म न करणारा.

९. संन्यासी कोण? - षड्रिपूंचा त्याग करणारा.

१०. दाता कोण? - पराचे दुःख जाणोन ते दूर करणारा, निष्काम दान करणारा.

११. योगी कोण? - स्वरूपास वेगळा न होणारा.

१२. परमार्थ कोण? - कुलउद्धार - जगावर उपकार, इहलोकी धन्य होऊन परलोक साधणे, देवास आपल्या भक्तीसी लावणे, त्रिगुण - रहित अहंभावाशिवाय जे आनंदस्मरण.

१३. पापी कोण? - आपल्या संगतीनुसार दुसऱ्यास तुच्छ करणारा व गर्वात राहणारा व सत्यास असत्य करणारा.

१४. करावे काय? - दृश्यात राहून अदृश्य पाहावे.

१५. कसे वागावे? - आपला उत्तम गुण करू नये.

१६. शांति कशी धरावी? - पराचे अपराधाची क्षमा करावी, उर्मी घेऊ नये.

१७. चांडाळ कोण? - उपकारास अनुपकार करणारा.

१८. शांति कशास म्हणावी? - कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये, भगवत् परायण वृत्ती.

१९. शहाणा कोण? - सत्य - हानी न होऊ देणारा व असत्यास साहाय्य न करणारा.

२०. मिळविता कोण? – स्वस्वरूपास मिळणारा.
२१. गमविता कोण? – गुरूद्रोह करणारा.
२२. कमाविता कोण? – आत्मज्ञान कमविणारा.
२३. कोणत्या रस्त्याने जाऊ नये? – कुमार्गाची वाट धरू नये.
२४. साधु कोण? – शांती, दया ज्यांनी साधली तो.
२५. संत कोण? – ब्रह्मज्ञानी असून ब्रह्माचे सुख घेणारा व सगुण भक्ती करणारा, आपण तरून दुसऱ्यास तारणारा. सदा सर्वदा ज्याची वृत्ती अनुरागी.
२६. भक्त कोण? – दृश्य मिथ्या यातून परमात्म्यापासून न विभक्त होणारा.
२७. ज्ञानी कोण? – मी कोण आहे हे जाणून देहाचे विस्मरण करणारा.
२८. अतितर पाप कशाने होते? – अतिलोभाने.
२९. क्रोधाचे मूळ? – हेतु.
३०. दुःखाचे मूळ? – वासना.
३१. बंधन मूळ? – नाशवंतास सत्य मानणे.
३२. उत्तम पुरुष कोण? – अभिमानरहित असतो, कोणास तुच्छ न करणारा.
३३. मोठा कोण? – ईश्वर – मायेचा उपयोग करून तत्त्व जाणणारा.
३४. जीवन्मुक्त कोण? – विषयरहित शिव तो जीवन्मुक्त, रामनामा वाचून वेळ जात नाही तो.
३५. बद्ध कोण? – विषयांत तत्पर तो व आपले वाईट वर्तन उत्तम वाटे तो.
३६. मुक्त कोण? – विषयाचे ठिकाणी अहंममत्व.
३७. संसारात सार काय? – श्रुतीचा आत्मबोध.
३८. मोक्षाचा हेतु तो कोणता? – पांथिकास गुरूप्रबोधाने परमात्मप्राप्ती.
३९. नरकाचे द्वार कोणते? – स्त्रियांचे ठायी चित्त लोलंगता.
४०. नरकास कोण जातो? – काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सरासक्ती हे नरकांसी जाती.
४१. कशाने स्वर्गप्राप्ती होते? – प्राण गेला तरी हिंसा न करणे.
४२. जागणारे कोण? – सदसद्विवेकी.
४३. शत्रु ते कोण? – आपलीच इंद्रिये.
४४. मित्र कोण? – जितेंद्रिय तोच.
४५. दरिद्री कोण? – ज्यास फार तृष्णा तो.
४६. श्रीमान कोण? – सर्वत्र फार संतोष आहे तो.
४७. जिवंत असा मेला कोण? – परमार्थ – प्राप्तीविषयी निरूपयोगी.
४८. महामोहकारक काय? – स्त्रियांसारखे अन्य नाही.
४९. पशू कोण? – ममतेचा अहंभाव बाळगणारा.

५०. महा अंध कोण? - मदनाचे ठिकाणी आतुर आहे तो.

५१. गुरू कोणास म्हणावे? - हितोपदेश करणारा.

५२. शिष्य कोणास म्हणजे? - जो गुरूभक्तीस तत्पर तो.

५३. महान् रोग कोणता? - भव - बंधन.

५४. औषधी कोणती? - भव - बंधनाचा विचार करणे.

५५. भूषणात भूषण काय? - शील उत्तम असणे.

५६. परमतीर्थ कोणते? - शुद्ध मन.

५७. रात्रंदिवस हेतु कोणता धरावा? - सतत ब्रह्म - प्राप्ती व्हावयाचा.

५८. संतोष कशाने प्राप्त होतो? - संतसंगतीने काळ काढल्याने.

५९. ज्वर कोणता? - रात्रंदिवस चिंता.

६०. अपार मोह कोणास बाधत नाही? - परमेश्वराचे, परमात्म्याचे ठायी पूर्ण निष्ठा त्यास.

६१. मूर्ख कोणास म्हणावे? - जो विवेकहिन त्यास.

६२. सर्व काळ काय करावे? - परमेश्वराची भक्ती करावी.

६३. जीवन कशात घालवावे? - दोषवर्जित राहण्यात.

६४. बोध कशास म्हणावे? - मुक्तीची प्राप्ती करून देईल तो.

६५. लाभ तो कोणता? - आत्म्यास जाणणे

६६. जगत् जिंकणारा कोण? - ज्याने मनाचा जय केला तो.

६७. शूरांत महाशूर कोण? - ज्याचे मन कोणापासूनही दुःखी होत नाही.

६८. सदासर्वदा दुःख कोणते? - समस्त विषयांचे ठायी लंपट तो.

६९. जगतात धन्य कोण? - पर - उपकार करणारा.

७०. अपूज्य कोण? - तत्त्वांचे ठायी ज्याची निष्ठा नाही तो.

७१. सर्वत्र स्वस्थ कोण? - ज्याचे मन व्यग्र होत नाही तो.

७२. संसाराचे मूळ काय? - सदोदित चिंतेत राहणे.

७३. शृंखला - बंधन कशास म्हणावे - स्त्रियांचा जन्म पावेतो संग.

७४. धन्य वृत्ती कोण? - जो एक परमात्म्याशिवाय कोणास शरण जात नाही तो.

७५. सर्व जगाचे ठिकाणी दुःख कोणते? - दुराशा.

७६. पशु कोण? - विद्याहीन.

७७. भ्रम कोणता? - मी कोण आहे हे न कळता माझे म्हणतो तो.

७८. वासनाबद्ध कोण? - मूर्ख पापमतीने वागणारा अविचारी.

७९. मुमुक्षूत्व कोणत्या साधनाने प्राप्त होते? - संतसंगतीचा लाभ असे निर्मतत्त्व असावे, भक्तीमध्ये तत्पर अ*□

८०. नास्तिक कोणास म्हणावे? – सत्याचे मिथ्या वाटणे व मिथ्याचे सत्य मानणारा.

८१. उत्तमात उत्तम काय? – संतांचे चरित्र.

८२. कर्म कोणते करावे? – चिंता, रोग, शोक, नाशिवंत ह्यांस त्यजावे.

८३. कामाचा अरि (शत्रु) कोण? – परमेश्वर चिंतन.

८४. शत्रुपेक्षा महाशत्रु कोण? – कोपित काम, मिथ्या लोभ, तृष्णा.

८५. विषयाची पूर्तता न होणे हे काय? – अविवेक व अभिमान.

८६. सत्य कोणास म्हणावे? – भूतमात्राचे हित जाणते.

८७. द्यावे काय? – भूतमात्रा अभय.

८८. नाश कोणाचा होत नाही? – मनी मोक्ष धारण केले त्याचा होत नाही.

८९. मुक्त कोण? – सर्वदा निर्भय तो.

९०. कृपा कोणावर होते? – जो गुरूस अनन्य शरण.

९१. यम – भयापासून कोण सुटला? – ज्याचे चित्त समाधानी आहे तो.

९२. यमाचे बंधन कोणास नाही? – परमेश्वर चिंतन करणारा.

९३. दुर्दशा कोणास प्राप्त होते? – दुर्वासना ज्यास आहे त्यास.

९४. शोभायमान भूषण काय? – सद्विद्या.

९५. कार्य कशाने होते? – सुविद्येत वागल्याने.

९६. शिष्य कोणास म्हणावे? – गुरूवाक्याचे अहर्निशी बुद्धीस बोध करतो तो.

९७. ज्ञानी कोणास म्हणावे? – सर्वात्मा जगी मानून जगास बोध करणारा.

९८. जगी दुर्लक्ष काय? – सद्गुरू प्राप्ती.

९९. संत – संगतीचा उपयोग काय? – ब्रह्मप्राप्ती.

१००. दुर्जय काय? – मन.

१०१. विष कोण पितो? – आत्मवत् स्त्रियांस मानतो तो.

१[illegible] विद्युल्लतेप्रमाणे चंचल काय? – आयुष्य, धन, शरीर, सुख, दुःख.

१०४. दान कोणते? – सत्पात्राचे ठिकाणी देणे ते.

१०५. कंठगत प्राण आहे, तरी काय करू नये? – आपली सु–वाचा मलीन करू नये.

१०६. अहर्निशी चिंतन का करावे? – संसार मिथ्या, शिवरूप सत्य.

१०७. संसार म्हणजे काय? – देहाची स्मृती। या नाव संसार म्हणती।।

१०८. वैराग्य कसे असते? – मनोजय, वासनाक्षय, वृत्तिलय.

१०९. साधु कोणास म्हणावे? – षड्रिपूंचा घात करून भगवत्परायण चित्त या नाव साधु.

११०. साधक कोण? – सतजनी आश्वासला, सद्गुरूशी विश्वासला.

१११. सच्छिष्य कोण? – आपलेपणा सद्गुरूस अर्पून उरला आज्ञापुरता.

११२. विवेक कोणता? – आत्मज्ञानाकरिता आत्मा (अ) नात्म विचार.

११३. कोणत्या सुखाचा त्याग करावा? – विषय सुखाचा.

११४. संगती कोणाची धरावी? – निर्विषय भगवद्भक्ती करी त्याची संगती धरावी.

११५. भवसमुद्रात बुडाल्यास काय करावे? – सद्गुरूस अनन्य शरण जावे.

११६. सद्गुरूस काय मागावे? – सद्गुरू सेवेव्यतिरिक्त मोक्षसुद्धा मागू नये.

११७. सत्समागम कसा करावा? – वासनातीत कामक्रोध लोभ देहबुद्धी सोडून करावा.

११८. संसारात काय सोडावे? – हर्ष – विषाद सोडावा.

११९. आत्मज्ञान कशास म्हणावे? – देहबुद्धीचे विस्मरण व आत्मबुद्धीचे स्मरण.

१२०. गुरूपुत्र कोणास म्हणावे? – भूत – दयेचा सागर, शांती – सुखाचे आगर.

[ डॉ. प्र. न. जोशी – ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज (चरित्र व शिकवण) या ग्रंथावरून ]

# ६३) भारतीय दार्शनिक संक्षिप्त परिभाषा कोश

**अवतार –** हा शब्द अवतरण या शब्दापासून बनलेला आहे. याचे संस्कृत भाषेमध्ये अर्थ आहे 'खाली येणे किंवा उतरणे,' विशेषत: ईश्वर अथवा ईश्वरीय शक्तींचे मानवी शरीरामध्ये उतरणे. जो परब्रह्माशी एक होऊन जातो आणि मग मानवी जातीच्या साहाय्यासाठी शरीर धारण करून या जगामध्ये येतो किंवा अवतीर्ण होतो त्यास अवतार असे म्हणतात.

**अवधूत –** देह संज्ञापासून पलीकडे - अतीत, रूढी - रीतींपासून पलीकडे, आत्मस्थ महात्मा.

**आकाश –** पंचतत्त्वांमधील सर्वात सूक्ष्म तत्त्व. या तत्त्वापासून इतर चार तत्त्वे उत्पन्न झाली आहेत. हा सर्वत्र आहे. पंचमहाभूतांपैकी (पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश) एक सूक्ष्मतम महाभूत.

**आत्म-साक्षात्कार –** ईश्वराच्या सर्वव्यापी चैतन्याशी एकाकार आत्म्याच्या स्वरूपात आपल्या सच्च्या (खरे) स्वरूपाचे ज्ञान होणे. श्री श्री परमहंस योगानंद लिहितात - ''आत्म-साक्षात्कारचा अर्थ आहे. शरीर, मन आणि आत्म्यामध्ये या गोष्टीची जाण होणे की आपण सर्व ईश्वराच्या सर्वव्यापकतेसोबत आहोत; म्हणून त्यास आपल्याशी बोलावण्यासाठी प्रार्थना करण्याची गरज नसते; कारण की आम्ही फक्त सदैव (नित्य) त्याच्या सान्निध्यात नसून, ईश्वराचे सर्वव्यापक तत्त्व आमची स्वत:ची सर्व व्यापकता आहे; कारण आम्ही अद्यापपर्यंत त्याचे तितकेच अभिन्न अंग आहोत जितके की अभिन्न होऊ शकतो. आम्हाला फक्त एवढेच करायचे आहे की आमची जाणीव (बोध) विकसित होऊन जावी.''

**आसन –** शरीरास सुदृढ बनविण्यासाठी, नाड्यांना शुद्ध करण्यासाठी आणि मनाच्या एकाग्रतेसाठी ज्यांचा अभ्यास केला जातो. असे विभिन्न प्रकारचे शारीरिक व्यायाम. पातंजलीच्या 'योगसूत्र''मध्ये ८४ (चौऱ्याऐंशी) मुख्य आसनांचा उल्लेख आहे. चटई किंवा अंथरण्याची वस्तू, की जिच्यावर बसून ध्यान केला जातो. ध्यानाच्या वेळी शरीराची विशिष्ट अवस्था वा स्थिती.

**उपनिषद –** प्राचीन काळी ऋषींनी दिलेले. हे वेदांचे शेवटचे भाग आहेत. उपनिषदांचा मुख्य उपदेश हा आहे की मनुष्याचा अंतरात्मा, ब्रह्म आणि परमेश्वर एकच आहेत. उपनिषदांच्या मतानुसार जीवनाचा उद्देश (हेतू) ब्रह्मप्राप्ती हा आहे.

**ॐ –** आदि नाद; नाद किंवा प्रकंपन की ज्याच्यामुळे समस्त लोक प्रकट होतात; हा सर्व मंत्रांचा मूळ आहे. हा परमतत्त्वाचे सृजन आणि पालन करणाऱ्या पैलूचा, अर्थात् ब्रह्मनाद वा ब्रह्मांडीय स्पंदनाचा संकेत करणारा बीज शब्द किंवा बीज ध्वनी आहे. वेदांचा 'ओम्', तिबेटींचा 'हुम्', मुसलमानांचा 'आमीन' आणि मिस्र (इजिप्त) वासी, यूनानी (ग्रीक), रोमन, यहूदी आणि ईसाई (ख्रिश्चनां)चा

'आमेन' हे सर्व ॐ याचे सूचक आहेत. जगातील सर्व महान (प्रमुख) धर्मांचे असे मत आहे की, सृष्टीमधील प्रत्येक वस्तू ही 'ओम्' किंवा 'आमेन' वा शब्द वा पवित्रात्म्याच्या स्पंदनात्मक ब्रह्मांडीय ऊर्जेपासून उत्पन्न झाली आहे. ''सुरुवातीस फक्त शब्द होता आणि शब्द ईश्वरापाशी होता आणि शब्दच ईश्वर होता... प्रत्येक वस्तूचे सृजन त्या (शब्द वा ओम्) ने केले होते, आणि जे काही निर्माण झाले आहे. त्यामध्ये त्याच्याशिवाय काहीच निर्माण झाले नाही.'' (बायबल : यूहन्ना १:१,३).

**ॐ नमः शिवाय** – हा एक महान तारक मंत्र आहे. याचा अर्थ आहे – ''शिवास नमन.'' शिव हा अंतरात्म्याचा प्रतिक आहे. ''नमः शिवाय'' हा मंत्र पाच अक्षरांनी बनलेला आहे. म्हणून याला ''पंचाक्षरी मंत्र'' म्हणतात. मुक्ती किंवा मोक्ष प्राप्त करण्याचा हा एक महान मंत्र आहे; कारण की याच्यामध्ये सांसारिक सुखांसोबत मोक्ष प्राप्त करून देण्याची पण शक्ती आहे. हा सिद्धांचा मुख्य दीक्षा मंत्र आहे.

**कल्पतरू** – एक दिव्य वृक्ष ज्याच्या छाये (सावली) खाली मनाच्या सर्व इच्छा पूर्ण होऊन जातात.

**कला** – एक लहान भाग (अंश); ०–९ पर्यंतची कोणतीही संख्या; एखाद्या वस्तूचे सोळावे भाग (१/१६). मनुष्याच्या शरीराचे सोळा आध्यात्मिक विभाग आहेत, जसे – पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पाच प्राण आणि मन.

**काश्मीर शैव मत** – शुद्ध अद्वैत दर्शन (तत्त्वज्ञान). या दर्शनानुसार एकच परम, अद्वितीय, स्वतंत्र, चितिशक्ती द्वारा संपूर्ण विश्व सृजित आणि व्याप्त आहे. काश्मीर शैवमत असे प्रतिपादित करते की कशा प्रकारे निराकार अप्रकट (अदृश्य) महानतम सत्य स्वतः विश्व (जगत्) स्वरूपामध्ये प्रकट होते. काश्मीर शैव मताचा प्रमाण ग्रंथ ''शिव सूत्र'' आहे. हा संस्कृत भाषेमध्ये आहे आणि यामध्ये ७७ (सत्याहत्तर) सूत्रे आहेत. भगवान शिव यांनी स्वतः आपल्या दैवी प्रेरणेने या सूत्रांनी ऋषी वसुगुप्तार्यांसमोर उद्घाटित केले होते.

**कामधेनु** – ही एक दिव्य गाय आहे. हिला देवी म्हणून मानतात. ही सर्व मनोकामना पूर्ण करते.

**किन्नर** – स्वर्गामधील गायक (गवई).

**क्रिया** – जागृत कुंडलिनी द्वारा संचारित स्थूल (शारीरिक) अथवा सूक्ष्म (मानसिक) शुद्धीकरणाचे प्रयत्न. क्रिया मेरूदंडामध्ये स्थित संचित संस्कारांना नष्ट करून स्नायुमंडलास शुद्ध करतात. यामुळे ऊर्ध्वगामी कुंडलिनी शक्तीचा मार्ग उघडणे शक्य होते.

**कुंडलिनी** – (शब्दशः अर्थ – कुंडल आकार); प्रत्येक व्यक्तीच्या मूलाधार चक्रामध्ये सुषुप्तावस्थेत सर्पाकार असणारी आदि शक्ती किंवा विश्वव्यापी प्राण शक्ती. जेव्हा ही जागृत होते तेव्हा ती सूक्ष्म मध्य नाडी सुषुम्नाच्या माध्यम (मार्गा) ने चक्रांना ओलांडत वर उठते आणि अनेक योगिक क्रिया संपन्न करते की ज्यामुळे शरीराचे पूर्ण शुद्धीकरण व परिमार्जन होऊन जाते. जेव्हा कुंडलिनी ब्रह्मरंध्रामध्ये स्थित आध्यात्मिक केंद्र सहस्रारमध्ये प्रवेश करते तेव्हा आत्मा – परमात्याचे मिलन होऊन जाते आणि साधकास मोक्षप्राप्ती होते.

**कुंभक** – श्वासास आत थांबवून धरणे.

**कौस्तुभ –** ''क्षीरसागर'' मधून निघालेले एक रत्न. हे सर्व इच्छा प्राप्त (पूर्ण) करून देते.

**कूटस्थ केंद्र –** भ्रूमध्य मध्ये स्थित एकाग्रता आणि इच्छा शक्तीचे केंद्र, कूटस्थ चैतन्य आणि दिव्य चक्षुस्थान.

**कूटस्थ चैतन्य –** समस्त सृष्टीमध्ये व्याप्त ईश – चैतन्य. सृष्टीच्या प्रत्येक कणा – कणामध्ये व्याप्त या ब्रह्म तेजास हिंदू शास्त्रामध्ये कूटस्थ चैतन्य म्हटले गेले आहे. ईसाई (ख्रिश्चन) बायबलमध्ये यास ''एकमात्र पुत्र'' म्हटले गेले आहे. हे सर्वव्यापी चैतन्य आहे, परब्रह्माशी एकरूपता आहे, जी श्रीकृष्ण, येशू ख्रिस्त आणि इतर अवतारांमध्ये प्रकट झाली. मोठमोठे संत – महात्मा आणि योगी याला समाधीची अवस्था म्हणून ओळखतात. जेव्हा योगी – महात्म्यांची चेतना सृष्टीच्या कणा–कणामध्ये व्याप्त प्रज्ञा किंवा तेजाशी एकाकार होऊ जाते; तेव्हा समस्त ब्रह्मांडास ते आपल्या शरीर स्वरूपात अनुभव करतात.

**क्रिया योग –** हजारो वर्षांपूर्वी भारतात उद्‌भव झालेले एक पवित्र आध्यात्मिक विज्ञान (शास्त्र). हा राजयोगाचाच एक प्रकार (रूप) आहे. यामध्ये ध्यानाच्या काही अशा उन्नत प्रविधी आहेत की ज्यांच्या अभ्यासामुळे साधक हा ईश्वराची प्रत्यक्षानुभूती प्राप्त करतो.

**गीता (किंवा भगवद्‌गीता) –** हिंदू धर्माचा हा एक प्रमुख ग्रंथ आहे. हा 'महाभारता'चा एक अंश आहे. यामध्ये रणक्षेत्र कुरूक्षेत्रामध्ये भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनास परमात्मा, जगत आणि आत्म्याचे स्वरूप, योगचे वेगवेगळे प्रकार आणि भगवत् प्राप्तीचे साधन इत्यादीविषयी उपदेश दिले आहेत.

**गुण –** सृष्टीच्या समस्त वस्तूंच्या वैशिष्ट्यास निर्धारित करणारे प्रकृतीचे तीन मुख्य भाव म्हणजे गुण. हे तीन आहेत. सत्त्व, रज आणि तम. सत्त्व गुण पवित्रता, प्रकाश, समन्वयाचा द्योतक आहे; तर रज गुण हा चपळता, वासनेचा निर्देश करतो आणि तम हा उदासीन, अज्ञान, निष्क्रियता दर्शवितो.

**गुरू –** आध्यात्मिक शिक्षक. गुरू गीता मध्ये सतराव्या (१७ व्या) श्लोकमध्ये गुरूचे वर्णन ''अंधकार नष्ट करणारा'' असे केले आहे. (गु म्हणजे अंधकार आणि रू म्हणजे नष्ट करणारा). जरी गुरू शब्दाचा दुरूपयोग प्राय: कोणत्याही शिक्षकासाठी केला जातो. तरी (पण) सच्चा (खरा) ब्रह्मज्ञानी गुरू तोच असतो की ज्याने आपल्या आत्म – प्रभुत्वाच्या प्राप्तीमध्ये सर्वव्यापी परमतत्त्वाशी आपली एकता प्रस्थापित केली असेल. असाच सद्‌गुरू इतरांना त्यांच्या अंतरोन्मुखी आध्यात्मिक यात्रेमध्ये मार्गदर्शनासाठी योग्य असतो.

**गुरू ॐ –** हा एक मंत्र आहे की ज्याच्या साहाय्याने, गुरूच्या रूपात, अंतरात्म्याचे ध्यान केले जाते.

**गुरूकृपा –** परमेश्वराची शक्ती जी गुरूच्या अनुग्रहाने शिष्यास प्राप्त होते.

**गुरूगीता –** शिव आणि पार्वती यांच्या दरम्यान संवाद स्वरूपात हे मंत्रांचे संकलन (संग्रह) आहे. यात गुरू आणि परमात्माची एकता प्रतिपादित आहे आणि गुरूची भूमिका, गुरूचे स्वरूप, गुरू – शिष्य – संबंध, आणि गुरूध्यानाचे वर्णन आहे.

**गुरूभाव –** गुरूंमध्ये तन्मयता, गुरूंशी ऐक्य.

**चक्र –** सूक्ष्म शरीरामध्ये स्थित शक्ती (ऊर्जे)चे केंद्र. येथे नाड्या केंद्रित होतात (एकवटतात) आणि त्या

कमळाप्रमाणे दिसतात. सुषुम्ना (सूक्ष्म मध्य नाडी) मध्ये सहा चक्रे आहेत. मानव शरीरामध्ये चक्रे ज्ञानाचे केंद्र आहेत, आणि हेच केंद्र शरीराच्या सर्व नाड्यांच्या क्रियांना नियंत्रित करतात. मूलाधार चक्रामध्ये सुषुम्नाच्या खालच्या भागामध्ये सर्पाकार स्वरूपात, कुंडलिनी, सुषुप्तावस्थेमध्ये असते. योगिक क्रियांद्वारे किंवा गुरूंच्या कृपेमुळे जेव्हा ही जागृत होऊन जाते तेव्हा ती सर्व चक्रांचे भेदन (ओलांडत) करत सुषुम्नेच्याच माध्यमाने वर चढू लागते आणि शेवटी उच्चतम आध्यात्मिक केंद्र, सहस्रार, मध्ये प्रवेश करते. मुख्य चक्रे सहा आहेत. ते खालीलप्रमाणे -

१) **मूलाधार चक्र** – मेरूदंडाच्या खालच्या भागामध्ये जेथे कुंडलिनी सर्पाकार वेटोळे घेऊन स्थित असते. हे चार पाकळ्यांचे कमळ आहे.

२) **स्वाधिष्ठान चक्र** – जननेंद्रियाच्या मुळामध्ये स्थित सहा पाकळ्यांचे कमळ.

३) **मणिपूर चक्र** – नाभि (बेंबी) च्या जागी स्थित दहा पाकळ्यांचे कमळ.

४) **अनाहत चक्र** – हृदयस्थानी स्थित बारा पाकळ्यांचे कमळ.

५) **विशुद्ध चक्र** – कंठ प्रदेशामध्ये स्थित सोळा पाकळ्यांचे कमळ.

६) **आज्ञा चक्र** – भ्रूमध्यामध्ये स्थित दोन पाकळ्यांचे कमळ.

**चित्‌शक्ती (चिच्छक्ती)** – सर्वव्यापी, परमात्म्याची दिव्य शक्ती.

चिति (किंवा चित्‌शक्ती, कुंडलिनी शक्ती, कुंडलिनी, महामाया, पराशक्ती, शक्ती) – दिव्य चैतन्यशक्ती; आदि जगदंबा स्वरूपात चित्रित (वर्णित) परमात्म्याचे सृजनात्मक रूप.

**चिदाकाश** – सहस्रार आणि हृदयामध्ये चिति (जीवात्मा)चे सूक्ष्म निवास स्थान, यास चित्तमंडल पण म्हणतात.

**चिन्मुद्रा** – ध्यानावस्थेच्या वेळेस केलेली हस्तमुद्रा. यामध्ये अंगुष्ठ (आंगठा) आणि तर्जनीच्या अग्रभागांना गोलाकार स्वरूपामध्ये जोडून घेतले जाते आणि बाकीची तीन बोटे (मध्यमा, अनामिक आणि कनिष्ठिका (करंगळी) सुटी विस्तारीत राहतात. असे केल्यामुळे आत्मशक्ती (जीवनशक्ती)चा प्रवाह बाहेर जात नाही.

**छत्तीस तत्त्वे** – काश्मीर शैव मतानुसार अदृश्य परम तत्त्व छत्तीस विकास अवस्थांना ओलांडून जगत्‌मध्ये प्रकट होतो.

**जप** – मंत्रोच्चारण.

**जीवन्मुक्त** – स्थूल शरीरामध्ये असताना ज्याला मोक्ष प्राप्त झाले असेल तो.

**जीवात्मा** – जीव; प्राण्यांचे चेतन वृत्तीचे कारण – स्वरूप तत्त्व.

**तंत्र** – दैवी प्रेरणेने प्रकट झालेले धर्मग्रंथ जे शिव आणि पार्वती यांच्यामधील संवाद स्वरूपात (असल्याचे) उल्लेखित आहेत आणि ज्यामध्ये ज्ञान, ध्यान, गुरू – भक्ती आणि मोक्ष – प्राप्तीच्या क्रिया आणि अभ्यासांचे वर्णन आहे.

**तंत्र – मंत्र – उपासनाचे एक गुह्य** – गूढ (रहस्यात्मक) सिद्धान्त (पद्धती) की ज्यामध्ये कर्मकांड

(धार्मिक विधी – विधान), मंत्र, यंत्राच्या माध्यमाने, जगदंबेच्या रूपात ''शक्ती''ची पूजा अर्चना केली जाते. तंत्राचा उद्देश्य आहे. कुंडलिनी जागृत करून शिव आणि शक्ती या दोन्ही तत्त्वांचे मिलन घडवून मोक्ष प्राप्त करणे.

**तपस्या (तप)** – मनास शुद्ध करणे आणि चित्त – वृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर अभ्यास.

**तीन ग्रंथी** – सुषुम्नेमधील तीन संधी बिंदु, जेथे 'इंगला', 'पिंगला' आणि 'सुषुम्ना नाड्या एक गाठी स्वरूपात एकमेकात मिसळलेल्या असतात. या आहेत – मूलाधार चक्रामध्ये स्थित 'ब्रह्म ग्रंथी; अनाहत् चक्रामध्ये स्थित 'विष्णु ग्रंथी' आणि आज्ञा चक्रामध्ये स्थित 'रूद्र ग्रंथी.' जागृत झाल्यावर कुंडलिनी या ग्रंथींचे वेधन करीत (शुद्ध करीत) वर सहस्रारमध्ये चढते.

**तीन जगत** – धर्मग्रंथांमध्ये उल्लेखित तीन जगत आहेत – स्वर्ग, धरा (पृथ्वी) आणि पाताळ.

**तुर्यातीत** – तुरीया (सुषुप्तिच्या पलीकडील) नंतरची अवस्था. परमोल्लासाची ती अवस्था की ज्यामध्ये द्वैतभाव संपूर्णपणे नष्ट होऊन जातो आणि याची जाणीव निर्माण होते की समस्त प्राण्यांमध्ये एकच आत्मा वास करतो. (राहतो, असतो.)

**दत्तात्रेय** – एक ईश्वरीय अवतार ज्यास अवधूत मुकुटपणी म्हटले जाते आणि त्यांचा आदर परम – गुरू स्वरूपात केला जातो.

**दिव्य चक्षु** – भ्रमध्याच्या कूटस्थ केंद्रामध्ये स्थित अंतर्ज्ञान आणि आत्मिक अनुभूतीचे एकमात्र नेत्र; चेतनेच्या उच्चतर अवस्थेमध्ये जाण्याचे प्रवेश–द्वार. गहन ध्यानावस्थेमध्ये हे एकमात्र नेत्र किंवा दिव्य चक्षु एक उज्ज्वल ताऱ्याच्या स्वरूपामध्ये दृष्टीगोचट होते. हा तारा निळा प्रकारागोलाने घेरलेला (आवेष्टीत) असतो, आणि निळा प्रकाशगोलक एक देदिप्यमान स्वर्णिम प्रकाशवलयाने आवेष्टीत असतो. या स्वर्णदर्शीनन्वेत्राचा उल्लेख शास्त्रांमध्ये विविध नावांनी केला गेला आहे. जसे – तृतीय नेत्र, पूर्वेकडचा तारा, अंत:चक्षु, स्वर्गातून उतरणारा कपोत, शिवचे तृतीय नेत्र, अंतर्ज्ञान चक्षु. ''म्हणून जर तुमचा डोळा एक असेल तर तुमचे संपूर्ण शरीर प्रकाशाने भरून जाईल.'' (बायबल : मत्ती रचित सुसमाचार ६:२२).

**धर्म** – नित्य नियम, सत्यनिष्ठ जीवनाचे विधान.

**ध्यान** – मनामध्ये स्थापित करणे. चित्ताची एकाग्रता चित्तास एकाग्र करून कुठल्या तरी स्थळी एकवटण्याची क्रिया. हा योगच्या आठ अंगांपैकी सातवा अंग आहे. हे धारणा आणि समाधीची मधली अवस्था आहे.

**नटराज** – ज्यांना नटवर (नृत्यमग्न शिव) म्हणून संबोधले जाते. त्या भगवान शिवसाठी प्रयुक्त एक विशेषण / उपाधी (पदवी) आहे. जीवात्म्यास मायाजालपासून मुक्त करविणे – सुटका करणेच त्यांच्या नृत्याचे उद्देश आहे. जगतमध्ये व्याप्त समस्त क्रीडा अर्थात् लीला शिवचे तांडव आहे. जगताची सर्व चंचलता त्यांचेच नृत्य आहे. तेच सृष्टीचे निर्माणकर्ता आहेत आणि वेळ आल्यावर तेच संसार उद्ध्वस्त करण्यासाठी नटराज स्वरूपामध्ये तांडव करतात.

**नाडी** – शरीरामधील प्राण–धारक शक्तीच्या ७२,००० धमन्या.

**नाद** – दैवी गायन किंवा शब्द जे ध्यानाच्या उच्चतम अवस्थेमध्ये ऐकू येते.

**निर्गुण** – गुणरहित; परमेश्वराचे निराकार रूप.

**निर्विकल्प** – समाधीची सर्वोच्च अवस्था; विचार - शून्य, निर्गुण आणि अपरिभाष्य. निर्विकल्प समाधीमध्ये ज्ञेय, ज्ञान आणि ज्ञाता यामध्ये काहीच फरक राहत नाही.

**नऊ द्वार** – शरीराची नऊ (९) द्वारे - डोळे (२), कान (२), नाक (नाकपुड्या २), तोंड (१), गुदा (गुदद्वार १) आणि जननेंद्रिय (१). (२+२+२+१+१+१ = ९).

**पंचमहाभूत** – पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश हेच पाच जगताचे आधारतत्त्व आहेत.

**पंच आवरण (कोश)** – मानव शरीरामध्ये स्थित आत्म्याची पाच आवरणे. (कोश). हे आवरणच प्रत्येक व्यक्तीच्या जीवात्मा शक्तीची प्रकृति आणि स्वरूपाचे आधार आहेत. ते ते असे –

१) **अन्नमय कोश** – अन्न आवरण. जे स्थूल तत्त्वांनी निर्मित स्थूल शरीराचे आधार आहे.

२) **प्राणमय कोश** – पाचही प्राण - वायु आणि पाच कर्मेंद्रिये अर्थात वाणी, हात, पाय, गुदा आणि उपस्थ.

३) **मनोमय कोश** – मन आणि पाच ज्ञानेंद्रिये.

४) **विज्ञानमय कोश** – प्रज्ञा.

५) **आनंदमय कोश** – आनंदावरण.

**पद्मासन** – (शब्दश: अर्थ - कमळाप्रमाणे बसणे.); ध्यानासाठी सर्वश्रेष्ठ आसन. हे आसन कमर सरळ ठेवून, जमीनीवर बसून आणि उजवे पाय डाव्या जांघेवर आणि डावे पाय उजव्या जांघेवर ठेवून किंवा याच्या विरोधी (विपरीत) स्वरूपात केले जाते. दोन्ही हात चिन्मुद्रेमध्ये गुडघ्यावर ठेवले जाऊ शकतात.

**परमहंस** – ईश्वराशी अखंड एकरूपतेची सर्वोच्च अवस्था प्राप्त करून घेणाऱ्या मनुष्यासाठी उपयोगामध्ये आणली जाणारी आध्यात्मिक पदवी. ही पदवी एखाद्या सुयोग्य शिष्यास एक सद्‌गुरूच प्रदान करू शकतो. श्री योगानंद यांना ही पदवी स्वामी श्रीयुक्तेश्वर यांनी इ. स. १९३५ मध्ये प्रदान केली होती.

**पराशक्ती** – गतिशील आणि सृजनात्मक शक्ती स्वरूपातील परब्रह्म.

**परशिव** – देवाधि - देव; परम गुरू.

**पारस** – एक काल्पनिक दगड ज्याविषयी ही गोष्ट प्रसिद्ध आहे की जर लोखंड त्याला स्पर्श केले तर ते सोने बनून जाते.

**पुनर्जन्म** – कर्म सिद्धांतानुसार मानवांचे विगत कर्मांचे परिणाम या भौतिक जगामध्ये परत येतात. त्या विगत कर्मांचे परिणाम भोगण्यासाठी आणि शेवटी आत्म्याची अंतर्निहित परिपूर्णता आणि त्याची ईश्वराशी एकरूपतेच्या ज्ञानापर्यंत पोहोचविणारी आध्यात्मिक क्रम विकासाच्या प्रक्रियेस निरंतर सुरू ठेवण्यासाठी मानव जन्म - मृत्यूच्या फेऱ्यापासून (चक्रापासून) वारंवार जात असताना वारंवार या जगतांमध्ये येत असतात.

**पुराण** – (शब्दशः अर्थ – प्राचीन कथा) एकूण अठरा (१८) पुराण अथवा धर्मग्रंथ आहेत की ज्यामध्ये सृष्टी, भगवदावतार संबंधी कथा, गोष्टी, भजन इत्यादींचे संग्रह आहे आणि अनेक देवतांचे उपदेश व प्राचीन ऋषी, राजा यांचे आध्यात्मिक वृत्तांत आहेत.

**पुरुष** – आत्मा, शरीरामधील स्थित परमात्म्याचे स्वरूप.

**प्रकृती** – प्रमुख शक्ती; निसर्ग, सांख्य मतानुसार ती मूलशक्ती की जिचे भौतिक जगत् हे विस्तार आहे.

**प्रणव** – स्वरध्वनी – विशिष्ट गुह्य शब्द ॐ चे पर्याय.

**प्रत्यभिज्ञाहृदयम्** – (शब्दशः अर्थ – स्मृतीच्या साहाय्याने उत्पन्न होणारे ज्ञानसंबंधी मताचा मुख्य भाग – अंग) क्षेमराज द्वारा लिखित वीस सूत्रांचे एक संक्षिप्त तत्त्वज्ञान. यामध्ये काश्मीर शैव मताचे प्रत्यभिज्ञ दर्शनाचे – तत्त्वज्ञानाचे सार दिले गेले आहे. यानुसार मनुष्य आपल्या शरीरासच आत्मा समजून आपल्या वास्तविक स्वरूपास विसरून गेलेला आहे. आपल्या वास्तविक (सत्य) स्वरूपास ओळखण्याची क्रियाच ''मोक्ष'' आहे. या सूत्रांची व्याख्या स्वामी मुक्तानंद द्वारा त्यांचे पुस्तक ''सिद्ध मेडिटेशन'' यामध्ये केली गेली आहे.

**प्राणायाम** – प्राणाचे नियमन आणि त्यास आपल्या नियंत्रण – वशमध्ये ठेवणे.

**बंध** – (शाद्बीक अर्थ – बंधन); हठयोगच्या क्रियांचा एक अंग. यांचे प्राणायाम (श्वास क्रियां)शी अभ्यास हा प्राण व अपान (श्वास व प्रश्वास (उच्छ्वास) यांच्या समन्वयासाठी सहाय्यक होते. मुद्रांच्या अभ्यासाच्या वेळी प्राणास शरीराच्या आत मध्येच ठेवण्यामध्ये पण हे सहाय्यक होतात. जालंधर, मूल आणि उड्डियात हे तीन मुख्य बंध आहेत.

**बीजमंत्र** – संस्कृत भाषेची प्राकृतिक ध्वनी जिचे उच्चारण, निरंतर जप, ती वस्तू, देवता अथवा स्थिती (अवस्था)स, प्रत्यक्ष रूप प्रदान करते. त्याच हेतुने असे केले जाते. यास 'बीज अक्षर' पण म्हणतात.

**ब्रह्मचैतन्य** – परब्रह्म; सृष्टीपलीकडील चैतन्य. या संज्ञेचा उपयोग समाधीची ती अवस्था संकेत करण्यासाठी पण केला जातो की ज्यामध्ये स्पंदनात्मक सृष्टीमध्ये व्याप्त आणि सृष्टीपासून अतीत अशा ईश्वराशी तद्रूपता प्रस्थापित होऊन जाते.

**ब्रह्मभाव** – परम सत्याशी एकाकार होणे.

**ब्रह्म मुहूर्त** – प्रातःकालचा तीन वाजल्यापासून ते सहा वाजेपर्यंतची वेळ. ही वेळ ध्यान आणि पूजेसाठी सर्वोत्तम समजले जाते.

**ब्रह्मरंध्र** – (शब्दशः अर्थ – ब्रह्माचे छिद्र); मेंदूंच्या मध्यभागी स्थित एक सूक्ष्म केंद्र. अशी मान्यता आहे की जर प्राण या छिद्रापासून उत्क्रमित झाले तर ब्रह्म लोकाची व्याप्ती होते. ''सहस्रार'' ब्रह्मरंध्रमध्येच स्थित आहे.

**ब्रह्मा** – याला जगतचा निर्माता म्हटले जाते. हिंदू 'त्रिक' चे ज्या तीन देवतांना मानवरूप दिले गेले आहे. त्यापैकी हा एक आहे. इतर दोन आहेत – विष्णू. जगाचे पालन कर्ता आणि शिव संहारक आहेत.

**ब्रह्म** – जगतचे परम सत्य अथवा सर्वव्यापी मूल तत्त्व. ब्रह्मच्या प्रकृतीचे वर्णन उपनिषदांमध्ये आणि वेदांत दर्शनामध्ये सत् (मूल तत्त्व, जीवनशक्ती), चित् (परम ज्ञान) आणि आनंद (परमोल्लास) स्वरूपात केले गेले आहे.

**भक्त** – एक उपासक, भगवंताचा प्रेमी; भक्ती योग (प्रेम व भक्तीमार्ग)चा एक शिष्य.

**भक्ती** – (भक्ति योग) – भगवत् प्राप्तीचा भक्ती मार्ग – भगवंत अथवा गुरूंच्या प्रती असीम प्रेमाची स्थिती.

**भगवान (भगवंत)** – परमात्मा; संत महात्म्यांना संबोधित करण्याचा एक शब्द. याचे तात्पर्य आहे – गौरवपूर्ण, दिव्य, आदरणीय आणि पवित्र.

**भाग्य किंवा कर्म** – या जन्माचे किंवा मागील जन्मांचे विगत कर्मांचे परिणाम. कर्म सिद्धांत हा क्रिया आणि प्रतिक्रिया, कारण आणि परिणाम, पेरणे आणि उगवणे याचे नाव आहे. आपले विचार आणि कर्मांनी मानव हा आपल्या भाग्याचा विधाता स्वतःच बनतो. एखाद्या व्यक्तीने ज्या शक्तींना जाणते – अजाणतेपणे, बुद्धीमानी पद्धतीने किंवा मूर्खपणाने गती दिली असेल, त्या शक्तींना त्याच व्यक्तीपाशी, आरंभ बिंदू असल्यामुळे, अपरिहार्यपणे पूर्ण होणाऱ्या गोलाकार चक्राप्रमाणे, परतून यावेच लागेल किंवा नाही तर जोपर्यंत ती व्यक्ती आध्यात्मिक उन्नतीद्वारे त्यांच्या कचाट्यातून बाहेर पडत नाही.

**भारतीय तत्त्वज्ञानाचे सहा संप्रदाय (पंथ)** – वेदांवर आधारित तत्त्वज्ञानाचे सहा संप्रदाय पुढीलप्रमाणे आहेत –

१) **न्याय** – गौतम मुनिद्वारा प्रस्थापित दर्शन (पंथ). यामध्ये तथ्यांचे प्रमाण तर्क – वितर्कावर आधारलेले असतात.

२) **वैशेषिक** – महर्षी कणाद द्वारा उल्लेखित दर्शन (तत्त्वज्ञान). याच्या अनुसार जीवनाचे आधार नऊ मुख्य तथ्यांना समजून घेतल्यानंतरच सत्याचे ज्ञान होऊ शकते.

३) **सांख्य** – कपिलमुनिद्वारा प्रतिपादन तत्त्वज्ञान. या तत्त्वज्ञानाची अशी मान्यता आहे की समस्त जगत फक्त दोन परम सत्यांवर आधारित आहे. (१) ''पुरुष'' आणि (२) ''प्रकृती''.

४) **योग** – 'योग सूत्रां'मध्ये, पतंजलि द्वारा प्रतिपादित तत्त्वज्ञान, ज्यामध्ये अष्टांग योग द्वारा चित्तास एकाग्र करून ईश्वरामध्ये लीन (ब्रह्म-लीन) होऊन जाण्याचे विधान आहे.

५) **पूर्व मीमांसा** – जैमिनीकृत एक तत्त्वज्ञान. यामध्ये हे सिद्ध केले गेले आहे की वेदांमध्ये निर्धारित कर्मकांडामुळे कशा प्रकारे मोक्ष प्राप्त होऊ शकते.

६) **उत्तर मीमांसा किंवा वेदान्त** – बादरायण द्वारा प्रतिपादित तत्त्वज्ञान. यामध्ये उपनिषेदांचे संकलन आहे. या तत्त्वज्ञाना (दर्शन) मध्ये अद्वैत आत्मा आणि परमात्मा यांच्या एकतेवर जोर दिले गेले आहे.

**भाव** – मनोभाव; लीनता अथवा अभिन्नतेचा आभास (बोध); आध्यात्मिक दृष्टीकोण.

**भुजंगिनी मुद्रा** – हठयोगची एक क्रिया. याला ''सर्प – मुद्रा'' म्हणतात. या मुद्रेमध्ये श्वास हा कंठ स्त्रोता (गळ्या) मधून घेतला जातो आणि याच्या अभ्यासामुळे पोटाचे विकार नाहीसे होऊन जातात.

**मंत्र –** जगदाधार गुह्यध्वनी, शब्द ब्रह्म; शक्तीशाली अक्षर वा वर्ण – समुदाय की ज्यांचे जप किंवा मनन केल्यामुळे आत्म – दर्शन अथवा एखादी इच्छित वस्तू वा स्थितीची प्राप्ती शक्य आहे. मंत्र हा जप करणाऱ्याचे रक्षण करतो – 'मंत्रा: मननत्राणरूपा:।' मंत्रास आत्मसात करून जपले पाहिजे. जप केले पाहिजे.

**मंडलेश्वर –** एखाद्या आश्रमाचा प्रमुख किंवा मठाधीश असलेला प्रख्यात आणि सर्वमान्य संन्यासी. याला विशिष्ट क्षेत्राच्या संन्यासियांवर अधिपत्य प्राप्त असते. एखाद्या विख्यात संन्याशाला दिली गेलेली उपाधि (पदवी).

**महादेव –** (शब्दश: अर्थ – महान देवता); परम शिवचे एक नाव.

**महाभारत –** व्यासमुनिद्वारा रचित महाकाव्य. यामध्ये राज्यासाठी कौरव – पांडव बंधुंमध्ये झालेल्या. संघर्ष – युद्धाचे उल्लेख आहे. जसजशे याच्या बृहत् कथेचे अनावरण होते, तसतशे आमच्या समोर भारतीय संस्कृती, धर्म निरपेक्षता आणि धार्मिकतेचे एक महान भंडार उघडले जाते. ''भगवद् गीता'' महाभारताच्या शेवटच्या भागात येते.

**महामाया –** (शब्दश: अर्थ – मोठे भ्रम); शक्तीचे एक नाव.

**महेश –** शिवचे एक नाव.

**माया –** ती शक्ती जे असत्‌ला सत्य स्वरूपात दर्शविते आणि क्षण – भंगुरास अजर – अमर असल्याचे आभासित करते. ती भ्रांतिकारक शक्ती जे प्रकट अनेकतेद्वारे आत्म्याच्या शुद्ध स्वरूपावर आवरण टाकून (ते झाकून टाकते) की ज्यामुळे सत् हे असत् वाटते आणि असत् हे सत् असल्याचे भासते.

सृष्टीच्या रचनेमध्ये अंतर्निहित एक भ्रम उत्पन्न करणारी शक्ती, जिच्यामुळे एक परमात्मा हा अनेक रूपांमध्ये प्रतीत होतो. माया सापेक्षता वा परस्पर – संबद्धता, विपर्यास, परस्पर भेद, परस्पर – विपरीत अवस्थांचे तत्त्व आहे. यालाच बायबलच्या पूर्वविधानामध्ये 'शैतान' म्हटले गेले आहे. परमहंस योगानंद लिहितात : ''संस्कृतमध्ये माया शब्दाचा अर्थ आहे 'परिमाप करणारा किंवा मापणारा.' माया सृष्टीमधील एक विलक्षण शक्ती आहे की जिच्यामुळे अपरिमेय आणि अभेदामध्ये परिमितता आणि भेदाच्या विद्यमानतेचे स्पष्ट आभास होते... ईश्वराची योजना आणि लीलेमध्ये माया किंवा शैतानचे एकमेव कार्य आहे मनुष्याला ब्रह्मपासून जड पदार्थाकडे, सत्यपासून मिथ्याकडे वळविण्याचे प्रयत्न करणे... माया प्रकृतिमध्ये असारतेचा पडदा आहे... असा पडदा जो प्रत्येक मनुष्यास त्याच्या मागे लपलेले सृष्टा, अपरिवर्तनीय सनातन सत्याचे दर्शन करण्यासाठी दूर सारलेच (वर उठविलेच) पाहिजे.''

**मुक्ती –** आवागमनपासून सुटका; परम चैतन्याशी एकाकारची स्थिती.

**मुद्रा –** (१) हठयोगमधील उच्चकोटीच्या विभिन्न प्रक्रिया की ज्यांच्या अभ्यासामुळे प्राणास शरीरामध्ये बांधून (बद्ध करून) ठेवले जाते; परिणामी कुंडलिनी सुषुम्नेमध्ये प्रवाहित होण्यासाठी बाध्य होते. कधी – कधी या क्रिया शक्तिपातासोबतच होऊ लागतात. (२) सांकेतिक हाव – भाव आणि हातांचे संचलन की जे आमच्या आंतरिक अवस्थांना अभिव्यक्त करतात अथवा ज्यांचे विभिन्न अर्थ होतात.

जसे – दान, ज्ञान आणि निर्भयता. अनेक देवी – देवता, संत आणि मूर्तींना, अभयदान देत असल्याचे, या मुद्रांसोबत दाखविले जाते.

**मूलाधार चक्र –** हे चक्र मेरूदंडाचया खालच्या टोकावर स्थित आहे. कुंडलिनी येथेच सुषुप्तावस्थेमध्ये सर्पाकार स्वरूपामध्ये असते. मूलाधारच्या आपल्या या स्थानापासून कुंडलिनी समस्त शारीरिक क्रियांना ७२,००० नाडी – जालाच्या माध्यमाने नियंत्रित करीत असते.

**यमराज –** मृत्यूचे देवता; यमांचा राजा, धर्म – राज, जो मृत्यूनंतर जीवांच्या कर्मांनुसार दंड किंवा उत्तम फल देतो.

**यक्ष –** एक प्रकारचे मध्यम कोटीचे देवता ज्यांचे राजा कुबेर, धन – वैभवाचे स्वामी आहेत.

**योग –** (शब्दश; अर्थ – मिलन, जुडणे) आत्म्याची परमात्म्यामध्ये विलीन होऊन जाण्याची स्थिती. अशी स्थिती प्राप्त करण्यासाठी (केल्या जाणाऱ्या) क्रिया. 'योग' (संस्कृत 'युज्'पासून व्युत्पन्न) शब्दाचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्याशी मिलन, संयोग, सायुज्यता. या ध्येयास प्राप्त करण्यासाठी ज्या विधी किंवा प्रक्रिया प्रयोगात आणल्या जातात त्यांना पण योग म्हटले जाते. योगच्या विभिन्न प्रणाली आहेत. ज्या प्रणालीचे शिक्षण परमहंस योगानंद यांनी दिले ते राजयोग किंवा संपूर्ण योग आहे. हे मुख्यत: ध्यानाच्या वैज्ञानिक प्रविधींवर केंद्रीत आहे. योगचे प्रथम व्याख्याता महर्षी पतंजलि यांनी आपल्या अष्टांग योगमध्ये आठ अंगांना क्रमबद्ध केले आहे. याच्या अभ्यासामुळे राजयोगी हा समाधी किंवा ईश्वर – सायुज्यता प्राप्त करतो. हे आठ अंग आहेत – (१) यम, (२) नियम्, (३) आसन, (४) प्राणायाम, (५) प्रत्याहार, (६) धारणा, (७) ध्यान आणि (८) समाधी.

योगाचे आठ अंग (किंवा अष्टांगयोग; राजयोग) – पतंजलिद्वारा "योगसूत्र" मध्ये प्रतिपादित अष्टांग / अष्टांगी योग. हे 'सूत्र' राजयोगावरील एक अधिकारिक ग्रंथ आहे. या योगाच्या क्रियांचे आठ भेद आहेत–

१) **यम –** पाच नैतिक सदाचार / सद्गुणांचा अभ्यास – सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह.

२) **नियम –** पाच नित्य कर्मांचा अभ्यास – शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर – प्रणिधान.

३) **आसन –** बसण्या (बैठकी)ची मुद्रा (स्थिर स्वरूपात, न थकता, सुख – शांतीपूर्वक समाधानाने अभिष्ट वेळपर्यंत बसून राहणे)

४) **प्राणायाम –** प्राणांना साध्य करणे – नियमित आणि नियंत्रणा (वश) मध्ये ठेवणे.

५) **प्रत्याहार –** मनास विषयांपासून परावृत्त करणे.

६) **धारणा –** एकाग्रता, विचार, कोणत्या तरी वस्तू (गोष्टी) वर मनास केंद्रीत करणे.

७) **ध्यान** – साधना, एखाद्या लक्षित वस्तूकडेच (गोष्टीकडेच) विचारांचा धारावाहिक प्रवाह.

८) **समाधि –** लक्षित पदार्थ (गोष्ट) / वस्तु मात्रामध्ये संपूर्णपणे लीन होऊन जाणे अथवा तिच्याशी ऐक्य; ध्यानामध्ये परमात्म्याशी मिलन.

**योग शिक्षा उपनिषद्** – योगाशी संबंधित सर्व उपनिषदांमधील एक. यामध्ये सर्व दृष्टीकोणांनी ज्ञानमार्गाचे वर्णन आहे. हा योग ज्ञान – प्राप्तीमध्ये कशा प्रकारे सहाय्यक आहे, याचा उल्लेख या उपनिषदामध्ये आहे.

**योगिनी** – योगाचा अभ्यास करणारी महिला.

**योगी** – ती व्यक्ती जी योगचा अभ्यास करते; ती व्यक्ती जिने योगिक क्रियांचे लक्ष्य प्राप्त केलेले असेल.

**राजयोग** – अष्टांगयोगाचेच दुसरे नाव राजयोग आहे.

**रामायण** – (शब्दशः अर्थ – रामाची कथा). ऋषी वाल्मिकी यांनी लिहिलेले प्राचीनतम् महाकाव्य रामायणामध्ये भगवान विष्णुचे सातवे अवतार श्रीराम यांच्या जीवनाची गोष्ट (कथा) सांगितली गेली आहे आणि त्यांच्या शौर्याचे वर्णन आहे.

**रूद्र** – शिवचे एक नाव.

**रूद्रहृदय उपनिषद्** – शैव उपनिषदांपैकी एक. याच्या अनुसार शिव आणि परमात्मा एकच आहेत.

**लोक** – (शब्दशः अर्थ – संसार) – स्थूल किंवा सूक्ष्म – जगत.

**व्यास** – प्राचीन काळातील एक महान ऋषि. हे वेद आणि पुराणांचे संकलनकर्ता आणि ''महाभारत''चे रचनाकार होते. शुक्र मुनिंचे हे पिता (वडील) होते.

**वसुगुप्ताचार्य** – (नौवे शतक) एक ऋषि होते. यांच्यासमोर भगवान शिव यांनी ''शिवसूत्रां''ना प्रकट केले.

**विठ्ठल** – (शब्दशः अर्थ – विटांची जागा (स्थळ) – भगवंत श्रीकृष्ण एकदा पुंडलिक याच्या घरी गेले. पुंडलिक हे आपले वृद्ध माता – पिता यांची सेवा करीत होते. त्यांनी एक वीट पुढे सरकवून त्यावर उभे राहून वाट पाहण्याचा आग्रह भगवंताला केले. विटेवर उभे राहिलेले भगवंत श्रीकृष्णच्या या रूपास ''विठ्ठल'' म्हणतात. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध तीर्थस्थान, पंढरपूरच्या मंदिरामध्ये भगवान श्रीकृष्णाची या स्वरूपामध्ये मूर्ति स्थापित आहे आणि महाराष्ट्र व कर्नाटकचे संत कवी यास पूज्य मानतात.

**विष्णु** – पौराणिक (हिंदू) त्रिक (त्रिमूर्ति) देवतांपैकी एक जे सृष्टीचे पालनकर्ता आहेत. वैष्णवांचे देवता. मानव स्वरूपात यांना शंख, चक्र, पद्म, गदाधारी चर्तुभुज स्वरूपात दर्शविण्यात येते. यांचे वर्ण (रंग) निळे–सावळे (नील–श्याम) आहे. जेव्हा जेव्हा धर्माची हानि होते. अथवा जेव्हा सर्वत्र (चारी दिशांना) दुष्टता आणि कलह – दुःख व्याप्त होऊन जाते. तेव्हा मानव आणि देवता यांच्या रक्षणार्थ आणि धर्म व न्याय प्रस्थापित करण्यासाठी पृथ्वीतळावर मानव स्वरूपात हे अवतरित होतात. (अवतार धारण करतात) आजपर्यंत जगामध्ये दहा अवतार झाले आहेत, यापैकी श्रीराम आणि श्रीकृष्ण प्रमुख आहेत.

**वेद** – आर्यांचे प्राचीन, प्रामाणिक, सर्वमान्य चार धार्मिक ग्रंथ. अशी मान्यता आहे की स्वतः परमेश्वराने यांना प्रकट केले आहे. हे देवतांचे स्तोत्र, वंदना, यज्ञ, धार्मिक आणि सामाजिक जीवनाचे विधान, आराधना, यज्ञासंबंधी नियम आणि प्राचीन ऋषींनी दिलेले उपदेश यांचे संग्रह आहेत.

**वेदांत** – (शब्दशः अर्थ – वेदांचा अंत). भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा संप्रदायांपैकी एक. यालाच उत्तर मीमांसा पण म्हणतात. यामध्ये उपनिषदांचे दार्शनिक उपदेशांचे संकलन आहे. वेदांतामध्ये अद्वैत आत्मा आणि परमात्म्याच्या एकतेवर भर आहे.

**वैकुंठ** – भगवान विष्णूचे निवास स्थान.

**वैष्णव –** विष्णु संबंधी; विष्णुची उपासना करणारे. हिंदूंचे एक प्रसिद्ध धार्मिक संप्रदाय. या संप्रदायाचे लोक विष्णुची उपासना करतात आणि विशेष आचार – विचार बाळगतात. (पाळतात)

**शक्ति –** (किंवा चिति, कुंडलिनी, कुंडलिनी शक्ती) – बळ, ताकद; विश्वमयी दैवी शक्ती जी जगतास निर्माण करणारी, पालन पोषण करणारी आणि संहार करणारी आहे; शिवची अर्धांगिणी.

**शक्तिपात –** सद्‌गुरूद्वारा आध्यात्मिक शक्तीचे शिष्यामध्ये प्रवेश करविणे; कृपेद्वारा आध्यात्मिक जागृती. ती प्रक्रिया जेव्हा सिद्धगुरू आपल्या कृपेद्वारे आपल्या शक्तीस शिष्यामध्ये प्रविष्ट करवितात आणि त्याच्या प्रसुप्त कुंडलिनी शक्तीस जागृत करून सोडतात. ही दैवी प्रक्रिया प्राय: दृष्टी, स्पर्श, शब्द अथवा संकल्प द्वारा पूर्ण केली जाते.

**शब्द ब्रह्म –** ॐ तो आदि परम शब्द की ज्यामुळे संपूर्ण सृष्टीचे प्रादुर्भाव झाले.

**शरीराचे सात तंतु –** लसिका (शरीरस्थ वर्णहीन तरल पदार्थ), मांस, अस्थि, रक्त, मज्जा, वीर्य, वसा (मेद, चरबी).

**शांडिल्य –** भक्तीवर ''शांडिल्य भक्ती सूत्र'' लिहिणारे एक प्राचीन मुनि.

**शांभवी मुद्रा –** अनायास समाधीची ती अवस्था की ज्यामध्ये डोळे अंतरात्म्यावर केंद्रित होऊन जातात जरी ते अर्धे उघडे असले तरी. परम शिवची स्थिती.

**शिव –** सर्वव्यापी परम सत्याचे एक नाव, सृष्टीचे संहारकर्ता, ईश्वर स्वरूपातील पौराणिक (हिंदू) त्रिमूर्ती देवतांपैकी एक; शैवांची देवता. मानव स्वरूपामध्ये मृगचर्म नेसलेले आणि एक त्रिशूल घेतलेले योगी, ज्यांचा गळा आणि हातांमध्ये सर्प वेटोळे घेतलेल्या स्वरूपात दाखविले जाते.

**शिव कवच –** भगवान शिवचे पूज्य मंत्रांचा समूह की ज्यांच्याद्वारे त्यांचे (शिवचे) संरक्षण होते.

**शिवची सेना –** भगवान शिव यांच्या सेवेमध्ये असलेले विचित्र जीव, गण, भूत – प्रेत आणि दानव – रूपी जीव – जंतू.

**शिवलिंग –** भगवान शिवचे पिंड. यामुळे ईश्वराचे व्यक्ती – विहित रूप दर्शित होते.

**शिव संहिता –** योगवरील एक संस्कृत ग्रंथ. यामध्ये जगत आणि मानव शरीर यांच्या समन्वयाची व्याख्या केली गेली आहे आणि कुंडलिनी जागृतीच्या उद्देशाने आसन, प्राणायाम आणि मुद्रा यांच्या अभ्यासाचे निरूपण केले गेले आहे.

**शिवसूत्र –** एक संस्कृत ग्रंथ. स्वत: भगवान शिव यांनी हा ग्रंथ ऋषि वसुगुप्ताचार्य यांच्या समक्ष प्रकट केले होते. यामध्ये सत्याहत्तर (७७) सूत्रे आहेत. काश्मीरमध्ये एक शिळेवर कोरलेल्या स्वरूपामध्ये हे आढळले होते. काश्मीर शैव मतावरील हा एक अधिकाधिक ग्रंथ आहे.

**शिवोहम् –** हा एक मंत्र असून याचे अर्थ आहे ''मी शिव आहे.''

**शेष –** दैवी सर्पराज, ज्याच्या फण्यावर, प्राचीन मतानुसार, पृथ्वी स्थिर आहे.

**शैवमत –** परमेश्वर स्वरूपात शिवची आराधना; ते दार्शनिक संप्रदाय (पंथ) की ज्याच्या मते सत्याचे स्वरूप सर्वव्यापी शिवच आहे. हे शुद्धाद्वैत (शुद्ध अद्वैत) दर्शन आहे. या मतानुसार एकच परम, अद्वितीय, स्वतंत्र चिति शक्तीद्वारे संपूर्ण विश्व सृजित आणि व्याप्त आहे आणि तो परम आत्मा विभिन्न रूप – आकारांमध्ये प्रकट होऊन सृष्टी, स्थिती, प्रलयादी व्यापारांना संपन्न करतो.

**शौनिक –** वेदांवर भाष्य लिहिणारे प्राचीन काळचे ऋषि.

**षट्चक्र –** मेरूदंडात असलेले सहा सूक्ष्म शक्ति केंद्र – मूलाधार, मणिपूर, स्वाधिष्ठान, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञा. जेव्हा कुंडलिनी जागृत होते. तेव्हा या चक्रांना शुद्ध करीत, सहस्रार स्थित सहस्रदक कमळामध्ये, परम शिव मध्ये, लय होऊन जाते.

**सच्चिदानंद –** परम सत्याची प्रकृति – सत्, चित् आणि आनंदाने युक्त. सत् परमात्मा असून ते सदैव, सर्वत्र आणि सर्व वस्तूंमध्ये असते; चित् सर्व वस्तुमात्रांना प्रकाशित करते आणि आनंद परम सुख आहे – अर्थात् परमात्मा, ईश्वर.

**सत्संग –** पौराणिक ग्रंथांचे श्रवण करणे, भजन – कीर्तन करणे अथवा एखाद्या महात्म्याचे दर्शन करण्याच्या हेतूने भक्तांचे संमेलन. संत – भक्तांची मंडळी, यांच्या संनिद्ध राहणे, त्यांच्या सहवासात राहणे.

**सद्‌गुरू –** सत्य गुरू; सिद्ध गुरू.

**संन्यास –** परंपरेनुसार स्मृतींमध्ये वर्णित हिंदूंच्या जीवन पद्धतीच्या चार वर्णाश्रमपैकी एक आश्रम.

**चार वर्णाश्रम आहेत –** १. ब्रह्मचर्य आश्रम, २. गृहस्थ आश्रम, ३. वानप्रस्थ आश्रम व ४. संन्यास आश्रम. संसाराच्या माया जालपासून विभक्त होण्याची अवस्था.

**संन्यासी –** संसार त्याग केलेला आणि विरागी (बैरागी) झालेला एक तपस्वी.

**समाधी –** ध्यानमध्ये परमेश्वराशी मिलनाची अवस्था. हे योगचे आठवे अंग आहे. आत्मिक परमानंद; अधिचेतन अनुभव; शेवटी सर्वव्यापी परम सत्य स्वरूपामध्ये ईश्वराशी सायुज्ता.

**समाधी कुटी –** एखाद्या महान संताने महासमाधी घेतलेले स्थळ. एखाद्या महान संताने समाधी घेतलेले ते स्थळ की जे त्या संताच्या आत्मशक्तीमुळे सदैव जागृत असते.

**सहज –** प्राकृतिक, स्वाभाविक; जे स्वत: आपोआप हृदयामध्ये उत्पन्न होते.

**सहजावस्था –** 'सर्वत्र एकच आत्मा व्याप्त होऊन राहिला आहे,' असे समजून चित्तवृत्तीचे विकाररहित होऊन जाणेच सहजावस्था आहे.

**सहस्रार –** ब्रह्मरंध्रामधील मुख्य आध्यात्मिक केंद्र अथवा सहस्र – दल – कमल. हे भगवान शिव, परम गुरू यांचे निवास स्थान आहे. जेव्हा सहस्रारमध्ये कुंडलिनी शक्ती आणि शिव यांचे मिलन होते तेव्हा योग्यास आत्मसाक्षात्काराची स्थिती प्राप्त होते.

**सात संत मुनि –** १. अत्रेय, २. वशिष्ठ, ३. भरद्वाज, ४. कश्यप, ५. विश्वामित्र, ६. गौतम आणि ७. जमदग्नि हे सात संत मुनि आहेत. प्रत्येक संसार चक्रामध्ये सात संत मुनींचा प्रादुर्भाव होतो.

**स्थितप्रज्ञ –** सुख – दु:खादी सर्व विकारांच्या पलीकडे असलेल्या एक आत्मदर्शीची अंतर्स्थिती.

**सिद्ध –** पूर्णता प्राप्त झालेला असा योगी; तो ज्याने योग किंवा तपाद्वारे परमात्म्याशी एकात्म भावाची स्थिती प्राप्त केली असेल. आत्मसाक्षात्कारी.

**सिद्धयोग –** सद्‌गुरूंच्या कृपेद्वारे कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यानंतर स्वत: संचालित योग. याला महायोग पण म्हणतात कारण की यामध्ये (इतर) सर्व योग समाविष्ट आहेत.

**सिद्धारूढ स्वामी –** कर्नाटक राज्यामधील हुबळी येथील एक संत. यांच्या आश्रमामध्ये काही दिवस स्वामी मुक्तानंद यांचा मुक्काम होता.

**सिद्धासन –** (शब्दशः अर्थ – पूर्ण मुद्रा); ध्यानासाठी मुद्रा (आसन). सरळ ताठ बसून एका पायाची टाच गुदा आणि अंड – कोष यांच्या दरम्यान ठेवून दुसऱ्या पायाची टाच जननेंद्रियाच्या मुळाच्या वरच्या भागावर दुसऱ्या गुडघ्यावर अशा प्रकारे ठेवावे की ते एक दुसऱ्यास स्पर्श करतील, अशा प्रकारे हा आसन केला जातो.

**सिद्धी –** मंत्र जप, ध्यान आणि अन्य अभ्यासांनी प्राप्त अलौकिक शक्ती. मुख्य सिद्धी आठ आहेत, जसे

१) **अणिमा –** आपल्या शरीरास सूक्ष्माति – सूक्ष्म करून घेण्याचे सामर्थ्य. या सिद्धीद्वारे सूक्ष्म जगताचे भ्रमण केले जाते.

२) **महिमा –** शरीरास वाढवून मोठ्यातले मोठे आकार करण्याचे सामर्थ्य.

३) **लघिमा –** शरीरास हलके करून घेण्याचे सामर्थ्य.

४) **गरिमा –** शरीरास जड करून घेण्याचे सामर्थ्य.

५) **प्राप्ति –** सर्व काही प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य.

६) **प्राकम्य –** आपल्या इच्छा पूर्ण करून घेण्याचे सामर्थ्य.

७) **ईशित्त्व –** सर्व वस्तूंवर आधिपत्य प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य.

८) **वशित्त्व –** सर्व वस्तूंना आकर्षित करून घेण्याची आणि त्यांना आपल्या वश मध्ये ठेवण्याचे सामर्थ्य.

**सुतप –** प्रजापति किंवा नैसर्गिक प्राण्यांमधील एक. याने सृष्टीच्या सृजनामध्ये ब्रह्माची मदत केली होती.

**सुषुम्ना –** बहात्तर हजार नाड्यांमधील प्रमुख आणि मध्य (वर्ती) नाडी. ही मेरूदंडामध्ये, तिच्या खालच्या भागापासून मेंदूच्या वरच्या भागामध्ये स्थित आहे. सहा चक्रे सुषुम्नेमध्येच स्थित आहेत आणि सुषुम्ना नाडीच्या माध्यमानेच कुंडलिनी जागृत होऊन वर चालते.

**सूक्ष्म जगत् –** भौतिक सृष्टीच्या पाठीमागे विद्यमान प्रकाश आणि ऊर्जेचे सूक्ष्म जगत्. भौतिक जगताचे प्रत्येक जीव, प्रत्येक वस्तू, प्रत्येक स्पंदनाचे प्रतिरूप सूक्ष्म जगत्मध्ये आहे. कारण की सूक्ष्म जगत् (स्वर्ग) मध्ये भौतिक जगताची संपूर्ण रूपरेषा विद्यमान आहे

**सोऽहम् –** (शब्दशः अर्थ – ''मी तोच आहे.''); प्रत्येक श्वासोच्छवासाच्या वेळी स्वतः होणारे आत्म्याचे प्राकृतिक स्पंदन. ती अनुभूती प्राप्त करूनच योगी हे जाणतो की आत्मा आणि ब्रह्म एकच आहेत आणि त्याचा आत्मा परमात्म्यामध्ये विलीन होऊन जातो.

**हृदयाच्या तीन ग्रंथी –** 'इंगला', 'पिंगला' आणि 'सुषुम्ना' या हृदयाच्या तीन ग्रंथी (गाठी) आहेत,

**हर –** भगवान शिवचे एक नाव.

**हरि –** भगवान विष्णुचे एक नाव.

**ज्ञानी –** ज्ञानप्राप्त मनुष्य, ज्ञानोपासक.

# ६४) सूफ़ी तत्त्वज्ञान संक्षिप्त परिभाषा कोश

अक़ायदा-ए-फ़ासिदा = अंधश्रद्धा / अक़ीदा = आस्था, श्रद्धा

अब्दाल = वाटेल तेव्हा परकाया प्रवेश करू शकणारा एक सद्‌गुरू

अब्रार = महापुरुष, संत

अज़मत = सिद्धी

अदम = शून्य / अन्सर भूत, तत्त्व / अन्सरी ख़ासियत = तन्मात्रा

अफ़्राद = सत्पुरुष - एक निपुण दक्ष साधक / अनासर बसीत = महाभूत

अहदियत = विज्ञान - हालत-ए-मुहम्मदी अद्वैत

अनल हक़ = अहं ब्रह्मास्मि

अहल-ए-तौहीद = अद्वैत समर्थक गूढवादी संप्रदायांचे साधक वुजूदिय्याह आणि शहूदिय्याह (अद्वैतवादी आणि विशिष्टाद्वैतवादी)

अहुरमझ्द (झरतृप्ती) = परमात्मा, अल्लाह

अख़यार = महात्मा साधनमार्गावरील एक प्रगत साधक

अक्मल = पुरुषोत्तम, द्वैताशी कर्तव्य असलेला, परंतु शिष्यवर्ग नसलेला 'बक़ा बिल्लाह'मधील एक दुर्मिळ प्रकारचा साक्षात्कारी साधक. 'सालिक-ए-अक्मल' पण म्हणतात. / अयान = समरूप

अल् = अरबी भाषेतील उप-पद / अल्वहियत = ईश्वरत्व

अल्लाह = परात्पर परब्रह्म, परमात्मा, झरतृप्ती अहुरमझ्द, यज़्दान

अन्वार = दिव्यत्व प्रचीती) अतीत अवस्थेमधील ईश्वर

अल् - अमा = घनदाट अंधकार, दाट धुके, ईश्वराच्या परा-परात्पर अवस्थेचे

अर्ज = भूमी, पृथ्वी) एक अभिधान

अर्श = वैकुंठ, दिव्य संहासन

अर्श-ए-आला = विज्ञान भूमिका, सर्वोच्च सिंहासन, अवतार आणि पुरुषोत्तमाची

अक़्ले कुल्ल = सार्वभौमिक मन) सर्वोच्च आध्यात्मिक अवस्था

असर = भाव समाधिस्त ईश्वरानुभूतीचा प्रभाव / असराफ़ = अपव्यय

अज़्ल-उल्-अज़ाल = अनंततेचे अनंतत्त्व. ईश्वराच्या परा-परात्पर अवस्थेचे

अदम = अ-वास्तव / एक अभिधान

असर सिफ़त = अविद्या

जाब-ए-मुतलक़ = जीवन्मुक्त, तुरीय अवस्था

आदम = प्रस्तरपासून ते मानवापर्यंतची उत्क्रांती आणि मानवापासून ते ईश्वरापर्यंतचे निवर्तन (अंतर्वलय) चक्र पूर्ण केलेला प्रथम जीवात्मा, पारंपरिकपणे, प्रथम मानव, प्रथम अवतार पण, आद्य प्रेषित

आलम = जगत्

आलिम = सर्वज्ञ
आला जमी जामी सिफ़त = सार्ध ब्रह्मेति
अस्तग़्फ़ार = विनवणी
अन्नफ़्स = आध्यात्मिक
आलम-ख़फ़ी = अचक्षुक / आलम-ए-जानान = वासनारहित निर्मळ जगत्
आलम - रूहानी = अचक्षुक
आख़िरत = लोकांतर
आयत-ए-करीमा = प्रणव वेदी मंत्र
आलम-ए-कबीर = ब्रह्मांड, विश्व, 'ख़म्सा वुजूदात'
आलम-ए-सग़ीर = पिंडांड, मानव
आलम-ए-हाहूत = विज्ञान भूमिका, प्रभुत्व क्षेत्र, पाचव्या वास्तव क्षेत्राचा तो पैलू की जेथून 'कुतुब' आणि 'अवतार' ब्रह्मांडास दिशा निर्देश करतात.
आलम-ए-जबरूत = मनोभुवन, चेतनेचे पाचवे आणि सहावे थर असलेले मानसिक क्षेत्र
आलम-ए-लाहूत = विज्ञान (भुवन), परिपूर्णतेचे क्षेत्र
आलम-ए-मलकूत = प्राणभुवन चेतनेचे पहिल्यापासून ते चौथे थर युक्त सूक्ष्म क्षेत्र
आलम-ए-नासूत = अन्न भुवन. स्थूल जगत्. बहुतांश माणसांना संपूर्णपणे जाणीव असलेले भौतिक जग.
आफ़्रीदगार = ब्रह्मा. विश्व निर्माता
आरिफ़ = ज्ञाता, ब्रह्मज्ञानी चेतनेच्या पाचव्या थरावरील जीवात्मा, प्रज्ञासंपन्न, ब्रह्मवेत्ता
आरिफ़-उल्-वुजूद = अस्तित्व ज्ञाता. (जाणणारे अस्तित्व) प्रभुत्व क्षेत्रातील 'कुतुब'वर्णन करणारे. द्वितीय अवतरण ('तजल्ली-ए-दुव्वम') च्या बरोबरीचे
आशिक़ = शब्दार्थ, प्रियकर, चेतनेच्या सहाव्या स्तरावरील एक जीवात्मा
आशिक़ोमाशूक़ = प्रियकर आणि प्रेयसीचे मीलनामधील सायुज्य, एकत्व, परिपूर्णतेच्या क्षेत्रामधील ईश्वराचा पैलू, आलम-ए-लाहूत, पुज्यापूजक.
आशिक़िय्यत = एक प्रियकर होण्याची अवस्था, ईश्वर प्रेयसी आणि मानव प्रियकर असलेले प्रथम आविर्भावामधील महिमेचा प्रभुप्रकाश
आसमान = स्तर, भूमिका
आज़ाद-ए-मुत्लक़ = मुक्त शरीरधारी किंवा अवतार, नवव्या अवस्थेमधील किंवा मनोदशेमधील ईश्वर जीवन्मुक्त
इर्फ़ान = गूढज्ञान, रहस्य ज्ञान. 'आरिफ़'चे ज्ञान. सहाव्या आणि सातव्या स्तरावर असलेल्यांचे ज्ञान
इमकात = कुंडल / ज्ञातसुद्धा ज्ञात
इल्म = ज्ञान, अपरा विद्या
इल्म-ए-लदुन्नी = केवलज्ञान, ईश्वरप्रदत्त
इरादत = ईशत्व / इल्म-ए-सफ़ीना = अर्जित ज्ञान
इल्म-ए-सीना = उपजत ज्ञान
इर्तेक़ा = उत्क्रांती
इल्म-ए-कुरआन = प्रणव वेदी ज्ञान
इल्म-ए-कलाम =वादशास्त्र
इल्म-उल्-यक़ीन = प्रबळ विश्वासावर आधारभूत विवेकपूर्ण दृढ धारणा
इन्सान = मानव
इलहाम = दैवी प्रेरणा
इल्का = सुखकर्ता आणि विघ्नहर्ता दैवी शक्ती

इन्सान-ए-कामिल = साक्षात्कारी मानव, शिव-आत्मा, पुरुषोत्तम, नरोत्तम

इर्शादात = बोध वचन, गुरूची शिकवण, गुर्वाज्ञा

इस्तख़राज = अनुमान

इल्लती = हेतुमान

इफ़्तार = पारण

इस्राफ़ील = प्रमुख देवदूत राफ़ेल

इख़्लास = अंतःशुद्धी

इज़ाफ़ी = संबंधात्मक अथवा सापेक्ष, 'हक़ीक़ी'शी तुलना करा.

उक़्बा = इहलोक-परलोक 'दो आलम'पहा; लोकांतर

उम्मुल किताब = आदि ग्रंथ

उबूदीयत = दास्य भाव भक्ती दासतेमधील (बद्धा) मानवजातीच्या भल्यासाठी सामान्य

उम्मती = अनुयायी

चेतनेस परत फिरलेल्या वास्तविक साधकाची भूमिका

उश्र = दशबंद १/१०

उर्फ़-उल्-यकीन = बद्ध आत्म्यांना मदत करण्यासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करणारे

ऊलूल अज़्म = अग्रगण्य

अवतार आणि पुरुषोत्तमा (नरोत्तमा) च्या गूढ ज्ञानाची खात्री

ऐन = नाम, 'ज़ात'शी समानार्थी. नेत्र किंवा दृष्टी पण

ऐन-उल्-यक़ीन = अंतर्दृष्टी, सहाव्या स्तरावरील, ईश्वरास समोरासमोर पाहून निर्माण होणारा दृढविश्वास

औजूद मौजूद = क्षेत्र क्षेत्रज्ञ

औलिया अंबिया = हरिहर ब्रह्मादिक

करामन कातिबैन = चित्रगुप्त, कर्मे नोंदणारा देवदूत

क़फ़्फ़ारा = निराकरण

कश्फ़ = अंतर्ज्ञान, ईश्वरीय प्रेरणा

करामत = (अनेकवचन : करामात) पाचव्या आणि सहाव्या स्तरावरील अधिकारी साधकाने घडवून आणलेला एक चमत्कार

कलाम = ईश्वरशास्त्र

कस्ब = क्रय-विक्रय पद्धतीने केले गेलेले एक संपादन 'मोहिब'शी तुलना करा, कर्म

क़दीम = मूळ (प्राचीन) 'हदस'शी तुलना करा.

क़ल्ब = चित्त

क़याम = धारणा

क़यामत = महाप्रलय, विश्वाचे महान शेवटचे अस्त वा विलय

कमाल = पराकाष्ठा

काफ़िर = धर्मवंचित, श्रद्धाहीन

क़ाल = उवाच

कान्हू हू = शब्दशः तंतोतंत तो. त्याचासारखा ('तो' = अल्लाह, परब्रह्म) हुबेहूब तोच. 'शुहूदियाह' संप्रदायाद्वारे प्रस्तुत अंतिम निर्वाण ('फ़ना') मधील आत्म्याच्या स्थितिचे वर्णन

कामिल = एक नरोत्तम, जीवन्मुक्त, सिद्ध पुरुष, पुरुषोत्तम

क़िस्मत = प्रारब्ध, भाग्य

क़िब्ला = वंद्य स्थळ

कुद्रत = दिव्य शक्ती, सामर्थ्य सत्

कुर्बत = शब्दशः समीपता, ईश्वराशी संबंध, सान्निध्य

कुर्ब-ए-नवाफ़िल = ऐच्छिक समीपता, पुरुषोत्तमाचे परमेश्वराशी संबंध

कुर्ब-ए-फ़रायज़ = अनैच्छिक (अनिवार्य) समीपता, अवताराचे परमेश्वराशी संबंध
कुतुब (कुत्ब) = शब्दशः, केंद्र किंवा अक्ष, सद्गुरू
कुतुब-ए-इर्शाद = विश्वाचे संचालन करणाऱ्या पाच जिवंत कुतुबांचा प्रमुख एका अवतारी युगामध्ये हे पद अवताराने भरले जाते.
कुत्बीयत = सद्गुरूत्व, ईश्वराची दहावी अवस्था
कुलमन अमल-ए-फ़ानि = यदृष्टं तं नष्टं
कैफ़ियत = वृत्ति
कुर्सी = पादपीठ
कुफ़्र = नास्तिकता, प्रकार - १) जमाली, २) जलाली, ३) रूही व ४) इलाही
ख़म्सा वुजूद = पाच प्रकारांचे अस्तित्व, मानवामधील परा-परा अवस्थेतील परमेश्वराची पाच न्यागमने किंवा हस्तांतरणे - १) आरिफुल वुजूद, २) मुमकिनुल वुजूद, ३) मुमतनल वुजूद, ४) वाहिदुल वुजूद आणि ५) वाजिबुल वुजूद
ख़तरा = चित्त / ख़ातिम = निर्वर्तक
ख़ादिमुलफुक़रा = साधु प्रीती / ख़ालिक़ व मख़लूक़ = अंशी - अंश
ख़िदमत = सेवा
ख़ुदपरस्ती = अहंकारी
ख़ुदशनास = आत्मज्ञान / ख़ुदशनासी = आत्मसाक्षात्कार
ख़ुदा = परमेश्वर
ख़ुदाबंदा = जीव ईश्वर
ख़ुदी = अहंकार, मिथ्या अहम्, संकल्प
ख़ुलासा = उकल
ख़ुशआनी = आनंदावभास भोग
गजमख़फ़ी = ब्रह्मगुफ़ा, ओंकारपीठ
ग़ैब = अंतर्धान, परोक्ष, अदृष्ट, अव्यक्त
ग़ैबुलग़ैब = गुह्यांतर्गत गुह्य, परमेश्वराच्या परा-परा अवस्थेचे एक अभिधान
ग़ैर = शब्दशः अन्य, इतर, द्वैतता
घूँघट = शब्दशः, स्त्रीचे एक अवगुंठन, आवरण, 'बुरक़ा' प्रतीक स्वरूपात, अज्ञान पटल, अविद्या आवरण
चिल्ला = एकांतवासाचा आधिकारिक चाळीस (४०) दिवसांचा कालावधी, चाळीस दिवसीय मंडळ
चौदा तबक़ = सप्त आकाश व सप्त पृथ्वी
चिल्ला नशीनी = एकांतवास, चाळीस दिवसाच्या एकांतवास मंडळाची प्रतिज्ञा
जमाल = सौंदर्य / जल्वा = साक्षात्कार
जमाल-ए-अहदीयत = निरपेक्ष परम एकत्वाचे सौंदर्य
जमुलजमा = आत्म प्रतिष्ठापना, सहज समाधी
जलाल = प्रताप, महिमा, परमानंद, निःश्रेयस / जहल = अविद्या
ज़ात = नाम, परम सत्ता / ज़ात बहत = अल्लाह, परात्पर परब्रह्म
ज़ात सिफ़त = माया ब्रह्म
जान = आत्मा, आत्मन, शब्दशः, प्राण
जान-ए-जिस्मी = जीव-आत्मा (जीवात्मा)
जाम = शब्दशः पेला, मदिरेचा प्याला, परमेश्वराशी सचेतन संयोग, ईश्वराशी साक्षात्कार
जानाँ = प्रेयसी / ज़िक्र = नाम-स्मरण, जप
जिन = यक्ष, किन्नर
जिन इन्स = देव मनुष्य
जिब्रील = प्रमुख देवदूत जिब्रील, ईश्वराचा संदेशवाहक प्रमुख देवदूत

जिस्म = शरीर, देह
जिस्म-ए-अल्तफ़ = मनोशरीर, कारण शरीर
जिस्म-ए-मुत्लक़ = परम शरीर
जिस्म-ए-कसीफ़ = स्थूल शरीर
जिस्म-ए-लतीफ = सूक्ष्म शरीर
जौहर = अणु, परमाणु
ज़ाहेर बातिन = अंतर्बाह्य
ज़िक्र = नाम-स्मरण, जप
जिकीर फ़िकीर - स्मरण विवेक
ज़ीरूह = सजीव (ग़ैर ज़ी रूह = निर्जीव)
तजल्ली = दिव्यत्व, प्रचीती (अनेकवचन - तजल्लियात) = प्रकटीकरण, अभिव्यक्ती, अवतरण, साधनमार्गावर आकांक्षी साधकास येणारी परमेश्वराच्या प्रतापाची - तेजाची अनुभूती -

१) अध्यासमय मायावी सृष्टी स्वरूपात ईश्वराचे अवतरण (ची अभिव्यक्ती)
२) सूक्ष्म जगताच्या प्रथम तीन स्तरांच्या शक्ती
३) चौथ्या स्तराच्या दिव्य शक्ती (अन्वार-व-तजल्लियात)

पाच प्रकारच्या 'तजल्ली' रू

१) तजल्लि-ए-अव्वल : प्रथम प्रकटीकरण 'वाहिद-उल्-वुजूद'
२) तजल्लि-ए-दुव्वम : द्वितीय प्रकटीकरण 'आरिफ़-उल्-वुजूद'
३) तजल्लि-ए-सुव्वम : तृतीय प्रकटीकरण 'मुमतन्-उल्-वुजूद'
४) तजल्लि-ए-चहारूम : चतुर्थ प्रकटीकरण 'मुमकिन-उल्-वुजूद'
५) तजल्लि-ए-पंजुम : पंचम प्रकटीकरण 'वाजिब-उल्-वुजूद'

तजल्लि-एन्जमाली = सर्वसाधारण चैतनयुक्त साक्षात्कारी पुरुषास प्रदत्त सौंदर्याचे प्रकटीकरण किंवा प्रभुप्रकाश. 'माशूक़िय्यत'
तजल्लि-ए-जलाली = जीवात्म्यास 'फ़ना' अर्थात् निर्वाणाची अनुभूती प्रदान करणारे ईश्वरी प्रतापाचे प्रकटीकरण किंवा प्रभुप्रकाश 'आशिक़िय्यत' / लक़्वा=संयम / तक़्वा शिआर = संयमी, जितेंद्रिय
तजल्लियात = 'वजल्ली'चे अनेकवचनी रूप. सिद्धी / तक़य्यद = तन्मात्रा
तजल्लियात-ए-ख़म्स = पंच प्रकटीकरण, पाच अभिव्यक्ती = ख़म्स वुजूदात
तफ़क्र = मनन, ध्यान / पाच प्रकारांचे अस्तित्व पहा : 'वुजूद'
तनासुख = संसृति, पुनर्जन्म
तनज़्ज़ुलात = पाच प्रकारच्या अस्तित्वामधून निरपेक्ष सत्तेचे उत्क्रमण; विकार
तज़कीए नफ़्स = प्रत्याहार / तमक्कन = अधिष्ठित / तजरीद = ब्रह्मचर्य
तरीक़त =अध्यात्ममार्ग, आध्यात्मिक प्रगतीचा गूढ मार्ग, आध्यात्मिक मार्ग
तसव्वुफ़ = आध्यात्मिक चिन्मय, प्रज्ञा, विवेक / तसलीस = अवस्थात्रय
तशबीह = एकसमान, तुल्य, साम्य, सुयोग्य, अर्हताधारक / तस्बीह = स्मरणी, जपमाळ
तवज्जोह = शब्दशः प्रभाव, एखाद्या सद्गुरूचे आकांक्षी साधकाच्या डोळ्यांत दृष्टिपात करून, त्याचे अज्ञान-पटल फाडून, त्याचे अंतःचक्षु उघडणे.
तहतुस्सरा = रसातळ / सद्गुरू कृपा / तल्क़ीन = गुरूमंत्र, सदुपदेश

तालिब = साधक, जिज्ञासु, अन्वेषक / तालील = कार्य-कारण भाव

तौबा = अनुताप, पश्चात्ताप, उत्स्फूर्त उत्कंठा स्वरूपात, इंद्रियानुभूत जीवनापासून पाठ फिरवून ईश्वराकडे अभिमुख होणे.

तौहीद = ईश्वराची अद्वैत अवस्था, एकेश्वरवादीधारणा, अद्वैत

तौहीद-ए-अफ़आली = ईश्वराचे सक्रिय अद्वैत; जीवात्म्याकडून सूक्ष्म स्तरांवरील प्राप्त एकीकरण / तायुनात = बहुविधरूपत्व; तन्मात्रा

तायुनी = संकल्पिक

तौसीफ़ी = संकल्पिक

तौहीद-ए-अहवाली = ईश्वराचे भावनिक अद्वैत, मनसा द्वैत. पंचम स्तरावरील जीवात्म्याकडून प्राप्त एकीकरण

तौहीद-ए-अक़्वाली = ईश्वराचे वाचिक अद्वैत. साधन मार्गावर अद्याप प्रवेश न केलेल्या अधिकांश मानवजातीकडून प्राप्त एकीकरण

तौहीद-ए-शरीयत = 'तौहीद-ए५अक़्वाली', विधी-संहितेचे एकीकरण

तौहीद-ए-सिफ़ाती = ईश्वराचे गुणीभूत अद्वैत, सहाव्या स्तरावरील जीवात्म्याकडून प्राप्त एकीकरण

तौहीद-ए-तंज़ीही = निरपेक्ष एकत्त्व, अद्वैत

तौहीद-ए-तरीक़त = चिन्मय मार्गावरील असलेल्यांचे एकीकरण - अद्वैत. यामध्ये 'तौहीद-ए-अफ़आली =, 'अहवाली' आणि 'सिफ़ानी' समाविष्ट आहेत

तौहीद-ए-ज़ाती = ईश्वराचे सत्त्वांतर्गत अद्वैत, साक्षात्कारी आत्म्याचे (पुरुषाचे) 'तौहीद'

तंज़हि = परम सत्ता, इंद्रियातीत, ज्ञानातीत

दम = प्राण / दरख़्तोतुबा = कल्पवृक्ष / दज्जाल = कलिपुरुष /

दस्तारबंदी = पदग्रहण

दानाबीना = ज्ञाता द्रष्टा

दानाईजादानगी = ज्ञान अज्ञान

दारैन = उभय लोक / दावत = मंत्र - सिद्धी, अभिचार

दीन = शब्दश: धर्म, परलोक

दीनदुनिया = इहपर

दुई = द्वैत

दुआ = आळवणी

दुनिया = इहलोक, जग

दो आलम = दोन जग अर्थात् स्थूल आणि सूक्ष्म किंवा मनो जगत ('उक़्बा') आणि चतुर्थ (संयुक्त) जग सुद्धा त्रिभुवन

दौर = चक्र, किंवा युग

दौर-ए-ज़माँ = काल-चक्र किंवा युग, अवताराच्या अवतरण होणयाच्या वेळेस सुरू होणारे ७०० ते १४०० वर्षांचा एक कालावधी किंवा कालचक्र

दौर-ए-क़लंदरी = प्रभुत्व - चक्र

नज़र = प्राणदृश्य

नज़र नाज़िर = दृश्य द्रष्टा

नफ़ी इसबत = नित्यानित्य

नफ़्स = आत्मन्, मिथ्या अहंकार

नफ़्स-ए-अम्मार: = लोभी आत्मा

नफ़्स-ए-लव्वाम: = निंद्य आत्मा, निंदात्मक आत्मा

नफ़्स-ए-मुल्हिम: = ईश्वरप्रेरित आत्मा

नफ़्स-ए-मुत्मैन: = आनंदित प्रसन्न आत्मा

नफ़्स रूह = आत्मा

नबी = अवतार
नयाबती = औपाधिक
नयाबत = उपाधि
नजात = मुक्ती, मोक्ष, अपवर्ग / नाजी = मुक्तिदाता
नात = भक्ती
नापाक अहवा = मलीन जीव
नुक़ूश-ए-आमाल = शब्दश: कृतींचे ठसे अर्थात प्रभाव, संस्कार
नूर = प्रकाश (अनेकवचन 'अन्वार') प्रभा, चमक, ज्योति
नूर-ए-मुहम्मदी =स्वत:स ओळखण्याच्या इच्छे (मौजे) पोटी प्रथम
नूर-ए-ज़ात = परम ज्योति / सजग झालेल्या ईश्वराचा प्रकाश, प्रकाशाचा आद्य उदय
नेकी बदी = पाप पुण्य / नेस्ती = अभाव
परवरदिगार = पोशिंदा, भरणपोषण करणारा, विष्णु
पाक अस्वा = शुद्ध जीव / पास अनफ़ास = प्राणायाम
पीर = सत्पुरुष, सहाव्या स्तरावरील एक सद्‌गुरू
पीर मुरीद = गुरुशिष्य
पीरी मुरीदी = गुरुशिष्य परंपरा
पैगंबर = प्रेषित
पैगंबरी = प्रेषितत्त्व
पैगंबरी खास्त = देवता प्रकृती
फ़ना = मनोनाश, निर्वाण, व्यष्टि नाश, संभूति, लय
फ़क़द = अहं समाप्ति, अहंनाश
फ़ना-बक़ा = संभूति-असंभूति, निर्वाणाशी अटळ असलेल्या अनुभूतींच्या तीन प्रकारांकडे याचा संकेत असून, त्यांमधील साम्ये दाखविता येतील. १) सामान्य माणसाचे रोजचे झोपणे व झोपेतून जागे होणे, २) साधनमार्गावरील एक टप्प्याहून दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रवेश करण्याअगोदरील मिथ्या अहंकाराचा काही पैलू आणि त्या टप्प्यामधील जीवन ('बक़ा') जगणे, आणि ३) 'मज़ज़ूब-ए-कामिल'चा फ़ना फ़िल्लाह आणि जीवन्मुक्त व सद्‌गुरूचा 'बक़ा बिल्लाह', फ़ना = मी नव्हे (नाही)
बक़ा = तू आहेस.
फ़ना-अल्-फ़ना = महानिर्वाण
फ़ना फ़िल्लाह = निर्विकल्प समाधी
फ़ना फ़िश्शेख़ = गुरूलीनता
फ़ना-मा-अल्-बक़ा = तुरीय अवस्था
फ़नाकार = विध्वंसक, शिव-महेश
फ़क़ीर = निरासक्त
फ़क़ीरी = निरासक्ती
फ़क़्र = निरासक्ती
फ़र्क़ - बादुलजमा = सहज समाधी, आत्मप्रतिष्ठापना
फ़रिश्ता = देवदूत
फ़कीह = स्मृतिकार
फ़िक़ा = धर्ममीमांसा
फ़िरावून खास्त = असुरी प्रकृती
फ़तहा = अकार
जम्मा = उकार ॐकार
कसरा = मकार
बक़ा = असंभूति, चिरंतनता
बक़ा बिल्लाह = सहज समाधि, आत्मप्रतिष्ठापना
बक़ा-उल्-बक़ा = अवतार पुरुष
बहरूल हयात = अमृतकुंड
बंदा = सेवक, दास, भ्रमावेष्टित आत्मा, किंकर
बा सिफ़त = सगुण / बाज़गश्त = अनुवृत्ति / बातिल = असत्
बा सूरत = साकार / बाईमान = धर्मनिष्ठ / बिदअत = अधर्माचार

बातिन = अंतस्त / बातिनी = अध्यात्मिक / बुर्ताक़ = कामधेनु
बेज़ार = अलिप्त / बेनियाज़ = निर्विकार
बेखुदी = अहम् विस्मृती, आत्म विस्मृती /ह्वबेनवा = अकिंचन
बेहोशी = अचेतनता
मक़ामात = स्थिती, साधनामार्ग, स्तर / मआद = परलोक, परत येण्याचे स्थान
मजज़ूब = ब्रह्मलीन / मख़दूम = सेव्य, धनी / मक्रूह = अनिष्ट, अवांछनीय
मजज़ूब-ए-कामिल = ब्रह्मीभूत, विदेहमुक्त आत्मा
मजज़ूब सालिक = परमहंस / मज़कूर = मंत्र / मदारिज = अवस्था
मजज़ूबियत = ब्रह्मीभूतातील ईश्वराची आठवी अवस्था
मओहिब = प्रदत्त देणगी / मलकात = प्रकृती, प्रकृतीचे गुण
मलकात-ए-फ़ाज़िला = सत्त्व गुण
मजाज़ = माया / मलकात-ए-रदीया = रजोगुण
मलकात-ए-मज़मूम = तमोगुण
मज़ार = समाधी / मब्दा = मूल उद्‌गम, सृष्टीचे मूल कारणा, परमात्मा
मजहूलन्नात = अज्ञेय व व्याख्यातीत ईश्वराचे पर-पर अवस्थेचे पदनाम, अभिधान
मज़हर = अवतार
मरदूद = गर्हित, धिकृत / मलऊन = शापित, तिरस्कृत
महज़ ज़ात = प्रजापिता / ममासिन = अविशेष
मलकूत = जनलोक, देवलोक / मलामत = निर्भर्त्सना
मसनवी = कथा-काव्य / मस्तकलंदर = निजमुक्त
मस्त = साधनामार्गावरील एक ईश्वरमद आत्मा, ब्रह्मलीन साधक
मस्ती = साधकाची भक्तीमधील तल्लीनता
मन दर हमा अम = मी सर्वांमध्ये आहे, मी सर्व काही आहे
महसूस = ज्ञेय
मारिफ़ = ब्रह्मज्ञानाचे क्षेत्र / माकूली = नैयायिक
मारिफ़त = रहस्यज्ञान, ब्रह्मज्ञान / माकूलात = न्यायशास्त्राचे ग्रंथ
मारिफ़त-ए-हक़ीक़त = सत्यानुभूती, अवतार पुरुषाचे ज्ञान, वास्तविकतेचे ज्ञान
माशूक़ = प्रेयसी
माशुक़ियत = प्रेयसीची अवस्था, ईश्वर प्रियकर व मानव प्रेयसी असताना सौंदर्याचा उदय
मुर्शद = गुरू / मुमकिनुल वजूद = मानव जाति
मुरीक = शिष्य / मुबाह = विधिसम्मत
माद्दा = क्षर
मुकाशफ़ा = योग प्रत्यक्ष, योगि-दर्शन
मुंदरज = अनेकतेमध्ये एकता
मुंदमज = एकतेमध्ये अनेकता
मुईन = निर्विकल्प
मुज़ादलत = अनुष्ठान
मुताज़रा = शास्त्रार्थ
मुराद = साध्ये / मुनक़तुल इज़हारत = लक्षणरहित अवस्था
मुराक़बा - समाधी, ध्यान, मनन / मुकाशिफ़ा = प्रकटन
मुकम्मिल = सद्‌गुरू
मुजाहिद = विशिष्टाद्वैतवादी, 'वहदतुल शुहूद' सिद्धान्ताचे समर्थक, द्रष्टा, जीर्णोद्धारक
मुजाहदाह = सराव, प्रयत्न, साधना, यमनियम, तपस्या
मुहासबा = मनन / मुजाहिद ह्न= तपस्वी

मुहद्दिस = वार्ताकार
मुल्हिद = नास्तिक, निरीश्वरवादी
मुवहिहद = अद्वैतवादी, एकेश्वरवादी भक्त
मुक़द्दर = प्रारब्ध, भाग्य
मुतवस्सित = साधू, प्रगत आत्मा
मुसर्रत = आनंद / मुराक़बा = व्रत, मनन / मुराक़िब = व्रतस्थ
मुक़ाम-ए-फ़ुरूतत = तुरीय अवस्था
मुक़ाम-ए-हैरत = आश्चर्य स्थळ, साधकास आपल्या आध्यात्मिक प्रगतीमध्ये अत्यंत विलंब होऊ शकणारे साधनामार्गावरील एक स्थानक
मुक़ाम-ए-मुहम्मदी = विज्ञान भूमिका
मूजिज़ा = अवतार किंवा 'कुतुब'ने धावून आणलेला चमत्कार
यक़ीन = दृढ विश्वास, दृढधारणा, दृढ आत्मविश्वास
इल्मुल यक़ीन = प्रबळ विश्वासाधृत विवेकपूर्ण दृढधारणा
उर्फुलयक़ीन = बद्ध जीवांच्या मदतीसाठी आपल्या ज्ञानाचे उपयोग करणारे अवतार आणि सद्गुरूंच्या रहस्यज्ञानाची खात्री
ऐनुल यक़ीन = अंतर्दृष्टी, सहाव्या भूमिकेवर ईश्वरास समोरासमोर पाहिल्यामुळे, दृष्टीची दृढधारणा
यक़ीनुल यक़ीन = एकापासून ते पाचव्या भूमिकेवरील जीवात्म्यांचा दृढ विश्वास, अचल, अटळ असा विश्वास
हक़्कुल यक़ीन = अनुभूतीची खात्री, निश्चित ब्रह्मबोध
यकशव = अद्वैत आत्मा होणे
यझ्दान = (झरतुश्ती) = सर्वशक्तिमान ईश्वर, परमात्मा, अल्लाह

रब्ब = प्रभू, परमेश्वर
रसूल = महाप्रेषित, अवतार, मसीह, त्राता, मुक्तिदाता
रहरव = योगी, मुमुक्षू साधक
राह-ए-तरीक़त = साधनामार्ग
रिजा = पुनरागमन /
रिंद = उन्मुक्त
रिजात = पुनर्जन्म, आवागमन
रूबाई = चौपाई (चौपदी) छंद
रूह = आत्मा, अक्षर / रूहानियत = आत्मवाद
रूह क़दीम = अनादि आत्मा
रेहल = ग्रंथासनी
रिसाले = शास्त्रे
रियाज़त = कठोर तपस्या
रोज़ा = उपवास व्रत
रोज़-ए-अज़ल = आदि दिवस, सृष्टिप्रारंभ
लतायफ़-ए-सित्ता = षट्चक्र / लदुन्नी = दिव्य प्रणवरूप शिक्षण
लमयज़ल = अविनाशी, अनश्वर
लहर = लाट, कल्पना, सृष्टिनिर्मितीमागील ईश्वराची लहर
लाइलाह इल्लल्लाह = ईश्वराशिवाय अर्थात् अल्लाशिवाय दुसरा कोणीही पूज्य नाही
ला महदूद = अनंत
ला मकान = स्थान विरहित, मानसिक क्षेत्रातील बिंदूहीत 'बीज' की जेथे काळ आणि अंराळाच्या सर्व कल्पना एका बिंदूपर्यंत येतात आणि तेथून स्थूल व सूक्ष्म जग निर्माण होते.
लाशअ = अचेतन
ला शरीक = निसंग
ला सिफ़त = निर्गुण
ला सूरत = निराकार / ला हैयत = निरवयव

लिक़ा अल्लाह = साक्षात्कार
वक़्त = काळ, ६५ ते १२५ वर्षांचा कालावधीमधील एककाळ (काल) प्रत्येक चक्रामध्ये अकरा (११) युगे असतात.
वक़ूफ़ = बोध
वज़ीफ़ा = मंत्र
वली = महापुरुष, संत - महात्मा, अर्हत
वली अल्लाह = ईश सखा, परमेश्वराचा मित्र
वज़ू = आचमन / वजूद = वास्तव, अस्तित्व
वज्द = सहजानंद
वस्ल = मीलन, ऐक्य
वहदत = स्वरूपमुक्त, अद्वैत
वहदतते ख़सूसी = विशिष्ट अद्वैत
वहदते वजूदी = शाक्त अद्वैत
वरा-उल्-वरा = परात्पर परब्रह्म, परब्रह्म मंडल, अरूप स्थल, शून्य स्थान प्रथम अवस्थेमधील ईश्वर, ईश्वराची परा-परा अवस्था
वहबी = ईश्वरप्रदत्त
वहद्तुल वुजूद = सूक्ष्म देह / वाजिबुल वुजूद = ईश्वर, स्वयंभू
वहदानियत = अद्वैतवाद, सचेत अद्वैत, ईश्वर एक असल्याचा सिद्धान्त
वहदियत-ए-वहदियत = अनेकत्वतेमध्ये एकत्वाची अद्वैत चेतना
वहम = मन
वहमा = कल्पना प्रविक्रम
वहदहू लाशटीक =असंग अद्वैत / वही = आप्त उपदेश
वाक़िफ़ = ज्ञान, जडचेतन आत्मा / वारिद = प्रभाव
वासिफ़ = स्तुति पाठक
वासिल = ईशभक्त, ईशप्रेमी
वाहदियत = सचेत एकत्व, वा अद्वैत
वाहेदियत = जीवन्मुक्त, मायावी अद्वैत
विलायत = शब्दश:, ईश्वराशी मैत्री, पाचव्या आणि सहाव्या भूमिकांवरील एखाद्या आत्म्याची अवस्था, अर्हतत्त्व, संतत्त्व
वुजूद = अस्तित्व, देह - तीन श्रेणी (१) ज़ात बहत (अल्लाह, नाम), (२) सिफ़ात (रूप) आणि (३) कायनात (ब्रह्मांड)
वुजूदी = अद्वैतवादी
वुजूद-ए-मुत्लक़ = विशुद्ध अस्तित्व, निरपेक्ष अस्तित्व
वुजूदात = पंचदेह (ख़म्सा वुजूदात) (१) वाजिबुल वुजूद, (२) मुमकिनलवुजूद, (३) मुमतनुल वुजूद, (४) आरिफ़ुल वुजूद आणि (५) वाहिदुल वुजूद
१) वाजिबुल वुजूद = स्थूल देह, भुव:लोकातील स्थूल चेतना
२) मुमकिनल वुजूद = लिंग देह, जनलोकमधील सूक्ष्म आत्म्याचे संभाव्य अस्तित्व
३) मुमतनुल वुजूद = कारण देह, तप: लोकमधील आत्म्याचे नकारार्थी अस्तित्व
४) आरिफ़ुल वुजूद = महाकारण देह, कौमारलोकमधील 'कुतुब'चे वर्णन करणारे
५) वाहिदुल वुजूद = परा देह, सत्यलोकामधील ब्रह्मीभूतास अनुभूत असे चेतन एकत्व (अद्वैत) अद्वैतवादी अस्तित्व
वुजूदिय्याह = अद्वैतात्मक, अद्वैतवादी
शग़ल = क्रिया-विधी, ध्यास / शक्लोसूरत = आकार - प्रकार
शग़ले नसीर = समाधी क्रिया
शग़ले महमूद = त्रिकुटी समाधी

शग़ले सोने सरमदी = अनहद नाद / शय = रूप
शफ़ाअत = अभिस्ताव, मोक्षाची शिफारस
शरीअत = धर्मशास्त्र, कर्मकांड, देहपूजा, शास्त्रविधी
शह = सहजानंदाची पराकाष्ठा
शुहूदिय्याह = विशिष्टा द्वैतवादी तत्त्वज्ञान
शुबदाह (शोबदा) = शक्तिप्रदर्शन / शरा = शास्त्रनिर्णय, इस्लाम धर्मशास्त्र
शरा सुलूक = कर्म नि:कर्म
शाहिद = साक्ष
शिर्क = बहुदेववाद
सफ़ = रांग, ओळ, लोकर / सनवियत = द्वैत / सआदत = शिवता, शिवत्व
सफ़ा = पवित्र
समा = सूफ़ी संगीत सभा / सवाब = सलाभ, श्रेयांक
सल्ब-ए-विलायत = अवतारी पुरुषाकडून आत्म्याची चमत्कारशक्ती हिरावून घेणे,
सलात = उपासना, पंचकालिक अनिवार्य नमाज़
सवाद-ए-आज़म = नाम-मर्म-सिद्धी
सहरी = प्रातराश / चमत्कारशक्ती विनाश
साक़ी = मधुबाला
सालिक = नवशिक्षित साधक
सालिकून = यात्री, साधक
सालिक-ए-अकमल = अत्यंत परिपूर्ण साधक
सालिक-ए-कामिल = जीवन्मुक्त
सालिक-ए-मुकम्मिल = सद्गुरू
सालिक मजज़ूब = परमहंस / साबित = अविनाशी
साहब-ए-जमा व फ़र्क़ = जीवन्मुक्त
साहब-ए-ज़मात = अवतार / साज़ज = वर्णहीन, तेजपात
सिद्दीक = सत्यनिष्ठ
सिफ़ात = गुण, रूप (बा सिफ़ात = सगुण)
सिद्रतुलमुंतहा = कल्पवृक्ष, शेवटची हद्द, चौथ्या आकाशातील ती लक्ष्मणरेषा की जिथून पुढे साधारण देवदूत किंवा प्रमुख देवदूतांचा देह-हीन आत्मा ईश्वराच्या भेटीस जाऊ शकत नाही.
सिर्र = मर्म, हृदयाचे अंत:स्थल
सुक्र = तल्लीनतेतील उन्मादावस्था, प्रेममद
सुफ्फ = चबूतरा
सुलूक = साधना मार्ग, 'मस्ती'च्या विरुद्ध 'बक़ा बिल्लाह' मध्ये सच्च्या साधकास वास्तविक अनुभूत अशी, साक्षात्कारानंतर सर्वसाधारण चेतनेकडे पुनरागमन, यात्रा
सुलूकीयत = शेवटची 'सुलूकियत' म्हणजे 'बक़ा बिल्लाह' मधील सच्च्या साधकाची अवस्था / सुल्तानुल अज़्कार = राजजप
सैर = सूफ़ींची सहल, सूफ़ींचा प्रवास, यात्रा
सैर सिफ़त = माया / सैर-ए-वजूद = अंतर्यात्रा, अंतरंग विहार
सैर-ए-मा अल्लाह = ईश्वरासह सहल, तिसरा दैवी प्रवास
हक़ = ब्रह्म, वास्तविकतेशी परिचित सत्य
हक़राह = सत्यमार्ग
हक़ायक = परम सत्य
हक़ीक़त = वास्तविक ज्ञान, सत्य, जीवन भक्ती
हक़ीक़त-ए-इन्सानी = मानवाचे वास्तव, ईश्वरास समोरासमोर पाहणाऱ्या संताची सहाव्या भूमिकेची अवस्था
हक़ीक़त-ए-मुहम्मदी = प्रेषित मुहम्मद यांचे वास्तव, पुरुषोत्तमाचे सद्गुरूत्व, ईश्वराची दहावी अवस्था
हक़ीक़ी = वास्तविक, आत्मज्ञानी

हक़्क़-उल्-यक़ीन = ईश्वराविषयी दृढधारणा
हज्ज = तीर्थ, महातीर्थ यात्रा
हदस = नवनिर्मित / हदीस = स्मृति
हबीबुल्ला = ईश्वराचा लाडका सखा
हब्से दम = प्राणायाम
हमा अज़ मन अस्त = प्रत्येक माझ्यापासून आहे.
हमा अज़ अूस्त = प्रत्येक त्याच्यापासून आहे.
हमा अूस्त = प्रत्येक तोच (अर्थात् ईश्वर) आहे.
हमा बा मन अस्त = प्रत्येक माझ्याशी आहे.
हमा बा अूस्त = प्रत्येक त्याच्याशी आहे.
हमा दर मन अस्त = प्रत्येक माझ्यात आहे.
हमा दर अूस्त = प्रत्येक त्याच्यात आहे.
हराम = वर्जित, निषिद्ध / हलाल = अनुज्ञप्त
हमा मन अम = प्रत्येक मी आहे. / हयात-ए-दुनिया = भौतिक जीवन
हमाजाई = विभुत्व
हस्त मुत्लक = परब्रह्म
हवास-ए-बातित = अंत:करण / हयूला = मूल तत्त्व, प्रकृति / हलूल = ब्रह्मलय
हाजी = तीर्थंकर, धर्मयात्री / हादी = सद्गुरू
हाल = ईश्वर मग्न भक्ताची तन्मय अवस्था, तंद्रा
हालत-ए-मुहम्मदी = साक्षात्कारी आत्म्यांचे जाणीवपूर्वक अद्वैत, 'अहदियत', विज्ञान सर्वदा मुक्त, प्रभू बोध आत्म्यांचा सचेतन अद्वैत
हाहूत = कौमाटलोक, प्रभुत्व
हिकमत = विवेक, ज्ञान बुद्धी / हिस्स = इंद्रिय-ज्ञान
हुरूफ़-ए-क़मरी = चांद्राक्षरे
हुरूफ़-ए-शम्सी = सौराक्षरे
हुय्यत = अतिकायापासून अवतरित शून्य अवस्था, ईश्वरतत्त्व, परमेश्वराचे त्याचेपण जाणणे, तदत्त्व, ईश्वरत्त्व, सोहम्
हुवल आख़िर = तो (अर्थात् अल्लाह) शेवटी आहे
हुवल अव्वल = तो (च) प्रथम आहे.
हुवल बातिन = तो आत आहे अर्थात् तो अव्यक्त आहे.
हुवल ज़ाहिर = तो बाहेर आहे अर्थात् तो व्यक्त आहे.
हुवल फुक़रा = साधुप्रीती
हुस्न = सौंदर्य
हू = तो, परमेश्वर / हूदय्यत = तदत्त्व
हूर = देवकन्या
हैरत = विस्मय, आश्चर्य
हौज़ कौसर = अमृत कुंड
हश्रतुल अर्ज़ = सरीसृप

---

**टीप :**

'हक़ीक़त-ए-मुहम्मदी' म्हणजे अल्लाहची सर्वप्रथम उक्ति 'कुन' अर्थात् 'भव', 'हो' ची अनुभूति.

'नूर-ए-मुहम्मदी' म्हणजे अल्लाहची सर्वप्रथम उक्ति 'कुन' अर्थात् 'भव', 'हो' ची अभिव्यक्ति.

'हक़ीक़त-ए-मुहम्मदी' मध्ये 'नूर-ए-मुहम्मदी' समाविष्ट आहे; परंतु 'नूर-ए-मुहम्मदी' मध्ये 'हक़ीक़त-ए-मुहम्मदी'चा समावेश नाही.

## ६५) शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर यांच्या 'दुचेश्मा'

| | |
|---|---|
| जलालियत | तमोगुण ।।१।। |
| कमालियत | शुद्ध सत्त्वगुण।।२।। |
| **मकानचार** | **स्थाने चार** |
| चश्म मकान | नेत्र स्थान ।।१।। |
| हलक महान | कंठ स्थान ।।२।। |
| कतब महान | हृदय स्थान ।।३।। |
| सिररे मकान | मूर्ध्नि स्थान ।।४।। |
| **भोग चार** | |
| सुरत दीदनी | स्थूळ भोग ।।१।। |
| वहमा | कल्पना प्रविक्रम।।२।। |
| नीद | निराचंद मूर्छना।।३।। |
| खुशआनी | आनंदावभास भोग ।।४।। |
| नासूत दर मलकूत | अकारो उकार |
| मलकूत दर जबरूत | मकारो ॐकार |
| लाहूत दर नासूत | ॐकार अहमेव |
| अक्लोम गुद सवदरी | अहमात्मा साक्ष |
| **अनसर पंज** | **पंच महाभूते** |
| खाक | पृथ्वी ।।१।। |
| अब | आप ।।२।। |
| आतश | तेज ।।३।। |
| बाद | वायू ।।४।। |
| हवा | आकाश ।।५।। |
| **हवासें दस १०** | **इंद्रिये दहा ।।१०।।** |
| शिनवाई | श्रोत्र ।।१।। |
| लसम | त्वचा ।।२।। |
| बिनाई | चक्षू ।।३।। |
| चेशिदन | जिव्हा ।।४।। |
| बोईदन | प्राण ।।५।। |
| गोईदन | वाचा ।।६।। |
| हस्त | पाणी ।।७।। |
| पाद | पाद ।।८।। |
| केर | शिश्न ।।९।। |
| कून | गुद ।।१०।। |
| दिल | अंत:करण ।।१।। |
| वहम | मन ।।२।। |
| अकल | बुद्धी ।।३।। |
| कतरा | चित्त ।।४।। |
| खुदी | अहंकार ।।५।। |
| नज़र | प्राणदृश्य ।।६।। |
| नज़र नाज़िर | दृश्य द्रष्टा ।।७।। |
| खुदा बंदा | जीव ईश्वर ।।८।। |
| ज़ात सिफ़त | माया ब्रह्म ।।९।। |
| नफ़ी इसबत | नित्यानित्य ।।१०।। |
| दाता बिना | ज्ञाता द्रष्टा ।।११।। |
| शाहीद | साक्ष ।।१२।। |
| शरा सलूक | कर्म नि:कर्म ।।१३।। |
| तोहीद | अद्वैत |
| भिहिष्त दोजख | स्वर्ग निरय |
| बसालत | ऐक्य |
| दुई | द्वैत |
| दानाईनादानगी | ज्ञानअज्ञान |
| खुद शिनास | आत्मज्ञान |
| जिकीर फिकीर | स्मरण विवेक |
| तफदूर | विचारणा |
| मुकर्बा | ध्यान ('मुराक़बा' पाहिजे) |
| नूर | प्रकाश |
| जुलुमात | अंधकार |
| फीरा का विसाल | योग वियोग |
| दरफीर | अहं ब्रह्मास्मिन |
| गंजे | पूर्ण |
| अला जमे जामी सिफत सार्ध – ब्रह्मेति | |
| मनामनी | मी माझे |

| | |
|---|---|
| सलीमीसुलीनकतरानफ़ी | वृत्तिलीन, तल्लीन |
| खुदपरस्ती | अहंकारी |
| खादिमुलफुकरा | साधुभजन |
| हुवल फुकरा | साधु प्रीती |
| पैगंबरी खास्त | देवता प्रकृती |
| फिरावून खास्त | असुरी प्रकृती |
| अजमत | सिद्धी |
| पाक अस्वा | शुद्ध जीव |
| नापाक अस्वा | मलीन जीव |
| पीर मुरीद | गुरूशिष्य |
| मुतकल्लीम | वाचक |
| तालब | साधक |
| मुराद | साध्ये |
| दुई बगुजार | आत्मज्ञान निरसन |
| यकशव | अद्वैत आत्मा होणे |
| हक़ीक़ी | आत्मज्ञानी |
| मीजाजी | वर्णाश्रम अभिमानी |
| किरमुन कातेबिन | चित्रगुप्त |
| सातों सिफ्त खुदा | सप्तगुण |
| सबलीत | ईश्वर |
| आलेम | सर्वज्ञ |
| इरादत | ईशत्व |
| कुदरत | सामर्थ्य |
| ह्युंन | जीवन |
| समीयुन | ऐकणे |
| बसीरून | देखणे |
| मुतकल्लेमुन | वाचक बोलणे |
| औजूद मौजूद | क्षेत्र क्षेत्रज्ञ |
| खुलासा | उकल |
| अशक माशुक | पुज्यापूजक |
| इश्क | प्रेम |
| नेकी बदी | पापपुण्य |
| हज | तीर्थभ्रमण |
| जाहेरबातीत | अंतरबाहिर |

| | |
|---|---|
| हकराह | सत्यमार्ग |
| कुलमन अंलेहफान | यदृष्टं तं नष्टं |
| नात | भक्ती |
| दिनदुनिया | इहपर |
| हुरा | देवकन्या |
| दरख्तोतुबा | कल्पवृक्ष |
| अमिया | अमृत |
| जाहेरबातिन | अंतरबाहिर |
| हक़राह | सत्यमार्ग |
| कुलमन अंलेहफान | यदृष्टं तं नष्टं |
| नात | भक्ती |
| दिनदुनिया | इहपर |
| हुरा | देवकन्या |
| दरख़्तोतुबा | कल्पवृक्ष |
| अमिया | अमृत |
| हिजाव जीवनीफ | मोहित व्याप |
| अमर | सत |
| जिया | जीव |
| अल्ला | ब्रह्म |
| खुदा | परमेश्वर |
| सीरसिफत | माया |
| असरसिफत | अविद्या |
| जिन इनस | देवमनुष्य |
| अरश | वैकुंठ |
| भीष्त | स्वर्ग |
| औलियां अंबियां | हरिहर ब्रह्मादिक |
| **किताब चार** | वेद चार |
| तौरयत | ऋग्वेद |
| जबूर | यजुर्वेद |
| इंजील | सामवेद |
| फुर्कान | अथर्व वेद |
| रिसाले | शास्त्रे |

# ६६) ॐ : उत्पत्ती, महत्त्व आणि पूर्ण ब्रह्माचे प्रतीक

ऐतरेय ब्राह्मणच्या २५ व्या अध्यायाच्या सप्तम खंडामध्ये ॐ ची उत्पत्ती आणि त्याची महत्ता वर्णित आहे. प्रजापतीने कामना केली की, ''मी प्रजा उत्पन्न करून अनेक होऊन जावे.'' त्याने तप केले आणि तप करून पृथ्वी, अंतराळ(अंतरिक्ष) आणि द्यौ या तीन्हीं लोकांची उत्पत्ती केली. हे तीन्हीं लोक तप्त झाल्यामुळे तीन ज्योती निर्माण झाल्या. पृथ्वीपासून अग्नी, अंतराळापासून वायू आणि द्यौलोकापासून आदित्य यांचे उदय झाले. आणि पुन्हा या तीन ज्योतिंचे तप्त होण्यामुळे तीन वेद उत्पन्न झाले. अग्नीपासून ऋग्वेद, वायुपासून यजुर्वेद आणि आदित्यपासून सामवेद उत्पन्न झाले. तीन्ही वेदांच्या तप्त होण्याने तीन शुक्र उत्पन्न झाले. ऋग्वेदापासून भूः, यजुर्वेदपासून भुवः आणि सामवेदपासून स्वः या तीन शुक्रांच्या तप्त होण्यामुळे 'अ' कार, 'उ' कार आणि 'म' कार हे तीन वर्ण उत्पन्न झाले, ज्यांच्या एकधा समकरणास (सामासिकतेमुळे) 'ओऽम' (ॐ) म्हटले जाते. हा ओंकार स्वर्ग-प्राप्तिचा हेतू आहे.

ॐ हा आदिनाद आहे. या नाद अथवा प्रकंपनामुळे समस्त लोक प्रकट होतात. हा सर्व मंत्राचा मूळ आहे. ॐ कार हा विश्वाचा आदिघटक द्रव्य आहे. म्हणजेच तो स्वयंभू आहे. शब्दब्रह्म हे ॐकाराचे व्यक्त रूप आहे. शब्दतत्त्व म्हणजेच 'अनाद्यनन्त अक्षरब्रह्म' होय. त्यामुळेच सृष्टिप्रक्रिया अर्थरूपाने भासते. समान संस्कृती चक्र ईश्वर इच्छेने प्रादुर्भूत होते आणि अन्तर्लीन होते. (डॉ. मुंशीराम शर्मा- ''भक्ति का विकास'' - पृ. १९८)

*''मम इच्छा संभव जग सारा । जीव चराचर विविध प्रकारा''*

संस्कृती चक्रामध्ये पाच मंडल आहेत. आमचा निवास ज्या मंडलामध्ये आहे त्यास स्थूल मंडल म्हणतात. याच्यावर सूक्ष्म मंडल, सूक्ष्माच्या वर कारण मंडल, कारण मंडलाच्या वर महाकारण मंडल अर्थात् साम्यावस्थाधारिणी जडात्मिका मूल प्रकृति आणि त्या मूल प्रकृतिवर चैतन्य वा पराप्रकृती कैवल्य पद जडरहित चैतन्य मंडलाचे अस्तित्व विद्यमान आहे.

कैवल्य मंडल निर्मल शाश्वत चैतन्य आहे, इतर सर्व मंडल चैतन्य सहित जड मंडल स्वरूपात माहीत होणे योग्य आहेत. प्रत्येक मंडलाच्या निर्मितीमध्ये केंद्र अवश्य असतो. परिणामतः कथित केंद्रांचे शब्द अवश्य आहेत. शब्दामध्ये आपल्या उगम स्थानावर आकर्षण करण्याचा स्वभाव प्रत्यक्षच आहे. यावरून हे सहजच स्पष्ट होऊन जाते की संस्कृति चक्राचा विकास शब्दापासूनच चालत आलेला आहे आणि त्यामुळेच सृष्टिच्या आवरणाच्या पलीकडे जाण्याचे अत्यंत युक्तियुक्त आधार वर्णित शब्दाशिवाय विशेष काहीच नाही. हा केंद्रीय शब्द वर्णात्मक असूच शकत नाही, याचे स्वरूप तर धन्यात्मक आहे. नादानुसंधान किंवा सुरत

शब्द योग हेच नाद किंवा धन्यात्मक शब्दांचाच होतो आणि शब्दाच्या आकर्षणामुळे सुरत शब्दयोगाचे फल अत्यंत ऊर्ध्वगतिपर्यंत पोहोचणे निश्चित आणि संसिद्ध सत्य आहे.

वर वर्णित सृष्टीचे पाच मंडल आवरणे आहेत. हे शरीर पिंड आणि संपूर्ण ब्रह्मांड जगत दोहोंना विशिष्ट रूपाने आच्छादित करतात. या प्रकृति कैवल्य स्वरूप मोक्षदायक परमेश्वराच्या अति निकटस्थ असल्यामुळे त्याच्या स्वरूपास पोहोचणे आणि त्याचे अप्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करण्यास सर्वथा योग्य मानवीय शुद्ध आत्माच असू शकतो कारण की हा परमेश्वराचा अंश आहे.

*''ईश्वर अंश जीव अविनासी ।*
*चेतन अमल सहज सुख रासी ।''*

यावरून हे स्पष्ट होते की जीव त्या अव्यक ब्रह्माचे शुद्ध अंश आहे जे निर्विकार बनूनच त्याचे सम्यक दर्शन करू शकते. हे नि:संशय आहे की स्वत:चे स्वत:स आणि ब्रह्म स्वरूपाचे अप्रत्यक्ष ज्ञान होणे किंवा स्वत:स स्वत:ची आणि प्रभुची प्राप्ती होणे हे ध्रुव सत्य आहे.

वरचा शब्द खालपर्यंत बऱ्याच लांबवर स्वाभाविकपणे पोहोचतो. सूक्ष्म तत्त्वांचे चिंतन स्थूल तत्त्वांच्या चिंतनांपेक्षा अधिक दीर्घ आणि गहन असते. रचनेमध्ये वरच्या बाजूस सूक्ष्मता आणि खालच्या बाजूस स्थूलता असते. प्रत्येक मंडल आपल्यापेक्षा खालच्या मंडलाहून सूक्ष्म आहे. प्रत्येक वरच्या मंडलाचे केंद्रीय शब्द प्रत्येक खालचे मंडल आपल्यापेक्षा खालच्या मंडलाहून सूक्ष्म आहे. प्रत्येक वरच्या मंडलाचे केंद्रीय शब्द प्रत्येक खालचे मंडल आणि त्याचे केंद्रिय शब्दाच्या कथनानुसार सूक्ष्म आहे. शेवटी सर्वात वरच्या कैवल्य मंडलाच्या केंद्रापासून अर्थात् ब्रह्मपासून उत्पन्न शब्द महाकारण मंडलाच्या केंद्रावर निश्चितपणे स्थित होऊ शकेल आणि त्या शब्दापासून आकर्षित्त होऊनच चैतन्य जीव परमेश्वरास भेटून त्याच विराट तत्त्व वा अति सूक्ष्म तत्त्वामध्ये विलीन होऊन जाईल. परम ब्रह्माचे अप्रत्यक्ष ज्ञान प्राप्त करण्याचे हे सूत्र सिद्धान्त अनादि काळापासून सर्वमान्य बौद्धिक संसृती आणि औपनिषदिक युगाबरोबर पौराणिक काळापर्यंतची अनुपम संसिद्धी राहिली आहे.

परम प्रभूमध्ये उत्थित हा आदि नाद वा शब्द ध्वनी 'ॐ' समस्त पिंड आणि ब्रह्मांडाच्या अंतस्थानामध्ये नित्य निरंतर अप्रतिहत आणि अविच्छिन्त स्वरूपाने ध्वनित होऊन सृष्टिच्या स्थितीपर्यंत पूर्णपणे ध्वनित होत राहील आणि याच्या स्थितीचे लोप झाल्यावर सृष्टि संसृती चक्राचे त्याच परम निराकार तत्त्वामध्ये विलीन - अंतर्लीन होईल. ऋषि-मुनींनी या अलौकिक आणि अनुपम निर्गुण नादास 'ॐ' म्हटले. त्यामध्ये सत्त्व, रज, तम त्रिगुणात्मक शक्तीचे पूर्ण स्वरूप पूर्ण ब्रह्म समाविष्ट आहे, ज्याला गीतेमध्ये श्री कृष्ण यांनी पूर्ण ब्रह्मचे स्वरूप संसिद्ध घोषित केले. हा ॐ ओंकार प्रणव ब्रह्म ब्रह्माचेच नसून, पूर्ण ब्रह्मचे सूचक आहे - ''तस्य वाचक: प्रणव:'' (वेद ४।२३) हे प्रणव ॐ एकाक्षर शब्द तत्त्व पुरुषांचे सार निगूढ तत्त्व आहे. याची साधना धानाभ्यासाद्वारे केल्याने मनुष्य ईश्वरीय गुणांनी परिपूर्ण होऊन जाईल.

(श्री राधागोविंद पातर - 'मानव और धर्म' - पृ. ९६-९८)

## ६७) ईश्वरापासून विश्व–विकासाचे सहा–सहा टप्पे आणि श्रेणी

(अबू नस्र बिन मुहम्मद इब्न तर्खन इब्न उज़लग, अल–फ़ाराबी कृत)

**क) निराकार षट्क**

**१) कर्ता पुरुष : ईश्वर –** ईश्वर हा सर्वशक्तिमान असा कर्ता पुरुष आहे. तो प्रथम सत्ता स्वरूप केवळ एक आणि वस्तू सत् आहे. त्याची सत्ता स्वत: कारण रहित असून ती सर्वांचे कारण आहे. तो अत्यंत पूर्ण, अपरिवर्तनशील, आत्मतृप्त परमशिव, चेतन, परम मन (विज्ञान) आहे. तो एक अद्वैत असून त्याची सत्ता परिपूर्ण आहे. ईश्वरामध्ये (पायथ्यागोरीय) आकृती अनंत काळापासून निवास करतात.

**२) कर्ता पुरुषापासून नऊ देवात्मा (फरिश्ते) प्रकट होतात.** या देवात्मा (आलम–अफ़लाक) पैकी प्रथम तर कर्ता पुरुषाप्रमाणेच असतो आणि तो (हिरण्यगर्भाप्रमाणे) लांबपर्यंत ब्रह्मांडाचे संचालन करतो. या प्रथम देवात्म्यापासून क्रमशः एकामागून एक आठ फरिश्ते, देवात्मा किंवा 'अभिमानी' देवता प्रकट होतात.

या दोन श्रेणी नित्य एकरस बनून राहतात.

**३) क्रियापरायणविज्ञान –** तिसऱ्या श्रेणीमध्ये क्रियापरायण विज्ञान (नफ़्स) चा समावेश होतो. यास पवित्र आत्मा पण म्हणतात. हेच क्रियापरायण विज्ञान (बुद्धी) स्वर्ग (आकाश) आणि पृथ्वीस जोडते.

**४) जीव –** चौथी श्रेणी जीवाची आहे. बुद्धी आणि जीव या दोन श्रेणी अद्वैत स्वरूपामध्ये न राहता मनुष्याच्या संख्येनुसार बहुसंख्यक असतात.

**५) आकृती –** पायथ्यागोरीय आकृती या भौतिक तत्त्वामध्ये मिसळून वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू निर्माण करण्यामध्ये सहाय्यक होतात.

**६) भौतिक तत्त्व –** निराकार स्वरूपात पृथ्वी, आप, तेज आणि वायू

यापैकी पहिले तीन अर्थात ईश्वर, देवात्मा आणि बुद्धी हे नेहमी नफ़्स (विज्ञान) स्वरूपात निराकार असतात. नंतरचे तीन अर्थात जीव, आकृती आणि भौतिक तत्त्व हे यद्यपि मुळात निराकार (अ – काय) आहेत, तरीपण शरीराच्या साह्याने (साथीने) ते आपसात संबंध प्रस्थापित करतात.

**ख) साकार षट्क**

(१) देव काय – शरीरधारी देवदूत (फ़रिश्ते) (२) मनुष्य काय – शरीरधारी मानव, (३) पशु (तिर्यक) काय–पशु, पक्षी आदि शरीरधारी, (४) वनस्पति–काय–वृक्ष, वनस्पती आदि साकार पदार्थ, (५) धातू – काय–सोने, चांदी आदि साकार पदार्थ, (६) महाभूत–काय–पृथ्वी, आप, तेज, वायू साकार स्वरूपात.

## ६८) भक्तांचे बारा प्रकार

| आध्यात्म घटक | ईश्वरानिष्ठ महात्मे (रिजालुल्लाह) | ईशजत : भक्त | अल्लाहचे अग्रगण्य गुण |
|---|---|---|---|
| १) क़लम-ए-आत्मा अल्लाह, परात्पर परब्रह्म | १) अक़ताब (कुत्ब) महाविश्वाधार महर्षी | १) मुवहि्हद - एकनिष्ठ एकेश्वरवादी भक्त | १) मालिक - अधीश्वर |
| २) कलम रूह, - आत्मा | २) ग़ौस - महात्मा | २) आरिफ़-ब्रह्मज्ञानी भक्त | २) कुद्दूस - निर्विकार |
| ३) लौहे - दिल चित्त, अंत:करण | ३) इमामान (इमाम) पथप्रदर्शक अधिनायक | ३) आशिक़-ईशप्रेमी भक्त | ३) स्सलाम कल्याणकारी |
| ४) अर्श - जिस्म, देह | ४) अवताद - स्थिरचित्त ईश्वरनिष्ठ भक्त | ४) साबिक़ - अग्रेसर भक्त | ४) मुअ्मिन - शांतीदाता |
| ५) कुर्सी - नफ्स, वासना | ५) अब्दाल - परिवर्तन निर्माता ईश्वरनिष्ठ भक्त | ५) मुहि्हब-ईशसखा भक्त | ५) मुहमिन - त्राता |
| ६) गंज-ए-मख़फ़ी ब्रह्मगुफ़ा | ६) अख़यार - कल्याणकारी ईश्वरनिष्ठ संत | ६) मुवक्किन - दृढविश्वासू भक्त | ६) अज़ीज - प्रबल |
| ७) अर्श व कुर्सी - ॐ कार पीठ | ७) अब्रार - ऋषी - मुनी | ७) मुकाशिफ़ दिव्यदृष्टीज्ञाता भक्त | ७) जब्बार - ताडक |
| ८) ज़ात - नाम | ८) नुक़बा (नक़ीब) - पूर्वसूचना देणारे ईश्वरनिष्ठ भक्त | ८) मुशाहिद - द्रष्टा भक्त | ८) मुतकब्बिर-प्रशंसनीय |
| ९) सिफ़त (सिफ़ात) रूप (रूपे) | ९) नुजबा कुलीन ईश्वरनिष्ठ संत | ९) सालिक-साधक (भक्त) | ९) अलीम - सर्वज्ञ |
| १०) नज़र - मन (दृष्टी) | १०) अमद - प्रतिष्ठित ईश्वरनिष्ठ महात्मा | १०) सादिक सत्यनिष्ठ भक्त | १०) हय्यु - चैतन्य |
| ११) फ़ना - मी नव्हे (नाही) (जीवात्मा नव्हे) | ११) मक्तूमान - अदृश्य, गुह्य ईश्वरनिष्ठ भक्त | ११) राज़ीब रज़ा संतुष्ट भक्त | ११) क़य्यूम - अविनाशी |
| १२) बक़ा तू आहेस (ब्रह्मच आहे) | १२) मुफ़्रदान एकटे ईश्वरनिष्ठ महात्मा | १२) मुरीद दृढ संकल्पी भक्त | १२) क़ादिर - समर्थ |

"(प्रेषित) मूसाच्या लोकांत एक गट असा देखील होता जो सत्यानुसार मार्गदर्शन करीत असे व सत्यानुसारच न्यास करीत असे आणि आम्ही त्या जनसमूहास **बारा घराण्यात** विभागून त्यांना स्वतंत्र **गटाचे** रूप दिले होते आणि जेव्हा मूसाकडे त्याच्या लोकांनी पाणी मागितले, तेव्हा आम्ही त्याला संकेत दिला की अमुक खडकावर आपली लाठी मार. म्हणून त्या खडकामधून **बारा झरे** फुटले आणि प्रत्येक **गटाने** आपला पाणवठा **निश्चित** केला." ७:१५९-६०

उपरोक्त बारा घराणे, बारा झरे, बारा गट म्हणजेच कोष्टकात आ अंकित ईशजन अर्थात भक्तांचे बारा प्रकार होत.

**षटक तौहीक (अद्वैत) चे सहा प्रकार –** १) तौहीद अकवाली, २) तौहीद अफझली, ३) तौहीद अहवाली, ४) तौहीद ज़ाती, ५) तौहीद सिफ़ाती,६) तौहीद तंज़ीही

**अल्लाहचे आद्य सर्वप्रमुख गुण –** अल्लाह (नाम) – परात्पर परब्रह्म, १) रहमान (दयाळू), २) रहीम (कृपाळू)

**द्वादश (बारा) सूफ़ी संप्रदाय –**

**क) शास्त्र अंतर्गत अर्थात ग्राह्य (१०) –** १) मुहासबियः, २) क़स्सारियः, ३) तैफ़ूरियः, ४) जुनेदियः, ५) नूरियः, ६) सुहेलियः, ७) हकीमियः, ८) ख़र्राज़ियः, ९) ख़फ़ीफ़ियः आणि १०) सय्यारियः

**ख) शास्त्र बहिर्भूत अर्थात त्याज्य (२) –** (११) हुलूलियः आणि (१२) हल्लाजियः

## ६९) नमाजमधील परिक्रमांचे (व सूफ़ीप्रणित साधनेमध्ये प्रयुक्त) क्रमशः सचित्र टप्पे

## नमाज : इस्लामी उपासने (भक्ती)चे मर्म (नमाजचे दार्शनिक विवेचन)

**नमाजचा उद्देश***

'नमाज' इस्लामची एक स्तंभ असून तिला धर्माचा मूळ पायाच म्हणता येईल. उपासना (आराधन) करणे ही माणसाची आंतरिक प्रेरणाच आहे. त्याचबरोबर उच्च ध्येय साध्य करणे हा तिचा स्वभावच आहे. सर्वात थोर अस्तित्व आणि सर्वांत उच्च प्रकारचा उद्देश अल्लाहच आहे. इस्लामी नमाजचा मुख्य उद्देश मानवात सबळ, प्रभावी व्यक्तिमत्त्व निर्माण करणे आणि त्याच्या विकासाच्या अपेक्षा उत्तम पद्धतीने साध्य करणे हाच आहे. नमाजास दुर्लक्षित करणे म्हणजे मानवी स्वभावात असलेल्या चांगल्या गुणांची हेटाळणी करणे होय. उपासना (आराधना) करणे व प्रेम करण्याच्या हक्कापासून मानवी स्वभावाला नामोहरम करण्यासारखे आहे; चांगुलपणा आणि सज्जनपणाच्या हेतुंना मूठमाती देणे आणि त्याच्या विकासाच्या हक्कांना हिरावून घेणे होय.

ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की अल्लाहला मानवाची मुळीच गरज नाही; कारण तो प्रत्येक गरजेपासून मुक्त आहे. तो निरपेक्ष आहे, निस्पृह आहे, खरा गरजवंत मानवच आहे. त्याला फक्त मानवी कल्याणात आणि विकासात स्वारस्य आहे. जेव्हा तो नमाजवर भर देतो व आमच्यावर एखादी जबाबदारी सोपवितो तर त्याचा अर्थ हाच की तो आम्हाला मदत करू इच्छितो. कारण आम्ही जी काही चांगली कामे करतो ती आमच्या स्वतःच्या लाभासाठीच करतो आणि जी काही वाईट कामे करतो आमच्या स्वतःच्या आत्म्याविरुद्धच करतो. या बाबतीतदेखील मानव आकर्षणाचा केंद्रबिंदूच ठरतो. म्हणजेच मानवास कर्मस्वातंत्र्य देऊन तो त्याची कसोटी घेऊ इच्छितो. नमाज (इस्लामी प्रार्थना, उपासने) पासून अनेक लाभ पोचतात. याशिवाय पुण्यलाभ हे वेगळेच. नमाज एक सिद्धान्त किंवा रूढीवर आधारलेली केवळ एक भावना नसून, ते एक महान सत्य आणि आध्यात्मिक प्रयोग आहे.

**नमाजचे प्रभावी परिणाम खालीलप्रमाणे आहेत –**

१) अल्लाहचे अस्तित्व आणि त्याच्या चांगुलपणाच्या श्रद्धेला नमाज दृढमूल करते आणि या विश्वासाला मानवी हृदयात खोलवर प्रवाहित करते.

२) इस्लामी उपासना अर्थात् नमाज याच तऱ्हेच्या विश्वासाला दृढ करून व्यावहारिक जीवनात रचनात्मक स्वरूप देते.

३) नमाज मानवाला त्याच्या अंगातील चांगुलपणा, थोरपणा आणि उच्च चारित्र्याला ओळखण्यासाठी आंतरिक प्रेरणा देते.

४) नमाज हृदयाला स्वच्छ करून मनाच्या विकासाला कारणीभूत ठरते; विवेकाला जागृत करून आत्म्याला शांती देते.

५) नमाज मानवाच्या चांगल्या भावनांना उत्तेजन देऊन वाईट भावनांवर आवर घालते.

इस्लामी उपासना अर्थात नमाजचे विश्लेषण केल्यास असे आढळून येते की ही केवळ शारीरिक हालचाल किंवा पवित्र ग्रंथा (कुरआन) चे नुसते पठणच नसून; उलटपक्षी नमाज बौद्धिक विवेकपूर्ण ध्यान, आत्मिक भक्ती, चारित्र्याचा विकास आणि शारीरिक व्यायामाची एक अद्वितीय समष्टी व सूत्रच होय. हा एकमेव इस्लामी प्रयोग आहे. ज्यात शरीराचा प्रत्येक अवयव अल्लाहच्या उपासनेत – आराधनेत मन आणि आत्म्याशी सहयोग करतो.

**नमाजची वैशिष्ट्ये अशी रेखाटता येतील –**

१) नमाजमुळे वेळेचे बंधन पाळण्याची शिस्त निर्माण होते. वेळेच्या महत्त्वाचे भानासोबत शारीरिक कवायतीच्या व्यायामाच्याबरोबर मानसिक समाधान पण प्राप्त होते. इच्छाशक्तीचा धडा मिळतो. नमाज म्हणणे 'इस्लामी योग – क्रियाच' होय.

२) अल्लाहच्या उपासनेची आणि इतर उच्च ध्येय करण्याची सवय.

३) अल्लाहची आणि त्याच्या चांगुलपणाची आठवण करून देणारे उत्तम साधन

४) आध्यात्मिक आणि चारित्र्याच्या विकासाची बीजे.

५) जीवनाच्या सरळ मार्गासाठी उत्तम मार्गदर्शक.

६) मार्गभ्रष्टता, वाईटपणा, अपवित्रता यांच्या विरोधात उत्तम दक्षता.

७) भक्कम एकजूट, बंधुभाव व खऱ्या समानतेचे प्रदर्शन.

८) अल्लाहचे आभार मानण्याची व त्याची स्तुती करण्याची उत्तम पद्धत.

९) आंतरिक शांती व टिकाऊपणाचा मार्ग.

१०) सहनशीलता, आशा, आत्मविश्वास आणि धैर्याचे स्रोत.

११) आध्यात्मिक आनंदाची अनुभूती प्राप्त होते.

अशी आहे इस्लामी नमाज! मानवी कल्याणाची गुरूकिल्ली!

ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की इस्लामने नमाजाच्या वेळा अशा तऱ्हेने निश्चित केलेल्या आहेत की शारीरिक पोषणाबरोबर आत्मिक ताजेतवानेपणा टिकून राहतो व त्याचबरोबर मनाला शांती वाटून शरीरालाही विश्रांती लाभते. नमाजी (भक्त) धर्म आणि जीवन यांची एकजूट निर्माण करून सर्व दिवसभर अल्लाहच्या अस्तित्वाची जाणीव आपल्या मनात ठेवतो. तो आपला रोजचा व्यवहार आत्मिक भावनेवर

संपवितो आणि भक्कम पायावर चारित्र्याच्या प्रतिष्ठेची उभारणी करतो. त्याचे सर्व कार्यक्षेत्रावर धर्माचे वर्चस्व आढळून येतो. नमाज ही दैवी परीक्षाच होय ! नमाज ही साक्षात् श्रद्धावंतासाठी दिव्यारोहण ('मेअराज') आहे. ती ईश्वर – भक्ताची उत्कर्ष यात्राच होय. कारण 'मेअराज'मध्ये प्रेषित मुहम्मद स. यांना ज्या दिव्य अनुभूती आल्या जणू त्यांचीच अति अल्पांशी पडछायी अनुभूतिची जाणीव नमाजी भक्तांना होते. या दिव्य अनुभूतिचा लाभ नमाजींना मिळवून देणे हा नमाजचा आध्यात्मिक उद्देश आहे.

* (हम्मूदाह अब्दल लती – 'इस्लामचे खरे स्वरूप', पृ. ९३ – ९९)

**नमाजचे प्रकार व तदनुसार तिचे टप्पे***

नमाजपठण दोन प्रकारे केले जाते – एक सामुदायिकपणे व दुसरे एकट्याने. सामुदायिक नमाजास 'नमाज – ए – जमात' म्हणजेच सांधिक नमाज असे म्हणतात; तर एकट्याने पढलेल्या नमाजास 'नमाज – ए – मुफरिद' अर्थात वैयक्तिक किंवा एकल नमाज असे म्हणतात. मात्र जमाअत ने नमाज पढणेस उत्तुंग श्रेष्ठता प्राप्त असून जाणूनबुजून एकाकी वा एकल नमाज पढणेस जवळजवळ मनाई करण्यात आली आहे. काही विवशता असेल तर ती बाब वेगळी! नमाज – ए – जमाअतला एकल नमाजच्या २७ पट अधिक श्रेयांक अर्थात् पुण्य आहे. ''परंतु फर्ज व्यतिरिक्त अन्य नमाज व्यक्तीने स्वगृही पठण केलेले श्रेष्ठ आहे.'' – हजरत पैगंबर स.

**क) नमाज – ए – जमाअत (सांघिक नमाज)**

१) नमाजच्या काही वेळेपूर्वी मस्जिद मधून अजान देण्यात येते. (अजान देणाऱ्यास मुअज्जिन अर्थात बांगी म्हणतात.)

२) 'अजान'चे स्वर ऐकू येताच व्यक्तीने मस्जिदच्या दिशेने चालू लागावे.

३) मस्जिद प्रवेशावेळी ''अल्लाहुम्मफ्तह ली अब्वाब रहमतिका'' अर्थात् ''अल्लाह! माझ्यासाठी तुझ्या कृपेचे द्वार (दार) उघड.'' ही प्रार्थना म्हणावी.

४) पेशइमाम (अधिनायक, पुरोहित) च्या मागे नियमबद्ध रांगेत उभे राहावे. अशा नमाजींना 'मुक़्तदी' म्हणतात.

५) पहिल्या रांगेतील एक व्यक्ती 'इकामत' (नमाज सुरू होण्याची उद्घोषणा) म्हणते. अशा नमाजीस 'मुकब्बिर'' (ईशप्रशस्ती प्रस्तोता) म्हणतात.

६) पेशइमाम 'अल्लाहु अक्बर' म्हणत आकर्ण दोन्ही हात उचलून उदरावर बांधून उभे राहतात.

७) मुक्तदीने संकल्प (निय्यत) करावा. उदा. 'जुहरची चार रकाअत फर्ज नमाज अल्लाहसाठी काबारमुख होत ताबे इमामां (अधिनायक)च्या.

८) नंतर 'अल्लाहु अक्बर' म्हणत हात आकर्ण वर उचलून बांधावेत आणि अदबीने उभे राहावे.

९) निम्न स्वरात म्हणजेच मौनपणे 'सना' पठण करावे – ''सुब्हान कल्लाहुम्म व बिहम्दिक व तबारकस्मुक व तआलाजाद्दुक व ला इलाह गैरूक.'' अर्थात् ''अल्लाह ! आम्ही तुझे पावित्र्य स्वीकारून तुझी प्रशंसा करतो. तुझे नाम समृद्धीदायक आहे. तू सर्वश्रेष्ठ, महामहिम आणि एकमेव पूज्य आहेस.''

१०) ‘तअव्वुज’ म्हणावे – ‘‘अऊजुबिल्लाहि मिनशैता निर्रजीम ‘‘अर्थात’’ दृष्टात्मा शैतानापासून बचावासाठी मी अल्लाहला शरण जातो.’’

११) ‘तस्मिया’ (परमेश्वर दयाळू व कृपाळू असल्याचे निवेदन) पठण करावे – ‘‘बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहिम’’ अर्थात ‘‘अति दयावंत व कृपावंत अल्लाहच्या नामे प्रारंभ करतो.’’

१२) यानंतर काहीही पठण न करता ‘मुक्तदी’ने अदबीने शांत उभे राहावे. चित्त केवळ नमाजवर केंद्रित करून दृष्टी त्या ठिकाणी केंद्रित करावी जेथे सज्दा (प्रणिपात) क्षणी मस्तक ठेवेल.

१३) इमाम सूरः फातिहा (मंगलाचरण अध्याय) नंतर अन्य सूरः चे (अध्यायाचे) पठण करतील. फज्र, मग्रिब व इशावेळी ‘तिलावत’ (कुरआन श्लोक पाठ) सस्वर सूर : पठण होते; तर जुहूर व अस्र वेळी मौन स्वरूपात. म्हणजेच दिवसातील नमाज मौन; तर रात्रीच्या नमाज सस्वर स्वरूपात अदा केल्या जातात.

१४) इमाम ‘अल्लाहु अक्बर’ म्हणत खाली वाकतात. यास ‘रूकू’ (नमन, संधी) म्हणतात. मुक्तदीने ‘अल्लाहु अक्बर’ म्हणत रुकूअ करावा. या प्रक्रियेत तळहात गुडघ्यावर टेकवत कंबरेतून खाली वाकावे. मस्तक व कंबर समपातळीवर व हात बरगड्यांपासून विभक्त असावेत. या अवस्थेत ‘सुब्हान रब्बियल अजीम’ अर्थात ‘‘पावित्र्यगुण गातो पालनकर्त्याचे’ हे वचन तीन वा पाच वेळा म्हणावे.

१५) इमाम ‘समिअल्लाहुलिमन हमिदह’ अर्थात ‘‘ज्याने ज्याने अल्लाहची प्रशंसा केली. त्याचे त्याचे ऐकले’’ असे म्हणत ‘सरळ सरळ’ उभे राहतात. प्रत्युंतरात ‘मुक्त’दी ने ‘रब्बना लकल हम्द’ अर्थात ‘‘अल्लाहसाठीच ‘सर्व’ प्रशंसा’’ म्हणत उभे रहावे. आपले दोन्ही हात बाजूस सोडलेले असावेत.

१६) इमाम ‘अल्लाहु अक्बर’ म्हणत नतमस्तक होतात. यास ‘सज्दा’ (प्रणिपात) म्हणतात. मुक्तदीनेही ‘अल्लाहु अक्बर’ म्हणत सज्दा करावा. या प्रक्रियेत क्रमशः गुडघे, दोन्ही बाजूस तळ मध्यभागी प्रथम नाक व नंतर कपाळ टेकवावे. मनगट व कोपर (खोपर) टेकलेले नसावे. हात बरगड्यांपासून विभक्त असावेत. या अवस्थेत ‘सुब्हान रब्बियल आला’ अर्थात ‘‘पावित्र्य गुण. सर्वश्रेष्ठ पालनकर्त्याचे’’ हे वचन तीन वा पाच वेळा म्हणावे.

१७) इमामती ‘अल्लाहु अक्बर’ म्हटलेनंतर मुक्तदीने तेच म्हणत उठून बसावे. यास ‘जलसा’ (लघ्वासन) म्हणतात.

१८) इमाम बरोबर पुनःश्च ‘अल्लाहु अक्बर’ म्हणत दुसरा सज्दा करावा. तेच वचन ‘सुब्बान रब्बियल अल्ला’ तीन वा पाच वेळा म्हणावे.

१९) इमामांच्या ‘अल्लाहु अक्बर’ या शब्दास प्रतिसाद देत उठून उभे राहावे आणि अदबीने हात बांधावेत.

२०) दुसरी ‘रकाअत’ (उपासना चक्र) तशीच पठण करावी. अर्थात् एक रूकूअ व दोन सज्दे नंतर बसावे. या अवस्थेस ‘कादा’ (उपविश्यासन) म्हणतात. या प्रक्रियेत दोन्ही पाय समानांतर ठेवत डाव्या तळव्यावर बसावे. उजवा पाय उभा ठेवावा. कंबर ताट ठेवत तळहात गुडघ्यांवर टेकवावेत. या स्थितीत अत्तहिय्यात (प्रार्थना विविधा) व दरूद शरीफ (पवित्रत अंतरासत्ती) पठण करून इमामनी

''अस्सलाम अलैकुम व रहमतुल्लाह'' म्हटलेनंतर मुक्तदीने तेच म्हणत प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे सलाम फेरावा. (सलाम = शांती निवेदन)

२१) नमाजनंतर दुआ (कृपायाचना) करावी.

२२) जमाअतचा महत्त्वाचा नियम असा की इमामनी श्लोक उच्च स्वरात - सस्वर; तर मुक्तदीने निम्न स्वरात म्हणणे मौनपणे (मनातल्या मनात) म्हणावीत.

२३) ही झाली दोन रकाअत नमाज - ए - जमाअतची पद्धत. जर तीन रकाअत (उदा. मग्रिब)ची नमाज असेल तर दोन रकाअतनंतर 'कादा'मध्ये बसले वर केवळ 'अत्तहिय्यात' पठण करून 'अल्लाहु अक्बर' म्हणत उभे राहावे. तिसऱ्या रकातनंतर 'कादा'मध्ये बसुन 'अत्तहिय्यात' व 'दरूद शरीफ' पठण करून सलाम फेरावा.

२४) जर 'नमाज - ए - जमाअत' चार रकात असेल (जुहर, असर व इशा) तर दोन रकात नंतर 'कादा' मध्ये फक्त 'अत्तहियात' पठण करून उभे राहावे व नंतर दोन रकात पठण करून 'कादा अत्तहियात व दरूद शरीफ नंतर सलाम फेरावा.

**ख) नमाज - ए - मुनफरिद (वैयक्तिक किंवा एकल नमाज)**

घरी (इतरत्र) एकटे नमाज पडणाऱ्यास 'मुनफरिद' म्हणतात.

१) काबामुख (अर्थात पश्चिममुखी) होऊन उभे रहा.

२) संकल्प (नियत) करा.

३) ''अल्लाहु 'अक्बर' म्हणत 'हात' आकर्ण उचलून उदरावर बांधावेत. डावा हात खाली आणि उजवा हात वर असावा.

४) सना, तस्मिया व तअव्वुज पठण करावे.

५) सूर : फतिहा पठण करून 'आमीन' म्हणावे.

६) कुरआन शरीफ मधील कोणताही लघु सूर : म्हणावा. एक महत्त्वाचा नियम असा की दुसऱ्या रकातमधील सूर : पूर्वीच्या रकातीमध्ये तुलनेत कुरआन शरीफमध्ये देखील नंतरच्या क्रमाने आला असावा. फर्ज मध्ये केवळ पहिल्या दोन रकातीतच सूर : फातिहा नंतर अन्य सूर : पठण करावे; तर सुन्नतमध्ये सर्व रकातीत.

७) रुकूअ करावा.

८) रुकूअ नंतर 'समिअल्लाहुलिमन हमिदह सहित 'रब्बना लकल हम्द' म्हणावे.

९) सज्दे करावे.

१०) दोन रकाअत नंतर अत्तहिय्यात पठण करावे, दरूद शरीफ व दुआ म्हणत सलाम फेरावा. नमाज तीन वा चार रकाअतची असेल तर केवळ अत्तहिय्यात पठण करून उभे राहावे.

*(डॉ. अब्दुल वाहिद अर्द्धरहमान शेख - 'मानवतेचा दीपस्तंभ' - पृ. १२०-२३)

**नमाजमध्ये पठित सूर : क्रम**

१) दोन फर्ज :- १ ली रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : कौसर
   २ री रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : इख्लास

२) तीन फर्ज :- १ ली रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : अस्र
   २ री रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : इख्लास
   ३ री रकाअत - फक्त सूर : फातिहा

३) चार फर्ज :- १ ली रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : कद्र
   २ री रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : नास
   ३ री रकाअत - फक्त सूर : फातिहा
   ४ थी रकाअत - फक्त सूर : फातिहा

४) दोन सुन्नत :- १ ली रकाअत : फातिहानंतर सूर : कौसर
   २ री रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : इख्लास

५) चार सुन्नत :- १ ली रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : अस्र
   २ री रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : कौसर
   ३ री रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : इख्लास
   ४ थी रकाअत - सूर : फातिहानंतर सूर : नास

**नवनमार्जीसाठी काही लघु सूर : (अध्याय) (क्रमशः)**

**१) सूर : फातिहा**

''अलहम्दुलिल्लाहि रब्बिल आलमीन. अर्रह्मानिर्रहीमि मालिकि यौमिद्दीन. इय्याकनबुदु व इय्याकनस्तईन. अिह्दिनस्तिरातल् मुस्तक़ीम सिरातल्लज़ीन अन् अम्त अलैहिम गैरिल 'मग्ज़ूबि' अल्लैहिम वलज्जाऽल्लीन.'' (आरंभ अल्लाहच्या नावाने जो अत्यंत दयाळू व कृपाळ आहे.)

सर्व स्तुतीचा अधिकारी अल्लाह हाच (आहे) जो सर्व जगांचा विधाता आहे. (जो) कृपाशील (व) दयाळू (आहे). निवाड्याच्या दिवसाचा अधिपति. (हे अल्लाह) आम्ही केवळ तुझीच उपासना करतो आणि फक्त तुझ्याकडेच सहाय्याची याचना करतो. आम्हाला सन्मार्ग दाखव. अशा लोकांचा मार्ग ज्यांच्यावर तुझा कृपावर्षाव झाला. (आम्हाला) नको त्यांचा मार्ग ज्यांच्यावर तुझा प्रकोप झाला आणि जे मार्गभ्रष्ट झाले.)

**२) सूर : अस्र**

''वल्असरि इन्नल - इन्सान लफी खुसरिन. इल्लल्लजीन आमनू व आमिलुस्सालिहाति व तवासौ बिल्हक्कि व तवासौ बिस्सब्रि.'' (ढळत्या युगाची शपथ. निःसंशय, मनुष्य हा (सदैव) तोट्यात आहे. पण यास अपवाद केवळ त्यांचा आहे, जे श्रद्धा बाळगतात व सत्कर्मे करतात, आणि एकमेकास स्थिरचित्त (सहनशील) राहण्याचा उपदेश करतात.)

**३) सूर : कौसर**

''इन्ना आतैना कल् कौसर. फसल्लि लि रब्बिक वन्हर. इन्न शानिअक हुवल अब्तर.''

([पैगंबर!] नि:संशय, आम्ही तुला (प्रत्येक वस्तूची) विपुलता प्रदान केली आहे. म्हणून आपल्या विधात्याची प्रार्थना कर (नमाज पढ) आणि (त्याच्यासाठी) त्याग कर. नि:संशय, तुझा तिरस्कार करणारा तुझा शत्रूच (सर्व चांगल्या गोष्टींपासून) वंचित राहणार आहे.)

**४) सूर : नस्र**

''इजा जा अ नस्रुल्लाहि वल्फतहु व रऐतन्नास यदखुलून फी दीनिल्लाहि अफवाजन. फसब्बिह बिहमदि रब्बिक वस्तगफिरहु इन्नह कान तव्वाबन्''

(जेव्हा अल्लाहचे साहाय्य पोचते व (परिणामी) विजय प्राप्त होतो, आणि तू पाहतोस व लोकांच्या झुंडीच्या झुंडी अल्लाहच्या धर्मात दाखल होत आहेत, तेव्हा तू आपल्या विधात्याच्या पावित्र्याचे (त्याच्या) स्तुतीसह गुणगान कर, आणि त्याची क्षमा याचना कर. नि:संशय, तो वारंवार दया करणारा आहे.)

**५) सूर : इख्लास**

''कुल् हुवल्लाह अहद. अल्लाहुस्समद. लम यलिद् वलम् यूलद. वलम् यकुल्लहू कुफवन अहद.''

(तू असे) म्हण (की), तो अल्लाह एकच आहे. तो निरपेक्ष (निस्पृह) आहे. तो ना जनिता आहे ना जन्य आणि तत्सम कोणीही नाही.)

**६) 'सूर:' फलक**

''कुल् अऊज बि रब्बिल फलक. मिन शर्रि मा खलक व मिन् शर्रि गासिकिन इजा वकूब. व मिन् शर्रिन्नफ्फासाति फिल उकद व मिन् शर्रि हासिदिन इजा हसद.''

(तू असे) म्हण (की), मी शरण जाऊ इच्छितो (त्या) सृष्टी निर्मितीच्या स्वामीला, त्याने जे काही निर्मिले आहे त्यांच्या अपायापासून (वाचण्यासाठी), आणि रात्र जेव्हा पसरते (तेव्हा) तिच्या अपायापासून (वाचण्यासाठी), आणि (ऋणानुबंधाच्या) गाठित (वितुष्ट) फुंकणाऱ्यांच्या अपायापासून (वाचण्यासाठी), आणि मत्सर करणारे जेव्हा मत्सर करतात (तेव्हा) त्यांच्या अपायापासून (वाचण्यासाठी).

**७) सूर : नास**

'कुल अऊज बि रब्बिन्नासि मलिकिन्नासि इलाहिन्नासि मिन् शर्रिल वसवासिल ख़न्नासि. अल्लजी युवस्विसु फी सुदूरिन्नासि मिनल जिन्नति वन्नासि.''

(पैगंबर) सांगा, मी लोकांच्या पालनकर्त्याचे शरण प्राप्त करू इच्छितो, जो लोकांचा सर्वाधिपती (व) लोकांचा ईश्वर आहे, जो लपूनछपून बहकाविण्याचे काम करतो अशा (शैतानाच्या) अपायापासून (स्वत:ला वाचवण्यासाठी मला तुझे शरण हवे आहे.) जो लोकांच्या मनांत वाईट विचार भरतो, मग तो जिन्नां (किन्नरां) पैकी असो वा मनुष्यांपैकी.)

**अत्तहिय्यात (उपासना विविधा)**

''अत्तहिय्यातु लिल्लाहि वस्सलवातु व तय्यिबातु अस्सलामु अलैक अय्युहन्नबिय्यु व रहमतुल्लाहि व

बरकातुहू. अस्सलामु अलैना व अला इबादिल्ला हिस्सालिहीन. अश्हदु अल्ला इलाह इल्लल्लाहु व अश्हदु अन्न मुहम्मदन् अब्दुहू व रसूलुहू.''

(सर्व प्रकारच्या वाचिक, शारीरिक आणि आर्थिक उपासना अल्लाहसाठीच आहेत. हे प्रेषित! तुम्हाला सुख, शांती, सुरक्षा लाभो, अल्लाहची कृपा आणि समृद्धीही लाभोत. सुख, शांत आणि सुरक्षेचा लाभ आम्हाला आणि अल्लाहच्या सदाचारी भक्तजनांना व्हावा. मी साक्ष देतो की अल्लाहशिवाय अन्य कोणीही उपासनेस योग्य नाही. तसेच मी साक्ष देतो की प्रेषित मुहम्मद (त्यांना शांती लाभो) हे अल्लाहचे भक्त आणि प्रेषित आहेत.)

**दरूद शरीफ (पवित्र अंतरासत्ती)**

''अल्लाहुम्म सल्लि अला मुहम्मदिवं व अलाऽऽ आलि मुहम्मदिन् कमा सल्लैत अलाऽऽ इब्राहीम व अलाऽऽ आलि इब्राहिम इन्नक हमीदुम मजीद.

अल्लाहुम्म बारिक अला मुहम्मदिंव व अलाऽऽ आलि मुहम्मदिन् कमा बारक्त अलाऽऽ इब्राहीम व अलाऽऽ आलि इब्राहीम इन्नक हमीदुम मजीद.

(हे अल्लाह! तुझा 'कृपावर्षाव' व्हावा, मुहम्मद स. यांचेवर आणि मुहम्मद स. यांच्या वंशजावर, जसे तू कृपावर्षाव केला आहेस इब्राहीम अ. यांचेवर आणि इब्राहीम अ. यांच्या वंशजावर, नि:संशय तू प्रशंसेस पात्र आणि महान आहेस.

हे अल्लाह! तुझ्या देणग्यांची विपुलता व्हावी, मुहम्मद स. यांचेवर आणि मुहम्मद स. यांच्या वंशजावर, जशी तू तुझ्या देणग्यांची विपुलता केलीस इब्राहीम अ. यांचेवर आणि इब्राहीम अ. यांच्या वंशजावर, नि:संशय तू प्रशंसेस पात्र आणि महान आहेस.)

**दुआ (कृपायाचना)**

''अल्लाहुम्म इन्नी जलम्तु नफ्सी जुल्मन कसीरंव व ला यग्फिरूज्जुनूब इल्ला अन्त फगफिर्ली मगफिरतम मिन् इन्दिक वरहमनी इन्नक अन्तल् गफूरूर्रहीम.''

(हे अल्लाह! मी माझ्या आत्म्यावर अत्यंत जुलूम केला आहे आणि तुझ्याशिवाय इतर कोणीच अपराधांना माफ करू शकणारा नाही. म्हणून तूच आपल्याकडून विशेष क्षमेने मला क्षमा कर आणि माझ्यावर दया कर. नि:संशय, तूच क्षमा करणारा आणि अत्यंत क्षमा करणारा असा आहेस.)

**दुआ – ए – कुनूत (विनयपूर्ण कृपायाचना)**

''अल्लाहुम्म इन्ना नस्तईनुक व नस्तफिरूक व नुअमिनु बिक व नतवक्कुल अलैक व नुस्नी अलैकल खैर व नशकुरूक व ला नकफुरूक व नख्लउ व नतरूकु मंय यफजुरूक, अल्लाहुम्म इय्याक नअबुदु व लक नुसल्ली व नसतजुदु व इलैक नसआ व नहफिदु व नरजू रहमतक व नख्शा अजाबक, इन्न अजाबक बिलकुफ्फारि मुलहिक.'' (हे अल्लाह! नि:संदेह आम्ही तुझी मदत मागतो आणि तुझ्याकडे मोक्षाची याचना करतो आणि तुझ्यावर श्रद्धा ठेवतो आणि तुझा भरवसा करतो आणि तुझी खूप चांगली प्रशंसा करतो आणि तुझे आभार मानतो आणि तुझ्याशी कृतघ्न होत नाही आणि जी व्यक्ती तुझी अवज्ञा करते तिच्याशी विभक्त होऊन त्यांची संगत सोडून देतो. हे अल्लाह! आम्ही तुझी उपासना करतो आणि तुझ्यासाठीच नमाज अदा

करतो आणि तुझ्यासमोर मस्तक टेकवतो आणि आम्ही तुझ्याचकडे धावत व त्वरेने येतो आणि तुझ्या दयेचे इच्छूक आहोत आणि तुझ्या शिक्षेला आम्ही घाबरतो. खचितच तुझी शिक्षा तुला न मानणाऱ्याला (नाकारणाऱ्यास) होणार आहे.)

**नमाजच्या (नमाजमधील) कृती***

**नमाज अशी सुरू होते :–**

'अजान' संपताच अल्लाहचे दास (भक्त) नमाजासाठी सज्ज होतात आणि ते नमाजाची सुरुवात पूर्वी अजानात उच्चारलेल्या वाक्यांनी करतात. याला 'इकामा' म्हणजेच नमाज सुरू होत असल्याची घोषणा वा नमाजसाठी तत्पर होण्याचे आवाहन, असे म्हणतात. अजानामधील वाक्यांत दोन प्रकारचे फरक करून 'इकामा' उच्चारतात (क) इकामा लवकर (भरभर) आणि ऐकण्यात येईल अशा हळू आवाजात उच्चारतात, (ख) ''कद कामतिस्सला'' (नमाज सज्ज आहे) पाचव्या वाक्यानंतर हे वाक्य दोनदा उच्चारले पाहिजे. नंतर सहावा आणि सातवा भाग शेवटपर्यंत नेहमीप्रमाणे उच्चारावा.

**नमाजच्या कृती**

जेव्हा नमाज पडणारा माणूस वजू केल्यानंतर अजान ऐकतो आणि नमाजसाठी सज्ज होऊन ''इकामा'' उच्चारतो तेव्हा नमाजाची खालील कृती सुरू होतात ÷

उदाहरणार्थ – फजर (सूर्योदयापूर्वीची वा प्रात:काळची)ची नमाज

(सलातुल फजर) या नमाजात प्रथम दोन रकात सुन्नत पडतात. त्याच्यानंतर दोन रकात फर्ज पडतात. हे दोन्ही म्हणजे सुन्नत व फर्ज एकाच पद्धतीने पडतात, फरक इतकाच की नमाजचा निश्चय वा संकल्प (निय्यत) तोंडाने बोलताना मी सुन्नत नमाज पडतो आणि फर्ज पडताना मी फर्ज पडतो असे शब्द व्यक्त केले पाहिजे. नमाजाच्या कृतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे –

**नमाजमधील कृती**

**कृती क्र. १ :–** नमाज़ पडणारा माणूस नम्रतापूर्वक उभे राहून किबल्याच्या दिशेकडे म्हणजे भारतात सहसा पश्चिम दिशेकडे तोंड करतो. (चित्र क्र. १) कानापर्यंत आपले दोन्ही हात उचलताना (चित्र क्र. २) असे म्हणतो, 'नवायतो ओ सल्ली सलातील फजर (मी प्रात:काळची सुन्नत नमाज पढण्याचा निश्चय करतो) किंवा फर्ज नमाज असल्यास (फर्ज सलातील फज्र) असे म्हणून तोंडाने 'अल्लाहो अकबर' म्हणतो, नंतर तो हात उचलून 'अल्लाहो अकबर' म्हटल्यानंतर आपल्या शरीराच्या मध्यभागी म्हणजे कंबरेखाली बेंबीजवळ अगोदर डावा हात ठेवून त्याच्यावर उजवा हात ठेवतो. (चित्र क्र. ३)

याचा अर्थ असा की मी सूर्योदापूर्वीची सुन्नत किंवा फर्ज नमाज पढण्याचा निश्चय (तिय्यत) करतो.

**कृती क्र. २ :–** नंतर तो खालील वाक्य हळू आवाजात उच्चारतो. 'सुबहात कल्ला हुमा व बिहमदेका व तबारक् अस्सोका व ताअला जद्दुका व ला इलाहा गैरोका' अर्थात पवित्रता तुझ्यासाठीच आहे. हे अल्लाह आणि तुझीच स्तुती आहे आणि तुझे नाव शुभ आहे आणि सर्वोच्च स्थानी आहे. तुझ्या शिवाय कोणीच ईश नाही.

'अऊजो बिल्लाहे मिनश शैतानिर्रजीम. बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहिम.

अर्थात् मी धिक्कारहार्य शैतानापासून तुझ्या रक्षणाची याचना करतो. अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू आणि कृपाळू आहे.

**कृती क्र. ३ :–** नंतर तो ऐकण्यात येईल अशा हळू आवाजात कुरआनच्या फातिहा या सुऱ्या (अध्याया)चे पठण करतो. त्याच्यानंतर कुरआनच्या कोणत्याही भागाचे पठण करतो. जसे –

''बिस्मिल्लाहिर्रहमनिर्रहिम. अल् हम्दो लिल्लाहे रब्बिल आलमीन. अर्रहमा निर्रहीम मालिकी यौमिद्दिन. इय्याक नाऊबदु व इय्याक नस्तईन, एह दिनस् सिरातल मुस्तकीम सिरातल् लजीना अन अम्ता अलैहिम गैरिल मगजूबी अलैहिम् वलज्जाऽऽलीन. (आमीन)'' अर्थात 'परमदयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने. अल्लाहची स्तुती असो, सर्व सृष्टीचा पालनकर्ता आणि पोशिंदा, परम दयाळू व परम कृपाळू, न्यायाच्या दिवसाचा धनी, फक्त तुझीच आम्ही उपासना करतो आणि तुझीच मदत शोधतो. आम्हाला सरळ मार्ग दाखव. अशा लोकांचा मार्ग ज्यांच्यावर तुझी कृपा झाली. अशा लोकांचा नको ज्यांच्यावर तुझा कोप झाला आणि जे मार्गभ्रष्ट झालेत.' यानंतर 'सूर : अस्र'चे पठण करावे. जसे –

''वल्‌अस्रि इन्नल – इन्सान लफी खुस्रिन् : इल्लल्लजीन आमनू व आमिलुस्सालिहाति व तवासौ बिल् हक्कि व तवासौ बिस्सब्रि.''

म्हणजेच, 'ढळत्या युगाची शपथ. निःसंशय, मनुष्य हा (सदैव) तोट्यात आहे. पण यास अपवाद केवळ त्यांचा आहे, जे श्रद्धा बाळगतात व सत्कर्मे करतात, आणि एकमेकास सत्याशी (आपले नाते अढळ ठेवण्याविषयी) उपदेश करतात, आणि एकमेकास स्थिरचित्त (सहनशील) राहण्याचा उपदेश करतात.'

**कृती क्र. ४ :–** नंतर नमाजी असे म्हणतो, 'अल्लाहो अकबर' (अल्लाह सर्वात महान आहे.) तो आपले डोके खाली वाकवितो, आपले शरीर सरळ कोनात ठेवतो, आपले दोन्ही हात गुडघ्यावर ठेवून (चित्र क्र. ४) तो हळू आवाजात तीनदा म्हणतो, 'सुबहाना रब्बियल अजीम' (माझ्या महान स्वामीसाठी भूषण व पवित्रता आहे.) याला 'रूकू' (नमन) असे म्हणतात.

याच्यानंतर पुन्हा उभे राहण्याच्या स्थितीकडे परत येतो, (चित्र क्र. ५) आणि हे शब्द उच्चारतो, 'समी अल्लाह होलेमन हमेदा.' 'रब्बना लकद हम्द' (जो कोणी आभारी असतो, अल्लाह त्याच्या स्वीकार करतो. आमच्या स्वामी! तुझी स्तुती असो.) असे म्हणताना हात बाजूला ठेवतात.

**कृती क्र. ५ :–** नंतर नमाजी असे म्हणतो, 'अल्लाहोअकबर'. तो जमिनीवर आपले दोन्ही हात, दोन्ही गुडघे, दोन्ही पाय आणि माथा जमिनीवर टेकलेले अशी स्थिती स्वीकारतो. (चित्र क्र. ६) याला 'सुजूद'ची स्थिती (प्रणिपातची) म्हणतात. ही स्थिती खालील शब्द तीनदा बोलून सुरू होते. 'सुबहाना रब्बियल आला' (माझ्या सर्वोच्च स्वामीसाठी पवित्रता असो.)

**कृती क्र. ६ :–** नंतर 'अल्लाहो अकबर' म्हटल्यानंतर 'जुलूस' (लघ्वासन)ची अवस्था येते. ती बसण्याच्या अवस्थेत अल्पशी विश्रांतीची स्थिती असते. डाव्या पायाची बाहेरील बाजू आणि उजव्या पायाची टाच उभ्या स्थितीत असतात व जमिनीवर टेकलेले असतात आणि दोन्ही हात गुडघ्यावर ठेवलेले असतात. (चित्र क्र. ७)

यानंतर 'सुजूद'ची अवस्था पूर्वीप्रमाणेच सुरू होते. (चित्र क्र. ८) यामुळे येथे नमाजाची एक रकातची सर्व कृती पूर्ण होते.

**कृती क्र. ७ :–** एक रकात पूर्ण झाल्यानंतर नमाजी 'अल्लाहो अकबर' उच्चारून दुसऱ्या रकातीसाठी उभा राहण्याच्या अवस्थेत येतो आणि तो उभे राहून (चित्र क्र. ३) पुन्हा कुरआनच्या 'फातिहा'चे (मंगलचरणचे) पठण पूर्वीप्रमाणेच सुरू करतो.

**कृती क्र. ८ :–** जेव्हा तो दुसऱ्यांदा वाकून (चित्र क्र. ४) नंतर दोन वेळा जमिनीवर डोके पूर्वी प्रमाणेच ठेवतो (चित्र क्र. ६) तेव्हा तो 'जुलूस' (प्रणिपात)च्या अवस्थेत बसतो (चित्र क्र. ७) आणि 'तशहूद' वा 'अत्तहिय्यात'चे पठण त्याच्या दोन भागासह करतो.

**तशहद् वा अत्तहिय्यात :–** (अ) ''अत्तहिय्यातु लिल्लाहि वस्सलवातु व त्तय्यिबातु अस्सलामु अलैक अय्यहन्नबिय्यु व रहमतुल्लाहि व बरकातुहू. अस्सलामु अलैना व अला इबादिल्ला हिस्सालिहिन. अश्हदु अल्ला इलाह इल्लल्लाहु व अश्हदु अन्न मुहम्मदन् अब्द्हु व रसूलह,'' अर्थात सर्व प्रकारच्या वाचिक, शारीरिक आणि आर्थिक उपासना अल्लाहसाठीच आहेत. हे प्रेषित! तुम्हाला सुख, शांती, सुरक्षा लाभो, अल्लाहची कृपा आणि समृद्धीही लाभो. सुख, शांती आणि सुरक्षेचा लाभ आम्हाला आणि अल्लाहच्या सदाचारी भक्तजनांना व्हावा. मी अशी साक्ष देतो की अल्लाह शिवाय कोणीच दुसरा ईश्वर नाही आणि मी अशी साक्ष देतो की मुहम्मद स. हे अल्लाहचे भक्त आणि प्रेषित आहेत.

**ब) दरूद शरीफ (पवित्र अंतरासत्ती) :–** ''अल्लाहुम्म सल्लि अला मुहम्मदिंव व अलाऽऽ आलि मुहम्मदिन् कसा सल्लैत अलाऽऽ इब्राहिम व अलााऽऽ आलि इब्राहीम इन्नक हमीदु मजीद. अल्लाहुम्म बारिक अला मुहम्मदिंव व अलााऽऽ आलि इब्राहीम इन्नक हमीदुम मजीद.

म्हणजेच हे अल्लाह आमचे धनी मोहम्मद स. आणि त्यांच्या लोकांचे स्थान उच्च ठेव. ज्याप्रमाणे तू आमचे धनी इब्राहीम अ. आणि त्यांच्या लोकांचे स्थान उच्च ठेवले आणि आमचे धनी मोहम्मद स. व त्यांच्या लोकांना आशीर्वाद दे. ज्याप्रमाणे तू आमचे धनी इब्राहीम अ. आणि त्याच्या लोकांवर कृपा केली. खरोखरच तू स्तुतीच्या लायकीचा आहे, आणि वैभवपूर्ण आहे.

तशहूद वा अत्तहिय्यातचे उपरोक्त दोन भाग नमाज संपविणाऱ्या शेवटच्या रकातीत पठण करावयाचे असतात. हा दुसरा भाग संपल्यानंतर व शांतीचे सलाम उच्चारल्यानंतर नमाज पूर्ण होते.

**कृती क्र. ९ :–** शेवटी तो (नमाजी) आपले तोंड उजव्या बाजूकडे वळवून (चित्र क्र. ११) खालील शब्द उच्चारतो. 'अस्सलाम अलैकुम रहमतुल्लाह' (तुम्हाला शांती आणि अल्लाहची दया लाभो) नंतर तो आपले तोंड डाव्या बाजूकडे वळवून (चित्र क्र. १२) वर नमूद केलेले शब्दच पुन्हा उच्चारतो.

याप्रमाणे दोन रकात मग ती फर्ज नमाज असो किंवा सुन्नत असो पूर्ण होतात. ही गोष्ट लक्षात असू द्यावी की इस्लामी नमाजात प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती फारच महत्त्वाची आहे. त्याचा फार खोल अर्थ असतो.

*(हम्मूदाह अद्बुल लती – 'इस्लामचे खरे स्वरूप' – पृ. १०४ – १०७)

## काही विशेष प्रसंगी पठित नमाज

अनिवार्य नमाज पंचका (पंजगाना) शिवाय आणखी काही अशा नमाज आहेत की ज्या विशिष्ट व विशेष प्रसंगी अदा (संपन्न) केल्या जातात. उदाहरणार्थ, (१) नमाज - ए - इस्तिस्क़ा (पाऊस पडण्यासाठी), (२) नमाज - ए - इस्तखारा (शुभ कल्याणासाठी. आपले हित व भले होण्यासाठी ही पढली जाते.) (३) नमाज - ए - इशराक (ही सूर्योदयानंतर पढली जाते.) (४) नमाज - ए - तहयतुल मस्जिद (मशिदीच्या स्थैर्यासाठी), (५) नमाज - ए - तहयतुल वजू (आचमन केल्यानंतर तिच्या ताजेपणासाठी), (६) नमाज - ए - तरावीह (रमजान महिन्यात रात्रीच्या नमाजसोबत युग्मगुच्छ स्वरूपात पढली जाते.) (७) नमाज - ए - तहज्जुद (मध्यरात्री पडली जाते), (८) नमाज - ए - जुमा (शुक्रवारी दुपारी पडली जाते), (९) नमाज - ए - जनाजा (दिवंगताच्या आत्म्यास शांतीलाभ होण्यासाठी उभे राहून पढली जाते.) (१०) नमाज - ए - चाश्त (ही दिवसा दहा वाजण्याच्या सुमारास पढली जाते), (११) नमाज - ए - हाजत (ही मनोकामनापूर्तीसाठी पढली जाते), (१२) नमाज - ए - खसवफ (चंद्रग्रहणाच्या वेळी संपन्न होते), (१३) नमाज - ए - कसवफ (सूर्यग्रहणाच्या वेळी अदा केली जाते), (१४) नमाज - ए - खुफ्तन (झोपताना रात्री पढली जाते), (१५) नमाज - ए - सफर (प्रवासामध्ये संक्षिप्त स्वरूपात अदा केली जाते), (१६) नमाज - ए - शुकर (कृतज्ञताज्ञापनसाठी संपन्न होते), (१७) नमाज - ए - ईदैन (नमाज - ए - इदुज्जुहा (बकरी ईद) आणि नमाज - ए - ईदुल फितर (रमजानच्या ईदची) या दोन इस्लामी सणाच्या वेळी पढली जाणाऱ्या नमाज), (१८) नमाज - ए - कसर (ही युद्धाच्या प्रसंगी संक्षिप्त करून संपन्न केली जाते.), (१९) नमाज - ए - कजा (उशीर झाल्यामुळे किंवा वेळेअभावी जी अनिवार्य सांघिक नमाज हुकली असेल तिच्या भरपाईसाठी नंतर स्वतंत्रपणे अदा केली जाणारी नमाज.)

## नमाजचे तत्त्वज्ञान : पुनरावलोकन

### क) नमाजपंचका मागील तत्त्वज्ञान*

**१) फजर नमाज का?**

अ) स्वर्गातील प्रत्येक क्षण अल्लाहदर्शनामुळे प्रभाताप्रमाणेच तेजदायक व हर्षवर्धक असेल.

ब) फजरवेळी बेनमाजीना निद्रावस्थेत सोडून नमाजी मशिदीत जातात. त्याचप्रमाणे कयामत (प्रलय दिवशी) मध्ये ते बेनमाजींना शोकावस्थेत सोडून स्वर्गात जातील,

क) हज़रत आदम अ. च्या पृथ्वी - आगमनावेळी सर्वत्र भयाण अंध:कार होता. भयग्रस्त अवस्थेत ते अल्लाहकडे कृपायाचना करू लागले. सूर्योदयानंतर परिसर प्रकाशमय झालेवर कृतज्ञता म्हणून त्यांनी दोन रकाअत नमाज अदा केली. त्याचप्रमाणे कब्र व हश्रच्या अंध:कारापासून रक्षण होणेकरिता मुस्लिम फजरची नमाज पढतात.

**२) जुहर नमाज का?**

अ) जुहरवेळी फरिश्ते (देवदूत) आकाशात 'तस्बीह' करतात. आकाशद्वार उघडले जाते व प्रत्येक प्रार्थना स्वीकारली जाते.

ब) हज़रत इब्राहीम अ. ईश्वर शोधात होते. प्रकाशमय तारे पाहून ते त्यांना ईश्वर मानू लागले, परंतु ते नाहीसे झाल्यावर निराश झाले. नंतर चंद्रोदय झाल्यावर ते चंद्रास ईश्वर म्हणू लागले परंतु सूर्योदयानंतर तोही निस्तेज झालेवर ते म्हणाले, तेज:पुंज सूर्य हाच ईश्वर तो सर्वात विशाल देखील आहे. सूर्य मावळू लागले वर मात्र ते अत्यंत निराशावस्थेत म्हणाले, 'ईश्वरा, तू माझी अवस्था समजू शकतोस. आता तूच मार्ग दाखव.' आणि ते अमर, सर्वव्याप्त अल्लाहला शरण गेले. त्याचे स्मरण म्हणून मुस्लिम जुहरची नमाज पढतात.

**३) असर नमाज कशासाठी?**

अ) असर वेळीच हज़रत आदम अ. नी निषिद्ध फळ खाऊन अल्लाहचा कोप ओढवून घेतला होता. तसे दुर्दैव टाळणेची पूर्वखबरदारी म्हणून अल्लाहमग्न होत मुस्लिम असरची नमाज पढतात.

ब) कब्रमध्ये पुनर्जीवनानंतर असरचे वातावरण असेल. त्यामुळे नियमित असर पठण करणाऱ्यास यत्किंचितही भय वाटणार नाही!

क) हज़रत यूनस अ. ना मासळीने नदी तीरी टाकलेवर त्यांची – सरिता (समुद्र), निशा, मत्स्योदर आणि त्या मास्यास गिळंकृत करणारा विशाल मासा अशा चार अंध:कारापासून मुक्तता झाली. ती वेळ असरची होती. कृतज्ञेदाखल त्यांनी चार रकाअत नमाज अदा केली. त्याचेच स्मरण ठेवत मुस्लिम असरची नमाज पढतात.

**४) मगरिब नमाज कशासाठी?**

अ) मगरिबचा काळ विविध विघ्ने, दृष्टता, संकटे आदीच्या बजबजपुरीचा काळ आहे. त्यापासून रक्षणासाठी नमाज पठण केली जाते.

ब) दिवसभरातील अल्लाहच्या असंख्य अनुग्रहाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणेसाठी मगरिब नमाज पढली जाते.

क) हज़रत आदम अ. ची क्षमा याचना मगरिब समयी स्वीकारली गेली. त्याबद्दल त्यांनी नमाज अदा केली. त्याचे स्मरणार्थ मुस्लिम मगरिबची नमाज पढतात.

ड) हज़रत याकूब अ. ना सुपूत्र हज़रत यूसुफ अ. च्या अस्तित्वाची सुशखबरी मिळताच आभार प्रदर्शनार्थ त्यांनी तीन रकाअत नमाज अदा केली. त्याचे स्मरण म्हणून मगरिबची नमाज अदा केली जाते.

**५) इशा नमाज का?**

अ) इशावेळी फक्त अल्लाहपूजकच भक्ती करतात.

ब) पैगंबर स. ना इशासमयी 'मेराज'ची भेट प्राप्त झाली.

क) हज़रत मूसा अ. स्वत: व सहकाऱ्यांचे नदीपार जाणे, फिरऔनपासून रक्षण व त्याचा सर्वनाश या चार चिंतांनी ग्रस्त होते. त्यापासून मुक्तता त्यांना इशासमयी प्राप्त झाली. कृतज्ञतेबाबत त्यांनी चार रकाअत नमाज अदा केली. त्याचे स्मरणार्थ इशाची नमाज पठण केली जाते.

## ख) नमाजच्या विविध क्रियांमागील तत्त्वज्ञान

### १) रकाअतची संख्या

अ) फजरची दोन रकाअत : स्पर्शेंद्रियांना (त्वचा) शीतोष्ण अशी दोन उद्दीपने असतात. त्याच्या कृतज्ञतेदाखल फजरची दोन रकाअत नमाज अदा केली जाते.

ब) जुहरचे चार रकाअत : घ्राणेंद्रियांना (नाक) चौहोदिशांनी गंध येऊ शकतो. त्याचे अनुग्रह स्मरत जुहरची चार रकाअत नमाज अदा केली जाते.

क) असरचे चार फर्ज रकाअत : जिभेस (रसनेंद्रियेस) गोड, कडू, आंबट व खारट अशा चार रूचींचा आस्वाद घेता येतो. यास्तव असरचे चार फर्ज.

ड) मगरिबची तीन रकाअत : दृष्टी (डोळे) उजवी - डावीकडे आणि समोर पाहू शकते. या तिन्हीसाठी मगरिबचे तीन रकाअत.

इ) इशाची चार रकाअत : कान चोहोकडून ध्वनी श्रवण (ऐकू) करू शकतात. त्या उपकाराचे स्मरणार्थ इशाची चार रकाअत.

सारांश, पंचेद्रियांच्या उपयोगितेच्या आभारप्रदर्शनासाठी पंच अनिवार्य नमाजांमधील रकातींची संख्या मिळती-जुळती आहे.

### २) काबामुख होणे

याचे स्पष्ट प्रमाण पवित्र कुरआनमध्ये पुढीलप्रमाणे आढळते - ''हे प्रेषिता, तुमचे वारंवार आकाशाभिमुख होणे आम्ही पाहत आहोत. म्हणून आम्ही त्याच किबल्याकडे (उपासना दिशेकडे) तुम्हाला वळवितो, जे तुम्हाला सर्वाधिक प्रिय आहे. तेव्हा मसजिदे हराम (पवित्र काबागृह)कडे तोंड करा. यापुढे जिथे कुठे तुम्ही असाल, तिथून तिच्याकहे तोंड करून (त्या दिशेने) नमाज पठण करा.'' - २:१४४

या ईश्वरी आदेशाच्या परिपालनार्थ सर्व नमाज पढणारे नेहमी काबामुख असतात.

### ३) प्रारंभ 'अल्लाहु अकबर'ने

अ) ''अल्लाहु अकबर'' (अल्लाह महामहिम) हे नमाजचे शीर्षक आहे.

ब) नमाज ही सर्वश्रेष्ठ शहंशाह अल्लाहचे दरबारात होणारी पेशी (हजर होणे) आहे. 'अल्लाहु अकबर', सना, तअव्वुज, तस्मिया आदीच्या सहाय्याने अल्लाहची प्रशंसा केली जाते.

### ४) कानापर्यंत हात का?

अ) कानापर्यंत हात उचलणे म्हणजेच दुष्कृत्यांपासून नि:संग असल्याचे दर्शविणे. त्यामुळे नमाजी होणेचा अर्थ सर्वांग सुंदर आणि दोषमुक्त असणे / होणे हा आहे.

ब) संकटाच्या खोल दरीत बुडत असताना ''वाचवा वाचवा'' हा आर्त पुकारा करत आपले दोन्ही हात मदतीच्या अपेक्षेने वर उंचावतो. तशीच साद लाचार - असहाय व्यक्ती हात वर करून अल्लाहला घालते.

**५) हात बांधणे**

अल्लाहबद्दल आदरभाव व्यक्त करून कृपायाचना करणेसाठी हात बांधून अदबीने उभे राहिले जाते.

**६) सूर : फातिहाने प्रारंभ**

सूर : फातिहा हा संपूर्ण कुरआन आणि इस्लामचा सारांश आहे. यास्तव त्याचे प्रारंभी पठण केले जाते.

**७) रूकूअ**

अ) रकाअतमध्ये सूर : द्वारा केली गेलेली याचिका अल्लाह स्वीकारतो. त्याच्या कृतज्ञतेदाखल मस्तक - कंबर झुकवत रूकूअ केला जातो.

ब) प्रामाणिक नमाजी रूकूअ करतो तेव्हा त्यांच्या मस्तकावर ठेवलेले पापांचे गाठोडे खाली पडते व तो पापमुक्त होतो.

**८) पहिला सज्दा**

रूकूअच्या किंचित नम्रतेमुळे झालेल्या लाभांनी प्रफुल्लित होऊन आणि नम्रतेने नतमस्तक होत नमाजी सज्दा करतो.

**९) पावित्र्य मंत्र**

रूकूअमध्ये नम्रतेने नमाजी ''सुब्हान रब्बियल अजीम'' अर्थात् ''पावित्र्यगुण गातो पालनकर्त्याचे'' हे पावित्र्य मंत्रपठण करतो, तर सज्दामध्ये अति सामिप्यामुळे भावविव्हलतेने सद्‌गदित होऊन ''सुब्हान रब्बियल आला'' अर्थात् ''पावित्रगुण गातो. सर्वश्रेष्ठ पालनकर्त्याचे'' हे वचन म्हणतो.

**१०) दुसरा सज्दा**

अ) एका सज्दामुळे अल्लाहने नमाजीस श्रेष्ठता प्रदान केली. या उत्तुंग दयेमुळे आपण गर्विष्ठ होऊ नये याची पूर्व खबरदारी म्हणून दुसरा सज्दा केला जातो.

ब) अल्लाहचा आदेश म्हणून हज़रत आदम अ. च्या पुतळ्यास सज्दा करून उठल्यानंतर देवदूतांनी अल्लाहला, आदेश भंगामुळे (अवज्ञेमुळे) इवलीस (शैतानांचा नेता) वर अति क्रोधित झालेले पाहून, भयभीत होत दुसरा सज्दा केला. त्या घटनेस आदरांजली म्हणून दुहरा सज्दा केला जातो.

**११) सज्दानंतर उठणे**

सज्दाचे निर्देशांक दोन आहेत -

अ) मातीपासून मनुष्योत्पत्ती.

ब) मातीतच मनुष्योद्‌गती.

परंतु, मृत्यूनंतर मातीत मिसळल्यावर पुनःश्च जिवंत केले जाणार याचे भान राहावे म्हणून सज्दामध्ये मातीस मस्तक टेकलेवर पुन्हा उभे राहिले जाते.

**१२) सलाम**

व्यक्तीने नमाजची रकाअत बांधली तर तिचे विश्व दुसरेच - काही औरच असते - केवळ अल्लाहचे विश्व.

हज़रत आरिफ़ रूसी म्हणतात, ''खरे नमाज़ी 'अल्लाहु अकबर' म्हटले नंतर या जगापासून असे विमुक्त होतात जशी मृत व्यक्ती.'' त्यामुळे नमाज संपलेनंतर या नश्वर जीवनात प्रवेश करताना 'असलामु अलैकुम व रहमतुल्लाह' म्हणत नमाजी या विश्वातील लोकांना व थडग्यामधील प्रश्नकर्ते मुन्कीर – नकीर (चित्रगुप्त) या देवदूतांना सलाम अर्थात् शुभ आशंसा करतात.

**ग) नमाजच्या सामाजिक भूमिकेमागील तत्त्वज्ञान**

१७ रमजान, शनिवार रात्री हिजरत पूर्व १८ महिनेला नमाज फर्ज केली गेली.

''नित्य नमाज कायम करा. निश्चितच नमाज, अश्लील व अपकृत्यांपासून (वाम मार्गापासून) वाचवते (रोखते).'' – २९:४५

कुरआन शरीफमध्ये एकूण ८३ वेळा नमाजविषयी ताकीद आहे.

**नमाजची समाजोपयोगी मूल्ये अशी**

**१) समता :** राजा – प्रजा, शासक – शासित, राव – रंक, कृष्ण – श्वेत मानवांमध्ये उच्चनीचतेचा कसलाही भेदभाव न होता आश्चर्यकारकरित्या ही विजातीय ध्रुवे प्रेमभावाने खांद्यास खांदा लावून एकाच रांगेत उभी असतात. समतेचा असा आदर्श कोठेही पाहावयास मिळणार नाही.

**२) नम्रता :** रूकूअमध्ये नम्रतेने मस्तक झुकवण्यावर प्रसन्न होत अल्लाह नमाजीची मान सन्मानाने सरळ करतो. सज्दामध्ये अति नम्रतेने नतमस्तक होण्यावर अति प्रसन्न होत नमाजीस 'जलसा' व 'कादा'मध्ये प्रतिष्ठेने बसण्याची संधी मिळते. नमाज ही सर्वश्रेष्ठ शहंशाह अल्लाहच्या दरबारातील पेशी (हजेरी) आहे. अशा दरबारात बसावयास मिळण्याइतका गौरव अन्य कोणता असू शकेल? 'गर्विष्ट ताठर मानेने राहणाऱ्यास लज्जेने मान तुकवरावी लागते तर नम्र व्यक्तीस सन्मानपूर्वक उत्तुंगता गाठता येते.' हे आदर्श समाजोपोगी तत्त्व नमाजच्या या विशिष्ट पद्धतीतून सांगावयाचे आहे.

**३) स्वच्छता :** नमाजपूर्वी सर्वार्थाने स्वच्छ व्हावे लागते. नित्य स्वच्छ राहाणे व स्वच्छता राखणे व बाळगणे याचा एक आदर्श धडा शिकण्यास मिळतो.

*(डॉ. अब्दुल वाहिद अब्दुर्रहमान शेख – 'मानवतेचा दीपस्तंभ' – पृ. ८० आणि १२६–१३०)

## नमाज़शी निगडीत परिभाषा संज्ञा व इतर शब्द – संग्रह

अज़ान = उपासने (नमाज़)च्या वेळी उद्‌घोषणा, आरोळी, बांग

अल्लाह = परात्पर परब्रह्म

असराफ़ = अपव्यय

अनवार = प्रकाश पुंज

अवराद = नित्याराधन

अहसन – ए – तक़लीम = ईश्वरीय कृतीचे सर्वोत्तम कलापूर्ण उदाहरण असलेले, मानव शरीर

अत्तैहियात = उपासना विविधा

अता = प्रसाद

अज़ाळ = कोप, प्रकोप

अर्कान = उपासना स्तंभ, उपासनेचे टप्पे

अस्तग्फ़ार = क्षमायाचना

आयतलकुर्सी = महाश्लोकासन

आमीन = तथास्तु

आरिफ़ = ब्रह्मवेत्ता

इक़ामत = नमाज़ सुरू होत असल्याची घोषणा नमाज़साठी तत्पर राहण्याची घोषणा

इम्तिफ़्ताह = ईशप्रशस्ती प्रस्तावना वा उद्‌घोषणा

इस्तग़्फ़ार = दश व क्षमेसाठी प्रार्थना

इस्तख़ाब = मंगलकामनेची विनवणी

इस्तग़ासा = न्याय याचनेसाठी फ़िर्याद करणे

इस्लाम = ईश्वरशरणागती, सर्वस्व समर्पण भाव

इक़रार = वचनबद्धता

इनकार = नकार, वचन विमुखता

इताअत = उपासना, भक्ती, साधना

इमाम = अधिनायक; पुरोहित (पेशइमाम = अग्राधिनायक)

इमामत = पौरोहित्य, अधिनायकत्व

इब्रत = बोध

इबादत = आराधना, भक्ती

इबादते आला = अनन्य भक्ती

इम्ले लदुन्नी = केवलज्ञान, ईश्वरप्रदत्त ज्ञान

इम्मे आज़म = महानाम मंत्र, नाम महिमा

इमकात = कुंडल

इर्शादात = बोधवचन

इख़्लास = निष्ठा, निष्कपट प्रेम

इंतक़ालात = साधनांग परिवर्तन, बदल

ईमान = श्रद्धा

ईमान-ए-मुज्मल = व्याख्यायीत श्रद्धा

ईमात-ए-मुफ़स्सल = व्याख्यायित श्रद्धा

उबूदियत = भक्ती

उन्मत = समाज बांधव, धर्मप्रजा

उम्मुल किताब = ग्रंथराज

ऊलुल अज़्म = अग्रगण्य, सुप्रतिष्ठित

एतकाफ़ = एकांतवास, एकांत सेवन

क़ज़ा = विस्मृत किंवा सुटलेली नमाज़ची नंतर भरपाई, क्षतिपूर्ति उपासना

कसर = संक्षिप्त केलेली नमाज़

कफ्फ़ारा = निराकरण
कमाल = पराकाष्ठा
कश्फ़ = ईश्वरीय प्रेरणा
करामत = चमत्कार
क़अूद (क़ादा) = उपविश्यासन, भूस्थिरासन
क़याम = उत्थानम् अवस्था, स्थितप्रज्ञावस्था
कल्मा = ब्रह्मसूत्र, महामंत्र
कल्मए तय्यब = विशुद्ध महामंत्र
कल्मए शहदात = साक्ष्य मंत्र - ब्रह्मसूत्र
कल्मए तमजीद = पावित्र्य मंत्र
कल्मए तौहीद = एकेश्वरी मंत्र
कल्मए रद्दे कुफ़्र = धर्मवंचना निरस्त्र ब्रह्मसूत्र
क़िरअत = कुरआनी श्लोक वा अध्याय पाठ
क़िब्ला = वंद्यस्थळ, नमन दिशा
कुर्बानी = बलिदान
कुतूतं = आज्ञापालन आश्वासन (आश्वासन)
क़ौम = जनसमूह
क़ौमा = अल्पोत्थानम्, अल्प विश्राम
कैफ़ियत = वृत्ती
ख़ुज़ू = शालीनता, आत्म - शांती
खुदसुपुर्दगी = आत्म - समर्पण, परपत्ती
ख़ुशू = विनय, नम्रता, चित्त - समाधान
गफ़लत = बेसावधगिरी
गाफ़िल = बेसावध
ग़ैरत = आत्मसन्मान
ज़कात = धर्मकर
जलसा = लघ्वासन (लघु + आसन)
जानमाज़ = उपासनावस्त्र, आराधनावस्त्र
ज़ाकिर = जापक, जपे
जायज़ = उचित, अनुमोदित कर्म
ज़ाहिर = बाह्य, प्रकट
ज़िक्र = नाम-स्मरण; हितोपदेश
ज़िम सूर = मंगलाचरण अधीनस्थ अध्याय, मंगलाचरण पाठोपाठ म्हटला जाणारा एखादा लघुतम अध्याय किंवा तीन लहान सलग श्लोक किंवा 'आयतल कुर्सी.' (महाश्लोकासन)
तयम्मुम = शुष्क आचमन, मृत्तिकाप्रक्षालन
तस्बीह = ईशामहिमा गान, स्तोम, जप, जपमाळ
तशहुद = साक्षांकन, साक्ष्यनिवेदन
तकबीर = ईशप्रशस्ती
तक़दीस = पावित्र्यगान
तहलील = उपाधि-हात
तहमीद = ईशस्तवन
तर्बियत = सुसंस्कार
तज़्किएनफ़्स = प्रत्याहार
तफ़क्क़ = ध्यान, चिंतन, मनन
तवाफ़ = परिक्रमा
तहारत = शुचिता
तऊज़ = अमंगल निराकरण याचना
तादील = यथायोग्य
तायुत = निश्चित
तौहीद = एकेश्वरवाद
तौकुफ़ = मध्यंतर, अंतराल
दरूद = अंतरासत्ती, स्वस्तिश्री, स्वस्तिक
दुआ = कृपायाचना
दुआए कुतूत = सविनय कृपायाचना
नआत = प्रोषित प्रशंसा, प्रोषित स्तोत्र
नजात = मोक्ष, मुक्ती
नफ़िल (नवाफ़िल) = अतिरिक्त कर्म
नशिस्त = आसन
नमाज़ = उपासना, भक्ती, आराधना
नमाज़ी = उपासक, भक्त
नादिम = लज्जित, खजिल

नैसियाँ = चूक - भूल

नमाज़ : प्रकार

- पंजगाना = अनिवार्य नमाज़ पंचक
- फ़जर = सूर्योदयापूर्वी (प्रात:काळ)ची नमाज़
- ज़ुहर = दुपारची नमाज़
- असर = सायंकाळची नमाज़
- मग़रिब = सूर्यास्तानंतरची नमाज़
- इशाअ = रात्रीची नमाज़
- वितर = एकमेव नैमित्तिक रात्रीची नमाज़

नमाज़ = प्रासंगिक इतर नमाज़

- इशराक़ = सूर्योदयानंतरची नमाज़
- इस्तख़ारा = क्षेमकल्याणासाठी नमाज़
- इस्तिस्क़ा = पाऊस पडण्यासाठी नमाज़
- इदैन = दोन सणांच्या नमाज़, पर्वोपासना
१) ईदज़्ज़ुहा = बलिदान-पर्व (बकरी ईद)
२) ईदुलफ़ितर = दान-पर्व नमाज़ (रमजान ईद)
- क़ज़ा = हुकलेल्या नमाज़ची भरपाई नमाज़, सुटलेल्या नमाज़ची क्षतिपूर्ती
- क़सर = युद्धप्रसंगातील संक्षिप्त नमाज़
- कसवफ़ = सूर्यग्रहणवेळची नमाज़
- ख़सवफ़ = चंद्रग्रहणवेळची नमाज़
- ख़ुफ़्तत = झोपतानाची नमाज़
- चाश्त = दिवसा दहा वाजेची नमाज़
- जनाज़ा = दिवंगताच्या शांतीलाभासाठी नमाज़
- जहरी = सस्वर नमाज़ (फ़जर, मग़रिब, इशाअ)
- जुमा = शुक्रवार दुपारची नमाज़
- तहज्जुद = निद्रोपरांत अर्धरात्रीची नमाज़
- तरावीह = युग्मगुच्छोपासना
- तहयतुल मस्जिद = मशीद कायम सुरक्षित राहण्यासाठी नमाज़
- तहयतुल वज़ू = आचमन प्रीत्यर्थ नमाज़
- बा जमाअत = सांघिक नमाज़
- मुफ़र्रद = वैयक्तिक नमाज़
- शुकर = कृतज्ञता ज्ञापनासाठी नमाज़
- सफ़र = प्रवासातील नजाज़
- सिर्री = मौन नमाज़ (ज़ुहर व असर)
- हाजत = मनोकामनापूर्तीसाठी नमाज़

परहेज़गार = धर्मनिष्ठ

परागंदा = उद्विग्न

पासअनफ़ास = प्राणायाम

पैग़ंबर = प्रेषित

फ़क़ी = धर्ममीमांसक

फ़ना = व्यष्टिनाश, संभूती

फ़नाइयत = समरसता

फ़र्ज़ = नित्य कर्म, ब्राह्मी कर्म

फ़ितना = मतभेद, मतमतांतर

फ़ैज़ = देणगी

फ़ासिद = भ्रष्ट

बंदा = दास, भक्त

बदल = विकल्प

बातिन = अंतस्त, अंतरंग

बातिनी = अंतस्तमवाद

बातिल = व्यर्थ

बेज़ार = अलिप्त

बेनवा = अकिंचन

मंज़ूर = स्वीकृत कर्म

मक्रूह = अमान्य कर्म, अहम्मत कर्म, अवांछनीय कर्म

मन्नत = मनोकामना, नवस

मसबूक़ = उशिरा पोहोचणारा (येणारा) नमाज़ी

मस्जिद = उपासनागृह, मशीद

मलऊत = धिकृत

मसनून = स्वीकृत कर्म
महजूब = बेसावध
महजूर = निषिद्ध कर्म, वर्ज्य कर्म
महरम = सपिंड
माकूस = अधोमुख, विपरीत
मारिफ़त = आत्मज्ञान
मासियत = अवज्ञा; अपराध
मा सू ए अल्लाह = उपाधी, ईश्वरास सोडून सर्व काही.
मिंबर = व्यासपीठ, धर्मोपदेश - मंच
मिनार = मिनार
मुअज़्ज़िन = उपासना उद्घोषक, बांगी
मुआइना = अनुभूती, निरीक्षण
मुक़्तदी = मुमुक्षू, अनुगामी
मुक़ामात = साधना मार्ग
मुक़ाशिफ़ा = प्रकटन
मुख़ालिफ़त = प्रलंबितता
मुजाहिद = धर्मप्रतिनिधी, तपस्वी
मुजाहदा = तपस्या, इंद्रिय-निग्रह
मुकब्बिर = ईशप्रशस्ती प्रस्तोता
मुफ़सिदात = भ्रष्टकारक, बिघडविणारे
मुनाजात = स्तोत्र ईशप्रार्थना
मुवक्कद = सक्त ताकीद, सबळ अनुरोध, जोरदार ताकीद
- ग़ैर मुवक्कद = सैल ताकीद
मुस्तहब = पुनीत कर्म
मुबाह = अनुमोदित कर्म, विधी समस्त कर्म, वैध कर्म
मुतीअ = आज्ञाकारी, आज्ञांकित
मुश्रिक = बहुदेवोपासक, अनेकेश्वरवादी
मुल्हिद = नास्तिक
मुसाबिक़त = अग्रता
मुवाफ़िक़त = समता
मुताबिअत = अधीनता, पश्चता, पाठीमागे
मुसल्ला = प्रार्थनासती, उपासनावल्कल
मुहद्दिस = वार्ताकार
मुहासबा = आत्मपरीक्षण, आत्मावलोकन
मुराक़बा = व्रत, मनन
मुराक़िब = व्रतस्थ
मुहाज़रा = शास्त्रार्थ
मुशाहदा = साक्षात्कार, चिंतन
मुत्तक़ी = संयमी
मोजज़ा = दिव्य चमत्कार, सिद्धी
रसूल = महाप्रेषित
रेहल = ग्रंथासनी
रियाज़त = पठोर तपस्या
रफ़ायदैन = हात सोडणे
रियायते तरतीब = सुसंगत क्रम
रकात = उपासनाचक्रे, साधनांगचक्रे, परिक्रमा
रूकू = साधनांग सोपान, नमन
रब्बुल आलमीन = ईश्वर
रहमतुल आलमीन = महाविष्णु
रिज़ा व तसलीम = निवृत्तिमार्ग
लमयज़ल = अनश्वर, अविनाशी
लानत = धि:कार
वज़ा यदैन = हात बांधणे
वहाब = महादाता
वुज्द = भावावेश, भावोल्लास
वुजूद = निर्वेद
वहदहूला - शरीफ = असंग, अद्वैत
वाजिबुल वितर = एकमेकाचे नैमित्तिक कर्म
विर्द (औराद) = जाप, जपजाप, नाम-जप
वही = आकाशवाणी
वज़ू = आचमन

वाजिबात = आवश्यक कर्तव्य-कर्म
वाजिब = नैमित्तिक कर्म
शुग़्ल = ध्यास, योग-कर्म, ध्यान-धारणा
शरीयत = शास्त्रविधी
शफ़ाअत = अभिस्ताव, मोक्षाची शिफ़ारस
शिर्क = बहुदेववाद
शैतान = राक्षसी वृत्ती, नमाज़मधील बाधकवृत्ती व कृती
सआदत = शिवता
सतरे औरत = गुह्यांग रक्षण
सज्द-ए-सह्व = प्रमाद निराकारण प्रणिपात (जानुनमन) सनार्च्ईशस्तवन
समा - कीर्तन
सलान = उपासना, भक्ती
सलाम = शुभ आशंसा
सवाब = श्रेयांक, सद्‌गति पुण्यलाभ
सह्व = प्रमाद, चूक
सहाबी = सहचर
साबित = अविनाशी
सुलतानुल अज़्कार = राजजप
सूर: फ़ातिहा = मंगलाचरण अध्याय
सोमोसलात = धर्माचरण (उपवासव्रत व उपासना)
सज्दा (सजूद) = जानुनमत, प्रणिपात
साहब-ए-तरतीब = नित्य अखंडोपासक, कधीही नमाज़ न चुकविणारा
सुन्नत = (प्रेषित) संविधान कर्म
सैहुन = अज्ञानवश, अजाणतेपणाने
हम्द = ईशस्तवन
हराम = निषिद्ध कर्म, वर्ज्य कर्म, वर्जित कर्म
हलाल = वैध कर्म, अनुज्ञप्त कर्म
हदीस = प्रेषित वचन, वार्ता
हिदायत = सन्मार्गदर्शन
हब्सेदम = प्राणायाम
हुज़ूरे क़ल्ब = एकाग्रता, चित्ताग्रता
हय्युँ क़य्यूम = मृत्युंजय

**लक्षवेधक बाब :-**

१) .फ़र्ज़ वाजिब ईश्वराज्ञे स्वरूपात आहेत; तर सुन्नत व मुस्तहब प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या आदेशानुसार आहेत; तर नफ़िल (नवाफ़िल) ही नमाज़ी (भक्ता)च्या स्वेच्छा स्वरूप आहेत.

२) अल्लाहचा दरूद म्हणजे सेवकां(भक्तां)वर दया; तर देवदूतांचा दरूद म्हणजे सेवका(भक्तां)साठी दुआ (कृपायाचना) होय.


*** नमाज़मधील परिक्रमांचे**
**(व सूफ़ीप्रणित साधनेमध्ये प्रयुक्त) क्रमशः टप्पे ***




**(१) इक़ामत**
**(स्थितप्रज्ञावस्था, स्थितासन)**



**(२) तकबीरे तैहरीमा**
**(उपोद्घात)**




**(३) क़याम**
**(उत्थानावस्था)**



(४) रुकू
(नमन, संधी, साधनांगविक्षेप)




**(५) कोमा**
**(अल्पोत्थानम्)**



(६) सजदा (प्रथम)
(प्रणिपात)



**(७) जलसा (लघ्वासन)**
**किंवा**
**(अल्प विश्रामी बैठक)**



**(८) दूसरा सजदा**
**(द्वितीय प्रणिपात)**



**(९) क़ादा (क़ऊद)**
**(उपविश्यासन) (भूस्थिरासन)**



**(१०) जलसा और कअदा की पुश्त**
**(लघ्वासन आणि उपविश्यासन अवस्थेमधील**
**नमाजी (उपासका) ची पाठीमागील अवस्था) (वज्रासन)**



**(११) सलाम देहनी तरफ (उजवीकडील)**
**(शांतिनिवेदन)**
**किंवा**
**(स्वस्तिक)**



**(१२) सलाम बाई तरफ (डावीकडील)**
**(शांतिनिवेदन)**
**किंवा**
**(स्वस्तिक)**



**(१३) दुआ**
**(कृपायाचना)**

## आचमन, अज़ान पासून ते असे सर्व नमाज़मधील विक्षेप एकाच ठिकाणी




वजू (आचमन)



तकबीरे तैहरीमा (उपोद्घात)



अज़ान (आरोळी)



(अनुगामी (१४)
(अधिनायक मुक़्तदी) इमाम)



कोमा
(अल्पोत्थानम्)



रूकू (नमन, संधी)



मजदा (प्रणिपात)



क़याम (उत्थानावस्था)



क़ादा (उपविश्यासन)



दुआ (कृपायाचना)




दुआ (कृपायाचना)




क़ादा (उपविश्यासन)




रूकू (नमन, संधी)




क़याम (उत्थानावस्था)



तकबीरे तैहरीमा (उपोद्घात)





सजदा (प्रणिपात)


*** ज्यांना गुडघेदुखी, सांधेदुखी वा तत्सम व्याधीमुळे ऊठ-बैस करणे अशक्य होत असेल तर अशा नमाज़ीसाठी अपवादात्मक विकल्प-पद्धती ***



**(१) तकबीरे तैहरीमा**
**(उपोद्घात)**



**(२) क़याम**
**(उत्थानावस्था)**



**(३) रुकू**
**(नमन, संधी, साधनांगविक्षेप)**




**नमाज़ बा जमात**
**(सांघिक नमाज़ [ उपासना ] ) चे प्रारंभ**

# विभाग - ५

# ख) दार्शनिक चिंतनिका

# (ख) दार्शनिक चिंतनिका

- मनुष्य हा सृष्टीचा मुकुटमणीच आहे.
- तत्त्वज्ञान हे जीवनाची समीक्षा असते.
- 'सुभाषिते ही संवेदनांची देवघरे असतात' - इमर्सन.
- अंत:करणाची कवाडे उपासनेमुळे उघडतात.
- मृत्यू म्हणजे आत्म्याचे पुनरूत्थान होय.
- ध्यान म्हणजे चित्ताची निरंतर अंतर्मुखता.
- 'सत्य हा परमेश्वराचा आत्मा आहे व प्रकाशाचा देह आहे.' - पायथॅगोरस.
- 'काल ही आत्म्याची रंगभूमी आहे.' डॉ. सर मुहम्मद इक़बाल.
- 'पावसाचा परिणाम शरीरावर तसेच त्याद्वारे मनावरही होत असतो प्रार्थनेचेही तसेच आहे. प्रार्थनेचा परिणाम हृदयाद्वारे थेट आत्म्यावर होतो.' - आचार्य विनोबा भावे.
- 'कृतीविना दूरदृष्टी म्हणजे एक दिवास्वप्नच; तर दूरदृष्टीविना कृती म्हणजे एक दु:स्वप्नच !' - जपानी म्हण.
- 'तत्त्वज्ञान हे आत्म्याचे औषध आहे.' - एपिक्युरस.
- शरणागति हा मोक्षाचा सर्वोत्तम उपाय आहे.
- अस्तित्व म्हणजे उच्च विकासासाठी झटत असलेले जिवंत व्यक्तिमत्त्व.
- कलेतील कष्ट, धर्मातील आर्तता व शास्त्रांतील अविरत श्रम' यांखेरीज सत्कडे नेणारा तत्त्वज्ञानाला दुसरा मार्गदर्शक नाही.
- 'सतति' म्हणजे कालरहित वर्तमान. 'सतति' हे अनाद्यनंत अविकारी नामरूपविहीन अस्तित्त्वाचेच एक नाव आहे. 'सतति' म्हणजे कालविहीन अवस्थाच होय.
- आत्मा म्हणजे केवळ संवेदनांची अखंड मालिकाच होय. - ह्यूम
- संगीत हे भावनांचे शुद्ध उद्‌गीत होय. - रवींद्रनाथ टागोर
- कला म्हणजे अंत:स्फूर्ति !
- बुद्धिवानांची स्तुती केली जाते, श्रीमंतांविषयी ईर्ष्या केली जाते, शक्तिशालींविषयी भय बाळगले जाते, मात्र विश्वास फक्त चारित्र्यवान व्यक्तींवरच ठेवला जातो.
- मुंग्यांची जीवनशैली हाच एक आदर्श आहे. कारण, मुंग्या शिस्तबद्धतेने, मौन पाळून कायम कार्यरत राहतात. - फ्रँकलिन

- अस्तित्वात नसणाऱ्या गोष्टी अस्तित्वात येतात व नंतर पुन: नाहीशा होतात हे निश्चित आहे.
- शरीर, प्राण व मन ही चैतन्याची तेजाची उपकरणे आहेत.
- अभ्युपगमास शास्त्रीय विगमनाचा पाया किंवा वैज्ञानिक संशोधनाचा प्रारंभ म्हटले जाते.
- संपत्ती, सत्ता, प्रतिष्ठा हे अभिलाषेचे विषय अपायकारक असतात. कारण ते आत्म्याला भ्रष्ट बनवितात.
- निसर्ग म्हणजे प्राण्यांचे अ-सामाजिक जीवन.
- सद्‌गुण, सुज्ञता आणि सत्य ही जीवनाची खरी मूल्ये आहेत. - सॉक्रेटीस
- तत्त्वज्ञान हे आध्यात्मिक विकृतीवरील उपाय आणि खऱ्या जीवन-स्वातंत्र्यासाठी आवश्यक असलेले अनुशासन होय.
- संवेद्य अनुभवालाच सत्ता म्हणतात. सत्ता ही आध्यात्मिक असते.
- संबंधाला गुणांची व गुणांना संबंधीची अपेक्षा असते.
- ईश्वरव्यक्ति नसून सृष्टीचे मार्गदर्शक व आकारिक असे सर्वोच्चतत्त्व आहे. ईश्वर हे गतीचे अंतिम कारण असून तो ह्या जगाचा अचलित चालक आहे. तो जगाला गतिमान् करतो.
- आत्मा आकार व सूक्ष्मद्रव्य यांनी बनलेला असून त्याचे व्यक्तिमत्त्व स्वयंप्रेरित असते. त्याच्यामध्ये दैवी शक्ती असून, तो ईश्वर सदृश असतो.
- कालाची गतिमानताच वस्तूमध्ये परिवर्तन घडवून आणते व नवीन घटना निर्माण करते.
- आत्मयज्ञ म्हणजे संकुचितता व विसंवाद यांचा त्याग म्हणजेच व्यापकता व सुसंवाद यांची निर्मिती, म्हणजेच आत्मपूर्ती. आत्मसाधना म्हणजे 'मी'चा एका स्वरूपात यज्ञ किंवा त्याग. परमार्थात तीव्रता असावी; पण उतावीळता नसावी.
- दर्शनशास्त्राचे दोन सर्वात महत्त्वपूर्ण उद्देश आहेत - सत्याचा शोध आणि चांगुलपणाचे आचरण - वॉल्टेर
- समस्त तत्त्वज्ञानाची उच्चता आत्म्यास जाणणे हे आहे; आणि या ज्ञानाचा शेवट परमेश्वरास ओळखणे हा आहे. आत्म्यास ओळख म्हणजे तू परमेश्वरास ओळखू शकशील; आणि परमेश्वरास ओळख (की) जेणेकरून तू त्याच्याशी प्रेम करू शकशील आणि तत्सम होऊन जावे त्याच्याशी तादात्म्य पावावे. प्रथमपासून तू सम्यक् ज्ञानामध्ये प्रवेश करतोस; तर दुसऱ्यामुळे परिपूर्णता साध्य करतोस. - क्वार्ल्स.
- ज्ञान हे श्रद्धेला खुणावते आणि श्रद्धेमुळेच सत्कर्म घडतात. पुढे सत्कर्मामुळेच मनात निष्ठा जन्म घेते. श्रद्धा दृढ करण्याच्या अनेक उपायांपैकी महत्त्वाचा उपाय म्हणजे सभोवतालच्या चराचरांचे बारकाईने निरीक्षण करणे. त्यावर चिंतन-मनन करणे. त्याप्रमाणे निसर्गाचे निरीक्षण करून त्या परमेश्वराची महानता समजून घेतली पाहिजे. श्रद्धा वाढविण्यासाठी ऐहिक जीवनावरील आसक्तीला लगाम देऊन मृत्युला वारंवार स्मरणात ठेवावे. दानधर्म करत राहावा. त्यामुळे त्याग वृत्ती बळावते. ज्याचे लक्ष फक्त मरणोत्तर जीवनावरच असते, ईश्वर त्याला ऐहिक व परलौकिक दोन्ही जीवनात यश देत असतो.
- ज्यामुळे अभ्युदय व नि:श्रेयस यांची सिद्धि (प्राप्ती) होते तो धर्म होय. - सुरेंद्रनाथ दासगुप्ता
- तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहता ईश्वराची संकल्पना हा धर्माचा पाया असतो. - मानवेंद्रनाथ रॉय

- विश्व आणि मानव यांच्या अस्तित्वाच्या स्वरूप आणि अर्थविषयक मूलभूत प्रश्नांचा शब्दप्रामाण्य न स्वीकारता केला जाणारा विचार म्हणजे तत्त्वज्ञान – शि. स. अंतरकर.
- व्रत म्हणजे स्वत:च्या इच्छेने केलेला संकल्प व त्याचे आचरण.
- वासनाधीन इंद्रिये माणसाला परतंत्र करतात व त्या योगे मनुष्य मोहवश होतो.
- ज्ञान श्रेष्ठ असले तरी ते भक्तिशिवाय व्यर्थ आहे. परमेश्वराच्या भक्तिशिवाय व त्याच्या नामस्मरणाशिवाय असणारे ज्ञान व्यर्थ आहे.
- ज्ञान आणि कर्म याच्या जोडीला आध्यात्मिक प्रकृती चांगली ठेवण्यासाठी श्रद्धा आवश्यक असते.
- उपाधी म्हणजे भगवंता (ईश्वरा) वाचून इतर सर्व. 'गैरूल्लाह' म्हणजे उपाधी. 'अल्लाही अल्लाह' म्हणजे उपाधि–हान.
- कृपा–याचनेच्या पंखाच्या बळावर आत्मा स्वर्गाकडे भरारी घेतो; तर उपासना (आराधना, नमाज) हे असे डोळे आहेत की ज्यामुळे आपण (उत्कट भक्त) प्रभुस पाहातो.
- सत्या(हक)स आपली उपासना (नमाज) बनव, आणि श्रद्धे(ईमान)स आपले उपासनी–वस्त्र (जानमाज).
- प्रार्थना म्हणजे विश्वात्म्यामध्ये जगण्याचे प्रयत्न – कॉलरिज
- जीवनव्यापी ध्येय म्हणजेच पुरुषार्थ.
- प्रार्थनेमुळे मनास चैन आणि ज्ञानतंतुना आराम मिळतो. – स्टीवर्ट
- प्रार्थना आपणास परमेश्वराशी भेट घालून देते. – विलियम लॉ
- प्रार्थना म्हणताना किंवा स्तवन करताना तिच्या अर्थाशी आणि भावनेशी आपले चित्त हळुहळू समरस झाले पाहिजे.– नाथजी
- कृतज्ञ आणि प्रफुल्ल हृदयापासून निघालेली उपासना परमेश्वरास सर्वात जास्त आवडते. – प्लुटार्क
- डोळे हे आत्म्याचे झरोके असतात. भाषा हा विचाराचा पेहराव असतो. विचार भाषेच्या वेषात प्रकट होतो.
- 'लोगॉस' म्हणजेच शब्दब्रह्म, चिद्रूप हा ईश्वर व मनुष्य यांतील मध्यस्थ आहे.
- जेव्हा मनुष्य अध्ययन करतो, तेव्हा प्राणाचा वाक्‌मध्ये होम होतो, याउलट जेव्हा तो मौन धरतो, तेव्हा वाक्‌चा प्राणात होम होतो.
- ईश्वर त्रिविध असून तोच अंतिम व सर्व संपन्न सद्वस्तु आहे. अमर्यादितता त्याचे सारतत्त्व आहे. त्याची त्रिविधता ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान किंवा अस्तित्व, शक्ती, कृती इत्यादीतून प्रकट होते. – निकोलस.
- बंध म्हणजे 'भगवत् – बहिर्मुख' व मोक्ष म्हणजे 'भगवत्–संमुख' असणे. हरिव्यासदेव.
- श्रद्धा ही अंत:करणाची विचारशक्तीच आहे आणि ईश्वराच्या अनुग्रहाने श्रद्धा प्राप्त होणे शक्य आहे. – पास्काल ब्लेस.
- तत्त्वज्ञान म्हणजे ऐंद्रिय अनुभवावर आधारलेले नैसर्गिक ज्ञान.–जिल्सन. ई. एच्.
- भक्ती, प्रेम व सदाचरण हीच आत्म्याच्या उन्नतीची खरी साधने होत.

- तत्त्वज्ञान हे व्यापक मूल्यांचे समीक्षात्मक विज्ञान आहे. - विंडेलबँड. डब्ल्यू
- तत्त्वज्ञान म्हणजे अस्तित्वाचे शुद्ध बुद्धिनिष्ठ शास्त्र असेही काटेकोर अर्थाने म्हणता येईल.
- विषयाचे ज्ञान हा तत्त्वज्ञानाचा पाया होय. - देकार्त
- तत्त्वज्ञान जीवनाचा एकमार्ग आहे. तत्त्वज्ञानाची कसोटी सत्यता हीच, उपयुक्तता नव्हे किंवा इतर कोणतीही कसोटी त्यास लागणार नाही.
- बुद्धीच्या मदतीने मिळणारे कारण-कार्याच्या परस्परसंबंधाचे ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान. - टॉमस हॉब्स
- तत्त्वज्ञान हे आध्यात्मिक विकृतीवरील उपाय आणि जीवन-स्वातंत्र्यासाठी आवश्यक असलेले अनुशासन होय. - फीडो
- तत्त्वज्ञान हे अंशतः परिकल्पनांचे विशदीकरण आहे. असे करताना ते त्याचे मूल्यांकन पण करीत असते. थोडक्यात, तत्त्वज्ञान म्हणजे विशदीकरण, व्याप्ती, समन्वय व मूल्यांकन होय - अर्नेस्ट.
- देकार्तच्या मते तत्त्वज्ञान हे एखाद्या वृक्षासारखे असून, सत्ताशास्त्र हे त्याचे मूळ आहे, पदार्थविज्ञान त्याचे खोड आहे, आणि इतर सर्वशास्त्रे म्हणजे या खोडातून निघणाऱ्या फांद्या आहेत.
- बुद्धी, अहंकार व मन यांच्या समष्टीचे नाव म्हणजेच अंत:करण होय.
- विज्ञानाच्या भाषेचा तर्कशास्त्रीय अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान. - कारनॅप, रूडॉल्फ
- आत्मज्ञान हे मानवमात्राचे सर्वोत्तम श्रेय होय, आणि तेच सर्व तत्त्वज्ञानाचे अंतिम साध्य होय. द्वैताने लोक व्यवहार सिद्ध होतो. अद्वैताने परमार्थ सिद्ध होतो.
- सर्व जगत् चैतन्यमय आहे, ईश्वर अणुरेणूंत भरलेला आहे, त्याच्या अधिष्ठानावाचून जगताची सत्ता नाही. ह्यालाच विवर्तवाद म्हणतात.
- 'चोदना' म्हणजे शास्त्राचे प्रवर्तक वचन. प्रवर्तक म्हणजे अमुक कर अथवा अमुक करू नकोस, असे सांगणारे वचन.
- प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या तत्त्वानुसार चारित्र्य घडविले पाहिजे. प्रज्ञा म्हणजे शहाणपण शील म्हणजे सदाचरण, करुणा म्हणजे प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे आत्मीयता. - गौतम बुद्ध.
- जे स्वतंत्र किंवा स्वयंभू असून स्वयंज्ञात आहे ते द्रव्य होय. द्रव्य एकच आहे व ते अनंत आहे- स्पिनोझा
- आत्मस्वरूपाचा 'विसर' हेच मूलभूत अज्ञान होय. त्यामुळेच 'अध्यास' शक्य होतो. शंकराचार्यांनी सत्य व अनृत यांची भेसळ झाल्यामुळेच 'अध्यास' घडतो असे प्रतिपादिले आहे. बदलणारे ते अनृत व अविचल राहणारे ते सत्य.
- स्वातंत्र्य म्हणजेच अमर्यादित, व अमर्याद अशा चैतन्याचेच नाव 'ब्रह्म' आहे. म्हणूनच ज्याला खऱ्या अर्थाने आत्मानुभव आला त्याची ती स्थिती 'अहं ब्रह्मास्मि' या ज्ञानवृत्तीतून स्वयंस्फूर्त होते. सत्-चित्-आनंद-घन म्हणजे 'ब्रह्म' जीव स्वरूपतः आत्मा आहे. आत्मा प्रत्येकाचा निसर्गसिद्ध प्रेमाचा विषय (अधिष्ठान) आहे. म्हणून जीवात्म्याची परमात्म्या (ब्रह्मा) कडे नकळतच ओढ असते.
- प्रत्येक माणसाचे वास्तव हे परमेश्वराचे अस्तित्व ('वजूद') आहे.

- श्रद्धेमुळे बुद्धीला पूर्णत्व लाभते, बुद्धीमुळे श्रद्धेला सामर्थ्य प्राप्त होते. प्रगल्भ बुद्धीने, प्रसवगर्भ कल्पनेने आणि उस्फूर्त प्रतिभेने भावनांचा उत्कट परिपोष होतो. ज्ञानाने दु:खाचा निरास होतो, आनंद मिळतो, शांती लाभ होतो, जीवनाला पूर्णता येते, अमृतत्त्व किंवा अनंतत्त्व लाभते. 'सा विद्या या विमुक्तये' हा ज्ञानाकडे पाहण्याचा मूल्यात्मक दृष्टिकोण आहे.
- चैतन्यातच अगणित विश्वे अव्यक्त नांदत असतात.
- ज्ञान कारण शोधत असते आणि ध्यान अकारणातून जात असते.
- तत्त्वज्ञानाचा शब्दश: अर्थ आहे-शहाणपणाचे प्रेम. तत्त्वज्ञानाचा अर्थ वैश्विक मूल्यांचे चिकित्सक शास्त्र
- तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील 'आत्मा' (मन) आणि 'जडद्रव्य' या संघर्षाची एक सोडवणूक
- What is mind ? Does not matter
- What is matter ? Never mind. - **बिशप बर्क्ले :**
- आत्मा अंतिम कल्याण वा हितकारी म्हणजे श्रेयस्. प्रिय वा सुखकारी म्हणजे प्रेयस्.
- देवदूत हे ईश्वरनिर्मित परंतु अशरीरी अगर चिन्मय आत्म्याचे असतात. त्यांच्या उच्च-नीच श्रेणी असतात. - बायबल(इंजील)
- दृष्ट्याची दृष्टी ही आत्म्याच्या मौनामध्ये असते.
- अंत:करणाचे नमन-स्थळ हे सर्वश्रेष्ठ परमेश्वराची विशुद्ध सत्ता असते.
- (प्रभु-दर्शनाच्या) तहानामध्ये जर तुम्ही एका पेल्यामधून पाणी पीत असाल, तेव्हा तुम्ही त्यामध्ये परमेश्वर पहाल. ज्यांना परमेश्वराशी प्रेम नाही, असे लोक त्यामध्ये फक्त आपला चेहराच पाहतील.

**अंत:करणाची जिव्हा :**
- → परमेश्वरापाशी याचना करणे म्हणजे **उपासना,** दिल्यास त्याची **महत्‌कृपा** न दिल्यास त्याची **युक्ती**
- → लोकांपाशी याचना करणे म्हणजे **मानहानी,** दिल्यास त्यांचे उपकार, न दिल्यास **लज्जेची बाब.**

- उपवासव्रत आत्म्यास स्वच्छ बनवितो, मनाचे उत्कर्ष घडवितो, शरीरामधील चेतना जागवितो, चित्तास, पश्चात्तापदग्ध व विनम्र बनवितो, कामवासनांचे ढग पांगवितो, लालसेच्या अग्नीस विझवितो आणि निष्कलंकतेच्या सच्चा प्रकाशास प्रदीप्त करतो. - सेंट ऑगस्टीन.
- मनुष्याचा आत्मा पडद्यांच्या मागे झाकोळला गेला आहे. हे पडदे सारले की आत्मा शुद्ध, बुद्ध आणि मुक्त या अवस्थांपर्यंत पोहोचतो. मन, वचन आणि काया यांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या मलिन वृत्तीचे हे पडदे आहेत. महावीर या पडद्यांना 'लेश्या' असे म्हणतात. त्यांच्या मतानुसार हे पडदे सहा आहेत. पैकी तीन असत् आहेत, तर उरलेले तीन सत् आहेत.

  १) कृष्ण लेश्या, २) नील लेश्या, ३) कपोल लेश्या हे तीन असत् पटल वा पडदे आहेत. तर ४) तेजो लेश्या, ५) पद्म लेश्या आणि ६) शुक्ल लेश्या हे तीन सत् पटल वा पडदे आहेत. हे सहा पडदे एक-एक दूर सारून पुढे चालत जाणे याचेच नाव **अध्यात्म** आहे.

- ''जो जिभेच्या अंकित आहे आणि झोपेच्या अधीन आहे तो अध्यात्माचा अधिकारी कधीही होऊ शकणार नाही, हे लक्षात ठेवा.'' – संत ज्ञानेश्वर
- ''मन हे चंचल, चपळ असते. त्याच्या स्वास्थासाठी मौन पाळले पाहिजे. ही साधना जमली तो अंतरंगातील आत्मारामाच्या आवाज ऐकू शकतो.'' – वर्धमान महावीर
- दोन प्रकारचे मनुष्य सूर्यमंडळ भेदून ऊर्ध्वगती प्राप्त करू शकतात. पहिला योगी संन्यासी व दुसरा रणांगणात वीरमरण आलेला (हुतात्मा) योद्धा.
- भावोत्कटतेचा स्पर्श झालेली नीति म्हणजे धर्म होय. – आर्नोल्ड
- आयुष्याच्या ध्येयाचा दरवाजा धीरामुळेच उघडू शकतो. कारण धीराखेरीज त्या दरवाजाची दुसरी कोणतीही किल्ली असू शकत नाही. – शेख सादी
- प्रत्येक विज्ञानाची सुरुवात तत्त्वज्ञानास्वरूपात होते, तर शेवट कलेच्या रूपाने होतो. – विल दुराँ (ड्युरांट)
- वाचेने नामस्मरण करा, मौनाने चिंतन साधा आणि दृष्टीच्या साहाय्याने बोध घ्या.
- नेहमी मनाच्या प्रकाशाला हृदयाच्या दिव्याने तेवत ठेवा.
- काळ आणि अवकाश हे सत्पासून असत्‌ला वेगळे करण्याच्या एककांची एक अनिवार्य मूस आहे. विभक्तपणाची माया निर्माण करण्यासाठी हे दोन प्राचल आवश्यक आहेत.
- शब्द सामर्थ्य प्रदान करू शकतात, सामर्थ्य काढून घेऊ शकतात; शब्द मित्र मिळवून देऊ शकतात, ते त्यांना शत्रूंमध्ये परिणत करू शकतात; शब्द व्यक्तीस उच्चपदस्थ किंवा अध:पतित करू शकतात. म्हणून प्रत्येकाने गोड, मधुर आणि आल्हाददायक शब्द बोलण्याची सवय लावून घ्यावी. – अथर्ववेद
- तुला बंधु मित्र हवा असेल तर ईश्वर पुरेसा आहे; साथी हवा असेल तर विधाता पुरेसा आहे' मान-प्रतिष्ठेची हाव असेल तर जग पुरेसे आहे. सांत्वना हवी असेल तर धर्म-ग्रंथ पुरेसे आहे, उपदेश हवा असेल तर मृत्यूची आठवण पुरेशी आहे, जर तुला माझे हे म्हणणे पटत नसेल तर मात्र तुझ्यासाठी नरक पुरेसा आहे. – हातम असम
- सर्वात महान माणूस तो आहे जो अटळ प्रतिज्ञेसह सत्याचे अनुसरण करतो, जो आतील आणि बाहेरच्या प्रलोभनांना बळी न पडता प्रतिरोध करतो, जो मोठ्यात मोठी जबाबदारी प्रसन्नचित्ताने पार पाडतो, सत्य, सत्कृत्य आणि ईश्वरावरील ज्याची निर्भरता सर्वथा अडिग आहे.
- संकटामध्ये धैर्य, ऐश्वर्यामध्ये क्षमा, सभेमध्ये वचन-चातुर्य, संग्राम (युद्धा) मध्ये पराक्रम, सुयशामध्ये अभिरूचि आणि शास्त्रांमध्ये व्यसन – हे गुण महापुरुषांच्या स्वभावातच असतात. – भर्तृहरि
- महत्त्वाकांक्षेपासून सावधान रहा, स्वर्ग अहंकाराने नव्हे; तर नम्रतेमुळे प्राप्त होते.
- महानता नेहमी विनयशील असते आणि ती दिखाव्यास पसंत करीत नाही, परंतु क्षुद्रता जगभर आपल्या गुणांची दवंडी पिटवत फिरत असते. – तिरूवल्लुवर
- जीवनामध्ये भगवंतास अभिव्यक्त करणेच मनुष्याचे मनुष्यत्व आहे. – अरविंद घोष
- शुद्ध अंत:करणामध्येच सत्य स्फुरित होते. स्वार्थ आणि सुख सोडल्यामुळेच अंत:करण शुद्ध बनते. – हरिभाऊ उपाध्याय.

- धर्म-द्रोहीचे मन मृत असते, पापीचे मन रोगी; लोभी आणि स्वार्थीचे मन आळशी आणि भजन-साधनामध्ये तत्पर व्यक्तीचे मन निरोगी (स्वस्थ) असते. - हातम असम.
- रोगी मनाची ही चार लक्षणे आहेत.- १) उपासनेमुळे आनंदित न होणे, २) ईश्वरास भिऊन आचरण न करणे. ३) एखाद्या वस्तुकडे ज्ञान प्राप्त करण्याच्या हेतूने न बघणे. ४) ज्ञानाची गोष्ट ऐकून पण तिच्या मर्मास न समजणे. - जुन्नून मिस्री
- मन पाच प्रकारचे असते. १) मृत मन जसे नास्तिकांचे, २) रोगी मन जसे पापी लोकांचे, ३) अचेत मन जसे पोट-भरूंचे, ४) पालथे मन जसे भयंकर व्याज खाणाऱ्यांचे, ५) सुदृढ मन जसे सज्जनांचे - पारस भाग
- अभ्यास आणि वैराग्यामुळे मन सहजपणे वश होते. - गीता
- आजचे जे पुरुषार्थ आहे तेच उद्याचे भाग्य आहे. - पालशिरर
- ईश्वराला भिणे हे भाग्यशाली बनण्याचे लक्षण आहे. पापकर्मे करत असताना पण ईश्वराला दयेची आशा करणे ही दुर्भाग्याची खूण आहे. - अबू उस्मान
- सहनशीलता आणि सत्यपारायणतेच्या संयोगाशिवाय प्रभुप्रेम पूर्णत्वास पोहोचत नाही. - जुन्नून मिस्री
- गूढवादी 'सत्'च्या शोधात असतात. श्रद्धा आणि अंत:प्रेरणा यांच्या साहाय्याने त्यांना सत्ची प्रतीती होत असते.
- हृदयाची भाषा जगाला कळो न कळो, प्रेमवीरांना त्याची तमा नसते.
- प्रेमाचे सर्व खटाटोप व्यर्थ! (Love's labour lost!)
- 'वास्तवाची व्याख्या करणे ही एखाद्या नेत्याची पहिली जबाबदारी आहे. शेवटची जबाबदारी धन्यवाद देण्याची आहे. यांच्या दरम्यान तो नेता एक सेवक असतो.' - मॅक्स द (डी) प्री.
- 'परिवर्तनाखेरीज कोणताही विकास शक्य नसतो आणि बदल घडवण्याचा पहिला मंत्र असतो आपले विचार बदला' - जॉर्ज बर्नाड शॉ.
- 'द्वेषबुद्धीला आपण द्वेषाने संपवू शकत नाही. प्रेमाची शक्तीच तिला नष्ट करू शकते.' - विनोबा भावे
- 'नकारात्मक भूमिकेतून मिळालेले यश म्हणजे नशीब आणि सकारात्मक भूमिकेतून मिळालेले यश म्हणजे ध्येयपूर्ती' - अनामिक
- 'श्रद्धा आपणाला ज्ञान देते, नम्रता मान-सन्मान देते आणि योग्यता स्थान देते. या तिन्हीचा मिलाफ आपणाला अमर बनवितो.' - अनामिक
- भक्ती, शक्ती व कृती यांच्या संमिश्रणाने निर्माण होणारी व्यक्ती तेजोमय असते.
- 'जवळ येणे ही फक्त सुरुवात आहे. सोबत असणे प्रगती आहे तर सोबत काम करणे म्हणजे यश.'- हेन्री फोर्ड.
- विपश्यना म्हणजे मनाचे शस्त्रकर्म मनानेच करून मन शुद्धी करणारे शास्त्रोक्त साधना.
- 'शहाणपणाला मर्यादा असतात मात्र मूर्खपणा अमर्याद असतो.' - व्हॉल्टेअर
- 'मनुष्य विचारी असेल, तर तत्त्वज्ञ बनतो व विकारी असेल तर तो बेताल बनतो.' - न. चिं. केळकर
- स्वधर्माविषयी प्रेम, परधर्माविषयी आदर आणि अधर्माविषयी उपेक्षा याचाच अर्थ धर्म.

- 'धैर्य आणि दृढ निश्चय हा जादुई गंडा आहे. त्यामुळे अडचणी दूर होतात आणि अडथळे पळून जातात.' – जॉन क्विन्सी ॲडम्स.
- भाग्यात असेल तर मिळते, प्रारब्धात असेल ते घडेल आणि नियती ही सर्व व्यवहार घडवत असेल, असे मानले जाते.
- 'महान लोक कल्पनांबाबत बोलतात, सर्वसाधारण लोक घटनांबाबत, तर खालचे लोक इतर लोकांबाबत बोलतात.' एलनॉर रूझवेल्ट
- दुसऱ्यांना समजून घेणे ज्ञान आहे, स्वत:ला समजणे अंतर्ज्ञान आहे.
- आरोग्य सर्वात मोठी संपत्ती आहे. समाधान सर्वात मोठा खजीना आहे. आत्मविश्वास सर्वात चांगला मित्र आहे. अस्तित्व नसणे सर्वात मोठा आनंद आहे.
- आव्हानांमुळे आयुष्य रंजक बनते, तर ती पेलल्यानंतर अर्थपूर्ण – जोशुआ मरिन
- सिद्धी – असिद्धीविषयी मनाची समानता असणे यालाच **योग** म्हणतात. जाणिवेच्या अंगाने **समानता** आणि व्यवहाराच्या अंगाने **समता**.
- पारमार्थिकदृष्ट्या सर्वत्र ब्रह्म ही **समानता** आणि योग्यतेनुसार, आवश्यकतेनुसार व्यवहार करणे ही **समता**. अशी दोन्हीकडे समता आली म्हणजे **नेम** पुरा झाला.
- आचरणाच्या दृष्टीने अनुग्रहात मिळालेल्या नामाचे स्मरण आणि नामासहित ध्यान म्हणजे **नेम**.
- 'जशी दृष्टी तशी सृष्टी' स्वभावधर्मानुसार वर्तन ही **प्रकृती**; पण प्रकृतीधर्म विसरून वागणे ही **विकृती**. आत्मरूप जाणणे म्हणजे **अध्यात्म**. आत्मा परमात्मरूप होणे ही **सिद्धी**. त्या पातळीपर्यंत पोहोचणे ही **मुक्ती**. दरम्यानची साधना म्हणजे **अध्यात्म**.
- परमात्मा प्रेमरूप आहे. प्रेमाने प्रेमास जिंकणे म्हणजे **स्वसंवित्ती**, त्या प्रेमाचे सामर्थ्य म्हणजे **शक्ती** आणि चैतन्याच्या अंगभूत असणाऱ्या सहज प्रीतीचे नाव म्हणजे **भक्ती**.
- 'परमात्मा (अल्लाह) नि:संशय अशा लोकांसाठी अतिशय **क्षमाशील** आहे जे **पश्चात्ताप** पावतात आणि **श्रद्धा** बाळगतात व **सत्कृत्ये** करतात आणि मग **सन्मार्गावर** दृढ राहतात.'–पवित्र कुरआन–२०:८२
- 'जर तुम्हास कोणी वाईट म्हणत असेल तर तिकडे लक्ष देऊ नका आणि जर कोणी तुमचे वाईट केले असेल तर त्याची वाच्यता करू नका. जर कोणी उन्मार्गावर चालत असेल तर त्याला त्यापासून परावृत्त करा आणि जर कोणी अपराध केला असेल तर त्याला क्षमा करा.' – उर्दू महाकवी गालिब.
- 'नि:शंक श्रद्धा ही निर्जीव असते, तर साशंक श्रद्धा सजीव असते.' – डी उनमुनो.
- 'औदार्य म्हणजे तुमच्या क्षमतेपेक्षा अधिक देणं आणि आत्मसन्मान म्हणजे तुमच्या गरजेपेक्षा कमी घेणं.' – अनामिक
- 'भूतकाळ आपल्याला आठवणींचा आनंद देतो, भविष्यकाळ आपल्याला स्वप्नांचा आनंद देतो पण आयुष्याचा आनंद फक्त वर्तमानकाळच देतो.' – अनामिक
- 'पैसा हा खतासारखा आहे, साचवला की कुजत जातो आणि गुंतवला तर वाढायला मदत करतो.' – जे. आर. टाटा.

- ‘विचार-विमर्श म्हणजे विचार अणि ज्ञानाचे विनिमय. याचे समर्थन करा. युक्तिवाद म्हणजे अहंकार आणि अज्ञानाचे विनिमय. हे टाळा. विचार-विमर्श ज्ञानास सक्षम बनविते. युक्तिवाद गैरसमजाकडे प्रवृत्त करेल.’ – ब्रह्माकुमारी
- ‘काम, क्रोध आणि लोभ (मोह) ही नरकामध्ये जाण्याची तीन द्वारे आहेत. प्रत्येक बुद्धिमान मनुष्याने त्यांचा त्याग केला पाहिजे.’ – श्रीमद्‌भागवत गीता, १६ : २१
- ‘प्रेमाचा कालावधी फार क्षणिक असतो; तर विस्मरणाचा कालावधी सुदीर्घ असतो.’ – पाब्लो नेरूडा
- ‘ज्या मनुष्याच्या गरजा जेवढ्या कमी असतात तेवढा तो ईश्वराच्या जवळ असतो.’ – सॉक्रेटिस
- ‘शहाणपणापेक्षा मोठी संपत्ती कोणतीही नाही; अज्ञानापेक्षा जास्त दारिद्र्य कोणतेच नाही; संस्कृतीपेक्षा मोठा वारसा कोणताच नाही.’ – प्रेषित जामात हज़रत अली.
- दुसऱ्यांचे परीक्षण त्यांच्या गुणांसाठी करा आणि आत्म-परीक्षण स्वत:च्या दुर्गुणांसाठी करा.
- ‘ज्ञानी लोक विवेकापासून शिकतात, सर्वसामान्य मनुष्य अनुभवातून, अज्ञानी मनुष्य गरजेतून, तर पशू स्वभावापासून शिकता असतात.’ – कौटिल्य.
- ‘जीवनात सर्वोच्च सामर्थ्य मिळवायचे असेल तर आत्म सन्मान, आत्मज्ञान आणि आत्मचिंतन या तीन गोष्टींची जरूरी असते.’ – टेनिसन
- ‘ज्ञान म्हणजे योग्य उत्तर माहीत असणं. बुद्धिमत्ता म्हणजे योग्य प्रश्न विचारणं.’ – अनामिक
- ‘धर्माशिवाय विज्ञान लंगडे असते. विज्ञानाशिवाय धर्म आंधळा असतो.’ – आइनस्टाईन
- ‘बदलाचे चक्र सारखे फिरत असते, जे खाली असतात ते वर येतात आणि जे वर असतात ते खाली जातात.’ – रवींद्रनाथ टागोर
- ‘दूर राहिल्यामुळे प्रेम जास्त दृढ होते, तर सान्निध्यामुळे ते जास्त गाढ होते.’ – थॉमस फूलर
- ‘विचार म्हणजे माणसाच्या मनाच्या सौंदर्याचे परिपूर्ण रूप.’ – अनातोले फ्रान्स
- आत्म्याचा आवाज परमात्मापर्यंत घेऊन जाणारा संदेशवाहक म्हणजे प्रार्थना!
- ‘जगात केवळ एकच सत्य आहे. हे सत्य आपल्याच मनात दडलेले असते. ज्यावेळी आपल्याला या सत्याविषयीचे ज्ञान अवगत होते तेव्हाच आपल्याला परमेश्वराची आत्मानुभूती होते.’ – आधुनिक सूफ़ी संत हज़रत इनायत खान.
- कोणतेही काम एकाग्रतेशिवाय यशस्वी होत नाही.
- बुद्धी, अहंकार व मन यांच्या समष्टीचे नाव म्हणजेच अंत:करण होय.
- ‘मनुष्य हा एकमेव प्राणी आहे जो स्वप्ने पाहू शकतो आणि ती सत्यातही (वास्तवात) आणू शकतो.’ – नेपोलियन हिल.
- ‘आपले विचार ब्रह्मांडाला आदेश देत असतात. आपण जसा विचार करतो तशी घटना यातून घडत असते. यामुळे विचार आणि भावनांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. यातूनच आपला खरा आध्यात्मिक विकास होतो.’ बॉब प्रॉक्टर, सकारात्मक विचारांचे प्रणेते.
- **मोक्ष** ही आत्म्याचीच शुद्धावस्था आहे.
- ‘भूमन् म्हणजे ब्रह्म ध्यानावस्थित मनुष्याला ओतप्रोत भरलेले दिसते.’ – डॉ. रा. द. रानडे

- 'भाषा सुटीवर गेली म्हणजे तत्त्वज्ञानाची सुरुवात होते.' – विट्गेन्स्टाइन
- परब्रह्म हे ब्रह्माचे **आधिदैविक** स्वरूप असून अक्षरब्रह्म हे आध्यात्मिक स्वरूप होय.
- 'प्रज्ञा ही प्रचीतीची कन्यका आहे.' – लिओनार्डो
- विदेह मुक्तीमध्ये जीवात्मा परमात्म्याशी एकरूप होतो व स्वत:चे नित्यत्व जाणतो.
- विकास म्हणजे अव्यक्ताला व्यक्त रूप प्राप्त होण्याची प्रक्रिया होय.
- सर्व उपाधींचा निरास करणारे ते **परब्रह्म** होय.
- 'आत्माहा संवेदनांचा पुंज आहे.' – ह्यूम. बुद्धी किंवा ज्ञान हा आत्म्याचा गुण असून तो विषयाशी विषयता – संबंधाने निगडित झालेला असतो.
- मूल्यांच्या अनुभूतीचे रहस्य आत्म्याच्या स्वरूपात आहे. मूल्याच्या साक्षात्काराचे गमक आनंद होण्यात आहे. आत्मा हा रसरूप, आनंदरूप आहे. 'रसो वै स:' (तैत्तिरीय उपनिषद). आत्मा किंवा ब्रह्म हा सच्चिदानंदरूप आहे.
- मूल्यें वस्तुस्थितीला अस्तित्वात आणतात. आदर्श हा वस्तुस्थितीला घडविणारा आहे.
- प्रगल्भ बुद्धीने, प्रसवगर्भ कल्पनेने आणि उत्स्फूर्त प्रतिभेने भगवंताचा उत्कट परिपोष होतो.
- आत्मा हा विश्वाचा 'मधु' आहे व विश्व हे आत्म्याचे 'मधु' आहे.
- **अनुग्रह** किंवा **शक्तिपात** म्हणजे ईश्वरकृपा अवतरणे.
- ईश्वराचे दर्शन दृष्टीने नव्हे तर श्रद्धेने घडते. ईश्वराला पाहणाऱ्या डोळ्यांचे हृदय श्रद्धेने भरलेले असते.
- पद्धती म्हणजे तात्त्विक प्रश्नाबद्दलच्या प्रबळ युक्तिवादाचे एक तर्कशास्त्र किंवा विवरण देण्याचा प्रयत्न होय.
- 'विवेकबुद्धीलाच आपला गुरू करा. शब्दांचा कर्माशी आणि धर्माचा शब्दांशी ताळमेळ बसवा.' – शेक्सपीअर विल्यम
- 'प्रेम सर्वांवरच करा, काहींवर विश्वास ठेवा आणि कुणासोबत काहीही चुकीचे करू नका.' – शेक्सपीअर विल्यम
- 'माझी यातना ही इतर कुणाच्या तरी हास्यास कारणीभूत ठरेल; मात्र माझे हास्य हे इतर कुणाच्यातरी यातनेस कधीचक कारणीभूत ठरू नये.' – चार्ली चॅप्लिन
- 'श्रद्धा ईश्वरास कार्यप्रवृत्त करते. भय शत्रूस कार्यप्रवृत्त करते.' – जोएल ऑस्टीन
- शुद्ध अंत:करणाने मनुष्य देवासमोर आला तरच त्याच्या प्रार्थना त्याला पोचतात व तो ऐकतो आणि त्याच्याकडून त्या प्रार्थनांना प्रतिसाद मिळतो.
- **आर्षज्ञान** म्हणजे मनाला ईश्वराच्या उपस्थितीची होणारी जाणीव असते. **धर्म** हा न्यायाशी संबद्ध असलेला सद्गुण आहे. कारण धर्माच्या रूपाने आपण ईश्वराचे ऋण फेडीत असतो. धर्मामुळे जीवन समृद्ध होते. धर्म हा आचारनिष्ठ असतो. धर्म हे जीवनाला दिलेले वळण असते; कृतार्थ जीवनाचे विशदीकरण असते. धर्माचा संबंध मूल्यांशी असतो, वस्तुस्थितीशी नसतो. भावनोत्कटतेचा स्पर्श झालेली नीति म्हणजे धर्म होय. सदाचाराचे शास्त्र हे नीतिशास्त्र.

# विभाग - ५

## ग) व्यक्ती - नाम - सूची

# (ग) व्यक्ती – नाम – सूची


(अ)

अकबर – २६

अक़ीली – ११९

ॲक्वायनस टॉमस – ९, ४७, १५९, १६०, ५०८, ५८३, ५८४

ॲक्विनास थॉमस – ९४१, ४३, ११५, ३२४

अज़ाज़ील – ६३२

अज़ीज़ अहमद – ११२२

अर्जुन – ६८५

अंतरकर शि. स. १६१५

अत्तार शेख फ़रीदुद्दीन – ५६, ५८, ७५, ८३९, ८४०, ११२५

अर्नेस्ट अनविन – १०६

अर्नेस्ट हेकल – १०६

अन्सेल्म सेंट – ११५, १५९, १६०

अन्सारी अब्दुल्ला – १२४०

अन्नज़्ज़म – १८

ॲनॅक्झॅगोरस – ३६१

ॲनॉक्झिमेंडर – ३६०, ३६४

अपोलोनियस – ३६४

अफ़लातून (प्लेटो) – ४७२

अफ़ज़ल खान – १६५

अबी अल ख़ैर / अबुल ख़ैर शेख अबू सईद – ९३, ७३०, १०८०, १११५, ११२१, ११५३, १३६०

अबी दर्दा – ९५२

अबी दर – ३६९

अबीदुल्ला बिन अबी जाफ़र – १४१६

अबुल हसनात सय्यद अब्दुल्ला शाहसाहब – १०९७

अबुल अब्बास (इमाम इब्न तैमिया) ९५३, ९५५

अबुल फ़ज़ल – २६, २७

अबुल हसन–अली–बिन हारून अज़्ज़ंजान – २०

अबुल हसन अल् अशअरी – २०, २२, ८१, १८५

अबू अहमद अब्दाल चिश्ती ख्वाजा – १०९८

अबू अब्दल्ला अल् कुरशी – ८७९

अबू नसूर – १०८०

अबू यूसुफ़ चिश्ती ख्वाजा – १०९८

अबू–बकर बाकिलानी – २२

अबू सईद अल–सर्राज – ७२६

अबू अल्–हारिस अलू–बुनानी – १११३

अबू इसहाक़ चिश्ती – १०९७

अबू क़ासिम – ६८१

अबू यहिया – १०६७

अबू हनीफ़ा – २२, २३, १०८०

अबू जहल – ८२, २०६

अबू लहब – १२४४

अबू सईद अल ख़राज – १२०, ७५०

अबू सरवर – २१४

अबू हाशिम – ५५

अबू बक्र – ४५, २०६, १०५२

अबू बकर मुहम्मद इब्न यहिया – ४४

अबू मसूद अन्सारी - १०७९
अबू इसहाक़ मुहम्मद बिन कासिम बिन शोबान - १४१५
अबू सुलेमान मुहम्मद बिन माशअर (मशर) अल-बैयुस्ती अल-मुक़द्दसी - २०, ५२
अबू ज़र - ७८६
अबू यजीद - १०२३
अबू दरदा / अबी दर्दा - ९५२
अबू दाऊद - १०७५
अबू अल्-हसन बिनसलीम (सलमी) - १११४
अबू अल - हुसैन अल दर्राज - १११६
अबू शेख - १४१५
अबू हुरैरा - ४२३, ७८६, १२३९, १२५०
अबू उस्मान यूसुफ़ - १६१९
अबू याकूब यूसुफ़ - ४५
अब्बासी - १९, २९, ३०, ५२, १०६७
अब्द अल्लाह इब्न ख़फ़ीफ़ - ११२१
अब्दल अल-कुरेशी - ९०५
अब्दु हुजाइल - १८
अब्दुल क़ैयुम रफ़ीकी - ९८६
अब्दुल वाहिद बिन ज़ैद - १०२५
अब्दुल क़ादिर जीलानी - ५९, ७१, १३७, २४२, १०६१, १०६२, १०८०, १३५८
अब्दुल क़ादिर इब्न अब्दुल्ला - ७१
अब्दुल्ला - ४६१
अब्दुल्ला ख़फ़ीफ़ - १०८०
अब्दुल्ला बिन जाफ़र - ७८७, १०७९
अब्दुल्ला यूसुफ़ अली-२९८, ६८८, ७१८,१२८७
अब्दुल्ला बिन उमर - ३७, ४२१, १०७९, १०८०
अब्दुल्ला बिन अब्बास - ९५२
अब्दुल्ला बिन ज़ुबैर - १०६७, १०८०
अब्दुल्ला बिन अहमद - १४१९
अब्दुर्रहमान - १४१५
अब्दुर्रहमान मिर्ज़ा मदारी - ६०
अब्दुर्रहीम शाह - १०८८
अब्राहम - २९३, ६८५
अमीर अली - २३
अमीर खुर्द - ११३४
अमोणकर किशोरी - १०७१
अरबी इब्न अल् शेख मुहियुद्दीन (इब्न अरबी) - २७, ४४, ५५, ५६, ५९, ६०, ६३, ६७, ६९, ७०, ८०, ८१, ८३, ८४, ८७, ९१, ९३, १२१, १२२, १८०, १८१, १८२, २१०, २४२, २४३, ६८१, ७३७, ११२०, ११४७, ११४८
अर्बेरी (अरबेरी) ए. जे. - ९७२, ११५७, १३६९
अल्-औफ़ी - २०
अल्-हज़्म (हुज़ुम) - १९, ३१
अल्-अल्लफ़ - १८
अल्-नूरी - ७३
अल मुतवक्किम - ३०
अल जुनानी (जुजानी) - ३६
अल रज़ी - ३७
अल राज़ी - २२, २८, ३५, ५२, ५३
अल मुहाइद - ४४
अल मोराविद - ४४
अल हसन इब्न अल सब्बाह - ५९
अल सराज / सर्राज - ५५
अल् वाजिद - १०६७
अल कुशैरी - ५५
अल्-इस्फ़हानी - १०६७
अल जवैनी - २२, ४०
अल जब्बाई - २०
अल वलीक - २५

अल ख़्वारिज़्मी – ५३
अल बत्तानी – ५३
अल मुहासिबी – ५५
अल–किंदी अबू याकूब – ३१, ३२, ३३, ३४, ३९, ५२, ५३, ५४, १०६६, १०६७
अल–फ़राबी (फ़ाराबी) अबू नासर (नस्र) बिन मुहम्मद इब्न तर्ख़न इब्न उज़जा – ३१, ३३, ३४, ३५, ३७, ३७, ४५, ४६, ५३, ५४, ६७, ५८५, १०६६, १०६७, ११०७, ११०८, १५६९
अल्–मामून – १९, ३०, ५२
अल्–जहीज़ – १८
अल्–अशअरी – १९, ५४
अल्–मतरूदी – १९
अल मन्सूर – २३, ३०, ४९
अल्–तहावी – १९
अल्–ज़हबी – १३५६
अलाहाबादी शेख मुहिबुल्ला – ९१, २१०
अलेक्झँडर – ३२, ४७२, ५८३
अली – १३०, ७०२, ९६८, १०७९
अली बिन अबी तालिब मौला – अली हज़रत अमीरूल मोमिनीन – ३६, ३७, ६२८, १०८१, १३२८, १६२१
अल्लाह – ६२, ६५, ६८, ७०, ७२, ७३, ८२, ८६, ८७, ८८, ९१, ९५, ९९, १०१, १०३, १२०, १२१, १२३, १२७, १२८, १३०, १३१, १३२, १३३, १३६, १३८, १३९, १४०, १४१, १५०, १५४, १५८, १६२, १६८, १७२, १७५, १७६, १७७, १८०, १८८, १९०, १९२, १९६, १९७, १९८, २०१, २०२, २०४, २०६, २०७, २०८, २०९, २१७, २१८, २१९, २२१, २२२, २२३, २२४, २२५, २२६, २२७, २२९, २३०, २३१, २३२, २३४, २४६, २४७, २४८, २४९, २५०, २५१, २५२, २५३, २५७, २५९, २६०, २६१, २६२, २६३, २६४, २६५, २८३, २८८, २९२, २९५, २९६, २९८, ३११, ३१२, ३१५, ३१७, ३१८, ३२५, ३२९, ३४०, ३४२, ३४३, ३४६, ३४७, ३४८, ३४९, ३५०, ३५२, ३७८, ३७९, ३८२, ३८३, ३८९, ३९०, ३९५, ४०८, ४०९, ४१२, ४१६, ४१७, ४२१, ४२८, ४३२, ४३५, ४४०, ४४१, ४४८, ४५७, ४७९, ४८१, ४८२, ४८४, ४८७, ४८८, ४९०, ४९१, ४९३, ४९४, ४९५, ४९६, ४९७, ४९८, ५००, ५०१, ५०२, ५४८, ५५२, ६०३, ६०४, ६०५, ६१६, ६१८, ६२५, ६३०, ६३१, ६३४, ६४४, ६५६, ६५८, ६७४, ७०९, ७१९, ७२२, ७२४, ७३६, ७४९, ७५८, ७५९, ७६०, ७६१, ७६३, ७६४, ७६५, ७९२, ७९३, ७९५, ७९८, ७९९, ८०२, ८०४, ८०५, ८०७, ८०८, ८३६, ८३८, ८४८, ८९२, ८९३, ९०२, ९५३, ९५४, ९५६, ९५९, ९६१, ९६२, ९७०, ९७५, ९७८, ९८४, १०२१, १०२२, १०२४, १०२७, १०२८, १०३०, १०३१, १०३४, १०३५, १०३६, १०३७, १०४४, १०५२, १०५४, १०५८, १०७६, १०८२, १०९९, १११८, ११४९, ११५४, १२११, १२१५, १२२९, १२३०, १२३८, १२४३, १२४४, १२४५, १२४९, १२५०, १२५४, १२५५, १२५६, १२५७, १२५९, १२६१, १२६२, १२६४, १२६५, १२९५, १३००, १३०५, १३०६,

१३०९, १३२३, १३२६, १३४४, १३४७, १३४८, १३४९, १३७१, १३७४, १३८१, १३८२, १३८९, १३९४, १३९५, १४०२, १४०८, १४०९, १४११, १४१५, १४१६, १४१७, १४१८, १५१७, १५१८, १५२३, १५७०, १५७९, १५८५, १५९२
अल्फ़ा (ओमेगा) – ३२६
अव्वा – १२४९
अश्शाफ़ी – २४
अहमद – ३७१, १२३६, १२३७, १२६२
अहमद अल्-बदवी – १३५८
अहमद इब्न हंबल – २४, १०८०
अहरार अबू सईद (सादी) – ६७
अहमदनगरी ख्वाजा सय्यदना फ़क़ीर मोहंमद शाह – १०८१, १०८२
अहिरमन/अहिर्मन/आहुरमन – १८६, २७३, २८५
अहुरमजदा (ओर्मझ्द) – २७३, २७९, ३५६
ॲबेलॉर्ड – ९
ऑरिजेन – ९, ५०७
ऑरिस्टिपस – २६९
ऑरिस्टॉटल / अरस्तू – ७, १९, २१, ३२, ३३, ३४, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४६, ४७, ५३, ५४, ६५, ७०, ८२, ९२, ९६, १०६, ११५, १६०, १८२, २७२, ३१६, ३६२, ३६४, ४७२, ५०४, ५०७, ५८३, ५८६
ॲव्हेंपेस – ४४

## (आ)

आईन्स्टाईन अल्बर्ट – १०५, ११२, ३२४, ३२८, ३२९, ३३०, ३६४, १०७१, १६२१
आएशा/आयशा सिद्दीका हजरत – २१४
आज़म डॉ. मुहम्मद – ८३९, १०७३, १०७४, ११५२, ११५४
आज़ाद मौलाना अबुल कलाम – २९
आद – २३३
आदम – ८८, ९९, १३०, १३४, १३५, १४३, १५१, १५२, २०८, २१८, २४०, २५१, २८४, ३१८, ३२२, ३२३, ३९८, ३९९, ४०२, ४०६, ४०९, ४१४, ४१९, ४४७, ४९०, ६०३, ६२२, ६३०, ६५१, ६८१, ६८३, ७२१, ७५१, ८२२, १०३९, १२३९, १२४८, १२९६
आनंद – ३५५
आरूणि – ३०३
आर्नोल्ड – १६१८
आलमखान – १४४०
आल्बर्टुस मॅग्नुस – ५४
आत्रेय – ५६४
आंग्रमैन्यू – ५०८
ऑगस्टीन सेंटटॉमस – ४१, ४४, १५९, ५०८, ५७९, १६१७
ऑटो – १५९
ऑस्टिन जोएल – १६२२

## (इ)

इक़बाल डॉ. मुहम्मद – ५०७, ५८५, ५८७, १०८२, १६१३
इज़राईल/इज्राईल – २१२, ३७४, ४०१, ४०२, ४०५, ४१३, ४५६, ४६१, ६३२
इजाज़ील – ४०८
इद्रीस – २४०, ३७४, ४०२, ४१४, ४५५, १३१४
इनायतखान हज़रत – ७५१, ८७८, १३४१, १६२१
इब्न अब्बास – ९७८, १०२५, १०७८

इब्न अता सिकंदरी – १०२५
इब्न इसहाक – १४१६
इब्न ख़ल्दून – ३१, ४७, ४८, ९६, ५८५, ५८७
इब्न अब्दुल बर – १४१५
इब्न आयशा अल् मदनी – १०६७
इब्न अल्–जोज़ी अल्–बग़दादी – ११११
इब्न तायमिया (तौमिया) अहमद तक़ीउद्दीन – २४, २५, ३१, ४३, ४९, ६०, १३८८
इब्न ख़ल्लिक़ान – २३, २४, ३३
इब्न तुफ़ैल (तुफ़ल) – ३१, ४५, ६३४
इब्न तुमूरत – ४४
इब्न बज्जा – ३१, ४४, ४५
इब्न मस्काविया – ३१, ३६, ७११
इब्न मिसजा / मिसजाह – १०६७
इब्न अल्–मुनज़्ज़िम – १०६७
इब्न रूश्द (अव्हेरूस) – ९, २८, ३१, ४६, ४७, ५३, ९४, ५०८, ५८३, ७०२
इब्नसाद – १४१५
इब्नसीना अबू अली अल हुसैन बिन अब्दुल्ला बिन सीना (अव्हेसीना) – ९, ३३, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४३, ४६, ४७, ५१, ५३, ५४, ६५, १६०, ५०७, ५८३, ५८५, ५८६, १०६८, ११४८, १३५६
इब्न सुराइज – १०६७
इब्न हुज़्म (हुज़ुम) १९, ३१
इब्न हुज़्मी – ४४
इब्न–ए–क़य्यिम (इमाम) – ७८४, ७८५, १४१३, १४१७
इब्न–ए–ज़ैद – ९५२
इब्न–ए–मसऊद – ९५२, १४१७
इब्न–ए–हबान (हिब्बान) – १०७९
इब्राहीम (प्रेषित) – १३३, १३४, १३५, २१५, २३७, २४०, २८६, २८२, ४१४, ४१५, ४६०, ४८२, ७१७, ८०६, ८१४, ८२२, ८३९, ९७१, १०३९, १२१६, १२३८, १२९२, १३५१, १३८१, १३८२, १५७९
इब्राहीम अल् महदी – १०६७
इब्राहीम इब्न सय्यद – १८
इब्राहीम बिन अधम – ५५, ५८, ६९
इब्राहीम ख़वास – ७८७
इब्राहीम शुत्तारी अहमदाबादी – ८८
इब्राहीम शैबानी – ७२४
इब्लीस – ९९, २०८, २१८, २१९, २६२, ३१३, ३९८, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४११, ४१९, ५३३, ६००, ६८५, १२१८, १२३९, १३५२
इमाम अहमद – २०७
इमाम इस्माईल – ३६, ४४८
इमाम कुशेरी – १३६, १०२०, १०२१, १०२२
इमाम मालिक – १०८०
इमाम जाफ़र अस्–सादिक़ – २३, ३६
इमाम नववी – १४२०
इमाम रब्बानी अल्फ़सानी – १०७५
इम्रान – २११, २२३, १२९०, १२९२, १३०१
इमर्सन – १०६९
इसराफ़ील / इस्राफ़ील – २३८, ३७४, ४०२, ४१३, ४५५, ४६१, ५३२, ६३२, ६५५, ६८३, १३१४
इसहाक़ अल – मूसीली – १०६७
इस्कंदर/सिकंदर/अलेक्झँडर – ३६३, ४६२, ४७२
इंद्र – ३०१, ११७४

(ई)

ईश - १०४०

ईसा/येशू ख्रिस्त - ५०, १३४, १३५, २४०, २८६, ३७४, ४१५, ४५५, ६३०, १०३९

(उ)

उत्बा - ९६

उदयन - १०७

उनमुनोडी - १६१८

उपाध्याय बलदेव - ९९७

उबे दुल्ला सिंधी मौलाना - २९

उमय्यद - १०६७

उमय्या (उमैय्या) - १७, १९, २९, ३०

उमर ख़य्याम - ५२

उमर बिन आस - १०८०

उमर हज़रत - ३७, ९८, २१२, २१५, ११०६

उस्मान हज़रत - ३७

(ए)

एकनाथ संत/महाराज - ९४०, १३४१, १४७२, १४७३

एखार्ट - ८३, १२३

एटकिंसन ली - २७०

एडिंग्टन - ३२८, ३६३

एने (वे) क्सो गोरस - १०६

एनोक्झिमेनेस (ॲनाक्झिमेनीस) - २६८, ३६०

एपिक्यूरस - २६९, ५८३, १६१३

एरिजेना जॉन स्कॉटस - ९, १२१, १२२

एल्लीस. एच. - ८६४

एंपेडोक्लीस - ३६१

(ऐ)

ऐलुष - ५६४

(ओ)

ओर्मुझ - १८६

(औ)

औरंगज़ेब - २८

(क)

कणाद - १३

कदम श्री. अशोक - ७२

कपिल (सांख्यमुनि) - १३, १०८, २६८

कतादा - ९५२

कबीर संत - २६, ५०८, १०५५, ११४७

करामन कातिबैन - ४१३

करूबी (करूबियून) - ४६१, ४७४

कर्ख़ी मारूफ़ अल् - ६९, ७३, १०८०, ११२१

कश्यप (आचार्य) - ७७७

कसीर इब्न - १५८

कृष्ण - २७३

कृष्णचंद्र - १३

कॅल्व्हिन - ५०५

कंस - २७३

(का)

क़ाज़ी महमूद बहरी - ९०

(डॉ.) काणे भारतरत्न महामहोपाध्याय - १२०७, १४१०

क़ादियानी मिर्ज़ा गुलाम अहमद - ५८८

कामत रामचंद्र कृष्ण (आण्णा) - ९४९, ९९०, १४५५, १४५६, १४९९

कारनॅप रूडॉल्फ - १६१६

कालाबाधी - ७२५

कालिदास - १२७२

कॉलरिज – १६१५
कांट – २०, २१, २२, ३२, ४५, ९५, १०७, ११४, १५९, १६१, २८०, ३३५, ३६२, ५८४, ७०४

(कि)

किर्केगार्ड – १५९
किरमानी सय्यद मुहम्मद बिन मुबारक – ११००, ११०७, ११०८, १११०, ११११, ११५९
किस्तलानी इमाम – ८८

(कु)

कुत्बुद्दीन बख़्तियार काकी ख्वाजा – १०७६, १०८१, १०८२, १०८७, ११२३
कुमार गंधर्व – १०७०
कुमारिल भट्ट – १३
कुशेरी इमाम अबुल क़ासिम अल् – ७२५, १०७२, १११३, १११७, ११४३, १३६३, १३६७, १४१३, १४१४

(के)

केप्लर – ३६४
केयर्ड प्रो. – ११६
केशकंबली अजित – १२, २६८
केसलर – ३३३
केळकर न. चिं. – १६१९
क्लेमंट – ९

(को)

क्रोचे बेनेडिट्टो – ४, ६७
कोपर्निकस – ३६४
क्रोपोटकिन – ३३३

(कौ)

कौटिल्य – १६२१

(ख)

ख़तीब अल्लामा – २३७
ख़लीफ़ा बिल्लाह – २४

(खा)

ख़ान ख़्वाजा – १८१
खानवेलकर श्री. शं. – १४५४, १४८३

(ख़ि)

ख़िज़र/ख़िज्र – ९८, २१२, २४२, ४०६, ४६३, ४६४, ४७२
ख्रिस्त येशू – १६४, १७०, १७२, ५०४

(खु)

ख़ुसरो अमीर – १०६९, १०८७, ११५८, १३१०

(खे)

खेर कैलास – ११४७

(ग)

ग़ज़्दवानी संत ख्वाजा अब्दुल ख़ालिक़ – १३६
गजानन महाराज – १४४८
ग़ज़ाली इमाम अबू हामिद अल तूसी अल – २२, २८, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ६३, ७०, ७३७, ७८२, ७८५, ७८७, ८२८, १०२३, १०२५, १०२७, १०२८, १०७९, १०८१, १०९०, १०९२, ११४८, १३६३, १३६७, १३९९, १४०६

ग़ज़ाली अहमद अल् (अल्गाझेल) - २५, २६, ३१, ४०, ४२, ४३, ४६, ५४, ५५, ५६, ६४५, ७४१, १०९०, १०९२, १११३, १११४, १११६, १११७, ११२१, ११५३
गडकरी कै. राम गणेश (गोविंदाग्रज) - ८४९, ८५६
गंगोही शेख़ अब्दुल कुद्दूस - १०८१, ११००, ११०९
गंज-ए-शकर बाबा फ़रीदुद्दीन - १०८१, १०९९, १११७, ११२४
गॅमो - ३२६
गॅलन/गॅलेन - ३६, ३७, १३५६

(गा)

ग़ाज़ी मियाँ - १३५६
ग़ालिब मिर्ज़ा - १६२०

(गि)

गिब्ब. ई. जे. डब्ल्यू. - ३७०, ८८३
गिब्सन - ३२
गिल्बर्ट - ९

(गी)

ग्रीन - २७५

(गु)

गुरूनानक - २६, २५०, २५६, ३१९, ३२०, ३२१, ४३२, ५०८, ७०५, ९९५, ११४७, ११९५
गुलाबराव महाराज - १४९९
गुंथर-ए. - ५०८

(गे)

गेट्स पॅट्रिक - ३३३

(गो)

गोपीनाथ डॉ. कविराज महामहोपाध्याय - १२०४, १४९०
गोरखनाथ गुरू - १००६, १००७, १००८
गोरा कुंभार - ९३९
गोविंद रामकृष्ण - ९३९
गोंदवलेकर महाराज ब्रह्मचैतन्य श्री - ९४०, ९४२, ९९१

(गौ)

गौतम बुद्ध - १३, १७०, २६८, २६९, ५१४, ७०५, १५१४, १६१६

(घा)

घाघ - महाघाघ - ४६२

(घो)

घोष अरविंद - १६१८

(च)

चतुर्वेदी पंडित आचार्य परशुराम - ८९७, ९१०
चंद्रकीर्ति - २७३

(चा)

चार्ली चॅपलिन - १६२२
चार्वाक - १२, २६८, ३५९

(चे)

चेस्टाव्ह - १५९

**(चै)**

चैतन्य – २६

**(चो)**

चोखामेळा – ९३९

**(चौ)**

चौहान सुनिधी – ११४७

**(छा)**

छागले भगवान – ५६३

छागलेय ऋषी – ५६३

**(ज)**

जज़री इब्न असीर – ११९

जनाबाई – ९३९

जमशीद/जमशेद – ६१०, ७४६

जरादी अल्लामा अबू बरी फ़ख़्रुद्दीन – ११०९

जर्जीस – ४५५, १३१४

जर्राबी (जर्रादी) मौलाना फ़ख़रूद्दीन – ११००, १११०, ११२५

जर्रार – १८५

जरीरी – १०९४

ज़लजाल – १०६७

जस्टिन – ९, ५२

ज़हबी अल् – ८३०

जहान बिन सफ़वान – १७

जहाँगीर सूफ़ी सय्यद अश्रफ़ समनानी – ८१४, ११२५

जॅस्पर्स – १५९

**(जा)**

जाबिर सईद बिन – ८८

जामी नूरूद्दीन अव्दुर्रहमान – ५१, ५२, ५६, ७२९, ८८२

जामी मुल्ला – ८३, १७७

जॉन (याहया) – ८२

जॉन क्विन्सी ॲडम्स – १६२०

जॉर्ज बर्नाड शॉ – १६१९

जॉर्जियस – २६९

**(जि)**

जिब्रान ख़लील – ९११, ९१२

जिब्रईल/जिब्रील – ९८, १५८, २०९, ३८६, ३९३, ३९४, ४१३, ४६१, ५३१, ५३३, ५५२, ६०३, ६२०, ६३२, ६५५, ६८३, १०२१, १०६२

ज़िम्मर – ९९९

जिल्सन ई. एच्. – १६१५

**(जी)**

जीन्स सर जेम्स – १०५, १६९, ३६३

जीलान दमिश्क़ी – १७

जीली सय्यद (शेख) अब्दुल करीम अल् – ६३, ६४, ६८, ६९, ७०, ८१, ८३, ८५, ८७, ९३, ९८, १८४, १८८, १९०, १९१, १९४, २०१, २८१, २८२, २९७, ३९९, ४०१, ४०४, ४०६, ४४५, ४६४, ४६५, ४७५, ६६४, ६८१, ६८५, ६८८, ७२७, ७३५

**(जु)**

जुज़ानी (जुस्जानी) क़ाज़ी मिन्हाज अल्–सिराज – ११२३

जुनेद ख़्वाजा अल् – २०७, १०९४, १११३

(जे)

जेम्स विलियम (विल्यम) – ११७, २६७, ८६४
जेम्सवार्ड – २८०

(जै)

ज़ैद – ८१, ९२
ज़ैद बिन रिफ़ाआ – २०
जैमिनी – १३, ११७३

(जो)

जोशी का. स. – १५०७, १५१०
जोशी प्र. न. – १५३१, १५३८
जोशुआ मरिन – १६२०

(झ)

झरतुष्ट्र (ष्त) १८६, ५०८
झवेरी मोहनलाल भगवानदास – ११७८

(झे)

झेनोफेनीस – ५०७
झेलर – ९२

(ट)

टर्ट्यूलिअन – ५८४

(टा)

टागोर (ठाकूर) कवींद्र रवींद्रनाथा – ६९२, ७६६, ९१३
टाटा. जै. आर. – १६२०
टॉमस गोल्ड – ३२६
टॉमस चब – २७६
टॉमस सेंट – ५४
टॉलस्टॉय लिओ – १०७१

(टे)

टेट – ९७
टेनिसन – १६२१

(ड)

डग्लस ऐनलाय – ६७

(डा)

डायोनिशियस/डायोनिसस/डायोनिसिस – ८२, ८३, ५८०, ७४२
डार्विन चार्लस – ५०, ८५, २७६, ३१६, ३३३
डांटे (दांते) – ४३
डॉपलर ख्रिश्चन – ३२८

(डि)

डिमॉक्रिटीस/डेमॉक्रिटस – २६९, ३६१, ५८०, ५८३

(डु)

डुरांट (दुराँ) विल्ल – ८६६, १६१८

(डे)

डेकार्ट्स (देकार्त) – ३२, ५४, ५८३
डेव्हिड डिनँडचा – ५०७

(त)

तब्रीज़ी शेख जलालुद्दीन – ११२२
तंडु – ११५१

(ता)

ताराचंद (डॉ.) – ८९६
ताहा – १२१७, १२९०, १२९२
ताहिर इब्न अब्दुल्ला अन्सारी – ८८

(ति)
तिरूवल्लुवर – १६१८
तिवारी (डॉ.) रामचंद्र – ८९९
तिवारी प्रा. रामपूजन – ९०४, ९०९

(तु)
तुकाराम (तुकोबा) महाराज संत – ५३६, ७७२, ९३८, ९४०, ९८८, ९९४, ११८५, १३७८, १३८०, १३८४, १३८६, १३८७, १३९०, १३९१, १३९२, १३९६, १४२१, १४२५, १४५४, १४९१, १४९७
तुबाइस – १०६७
तुराब अली शाह क़लंदर आचार्य – १२१

(तौ)
तौसवी ख़्वाजा सुलेमान – १०८१

(था)
थानवी मौलाना अश्रफ़ अली – ७२४, ९६२, १०५३
थॉमस ॲक्विनास – ४२, ४४
थॉमस फूलर – १६१९
थॉमसन – ३३३
थॉय – ३५५

(थे)
थेलीज/थेलिस – २६८, ३६०
थेल्स – ३१८

(थो)
थोरो – ११

(द)
दक़्क़ाक़ अबू अली अल् – १११४, ११२५, ११४१
दबीस मुग़न्नी – १०६७
दमासीन सेंट – १५९
दमास्कीन – १६०
दर्द ख़्वाजा मीर – १०२५
दळवी डॉ. मुहम्मद – २४६

(दा)
दाऊद (प्रेषित) – ८७, २८६, ४१५, ४५५, १०७७, १०८४, १२४०, १३१४
दार कतबी – १४१९
दारा शिकोह – २८, ६०, ७४८
दारानी अबू सुलेमान – ६००
दासगुप्ता सुरेंद्रनाथ – १६१४

(दि)
दिनोरी मिमशद अल् – १११६
दिवाकर श्री. रंगनाथ रामचंद्र – ९९९
द्विवेदी डॉ. हज़ारीप्रसाद – ९१०, १००८, १०४०, १२७५

(दी)
दीदात अहमद – १२८९, १२९४
दीक्षित. श्री. ह. – १३२६

(दु)
दुनिया इब्न अबी अल् – १११२, १११५
दुर्खीम एमिल – ४९९, ७५४, १४२२

## (दे)

देकार्त – ११५, १५९, २८०, ५०८, ५८४, ७०४, १६१६
देवराज डॉ. – ६९२
देहलवी शाह वलीउल्लाह मुहद्दिस – २८, १०७९

## (न)

नक़्शबंद ख़्वाजा बहाउद्दीन – ७१
नक़्शबंद ख़्वाजा मीर मुहम्मद – १०५८
नज़ाम – ५४
नज़्मुद्दीन कुब्रा (शेख) – ८८, ११२०, १३५८, १४००
नफ़र बिन हारिस – ६३८
नरहरी सोनार – ९३९
नवाब साराभाई मणिलाल – ११७८

## (ना)

नागार्जुन – २७३
नागोरी मौलाना क़ाज़ी हमीदुद्दीन – १८६, ११२२, ११२३, ११२५, ११५७
नाथजी – १६१३
नारळीकर जयंत – ३३०
नारद देवर्षी – ३३१, ७६८, ७७७, ७७८, ९०९, ९११, ९३७, १०६३, ११७३, ११८०
नासिर इब्नुल हारिस – ९६

## (नि)

निकोलस – १२२, २१९, १६१३
निकोलसन (निकलसन) डॉ. रेनॉल्ड ॲलिन – ७७, ४७५, ६००, ६८८, ७२५, ८८०, ८८२, ८८४, ८८५, ८९७, ८९८, ९०५, ९०७, १०४०
निगंठनात पुत्र – २६८
निज़ामी फ़ख़्रुद्दीन – ८२६
निज़ामुलमुल्क तूसी – ४०
निज़ामुद्दीन औलिया शेख़ ख़्वाजा चिश्ती – २४२, १०६९, १०७३, १०९६, ११००, ११०२, ११०७, ११०९, १११०, ११११, १११५, ११२५, ११३३, ११३६, ११४८, ११५८, १३०७
निफ़ारी – ७२८
निवृत्तीनाथ – ९३८
निंबार्क – ५०७

## (नी)

नीत्से फ्रेडरिक – १६३

## (नू)

नून – ४६१
नून योशा बिन – ४७२
नूरी अबुल हसन – १११८, ११२०
(नूरी अबू अल् हसन)
नूरी शेख अबुल हसन – ६५३, ६५४
नूह – १३४, १३५, २३३, ३८९, ४१५, ४५२, ९७१, १०३९
न्यूटन – २७६, ३३४, ३६४

## (ने)

नेपोलियन – ७०२

## (नो)

नोफ़िल उस्ताद अब्दुर्रज़्ज़ाक़ – १२८९, १३०४

**(प)**

पतंजली महर्षी – ९९९, ११६९, ११७३

पद्मनाभ स्वामी परमहंस – ९५०

परवीन आबिदा – ११४५, ११४६, ११४७

परमहंस रामकृष्ण – ११४८

परशुराम – ११७३

प्रजापति – २६८, ३०१, ११७४

प्रभाकर – १३

पॅटिसन प्रिंगल – २८०

पॅटॅसेल्स – ९३

प्लॅटिनस (प्लॉटिनस) – ७, ६६, ६७, ८६, ९३, १६०, ५०७, ५८४, ७४२

प्लॅटिनियस – ८२

पंत महाराज बाळेकुंद्रीकर – १४६६

**(पा)**

पाकिधकय्यायन –२६८

पातर श्री. राधागोविंद – ११९३, १५६८

पानीपती क़ाज़ी सनाउल्लाह – ११००

पानीपती ग़ौस बू अलीशाह क़लंदर – १०५५, १३०७

पाब्लोनेरूडा – १६१९

पायथागोरस – ७, ३६४, १६१३

पार्मेनायडीस – ३६१, ५०८

पार्वती – ११५१

पास्कल – ४१

पालशिरर – १६१९

प्राण – ३०४

प्रॉक्टर बॉब – १६२१

पॉल सेंट – ५०८

पांडये पंडित चंद्रबली – ९०३, ९०८, ९१०

**(पि)**

पिकथॉल मार्माड्यूक एम. – ८२४

**(पु)**

पुंडलिक – १५४९

प्ल्युटार्क – ११

**(पे)**

प्लेटो / अफ़लातून – ७, १९, ३३, ६५, ८२, ८६, ९२, ९६, ९७, ९८, ११०, ११५, १६०, २६६, २७२, ३६१, ५६३, ५८०, ५८१, ५८३, ५८४, ५८७, ८५७, ११४८

**(फ)**

फ़जील बिन मर्ज़ूक – ९५२

फ़तेह अली खान नुसरत – ११४६

फ़रीद इब्नुल शर्फ़ुद्दीन उमर – ५९९

फ़रीदुद्दीन अत्तार – ५६, ५८, ७५, ८३९, ८४०, ११२५

फ्रँकलिन – १६१३

फॅब्रे – ८५५

**(फा)**

फ़ातिमा बीबी – ६२८

फादर संत अंथोनी – ९९

फायलो – ६६, ८२

फ्रान्स अनातोले – १६१९

फ्रायड सिग्मंड – २६६, २६७, ८६२

**(फि)**

फिट्झ – ६७

फ़िरऑन/फ़िरॉन/फ़िरऔन – ४९, २३३, ४२९, १२१०, १२१८

फ़िरोज शाह तुग़लक़ – ११२४
फिलिप हिट्टी प्राध्यापक – ४३
फिलॉलाऊस – ३६४
फिश्ट – ५०७
फ्लिंट प्राध्यापक – ११६, २६६

(फी)

फीडो – १६१६

(फे)

फेश्नर – ५०७

(फो)

फोर्ड हेन्री – १६१९

(ब)

बग़दादी जुनैद – ५५, ५७, २०७, ७८५, ७८७, ७८९, ८८८, १०८०, १०९४, १११३, १११५, १११७, ११२०, ११२१, १३५२
बग़दादी शफ़ीउद्दीन अब्दुल मोमिन अल् – १०६८
बग़दादी शेख मुजुदुद्दीन – ११५९
बद्रुद्दीन इसहाक़ – १३६१
बशारत अहमद डॉ. – ७२
बर्कले/बर्क्ले बिशप – २२, ११६, २८०, ५७८, १६१७
बर्नाड संत – ७३३, १५१४
बर्गसाँ – ९६, १५९, ३६३
बर्ट्रांड रसेल – ११३
बृहस्पती – १२, २६८
ब्रह्म/ब्रह्मदेव – ३०९, ३१९, ३५८, ३५९, ४३२, ५६५, ५८४, ७७५, ११६४, ११७६, १३४५, १४४२, १५०३, १५०४, १५०५, १५१३
ब्रह्मा – २४९, २७१, ३०८, ३१९, ५५२, ५६३, ९३४, १०४०, ११६५, १४२७
ब्रह्माकुमारी – १६२१
बल्ख़ी शफ़ीक़ – ६९
बसरी ख़्वाजा हसन अल्–इमाम – १५२४
बहरी क़ाज़ी महमूद – ९०
बहाउद्दीन – १३६०
ब्रॅडले – ३, २७५, ५०७
बंदानवाज़ ख़्वाजा गेसूदराज – ५२७, ५२८, ५२९, ५३०, ५३२, ५३३, ६१६, ६१७, ६६७, ६६८, ६६९, ६७०, ६७१, ६७३, ६७६, ९५०, ९६६, ९७७, १०२०, १०८१, ११२५, ११२६, ११२७, ११२८, ११२९, ११३०, ११३१, ११३२, ११३३, ११३४, ११३५, ११३६, ११३७, ११३८, ११३९, ११४०, ११४१, ११४२, ११४३, ११४४, ११५४, १३९९

(बा)

बाक़ी बिल्लाह नक़्शबंदी देहलवी – १५७
बादरायणाचार्य – १३, १०६, १६१
बाबा फ़रीद – १३६१
ब्राऊन इ. जी. – ८४
ब्राऊनिंग कवी – ११६
ब्राइट मॅन – ५०७
बालिश ऋषी – ५६३, ५६४
बाळमुकुंद – १४६६
बाळशास्त्री हरदास – १४६८
ब्लॉंडेल – १५९

### (बि)

बिस्तामी अबू यज़ीद – ७५

बिस्तामी/बुस्तामी बायज़ीद – ५५, ५८, ७०२, ७२५, ७५०, १०८०

### (बु)

बुकैल्ले मॉरिस – ३५३

बुख़ारी – २१४

बुद्धदेव – ३५५

बुरहानुद्दीन इब्राहीम अल्-बिकाई – ६०

### (बे)

बेकन रॉजर – ३२, ४५, ५४, ५८३

ब्लेस पास्काल – १६१५

### (बो)

बोनाव्हेंचर सेंट – १५९

बोस बाबू जगदीशचंद्र – ६३, ३३०

### (भ)

भगवानदास – १४२८

भट यशवंत आबाजी – १२०७

भरत – १०६३

भर्तृहरी आचार्य – ५०७, ५५०, १२००, १२०४, १६१८

### (भा)

भागवत रा. स. – ९९९

भारती स्वामी शुद्धानंदजी – ७६७

भावे विनोबा – ७२, १८८, १६११

भांडारकर डॉ. रामकृष्ण गोपाल – १३८०, १३८५, १३९३, १४८१

### (म)

मआविया/मुआविया अमीर – ७०२, १०७९

मक्की उमर बिन उस्मान अल् – ६४३

मक्की शेख़ुल शयूख़ अबू तालिब मुहम्मद बिन अली बिन अतिया – ५५

मख्खली गोशाला (गोसाल) – १२, २६८

मदनी शेख याह्या – १०८१

मदार ज़िंदाशाह – १२६५

मध्वाचार्य – १३

मनेरी शेख़ शरफुद्दीन अहमद यहिया – १२१

मरियम/मर्यम/मेरी = ३९७, ४१५, ४१६, १२१७, १२४९, १२९०

मलिक गश्तान – १२४०

मलिक शाह – ५९

मसीह डॉ. – २६७

मसूद बक्क – ११२५

महदी अल-माऊद/अल मुंतज़र – ३७

महदी (माऊद) सय्यद मुहम्मद बिन सय्यद अब्दुल्ला – ९६३

महावीर जैन (वर्धमान) – २६८, २७३, १६१६

महेश/महेश्वर/महादेव – २४९, २७१, ३०८, ११६४, ११६५

मंडनमिश्र – ५०७

मॅक्स द (डी) प्री. – १६१९

मॅक्समुल्लर – ५६, २६७, २७१

मॅकडूगल – ११०

मॅकडोनाल्ड डंकन बी – २०, ४४

मॅसेहेन्री – १३६०

### (मा)

माबाद अल्-जुबानी – १७

मामून अल् (ख़लीफ़ा) – २३, २४

मायमून/मैमून इब्न/मायमोनिडेस/मेमोनायडीस – ४३, १६०
मायर श्री. – ९८
मालब्रांश – ५०८, ५८३
मालिक इब्न अनस – २३
मांडुक्य – ५०७
मॉरेल्ल – ८३

(मि)

मिल्ल-जे-एस. – १६८
मिसजाह अबू इस्मान बिन – १०६७
मिसरी/मिस्री जुन्नून – ५७, ७५, ८५, ८४८, ८९७, १०२३, १११३, ११३४, १६१९

(मी)

मीकाईल – २०९, ४०५, ४१३, ४५८, ४५९, ४६१, ६३२, ६५५, ६८३, १२६२, १२६३
मीरसय्यद मुहम्मद जाफ़र मक्की – २४१
मीर सय्यद शरीफ़ जर्ज़ानी शाह – ११९
मीरा – ११४७

(मु)

मुईनुद्दीन चिश्ती ख़्वाजा शेख संजरी अजमेरी – ७१, १०६९, १०७२, १०८०, १०८१, १०८२, १०९९, ११२५, ११४८, १३५८
मुज़फ़्फ़र अली – ९७४
मुतवक्किल अल् (ख़लीफ़ा) – १९, २५
मुन्किर नकीर – २१२, ४१४
मुल्ला अब्दुल क़ादर बदायूनी – २६, २७
मुरादाबादी जिगर – १०७५
मुस्तसिम अल् – २५
मुहम्मद हज़रत पैगंबर (प्रेषित) – १६, ३७, ५०, ५५, ६८, ७४, ८२, ८७, ८८, ९८, ११९, १३०, १३४, १३५, १४७, १५४, १५८, १८५, १९८, २०३, २०७, २११, २१२, २१४, २२३, २२८, २२९, २४२, २५६, २५९, २८३, २८६, २८८, २९२, २९५, २९६, २९८, ३७१, ३७४, ३७८, ३८०, ३८४, ३८६, ३९०, ३९३, ३९४, ३९६, ३९९, ४००, ४०१, ४०२, ४१२, ४१३, ४१५, ४५५, ४९३, ४९४, ५००, ५०२, ५४८, ५९७, ६००, ६०३, ६२०, ६२२, ६२७, ६२८, ६३७, ६३८, ६५१, ६५२, ६५३, ६६५, ६६७, ६७०, ६७१, ६७२, ६८१, ६८२, ६८४, ७०५, ७०८, ७३२, ७८१, ७८५, ७९३, ७९४, ७९७, ८०५, ८०६, ८०८, ८०९, ८१४, ८२१, ८२२, ८२३, ८२४, ८२८, ८३३, ८४१, ८४४, ९५६, ९७५, ९७७, ९८१, १०२१, १०३९, १०५४, १०७३, १०७४, १०७५, १०७८, १०७९, १०८१, १०९५, ११०१, ११०५, ११०६, १११३, १११६, ११३०, १२१२, १२३५, १२३८, १२३९, १२४०, १२५५, १३२६, १३२८, १३४९, १३५०, १३५२, १३७१, १३८९, १३९६, १३९८, १४०५, १४३२, १५७९, १५९२
मुहम्मद अल्-बर्क़र्वा – १९८
मुहम्मद इब्न इद्रीस अश्शाफ़ी – २३
मुहम्मद अब्दुल क़ादिरशाह रहमानी पीर मंगलोरी – १०३१
मुहम्मद इब्न यूसुफ़ अल् फ़र्ग़ानी – ८३९
मुहम्मद ग़ौस ग्वाल्हेरी – १२२०, १२३६
मुहम्मद बिन अल् ज़जरी शाफ़ई – १२५३
मुहम्मद बिन उलयान – ६०१
मुहम्मद हसन अल जय्यत – २९

(मू)
मुसा (प्रेषित) - ४९, ८६, १३४, १३५, २११, २२८, २३३, २३४, २४०, २७४, २८६, २९३, ३५६, ४०५, ४१५, ४५७, ४७२, ६१२, ७१९, ७९३, ८२३, ९५३, १०३९, १२१०, १५७१

(मे)
मेमोनायडीस - ३४
मेहेरबाबा - ९११, १५१९

(मै)
मैत्रेयी - ५, ८५१
मैथ्यूटिंडल - २७६

(मो)
मोहसिन फ़ानी - २७

(मौ)
मौदूद चिश्ती ख़्वाजा - १०८१, १०९९
मौदूदी सय्यद अबुल आला - ८४१, ८४७
मौलवी मीर मोहंमद याक़ूब खान सूफ़ी (डॉ.)-७२
मौलाना वहीदुद्दीन खान - ७२, १११
मौलाना शाह अहमद सईद -१३७

(य)
यज़दाँ (यझ्दान) - १८६, २८५
यवोहा - २७१
यसावी अहमद अल् - १३५८

(या)
याक़ूब (प्रेषित) - ९२६, ९५७, १३८१, १३८२
याज़िद - १०६७
याजूज माजूज - ४६२
यासीन - १२६३, १२९०, १२९२
याज्ञवल्क्य महर्षी - ५, ८५१

(यु)
युक्लिड - ६८, ८५, १३२८
युंग - ११७

(यू)
यूडॉक्सस - ३६४
यूनुस अल् - असवारी - १७
यूनुस (प्रेषित) - २२३, ९६५, १२१६, १२९०, १२९२
यूसुफ़ (प्रेषित) - ९२६, ९५७, १२९०, १२९२, १३८२
यूसुफ़ अली अब्दुल्ला - १५८, १२८७
यूसुफ़ ख़्वाजा चिश्ती - १०८१
यूसुफ़ इब्न अल्-हुसैन अल राज़ी - १११६

(ये)
येशूमसीह (ख़्रिस्त) - २७९, २८६, ३९७, ४०२, ४१५, ७०५

(यो)
योगानंद - १५४४

(र)
रजनीश आचार्य - ५२२

रमण चंद्रशेखर – १४६९
रमण महर्षी – १४७२
रयि – ३०४
रसखान – ११४७
रहमान–ए–आर. – १०२१
रहीम – ११४७

(रा)

रानडे (डॉ.) रा. द. – १६२१
राधाकृष्णन सर्वपल्ली (डॉ.) – २६८, ३०७, ६९२
राबिया अदविया बसरी – ५५, ५८, ६९, ७४, ८८०
राम – २७३, ९३७
रामानंद स्वामी – ७७९
रामानुज – २७३, ५०७
रामनुजम – १३
रामनुजाचार्य – ७४, ११९१
रामदास स्वामी समर्थ – ५१४, ५१९, ५२२, ५२४, ५३५, ९४९, ९८९, १४४८, १५०५
रामकृष्ण – ९३६, ९३९
रावण – २७३
रॉइस जे. – ५०७
रॉबसन जे. – १११२
रॉबिनसन क्रुसो – ४५
रॉय मानवेंद्रनाथ – १६१४
रॉस – ११०

(रि)

रिकर्ट हेनरिश – ५८२
रिचर्ड सेंट व्हिक्टर – ५८२
रिफ़ाई अहमद इब्न – १३५८

(रु)

रुडॉल्फ ऑटो – ५८०
रुद्र – ९३४, १०४०

(रू)

रूझवेल्ट एलनॉर – १६२०
रूपगोस्वामी – ७७७
रूदबारी अबू अली अब्दुल्ला अल् – १११७
रूम/रूमी जलालुद्दीन मौलाना कवी – ४९, ५०, ५१, ५६, ६९, ७०, ७८, ९४, ९७, २१०, ५९७, ६९४, ७०२, ७११, ७३२, ७३३, ७३८, ७४३, ७४८, ८७९, ९१५, ९१६, ९१७, ९१८, ९१९, ९२०, ९२२, ९२३, ११२०, ११४८, ११५०, ११५४, ११५५, १३३७, १३५८, १३७६
रूयम अबू मुहम्मद अल् – १११७
रूसो जे. जे. – ५८२

(रे)

रेशमिया हिमेश – ११४७
रेळे (डॉ.) वसंत – १०१३

(रो)

रोमन हल – ५४

(ल)

लॅप्ले – ९५

(ला)

ला टॉय – १५९
लाइबनिझ/लायब्निझ/लेबनिज़ – २१, २२, १०६, ११६, १५९, २७१, ५०८, ५८३, ५८४, ६९७

लाओत्से – ५४९
लाप्लास/लॅप्लेस/लैपलेस – १०४, २७६, ३३४, ३६३
लॉ विलियम – १६१५

(लि)
लिओनार्डो – १६२२

(लु)
लुकमान – १२९०, १२९२, १३०१
लुथार्ड – ६८

(लू)
लूत – २३३
ल्यूपिसस (लुपिसस) – ३६१

(ले)
लेकियर – ५०७
लेन. ई. डब्ल्यू. – ९७२, ११५४

(लै)
लैमेत्रे जॉर्ज – ३२८

(व)
वकील डॉ. अलीम – ६८८, ८४५, १०१०, १०१४, १०२६, ११०७, ११५२, ११८१, १३५१, १३६०
वर्मा डॉ. रामकुमार – ९०८
वरुण – ११७४
वॅटसन – ८५८

(वा)
वाध्वाना – ४
वाल्टेयर (वॉल्टेर) – २७६, १६१४
वाष्कली – ४
वासिल बिन अता – १७, १८, १८४
व्यास – ९३७, ११७३

(वि)
विट्गेन्स्टाइन – १६२२
विठ्ठल – १५४९
विठोबा – ९३६, ९३९, ९८८
विरोचन – २६८
विवेकानंद स्वामी – ५२२, ११४८, १४४९
विंडेलबँड डब्ल्यू. – १६१६

(वु)
वुड्राफ/वुड्राफ सरजॉन अॅव्हॉलॉन (एवलॉन) – ११६३, १४६९

(वे)
वेदव्यास – ९३७, ११७३
वेब्ब प्रा. सी. सी. जे. – ७४९

(श)
शक्ती – १२७१
शफ़क़ मिर्ज़ा महमूद अली – १२२१
शबिस्तरी महमूद – ९२, १००, १५७, ३६९, ७३८, ७९४
शम्स तबरेज़ – १३१, ७४७
शर्फुद्दीन अहमद यहिया मनेरी – ९२४
शर्फुद्दीन उमर इब्नुल फ़रीद – ७५२
शर्मा डॉ. मुंशीराम – १२७५
शर्मा डॉ. श्रीराम – ५२७, ७७३, १५६७
शमसुद्दीन – ६८१
शहरस्तानी – २२

शंकर – ९९९
शंकराचार्य आचार्य – १३, ७४, ७५, १५९, २४८, २६८, २७३, २७९, ५०८, ५१४, ७६८, ९०६, ११४९, ११६४, १२०६
शंभू – १०४०

(शा)

शाफ़ई इमाम – १०८०
शाहआबादी अब्दुर्रज़्ज़ाक़ असर – १०९७
शाह कमाल – ७३२
शाह मेहर अली – १०८१
शाह वली उल्लाह देहलवी – २८, २९, ९८, १०२१, १०८१, १०८८
शाहसाहब मौलाना हाजी पीर सय्यद अब्रार उल्ला – १२२१
शांडिल्य – २६८, ७६८, ७७०, ७७७, ९३७, १५५०

(शि)

शिबली – ५५, ६८१, ११२१
शिबली अबू बकर/अल् बक – ५७, ७५, ७८२
शिव – ३०८, १५४९, १५५०
शिव/शिवशंकर – ११७४, १२०७, १२७१
शिवाजी महाराज – १६५
श्लिअर मॅकर – १५९

(शी)

शीस (प्रेषित) – ४१४

(शु)

शुक्ल आचार्य रामचंद्र – ९१२
शुलैब अबू मदियत – १३५८
शुस्तेरी ए. एम. ए. – ११९६

(शे)

शेक्सपीअर विल्यम – १६२०
शेख अहमद फ़ारूक़ी मुजद्दद सर हिंदी – २७, २१३, २१४, ७४०, १०३८
शेख अबुल अब्बास शकरनी – ६०१
शेख डॉ. अब्दुल वाहिद अब्दुर्रहमान – १५७६, १५८७
शेख अब्दुल हमीद – ८४१
शेख अल् – बक्री – ९७२
शेख अब्दुल रझाक शाह बियाबानी – १४२१, १४३०, १४३३
शेख नूरुद्दीन मुबारक ग़ज़नवी – ११२२
शेख मुहम्मद अमीन अल्–कुर्दी अल्–शाफ़ई अल् – नक़्शबंदी – ९६९
शेख बहाउद्दीन ज़करिया – ११२२, ११२४
शेख नसीरुद्दीन महमूद – ११२९
शेख अबू अली सियाह – ६०१
शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर – १५६५
शेख मुहम्मद बिन अहमद मग़रबी – १०७७
शेख हारून – ८२६
शेख शहाबुद्दीन सुहर वर्दी – ५९, ७०, ९८, १८३, ७२९, ७८२, ७८३, ८८८, ९०६, १०८०, १०८१, १११३, १११५, ११२०, ११२२, ११३९, ११५२, ११५७
शेलर – १५९
शेलिंग – ६८, ८५
श्वेतकेतू – १०४, ३०३

(शै)

शैतान – २७१, २७३, २८२, ३९८, ४११, ४१२, ४४१, ४६४, ४६५, ४७१, ८३२, ९५३, १२१३, १२३९, १२४०

(श्री)

श्रीकृष्ण भगवान/कृष्ण - २७१, २७४, २८१, ३१९, ११९३, १५४९
श्रीकंठ - ५०७
श्री श्री परमहंस योगानंद - ८७६
श्रीविष्णू - ९३८

(स)

सईद इब्न-ए-मुसैद - १०७९
सईद बिन जाबिर - १०७९
सक़ती सरी अल् - १११३
सदरलँड - ८५७
सदाशिव - ९३४, १०४०
सद्रुद्दीन मुल्ला - ६६, २१३
सफ़रूल आलमीन - १०६७
समनानी / सिमनानी शेख अल्लाउद्दौला - ८३, ९३
समूद - २३३
सरस्वती - ५५२
सरस्वती स्वामी स्वरूपानंद - ११७७
सर ऑलिव्ह लॉज - ९८
सर मुहम्मद यामीन खाँ - ३१५, ४३३
सर सय्यद अहमद खान - ६२, ९७
सरदार इक़बाल अली शाह - ५७
सराज/सर्रास शेख अबू नसर - ६४३, ८३०, १०७२, १११३
सरी अल सक़ती - १०९८
सलमान - ९५२
सहल बिन अब्दुल्ला - ८२८
सहल बिन तुस्तरी - १०२६
संजय वेलाथी पुत्र - २६८
स्टार जोनाथन - १३७६
स्टार्लिंग - ८५९
स्कोलिमावेस्की हेन्रिक - १४४४
स्पेन्सर - ३३२
स्पेन्सर हर्बर्ट - १०६
स्पेंगलर - ७०२
स्पेंटामैन्यू - ५०८

(सा)

सादी शेख - ५६, ८१, ९१८, ११४८, ११५७, ११५८, १६१८
साने गुरूजी - १४९१
साबित हुस्सान बिन - १०८०, ११०६
सारिपुत्र - ४३७
सारियतिया बिन ज़नीम - २१२
सारिह इब्न रूस्तम - ९८
सालारदीन शेख नूरूद्दीन - ८३०
सॉक्रेटीस - ६, ७, ११, ८२, ३६१, ५८१, ५८३, ७०४, ११४८, १६१४
स्कॉटस डन्स - १५९
स्वामी श्रीयुक्तेश्वर - १७४, १५४४
स्वामी महाराज, अक्कलकोट - १४५६

(सि)

सिकंदर - ६१०
सिज्झी अमीर हसन - ११३४
सिद्धारूढ स्वामी - १५५२
सिबिस - ५८१
सिमिअस - ५८१
स्टिवर्ट (स्टीवर्ड) बॅलफोर - ९७, ११६१
स्पिनोजा - १०७, १०८, ५८३
स्पिनोझा - ११५, १५९, २७५, ५०७, १६१६

### (सी)

स्वीडनबर्ग इम्म्यानुएल – ९७

### (सु)

सुदैली स्टीफन बर – १०८१
सुफ़्यान ताबेई – १९९
सुलतान अजदुद्दौला – ३६
सुलतान सैफुद्दौला – ३४
सुलेमान बिन अली – १०२६
सुहरवर्दी झियाउद्दीन अब्दुल अबुल नजीब अल् – ७१, ११३०, १३५८
सुहरवर्दी शेख मख़दूम बहाउद्दीन ज़करिया मुलतानी – १०८०, १०८१

### (सू)

सूर्य जुग – ११५६

### (से)

सेना महाराज – ९३९

### (सै)

सैफुद्दीन – १०६६
सैयद बिन मिसजाह – १०६७

### (सो)

सोनार सुभाषचंद्र – ११४८
सोलॅ – २८०

### (ह)

हक्सले – १०५
हनुमान – १०६३
हबल – ३२८
हब्बाबा – १०६७
हमदानी सय्यद अली – ९८५
हमदानी ऐनुल कुज़्ज़ात – १११७, ११२१
हम्मूदाह अब्दल लती – १५८२
हयी इब्न यकजा – ४५
हरिव्यास देव – ११६१
हर्बट स्पेन्सर – ८६, १६३, १६६, १६८, २७६
हर्मन बंडी – ३२६
हर्मिस जी. – ५०८
हलाकू – २५
हल्लाजे मन्सूर अल् – ५५, ५८, ७३, ७५, ७०२, ७५०, ९१२, ११२१
हव्वा बीबी – ४९०, १२४८
हसन – १०६८
हसन अल् बसरी – १७, १८, ५५, ५८, १०८१, १५२४
हसन इमाम – ६२८
हसन माशा – ११५१
हंबल इमाम अहमद – १८५
हंसराज हंस – ११४२
हंबोल्ट व्हॉन – ३२४
हॅमसन – ३२८

### (हा)

हाफ़िज़ शिराज़ी – ५६, ६४, ६९, ७४५, ७४६, ११०३
हातम असम – ८३९, १०३३, १६१८, १६१९
हारिस मुहासबी – ५८
हारून (प्रेषित) – ९५३
हारून अर्रशीद – २३
हारूनी ख़्वाजा उस्मान – १०८१, १०८२, १०९९
हार्टमन एन. – ५०७

हार्टशॉर्न - १५९
व्हॅरिस्को - ५०७
हॉब्स - २६९
हॉयल फ्रेड - ३२६, ३३०
हॉल स्टॅन्ले - ८६३
व्हाइटहेड - ३६३
व्हॉल्टेअर - १६१९

(हि)
हिग्स पीटर - ३३०
हिप्पोक्रेटस - ३७
हिल नेपोलियन - १६२१
व्हिक्टर संत - ७३७

(हु)
हुजवीरी अली बिन उस्मान अल् - जल्लाबी दाता गंज बख़्श - ५५, २४१, ६००, ६३२, ६३८, ६४३, ७२४, ७२६, ७२७, ७८१, ७८३, ७८७, ७८९, ७९०, ८२७, ८२८, ८३९, ८४०, ८७९, ८८६, ८९१, ८९६, ९०४, ९१४, १०२३, १०२६, १०७१, १०७२, १०७३, १०७७, १०९४, ११०५, ११०६, १११२, १११६, ११२१, ११३५, ११३६, ११५१, ११५२
हुज़ेफा - १३९७
हुसैन - १०६८
हुसैन इमाम - ६२८

(हू)
हूद - १२९०, १२९२
ह्यूगो - ७३७
ह्यूजेस सर टी. पी. - ८९१
ह्यूम - ५८३, १६१३
ह्यूम डेव्हिड - २२, ४५, ५४, २६९, ७०४, १६२२

(हे)
हेराक्लाइटस/हेरॅक्लिटस - २६९, ३२४, ३६०, ५०७

(है)
हैदराबादी ख़्वाजा हबीबी अलीशाह - १०८१, १०८२

(ज्ञा)
ज्ञानदेव - ९३८
ज्ञानेश्वर - संत ज्ञानेश्वर महाराज - ५१४, ५२२, १३४३, १४२७, १४३१, १६१८

## स्रोत ग्रंथ


८१. रामचंद्र कृष्ण कामत – 'नामचिंतामणि' पृ. ६७–११०

८२. मुहम्मद ग़ौस ग्वाल्हेरी–'जवाहिर–ए–ख़म्सा' पृ. ६४–६५,८१–८६,९१,९४–९५,११२,१२४–२५,१५०.

८३. डॉ. जी. ए. हेरक्लॉट – 'इस्लामची जीवनपद्धती' – पृ. १४०–५७. (मूळ दखनी ग्रंथकार ज़फर शरीफ़ उपाख्य लाला मियाँ – 'कानून–ए–इस्लाम')

८४. महामहोपाध्याय डॉ. गोपीनाथ कविराज – तांत्रिक वाङ्मय मे शाक्तदृष्टि' पृ. ५३–५७, ७५–७७.

८५. महामहोपाध्याय डॉ. गोपीनाथ कविराज – तांत्रिक वाङ्मय मे शाक्तदृष्टि' पृ. २९२–३०८, ३१३–१५, ३१७–२३.

८६. Abdullah Yasuf Ali - 'The Holy Qur-an' pp. 118-120

८७. अहमद दीदात (अनुवादक – अब्दुल वदूद सिद्दीक़ी – 'कंप्युटर और मोज़िज ए क़ुरआन' (उर्दू अनुवाद) – पृ. ६६–७७, १०८–१२

८८. डॉ. मुहम्मद आज़म – 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' – पृ २८२–८७, ३०१–१४.



**डॉ. मुहम्मद आज़म**

अहमदनगर

हिन्दी, उर्दू आणि फ़ारसी भाषांचे सेवानिवृत्त प्राध्यापक. सूफ़ी साहित्याचे व तत्त्वज्ञानाचे मराठी भाषक गाढे व्यासंगी विद्वान, बहुभाषापंडित. अनेक विद्यापीठीय व राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सक्रिय सहभाग. साहित्य अकादमी, दिल्ली द्वारा वारंवार निमंत्रित. भक्ती व तत्त्वज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील एक मान्यवर विद्वान.